# सूफीवाद
# आणि
# तुलनात्मक धर्मशास्त्र

खण्ड १

डॉ. मुहम्मद आज़म



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# सूफ़ीवाद
# आणि
# तुलनात्मक धर्मशास्त्र
## (त्रिखण्डात्मक)

## खण्ड – एक

**डॉ. मुहम्मद आज़म**
एम.ए. (हिन्दी–फ़ारसी); एम.एड. (तौलनिक शिक्षणशास्त्र);
पीएच.डी. (हिन्दी); एम.ए. (समग्र उर्दू); पीएच.डी. (उर्दू)
माजी हिन्दी, उर्दू आणि फ़ारसी विभाग प्रमुख,
अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर – ४१४००१ (महाराष्ट्र)
दूरध्वनी : (०२४१) २३४३७५८
भ्रमणध्वनी : ८३०८३३०६३४

*महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई*

वाय ३८९–१

- **सूफीवाद आणि तुलनात्मक धर्मशास्त्र (त्रिखण्डात्मक) खंड एक**

  डॉ. मुहम्मद आजम

- **पहिली आवृत्ती :** २०१९

- **प्रकाशक :**

  सचिव,
  महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
  रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
  पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
  सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५.

- **अक्षरजुळणी :**

  सौ. अनिता विनायक भालेराव,
  क्रिएशन, 'जयश्री', एन-१, सिडको,
  औरंगाबाद - ४३१ ००३
  दूरध्वनी : ०२४०-२४८६९१०

- **मांडणी व रचना :**

  श्री. विनायक अंबादास भालेराव
  औरंगाबाद - ४३१ ००३
  भ्रमणध्वनी : ९४२३३९६८८१

- **मुद्रक :**

  व्यवस्थापक,
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  कोल्हापूर-४१६ ००३.

- **मुखपृष्ठ :**

  श्री. भ. मा. परसवाळे, हिंगोली
  भ्रमणध्वनी : ९४०३२२४१३०

- **एकत्रित मूल्य : ६८५**

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अध्यक्षांचे मनोगत

आज आपण एकवीसाव्या शतकात शिक्षण, विज्ञान अन् तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रगतीचा एक एक टप्पा गाठत असताना जगभरात अवर्षणाचं, अतिवृष्टीचं आणि पर्यावरण असंतुलनाचं संकट आपल्या डोक्यावर घोंगावत असताना जाती-धर्माच्या नावानं दहशतवादाचं भूत भेडसावत आहे. यातून जगभर अशांती अन् भीतीच्या काळ्याकुट्ट ढगांनी आसमंत भरून व्यापला आहे.

खरे तर सुखद जगण्यासाठी धर्म पाळणे, हा निसर्गाचा जगमान्य नियमच आहे. निसर्गात प्रत्येक गोष्ट निसर्ग नियमाप्रमाणेच घडत असते. नियम मोडले की निसर्ग शिक्षा करतो. आपणही जगताना, वागताना, खाताना नियम मोडला की शिक्षा होणारच; पण बरेचदा ती दृश्य स्वरूपात नसते. आपले खाणं-पिणं अन् वागण्यातून आपल्या शरीर-मनाची जडण-घडण होत जाते. शरीर हे स्वयंचलित यंत्र आहे. चुकीचे केले की बिघाड ठरलेला. मग त्याची सर्व्हिसिंग स्वत: अथवा डॉक्टरांकडे जाऊन करावी लागते.

समाजात प्रत्येक माणूस या समाजाचा घटक असतो. समाज धर्म भावनेने बांधलेला असतो. प्रत्येक धर्मात स्वातंत्र्य, बंधूभाव आणि समतेचा संदेश हा मूळ गाभा असतो. मात्र प्रत्येक धर्मातील काही माणसे स्वार्थ, मोह, हेवा याचे गुलाम बनून हिंसकवृत्तीचे बळी बनतात. अन् त्यातून अतिरेकी दहशतवाद डोकं वर काढतो.

डॉ. मुहम्मद आज़म यांनी 'सूफ़ीवाद आणि तुलनात्मक धर्मशास्त्र' या बृहद ग्रंथात या मानवी प्रवृत्तींचा शोध घेतांना यावर मानवता धर्माचा मार्ग प्रतिपादिला आहे. ते म्हणतात, सूफ़ी हे इस्लाम धर्माचे पाईक, शांतीचे खंदे पुरस्कर्ते आहेत. सूफ़ी धर्म तत्त्वज्ञान शांती मार्ग आहे. जगभरातील अशांततेचं मूळ प्रत्येकाच्या स्वार्थात आहे. प्रत्येक चांगल्या अन् वाईट गोष्टींची सुरुवात आपल्यापासूनच होत असते. त्याकरिता सदाचार हा परमार्थाचा पायाच आहे. शांतीचे अन् विश्वबंधुत्वाचे साम्राज्य जगभर नांदावे हे इस्लाम धर्माचे उदात्त ध्येय व उद्दिष्टच आहे आणि या करिता सूफ़ी संत झटत आले आहेत.

जगभरातील माणसं ही एकाच परमेश्वराची लेकरे आहेत, त्यामुळे सर्वांनी परस्पर प्रेम अन् गुण्या-गोविंदाने जगावे, असे सर्व धर्मातील संत-महात्म्यांनी सांगून ठेवले आहे. जगभरातील लढाया, दंगेधोपे बंड-उठावाच्या मुळाशी मानवी मनाचा स्वार्थच आहे.

त्यामुळेच सर्व संतांनी मन आवरा हा संदेश देऊन, प्रसंगी स्वार्थी माणसं जागोजागी दहशतवाद अन् हिंसा सुरू ठेवत आहेत. यास वेसण घालण्याचं काम सूफ़ी व अन्य सर्व संत वर्षानुवर्षे शिकवण देत आले आहेत. सद्‌विचार व सदाचार हे सूफ़ी संतांचे गुणकारी औषधच आहे.

या निसर्ग सृष्टीमध्ये प्रत्येक गोष्टीत विविधता आणि वैचित्र्य आढळून सर्व एका निसर्ग नियमाने ती बांधलेली आहेत. प्रत्येकाने नियम पाळणे हा इथला कायदा. जो नियम मोडेल, त्याला शिक्षा ठरलेली; परंतु काही माणसे मनाविरुद्ध स्वार्थाच्या आहारी जाऊन हिंसेचे पाईक बनतात. अन् तिथचं दहशतवादाचा उदय ठरलेला. यावरचा उपाय डॉ. आज़म यांनी या ग्रंथात सांगितला आहे. ते म्हणतात, संपूर्ण जगास विश्वबंधुत्व आणि विश्वशांतीची तहान भूक आहेच. त्याकरिता सर्व धर्मांचा तौलनिक अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. हेच काम डॉ. आज़म यांनी या ग्रंथात समर्थपणे केले आहे. या बृहत ग्रंथात त्यांनी भारतीय तत्त्वज्ञान, पाश्चात्य तत्त्वज्ञान, इस्लामी तत्त्वज्ञान, आणि सूफ़ी तत्त्वज्ञान यांची सुलभपणे ओळख करून दिली आहे.

आपापल्या मनाची शांती ढळू न देता, सर्व धर्म तत्त्वांचा आदर करत मानवी मूल्य जपण्यासाठी मनाची प्रसन्नता टिकवावी लागेल. संत तुकोबांनी मनाच्या अशा प्रसन्नतेत सिद्धीची बीजे पाहिली आहेत. तेच कार्य 'सूफ़ीवाद आणि तुलनात्मक धर्मशस्त्र' या डॉ. मुहम्मद आज़म यांच्या ग्रंथांच्या माध्यमातून होत आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास या ग्रंथ प्रकाशनाची संधी त्यांनी दिली, त्याबद्दल त्यांचे आभार.

दिनांक : १४/१/२०१८

**बाबा भांड**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य
आणि संस्कृती मंडळ,
मुंबई.

# अभिप्राय : डॉ. भालचंद्र नेमाडे

रा. मुहम्मद आजम यांचा प्रस्तुत 'सूफीवाद आणि तुलनात्मक धर्मशास्त्र' हा ग्रंथ महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीत महत्त्वाचे कार्य केलेल्या सूफी दर्शनावरचा एक पायाभूत ग्रंथ ठरेल, याची मला खात्री आहे. अनेक वर्षांच्या परिश्रमाचे हे फळ असून मराठी साहित्य, संस्कृतीआणि धर्मविचार या क्षेत्रांतील अभ्यासक्रमांना अपरिहार्य ठरेल अशी सांगोपांग माहिती ह्या त्रिखंडात्मक बृहद्ग्रंथात मिळते. सूफी विचारावर एकत्रित असा व्यासंगपूर्ण तपशील मराठीत कुठल्याही अन्य ग्रंथात सापडणार नाही. मी अनेक वर्ष तौलानिक भारतीय साहित्य अनेक विद्यापीठांमध्ये शिकवत असतांना संपूर्ण जगात प्रभावशाली ठरलेल्या ह्या तत्त्वज्ञानासंबंधी मला परक्या भाषांमधील पुस्तकांचाच आधार घ्यावा लागे, कारण मराठीत ह्या विषयावर सविस्तर चर्चा करणारी सामग्री फारशी नव्हती. आता रा. मुहम्मद आजम ह्या मराठी विद्वानाने लिहिलेल्या ग्रंथांनी ही उणीव बऱ्याच अंशी भरून येत आहे.

मराठीत तसेच इतर भारतीय भाषांमध्येही सूफी तत्त्वज्ञानाच्या प्रभावाचे कार्य फार मोठे ठरले आहे. विनोबा भावे, साने गुरुजी, रा. चिं. ढेरे, सेतु माधवराव पगडी आदि लेखकांनी ह्याबद्दल मौलिक ग्रंथरचना करून ठेवली आहे. अस्सल भारतीय बहुविधता आणि सहिष्णुता जोपासणारे आणि इथल्या देशी परंपरा, लोककला, लोकाचार जपणारे सूफी तत्त्वज्ञान सिंधी, पंजाबी, काश्मिरी, हिंदी आदि उत्तरेतील भाषांमध्ये क्रांतिकारक बदल करणारे ठरले आहेत. गुरू नानक, कबीर, शाह लतीफ, बंगाली बाऊल फकीर असे मोठमोठे भारतीय साहित्यकार सूफी प्रभावाची जिवंत ओळख करून देतात. महाराष्ट्रात शिवाजी महाराजांच्या घराण्यात, एकनाथाच्या गुरूपरंपरेतील सय्यद चांदसाहेब कादरी उर्फ चांद बोधला, तुकारामाच्या चिस्ती सूफी गुरू परंपरेच्या सय्यद बंदानवाज गेसूदराज आणि महादजी शिंदे यांच्यापर्यंत सूफी संतांना मध्यवर्ती स्थान होते. मराठी संस्कृती किती समावेशक आहे, याचे हे ठळक उदाहरण आहे. देवगिरीजवळ खुल्दाबाद येथे तर मोठे सूफी विद्यापीठ भरभराटले होते. गावोगाव पीर, समाध्या, जत्रा आजही आढळतात. सूफी विचारांद्वारे आपण अरबस्तान, इराण, तुर्कस्तान आणि उझबेक वगैरे मध्य आशियातील संस्कृतींशी बंधुभावाच्या नात्याने जोडले गेलो होतो. देशाबाहेरील ग्रीक, इराणी, झरतुष्ट्र, खिस्ती ह्या तत्त्वज्ञानांशी तसेच देशी जैन, बौद्ध आणि इतर भारतीय दर्शनांशी स्वतःला सेंद्रियपणे जोडूण घेणारा भारतीय सूफी वाद आपल्या सर्व भाषांमध्ये अत्यंत सर्जनशील ठरला आहे. मराठीत एकनाथ, तुकाराम ही देदिप्यमान उदाहरणे सूफी प्रभावाची आहेतच. महाराष्ट्रातला पहिला सूफी कवी शहा मुंतोजी ब्राह्मणी (बहामनी) याच्या दखनी भाषेतील पंचीकरण ग्रंथात लिहिल्याप्रमाणे :

।। हिंदू - मुसलमान येक कर दिये ।।

हे सूफी स्वप्न आपल्याला अजूनही पुरे करता येऊ  नये, याची खंत वाटते. मराठी भक्तीकाव्यात ईश्वराला प्रेयसी मानून भक्तीरस अविष्कार करण्याची उन्मनावस्था म्हणजे मधुराभक्तीचे मूळ ही सूफी-मराठी संयोगात सापडते.

कुराणात इस्लामचे त्याज्य ठरवलेल्या संगीतनृत्यादि कला सुफीनी बंडखोरी करून प्रत्यक्ष आचरणात आणल्या आणि हा सनातनी दुराग्रह टाकून देऊन उत्तुंग सर्जनशीलता जोपासली. साहित्यात तर वैश्विक मानदंड ठरतील असे मीर, गालिब, मोमिन हे कवी प्रभावशाली होते. उर्दू ह्या महाराष्ट्रात जन्मलेल्या आर्यभाषेत उत्तमोत्तम काव्यप्रकार, अलंकार, शैलीरूपे आणि मुशायरादि जगात कुठे नसतील असे लोकाभिमुख वाङ्मयव्यवहार रुढ केले. भारतीय संगीताला सूफी तत्त्वज्ञानाने दिलेले गौरवशाली रूप तर अमीर खुस्रोपासून आजपर्यंत बहरत आले आहे.

रा. मुहम्मद आजम यांनी आपल्या व्यासंगी शैलीत अनेक तपशील मार्मिक पद्धतीने दिले आहेत आणि जागतिक सूफी वाङ्मयाच्या नकाशावर भारतीय सूफी संप्रदायांचे अमूल्य योगदान सिद्ध केले आहे. मोठा आवाका असूनही हा ग्रंथ त्यांच्या अस्सल मराठी भाषेच्या वापरामुळे वाचनीय झाला आहे. सूफी तत्त्वज्ञानासंबंधी एकत्रितपणे सुसंगत मांडणी करण्याचे रा. आजम यांचे कौशल्य वाखाणण्या सारखे आहे. त्यांनी वापरलेली परिभाषा आणि शैली अहमदनगरच्या अस्सल मराठमोळ्या धाटणीमुळे सुलभ अर्थवाही झाली आहे. मराठी मातृभाषा असलेल्या मुसलमान विद्वानांमध्ये त्यांना महत्त्वाचे स्थान मिळाले पाहिजे. उदा. ''अध्यात्माच्या प्रक्रियेत कठीण चढण चढून गेल्यावर जे घाटमाथे लागतात'', त्या अवस्थांचे त्यांनी केलेले विश्लेषण पाहावे. मराठीतल्या नव्या पिढीतल्या मुसलमान लेखकांनी ही परंपरा जोपासली पाहिजे, कारण ही महाराष्ट्राची वैभवशाली भक्तीपरंपरा आहे.

रा. मुहम्मद आजम यांनी हा बहुमोल ग्रंथ रचून मराठीची अतुलनीय सेवा केली आहे. प्रचंड मोठा जागतिक विचारांचा आवाका असूनही त्यांनी संपूर्ण विवेचन संतुलित आणि सुबोध केले आहे. मराठीच्या विद्यार्थ्यांना तसेच आंतरविद्याशास्त्रीय तौलनिक साहित्याच्या अभ्यासकांना हा संदर्भग्रंथ अत्यंत उपयुक्त ठरेल, याची मला खात्री आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष रा. बाबा भांड यांनी ह्या बहुमोल प्रकाशनाची जबाबदारी लक्षपूर्वक पार पाडली, हे स्तुत्य आहे.

**डॉ. भालचंद्र नेमाडे**

गोहाती,
२६ जानेवारी २०१८

# ग्रंथकर्त्याचे मनोगत

**चालना व संकल्प :**

५ मे २००९ रोजी माझे प्रथम ग्रंथ ''सूफ़ी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन''ची हस्तलिखित प्रत प्रकाशक श्री. अरुण जाखडे यांच्या स्वाधीन केल्यानंतर मी त्या ग्रंथलेखनाचा शीण घालविण्यासाठी जवळ-जवळ तीन वर्षे लेखनकार्यास विराम दिला होता. मात्र दरम्यान माझे जिवलग मित्र सोलापूरचे **प्रा. फ़ख़्रुद्दीन बेन्नूर** हे आपल्या खाजगी कामानिमित्त अहमदनगरला आले असता वेळ काढून माझ्या घरी येऊन भेटले. कुशल-मंगल झाल्यानंतर त्यांनी सहज विचारले, 'सध्या काय चालले आहे?,' 'काही नाही, आराम आहे,' मी उत्तरलो. माझे हे उत्तर ऐकून ते संतापून गरजले, 'असे काय करता? वृद्धापकाळ आहे. तब्येतीचे काही खरे नसते. अद्याप तुमचे आरोग्य उत्तम आहे. उरलेल्या वेळेचा सदुपयोग करा. तुमचा पुढचा मनोनीत प्रकल्प तत्काळ हाती घ्या.'

माझे डोळे उघडले. सल्ला पटला. मी ताबडतोब दुसऱ्या दिवसापासून माझे मनोनीत प्रकल्प म्हणजेच **'सूफ़ीवाद आणि तुलनात्मक धर्मशास्त्र'**च्या लेखनास सुरुवात केली. हा प्रकल्प दि. १० एप्रिल २०१२ रोजी हाती घेतला व तो दि. १० मार्च २०१४ रोजी तडीस नेला. मित्रवर्य प्रा. बेन्नूर यांच्या प्रेमळ कानउघाडणीसाठी मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. त्यांची कानउघाडणी माझ्या सदरहू ग्रंथलेखनासाठी ऊर्जस्वी व ओजस्वी प्रेरणाच ठरली! तिने पुढील लेखनकार्यास शेवटपर्यंत हुरूप देऊ केले.

**प्रयास :**

ग्रंथलेखनाचा आराखडा निश्चित करण्यामध्ये आणि प्रकरणांची मांडणी व विभागणी करण्यामध्ये प्रो. देविदास दत्तात्रेय वाडेकरद्वारा संपादित ''मराठी तत्त्वज्ञान - महाकोश'' (त्रिखंडात्मक)च्या तिन्ही खंडांचा बहुमोल उपयोग झाला. इतकेच नव्हे तर माझ्यासारख्या वाङ्मयाच्या एक साधारण अभ्यासकास तत्त्वज्ञानाची बैठक भक्कम करण्यामध्ये या महाकोशाचा हातभार आहे, हे नाकारता येत नाही. याच्या अभ्यासामुळे तत्त्वज्ञानाच्या गूढ आणि रुक्ष संकल्पना सुस्पष्ट होत गेल्या. भारतीय व पाश्चात्य तत्त्वज्ञानाची चांगली ओळख झाली. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासास योग्य दिशा मिळाली आणि लेखनाचा मार्ग सुकर झाला. ग्रंथलेखन तीन पदरी असल्याचे वाचकांना आढळून येईल. पहिले पदर भारतीय तत्त्वज्ञानाचे, दुसरे इस्लामी तत्त्वज्ञानाचे; तर

तिसरे सूफ़ी तत्त्वज्ञानाचे. काही ठिकाणी स्वतंत्रपणे पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचे विवेचन आढळून येईल. या मांडणीमुळे वाचकांच्या मनात परोक्ष तुलना सहजपणे प्रस्थापित होऊ शकेल.

उपरोक्त तीन्ही खंड माझ्या अभ्यासासाठी अहमदनगरचे प्रसिद्धीपराङ्मुख आणि अत्यंत विनम्र असे **सूफ़ी फैयाज़ अहमद पटेल,** माजी अतिरिक्त आयुक्त, सहकार, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पुरविले. हे ग्रंथ माझ्या प्रथम प्रकल्पापासून म्हणजे जवळजवळ आठ-नऊ वर्षे त्यांनी मजजवळ अभ्यासार्थ ठेवण्याची कृपा केली आणि दरम्यानच्या काळात या ग्रंथांविषयी त्यांनी ब्रसुद्धा काढला नाही. मीच ओशाळून त्यांना ते परत घेण्याची विनवणी केली असता ते अत्यंत नम्रपणे म्हणत, ''ग्रंथ हे वाचण्यासाठी, अभ्यासासाठीच असतात. तुमच्यासारख्याकडून त्यांचा सदुपयोग होत आहे, हे मी माझे भाग्य समजतो. ते परत करण्याची मुळीच घाई करू नका. तुमच्या लेखनात त्यांचा भरपूर उपयोग करून घ्या.'' सहकार्याची व सदिच्छेची केवढी ही पराकाष्ठा! त्यांच्या ऋणातून उतराई होणे महाकठीणचनसून जवळजवळ अशक्यच आहे. इतकेच नव्हे तर माझ्या सदरहू ग्रंथाचे जवळजवळ १४०० पानांचे हस्तलेखन अत्यंत सूक्ष्मपणे वाचून 'व्यक्ती-नाम-सूची'चे क्लिष्ट काम पण त्यांनी मोठ्या आनंदाने स्विकारून ते पूर्ण केले. तेच माझ्या या ग्रंथाचे प्रकाशनपूर्व प्रथम वाचक आहेत. त्यांच्या या उत्स्फूर्त सहकार्यासाठी त्यांचे आभार-प्रदर्शनासाठी माझ्याजवळ शब्द नाहीत.

आकाशात उंच उडत असताना सुद्धा घारीचे चित्त तिच्या पिलापाशी असते. तद्वत अहमदनगरपासून लांब पुण्यामध्ये असूनसुद्धा माझे परमस्नेही डॉ. मूसा बागवान व ज्येष्ठ मित्र कै. प्राचार्य रामदास डांगे यांच्या पर्यवेक्षणाची सूक्ष्म दृष्टी मजवर सदोदित राहिली आहे. माझ्या लिखाणाच्या प्रगतीविषयी इत्थंभूत माहिती ते वेळोवेळी घेत असत. त्यांची ही कृपादृष्टीपण माझ्यासाठी प्रेरक ठरली आहे. त्या दोघांना 'उपकार' शब्द रूचणार नाही. म्हणून मी याबाबतीत मौन धारण करणेच श्रेयस्कर ठरेल.

**मनोकामनापूर्तीचे पाच एकसमान आश्चर्यकारक प्रसंग**

**पहिला प्रसंग :** दि. १९ जानेवारी, २०१३ चा जळगाव येथील एक प्रसंग. अध्ययनासाठी इंग्रजी भाषेतील आधारग्रंथांपैकी फक्त ए. जे. आर्बेरी यांचे 'सूफ़ीझम' हे पुस्तक हाती लागणे बाकी होते. अखिल भारतीय मराठी मुस्लिम साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदावरून मी जळगाव येथे दि. १८ जानेवारी २०१३ रोजी माझे अध्यक्षीय भाषण संपवून मध्यंतरामध्ये विश्रांतीसाठी हॉलमधून बाहेर पडलो. इतक्यात **फ़हीम अहमद** नावाचा एक अनोळखी तरुण लगबगीने माझ्याजवळ येऊन बोलताना म्हणाला, 'माझ्याजवळ सूफ़ी तत्त्वज्ञानावर इंग्रजीमध्ये एक पुस्तक आहे. ते आपणास उद्या दाखवितो. वायद्याप्रमाणे तो मला दुसऱ्या दिवशी त्या पुस्तकासह भेटला. काय आश्चर्य! त्याने माझे बहुप्रतीक्षित पुस्तकच मला दाखविले! चिंच पाहिल्याबरोबर जसे तोंडास पाणी सुटते तद्वत माझ्या मनात ए. जे. आर्बेरीच्या त्या 'सूफ़ीझम' या पुस्तकाविषयी उत्कट लालसा निर्माण झाली. मनातील लालसा जिव्हेवर तत्काळ पोहोचली आणि ती उच्चारण्याअगोदरच काय चमत्कार! त्या उदार तरुणानेच स्वेच्छेने ते पुस्तक मला सहर्ष सप्रेम भेट दिल्याचे घोषित केले. ही ईश्वरी कृपेची लीला नव्हे तर काय आहे! सदरहू पुस्तकाचा मला 'रक़्स' (सूफ़ींचे नृत्य), नामस्मरण विधी आणि सूफ़ीशास्त्र व सरावाची संरचना या विषयावरील लेखनासाठी बहुमोल उपयोग झाला.

**दुसरा प्रसंग :** दि. ४ एप्रिल २०१३ रोजी बार्शी (जि.सोलापूर) येथे **सूफ़ी गुलाम हुसैन मुस्तफ़ा बेग** यांच्याकडून 'दि मॉडर्न पार्शियन डिक्शनरी' (पर्शियन–उर्दू–इंग्लिश) हा प्रोफेसर एफ्. डी. रज़ी यांचा हा मनोवांछित शब्दकोश अयाचितपणे स्वयंस्फूर्त रीतीने सप्रेम भेटस्वरूप प्राप्त झाला. तत्कालीन चाललेल्या माझ्या लेखनासाठी उपरोक्त शब्दकोशाची मला खरोखर नितांत आवश्यकता होती. परमेश्वरानेच न मागता माझी ही गरज आपोआप पूर्ण केली.

**तिसरा प्रसंग :** 'भक्तीचा राजमार्ग : ईश्वराचे नामस्मरण' या विषयाचे लेखन करण्यासाठी माझ्या डोक्यात त्याची रुपरेषा निर्माण होत असताना तत्संबंधी भारतीय संतांची संकल्पना मांडणे जरूर होते. याची निकड दि. १ जुलै, २०१३ रोजी **सूफ़ी फैयाज़ अहमद पटेल** यांनी त्याच सुमारास उत्स्फूर्तपणे दिलेल्या रामचंद्र कृष्ण कामत यांच्या 'नामचिंतामणी' या पुस्तकाने भागविली. हा निव्वळ योगायोग नसून, ती ईश्वरी कृपाच आहे!

**चौथा प्रसंग :** ''सूफ़ी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन'' माझ्या या ग्रंथाने प्रभावित होऊन अहमदनगर येथील एक **सुप्रसिद्ध गायक पवन नाईक** याने स्वेच्छा माझे शिष्यत्व ग्रहण केले. 'समाअ'विषयी इस्लामी (धार्मिक) दृष्टिकोन समजून घेण्यासाठी दि.२० सप्टेंबर, २०१३ रोजी सच्छिष्य पवन नाईक यांनी दिलेले सूफ़ी फ़क़ीर सय्यद महबूब अली शाह निज़ामी यांचे 'समाअ' (क़व्वाली) हे इंग्रजी पुस्तक फार उपयोगी पडले. पूर्ण ब्रह्मस्वरूप 'ॐकार'च्या लेखनासाठी त्यांनी दिलेले श्री. राधागोविंद पातर यांचे 'मानव और धर्म' हे पुस्तक पण अत्यंत उपयोगी सिद्ध झाले. 'समाअ'चे विवेचन प्रस्तुत करण्यासाठी भारतीय संगीताची पृष्ठभूमी जाणून घेणे परम आवश्यक होते. याची परिपूर्तता 'संगीत विशारद' लेखक वसंत (संपादक – डॉ. लक्ष्मीनारायण गर्ग) या ग्रंथामुळे झाली; आणि त्यामुळे लिखाणास थोडीफार खोली प्राप्त झाली. उपरोक्त तीन्ही ग्रंथ मी न मागता सच्छिष्य पवन नाईक यांनी स्वत: होऊन माझ्या अभ्यासासाठी घरपोच केले. ही पण अयाचित ईश्वरी कृपा नव्हे काय? सच्छिष्यास अयाचित बहुमोल मदतीसाठी शुभ आशीर्वादाव्यतिरिक्त सर्वोत्तम उपहार कोणता बरे असू शकेल! तर जळगावचा तो अनोळखी तरुण **फ़हीम अहमद** याचे आभार प्रदर्शन करणे अगत्याचे आहे. **सूफ़ी गुलाम हुसैन मुस्तफ़ा बेग** आणि **सूफ़ी फ़ैयाज़ अहमद पटेल** या सूफ़ीद्वयांच्या ऋणात ऋणांकित राहणेच ग्रंथकर्त्यास आवडेल.

**पाचवा प्रसंग :** पाचवा शेवटचा चमत्कार हा रविवार दिनांक २७ ऑगस्ट २०१७ रोजी स्वप्नातही नसताना अकस्मात घडला. तो असा – मुक्काम बोल्डा, ता. कळमनुरी येथील **श्री. शफ़ी गोल्डेकर** हे माझे 'सूफ़ी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन' या ग्रंथाचे चाहते आणि उत्कट प्रेमी आहेत. त्यांचा उपरोक्त तारखेस अकस्मात फोन आला. सूफ़ी संदर्भातील आपले एक ग्रंथ प्रकाशनाची सुवार्ता कळविली. या प्रकाशन समारंभाचे प्रमुख वक्ते म्हणून हिंगोलीचे प्रसिद्ध चित्रकार **श्री. भ. मा. परसवाळे** हे होते. माझ्या प्रस्तुत ग्रंथासाठी फक्त मुखपृष्ठ निश्चित करण्याचे नियोजन बाकी होते. उपरोक्त दिवशी श्री. शफ़ी यांनी

श्री. परसवाळे यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळवून दिली. संयोगाने श्री. परसवाळे सुद्धा सूफ़ी तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक असल्यामुळे त्यांनी माझ्या नवलेखनाविषयी सहज चौकशी केली आणि माझ्या या प्रस्तुत 'सूफ़ीवाद आणि तुलनात्मक धर्मशास्त्र' या ग्रंथाची रूपरेषा जाणून घेतली व तत्काळ उत्स्फूर्तपणे त्यांनी आपले मनोगत व्यक्त करून सदरहू ग्रंथासाठी सुंदर कलात्मक व समर्पक असे मुखपृष्ठ तयार करून देण्याचे अभिवचन दिले व ते त्यांनी पाळले. या शेवटच्या मनोकामनेपूर्तीसाठी पण माझ्यासाठी प्रभूकृपा धावून आली असेच म्हणावे लागेल. श्री. भ.मा. परसवाळे यांच्या या स्वयंस्फूर्त सहयोगासाठी त्यांच्या प्रती मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्यच समजतो. त्यास्तव मी त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

अशा प्रकारे ज्या ज्या वेळेस ज्या ज्या ग्रंथांची गरज होती त्या त्या वेळेस परमेश्वर आपल्या कृपेने ते ते ग्रंथ उपरोक्त पाच व्यक्तींमार्फत अनायास पुरवीत गेला. केवढे हे त्याचे अनंत उपकार! त्या उपकारास स्मरून परमेश्वराचे आभारप्रदर्शनासाठी 'पवित्र कुराण'मधील पुढील श्लोक अनायास ओठावर येतो –

''फ़ज़्कुरुनी अज़्कुर्–कुम वश्कुरुली व ला तक्फ़ुरुनि'' – २:१५२

म्हणजेच ''तर तुम्ही माझे स्मरण करा; म्हणजे मीही तुमचे स्मरण ठेवीन आणि माझे आभार मानीत राहा व माझ्याशी कृतघ्न होऊ नका.'' – २:१५२

**ग्रंथरचनेची षट्सूत्रे**

सारांश, प्रेरणा, प्रोत्साहन, पाठबळ, प्रयत्न, प्रसाद आणि प्रभू–कृपा ही या ग्रंथरचनेची षट्सूत्रे आहेत.

**(१) प्रेरणा :** सोलापूरचे मित्रवर्य **प्रा. फ़ख़्रुद्दीन बेन्नूर** यांची.

**(२) प्रोत्साहन :** परमप्रिय **डॉ. मूसा बागवान** आणि ज्येष्ठ मित्र **कै. प्राचार्य रामदास डांगे** यांचे प्रोत्साहन; तसेच **डॉ. रहीमशामियाँ चांदमियाँ शेख** या ज्येष्ठ स्नेह्यांचे वेळोवेळी दिलेले सल्ले शक्तिवर्धक सिद्ध झाले आहेत.

**(३) पाठबळ :** बार्शीचे **सूफ़ी गुलाम हुसेन शाह मुस्तफ़ा बेग** आणि अहमदनगरचे **सूफ़ी फ़ैयाज़ अहमद पटेल,** माजी अतिरिक्त आयुक्त, सहकार, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आत्मिक व आध्यात्मिक पाठबळ.

**(४) प्रयत्न :** या बृहत् ग्रंथाच्या प्रकाशनाच्या विवंचनेत असताना माझे परममित्र **कॉ. विलास सोनवणे** हे माझ्या मदतीला धावून आले. त्यांनी या कामी पुणे येथील हर्मिसचे प्रकाशक **श्री. सुशील धसकटे** यांना हे मोठे व अवघड काम हाती घेण्याचे धाडस निर्माण करण्याविषयी प्रेरित केले व **श्री. धसकटे** यांनी पण कंबर कसली. त्यांनी नेटाने अक्षर जुळणीचे संगणकीय कार्य तडीस नेले. खरे तर या दोघांच्या प्रयत्नामुळेच हा ग्रंथ दृश्य स्वरूपात येऊ शकला.

या ग्रंथ प्रकाशनास चालना देणाऱ्या **कॉ. सोनवणे** व **श्री. धसकटे** यांचे आभार कसे मानावेत, हेच कळेनासे झाले आहे.

शेवटी ग्रंथाचा आकार, रचना व मांडणी तसेच इतर सर्व संगणकीय सोपस्कार कमीत कमी वेळेत कलात्मक, दर्जेदार व उच्च गुणवत्तेचे करून दिल्याबद्दल औरंगाबादचे **श्री. विनायक भालेराव** व **सौ. अनिता विनायक भालेराव** या दंपतीद्वयांचे आणि त्यांचे कुशल सहकारी **श्री. अनंत भालेराव** व अरबी वर्णाक्षरांसाठी **श्री. बिलाल** यांनी सहकार्य केले. या सर्वांचे आभार प्रदर्शन करणे अटळ असून अगत्याचे पण आहे. म्हणून या सर्वांचे मन:पूर्वक आभार!

**(५) प्रसाद :** संत-महात्मे आणि विद्वज्जनांचे कृपा-प्रसाद आणि सर्वांत शेवटी वाचकांची सदिच्छा ग्रंथकर्त्यासाठी 'पसायदान'च!

**(६) प्रभू-कृपा :** गरजेची पुस्तके यथायोग्य वेळेस विनासायास व अनायास पुरविण्यासंबंधी उपरोक्त पाच एकसमान आश्चर्यकारक प्रसंग घडवून आणणारी ईश्वरी कृपा म्हणजे प्रभू-कृपाच होय.

**एक लक्षवेधी सूचना**

प्रकरण २५ - ''मंत्र : शास्त्र, सिद्धी, तंत्र आणि विद्या''मधील 'जादू किंवा यातुविद्या : इस्लामी व सूफ़ी दृष्टिकोन' या विवेचनांतर्गत वशीकरण आणि ताईतच्या संदर्भातील काही लिखाणावरून अंधश्रद्धेला प्रोत्साहन देण्याचा ग्रंथकाराचा हेतू आहे की काय असा संशय बळावण्याची दाट शक्यता आहे. मात्र इस्लामी लोकव्यवहार व लोकनीतिची कल्पना वाचकांना यावी, एवढ्याच मर्यादित हेतूने त्याने सदरहू भाग समाविष्ट केले आहे. हा मुद्दा वाचकांनी जरूर लक्षात घ्यावा. किंबहुना सूफ़ींकडून यांचा वापर क्वचितच आणि केवळ लोककल्याणाच्या गरजेपोटी विनामोबदला होत असल्याचे आढळून येते.

काही काही ठिकाणी वाचकास पुनरावृत्तीचा दोष आढळून येईल. आवश्यकतेच्या अनिवार्यतेमुळे असे घडले आहे. अटळ असल्यामुळे नाइलाजास्तव पुनरावृत्तीचा दोष दृष्टिपथात येतो. म्हणून वाचकांच्या उदारतेची अपेक्षा आहे.

इस्लाम धर्म किंवा तत्त्वज्ञानसंदर्भात, तसेच सूफ़ी तत्त्वज्ञान संदर्भातील विवेचनामध्ये संपूर्ण ग्रंथभर अनेक अवतरणे वाचकांना दिसतील. अवतरण संपल्यानंतर एका पाठोपाठ एक अशा दोन संख्या आणि मध्ये **:** (विसर्ग चिन्ह) दिसेल. पैकी प्रथम संख्या ही पवित्र कुरआनमधील सूरा **:** अर्थात् अध्याय क्रमांक निदर्शक आहे, तर दुसरी संख्या त्या अध्यायामधील आयत (आयात) अर्थात् महाश्लोक क्रमांक दर्शविते.

**सहायक व संदर्भ ग्रंथांविषयी थोडेसे...**

हे ग्रंथ तीन प्रकारात मोडतात- (१) संदर्भ ग्रंथ, (२) स्रोत ग्रंथ आणि (३) परामर्शित ग्रंथ. साधारणत: उद्धरण जर दोन पृष्ठांइतका असेल तर त्याची गणना संदर्भ ग्रंथ स्वरूपात करण्यात आली आहे. हा संदर्भ मजकूर संपताच त्याखाली कंसात देण्यात आला आहे. जर अवतरण त्यापेक्षा मोठे असेल तर त्याची गणना स्रोत ग्रंथ स्वरूपात करण्यात आली आहे. स्रोत ग्रंथांची सूची ग्रंथाच्या शेवटी ससंदर्भ देण्यात आली आहे. गरजेपुरते अवलोकन करण्यात आलेल्या ग्रंथांना परामर्शित ग्रंथ म्हणून संबोधण्यात आले आहे. याची यादी पण शेवटी दिलेली आहे. ग्रंथकर्ता हा उपरोक्त सर्व प्रकारच्या ग्रंथ-लेखकांचा ऋणी आहे. त्यांच्या आधाराविना ग्रंथरचनाच करता आली नसती.

**अर्पण पत्रिकेविषयी**

शेवटी ईश्वरी कृपेशिवाय ग्रंथरचना पूर्णत्वास नेणे अशक्यप्राय असल्यामुळे **अल्लाहच्या** उपकाराप्रीत्यर्थ सर्वप्रथम ''अर्पण पत्रिका'' नमूद केल्याशिवाय राहवत नाही. म्हणून या ग्रंथाचा आरंभ 'अर्पणपत्रिके'ने होतो.

**कृतज्ञता ज्ञापन**

या ग्रंथाचे 'सूफ़ी तत्त्वज्ञान : सखोल विश्लेषण' या स्वरूपातील हा ग्रंथ जवळजवळ दोन हजार (२,०००) पृष्ठे इतका बृहत असल्याकारणाने छपाईसाठी थोड्या फार प्रमाणात आर्थिक भार हलका व्हावा या हेतूने ग्रंथकर्त्याने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडे आपला अर्ज पाठवला होता. मात्र मराठी भाषा विभागाच्या तज्ज्ञ समितीला या ग्रंथाचे सविस्तर प्रारूप पाहिल्यानंतर तो इतका आवडला की तिने तो प्रस्ताव बृहद् प्रकल्प स्वरूपात स्विकारण्याची शिफारस मंडळास केली व मंडळाने तो भरघोस आर्थिक अनुदानासह स्विकारण्यात येत असल्याचे कळविले. यामुळे प्रकाशनाची चिंता मिटली आणि मानसिक समाधानच नव्हे तर अत्यानंद पण झाला. म्हणून ग्रंथकर्ता महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि विशेषत: या मंडळाचे अध्यक्ष **श्री. बाबा भांड** यांचा या प्रकल्पामध्ये व्यक्तिश: रस घेतल्याबद्दल सदैव ऋणी आहे.

शेवटी मराठीचे प्रख्यात कादंबरीकार, समीक्षक व विचारवंत, माझे मित्रवर्य, **ज्ञानपीठ पुरस्कार विजेते पद्‌मश्री डॉ. भालचंद्र नेमाडे** यांनी आपल्या निरंतर व्यस्ततेतून, वेळात वेळ काढून या ग्रंथासाठी आपला अभिप्राय पाठविण्याची जी कृपा केली त्याबद्दल ग्रंथकर्ता त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

सूज्ञ वाचकांकडून माझ्या प्रथम ग्रंथासारखेच भरघोस प्रतिसाद मिळेल अशी अपेक्षा.

दिनांक – १४ जानेवारी २०१८

अहमदनगर.

**– डॉ. मुहम्मद आज़म, ग्रंथकर्ता**

दूरध्वनी : (०२४१) २३४३७५८
भ्रमणध्वनी : ८३०८३३०६३४

**संपर्क :– डॉ. मुहम्मद आज़म**
C/o – डॉ. शहनाज़
सर्वे नं. ३२१/१, बंगला नं. २
बॉंबे हॉस्पिटलसमोर, मुकुंदनगर,
अहमदनगर – ४१४ ००२
(महाराष्ट्र)

# अनुक्रम


- अध्यक्षांचे मनोगत – बाबा भांड ..... तीन
- अभिप्राय – डॉ. भालचंद्र नेमाडे ..... पाच
- ग्रंथकर्त्याचे मनोगत ..... सात

**खण्ड – एक**

**विभाग – १ : तत्त्वज्ञान**

**प्रकरण १** तत्त्वज्ञान : सर्वसामान्य, ग्रीक व भारतीय ..... ३
**प्रकरण २** इस्लामी तत्त्वज्ञान ..... १६
**प्रकरण ३** इस्लामी चिंतनाचे दार्शनिक संप्रदाय ..... ६२
**प्रकरण ४** सूफ़ीवाद आणि सूफ़ी तत्त्वज्ञानाच्या संकल्पना ..... ७१

**विभाग – २ : अल्लाह (परात्पर परब्रह्म)**

**प्रकरण ५** अल्लाहचे अस्तित्व (वजूद) ..... १०३
**प्रकरण ६** अल्लाहचे स्वरूप ..... १६२
**प्रकरण ७** ईश्वरवाद अथवा ईश्वरासंबंधी संकल्पना ..... २६६

**विभाग – ३ : ब्रह्मांड**

**प्रकरण ८** उपनिषदेंप्रणीत विश्वोत्पत्ती – विचार ..... ३०१
**प्रकरण ९** सृष्टी – प्रपंच : तौलनिक विवेचन (इस्लामी व भारतीय दृष्टिकोन) ..... ३०७

| | | | |
|---|---|---|---|
| **प्रकरण १०** | विश्वोत्पत्तीविषयक वैज्ञानिक सिद्धान्त व तदविषयक इस्लामी दृष्टिकोनाची वैज्ञानिकता | ..... | ३२४ |
| **प्रकरण ११** | विश्वरचना – विचार : दार्शनिक दृष्टिकोन (भारतीय व पाश्चात्य) | ..... | ३५४ |
| **प्रकरण १२** | ब्रह्मांड – निर्मिती : सूफ़ी दार्शनिक दृष्टिकोन | ..... | ३६७ |
| **प्रकरण १३** | परलोक (आख़िरत) : तौलनिक विवेचन | ..... | ४२८ |
| **प्रकरण १४** | सूफ़ींच्या कल्पनेतील सृष्टीची विलक्षणता व अद्‌भुतता किंवा ईश्वराची अगाध लीला : सृष्टीमधील चमत्कारांचा खेळ | ..... | ४४५ |


**विभाग – ४ : मानव**


| | | | |
|---|---|---|---|
| **प्रकरण १५** | मानव : निर्मिती – प्रयोजन व विशेषता | ..... | ४७९ |
| **प्रकरण १६** | विश्व, मानव आणि ईश्वर | ..... | ४९० |
| **प्रकरण १७** | मानव – देह – विज्ञान : दार्शनिक दृष्टिकोन | ..... | ५०९ |


## खण्ड – दोन


| | | | |
|---|---|---|---|
| **प्रकरण १८** | आत्मा ('रूह') : दार्शनिक विवेचन | ..... | ५५९ |
| **प्रकरण १९** | पुरुषोत्तम (नरोत्तम) | ..... | ६६२ |
| **प्रकरण २०** | आध्यात्मिक जीवन व आध्यात्मिक अनुभूती | ..... | ६८९ |
| **प्रकरण २१** | भक्तिशास्त्र | ..... | ७६६ |
| **प्रकरण २२** | सूफ़ी – प्रेमपंढरीचे वारकरी | ..... | ८४९ |
| **प्रकरण २३** | जपविज्ञान | ..... | ९२७ |
| **प्रकरण २४** | 'समाअ' (संकीर्तन श्रवण, सूफ़ी संगीत श्रवण) | ..... | १०६३ |


## खण्ड – तीन


| | | | |
|---|---|---|---|
| **प्रकरण २५** | मंत्र : शास्त्र, सिद्धी, तंत्र आणि विद्या | ..... | ११६३ |
| **प्रकरण २६** | वर्णाक्षरांचे अध्यात्मशास्त्र | ..... | १२६६ |


**विभाग – ५ : परिशिष्टे**


| | | | |
|---|---|---|---|
| **क)** | **परिशिष्टे – १ ते ६९** | ..... | १३३७ |
| **ख)** | **दार्शनिक चिंतनिका** | ..... | १६११ |
| **ग)** | **व्यक्ती – नाम – सूची** | ..... | १६२३ |

# विस्तारित अनुक्रमणिका

# खण्ड एक

## विभाग – १ : तत्त्वज्ञान


**प्रकरण १ तत्त्वज्ञान : सर्वसामान्य, ग्रीक व भारतीय ..... ३**

(१) तत्त्वज्ञान : अर्थ आणि प्रयोजन [३], (२) तत्त्वज्ञान आणि धर्म [४], (३) तत्त्वज्ञानाचे उद्दिष्ट [४], (४) 'तत्त्वज्ञान' : संकल्पना विश्लेषण [५], (५) ग्रीक तत्त्वज्ञानाचा विकास [६], (६) पौर्वात्य प्रभाव [७], (७) भारतीय तत्त्वज्ञानाचा विकास [८], (८) तत्त्वज्ञान आणि ख्रिश्चन धर्म [८], (९) तत्त्वज्ञान : भारतीय दृष्टिकोन [९], (१०) तत्त्वज्ञानाचे स्वरूप [१०], (११) तत्त्वज्ञान आणि जीवन [११], (१२) तत्त्वज्ञान व गुरुधर्म [१२], (१३) भारतीय तत्त्वज्ञानः एका दृष्टिक्षेपात [१२] – १) लोकायत, २) जैनवाद, ३) बुद्धवाद, ४) सांख्य-योग, ५) न्याय-वैशेषिक, ६) मीमांसा, ७) अद्वैतमत, (१४) भारतीय तत्त्वज्ञान सार [१३]

**प्रकरण २ इस्लामी तत्त्वज्ञान ..... १६**

**(क) इस्लाम धर्मांतील तत्त्वज्ञान** [१६] – (१) मदिना-संप्रदाय [१७], (२) मुअतज़िला – संप्रदाय (विचारप्रणाली)[१७], (३) अल अशअरी आणि त्याचा संप्रदाय [२०] – १) हनफ़ी, २) मालिकी, ३) शाफ़ई, ४) हंबली, (४) इब्न तैमिया [२४], (५) भारतातील मुस्लिम विचारप्रणालीचा विकास [२५], – १) अकबर, २) शेख-सरहिंदी, ३) दारा शिकोह, ४) औरंगजेब व त्याच्यानंतर, ५) शाह वलीउल्लाह, उपसंहार [२९]

**(ख) इस्लामी तत्त्ववेत्त्यांचे तत्त्वज्ञान - (१) इराणी अरबी प्रदेशातील तत्त्वज्ञान** [२९] - १) अल-किंदी (इ.स. ८०३-८७५), २) अल फ़राबी (इ.स. ८७०-९५०), ३) इब्न मस्काविया (मृ. इ.स. १०३०), ४) इब्न सीना (इ.स. ९८०-१०३७), ५) अल ग़ज़ाली (इ.स. १०५९-११११), **(२) स्पेनमधील तत्त्वज्ञान (अंदलुसी तत्त्वज्ञ)** [४४] - १) इब्न हुज्मी, २) इब्न बज्जा (अबू बकर मुहम्मद इब्न याहिया), ३) इब्न तुफ़ल (मृ. ११८५ इ.स.), ४) इब्न रुश्द (इ. स. ११२६-११९८), ५) इब्न खल्दून (इ.स. १३३२-१४०६), **(३) गूढवादी तत्त्वज्ञ कवी** [४८] - १) मौलाना जलालुद्दीन रूमी (इ.स. १२०७-७३) [४९], २) अब्दुर्रहमान जामी (इ.स. १४१४-१४९२) [५१], ज्ञान-विज्ञान क्षेत्रास इस्लामी तत्त्वज्ञानाचे योगदान [५२], काही निष्कर्ष [५३]

**(ग) सूफींचे विचारविश्व (चिंतन)** [५५] – १) सूफीवाद : एक सिंहावलोकन [५५], २) भारतातील सूफीवाद [५६], ३) सूफींचे चिंतन (विचारविश्व) [५७] - जुन्नून मिसरी, जुनैद बग़दादी, अबू बकर शिबली, हसन बसरी, इब्राहीम बिन अधम, हारिस मुहासबी, राबिया अल्-अदविया, बायज़ीद बिस्तामी, मंसूर अल-हल्लाज, अब्दुल क़ादिर जीलानी, शेख शहाबुद्दीन सुहरवर्दी, शेख मुह्युद्दीन इब्न अल्-अरबी, इब्न तायमिय्या, दारा शिकोह

**प्रकरण ३ इस्लामी चिंतनाचे दार्शनिक संप्रदाय ..... ६२**

(१) ईजादिया [६२], (२) वुजूदिया [६३], (३) शुहूदियाः (विशिष्टाद्वैतवादी) [६३], प्लॉटिनसचे सत्ताशास्त्र [६६], अ) तद एकम्, ब) बुद्धी (चित्), क) विश्व-आत्मा, ड) जड द्रव्य, १) विचारवादी, २) संकल्पवादी, ३) सौंदर्यवादी वा प्रेमवादी, ४) प्रकाशवादी (ज्योतिर्वादी)

**प्रकरण ४ सूफीवाद आणि सूफी तत्त्वज्ञानाच्या संकल्पना ..... ७१**

**क) सूफीवाद - गोशवारा** [७१] - **(१) सूफी मत** [७१] - १) चिश्ती संप्रदाय २) सुहरवर्दी संप्रदाय, ३) कादरी संप्रदाय, ४) नक्शबंदी संप्रदाय, **(२) उगम व स्वरूप** [७२] - राबिया अल् अदविया, जुन्नून मिसरी, अबू यज़ीद बिस्तामी, मंसूर हल्लाज,

शिबली **(३) सिद्धान्त आणि साधना** [७५] - १) शरीअत (कर्मकांड), (२) तरीक़त (उपासना कांड) (३) मारिफ़त (ज्ञानकांड) व (४) हक़ीक़त (मुक्तीकांड)

**ख)** **सूफ़ी तत्त्वज्ञानाच्या संकल्पना** [७७] - (१) मानवाची रचना-अध्यात्मवादी दृष्टिकोन [७७], (२) उपपत्ती सिद्धान्त वा प्रसर्जन सिद्धान्त वा निस्सरण सिद्धान्त [८१], अयान-ए-साबित (अखंड समरूपता, कल्पनेचे शाश्वत साम्राज्य, आदि प्ररूप) [९०], अ) ग़ैरियत-ए-एतिबारी - (काल्पनीक - भ्रममूलक द्वैत )[९१], ब) ग़ैरियत-ए-हक़ीक़ी (वास्तविक द्वैत)[९२], (१) आलम-ए-अर्वाह (आत्म्याचे जग) [९४], (२) आलम-ए-मिसाल (प्रतिरूप जगत्, सादृश्य जगत्) [९७], (३) आलम-ए-अजसाम (कारण जगत, भौतिक जगत) [९९]

## विभाग – २ : अल्लाह (परात्पर परब्रह्म)

**प्रकरण ५ अल्लाहचे अस्तित्व (वजूद)** ..... **१०३**

**अल्लाहचे अस्तित्व** [१०३],

**(क) वैज्ञानिक दृष्टी** [१०३], मानवशरीर आणि ब्रह्मांड, विज्ञान आणि ब्रह्मांड, नीहारिकावाद आणि हिरण्यगर्भवाद, नैसर्गिक नियम,

**(ख) दार्शनिक दृष्टी** [१०५], १) सत्ताशास्त्र [१०५], २) मानसशास्त्र [१०९], ३) नीतिशास्त्र [११०],

**(ग) एक सूफी आचार्य व विचारवंताचा वैज्ञानिक युक्तिवाद** [१११], ईश्वर अस्तित्वात आहे का?[१११], ईश्वराच्या अस्तित्वाचा वैज्ञानिक पुरावा [११२], विश्वाची सुरुवात [११३], पृथ्वी या ग्रहाचा वेगळेपणा [११४],

**(घ) ईश्वर-सत्ताविषयक प्रमाण वा युक्तिवाद** [११४], १) सत्ताशास्त्रीय युक्तिवाद [११४], २) विश्वोत्पत्तिवादी युक्तिवाद [११५], ३) प्रयोजनवादी युक्तिवाद [११६], ४) नैतिक युक्तिवाद [११६], ५) व्यवहारवादी युक्तिवाद [११७]

**(च) सूफीवादाचा दृष्टिकोन** [११७] **– अल्लाहच्या अस्तित्वा (वजूद)चे स्वरूप** [१२३], (१) वहदतलवजूद (अद्वैतवाद), (२) हमा अूस्त (सर्वस्वी तोच), (३) अद्वैत आणि द्वैत, (४) 'तश्बीह' आणि 'तंज़ीह' (उपमेय आणि अनुपमेय) किंवा (गोचर व अगोचर), उपमेय ज्ञानग्रहण करण्याचे पाच स्रोत, अनुपमेय ज्ञानग्रहणाचे पण पाच स्रोत [१२६], **अल्लाहच्या (ईश्वरी) अस्तित्वविषयक चार संप्रदाय** [१२७] – १) ईजादिया (आविष्कारवादी वा अविष्करणवादी), २) शहूदिया (विशिष्टाद्वैतवादी), ३) वहदतल वजूद (अद्वैतवादी): समरूपता आणि समतुल्यता, ४) इलहादिया (निरीश्वरवादी किंवा नास्तिकवादी), सूफी साधकाची अल्लाह(अस्तित्वा)कडे ओढ व तिच्या पद्धती [१३४] –१) नाम-स्मरण विधी वा जप-जाप पद्धती, २) चिंतन, ३) मनन (मुराक़बा), **अल्लाहच्या अस्तित्वाचे आणखी काही कुराणोक्त प्रमाण – पुरावे** (स्वैर अनुवाद) [१३८], ईश्वराच्या अस्तित्वाचा पुरावा [१३८]

**छ) अल्लाह (ईश्वरा)चे अस्तित्व (वजूद) : दार्शनिक दृष्टिकोन** [१४०], अल्लाहचे अस्तित्वा ('वजूद')चे घटक [१४१], सत्तेच्या चार श्रेणी – स्पष्टीकरण [१४३], **संच १ – ला ताय्युन : तन्मात्राविहीन,** [१४५], **संच २ – ताय्युन-ए-अव्वल : प्रथम तन्मात्रा** [१४६], पूर्वोक्त खुलाशाचे सार [१५०], ताय्युन-ए-सानी : द्वितीय तन्मात्राची गरज [१५१], द्वितीय तन्मात्रा – सविस्तर विवेचन [१५२], प्रकट व अप्रकट आदी व अंत [१५२], वहदतलवजूद (अद्वैतवाद) [१५३], आलम-ए-हादिस (नवनिर्मित जग) [१५३], **संच ३ ताय्युन-ए-सानी : द्वितीय तन्मात्रा** [१५४], कंसांचे स्पष्टीकरण [१५५], १) अहदिय्युत [१५६], २) वहदत [१५६], ३) वाहिदिय्यत [१५७]

**ज) ईश्वराचे अस्तित्व : पौर्वात्य व पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांच्या प्रवृत्ती** [१५८], अनुभवपूर्व – अनुभवोत्तर युक्तिवाद [१५९] – पहिली पद्धत, दुसरी पद्धत, तिसरी पद्धत, चौथी पद्धत, पांचवी पद्धत.

**प्रकरण ६ अल्लाहचे (ईश्वराचे) स्वरूप ..... १६२**

**(१) अल्लाहचे निरपेक्ष रूप** [१६२] – काल्पनिक वा वास्तविक, शक्ती वा द्रव्य, सानन्द वा निरानन्द, ससीम वा असीम, एक वा अनेक, सर्व शक्तिमान, **(२) ईश्वराचे सापेक्ष स्वरूप** [१६७] **–** क) जगतच्या अनुषंगाने [१६७], ख) जीवाच्या अनुषंगाने [१७०], **ईश्वराच्या निरपेक्ष आणि सापेक्ष स्वरूपावर एक दृष्टिक्षेप** [१७१] – **(१)** ईश्वराचे निरपेक्ष स्वरूप [१७१], **(२)** ईश्वराचे सापेक्ष स्वरूप [१७२], **(३)** ईश्वराचे दार्शनिक स्वरूप [१७३], **(४)** इस्लामी तत्त्व-चिंतनानुसार अल्लाह (परात्पर परब्रह्म)चे स्वरूप [१७५], **(५)** अल्लाहचे स्वरूप : सनातनपंथी इस्लामी दृष्टिकोन [१७५], **(६)** अल्लाहचे स्वरूप : सूफ़ीवादी दृष्टिकोन [१७७] – १) वहदतुलवजूद : (अद्वैतवाद), २) वहदतुश्शुहूद : (विशिष्टाद्वैतवाद) **(७)** ज़ात (नाम) आणि सिफ़ात (गुण, रूपे) [१८२], **(८)** जीलीप्रणीत अल्लाहचे स्वरूप [१८८] – १) ज़ात (सत्ता), सिफ़ात (गुण) आणि इस्म (नाम) [१८८], २) केवलतत्त्वाचे अवतरण वा अवरोहण [१८९] – सत्ताशास्त्रीय अंतरणाची – न्यागमनाची लेखक जीलीची योजना [१९१] – अ) केवलतत्त्व अथवा विशुद्ध विमर्श (विचार, प्रज्ञा) (अज़्ज़ात, अल्-वुजूदल मुतलक़), ब) अमूर्त-निर्गुण एकत्त्व (अहदिया), क) अनेकतेमध्ये एकता (वाहिदिय्या), ३) अल्लाहस्वरूप सत्त्व [१९२] – 'अल्-रहमान' : सप्त दैवीगुणधारी सप्ताक्षरी शब्द [१९३] – १) जीवन, २) ज्ञान, ३) संकल्प (इच्छा), ४) सामर्थ्य (शक्ती), **(९)** दैवी गुण : विवेचन (अल्लाहचे कुराणोक्त गुण) [१९६] – १) अल्लाह (परात्परपरब्रह्म), २) रब (पालनकर्ता, प्रभू), ३) रहमान (दयाळू), ४) रहीम (कृपाळू), ५) मालिक (अधिपती, धनी) – १) निव्वळ एकल गुणवाचक शब्द [१९९], २) एकल सामासिक गुणवाचक शब्द [२००], ३) गुणवाचक युग्म शब्द [२००] – (१) सत्त्व गुण (अस्मा व सिफ़ाते ज़ातिया), (२) भद्र गुण (अस्मा व सिफ़ाते जमालिया), (३) रुद्र गुण (अस्मा व सिफ़ाते जलालिया), (४) पराकाष्ठेचे गुण (अस्मा व सिफ़ाते मुश्तरिका यानी कमालिया), (५) अल्लाहची काही वेचक ९९ सुंदरच सुंदर नावे ['अस्माउल्-हुस्ना'], **(१०)** सत्तेच्या अवरोहणाच्या सहा श्रेणी [षट् अवरोह वा षडवरोह] [२०४], तनज़्ज़ुलात-ए-सित्ता (षडवरोह, षडवतरण), १) पहिली तन्मात्रा [२०५], २) दुसरी

तन्मात्रा [२०५], आविष्करण (निर्मिती) पद्धती [२०६], प्रारब्ध (क़ज़ा) व संकल्प (क़दर), दोन वास्तवांचे आविष्करण, 'अमा'चे विवेचन, ३) तिसरी तन्मात्रा [२०७], 'अमा'ची सृष्टी, 'अर्वाह' (आत्म्यां)चे विवेचन, मुहम्मदी आत्मा ('रूह'), ४) चौथी तन्मात्रा [२११], निर्णित दृष्टान्त, उमर यांचा प्रसंग, थडग्या (कबरी)मधील सुख-दुःख, देहांचा कर्म-हिशेब, प्रतिरूप जगा ('आलम-ए-मिसाल')चा पहिला प्रकार - स्वप्न, ५) पाचवी तन्मात्रा [२१५], अर्श आणि कुर्सी (दैवी सिंहासन आणि पादपीठ), ६) सहावी तन्मात्रा [२१७], नरोत्तम वा पुरुषोत्तम ('इन्सान-ए-कामिल') - १) अल्लाहच्या सत्तेचे त्रिविध पैलू [२१९], २) तनज़ुलात-ए-सित्ता (षडवरोह, षडवतरण) [२२०], ३) तनज़ुलात-ए-सित्ता (षडवरोह किंवा षडवतरण) चा तक्ता [२२१], **(११)** पवित्र कुराण निर्दिष्ट अल्लाहची नाम-रूपे : स्वरूप [२२१], **(१२)** पवित्र कुराण निर्दिष्ट अल्लाहची कार्य-प्रणाली [२२६] - अल्लाहची कार्यप्रणाली : प्रकार [२२७] - (१) साक्षात्कार : प्रेषितांसाठी [२२७] - १) मूसांचा साक्षात्कार - प्रभू बोलला, परोक्षसंभाषण, २) मूसांचा साक्षात्कार : अग्नीज्योति-दर्शन, ३) मुहम्मदांचा साक्षात्कार - प्रज्ञान वा अंतःप्रेरणा, ४) मुहम्मदांचा साक्षात्कार - दिव्य प्रवास व दिव्यारोहण, (२) आदेशपरोक्ष रीत - प्रेषितेतरांसाठी [२२९] - १) संबोधन पद्धती, २) आव्हानात्मक प्रश्नपद्धती, ३) आज्ञा-निषेधाज्ञा पद्धती, ४) शपथ-शाप पद्धती, ५) निवेदन पद्धती, **(१३)** अल्लाहच्या कार्यप्रणालीचे संचालन [२३१], **(१४)** विश्व संचालन - सूफ़ी दृष्टिकोन [२३४], विश्वसंचालनामध्ये ईश्वरनिष्ठ महात्म्यां('रिजालुल्लाह')ची भूमिका [२३४], 'रिजालुल्लाह' ईश्वरनिष्ठांचे बारा गट [२३४], ईशजनांचे बारा प्रकार [२३५], रिजालुल ग़ैब - १) अक़ताब (कुत्ब), २) ग़ौस , ३) इमामान, ४) अवताद , ५) अब्दाल, ६) अख़यार, ७) अब्रार, ८) नुक़बा, ९) नुजबा, १०) अमद, ११) मक्तूमान, १२) मुफ़्रदान, रिजालुल ग़ैब (परोक्ष ईश्वरनिष्ठ) [२४२], 'रिजालुल ग़ैब'चे सहा प्रकार [२४४], मर्दान-ए-ग़ैब (परोक्ष भक्त-लोक/भक्त-गण) [२४५], **(१५)** अल्लाहचे ओवीबद्ध स्वरूप-सार [२४६], **(१६)** अल्लाहचे स्वरूप : तौलनिक विवेचन [२४७], **(१७)** अल्लाहचे अस्तित्व, त्याची सत्ता, त्याचे गुण व परोक्ष जगाशी निगडित पारिभाषिक शब्दार्थ संग्रह [२५३] - १) ब्रह्मांड आणि पिंडांड

(मानव) अथवा विश्व आणि मानव : यौग पद्य (सहसंबंध) [२५४], २) ब्रह्म आणि ब्रह्मांड किंवा विश्वंभर आणि विश्व – सह-संबंध [२५५], विश्वा (ब्रह्मांडा)च्या चाळीस श्रेणी [२५७], ३) चिंतन-प्रवाहाची दिशा – रूपरेषा [२५९], ४) एका परोक्ष संकेताची उकल – 'ज़कात' (धर्मकर) २.५०%च का? याचा उलगडा [२६१]

**प्रकरण ७ ईश्वरवाद अथवा ईश्वरसंबंधी संकल्पना ..... २६६**

प्रस्तावना [२६६], धर्म-तत्त्वज्ञानाच्या विकासामध्ये ईश्वरवादाचे योगदान [२६६], ईश्वरवाद : आवश्यकता आणि उपयोगिता [२६७], ईश्वरवादाचे प्रकार [२६८]

**(१) अनीश्वरवाद** [२६८] – (१) पूर्वपीठिका [२६८], १) भारतीय चिंतन परंपरेमध्ये अनीश्वरवाद, २) पाश्चात्य चिंतन-परंपरेमध्ये अनीश्वरवाद, (२) अनीश्वरवाद : सिद्धान्त आणि प्रकार [२६९] – १) हठवादी वा रूढवादी अनीश्वरवाद, २) संदेहवादी अनीश्वरवाद, ३) समीक्षात्मक अनीश्वरवाद, ४) भौतिकवादी अनीश्वरवाद, ५) व्यवहारवादी अनीश्वरवाद, ६) सत्तामूलक अनीश्वरवाद, **(२) अनेकेश्वरवाद** [२७०] – (१) पूर्वपीठिका [२७०] – १) प्राकृतिक अनेकेश्वरवाद, २) संगठित अनेकेश्वरवाद, ३) मानवीय अनेकेश्वरवाद, ४) विकल्पेश्वरवाद, ५) त्रयक ईश्वरवाद, (२) सिद्धान्त [२७१], **(३) द्वैतवाद** [२७२], सिद्धान्त – १) तत्वमीमांसीय द्वैतवाद, २) धर्मशास्त्रीय द्वैतवाद, **(४) एकेश्वरवाद** [२७४] – (१) पूर्वपीठिका, (२) सिद्धान्त, **(५) निमित्तेश्वरवाद** [२७६] – (१) पूर्वपीठिका, (२) सिद्धान्त, **(६) सर्वेश्वरवाद** [२७७] – (१) पूर्वपीठिका, (२) सिद्धान्त, **(७) परसर्वेश्वरवाद वा पुरुषोत्तमवाद** [२७८] – (१) पूर्वपीठिका, (२) सिद्धान्त, **(८) व्यावहारिक ईश्वरवाद** [२७९] – (१) पूर्वपीठिका, १) भारतेतर ईश्वरवाद, २) भारतीय ईश्वरवाद, (२) सिद्धान्त, निष्कर्ष [२८१]

**ईश्वरवाद : सूफ़ी दृष्टिकोन** [२८१], विविध धर्मांची निर्मिती कशी झाली? [२८४], मूलभूत धर्म [२८६], भक्तीची पद्धती (उपासना विधी) – तदनुषंगिक प्रमुख धर्म [२८७] – १) श्रद्धाहीन मूर्तिपूजक धर्म, २) मूल तत्त्वोपासकांचा धर्म : मूल तत्त्वपूजन, ३) दार्शनिकगण किंवा नैयायिकगणाचा धर्म अर्थात नक्षत्रपूजक, ४) द्वैतवाद्यांची उपासना पद्धती, ५) अग्नीपूजकांची

उपासना, ६) निसर्गपूजकांची उपासना पद्धती, ७) 'ब्राहिम:' वा ब्राह्मणांची उपासना, ८) यहूदी-ज्यूंची उपासना पद्धती, ९) नसारा - ईसाई (ख्रिश्चन) लोकांची उपासना, १०) इस्लाम धर्म, अस्सल एकेश्वरवादी ('मुवहि्हद') [२९६], उपासकांच्या श्रेणी (दर्जे) [२९७], सात श्रेणी [२९८], एक नम्र सूचना [२९८]

## विभाग - ३ - ब्रह्माण्ड

**प्रकरण ८ उपनिषदें प्रणीत विश्वोत्पत्ती विचार** ..... ३०१

(१) विश्वोत्पत्तीविषयी उपनिषद्पूर्व कल्पना [३०१], २) उपनिषदेंप्रणीत सृष्टी-निर्मिती वा विश्वोत्पत्ती-विचार [३०२]

**प्रकरण ९ सृष्टी-प्रपंच - तौलनिक विवेचन (इस्लामी व भारतीय दृष्टिकोन)** ३०७

(१) इस्लामप्रणीत विश्वरचना व मानव-निर्मितीचे प्रयोजन व पद्धती [३०७], (२) बहुविध सृष्टी : भारतीय दार्शनिक दृष्टिकोन [३०८] - १) मत्स्य, २) कूर्म, ३) वराह, ४) नृसिंह, ५) वामन, ६) परशुराम, ७) राम, ८) कृष्ण, ९) बुद्ध, १०) कल्कि, (३) सृष्टी-प्रपंच : इस्लामी धारणा [३११], (४) सृष्टी-प्रपंच : इस्लामी व भारतीय दृष्टिकोन - तौलनिक विवेचन [३१४]

**प्रकरण १० विश्वोत्पत्तीविषयक वैज्ञानिक सिद्धान्त, व तद्विषयक इस्लामी दृष्टिकोनाची वैज्ञानिकता** ..... ३२४

(१) विश्वोत्पत्तीविषयक वैज्ञानिक सिद्धान्त [३२४], विश्वाचा जन्म [३२४], किती सुंदर आपले विश्व ! [३२५], रात्रीचा कुराणोक्त गौरव पहा [३२६], विश्वोत्पत्तीचे वैज्ञानिक सिद्धान्त [३२६] - १) स्थिर अवस्था सिद्धान्त,२) उत्क्रांती सिद्धान्त, ३) महाविस्फोट सिद्धान्त, ४) प्रसरण सिद्धान्त, ५) उष्मा-गतिकी सिद्धान्त, ६) पुंज सिद्धान्त, आइन्स्टाइनप्रणीत विश्वाची नवीन संकल्पना [३२९], ब्रह्मांडनिर्मितीचा उलगडा - नवीनतम अद्ययावत शोध [३१०] (२) धर्म आणि विज्ञान : तुलना [३३१] - १) धर्म आणि विज्ञान - परस्पर संबंध, २) धर्म आणि विज्ञान - समानता, क) धर्म विज्ञानाचा सहयोगी आहे [३३३], ख) विज्ञान धर्मास सहाय्यक आहे [३३४], ३) धर्म

आणि विज्ञान : अंतर - फरक, तुलना (तक्ता) - धर्म-विज्ञान [३३६] (३) विश्वोत्पत्तीसंबंधी इस्लामी दृष्टिकोनाची वैज्ञानिकता [३३७], आकाश व पृथ्वीची निर्मिती [३३८], कुराणोक्त खगोलशास्त्र [३४२] - क) आकाशाविषयी सर्वसाधारण मनन, ख) आकाश-ग्रहांचे स्वरूप, ग) खपिंड व्यवस्था, घ) आकाशाची उत्क्रांती, च) अवकाशावर विजय
पृथ्वी [३४६] - अ) सर्वसाधारण विधानयुक्त श्लोक, ब) जलचक्र आणि समुद्रे, क) पृथ्वीचा विस्तार, ड) पृथ्वीचे वातावरण,
प्राणी आणि वनस्पती जग [३४८] - क) सजीवांचे उगम (उत्पत्ती), ख) वनस्पती जग, ग) प्राण्याचे जग
मानवी प्रजोत्पादन [३५०]

**प्रकरण ११ विश्वरचना-विचार : दार्शनिक दृष्टिकोन (भारतीय व पाश्चात्त्य) . ३५४**

विश्वशास्त्र : विश्वरचना विचार म्हणजे काय? [३५४] - (१) वैज्ञानिक विश्वरचना-विचार, (२) तात्त्विक विश्वरचना-विचार, अतिप्राचीन विश्वोत्पत्ती विचार [३५५] - अ) प्राचीन भारतीय विश्वरचना विचार [३५७] - १) न्याय-वैशेषिक दर्शन, २) सांख्य-योगदर्शन, ३) मीमांसाशास्त्र, ४) अद्वैत वेदान्त शास्त्र, ५) बौद्धमत, ६) जैन मत, ७) चार्वाक मत, ८) जगदुत्पत्ती पुराण कल्पना, ब) प्राचीन पाश्चात्त्य विश्वरचना विचार [३६०], (क) अर्वाचीन पाश्चात्त्य विश्वरचनाविचार [३६२] - दिक्‌संबंधी कल्पना व विश्वरचनाविचाराच्या प्रणाली, अवकाश ही कल्पना चार टप्प्यातून विकसित झाली आहे, निष्कर्ष : वरील विवेचनाचा सारांश [३६५] - अ) उत्पत्ती, ब) स्वरूप अगर वस्तुस्वरूप विचाराच्या दृष्टीने, क) उद्दिष्ट, सृष्टीचा खेळ व सृष्टी-प्रपंच [३६५] - सृष्टीचा खेळ, सृष्टी-प्रपंच

**प्रकरण १२ ब्रह्मांड निर्मिती : सूफी दार्शनिक दृष्टिकोन ..... ३६७**

ब्रह्मांड वा विश्व व त्यामधील लोक [३६७], विश्वंभराची विश्वनिर्मिती-इच्छा [३६७], सृष्टीचा आरंभ : 'तनज़्ज़ुल' म्हणजेच आविष्करण सिद्धान्त [३६८], सूफी तत्त्वज्ञानानुसार ब्रह्मांडाची रचना [३७०], 'इन्सान कामिल'चे ग्रंथकार अब्दुल करीम जीली प्रणीत सृष्टी-प्रपंच [३७३], सप्तग्रहासंबंधी पुढील गोष्टी सांगितल्या जातात [३७४], सृष्टी-प्रपंचामध्ये मानवाचे

आविर्भाव [३७४], इमाम ग़ज़ालीप्रणीत विश्वोत्पत्ती क्रम वा ब्रह्मांड-व्यवस्था [३७५], जगाची नवनिर्मिती : जगाची अर्वाचीनता [३७६], अल्लाहची सर्वप्रथम निर्मिती [३७६], प्रारंभिकता : अग्रिमता [३७६], कर्म आणि कर्मफल (फ़ेल व अनफ़आल) [३७८], या नंतरचा क्रम (सृष्टी-प्रपंच) [३७९], मानवजातीमध्ये काहीना काहीवर श्रेष्ठता [३८१], सारांश [३८२], ब्रह्मांडाचे घटक : सूफ़ी तात्त्विक संक्षिप्त परिचय [३८२] - (१) अल्लाह (परात्पर परब्रह्म), (२) अक़्ल-ए-अव्वल वा अक़्ल-ए-कुल्ल (विश्व-ज्ञान) वा (मूर्खता वा अज्ञान), व्यवहार ज्ञान, अक़्ल-ए-कुल्ल (कुल्ली) - मूर्खता वा अज्ञान वा अति ज्ञान, अक्ल-ए-अव्वल अर्थात विश्व-ज्ञान आणि जिब्रील (देवदूत), (३) अर्श (दैवी राजसिंहासन) [३८६], जिस्म-ए-कुल्ली (विश्व-शरीर) (४) कुर्सी (पादपीठ)[३८६], विस्ताराचे दोन प्रकार [३८९] - (तुलना) परमेश्वराचे पहिले चरण (पाय), परमेश्वराचे दुसरे चरण (पाय), (५) उम्मुल किताब (ग्रंथ-मातृका) [३८९], परमेश्वरी सत्तेचे वास्तविक स्वरूप, वास्तवाचे तत्त्व वा गुणधर्म, लौह (पाटी) (सुस्पष्ट दैवी ग्रंथ), (६) कलम-ए-आला (सर्वश्रेष्ठ लेखणी) [३९१], (७) लौह-ए-महफ़ूज़ (सुरक्षित लेखशिला) (सुबोध ग्रंथ) [३९२], नूर-ए-इलाही (प्रभू-प्रकाश), (८) 'सिद्रतुल मुंतहा' (कल्पवृक्ष, कामधेनू, 'लक्ष्मण-रेषा') [३९३], 'सिद्रतुल मुंतहा' ('लक्ष्मण-रेषा') : परिचय (ओळख) [३९५], १) पहिला दरबार - पहिली अभिव्यक्ती, २) दुसरा दरबार - दुसरी अभिव्यक्ती, ३) तिसरा दरबार - तिसरी अभिव्यक्ती, ४) चौथा दरबार - चौथी अभिव्यक्ती, ५) पाचवा दरबार - पाचवी अभिव्यक्ती, ६) सहावा दरबार - सहावी अभिव्यक्ती, ७) सातवा दरबार - सातवी अभिव्यक्ती, ८) आठवा दरबार - आठवी अभिव्यक्ती, (९) बैतुल मामूर (देवदूतांचे नमनस्थळ) [३९६], (१०) नूर-ए-अक़्ल (ज्ञान-प्रकाश) [३९६], (११) रूह, रूहुल क़ुद्स व क़ल्ब (आत्मा, पवित्र आत्मा आणि अंत:करण) [३९६], रूह, क़ल्ब (अंत:करण वा चित्त) - १) विवेक बुद्धी ('अक़्ल'), २) मुहम्मदांची निर्णयशक्ती ('वह्म'), ३) चिंतन ('हिम्म') विचार, (१२) हैयूला, (१३) हबा, (१४) फलक-उल्-बुरूज (राशिचक्र), (१५) फलकुल अनासिर, (१६) फ़लक-ए-अतलस, (१७) फलक-उल्-असीर, (१८) हवा, (१९) माए, (२०) मादन, (२१) नबात (२२) जौहर, (२३) हैवान, (२४)

आलम-ए-मिसाल, (२५) आलम-ए-अजसाम, (२६) आलम-ए-मानी, (२७) सप्त आकाश - १) रूक़ैया - सोम (चंद्र) ग्रहाचे आकाश, २) माऊन किंवा फ़ैदूम - बुध ग्रहाचे आकाश, ३) मलकूत किंवा हार्योन - शुक्र ताऱ्याचे आकाश, ४) ज़ाहिरा - रवी ग्रहाचे आकाश, ५) मसहरा किंवा मज़ीना - मंगळ ग्रहाचे आकाश, ६) ख़ालसा - गुरू ग्रहाचे आकाश, ७) लाबिया किंवा दामिआ - शनी ग्रहाचे आकाश, (२८) सप्त पृथ्वी - १) अर्ज़ुल-नफ़ूस - मानव लोकांची पृथ्वी, २) अर्ज़ुल ईबादात - ईश्वरनिष्ठांची पृथ्वी, ३) अर्ज़ुल तबा - प्रकृतीची पृथ्वी, ४) अर्ज़ुल शह्व - वासनेचे जग, ५) अर्ज़ुल तुग़यान - अमर्याद पृथ्वी, ६) अर्ज़ुल इल्हाद - अधर्माची पृथ्वी, ७) अर्ज़ुल शक़ावत - दुर्दशा-विपत्तीचे प्रांत, (२९) इब्लीस (शैतान) - इब्लीसची तारांबळ (गोंधळ) (तलबीस-ए-इब्लीस), इब्लीसचा धिक्कार (लांछन), शैतान कुणास ग्रासतो?, (३०) देवदूत (मलाईका-फ़रिश्ते) - १) जिब्रईल, २) मीकाईल, ३) इस्राफ़ील, ४) इज्राईल, (३१) धर्माज्ञा पत्रावली (शास्त्रलेख) आणि दिव्य ग्रंथ (सहीफ़े व मुक़द्दस किताबें), (३२) प्रेषित व संदेशहर (रसूल व नबी), (३३) मानव (इन्सान) - मानवाचे कुराणोक्त शब्द-चित्र, मानवाची विशेषता, मानव दोन्ही हाताची कृती, अमानत (ठेव), दोन टोके, हीन, मध्यम, उत्तम, मनुष्य जन्माचा हेतू, मानव : दार्शनिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोन, (३४) स्वर्ग (जन्नत), (३५) नरक (दोज़ख़) - १) जहन्नम, २) हाविया, ३) जहीम, ४) सईर, ५) हुतमा, ६) लज़ा, ७) सक़र, कोणता नरक कोणासाठी? - १) जहन्नम, २) हाविया, ३) जहीम ४) सईर ५) उस्रा ६) लज़ा ७) सक़र, (३६) वासना (नफ़्स)

**प्रकरण १३ परलोक (आख़िरत) : तौलनिक विवेचन ..... ४२८**

**प्रकरण १४ सूफ़ींच्या कल्पनेतील सृष्टीची विलक्षणता व अद्‌भुतता वा ईश्वराची अगाध लीला : सृष्टीमधील चमत्कारांचा खेळ ..... ४४५**

आकाश [४४६], आकाशाची विलक्षणता [४४७] - (१) पार्थिव प्रथम आकाश - रूक़ैया - चंद्र (सोम)ग्रहाचे आकाश [४४९], चंद्राचे जग [४५०], आकाशांचे परस्पर संबंध [४५१], (२) दुसरे आकाश - माऊन -

बुध ग्रहाचे आकाश [४५१], प्रेषित नूहशी भेट, (३) तिसरे आकाश - मलकूत - शुक्र ग्रहाचे आकाश [४५३], (४) चौथे आकाश - ज़ाहिरा - रवी ग्रहाचे आकाश [४५४], इस्राफ़ीलचे स्थळ, प्रेषित इद्रीस यांचे स्थळ, प्रेषितांचे स्थळ, (५) पाचवे आकाश - मसहरा - मंगळ ग्रहाचे आकाश [४५६], (६) सहावे आकाश - ख़ालसा - गुरू ग्रहाचे आकाश [४५६] - गुरू ग्रहाचे स्थळ, देवदूतांच्या आकृती (स्वरूप), मीकाईल (देवदूता)चे स्थान, (७) सातवे आकाश - लाबिय : (दामिया) - शनी ग्रहाचे आकाश [४५९], ब्रह्मांडाची व्याप्ती, निकटवर्ती (मुक़रब) देवदूत, सिद्रतुल मुंतहा (कल्पवृक्ष), आकाशांची संख्या - १) पहिली पृथ्वी - अर्ज़ुल नुफ़ूस - मानव लोकांची पृथ्वी, २) दुसरी पृथ्वी - अर्ज़ुल इबादात - ईश्वरनिष्ठांची पृथ्वी, ३) तिसरी पृथ्वी - अर्ज़ुल तबा - प्रकृतीची पृथ्वी, ४) चौथी पृथ्वी - अर्ज़ुल शह्व - वासनेचे जग, ५) पाचवी पृथ्वी - अर्ज़ुल तुग़यान - अमर्याद पृथ्वी, ६) सहावी पृथ्वी - अर्ज़ुल इल्हाद - अधर्माची पृथ्वी, ७) सातवी पृथ्वी - अर्ज़ुल शक़ावत - दुर्दशा-विपत्तीचे प्रांत, समुद्रांची विलक्षणता [४६७], गोडे (गोड) समुद्र [४६८], इरम ज़ातुल इमाद (सत्तेचे आधारस्तंभ असलेले स्वर्ग) [४६९], खारट समुद्र (क्षारयुक्त समुद्र) [४७०], जीवन निर्झर (चश्म-ए-हयात) [४७१], अथांग, गहन समुद्राचे प्रवाह [४७३] - १) बहर-ए-अहमर - लाल समुद्र, २) बहर-ए-अख़ज़र - हरित (नील) समुद्र, ३) बहर-ए-अस्वद - कृष्ण (काळा) समुद्र, विशेष सूचना [४७५]

## विभाग - ४ मानव

**प्रकरण १५ मानव : निर्मिती - प्रयोजन व विशेषता** ..... ४७९

(१) मनुष्य-जन्माचा हेतू व ब्रह्मांडामधील त्याचे स्थान [४७९], (२) मानव माहात्म्य : नैतिक पैलू [४८४] - नीति : दार्शनिक दृष्टिकोन, नीति : आध्यात्मिक दृष्टिकोन, (३) ईश्वरनिर्दिष्ट मानव-निर्मिती प्रक्रिया व मानवी स्वभाव [४८६], मानव निर्मिती प्रक्रिया [४८७], मानवाचे स्वभाव-वैशिष्ट्य [४८७]

**प्रकरण १६ विश्व, मानव आणि ईश्वर** ..... ४९०

(१) विश्व आणि मानव [४९०], (२) अल्लाह (ईश्वर) आणि मानव [४९१], (३) मानव समाजामध्ये प्रेषित पाठविण्याचे प्रयोजन [४९३], (४) ईश्वराचे मानवास हितोपदेश [४९४] - विधी-आज्ञा [४९५], निषेधाज्ञा [४९७], (५) आदर्श जीवन-व्यवस्था - प्रारूप [४९९], (६) ईश्वर, जग व मानव यासंबंधाच्या ख्रिश्चन प्रज्ञानाचे थोर विचार [५०३] - अ) ईश्वर, ब) विश्व, क) मानव, ड) उपसंहार, (७) ईश्वर व जगत् - दार्शनिक सिद्धान्तांच्या दृष्टिकोनातून [५०६] - १) सर्वेश्वरवाद - अ) स्थित्यात्मक सर्वेश्वरवाद, आ) विकासवादी सर्वेश्वरवाद , २) निस्सरणवाद, ३) विभुत्ववाद किंवा अर्धेसर्वेश्वरवाद, ४) विधातृवाद किंवा निमित्तकारणवाद, ५) शाक्तमत, ६) द्विकारणतावाद, ७) सृष्टिवाद - अ) आवश्यक सृष्टिवाद, आ) स्वतंत्र सृष्टिवाद, ८) अविश्ववाद किंवा मायावाद

**प्रकरण १७ मानव-देह-विज्ञान : दार्शनिक दृष्टिकोन** ..... ५०९

१) नरदेह-वंदन : नरदेहस्तवन [५०९] - (१) पशूची अवस्था, २) विचार आणि विवेक याची अवस्था, ३) तिसरी अवस्था संततत्वाची, (२) जन्म-पूर्व (गर्भस्थ) देह-अवस्था [५११], (३) देह - तापत्रय (त्रिविध ताप) [५१२] - १) आध्यात्मिक ताप, २) आधिभौतिक ताप, ३) आधिदैविक ताप, (४) देह - निर्मिती आणि प्रकार [५१४], भूतपंचक वा पंचमहाभूते, तन्मात्रा (विषय) - १) सूक्ष्म पंचमहाभूत - १. आकाश, २. वायू, ३. तेज, ४. आप, ५. पृथ्वी, २) स्थूल पंचमहाभूत - १. पृथ्वीचे लक्षण, २. आपचे लक्षण, ३. तेजाचे लक्षण, ४. वायूचे लक्षण, ५. आकाशाचे लक्षण, (५) पंचीकरण [५१८], (६) श्रीसमर्थ रामदासस्वामी प्रणीत पंचमहाभूतां (भूतपंचका)चा निरास (निरूपण) [५१९] - १) पृथ्वी, २) आप, ३) तेज, ४) वायू, ५) आकाश, पाच ज्ञानेंद्रिये व पाच कर्मेंद्रिये यांचा निरास [५२०], पाच विषयांचा निरास [५२०], अंत:करण पंचकाचा निरास [५२१], पंचवीस तत्त्वे [५२२], पंचभौतिक पंचवीस विषयांचा निरास [५२३], पंचवीस विषय [५२४], चार देहाच्या बत्तीस तत्त्वांचा निरास [५२४], देहाची बत्तीस तत्त्वे [५२५], १) जागृती, २) स्वप्न, ३) सुषुप्ती, ४) तुर्या, (७) सुप्रसिद्ध सूफ़ी संत ख्वाजा बंदानवाज़प्रणीत तत्त्व-विवेचन [५२७] -

१) ''तिलावतुलवजूद'' (देहसंकीर्तन) या ग्रंथानुसार तत्त्व विवेचन व देहसंकीर्तन [५२८] – १. वाजिबुलवजूद– स्थूल देह, २. मुमकिनुलवजूद – लिंग देह, ३. मुमततुलवजूद– कारण देह, ४. आरिफुल वजूद – महाकारण देह, २) ''शिकारनामा'' (आखेटगाथा) या कूटकाव्यानुसार तत्त्व–निरूपण [५३०], ३) ''मेअराजुल आशिक़ीन''(भक्तांचा दिव्य उत्कर्ष) (प्रेमिकांचे निर्वाण) मधील देह संकीर्तन स्वरूप [५३२] – १. वाजिबुल वजूद – स्थूल देह, २. मुमकिनुल वजूद – लिंग देह, ३. मुमतनुल वजूद – कारण देह, ४. आरिफुलवजूद : महाकारण देह, ५. वाहिदुलवजूद : सूक्ष्म देह, (८) देह महिमा [५३४], दुर्लभ देहा (शरीरा)चे महत्त्व [५३४], (९) देहादिसंसृष्ट आत्म्याच्या पाच अवस्था [५३७] – देह–मन–संबंध, (१०) देह आणि कर्म [५३९], (११) संकल्प स्वातंत्र्य आणि कर्मवाद [५४१], (१२) मानवी देह – सूक्ष्मजगत [५४२], (१३) कृपा आणि कर्म [५४३], (१४) भारतीय तत्त्वज्ञान व सूफ़ी दर्शनप्रणीत देह – तौलनिक विवेचन [५४३], पंचमहाभूत व मानव निर्मिती [५४३], आत्मा – मानवासाठीच विशेष देणगी [५४४], पंचमहाभूतांच्या तन्मात्रा [५४४], पंचमहाभूतांचा ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये यांच्याशी संबंध [५४५], सप्त श्रेणी आणि सप्त नाम–स्मरण (जप) [५४५], लिंग–नफ़्स–तुलना [५४६], पंच देह : पंच अस्तित्व व पंच जगत् (लोक) [५४७], पंचमहाभूतवर्ण : अलवान–ए–पांच अनासीर [५४७], पंचीकरण : प्रक्रिया व स्वरूप [५४७], पंचीकरण – १) चित्त (फिक्र) २) बुद्धी (अक़्ल) ३) मन व संकल्प (इरादा) ४) अहंकार (अनानियत), पंचमहाभूतांची कार्यप्रणाली [५४९] १) आकाश विवेचन [५४९] – १. अहंभावाचा ध्वनी, संकल्पानुभूती, २. कंपन–ध्वनी, ३. शब्द, २) वायू विवेचन [५५१] – १. उद्दान, २. प्राण, ३. समान, ४. व्यान, ५. अपान, ३) तेज (अग्नी) विवेचन [५५१], ४) आप विवेचन [५५२], ५) पृथ्वी विवेचन [५५२]

- **स्रोत ग्रंथ** ..... ५५४

# खण्ड - एक

## विभाग - १

## तत्त्वज्ञान



१

प्रकरण १

# तत्त्वज्ञान : सर्वसामान्य, ग्रीक व भारतीय[१]

## १) तत्त्वज्ञान : अर्थ आणि प्रयोजन

साक्षात्कारमूलक अनुभव राशींस तत्त्वज्ञान म्हणून संबोधले गेले आहे. दुसऱ्या शब्दात 'दृश्यते अनेन इति दर्शनम्'च्या आधारानुसार वस्तूच्या सत्यभूत तात्त्विक स्वरूपाचे सम्यक ज्ञान म्हणजेच तत्त्वज्ञान होय. आपण कोण आहोत? येथे (या जगात) कशासाठी आलो? कुठून आलो? मृत्यूनंतर जीव (प्राण) कोठे जातो? या दृश्य जगाचा निर्माता कोण बरे आहे? तो अदृश्य का आहे? अशा प्रकारच्या प्रश्नमालिकेचे समर्पक उत्तर देणे, हे तत्त्वज्ञानाचे प्रयोजन आहे.

प्रसिद्ध जर्मन तत्त्ववेत्ता हेगेल याच्या मते तत्त्वज्ञान म्हणजे ज्ञान–यात्रा, बुद्धीचा विकास आणि विचारधारेची प्रगती होय. ज्ञानाची प्रगती ही 'रिक्त किंवा केवल सत्'पासून सुरू होऊन 'असत्'मधून मार्गक्रमण करत तिच्यासह सदसत्मध्ये व्याप्त असूनसुद्धा सदसद् विलक्षण 'विशुद्ध किंवा पूर्ण सत्'कडे अग्रेसर होत असते. हिची वाटचाल अपरोक्ष इंद्रियानुभूतिपासून प्रारंभ होऊन आपल्यासकट विशुद्ध आणि आत्मानंदयुक्त स्वानुभूतीकडे होत असते. इंग्रज तत्त्ववेत्ता ब्रॅडले याच्या मते, तत्त्वज्ञान म्हणजे आभास आणि छाया अथवा प्रतिबिंब आणि माया याची योग्य ती जाणीव करून घेऊन त्यात दडलेले असे यांच्या आधारभूत तत्त्वांचा शोध, होय. तत्त्वज्ञान मिथ्याचा त्याग करून सत्याचा शोध घेते, द्वैतामध्ये सूत्रात्मक अद्वैताचा शोध घेते, अनेकांमध्ये एकाचा आणि असत्मध्ये सत्चे अन्वेषण करते.

येथेच प्राच्य आणि पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांद्वारे प्रयुक्त आणि बहुचर्चित स्वानुभूती याविषयी विचार करणे अपेक्षित आहे. काय स्वानुभूती हे ज्ञानापासून एक वेगळे तत्त्व आहे आणि जर असेल, तर ते त्याहून वरचढ किंवा कनिष्ठ आहे काय? साक्षात्कारजन्य असल्यामुळे स्वानुभूतीस भले अभिव्यक्तिची अपेक्षा नसेना का, परंतु तत्त्वज्ञानमूलक असण्याच्या नाते व्यावहारिक दृष्टीने अनुभूतीचीही व्याख्या करावीच लागेल. परमार्थ वा तत्त्व, जे शुद्ध ज्ञानमूलक आहे, स्वतः सिद्ध आणि स्वयंप्रकाश असे आहे, परंतु मात्र अनुभूतीद्वारेच याचे साक्षात होऊ शकते. वाचेने सांगता येत नाही, बुद्धीने विचार केला जाऊ शकत नाही. तत्त्वज्ञान बुद्धीनिर्मित असल्याकारणाने तत्त्वाचे प्रतिपादन करू शकत नाही. तरीपण व्यवहाराद्वारेच परमार्थास ओळखून, त्याचा अनुभव घेण्याच्या प्रयत्नात आपण लागू शकतो. व्यवहारामध्ये बुद्धीच्या शक्तीस कोणीच नाकारू शकत नाही. ज्ञान पण बुद्धीचे अत्यंत विशुद्ध रूप असते. हेच तत्त्वज्ञानाचे महत्त्व आहे. वास्तविक मौनच उच्चतम तत्त्वज्ञान

आहे. हे मौन मूक आणि मूर्खांचे मौन नसून विद्वानांच्या चूडान्त विद्वत्तेचे गंभीर असे मौन आहे. या मौनाचा महिमा इतका महान आहे की भाषा भिकारीण बनून हिच्यासमोर भीक मागत असलेली दिसते. वाष्कली मुनींनी आचार्य वाध्वाना आत्म्याविषयी विचारणा केल्यावर उत्तरदाखल ते मौनच राहिले. पुन्हा विचारल्यावर ते पूर्वीसारखे मौनच राहिले. वारंवार विचारल्यानंतर ते रागाने म्हणाले, ''मी तुमच्या प्रश्नाचे उत्तर मौनानेच तर देत आहे. तुम्ही समजतच नाही. हा आत्मा सर्व प्रकारच्या द्वंद्वापासून मुक्त (अलिप्त) पूर्ण शांत आहे. 'ब्रूमः खलु त्वं तु न विजानासि, उपशान्तोऽयमात्मेति' हे तत्त्व वाणी आणि बुद्धिविलास याच्या पलीकडे आहे. – 'यत्र वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह ।'

## २) तत्त्वज्ञान आणि धर्म

तत्त्वज्ञान आणि धर्म यांचा अन्योन्याश्रित संबंध आहे. दर्शनशास्त्राद्वारे सुचिंतीत आध्यात्मिक तत्त्ववादावरच भारतीय धर्माची प्राणप्रतिष्ठा आहे. धार्मिक आचरणविहीन तत्त्वज्ञान निष्फळ असते, तर दार्शनिक विचारांविना परिपुष्ट धर्माची सत्ता ही अप्रतिष्ठित अशी असते. क्रोचेच्या शब्दांमध्ये धर्म आणि तत्त्वज्ञान, जीवन आणि विचार, व्यवहार आणि सिद्धान्त, हे सर्व आत्म्याचे शाश्वत असे छंद आहेत. आपण जीवनापासून उठून विचारापर्यंत पोहचतो आणि विचारापासून पुन्हा जीवनाकडे परत येतो. ही अशी एक क्रमिक समृद्धी आहे की जी परम सत्तेच्या सतत ऊर्ध्वगामी धरातळापर्यंत आपणास पोहचवत असते. भारतीय तत्त्वज्ञान, वैयक्तिक चेतनेच्या सांस्कृतिक अथवा आध्यात्मिक परिष्कारासाठी विशेष जागरूक राहिलेले आहे. मानवजीवनाच्या भौतिकसमृद्धीमध्ये सुधारणा घडवून आणण्यामध्ये याने आपली विशेष रुची दाखवली नाही. जर तत्त्ववेत्ते समाज–व्यवस्थेमध्ये रुची दाखवत असतील तर ते केवळ व्यक्तीच्या आध्यात्मिक प्रगतीसाठी उपयोगी ठरावे म्हणून. धार्मिक व्यवहाराचा गौरव करण्याच्या मुळात स्वार्थवृत्तीचे उन्मूलन आणि निम्न–प्रवृत्तीचे शोधन–परिष्करण याद्वारे आत्मशुद्धी प्राप्त करणे हे होय.

## ३) तत्त्वज्ञानाचे उद्दिष्ट

भारतीय तत्त्वज्ञानाचा मूलमंत्र आहे–'आत्मानं विद्धि'– आत्म्यास ओळखा. तत्त्वाची व्याख्या करताना येथील तत्त्वज्ञांनी अनुभवगम्य विषयाकडे अधिक लक्ष न देता, अनुभवकर्त्याकडे विशेष लक्ष दिले आहे. शुष्क तर्कनिष्ठ युक्तिवादाच्या आधारे आत्म्याचे ज्ञान परोक्ष नसावे, तर अपरोक्ष असावे. भारतीय तत्त्वज्ञानाचे परीक्षण करता दोन सामान्य सिद्धान्त दृष्टिगत होतात. पहिला आहे – नानात्मक प्रपंचाची पारमार्थिक एकता आणि दुसरा आहे ध्यान–धारणा–समाधीद्वारे या अनुस्यूत एकतेचे मूलतत्त्व आत्म्याचा साक्षात् अनुभव. यालाच प्रकारांतरे तार्किक सिद्धान्त–वेदान्त आणि व्यावहारिक सिद्धान्त–योग असे म्हटले जाते. तत्त्वज्ञानाच्या अंतर्गत दृश्य जगतास निर्माण करणाऱ्या क्रियांचा समावेश होत नाही, तर जीवनाची सृष्टी (निर्माण) करणाऱ्या क्रियांचा समावेश होतो. म्हणूनच तत्त्वज्ञानास पर्याय स्वरूप 'आत्मज्ञान' ही संज्ञा दिली जाते. दार्शनिक वक्तव्यांचा संबंध मानवाच्या आंतरिक जगाशी असल्याकारणाने त्यांना बाह्य अनुभूतींच्या साहाय्याने प्रमाणित अथवा अप्रमाणित करता येऊ शकत नाही. तत्त्वज्ञान एका परीने समस्त ब्रह्मांडास किंवा समस्त अनुभवविश्वास समान प्रकारे

पाहण्याचा प्रयत्न करते. मूल्ये असलेल्या अनुभव आणि क्रियांमध्ये तत्त्ववेत्त्याची रुची असते. अनंत मूल्याचा अधिष्ठाता असलेले अस्तित्व अथवा सत्तेच्या शोधात तत्त्वज्ञान गढून गेले आहे. तत्त्वज्ञानाची दृष्टी मानवाच्या सौंदर्यमूलक, नैतिक आणि आध्यात्मिक संभावनांकडे असते. तत्त्वज्ञान आमच्यासमोर अणू आणि विराट जगाच्या असंख्य रूपांना उपस्थित करते, जीवनाच्या असंख्य संभावना (शक्यता) आणि दृष्टींची उद्भावना करते आणि जीवन व विश्वाच्या असंख्य संबंधांकडे आमचे ध्यान आकर्षित करते. अशाप्रकारे तत्त्वज्ञान मानवास क्षुद्र स्थितीपासून वर उचलून विश्व–ब्रह्मांडाच्या हालचालीच्या केंद्रस्थानी बसवून देते. तत्त्वज्ञान आमच्यात जी चेतना निर्माण करते ती जीवनास उच्चतम कोटीची तृप्ती प्रदान करते.

भारतीय तत्त्ववेत्त्यांनी आपल्या कुशाग्र बुद्धीच्या साहाय्याने विश्वाचे कोडे उलगडण्याचे स्पृहणीय प्रयत्न केले आहेत. क्षणोक्षणी परिवर्तनशील अशा नानारूपात्मक पदार्थांच्या अंतरंगामध्ये विद्यमान एकरूपतेचा शोध घेणे, हे तत्त्वज्ञानाचे प्रमुख उद्दिष्ट राहिले आहे. ज्या प्रकारे परिवर्तनशील अशा ब्रह्मांडामध्ये एक अपरिवर्तनशील तत्त्व विद्यमान आहे, तद्वत या (मानवी) पिंडामध्येसुद्धा एक अपरिवर्तनशील तत्त्वाची सत्ता विद्यमान आहे. 'जे ब्रह्मांडी ते पिंडी' ब्रह्मांडाच्या नियामक सत्तेचे नाव आहे ब्रह्म तर पिंडांडांच्या नियामक सत्तेची संज्ञा आहे आत्मा. प्राचीन तत्त्ववेत्त्यांनी ब्रह्मांड आणि पिंडांडांचे ऐक्य सर्वतोमुखी स्वीकार केले आहे आणि ब्रह्म व आत्म्याची एकता प्रतिपादित केली आहे. बह्माचा साक्षात्कार करण्यासाठी आत्म्याची ओळख आणि त्याचा साक्षात्कार करणे, ही अत्यंत आवश्यक अशी अट मानली गेली आहे. बृहदारण्यकोपनिषद २/४/५ मध्ये याज्ञवल्क्य यांनी मैत्रेयीस आध्यात्मिक उपदेश करताना आत्म्याच्या श्रेष्ठतेवर पर्याप्त प्रकाश टाकलेला आहे. ते म्हणाले, ''पतीसाठी पती प्रिय नाही, परंतु आत्म्यासाठी. पत्नीसाठी पत्नी प्रिय नसून ती आत्म्यासाठी प्रिय असते. पुत्रासाठी पुत्र प्रिय नसतो तर आत्म्यासाठी (प्रिय) असतो. जगातल्या समस्त वस्तू या स्वतःसाठी प्रिय नसतात, परंतु आत्म्यासाठी प्रिय असतात. म्हणून आत्माच सगळ्यात (जास्त) प्रिय वस्तू आहे. म्हणून हे मैत्रेयी, या आत्म्यासच जाणले पाहिजे. त्याचेच श्रवण केले पाहिजे, मनन केले पाहिजे, त्याचेच सतत ध्यान केले पाहिजे कारण की याच्याच दर्शनाने, श्रवणाने, मननाने तथा विज्ञानाने सर्व काही जाणले जाऊ शकते.''

### ४) 'तत्त्वज्ञान' : संकल्पना विश्लेषण

आंग्ल भाषेत 'तत्त्वज्ञान' याचा समानार्थी शब्द 'Philosophy' असा आहे; व तो ग्रीक भाषेतून आलेला आहे. 'फिलॉसोफिया' ही ग्रीक संज्ञा 'फिल्' हा धातू आणि 'सोफिया' हे नाम या दोन घटकांची मिळून बनलेली आहे. 'फिल्' म्हणजे 'प्रीती' आणि 'सोफिया' म्हणजे 'ज्ञान' होय. 'सुज्ञतेचे प्रेम' या अर्थाचा 'फिलॉसफी' हा शब्द बहुधा पायथॅगोरसने प्रथम योजिला असावा. उपरोक्त दृष्टीने तत्त्वज्ञान म्हणजे व्यवस्थित आकांक्षा व प्रयत्नपूर्वक ज्ञानसंपादन होय. 'ज्ञानप्राप्ती' म्हणून फिलॉसोफिया या संज्ञेचा अर्थ लावताना कधी या प्रक्रियेतील 'शोध' या गतिशील घटकावर भर दिला जाईल, तर कधी या प्रक्रियेच्या फलश्रुतीवर म्हणजे परिपूर्ण ज्ञानावर भर दिला जाईल. म्हणजेच तत्त्वचिंतनाच्या समस्यात्मक बाजूवर भर दिला जाईल किंवा तत्त्वचिंतनातून उपलब्ध होणाऱ्या उत्तरांवर भर दिला जाईल. तत्त्वज्ञानाच्या ऐतिहासिक विकासात कधी या तर कधी त्या बाजूवर भर देण्याचा प्रयत्न झाल्याचे आढळते. 'सोफिया' अथवा 'ज्ञान' या संज्ञेचा अर्थ 'अज्ञान्यांना मार्गदर्शक

ठरणारे तज्ज्ञांचे ज्ञान' असा नेहमीच करण्यात आलेला आहे. तज्ज्ञ ही संज्ञा प्रथम कुंभारकाम, शिल्पकला इत्यादी एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील 'कारागिरांना' त्यानंतर नौकायन, स्थापत्य इत्यादींसारख्या मर्यादित आणि सामान्य व्यवसाय क्षेत्रातील मार्गदर्शकांना, त्यानंतर समग्र नगर-जीवन व्यापारास जबाबदार असणाऱ्या ग्रीक मुत्सद्यांस अनुलक्षून आणि अखेरीस, मरणोत्तर जीवनासह मानवाच्या समग्र अस्तित्वाचे गूढ यथार्थरीत्या उकलून दाखवू शकणाऱ्या 'प्रज्ञावंतास' देण्यात आली. सॉक्रेटिसपूर्व विचारवंत व सोफिस्ट लोकांच्यानंतर सॉक्रेटिसपासून, 'सोफोस्' वा 'तज्ज्ञ' या संज्ञेचे पूर्वीचे अर्थ मागे पडून शेवटच्या व्यापक अर्थानेच ती वापरण्यात येऊ लागली. परंतु सॉक्रेटिसने नम्रवृत्ती दर्शवून, स्वतःला प्रज्ञावंत म्हणवून न घेता सर्वश्रेष्ठ ज्ञानाचा शोधक 'फिलासोफोस' म्हटले. सॉक्रेटिसपासून पुढे 'सोफिया' वा 'ज्ञान' या संज्ञेचा जो मूळ अर्थ - कलाकुशलतेचे तंत्र- तो लोप पावून तिला उघडउघड नैतिक व धार्मिक अर्थ प्राप्त झाला. ज्ञान म्हणजे माणसाला पूर्ण सुख मिळू शकेल असे तारक ज्ञान, असे समजण्यात येऊ लागले.

प्राचीन भारतामध्ये वेदकालापासून प्रज्ञावाचक संज्ञा - वेद, विद्या, ज्ञान - या संज्ञा धार्मिक क्षेत्राशी संबंधित होत्या व त्यांचा अर्थ 'ब्राह्मणान्त'र्गत यज्ञयागाशी संबंधित असलेल्या विविध प्रकारच्या तज्ज्ञांचे विशेष ज्ञान हा असे. 'ब्राह्मणां'मध्ये व विशेषतः उपनिषदांमध्ये 'ज्ञान' ह्या संज्ञेस प्रथम सर्वसामान्य 'धर्मज्ञान' असा व्यापक अर्थ प्राप्त झाला व नंतर माणसाला कृतार्थ करणारे ब्रह्म व आत्मा यांचे विश्वसनीय ज्ञान असा अर्थ प्राप्त झाला. सत्याचा 'शोध' यावर नव्हे तर ऋषींच्या ज्ञानाच्या निर्दोषत्वावर त्या काळी भर असे. ऋषींच्या या ज्ञानाचे समर्थन विरोधी मतांच्या संदर्भात करणे आवश्यक ठरले व उपनिषदे, जैन तत्त्वज्ञान, बौद्ध तत्त्वज्ञान, भागवत संप्रदाय यामधून व्यवस्थित स्वरूपाच्या तत्त्वसंशोधनास प्रारंभ झाला व ज्ञान-प्रामाण्याचे अभिनियम मांडले जाऊ लागले. सत्तेविषयीच्या 'कोटी'च्या प्रस्थापनार्थ बुद्धिपूत अन्वेषण या अर्थाची दर्शनपूर्वकालीन 'सांख्य' ही संज्ञा, 'आन्वीक्षिकी' (शास्त्रीय विवेचन) ही संज्ञा, 'जिज्ञासा' (ज्ञानाची इच्छा अर्थात सुव्यवस्थित चिकित्सा) ही संज्ञा, या सर्व संज्ञा तात्त्विक सत्याच्या शोधात विविध स्वरूपातील प्रयत्नांच्या वाचक आहेत. या तात्त्विक सत्यासच 'पराविद्या' म्हटले जाई. पराविद्या म्हणजेच मोक्ष होय. ह्याच सत्यशोधनापायी सर्व दर्शनांची रचना झाली. प्रत्येक दर्शनाचा दावा असा की, तेच माणसाची सर्व दुःखापासून मुक्तता करू शकते, अंतिम सत्तेच्या स्वरूपाचा बोध करून देते व जीवनाचे साकल्याने दर्शन घडवते. अशा प्रकारे इ.स. पूर्व चौथ्या शतकाच्या सुमारास 'तत्त्वज्ञाना'च्या संकल्पनेबाबत भारत व ग्रीस यांच्यात बरेच एकमत होते.

### ५) ग्रीक तत्त्वज्ञानाचा विकास

तत्त्वज्ञानाचा इतिहास पाहता असे लक्षात येते की या क्षेत्रात ग्रीस व भारत आघाडीवर आहेत. म्हणून या दोन राष्ट्रांमधील तत्त्वज्ञानाचा विकास समजून घेणे गरजेचे आहे. यास्तव प्रथम ग्रीक तत्त्वज्ञानाच्या विकासाकडे वळू या -

सॉक्रेटिस आणि प्लेटो यांच्या विचारात सत्य व सौंदर्य याविषयीच्या प्रेमावर (इरॉस) भर दिला गेला. इरॉस हा दैन्य (अज्ञान) आणि समृद्धी (सत्य-धन) यांचा पुत्र होय. ''ज्ञान हे सर्वात सुंदर व इरॉस म्हणजे सौंदर्याचे प्रेम, म्हणून इरॉस हा तत्त्वज्ञ असलाच पाहिजे व तत्त्वज्ञ (ज्ञान-प्रेमी) म्हणून ज्ञानी व अज्ञानी यांच्यातील तो

मध्यस्थ असला पाहिजे.'' म्हणूनच प्रणालित विवरणाऐवजी सॉक्रेटिस व प्लेटो यांनी संवादांचा अवलंब केला. सदैव स्थिर व एकरूप अशा सत्याचे आकलन हाच त्यांचा हेतू होय. हे आकलन म्हणजे, सर्वव्यापी व संवर्ती कल्पनांचे आकलन होय.

ॲरिस्टॉटलमध्ये, शोधप्रक्रियेचे फल असे जे विज्ञान त्यावर भर आहे. तत्त्वज्ञान याऐवजी 'सोफिया' (ज्ञान) ही संज्ञा त्याने वारंवार वापरली आहे व त्यामधून सैद्धान्तिक ज्ञानाच्या विविध शाखांचा निर्देश करण्यासाठी म्हणून या संज्ञेचा त्याने अनेकवचनी उपयोग केलेला आहे. या ज्ञानशाखांत गणित, पदार्थविज्ञान, नीतिशास्त्र, राज्यशास्त्र, काव्यशास्त्र इत्यादींचा अंतर्भाव होतो. पण ज्याला तो 'प्रथम तत्त्वज्ञान' म्हणतो ते 'सत्ताशास्त्र' होय. त्याचा अभ्यासविषय निरूपाधिक स्वरूपातील सत् तत्त्व व त्याचे स्वरूपगत गुणधर्म हा होय. ॲरिस्टॉटलच्या मते विज्ञान म्हणजे पदार्थाचे अव्यवहित, व्यवहित व अंतिम कारणदृष्ट्या ज्ञान होय व विज्ञाने वेगवेगळी आहेत याला त्यांचा अभ्यासविषय कारणीभूत नसतो, (कारण, अनेक विज्ञानांचा अभ्यासविषय सारखाच असू शकतो) तर प्रत्येकाचा विशिष्ट दृष्टिकोन आणि सत्तेच्या उपपादनासाठी स्वीकारलेले कारणप्रकार यामुळे विज्ञानशाखांत भेद निर्माण होतात. 'प्रथम तत्त्वज्ञान' सर्व सत्तांचा सत् म्हणून विचार करते व त्यांचा अंतिम कारणाच्या परिभाषेत त्यांची उपपत्ती लावते. हे अंतिम कारण म्हणजे शाश्वत, अचल, स्वतंत्र म्हणजे अतीत, असे सत् अथवा ईश्वर होय. ते तत्त्वज्ञान दैवी विज्ञान होय की जे सर्वापेक्षा ईश्वराला असते; पण जे प्राप्त करून घेण्याचा मानवाचा प्रयत्न असतो. ''अज्ञानापासून मुक्त होण्यासाठी जेव्हा माणसे अशा रीतीने तत्त्वचिंतन करतात, तेव्हा व्यावहारिक उपयुक्ततेसाठी नव्हे तर प्रज्ञेविषयीच्या शुद्ध प्रेमामुळेच ते ज्ञानाचा शोध घेत असतात, कारण प्रज्ञेमुळेच त्यांना पूर्ण आनंदाची प्राप्ती होऊ शकते.''

स्टोइक आणि एपिक्युरियन विचारवंतांमध्ये तत्त्वज्ञानाचे उद्दिष्ट अधिक ऐहिक स्वरूपाचे आहे. इच्छेला मार्गदर्शक होणारी अशी चांगले जीवन जगण्याची कला म्हणजे तत्त्वज्ञान असे त्यांनी मानले. त्यांचा दृष्टिकोन मुख्यतः नकारात्मक होता. जीवनातील भयावह गोष्टींपासून दूर राहून स्वतःचा बचाव करणे आणि बाकीच्या गोष्टींना पाठिंबा देणे ही स्टोइक विचारवंतांची प्रवृत्ती होती, तर त्यांचा सम्यक विवेकपूर्वक उपभोग घेण्याकडे एपिक्युरियन्सची प्रवृत्ती होती. तत्त्वज्ञ होणे म्हणजे केवळ ज्ञान प्राप्त करून घेणे नव्हे तर अनासक्त भूमिकेवरून संयम राखून वागणे होय असे त्यांचे मत होते.

### ६) पौर्वात्य प्रभाव

पायथॅगोरस सोडला तरी इ.स. पूर्व तिसऱ्या शतकापासून आशियाई लोक व धर्म यांच्याशी ग्रीसचा संबंध आला. काही प्रदेशांमध्ये, या ना त्या धर्मासाठी तत्त्वज्ञान राबवले गेले. तत्त्वज्ञानी हा द्रष्टा, निदान मोक्षमीमांसक समजला जाऊ लागला. फिलेने बायबलला रूपककथांचे भांडार मानले. इसवीसनाच्या तिसऱ्या शतकात प्लॅटिनसने प्लेटोवादाचे साक्षात्कारी व मोक्षवादी तत्त्वज्ञानात परिवर्तन केले. मात्र तत्त्वज्ञान व धर्म यांचा सामना झाला तो मुख्यतः ख्रिश्चन धर्मापासूनच.

## ७) भारतीय तत्त्वज्ञानाचा विकास

बौद्ध दर्शनात तत्त्वचिंतनास मध्यवर्ती स्थान होते. अनुभवास येणाऱ्या सर्व गोष्टी आणि सामान्य श्रद्धा यांची पद्धतशीर समीक्षा म्हणून बौद्ध दर्शनाचा विकास झाला. विश्वाला संपूर्णतः असत् ठरवणाऱ्या व पूर्ण अनासक्ती ठेवावयाला लावणाऱ्या अतीताचा शोध त्याने केला. म्हणून, अन्वीक्षणात्मक ज्ञानमीमांसेस प्राधान्य मिळून विधायक सत्ताशास्त्राची पीछेहाट झाली.

सांख्य-योग दर्शनांत अनासक्ती व ध्यानद्वारा, पुरुषाने प्रकृतीच्या अतीत होण्याकडे अधिक कल आहे. 'पुरुष' हे समस्वरूपी असे अनेक चिदणू मानले गेले आहेत, किंवा ईश्वराधिष्ठित चिदणूंची सृष्टी कल्पिलेली आहे. पुरुषाची पूर्ण मुक्ती वा कैवल्य किंवा समाधिद्वारा ईश्वराशी सायुज्ज-प्राप्ती हाच सर्व ऐहिक दुःखापासून मुक्त होण्याचा मार्ग समजण्यात आला आहे.

वैशेषिक-न्याय दर्शनांमध्ये युक्त विचारांच्या नियमांचा अवलंब आणि सत्ताविषयक 'पदार्थां'चे सम्यक आकलन हा मोक्षाचा उपाय मानला गेला. याला ईश्वराशी सायुज्यतेची जोड वैशेषिकांनी दिलेली नाही. परमेश्वराचे अस्तित्व व त्याच्याशी सायुज्य नैयायिकांनी मानले आहे.

'तत्त्वज्ञान' ही संज्ञा न्याय-वैशेषिक दर्शनाने प्रथमतः प्रचारात आणली. 'यथार्थज्ञान', विशेषतः ईश्वराविषयीचे या अर्थी ती वापरली गेली आहे व तद् विरुद्ध ज्ञानास मिथ्याज्ञान म्हटले आहे. वात्स्यायान व प्रशस्तपाद यांच्या चिंतनात हे आढळून येते.

पूर्वमीमांसेत वैदिक कर्मकांडांचे सम्यक आचरण मुख्य मानले गेले व सैद्धान्तिक तत्त्वविचार साधनभूत बनला.

वेदान्तदर्शनातही तर्क हा श्रुतींच्या विवरणाचे साधन मानला गेला. श्रवण, मनन, निध्यासनाचे विषय अशी जी श्रुतींतील महावाक्ये त्यांचे हे विवरण होय. ही आप्तवाक्ये ब्रह्म व प्रत्येक जीवातील आत्मतत्त्व यांचा अभेद प्रतिपादन करतात किंवा हे अद्वितीय ब्रह्म समग्र विश्वाचे सर्वांतर्यामी, अतीत, सल्ला घेणे अविकृत असे निमित्तकारण होय असे प्रतिपादन करतात. निदान शंकराचार्यांनी त्यांचा तसा अर्थ लावला आहे. रामानुजाचार्यांनी मात्र ब्रह्मपरिणामवादी कारणमीमांसा स्वीकारलेली आढळते. वल्लभाचार्यांनी ह्या कारकत्वाचा 'मार्गदर्शन' हा मर्यादित अर्थ घेतला आहे. ते कसेही असो, वेदान्त तत्त्वज्ञान म्हणजे प्रामुख्याने श्रुतिवादच, म्हणजेच आप्तवाक्यविषयक शास्त्र असून त्यामध्ये तर्काला श्रुतिप्रमाण विधानांपेक्षा गौण मानले आहे. ही आप्तवाक्ये प्रथमतः श्रद्धेने स्वीकारावयाची असतात; परंतु त्यांची साक्षात प्रचीती व्यक्तीने तर्कनिष्ठ चिंतनातून करून घ्यावयाची असते. शब्दवादत्व आणि साक्षात प्रचीतीची अपेक्षा हे वेदान्ताचे दोन विषय ख्रिश्चन साक्षात्कारवादी ईश्वरशास्त्राशी जुळणारे आहेत व जराशा कमी प्रमाणात त्यांचे इस्लामशीही साम्य आढळते.

## ८) तत्त्वज्ञान आणि ख्रिश्चन धर्म

मानवाला तारणारे सत्य, ख्रिस्तामध्ये झालेल्या ईश्वराच्या आविष्काराच्या रूपाने पूर्णतया उपलब्ध झाले असल्यामुळे, तत्त्वज्ञान हे निरूपयोगी आहे. तत्त्वज्ञानात अनेक सत्यापलाप असल्याने ते भयावह साधन होय, किंबहुना असत्यांचा जनक जो सैतान त्याची एक क्लृप्ती होय. तत्त्वज्ञानाने ज्ञेयवादासारखी अनेक पाखंडे निर्माण

केली, अशी ख्रिश्चनांची धारणा झाली. उपरोक्त मतप्रणालींशी सामना करणे त्यांना भाग पडले. मात्र आंधळेपणाने केलेला सामना क्वचितच यशस्वी होतो; त्यामुळे श्रद्धा-संरक्षणार्थ तत्त्वज्ञानाचा अभ्यास अपरिहार्य झाला. मात्र दैवी साक्षात्काराचे संकुल स्वरूप नीट समजून घेण्यासाठी तत्त्वज्ञान उपयोगी पडू शकेल, असेही त्यांना वाटले. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकापासून जस्टिन, क्लेमंट, अ‍ॅलेकझँड्रियांचा ऑरिजेन या विचारवंतांनी ख्रिश्चन धर्मसंस्थेला या विधायक दिशेने कामास लावले. त्यानंतरच्या तीन शतकांमध्ये ख्रिश्चन 'फादर्स'च्या पॅट्रिस्टिक तत्त्वज्ञानाला बहर आला. 'फादर्स'पैकी ऑगस्टिन हा प्रमुख होता. ऑगस्टिनने नव-प्लेटोवादाला ख्रिश्चन रूप दिले. ऑगस्टिनच्या मते सुखाच्या इच्छेतून तत्त्वज्ञानाचा जन्म होतो. त्यामुळे मोक्षाच्या वाटचालीत तो अत्यावश्यक घटक आहे; कारण तत्त्वज्ञान म्हणजे ज्ञानाचे प्रेम असल्यामुळे ते ज्ञानस्वरूप अशा ईश्वराचेच प्रेम होय. पॅट्रिस्टिक तत्त्वज्ञान हे तत्त्वतः शब्दवादी, श्रुतिप्रामाण्यवादी आहे; कारण ख्रिश्चन श्रुती हे त्यांचे सर्वश्रेष्ठ प्रमाण असून तत्त्वज्ञानात्मक विधान हे त्याला धरून असले पाहिजे, असा त्याचा आग्रह आहे.

यानंतरचा कालखंड हा जवळजवळ सर्जनात्मक नव्हताच. तरीही एरिजेना, अ‍ॅबेलार्ड, गिल्बर्ट हे विचारवंत या काळात निर्माण झाले. तत्त्वज्ञान विरुद्ध श्रद्धा या समस्येत त्यांना फार रस होता. तत्त्वज्ञानाला स्वतंत्र स्थान प्राप्त करून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मुस्लिम तत्त्वज्ञान जगतामध्ये मात्र इब्न-सीना व इब्न रुश्द (अ‍ॅव्हिसेना व अ‍ॅव्हेरूस) यांनी अ‍ॅरिस्टॉटलच्या विचारांचे पुनरुज्जीवन केले व अतिशय समर्थपणे त्याचे विवरण केले. मात्र इस्लामच्या 'कलम' किंवा ईश्वरशास्त्राला त्यांनी मागे सारले नाही. ज्यूंच्या जगतामध्ये हेच कार्य मेमोनायडीसने केले.

या विचारवंतांच्या लिखाणाच्या लॅटिनमधील भाषांतराने स्कोलॅस्टिक मध्ययुगीन तत्त्वज्ञानाचा प्रारंभ झाला. स्कोलॅस्टिक महान विद्वतसमूहात टॉमस अ‍ॅक्वायनस हा सर्वोच्च होता. तर्कपूत तत्त्वज्ञान आणि आप्तवाक्यवादी ईश्वरशास्त्र यांचे प्रांत भिन्न आहेत हे त्याने स्पष्टपणे दाखवले व तत्त्वज्ञान हे ख्रिश्चन श्रद्धेला फक्त सेविकेप्रमाणे उपयोगी पडू शकेल, ही भूमिका त्याने मांडली. पण त्याचबरोबर, मोक्षसिद्धीसाठी तत्त्वज्ञान हे पुरेसे नाही हेही त्याने स्पष्ट केले. कारण, ते अमूर्त व अपूर्ण ज्ञानच देऊ शकते व त्याला पूरक म्हणून आत्मसाक्षात्कार, प्रपत्ती आणि प्रभूकृपा यांद्वारा अंतःप्रज्ञेच्या साहाय्याने निरूपाधिक सत्तेच्या दर्शनाची अपेक्षा असते. तत्त्वज्ञान व श्रद्धा यामधील हा भेद व उभयतांची परस्परपूरकता ही स्कोलॅस्टिक विचारवंतांची मोठी कामगिरी असून भावी विचारवंतांना त्यांनी दिलेला तो वारसा होय.

अर्वाचीन कालामध्ये तत्त्वज्ञानाचे धर्मश्रद्धेशी असलेले दुवे क्रमशः तुटत गेले आणि त्याला भौतिक विज्ञानाशी अवघड सामना करावा लागला.

### ९) तत्त्वज्ञान : भारतीय दृष्टिकोन

भारतीय विचारधारेला 'तत्त्वज्ञान' ही संज्ञा लावली असता त्यामध्ये स्थूलमानाने, मनुष्यापासून ते कनिष्ठ कक्षेतील प्राणिमात्र, वनस्पती व अचेतन वस्तू आणि ज्येष्ठ कक्षेतील आध्यात्मिक व आधिदैविक गोष्टी- या सर्वांच्या अस्तित्वाचे गूढ उकलण्याचे भारतीय विचारवंतांचे सर्व प्रयत्न समाविष्ट होतात असे मानता येईल;

तथापि व्यवहारविषयक क्षेत्रासंबंधीचे सैद्धान्तिक विवेचन आपणास आपल्या विचारकक्षेतून वगळता येईल. उदा. अर्थशास्त्र, कामशास्त्र (कामसूत्र), धर्मशास्त्र, ब्राह्मणग्रंथ, वेदांगे, कल्पसूत्रे, तंत्र अथवा आगमग्रंथ, संगीत, काव्य, नृत्य व नाट्यविषयक सौंदर्य मीमांसा, वैद्यकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित व खगोलशास्त्र या सर्व शास्त्रांवरून भारतीय मन हे बहुअंशी व्यवहारप्रवण असल्याची साक्ष पटते.

भारतीय तत्त्वज्ञान हे धर्माधिष्ठित असून 'अंतिम ध्येय' हे जे त्याचे सारभूत तत्त्व आहे, त्यावर ते जवळजवळ निरपवादरीतीने केंद्रित झाले आहे आणि त्या तत्त्वापासून ते सतत नव-नवीन प्रेरणा व सामर्थ्य प्राप्त करून घेत असते.

अनुभूतिनिष्ठ साक्षात्कार हे भारतीय तत्त्वज्ञानाचे उद्दिष्ट आहे. त्यामुळेच ते सैद्धान्तिक आहे असे म्हणण्याऐवजी व्यावहारिक आहे असे म्हणणे योग्य होईल. उपनिषदांचा कालखंड हा निश्चितच तात्त्विक क्षेत्रातील आद्य निष्ठा, विचारस्वातंत्र्य आणि जिज्ञासा व दिव्य दृष्टी यासंबंधी दाखवलेले धाडस याकरिता उल्लेखनीय ठरतो.

भारतीय तत्त्वज्ञान हे मूल्यमापनात्मक आहे. वाटेल त्या प्रकारचे सत्यान्वेषण ते करीत नाही, तर ज्या योगे मानवाला परिपूर्णता प्राप्त होऊन त्याचा उद्धार होईल असे सत्यान्वेषण ते करते. नीर-क्षीर-विवेकी हंसाप्रमाणे भारतीय तत्त्वज्ञान हे कठोपनिषद् (२.२) यात म्हटल्याप्रमाणे 'प्रेया'पेक्षा 'श्रेय' अधिक पसंत करते आणि अपराविद्या नव्हे तर पराविद्येला ध्येय मानते. नित्यानित्यवस्तुविवेक साधण्याचा भारतीय तत्त्वज्ञान प्रयत्न करते. कारणांबद्दल मीमांसा करताना भारतीय तत्त्वज्ञान हे उपादान अथवा आत्मन् म्हणून म्हटल्या गेलेल्या आंतरिक कारणाला प्राधान्य देते.

खरोखर ब्रह्मविद्या ही सर्व शास्त्रांचा मूलाधार मानण्यात आलेली आहे. ('सर्वविद्याप्रतिष्ठा', मुंडकोपनिषद्, १.१.१) आणि तत्त्वज्ञान हे 'सर्व शास्त्रांचा प्रदीप, सर्व कर्मांच्या सिद्धीचा उपाय आणि सर्व (कर्तव्य-) धर्माचा आश्रय आहे' (कौटिल्य) असे मानले जाते.

### १०) तत्त्वज्ञानाचे स्वरूप

सृष्टीचे, संसाराचे व जीवनाचे सार शोधणे, सृष्टिनियमात आणि जीवनात अंतर्गत असलेली मूल्ये निश्चित करणे, सर्वंकष असे विश्वाचे सत्य समजून घेणे, हे तत्त्वज्ञानाचे आद्य प्रयोजन व त्याचप्रमाणे प्रमुख कार्य आहे. तत्त्वज्ञान हे मानवी विवेकशीलतेचे सर्वोत्कृष्ट फळ होय. जीवनामध्ये जे काही अनुभव मनुष्याला आले, त्यांचा कार्यकारणभाव शोधून काढल्यावर निघालेल्या निष्कर्षांचे ते सारसर्वस्व होय. कधी निसर्गातील भव्य देखाव्याचे निरीक्षण करून, तर कधी आलेल्या संकटांचे परीक्षण करून विचारी माणसांना, जे काही सिद्धान्त सुचले त्यांचा तो आविष्कार होय. तत्त्वज्ञान म्हणजे विवेकयुक्त जीवन, भौतिक निसर्गाच्या मुळाशी असलेल्या आध्यात्मिक सिद्धान्ताचा शोध, अनित्य वस्तूंच्या मागे प्रतीतीस येणाऱ्या नित्य वस्तूंचे अनुमान, भिन्न-भिन्न पदार्थांना जोडणारा अव्यक्त धागा, या नश्वर विश्वाचा आधार, तमः-प्रकाश, जन्म-मरण, सुख-दुःख, उच्च-नीच, जयापजय इत्यादी द्वंद्वांच्या पलीकडचे समाधान होय. तत्वज्ञान हे सर्व शास्त्रांचे शास्त्र आहे, कारण त्यामध्ये अखिल विश्वाचा व मानवी जीवनाचा विचार साकल्याने आणि समग्रपणे केला जातो. तत्त्वज्ञानशास्त्राचे महत्त्व

जसे सर्वमान्य आहे, तसे त्याचे गहनत्वही असामान्य आहे, कारण अव्यक्त विषयाचे विवेचन त्यात असून, शिवाय मानवी जीवनाचे अंतिम ध्येय किंवा मूल्य त्यामध्ये विशद केलेले असते आणि वर्णनात्मक शास्त्रांपेक्षा ध्येयवादात्मक शास्त्रे नेहमीच गहन असतात, सृष्टी अस्तित्वात कशी आली? तिचा निर्माता कोणी आहे काय? सृष्टीत काही नियमबद्धता, सूसुत्रता आहे काय? सृष्टीतील व्यवहारांचे संचालन कोणत्या मार्गाने होते? सृष्टीच्या अस्तित्वासाठी एखादी अद्भुत शक्ती आहे काय? या प्रश्नांची उत्तरे तत्त्वज्ञान शोधीत असते. मुख्य प्रश्न मानवासंबंधीचे आहेत, मानवाच्या जीवनाचे सूत्र कोणते? मानव कोठून आला आहे? कोठे चालला आहे? त्याच्या जीवनाचे उद्दिष्ट कोणते? मानवास सृष्टीचे ज्ञान कसे होते? हे प्रश्न कोणत्याही तत्त्वज्ञानात अग्रस्थानी आढळतील.

### ११) तत्त्वज्ञान आणि जीवन

तत्त्वज्ञान आणि प्रत्यक्ष जीवन यांचा संबंध काय? म्हणजेच ज्ञान आणि कर्म (कृती), विचार आणि आचार यांचा संबंध काय? ज्ञान बुद्धिप्रामाण्यच मानील तर कर्म जीवन मूल्यांच्या दिशेने क्रियाशक्तीच्या व इच्छाशक्तीच्या आधारे चालेल हे लक्षात घेतले तर मग ज्ञानाची आणि जीवनाची (क्रियेची) क्षेत्रे भिन्न आहेत काय, असा प्रश्न उपस्थित होतो. प्रत्यक्ष जीवनाचे तत्त्वज्ञान म्हणजे निव्वळ बौद्धिक स्वरूपाची एक विचारप्रणालीच आहे, की प्रत्यक्ष जीवनाचे अधिष्ठान आहे? प्राचीन भारतात आणि प्राचीन ग्रीस मध्ये, किंवा मध्ययुगीन काळात अथवा अध्यात्मवाद-वा-कार्यवाद-सदृश आधुनिक तत्त्वज्ञान पद्धतीत 'तत्त्वज्ञान जीवनाचा एक मार्ग आहे' ही विचारसरणी दिसून येईल. आधुनिक तत्त्वज्ञानातील काही संप्रदायांना मात्र हे संमत नाही. त्यांच्या दृष्टीने ज्याप्रमाणे 'कलेसाठी कला' त्याचप्रमाणे 'ज्ञानासाठी ज्ञान' कोणीही मान्य करील की, तत्त्वज्ञानाची कसोटी सत्यता हीच, उपयुक्तता ही नव्हे किंवा इतर कोणतीही कसोटी लागणार नाही; परंतु मानवी मन किंवा आत्मशक्ती ही एकरूप आहे, ही जाणीव ठेवणे आवश्यक आहे. ज्ञान, भावना, क्रिया ही परस्परांना अवलंबून असून, त्यांच्यामध्ये अविभाज्य असा संबंध आहे. त्यामुळे आचार आणि विचार, कृती आणि सिद्धान्त, जीवन (कर्म) आणि तत्त्वज्ञान ह्यांत विवेचनासाठी वा विवरणासाठी भेद कल्पिला, तरी मूलतः ती एकमेकांशी निगडित आहेत. जीवनाचे सम्यक ज्ञान झाले की ते आचारात उतरेलच पाहिजे. जोवर ज्ञान मर्यादित व एकांगी राहील तोवर जीवनाची आणि ज्ञानाची क्षेत्रे भिन्न राहतील; परंतु ज्या मानाने ज्ञानात परिपूर्णता येईल त्या मानाने त्यांतून जीवन-मार्ग प्रतीत होईल आणि ही प्रतीति निव्वळ बौद्धिक न राहता प्रत्यक्ष कृतीत व्यक्त होईल. सॉक्रेटिसने सद्गुण आणि ज्ञान, आचार आणि विचार हे केवळ परस्परावलंबीच मानले नाहीत तर एकरूप मानले, आणि 'सदाचार व ज्ञान' ही एकच आहेत हे तत्त्व सूत्ररूपाने प्रतिपादिले. ज्ञान जीवन जगण्याचा मार्ग दर्शवते एवढेच नव्हे तर तो मार्ग अवलंबवण्यास भाग पाडते; म्हणूनच प्ल्युटार्कने म्हटले, ''तत्त्वज्ञान ही जीवनाची कला आहे.''

ज्ञानाविषयी भारतीय तत्त्वज्ञानात जी कल्पना आहे, तीत तत्त्वज्ञान या शब्दात जीवनाशी असणारा हा संबंध गृहीत धरला आहे हे दिसून येईल. त्याचप्रमाणे 'फिलॉसफी' ह्या आंग्ल भाषेतील शब्दात (ज्ञानाची प्रीती) भावनांद्वारे जीवनाशी संबंध व्यक्त झाला आहे. अमेरिकन विचारप्रवर्तक लेखक थोरो ह्याने ही कल्पना पुढील

शब्दात स्पष्ट केली आहे. ''तत्त्वज्ञानाचे विचारच सूक्ष्म असतात असे नव्हे, तर ज्ञानाविषयीची त्याची प्रेमभावना इतकी उत्कट असते की, तिच्या अनुरोधाने तो जीवन जगत असतो.''

### १२) तत्त्वज्ञान व गुरुधर्म

तत्त्वज्ञानाचा एखादा विवक्षित पंथ ज्याला पटला आहे, बुद्धीला पटून त्याचा जीवनात तो उतरला आहे, त्याच्या जीवनाचे अधिष्ठान होऊन बसला आहे, तो आपले तत्त्वज्ञान स्वतःपुरते आणि स्वतःच्या वैयक्तिक जीवनापुरतेच मर्यादित ठेवणार नाही, ते तत्त्वज्ञान इतरांना पटवून देण्याचा सतत प्रयत्न करील हाही मानवाचा प्रकृतिधर्म आहे, आणि हे स्वभावज कर्म आहे. मनुष्य स्वभावच असा आहे की, प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या श्रद्धा आणि निष्ठा इतरांस पटवण्याचा, इतरांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न करते. प्रत्येक मानव आपल्या जीवनात शिष्य आणि गुरू या दोन्ही भूमिका पत्करतो; आणि त्यातून आपला स्वतःचा व इतरांचा विकास साधत असतो. बाल्यात आणि तारुण्यांत शिष्यधर्म जितका स्वाभाविक, तितकाच प्रौढावस्थेत गुरूधर्म स्वाभाविक आहे; आणि जीवनाच्या कोणत्याही अवस्थेत हे दोन्ही धर्म प्रत्येक व्यक्तीत आढळतात, शिकणे जितके स्वाभाविक आहे, तितकेच शिकवणेही आहे. जीवनाचे सार जसे ज्याला उमगले तसे इतरांना समजावण्याचा प्रयत्न तो करील. स्वतःच्या ज्ञानाचे इतरांना दान करणे हा गुरूचा धर्म आणि ते आत्मसात करून ते ग्रहण करणे हा शिष्याचा धर्म; मात्र विद्यादान आणि विद्याग्रहण ही इतर दानापांसून आणि ग्रहणापासून भिन्न आहेत. हे दान दृश्य वा मूर्त वस्तूंचे नाही. ह्या दानात आणि ग्रहणात गुरुशिष्यांच्या सर्व अंतःशक्ति गुंतलेल्या राहतात.

इतिहासाकडे दृष्टी टाकली तर दिसून येईल की, महान तत्त्वज्ञ हे महान गुरु म्हणून गणले गेले आहेत. उपनिषदांतील ऋषी तत्त्वज्ञानीही होते, इतकेच नाही तर ह्या दोन भूमिका त्यांच्या जीवनात भिन्न अशा नव्हत्याच. प्राचीन ग्रीसमध्ये सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल यांच्यासारखे प्रसिद्ध तत्त्ववेत्ते प्रत्यक्ष रीतीने देशातील तरुणांना शिक्षण दानाचे कार्य करीत होते. त्यांच्या स्वतंत्र विचारशक्तीचा विकास घडवून आणत होते. मध्ययुगीन युरोपमध्ये तत्त्वज्ञानास धर्माची किंवा धर्मास तत्त्वज्ञानाची जोड मिळाली आणि या धर्मगुरुंनी वेगवेगळ्या क्षेत्रांतील तरुणांस शिक्षण देण्याचे कार्य केले. सूफी साधना आणि तत्त्वज्ञानक्षेत्रपण याला अपवाद नाही. कारण सूफी साधना व तत्त्वज्ञानामध्ये सद्गुरुचे अढळ स्थान मान्य आहे.

### १३) भारतीय तत्त्वज्ञान : एका दृष्टिक्षेपात[२]

**१) लोकायत :** इ.स. पू. सहावे शतक. प्रस्थापक बृहस्पती. प्रणेते चार्वाक. (अजित केशकंबली, मख्खली गोशाला) सर्वांचा काळ अनिश्चित. वेदविरोधी (वेद-पूर्वकाळातील लोकांचे तत्त्वज्ञान) लोकायताची मुख्य सूत्रे अशी आहेत - प्रत्यक्ष हेच प्रमाण, आत्मा देह एकच, पुनर्जन्म नाही. विश्व चार भूतांपासून, त्यातून जीव निर्माण. ईश्वर नाही. जे होते ते स्वभावानुसार. जग, जीवन सत्य. नित्य कर्मे करून सुखोपभोग घ्यावा. देह हेच सत्य. तो नाशवंत. तोच आत्मा. ऐहिक सुखप्राप्ती. कर्मकांडे मूर्खपणा. मोक्ष म्हणजे मृत्यू. मोक्षावस्था नाही.

**२) जैनवाद :** संस्थापक महावज्र (इ.स. पू. ८-९ शतक) प्रणेता : २४ वे तीर्थंकर (वर्धमान) अवैदिक. मुख्य सूत्रे अशी : जीव (आत्मा) आणि अजीव (आत्म्याखेरीज सर्व). जीव हा जाणीवपूर्वक असतो तर अजीव हा परमाणूमय असतो. दोन्ही अनादी, अनंत. निरीश्वरवादी. आत्मा अनंत, अनादी. जग परिवर्तनीय. आत्मा=जीव. अनंत 'द्रव्या'चा शरीरात तात्पुरता निवास. अहिंसा, धर्मपालन, अपरिग्रह हा जीवनहेतू. योग्य श्रद्धा, योग्य ज्ञान, योग्य वर्तन ही त्रिरत्नप्राप्ती म्हणजे आत्म्याची मूल शुद्धता. मोक्ष कल्पना नाही. पुनर्जन्म, कर्मसिद्धान्त मान्य.

**३) बुद्धवाद :** प्रस्थापक व प्रणेते गौतम बुद्ध (इ.स. पू. ५६३-४८३). हीनयान व महायान दोन प्रमुख पंथ. अवैदिक. मुख्य सूत्रे आहेत अशी- जीवन दुःखद. त्याचे मूळ अविद्या. (अज्ञान) त्यामुळे इच्छा, आकांक्षांचा प्रभाव. त्याचा त्याग म्हणजे निर्वाणप्राप्ती. निरीश्वरवादी. आत्मा म्हणजेच माणसातील ईश्वर. संसार क्लेशदायक. मूळ निकृष्ट निसर्ग सोडून निर्वाण मार्ग धरावा. स्वार्थी, क्षुद्र इच्छा सोडून निर्वाणपद प्राप्त करावे. इतरांचे दुःख कमी करावे. निर्वाण म्हणजेच मोक्ष.

**४) सांख्य-योग :** प्रस्थापक व प्रणेते कपिल (सांख्य मुनी. काल अनिश्चित) कृष्णचंद्र (सांख्य) ५ वे शतक (योग : पतंजली) (इ.स. पू. पहिले शतक) वेद प्रमाण पण तत्त्वज्ञान स्वतंत्र. सृष्टी निर्मिती प्रकृती (जडद्रव्य) आणि पुरुष (चेतना) यांच्या संयोगातून. सांख्य निरीश्वरवादी आहेत; तर योग ईश्वरवादी. जग मुख्यतः प्रकृतीचा परिणाम. (सूर भौतिकवादी) जीव असंग, चेतन, भोक्ता आणि नानास्वरूपी. जीवनहेतू प्रकृती-पुरुष विवेक (तेवीस तत्त्वात्मक) त्रिविध दुःखाचा नाश म्हणजे मोक्ष.

**५) न्याय-वैशेषिक :** प्रस्थापक व प्रणेते कणाद (वैशेषिक) इ.स. पू. ६-५ शतक. गौतम (न्याय) इ.स. दुसरे शतक. वेद प्रमाण पण तत्त्वज्ञान स्वतंत्र. विश्वनिर्मिती परमाणू संयोगातून. अनित्य (सांख्यांशी सहमत) आत्म्याची अलगता ही ज्ञानप्राप्ती. सर्व दुःखांचा नाश (ज्ञानप्राप्तीमुळे) म्हणजे मोक्ष.

**६) मीमांसा :** प्रस्थापक जैमिनी (इ.स. पू. ३००) कुमारिल भट्ट आणि प्रभाकर प्रणेते (दोघेही इ.स. पू. आठवे शतक). कडक वेदनिष्ठा (ईश्वराठिकाणी वेद). वेदोक्त कर्मपूर्ती हे सर्वप्रमुख कर्तव्य. निरीश्वरवादी. ईश्वरकल्पना निरर्थक, अनावश्यक. जग आणि जीवन अनादी, अनंत, प्रवाही. जीव जड, नाना, कर्ता भोक्ता. वेदविहित कर्माचरण म्हणजे फलप्राप्ती. यज्ञकर्मांनी मिळते ती स्वर्गप्राप्ती म्हणजे मोक्ष.

**७) अद्वैतमत :** प्रस्थापक व प्रणेते बादरायणाचार्य (काल अनिश्चित), शंकराचार्य (इ.स. ७८८-८२०), रामानुजम् (इ.स. १०७३-११३७), मध्वाचार्य (इ.स. ११९९-१२९५) वेदाधिकाराचा आग्रह. मुख्य सूत्र 'ब्रह्म सत्य, जग मिथ्या'. मूलतत्त्व ब्रह्मन्. ईश्वर, त्याचे सगुण रूप (पुढील टप्प्यात भक्तिमार्गाकडे). जग मायेचा परिणाम आणि चैतन्याचा विवर्त. जीव म्हणजे अविद्याधारी चैतन्य. जीवनहेतू ब्रह्मन् आत्मन युतीचे ज्ञान. उपरोक्त ज्ञानप्राप्ती (अविद्या मुक्ती) म्हणजे मोक्ष.

## १४) भारतीय तत्त्वज्ञान सार

उपनिषदादिकांपासून अद्वैतवाद्यांपर्यंत संबंधित जन सर्व वेदांत थोड्याफार प्रमाणात प्रमाण मानत होते. जैन आणि बौद्ध हे अवैदिक, तर लोकायत-चार्वाकवादी हे वेदविरोधी होते. लोकायतवादी हे बहुधा

आर्यपूर्वकाळातील स्थानिक जन असावेत. कारण त्यांना कथित उच्च तत्त्वज्ञानाचा संसर्ग झालेला दिसत नाही. आयुष्य सुखाने जगावे, पारलौकिकाच्या निरर्थक उठाठेवी करू नयेत, ही त्यांची जीवनदृष्टी होती. वेदवेत्त्यांशी त्यांचे संघर्ष अनेक कारणांमुळे अपरिहार्य होते. आर्यांच्या वेदांतून (विशेषतः ऋग्वेदातून) निसर्गाचे प्रतीकात्मक प्रतिनिधित्व करणाऱ्या देवदेवतांची सुख आणि समृद्धी यांसाठी प्रार्थना आहे. त्यांना प्रसन्न करण्यासाठी ब्राह्मणांत (विशेषतः यजुर्वेदात) यज्ञयाग मार्ग सांगितला आहे. मूळच्या असुरजनांचा त्रास कमी झाला तरी यज्ञयाग आणि कर्मकांड अमर्यादपणे वाढले. त्यांना आवर घालण्यासाठी विश्वनिर्मिती आणि विश्वनियंत्रण यांची मूळ शक्ती एक ब्रह्म आहे, अनेक देवदेवता नाहीत असे सांगणारी उपनिषदे पुढे आली. उपनिषदांचे मुख्य सूत्र होते, आत्मन आणि ब्रह्मन यांचे एकच असणे. उपनिषदानंतर सहा दर्शने (षड्दर्शने) पुढे आली ती (१) सांख्य-योग (२), न्याय-वैशेषिक (२), मीमांसक आणि अद्वैत. सांख्याच्या मते जड प्रकृती पुरुषाच्या (चैतन्याच्या) साहाय्याने संसार उभा करते. ती संसार मांडते आणि मोडतेही. पुरुष आणि प्रकृती अनादी आणि अनंत आहेत, तेव्हा ईश्वर (जगन्नियंता) ही संकल्पना अनाठायी आहे. पृथ्वी, वायू, अग्नी, जल ही चार भूते आणि सत्त्व, रज, तम हे तीन गुण यांच्या साहाय्याने निर्माण केलेल्या २५ तत्त्वांपासून सर्व सृष्टीची उपपत्ती झाली असे सांख्य मानतात. न्याय-वैशेषिक परमाणूंच्या संयोगातून जडसृष्टी निर्माण झाली, पंचमहाभूते उत्पन्न झाली आणि त्यांतून विश्वोदय झाला असे समजतात. मीमांसक हे प्रखर वेदनिष्ठ; तेही ईश्वर मानत नाहीत. वेदातील कर्मकांडांची क्रिया प्रत्यक्ष स्वर्गप्राप्तीलाही सक्षम आहे असे मत मांडून पुरोहित वर्गाचे माहात्म्य त्यांनी वाढवले. अद्वैतवाद्यांचा भर उपनिषदांवर अधिक. त्यांच्या मते सच्चिदानंदस्वरूपी ब्रह्म आणि आत्मा एकच आहे. ब्रह्म हे एकमेव मूलतत्त्व (ईश्वर त्याचे सगुण स्वरूप). मुख्य म्हणजे संसार हा ब्रह्मावरील केवळ भास आहे, तो मिथ्या आहे. या मिथ्या भासाचे ज्ञान म्हणजे जीवनमुक्ती. मायिक जगातून मुक्तता म्हणजे मोक्ष. आपापल्या रूपरंगांसह आणि उपग्रहांसह वेद सूर्याभोवती उपनिषदांसकट फिरणारे हे सात ग्रह म्हणजे भारतीय विचारविश्वाची विशेष शोभा आहे.

उपरोक्त सिंहावलोकनावरून काही गोष्टी प्रकर्षाने जाणवतात. प्राचीन भारतातील वैचारिक वैपुल्य आणि विविधता आश्चर्यचकित करणारी आहे ही पहिली जाणीव होते. सर्वसाधारण समज असा असतो की, प्राचीन भारतातील विविध तत्त्वज्ञाने एकच गोष्ट सांगत होती; पण प्रत्यक्षात ईश्वरविरोधी लोकायतापासून, तर ईश्वरवादी भक्तिवादापर्यंत विविध मते अहमहामिकेने मांडली गेली. वेदवादी, वेदविरोधी, अवैदिक असे सर्व विचारवंत वैचारिक संघर्षात मग्न झाले होते. लोकायतांविरुद्ध वेदांतवादी, वेदांतवाद्यांविरुद्ध जैन-बौद्धपंथीय, त्यांच्याविरुद्ध अद्वैतवाद, त्याच्याशी असहमत मीमांसक असे संघर्ष चालू होते. शंकराचार्यांचे तत्त्वज्ञान रामानुजांना मान्य नाही, तर रामानुज मध्वाचार्यांना अमान्य. लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही की या घनघोर वैचारिक युद्धात रक्ताचा एक थेंब सांडला गेला नाही. शतकानुशतके संघर्ष होत होते, पण क्रुसेडचे किंवा जिहादचे रक्तरंजित दृश्य कधीही दिसले नाही. कुणाची वैचारिक पातळी ढळली नाही.

इतिहासाचा रथ भारतीय भूमीत विविध मतांची बीजे फेकीत पुढे गेला; अनेक झाडे त्या बीजांतून उगवली, वाढली. काही कालांतराने वठलीही. पण यापलीकडे या भूमीत फार मोठा अनर्थ झाला नाही. धर्माच्या नावाखाली जगभर कत्तली झाल्या, संहार झाले; पण येथे तसे काहीही झाले नाही. तसे का झाले नाही हे एक

गूढच आहे. कदाचित भारतीयांची उपजत प्रवृत्ती समंजस आणि सहिष्णू असेल; कदाचित या तत्त्वज्ञानांत सहिष्णुतेवर आणि अनाग्रहावर भर म्हणून असेल, कदाचित माणसाला पाशवी बनवणाऱ्या धर्मोन्मादाला त्यात केंद्रीय स्थान नसेल. पण एक परंपरा निश्चितपणे निर्माण झाली ती सहिष्णुता आणि विविध धर्म समभावाची. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीला परमतसहिष्णुता आणि धर्मनिरपेक्षता, यांची सहज मान्यता मिळाली आणि सामर्थ्य मिळाले ते या प्राचीन परंपरेकडून, हे नमूद केले पाहिजे.

समस्त भारतीय तत्त्वज्ञानाची व्यवच्छेदक लक्षणे सूक्तीरूपात पुढीलप्रमाणे मांडता येतील–

१. वेद – 'वेदोऽखिलो धर्ममूलम्'
२. उपनिषदे – 'अहं ब्रह्मास्मि'
३. गीता – 'निष्काम कर्मयोग'
४. सांख्य – 'पुरुष–प्रकृतीची क्रीडा'
५. न्याय-वैशेषिक – 'परमाणुवादाची मांडणी'
६. पूर्व–मीमांसा – 'अथातो धर्मजिज्ञासा'
७. अद्वैत दर्शन – 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या---।'
८. लोकायत विचार* – 'प्रत्यक्ष हेच प्रमाण (प्रत्यक्षमेव प्रमाणम्)'
९. जैन विचार – 'जीव आणि अजीव यांचा संसार'
१०. बुद्ध विचार – 'निर्वाण हेच मोक्ष'

---

** लोकायत विचारालाच 'चार्वाक दर्शन' असे दुसरे नाव आहे. खा, प्या आणि मजा करा हा या दर्शनाचा मूलमंत्र आहे. हे नास्तिक, निरीश्वरवादी, प्रत्यक्षवादी तसेच सुखवादी दर्शन आहे.*

२

प्रकरण – २

# इस्लामी तत्त्वज्ञान[३]

इस्लामी तत्त्वज्ञानाचा विकास पाहता त्याची मांडणी तीन विभागांमध्ये करणे सोयीस्कर ठरेल. ती मांडणी अशी होईल – (क) इस्लाम धर्मांतील तत्त्वज्ञान, (ख) इस्लामी तत्त्ववेत्त्यांचे तत्त्वज्ञान आणि (ग) सूफींचे विचारविश्व (चिंतन) याच क्रमाने पुढे विषय–विवेचन करण्यात येत आहे –

### क) इस्लाम धर्मांतील तत्त्वज्ञान

इस्लाममधील दार्शनिक कल्पनांची वाढ व विकास यांची कथा म्हणजे मानव जातीच्या बौद्धिक इतिहासातील एक रम्य प्रकरण आहे. तत्त्वज्ञान आणि इस्लाम यात परस्पर–विरोध आहे, असे समजणे ही एक चूक ठरेल. ज्यांनी पवित्र कुराणाचा अभ्यास केलेला आहे त्यांना त्या पवित्र ग्रंथात 'हिक्मत' (ज्ञान, विवेक) या शब्दावर किती भर देण्यात आलेला आहे याची चांगली कल्पना असली पाहिजे. कुराणामध्ये हा शब्द अनेक ठिकाणी आलेला आहे. पवित्र कुराण सांगते, ''तो ज्यास इच्छितो त्यास विवेक (ज्ञान) प्रदान करतो, आणि ज्या कोणाला विवेक (ज्ञान) प्रदान करण्यात आले असेल, त्याला खरोखर मोठी संपत्ती प्राप्त झाली.'' २:२६९ प्रेषित मुहम्मद साहेबांच्या काही उक्तींमध्येही ज्ञानाच्या शोधावर खूप भर देण्यात आलेला आहे. पैगंबरसाहेब नेहमी म्हणत असत, ''विद्वानाची शाई हुतात्म्याच्या रक्ताहून अधिक पवित्र आहे.'' तसेच, ''जो ज्ञानाच्या शोधासाठी आपले घर सोडतो तो ईश्वरी मार्गाने जात असतो.'' यावरून हे स्पष्ट होते की, इस्लामच्या अनुयायांनी आपापल्या कुवतीप्रमाणे ज्ञानप्राप्तीची कला अवगत व विकसित केली पाहिजे, अशी आशा बाळगण्यात आलेली होती.

प्रेषित मुहम्मदांनी प्रवर्तिलेला धर्म साधा आणि व्यवहार्य होता; परंतु जसजसा इस्लामचा प्रसार होऊ लागला, तसतसे पवित्र कुराणातील वचनांचा अर्थ लावण्याच्या बाबतीत नवनवीन प्रश्न उपस्थित होऊ लागले. तरीपण अरबांनी विश्वावर (जगावर) अधिराज्य गाजवणाऱ्या सर्वश्रेष्ठ ज्ञानालाच मान्यता दिली. एके ठिकाणी असे सांगण्यात आले आहे की, मानवी कर्मांवर एका सर्वशक्तिमान संकल्पाचे नियंत्रण असते. दुसऱ्या एके ठिकाणी मानवी इच्छा–स्वातंत्र्याची कल्पना अत्यंत जोरदार शब्दांत मांडण्यात आलेली आहे. पवित्र कुराणाने स्पष्ट सांगून टाकले आहे की, ''जो कोणी दुष्कर्म (पाप) करतो तो स्वतःच्या आत्म्याविरुद्ध ते करत असतो.'' ४:१११ दुसऱ्या शब्दात असे सांगता येईल– 'जो कोणी पाप करील त्याची जबाबदारी त्याच्यावरच राहील.'

याचा अर्थ असा की, मानव हाच त्याच्या स्वतःच्या आचरणाचा संपूर्ण धनी आहे. त्याला ज्या शक्ती देण्यात आलेल्या आहेत त्यांचा सदुपयोग किंवा दुरूपयोग करण्याची जबाबदारी त्याच्यावरच आहे. त्याची जशी प्रवृत्ती असेल त्याप्रमाणे तो वर चढेल किंवा खाली पडेल. मात्र खाली पडलेल्या माणसाला ईश्वरी मार्गदर्शनाची हमी देण्यात आलेली आहे. इच्छास्वातंत्र्य आणि नियतिवाद यांच्या बाबतीत इस्लामच्या पैगंबरांची शिकवण अशी आहे; परंतु त्यानंतरच्या काळात ख्रिस्ती धर्म आणि इस्लाम या दोहोंमध्ये हीच समस्या संघर्षक्षेत्र बनून राहिली.

### १) मदिना–संप्रदाय

अरबी दार्शनिक विचारधारा सर्वप्रथम मदिना–संप्रदायातून निर्माण झालेली होती, हे लक्षात ठेवले पाहिजे. कालांतराने इच्छा–स्वातंत्र्य आणि नियतिवाद याविषयीच्या कल्पनेने अधिक निश्चित स्वरूप धारण केले आणि तिचे एक तत्त्वज्ञान बनले. मदीनेहून ही कल्पना दमास्कस, कूफ़ा, बसरा व बग़दाद या ठिकाणी गेली आणि तिने तत्त्वसंग्राहक संप्रदायांना जन्म दिला. उम्मय्यांच्या कारकिर्दीत (इ.स. ६६१–७५०) जबरिया (नियतिवादी) नावाचा एक संप्रदाय निर्माण झाला. त्याचा संस्थापक जहान् बिन सफवान हा होता. जबरियांच्या मते मानव हा त्याच्या कोणत्याच कृत्यांबद्दल जबाबदार नसतो; कारण ती कृत्ये सर्वस्वी ईश्वराकडूनच आलेली असतात. मानवाला पारितोषिक मिळायचे की शिक्षा, ही गोष्ट मानवी कृत्यांच्या बाबतीतील निरंकुश ईश्वरी सत्तेवर अवलंबून असते. जबरिया संप्रदायाच्या या दैववादाविरुद्ध विचारवंतांनी बंड पुकारले, यात काहीच आश्चर्य नाही. माबाद अल्–जुबानी, यूनुस अल्–असवारी आणि जीलान दमिश्की यांच्यासारख्या विचारवंतांचा एक गट तयार झाला आणि त्याने मानवी कृत्यांच्या बाबतींतील स्वातंत्र्याचा निर्भयपणे उद्घोष केला. हा संघर्ष दमास्कसहून बसऱ्याला गेला आणि तेथे त्याने कळस गाठला. धर्म आणि तत्त्वज्ञान यांच्या बाबतीतील विचाराच्या त्या नाजूक अवस्थेत अल्–हसन अल्–बसरी (मृत्यू ७२८ इ.स.) हा इस्लामच्या प्रारंभिक काळातील सर्वात अधिक उल्लेखनीय तत्त्वज्ञ पुढे आला. अल–हसन हा पूर्व नियतिवादाचा कट्टर विरोधक होता. सत्ताशास्त्रीय प्रश्नांसंबंधी तो अत्यंत तर्कशुद्ध पद्धतीने चर्चा करीत असे. मुअतज़िला या नावाच्या पंथाचा प्रवर्तक वासिल इब्न अता (इ.स. ६९९–७४८) हा अल्–हसनचा शिष्य होता, ही लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे. एका धार्मिक प्रश्नावर आपल्या गुरूशी मतभेद झाला, आणि म्हणून त्याला सभागृह सोडून जाण्यास सांगण्यात आले.

### २) मुअतज़िला – संप्रदाय (विचारप्रणाली)

उमैय्या खलीफ़ांच्या काळामध्ये एक अशा सिद्धान्ताचे दर्शन आपल्याला घडते की ज्याचा धार्मिक क्षेत्रावर फार खोल आणि व्यापक प्रभाव पडलेला होता. हा मुअतज़िलाचा सिद्धान्त होता. या सिद्धान्ताची तार्किकता आणि विचार–स्वातंत्र्य अभूतपूर्व होते. याच्या अविर्भावाची कहाणी मोठी अद्भुत आहे. असे म्हणतात की एकदा हसन अल्–बसरी यांना असे विचारण्यात आले की धर्मावर श्रद्धा असणारी एखादी व्यक्ती जर पापकर्म करत असेल तर त्या व्यक्तीला श्रद्धाळू मानावे की धर्मच्युत? खारिजी (शब्दशः अर्थ, बहिष्कृत) लोकांच्या विचारसरणीमुळे त्या काळी हा प्रश्न फार महत्त्वाचा गणला गेला होता. हसन बसरी अद्याप या प्रश्नाच्या

उत्तरासाठी विचार करीत असतानाच त्यांचा शिष्य वासिल बिन अता याने तत्काळ असे उत्तर दिले की अशी व्यक्ती न श्रद्धाळू असेल न धर्मच्युत. या दोहोंमधील तीची स्थिती असेल. ज्या मशिदीमध्ये हे लोक जमले होते तिच्या दुसऱ्या हिश्शात जाऊन तेथे तो लोकांना आपल्या मताचे स्पष्टीकरण देऊ लागला. हे पाहून त्याचे गुरू हसन म्हणाले वासिल आमच्यापासून वेगळा झाला आहे. अर्थात आमच्या विचारांपासून त्याने फारकत घेतली आहे. त्याचे आमच्याशी वैचारिक मतभेद झाले आहे. त्यावेळेस हसन बसरी यांचे अरबी भाषेमधील उद्‌गार असे होते– 'इतज़ला अन ना.' हे ऐकून वासिलच्या विरोधकांनी 'अल्–मुतज़ला' असे म्हणण्यास सुरू केले. 'इतज़ला अन ना'चा अर्थ आहे– 'आमच्या (लोकां)शी भिन्न होणे.' इस्लाम धर्माचे गाढे अभ्यासक असे भारतीय विद्वानांचे मत आहे की वासिल स्वतः होऊन तेथून नाही गेला तर तेथून त्याला बळेच हटवले गेले. अशा परिस्थितीमध्ये 'मुअतज़ला' शब्दप्रयोग योग्य आहे. यावरून असे दिसते की मुअतज़िला सिद्धान्ताचा जन्म बसरा येथे झाला.

मुअतज़िला (अलिप्तवादी) सिद्धान्ताचा आधार तर्क आहे. उपरोक्त प्रसंग आणि मुअतज़िला या शब्दाचा अर्थ लक्षात घेता याचा भावार्थ होतो 'संबंध–विच्छेदक.' त्यावरूनच संप्रदायाला हे नाव पडले. वासिल इब्न अताने लवकरच आपले गुरू हसन अल् बसरीपेक्षाही अधिक कीर्ती मिळवली, आणि आपल्याभोवती अत्यंत समर्थ व अत्यंत उदार लोक जमवले. मोठमोठे विद्वान, महत्त्वाचे शास्त्रज्ञ, गणितज्ज्ञ आणि इतिहासवेत्ते त्याच्या संप्रदायाच्या झेंड्याखाली गोळा झाले. अब्दु हुजाइल, इब्राहीम इब्न सय्यद, अन्नज़्ज़म्म, अल्–अल्लफ़, अल्–जहीज यांसारख्या ग्रीक तत्त्वज्ञानाशी व तर्कशास्त्राशी उत्तम प्रकारे परिचित असलेल्या विद्वानांनी त्या शास्त्रांतून अनेक कल्पना आपल्या संप्रदायात सामाविष्ट करून घेतल्या आणि अशाप्रकारे मुसलमानांच्या दार्शनिक विचारांवर एक नवा ठसा उमटविला.

मुअतज़िला संप्रदायाच्या मते शाश्वतता हे ईश्वरी अस्तित्वाचे ठळक वैशिष्ट्य आहे. परमेश्वर अनादी–अनंत असून तोच त्याचा विशेष गुण आहे. ते एकमुखाने सांगतात की, ईश्वरी गुण आणि ईश्वर ही पूर्णपणे अभेद्य आहेत.

मुअतज़िलींच्या मते ईश्वरी शब्द हा निर्माण केला जातो; आणि निर्माण झाल्यावर तो शब्दांच्या व ध्वनींच्या रूपाने व्यक्त होतो. त्यामुळे सनातनी मुस्लिम तत्त्वज्ञांप्रमाणे कुराण हे अनादी आहे, असे ते मानत नाहीत. संकल्प करणे, ऐकणे व पाहणे या गोष्टी देवांच्या ठिकाणी असतात. ह्या गोष्टींचे ते एकमताने निराकरण करतात.

भौतिक डोळ्यांनी ईश्वराला स्वर्गामध्ये पाहता येणे शक्य आहे, ही गोष्ट मुअतज़िली साफ नाकारतात. भौतिक वस्तूंशी निगडित असलेल्या गुणांनी (उदा. दिशा, स्थान, दृश्य, शरीर, बदल, निवृत्ती, प्रवृत्ती, विलोपन इत्यादी) ईश्वराचे वर्णन करणे मुअतज़ली निषिद्ध मानतात. कुराणामध्ये अशा गुणांनी युक्त असलेल्या ईश्वराचे वर्णन जेथे आलेले आहे तेथे ते शब्दशः घेण्यासाठी नसून अलंकारिक किंवा लाक्षणिक अर्थाने घ्यावयाचे आहे, असे ते मानतात. या सिद्धान्ताला ते 'तौहीद'(अद्वैतवाद) असे नाव देतात.

माणूस हा आपल्या बऱ्यावाईट कर्मांची फळे भोगणारा प्राणी आहे अशी मुअतज़िलींची श्रद्धा आहे. त्याच्या बऱ्यावाईट कृत्यांप्रमाणे त्याला भावी जगात पारितोषिक किंवा शिक्षा मिळते. पाप किंवा अन्याय यांचा

संबंध ईश्वराशी जोडता येणार नाही, कारण जर ईश्वरानेच पाप निर्माण केले असेल तर तो स्वतःच पापी ठरेल. या सिद्धान्ताला त्यांनी 'अदल'(न्याय) असे नाव दिले आहे.

इस्लामच्या या बुद्धिवादी विचारवंतांनी उदारमतवादी लोकांवर खूपच प्रभाव पाडला. काही उम्मय्या व अब्बासी उत्तराधिकाऱ्यां (ख़लीफ़ां)कडून त्यांना जोरदार पाठिंबा मिळाला. अल्-मामून हा अब्बासी ख़लीफ़ा (मृत्यू इ.स. ८३३) यांच्या शिकवणुकीने इतका प्रभावित झाला की, त्याने मुअतज़िला पंथ हा आपल्या राज्याचा सरकारी धर्म असल्याचे जाहीर करून टाकले. याबाबतीत तो इतक्या थराला गेला की, ईश्वरी शब्द (कुराण) मानवनिर्मित आहे, तो अपौरुषेय नाही, ही गोष्ट कबूल करण्यास नकार देणाऱ्या धर्मपंडितांचा त्याने भयंकर छळ केला. सगळ्या सनातनी लोकांनी मुअतज़िलीच्या दृष्टिकोनाविरुद्ध भयंकर वादळ उठवले. सलजूक तुर्कांच्या आगमनानंतर (इ.स. १०६३-१११०) पौरस्त्य देशांतील इस्लाममधून मुअतज़िला संप्रदायाचा झपाट्याने ऱ्हास सुरू झाला; परंतु स्पेनमध्ये आणि काही लहानसहान संस्थानिकांच्या दरबारांत या पंथाला थोडाफार पाठिंबा मिळत राहिला. या वेळपर्यंत सनातनी तत्त्वज्ञान पद्धतीच्या उदयाला अनुकूल भूमिका तयार झाली होती.

वस्तुतः सनातनी विचारपद्धती ही बुद्धिवादी विचारपद्धतीची प्रतिक्रिया म्हणूनच सुरू झाली. अशाप्रकारची चळवळ सुरू होणे अपरिहार्य होते. कुराण व सुन्नत (प्रोषित मार्ग, मुस्लिम कायदेकानू) यांना चिकटून राहिलेल्या सनातनी मुसलमानांची मुस्लिम धर्मसंस्थेत कोणतीही नवीन गोष्ट, नवा शिरस्ता (बिद्अत) सामील करून घेण्यास साफ नकार दिला; कारण ॲरिस्टॉटल व प्लेटो यांच्या शिकवणुकीमुळे नास्तिकतेला किंवा पाखंडीपणाला प्रोत्साहन मिळते, असे त्यांना वाटत होते. वर सांगितल्याप्रमाणे बुद्धिवादी मुअतज़िला संप्रदायावर ग्रीक विचारसरणीचा जो प्रभाव पडला, त्यामुळे कुराणाच्या शिकवणीशी विसंगत असलेले मुद्दे ते काढू लागले. त्यामुळे सनातनी पंडितांनी स्वतःला एका बाजूने मुअतज़िला संप्रदाय व तत्त्वज्ञानी आणि दुसऱ्या बाजूने शिया व सूफ़ी यांच्यापासून काळजीपूर्वक दूर ठेवले. कुराणाचा अर्थ, परंपरा व धार्मिक संस्कार यांचे अध्ययन करण्यावरच त्यांनी आपले लक्ष केंद्रित केले. इस्लाममधील 'कलाम'चा (इस्लामी तर्कशास्त्र) प्रारंभ मुअतज़िला संप्रदायापासून सुरू झालेला असला तरी सनातनी पंडितांनी त्या वेळी प्रचलित होऊन बसलेल्या नास्तिक निष्कर्षांना विरोध करून परंपरागत श्रद्धांचा पाठपुरावा करण्यासाठी त्यावर सनातनी दृष्टिकोनातून भाष्ये करण्यास सुरुवात केली. सनातनी संप्रदायांतील सोवळ्या मंडळींना बुद्धिवादी मुअतज़िलांपासून वेगळे करण्यासाठी 'मुतकल्लिमीन' (तर्कवादी) हे नाव देण्यात आले. सनातनी मतप्रणालीच्या या अनुयायांमध्ये वेगवेगळ्या इस्लामी देशांत एकाच वेळी उदयास आलेल्या अनेक मतप्रणालींचे लोक होते. त्यांमध्ये स्पेनमधील इब्न हुजुमचा संप्रदाय, इजिप्तमधील अल्-तहावीचा पंथ, समरक़ंदच्या अल्-मतरुदीचा संप्रदाय आणि इराक़मधील अल्-अशअरीचा संप्रदाय यांचा समावेश होतो. यांपैकी शेवटचा संप्रदाय हा त्याचा प्रभाव व विचारांची मौलिकता यांमुळे विशेष प्रख्यात झाला. कालांतराने वासिलिया, हुजैलिया, नज्जामिया इत्यादींसारखे अनेक उप-संप्रदाय मुअतज़िला संप्रदायाच्या अंतर्गत निर्माण झाले.

मुअतज़िलांचे शास्त्रीय आणि दार्शनिक विवेचन सर्वसाधारण मुस्लिम जनतेस आकर्षित करू शकले नाही. या संप्रदायाचा ऱ्हास ख़लीफ़ा मुतवक्किलच्या शासन काळामध्ये झाला. मुतवक्किल (इ.स. ८४७-८६१) याने

पुन्हा सनातन-पंथी कट्टरतेची प्रस्थापना केली आणि मुअतज़िला सिद्धान्ताचे दमन केले. इ.स. दहाव्या शतकाच्या मध्यास अबुल हसन अल्-अशअरीने सनातनपंथी सिद्धान्तांमधील दोषांचे निराकरण करून मुअतज़िला सिद्धान्तास विरोध दर्शवला. त्याची कट्टरता आजतागायत शिल्लक आहे. प्रथम अशअरी हा मुअतज़िला सिद्धान्ताचा समर्थक होता, नंतर तो विरोधक बनला.

विरोध होऊनसुद्धा मुअतज़िला सिद्धान्ताचे इस्लामी तत्त्वज्ञानक्षेत्रास दिलेले योगदान विसरता येत नाही. याने एका वेगळ्या पद्धतीने इस्लामी विचारधारेस प्रभावित केले. राजकीय आणि धार्मिक क्षेत्रांमध्ये त्याचे विशेष महत्त्व उरले नाही; मात्र चिंतनाच्या क्षेत्रामध्ये व्यापक प्रमाणात याचा प्रभाव पडला. तत्कालीन विचारधारांना आणि संप्रदायांना त्याने एका नवीन प्रकारे विचार करण्याचा मार्ग प्रशस्त केला. विचारस्वातंत्र्यासाठी एक प्रकारच्या नवीन वातावरणाची निर्मिती केली. 'इख़्वानुस्सफ़ा' (पवित्र भ्रातृत्त्वसंघ) सारखे गट नंतर निर्माण झाले. धर्म आणि विज्ञान यामध्ये सामंजस्य प्रस्थापनाच्या कामामध्ये धर्माचारी लोक व्यस्त झाले. त्यांनी आपले एक दल उभारले. धार्मिकता, पवित्र जीवन, सत्य इत्यादींचे अनुसरण करून परमेश्वराची कृपा प्राप्त करणे, हा या संघटनेचा उद्देश होता. तर्कसंगत आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून इस्लामचे सिद्धान्त कसे अनुकूल आणि योग्य ठरतील, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. आपल्या सिद्धान्तांचे विवेचन त्यांनी या दृष्टिकोनातून केले. ज्ञान-विज्ञान, धर्म दर्शन यांचा सुयोग्य परिचय लोकांना घडावा या उद्देशाने 'इख़्वानुस्सफ़ा' संघटनेच्या विद्वानांची जवळ-जवळ पन्नास एक ग्रंथ प्रकाशित केले. समुचित ज्ञानामुळे अज्ञानवश होणाऱ्या चुका टाळता येतात, असा त्यांचा विश्वास होता. दर्शनशास्त्राच्या अभ्यासामुळे, स्वतःच्या दोषांचे निराकरण करून मनुष्य स्वतःस पवित्र बनवू शकतो अशी त्यांची धारणा होती. हे लोक बसरा या शहरी निवासास होते. यांपैकी निदान पुढील पाच विद्वान होते- अबू सुलेमान मुहम्मद बिन माशअर अल-बैयुस्ती अथवा अल-मुक़द्दसी, अबुल हसन-अली-बिन हारून अज़्ज़ंज़ानी, अबू-अहमद अल-मिह्रजानी, अल-औफ़ी आणि ज़ैद बिन रिफ़ाआ. काहींचे असे मत आहे की हे विद्वान वास्तविक इस्माईली-सिद्धान्तांचे प्रचारक होते.

### ३) अल अशअरी आणि त्याचा संप्रदाय

अबुल हसन अल अशअरी (मृत्यू इ.स. ९३५) हा सुरुवातीस कडवा मुअतज़िली होता; परंतु पुढे एका धार्मिक प्रश्नाच्या बाबतीत आपला गुरु अल जब्बाई याच्याशी मतभेद झाल्यामुळे त्याने मुअतज़िला संप्रदायाला रामराम ठोकला. मुअतज़िली विचारसरणीला विरोध करणारा 'किताब अश्शरह वत्तफ़सील' (भाष्य व विवरण ग्रंथ) नावाचा एक ग्रंथ त्याने लिहिला.

अशअरी पंथाच्या शिकवणुकीचे विहंगमावलोकन केल्यास सनातनी संप्रदायाचे दार्शनिक वैशिष्ट्य लक्षात येण्यास मदत होईल. अशअरी पंथाच्या अनुयायांमध्ये वैयक्तिक मतभेद असले, तरी साक्षात्कार, अंतःस्फूर्ती किंवा अंतःप्रेरणा हाच ज्ञानाचा एकमेव मार्ग आहे आणि त्यांच्या निर्णयापुढे युक्तवादाने मान तुकवली पाहिजे, याबाबतीत त्यांचे एकमत आहे. एखादी गोष्ट किंवा वस्तू खरोखरी कशी आहे, हे समजणे म्हणजे ज्ञान. ती कशी दिसते याला महत्त्व नाही; परंतु कोणत्याही गोष्टीचे वास्तविक स्वरूप म्हणजे तरी काय? हा प्रश्न उपस्थित करून त्यांनी कांटवर आघाडी मारली. प्राच्यविद्याविशारद डी.बी. मॅक्डोनाल्ड यांनी म्हटल्याप्रमाणे या

प्रश्नाचे उत्तर देण्यात त्यांना कांटपेक्षा अधिक पूर्णत्व प्राप्त झालेले होते. एखादी वस्तू पाहणे म्हणजे तिचे ज्ञान होणे नव्हे; कारण वस्तूचे दर्शन हे स्थळ व काळ यांनी जखडलेले असते. त्यांच्या ठिकाणी गुण व परिमाण असल्याचे दिसते आणि कारण व परिमाण यांच्या दृष्टिकोनातून त्यांच्याकडे पाहिले जाते; परंतु स्थळ, काळ, परिणाम, क्रिया इत्यादी ॲरिस्टॉटलने मानलेले पदार्थ हे केवळ संबंध होत; आणि सारे संबंध हे आत्मनिष्ठ असतात. संबंध हा वस्तुनिष्ठ असेल तर तो कोणत्या तरी वस्तूंत विद्यमान असला पाहिजे; तथापि ज्या दोन वस्तूंना तो एकत्र आणतो त्यांपैकी एकाही वस्तूत तो विद्यमान असू शकत नाही; म्हणून तो तिसऱ्या एखाद्या वस्तूत असला पाहिजे; परंतु ही तिसरी वस्तू आणि पहिल्या दोन वस्तू यांना एकत्र आणावयाचे तर इतर संबंधाची गरज भासणार आणि या इतर संबंधांना विद्यमान राहण्यासाठी आणखी इतर वस्तूंची गरज लागणार. अशा तऱ्हेने अनवस्था प्रसंग निर्माण होईल व तो तर सर्वथा अग्राह्यच होय; म्हणून संबंधांना अस्तित्व नाही. ते केवळ बाह्य देखावे आहेत. इतर सर्व संबंधांप्रमाणे वस्तू आणि आकार यांच्यांतील ॲरिस्टॉटलने सांगितलेला संबंध हाही केवळ भासच होय. ज्या निसर्गामध्ये हे सारे संबंध अंतर्भूत असतात, तोही एक आत्मनिष्ठ देखावाच असतो. त्याला स्वतंत्र अस्तित्व नसते. वस्तू ज्या स्वरूपात आपल्याला दिसतात त्या स्वरूपात वस्तुतः त्या अस्तित्वहीनच असतात. गुण व वस्तू यांच्या व्यतिरिक्त दुसरे काहीही वस्तुनिष्ठ नसते; परंतु गुणविरहित वस्तूंचे अस्तित्वच संभवत नाही; तथापि गुण हे केवळ आगंतुक असतात. ते चंचल असतात. ते येतात आणि जातात; म्हणून वस्तूही येतात आणि जातात. गुण आणि वस्तू यांचे अस्तित्व क्षणमात्रच असते. याचाच अर्थ असा की, ती परमाणुरूप असतात. सारे जग परमाणूंनी भरलेले आहे. मानसिक व भौतिक विश्वातील स्थळकाळांतील साऱ्या दृश्य वस्तूंचा आधार मूलचिदणूचा पुंज हा होय. हे चिदणू एकमेकांना स्पर्श करीत नाहीत; कारण अलग-अलग राहण्यासाठी त्यांच्यामध्ये पूर्णपणे पोकळी असली पाहिजे. त्यांना विस्तृती नाही; परंतु त्यांना केवळ स्थिती असते. केवळ स्थल-चिदणूच अस्तित्वात आहेत असे नव्हे, तर काल-चिदणुही आहेत. ज्याप्रमाणे अवकाश ही परमाणूंची एक शृंखला असते, त्याप्रमाणे काळ हीही स्पर्श न करणाऱ्या क्षणांची मालिका आहे. स्थळ-काळांचे हे चिदणू आपल्यामधील पोकळीच्या पलीकडे उड्या मारत असतात आणि तसे करताना स्वतःला एक झटका देतात. त्यांचे अस्तित्वात येणे आणि विलय पावणे यांच्यामुळेच सारी परिवर्तने होत असतात. ते चिदणू स्वतःमात्र अपरिवर्तनशील असतात. या विवेचनावरून हे सनातनी विद्वान ग्रीक तत्त्वज्ञांपासून किती दूर आणि आधुनिक भौतिक शास्त्रज्ञांना व लायब्निझला किती जवळचे होते, हे आपल्याला स्पष्ट दिसून येते. लायब्निझचे चिदणू विकसनशील, परंतु अपरिवर्तनीय आहेत. चिदणूमधील क्रमाचे स्पष्टीकरण करण्यासाठी लायब्निझला पूर्वप्रस्थापित सुसंगतीच्या कल्पनेचा आधार घ्यावा लागतो, तर अशअरी ईश्वराचा आधार घेतात. त्यांच्या मते ईश्वराला पूर्णपणे स्वतंत्र संकल्पशक्ती आहे. तो चिदणूंना निर्माण करतो, त्यांचा नाश करतो व त्यांच्यात संबंध प्रस्थापित करतो. सारी नियमबद्धता ईश्वराच्या संकल्पांतून निर्माण होते; व दृश्य स्वरूपांतील सुसंबद्धता हीसुद्धा त्याच्या कार्यामुळेच आलेली आहे; म्हणून विश्वांतील सारे बदल हे ईश्वरी चमत्कार असतात. जगामध्ये कारणात्मक नियम असे नाहीत; कारण सारा कार्यकारणभाव ईश्वरी संकल्पांमध्ये अनुस्यूत असतो. अस्तित्व हा वस्तूंचा गुण नसून ते सद्वस्तूंचे सारतत्त्वच आहे आणि केवळ ईश्वरालाच अस्तित्व आहे; इतर सारी माया आहे. ही आभासरूप माया परमाणूंवर

आधारलेली असून, हे परमाणू ईश्वराच्या संकल्पाने निर्माण होतात, नष्ट होतात आणि त्यांना वेगवेगळी रूपे देण्यासाठी त्यांची वेगवेगळी संमिश्रणे केली जातात. ईश्वर आणि त्याचे सत्त्व यात तादात्म्य असून त्याचा शब्द हा त्याच्या प्रमाणेच शाश्वत आहे. त्याची लक्षणे त्याच्या सत्त्वापासून भिन्न आहेत. त्याच्यापासून बऱ्या व वाईट दोन्ही प्रकारच्या गोष्टी उगम पावतात आणि अशक्य गोष्टींनाही त्याचे नियंत्रण चालते; परंतु त्याचबरोबर अशअरीचे असेही मत आहे की, ईश्वराला कोणताही दुर्गुण आपण चिकटवू शकत नाही. नैतिकदृष्ट्या बऱ्या व वाईट, लाभदायक व हानिकारक अशा दोन्ही प्रकारच्या गोष्टी संकल्पाने निर्माण होतात. त्याला ज्ञान व संकल्पशक्ती दोन्ही असल्यामुळे त्या ज्ञानाबरहुकूम तो प्राण्याकडून इच्छा करवतो आणि लौहे महफ़ूज़ नामक सुरक्षित पाटीवर ते नमूद करवतो. हे पूर्वज्ञान म्हणजे त्याची आज्ञा, निर्णय व निश्चय आहे. तिच्यात काही फेरबदल किंवा कमी अधिक होऊ शकत नाही. ईश्वराने मनुष्याने करावयाच्या ज्या गोष्टी आधीच ठरवल्या आहेत, व ज्या करण्याची मनुष्यात क्षमता निर्माण होत असते, त्या त्याने करणे म्हणजे आपले कर्तव्य योग्य प्रकारे पार पाडणे होय, याला 'उपार्जन-सिद्धान्त' (उसूल-ए-कस्ब) असे म्हणतात. या संप्रदायाची एकूण विचारसरणी पाहता तिच्यात लायब्निझ, बर्क्ले, कांट व ह्यूम यांची तत्त्वज्ञाने आणि आधुनिक भौतिक विज्ञानाच्या कल्पना कशा अनुस्यूत आहेत याची कल्पना आपल्याला येऊ शकते.

या संप्रदायाचे मुख्य तत्त्वज्ञ अल अशअरी (मृत्यू - इ.स. ९३५), अबू-बकर बाकिलानी (मृत्यू १०२५), अल जुवैनी (मृत्यू ११००), शहरस्तानी (मृत्यू ११९०), अल राजी (मृत्यू १२२२) आणि अल ग़ज़्ज़ाली मृत्यू (११११) हे होत. यांपैकी शेवटचा अबू हामिद अल ग़ज़्ज़ाली हा आजवरच्या इस्लामातील एक सर्वश्रेष्ठ धार्मिक द्रष्टा समजला जातो. कीर्तीच्या अत्युच्च शिखरावर असताना दार्शनिक व धार्मिक शास्त्रांमध्ये प्रवीण असलेल्या अल ग़ज़्ज़ालीला फार मोठ्या आध्यात्मिक संघर्षातून जावे लागले; आणि त्याने साऱ्या पदव्या व भौतिक मानसन्मान झुगारून देऊन सरतेशेवटी साक्षात्कारवादाचा आश्रय केला. त्यातच त्याला सुख व समाधान लाभले. त्याने सूफीवादाला पुन्हा प्रतिष्ठा मिळवून दिली.

वरील विवेचनावरून अशअरी पंथाची विचारसरणी मुअतज़िली बुद्धिवाद्याच्या विचारसरणीच्या अगदी उलट असल्याचे दिसून येईल. सनातनी संप्रदायाला मुसलमानांमधील फार मोठ्या समाजाचा पाठिंबा मिळाला हे खरे; परंतु ॲरिस्टॉटलच्या विचारप्रणालीला चिकटून राहण्याच्या चुकीबद्दल त्यांना दार्शनिकांचा विरोध झाला. दुसऱ्या बाजूने त्यांना कडव्या हंबल-पंथियांच्या विरोधालाही तोंड द्यावे लागले.

इस्लामी धर्मशास्त्राच्या व्याख्येच्या संदर्भात कालांतराने चार संप्रदाय उदयास आले. ते म्हणजे (१) हनफ़ी, (२) मालिकी, (३) शाफ़ई आणि (४) हंबली[४] या मुस्लिम सनातन-पंथी सुन्नींच्या चार प्रमुख शाखा आहेत. त्यांच्यामध्ये आपापसात बरेच साम्य असून त्यांच्यामध्ये मैत्री-भाव आहे. हे चारी परस्पर एक दुसऱ्याच्या इमामांप्रती (आचार्य) आदर सन्मानाची भावना ठेवतात. संपूर्ण इस्लामी जगतात सुन्नी संप्रदाय हा बहुमतात आहे. धर्मशास्त्राची व्याख्या आणि कर्मकांडांना अनुलक्षूनच उपरोक्त चार शाखांचा उदय झाला. या चारी शाखा आपापल्या संस्थापकांच्या नावे सुपरिचित आहेत.

**१) हनफ़ी** : ही सर्वांत पहिली आणि जुनी शाखा आहे. या शाखेचे संस्थापक अबू हनीफ़ा हे होते. यांचा जन्म इ.स. ७०० मध्ये झाला. हे एका इराणी गुलामाचे पुत्र होते. हे एक व्यापारी होते आणि इस्लामी

धर्मशास्त्रामध्ये यांचा प्रवेश अद्‌भुत होता. यांनी आपल्या शिष्यांमध्ये आपल्या मताचा प्रसार केला. यांनी कोणतेच ग्रंथ लिहिले नाही. अबू युसूफ़ (इ.स. ७९८) नावाच्या यांच्या शिष्याने लिहिलेल्या 'किताब अल-खराज' या ग्रंथावरून यांच्या सिद्धान्ताची कल्पना येते. अबू हनीफ़ा यांचे निधन इ. स. ७६७ मध्ये झाले. धर्माचरणासाठी किंवा कर्मकांडामधील औचित्य-अनौचित्याच्या विचारासाठी त्यांनी 'हदीस'वर (प्रेषित-वचन) तितका जोर न देता 'क़यास'वर (तर्क) भर दिला आहे. 'क़यास'चा त्यांचा अर्थ होता तर्काच्या साहाय्याने व्यापक पासून व्याप्याचे अनुमान काढणे हे होय. त्यांचे असे मत होते की धर्माशी निगडित क़ायदे-कानू विचारपूर्वक अंमलात आणणे श्रेयस्कर असते. विचारपूर्वक आपले मार्ग निवडण्याचा अधिकार हा प्रत्येक व्यक्तीस आहे. सुप्रसिद्ध मुस्लिम विद्वान आणि 'स्पिरिट ऑफ इस्लाम' या ग्रंथाचे ग्रंथकर्ते अमीर अली यांचे असे मत होते की अबू हनीफ़ा यांनी शिया संप्रदायाची दिक्षा घेतली होती आणि धर्मशास्त्राचे शिक्षण त्यांनी इमाम जाफ़र अस्-सादिक़कडून घेतले होते. नंतर ते शिया संप्रदायाच्या विरोधात गेले. जगातील जवळजवळ निम्मे मुस्लिम लोक हनफ़ी शाखेशी निगडित आहेत. भारतीय मुसलमानांमध्ये अधिकांशपणे याच शाखेचे अनुयायी आढळतात. मध्य आशिया, तुर्कस्थान, अफ़गाणिस्थान, इजिप्त इत्यादी राष्ट्रांमध्ये अधिकांश मुसलमान याच संप्रदायाचे आहेत. अंदाजे अकरा कोटी ऐंशी लाख मुसलमान हनफ़ी संप्रदायाचे आहेत. मालिकी, शाफ़ई आणि हंबली हे इतर तीन संप्रदाय आहेत. मालिकी जवळजवळ तीन कोटी आहेत, शाफ़ई सात कोटी तीस लाख; तर हंबली केवळ तीस लाख आहेत.

**२) मालिकी :** हनफ़ी संप्रदाय उदार असून, मालिकी संप्रदाय त्यामानाने अधिक अनुदार आहे. ते अत्यंत कट्टर आहेत. ते हदीसलाच प्राधान्य देतात. यांची कट्टरता आणि अनुदारता कदाचित यामुळे असावी की या शाखेचा जन्म मदीना शहरी झाला होता आणि याचे प्रवर्तक होते मालिक इब्न अनस. यांच्याबाबतीत असे म्हटले जाते की ते पैगंबर यांचे जीवन आणि विचारप्रणालीशी चांगले परिचित होते. हदीसांचा संदर्भ देऊनच ते एखाद्या कृत्याच्या औचित्य वा अनौचित्यविषयी विचार करत. त्यांचा जन्म मदीना येथे इ.स. ७१३ किंवा ७१४ मध्ये झाला होता आणि त्यांचा मृत्यू इ.स. ७९५ मध्ये झाला. यांच्या मृत्यूसमयी हारून अर्रशीदचा काळ होता. इब्न खल्लिकानचे असे मत आहे की अल मन्सूरकडून अत्यंत निर्दयपणे यांना चाबकाचे फटके मारण्यात आले कारण की तो अब्बासियांचा विरोधक असल्याचा खलिफ़ास संशय होता; परंतु त्यामुळे जनतेमध्ये मालिकीचा सन्मान वाढतच गेला. या दोन्ही शाखांच्या प्रादुर्भावानंतर धर्मशास्त्राचे अध्ययन उत्तरोत्तर वाढत गेले.

**३) शाफ़ई :** तिसरी शाखा शाफ़ईचे प्रवर्तक मुहम्मद इब्न-इद्रीस अश्शाफ़ी हे होते. हे कुरैश वंशाचे होते. यांचा जन्म सीरियामधील गाज़ा येथे इ.स. ७६७ मध्ये झाला. याच वर्षी अबू हनीफ़ा यांचे निधन झाले होते. यांनी मदिना येथे अश्शाफ़ीकडून शिक्षण घेतले होते. बग़दाद आणि कैरो हे यांचे क्षेत्र होते. येथे त्यांचा अधिक प्रभाव होता. यांचा मृत्यू पण कैरो येथे इ.स. ८२० मध्ये झाला. त्या काळी ख़लिफ़ा मामून यांचे शासन होते. हे न मालिकीप्रमाणे कट्टर होते, न हनफ़ीप्रमाणे उदार होते. यांचा मध्यममार्ग होता. यांचे शिष्य इजिप्तच्या काही भागामध्ये, भारतीय उपखंडाच्या काही भागात, पूर्व आफ्रिकेत, सिंहल (श्रीलंका) आणि मलेशिया येथे आढळतात. पॅलेस्टाईन आणि पश्चिम व दक्षिण अरबस्थानमध्येसुद्धा यांचे शिष्य आढळून येतात. भारतात भोरी (बोहरा) समाजामध्येसुद्धा या संप्रदायास मानणारे लोक आढळून येतात.

**४) हंबली :** हा चौथा संप्रदाय आहे. याचे जनक अहमद इब्न हंबल हे होते. हे अत्यंत पुराणमतवादी (सनातनी) होते. यांच्या शिष्यांची कट्टरता आणि पुराणमतवादिता या कारणांमुळे खलिफ़ा मामूनपासून ते नंतरच्या खलिफ़ांच्या कारकीर्दीपर्यंत जास्त प्रमाणात दंगे झाले, रक्तपात झाला. इब्न हंबल यांच्या मृत्यूनंतर त्यांची गणना संतामध्ये झाली. सध्या (हल्ली) यांच्या शिष्यांची संख्या फार कमी झाली आहे. वहाबी लोकांमध्येच हे अधिकांशपणे शिल्लक राहिले आहेत. हे अश्शाफ़ी यांचे शिष्य होते आणि हदिसांचे अक्षरशः पालन करण्यावर यांचा भर आहे. इब्न खल्लिकानचे असे मत आहे की इजिप्तकडे रवाना होण्याच्या वेळेस शाफ़ईने असे म्हटले होते की इब्न हंबलसारखा धर्म आणि धर्मशास्त्राच्या नियमांचा जाणकार आणि व्यवस्थापक बगदादमध्ये कुणीच नव्हता. हे ख़लीफ़ा मामून आणि ख़लीफ़ा बिल्लाहच्या धार्मिक दृष्टिकोनाला विरोध करत राहिले. यांना हत्येची भीती होती तरी पण ते आपल्या सिद्धान्तावर अविचल होते. ते अरब होते. त्यांचा जन्म इ.स. ७८० मध्ये तर मृत्यू इ.स. ८५५ मध्ये झाला. त्यांचा मृत्यू बगदाद येथे झाला. इस्लाममध्ये नवा शिरस्ता (बिदअत) आणण्यास या संप्रदायाचा सक्त विरोध होता.

उपरोक्त चारही इमाम इस्लामी आचार्य म्हणून गणले जातात आणि ते सर्व सुन्नी लोकांच्या श्रद्धेस पात्र आहेत. कालांतराने मुसलमान लोकांसाठी यांनी निर्माण केलेली धर्मशास्त्राची व्यवस्था हीच कानू (क़ायदे) बनून गेली. त्यांचे भाष्यच प्रमाणभूत मानले जाऊ लागले. मुसलमानांचे सर्व कारभार शरियतप्रमाणे चालतात. धार्मिक, राजनीतिक, सामाजिक संबंधांना ते शरियत बरहुकूम स्थिर करतात. त्यांना पंचकर्मविधान आखून देण्यात आले. ते असे– (१) नित्य (फ़र्ज़) कर्म याचे पालन करणे आवश्यक असते. याच्या अवहेलनेमुळे दंड भोगावा लागतो; तर आचरणामुळे पारितोषिकाचा अधिकारी बनतो. (२) पुनीत (मुस्तहब्ब) कर्म– याचे पालन करणे शुभदायक असते, परंतु अंमलात नाही आणले तर दंड भोगावा लागत नाही. (३) अनुमोदित (जायज़) कर्म – हे उचित कर्म असते. याच्यासाठी कायद्याच्या दृष्टीने दंड किंवा पुरस्कार याचा प्रश्न उपस्थित होत नाही. (४) असम्मत (मकरूह) कर्म– हे अनुचित तर असतेच, परंतु यासाठी दंड भोगावा लागत नाही, आणि (५) निषिद्ध (हराम) कर्म– हे मनाई केलेले कर्म असते आणि यासाठी दंड भोगावा लागतो. उपरोक्त पंचकर्मविधान हे मुस्लिमांच्या आचारसंहितेचा एक भाग आहे.

यावरून असे दिसून येते की इस्लामी जगतामध्ये वेगवेगळ्या विचारधारा क्रियाशील होत्या. इस्लाम धर्माच्या अंतर्गत अनेक प्रकारची धार्मिक आंदोलने होत होती. इस्लामच्या अंतर्गत काही असे संप्रदाय होते की जे राजकारणामुळे उत्पन्न झाले होते, परंतु पुढे त्यांना धार्मिक स्वरूप प्राप्त झाले; तर काही असे होते की ते संपूर्णपणे धार्मिक होते, परंतु ते स्वतःस राजकारणापासून अलिप्त ठेवू शकले नाहीत. याच काळामध्ये आणि याच परिस्थितीमध्ये सूफी मताचा आविर्भाव आणि विकास झाला.

### ४) इब्न तैमिया

जंगली तार्तरांच्या हातून बग़दाद शहराची लुटालूट झाल्यानंतरच्या काळात सनातन धर्माचा पाठिराखा म्हणून थोर धर्मशास्त्रज्ञ व कायदेपंडित तकीउद्दीन अहमद इब्न तैमिया (मृत्यू १३२८) उदयास आला. त्याने सुन्नीवाद, सूफीवाद व पांडित्यवाद या तिन्हींच्या नवीन समन्वयाला जोराचा विरोध केला. दिवसेंदिवस वाढत

असलेला संतांचा संप्रदाय व मुस्लिम जनतेकडून त्यांना मिळणारी अतिरेकी श्रद्धा पाहून त्याला वाईट वाटे. त्याच्या मते खुद्द पैगंबरांच्या समाधीला (कबर) ठरावीक प्रसंगाखेरीज अधिक वेळा भेट देणे म्हणजे मूर्तिपूजेचाच एक नवा प्रकार होता. मग एखाद्या मृत सूफीच्या थडग्याला भेट देण्याची तर गोष्टच राहू द्या. इब्न तैमिया हा खरा मूळच्या तत्त्वांना मान देणारा होता. लोकांनी कुराण व सुन्नत (प्रेषित मार्ग) यांच्याकडे वळावे, असे त्याचे सांगणे होते. ईश्वरज्ञानाच्या प्रश्नावर तत्त्वज्ञानी व पंडित यांना त्याचा कडवा विरोध होता. माणूस ईश्वराला जाणू शकत नाही; म्हणून ईश्वराला जाणणे हे त्याचे काम नसून, त्याची आज्ञा पाळणे हेच त्याचे कर्तव्य होय. ईश्वराचे गुण किंवा लक्षणे ही खरी असली तरी तो मानवाच्या कल्पनाशक्तीच्या पलीकडे अत्यंत गूढ, भयावह आहे. इब्न तैमियाने अशअरी दृष्टिकोनावर टीकेची झोड उठवली. अल ग़ज़्ज़ालीच्या संदेशांतील प्रांजळपणाविषयी तो संशय व्यक्त करतो. त्याच्या मते अल ग़ज़्ज़ाली हा तत्त्वज्ञान आणि धर्म यांच्यामध्ये हेलकावे खात असून ज्यू व ख्रिश्चनच नव्हे तर जुन्या मूर्तिपूजक अरबांच्या श्रद्धांहून अधिक खालच्या दर्जाच्या समजुतींचा तो पाठपुरावा करतो. अशअरीपंथीय व सूफी यांच्याबद्दल कमालीचा तिटकारा बाळगणाऱ्या इब्न तैमियासारख्या धर्मवेड्याच्या नशिबी तुरुंगवास येणे अटळच होते. तुरुंगात राहून त्याने आपल्या विरोधकांवर हल्ले चढवणारे आणि त्यांचे मुद्दे खोडून काढणारे प्रचंड लिखाण करण्याचा सपाटा चालवला. अखेर त्याला शाई व कागद देणेही बंद करण्यात आले. त्याला तुरूंगवासाची शिक्षा झाल्यानंतर एका महिन्याच्या आतच, इ.स. १३२८ साली, तो मरण पावला. अठराव्या शतकाच्या मध्यास अरबस्तानात सुरू झालेल्या वहाबी चळवळीमुळे सऊद घराणे अधिकारावर आले. या घटनेवरून इब्न तैमियाच्या शिकवणीच्या प्रभावाची कल्पना यावी. 'आधुनिक अज़हरी' (कैरोच्या अल अज़हर विद्यापीठाचे धर्मशास्त्रज्ञ) आणि इजिप्तमधील 'मुस्लिम भ्रातृत्व संघटना' यांच्यावर इब्न तैमियाच्या सिद्धान्ताचा खूपच प्रभाव पडलेला आहे.

### ५) भारतातील मुस्लिम विचारप्रणालीचा विकास[५]

अब्बासी मन्सूर (इ.स. ७५४) याच्यापासून सुरू होऊन अल वलीक (इ.स. ८४७) याच्या मृत्यूपर्यंत चालत आलेला जवळजवळ एका शतकाचा काळ हा अत्यंत भरभराटीचा कालखंड होता; तर अल मुतवक्किल (इ.स. ८४७) पासून बगदादच्या पतनापर्यंतचा काळ हा अवनतीचा व विनाशाचा कालखंड होता. इ.स. १२५८ साली मोगल हलाकूने बगदाद लुटले आणि अब्बासी ख़लीफ़ा अल मुस्तसिम याला ठार मारले; परंतु या दंगलीपासून खूप दूर असलेले घोरी, तुर्क भारतामध्ये राजकीय उलाढाली करण्यात गुंतले होते. घोरी, तुर्क व अफगाण हे भारतामध्ये हल्लेखोर म्हणून आले आणि राज्यकर्ते बनून राहिले. इस्लामचा त्याच्या अत्यंत साध्या-सुटसुटीत स्वरूपात त्यांनी स्वीकार केला होता व ते कट्टर सुन्नी होते. इस्लामच्या उदयानंतरच्या शतकाच्या पूर्वार्धातच इस्लाममध्ये सुरू झालेल्या सांप्रदायिक झगड्यांकडे त्यांनी फारसे लक्ष दिले नाही; परंतु मोगलांच्या भयंकर उपद्रवापासून स्वतःला वाचवण्यासाठी भारतात आसरा घेतलेल्या मुस्लिम विद्वानांनी येथे जे कार्य सुरू केले त्यातूनच भारतातील मुस्लिम विचारप्रणालीचा विकास घडून आला. कट्टरवाद, तत्त्वज्ञान व साक्षात्कारवाद या वेगवेगळ्या विचारप्रणाली भारतात येऊन स्थायिक झालेल्या मुसलमानांबरोबर येथे आल्या. प्रारंभी आलेल्या या मुसलमानांना त्यांच्या स्वतःच्या संस्कृतीहून अगदी वेगळ्या प्रकारच्या सांस्कृतिक विचारांना

व श्रद्धांना तोंड द्यावे लागले. प्रारंभीच्या मुसलमानांनी हिंदू जीवनपद्धतीचा मुळीच अवलंब केला नाही. त्यामुळे धार्मिक व दार्शनिक पातळ्यांवर हिंदू व मुसलमान यांच्यात संपर्क स्थापित होण्याची संधी फारच थोडी होती; परंतु मुस्लिम सूफींचा विशाल दृष्टिकोन व समर्पित जीवन यामुळे त्यांच्या भोवती नाना जातींचे व नाना धर्मांचे लोक गोळा झाले. या सूफी वर्तुळात हिंदू-मुसलमानांचा प्रवेश झाला आणि त्यांनी काही प्रमाणात अनुभववादी विचारप्रणालीवर आपला प्रभाव पाडला. याउलट मुस्लिम अनुभववादी व धार्मिक विचारांच्या प्रभावामुळे हिंदूंमध्ये अनेक सुधारणावादी चळवळींना प्रेरणा मिळाली. या चळवळी देशभर पसरल्या आणि त्यांनी हिंदू-जीवनदृष्टीवर व हिंदू-विचारप्रणालीवर सखोल परिणाम केला. अशाप्रकारे इस्लाममधील अनुभववादी हिंदुत्वाकडे जात असलेले दिसू लागले; तर हिंदूंमधील कबीर (जन्म १३९८), नानक (ज. १४६९) आणि चैतन्य (ज. १४८५) यांनी हिंदू धर्मातील जातिभेद, कर्मकांड व मूर्तिपूजा यावर चढवलेल्या हल्ल्यांमुळे ते इस्लामकडे झुकल्यासारखे दिसू लागले.

मुसलमानांनी इराणी-अरबी विचारप्रणालीचा वारसा भारतात आणला हे आपण ओळखले पाहिजे. दहाव्या शतकाच्या अखेरीस मुअतज़िली विचारप्रणालीचा वाद संपून गेलेला होता आणि अशअरी संप्रदाय सर्वमान्य झालेला होता. इस्लामी धर्मशास्त्रात (फ़िक़ा) हनफ़िया, मालिकिया, हंबलिया व शाफ़ईया या चार पंथांचे, काही मुद्द्यांवरील थोडासा मतभेद वगळता, मतैक्य झाले. तुर्क लोक हनफ़िया सिद्धान्ताचे प्रबळ पुरस्कर्ते होते. त्यामुळे भारतात मुस्लिम सत्ता असेपर्यंत या विचारप्रणालीचे प्राबल्य चालू राहिले. शिया पंथ व त्याचे पोटभेद यांच्या बाबतीत असे म्हणता येईल की, उत्तरेकडील व दक्षिण भारतातील शिया सुलतान व अमीर-उमराव यांचा पाठिंबा मिळूनही भारतात शिया पंथाच्या मुसलमानांची संख्या नेहमीच कमी राहिली.

मुसलमानी अमदानीतील मोगलांच्या आधीच्या काळात सुलतानांचे दरबार विद्वान कायदेपंडित, इतिहासकार व धर्मशास्त्रज्ञ यांनी गजबजलेले असत. त्यांना तत्त्वज्ञान विशेष प्रिय नव्हते. एकंदरीने तो काळ दार्शनिक विचारांच्या मौलिकतेच्या दृष्टीने फारच कमी महत्त्वाचा होता; परंतु सूफीवादाने मात्र त्या वेळी परमोच्च शिखर गाठले होते; कारण याच सुमारास भारतांतील प्रमुख सूफ़ी पंथांची येथे स्थापना करण्यात आलेली होती.

मोगलांची सत्ता अस्तित्वात आल्यानंतर इस्लामी विचारांचा भारतामध्ये नवीन बौद्धिक क्षेत्रांशी संबंध आला. अल ग़ज़्ज़ालीच्या संप्रदायाचे वारसदार असणारे उलेमा (विद्वान) व सूफ़ी यांच्यांतील उघड संघर्षाला चांगलेच वातावरण मिळाले.

**१) अकबर** : महान मोगल सम्राट अकबर (इ.स. १५४२-१६०५) याला लिहिता-वाचता येत नव्हते. त्यामुळे त्याच्या धार्मिक प्रवृत्तीविषयीची माहिती त्याचा मित्र व सल्लागार अबुल फ़ज़ल आणि त्याचा सनातनी सुन्नी विरोधक मुल्ला अब्दुल क़ादर बदाउनी या त्याच्या समकालीनांच्या लिखाणावरूनच मिळवावी लागते. अकबराने फत्तेपूर-शिक्री येथे एक उपासनागृह बांधले होते. त्या ठिकाणी होणाऱ्या चर्चेत भाग घेण्यासाठी विभिन्न धर्मांच्या निवडक प्रतिनिधींना बोलावण्यात येई. या चर्चेचे संचालन स्वतः अकबर करी. इ.स. १५८२ साली अकबराने 'दीन-ए-इलाही' या आपल्या सर्वसंग्राहक धर्माची घोषणा केली. या ईश्वरी धर्माची (दीन-ए-इलाही) तत्त्वे व आचारनियम कोठेही व्यवस्थितपणे नमूद केलेले नाहीत, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. या गोष्टी

अबुल फ़ज़लच्या 'आईन-ए-अकबरी'(अकबराची राज्यव्यवस्था), बदाउनीच्या 'मुंतख़ब अत्तवारीख़' (निवडक इतिहास) आणि मोहसिन फ़ानीच्या 'दबिस्तान-ए-मज़हब'(धर्माची पाठशाळा) या ग्रंथांतून गोळा कराव्या लागतात. अकबराने स्थापन केलेल्या या धर्माला मुसलमानांनीही पाठिंबा दिला नाही किंवा हिंदूंनीही दिला नाही. या धर्मस्थापनेमुळे मुसलमान लोक अधिक अस्वस्थ झाले; कारण ही एखादी लहानसहान धार्मिक सुधारणा नव्हती, तर धर्माच्या मुळावरच घाव घालणारे उघड-उघड पाखंड होते.

२) **शेख-सरहिंदी :** अशा या आणीबाणीच्या प्रसंगी परिस्थितीला सावरून धरण्यासाठी शेख अहमद सरहिंदी (इ.स. १५६४-१६२४) व अल मुजद्दिद अल्फ़े सानी (दुसऱ्या सहस्रकांत इस्लामचे नूतनीकरण करणारे) हे पुढे आले. अकबराच्या सर्वसंग्राहक धर्मामध्ये नवीन गोष्टी अंतर्भूत केल्याने झालेले भयंकर परिणाम, आणि त्याची इस्लामविरोधी सर्वेश्वरवादी भूमिका यांची शेख सरहिंदी यांना चांगली कल्पना होती. या सर्वेश्वरवादी प्रवृत्तींना इब्न अरबीच्या 'वहदत उल्-वजूद'(अद्वैतवादी)च्या सुप्रसिद्ध सिद्धान्तापासून प्रेरणा मिळाली. या सिद्धान्ताची मुस्लिम मतावर कधीही पुसली जाणार नाही अशी छाप पाडलेली आहे. म्हणून शेख सरहिंदी यांनी सूफीवादाला पुनः इस्लामच्या पंखाखाली आणण्यासाठी या सिद्धान्ताला कसून विरोध केला. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास, इब्न अरबीच्या अनुभववादी संप्रदायाचे म्हणणे असे की, सद्वस्तू एकच आहे आणि ती म्हणजे अल्लाह. येथे जे काही आहे ते त्याचेच प्रकटीकरण किंवा त्यापासून ओघाने आले आहे. ईश्वर हा बहिर्यामीही नाही अथवा अंतर्यामीही नाही. तोच सर्व काही आहे. सर्जन हे केवळ स्वतःच्या अभिव्यक्तीतून स्वतःला जाणण्याचे ईश्वराचे औत्सुक्य आहे. साक्षात्कारवादी मार्गाने जाणारा साधक हा सरतेशेवटी आपण स्वतःच ईश्वर आहोत, हे जाणतो. तेच त्याचे अंतिम ध्येय. ईश्वराचे सत्त्व आणि त्याची लक्षणे एकच आहेत. याउलट शेख सरहिंदी यांच्या मते ईश्वराशी एकरूप होण्याची (फ़ना-निर्वाण) साक्षात्कारवादातील अवस्था ही काही खरी अंतिम अवस्था नव्हे. या स्थितीमध्ये सूफी हा स्वतःच ईश्वराच्या अस्तित्वात विलीन झालेला असतो आणि त्याला ईश्वराखेरीज इतर सर्व गोष्टींचा विसर पडलेला असतो. यामुळे इब्न अरबीने आत्मनिष्ठ गोष्टीला वस्तुनिष्ठ समजण्याचा गोंधळ केला आहे. वस्तुतः विश्वाचे ईश्वराशी तादात्म्य सिद्ध करावयाचे असल्यामुळे इब्न अरबीला त्या अवस्थेतही जगाची जाणीव असते. तसे नसते तर त्याने फक्त ईश्वराचाच उल्लेख केला असता; म्हणून 'फ़ना' (कैवल्यावस्था) ही साक्षात्कारी अनुभूतीची अंतिम अवस्था असू शकत नाही. शेख सरहिंदीच्या मते फ़नाच्या पलीकडेही आणखी एक अवस्था आहे. तेथे इब्न अरबी पोहोचू शकला नाही. अंतःप्रेरणेद्वारे आकलन होण्याच्या पलीकडे ईश्वर आहे. तेव्हा ईश्वरी संदेश आणि त्यावर आधारलेली धर्मशास्त्रे (म्हणजेच 'शरीअत') यांच्याकडे परत जाणे, हा सूफी व्यक्तीपुढे खुला असलेला एकमेव मार्ग होय. स्रष्टा (ईश्वर) आणि सृष्टी (मानव) यांच्यांतील भेदावर शेख सरहिंदी यांचा भर आहे. त्यांच्या मते अभेद भावना किंवा तादात्म्य मानणे म्हणजे आत्मनिष्ठ अनुभववादाच्या भ्रामक कल्पनांतून उत्पन्न झालेली नास्तिकता होय. अशा प्रकारे शेख सरहिंदी यांनी इब्न अरबीच्या 'वहद्तुल वजूद'(अद्वैतवाद) या सिद्धान्ताच्या विरोधी असा स्रष्टा आणि सृष्टी यांच्यांतील द्वैती संबंधावर आधारलेला आपला 'वहद्तुल शुहूद' (विशिष्टाद्वैतवाद) हा सिद्धान्त पुढे मांडला. शेख सरहिंदी यांच्या विचारांचा संग्रह 'मकतूबात'(पत्रे) या ग्रंथात करण्यात आलेला आहे. ही पत्रे सुमारे ५३० असून ती त्यांनी आपल्या शिष्यांना लिहिलेली आहेत. भारतीय मुसलमानांच्या धार्मिक साहित्यामध्ये

अभिजात साहित्य म्हणून या ग्रंथाचा समावेश अवश्य करता येईल. 'वजूदिया' आणि 'शुहूदिया' या दोन संप्रदायांतील वाद त्यांच्या अनुयायांकडून पुढे चालवण्यात आला; परंतु त्यातून चिंतनाचे काही नवीन मार्ग निष्पन्न झाले नाहीत.

**३) दारा शिकोह :** अकबराचा पणतू दारा शिकोह (मृ. १६५९) याच्या अनुभववादी तत्त्वज्ञानाचा खास उल्लेख येथे केला पाहिजे. राजपुत्र या नात्याने त्याच्या विद्वत्तेचा विचार केल्यास मन थक्क होते. दारा शिकोह याला हिंदू व मुस्लिम दोन्ही तत्त्वज्ञानांचे चांगले ज्ञान होते. ज्ञानाचे मानवी व दैवी असे दोन विभाग कल्पिण्यामध्ये हिंदू व मुस्लिम या दोन्ही साक्षात्कारवादांचे एकमत आहे, हे त्याने दाखवून दिले. मानवी ज्ञान हे इंद्रियजन्य असून ते प्रात्यक्षिक व चर्चा यांच्याद्वारे प्राप्त करता येते; परंतु दैवी ज्ञान हे अंतःस्फूर्ती किंवा अंतःप्रेरणा यांच्याद्वारे प्राप्त होऊ शकते; आणि ज्ञानाला परम सत्याकडे घेऊन जाते. सूफी परिभाषेमध्ये ज्ञानाच्या या दोन प्रकारांना 'इल्म'(ज्ञान) व 'मारिफ़त'(अध्यात्मविद्या) अशा संज्ञा असून हिंदू दार्शनिकांनी त्यासाठी 'अपरा' व 'परा' या संज्ञांचा उपयोग केलेला आहे. सद्वस्तू ही एक असून तिचे दार्शनिक स्वरूप 'अद्वैत'(तौहीद) हे आहे. सत्य हे परम (मुतलक़) असून, त्याच्या व्यतिरिक्त जे काही आहे ते 'मिथ्या', 'माया' (मादूनी, मौहूम) आहे. हिंदू व मुस्लिम साक्षात्कारवादी तत्त्वज्ञानामधील एकवाक्यतेसंबंधीच्या आपल्या दृष्टिकोनाला आधार म्हणून दारा शिकोह उपनिषदें व सूफ़ी ग्रंथ यामधून अनेक उदाहरणे देतो. हिंदू व मुस्लिम साक्षात्कारवादी आचारविचार मूलतः भिन्न नाहीत, हे त्याने दाखवून दिले. दारा शिकोहचा शेवट मोठा हृदयद्रावक झाला. त्याच्याबरोबर सर्वसंग्राहक संप्रदायांचा काळ संपला.

**४) औरंगजेब व त्याच्यानंतर :** औरंगजेबाची कारकीर्द ही जीवनाच्या धार्मिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रांमधील प्रतिक्रियांनी भरलेली आहे. भारताच्या इतिहासात इस्लामी राज्य स्थापन करण्याचे स्वप्न पाहणारा औरंगजेब हा पहिलाच शासक. तो सनातनी संप्रदायाचा पुढारी झाला. त्या काळच्या मनःस्थितीची कल्पना 'फ़तवा ए आलमगिरी' (जगज्जेत्याचे आदेश) आणि 'रूकाते आलमगीरी'(जगज्जेत्याचे दप्तर) या ग्रंथावरून येऊ शकेल. या औरंगजेबाच्या कारकीर्दीत निर्माण झालेल्या महत्त्वाच्या गोष्टी आहेत. औरंगजेबाच्या मृत्यूबरोबर (इ.स. १७०७) ऱ्हासाची प्रक्रिया पूर्ण झाली. भारतातील मुस्लिम समाजाच्या विघटनाला हातभार लावणाऱ्या गोष्टी दुसऱ्या होत्या. लवकरच भारत ही विदेशी लोकांच्या कपट-कारस्थानाची रंगभूमी होणार होती. मुस्लिम जनतेवर पराभूत मनोवृत्ती आणि वैराग्य यांचे साम्राज्य पसरले होते.

**५) शाह वलीउल्लाह :** अवनतीच्या या कठीण प्रसंगी शाह वलीउल्लाह देहलनी (मृ. १७६२) फुटीरपणाच्या शक्तीशी दोन हात करण्यास पुढे सरसावले. हे स्वतंत्र प्रज्ञेचे गृहस्थ इस्लामच्या दुसऱ्या सहस्रकातील बहुधा सर्वश्रेष्ठ विचारवंत होते. विद्येच्या बाबतीत इमाम ग़ज़्ज़ाली, राज़ी आणि इब्न रुश्द यांच्याशी शाह वलीउल्लाह यांची तुलना केली जाते, ते योग्यच आहे. शाह वली उल्लाह यांच्या मते धर्माची दोन प्रमुख अंगे आहेत. अंधरूढी आणि शास्त्रज्ञांचा किंवा ईश्वरी आदेश. परंतु कुराणातील ईश्वरी आदेशांचे स्पष्टीकरण तर्कसंगत सिद्धान्तांच्या साहाय्याने करणे शक्य आहे; म्हणून तत्त्वज्ञान व इस्लाम यात परस्परविरोध आहे, असे समजणे चूक आहे. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की, सनातनी धर्मशास्त्रज्ञ आणि सूफ़ी यांच्यातील वाद शाह वली उल्लाह यांच्या काळापर्यंतही कमी झालेला नव्हता. त्यांनी 'क़ायदा' (धर्मशास्त्र शरीअत) आणि

‘तरीक़त’ (साक्षात्कारवाद) यांच्यात मेळ घालून फ़ार मोठे कार्य केले. ‘हुज्जतुल्ला अल बालिगा’ या आपल्या थोर ग्रंथात शाहवल्ली उल्लाह यानीं सर्व प्रथम धर्म व संप्रदाय यानां आधारभूत असलेल्या सर्व सिद्धान्तांची व मूलभूत कल्पनांची चर्चा केलेली आहे, आणि या सिद्धान्तांच्या संदर्भात इस्लामी धर्मशास्त्रांचे समर्थन केले आहे. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने या ग्रंथांतील विशेष महत्त्वाचे प्रकरण कल्पनांच्या विश्वासंबंधीचे प्रकरण होय. हे विश्व अपार्थिव असून त्या ठिकाणी वस्तू इंद्रियगोचर विश्वात येण्यापूर्वी पहिल्यांदा दृष्टीस पडतात. शाह वली उल्लाह यांच्या लिखाणाचे विद्वानांकडून गंभीरपणे अध्ययन झाले पाहिजे. इस्लामी धर्मशास्त्र आणि राजकीय तत्त्वज्ञान यांच्या क्षेत्रात संशोधनाला खूपच वाव आहे. शाह वली उल्लाह यांचे कार्य, त्यांचे सुयोग्य मुलगे व त्यांचे अनुयायी यांनी मोठ्या उत्साहाने व क्रांतिकारी निष्ठेने पुढे चालवले. अलीकडील काळांतील मौलाना उबेदुल्ला सिंधी आणि मौलाना अबुल कलाम आज़ाद हे शाह वली उल्लाह यांच्या तत्त्वज्ञानाचे सर्वोत्कृष्ट प्रतिनिधी होत.

शाह वली उल्लाह यांच्या नंतर आलेल्या मुस्लिम विचारकांच्या साहित्याचा परामर्श येथे घेण्यात आलेला नाही कारण तर्कशास्त्र, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान व सूफीवाद यांवर फारसी व उर्दू भाषेत अनेक ग्रंथ त्यानंतर प्रसिद्ध झाले असले तरी त्यांतून एखादी नवीन विचारप्रणाली पुढे आलेली नाही. मात्र या ठिकाणी ‘फ़रंगीमहल’ आणि ‘ख़ैराबाद’ या नावाच्या दोन संप्रदायांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. (फ़रंगीमहल व ख़ैराबाद ही उत्तर प्रदेशातील दोन ठिकाणे असून त्यांवरून या संप्रदायांना ही नावे मिळाली आहेत.) या संप्रदायांनी ज्ञानप्रसाराच्या बाबतीत फार महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. अलीकडच्या काळातील काही विचारकांचे विचार हे सूफी तत्त्वज्ञानाच्या परवर्ती कालखंडामध्ये मोडत असल्याने त्यांचा परामर्श घेण्यात आला नाही.

**उपसंहार :** या विषयाचा उपसंहार करताना आधुनिक इस्लामी जगातील तत्त्वज्ञानाच्या विकासाची शक्याशक्यता या प्रश्नासंबंधी दोन शब्द सांगणे योग्य होईल. यासंबंधी मुहम्मद हसन अल जय्यत या आधुनिक अरब विद्वानाचे उद्‌गार उद्‌धृत केल्यास परिस्थितीचे सम्यक दर्शन होऊ शकेल. ते म्हणतात, ‘‘आधुनिक काळात इस्लामच्या मोजक्या मूलभूत तत्त्वांमध्ये काहीही क्रांती किंवा उत्क्रांती झालेली नाही. धर्मशास्त्र किंवा अध्यात्मशास्त्र यांचा विकास झालेला नाही. इस्लामचे मूलभूत सिद्धान्त व मुद्दे यांच्याविषयी या शतकात बौद्धिक पातळीवर अजून चर्चा झालेली नाही.’’

### ख) इस्लामी तत्त्ववेत्त्यांचे तत्त्वज्ञान[६]

### १) इराणी अरबी प्रदेशातील तत्त्वज्ञान

बगदादच्या खिलाफ़तीवर (खलीफाच्या गादीवर) अब्बासींचे आगमन झाल्यापासून (इ.स. ७५०) इस्लाममध्ये बौद्धिक प्रबोधनाचे एक नवे युग सुरू झाले. अब्बासी खलीफा हे उदारवृत्तीचे होते. इस्लामी संस्कृतीच्या समृद्धीमध्ये होणाऱ्या सर्वप्रकारच्या प्रयत्नांना त्यांनी उत्तेजन दिले. अब्बासी हे मूळचे अरबी असले, तरी उमय्यांप्रमाणे त्यांना आपल्या अरबीपणाचा फाजील गर्व नव्हता. त्यामुळे उमय्यांच्या कारकीर्दीत राज्यकर्ते आणि जनता यांच्यात जशी एक खोल दरी निर्माण झालेली होती, तशी अब्बासींच्या कारकीर्दीत झाली नाही.

नव्याने मुसलमान झालेल्या लोकांना आपल्या बरोबरीने वागवण्यास उमय्या तयार नव्हते. याचा फायदा अब्बासींनी घेतला आणि या नवमुस्लिमांचा पाठिंबा मिळवून उमय्या घराण्याला पदच्युत करण्यात ते यशस्वी झाले. (ह्या नवमुस्लिमांपैकी बहुतेक इराणी होते.) त्यांनी आणखी एक महत्त्वाचा बदल केला तो असा की, त्यांनी आपली राजधानी दमास्कसहून बगदादला नेली. कालांतराने हे बगदाद शहर इराणी-अरबी संस्कृतींच्या समन्वयाचे केंद्र बनले.

अब्बासी राज्यकर्ते कला आणि साहित्य यांचे मोठे पुरस्कर्ते होते. त्यांच्या अचाट प्रयत्नांमुळेच पूर्वी होऊन गेलेल्या यावनी (ग्रीक) व पौर्वात्य ज्ञानभांडारांतील ज्ञान मुस्लिम जनतेपर्यंत पोहोचू शकले. अल मामून, अल मन्सूर आणि अल मुत्तवक्किम यांनी (ग्रीक ग्रंथ मिळवण्यासाठी) कॉंस्टँटिनोपलला आणि इतर ग्रीक शहरांना आपले दूत पाठविले. इ.स. ८३० साली अल मामून याने बगदाद येथे दोन लाख दीनार खर्चून एक ज्ञानगृह (बैतुल हिकमत) बांधले. इ.स. ७५० ते ९०० या काळात ज्ञानाचे विविध प्रकारचे बीजारोपण करून ते समृद्ध करणारे अनुवादकार्य चालले. त्या योगे शामी (सिसाइक), ग्रीक, पहलवी व संस्कृत या भाषांतील बहुमूल्य दार्शनिक आणि वैज्ञानिक साहित्य अरबीत आले. या प्रक्रियेतून इस्लामध्ये धर्मनिरपेक्ष ज्ञान येण्याचा मार्ग अप्रत्यक्षपणे उपलब्ध झाला. ही गोष्ट लक्षात घेता या कार्याचे वैशिष्ट्य उल्लेखनीय वाटते.

परंतु येथे हेही लक्षात ठेवले पाहिजे की अब्बासी घराणे राज्यावर येण्याच्या खूप आधीपासूनच इस्लाममध्ये तत्त्वज्ञानविषयात चिंतन सुरू झालेले होते. इस्लामच्या प्रारंभीच्या विजयांमुळे मुसलमानांचा नवीन संस्कृतींशी संबंध आला. त्यांपैकी काही संस्कृती, परंपरा व बौद्धिक कर्तृत्व याबाबतीत खूपच समृद्ध होत्या. ख्रिश्चनांनी केवळ मुस्लिम सैनिकांशीच दोन हात केले असे नव्हे, तर त्यांच्या धर्माशीही लढा दिला. या वेळीच अरबांना आपल्या शत्रूंविरुद्ध बौद्धिक पातळीवर आक्रमक आघाडी उघडणे भाग पडले. याच सुमारास इस्लाममध्ये 'मुअतज़िला' नावाचा एक नवा पंथ उदयास आल्यामुळे, धर्माचा बौद्धिकदृष्ट्या विचार करण्याची प्रक्रिया सुरू झालेली होती.

मुअतज़िली पंडित ग्रीक तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र यांच्याशी उत्तम प्रकारे परिचित होते. ते इस्लाममधील पहिले पंडिती परंपरेतील बुद्धिवादी होते. त्या भाषेतून घेतलेल्या अनेक कल्पना त्यांनी घेऊन, त्यांचे एकजीव मिश्रण केले आणि मुसलमानांच्या तत्त्वज्ञानविषयक कल्पनांवर एक नव्याच वैशिष्ट्याचा ठसा उमटवला. ग्रीक तत्त्वज्ञानाच्या अभ्यासामुळे मुअतज़िलींना एक नवे शास्त्र निर्माण करण्यास उत्तेजन मिळाले. याला त्यांनी 'इल्मुल कलाम' (तर्कशास्त्र किंवा मीमांसाविज्ञान) असे नाव दिले. या शास्त्राच्या साहाय्याने त्यांनी धर्माच्या अंतर्गत व बाह्य शत्रूंविरुद्ध धार्मिक आवेशाने युद्धाची आघाडी उघडली. या ठिकाणी एवढे सांगितले म्हणजे पुरे की, मुअतजिलींनी मुक्त-चिंतनाला खूप उत्तेजन दिले आणि त्यांच्या प्रभावामुळे इस्लाममध्ये चिंतनाच्या तीन वेगवेगळ्या प्रणाली उदयास आल्या : १) मुतकल्लिमीन (कट्टर मीमांसक पंडिती परंपरेतील शास्त्रप्रामाण्यवादी), २) हकमा किंवा फ़लसीफ़ (तत्त्वज्ञानी), ३) सूफ़ी (साक्षात्कारवादी).

या ठिकाणी आपल्याला इस्लाममधील ज्या तत्त्ववेत्त्यांवर ग्रीक विचारांचा प्रभाव फार मोठ्या प्रमाणावर दिसून येतो, त्यांच्या विचारांसंबंधीच प्रामुख्याने विचार करावयाचा आहे. मुतकाल्लिमीन पंडितांचे मुख्य उद्दिष्ट धर्मसिद्धान्तावर प्रतिस्पर्ध्यांकडून होणारे जोरदार हल्ले परतवून लावणे हे होते. कुराणाचा अर्थ लावणाऱ्या

भाष्याला बुद्धिवादी वळण देण्यावर त्यांचे प्रयत्न मुख्यत: केंद्रीभूत झालेले होते. या कामासाठी त्यांनी ज्या द्वंद्वात्मक तर्कशास्त्रीय पद्धतीचा अवलंब केलेला आहे, तिला त्यांनी 'अल कलाम' असे नाव दिले. या ठिकाणी हे लक्षात ठेवले पाहिजे की, 'अल कलाम' हे अरब-मनाने शोधून काढलेले स्वतंत्र मौलिक तत्त्व आहे.

सूफीवादाच्या बाबतीत बोलावयाचे तर इराण व भारत या दोन्ही देशात त्याचा घवघवीत विकास झाला आहे, असे म्हणता येईल. सत्याचा साक्षात्कार हा आध्यात्मिक शिस्तीच्या द्वारेच होऊ शकतो आणि ईश्वराचे मानवाला धन्यता प्राप्त करवून देणारे शुभदर्शन (साक्षात्कार) हे मानवाचे अंतिम उद्दिष्ट होय, असे सूफी लोक मानतात. सूफीवादाने मुख्यत: प्रत्यक्ष अनुभूतीच्या मार्गावरच अधिक भर दिला असला, तरी कालांतराने थोर सूफी विचारकांनी जे स्वत:च पद्धतशीर ग्रंथ रचले, त्यामधून सूफीवादासंबंधी उत्तम चिंतनात्मक साहित्य तयार झाले.

काही लोक नि:संकोचपणे असे मत व्यक्त करतात की, इस्लामच्या प्रारंभिक संस्कृतीत तत्त्वज्ञानात्मक परंपरांचा अभाव होता आणि ज्याला इस्लाममधील तत्त्वज्ञान असे म्हटले जाते, ते दुसरे-तिसरे काही नसून ग्रीक तत्त्ववेत्त्यांच्या तत्त्वज्ञानाविषयक कल्पनांवर केलेले एक प्रकारचे कलमच आहे. परंतु पुढे उल्लेखिलेल्या इस्लामी विचारकांचे साहित्य वाचले व समजून घेतले की ह्या मतांचे वैवर्थ्य (व्यर्थता) स्पष्ट होते. या विचारकांपैकी अनेकांनी ग्रीक ग्रंथांवर विशेष भिस्त ठेवली हे खरे; परंतु अधिकांश उदाहरणांमध्ये त्यांनी आपली स्वतंत्र प्रज्ञा दाखवली होती आणि नवीन कल्पना शोधून काढल्या होत्या, असे दिसून येते.

मुसलमानांमधून अनेक तत्त्वज्ञ निर्माण झाले असले, तरी त्यांच्यापैकी फार थोड्यांना प्रसिद्धी मिळू शकली. ज्यांना प्रसिद्धी मिळाली त्यांमध्ये अल-किंदी, अल-फ़राबी, इब्न मस्काविया, इब्न सीना, इब्न हुज़्म, इब्न बज़्ज़ा, इब्न तुफ़ैल आणि इब्न रुश्द हे सर्वश्रेष्ठ समजले जातात. अल-गज़ाली व इब्न तैमिया यांच्यासारखे धार्मिक विचारक, इब्न ख़ल्दूनसारखे इतिहासवेत्ते आणि इब्न तैमिया यांच्यासारखे धार्मिक विचारक, इब्न ख़ल्दूनसारखे इतिहासवेत्ते आणि इब्न रुश्द (व त्याचा अंदलूसी संप्रदाय) यांच्यासारखे प्रामुख्याने असलेले भाष्यकार यांच्याशी तुलना करता वर उल्लेखिलेले मुस्लिम तत्त्वज्ञ आपल्या वेगळेपणामुळे ठळक उठून दिसतात. अंदलूसी-संप्रदाय म्हणजे स्पेनसारख्या पाश्चात्त्य देशांतील मुस्लिम तत्त्ववेत्त्यांचा संप्रदाय. लॅटिन प्रदेशात ज्यांचा प्रभाव पसरला अशा ॲरिस्टॉटलीय संप्रदायाचा पुरस्कार करणाऱ्या विद्वानांमध्ये इब्न रुश्दचा तिसरा क्रमांक लागतो.

या ठिकाणी इस्लामी विचारकांच्या एका भ्रातृसंघाचा उल्लेख केला पाहिजे. या संघाच्या लोकांना 'इख़्वान अस्सफ़ा' (पवित्र बांधव) असे म्हणता येईल. या मंडळींनी संयुक्तपणे प्रयत्न करून ज्ञानाच्या प्रत्येक संभाव्य शाखेमध्ये वैज्ञानिक व अर्धवट वैज्ञानिक विचारांचे सारसंग्रह तयार केले. या 'पवित्र बांधवां'नी अंदलूसी विचारकांवर फार मोठा प्रभाव पाडला, हे लक्षात ठेवले पाहिजे.

**१) अल-किंदी (इ.स. ८०३-८७५) :** अबू याकूब अल-किंदी याचा जन्म कफा येथे इ.स. ८०३ साली झाला. तो आपली वंशावळ जुन्या किंद राजघराण्यापर्यंत नेऊन भिडवतो. तो राजघराण्याशी संबंध असलेला शुद्ध अरब असल्यामुळे 'पहिला अरब तत्त्वज्ञ' हे स्पृहणीय बिरूद त्याला मिळाले. त्याच्या नावावर सुमारे २६५ ग्रंथ आहेत. 'इस्लाममधील धर्मनिरपेक्ष विचारांचा अग्रदूत' म्हणूनही अल-किंदीचा उल्लेख केला

पाहिजे. ज्ञानाची कोणतीही विद्यमान शाखा त्याच्या तीक्ष्ण नजरेतून सुटली नाही. त्याच्या स्वतंत्र ग्रंथांपैकी 'दि एसे ऑन इंटलेक्ट' हा बुद्धीवरील प्रबंध व 'दि फाइव्ह इसेन्सेस' हा पाच मूलतत्त्वांवरील ग्रंथ हे अत्यंत महत्त्वाचे आहेत. बुद्धी (अक़्ल) वरील प्रबंधाचा मध्यकालीन लॅटिन भाषेत 'डी इंटलेक्टुएट इंटलेक्टो' या शीर्षकाखाली अनुवाद करण्यात आला होता. त्यात बुद्धीसंबंधीचा ॲरिस्टॉटलचा दृष्टिकोन व्यक्त होतो. अल-किंदीच्या मते बुद्धीचे चार प्रकार आहेत. यांपैकी पहिली बुद्धी ही सदैव क्रियाशील (ॲक्ट) असते, दुसरी सुप्तावस्थेत (पोटेंशिया) असते. तिसरी म्हणजे ही सुप्तावस्थेतून क्रियाशील अवस्थेत आत्म्यामध्ये अवतीर्ण होणारी बुद्धी. बुद्धीचे हे त्रिविध विभाजन 'डी ॲनिमा' या ग्रंथात आढळते; परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की, आपल्या प्रबंधाच्या शेवटी अल-किंदीने 'प्रकट बुद्धी' (अक़्ल ज़ाहिर) या नावाचा एक चौथा प्रकार सांगितला आहे. 'प्रकट बुद्धी' या कल्पनेचे मूळ ग्रीक तत्त्वज्ञानात शोधण्याचा युरोपीय पंडितांचा प्रयत्न निष्फळ ठरला आहे. अनेक विद्वानांनी या कल्पनेचे मूळ शोधण्याचा खूप प्रयत्न केला, परंतु तो यशस्वी झालेला नाही. श्री. गिब्सन यांच्या मते आल्फोडिलियसच्या ॲलेक्झँडरच्या 'डी ॲनिमा' या ग्रंथातून ही कल्पना घेण्यात आलेली आहे, परंतु तेथे हे विभाजन केवळ त्रिविधच आहे. अल-किंदीचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य असे की, ग्रीक तत्त्ववेत्त्यांच्या ग्रंथांतून मानसशास्त्रीय विचारसाहित्य निवडून घेऊन त्याचा विकास करणारा तो पहिला मुस्लिम विचारक होय.

अल-किंदीचा दुसरा महत्त्वाचा प्रबंध पाच मूलतत्त्वांसंबंधीचा होय. त्यामध्ये त्याने जडद्रव्य, आकार, गती, काळ आणि स्थान या पाच कल्पनांच्या मूलतत्त्वासंबंधी विचार केला आहे. बहुतेक सर्व युरोपीय लेखकांनी याला 'कट्टर मुअतज़िली' ठरवले आहे, परंतु कॉंस्टँटिनोपलमध्ये अलीकडेच उपलब्ध झालेल्या याच्या ग्रंथावरून तो खऱ्या अर्थाने मुअतज़िली होता, असे म्हणता येत नाही.

तत्त्वज्ञानविषयक संशोधनासाठी गणिती पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे, असे सांगणारा पहिला तत्त्वज्ञ डेकार्ट्स हा नसून, अल-किंदी हा होता. दृष्टिविज्ञान किंवा प्रकाशिकी (ऑप्टिक्स) या विषयासंबंधीचा त्याचा मुख्य ग्रंथ पाश्चात्त्य व पौर्वात्य दोन्ही देशांत मोठ्या प्रमाणावर अभ्यासला जात होता. रॉजर बेकन हा अल-किंदीचा उल्लेख मोठ्या आदराने करतो. अल-किंदीच्या मते ज्ञान हे इंद्रियांद्वारे, बुद्धीच्या साह्याने किंवा कल्पनेच्या साह्याने दिले-घेतले जाते. यांपैकी कल्पनेचा मार्ग हा इंद्रिय व बुद्धी यांच्यातील दुवा आहे. इंद्रिये विशेषांचे (पर्टिक्युलर) ज्ञान देतात, तर बुद्धी सामान्याचे (युनिव्हर्सल) ज्ञान देते. कल्पनाही सामान्य-विशेषांचे दोहोंचे ज्ञान देते. अगदी अलीकडच्या काळापर्यंत कांट (मृ. १८०४ इ.स.) हा इंद्रियगम्य प्रत्यक्ष ज्ञान आणि बुद्धी यांच्यामधील दुवा म्हणून कल्पनेचा उल्लेख करणारा पहिला तत्त्वज्ञ समजला जात होता, परंतु वर आपणाला दिसून आलेच आहे की हा भेद करण्याचे श्रेय अल-किंदी याच्याकडे जाते.

वर नमूद केल्याप्रमाणे अल-किंदी हा अरबांचा पहिला तत्त्वज्ञ होय. त्याने इतर विचारवंतांप्रमाणेच ग्रीक तत्त्वज्ञान, विशेषत: ॲरिस्टॉटलचे तत्त्वज्ञान प्रसृत केले. तत्त्वज्ञान आणि धर्मशास्त्र यांतील फरक स्पष्ट करून त्याने विचारस्वातंत्र्यावर भर दिला. 'तुम्हाला माहीत आहे ते मला माहीत आहे, पण मला माहीत आहे ते तुम्हांला माहीत नाही' असे बोलून त्याने तत्त्वज्ञानाच्यावतीने एका धर्मशास्त्रज्ञाला सुनावले. यावरून असे दिसून येते की अल-किंदीने अतिरेकी धर्मवादापुढे मान तुकवली नाही.

माणसाचे ईश्वराविषयीचे कुतूहल त्याच्या स्वत:च्या अस्तित्वाएवढेच पुरातन आहे. सूफी तत्त्वज्ञानाचे सर्वप्रमुख प्रमेय ईश्वर यासंबंधी उपरोक्त कुतूहलाचे निराकरण इस्लामिक तात्त्विक विचारांचा आद्य प्रणेता व पहिला अरब तत्त्वज्ञ अल-किंदी याने कसे केले असेल, हे पाहणे उद्बोधक ठरेल. वस्तुतः इस्लामी धर्मविचारांपासून फारकत घेऊन ग्रीकांच्या ज्ञानाचा अवलंब करणारा अल-किंदी हा पहिला तत्त्वज्ञ होय. ईश्वराच्या एकात्मिकतेचा शोध घेण्यासाठी त्याने बुद्धिप्रामाण्याची कास धरली व तर्कनिष्ठ विवेचनाचा नवा मार्ग दाखवला. प्लेटो व ॲरिस्टॉटलच्या अनेक कल्पना त्याने इस्लामच्या तत्त्वविचारांच्या वारशात सामावून घेतल्या. ईश्वराच्या एकात्मिकतेविषयीचे व त्याच्या सार्वभौमत्वाविषयीचे कुराणातील युक्तिवाद हे निरीश्वरवाद्यांच्या युक्तिवादांपेक्षा अधिक समर्पक आहेत हे सिद्ध करण्यासाठी त्याने आपल्या बुद्धीचा व ज्ञानभांडाराचा खुबीने वापर केला.

कुराणावर विश्वास न ठेवणाऱ्यांना एकदा त्याने विचारले, 'भुगा झालेल्या हाडांत कुणी जीव ओतू शकेल काय?' ह्या प्रश्नावर अर्थातच कुणाकडे उत्तर नव्हते. अल-किंदी उत्तरला, 'ज्याने ही हाडे निर्माण केली तोच त्यांत जीव ओतू शकेल.' ईश्वर सर्व गतिमानतेमागचा कर्ता-करविता आहे. प्राथमिक गतीचे कारण व मध्यस्थ तोच आहे. तो स्वत: स्थिर राहून इतर सर्वांना गती देतो. एकेश्वरवाद, शून्यातून विश्वाची निर्मिती आणि सर्व प्राणिमात्रांचे ईश्वरावरचे अवलंबित्व ह्या इस्लाममधील मूलभूत संकल्पना त्याने पुनश्च अधोरेखित केल्या. परंतु ईश्वराला मानवाचे गुणधर्म चिकटवणे त्याला मान्य नव्हते. ''ईश्वराला वस्तुमान, आकारमान नाही. तो निर्गुण, निराकार आहे. त्याला कुठलेही विकार नाहीत, प्रकार नाहीत. तो अपरिवर्तनीय, अविकारी आहे. ईश्वर म्हणजे एक निखळ, केवल अस्तित्व. त्याला जात नाही, भेद नाही, वर्ग नाही, अपघात नाही. बाकी मात्र सर्व काही अनेकविध आहे.''

**२) अल फ़राबी (इ.स. ८७०-९५०) :** अबू नासर अल-फ़राबी हा एक इराणी सेनापतीचा मुलगा होता. त्याचा जन्म फराब शहरी झाला. इस्लामने जन्म दिलेल्या अत्यंत थोर तत्त्ववेत्त्यांपैकी अल-फ़राबी हा एक होता, यात मुळीच शंका नाही. अल-फ़राबी हा विपुल लेखन करणारा लेखक होता आणि मानवी ज्ञानाच्या बहुतेक सर्व विषयांवर त्याने लेखन केले आहे. त्याने आपल्या 'इहसा-अल्-उलूम'मध्ये ज्ञानाची वर्गवारी करून ते संघटित करण्याचा प्रयत्न केला. त्यातील प्रमुख वर्ग आहेत. भाषिकशास्त्रे, तर्कशास्त्र, गणितशास्त्र, खगोलशास्त्र आणि दृक्शास्त्र (optics), पदार्थविज्ञान, अध्यात्म, राज्यशास्त्र, न्यायशास्त्र, धर्मशास्त्र. इब्न कल्लिकान (इ.स. १२११-१२५६). याच्या मते, अल-फ़राबीने तत्त्वज्ञानक्षेत्रातील शास्त्रांत जे उच्च स्थान मिळवले होते, तेवढे उच्च स्थान दुसऱ्या कोणाही मुसलमानाला कधी मिळवता आले नाही. त्याच्या लिखाणाचा अभ्यास आणि त्याच्या शैलीचे अनुकरण केल्यामुळेच इब्नसीनाला इतके नैपुण्य मिळवता आले, आणि आपले लिखाण इतके उपयुक्त करणे शक्य झाले. अल फराबी बगदादला गेला तेव्हा त्याला अरबी भाषा अवगत नव्हती. तेथे त्याने अरबी शिकण्यास सुरुवात करून लवकरच त्या भाषेवर प्रभुत्व मिळवले. तो बहुभाषाकोविद होता. त्याने ॲरिस्टॉटलीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. असे म्हणतात की, त्या तत्त्वज्ञानाने तो इतका प्रभावित झाला होता की त्याने 'डी ॲनिमा' हा ग्रंथ दोनशे वेळा आणि 'फिजिक्स' (पदार्थविज्ञान) हा ग्रंथ चाळीस वेळा वाचला. त्याने शंभराहून अधिक ग्रंथ लिहिले. त्यांपैकी निम्मे पूर्वसूरींच्या (मुख्यत:

ॲरिस्टॉटलच्या) ग्रंथांवरील भाष्यात्मक व टीकात्मक होते. इतर लिखाण हे त्याचे स्वतंत्र लिखाण होते. त्याच्या ग्रंथांपैकी पंचवीस ग्रंथ अजूनही सुट्या-सुट्या खंडांत विखुरलेले आहेत. त्याचा मुख्य विषय तर्कशास्त्र हा होता. आधुनिक चिद्वाद्यांप्रमाणे त्याने तर्कशास्त्र व ज्ञानमीमांसा ही समानार्थक मानली. त्याच्या मते तार्किक प्रक्रिया ही ज्ञानाच्या पद्धतीची चिकित्सा (Methodology) नसून त्याच्या रचनेची चिकित्सा आहे. सत्व (Essence) आणि अस्तित्व यांच्यातील भिन्नतेवर त्याने विशेष भर दिला. पुढे कालांतराने पौर्वात्य व पाश्चात्त्य तत्त्वज्ञानामध्ये या कल्पनेला खूपच महत्त्व प्राप्त झाले.

हमदानी सुलतान सैफुद्दौला याच्या दरबारात जाऊन पोचल्यानंतर अल फराबीच्या बौद्धिक जीवनातील अत्यंत यशस्वी कालखंड सुरू झाला. त्यानंतर जीवनाच्या अखेरपर्यंत तो दमास्कसलाच राहिला आणि त्याने आपला सारा वेळ लिहिण्यात व व्याख्याने देण्यात घालवला. सर्वश्रेष्ठ यहूदी तत्त्वज्ञानी मेमोनायडीस (इ.स. ११३५-१२०४) याने आपल्या 'गाईड ऑफ दि परप्लेक्स्ड' (संभ्रांतांचे मार्गदर्शन) या ग्रंथात अल फराबीच्या 'पोलिटिकल रेजिम' या ग्रंथाची शिफारस पुढील शब्दांत केली आहे – "माझी तुम्हांला अशी शिफारस आहे की, अबू नासर अली फराबी याच्या ग्रंथाखेरीज तत्त्वज्ञानावरील दुसरे कोणतेही ग्रंथ तुम्ही वाचू नका." अल फराबीच्या मते, विशेष सत्ये जाणून घेतल्यानंतरच सामान्य सत्यांचे निगमन करता येते आणि इंद्रियगम्य अनुभव मिळवल्यानंतरच संकल्पनात्मक ज्ञान मिळवता येते.

बुद्धीच्या सिद्धान्ताच्या बाबतीत अल फराबी हा आपला पूर्वसूरी अल-किंदी याचे अनुकरण करतो आणि आत्म्याच्या चार शक्तींचे वर्णन करतो. त्या चार शक्ती अशा १) संभाव्य किंवा सुप्त प्रज्ञा, २) क्रियाशील प्रज्ञा, ३) कारक प्रज्ञा आणि ४) उपार्जित प्रज्ञा.

**१) संभाव्य किंवा सुप्त प्रज्ञा :** हिला 'अक्ल हय्युलानी' (निष्क्रिय प्रज्ञा) असे म्हणतात. वस्तूशी संबंध असलेल्या उपाधींपासून वस्तूंचे मूलतत्त्व बुद्धीने वेगळे काढून त्याला जाणण्याची जी मानवी शक्ती, ती म्हणजे सुप्त प्रज्ञा. ॲरिस्टॉटलच्या अनेकेंद्रियवेदन (कॉमन सेन्स) या कल्पनेशी हिचे पुष्कळच साम्य आहे.

**२) क्रियाशील प्रज्ञा :** हिला 'अक़्ल बिलफ़ेल' असे नाव आहे. क्रियाशील बनून मूलतत्त्व वेगळे काढण्यास मदत करते ती ही सुप्त शक्ती होय.

**३) कारक प्रज्ञा :** हिला 'अक़्ल फ़आल' असे नाव आहे. ही बाह्य शक्ती आहे. हिचा उगम ईश्वरापासून झालेला असून माणसांतील सुप्त शक्ती जागृत करून त्याला कार्यप्रवण करण्यास ती समर्थ असते.

**४) उपार्जित प्रज्ञा :** हिला 'अक़्ल मुस्तफ़ाद' असे म्हणतात. ही प्रज्ञा कारक प्रज्ञेच्या प्रेरणेने विकसित होते व सक्रिय बनते.

अशाप्रकारे क्रियाशील प्रज्ञा आणि सुप्त प्रज्ञा यांचा संबंध आकारतत्त्व (फॉर्म) व आशयद्रव्य (मॅटर) यांच्या संबंधासारखा आहे, परंतु कारकप्रज्ञा ही बाहेरून प्रवेश करते आणि तिच्या क्रियेमुळे प्रज्ञेला नवीन शक्ती प्राप्त होतात, व त्यांच्यायोगे सर्वात मोठे कर्तृत्व ती उपार्जित करते. अल-फराबी हा शेवटपर्यंत धर्मनिष्ठ मुसलमान राहिला. त्यामुळे कुराणातील विचारांवर ॲरिस्टॉटलीय मानसशास्त्राचा काय परिणाम होतो, याचे मर्म त्याला समजले नाही. ॲरिस्टॉटलीय सिद्धान्तानुसार आत्म्यामध्ये, वनस्पतीजगतात व प्राणिजगतात समानपणे

आढळणाऱ्या वेगवेगळ्या शक्ती अथवा भाग असतात. शिवाय ॲरिस्टॉटल हा प्रत्यक्ष ज्ञान, इंद्रिये इत्यादींच्या शक्तींचा उल्लेख करतो. परंतु बाहेरून प्रवेश करून केवळ मानवामध्येच निवास करत राहणारा (रॅशनल सोल) बुद्धिनिष्ठ आत्मा हाच केवळ अविनाशी असतो. अशा प्रकारच्या सिद्धान्तामुळे मानव आणि मनुष्येतर जीवसृष्टी यांच्यामध्ये एक दुर्लंघ्य खाई निर्माण होते. त्यामुळेच ॲरिस्टॉटलीय दृष्टिकोनातून विचार करणारे लोक – मग ते सनातनी मुसलमान असोत की कॅथॉलिक चर्चचे अनुयायी असोत – मनुष्येतर प्राण्यांशी कर्तव्यबुद्धीने भूतदयेची वागणूक ठेवण्यास तयार असले, तरी त्यांना 'हक्क' देण्यास का तयार होऊ शकत नाहीत, याचाही खुलासा त्या सिद्धान्तावरून होतो, परंतु ॲरिस्टॉटल सिद्धान्तातील अत्यंत अमूर्त व बुद्धिनिष्ठ आत्मा हाच तेवढा मानवामधील असा भाग आहे की, जो अमर होऊ शकेल. मानवेतर प्राण्यांमध्ये विकासाची कितीही क्षमता असली तरी तो या कोटीला पोहोचू शकत नाही. अशा प्रकारच्या शरीरापासून वेगळा काढलेला आत्मा आणि मानवेतर प्राण्यांमधील आत्म्याच्या कोटीच्या शक्ती, यांचे चित्र कुराणामध्ये रंगविलेल्या मरणोत्तर जीवनाच्या चित्रांशी जमत नाही. शिवाय कुराणाच्या मते आत्म्याचा पुन: शरीराशी संयोग झाल्याखेरीज मरणोत्तर जीवन पूर्ण होत नाही, पण ही गोष्ट ॲरिस्टॉटलच्या अनुयायांना मान्य होणे शक्य नाही. याच कारणामुळे ॲरिस्टॉटलच्या शिकवणुकीचे समर्थन करणाऱ्या तत्त्ववेत्त्यांवर जोरदार हल्ले चढवण्यात आले, कारण तसे करण्यामध्ये ते आत्म्याच्या वैयक्तिक अस्तित्वाच्या कल्पनेला सुरूंग लावत होते आणि पुनरूत्थानाच्या सिद्धान्ताला विरोध करीत होते.

अल–फराबीने आपल्या 'जेम्स ऑफ विज्डम' ('ज्ञानरत्ने') या ग्रंथात कार्यकारण–संबंधाच्या सिद्धान्ताचे सविस्तर विवेचन केले आहे. ॲरिस्टॉटलप्रमाणे तोही असेच मानतो की, कारणपरंपरा ही अमर्याद असू शकत नाही. आदिकारण हे एक व शाश्वत असते. हे आदिकरण जाणणे हेच साऱ्या तत्त्वज्ञानाचे उद्दिष्ट आहे. हे आदिकारण म्हणजे 'आवश्यक सत्त्व' (नेसेसरी बीइंग) होय. इतर सर्व अस्तित्वांच्या मुळाशी हे आवश्यक किंवा 'अपरिहार्य अस्तित्व' असते. कुराणात सांगितल्याप्रमाणे 'तोच (ईश्वर) पहिला व शेवटचा, तो प्रकट व प्रच्छन्न आहे.' त्याला कोणत्याही शक्तीद्वारे बघता येत नाही, परंतु त्याच्या गुणांद्वारे त्याला जाणता येते. ज्ञान मिळवण्याचा उत्कृष्ट मार्ग म्हणजे 'जाणणे' हा होय. ईश्वरापर्यंत जाऊन पोहोचणे शक्य नाही. या ठिकाणी अल–फराबी हा शुद्ध तत्त्वज्ञानाची शिकवण आणि आशियातील इस्लामधर्मांत त्या वेळी झपाट्याने प्रसार पावत असलेला गूढवाद यांचे मिश्रण करीत असल्याचे दिसून येते.

अबू नासर अल–फ़राबी हा समेटवादी होता. दोन विरुद्ध विचारांमध्ये समन्वय घडवून आणण्याची कला त्याला अवगत होती. त्याचे असे म्हणणे होते की नकारामध्ये होकार अभिप्रेत असतो. अस्तित्वात असण्यातच त्याची नश्वरता दडलेली असते. साक्षात्कारात त्याची कारणमीमांसा अंतर्भूत असते.

नवव्या व दहाव्या शतकात अल राज़ीच्या विज्ञाननिष्ठ व त्यामुळे 'पाखंडी' ठरलेल्या विचारांवर अनेक मुस्लिम त्याच्यावर खवळून होते. तरीसुद्धा त्याच्या विचारांची छाप काळावर उमटलीच. अल–फ़राबीने श्रद्धा व विवेकशक्ती ह्यांचा मिलाफ घडवून आणला व धर्मवेत्त्यांच्या कडव्या पुरोगामी हल्ल्यास विवेकाचे वळण दिले. एक समन्वयवादी विचारधारा लोकांसमोर मांडली. ह्या विचार प्रणालीनुसार आद्य कार्यकारण शक्तीपासून (फर्स्ट कॉज) बुद्धीचे दहा स्रोत उगम पावले. ह्या दहांना त्याने चैतन्याचे रूप दिले. ही दहा चैतन्याची रूपे परम

आत्म्याचेच घटक होते व ह्या परम आत्म्यास त्याने ईश्वर असे म्हटले. ईश्वराचा हा आविष्कार अवकाशात व त्याच्याबरोबर पृथ्वीवरही विविध प्रकारे झाला तरीसुद्धा एकात्मिकच होता.

**३) इब्न मस्काविया (मृ. इ.स. १०३०) :** इब्न मस्काविया हा वैद्य, तत्त्वज्ञ व इतिहासकार होता. सुलतान आजादुद्दौलाच्या दरबारात तो कोषाध्यक्ष होता. अल-फ़राबीचा संप्रदाय लयास जात असल्याची चिन्हे दिसू लागत असताना त्याचा तत्त्ववेत्ता म्हणून उदय झाला. या वेळी थोर तत्त्वज्ञ इब्न सीना लहान होता. इब्न मस्कावियाने नीतिशास्त्राची जी एक दार्शनिक पद्धती निर्माण केली ती आजही पौर्वात्य देशात महत्त्वाची समजली जाते. प्लेटो, ॲरिस्टॉटल व गॅलेन यांच्याकडून त्याने मुक्तहस्ताने विचार घेतले, परंतु त्याच्यावर प्रामुख्याने ॲरिस्टॉटलचाच प्रभाव पडलेला दिसून येतो.

'आत्म्याचे सारभूत स्वरूप' या विषयावरील इब्न मस्कावियाचा प्रबंध हा मुस्लिम मनावर कायमचा ठसा उमटवणाऱ्या दार्शनिक ग्रंथांपैकी एक आहे. त्याच्या मते मानवी आत्मा हा त्यांच्यावरील बुद्धिनिष्ठ विचारामुळे मानवेतर प्राण्यांच्या आत्म्याहून वेगळा पडतो आणि तो सदैव श्रेयाच्या दिशेने वाटचाल करीत असतो. माणसांमध्ये असलेल्या कमीअधिक क्षमतेमुळे त्यांच्यात फरक पडतो. फार मोठे लोक स्वभावत: चांगले असतात आणि ते कधीच वाईट मार्गाला जात नाहीत. इतर काही लोक प्रारंभी चांगलेही नसतात किंवा वाईटही नसतात. त्यांच्यावर जसे संस्कार होतात व ज्या प्रकारे सामाजिक वातावरण त्यांना मिळते, त्याप्रमाणे ते भल्या किंवा बुऱ्या मार्गाला लागतात. श्रेय हे सर्वसाधारण (सार्वत्रिक) श्रेय असते किंवा एखादे विशिष्ट श्रेय असते, परंतु एक परिपूर्ण किंवा निरपेक्ष असे केवळ श्रेयही असते. सर्वोच्च अस्तित्व आणि सर्वोच्च ज्ञान यांच्याशी ते अभिन्न असते. नीती हा मानवाचा परमोच्च गुण प्रकर्ष होय. इब्न मस्कावियाच्या मते धर्म हा लोकांच्या नैतिक शिक्षणाचे कार्य करीत असतो.

**४) इब्न सीना (इ.स. ९८०-१०३७) :** इस्लामी तत्त्वविचारांच्या, विशेषत: ॲरिस्टॉटलीय व नव-प्लेटोवादी तत्त्वज्ञानाच्या चैतन्यशाली वातावरणात वाढलेल्या मुस्लिम तत्त्वचिंतकांमध्ये अबू अली अल हुसैन बिन अब्दुल्ला बिन सीना हा सर्वश्रेष्ठ आशियाई तत्त्वज्ञानी होय. पौर्वात्य देशात हा सामान्यत: इब्न सीना या नावाने आणि पाश्चात्त्य देशात ॲव्हिसेना या नावाने ओळखला जातो. इब्न सीनाचा शिष्य अल-जुजानी याने पूर्ण केलेल्या त्याच्या उत्कृष्ट आत्मचरित्रावरून त्याच्या जीवनाच्या विविध पैलूंचे दर्शन आपल्याला घडते. इब्न सीनाचा बाप खार्मायताचा राज्यपाल होता, परंतु इब्न सीनाच्या जन्मानंतर तो आपल्या मूळ गावी म्हणजे बुखाऱ्याला परत आला. या बुखाऱ्यातच इब्न सीनाचे प्रारंभिक शिक्षण सुरू झाले. इब्न सीना वयात येण्यापूर्वीच त्याच्या बापाने इस्माईली पंथाचा स्वीकार केला होता. इस्माईली पंथ हा मुसलमानांतील शिया संप्रदायाचा एक पोटभेद आहे. (चौथे खलीफा हजरत अली यांच्या अनुयायांना 'शिया' असे म्हणतात.) या इस्माईली पंथाचे अनुयायी आगाखानांना आपला नेता मानतात. या पंथाचे लोक आजही इजिप्त, इराण, भारत व पाकिस्तान या देशांत आढळतात. इस्माईली हे नाव एकूण बारा इमामांपैकी (अग्रनायकांपैकी) सातवे इमाम इस्माईल यांच्या नावावरून पडले आहे. हे इमाम जाफर सादिक यांचे चिरंजीव होते, परंतु त्यांना गादी न देता इमाम जाफर सादिक़ यांनी आपले दुसरे चिरंजीव मूसा काज़िम यांना गादी दिली. इस्माईली लोक हजरत इस्माईल यांना शेवटचे इमाम मानतात. यामुळे ते सातवे इमाम असल्यामुळे त्यांना 'सप्तकी' किंवा 'सातवाले' ('सेव्हनर्स') या

नावाने ओळखले जाते. याच्या उलट शिया संप्रदायातील बाराही इमामांना मानणाऱ्या इतर बहुसंख्य लोकांना 'द्वादशकी' किंवा 'बारावाले' (ट्वेल्व्हर्स) असे नाव आहे. बाराव्या इमामाचे नाव महदी अल माऊद (आश्वासित) असे आहे. यांनाच काही लोक महदी अल-मुंतज़र (प्रतीक्षित) असे म्हणतात.

या दोन्ही पंथांच्या मते हजरत मुहम्मद पैगंबर यांच्यामागून गादीवर बसण्याचा खरा अधिकार केवळ हजरत अली यांना होता. अबू बकर, उमर आणि उस्मान..... या अन्य तीन ख़लीफांनी ती गादी अन्यायाने बळकावली होती असे ते मानीत. खिलाफतीचा अधिकार मुहम्मदसाहेबांच्या घराण्यातच राहिला पाहिजे, अशी त्यांची श्रद्धा होती. या सिद्धान्ताला 'इमामतचा सिद्धान्त' असे म्हणतात. तसेच हे लोक कुराणातील श्लोकांचा अर्थ रूपकात्मक लावावा असे मानीत. कुराणातील गुह्य ज्ञान फक्त इस्माईली इमामांनाच मिळू शकते, आणि त्यांच्या प्रतिनिधींना दीक्षाद्वारे मिळणाऱ्या परमगुह्य शिकवणुकीतून ते प्राप्त होते, असे ते मानतात. तरुण इब्न सीनानेही इस्माईली पंथाची दीक्षा घेतली होती हे सिद्ध करणारा पुरावा उपलब्ध नाही. परंतु त्याच्या लिखाणावरून त्याच्यावर इस्माईली शिकवणीचा प्रभाव पडलेला स्पष्ट दिसून येतो. तो इस्माईली शिक्षकांकडून ग्रीक, तत्त्वज्ञान भूमिती व अंकगणित शिकला होता असे म्हणतात. त्यानंतर तो न्यायशास्त्र व साक्षात्कारवादी ईश्वरशास्त्र यांच्या अध्ययनाकडे वळला. इब्न सीनाच्या काळात गूढवाद किंवा सूफीवाद हा गंभीर अध्ययनाचा विषय बनला होता, ही लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे. इब्न सीनाने अननताली या इस्माईली दार्शनिकाकडून तर्कशास्त्र शिकून घेतले होते. याच काळात तो वैद्यकशास्त्राच्या अध्ययनातही गढून गेला होता. वैद्यकामध्ये त्याने इतक्या झपाट्याने प्रगती केली की, त्याने वैद्यकी हा आपला व्यवसाय बनविला. त्याने आपल्या 'अल-क़ानून' या ग्रंथात ग्रीक आणि अरब वैद्यकीय विचारांचा शानदार मिलाफ केला आहे. अनेक रोगांची मूलग्राही चिकित्सा करून त्याने ७६० औषधांची उपाययोजना सुचवली आहे. 'अल-क़ानून'मध्ये त्याने भावनिक आणि शारीरिक अवस्थांच्या परस्परपरिणामांचा विचार करून प्रथमच वैद्यकशास्त्रात मानसशास्त्रीय चिकित्सा आणली आहे. मनोदेहिक (Psychosomatic) शास्त्राचा हा प्रारंभच म्हणावा लागेल. प्रस्तुत ग्रंथ सतराव्या शतकापर्यंत कित्येक विद्यापीठांत प्रमाणित पाठ्यपुस्तक म्हणून वापरले गेले. अल-रज़ीच्या धर्माव्यतिरिक्त इतर क्षेत्रातील धर्माच्या अधिकाराला उघड विरोध होता. इब्न सीनाने धर्म आणि विज्ञान यांत एकवाक्यता शोधण्याचा प्रयत्न केला.

असे म्हणतात की, इब्न सीनाने एके दिवशी सहज अभावितपणे अल-फ़राबीचे ॲरिस्टॉटलवरील भाष्य विकत घेतले आणि त्याच्या साह्याने त्याला ॲरिस्टॉटलचे तत्त्वज्ञान समजून घेता आले. या दृष्टीने पाहिल्यास इब्न सीना याला अल-फ़राबीचा शिष्यही म्हणता येईल. आयुष्यामध्ये अनेक दुःखांना व आपत्तींना तोंड देऊन इब्न सीनाने उत्कृष्ट दर्जाचे जे तत्त्वज्ञानात्मक साहित्य निर्माण केले, ते पाहिले की मन आश्चर्याने थक्क होते. त्याने अरबी व फारसी भाषांत अनेक ग्रंथ लिहिले. 'अश्शिफ़ा' (रोगपरिहार) हा त्याचा ज्ञानकोशासारखा महाग्रंथ अठरा खंडांत विभागलेला असून, त्यात त्याचे भौतिक विज्ञान, सत्ताशास्त्र आणि गणित या विषयांवरील विचार संग्रहित झाले आहेत. इब्न सीनाने 'अश्शफ़ा'ची एक संक्षिप्त आवृत्तीही तयार करून तिला 'नजात' (मोक्ष) असे नाव दिले. या ग्रंथात त्याने गॅलेन व हिप्पोक्रेट्स यांच्या तत्त्वांचा संग्रह केला.

इब्न सीनाच्या मते तर्कशास्त्राचे अंतिम उद्दिष्ट, मानवाला चुकीच्या युक्तिवादापासून वाचविणारा एक आदर्श विचार उपलब्ध करून देणे, हे आहे. त्याने आपल्या तर्कशास्त्राविषयक प्रबंधाचे नऊ विभाग पाडले आहेत. ॲरिस्टॉटलच्या अरबीत अनुवादिलेल्या प्रमाणभूत तत्त्वज्ञानाप्रमाणे त्याची मांडणी करण्यात आलेली आहे. त्यामध्ये साहित्यशास्त्र (ऱ्हेटॉरिक) व काव्यशास्त्र (पोएटिकल) यांच्याप्रमाणे 'इसगॉग ऑफ पारफिरी' ('स्फटिक-शिलेचा प्रारंभ') या ग्रंथाचाही समावेश आहे. अरबी व्याकरणातील वाक्यरचना ही ग्रीक भाषेत वापरलेल्या रूपांहून वेगळी असल्याचे इब्न सीनाने दाखवून दिले आहे. उदा. सर्व अभावविधानांची कल्पना व्यक्त करता ग्रीकमध्ये सर्व 'अ' हा 'ब' नसतो, असे शब्द वापरले जातात, तर अरबीमध्ये याच अर्थाच्या अभिव्यक्तीसाठी 'अ'चा कोणताही भाग 'ब' नसतो, अशी वाक्ययोजना केली जाते. अचूक युक्तिवाद हा नेहमी यथार्थ व्याख्येवर आधारलेला असतो, या गोष्टीवर इब्न सीनाचा भर आहे. कोणत्याही व्याख्येमध्ये त्या विषयवस्तूचा गुण, जातिसामान्य, विशेष आणि तिची इतर सर्व अति आवश्यक वैशिष्ट्ये यांचा अंतर्भाव झाला पाहिजे. म्हणून व्याख्या केवळ वर्णनाहून निराळी होय. जातिसामान्य व विशेष यांची चर्चा करताना इब्न सीनाने असे दाखवून दिले आहे की, जातिसामान्य हे केवळ मानवी मनातच असते. ही एक प्रकारची अमूर्त कल्पना असून ती केवळ मनातच वास करते. कोणत्याही प्रत्यक्ष वस्तुस्थितीशी तिचा काही संबंध नसतो. ज्याप्रमाणे निर्मात्याच्या मनात व्यक्ती निर्माण होण्यापूर्वी सामान्य कल्पना उदय पावते, त्याप्रमाणे सामान्य कल्पना आधी निर्माण होते आणि मागून विशेष कल्पना येते. सामान्य कल्पना जेव्हा उपाधींनी युक्त असते, तेव्हाच तिची अभिव्यक्ती वस्तूच्या माध्यमांतून होते. उपाधींच्या अभावी ती केवळ एक मानसिक, अमूर्त विचाररूपाने असते.

इब्न सीनाच्या मते आत्मा हा शरीरावर परिणाम करणाऱ्या शक्तींच्या (कोशांचा) एक समुच्चय असतो. वनस्पतींचा आत्मा हे आत्म्याचे सर्वांत साधेसुधे स्वरूप होय. पोषण व उत्पादन या दोन क्षेत्रांपुरतेच त्याचे कार्य मर्यादित असते. मानवेतर प्राण्यांच्या आत्म्यांमध्ये वनस्पतींमधील आत्म्याचे गुण तर असतातच, पण त्याशिवाय त्यांच्यांत आणखीही गुणांची भर पडलेली असते. मानवी आत्मा त्यात आणखी भर घालतो. त्याला 'बुद्धिनिष्ठ' किंवा 'सुज्ञ आत्मा' असे म्हटले जाते.

प्रत्यक्ष इंद्रिय-ज्ञानाच्या शक्ती अंशतः बाह्य व अंशतः आंतरिक असतात. बाह्यशक्ती शरीरांत विद्यमान असतात आणि आत्मा त्या शरीरात असतो. शरीरामध्ये आठ इंद्रिये असतात. दृष्टी, श्रवण, रसना, प्राण, स्पर्श (उष्ण व शीत यांची जाणीव करून देणारे इंद्रिय), कोरडे व ओले यांची कल्पना आणून देणारे इंद्रिय, मऊ व टणक यांचा अनुभव घडवणारे इंद्रिय आणि खरखरीत व गुळगुळीत यांची जाणीव करून देणारे इंद्रिय. अनुभव घेणाऱ्याच्या आत्म्यामध्ये बाह्य वस्तूचा ठसा उमटवण्याच्या कामी ही इंद्रिये साह्यभूत होतात. इंद्रियजन्य प्रत्यक्ष ज्ञानाच्या आंतरिक शक्ती पुढीलप्रमाणे होत (१) अल मुसव्विरा (रचनात्मक शक्ती), (२) अल मुफ़क्किरा (वेदनात्मक शक्ती), (३) अल वहम (विवेक शक्ती), (४) अल हाफ़िज़ा किंवा अल ज़ाकिरा (स्मरण शक्ती), माणसे व जनावरे इंद्रियांद्वारे विशिष्ट वस्तूचे ज्ञान मिळवतात, तर माणूस तर्काद्वारे सामान्य तत्त्वांचे ज्ञान मिळवतो. माणसाचा बुद्धिनिष्ठ आत्मा उपाख्य अक़्ल याला शारीरिक शक्तीव्यतिरिक्त स्वतःच्या शक्तीची जाणीव असते. त्याचा योगायोगाने उपाधिद्वारा शरीराशी संबंध जोडला गेला असला तरी आत्मा हा अलग व स्वतंत्र घटक आहे हे ओळखले पाहिजे.

पदार्थविज्ञानाचे विवेचन करताना इब्न सीना निसर्गाच्या त्रिविध शक्तींचा उल्लेख करतो. पहिली शक्ती म्हणजे भार (वजन). हा वस्तूचा अपरिहार्य भाग असतो. दुसरी शक्ती म्हणजे बाह्यशक्ती, जी शरीरावर परिणाम करीत असते. शरीरात चलन उत्पन्न करते किंवा त्याला स्थिर करते. तिसरी शक्ती म्हणजे बाह्य प्रेरकाशिवाय शरीरात हालचाल निर्माण करणारी शक्ती. कोणतीही शक्ती अमर्याद असत नाही. ती वाढवता येते किंवा कमी करता येते. ती नेहमीच मर्यादित परिणाम घडवून आणते. काल हा स्वतः गतिमान नसतो, परंतु तो मुख्यतः गतीवर अवलंबून असतो. आकाशस्थ ग्रहताऱ्यांच्या हालचालीवरून काळाचे मापन व ज्ञान होते. अल किंदीचे अनुसरण करून इब्न सीना स्थलाची व्याख्या 'समाविष्ट वस्तूला स्पर्श करणारी, समावेशक वस्तूची सीमा' या शब्दांत करतो. जिला आपण पोकळी असे म्हणतो, ते केवळ नाव असून ती असंभाव्य गोष्ट आहे असे तो मानतो.

इब्न सीनाच्या मते केवळ ईश्वर हेच एक 'आवश्यक सत्त्व' असून ते सर्वोच्च अंतिम सद्वस्तू आहे. भौतिक शास्त्रांतील अध्ययनाचे विषय केवळ संभाव्य अस्तित्व, म्हणून ते 'वास्तविक अस्तित्व' बनू शकतीलही किंवा शकणारही नाहीत. अनंत काळापर्यंत राहणारे अपरिहार्य अस्तित्व म्हणजे फक्त ईश्वरच होय.

विवेकशक्ती आणि ईश्वराचा एकात्मिक आविष्कार या विषयातील इब्न सीना ह्याचे योगदान अत्यंत विचारप्रवर्तक आणि प्रभावी ठरले. त्याच्या नंतरच्या अनेक पिढ्यांवर त्याच्या विचारांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. धार्मिक शिकवणीचा अन्वय विशद करण्यासाठी त्याने काही तर्कावर आधारित अनुमाने तयार केली. अल फराबीप्रमाणे त्याचाही विश्वास होता की देवाच्या एकात्मतेतून म्हणजेच अटळ किंवा आवश्यक अस्तित्वापासून पहिला बुद्धीचा स्रोत वाहू लागला. हा स्रोत साधा आणि एकच होता. परंतु निरंकुश नव्हता. कारण अटळ अस्तित्व असलेल्या साक्षात देवानेच तो वास्तवात आणला होता. त्यानेच बुद्धीचा पहिला स्रोत वाहू दिला. अशा ह्या चुकीची दुरुस्ती करणाऱ्या दुहेरी प्रक्रियेमुळे बुद्धीचे अनेक स्रोत एका पाठोपाठ निर्माण झाले आणि अगदी शेवटच्या स्रोतामार्फत दैवी संदेश मानवजातीपर्यंत पोहोचवण्यात आला.

हा सिद्धान्त ॲरिस्टॉटलच्या सिद्धान्तापेक्षा खूपच निराळा होता. ॲरिस्टॉटलच्या सिद्धान्तानुसार सर्वश्रेष्ठ परम ईश्वरापासून खाली आलेल्या अनेकांपर्यंत पोहोचेल असा कोणताही स्रोत नव्हता. तसेच ह्या सिद्धान्तात ईश्वर व त्याने निर्माण केलेले विश्व ह्या दोघांना जोडणारा कुठलाही सांधा नाही. इब्न सीनाने मात्र परस्परविरोधी सिद्धान्तांमधून सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न केला. त्यात त्याला थोडेफार यश आले. परंतु पुराणमत-वाद्यांकडून त्याच्यावर आरोप झाला की तो एकेश्वरवादावर देव आणि सृष्टी एकच आहे ह्या विचारांचे पांघरूण घालत आहे. खरे म्हणजे त्याने एकाच विचारात अडकलेल्या 'देव आणि सृष्टी एक आहे' ह्या वादास गती दिली ज्या योगे हा विचार ईश्वराला मानवी रूप देण्यापर्यंत जाऊन पोहोचला असता, किंवा ह्या उलट प्रक्रियेने प्रत्येक सजीवाचे अस्तित्व ईश्वरात विलीन झाले असते. परंतु अशाप्रकारचे विचार माणसाच्या मनात येऊ नयेत ह्यासाठी इब्न सीनाने दिलेली हमी म्हणजे त्याने सांगितलेले प्रसिद्ध तत्त्व. ह्या तत्त्वानुसार ईश्वर हे मूलतत्त्व व मानव हे अस्तित्व होते. पहिले एकमेवाद्वितीय, तर दुसरे अनेक रूपी. एक त्रिकालाबाधित तर दुसरे नश्वर. हे दोन्ही कधीच एकरूप होऊ शकले नसते. ईश्वराच्या बाबतीत त्याचे मूलतत्त्व म्हणजेच त्याची एकात्मता होती.

माणसाच्या बाबतीत मात्र त्याची निर्मिती व त्याचे अस्तित्व हे दोन्ही एकमेवाद्वितीय नव्हते. ते खूप वैविध्यपूर्ण होते. ईश्वर नाही असे प्रतिज्ञापूर्वक सांगणारे अनेक विरोधाभासांच्या जाळ्यात अडकले. ईश्वर जर नसेल तर ह्या विश्वाचा निर्माता कोण? हे विश्व आपले आपणच तयार झाले हा विचार पूर्णपणे हास्यास्पद होता. स्वत:चा वरील मुद्दा स्पष्ट करताना इब्न सीना म्हणतो, ''ईश्वर सोडल्यास बाकी प्रत्येक गोष्ट, प्रत्येक जीव स्वत:च्या अस्तित्वासाठी दुसऱ्यावर कशावर तरी अवलंबून असते. प्रत्येकाचे अस्तित्व आनुषांगिक, प्रसंगोपात आहे. ह्याउलट विश्वाचा निर्माता मात्र एक आहे ह्या सत्याशिवाय दुसरे मूलतत्त्व नाही.'' सीनाचा ॲरिस्टॉटलशी एका बाबतीत मतभेद होता. ॲरिस्टॉटलच्या मते ईश्वर निर्गुण, निराकार आहे. परंतु सीनाच्या मते तसे असेल तर ईश्वराचा त्याने निर्माण केलेल्या विश्वाशी काही संबंधच दाखवता येणार नाही. ग्रीकांचा असा विचार होता की हे विश्व एक सत्य वास्तव आहे. ते आपले आपण निर्माण झाले. ईश्वराविषयी वाटणारी आदराची भावना विश्वाच्या निर्मितीमागे होती. त्याचवेळी परमेश्वर मात्र अनादी अनंत व सर्वांपासून अलिप्त असे अस्तित्व होते. ग्रीकांचा हा विचार कर्मठ मुस्लिमांना पटणे शक्य नव्हते. विश्वाची निर्मिती ईश्वराशिवाय झाली हा भौतिकवादी विचार खोडून काढण्यासाठी इब्न सीनाने आध्यात्मिक दृष्टिकोन व तर्कशुद्ध विवेचनाची सांगड घालण्याचा प्रयत्न केला. तरीही कर्मठ मुस्लिम तत्त्ववेत्त्यांचे समाधान झाले नाही. त्यांना सीनाच्या विचारात छुपा सर्वेश्वरवाद जाणवला आणि त्यामुळे कुराणातील निखळ एकेश्वरवादाशी तो तडजोड करत आहे, असा त्यांचा आरोप होता.

**५) अल ग़ज़ाली (इ.स. १०५९-११११) :** इब्न सीनाच्या मृत्यूनंतरचा काळ इस्लामच्या धार्मिक अथवा तत्त्वज्ञानविषयक क्षेत्रातील भावी विकासाच्या दृष्टीने अत्यंत आणीबाणीचा होता. सनातनी लोकांना तत्त्वज्ञान्यांची मते रुचत नव्हती. सूफीवादाला विकासाच्या क्रमात व्यवस्थित तत्त्वज्ञानाचे स्वरूप आले होते. अशा वेळी एकदम अवचितपणे सूफीवादाने अत्यंत भावनाप्रधान रूप धारण केले. सनातनी उलेमा सूफीवादाकडे तिरस्काराने पाहू लागले होते. अशा या आणीबाणीच्या प्रसंगी परिस्थिती सावरण्यासाठी अल-ग़ज़ालीचा उदय झाला. इस्लामी विचारप्रणालीच्या क्षेत्रात त्याने केलेल्या कर्तबगारीचे मूल्यमापन करणे अवघड आहे. त्यानंतरच्या काळामध्ये अल-ग़ज़ालीने मुस्लिम मनावर जो जबरदस्त प्रभाव पाडला तसा प्रभाव दुसऱ्या कोणत्याही तत्त्वज्ञान्याला किंवा सनातनी विद्वानाला पाडता आला नाही.

अबू हामिद इब्न मुहंमद अल तूसी इमाम अल-ग़ज़ाली याचा जन्म इ. स. १०५९ साली झाला आणि मृत्यू ११११ साली त्याचे जन्मस्थान असलेल्या तूसी याच गावी झाला. थोर अश्अरी विद्वान इमाम अल हर्मैन अल जवैनी यांच्या देखरेखीखाली नैशापूर येथे त्याचे शिक्षण झाले. आपल्या या गुरूच्या हयातीतच त्याला लेखक म्हणून ख्याती मिळाली. अल जवैनीच्या मृत्यूनंतर धार्मिक वृत्तीचा सलजूकी वजीर निजामुलमुल्क तूसी याने नैशापूरच्या प्रख्यात निज़ामी अकादमीचा मुख्य म्हणून अल ग़ज़ालीची नेमणूक केली. त्यानंतर तो बगदादच्या निज़ामी विद्यापीठाचा प्रमुख बनला. बगदादमध्ये असतानाच त्याला त्याच्या जीवनातील एका आध्यात्मिक पेच-प्रसंगाला तोंड द्यावे लागले. या घटनेचा त्याच्या व्यक्तिमत्त्वावर कायम टिकणारा परिणाम झाला. तो सांसारिक जीवनातून निवृत्त झाला आणि त्याने सूफीवादाचा आश्रय घेतला. आपल्या या परिवर्तनाची अत्यंत परिणामकारक हकीगत अल ग़ज़ालीने 'अल मुनक़्क़िद मिन अल जिलाल (भ्रमातून सुटका) या आपल्या छोट्या

आत्मवृत्तात्मक लिखाणात दिलेली आहे. आपल्या उद्दिष्टाच्या परिणामकारकतेच्या दृष्टीने पाहिल्यास 'अल मुनक़्क़िद' हा ग्रंथ सेंट ऑगस्टीनच्या 'कन्फेशन्स' (कबुलीजबाब) या श्रेष्ठ ग्रंथाच्या तोडीचा ठरतो.

अल ग़ज़ालीचा सर्वश्रेष्ठ महाग्रंथ 'इहया उल उलूम फ़ी दीन' (धर्मशास्त्राचे पुनरूज्जीवन) देशदेशांतरीच्या त्याच्या प्रवासाच्या काळात लिहिला गेला होता. यावेळी तो बगदादच्या निज़ामी विद्यापीठातील प्राध्यापक-कार्यांतून मुक्त झालेला होता. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील अल ग़ज़ालीची कर्तबगारी काही सामान्य नाही, ही गोष्ट 'मक़ासिद अल फ़लसिफ़ा' (तत्त्वांची उद्दिष्टे) आणि 'तहाफ़त अल फ़लासिफ़ा' (तत्त्वज्ञांची विसंगती किंवा नाश) या त्याच्या सुप्रसिद्ध ग्रंथांवरून स्पष्टपणे दिसून येते. यांपैकी पहिल्या ग्रंथात त्याने तत्त्वज्ञानाच्या सिद्धान्तांचे अत्यंत आकर्षक शैलीत वर्णन केले आहे, तर 'तहाफ़त'मध्ये ॲरिस्टॉटल व इतर ग्रीक तत्त्वज्ञांचे दोष दाखवून त्यांचे महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. अल ग़ज़ालीच्या मते इस्लामी सिद्धान्ताचा अर्थ विशद करण्याच्या कामी ग्रीक तत्त्वज्ञान अचूक मार्गदर्शन करू शकत नाही. अशाप्रकारे त्याने ईश्वरविषयक ज्ञानाचा मूलभूत आधार बुद्धी आहे, ही गोष्ट अमान्य केली. त्याच्या मते अशा ज्ञानाची गुरूकिल्ली अंत:प्रज्ञा ही आहे. याबाबतीत अल ग़ज़ाली हा आपल्या आधी होऊन गेलेल्या मुस्लिम तत्त्वज्ञान्यांच्या मूलभूत कल्पनांच्या अगदी विरुद्ध टोकाला गेलेला दिसतो. तरीपण ज्या मर्यादेपर्यंत तर्कशास्त्राचा इस्लामी सिद्धान्तांशी विरोध येत नाही, त्या मर्यादेपर्यंत त्याचा उपयोग करण्यास त्याची हरकत नव्हती. अल ग़ज़ालीच्या तत्त्वज्ञानविषयक कर्तबगारीव्यतिरिक्त त्याची सर्वात मोठी व प्रभावशाली वैशिष्ट्ये म्हणजे त्याची नैतिक सचोटी, त्याच्या संकल्पांतील दिसून येणारी गंभीर तळमळ आणि आपला संदेश किंवा शिकवणूक ताबडतोब अमलात आणण्याविषयीची त्याची व्याकुळता ही होत. त्याच्या आगमनापूर्वी सूफीवादाची प्रतिष्ठा धुळीस मिळालेली होती. अल ग़ज़ालीने सूफीवादाला ही प्रतिष्ठा पुन्हा मिळवून दिली.

अल ग़ज़ालीने 'तत्त्वज्ञानाचे खंडन' या आपल्या ग्रंथात असे प्रतिपादन केले आहे की सॉक्रेटिस, प्लेटो व ॲरिस्टॉटल यांच्या ग्रंथांतून सांगितलेली तत्त्वे चूक असून 'सत्य' हे केवळ इस्लामी धर्माच्या शिकवणुकीत सापडते. तत्त्वचिंतनावर त्याने असा प्राणांतिक आघात केला की, मुस्लिम सत्ता भारतात प्रभावित होऊ लागण्यापूर्वी सुमारे शंभर वर्षे तत्त्वचिंतनावरच असा आघात झालेला होता, त्यामुळे तेथे आलेल्या मुस्लिम राज्यकर्त्यांमध्ये तत्त्वचिंतनाबद्दल आस्था नव्हती. अल ग़ज़ालीच्या मताचा प्रभाव बहुतेक मुस्लिम राज्यकर्त्यांवर इतका होता की, त्यांनी तत्त्वचिंतनाला किंवा स्वतंत्र विचाराच्या प्रवृत्तीला कधीच उत्तेजन दिले नाही.

अल ग़ज़ालीने गूढवाद आणि व्यवहारवाद यांचा (महाराष्ट्रीय संतांप्रमाणे) प्रभावी मिलाफ केला. लोकरीचे वस्त्र परिधान करून जगजागृती करणाऱ्या सूफी पंथाचा तो पुरस्कर्ता होता. त्याने आपल्या 'धर्मशास्त्राचा पुनरुद्धार' (इयाह-उलूम अद्दीन) या ग्रंथात ईश्वर साक्षात्काराचा मार्ग वर्णिला आहे, पश्चात्ताप, संयम, भीती, आशा आणि शेवटी वैराग्य हे ईश्वरदर्शनाच्या मार्गावरील टप्पे आहेत. ईश्वराकडे जाण्याच्या मार्गावरील प्रवासासाठी दृढ श्रद्धेची नितांत आवश्यकता असते. अंतिम उद्दिष्ट साध्य होईपर्यंत कोठेही थांबता येत नाही. अशा आत्मिक प्रवासात माणूस स्वत:ला पूर्णपणे विसरतो आणि तसे झाल्यानंतरच ईश्वर त्याला दर्शन देतो. अल ग़ज़ालीच्या साक्षात्कारवादी गूढवादाचा प्रभाव मुसलमान जगाच्या बाहेरही पडला. थॉमस अक्विनासपासून पास्कलपर्यंत अल ग़ज़ालीचे प्रतिध्वनी उमटले.

अल ग़ज़ाली हा आजवरच्या इस्लामांतील एक सर्वश्रेष्ठ धार्मिक द्रष्टा समजला जातो. कीर्तीच्या अत्युच्च शिखरावर असताना दार्शनिक व धार्मिक शास्त्रांमध्ये प्रवीण असलेल्या अल ग़ज़ालीला फार मोठ्या आध्यात्मिक संघर्षांतून जावे लागले, आणि त्याने साऱ्या पदव्या व भौतिक मानसन्मान झुगारून देऊन सरतेशेवटी साक्षात्कारवादाचा आश्रय केला. त्यातच त्याला सुख व समाधान लाभले.

तत्त्वज्ञ, कायदेपंडित, इतर विद्वान मंडळींच्या परस्परविरोधी भूमिकांच्या गदारोळात इमाम अल ग़ज़ाली हे उत्तुंग व्यक्तिमत्त्व उदयास आले. प्रचलित मतभेदांमधून त्याने स्पष्ट आणि स्वच्छ मार्ग दाखवला. विशाल दृष्टिकोन, मूलभूत विचार आणि कुशाग्र बुद्धिमत्ता ह्यांच्या साहाय्याने विरोधी धार्मिक मतांच्या भूमिकांचे एकीकरण केले. मुजद्दिद हुज्जत अल-इस्लाम (इस्लाममध्ये नवचैतन्य निर्माण करणारा) असा त्याचा जयजयकार करण्यात आला. प्रश्न विचारण्यास तो घाबरत नसे. स्वत:चे मत तो परखडपणे मांडे. समज आल्यापासूनच त्याने आपले विचार निर्भयपणे सर्वांसमोर मांडले. एकदा त्याने स्वत:च सांगितले की, ''तो स्वत: प्रत्येक गूढ प्रश्नाला भिडला, प्रत्येक संप्रदायाच्या खाचाखोचा त्याने जाणून घेतल्या, प्रत्येक विचारप्रणालीतील रहस्ये उलगडण्याचा प्रयत्न केला. सत्य व असत्य काय, हे समजावे म्हणून मी हे सर्व केले. असा एकही तत्त्ववेत्ता नसेल ज्याच्या तत्त्वज्ञानाचा मी परिचय करून घेतलेला नाही. असा एकही धर्मवेत्ता नसेल ज्याची विचारसरणी मी तपासलेली नाही. जेव्हा एखादा सूफीपंथीय भेटला तेव्हा मी त्याच्या पंथाची रहस्ये जाणून घेण्याची अभिलाषा धरली. सर्वसंग परित्याग केलेल्या तपस्व्याशी गाठ पडली तेव्हा त्याच्या उग्र तपश्चर्येमागची कारणमीमांसा माहीत करून घेतली. माणूस नास्तिकतेकडे का वळत असेल हे शोधून काढण्याचा प्रयत्न केला.''

सत्यशोधनासाठी अल गज़ालीने केलेला व्यासंग मोठा दांडगा होता. दुसऱ्याने सांगितलेल्या कुठल्याही विचारावर त्याने कधीही आंधळेपणाने विश्वास ठेवला नाही. पुराणमतवादी धर्मवेत्त्यांचा सूफी विचार प्रणालीवरचा रोष कमी व्हावा ह्यासाठी त्याने कर्मठ परंपरागत विचार व ॲरिस्टॉटलचा उत्पत्तीचा सिद्धान्त ह्यामध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. आपल्या 'इह्या उलूम इद्दीन' ह्या प्रसिद्ध ग्रंथात त्याने ईश्वराच्या एकात्मिकतेची तुलना नारळाच्या कठीण अभेद्य कवचाशी केली आहे. हे कवच म्हणजे ईश्वराच्या एकात्मिकतेचा पहिला टप्पा होय. दुसरा टप्पा म्हणजे आतील मृदू कवच. तिसरा टप्पा म्हणजे रुचीला स्वादिष्ट असे खोबरे व चौथा टप्पा म्हणजे त्यातून निघणारे तेल, ज्यामुळे भूक लागते. ग़ज़ाली म्हणतो, ''तौहीद अर्थात ईश्वराच्या अद्वैताचा पहिला टप्पा म्हणजे 'परम ईश्वराशिवाय दुसरे दैवत नाही असा उद्‌बोध करणे, दुसरा टप्पा म्हणजे त्यावर अंत:करणापासून विश्वास ठेवणे, तिसरा टप्पा म्हणजे आपल्या हृदयातील आतल्या प्रकाशात ('कश्फ़') त्यास बघणे ही ईश्वराच्या जवळ पोहोचल्याची खूण होय. चौथा टप्पा म्हणजे ईश्वराशिवाय दुसरे काहीच न बघणे. ईश्वराशी पूर्णपणे तादात्म्य पावणे. हीच खरी अंतिम सत्याची पायरी.'' ग़ज़ालीने त्यास 'फ़ना-फ़ी-तौहीद' असे म्हटले आहे.

अगदी सुरुवातीस अनेकातून ईश्वराचे एकत्व जाणून घेणे अवघड जाते. माणसाच्या शरीराचे जसे हात, पाय, धड असे निरनिराळे अवयव असले तरी तो देह एकच असतो व एकाच व्यक्तीचा असतो तसेच काहीसे ईश्वराचे असते. ग़ज़ाली लिहितो, ''निर्माता व त्याने निर्माण केलेली सृष्टी ह्यांचेही नाते असेच असते. ते

अनेकविध रूपांत व्यक्त होते. एका दृष्टीने बघता ते दोघेही एकच असतात, ह्याउलट कधीकधी ते एकास अनेक असे नाते वाटते.'' ह्या नात्याचे माणसाने कशाही प्रकारे विश्लेषण केले तरी ते फोलच होय. कारण मुळातच ते तर्कसंगतीच्या नियमात न बसणारे नाते आहे. ईश्वराचे अस्तित्व व त्याची एकात्मिकता ह्या दोन्ही श्रद्धेच्या गोष्टी आहेत. जिथे श्रद्धेचा संबंध येतो तेथे तर्कबुद्धीला थारा नसतो. ईश्वराने स्वत:च निर्मिती केली असल्यामुळे त्याच्या निर्मिती करण्याच्या कृतीचा खरा अर्थ तर्काने समजणार नाही. त्याच्या एकात्मिकतेचेही केवळ वैचारिक पद्धतीने पूर्ण आकलन होणार नाही.

ॲरिस्टॉटलचे काही सिद्धान्त इब्न सीनाने थोडे फेरफार करून लोकांसमोर मांडले होते. उदा. ईश्वर सर्वज्ञ आहे हे ॲरिस्टॉटलचे मत त्याला मान्य असले, तरी प्रत्येक प्रकारचे ज्ञान हा ईश्वराचा गुण समजणे त्याला मान्य नव्हते. ग़ज़ालीने मात्र सीनाची गृहीतके अमान्य केली. त्याचे असे मत होते की ईश्वराचे अनादिअनंतत्त्व आणि अद्वैत हे दोन्ही माणसाच्या तात्पुरत्या अनुभवांशी किंवा ईश्वराच्या बहुविध आविष्कारांशी एकरूप करता येत नाही. कितीही तर्कसंगत विचार केला तरी कारणापासून परिणामाकडे जाता येत नाही असे त्याने खात्रीपूर्वक सांगितले. फार तर निरीक्षण व अनुभवांच्या आधारे त्याविषयी थोडाफार अंदाज करता येईल. शिवाय तर्कवाद ईश्वराच्या सार्वभौमत्व व सर्वज्ञता ह्या दोन गुणविशेषांची पण दखल घेत नाही.

तार्किकदृष्ट्या जे जे शक्य आहे ते सर्व ईश्वरी शक्तीच्या आवाक्यात येते हे जरी खरे असले, तरी ती शक्ती मानवी संकल्पनांच्या आधारे विशद करता येत नाही. निसर्ग काही विशिष्ट कार्यकारण शक्तीनुसार कार्यरत असतो असे वरकरणी वाटू शकते. परंतु हेसुद्धा असे असते कारण निसर्गचक्रात अडथळा आणण्याची ईश्वराला इच्छा नसते म्हणून. परंतु त्याला तशी इच्छा झाली तेव्हा तेव्हा त्याने निसर्गचक्रात अडथळा आणलाच. असे का? याचे उत्तर मानवी बुद्धीच्या पलीकडचे आहे. ग़ज़ालीच्या मते बुद्धिप्रामाण्यवादाला स्वत:च्या मर्यादा आहेत. म्हणूनच त्यास गूढवादाचे परिमाण देण्याकडे त्याला कल होता. हे त्याने इतक्या चतुरपणाने केले की त्याच्या शिकवणीने केवळ मुस्लिमांच्या विचारपद्धतीत फरक पडला असे नाही, तर तो प्रा. फिलिप हिट्टी यांच्या मते ''पूर्व व पश्चिमेतील ख्रिश्चन आणि ज्यूंच्या विचारांवरही त्याचा प्रभाव पडला. पाश्चिमात्य देशांत तो अल्गाझेल या नावाने प्रसिद्ध झाला. त्याच्या मृत्यूनंतर चाळीस वर्षांच्या आतच त्याच्या काही निवडक साहित्याचा लॅटिनमध्ये अनुवाद झाला. डांटे, थॉमस ॲक्विनास यांसारख्यांनी त्याच्या साहित्यातील संदर्भ उद्धृत केलेले आहेत. मध्य युगातील सुप्रसिद्ध ज्यू विचारवंत इब्न मायमून (मायमोनिडेस) ह्यानेही त्याचे संदर्भ दिले आहेत.''

अर्थातच ग़ज़ालीने केलेल्या तडजोडीबद्दल त्याच्यावर टीका झालीच. त्याने तर्कवाद गूढ केला व गूढवाद तर्कनिष्ठ केला आणि तत्त्वज्ञानाच्या आधारे दोघांची सांगड घातली असा त्याच्यावर आरोप झाला. पुराणमतवाद्यांचा प्रमुख प्रवक्ता इब्न तायमिय्या ह्याने आरोप केला की, ग़ज़ालीने तत्त्वज्ञानासाठी धर्माचा उपयोग केला. ह्याउलट तात्त्विक चर्चांची पुरेशी जाण असणारे काही समकालीन बुद्धिवादी आरोप करू लागले की ग़ज़ाली दुतोंडी आणि अप्रामाणिक आहे. ज्या तत्त्ववेत्त्यांनी पुरातन धर्मवेत्त्यांशी समन्वय साधण्याचा प्रयत्न केला त्याच्या मतप्रणालीलासुद्धा ग़ज़ालीने धक्का दिला आहे. मात्र अशाप्रकारची विरोधी मते असूनसुद्धा

ग़ज़ालीच्या शिकवणीने इस्लामी जनतेवर खोल प्रभाव पडला. म्हणूनच तो 'हुज्जत अल् इस्लाम' (इस्लामचा पुरावा) ह्या नावाने ओळखला जातो.

प्रा. डंकन मॅकडोनल्ड म्हणतात, ''ख्रिश्चनांना जसा सेंट ऑगस्टीन नीटसा कळलेला नाही, तसाच इस्लामला ग़ज़ालीची विचारसरणी पुरेशी कळलेली नाही. पूर्णपणे अपरिचित अशी कुठलीही वाट त्याने चोखाळली नाही. आधीच्याच एकेश्वरी संकल्पनेस त्याने गूढवादाची डूब देऊन अधिकाधिक लोकांना रुचेल अशाप्रकारे तो सर्वसमावेशक केला. जीवनप्रवासाला निघालेल्या प्रत्येकाला मुक्तपणे उपयोगात आणता येईल असा श्रद्धेचा नवा महामार्ग त्याने निर्माण केला.''

**२) स्पेनमधील तत्त्वज्ञान (अंदलुसी तत्त्वज्ञ)**

इस्लामी तत्त्वज्ञानाच्या सिंहावलोकनामध्ये आता आपण पूर्वेकडून पश्चिमेकडे वळले पाहिजे. कॉर्डोव्हा, टॉलेडो व सेव्हिली या स्पॅनिश शहरांमध्ये ज्ञानाचा प्रकाश पसरवण्यास मुसलमान उद्युक्त झाले होते. स्पेनचे मुस्लिम राज्यकर्ते कला व संस्कृती यांचे मोठे पुरस्कर्ते होते. त्यांच्या कृपाछत्राखाली ख्रिस्ती व यहुदी तत्त्वचिंतक उदयास आले आणि त्यांनी अंदलुसी (स्पॅनिश) संस्कृतीच्या विकासाला हातभार लावला.

**१) इब्न हुज्मी :** सर्वात प्राचीन स्पॅनिश इस्लामी तत्त्ववेत्त्यांमध्ये इब्न हुज्मी (मृ. ९९४ इ.स.) याचा उल्लेख करता येईल. धर्मांचे व्यापक भूमिकेवरून तुलनात्मक अध्ययन करणारा तो पहिला महत्त्वाचा लेखक होय. 'कबुतरांचा कंठा' (रिंग ऑफ दि डव्ह) या आपल्या ग्रंथात त्याने प्लेटॉनिक – शुद्ध आध्यात्मिक प्रेमाचे वर्णन केले आहे. अल मुहाइद राजघराण्यातील इब्न तुमूरत याच्या सुधारणांचा मार्ग सुलभ करण्याच्या कामी इब्न हुज्मी याच्या प्रभावाचा चांगला उपयोग झाला. इस्लाममधीलच नव्हे, तर साऱ्या जगातील श्रेष्ठ विचारकांमध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान भूषवणाऱ्या इब्न अरबी या तत्त्वचिंतकावरही इब्न हुज्मीचा प्रभाव पडला होता.

**२) इब्न बज्जा (अबू बकर मुहम्मद इब्न याहिया) :** इब्न हुज्मी याच्यामागून आलेला अबू बकर मुहम्मद इब्न याहिया याचा जन्म सरगोसा येथे अकराव्या शतकाच्या अखेरीस झाला. तो इब्न बज्जा या नावाने पौर्वात्य देशात प्रसिद्ध असून पाश्चात्त्य देशांत ॲव्हेंपेस या नावाने प्रसिद्ध आहे. निसर्गाचे तत्त्वज्ञान आणि सत्ताशास्त्र यात तो तरबेज होता. त्याने आपला अधिकांश वेळ गणित, ज्योतिष, वैद्यक, तर्कशास्त्र व संगीत या विषयांच्या अध्ययनात घालवला. इब्न बज्जा याच्या लिखाणवरून असे दिसून येते की, तो जीवनाला विटलेला होता आणि मृत्यूच्या कुशीत कायमची विश्रांती घेण्याची त्याला सदैव तळमळ लागून राहिलेली असे. त्याच्या स्वतःच्या देशबांधवांनी त्याला नास्तिक व दुराचारी ठरवून त्याचा भयंकर छळ केला. ज्या वेळी स्पॅनिश साम्राज्य विस्कळीत होऊन त्याची लहान लहान राज्ये बनली होती व उत्तरेकडील ख्रिस्ती सरदारांकडून त्याला धोका निर्माण झाला होता, अशा काळात इब्न बज्जा उदयास आला होता. स्पेन राज्यकर्त्यांच्या विलासीपणामुळे त्या साम्राज्याला उतरती कळा लागलेली होती, परंतु अलमोराविद (बर्बर राजघराणे) त्याच्या मदतीला धावून आले. त्यांनी स्वतंत्र विचारकांना व तत्त्वज्ञान्यांना निर्दयपणे चिरडून टाकले. इब्न बज्जा याचे फार थोडे ग्रंथ सध्या उपलब्ध आहेत, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. सत्ताशास्त्रविषयक शिकवणुकीच्या बाबतीत तो

ग्रीक-विचारकांच्या अत्यंत जवळ जाऊन पोचलेला होता. त्याच्या विरोधकांनी त्याला जे नास्तिक ठरवले त्याचे हेही कारण असू शकेल. तर्कशास्त्राच्या बाबतीत इब्न बज्जा हा अल फ़राबीपासून फारसा दूर गेलेला नाही. फेज या ठिकाणी इ. स. ११३८ साली तो मरण पावला.

मूरांच्या स्पेनमध्ये इब्न बज्जाची कारकीर्द गेली. तो फार विद्वान होता. तो ज्या अधिकारवाणीने धार्मिक बाबींवर बोलू शके, तेवढ्याच अधिकाराने वैज्ञानिक प्रश्नांवरही चर्चा करीत असे. देवाच्या एकात्मतेबद्दल त्याच्या विचारांचा कल परंपरावाद्यांच्या भूमिकेकडे झुकत होता. परंतु त्याचा युक्तिवाद अधिक प्रवाही होता. ईश्वराच्या अस्तित्वाविषयी त्याला कसलाही संदेह नव्हता. ईश्वराचे कुणी दुसरे साथीदार असतील हे त्याला मान्य नव्हते. ईश्वराव्यतिरिक्त जे जे अस्तित्वात होते ते ते सर्व ईश्वराच्या परिपूर्ण मूलतत्त्वापासून निर्माण झालेले असून ते प्रसंगोपात होते अशी त्याची भूमिका होती. ''ईश्वर त्याच्या निर्मितीमधून आपले ज्ञान व कृतीचा आविष्कार दाखवतो. हे ज्ञान प्रत्येक अस्तित्वाला त्याच्या परिपूर्णतेनुसार मिळते. बुद्धिवाद्यांना त्यांच्या अधिकारानुसार 'त्याच्या'कडून ज्ञान मिळते. खगोलांना हेच सर्व 'त्याच्या'कडून त्यांच्या क्रमानुसार व दर्जानुसार आकड्याच्या व बाह्यरूपाच्या स्वरूपात मिळते.'' मात्र इब्न बज्जाने एकेश्वरवाद सर्वार्थाने स्वीकारला होता.

**३) इब्न तुफ़ल (मृ. ११८५ इ.स.) :** याचा जन्म ग्रॅनॅडा प्रांतात इसवीसनाच्या बाराव्या शतकाच्या प्रारंभी झाला होता. याची कीर्ती मुख्यत: 'हयी इब्न यकजा' (जागृतीचा क्रियावान पुत्र) या विचारप्रवर्तक तत्त्वज्ञानात्मक ग्रंथामुळे झालेली आहे. दुसरा अल् मुवहिद राजा अबू याकूब यूसुफ़ याचा तो वजीर व वैद्य होता. 'हयी इब्न यकजा' हा ग्रंथ कादंबरीच्या स्वरूपात लिहिलेला असून ती एका एकांतवासी संन्याशाची – यतीची कथा आहे. हा यति आपला वेळ चिंतनात घालवतो आणि आपल्या प्रज्ञेची उंची इतकी वाढवतो की, अंतिम एकमेव क्रियाशील प्रज्ञेशी त्याचे संपूर्ण मिलन होते. एका बेटावर तो एकटाच राहतो. दुसऱ्या बेटावरील रहिवासी साधेसुधे असून जीवनातील दैनंदिन गोष्टीतच मशगूल आहेत, असे जेव्हा त्याला कळते तेव्हा त्याला त्यांची कीव येते. त्यांचे कल्याण व्हावे या प्रामाणिक इच्छेने तो तेथे जातो आणि स्वत:ला सापडलेले सत्य त्यांना सांगतो, परंतु त्यांना चिंतनयुक्त जीवनाची गोडी लावण्यात तो यशस्वी होत नाही. अखेर शेवटी हयीची अशी खात्री होते की, जनसमुदायाच्या पारंपरिक धर्मात ढवळाढवळ करणे चूक आहे, आणि तो आपल्या बेटावर परत येतो. 'हयी इब्न यकजा' हा ग्रंथ सखोल आध्यात्मिक अंतर्वेधी दृष्टीने लिहिण्यात आलेला आहे. अलीकडील काही संशोधनावरून रॉबिनसन क्रूसोची कथा 'हयी इब्न यकजा' वरून घेण्यात आली असावी, असे आढळून येते.

इब्न तुफल हा मध्य युरोपमध्ये अबू बकर ह्या नावाने प्रसिद्ध होता. मुवहिद राजवटीत तो स्पेनमधील नामांकित कवी, गणिती व हकीम होता. खगोलशास्त्रावरील त्याचे काही मूलभूत विचार प्रसिद्ध होते. कार्यकारणाचे बंध हे एकीकरणाच्या क्रियेतून होतात व ते ईश्वराचेच काम आहे असा त्याचा विश्वास होता. ह्या बाबतीत तो बेकन (इ.स. १२१४-९२), ह्यूम (इ.स. १७११-७६), कांट (इ.स. १७२४-१८०४) ह्या पाश्चिमात्य विचारवंतांचा पूर्वसूरी होता. भविष्यातील अनुमान पद्धतीचा त्याला अंदाज आला होता. तर्कनिष्ठ विवेकविचाराने या विश्वाचे अनादीअनंतत्त्व विशद करता येत नाही; तसेच कार्यकारण व त्याचा परिणाम ह्यांतील संबंध बुद्धीने स्पष्ट करता येत नाही, हेही त्याने सिद्ध केले. त्याच्या मते, आत्मा हाच सर्व ज्ञानाचा श्रेष्ठतम स्रोत

आहे. आत्म्याच्या मार्फतच आपण अंतिम सत्याला गवसणी घालू शकतो. परंतु त्यासाठी अनुमान पद्धत उपयोगाची नाही तर अंत:प्रेरणेचा वापर करायला हवा. ईश्वर हेच सत्य, बाकी सर्व अंदाजच.

**४) इब्न रुश्द (इ. स. ११२६–११९८) :** इब्न रुश्द हा मध्यकालखंडातील मुस्लिम तत्त्वज्ञानाचा पाश्चात्त्यांमधील प्रमुख प्रतीनिधी आहे. स्पेनमधील कॉरडोव्हा येथे त्याचा जन्म झाला. ईश्वरशास्त्र, कायदाशास्त्र, वैद्यकशास्त्र, गणितशास्त्र व तत्त्वज्ञान याचा त्याने अभ्यास केला. तो न्यायाधीश होता आणि मरेपर्यंत राजपुत्राची त्याच्यावर मर्जी होती. ॲरिस्टॉटलच्या परंपरेत त्याचे शिक्षण झाले व तो स्वत: ॲरिस्टॉटलच्या विचाराचा एक अग्रगण्य समर्थक व भाष्यकार होता.

स्पेनमधील मुस्लिम विचारवंतांमध्ये इब्न रुश्द उपाख्य ॲव्हेरूसला अनेकजण सर्वश्रेष्ठ विचारवंत मानतात. तो डॉक्टर आणि तत्त्वज्ञ होता. कुणाही माणसाला देवी (Smallpox) दोनदा होत नाहीत हे महत्त्वाचे (कारण त्यातच लस टोचण्याचे तत्त्व अध्याहृत आहे) निरीक्षण प्रथम त्याने केले. त्याचप्रमाणे दृष्टीपटलाचे कार्यही त्याने स्पष्ट केले. त्याचे तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील कार्य अधिक संस्मरणीय आहे. त्या कार्याचे तीन भाग पडतात. एक : ग्रीक तत्त्वज्ञान आणि कुराण यांचा मिलाफ घडवून आणण्याचा प्रयत्न; दोन : विवेकनिष्ठा आणि साक्षात्कार (Reason and Revelation) यांचा समन्वय करण्याचा प्रयत्न, आणि तीन : सर्वसामान्यांपर्यंत हे विचार पोहोचवण्याचा प्रयत्न. या तीन प्रयत्नांत त्याचे तत्त्वज्ञान समाविष्ट आहे. त्याचे कुराणावरील भाष्य निश्चित धाडसी आहे. त्याच्या मते कुराणातील प्रत्येक शब्द अक्षरश: खरा घेण्याचे कारण नाही. ज्या वेळी तार्किक सत्य आणि कुराणातील शब्दांचा अर्थ यांत विरोध असेल त्या वेळी कुराणातील शब्द लाक्षणिक अर्थानेच घ्यावे, असे मत मांडून त्याने तर्कनिष्ठ सत्याला अग्रेसरत्व दिले. इब्न रुश्दची स्वतंत्र विचारवृत्ती, तर्कनिष्ठतेचे प्रभुत्व आणि बौद्धिक बंडखोरी धर्मनिष्ठ इस्लामच्या चौकटीत बसण्यासारखी नव्हती.

'तहाफ़त अल–तहाफ़त' (नाशाचा नाश) ह्या ग्रंथात ॲरिस्टॉटलचे समर्थन केले आहे. अल–ग़ज़ालीने लिहिलेल्या 'तहाफ़त अल–फ़लसूफ' (तत्त्वज्ञांचा नाश) ह्याला दिलेला तो प्रतिटोला आहे. अल–ग़ज़ाली आपल्या लिखाणात असे दाखवतो की, अल–फ़राबी व इब्न सीना ह्या ॲरिस्टॉटलच्या अनुयायांनी असंबद्ध प्रतिपादन करून, जगाच्या संततीबद्दल अनुकूल, तर विशेष ईश्वरी साहाय्य व मरणोत्तर सदेह पुनरूत्थान याबद्दल प्रतिकूल मतप्रणाली मांडली आहे. अल–ग़ज़ालीला आपल्या ग्रंथात बहुतांशी सुसंबद्ध युक्तिवाद करता आलेला नाही आणि प्रमाण व सत्य यांचा शोध लागलेला नाही, असे दाखवण्याचा इब्न रुश्द प्रयत्न करतो.

**धर्म व तत्त्वज्ञान यांचा समन्वय :** धर्म व तत्त्वज्ञान यांच्या समन्वयाचा एक विधायक मार्ग 'फ़स्ल–अल–मगल' (दि डिसायसिव्ह ट्रीटिझ) यांत इब्न रुश्दने विशद केला आहे. शास्त्र व परंपरा यात प्रतिपादिलेल्या इस्लाम धर्मानुसार तत्त्वज्ञानाचे अध्ययन करणे कसे योग्य आहे याविषयी तो परीक्षण करतो. त्याचे उत्तर असे की, तत्त्वज्ञानाचे अध्ययन हे धर्मानुसार बंधनकारक आहे. तसेच तत्त्वज्ञानात इस्लामला विरोधी असे काही नाही. धर्मशास्त्र व तत्त्वज्ञान यात काही विरोधी असे काही नाही. धर्मशास्त्र व तत्त्वज्ञान यात काही विरोध दिसत असेल तर तत्त्वज्ञान एवढेच दाखवेल की धर्मशास्त्राचे रूपकात्मक रीतीने विवरण केले पाहिजे, कारण तत्त्वज्ञान्यांना निसर्गाविषयी निदर्शनात्मक ज्ञान असते.

इब्न रुश्दचा सर्वात प्रभावी ग्रंथ म्हणजे त्याची ॲरिस्टॉटलवरील भाष्ये होत. इब्न सीनाचा उद्‌भव सिद्धान्त इब्न रुश्द फेटाळतो. ईश्वर अनेक बुद्धितत्त्वे निर्माण करतो. ज्या अर्थी मूल जडद्रव्य हा उत्पत्तिक्रियेचा विषय नाही, त्या अर्थी ते नित्य आहे. ते घेऊन ईश्वर त्यातील अव्यक्ततेला जड वस्तूंची रूपे देतो. मनुष्याच्या आत्म्याचे वैयक्तिक अमरत्व इब्न सीनाने मान्य केले होते, तर इब्न रुश्दच्या मते मृत्यूनंतर आपली बुद्धी उरत असली तरी ती मनुष्यजातीच्या विश्वव्यापी व समान बुद्धीमध्ये विलीन होऊन जाते.

अरबीमधून हिब्रू व लॅटिन भाषांत इब्न रुश्दच्या ग्रंथांची भाषांतरे झाली व त्यांचा पाश्चात्त्य विचारांवर मोठा प्रभाव पडला. पुढील शतकांत उदयास आलेला टॉमस ॲक्वायनस इब्न रुश्दचे भाष्यग्रंथ वापरू शकला. हा महान 'भाष्यकारा'च्या दृष्टिकोनाशी जुळत असल्यास, आपल्या मताला पुष्टी देण्यासाठी व जुळत नसल्यास, आपले भिन्न मत व्यक्त करण्यासाठी टॉमस ॲक्वायनसने ह्या भाष्य ग्रंथांचा उपयोग करून घेतला.

कुराणाची शिकवण आणि बौद्धिक चिकित्सात्मक दृष्टी यांची सांगड घालण्याचा प्रयत्न इब्न रुश्दने फार मोठ्या प्रमाणावर केला आहे. त्याच्या मते धार्मिक सत्य आणि तत्त्वज्ञानातील सत्य ही एकमेकांपासून वेगळी ठेवली पाहिजेत. तसेच तत्त्वज्ञानांतील सत्याचे नियम हे ते सत्य जाणण्याची पात्रता असलेल्यांसाठी राखून ठेवण्यात आले पाहिजेत. अशाप्रकारे दुहेरी सत्याचा हा सिद्धान्त शास्त्रीय संशोधनाची द्वारे उघडी करतो. त्याच्या काही कल्पनांमुळे उदा. वैयक्तिक आत्म्याची अमरता त्याने नाकारल्यामुळे सनातनी मुसलमान आणि ख्रिस्ती धर्मोपदेशक त्याच्याकडे संशयाने पाहू लागले व त्याच्यावर पाखंडीपणाचा आरोप करण्यात आला. त्याच्या मते विश्वातील प्रत्येक गोष्ट तार्किकदृष्ट्या एकमेकांशी सबद्ध असल्यामुळे चमत्काराला काही स्थान उरत नाही. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की, इस्लामी व ख्रिस्ती या दोन्ही धर्मांमध्ये दैवी चमत्काराला मध्यवर्ती स्थान आहे. त्यामुळे त्याचे अस्तित्व नाकारणे म्हणजे तो पाखंडीपणा किंवा नास्तिकता ठरणे क्रमप्राप्त होते.

इब्न रुश्द ह्याची दुहेरी सत्याविषयीची भूमिका समन्वयाची होती. ती 'तावील'वर म्हणजेच स्पष्टीकरण कथनावर आधारलेली होती, ज्यानुसार सत्याची दोन परस्परविरुद्ध स्पष्टीकरणे न देता एकच अंतिम सत्य दोन भिन्न आविष्करण शैलीत मांडले जाते. त्याची अशी श्रद्धा होती की प्रत्येक घटिताच्या मागे कार्यकारण असते. केवळ विज्ञानच विवेकशक्ती आणि श्रद्धा यांचा समन्वय साधू शकते असा त्याचा विश्वास होता.

**५) इब्न खल्दून (इ.स. १३३२–१४०६) :** हा इतिहासाचे तत्त्वज्ञान जाणणारा सर्वश्रेष्ठ मुस्लिम तत्त्वज्ञ होता. इतकेच नव्हे तर जगातील सर्वश्रेष्ठ इतिहासवेत्त्यांमध्ये याची गणना करता येईल. (प्रा. फिलिप हित्ती, अरबांचा इतिहास, पृ. ५६८) त्याचे शिक्षण ट्यूनिस येते झाले आणि अगदी लहान वयातच तो तत्त्वज्ञानाच्या शाखांत प्रवीण झाला. ज्ञानाची कोणतीही विद्यमान शाखा त्याच्या तीक्ष्ण नजरेतून सुटली नव्हती, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

पांडित्यपूर्ण किंवा पुस्तकी तत्त्वज्ञानाने इब्न खल्दूनचे समाधान होत नव्हते. केवळ तत्त्वज्ञानाचे सिद्धान्तीकरण केल्याने जगाचे प्रश्न सुटणार नाहीत, असे त्याला वाटत होते. माणसाच्या आकलनशक्तीच्या पलीकडे जगात कितीतरी अगणित प्राणी व वस्तू आहेत. म्हणून ज्यांच्याविषयी तुम्हाला मुळीच माहिती नाही अशा गोष्टी ईश्वर निर्माण करतो, या कुराणातील दृष्टिकोनाचा तो पाठपुरावा करतो. केवळ तर्कशास्त्राचे नियम लावून कोणालाही सत्यापर्यंच पोहोचता येणार नाही. शास्त्रीय दृष्टिकोनाच्या माणसाने आपल्या स्वानुभवांवर

विसंबून राहिले पाहिजे असे तो सांगतो, परंतु त्याच वेळेस माणसाने, परंपरेने चालत आलेल्या मानवजातीच्या सामुदायिक अनुभवाचाही चिकित्सक आढावा घेतला पाहिजे, असे त्याला वाटते.

इब्न खल्दूनच्या मते आत्मा हा स्वभावत: ज्ञानरहित असतो, परंतु अनुभवासंबंधी मनन करण्याची शक्ती त्याच्यामध्ये असते. केवळ अंत:स्फूर्तीच्या द्वारेच माणसाला ज्ञानाचे अंतर्दर्शन होऊ शकते. या ज्ञानाची मांडणी व स्पष्टीकरण आकारिक तर्कशास्त्राच्या नियमांनुसार करता येते. तर्कशास्त्राचे कार्य आपल्याला चुकीपासून वाचवणे हे होय. ते बुद्धीला तीक्ष्ण बनवते आणि माणसाला अचूक चिंतनाच्या ध्येयाप्रत घेऊन जाते. या शास्त्रीय दृष्टिकोनामुळे इब्न खल्दून याने फलज्योतिष व रसायन यांसारख्या आपल्या पूर्वसूरींच्या दृष्टीने महत्त्वाच्या शास्त्रांचा इन्कार केला. तत्त्वज्ञांच्या गूढवादी बुद्धिवादालाही त्याने कडाडून विरोध केला. त्याच्या शास्त्रीय मनावर धार्मिक बाबींचा प्रभाव फार थोडा पडलेला आहे, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे.

ऐतिहासिक घटना या विशिष्ट नियमांनी बांधलेल्या असतात आणि त्यांची कारणे शोधून काढणे शक्य असते. याच अर्थाने इब्न खल्दून इतिहासाला 'शास्त्र' असे म्हणतो आणि ते तत्त्वज्ञानाचा एक भाग आहे, असे मान्य करतो. आता असा प्रश्न उपस्थित होतो की, इतिहास हा विषय तत्त्वज्ञानाची शाखा कशी होऊ शकतो? इब्न खल्दूनच्या मते इतिहास म्हणजे खुद्द समाजजीवन – समाजाची सामुदायिक, भौतिक व बौद्धिक संस्कृती होय. संस्कृतीची प्रक्रिया विशद करताना तिला कायद्याचा आधार असला पाहिजे, ह्या गोष्टीवर इब्न खल्दूनचा कटाक्ष आहे. तो सर्वत्र नैसर्गिक कारणे शोधतो. परंतु त्याच वेळी कारणे व परिणाम यांची साखळी शेवटी अंतिम कारणामध्ये म्हणजे परमेश्वरामध्ये विलीन होते, ही आपली श्रद्धापण तो जोरदारपणे व्यक्त करतो. त्याच्या मते शृंखला किंवा क्रम यांना अंत हा असलाच पाहिजे. प्रत्येक गोष्ट माणसाला कळणे शक्य नाही, असे इब्न खल्दून मानतो. अज्ञानाची जाणीव असणे हाही ज्ञानाचा एक प्रकारच होय. तरीपण माणसाने शक्य त्या मर्यादेपर्यंत ज्ञान हे मिळवलेच पाहिजे.

### ३) गूढवादी तत्त्वज्ञ कवी[७]

इंद्रिये आणि बुद्धी यांच्या द्वारा मिळणाऱ्या ज्ञानाचे जे सर्वसाधारण प्रकार आहेत त्यांच्यापलीकडील एकरूपतेच्या प्रत्यक्ष व प्रभावी अनुभूतीने सत्तेचा अंतिम गाभा माणसाला काही वेळा प्राप्त होऊ शकतो आणि तसा होतो, असा जो विश्वास त्याला 'गूढवाद' असे म्हणतात. बहुतेक धर्मांमध्ये त्याचा उदय झाला. समाधीची, आनुभविक सत्यता मान्य करणे, हे गूढवादाचे प्रमुख लक्षण आहे.

अल्लाह हा अनन्य ईश्वर आहे, अशा अनुभूतीच्या साह्याने सूफी अस्तित्वाचा गाभा अनुभवतात. गूढवादाचा यतित्ववाद आणि वैराग्य यांच्याशी संबंध आहे. मनाची एकाग्रता आणि चिंतनांतून उद्‌भवणारी समाधी हेच गूढवादाचे खरे सार आहे. समाधी म्हणजे व्यावहारिक अभावात्मकता आणि पारमार्थिक भावात्मकता यांचा संयोग.

अनेक महान तत्त्वज्ञांच्या विचारसरणीवर गूढवादाचा सखोल ठसा उमटला आहे आणि त्या तत्त्वज्ञांच्या अभावात्मक ईश्वरवादाला त्याने अनेक वेळा प्रेरणा दिली आहे. गूढवादापासून तत्त्वज्ञानाची फारकत झाल्यास ते निष्प्रभ, प्रेरणाशून्य आणि दुर्बल होईल. उलट त्यांत गूढवादाचा अंतर्भाव झाल्यास त्याची विलक्षण व भरीव

प्रगती होऊन तो एक हितकर उपक्रम ठरेल. यास्तव गूढवादास तत्त्वज्ञानाचे एक अभिन्न अंग समजण्यास काहीच हरकत नसावी.

इब्न तायमिय्याने हंबलींच्या शिकवणीस बरेच उचलून धरले. तरीसुद्धा मुस्लिम धर्मीयांवरील गूढवादींचा पगडा पूर्णपणे पुसला गेला नाही. उलट काळ जाईल तसे अधिकाधिक लोक त्याकडे आकर्षित होऊ लागले. प्रत्येक गूढवादीने आपापली वेगळी व्यवस्था स्थापन केली. सर्वांना ह्या गूढवादी पंथीय व्यवस्थेची दारे खुली होती. त्यासाठी धार्मिक सदस्यत्वाचे बंधन नव्हते. इस्लाममधील विविध विचारप्रवाहांमधील तीव्र फरक त्यांनी मोठ्या प्रमाणावर बोथट केले. एवढेच नव्हे तर मुस्लिम व मुस्लिमेतर ह्यांच्यातील दरीही कमी करण्यास त्यांची मदत झाली. ईश्वराशी मध्यस्थाचे नाते सांगून त्यांनी सर्वसामान्यांना ईश्वराच्या समीप नेले. त्यांतील मौलाना जलालुद्दीं रूमी हा कवी फार प्रभावी ठरला.

**१) मौलाना जलालुद्दीन रूमी (इ.स. १२०७–७३) :** ईश्वराच्या एकात्मिकते–विषयी उदार दृष्टिकोनातून विवेचन करून त्याने माणसामाणसांतील एकोप्याचे महत्त्व विशद केले. उदा. ईश्वर प्रेषित मूसाला जो आदेश देतो तो रूमीने त्याच्या एका काव्यात अधोरेखित केला –

*ईश्वराने तुला पाठवले आहे, हे मूसा.*
*फूट पाडण्यासाठी नाही*
*तर त्याच्या प्राणिमात्रांना एकसंध करण्यासाठी.*

रूमीने लिहिलेल्या ४०,००० चरणांचा मस्नवी (कथा–काव्य) हा संग्रह जगभरच्या मुस्लिमधर्मीयांत इतका लोकप्रिय झाला की त्यास 'फ़ारसी (भाषेमधील) कुराण' असेच नाव पडले. रूमीची अगदी खात्री होती की तर्काच्या कुबड्या घेऊन ईश्वरापर्यंत पोहोचणे शक्य नाही. वादविवाद आणि चर्चा करूनही ते साधणार नाही. अन्यथा रूमीलाच ते जमले असते. परंतु वादविवाद करणाऱ्यांचे पाय मातीचे असतात हे त्याच्या ध्यानात आले होते. थोड्याशासुद्धा धक्क्याने असे लोक कोसळतात. म्हणूनच त्याच्या विचारप्रणालीत विवेकवादास स्थान नव्हते. आपल्या 'मसनवी' ह्या काव्यसंग्रहात तो म्हणतो –

*विचारशक्ती म्हणजे केवळ राजाचा अधिकारी.*
*राजाच्या आगमनाबरोबर अधिकाऱ्याची सत्ता संपते*
*व तो मागे सरकतो.*
*विवेकशक्ती ही ईश्वराची छाया, तर*
*ईश्वर म्हणजे सविता.*
*छाया सूर्यावर हुकूमत कशी गाजवणार?*

मात्र ईश्वराशी एकरूप व्हायचे असल्यास मनाची उत्तम मशागत करावी लागते. ती कुठल्याही ऐहिक प्रक्रियेने, यांत्रिकपणे वा तर्कबुद्धीने करता येत नाही. रूमी आपल्या एका कवितेत म्हणतो –

*'मीच सत्य होय' हे शब्द मन्सूरच्या मुखात निरर्थक वाटतात.*
*'मीच सर्वश्रेष्ठ जगन्नियंता' हे शब्द फिरऔनच्या तोंडात ईश्वरनिंदा ठरतात.*
*मूसाच्या हातातील काठी ही सर्वसाक्षी होती*

*तर जादूगाराच्या हातातील काठी एक नगण्य चीज.*
*म्हणूनच ईसाने शब्दाची शक्ती कुठल्याही सोम्यागोम्याला दिली नाही.*
*मृताला जिवंत करण्याची शक्ती कुठल्याही व्यक्तीस दिली नाही.*
*कारण अज्ञ त्या शक्तीचा दुरूपयोग करू शकेल.*
*गारगोटी चिखलावर घासली तर अग्नी निर्माण होऊ शकत नाही.*
*हात व साधन हे गारगोटी व पोलादाप्रमाणे होत.*
*तुमच्याजवळ दोन्ही गोष्टी असायला पाहिजेत.*
*दोनातूनच निर्मिती होऊ शकते.*
*पण ईश्वराला साथीदार नाही.*
*'तो' एकटाच आहे.*

ईश्वराला कुणी साथीदार आहे असे मानणे म्हणजे त्याच्या अस्तित्वाच्या सत्याला बाधा आणणे होय. त्याला कोणी साथीदार किंवा सदस्य नाही. तो एकच आहे. एक विषम अंक, 'एक'च, कोणत्याही मतभेदाशिवाय! जे कोणी एक, दोन म्हणतात व पुढे मोजत राहतात ते अशाप्रकारे एकाचेच अस्तित्व मान्य करतात.

*जेव्हा द्वैत पाहण्याचा भास दूर जातो*
*तेव्हा 'एक' आणि 'दोन' म्हणणारे*
*'एक'च म्हणणाऱ्यांच्या बरोबर येतात.*

रूमीने कुठलाही पंथ स्थापन केला नाही. परंतु तरीही त्याचे अनुयायी ईश्वरचिंतन करताना नाचगाण्यात तल्लीन होऊन जात. रूमीच्या समविचाराने एकत्र आलेल्यांना कालांतराने 'मौलवी' किंवा 'घुमणारे दरवेशी' असे नाव पडले. कुराणात असे सांगितले आहे की मानव मातीपासूनच बनला आहे. ईश्वराने त्यात स्वत:च्या चैतन्याची फुंकर घातल्यावर तो सचेतन झाला. प्रेषित मुहम्मदांच्या मतानुसार मानवाला सचेतन करण्याची प्रक्रिया चाळीस (४०) दिवस सुरू होती. मात्र रूमीचे म्हणणे असे होते की तो प्रत्येक दिवस एक लाख वर्षांचा होता. मानवाची निर्मिती ही दीर्घकाळ चालू असलेली प्रक्रिया होती. मानवाला योग्य ते रूप देऊन त्यात नित्य नव्या सुधारणा करण्याचे काम लाखो वर्षे चालू होते. त्यासाठी ईश्वराने चैतन्याचा अंश टाकला व मानवामध्ये ईश्वरी मूलतत्त्व जागृत केले. एका अर्थाने हा प्राथमिक स्वरूपातील डार्विनचा उत्क्रांतीवादच म्हटला पाहिजे.

माणसाला आपल्या अहंकाराची जाणीव झाल्यावर आपल्या निर्मात्याच्या शोधात तो एकापाठोपाठ एक विचारसरणी आणि पंथ कसा बदलत राहिला ह्याचे वर्णन रूमी आपल्या काव्यात करतो. ईश्वराशी तादात्म्य पावण्याचे तंत्र साध्य होईपर्यंत त्याने आपला शोध चालू ठेवला. रूमीचे विचार म्हणजे एकेश्वरवादास व्यापक मानवतावादी रूप देण्याचा प्रयत्न होता. त्याच्या विचारांत ईश्वर एकच आहे आणि संपूर्ण मानवजात एकच आहे ह्या दोन्ही संकल्पना अंतर्भूत होत्या.

*मी त्याला सर्वत्र शोधले*
*पण तो क्रुसावर नव्हता.*

*मग मी देवळात गेलो*
*पण मूर्तीत तो दिसला नाही.*
*पुरातन पॅगोडात जाऊन आलो*
*पण तेथे तो सापडला नाही.*
*त्याच्या शोधात काबापाशी जाऊन पोहोचलो*
*तर तेथेही त्याचा पत्ता नव्हता.*
*इब्न सीनाकडे मी चौकशी केली*
*पण त्यालाही त्याचा ठावठिकाण माहीत नव्हता.*
*अखेरीस मी स्वत:च्याच अंत:करणात डोकावलो*
*व काय आश्चर्य, तेथेच तर तो होता.*

रूमीच्या आधी कुणीही असे काही म्हणण्याचे धाडस केले नव्हते. पण रूमीची निष्ठा व लौकिक एवढा होता की, 'ईश्वर माझ्या हृदयात आहे' असे म्हणण्याचे धाडस दाखवूनही त्याच्यावर पाखंडीपणाचा आरोप झाला नाही व काफ़िर (अ-भक्त) म्हणून त्याची निर्भर्त्सनाही केली गेली नाही. अजूनही ईश्वरनिष्ठ मुस्लिमांना तो वंदनीयच वाटतो. इस्लामने प्रतिपादलेल्या एकात्मिक ईश्वराचा तो सच्चा उद्गाता आहे अशी अजूनही मुस्लिमांची श्रद्धा आहे. म्हणून तर कुठल्याही संस्थात्मक धर्माच्या कर्मकांडांपासून दूर राहूनही जनसामान्यांवर तो पिढ्यान् पिढ्या मोहिनी घालू शकला. त्याची ईश्वरावरची श्रद्धा व माणसाविषयीचे प्रेम इतके निखळ होते की त्या काळच्या धार्मिक मतभेदांतूनही कोणताही ठपका न येता तो यशस्वीपणे मार्ग काढू शकला. मानवाला प्रियतम अशा एकाच ईश्वराच्या शोधात त्याला आनंदाच्या शिखरावर नेणारे गूढवादाचे खरे स्वरूप त्याने जगाला उलगडून दाखवले. रूमीच्या आधी व नंतरही कोणाला हे साध्य झाले नाही. त्याचा गूढवाद एकेश्वरवादात रूपांतरित झाला आणि त्याने सर्वेश्वरवादाला आपल्यात समाविष्ट केले.

**२) अब्दुर्रहमान जामी (इ.स. १४१४–१४९२) :** जो एक आणि एकच होता, परिपूर्ण आणि सार्वभौम होता, खालच्या आणि वरच्या अस्तित्वाचे उगमस्थान होता अशा त्या ईश्वराकडे नेणाऱ्या गूढ अनुभूती आणि अंत:प्रेरणांचे गुणवर्णन आपल्या स्वत:च्या शैलीत गाणारा नामवंत इराणी कवी अब्दुर्रहमान जामी ह्याच्यामुळे श्रद्धावंत हे 'केवल अस्तित्वा'पर्यंत पोहोचू शकले. ईश्वर जरी विविध रूपात दिसला असला, तरी तो एकच आहे व त्यामुळे अनेकेश्वरी संकल्पनेस थारा देणे योग्य नव्हे असे त्याचे मत होते. सारे विश्व हे एकाच ईश्वराचे दृश्य असे निराळे रूप होय. जामीच्याच शब्दात सांगायचे तर 'ईश्वर हे अंतर्गत सत्य असून भौतिक विश्व हा त्याचा बाह्य आविष्कार आहे.' ईश्वराविषयीचे अंतिम सत्य मानवी ज्ञानाच्या कक्षांपलीकडचे आहे. निर्गुणता हाच ईश्वराचा सर्वांत मोठा गुण आहे आणि त्याच्याबद्दल काही ज्ञान नसणे हे मती गुंग करणारे आहे. म्हणूनच अनेक प्रकारे प्रकट होऊन आणि त्या एकाचे अनेकात विभाजन होऊनही त्यांची एकात्मता भंग पावत नाही. आपला हा विचार त्याने एका अत्यंत समर्पक उपमेतून व्यक्त केला आहे. ''सूर्याचे प्रकाशकिरण एकाच वेळी स्वच्छ वस्तूंवरही पडतात आणि मलिन पदार्थांवरही पडतात, परंतु त्याने प्रकाशकिरणांच्या शुद्धतेवर काहीही परिणाम होत नाही.''

थोडक्यात, जामी हा इराणी कवी स्वतःच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत गूढ अनुभव आणि अंतःप्रेरणांच्या श्रेष्ठत्वाविषयी कवने गात असे. ह्या प्रेरणा सश्रद्ध माणसाला ईश्वरापर्यंत पोहोचवतात असे तो म्हणे. त्याच्या मते ईश्वर एकच आहे व अनेक रूपात त्याने दर्शन दिले तरी त्यावर अनेकत्व लादणे शक्य नाही.

**ज्ञान-विज्ञान क्षेत्रास इस्लामी तत्त्वज्ञानाचे योगदान**

इस्लामच्या उदयानंतर किमान पाचशे वर्षे इस्लामी विचारवंत ज्ञानार्जनासाठी उत्सुक होते. इ. स. ५४९ साली रोमन सम्राट जस्टिनिअनने अथेन्समधील शाळा बंद करून ग्रीक ज्ञानज्योतीवर फुंकर घातली. येथेच प्राचीन युगाची समाप्ती झाल्याचे मानण्यात येते. ख्रिश्चन धर्मस्थापनेनंतर धर्मशास्त्राला आत्यंतिक महत्त्व आले आणि बुद्धिवाद व विज्ञान यांचा अस्त होऊ लागला. पण ग्रीसमध्ये भूमिगत झालेली ज्ञानाची सरस्वती सुदैवाने मध्यपूर्वेत इस्लामी राज्यात प्रकट झाली. इस्लामची स्थापना सातव्या शतकाच्या प्रारंभ काळात झाली. सुरुवातीचा संघर्षकाळ संपल्यानंतर इस्लामी संस्कृती वाढू लागली, बहरू लागली. इ. स. ७५० पर्यंत पूर्वेकडील अनेक सांस्कृतिक केंद्रे मुसलमानांच्या हातात पडली. पण त्यांचा विध्वंस न करता त्यांनी इतर संस्कृतींची बलस्थाने आपल्या संस्कृतीत समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला. असे म्हटले जाते की, इस्लामचा मुख्य शास्त्रीय शोध म्हणजे आश्रयदातृत्व. ह्या परंपरेचा आणि प्रवृत्तीचा ठळक आविष्कार अब्बासी दरबारात, विशेषतः अल्-मामून या ख़लीफ़ाच्या (इ. स. ८१३-८३३) काळात स्थापन झालेल्या 'विद्वत्तेचे घर' किंवा 'ज्ञानगृह' (बैतुल हिकमत) संस्थेत जाणवतो. या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट परभाषेतील महत्त्वाच्या ग्रंथांचे भाषांतर करणे हे होते. त्यानुसार ग्रीक, संस्कृत, फारसी इ. भाषेतील भाषांतरे करण्यात आली. या काळात अरबांची प्रबोधनेच्छा जबर होती.

अरब तत्त्वज्ञान, विज्ञान आणि सांस्कृतिक विचार यांच्या समालोचनातून काही मुद्दे पुढे येतात. अरबांनी एखाद्या ज्ञानक्षेत्रात अभूतपूर्व आणि मूलगामी असे मोठे योगदान दिले नसले, तरी सर्व जगातील ज्ञान त्यांनी एकत्रित करून आपल्या शहरांना ज्ञानसमृद्ध केले. ज्ञान आणि ज्ञानीयांना आश्रय देणे, त्यांचे स्वागत करणे यात त्यांनी दाखवलेला उत्साह अजोड होता. याचा अर्थ असा नव्हे की ते केवळ स्वागत-सेवक होते. खगोलशास्त्रातील त्यांची भर फार मोलाची ठरली. अष्टपैलूपणा हा अरब विचारवंतांचा विशेष गुण म्हणावा लागेल. उदा. उमर ख़य्याम कवी-तत्त्वज्ञ-खगोलशास्त्रज्ञ आणि गणितशास्त्रज्ञही होता. अनेक अरब विचारवंत अनेक क्षेत्रात प्रवीण होते.

बाराव्या शतकापर्यंत तरी अरब बुद्धिवाद्यांनी धर्मनिष्ठांपासून आपले स्वातंत्र्य अबाधित ठेवले. अबू-मशर, अल-किंदी, अल-राज़ी इत्यादी विचारवंतांनी अतिरेकी धर्मवादापुढे मान तुकवली नाही. उदा., अल-राज़ीने विद्यार्थ्यांना अधिकारशाहीविरोधी धडे देऊन स्वतंत्र बुद्धिमत्तेची जोपासना करण्यास शिकवले. पुढील काळात मुल्ला-मौलवींचे प्रभुत्व वाढले आणि विज्ञानाची पीछेहाट झाली. परिणामी मुस्लिम समाज प्रगतीपासून दूर राहिला. एकेवेळी सर्व जगातील ज्ञानाची रोपे आपल्या बगिच्यात लावणाऱ्या आणि त्या झाडांची उत्साहाने जोपासना करणाऱ्या बगिच्याची धर्मवेड्यांनी केलेली उजाड अवस्था उद्विग्न करणारी आहे.

युरोप जेव्हा अंधारात चाचपडत होता तेव्हा काही मुस्लिम तत्त्ववेत्त्यांनी युरोपातील शास्त्रीय संशोधनासाठी पायाभरणीचे काम केले. खरे तर पुरातन ग्रीक विचार आणि ॲरिस्टॉटलच्या तत्त्वज्ञानाची ओळख ज्यू व ख्रिश्चनांना मध्ययुगाच्या सुरुवातीस मुस्लिमांमुळेच झाली. तसेच अनेक गणिती सूत्रे व वैज्ञानिक शोधांना पुष्टी देणारी तार्किक गणितेसुद्धा मुस्लिमांच्या माध्यमातून पश्चिमेकडे पोहोचली होती. तरीसुद्धा भौगोलिक अंतरामुळे इस्लाम युरोपमधील विचारमंथनापासून दूरच राहिला. ज्यू व ख्रिश्चनांवर बीजगणिताचा शोध लावणाऱ्या अल ख़्वारिज़्मीचे (मृत्यू इ. स. ८४०) मोठे ऋण होते. अल किंदीचे सखोल तत्त्वज्ञान, अल-राज़ी ह्या धन्वंतरीने सुचवलेले विविध रोगांवरचे उपचार, अल-बत्तानीने (इ. स. ८५८-९२९) शोधून काढलेली भूमिती व 'व्हर्च्युअस सिटी' लिहिणारा अल-फ़राबी ह्याचेही योगदान मोठे होते. ज्या काळात युरोप अंधारात चाचपडत होता त्या काळात मुस्लिम तत्त्ववेत्त्यांनीच युरोपमधील वैज्ञानिक संशोधनाला पायाभूत आधार दिला. मात्र इज्तिहाद (स्वतंत्र विचार) म्हणजेच स्वतंत्र विचाराचे दरवाजे काही कर्मठ मुस्लिमांनी बंद केले व इस्लामची अधोगती सुरू झाली. एक विचारप्रणाली म्हणून इस्लाम अश्मीभूत झाला, एकाच जागी साचला. जो वैचारिक मार्ग आद्य मुस्लिम विचारवंतांनी उजळून टाकला होता त्याच मार्गाचा अवलंब करून युरोप मात्र खूप पुढे निघून गेला. ह्या काळातील एकमेव सकारात्मक बाब म्हणजे पश्चिमेकडील बौद्धिक आक्रमणांतसुद्धा इस्लामची अल्लाहवरची व परम ईश्वराच्या अद्वैतावरची निष्ठा अविचल राहिली. एकाही मुस्लिम विचारवंताचे परम ईश्वराच्या अस्तित्वास आव्हान दिले नाही व जर कुणी तसा प्रयत्न केला तरी त्यास फारसे समर्थन मिळाले नाही.

**काही निष्कर्ष**

इस्लामी तत्त्वज्ञानाच्या उपरोक्त संक्षिप्त सिंहावलोकनाचा उपसंहार म्हणून पुढील निष्कर्ष सांगता येतील –

इस्लामी तत्त्वज्ञान्यांचे ज्ञानशास्त्रीय निष्कर्ष हे बुद्धिवादालाच वास्तववाद समजणाऱ्या अभिजात ग्रीक विचारकांच्या निष्कर्षांशी संपूर्णपणे विरोधी आहेत. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की, बहुतेक इस्लामी तत्त्ववेत्त्यांनी साक्षात्कार, अंत:स्फूर्ती किंवा दैवी प्रेरणा हीच केवळ ज्ञानाचे प्रमाणभूत मूलस्रोत आहेत असे मानले आहे. धर्मतत्त्वांचे समर्थन करण्याकरता त्यांना हा दृष्टिकोन स्वीकारणे भागच होते. तरीपण जोपर्यंत बुद्धिवादा (रीझन)चा धार्मिक कल्पनांशी विरोध येत नाही तोपर्यंत बुद्धिवाद वापरण्यास हरकत नाही, असे मानणारे पेरिपॅटेटिकांसारखे काही विचारक त्यांच्यात विद्यमान आहेत. यामुळेच मुअतज़िली (ग्रांथिक बुद्धिनिष्ठ) व हकमा (किंदी, फ़राबी, इब्न सीना व इब्न रुश्द) यांच्यासारख्या काही बुद्धिवाद्यांनी धर्म व तत्त्वज्ञान यांची सांगड घालण्याच्या कामी सारे प्रयत्न खर्ची घातले.

इस्लामी विचारकांपैकी फार मोठी संख्या सूफींची आहे. ते असे मानतात की केवळ अंत:प्रज्ञा व प्रेम यांच्याद्वारेच माणसाला सत्याचे दर्शन घडू शकते. हे उद्दिष्ट केवळ पुस्तकी ज्ञानाने साध्य होऊ शकत नाही, त्यासाठी साधनेची व सूफीवादी जीवनपद्धतीची कास धरावी लागते. केवळ ईश्वराच्या कृपेनेच माणसाला अज्ञानपटलाचा भेद करणे शक्य होते.

आधुनिक युरोपीय विचारवंतांनी विकसित केलेल्या काही तत्त्वज्ञानविषयक कल्पनांची पूर्वसूचना त्यांच्यापूर्वी बऱ्याच आधी इस्लामी तत्त्वज्ञान्यांच्या साहित्यात ग्रथित झालेली आढळते ही विशेष गोष्ट आहे.

इसवी सनाच्या नवव्या शतकांत नज़ाम याने 'संशयाची पद्धत' पुढे मांडली होती. तिचाच व्यवस्थित पुरस्कार अल-ग़ज़ालीने अकराव्या शतकात केला. अल-ग़ज़ालीनेच प्रथम दैवी चमत्कारांना स्थान देता यावे म्हणून कार्यकारण सिद्धान्ताची बंधने तोडून टाकावीत असे प्रतिपादिले. अल-ग़ज़ालीच्या पूर्वी अशअरी या शास्त्रप्रामाण्यवादी पंडिताने ईश्वरी इच्छेची कार्यपद्धती स्पष्ट करण्यासाठी एक प्रकारच्या अणुवादाचा वापर केला होता.

साक्षात्कार व बुद्धिवाद हे दोन्हीही ज्ञानाचे मूलस्रोत व निकष असल्यामुळे त्या दोहोंमध्ये संपूर्ण संवादित्व असले पाहिजे असे मानणाऱ्या काही विचारकांच्या एका गटाचाही आपल्याला उल्लेख करता येईल. त्यांच्या मते या दोन प्रणालींमध्ये विसंगती असल्यास दिव्य ग्रंथातील वचनांची पारख बुद्धिवादाच्या कसोटीवर केली पाहिजे.

उपरोक्त उल्लेखिलेल्या निरनिराळ्या विचारकांचे वर्गीकरण बुद्धिवादी संप्रदायांमध्ये करता येईल. सामान्यतः असे म्हणता येईल की, हा संप्रदाय आधी नव-प्लेटोवाद, ॲरिस्टॉटल व इस्लाम यांचा समन्वय करून नंतर शुद्ध व सरळ ॲरिस्टॉटलवादाकडे झुकत राहिला. अल-किंदी, अल-फ़राबी, आणि इब्न सीना यांनी मुस्लिम-प्लेटोवादी-ॲरिस्टॉटलवादी मिळून एक तत्त्वज्ञान निर्माण करण्याचा प्रयत्न केला. याच्यामध्येही फ़राबी हा अधिक ॲरिस्टॉटलवादी आणि इब्न सीना हा अधिक नव-प्लेटोवादी होता, असे म्हणता येईल. या संप्रदायांतील नंतरच्या विचारकांनी समन्वयाचा प्रयत्न निरर्थक समजून सोडून दिला आणि आपण ॲरिस्टॉटलवादी (पेरिपॅटिक) आहोत असे ते उघडपणे सांगू लागले. त्यांनी ईश्वरशास्त्र व तत्त्वज्ञान यांना एकमेकांपासून स्वतंत्र ठेवले. या संप्रदायाच्या मते युक्तिवाद व दिव्यग्रंथ हे दोन्हीही ज्ञानाचे मूलस्रोत असून, जेथे त्यांच्यात एकवाक्यता होत नसेल तेथे त्यांना एकमेकांपासून स्वतंत्र ठेवले पाहिजे.

पुष्कळ बाबतींत मुस्लिम तत्त्वज्ञानाला अशा अनेक कल्पना व सिद्धान्त सुचले होते, जे पुढे शेकडो वर्षांनंतर पाश्चात्त्य विचारकांनी शोधून काढून विकसित केले. मध्ययुगातील पाश्चात्त्य पंडितांनी आपली काही मार्गदर्शक तत्त्वे इस्लामी तत्त्ववेत्त्यांकडून घेतली होती हे आल्बर्टुस मॅग्नुस, रॉजर बेकन, रोमन हल, सेंट टॉमस व इतर अनेक तत्त्वज्ञ यांच्या ग्रंथांवरून दिसून येईल. रॉजर बेकनला अरब तत्त्ववेत्त्यांबद्दल फार आदर होता, ही गोष्ट निर्विवाद सिद्ध झालेली आहे. शास्त्रीय पद्धत अवलंबणारे व तिचा विकास करणारे पहिले लोक अरब होते, यात शंका नाही. शंका किंवा संशय ही ज्ञानाची कसोटी आहे, असे नज़ाम हा मुअतज़िली मानत असे. अल-ग़ज़ाली (मृ. ११११ इ. स.) हा तत्त्वज्ञानाचे पद्धतशीर खंडन करणारा पहिला तत्त्वज्ञानी होय. देकार्तने पुढे ज्या तत्त्वज्ञानपद्धतीचा अवलंब केला, त्या त्याला आधीच सुचल्या होत्या आणि ह्यूमच्या आधी सातशे वर्षे त्याने आपल्या द्वंद्वात्मक तर्कशास्त्राच्या शस्त्राने कार्यकारण संबंधाचे बंधन तोडून टाकले होते. येथे असा काही थोड्या उदाहरणांचाच फक्त उल्लेख केला आहे, परंतु अशा अनेक आधुनिक संकल्पना आहेत की ज्यांचे बीज मुस्लिम विचारकांच्या लिखाणामध्ये सापडू शकेल.

चौदाव्या शतकात मोगल टोळ्यांचे पेव फुटल्यानंतर अरबी संस्कृतीचा विकास खुंटला आणि धर्मातीत-धर्मनिरपेक्ष ज्ञानाची ज्योत जवळ-जवळ विझून गेली. ती पुन्हा प्रज्वलित झाली नाही. इस्लामी जगाच्या अधिकांश भागावर राज्य करू लागलेले उस्मानी तुर्क नवीन कल्पनांना विरोध करणारे होते. जेव्हा मुसलमान

भारतात आले व येथील शासक बनले तेव्हा त्यांनी आपल्याबरोबर तोच इराणी–अरबी संस्कृतीचा वारसा आणला, परंतु भारतातील मुस्लिम विचारकांना भारतीय भूमीवर दुसऱ्या निराळ्याच प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागले. इस्लाम आणि हिंदुत्व या दोन गतिशील व प्रबळ संस्कृतींच्या परस्पर संपर्कामुळे निर्माण झालेल्या धार्मिक व सामाजिक प्रश्नांचे निराकरण करण्याकडेच मुख्यत: त्यांना आपल्या शक्तींचा अनेक वर्षांपर्यंत विनियोग करावा लागला.

## ग) सूफींचे विचारविश्व (चिंतन)[८]

### १) सूफीवाद : एक सिंहावलोकन

काही आधुनिक विद्वानांनी अत्यंत परिश्रमपूर्वक केलेल्या संशोधनावरून आता असे सिद्ध झाले आहे की सूफीवादाची चळवळ ही इस्लामच्या मूळतत्त्वांशी विरोधी नसून कुराणांतील श्लोकांमध्ये या चळवळीचे समर्थन करणारे आधार मिळू शकतात. हजरत मुहम्मद पैगंबरसाहेब व त्यांचे सहकारी यांच्या जीवनाकडे पाहिल्यास ते कमालीचे पावित्र्य व साधेपणा यांनी परिपूर्ण असल्याचे आपल्याला दिसून येईल. डोळ्यांत भरणारा इस्लामचा प्रसार, विजयानंतरच्या लुटालुटीत मिळालेली अपार संपत्ती आणि राजकीय सत्तेचा हव्यास, यामुळे हे काटक व कष्टसहिष्णू अरब विलासी जीवनाचे भोक्ते बनले, परंतु त्याचबरोबर भौतिक सुखांबद्दल तिटकारा बाळगणारे धर्मभीरू लोकही तेथे होते. ते आपला सर्व काळ उग्र तपश्चर्या आणि नामस्मरण यात घालवीत असत. त्यांना 'ज़ाहिद' (कर्मठ विरक्त) असे म्हणण्यात येई. त्या काळच्या कर्मठ सूफी साधकांमध्ये हसन अल बसरी (मृ. इ. स. ७२८) आणि राबिया अदविया (मृ. ८०१) यांची नावे उल्लेखनीय आहेत. यांपैकी राबियाने सूफीवादात आत्मानंदाच्या गोडीचा समावेश करण्यामध्ये पुढाकार घेतला. इस्लामच्या उदयानंतरच्या पहिल्या शतकांत सूफी हा शब्द प्रचारात आलेला नव्हता, ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. हा शब्द बहुधा इसवीसनाच्या आठव्या शतकात कूफामध्ये अबू हाशिम या तपस्व्याच्या संदर्भात पहिल्यांदा वापरला गेला असावा. पुढे कालांतराने मुख्यत: ख्रिस्ती अनुभववाद व नव–प्लेटोवाद यांच्या प्रभावामुळे सूफीवादात अनेक परकीय गोष्टी शिरल्या. त्याचा ताळतंत्र सुटून त्यात अतिरेकी भावनाप्रधान गोष्टी शिरल्या. इराणी भूमीत सूफीवादाचा भरघोस विकास झाला आणि तेथे अल जुनैद (मृ. इ.स. ९१०), बायज़ीद बुस्तामी (मृ. इ.स. ८७५), अल हल्लाज (मृ. इ.स. ९२२), शिबली (मृ. इ.स. ९४६), इब्राहीम बिन अधम (मृ. इ.स. ७७७), अल मुहासिबी (मृ. इ.स. ८३७) यांच्यासारखे महत्त्वाचे सूफीवादी व इतरही अनेक उदयास आले. त्यानंतर व्यवस्थापनेचा काळ आला.

सूफीवादासंबंधी सुसंबद्ध माहिती देणाऱ्या सुरुवातीच्या ग्रंथांपैकी अल सर्राजचा 'किताब–उल्–लुमा' (इ.स. ९८८), अबू तालिब मक्कीचा 'कूत उल कल्ब' (इ.स. ९६६) अल कुशैरीचा 'रिसाला' (इ.स. १०७२) आणि अल हुज्वीरीचा 'कश्फुल महजूब' (इ.स. १०५७) हे ग्रंथ उल्लेखनीय आहेत. अल ग़ज़ालीच्या प्रयत्नांमुळे सूफीवादाला चिंतनशील पंथाचे रूप प्राप्त झाले. अल ग़ज़ालीचे व्यक्तिमत्त्व आणि सिद्धान्त यामध्ये निर्व्याज धार्मिक पावित्र्य व दार्शनिक वस्तुनिष्ठता, परमेश्वराविषयीच्या साक्षात्काराची उत्कटता व तिच्या अभिव्यक्तीसाठी वापरलेली शास्त्रीय सूक्ष्मता यांचा समन्वय झालेला आहे. त्याच्या आगमनाच्या फार पूर्वी सूफीवादाचे जे मानाचे स्थान नाहीसे झाले होते ते त्याने परत मिळवून दिले. मोहिउद्दीन इब्न अरबी

(जन्म इ. स. ११६४) याच्या उदयानंतर सूफीवादाच्या तत्त्वज्ञानाने आपले परमोच्च शिखर गाठले. मक्का व दमास्कस येथील आपल्या यात्रेत त्याने 'फुसूस उल हिकम' (तत्त्वज्ञानाची रत्ने) आणि 'अल फुतूहात अल मक्किया' (मक्केतील ऐशोन्मेष) हे आपले सर्वोत्कृष्ट ग्रंथ लिहिले. त्यात त्याचे अनुभववादी दार्शनिक सिद्धान्त सापडतात. हे ग्रंथ वाचावयास व कळण्यास सोपे नाहीत, कारण इब्न अरबीचा सूफीवाद अधिक विस्तृत क्षेत्रांमध्ये संचार करतो आणि आध्यात्मिक अनुभूतींच्या अगदी खोल तळांना स्पर्श करतो. यामुळे इब्न अरबी हे इस्लाममधील अत्यंत वादग्रस्त व्यक्तिमत्त्वांपैकी एक बनले असल्यास आश्चर्य नाही. काही कट्टर उलेमांच्या (धर्मपंडित) मते इब्न अरबीचे साक्षात्कारवादी सिद्धान्त हे कुराणातील वचनांच्या पूर्णपणे विरोधी आहेत, तरीपण इब्न अरबी याला इस्लामी जगात अत्यंत आदराचे स्थान आहे.

सूफीवादी विचारसरणीचा अल ग़ज़ालीनंतर होऊन गेलेल्या इराणी कवींवर इतका प्रभाव पडला की सूफीवादी कवींची एक तेजस्वी मालिकाच तेथे निर्माण झाली. त्यांपैकी फरीदुद्दीन अत्तार (मृ. इ. स. १२३०), जलालुद्दीन रूमी मृ. इ. स. १२७३), शेख सादी (मृ. इ. स. १२९२), हाफ़िज़ शिराज़ी (मृ. इ. स. १३९८) आणि अब्दुर्रहमान जामी (मृ. इ. स. १४९२) ही नावे विशेष उल्लेखनीय आहेत.

### २) भारतातील सूफीवाद

भारतातील सूफीवादाचा इतिहास सांगावयाचा म्हणजे एक स्वतंत्र ग्रंथच लिहावा लागेल. ज्या वेळी या उपखंडातील राज्यकर्ते आपापली साम्राज्ये निर्माण करण्यात गढून गेले होते, त्या वेळी येथील मुस्लिम सूफी देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत अध्यात्मवादाचा प्रकाश नेऊन पोचवण्यात तल्लीन झाले होते. भारतीय सूफीवादात अनेक आध्यात्मिक परंपरा निर्माण झाल्या. त्यांनी भारतीय मुसलमानांच्या जीवनात फार महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. भारतातील आध्यात्मिक मुस्लिम परंपरांमध्ये क़ाद्रिया, चिश्तिया, सुहरवर्दिया व नक़्शबंदिया या चार महत्त्वाच्या परंपरा होत.

तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने बोलावयाचे तर सूफीवादी चिंतनातूनही मूलभूत दर्शनशास्त्राचे मुद्दे उपस्थित होतात. ज्ञानशास्त्राच्या विचारक्षेत्रात सूफी लोक केवळ अंत:प्रेरणा, समाधी किंवा अंत:स्फूर्ती यांचाच प्रभाव मान्य करतात. याउलट 'प्रज्ञा' हा मानवातील कमी महत्त्वाचा गुण आहे असे ते मानतात. केवळ अंत:स्फूर्तींच्याद्वारेच माणसाला ईश्वराचे ज्ञान होऊ शकते. तरीक़तच्या (आत्मशुद्धी : सूफींचे उद्दिष्ट) मार्गाने जाणाऱ्या खऱ्या प्रवाशा (साधका)ला 'फ़ना' (शून्यता, विलीनता, निर्वाण, संभूती) या ध्येयापर्यंत पोहोचताना अनेक स्थितींतून व मुक्कामांतून जावे लागते, परंतु काहीच्या मतें 'फ़ना' हे सूफींचे अंतिम उद्दिष्ट नव्हे. त्याच्यानंतर 'बक़ा' (अनश्वरता) या नांवाचा आणखी एक टप्पा आहे. सालिक (सूफी साधक)च्या दृष्टीने ईश्वराचे अत्यंत सुखद दर्शन हाच परमानंद होय. स्रष्टा (ख़ालिक़) आणि सृष्टी किंवा मानव (मख़लूक़) यांच्यातील संबंधाचे स्वरूप काय? या प्रश्नाच्या बाबतीत बहुसंख्य सूफी विचारक असे मान्य करतात की, हा संबंध द्वैत स्वरूपाचा (ग़ैरियत) आहे आणि जे लोक ईश्वर व मानव हे अभिन्न आहेत असे मानतात, ते पूर्णपणे सर्वेश्वरवादी होत. येथे लक्षात ठेवले पाहिजे की, सूफी सर्वेश्वरवाद हा वेदांती सर्वेश्वरवादाहून वेगळा आहे. या दोहोंतील फरक स्पष्ट करण्यासाठी जर्मन विद्वान मॅक्समुल्लर यांनी ख्रिश्चन धर्म व इस्लाम यांसारख्या एकेश्वरवादी धर्मांतील

अद्वैतवादासाठी 'अंत:सर्वेश्वरवाद' हा नवा शब्द बनवला. या धर्मांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे जगातील वस्तू 'सर्वेश्वरवादांत' कल्पिल्याप्रमाणे ईश्वराच्या समकक्ष नसून त्या ईश्वरामध्ये अंतर्भूत आहेत.

### ३) सूफींचे चिंतन (विचारविश्व)[१]

सर्वसामान्य तत्त्वज्ञानाप्रमाणेच जीव, जगत् आणि ईश्वर अशी प्रमेये सूफी तत्त्वज्ञानामध्ये पण समाविष्ट आहेत. ईश्वर हा सर्वशक्तिमान, सर्वज्ञ, सत्यस्वरूप, सर्वकर्ता आणि सृष्टी, स्थिती व लय यांचा उपादानकारण आणि निमित्तकारण आहे. ईश्वराशी तादात्म्य हे सूफींचे उद्दिष्ट असल्या कारणाने त्यांचे केंद्रीभूत प्रमेय ईश्वर हेच ठरते. म्हणजेच 'ईश्वर' हा विषय सूफींच्या चिंतनात केंद्रस्थानी असतो. परिणामी त्यांच्या विचारविश्वात – चिंतनात ईश्वर हाच प्रमुख विषय ठरतो. त्याच अनुषंगाने सूफींच्या विचारविश्वाचे विवेचन पुढे सादर करण्यात येत आहे –

सूफींचा ईश्वर हा कुणा एका राष्ट्राचा वा समाजाचा ईश्वर नाही. तो साऱ्या विश्वाचा ईश्वर आहे. मानवतेच्या तत्त्वांवर आधारित असल्यामुळे कडव्या धर्मवेत्त्यांपेक्षा सूफी संप्रदायासच अधिक लोकाश्रय सर्वत्र मिळाला. जनसामान्यांवर सूफी शिकवणीचा अधिक प्रभाव दिसून येतो.

अगदी सुरुवातीच्या काळातील सूफी पंथीय हे ईश्वराची अनुभूती घेण्यात इतके मग्न होते की त्यांनी संघटित स्वरूपात काही करण्याचे प्रयत्नच केले नाहीत. अनुयायी मिळवण्याचाही खटाटोप त्यांनी केला नाही. आपल्या आध्यात्मिक शोधातच ते समाधानी होते. **जुन्नून मिसरी** (इ. स. ७९६–८५९) ह्याने सर्वप्रथम चिंतनाच्या गूढ मार्गाने ऐहिक जगाचे पाश तोडून ईश्वरापर्यंत पोहोचण्याच्या विचारप्रणालीचे सार भक्तांना सांगण्यास प्रारंभ केला. तो म्हणत असे, ''परमेश्वराचे ध्यान हेच माझे अन्न आणि त्याची अखंड स्तुती हे पेय आहे, त्याच्या कृती–पराक्रमाचे सर्वसाक्षी होऊन राहणे हे माझे वस्त्र.'' त्याच्या विचारांचा एकंदरीत आढावा घेतला तर ते गीतेतील तत्त्वज्ञानाशी मिळतेजुळते आहेत असे दिसते. **जुनैद बगदादी** (मृ. इ. स. ९१०) ह्याने प्रतिपादन केले की, ''मानव ही केवळ ईश्वराच्या हातातील एक आकृती आहे. ईश्वराचे सार्वभौमत्व विविध हुकूमनामे काढते व ते मानवापर्यंत येऊन पोहोचतात. म्हणून प्रत्येकाने त्याच्या एकत्वाच्या सागरात विसर्जित झाले पाहिजे.'' धर्मोपदेशनाच्या अधिकृत व्यासपीठावरून वरील विचारांचा प्रचार **अबू बकर शिबली** ह्याने केला. पुराणमतवादी ज्याप्रमाणे कुराणातील प्रत्येक वचनाला ताठरपणे चिकटून बसत व त्यांचा शब्दशः अर्थ लावत तसे सूफी पंथीय करत नसत. ईश्वराच्या एकात्मिकतेबाबत त्यांचा दृष्टिकोन अधिक उदार व व्यापक होता. ईश्वराची संकल्पना त्यांनी प्राचीन काळापर्यंत नेऊन भिडवली.

सरदार इकबाल अली शाह ह्यांनी त्यांच्या 'इस्लामिक सूफीझम' ह्या इंग्रजी पुस्तकात म्हटले आहे की, ''ईश्वराची संकल्पना कुठल्याही राष्ट्राच्या वा आदीम जमातींच्या देवदेवतांच्याही पलीकडची आहे. केवळ एखाद्या मर्यादित भूप्रदेशातील लोकांच्या गरजा भागवणारा ईश्वर त्यांना अभिप्रेत नव्हता. पवित्र कुराणात अगदी सुरुवातीस सांगितल्याप्रमाणे तो साऱ्या विश्वाचा ईश्वर आहे. अशाप्रकारे ईश्वराची संकल्पना व्यापक करतानाच सूफी पंथीयांनी त्याची व्याप्ती राष्ट्रांच्या सीमा भेदून सर्व मानवजातीला कवटाळता येईल इतकी मोठी केली. माणसामाणसांतील बंधुभाव वाढवून माणुसकीचा दृष्टिकोन विकसित केला. ईश्वर एकच आहे ह्या विश्वासावर

सूफीपंथीयांनी विशेष भर दिला. दैवी अस्तित्वात शुद्ध एकात्मता आहे व हे अस्तित्व कोणत्याही प्रकारचा सहभाग व बहुविधता स्वीकारत नाही.''

मानवतावादी पायामुळे सूफी पंथाचा जनसामान्यांवर अधिक खोल प्रभाव पडला. पुराणमतवादी धर्मवेत्त्यांच्या ताठर नीतिनियमांपेक्षा त्यांना माणुसकीवर आधारलेला सूफी पंथ अधिक जवळचा वाटला. **हसन बसरी** (इ. स. ६४२-७२८) ह्याने सूफी संप्रदायाच्या प्रचारात सिंहाचा वाटा उचलला. त्याने उमय्याद खलीफा उमर अब्दुल अज़ीज़ (इ. स. ७१७-७२०) ह्यास एकदा लिहिले की, ''ईश्वराशी तादात्म्य पावणे हेच मानवी आयुष्याचे प्रमुख उद्दिष्ट होय. बाकी सर्व वृथा होय. कारण हे भौतिक जग सापासारखे असते. त्याचा स्पर्श थंडगार असतो. परंतु त्याचे विष जहाल असते.'' तो परमेश्वरासच सर्वस्व समजत असे. त्याच्या मते अनासक्तीचा एक बिंदू हा सहस्रोवर्षांची उपासना (नमाज) आणि उपवासव्रत (रोजा) ह्यापेक्षा श्रेष्ठ असतो. हसनने सूफी संप्रदायाच्या प्रसारास वाहून घेतले व कालांतराने तो सूफी विचारप्रणालीचे चालतेबोलते प्रतीक बनला.

**इब्राहीम बिन अधम** (मृ. इ. स. ७७७) **:** ह्याच्या मते ईश्वराच्या एकात्मिकतेवर विश्वास ठेवणारा खरा भक्त भौतिक व पारलौकिक ह्या दोन्ही जगांची अभिलाषा ठेवत नाही. तो फक्त परम ईश्वराचाच ध्यास घेतो. तवक्कल (विश्रंभ किंवा ईश्वरावर अटळ श्रद्धा) हे त्याच्या आयुष्याचे उद्दिष्ट होते. **हारिस मुहासबी** सूफी संप्रदायातला होता. परंतु ईश्वराचे एकत्व लोकांना पटवून देताना त्याने विवेकवादाची कास धरली. मुअतज़िली व अशअरी ह्या दोन्ही संप्रदायाकडूनही त्याने काही विचार उचलले. मुहासबीने घोषित केले की, जो कोणी ईश्वराच्या निर्मितीमागील चैतन्य आणि निसर्गाचे गूढ ह्यांचा सखोल अभ्यास करील तोच ईश्वरी संकल्पनेच्या आनंदाची अनुभूती मिळवू शकेल.

**राबिया अल्-अदविया** (इ. स. ७१७-८१०) : ही बसरा गावची एक स्त्री होती. हिने आपले सारे जीवन ईश्वराच्या चरणी वाहिले. एकदा तिच्या एका मैत्रिणीने तिला एकांतवासातून बाहेर येऊन ईश्वराने निर्माण केलेले हे आश्चर्यजनक विश्व बघण्यास बोलवले. ह्यावर ती म्हणाली, ''ईश्वराच्या निर्मितीकडे बघण्यापेक्षा मला ईश्वराच्या समीप राहून त्याच्याकडेच बघू देत.'' फ़रीदुद्दीन अत्तार ह्या फ़ारसी सूफी कवीने तिचे उद्‌गार काव्यमय रूपात लिहून ठेवले आहेत. ''माणसाला ईश्वर जितका जास्त समजत जातो तितका तो त्यात गुंतत जातो.'' **बायज़ीद बिस्तामी** (मृ. इ. स. ८७४) : ह्यालादेखील ईश्वरभक्तीची प्रेरणा राबियाकडूनच मिळाली होती. ईश्वरचिंतनात तो इतका रममाण झाला की एके दिवशी त्याने कबूल केले की ''मी ईश्वराच्या ठायी राहून माझ्या स्वत:कडे बघितले व माझ्या लक्षात आले की ईश्वराच्या तेजाच्या तुलनेत माझ्या अंत:करणातील प्रकाश म्हणजे काळोखच होता. माझा मोठेपणा हा ईश्वरासमोर अगदी थिटा होता. ईश्वर म्हणजे केवळ पावित्र्य ह्या उलट मी म्हणजे निव्वळ अंधार!''

**मंसूर अल-हल्लाज** (मृत्यू इ. स. ९२२) : हा तर इतका ईश्वरमय झाला होता की त्याने रस्त्यात उभे राहून येणाऱ्या जाणाऱ्यांना ''मीच अंतिम सत्य आहे'' ''मीच ईश्वर आहे'' - ''अनल-हक़्क़'' असे सांगण्यास सुरुवात केली. हे अर्थातच धर्मनिष्ठांनाही सहन झाले नाही व निधर्मीवाद्यांनाही खपले नाही. त्यांना हे ईश्वराची एकात्मिकता व सार्वभौमत्व ह्याला आव्हानच वाटले. परंपरानिष्ठ कायदेपंडितांनी हल्लाजच्या अशा बोलण्यास

अत्यंत हीन गुन्हा ठरवले. तो ईश्वराची निंदा नालस्ती करतो असा त्याच्यावर आरोप ठेवून त्यास सुळावर चढवले. सूफी संप्रदायात मात्र त्यास अत्यंत आदराचे स्थान आहे. पापी ठरवला गेलेला संत असाच त्याचा उल्लेख केला जातो. सर्वसमावेशक परम ईश्वराचा निस्सीम भक्त असूनही ईश्वराचा द्रोह करण्याच्या आरोपावरून त्यास फाशी जावे लागले.

**अब्दुल क़ादिर जीलानी** (इ. स. १०७७-११६६) ही इस्लाम-ग्रंथनिर्दिष्ट सर्वात गूढ व्यक्ती म्हणावी लागेल. जगभरच्या मुस्लिमांना आजही जीलानीचा जीवनप्रवास प्रेरणादायी वाटतो. सल्जुकचा राजा मलिक शाहला तो समकालीन होता. मलिक शाह शिक्षणाचा पुरस्कर्ता होता. बगदाद येथील सुप्रसिद्ध निज़ामिया विद्यापीठाची स्थापना त्यानेच केली. मात्र ह्याच काळात ख्रिश्चनांनी मुस्लिमांबरोबर धर्मयुद्धे सुरू केली होती. तसेच अल-हसन इब्न अल-सब्बाह (इ. स. १०९०-११२४) ह्याच्या नेतृत्वाखाली जेरुसलेमसाठी ख्रिश्चनांबरोबर लढा चालू होता. समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात अशांती होती. अशा अस्वस्थ काळात जीलानीने निरनिराळ्या प्रसंगांच्या निमित्ताने एकूण ८० प्रवचने दिली व त्यातून सूफी विचारसरणीचे महत्त्व विशद केले. हीच प्रवचने नंतर एकत्र करून पुस्तक रूपात प्रसिद्ध केली गेली. पुस्तकाचे शीर्षक होते 'फुतूह अल-ग़ैब' ('अज्ञाताचे आविष्करण').

मंगोलांच्या आक्रमणांमुळे निर्माण झालेल्या सामाजिक अशांतीच्या व राजकीय अस्थैर्याच्या काळात राज्यकर्त्यांची ऐहिक लालसा फार वाढली होती. प्रजाही भौतिक सुखांसाठी हपापली होती. जीलानीने ह्या भोगवादी प्रवृत्तींवर हल्ला चढवला. त्याने आपल्या प्रवचनांमधून वारंवार बजावले की केवळ अंत:प्रेरणा आणि आत्मपरीक्षणाच्याच मार्गाने अंतिम सत्याचे ज्ञान प्राप्त होऊ शकेल. तसेच इहवादाच्या मागे लागून किंवा बौद्धिक चर्चा करून मन:शांती व आंतरिक समाधान मिळणार नाही, तर त्यासाठी 'कश्फ़' (ईश्वरी प्रेरणा) आणि 'मुशाहद:' (आत्मानुभव) हेच कामी येतील.

सुहरवर्दी पंथाचा संस्थापक **शेख शहाबुद्दीन सुहरवर्दी** (इ. स. ११५४-९१) हा पण चेंगीझखानच्या जुल्मी राजवटीतच जगला. आपल्या इश्राक़ी (नव तेज, नव प्रकाश)च्या सिद्धान्ताच्या आधारे त्याने ईश्वर एक आहे ही संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. ह्या सिद्धान्तानुसार विश्वातील सर्व सजीव व निर्जीव गोष्टी ह्या दैवी तेजाची प्रतिबिंबे होत. वेगवेगळ्या ठिकाणी ती वेगवेगळ्या स्वरूपात व्यक्त होतात. उदा. आकाशात सूर्याच्या रूपात, पृथ्वीवर अग्नीच्या रूपात, तर मानवामध्ये संवेदनांच्या रूपात. सर्व कार्यकारणांमागचा मूळ स्रोत हा दैवी प्रकाशच असतो व अखेरीस प्रत्येक जग ह्याच प्रकाशात विलीन होणार असते. सुहरवर्दीने ह्या प्रकाशास 'राजस तेज' असे संबोधले आहे. हा प्रकाश गरजेनुसार निरनिराळ्या अवस्थांमधून प्रवास करतो व जेथे जेथे अंध:कार असेल तेथे तेथे पोहोचून ते ठिकाण तेजाने उजळून टाकतो असे सुहरवर्दीचे म्हणणे होते. हिंदूंचा सिद्धान्त होता की, अनेकांतून एक निर्माण झाले. सुहरवर्दीने मात्र नेमका उलटा सिद्धान्त मांडला व एकामधून अनेक आविष्कार झाले अशी शिकवण दिली.

**शेख मुह्युद्दीन इब्न अल्-अरबी** (इ. स. ११६५-१२४०) हा पण सूफी संप्रदायाच्या संस्थापकांपैकी एक होता. त्याने विपुल लेखन केले. सूफी विचारप्रणालीवर त्याने जवळजवळ चारशे पुस्तके लिहिली. ईश्वर व सृष्टी एकच आहे असे सांगणारा सर्वात्मक ईश्वरवाद आणि एकेश्वरवाद ह्यांचा मिलाफ करण्याचा धाडसी प्रयत्न

त्याने केला. तो अत्यंत धार्मिकवृत्तीचा तपस्वी होता. एकेश्वरवाद व सर्वेश्वरवाद ह्यांत त्याला फारसा फरक वाटला नाही. तरीही त्याने आपले विचार सावधपणे मांडले. गतानुगतिक मुस्लिम धर्मवेत्त्यांना ते रुचणार नाहीत अशी भीती त्याला वाटे. ईश्वराच्या विविध रूपांना कुराणात दाखले शोधण्याचा व प्रेषितांच्या रूढींमध्ये पुरावे शोधण्याचाही त्याने प्रयत्न केला. तरीसुद्धा परंपरावाद्यांनी त्याला पाखंडी म्हटलेच. इब्न तायमिय्याने (इ.स. १२६३-१३२८) सर्वेश्वरवादाचा निषेध केला व अल-अरबीची मुका-बहिरा-आंधळा म्हणून संभावना केली. अशा धर्मवेत्त्यांना जोड्याने मारावे अशीही पुस्ती जोडली. मात्र उदारमतवादी लोकांनी अल्-अरबीस पाठीशी घातले. उदा. जलालुद्दीन अल्-सुयूती (इ.स. १४४५-१५०५) ह्यास त्याच्याविषयी नितांत आदर होता.

चौदाव्या शतकात **इब्न तायमिय्या** ह्याने अल्-अरबीच्या विचारांविरुद्ध खुलेआम आघाडीच उघडली. अल्-अरबीच्या विचारांमध्ये ईश्वराची एकात्मिकता ही वैश्विक एकात्मिकतेचे रूप धारण करू लागली. ते पसंत न पडून तायमिय्याने त्यांची कुचेष्टा सुरू केली. बुरहानुद्दीन इब्राहीम अल-बिकाई (मृ. १४५४ इ.स.) ह्याच्या शब्दांत सांगायचे झाले तर, ''अल्-अरबीसारखा विचार करणारे लोक हे मुस्लिम प्रार्थना व उपासतापासांच्या आड दडून मुस्लिम विरोधी विचार व्यक्त करतात. खरे तर ते साधू-बैराग्यांच्या नावाखाली वावरणारे पाखंडीच होत.'' ईश्वराला व्यक्तिगत वा त्यापलीकडचे असे श्रेष्ठ अस्तित्व मानून त्याला नैतिक गुणविशेष चिकटवून त्याच्या अस्तित्वाला मर्यादा घालणे अल्-अरबीस पसंत नव्हते. त्याच्या दृष्टीने ईश्वर म्हणजे चिरंतन मूलतत्त्व, धर्माच्या आणि संप्रदायच्या सीमा पार करून पूजले जाणारे केवल तत्त्व. ईश्वर कुठल्याही एका विशिष्ट रूपात सीमित होऊ शकत नाही. भक्त हव्या त्या रूपात ईश्वराला पाहू शकतात. प्रत्येक व्यक्तीची ईश्वराविषयीची कल्पना भिन्न असते व मला प्रत्येकाची कल्पना मान्य आहे'' असे अल्-अरबी एके ठिकाणी म्हणतो.

सूफींच्या चिंतन-पद्धतीचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून राजपुत्र **दारा शिकोह** याने आपल्या **'सकीनतुल औलिया'** या ग्रंथात एक सूफी संत अबदुर्रहमान मिर्ज़ा मदारी यांच्या एका दार्शनिक प्रमेयाच्या उत्तरादाखल व्यक्त केलेल्या प्रतिक्रियेकडे अंगुलीनिर्देश करता येईल. मिर्ज़ा मदारी यांचे मूळ फारसी भाषेतील काव्यमय प्रमेय असे होते-

१) ''चीस्त इन्सान? यके तिलस्म-ए-अजीब दर जहान व दरून-ए-अू दो जहान ।।१।।
चीस्त बीनश? हमा नको दीदन चीस्त, दानिश? ख़फ़ा व हिफ़्ज़-ए-लिसान ।।२।।
चीस्त इर्फ़ान? बइजज़-ए-खुद इक़रार पस फ़ना दर बक़ाए हज़रत-ए-आन'' ।।३।।

उपरोक्त प्रमेयाला प्रत्युत्तर म्हणून राजपुत्र दारा शिकोहने तितक्याच समर्थपणे पुढील दोन काव्यचरण निवेदिले.

२) ''चीस्त तौहीद? चून अलिफ़ बूदन कि दो आलम बअू शवद यकसान ।।१।।
चीस्त हिम्मत? गुज़श्तन अज़कोनैन दिल सिपुर्दन, बआन शहे दरान ।।२।।

उपरोक्त दोन्ही काव्य-खंडांचा भावानुवाद असा होऊ शकेल -

१) मानव काय आहे? एक विचित्र प्रकारची जादू! (कारण) या जगामध्ये त्याच्या अस्तित्वात इहलोक आणि परलोक असे दोन्ही लोक (जग) समाविष्ट आहेत. साक्षात्कार म्हणजे काय? समस्त ब्रह्मांडास दृष्टिआड करणे होय. बोधि (ज्ञान) म्हणजे काय? भय आणि जपून बोलणे हे होय. ब्रह्मज्ञान

म्हणजे काय? स्वत:च्या विनम्रतेची आत्मस्वीकृती तर आहे. मग त्या परमेश्वराच्या चिरंतनतेत निर्वाण प्राप्त करणे होय.

२) एकेश्वरवाद म्हणजे काय आहे? तो तर ‘अलिफ़’ वर्णाक्षरासारखा आहे, कारण की त्याच्यामध्ये (इहलोक व परलोक हे) दोन्ही लोक एकसारखे (सरळ) होऊन जातात. साहस म्हणजे काय? दोन्ही लोकांमधून सकुशल पार पडणे आहे, आणि कालचक्राच्या त्या सम्राटास अर्थात परात्पर परब्रह्माला आपले अंत:करण समर्पित करणे हे होय.

३



प्रकरण ३

# इस्लामी चिंतनाचे दार्शनिक संप्रदाय[10]

इस्लामी चिंतनाचे तीन दार्शनिक संप्रदाय आहेत १) ईजादिया:, २) वुजूदिया: आणि ३) शुहूदिया:

**१) ईजादिया :** (सृष्टिवादी वा परमार्थवादी) हे स्रष्ट्यास सृष्टीपासून वेगळे मानतात. ते एका अशा ईश्वरावर विश्वास ठेवतात जो आपल्या निर्मितीपासून वेगळा, स्वतंत्र आहे. निर्माता हा आपल्या निर्मितीहून वेगळा आहे. ईश्वर हा विश्वबाह्य आहे. ''त्यानेच (परमेश्वरानेच) आकाश व पृथ्वी यांची सहा कालावधीत (दिवसांत) निर्मिती केली आणि मग राजसिंहासनावर विराजमान झाला.'' ५७:४ अर्थातच ईश्वराने सहा दिवसांत ही समस्त सृष्टी निर्माण केली आणि सातव्या दिवशी त्याने विश्रांती घेतली. ''स्तुती अल्लाहकरिता आहे ज्याने आकाश व पृथ्वी बनविली. अंध:कार व प्रकाश निर्माण केले.'' ६:१ 'परमेश्वराचा हात प्रेषिताच्या हातावर होता' असे जेव्हा सांगितले जाते तेव्हा त्याला रूपकात्मक अर्थ नसतो.'' (हे प्रेषिता!) जे लोक ('हुदेबिया'चे तहाचेवेळी) तुझ्या हातावर हात देऊन (लढण्यामरण्यासाठी) प्रतिज्ञा करत आहेत, ते (केवळ तुझ्याशी नव्हे तर) परमेश्वराशी प्रतिज्ञा करीत आहेत (कारण तुझा नव्हे तर) परमेश्वराचा हात त्यांच्या हातावर होय.'' ४८:१० तद्वत जेव्हा ईश्वर हा उत्तर रात्री चौथ्या स्वर्गावर अवतरित होतो, असे मानले जाते, तेव्हा पण याचा अर्थ शब्दश:च घेतला पाहिजे. आम्ही त्याची परीक्षा घेऊ इच्छित नाही एवढेच. तो निर्माता आहे, तो तक्षक–उत्कीर्णक आहे आणि रूपकार–चित्रकार आहे. प्रत्येक वस्तू(जात) 'त्याच्यापासून' आहे ('हमा अज़ूस्त') अशी सर्वसाधारण लोकांची श्रद्धा आहे.

सर सय्यद अहमद खान हे आपला ग्रंथ 'तसनैन अहमदिया' पृ. क्र. १५९ वर असे लिहितात की, ''मुसलमानांची साधी श्रद्धा अशी आहे की परमेश्वर (अल्लाह) एक आहे. तो आपल्या पवित्र सत्तेनेच अस्तित्वात आहे. त्याने शून्यातून समस्त ब्रह्मांड निर्माण केले. आपल्या अस्तित्वानिशी सर्व वस्तू त्याच्यावर अवलंबून आहेत. तो कुणावरही निर्भर नाही. तो आपली सत्ता, आपले गुण आणि आपल्या कर्मांत अप्रतिम–अद्वितीय आहे. त्याच्या कृतींत कुणाचाही सहभाग नसतो. त्याचे सत्त्व आणि त्याचे ज्ञान हे आमचे सत्त्व आणि आमचे ज्ञान यासारखे नाही. त्याचे ऐकणे हे आमच्या ऐकण्यासारखे नाही. त्याचा संकल्प, त्याची शक्ती आणि त्याची वाणी हे सर्व आमचा संकल्प, आमची शक्ती आणि आमची वाणी यासारखे नाहीत. या सर्वांमध्ये कुठलेच साम्य नाही. साम्य असेल तर फक्त नावातच. निर्मिती हा त्याचा विशेष गुण होय. कारण कोणीही शून्यातून काहीच निर्माण करू शकत नाही. मानवाची एखादी कृतीपण त्याच्यामुळेच घडून येते. जरी त्याने

मानवाला कर्म-स्वातंत्र्य बहाल केले असले तरी. बरे-वाईट करण्याचे इच्छा-स्वातंत्र्य ईश्वराने मानवास बहाल केले आहे. तो कशातच समाविष्ट नाही. तसेच कोणीही त्याला आपल्यात समाविष्ट करून घेऊ शकत नाही. तो आपल्या सत्त्वाने प्रत्येक वस्तूला व्यापून आहे. तो सर्वांना जवळ आहे. तो प्रत्येक वस्तूसोबत आहे, परंतु त्याची निकटता व दूरस्थता आपल्याला समजून येत नाही.'' हा आहे अशअरिया संप्रदायाचा दार्शनिक पैलू. ज्याअर्थी त्यांच्या मते सृष्टीचे (निर्मितीचे) सत्त्व हे एक प्रकारचे 'शून्य' असते आणि ज्याअर्थी ते कुराणाची बाह्य शिकवण अंमलात आणतात आणि तसेच ज्याअर्थी ते काही विशिष्ट नामस्मरण विधींचा वापर आपल्या आचरणात करतात त्याअर्थी, त्यांची गणना सूफींचा एक संप्रदाय म्हणून करण्यात येते.

**२) वुजूदिया :** (अद्वैतवादी) इस्लामी तत्त्वज्ञानावर अतिशय प्रभाव असलेला दुसरा महत्त्वपूर्ण संप्रदाय म्हणजे वुजूदिया:. थोर विचारवंत शेख मुह्युद्दीन इब्न-अरबी (मृ. १२४० इ. स.) हा स्पेनचा एक निवासी (रहिवासी) होता. जरी त्याचा मृत्यू सिरियामध्ये झाला असला तरी त्याची गणना पाश्चात्त्य तत्त्ववेत्ते आणि सूफींमध्ये होते. त्याचा सिद्धान्त असा होता की मानव (अथवा विश्व) याची निर्मिती ही ईश्वराच्या ज्ञानापासून होते, आणि तो जगाचा अनुभव घेतो, जगापासून त्याला अनुभूती मिळते आणि तो परत आपल्या वास्तवा ('ऐन')कडे येतो. येथे मुळातच द्वैत येऊन मिसळते. सत्त्व फक्त एकच आहे, आपल्या ज्ञानाने ते 'नानाविध' रूपात अभिव्यक्त होते. 'एकोहं बहुस्याम्.' हे ज्ञान आपल्या उपपत्तीच्या, प्रसर्जनाच्या दुसऱ्या टप्प्यांत असते. परमेश्वराच्या ज्ञानसाम्राज्यात, अनुभूती घेतल्यानंतर, तिचा प्रवास परत आपल्या वास्तवाकडे सुरू होतो. 'सर्व काही तोच आहे.' ('हमा अूस्त'). काही लोक याला सर्वेश्वरवाद म्हणून समजतात. मात्र दोहोत अंतर स्पष्ट आहे. जसे योजनाकाराच्या ज्ञानामध्ये योजनेचे प्रकार तयार असतात तसेच एकमेव सत्तेमध्ये पदार्थांच्या गुणांचे ज्ञान समाविष्ट असते. जेव्हा ज्ञानामध्ये एखादी योजना, योजना स्वरूपात अस्तित्वात असते, तेव्हा ते योजनाकार म्हणून नसते. एकरूपता मुळात नसते आणि प्रत्यावर्तन करताना योजना आपल्या प्रकाराकडे परतते. हिंदू तत्त्वज्ञानाच्या संदर्भातसुद्धा सर्वेश्वरवाद हा एक उपेक्षित शब्द आहे. प्रत्येक क्षुल्लक वस्तू ही ईश्वर नसते. याचा सरळ अर्थ असा आहे की सर्व काही (प्रत्येक वस्तू) ही सचेतन सहजप्रवृत्ती, सहजप्रेरणा असते. बाबू जगदीशचंद्र बोस आणि इतरांच्या संशोधनांनी आपल्या विपुल परीक्षणाने जगाला आश्चर्यचकित करून सोडले आहे. सर्वेश्वरवादास एक अधिदैविक सर्वान्तर्यामित्वाचा सिद्धान्त असे म्हणता येईल. मुसलमानांच्या मुतज़ली संप्रदायाची ही धारणा की ईश्वर आपल्या ब्रह्मांडास व्यापून आहे, याच प्रकारची आहे. परंतु इब्न अरबीचे मूलतत्त्वज्ञान हे एक उच्चतर प्रकारचे तत्त्वज्ञान आहे. जगाची उत्पत्ती ही अकस्मात झालेली नसून, ईश्वराच्या ज्ञानामध्ये तिचे अस्तित्व सामावलेले होते आणि त्याचे ज्ञान हे त्याच्या सत्ते (ज़ात)इतकेच शाश्वत असते.

**३) शुहूदिया: (विशिष्टाद्वैतवादी) :** शेख़ अब्दुल करीम अल्-जीली (मृ. ८११ हिजरी) 'इन्सानुल कामिल' या सुप्रसिद्ध ग्रंथाचे ग्रंथकर्ते, हे शुहूदिया (विशिष्टाद्वैतवादी) या नंतरच्या महत्त्वपूर्ण संप्रदायाचे संस्थापक होते. सूफी तत्त्वज्ञ ग़ज़ालीचे असे मत होते की गुणच साक्षी पुरावा असतात आणि सत्ता हे एक अज्ञात परिमाण (एक शून्य) आहे. या उलट जीलीचा असा विश्वास होता की सत्ता हाच एकमेव साक्षीपुरावा - स्पष्ट प्रमाण होय. आणि गुण हे नेहमी अव्यक्त (लपलेले) असतात. उपकार आपल्याला दिसून येत नाही. तो उपकारी व्यक्तीमध्ये दडलेला असतो. उपकारीच साक्षीपुरावा असतो.

*'अल–हक़्कु महसूसुन्, वल् ख़ल्क़ माकूलुन्'*

म्हणजेच ईश्वर हा अनुभूत संवेदित असतो, तर विश्व (जग) हे फक्त अनुमानित असते. ईश्वराने शून्यातून जग निर्माण केले अशी त्याची धारणा होती. परंतु ग्रीक तत्त्वज्ञान या मताशी सहमत वाटत नाही, कारण 'Ex-nihilo nihil fit?' कारण शून्यातून आकार निर्माण होत असलेले तुम्ही पाहत नाही काय, आणि पुन्हा पाठीमागे सरत शून्यात विलीन होतात की नाही? मेणास आकार दिला जातो. हे आकार अर्थातच शून्यातून निर्माण होतात. ईश्वराच्या ज्ञानापासून आकार निसृत होत असतात, परंतु बाहेर येण्याअगोदर हे ईश्वरामध्ये अस्तित्वात होते. फ़ारसी कवी, हाफ़िज हा जीलीचा व्याख्याता होता. त्याने आपल्या काव्यामध्ये जीलीच्या मताचे समर्थन केले आहे. जेव्हा गुणांचा उदय होतो तेव्हा त्यांचे नामकरण प्रस्थापित होते. म्हणून नामे हे आरसे (दर्पण) असतात. नामाविना गुण हे स्वयमेव अभिव्यक्त झाले नसते. म्हणूनच नामे ('अस्मा') हे आरसे असतात. ते दैवी सत्तेची सर्व गुपिते उघड करतात. हा आहे आधिदैविक सर्वान्तर्यामित्व सिद्धान्त. आणखी दुसऱ्या एका कारणामुळे नामे हे आरसे असतात. ईश्वराने शून्यातून विश्व निर्माण केले. शून्य गुणांच्या परस्पर व्यत्यासाच्या साहाय्याने दैवीगुण उदयास आले. (प्रकट झाले) 'शून्यत्त्वास' वाचा–राहित्य असते, दृष्टी–हीनता असते, ऐकण्याची गरज नसते, शिव लागत नाही, ईश्वराची गरज भासत नाही इत्यादी. वाक्, दृश, श्रवण आणि शिव (चांगुलपणा) ईश्वराच्या सदरहू शक्ती परस्पर व्यत्यासी गुणअभावाने या 'शून्यत्व' अथवा आकारा ('ऐन') मध्ये प्रकट होतात.

सत्तेचे गुण हे परिपूर्ण आणि चिरंतन (अक्षय) असतात आणि 'शून्यत्वा' ('अदम')चे गुण हे अपरिपूर्ण आणि क्षय असतात. वुजूदियांचे मते ईश्वराची एकच सत्ता असते. त्या सत्तेशिवाय अन्य सत्तेचे अस्तित्व नाही आणि ती एकमात्र सत्ता म्हणजे परमात्मा होय. हे संपूर्ण दृश्य विश्व त्याच परमसत्तेची अभिव्यक्ती आहे. म्हणून परमात्मा आणि जगत् यामध्ये साम्य आहे. हे साम्य 'ज़ात' (सत्ता) आणि 'सिफ़त' (गुण)चे आहे. हे विश्व त्याच्या 'सिफ़ात' (गुणांची) 'तजल्ली' (अभिव्यक्ती)मात्र आहे. 'हमावुस्त' अर्थात 'सर्व काही तोच आहे'चा सिद्धान्त यावरच आधारलेला आहे. यानुसार संपूर्ण सृष्टीचे एकच उगम आहे आणि तिच्यातच ती लय पावते. हे स्पष्ट करण्यासाठी असे म्हटले जाते की, परमेश्वराची सत्ताच आपल्या अभिव्यक्तीमध्ये जादूगाराच्या रुपयाप्रमाणे सृष्टीची सत्ता बनते. सृष्टीची सत्ता ही 'अब्द' ('बंदा' दास) आहे. ती नाम–रूपाने परिवेष्टित आहे. 'तौहीद' (एकत्व, एकेश्वरवाद) म्हणजे केवळ मर्यादा झुगारून देणे किंवा चिन्ह पुसणे होय. (अत्तौहिद इस्क़ातुल इशारात) प्रथम बंधन किंवा मर्यादा होती परमेश्वराचे आपल्या ज्ञानामध्ये अवरोहण हा मुहम्मद यांचे वास्तवाचा टप्पा आहे. यालाच सूफींच्या भाषेत 'हक़ीक़त–ए–मुहम्मदी' असे म्हणतात; तर अंत:साक्षात्कारवादी वा ज्ञेयवादी ईसाई (ख्रिश्चन) 'मसीह' असे म्हणतात.

तथापि, शुहूदिया परमार्थ आणि अपरमार्थ अशा दोन सत्ता मानतात. एक परमात्म्याची सत्ता आहे, तर दुसरी जीवाची, परंतु जीवाची सत्ता ही शून्यवत आहे. तिला आपल्या अस्तित्वासाठी परमार्थ सत्तेची गरज भासते. जेव्हा गुण (सिफ़ात) प्रकट होतात तेव्हाच त्यांना नामाभिधान प्राप्त होते. म्हणून ही नावे आरशासारखी आहेत. ती परम सत्तेची सर्व गुपिते उघडतात. जीलीचे म्हणणे आहे – त्याची अभिव्यक्ती संपूर्ण (सर्व) सत्तांमध्ये अंतर्निहित आहे आणि ती सृष्टीच्या अणूरेणूमध्ये आपल्या संपूर्णतेस अभिव्यक्त करते. ती खंडश:

विभक्त नाही. सृष्टीचे सर्व पदार्थ हे सर्व तिच्या पूर्णतेमुळे आहेत आणि त्याने दिलेल्या नामामुळे नामवाचक आहेत. सृष्टी ही बर्फासारखी आहे आणि तेजस्वरूप परमात्मा हा पाण्यासारखा आहे. पाणीच बर्फाचे मूळ आहे. त्या गोठलेल्या वस्तूचे नामकरण बर्फ असे झाले, परंतु पाणीच त्याचे मूळ नाव आहे.

सृष्टी परमेश्वराच्या गुणांमध्ये त्याची अभिव्यक्तीमात्र आहे. हे जग-प्रपंच त्याच्या गुणावलीचे समाहार आहे. परमेश्वर आपल्या सत्तेस आपल्या गुणांमध्ये व्यक्त करतो. याचा अर्थ असा होतो की तो स्वत: आपल्या स्वरूपाच्या ज्ञानाची उपलब्धी करत आहे. खरोखर मनुष्य हा परमेश्वराच्या नाम-रूपांमध्ये विश्वास ठेवतो. म्हणून मनुष्याच्या विश्वासामध्येच तो अभिव्यक्त होतो. हा विश्वास ज्ञान आणि चिंतनाच्या आधारावर टिकलेला आहे. म्हणून तो ज्ञानाच्या आश्रयानेच माणसाच्या निकट अभिव्यक्त होतो.

वुजूदिया संप्रदायाच्या समर्थनार्थ पवित्र कुराणामध्ये अनेक श्लोक आढळून येतात. जसे -''पूर्व आणि पश्चिम (सर्व दिशा) अल्लाहच्याच आहेत. (त्यामुळे) तुम्ही जिकडे वळाल तिकडे तुम्ही अल्लाहशी सामोरे व्हाल.'' २:११५ ''तो तुमच्यासमवेत आहे जेथे कुठे तुम्ही आहात.'' ५७:४ ''आम्ही मानवाच्या कंठातील शिरेपेक्षाही त्याच्याशी अधिक जवळ आहोत (पण त्याच्या डोळ्यांवर गफलतीचा पडदा पडला आहे.)'' ५०:१६ ''तोच आदी व तोच अंत होय, आणि तोच व्यक्त व तोच अव्यक्त होय. आणि तो सर्वज्ञानी (सर्वज्ञ) होय.'' ५७:३ ''अल्लाह (परात्पर परब्रह्म) आकाश आणि पृथ्वी यांचा प्रकाश आहे. (म्हणजे प्रकाशाचा तोच स्रोत आहे.) त्याच्या प्रकाशाची उपमा एक अशा (प्रकाशमान) कोनाड्यासारखी आहे, ज्यात एक दिवा आहे. तो दिवा एका काचेत आहे. ती काच अशी आहे जणू चकाकणारा तारा. तो (दिवा) प्रज्वलित केला जातो वरदान प्राप्त झालेल्या वृक्षाने - जैतूनने - तो वृक्ष ना पूर्वेचा आहे ना पश्चिमेचा, ज्याचे तेल अग्निस्पर्श न होताही प्रज्वलित होऊ शकेल. (तेलही प्रकाशमान व आगही प्रकाशमान) म्हणजेच प्रकाशावर प्रकाश! अल्लाह इच्छितो त्यास आपल्या प्रकाशाचा मार्ग दाखवतो. तो लोकांना दृष्टान्त देऊन गोष्ट समजावून देतो. आणि (केवळ) अल्लाहलाच प्रत्येक गोष्टीचे परिपूर्ण ज्ञान आहे.'' २४:३५ ''तू पाहिले नाहीस काय की तुझा विधाता सावली कशी पसरवतो?'' २५:४५ ''आणि त्यानेच पर्वतांना पृथ्वीवर भक्कमरित्या स्थापित (उभे) केले.'' १६:१५

ईश्वर आणि जडतत्त्व (पुद्‌गल द्रव्य) यांच्या सहअस्तित्वाच्या कल्पनेसंबंधी विचार ॲरिस्टॉटलने केला होता. यासंबंधी त्याने प्रतिपादन केले होते की दोन्ही एकाच काळी अस्तित्वात असतात, फक्त एवढेच की ईश्वर हा अपरिवर्तनशील असतो तर पुद्‌गलद्रव्य परिवर्तनशील.

स्पेनच्या अबू अली इब्न सीना (मृत्यू १०३७) हा ॲरिस्टॉटलच्या सिद्धान्ताशी सहजपणे सहमत होतो. प्लेटोने आपल्या मूलजाती सिद्धान्ताद्वारे असे प्रतिपादन केले की विश्वात्मा हा एक असून माणसांचे आत्मे हे त्याचे अनित्य भाग असतात. त्याच्या मते व्यक्तीअगोदर वैश्विक अस्तित्वात होते. हा प्लेटोचा वास्तववाद होता. मूलजाती वा मूलप्ररूप सिद्धान्ताचा अस्पष्टसा असा प्रतिभाग पवित्र कुराणामध्ये 'उम्मुल-किताब' (ग्रंथ-मातृका) आणि 'किताबुल-मुबीन' (स्पष्ट प्रतिरूप) या शब्दप्रयोगात आढळून येतो. जे काही 'उम्मुल-किताब' (सत्त्व)मध्ये आहे ते 'किताबुल-मुबीत' अथवा 'लौह-ए-महफ़ूज' (सुरक्षित पट्टिका)मध्ये व्यक्त (प्रकट) होते.

''सर्व काही एका अतिविशाल समष्टीचे घटक आहेत. प्रकृती त्या समष्टीचे शरीर आहे तर ईश्वर हा आत्मा.'' जवळ-जवळ अशाच प्रकारचे विचार एक सूफी संत विचारक सद्रुद्दीन शिराज़ी उपाख्य मुल्ला सद्र यांनी व्यक्त केले आहेत. त्यांच्या शब्दांत ''ईश्वर हा साऱ्या विश्वाचा आत्मा तर विश्व म्हणजे त्याचे शरीर.''

इस्कंदरियाच्या नव-अफ़लातूनवादी (अलेक्षांड्रियाचे नव-प्लेटोवादी)चा अग्रणी फायलो व त्याचा शिष्य प्लॉटिनस हे उत्पत्तिसिद्धान्त किंवा निर्गमवादाचे संस्थापक वाटतात. येथे नव-प्लेटोवादाचा संक्षिप्त परिचय करून घेणे अप्रस्तुत ठरणार नाही. नव-प्लेटोवादी तत्त्वज्ञानाच्या जडणघडणीमध्ये उपरोक्त दोघांची महत्त्वपूर्ण अशी भूमिका होती. प्लॉटिनस हा नव-प्लेटोवादी संप्रदायाचा संस्थापक होता.

यहूदी (ज्यू) फायलो याच्या संग्रहवादी तत्त्वज्ञानावर धर्माची दाट छाया व गूढवादाकडील कल दिसून येतो. त्यात ग्रीक तत्त्वज्ञान व ज्यू ईश्वरशास्त्र यांचे मिश्रण आहे. प्रमाणग्रंथांचा शब्दश: अर्थ न घेता त्यामागची भूमिका पाहून अर्थ लावला पाहिजे. 'लोगॉस' हा ईश्वर व मनुष्य यांतील मध्यस्थ आणि दुय्यम ईश्वरच आहे. त्याच्या मते ईश्वरापासून पायरी-पायरीने विश्व येते, तसे उलट आपण विश्वाकडून ईश्वराकडे गेले पाहिजे. पण त्यासाठी मध्यस्थाची गरज नाही. उन्मनी अवस्थेत ईश्वराचा साक्षात्कार होतो.

नव-प्लेटोवादात ईश्वर व विश्व यातील द्वैत गृहीत मानले गेले आहे. हे द्वैत नाहीसे करणे हे त्याचे ध्येय आहे. या तत्त्वज्ञानाचा कल यतित्ववादाकडे आहे. नव-प्लेटोवादात पुढील गूढवादाची मुळे सापडतात.

आत्म-संवित्‌ची कल्पना प्लॉटिनसमध्ये दिसून येते. हे जग अतींद्रिय जगाची छाया आहे. आत्मा क्रियाशील आहे. सत् एक असून त्याबद्दल काही बोलता येत नाही, असे प्लॉटिनस म्हणतो. सत् तत्त्वाचे पूर्णत्व उफाळून उतू गेल्याने त्यातून जग निर्माण होते. हाच त्याचा **निर्गमनवाद**. जड म्हणजे असत् वस्तू. आत्म्याची उत्पत्ती ईश्वरातून आहे व त्याला तिकडेच गेले पाहिजे.

**प्लॉटिनसचे सत्ताशास्त्र**

प्लॉटिनसच्या मते सत्ता भिन्न श्रेणी मिळून बनली आहे. प्रथम 'तद एकम्' (ते एक अर्थात मूळ सत्ता सर्वांचे कारण आहे.) नंतर बुद्धी, नंतर आत्मा व शेवटी जड सृष्टी. मात्र मनुष्याला शरीर, आत्मा व बुद्धी आहे, यास्तव जड द्रव्य, आत्मा व बुद्धी ह्या तिन्ही क्षेत्रांच्या बाहेर मनुष्य उभा केलेला आहे.

**अ) तद एकम् :** अर्थात 'ते एक' सर्वांचे कारण आहे. त्याने मूळ सत्तेचा निर्देश होतो.

**ब) बुद्धी (चित्) :** 'त्या एका'पासून बाहेर पडलेली पहिली गोष्ट म्हणजे बुद्धी. ही सर्व ज्ञानाची समावेशक होय. ती विश्वात्म्याची उत्पादकही आहे.

**क) विश्व-आत्मा :** ज्या अर्थी विश्व हे सजीव व्यक्तीसारखे मानले गेले आहे, त्या अर्थी विश्व-शरीराला आत्मा असला पाहिजे, भिन्न-भिन्न शरीरांना सजीव करणाऱ्या आत्म्यांचे एकीकरण म्हणजे विश्व-आत्मा होय.

**ड) जड द्रव्य :** उत्पत्तीची शेवटची श्रेणी म्हणजे जड द्रव्य. न्यूनता असल्यामुळे जड द्रव्य काहीही उत्पादन करण्यास असमर्थ आहे. म्हणून जड द्रव्य दुरित मानले आहे. तरी पण आत्म्याचा परिणाम त्याच्यावर आहे, म्हणून त्याला काही अर्थवत्ता येते.

प्लॉटिनसच्या सत्ताशास्त्राचे एक तत्त्व असे आहे की, ''उत्पन्न झालेल्याला उत्पादकाची सतत ओढ लागते व तो त्यावर प्रेम करतो.'' म्हणूनच माणसाची ओढ मोक्षाकडे असते. यालाच प्लॉटिनसचा आंतरिकतेचा धर्म असे म्हणतात.

फायलो व प्लॉटिनसचा निर्गमवाद हा 'नॉडस्' म्हणजेच बुद्धितत्त्व, प्रेरकचित्-तत्त्वावर अवलंबून होता. 'नॉडस' याला विश्व-आत्मा असेही म्हणता येईल. 'नॉडस' वा 'विश्व-आत्मा' हा ईश्वरापासून निसृत होतो. त्यांनी 'दश प्रज्ञांचे' स्पष्टीकरण केले. सर्वप्रथम 'नॉडस' वा 'प्रथम प्रज्ञा' निसृत झाली. नंतर तिने प्रथम देवदूतास निर्माण केले. या देवदूताने 'द्वितीय प्रज्ञे'ची निर्मिती केली. अशाप्रकारे दहाव्या प्रज्ञेपर्यंत निर्मिती झाली. हे देवदूत चार मूलद्रव्ये अर्थात पृथ्वी, आप, तेज व वायू निर्मितीस कार्यप्रवृत्त होऊन त्यांनी समस्त विश्वाची निर्मिती केली. ह्या देवदूतांना **'अबाए-उलवी'** (श्रेष्ठतर पितृका) असे म्हणतात, तर त्यांनी घडवलेल्या मूलद्रव्यांना **'उम्महात-ए-सिफ्ली'** (अधमतर मातृका) असे म्हणतात. बेनेडिट्टो क्रोचे याने खालील शब्दांत या सिद्धान्ताची टीका केली आहे : ''एकीकडे एक 'लोगोस' म्हणजेच एक बुद्धी, विचारतत्त्व गृहीत धरले जाते आणि दुसरीकडे तिचा एक असा निश्चय वा द्रावण म्हणून स्वीकार केला जातो की जी स्वत: निसृत होते आणि असा एक स्वभाव निर्माण करते की जो शेवटी स्वत:कडेच परतण्यास समर्थ होऊ शकतो. या अन्य संक्रमणाच्या साहाय्याने इत:पर स्वाभाविकपणे आपल्यातच, म्हणजेच विचार व संकल्प करण्यास समर्थ होऊ शकेल.'' (डग्लस ऐनलायद्वारा इंग्रजीत भाषांतरित -'फिलॉसॉफी ऑफ दि प्रॅक्टिकल' पृ. २९५) तथापि अपवाद म्हणून अबू नस्र फ़राबी (मृत्यू ९५०) याने या मुद्द्यावर अधिक सुसंगत असा प्रकाश टाकला आहे. परमेश्वराच्या प्रतिबिंबाची पायरी म्हणजे आंतरिक जग व बाह्य जग यांचा समावेश होय. प्रतिबिंब हे नश्वर, क्षणभंगुर असते, तर सत्त्व हे शाश्वत असते. शेवटचा महान मुस्लिम तत्त्ववेत्ता शेख मुहिय्युद्दीन इब्न अरबी याने परमात्मा हा आपल्या स्वत:च्या ज्ञानामध्ये अवतरित होत असतो, असे विधान करून तत्त्वज्ञानाच्या पायावरच्या संपूर्ण इमारतीच्या उंच शिखरावर कळस चढवून दिला. एखाद्या अंध:कारमय वस्तुसंग्रहालयामध्ये विजेचे बटन दाबताक्षणीच तेथील संग्रहित सर्व वस्तू क्षणार्धात दिसू लागतात; तद्वत जेव्हा ज्ञानप्रकाशाने सत्ता (अस्तित्व) प्रकाशमान होते तेव्हा (बाह्यस्वरूपात) पायरी पायरीने - क्रमाक्रमाने, जग विकसित होऊन प्रकट झाले. सत्तेमध्ये ज्ञानाचा अभाव म्हणजे एखादी त्रुटी नव्हे. एका परीने ती स्वत:च स्वत:मध्ये विलीन होते आणि मग प्रकटीकरण (होत) नसते; तर दुसऱ्या परीने ती स्वत: आत्ममुक्त होते आणि मग गुण प्रकट होतात.

वुजूदिया संप्रदायाच्या उपशाखा या नात्याने **'अना'वादी (अहंवादी)** आणि **'फ़ना'वादी (शून्यवादी, विलयवादी)** या दोन शाखा निर्माण झाल्या. वास्तविक ते संप्रदाय नव्हेत, परंतु ते विशिष्ट संप्रदायांच्या साधकांच्या चिंतनाचे हेतू आणि उद्दिष्ट गणले जातात. संभवत: **अबू सादी अहरार** याने 'फ़ना' आणि 'बक़ा' हे शब्द प्रचारात आणले असावेत. **'अना'वादी** हे खरोखर विषयसापेक्ष चिद्वादी आहेत. आधुनिक जर्मन तत्त्वज्ञानाच्या फिट्चे संप्रदायाशी याचे साम्य जुळते. हा संप्रदाय सत्ता आणि ज्ञान यांचे तादात्म्य प्रस्थापित करतो. 'माझे एकट्याचेच अस्तित्व आहे,' असे फिट्चे म्हणतो, व पुढे असे प्रतिपादन करतो की, ''झाड आणि त्याची सावली ही एक गोष्ट आहे आणि हे दुसरे माझ्या स्वत:च्या मनाचे रूपांतर आहे.'' स्वत: वस्तू मात्र एक काल्पनिक कथा आहे. 'अना'वादी असे प्रतिपादन करतात की चेतनेच्या विशाल विस्तारामध्ये एकाबिंदू

('नुक़्ता')चे दर्शन घडते. हा माझा 'अहम' आहे. जेव्हा अशाच प्रकारचे बिंदू दिसतात (आणि ते भरपूर आहेत, विपुल आहेत), ते पण माझ्या 'अहम' सारखेच आहेत आणि म्हणून ती माझीच प्रकटीकरणे आहेत. हा बिंदू म्हणजे युक्लिडचा बिंदू आहे. या बिंदूला बाह्य गतिमान अस्तित्व नसते, परंतु तिचे अस्तित्व हे विचारकाच्या मनातील आंतरिक पैलूमध्ये असते. जेव्हा ते प्रसरण पावते तेव्हा ते स्वत: अस्तित्वमय होते (बनते). **'फ़ना'वादी** असे प्रतिपादन करतात की सत्यच अस्तित्वात असते, आणि मी कुणीच नाही. मी 'नाहीत्य' आहे. हे ज्ञातृनिरपेक्ष चिद्वादी आहेत. हे जर्मन शेलिंग संप्रदायाच्या जवळचे आहेत. 'अना'वादी संप्रदायाचे प्रबळ समर्थक, शत्तारी सूफी संप्रदाय हा कंटकाकीर्ण मार्ग आक्रमण करत आहे. विचारशक्ती आणि कल्पनाशक्ती बिघडून जातात आणि मग एखादा मनुष्य हा अहंकारी बनण्याची शक्यता असते. तो आत्ममग्न बनतो. म्हणून या मार्गास सोडावे लागते. जास्त प्रछन्न धोके नसल्यामुळे अधिकतर संप्रदाय 'फना' (आत्म-विलय, निर्वाण)चा मार्ग सहजासहजी अनुसरतात. परंतु नंतरच्यासाठी पवित्र कुराणामध्ये कुठे प्रमाण आहेत? उहुदच्या लढाईमध्ये जेव्हा प्रेषित मुहम्मदसाहेब यांनी शत्रूच्या सैनिकांकडे मूठभर वाळूचे कण फेकले तेव्हा ''जेव्हा तू वाळूचे कण फेकले होतेस तेव्हा ते तू फेकलेले नव्हतेस, तर अल्लाहनेच ते फेकले होते'' ८:१७ ''परमेश्वराचा हात त्यांच्या हातावर होय.'' ४८:१० अशा स्थितीमध्ये परमेश्वर हा कर्ता असून 'अब्द' (दास, भक्त) हा त्याचे साधन आहे. याला 'कुर्ब-ए-फ़रायज़' असे म्हणतात. हे विषयसापेक्ष चिद्वादाशी मिळतेजुळते आहे. तथापि परमेश्वर जेव्हा साधन असतो, आणि 'अब्द' (दास, भक्त) हा कर्ता असतो, तेव्हा परमेश्वर हा 'अब्द'च्या अंतरंगामध्ये असतो, आणि 'अब्द' हा प्रकट असतो. हे 'कुर्ब-ए-नवाफ़िल' होय. हे ज्ञातृनिरपेक्ष चिद्वादासारखे आहे. 'अब्द' हा परमेश्वराच्या दृष्टीने, श्रवणाने आणि स्पर्शाने क्रमश: पाहतो, ऐकतो आणि स्पर्श करतो. तथापि येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की हा विलय फक्त 'दृष्टीमध्ये' असतो. हेगेलचा संप्रदाय हा विषयसापेक्ष आणि ज्ञातृनिरपेक्ष आदर्शवाद, चिद्वाद यांच्या दरम्यान असल्यासारखा वाटतो. तो ज्ञातृनिरपेक्ष आत्मबोधाचा विषय वाटतो. केवलतत्त्व हे मन आणि जडद्रव्य दोहोमध्ये व्यक्त असते. जाणणे आणि असणे हे दोन्ही समान आहेत, असे हेगेल म्हणतो - ''परमेश्वरास स्वतंत्र अस्तित्व नाही, तो फक्त आमच्यामध्येच अस्तित्व राखतो. परमेश्वर स्वत:स ओळखत नाही. आम्हीच त्याला ओळखतो, जेव्हा माणूस परमेश्वराविषयी विचार करतो व त्याला जाणतो, तेव्हा(च) परमेश्वर स्वत:बद्दल जाणतो आणि विचार करतो आणि तो अस्तित्व राखतो. परमेश्वर हा माणसाचा सत्य आहे आणि मानव हा परमेश्वराचे वास्तव आहे.'' (हेगेल उद्धृत लुथार्डकृत 'फंडामेंटल ट्रुथ्स', पृ. ६६)

मानवी इतिहासाचा ओघ हा उघडपणे आत्मप्रकटीकरणाच्या ओघाशी एकसमान मानला जातो. हे 'अल-इन्सानु-सिर्री व न सिर्रूहु' या 'हदीस-ए-कुद्सी'चे स्पष्टीकरण असल्यासारखे वाटते. ''मानव हा माझा गुपित (मर्म) आहे, आणि मी मानवाचे गुपित आहे'' म्हणजेच मानव हा ईश्वराच्या नामां ('अस्मा')चे एक प्रकटीकरण आहे. तो (ईश्वर) आपल्या नाम-रूपांच्या आरशामध्ये माणसास पाहातो. माणूस स्वत:स ईश्वराच्या नाम-रूपांच्या आरशामध्ये पाहतो.'' ('अल-इन्सानुल-कामिल', भाग २, पृ. १०६) दोहोंपैकी कोणत्याही रीतीने नामे ही आरसे असतात. तथापि 'इन्सानुल कामिल' या ग्रंथाचा ग्रंथकर्ता शेख अब्दुल करीम अल-जीली हा हेगेलपेक्षा एक पाऊल पुढे गेला आहे. बाह्य जगाचे ईश्वराचे ज्ञान हे मानवाचे स्वत:च्या ज्ञानाइतकेच असते असे

म्हणून नंतरच्याने मर्यादा घालील ही ईश्वराच्या ज्ञानामधील एक उणीव राहील ही बाब त्याच्या सर्वज्ञतेशी विसंगत असून ती अतर्क्य वाटेल. शेख जीली म्हणतात की याची जाणीव असू द्या की ईश्वराची नानाविध आणि असंख्य जग आहेत. यापैकी आपणास वाटेल त्या जगावरून तो मानवास न्याहाळतो. याला 'शहादत-ए-बुजूदिया:' (प्रमाणभूत अस्तित्व) असे म्हणतात, आणि कुठल्याही जगावरून तो (ईश्वर) जर मानवाच्या मार्फतीविना पाहत असेल तर याला 'ग़ैब' (अदृश्य, परोक्ष, इंद्रियातीत) असे म्हणतात. या 'ग़ैब'चे दोन प्रकार आहेत. पैकी एक मानवाच्या ज्ञानकक्षेत तपशीलवार असते, तर दुसरे हे अमूर्त, गूढ असते. तपशीलवार 'ग़ैब' हे मानवाच्या देवदूतांच्या ज्ञानाप्रमाणे मानवाच्या ज्ञानकक्षेत प्रमाणभूत परोक्ष असते. ह्यानेच 'आलम-ए-मलकूत' (देवदूतलोक) ची निर्मिती होते आणि अमूर्त, गूढ 'ग़ैब' हे शून्यातीत ('अदम') परोक्ष असते. याचे मानवास ज्ञान नसते. फक्त ईश्वरासच याचे ज्ञान असते.

ज्याअर्थी परोक्ष जग हे दृश्य जगावर प्रशासन करते आणि तिच्यावर नियंत्रण ठेवते, त्याअर्थी ईश्वराने मानवामार्फत धारण केलेल्या ज्ञानापेक्षा ईश्वराचे स्वत:चे ज्ञान हे अधिक विशाल आणि अमर्यादित असते. जरी दृश्य जगाच्या संबंधात, ईश्वराचे तिच्याविषयीचे ज्ञान हे मानवाच्या स्वत:च्या स्थल कालमर्यादेत समान असते. तथापि असे निवेदन करता येईल की 'मसनवी' (कथा-काव्य)चे कवी रूमी हे हेगेलच्या मताशी सहमत असलेले वाटतात. कारण ते लिहितात -

*'इल्म-ए-हक़ दर इल्म-ए-सूफ़ी गुम शवद ।*
*किन सख़ुन के: बावर-ए-मर्दुम शवद ।।"*

अर्थात सूफीच्या ज्ञानामध्ये ईश्वराचे ज्ञान सुप्त - लपलेले असते. जेव्हा माणसाचे ज्ञान व्यक्त होते तेव्हा ईश्वराचे ज्ञान अव्यक्त असते. जेव्हा बर्फ (सीमित जल) व्यक्त असते, तेव्हा पाणी स्वत: अव्यक्त असते.

उपरोक्त परिगणित संप्रदायांव्यतिरिक्त काही संप्रदायांची अशी धारणा आहे की ईश्वर हा १) विचार, २) संकल्प-इच्छा, ३) सौंदर्य अथवा प्रेम, ४) प्रकाशरूपात असतो.

**१) विचारवादी -** ज्यांना ईश्वर हा विचार आहे असे वाटते ते शुहूदिया:सारखेच आहेत. 'अन्-हुव अल-अना कम कान' अर्थात तो (ईश्वर) पूर्वीसारखाच सध्या पण आहे. विचार व्यक्तित्वामध्ये बदल घडवून आणत नाही. जग येतील, जग जातील, परंतु तो (विचार) निरंतर मार्ग आक्रमण करीत असतो, अपरिवर्तित आणि अपरिवर्तनशील.

**२) संकल्पवादी -** शक़ीक़ बल्ख़ी, इब्राहीम अधम, राबिया बसरी आणि काही इतर हे संकल्पवादी संप्रदायाचे भाष्यकार - व्याख्याता होते. समष्टी ही संकल्पाची अभिव्यक्ती असते. शेख मुहियुद्दीन इब्न अल-अरबी याने असे प्रतिपादन केले की ईश्वर हा आपल्या ज्ञानकक्षेच्या रूप-आकारांचा माध्यमाने व्यक्त होतो. संकल्पाविना रूप-आकार व्यक्त होऊ शकत नाही.

**३) सौंदर्यवादी वा प्रेमवादी -** प्रेमवादी संप्रदायाची अशी धारणा आहे की विश्व हा एक आरसा असून त्यामध्ये ईश्वर हा स्वत:स न्याहाळतो, आणि म्हणून विश्व हे सौंदर्य आणि प्रेमाचे आविष्करण आहे. मारूफ़ कर्ख़ी, शिराज़चा सुप्रसिद्ध कवी हाफ़िज इत्यादी या संप्रदायाचे भाष्यकार आहेत.

**४) प्रकाशवादी (ज्योतिर्वादी)** – ॲरिस्टॉटलचा महान टीकाकार शेख़ शिहाबुद्दीन, हा शेख़ुल इश्राक अल–मक़्तूल ('हुतात्मा') या नावाने प्रसिद्ध आहे. त्याचे असे मत होते की ईश्वर हा प्रकाश आहे, 'अल्लाह आकाश आणि पृथ्वी यांचा प्रकाश आहे. (म्हणजे प्रकाशाचा तोच स्रोत आहे.) त्याच्या प्रकाशाची उपमा एका अशा (प्रकाशमान) कोनाड्यासारखी आहे, ज्यात एक दिवा आहे. तो दिवा एका काचेत आहे. ती काच अशी आहे जणू चकाकणारा तारा.'' २४:३५

असे दिसून येते की ह्या सर्व परवर्ती संप्रदायांचा उदय या कारणास्तव झाला आहे की 'एतिबारात' (प्रचीति, कल्पना, अनुमान) ना 'ज़ात' (अधिसत्ता)च्या दर्जापर्यंत उन्नत करण्यात आले. यांचा उगम एक निम्न स्रोत ('अहदिय्यत' – एकत्त्वता)पासून होतो. झरतुश्ती याच्या अनुयायांनी 'जलाल' (रुद्र गुण) आणि 'जमाल' (भद्र गुण) या दोन पैलूंना सत्त्वापर्यंत उन्नत करून पोहोचवले, आणि एक सत् ईश्वर (ओर्मुझ) आणि दुसरे असत् ईश्वर (अहुर्मन) यामध्ये विश्वास ठेवला. म्हणून सूफी विचारधारेचे हे संप्रदाय 'ज़ात'च्या 'एतिबारात' यांना खुद्द 'ज़ात'च्या दर्जापर्यंत उन्नत केल्याचे दिसून येते.

हदीस–ए–कुद्सीच्या शब्दांमध्ये ते म्हणतात, ''ईश्वर हा एक गुप्त कोश होता, आणि त्याला वाटले की आपण ओळखले जावे आणि म्हणून त्यांने ज्ञात होण्यासाठी जग निर्माण केले.'' या जागृतीमध्ये चार पैलू आढळतात, १. वजूद (सत्त्व), २. इल्म ('स्व'चे ज्ञान), ३. नूर (प्रकाश म्हणजेच ज्ञानकक्षेत सत्त्वाचा उदय किंवा अहं) आणि ४. शुहूद (आत्मावलोकन). पुढच्या टप्प्यांत हेच अस्तित्व किंवा जीवन आणि (गुणांचे) ज्ञान अथवा प्रेम इच्छा आणि शक्ती बनतात. संकल्प (शुहूद), प्रेम (ज्ञान) आणि प्रकाश (नूर) या संप्रदायांचे स्रोत 'एतिबारात' (अनुमान, प्रचीती)मध्ये आढळते.

इब्न अरबी, जीली, ग़ज़ालीसारख्या महान सूफींनी आपले विचार गद्यामध्ये मांडले आहेत, परंतु इतर विशेषत: फ़ारसी कवींनी आपल्या तत्त्वज्ञानाचे प्रतिपादन काव्यामध्ये केले आहे. योग्य प्रकारे आणि स्पष्टपणे समजून घेण्यासाठी तत्त्वज्ञानास निराळ्या भागामध्ये संक्षिप्त केले पाहिजे. भावनांना उन्नत करणारे काव्यमय उद्‌गार सहजासहजी गद्याच्या सुबोधतेपर्यंत पोहोचू शकत नाहीत. जलालुद्दीन रूमीची 'मसनवी' (कथा–काव्य) सर्व दार्शनिक संप्रदायांची एक रास आहे. कवीचा हेतू एक केंद्रीय सत्य शिकवण्याचा होता. शिखरावर नेऊन पोहोचवणाऱ्या सर्व मार्गांचा उल्लेख करून त्यांचे सविस्तर प्रस्तुतीकरण करण्यात आले आहे. एक सूक्ष्म परीक्षणाअंती असे आढळून येईल की मौलाना रूमींच्या सर्वोत्कृष्ट निष्कर्षांमध्ये परस्परविरोधी सिद्धान्त आढळून येतात.

४

प्रकरण ४

# सूफीवाद आणि सूफी तत्त्वज्ञानाच्या संकल्पना

**क) सूफीवाद – गोशवारा**[११]

**१) सूफी मत –** सूफी मताचा भारतामधील प्रवेश हा ख़्वाजा मुइनुद्दीन चिश्ती (१२ वे शतक) यांच्या काळापासून मानला जातो. येथील आगमनाअगोदरच या मताचा इतरत्र विकास झाला होता. तसे पाहता व्यापाराच्या निमित्ताने ७ व्या शतकाच्या सुरुवातीस मुसलमानांचे आगमन झाले होते आणि तेराव्या शतकापर्यंत बरेचसे मुस्लिम धर्मप्रचारक येथे आले होते, परंतु ही शास्त्र अंतर्गत (बा–शरा) मुसलमानांची साधना–धारा नव्हती, परंतु ती शास्त्रबहिर्भूत (बे–शरा) सूफींची साधना होती. शास्त्र अंतर्गत असलेले मुसलमान हिंदू धर्माच्या धर्मस्थानावर आघात करू शकत नव्हते. ते केवळ त्याच्या शरीरास ओरबडून केवळ दु:खी करू शकत, मात्र सूफींनी भारताच्या ह्रदयावर आपली छाप टाकली. याचे कारण असे होते की सूफीवाद हा भारतीय साधनापद्धतीशी अ–विरोधी होता. सूफींचे पुढील चार संप्रदाय संगठित स्वरूपात वेळोवेळी येऊन येथे प्रचार करत राहिले.

१) **चिश्ती संप्रदाय** (बाराव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये प्रचारित) –सर्वप्रथम प्रचारक – ख़्वाजा मुइनुद्दीन चिश्ती.
२) **सुहरवर्दी संप्रदाय** (तेराव्या शतकाच्या पूर्वार्धात संगठित) – सर्वप्रथम प्रचारक – जियाउद्दीन अबुलनजीब, अब्दुल क़ादिर इब्न अब्दुल्ला.
३) **कादरी संप्रदाय** (पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात पोषित) – सर्वप्रथम प्रचारक – शेख़ अब्दुल क़ादिर जीलानी.
४) **नक्शबंदी संप्रदाय** (सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये व्यवस्थित ) – सर्वप्रथम प्रचारक – ख़्वाजा बहाउद्दीन 'नक़्शबंद.'

सूफींचे उपरोक्त चारी संप्रदाय भिन्न–भिन्न प्रचारकांना आपले प्रवर्तक मानत असूनसुद्धा मूळ सिद्धान्तांमध्ये समान होते. धार्मिक आणि सामाजिकदृष्ट्या हे सर्व संप्रदाय अत्यंत उदार आणि विनम्र होते. चारी संप्रदायांमध्ये 'ज़िक्र' (नामस्मरण साधना)चे महत्त्वपूर्ण स्थान आहे. केवळ आचरणपरक दृष्टिकोनांमध्ये किंचित फरक आहे. उदाहरणार्थ, चिश्ती संप्रदायाचे अनुयायी 'ज़िक्र'च्या वेळी 'कलमा'चे शब्दोच्चार जोराने (स–स्वर) करतात; तर या उलट नक़्शबंदी संप्रदायाचे साधक ध्यानपूर्वक नतमस्तक होऊन 'कलमा'चे उच्चारण अत्यंत मंद स्वरात

(मौन) करतात. हे संगीताकडे मोठ्या उपेक्षेने पाहतात, परंतु चिश्ती आणि क़ादरी सांप्रदायिक अनुयायी धर्मग्रंथ पठन करताना गात-गात भावावेशात डोलू लागतात. उपरोक्त चार संप्रदायांपैकी भारतात चिश्ती संप्रदायाचा विशेष प्रचार झाला.

सूफींमध्ये इस्लामी कट्टरतेचा तीव्र गंध नव्हता. म्हणून ते सहजतेने हिंदू समाजाच्या बऱ्याचशा गोष्टी स्वीकारत आणि मोठ्या प्रेमळपणे ते आपल्या सिद्धान्ताचे प्रतिपादन करत. बाह्य आणि आंतरिक आचरणामध्ये 'सूफ'(लोकर)सारखी निर्मलता आणि पवित्रता असल्याकारणाने त्यांना 'सूफ़ी' असे म्हटले जाते. ईश्वरप्रती आत्मसमर्पणजनित प्रेमसाधना, पारस्परिक संवेदनशीलता आणि विश्वबंधुत्वाची भावना यावर यांचा विशेष भर असे.

**२) उगम व स्वरूप** – सूफीमताचा उगम हा क्रिया-प्रधान, रूढीवादी इस्लामच्या प्रतिक्रियास्वरूप झाला. 'ला इलाह् इल्लिलाह् मुहम्मदुर्रसूलुल्लाह' अर्थात अल्लाहशिवाय कोणी (अन्य) उपास्य नाही आणि मुहम्मद हे अल्लाहचे प्रेषित आहेत, हा इस्लामचा मूलमंत्र आहे. म्हणून पक्का मुसलमान बनण्यासाठी अल्लाह आणि त्याचा प्रेषित (रसूल) यावर पूर्ण श्रद्धा-विश्वास ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. इस्लामची मूळ स्वरूपात ईश्वरविषयक कल्पना अशी होती की तो (अल्लाह हा) शक्तिशाली आणि निरंकुश प्रभू आहे. 'अल्लाह' शब्दाचा अर्थच शक्तिशाली पुरुष असा आहे. इस्लामने ईश्वराच्या गुणांमध्ये प्रेमास कमी परंतु श्रद्धा आणि भय यास जास्त स्थान देऊन त्यावर भर दिला आहे. सनातनी इस्लामानुसार ''परमेश्वर एक आहे, तो अत्यंत जवळून सर्व काही पाहत आहे. पूर्व आणि पश्चिम (सर्व दिशा) त्याच्याच आहेत. (आम्ही) जिकडे दृष्टी वळवतो, तिकडे ईश्वराचा चेहरा दिसून येतो.'' (डॉ. मौलवी मीर मोहंमद याकूब खान, 'पवित्र कुराण') २:११५ लहानातला लहान अपराध त्याच्यापासून लपलेला नसतो आणि त्याचे परिणाम (दंड) अवश्य भोगावे लागतात. कुराणानुसार परमेश्वर हा एक आणि अद्वितीय असा आहे. कोणी दुसरा त्याच्या समान होऊ शकत नाही. तो स्थळ-काळाच्या बंधनापलीकडे आहे. तो स्वयंपूर्ण व निरपेक्ष आहे. त्याच्या न्यायात कोणीही बाधा निर्माण करू शकत नाही. त्याचा न्याय हा त्याचाच न्याय असतो. संपूर्ण सृष्टीचा निर्माता तोच आहे. तोच बरे-वाईट निर्माण करतो. तो अवतार धारण करत नाही. त्याची सृष्टी आणि त्याच्या स्वत: दरम्यान कोणीच नाही. त्याची शक्तिमत्ता आणि निरंकुशता या संबंधात म्हटले गेले आहे की – ''(हे पैगंबरा!) तू (तर ही) प्रार्थना कर की, हे अल्लाह! सार्वभौम सत्ता तुझीच आहे, (तूच सर्व राज्यांचा अस्सल मालक आहेस) तू ज्यास इच्छितोस त्यास सत्ता प्रदान करतोस, आणि ज्याच्याकडून इच्छितोस सत्ता काढून घेतोस, इच्छितोस त्यास सन्मानित करतोस आणि इच्छितोस त्यास अपमानित करतोस, तुझ्याच हाती आहे सर्व (प्रकारचे) कल्याण! नि:संशय तू सर्व शक्तिमान आहेस.'' (मौलाना वहीदुद्दीन खान, 'कुराण मराठीत') ३:२६ अल्लाह हा अनंत इच्छाशक्ती धारण करणारा आहे. ''अल्लाहचे (काम) असेच असते, तो इच्छिल ते निर्माण करतो, जेव्हा तो एखादी गोष्ट करण्याचा निर्णय घेतो, तेव्हा तो त्या (गोष्टी)बाबत केवळ इतकेच म्हणतो की, 'हो' ('कुन'='भव') आणि ती गोष्ट होते.'' (श्री. अशोक कदम व डॉ. बशारत अहमद, 'कुरआन-ए-हकीम') ३:४८ ''अल्लाह (परमात्मा), त्याच्या व्यतिरिक्त कोणी भजनीय नाही. आणि तो सर्वोच्च (व) महान आहे.'' (विनोबा भावे, 'कुराण-सार') २:२५५ तसे पाहता कुराणाचा प्रत्येक अध्याय (अध्याय ९वा – सूरतु-तौबाचा अपवाद

वगळून) हा ''आरंभ अल्लाहच्या नावाने जो अत्यंत दयाळू व कृपाळू आहे.'' या संहितेने सुरू होतो, परंतु जागोजागी प्रलयकाळाच्या कठीण दिवसांची आठवण करून दिल्याकारणाने परमेश्वरास भय आणि आतंक या भावनेने पाहिले जाते. यामुळे दास (भक्त) हा परमेश्वराकडे दृष्टिक्षेप करण्याचे धाडस करू शकत नाही. अज्ञानी अपत्यांच्या अपराधांकडे सहानुभूतीने पाहणाऱ्या एखाद्या दयाळू पित्याप्रमाणे चित्रित न करता परमेश्वरास एक न्यायनिष्ठुर, भावनाशून्य शासनकर्ता या स्वरूपात दाखवण्यात आले आहे. त्याच्या कृपेचे अधिकारी तेच लोक आहेत जे त्याच्या आज्ञांचे पालन करतात व जे त्याच्यावर श्रद्धा ठेवतात. कुराणप्रणीत अल्लाहशी कधीच कोणीही वैयक्तिक संबंध प्रस्थापित करू शकत नाही आणि कोणीही त्याच्या बरोबरीचा असल्याचा दावा करू शकत नाही. तसे धाडसही पण करू शकत नाही. याच अपराधपूर्ण साहसामुळे प्रसिद्ध सूफी संत मन्सूर हल्लाज याला सुळावर चढवले गेले. कारण की त्याने 'अन-अल-हक़' ('अहं ब्रह्मास्मि') अर्थात मीच परमेश्वर (सत्य) आहे अशी खुलेपणाने घोषणा केली होती. कुराणोक्त इस्लामी चिंतन हा निखळ एकेश्वरवादी आहे. या उलट सूफीमताच्या साधनेमध्ये जीव आणि ईश्वरमधील तात्त्विक एकता आणि ईश्वराची सर्वव्यापकता, या श्रद्धेवर भर आहे व त्यावर सूफींचा विश्वास आहे. अखिल सृष्टीच्या अणू-रेणूमध्ये, कणा-कणामध्ये ईश्वराच्या सौंदर्याची झलक ते पाहात. नियम पालन आणि क्रियाकर्म या ऐवजी त्यांच्या साधनेमध्ये आंतरिक प्रेम, आत्मसमर्पणाची उत्कट आकांक्षा आणि परमात्म-मिलनाची तीव्र विरहाकुलता-व्याकुळता होती. इस्लामी साधना ही शरिअत (कर्म-मार्ग), तरीक़त (भक्ती मार्ग) आणि हक़ीक़त (ज्ञान मार्ग) यांच्याशी संबंधित होती, परंतु सूफींमध्ये या साधनांच्या व्यतिरिक्त आणखी एक विशेषता होती व ती होती प्रेममार्गाची. यासाठी 'मारिफ़त' ही पूर्व अट पूर्ण करावी लागते. अर्थात ईश्वरास पुरेपूर ओळखून, त्याचा योग्य तो परिचय घडवून, त्याच्याशी पूर्णपणे भेटून 'अन-अल-हक़' या अवस्थेपर्यंत पोहोचणे होय. सूफींवर इस्लामप्रणीत गोष्टींव्यतिरिक्त, 'मादन-भावा'ची पण छाप होती. याचा उदय शामी जातीमध्ये झाला होता. मग आपली जुनी भावना आणि धारणेच्या रक्षणासाठी सारग्राही सूफींनी इतर जातींचे तत्त्वज्ञान आणि आध्यात्म यांच्या मदतीने हळू-हळू एका नवीन मतप्रणालीस जन्म दिला आणि शेवटी तिला शुद्ध आध्यात्मिक प्रेमाचे स्वरूप देऊन टाकले. सूफ़ी मताची व्याख्या करताना प्रसिद्ध सूफी संत मारूफ़ अल-करख़ी यांनी असे म्हटले आहे - परमेश्वराविषयी सत्यासत्याचे ज्ञान आणि सांसारिक वस्तूंचा त्याग, हेच सूफी मताचे सार आहे.

अल-नूरी या सूफी संताच्या मते सांसारिक वस्तूंशी उपेक्षा भाव आणि परमात्म्यावर प्रेम करणे हाच सूफींचा धर्म आहे. परम सत्याशी महत्त्वाच्या बोधाच्या भावनेचा सूफींमध्ये क्रमश: विकास होत गेला. त्यांनी परमेश्वरास प्रियकर स्वरूपात पाहिले. त्याला प्राप्त करण्यासाठी त्यांच्या हृदयामध्ये प्रेमाच्या व्याकुळतेचे तरंग उठत होते. त्यांच्यासाठी एकमात्र प्राप्य वस्तू परमेश्वराचे प्रेम हे होते. जसजशी ही विव्हळता वाढत गेली, तस तसे त्यांचे धार्मिक आचार-व्यवहार आणि अंधानुकरणाने केले जाणारे क्रिया-कलाप यांच्याशी संबंध तुटत गेले. त्यांच्यासाठी संपूर्ण धार्मिक कृत्यांचा उद्देश हा त्या प्रियकराची प्रेमप्राप्ती होता. प्रेमाच्या अतिरेकामुळे हे बेशुद्ध होऊन जात. अशाप्रकारच्या आत्मविस्मृतीच्या अवस्थेस पोहोचणे हे ध्यान धारणा, स्मरण, आदींच्याद्वारे कठोर अभ्यासानंतरच शक्य असते. सूफींच्या मतानुसार ध्यान, स्मरण आणि अन्य क्रियांद्वारे आपल्या अहंकारास विसरूनच परमसत्तेशी जे व्यवधान असतात, त्यांना दूर सारले जाऊ शकते. पूर्वी जेथे या साधनांचा

आदर्श एकांतिक जीवन, निरासक्ती, दीनता आणि विनम्रता हे होते, तेथे आता परमेश्वरास प्रेमानेच प्राप्त करणे त्यांच्या जीवनाचे उद्दिष्ट बनले. केवळ बाह्याचाराचे यंत्रवत पालन सूफींच्या दृष्टिकोनातून व्यर्थ होते. ते आंतरिक शुद्धी आणि मन:पूर्वक, धर्मांचे नियम समजून घेऊन, तदनुसार धर्माचरण करण्यासच अस्सल धर्मपालन समजत असत.

ईश्वर अस्तित्वाच्या संदर्भात सूफींमध्ये मुख्यत: दोन संप्रदाय १) वुजूदिया (शुद्ध) अद्वैतवादी आणि २) शुहूदिया (विशिष्टाद्वैतवादी) प्रचलित आहेत. यांचा विकास भारतातील आचार्य शंकराचार्य आणि रामानुजाचार्यानंतर झालेला आहे. या सूफी संप्रदायांवर भारतीय प्रेमानुगा भक्तिसाधना आणि योग याचा संपूर्ण प्रभाव पडला आणि अद्वैतवेदान्ताने तर ते अगोदरच प्रभावित झाले होते.

वुजूदियांच्या मते वास्तविक सत्ता 'एक' आहे. त्या सत्तेशिवाय इतर अन्य सत्तेचे अस्तित्व नाही आणि ती एकमात्र सत्ता म्हणजे परमात्मा होय. हे संपूर्ण दृश्य जग त्याच परम सत्तेची अभिव्यक्ती आहे. म्हणून परमात्मा आणि जगत् यांच्यामध्ये साम्य आहे. ही समानता 'ज़ात' (सत्ता) आणि 'सिफ़ात' (गुण) यांची आहे. हे विश्व त्याच्या गुणांची अभिव्यक्ती मात्र आहे. या संप्रदायाचे सूत्र आहे – 'हमावुस्त' म्हणजेच 'सर्व काही तोच आहे.'

शुहूदियांचे असे मत आहे की परमेश्वराचे स्वरूप (ज़ात) एवढे मोठे आहे की त्याच्यासमोर सृष्टीचे सर्व पदार्थ नसल्यातच जमा आहेत. त्यांच्या मतानुसार ज़ात (स्वरूप)च दृश्य आहे आणि 'सिफ़ात' (गुण) हे नेहमी अव्यक्त असतात, जसे उपकारकर्त्यामध्ये लपलेल्या उपकार नामक गुणास कुणीच पाहू शकत नाही, मात्र उपकारकर्ताच प्रकट – व्यक्त असतो. शुहूदिया परमार्थ आणि अपरमार्थ अशा दोन सत्ता मानतात. एक परमात्म्याची सत्ता आहे, तर दुसरी जीवाची सत्ता, परंतु जीवाची सत्ता ही शून्यवत असते. तिला आपल्या अस्तित्वासाठी परमार्थ सत्तेवर अवलंबून राहावे लागते. परमात्मा आपल्या सत्तेस आपल्या गुणांमधून अभिव्यक्त करतो. या संप्रदायाचे सूत्र आहे –'हमाअज़ूस्त' म्हणजेच 'सर्व काही त्याच्यापासूनच आहे.'

प्रारंभिक काळाच्या सूफी संतवाणीच्या साहाय्याने त्यांच्या सिद्धान्तांना समजून घेणे सोपे जाईल. एकदा प्रसिद्ध सूफी साधिका **राबिया अल्–अदविया** ही आपल्या मैत्रिणींबरोबर एका हाती मशाल आणि दुसऱ्या हाती पाणी भरलेला तांब्या घेऊन येत होती. तिचा या कृतीचा हेतू काय, याची विचारणा केल्यावर तिने खुलासा केला की ती मशालीच्या आगीने स्वर्गास जाळून भस्म करू इच्छिते आणि नरकाच्या आगीस आपल्या पाण्याने विझवू इच्छिते. यामुळे परमेश्वर आणि त्याला प्रिय असणारे लोक (भक्त) यांच्या मधील व्यवधान समाप्त होऊन जाईल. त्याच्या (परमेश्वराच्या) चाहत्यांसाठी अशी कोणती वस्तू राहू नये की जिला प्राप्त करण्याच्या आशेने ते तिच्यावर प्रेम करू लागावेत आणि अशीही कोणती वस्तू राहू नये की जिच्या भीतीपासून त्राण प्राप्त करण्याची आकांक्षा निर्माण व्हावी. म्हणजेच भक्तासाठी स्वर्गाचा लोभ नसावा आणि नरकाची भीती नसावी. एकदा तिला विचारण्यात आले की काय तिचे परमेश्वरावर प्रेम आहे? तिने होकारात्मक उत्तर दिले. तर मग तू शैतानाची निश्चितच घृणा करत असशील? तिने तत्काळ उत्तर दिले की शैतानाची घृणा करण्यासाठी परमेश्वराच्या प्रेमाने तिच्या हृदयात जागाच शिल्लक ठेवली नाही. अशाच प्रकारे मुहम्मदसाहेबांना विनवणी करताना तिने म्हटले – हे प्रेषित! (रसूल) असा कोण बरे माणूस असेल की ज्याला आपण प्रिय नसाल! माझी

दशा मात्र काही औरच आहे. माझ्या हृदयामध्ये परमेश्वराचा एवढा प्रसार झालेला आहे की त्यामध्ये त्याच्याशिवाय इतर कुणालाच जागा शिल्लक नाही.

**जुन्नून मिसरीचे** कथन आहे की परमेश्वराचे स्मरण हाच आमच्या प्राणांचा आहार आहे. त्याचे गुणगान आमच्या प्राणांसाठी पेयजल आहे. त्याच्याशी सलज्जित होणेच आमच्या प्राणांचे परिच्छेद आहे. त्याच्या दृष्टीने 'मारिफ़त' (ब्रह्मज्ञान)चा संबंध हा ईश्वरावरील प्रेम किंवा त्याच्या कृपा-प्रसादाशी आहे. सर्वस्व समर्पण करून जो परमेश्वराचे वरण करतो तोच परमेश्वरास प्रिय असतो. **अबू यज़ीद बिस्तामी**च्या मतानुसार सर्वस्व त्यागामुळेच त्याची (ईश्वराची) प्राप्ती होऊ शकते. जरी साधकाच्या मनात परमेश्वर प्राप्तीची इच्छा असली तरी त्याला प्राप्त करणे कठीण असते. तसव्वुफ़चा आत्मा असलेला **मंसूर हल्लाज** याचे कथन आहे की, ''मी तोच आहे की ज्याच्यावर प्रेम करतो व ज्याच्यावर प्रेम करतो तो मीच आहे. आम्ही एका शरीरात दोन आत्मे आहोत. जर तू मला पाहतोस तर त्याला पाहतोस आणि जर त्याला पाहतोस तर आम्हा दोघांना पाहतोस.'' 'तज़करतुलऔलिया' या ग्रंथाचे लेखक फ़रीदुद्दीन अत्तार यांनी लिहिले आहे की, 'अन-अल-हक़'ची उद्घोषणा केल्यानंतर मंसूर हल्लाज यास मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली. सर्वप्रथम त्याचे हात कापण्यात आले. त्या वेळी तो हसत-हसत म्हणाला, माझ्या या बाह्य बाहूंना कापणे सोपे आहे, परंतु माझ्या आत्म्याच्या त्या हातांना जे स्वर्गाच्या त्या शिखरावरील मुकुट उतरवण्यास आतुर आहेत, त्यांना कापण्याचे सामर्थ्य कोणात आहे? अति प्रमाणात शरीरातून रक्तप्रवाह झाल्याकारणाने त्याच्या चेहऱ्यावरील निस्तेज पाहून, कुणी अशी समजूत करू घेऊ नये की तो त्या त्रासास वीरतापूर्वक सहन करू शकत नाही. त्याने आपल्या हातांनी आपल्या चेहऱ्यास त्या प्रवाहित रक्ताने माखून घेतले. आपल्याच रक्ताने आपल्या दोन्ही हातांना लाल करून तो म्हणत असे की हा प्रभुप्रेमीचा 'वज़ू' (आचमन) आहे. जेव्हा त्याचे दोन्ही डोळे काढण्यात आले तेव्हा उपस्थित जनसमूहामध्ये हाहाकार माजला. अनेकांना रडू कोसळले. जल्लाद (वधक) जेव्हा त्याची जीभ कापण्यासाठी सरसावला तेव्हा त्याने म्हटले, थोडे थांब, मी एक गोष्ट सांगणार आहे. जल्लाद थांबल्यावर त्याने म्हटले, हे परमेश्वरा! ज्यांनी मला इतके छळले, इतका त्रास दिला त्यांना सुखापासून वंचित करू नकोस. त्यांच्यावर आपली नाराजी दाखवू नकोस. कारण की तुझ्या मार्गावरच त्यांनी हे सर्व काही केले. माझे हात-पाय कापून, त्यांनी माझ्या इच्छित उद्दिष्ट्याच्या मार्गास कमी केले आहे. आता ते माझे डोके कापतील, तेव्हा मी सुळावरून तुझ्या दर्शनासाठी समर्थ बनू शकेन. शेवटचा प्राण निघण्याअगोदर त्याने पवित्र कुराणाच्या दोन श्लोकांचे पठण केले. त्याच्या शवाचे अग्निदाह केले गेले. हल्लाजच्या संबंधात त्याच्या समकालीन सूफी संत **शिबली**चे कथन आहे की माझी आणि त्याची (मंसूर हल्लाजची) श्रद्धा एकसारखी होती, परंतु माझ्या उन्मादाने मला वाचवले आणि त्याच्या बुद्धिमत्तेने त्याचा विनाश घडवून आणला. खरोखर हुतात्मा -शिरोमणी मंसूरचा वध 'रक्त-बीज'चा वध होता. हा वध तसव्वुफ़ (सूफ़ी तत्त्वज्ञान)साठी शक्तिदायक खत बनून गेला.

**३) सिद्धान्त आणि साधना :** सूफीवादाचे सिद्धान्त मूलत: शंकराचार्याच्या अद्वैतवादासारखे होते. वेदांती आणि योगी यांच्यासारखे सूफी पण ब्रह्म आणि जीव यांच्यामधील अद्वैतभावामध्ये पूर्ण विश्वास ठेवतो. तो योग्यांसमान पिंडामध्ये सुद्धा ब्रह्मांडाची झलक पाहतो आणि अशाप्रकारे आपल्या निर्मळ आचरणांनी शरीरास पवित्र बनवून शरीराच्या आतच अद्वैतानुभूतीचा आनंद प्राप्त करतो. अशाप्रकारे सूफी साधनेचे अंतिम उद्दिष्ट

परम सत्तेशी 'एकमेक' होणे हे आहे. सर्वेश्वरवादी सूफीच्या दृष्टीने ब्रह्म (हक़्) सर्वत्र व्याप्त आहे आणि जीव त्याचे अंश (ज़ात) बनून त्याच्यामधील शाश्वत जीवना ('बक़ा')साठी इंद्रियजन्य बाह्य अस्तित्वा ('नफ़्स' वासना)स नष्ट करून त्याच्यात विलीन होतो. सूफींच्या विचारधारेनुसार आध्यात्मिक जीवन एक यात्रा (तरीक़ा) असून, साधक (सालिक) हा एक यात्रेकरू असतो. सूफी साधनेच्या चार अवस्था किंवा सोपान पुढीलप्रमाणे आहेत –

**१) शरीअत (कर्मकांड),** तौबा (घडलेल्या अपराधांबद्दल प्रायश्चित्त), सब्र (सहनशीलता), शुक्र (कृतज्ञता), रिजा (आत्मसमर्पण), ख़ौफ़ (शिक्षेचे भय), तवक्कुल (विश्रंभ, अपरिग्रह), रज़ा (ईश्वरेच्छेवर निर्भर), ज़िक्र (नामस्मरण) आणि मोहब्बत (प्रेम) हे शरीअतचे अंग–घटक आहेत. शरीअतच्या सामान्य विधी परिपालनामुळे आध्यात्मिक आनंदाची प्राप्ती होऊ शकत नाही. तिच्यामुळे केवळ प्रियकर प्राप्तीच्या उत्कुकतेमध्ये तीव्रतेचा संचार होतो. जेव्हा उपासका (आबिद)स शरीअतच्या परिपालनामुळे समाधान मिळत नाही तेव्हा तो एखाद्या सद्गुरू (मुर्शद)च्या मदतीने (आशीर्वादाने) 'जिहाद' (चित्तवृत्तीस नियंत्रण करण्याचे)चे शिक्षण प्राप्त करून परम प्रियकराच्या मीलनासाठी वियोगी बनून प्रेममार्गावर अग्रेसर होतो आणि शरीअत (कर्मकांड)ला सोडून **(२) तरीक़त (उपासना कांड)**च्या क्षेत्रामध्ये शिरू लागतो आणि धर्माच्या इतर अंगाचा त्याग करून पावित्र्यासह प्रियकराच्या वियोग भावनेमध्ये घुटमळू लागतो. चित्तवृत्तीनिरोधा ('जिहाद')मुळे साधका('सालिक')मध्ये मुआरिफ़ अर्थात प्रज्ञेचा जन्म होतो आणि साधका (सालिक) पासून ब्रह्मज्ञानी (आरिफ़) बनून जातो. अशा स्थितीस पोहोचल्यावर तो ईश्वराच्या स्वरूपाचे चिंतन करत वियोगासच आपले साध्य बनवतो (मानतो) आणि **(३) मारिफ़त (ज्ञानकांड)** व **(४) हक़ीक़त (मुक्तीकांड)** या क्षेत्रांमध्ये आपल्या प्रियकरा (ईश्वर)शी संपूर्णपणे विलीन होऊन जातो.

अशा स्थितीत पोहोचल्यावर तो कर्मकांडाच्या बंधनांपासून मुक्त होतो. त्याला आता आपल्याकडून काही करण्याचे शिल्लक राहत नाही. 'हक़ीक़त'मध्ये प्रवेश केल्याने त्याला आपल्या प्रियकराच्या सौंदर्या (जमाला)चे दर्शन (दीदार) घडते आणि तो हळू–हळू त्या सौंदर्यावर मुग्ध होऊन 'वस्ल' (मीलन)च्या क्षेत्रामध्ये पदार्पण करतो, मग शेवटी 'वस्ल'पासून 'फना' (निर्वाण, परम पद)च्या दशेपर्यंत पोहोचतो. त्याला या गोष्टीची जाणीव पण होत नाही की तो आपल्या प्रियकराहून भिन्न वेगळा आहे. तो द्वंद्वापासून मुक्त होऊन 'अन–अल–हक़्' (मी ईश्वर आहे) असे ओरडू लागतो, आणि अशाप्रकारे आपले अहं किंवा अस्तित्वाचे विसर्जन करून 'बक़ा' (चिरंतनता)चा आनंद उपभोगतो. वास्तविक 'फना' आणि 'बक़ा'च्या स्थितींमध्ये अत्यंत सूक्ष्म असे अंतर (भेद) आहे. जे परमेश्वराच्या दृष्टीने 'बक़ा' आहे तेच जीवाच्या दृष्टीमध्ये 'फना' असते. शेवटच्या मजलापर्यंत पोहोचण्यासाठी साधकास काही टप्पे ओलांडावे लागतात. ते टप्पे असे आहेत – १) नासूत (जागृत अवस्था, नर लोक), २) मलकूत (स्वप्न अवस्था, देवलोक), ३) जबरूत (सुषुप्ती, ऐश्वर्यलोक), ४) लाहूत (तुरीयावस्था, माधुर्यलोक), काही सूफींनी आणखी एका लोकाची कल्पना केली आहे. ती म्हणजे ५) हाहूत तुरीयातीत अवस्था, (सत्यलोक). श्रद्धाळू (मोमिन) हा 'शरीअत'चे पालन करून नासूतमध्ये विहार करतो, मुरीद (शिष्य) हा 'तरीक़त'चे सेवन करून मलकूतमध्ये विचरण करतो, सालिक (साधक) हा 'मारिफ़त'

(ब्रह्मज्ञान)चे स्वागत करून जबरूतमध्ये विराम करतो आणि आरिफ़ (ब्रह्मज्ञानी) 'हक़ीक़त'चे चिंतन करून लाहूतमध्ये तल्लीन होतो. हीच सूफींची पराकाष्ठा आणि तसव्वुफ़ (सूफी तत्त्वज्ञान)ची परागती आहे.

प्रसिद्ध सूफ़ी अभ्यासक व विद्वान निकलसनच्या मतानुसार सूफींची अशी कोणतीही एक साधन-पद्धती नाही. ते वेगवेगळ्या पद्धतींनी ईश्वरासमीप पोहोचण्याचा प्रयत्न करतात. साधका (सालिक)स यात्रेअगोदर 'नफ़्स' (वासना) चित्तवृत्तीस मारून कल्ब (अंतःकरण) व रूह (आत्मा) चा विकास केला पाहिजे. शुद्ध स्वानुभूतिमूलक मारिफ़तचे ज्ञान प्राप्त केले पाहिजे. ग्रांथिक ज्ञानाची येथे उपेक्षा केली गेली आहे. मारिफ़तच्या भावावेगमय रूपाचे नावच प्रेम आहे. याला प्राप्त करण्यासाठी प्रत्येक सूफी व्यग्र असतो. आपल्या उद्दिष्टापर्यंत पोहोचण्यासाठी प्रत्येक साधकास भावातिरेकतेस ग्रहण करावे लागते आणि हृदयास शुद्ध करण्यासाठी त्याला सात टप्प्या (मुक़ामात)तून जावे लागते. हे सात टप्पे क्रमशः असे आहेत - १) प्रायश्चित्त, २) अकिंचनता, ३) संतोष, ४) अपरिग्रह, ५) ईश्वर विश्वास वा विश्रंभ, ६) धैर्य आणि ७) निरोध.

सूफी साधकांची अशी दृढ धारणा आहे की सहजानंद (भावाविष्टावस्था - 'वज्द')च एक असे स्रोत किंवा साधन आहे की ज्यामुळे आत्मा, परमात्म्याचा साक्षात्कार करू शकतो आणि तो त्याच्याशी एकत्व लाभ करू शकतो. भावाविष्टावस्थेशी निगडित सूफींनी फ़ना (विलय, निर्वाण), वज्द (सहजानंद), समा (संगीत), ज़ौक़ (स्वाद), शर्ब (प्राशन), ग़ैबत (आत्मविस्मरण), जज़्बात (आवेश) आणि हाल (तंद्रा) इत्यादी शब्दांचा प्रयोग केलेला आहे. एवढे मात्र खरे की परमेश्वराच्या चिंतन, ध्यानादीमुळे मनामध्ये मंथन निर्माण होते आणि हळूहळू साधक आपल्या अहंकारास विसरून जातो. साधकाच्या प्रयत्नाची ही शेवटची अवस्था आहे. हे साध्य झाल्यावर त्याला आपल्याकडून करण्यासारखे असे काहीच उरत नाही. भारतीय दृष्टिकोनातून सूफीवादाची प्रेमसाधना ही अद्वैत आणि विशिष्टाद्वैताची प्रेममयी भक्तीच आहे. सूफी साधनेमध्ये कर्मकांडविहीनता दिसून येते. त्यांचे लक्ष्य (उद्दिष्ट) हे ज़िक्र (जप) आणि तसव्वुफ़ (ईश्वरानुभूती) आहे.

### ख) सूफ़ी तत्त्वज्ञानाच्या संकल्पना[१२]

### १) मानवाची रचना- अध्यात्मवादी दृष्टिकोन

सूफींचे तत्त्वज्ञान म्हणजे साक्षात 'प्रेम-मंदिर'! तेथे नित्य उत्कट भक्तीचा सुगंध दरवळतो. भक्तीची सावली प्रेम आहे. प्रेम हे भक्तीचे चरमोत्कर्षक रूप असते. तसव्वुफचा समस्त प्रासाद हा प्रेमाच्या पायावर उभा असून तो त्यावर टिकलेला आहे. याच प्रेमाच्या जादूविषयी एका फ़ारसी कवीने आपले विचार समर्पकपणे पुढील शब्दांत मांडले आहेत - (त्याचा हा भावानुवाद आहे). ''इहलोक व परलोक हे दोन्ही लोक आनंददायक दारूच्या कैफीत आहेत, आणि तरीपण कुणीच मधुचा प्याला पाहिला नाही! दोन्ही भूगोलार्ध चिंब भिजवले गेले आहेत, आणि तरीपण कुणीच पाण्याचा एक थेंबसुद्धा पाहिला नाही! प्रेमाच्या यातनेत, वेदनेत (संपूर्ण) विश्व तृषार्त आहे, आणि तरी पण कुणीच विनोद, थट्टामस्करीचा खेळ पाहिला नाही! उन्मत्त आणि झिंगलेल्या अवस्थेत ते प्रेमाचा आक्रोश उंचावत आहेत; कारण प्रियकराने सुंदर मंत्राची मोहिनी घातली आहे, आणि तरी पण कुणीच पथिकाश्रम अर्थात मधुशाला पाहिली नाही!''

आता आपणास सूफी तत्त्वज्ञानाच्या संकल्पनेकडे वळले पाहिजे, आणि मानवाच्या रचनेविषयी आढावा घेतला पाहिजे. सूफींचा सिद्धान्त असे दाखवून देतो की मानवाची रचना दोन घटक-तत्त्वांनी बनलेली आहे. आध्यात्मिक आणि भौतिक. सत्‌तत्त्व किंवा सद्वस्तूकडे साधकाचे कूच करण्यामध्ये भौतिक घटक आड येतो. कारण त्यामध्ये दोष असतात. या दोषांना भेसळ किंवा हिणकस असे म्हटले जाते. निर्मळ सूफी संतास परम सत्तेमध्ये विलीन होण्यासाठी या भेसळीस काढून टाकावे लागते आणि हे तिच्या तेजामध्ये स्पष्ट झाले पाहिजे. हेच तर साध्य करण्याचा सूफींचा हेतू असतो. तथाकथित 'भेसळ' म्हणजे वासनेची कलुषता होय. कारण ''शरीर मिथ्या आहे, तर आत्मा हा सत्य आहे.''

सुप्रसिद्ध फ़ारसी गूढवादी तत्त्वज्ञ कवी मौलाना जलालुद्दीन रूमी आपल्या 'मसनवी' (कथा-काव्य)मध्ये असे म्हणतात की, तुझे वास्तविक सत्त्व हे मिथ्यामध्ये दडलेले असते, जसे ताकाच्या स्वादामध्ये लोण्याचा स्वाद अंतर्निहित असतो. रूमीप्रणीत 'ताक' आणि 'लोण्या'चा सविस्तर दृष्टांत असा आहे-

''तुझे मिथ्या म्हणजे हा नाशवान देह, तुझे सत्य म्हणजे तो भव्य, उदात्त आत्मा होय.

अनेक वर्षांमध्ये हे ताक अर्थात शरीर-देह दृश्य आणि प्रकट झाले, तर लोणी अर्थात आत्मा अप्रकट राहिला. माथणीमधील ताक, एक मंथन करणारा यासाठी कौशल्यपूर्ण पद्धतीने मंथन करतो की शेवटी त्याने हे जाणावे की माझा खरा जीवात्मा (लोणी) हा अव्यक्त होता, लपलेला होता.

किंवा प्रेषिताच्या वक्तव्याचा भाग (अंश) असलेली, निवडलेल्या एका दासाची वाणी, ही दैवी प्रेरणेच्या शोधार्थीच्या कानामध्ये गुंजू लागते.

खऱ्या श्रद्धावंताचे कान आमच्या दैवी प्रेरणेस मनात ठेवतात : असले एक कान हे मोठ्याने हाक मारणाऱ्या (परम संता)शी अगदी जवळ असते.

जसे (उदाहरणार्थ) बाळाचे कान मातेच्या शब्दांनी भरलेले असतात (आणि मग) हे आत्मसात करून ते बाळ कलात्मकरित्या बोलणे सुरू करते.

आणि जर बाळामध्ये आईचे शब्द ग्रहण करण्याची क्षमता नसेल तर, त्याला आईचे शब्द ऐकू येत नाहीत आणि मग तो बाळ मूक बनतो.

जो कोणी जन्मत: कर्णबधिर-बहिरा असतो तो नेहमी मुका असतो, (केवळ) जो कोणी (बालपणी) आपल्या मातेची वाणी ऐकतो तो एक बोलणारा (सवाक्) बनतो.

काही विशिष्ट दोषांमुळे मनुष्य हा बहिरा व मुका बनतो, हे जाणून असा, कारण शिकवले जाणारे शब्द ग्रहण करण्याची क्षमता बधिर कानांमध्ये नसते.

न शिकवता वाक्-शक्ती धारण करणारा हा फक्त परमेश्वर असतो. त्याचे गुण हे व्यंगापासून मुक्त असतात.

किंवा आदमसारखा एखादा की ज्याला आई-दाई आणि इतर आवश्यक गोष्टींच्या (मननाच्या) पडद्याविना ईश्वराने आज्ञापिले.

किंवा मसीह (ख्रिस्त), प्रेमळ ईश्वराच्या आज्ञेमुळे जन्मतः बोलत या जगात आला.

त्याच्या जन्मासंबंधी संशयास मागे लोटण्याच्या हेतूने (आणि हे सिद्ध करून दाखविण्यासाठी) येशू मसीहचा जन्म हा व्यभिचार व पापकृत्याचा परिणाम नव्हता.

ताकात अव्यक्त स्वरूपात असलेले लोणी प्राप्त करण्यासाठी एक मोठे मंथन आवश्यक आहे.

निरस्तित्वाप्रमाणे अस्तित्वहीनतेसारखे ताकातील लोणी हे अदृश्य असते. आपल्या अस्तित्वात ताकाने आपला झेंडा उंचावला आहे. (म्हणजेच लोणी व्यक्त झाले, प्रकट झाले.)

तुम्हाला ज्याचे अस्तित्व आहे असे वाटते, ते खरोखर केवळ त्वचा असते; तर जे नाशवान आहे असे वाटते ते खरोखर मूळ असते.

ताकाने अद्याप लोण्याचे स्वरूप घेतले नाही ते अजून जुने (शिळे) आहे. ते ताक साठ्यामध्ये ठेवा. तीतून जोपर्यंत तुम्ही लोणी काढून घेत नाही तोपर्यंत ते (ताक) उधळू नका.

कान देऊन (लक्षपूर्वक) ऐका, जाणीवपूर्वक हातोहात वळवा म्हणजे जे काही अव्यक्त आहे ते प्रकट होईल.

कारण हा नाशवान देह, अमर आत्म्याचा एक पुरावा आहे. मद्यपीचे बडबडणे हे मधुबालेच्या उपस्थितीचे एक प्रमाण आहे.

अथवा पुन्हा जेव्हा तो म्हणतो – हे खचितच जाणून असा की शरीअत (कर्मकांड) हे पवित्र आत्म्याचे आविष्कारण, प्रकटीकरण असते आणि वैयक्तिक विवेक निर्मित समानता ही हिच्या अधीन म्हणजेच गौण असते.

विवेक आकलनशक्ती प्रदान करतो आणि आत्म्यामुळे प्रबोधन होते, ज्ञानोदय होतो. अशा परिस्थितीमध्ये आत्मा हा विवेकाचा पर्यवेक्षणाचा विषय कसा बरे होऊ शकेल?

परंतु आत्मा हा विवेकावर एक ठसा उमटवतो, आणि त्या ठशाच्या परिणामस्वरूप विवेक एक निश्चित अधिकार चालवतो.

नूहप्रमाणे जर आत्मा हा तुमच्यामध्ये एक विश्वास असल्याचे घोषित केले असेल तर मग समुद्र, आणि नूहची नौका आणि नूहचा जलप्रलय कोठे असेल?

विवेकाला हा ठसा आत्मा आहे असे वाटते, परंतु सूर्यमंडलापासून सूर्यप्रकाश हा फार दूर असतो.

म्हणून गूढ मार्गावरील एखादा यात्रेकरू भाकरीच्या एका तुकड्याने (कुर्सी= पादपीठ) संतुष्ट होतो. तो त्या प्रकाशामुळे दैवी प्रभावक्षेत्राकडे फेकला जातो – ओढला जातो.

कारण हा प्रकाश खाली असतो आणि तो चिरस्थायी नसतो. तो प्रत्येक रात्रंदिनी बुडत असतो,

तर ज्याचे निवासस्थान (घर) दैवी कक्षेमध्ये असते, तो सतत त्या प्रकाशामध्ये निमज्जित होतो.

ना ढग ना सूर्य याच्यावर नेम लावून बसतात; अंत:करण पिरगळणाऱ्या ताटातुटीपासून तो मुक्त असतो.

अशा व्यक्तीचा जन्म आकाशापासून झालेला असेल किंवा तो पार्थिव असेल, त्याचे रूप बदललेले असते,

कारण एखाद्या मनुष्यप्राण्यास सदोदित (आपल्या शरीरावर) सूर्यकिरणांचा मारा सहन होऊ शकत नाही.

जर पृथ्वीवर निरंतर सूर्य आपल्या तेजाचा मारा करत असेल, तर ती अशा प्रकारे होरपळून निघेल की तिच्या पाठीवर कोणतेच फळ उगवणार नाही.

माशाचे कर्तव्यकर्म हे नित्य पाण्याशी निगडित असते, माशाच्या मार्गासोबत असण्याची शक्ती एखाद्या सापामध्ये कशी बरी असू शकेल?

परंतु डोंगर-पर्वतामध्ये असे चतुर सर्प असतात की जे या समुद्रात माशाची कृती करतात. जरी त्यांच्या कावेबाजीमुळे लोक फसतात, तरीपण समुद्राशी असणाऱ्या त्यांच्या तिटकाऱ्यामुळे त्यांचे पाखंड उघडकीस येते;

आणि या समुद्रामध्ये चतुर सर्प आहेत, ते आपल्या इंद्रजालामुळे सापांचे माशामध्ये रूपांतर घडवून आणतात-

दैवी ऐश्वर्याच्या समुद्राच्या सर्वात खोल तळाशी असलेला मासा : या समुद्राने त्यांना वैध यातुविद्या शिकवली आहे;

म्हणून त्यांच्या प्रकाशाच्या माध्यमाने, जी वस्तू हास्यास्पद होती ती एक वस्तुस्थिती बनून गेली, अपवित्र तिकडे गेले आणि पवित्र बनले.

जरी या विषयावर मी पुनरुत्थानापर्यंत बोलत राहिलो, आणि असे पुनरुत्थानांचे एक शतक संपले तरी हे संभाषण व्याख्यान अपूर्णच राहील.''

आपल्या सभोवती असलेले दृश्य जगाच्या अंतर्गत आपल्या स्थानाची संपूर्ण प्रचीती येण्याच्या शक्यते अगोदर भौतिक आणि आध्यात्मिक तत्त्वामधील असलेले संबंध हे सूफी संकल्पनेशी विणले पाहिजेत. स्वत:स योग्य परिप्रेक्ष्यामध्ये योग्य स्थानी ठेवून, समस्त सत्त्वाच्या प्रकाशाच्या शोधार्थ, सूफी हा आकाशाकडे उंच झेप घेतो- भरारी मारतो.

आपल्या सभोवती असलेले विश्व, आणि त्यामधील आपले स्थान याविषयी सूफींचा काय बरे सिद्धान्त असेल? काय जगाची निर्मिती निरुद्देश्य, मनोरंजनासाठी करण्यात आलेली आहे? तिच्या निर्मितीमागे हेतू तरी काय आहे? सरतेशेवटी समस्त सत्त्व कोठे आहे? हे सत्त्व विश्वामध्ये दिसते अथवा कळून येते काय? समस्त गुह्यांचे गुह्य स्पष्ट करताना सूफींकडे उत्पत्ती सूत्र किंवा प्रसर्जन सूत्र आहे. म्हणजेच सर्व काही त्याच्या (ईश्वरा)पासून निर्माण होते आणि सर्व सरतेशेवटी त्याच्यामध्येच विलीन झाले पाहिजे (होतात).

महान सूफी इब्नुल-अरबीचे असे मत होते की, अस्तित्व हे परम सत्ता किंवा सत्त्व असते. संकुचित अर्थाने हे अस्तित्व उद्‌भूत झालेले नसते. प्रसिद्ध सूफी विद्वान खाजा खान म्हणतात त्याप्रमाणे ते स्वत: सत्तामात्र असते, आणि पुढे म्हणतात की तिच्यापासून निष्पादित अस्तित्व निष्पन्न होते, आणि पुन्हा हे अस्तित्व केवलत्ववादापासून केवल तत्त्व असते, आणि शेवटी जग हे या अस्तित्वाची एक मर्यादा. ('ताय्युन') तन्मात्रा हे या मर्यादेचे नाव आहे. हे अस्तित्व सर्वांचे परम सत्त्व आहे. अथवा अरबी भाषेत याला 'ज़ात' असे म्हणतात.

## २) उपपत्ती सिद्धान्त वा प्रसर्जन सिद्धान्त वा निस्सरण सिद्धान्त[१३]

परम सत्ता किंवा परम सत्त्वाचे दोन पैलू असतात – एक 'ज़ात'चा पैलू. या पैलूचे स्वयंभू अस्तित्व असते आणि ते आत्म-स्वायत्त असते, आणि दुसरा पैलू हा 'अस्मा'चा असतो. ही नामके असतात. हा पैलू गुण आणि क्रियांनी संयुक्त असतो. म्हणजेच हा सुप्त आणि सक्रिय दोन्ही असतो. 'अयान-ए-साबित' अर्थात समग्र समरूप (निश्चित तत्त्व, सत्ता म्हणजेच ज्ञानामध्ये निश्चितता असलेली सत्ता वा तत्त्व)च्या स्थाननिश्चिती व्यतिरिक्त अशाप्रकारे तिचे गुणनिर्देश करता येऊ शकत नाही, कारण एखाद्या आधीच ज्ञात असलेल्या अस्तित्वाशिवाय एखादा ज्ञाता असू शकत नाही. ही शेख मुहिय्युद्दीन इब्न-ए-अरबी (इ.स. ११६५-१२४१)च्या युक्तिवादाची दिशा आहे. शेख अब्दुल करीम इब्न-इब्राहीम जीली या सिद्धान्तावर टीका करतात. ज्ञानामध्ये अगोदरच अस्तित्वात असलेल्या ज्ञाता (ज्ञेया)स, ज्ञात्याने तिला आदेश दिला. अशाप्रकारे ज्ञेयाने ज्ञात्यास निर्माण केले. हे त्याच्यामधील एक प्रकारची उणीव दाखवून देते. हे अतर्क्य आहे. अस्तित्वहीनतेचे अस्तित्वहीन होणे हे सत्‌तत्त्व वा सद्‌वस्तू आहे, तर अस्तित्वाचे अस्तित्वहीन होणे हे अवास्तव आहे. दोन अस्तित्वहीनतेमधील सत्‌तत्त्व हे एक अवास्तव असते. अशअरी यांचे असे मत होते की अस्तित्व हे स्वतःच 'ज़ात' आहे आणि इतर सर्व संप्रदाय असे मानतात की अस्तित्व ही अवस्था ('हाल') असते. जोपर्यंत सत्त्व राहते तोपर्यंत हे सत्त्वास आवश्यक असते आणि या अवस्थेस कारण ('इल्ला') नसते. इजिप्तचा एक विद्वान पंडित – मुहम्मद फ़ुज़ली (तेराव्या हिजरी शतकाचा पूर्वार्ध) म्हणतो की, तिचे अवस्था असण्याचा अर्थ हा आहे की, ते सत्ता किंवा तत्त्व ('मौजूद') असण्याच्या मात्रेपर्यंत पोहोचत नाही आणि तिचा समावेश एखाद्या सत्ताहीनतेच्या ('मादूम') अंशापर्यंत होत नाही, की जेणेकरून ते विशुद्ध – संपूर्णपणे अस्तित्वहीन असावे, परंतु हे एक सत्ता आणि एक सत्ताहीनता यांच्या मध्यभागी आहे. म्हणून उदाहरणार्थ, ज़ैदचे अस्तित्व, ही एक त्याच्या सत्तेस आवश्यक अशी अवस्था आहे. ही अवस्था त्याच्या सत्तेपासून वेगळी करता येऊ शकत नाही आणि जेव्हा असे म्हटले जाते की तिला कारण नाही, तर याचा अर्थ असा होतो की ज़ैदच्या शक्तिसंपन्नतेच्या (क़दीर, शक्तिशाली) विरोधात काहीच निर्माण करत नाही, उदाहरणार्थ, त्याच्या शक्तीमध्ये निर्माणक्षमता (कुद्र) आहे म्हणून शक्तिसंपन्नता आणि त्याचे अस्तित्व ह्या दोन अवस्था आहेत. हे त्याच्या सत्त्वामध्ये अस्तित्वात आहेत आणि ते पंचज्ञानेंद्रियांना अज्ञात असतात.

या सिद्धान्तान्वये परमेश्वराचे सत्त्व हे त्याचे अस्तित्व नसते आणि निर्मित वस्तूंचे सत्त्व हे त्यांचे अस्तित्व नसते. परंतु अल-अशअरी असे मानतात की परमेश्वराचे अस्तित्व हे सत्तेचे आत्मतत्त्व ('ऐन') असते. बाह्यतः तिच्यामध्ये वाढ नसते, आणि एखाद्या निर्मित वस्तूचे अस्तित्व हे तिच्या सत्त्वाचे आत्मतत्त्व असते. अस्तित्व आणि अस्तित्वहीनता हे दोन्ही आपापले समसमान समतोल राखतात आणि ईश्वराने अस्तित्वहीनतेपासून जगास अस्तित्वात आणले. तथापि, या बाबीची नोंद घ्यावी की, जर सत्त्व हे अस्तित्व असेल, तर शेख सादी यांनी प्रस्तुत केल्याप्रमाणे असे म्हणता येऊ शकत नाही की ''ते विचार, अटकळ, कल्पना आणि आभासापेक्षा वरच्या दर्जाचा असू शकेल.'' कारण 'शय' (पुद्‌गल, पदार्थ)च्या व्याख्येप्रमाणे अस्तित्व म्हणजे 'जे काही' आहे आणि यांच्या दृष्टीच्या टप्प्यात आणता येऊ शकेल. हे इच्छुकाचे इच्छित ('शा शैन') आहे. तथापि पवित्र कुराण असे म्हणते की, ''ईश्वरासदृश्य कोणतीही वस्तू नाही'' ४२:११ ('लैस कमसिलिहि शयुन्')

म्हणजेच याचा अर्थ असा होऊ शकेल की तो स्वयं सत्ताधीश आहे; ''अस्तित्वात असो की नसो, 'शय' (पुद्गल, पदार्थ) म्हणजे अशी एक संकल्पना असते की जिच्याविषयी काही ठासून सांगता येऊ शकेल आणि जी ज्ञात होऊ शकेल.'' जर 'जे काही' ('शय') अस्तित्वात असेल तर ते 'वुजूद' (सत्ता) आहे. वाटल्यास अहमदनगर म्हणा, ते 'जे काही' आहे आणि ते 'अस्तित्वात' आहे, आणि म्हणून ती एक सत्ता आहे. जर हे 'जे काही' अस्तित्वात नसेल, जसे 'अन्क़ा' नावचा काल्पनिक पक्षी तर ते 'अदम' (शून्य, सत्ताहीन) आहे. या मतान्वये, अस्तित्व हे सत्तेवर अध्यारोपित आहे, आणि सत्ता ही 'विचार, अटकळ, कल्पना आणि आभास' यांच्या दृष्टीच्या टप्प्यात येत नाही. प्लॉटिनस आणि डायोनिसस हे या मताचे होते. ही सत्ता मात्र प्रत्येक वस्तूमध्ये व्यक्त असते.

एके दिवशी प्रेषित मुहम्मद साहेब (त्यांच्यावर शांती वसो) यानी कुरेशी टोळ्याच्या नेतेमंडळींना एकत्र बोलावून त्यांना उद्देशून म्हणाले, ''जर तुम्ही मन:पूर्वक निष्ठेने एक शब्द उच्चाराल तर तुम्ही अरब आणि अरबेतर (अजम) जगाचे धनी व्हाल.'' त्या मंडळीचा पुढारी अबू जहल याने हे ऐकून असे उत्तर दिले की, ''आम्ही तुमच्याकडून एक शब्दच काय, दहा-दहा शब्द स्वीकारण्यास तयार आहोत.'' प्रेषित म्हणाले, ''म्हणा अल्लाहशिवाय कुणी इतर ईश्वर नाही'' हे ऐकून संपूर्ण मंडळी आश्चर्यचकित झाली, आणि उत्तरली, ''जगभरात एकच ईश्वर कसा बरे सामावेल!'' आणि पुढे असे म्हणाले, ''काय मुहम्मदाने सर्व देवांना एक ईश्वर करून टाकले?'' ही तर फार मोठी अजब गोष्ट आहे.

हे सर्व श्रोते शुद्ध अरब वंशाचे होते. त्यांची भाषा अरबस्थानातील सगळ्यात शुद्ध अशी भाषा होती. कुरेशांची अरबी भाषा ही अरबस्थानातील प्रमाणभाषा म्हणून मानली जाई. त्यांना भाषेच्या सूक्ष्म छटा कळत असल्या पाहिजेत, आणि ते खचितच समजले की प्रेषिताच्या उपरोक्त शिकवणीचा मथियार्थ हा होता की, सर्वकाही परम सत्तेची अभिव्यक्ती आहे. प्रत्येक गोष्ट ही स्वत: होऊन एखादी उपास्य देवता नसते, परंतु ते त्याचे आविष्करण असते, जसे प्रकाशाचा प्रत्येक किरण हा सूर्य नसतो, परंतु ते सूर्याचे एक आविष्करण असते. 'ज़ात' (परम सत्ता) (कोणत्याही अर्थाने का होईना) स्वत: कसे आविष्कृत होते आणि 'ज़ात' (नाम) व 'सिफ़ात' (रूप) यांच्या दरम्यान कोणता संबंध आहे आणि शेवटी 'रब' (प्रभू) आणि 'अब्द' (दास, भक्त) (स्रष्टा आणि सृष्टी) यांच्यामध्ये सुद्धा कशाप्रकारचे संबंध आहेत हे निस्सरण सिद्धान्ताचे विषय आहेत. वर स्पष्ट केल्याप्रमाणे आयोनिक, डोरिक, आणि ईलेटिक संप्रदायांच्या तत्त्ववेत्त्यांचे आपापले स्वतंत्र सिद्धान्त आहेत. सॉक्रेटिसचा निश्चित असा सिद्धान्त नव्हता. प्लेटोचे प्रत्यादर्श किंवा बीजजातीचे आपले जग होते. ॲरिस्टॉटलची 'शिव-जिवा'ची दोन शाश्वत तत्त्वे होती. इस्कंदरिया (अलेक्झांड्रिया) संप्रदायाच्या स्थापनेपर्यंत ईश्वर आणि मानव यांच्यामधील संबंधांविषयी कोणताच निश्चित असा सिद्धान्त नव्हता. ग्रीक, यहूदी (ज्यू) आणि ईसाई (ख्रिश्चन) या सर्वांच्या संकल्पना कार्यरत होत्या. यहूदी-प्लेटोवादाचे दर्शन फायलोच्या लिखाणांमध्ये दिसून येते, जगाच्या माध्यमातून ईश्वर प्रकट झालेला आहे. ईश्वराचे प्रथम आविष्करण अथवा (ते म्हणतात तसे) ईश्वराचा प्रथम उदय (जन्म) जॉन (याह्या)च्या गॉस्पेल (संपूर्ण सत्य)मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रथम शब्दब्रह्म वा चिद्रूप (लोगॉस) आहे. या प्रथम शब्दब्रह्माने जग निर्माण केले. हे निस्सरण सिद्धान्ताचे अपक्व स्वरूप आहे. दैवी सत्‌तत्त्वांच्या एका भौतिक स्वरूपातील आवेष्टणामधून विश्व निर्माण केले गेले.

'अयान-ए-साबिता' (समग्र प्रतिरूप, समग्र समरूप)चे सिद्धान्त स्पष्ट करण्याचा हा पहिला प्रयत्न आहे. प्रोक्लसला ख्रिश्चन धर्मामध्ये दीक्षित करून घेण्याविषयी डायोनिस्सने लिहिले. अम्मोनियस सॉकसचा शिष्य प्लॉटिनियस हा नव-अफ़लातूनवादी - नव प्लॅटोनिक संप्रदायाचा संस्थापक होय. झेलरचे असे मत आहे की, ''प्लॉटिनसच्या सिद्धान्तास एका सक्रिय सर्वेश्वरवादी सिद्धान्ताव्यतिरिक्त, निस्सरण सिद्धान्त वा उपपत्ती सिद्धान्त म्हणवून घेण्याचा मुळीच अधिकार नाही.'' त्याचा सिद्धान्त वुजूदिया (अद्वैतवाद)पेक्षा शुहूदिय्या (विशिष्टाद्वैतवाद) सिद्धान्ताशी अधिक जवळचा आहे.

''सर्वांगपरिपूर्ण एक (परमसत्ता) ही नित्य स्वत:मधून अशाप्रकारे बाहेर प्रवाहित होत असते, अनंत युगांपूर्वी त्याने तंतोतंत आपल्यासारखेच एक परिपूर्ण स्वरूपातील अन्य सत्ता-अस्तित्व निर्माण (उत्पन्न) केले. ही त्याच्या स्वत:च्या अनंततेची फलोत्पत्ती होती.'' (मॅरेल्ल, 'हिस्ट्री ऑफ फिलॉसॉफी', पृ. ११५) हा दुसरा सिद्धान्त आहे आणि याला प्रज्ञा, विवेक किंवा 'लोगॉस' (वैश्विक बुद्धितत्त्व) असे म्हणतात. निस्सरण सिद्धान्त असे मानते की परम सत्तेपासून निघणाऱ्या अस्तित्वाच्या विस्तारणाऱ्या वर्तुळस्वरूपात विश्व क्रमशः खाली अवतरित होते. सर्वोच्च, सर्वात लगत आणि सर्वात जास्त गतिमान ग्रहांच्या कक्षेमध्ये, देवदूत, सर्वोच्च श्रेणीचे प्रमुख देवदूत आणि सिंहासने या सर्वांच्या देदीप्यमान रांगा प्रकाशतात आणि गातात. अथवा महान गूढवादी तत्त्वज्ञ कवी मुल्ला जामी याने असे प्रस्तुत केले आहे -

''शून्याच्या अवकाशापासून जे काही बाहेर आलेले असते, त्यापैकी प्रथम रांगेस देवदूतांची रांग समज.''

सर्वांतर्यामित्व सिद्धान्त किंवा सर्वेश्वरवादी सिद्धान्त (शुहूदिया संप्रदाय) अशी घोषणा करतो की ईश्वर हा सर्वत्र विद्यमान असतो. निरीक्षक एक आहे आणि आरसे असंख्य आहेत. आरशांच्या असंख्यतेमुळे पुष्कळ आरशांमधील एकत्वतेच्या प्रतिबिंबास बाधा निर्माण होत नाही. तो सर्व आरशांमध्ये आपल्या प्रतिबिंब स्वरूपात हजर आहे. इहलोकी ईश्वर हा आपल्या 'अब्द' (दास, भक्ता)शी इतका जवळ आहे की जणू काही तो त्या (मृता)च्या कबरीच्या दुसऱ्या बाजूस (उभा) आहे. (''तो तुमच्यासमवेत आहे जेथे कुठे तुम्ही आहात.'' ५७:४) उपपत्ती सिद्धान्त किंवा निस्सरण सिद्धान्ताची तुलना एखाद्या सूच्यग्रस्तंभ (पिरॅमिड)शी केली जाते. सूच्यग्रस्तंभ म्हणजेच पिरॅमिडचे शिखर हे एक बिंदूसारखे असते आणि जसजसे आपण खाली त्याच्या पायाकडे जातो तसतसे तो विस्तारित क्रम धारण करतो. सर्वेश्वरवादाचे प्रतीक केंद्रस्थानातील एक बिंदू असून, ते सर्व बाजूंनी परिघाकडे विस्तारत असते. डायोनिसस (सहाव्या शतकाचे मध्य)च्या काळापासून पाश्चात्त्य तत्त्वज्ञानामध्ये निस्सरण सिद्धान्ताने मूळ धरले होते. चौदाव्या शतकापर्यंत याचा प्रसार होता. ऱ्हाइनलँडचा गूढ तत्त्वज्ञ एखार्ट (चौदाव्या शतकाचा मध्य) याने निस्सरण सिद्धान्ताऐवजी सर्वेश्वरवाद सिद्धान्ताची प्रस्थापना केली. तद्वत शेख़ अकबर मुहिय्युद्दिन इब्न-अरबी (बारावे शतक) याने वुजूदिया (अद्वैतवादी) संकल्पनेस परिपूर्णतेकडे नेले आणि अलाउद्दौला समनानी (चौदाव्या शतकाचा आरंभ) आणि त्याचा शिष्य, अब्दुल करीम जीली यांनी वुजूदिय्याऐवजी शुहूदिय्या (विशिष्टाद्वैतवादी) संप्रदायाची स्थापना केली. मध्ययुगीन वातावरण हे आध्यात्मिक विद्युतभाराने उद्भारित होते. त्या काळी पूर्व आणि पश्चिमेमध्ये स्पर्शक्षम संप्रेषण नव्हते, आणि म्हणून विचार-प्रवाह हा पश्चिमेकडून पूर्वेकडे किंवा पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहत होता असे म्हणता येऊ शकत नाही. तिसरा सिद्धान्त हा आत्म्याशी निगडित आहे, तर चौथा सिद्धान्त म्हणजे प्रकृती ('तबियत-ए-कुल').

नरकदूत सिद्धान्त किंवा दैत्य सिद्धान्तामध्ये 'आलम-ए-मिसाल' (सादृश्य सिद्धान्त वा प्रतिरूप सिद्धान्त) सिद्धान्ताने नुकतीच आपली अस्पष्ट रूपरेषा प्रकट केली होती. तोपर्यंत तिने आपले स्वरूप पूर्णपणे बनवले नव्हते. परंतु एक दैत्य प्रत्येक माणसासोबत असतो. जसे सॉक्रेटिसचा दैत्य हा त्याला समोरून मेंढ्यांचा एक कळप केव्हा येणार आहे याची कल्पना देत असे. त्यामुळे त्याला बाजूच्या आळीतून जाण्याची सूचना देत असे. सर्वात शेवटी विश्वाचे आविष्करण होते. नव-प्लेटोवाद्यांमुळे साखळीचे दुवे प्रस्थापित झाले. ते उजळले गेले आणि कुराण व हदीसच्या शिकवणीवर भर देणाऱ्या मुस्लिम तत्त्ववेत्त्यांनी आपल्या मालिकेत – साखळीत बसवले.

निस्सरण किंवा उपपत्ती सिद्धान्त म्हणजे वस्तूंच्या उत्पत्तिस्थानाविषयी एक चर्चा होय. ते 'हक़ायिक़' (बृहत्तर गुह्ये)चे क्षेत्र घडवते, 'दक़ायिक़' (लघुत्तर गुह्ये) नावाचे दुसरे क्षेत्र हे सूफी तत्त्वज्ञानाच्या रहस्यात्मक अंगाशी निगडित आहे. सूफी तत्त्वज्ञानाच्या भौतिक पायावरच्या संपूर्ण इमारतीस एक नव-अफ़लातूनी – नव प्लॅटोनिक आधार आहे, रहस्यात्मक बाजू, 'दक़ायिक़' हे जीवनाची गुह्ये स्पष्ट करण्याचा एक मौलिक (मूळ) प्रयत्न आहे, आणि हिचे मूळ विशुद्ध इस्लामी आहे.

प्रा. इ. जी. ब्राऊन यांचे असे मत आहे की, ''मुहिय्युद्दीन इब्न अरबीप्रमाणे इब्नुल फ़रीद तसेच ज़ुन्नून मिस्री यांचा इराणशी संबंध नव्हता आणि म्हणून सूफीवाद हा इराणी किंवा आर्य विचाराचे एक आविष्करण नव्हे. इत्यादी.'' सूफीवादाच्या अनेक विद्वानांनी त्यास मूलत: एक आर्य आंदोलन मानले आहे आणि याच कारणामुळे या वस्तुस्थितीवर भर द्यावा लागतो की इस्लामचे दोन महानतम गूढवादी आणि कदाचित एक तिसरे ज़ुन्नून मिस्री हे आर्येतर मुळाचे होते.

'दक़ायिक़' हे खरोखर उत्कर्ष ('तरक़्क़ियात') सिद्धान्त वा आरोहण सिद्धान्त आहेत आणि हे विशुद्ध इस्लामी मुळाचे आहेत. हे सिद्धान्त नानाविध आहेत, जसे म्हण आहे, ''जितके मानवआत्मे आहेत, तितकेच ईश्वराकडे जाण्याचे (अनेक) मार्ग आहेत.'' अस्तित्वास अवरोहणे आहेत म्हणजेच मर्यादेनुसार आविष्करण. या अस्तित्वाच्या आंतरिकशक्ती ('शुयन्नात') आहेत. जसे एका बीजामध्ये एका वृक्षाची आंतरिक शक्ती (दडलेली) असते. या अवस्थेमध्ये कुठलेच गुण किंवा 'अस्मा' (नामे) आढळून येत नाहीत. या टप्प्यामध्ये 'ज़ात' (नाम, सत्ता) यास 'मुन्क़तुल इशारत' (सर्व खुणांचे, चिन्हांचे गाळणे, वगळणे) असे म्हणले जाते. 'ज़ात-ए-साज़ज़' (वर्णहीन 'ज़ात') 'मजहूलुलनास' (गुणांद्वारे अपरिभाषित) 'ग़ैबुलगूयूब' (विचारामध्येसुद्धा अव्यक्त), 'ला तायुन' (अमर्याद) 'ग़ैब-ए-मुत्लक़' (परम अगोचर), 'वुजूद-ए-बहत' (विशुद्ध अस्तित्व), 'ऐनुल काफ़ूर' (कर्पूरस्वरूप वा कर्पूराचे वास्तव, म्हणजेच जे काही कर्पूरामध्ये मिसळले जाते ते कर्पूरच बनून जाते). आपल्या आविष्करणासाठी प्रत्येक अवरोहणाचे आपले स्वत:चे एक जग असते. दुसऱ्या टप्प्यास (अवस्थेस) 'वाहिदिय्यत' असे म्हणतात. यांच्या दरम्यान 'वहदत' नावाची सीमारेषा आहे, जसे वर्तमानकाळ हा भूतकाळ आणि भविष्यकाळ यांच्या दरम्यान (सीमारेषेसारखा) असतो. याला 'बर्ज़ख़' (संचित, मध्यलोक, स्वर्लोक – आपल्या उपरोक्त उदाहरणात 'वहदत' हे 'बर्ज़ख़' आहे) असे म्हणतात. याला 'हक़ीक़त-ए-मुहम्मदी' (मुहम्मदांचे वास्तव किंवा सत्‌तत्त्व) असेही म्हणतात. हा तो आरसा आहे की ज्याच्यामध्ये ईश्वर हा आपले नाम ('अस्मा') रूप पाहतो. जोपर्यंत काचेवर पाऱ्याचा लेप किंवा थर चढवलेला नसतो, तोपर्यंत

पाहणारा हा आपला चेहरा आरशात पाहू शकत नही. (म्हणजेच लेपाशिवाय, चेहऱ्याचे प्रतिबिंब दिसणे शक्य होत नाही.) 'बर्ज़ख़' (संचित, मध्यलोक, स्वर्लोक) शिवाय, गुणांचे आविष्करण होणे अविचारणीय बनून जाते. तिसरे हे आत्म्याचे जग असते (याला 'आलम-ए-जबरूत' पण म्हणतात), चौथे 'मिसाल' (याला 'मलकूत' पण म्हणतात), पाचवे आहे 'शहादत' (बाह्य जग) आणि सहावे आहे 'इन्सानुल कामिल' (पुरुषोत्तम किंवा नरोत्तम) यामध्ये सर्व गुण आणि 'अस्मा' नामांचा समावेश होतो. मुहम्मदचे वास्तव, अशाप्रकारे आदम (आद्य मानवा)मध्ये संपूर्णपणे आविष्कृत, अवतरित झालेले आहे. अशाप्रकारे एकूण सहा टप्पे आणि पाच आविष्करणे आहेत आणि नंतरच्या या पाच आविष्करणांना 'हज़रत-ए-ख़म्सा' (पंच आविर्भाव, पंच प्रकटीकरण) असे म्हणतात.

सव्वाशे वर्षांपूर्वीच्या मानसशास्त्रामध्ये फक्त मन आणि जडद्रव्य हे अभ्यासाचे विषय असत, त्यामध्ये ईश्वरास जागा नव्हती. मन हे जडद्रव्यहीन होते, तर जडद्रव्य हे मन कधीच नव्हते (अशी म्हण रूढ होती). ('Mind is no-matter, and matter is never mind.') ज्या प्रमाणे पित्त हे पित्ताशया (यकृता)ची पैदास नसते किंवा शेलिंगच्या उदाहरणात (संदर्भात) जडद्रव्य हे सुप्त मनामध्ये बदलता येत नाही, त्याचप्रमाणे मनास जडद्रव्याच्या चकाकीमध्ये बदलता येत नाही. मन म्हणजे चेतन अवस्थेची केवळ एक मालिकाच असते. या क्षणभंगुर अवस्था कशा प्रकारे एकमेकास जोडल्या जात हे अज्ञात होते, जसे डार्विनच्या जीवशास्त्रामध्ये हरवलेले दुवे अज्ञात होते. या सिद्धान्ताने सध्या एका चेतनक्षेत्रास जागा करून दिली आहे. एका व्याख्येच्या चार कोनांमध्ये याला बसवता येत नाही. चेतनेचे एक क्षेत्र आहे, **अधिक** तिचा अनुभूत अथवा विचारणीय विषय, **अधिक** त्या विषयाप्रती तिची मनोधारणा, **अधिक** गुणधारी आत्मतत्त्व बोध वा संवेदना (हे ते चार घटक आहेत.)

प्रथम चैतन्य-बिंबावर एक बिंदू दिसतो. हा बिंदू एक काल्पनिक मर्यादा दर्शवतो. हा बिंदू आणि चेतनेच्या दरम्यान एक मन:प्रवृत्ती निर्माण होते, आणि नंतर पुन्हा त्या बिंदूवर लागू होणारी चेतनेची संकल्पना कार्यान्वित होते.

सूफींच्या मतान्वये तो बिंदू (न सत्त्व असतो न युक्लिडच्या व्याख्येप्रमाणे विस्तार असतो) स्वत:च्या ज्ञानामधील 'ज़ात' (परमसत्ता)ची मर्यादा असते. अशाप्रकारे 'इल्म' (ज्ञान)चे 'ऐतिबार' (काल्पनिक मर्यादा) स्पष्टपणे कळून येते. 'ज़ात' जणूकाही आपल्या ज्ञानामध्ये अवतरित होते. ज्ञानामधील 'ज़ात'च्या मर्यादामुळे अस्तित्वाची संकल्पना अंतर्भूत होते. स्वत:ची तिची जाणीव हे 'मी' ('नूर' - प्रकाश) असते. स्वत:कडे पाहत तिला आपल्या अंत:शक्तींची ('शुयूनात') जाणीव होते. हे 'शुहूद' आहे. दुसऱ्या शब्दांत जेव्हा 'ज़ात' ने स्वत:कडे पाहिले तेव्हा तिला तिच्यात (आपल्यात) गुण (म्हणजेच नामे) असल्याचे आढळून आले. अशाप्रकारे अस्तित्व म्हणजे संबंध धारण करण्याचे एक विधान आहे. सूफी विचारक अब्दुल करीम जीली याचे तत्त्वसूत्र होते - अस्तित्व हे खुद्द (स्वत:) विचाराशिवाय दुसरे काहीच नसते. जेव्हा 'ज़ात'ने आपल्या नामरूपांना (गुणांना) ओळखले, तेव्हा ज्ञानोदय झाला, जेव्हा तिने सौंदर्य शोधले, तेव्हा 'नूर' (प्रकाश) उदयास आले. जेव्हा तिने स्वत:स ओळखले, तेव्हा ते तिचे 'शुहूद' होते. अथवा इतर काहींच्या मते, स्वत:स न्याहाळल्यावर 'नूर' होते, स्वत:चा शोध घेतल्यावर अस्तित्व दिसून आले, आणि खुद्द स्वत: म्हणजे 'शुहूद'

आणि या सर्वांना ओळखणे म्हणजे ज्ञान. दुसरे पुन्हा असे म्हणतात की 'अयान'ची समग्रता म्हणजे 'अक़्ल-ए-कुल' (केवल विवेक). 'ज़ात' आणि ही समग्रता यांमधील संबंध म्हणजे गुण. मूलतः ही समग्रता संपूर्ण विनाशामध्ये (समाविष्ट) होती, जशा 'ज़ात'च्या चकमकाच्या दगडामध्ये ठिणग्या (सुप्तावस्थेत) असतात, किंवा तिच्यामध्ये विलीन असतात. प्रथम गुण होते 'इल्म' (ज्ञान); जेव्हा 'अयान' उदय पावले, तेव्हा 'ज़ात'ने 'अदम' (शून्यता, नास्तित्वता) वर 'अयान'ला प्राधान्य दिले. हा 'ज़ात'चा 'इरादा' (संकल्प) होता. जेव्हा ते 'अयान'शी कार्यरत झाले, तेव्हा शक्तीने प्राधान्य ग्रहण केले. जेव्हा 'ज़ात' ने त्यांना त्यांच्या आविष्करणाअगोदर पाहिले, तेव्हा ती दृष्टी होती, जेव्हा 'अयान' ची अभिक्षमता (आवड) प्रमुख बनली, तेव्हा जणू काही त्यांनी आपले व्यक्तित्व जाहीर केले, 'ज़ात'ने हे ऐकले. अशा रितीने तिला श्रवणशक्ती प्राप्त झाली.

पहिल्या टप्प्यामध्ये, जिला **'अहदीय्युत'** म्हणतात, तेथे असीम वसते (आहे). दुसऱ्यामध्ये जे 'वहदत' म्हणून ओळखले जाते, तिच्यामध्ये चार अंतःशक्ती ('शुयूनात') आढळतात. प्लेटोस सत्‌तत्त्वापेक्षा श्रेष्ठ असा ईश्वर आढळला. प्लॉटिनसने त्याला सत्‌तत्त्व, विचार आणि शक्ती प्रदान केले. आणि त्याला डिमिरगस म्हणून संबोधले. 'ज़ात'चे 'एतिबारात' हे प्लॉटिनसने विचारार्थ पुढे मांडलेले दैवी (ईश्वरी) प्रकृतीमधील काल्पनिक संबंध होते. या दुसऱ्या टप्प्यामध्ये 'ज़ात' किंवा एक दुसऱ्यापासून भिन्न नव्हते. त्यांच्यामध्ये फरक नव्हता. अशाप्रकारे 'ज़ात'च्या आंतरिक शक्ती प्रथम ज्ञानामध्ये व्यक्त झाल्या. तिसऱ्या टप्प्यामध्ये (अथवा द्वितीय मर्यादा) स्वचे ज्ञान 'शुयूनात (विभू)चे ज्ञान बनले. "अल्लाहने आपल्या ज्ञानाने प्रत्येक गोष्टीस वेढून ठेवले आहे." ६५:१२ अस्तित्व जीवन बनते. "अल्लाह, त्याच्याशिवाय दुसरा कोणीच ईश्वर नाही. तो चिरंजीव व आत्मनिर्भर आहे." २:२५५ 'नूर' अहं (जीवात्मा) बनते. डोळे त्याच्या 'ज़ात'ला पाहात नाहीत आणि शक्ती संकल्पनात परिणत होते. "निश्चितच, तुझा विधाता जे इच्छितो ते (प्रत्यक्षात) करतोच." ११:१०७ तो जे संकल्प करतो ते निश्चितच पूर्ण करतो. जेव्हा त्यांच्या बाह्य प्रकटीकरणाअगोदर 'ज़ात'ने आपल्या आंतरिक शक्ती यथार्थपणे ओळखल्या. त्याची दृष्टी प्रकट झाली. तो ऐकणारा आणि पाहणारा आहे. जेव्हा आपल्या आवडीनुसार या आंतरिकशक्तींच्या गरजा पूर्ण झाल्या तेव्हा श्रवण शक्ती उदयास आली. "त्याला याची जाणीव नाही काय की, अल्लाह सर्व काही पाहात आहे." ९६:१४ याच अवस्थेमध्ये जेव्हा 'ज़ात'ने या गरजांकडे लक्ष दिले, ती वाणी बनली. "मूसा (पैगंबरांपैकी असे पैगंबर होते) ज्यांच्याशी अल्लाहने प्रत्यक्ष संभाषण केले." ४:१६४ अशा प्रकारे प्रथम 'ज़ात' होते, हर्बर्ट स्पेन्सर याचे अज्ञात आणि अज्ञेय जिच्याविषयी हदीसमध्ये (प्रेषितवचन) सांगितले गेले आहे की, " 'ज़ात'विषयी विचार करू नका, परंतु 'सिफ़ात' (गुणां)विषयी मनन करा." हा अहदियतचा टप्पा आहे. अशाप्रकारे चार 'एतिबारात' (काल्पनिक संबंध) आढळून येतात. १) आत्मतत्त्वाचे किंवा अहंचे ज्ञान, २) अस्तित्व, ३) प्रकाश आणि ४) शक्ती. हा **'वहदत'**चा टप्पा आहे.

मग तिसरा टप्पा येतो. याला **वाहिदियत** म्हणतात. येथे जीवात्मा (अहं)चे ज्ञान 'शुयूनात'चे ज्ञान बनते, अस्तित्व जीवन बनते, प्रकाश अहं (जीवात्मा)मध्ये परिणत होतो, शक्ती संकल्प बनते, या सर्वांसोबत दृष्टी, श्रवणशक्ती आणि वाक्‌शक्ती येऊन, वर स्पष्ट केल्याप्रमाणे मिळतात. ज्याअर्थी या गुणांपैकी सहा गुण हे

अस्तित्वावर अवलंबून असतात, त्याअर्थी गणनेमध्ये अस्तित्वास सर्वप्रथम दर्शवतात. अस्तित्वाशिवाय ज्ञानाची शक्यता दुरावते. काही (विद्वान) 'एतिबारात'मध्ये ज्ञानास सर्वोच्च स्थान देतात आणि त्याला 'इमामुल-ऐम्मा' (नेत्यांचा नेता) म्हणून संबोधतात. कारण अस्तित्वाच्या ज्ञानाशिवाय, अस्तित्व स्पष्टपणे कळून येत नाही. शेख़ मुहिय्युद्दीन इब्न-अरबी आणि त्याचे अनुयायी या विचार-संप्रदायाशी निगडित आहेत. ते म्हणतात, शक्यता ('शुयूनात') स्पष्टपणे कळून आल्यावरच ज्ञान स्पष्टपणे कळून येते. अशाप्रकारे स्व-परिचयासाठी, आत्मबोधासाठी 'ज़ात' हे 'शुयूनात'वर अवलंबून असते. तथापि, शेख़ अब्दुल करीम जीली आपल्या 'इन्सानुल कामिल' या ग्रंथात वेगळे विचार मांडतात. पवित्र कुराणामध्ये परमेश्वरास (अल्लाह) 'अस्समद' आणि 'ग़नी' म्हणून सांगितले गेले आहे. या दोन्ही शब्दांचा अर्थ 'निरपेक्ष, निस्पृह' असा आहे. जीली यांचा विचार आहे की, इब्न-अरबीच्या उपरोक्त मतामुळे 'परमेश्वराच्या निस्पृहते'स बाध आणले जाते. ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान यांच्या संबंधांविना आपल्या 'शुयूनात (विभू)ची परमेश्वरास जाण असल्यामुळे, ते म्हणतात की, परमेश्वरास वैयक्तिक ज्ञान असते. ज्ञानामधील या 'शुयूनात'ची आपली स्वत:ची वैशिष्ट्ये आहेत. ही त्यांची स्वत:ची वैशिष्ट्ये होती आणि परमेश्वराने त्यांना आज्ञापिले 'भव'('हो') आणि ते 'झाले'. "जेव्हा तो (परमेश्वर) कोणतीही गोष्ट करण्याचा निर्णय करतो तेव्हा तो तिच्याबाबतीत केवळ 'कुन' ('भव', 'हो') असे म्हणतो आणि ती होते." २:११७ "जेव्हा तो (परमेश्वर) (एखादी गोष्ट निर्माण करण्याचा) निर्णय घेतो, तेव्हा तो त्या गोष्टीबाबत इतकेच म्हणतो, 'अस्तित्वात ये' आणि ती गोष्ट अस्तित्वात येते." ३:४८ त्यांच्या आविष्करणाअगोदर, परमेश्वरास त्यांच्याबाबत कल्पना होती. हा संप्रदाय सात 'एतिबारात'मधील 'इरादा' अर्थात 'संकल्पा'स सर्वोच्च स्थान देतो. अशाप्रकारे वैश्विक चैतन्या ('अहदिय्यत') शी 'ज़ात' समांतर असते. तिच्या मंडलामध्ये एक बिंदू निर्माण होतो आणि चार 'एतिबारात' दिसू लागतात.

हे 'वहदत' आहे. याला मुहम्मदचे वास्तव ('हक़ीक़त-ए-मुहम्मदी') पण म्हणतात. यांच्यामधील भेद (फरक) निदर्शनास आल्यामुळे ते अधिक ठळक-स्पष्ट बनले, आणि सात 'सिफ़ात' (गुण) निदर्शनास आले. प्रेषित दाऊदने परमेश्वरास विचारले, "हे प्रभू! सृष्टीच्या निर्मितीअगोदर तू कुठे होतास?" मी एक गुप्त (अव्यक्त) खजीना (कोष) होतो, स्वत:स ओळखण्यासाठी, आपल्या आत्मोपलब्धीसाठी मी स्वत:स विभक्त करून ही सृष्टी निर्माण केली." ही एक हदीस (प्रेषितवचन)-ए-कुदसी म्हणून अधिकांश मुस्लिमांना मान्य आहे. अबी ज़रर याने प्रेषित मुहम्मद यांना विचारले, "विश्वनिर्मितीअगोदर परमेश्वर कोठे होता?" उत्तर होते - "तो एका ढगा (अम)मध्ये होता. त्या (ढगा)वर वायू (हवा) नव्हता आणि खाली (पण) वायू नव्हता." (म्हणजेच निर्वात पोकळी होती.) मानव हा जास्तीत जास्त 'एतिबारात' ('वहदत') पर्यंत विचार-मनन करू शकतो, परंतु यापुढे त्याचा शिरकाव शक्य नाही. त्याच्या दृष्टीच्या टप्प्यास एक यवनिका (पडदा) नेहमी लपविते. शेख़ मुहिय्युद्दीन इब्न-अरबी यांनी 'अम' (काळे ढग) चा संबंध 'अहदियत'शी जोडले, परंतु इतर विचारक तिचा संबंध 'वाहिदीयत'शी जोडतात. म्हणजेच, या अवस्थांमधील 'ज़ात' ही 'अम' (गुणांचे ढग किंवा 'अस्मा' नामके) मुळे झाकोळली जाते, आणि म्हणून अगोचर, अतींद्रिय बनते. जसे वर्तमानकाळ हा भूतकाळ आणि भविष्यकाळ यामधील एक विभेद दर्शक सीमारेषा आहे तद्वत 'अहदीयत' आणि 'वाहिदीयत' यांच्या दरम्यान 'बर्ज़ख़'ही सीमारेषा आहे, किंवा एखाद्या इंद्रधनुष्याच्या विविध रंगांच्या दरम्यान असणाऱ्या

काल्पनिक रेषेसारखी आहे. अहंकारा (जीवात्मा)चे अहंकारावर उदय होणे हे 'वहदत' आहे, तर अहंकाराचे आपल्या शक्यतांवर उदय होणे हे 'वाहिदीय्यत' आहे. 'वहदत' हे मुहम्मदांचे वास्तव आहे, आणि विश्व हे त्या वास्तवाचे एक आविष्करण आहे. असे म्हणतात की, विश्वाचे आत्मे आणि शरीरांची वास्तवे ही मुहम्मदांचे देह-आत्म्याचे वास्तवाचे तपशील आहे. ('हक़ायिक़नामा', ''जाम-ए-जहाननुमा'' लेखक - इब्राहीम शुत्तारी अहमदाबादी यावरील भाष्य, पृ. १९१) अशाच प्रकारचा एक सिद्धान्त, ख्रिश्चनांमध्ये ख्रिस्ताविषयी, द्रव्यांतरीभवनाच्या संकल्पनेच्या उदयास कारणीभूत असावा. तथापि याचा मागमूस 'प्रभूचे भोजन' या उत्सवाशी लागतो.

मुहम्मदांचे वास्तव हे शेवटी आदम (आद्य मानव)ची आकृती बनली. इमाम क़िस्तलानीच्या मते, ताहिर इब्न अब्दुल्ला अन्सारी म्हणाले की, मुहम्मदसाहेब (त्यांच्यावर शांती असो) म्हणाले, ''सर्वप्रथम वस्तू जी निर्माण झाली, ती म्हणजे तुमच्या प्रेषिताचे प्रकाश (तेज). याची निर्मिती परमेश्वरापासून झाली.'' दुसरे एक हदीस (प्रेषित वचन) असे म्हणते - ''हे जाबिर, पहिली निर्मित वस्तू म्हणजे, तुमच्या प्रेषितांचा आत्मा.'' तिसरी हदीस म्हणते - ''परमेश्वराशी माझा एक ख़ास (विशेष) वेळ असतो. त्या वेळेस निकटतम देवदूत किंवा एखादा प्रेषित यांना येण्याची मुभा नसते.'' ''(आद्य मानव व प्रेषित) आदम अद्याप जल आणि चिखलमाती यांच्या दरम्यान होते तेव्हा मी एक नबी (संदेष्टा) होतो.'' या संदर्भात कौराणिक संदर्भ असा दाखला देते - ''(लोक हो!) मुहम्मद तुमच्यापैकी कोणाही पुरुषाचा पिता नाही, तर तो अल्लाहचा दूत (प्रेषित) आणि अंतिम प्रेषित (प्रेषितांची मुद्रा) आहे.'' ३३:४० याचा नज्मुद्दीन-ए-कुब्राप्रणीत खुलाशाचा अर्थ आहे त्यांचा तुमच्या जगाशी (इहलोकाशी) संबंध नाही. (नज्मुद्दीन-ए-कुब्रा - 'मुर्सद-उल-इब्बाद' पृ. ९०)

कर्मठ मुस्लिम वहाबी हे मुहम्मदांच्या वास्तव सिद्धान्तामध्ये विश्वास ठेवत नाहीत.

प्रथम मर्यादा 'वहदत'चे चार 'एतबारात' - १) अहं (जीवात्मा)चे ज्ञान, २) सत्त्व, ३) प्रकाश, ४) शक्ती (सामर्थ्य) यांनी द्वितीय मर्यादा 'वाहिदीय्यत'चे सप्तगुण - (१) जीवन (हयात), (२) ज्ञान (इल्म), (३) सामर्थ्य-शक्ती (कुद्रत), (४) संकल्प (इरादा), (५) श्रवणशक्ती (समा), (६) दृष्टी (बसर) आणि (७) वाणी (कलाम) यांच्याशी गुणले असता (यांना 'उम्महात-उस-सिफ़ात' गुणमातृका पण म्हणतात) एकूण २८ गुणांची -२८ नामांची निर्मिती होते. विश्व हे त्या सर्वांचे एक आविष्करण आहे. पुढील नकाशावरून व्यक्त आणि अव्यक्त अशी २८ नावांची एक कल्पना येते.

पुढील पानावरील नकाशात (तालिका) 'अहदियत'पासून ते 'इन्सानुल कामिल' (पुरुषोत्तम, नरोत्तम) पर्यंतच्या अवरोहणाचे निदर्शक आहे. डावीकडील रकाना क्रमांक २ हा 'अस्मा-ए-इलाही' (दैवी ईश्वरी नामे) याचे निदर्शक आहे, तर उजवीकडील रकाना क्रमांक ४ हा 'अस्मा-ए-कियानी' (भौतिक नामे) दर्शवतो, आणि मधली दुहेरी रेषा ही उपरोक्त नामांच्या दोन संचामध्ये असलेले 'बर्ज़ख़' (अडकण, बांध म्हणजेच मध्यजगत, संचित, स्वर्लोक)ची निदर्शक आहे.

''त्यानेच (परमेश्वरानेच) दोन समुद्रांना (अशाप्रकारे) गतिमान केले आहे की, ते (शेवटी) आपसात मिसळतात. (तथापि) त्या दोघांच्या दरम्यान एक अडकण-बांध आहे, ज्यामुळे ते (पूर्णपणे) एकमेकांत मिसळून जात नाहीत.'' ५५:१९-२०

### नामांचे भाषांतर आणि त्यांचे अर्थ

| १<br>क्र. | २ पूर्व<br>ईश्वराची नामे(नावे) | ३<br>भाषांतर (अर्थ) | ४ पश्चिम<br>निर्मितीची नावे (भौतिक नामे) | ५<br>भाषांतर (अर्थ) | ६<br>निगडित अरबी वर्णाक्षर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बदीअ | अनुपम सृष्टा | अक़्ल-ए-कुल | निरपेक्ष (केवल) विवेक (विश्वज्ञान) | ا أ | अलिफ़ | अलिफ़ हमज़ा |
| २. | बाइस | बीजरूप, कारण | नफ़्स-ए-कुल | विश्वात्मा | ه | हे | ह़ |
| ३. | बातिन | अगोचर | तबियात-ए-कुल | निरपेक्ष प्रकृती | ع | ऐन | अ़ |
| ४. | आख़िर | अंत | जौहर-ए-हबा | भौतिक तत्त्व, जडद्रव्यरूप | ح | है | ह |
| ५. | ज़ाहिर | गोचर | जिस्म-ए-कुल | विश्व देह, निरपेक्ष देह | غ | ग़ैन | ग़ |
| ६. | हकीम | तत्त्वविद् | शक्ल-ए-कुल | विश्वरूप, निरपेक्ष रूप | خ | ख़ै | ख़ |
| ७. | मुहीत | सर्वसमावेशक | अर्श | ईश-सिंहासन | ك | काफ़ | क |
| ८. | शकूर | गुणग्राहक | कुर्सी | पादपीठ | ق | क़ाफ़ | क़ |
| ९. | ग़नी | निःस्पृह . | फलक-उल-मनाज़िल | नक्षत्र | ج | जीम | ज |
| १०. | मुक़्तदिर | सत्त्व | फ़लक-उल्-बुरूज | राशी | ش | शीन | श |
| ११. | रब्ब | प्रभू | ज़ुहल | शनी | ى | या | य |
| १२. | अलीम | ज्ञाता, परम ज्ञानी | मुश्तरी | गुरू | ض | ज़्वाद | ज़ |
| १३. | क़ाहिर | प्रकोपी | मिर्रीख़ | मंगल | ل | लाम | ल |
| १४. | नूर | प्रकाशरूप | शम्स | रवी | ن | नून | न |
| १५. | मुसव्विर | रूपनिर्माता | ज़ुहरा | शुक्र | ر | रे | र |
| १६. | मुहसीय | परिवेष्टक | उतारिद | बुध | ط | तोय | त़ |
| १७. | मुहयमिन | त्राता | क़मर | सोम | د | दाल | द |
| १८. | क़ाबिज़ | अधिष्ठाता | नार | तेज, अग्नी | ت | ते | त |
| १९. | हय्य | चैतन्य | हवा | वायू | ز | ज़े | ज़ |
| २०. | मुहीय | जीवनदाता | मा | आप | س | सीन | स |
| २१. | मुमीत | मृत्यूदाता | अर्ज़ | पृथ्वी | ص | स्वाद | स़ |
| २२. | अज़ीज़ | प्रबळ | मादन | खनिज | ظ | ज़ोय | ज़ |
| २३. | रज़्ज़ाक | अन्नदाता | नबातात | वनस्पती | ث | से | स़ |
| २४. | मुज़िल | पराभूतकारी | हैवान | प्राणी | ذ | ज़ाल | ज़ |
| २५. | क़वी | महाशक्तिशाली | मलायक | देवदूत | ف | फ़े | फ़ |
| २६. | लतीफ़ | सूक्ष्मदर्शी | जिन्न | यक्ष-किन्नर | ب | बे | ब |
| २७. | जामिअ | सर्वनिधान | इन्सान | मानव | م | मीम | म |
| २८. | रफ़ीउद्‌र्जात | बहुगुणसंपन्न | इन्सान-उल-कामिल | पुरुषोत्तम, नरोत्तम | و | वाव | व |

↓

बर्ज़ख = अडकण, बांध (मध्य जगत, संचित, स्व-र्लोक)

''पूर्व आणि पश्चिम यांच्या विधात्याची शपथ घेऊन सांगतो (की), आम्ही यासाठी समर्थ आहोत की त्यांच्याजागी त्यांच्यापेक्षाही उत्तम लोकांना आणू शकतो.'' ७०:४०-४१ उपरोक्त डावीकडची ईश्वराची नावे ही पूर्व आहेत आणि उजवीकडील भौतिक नावे पश्चिम आहेत.

प्रथम तीन टप्पे अथवा दोन मर्यादा यांना 'जुहूर-ए-इल्मी' (ज्ञानांतर्गत आविष्करण) अथवा 'मरातिब-ए-इलाही' (दैवी दर्जे) असे म्हणतात, आणि नामांचे प्रकटीकरण असलेले पुढील तीन टप्प्यांना (अर्थात अर्वाह, मिसाल आणि अजसाम) 'मरातिब-ए-कौनी' (भौतिक दर्जे) असे म्हणतात. पुढील प्रत्येक टप्पा हा नंतरचा उच्चतर टप्पा याचे एक आच्छादन असते म्हणजेच आपल्या निम्नतर आविष्करणामुळे उच्चतर टप्पा हा अस्पष्ट बनतो, नंतरचा टप्पा हा उच्चतर टप्प्याचा एक स्वरूप असतो. अंकपाश व एकत्रीकरणाच्या मदतीने अठ्ठावीस (२८) नामे ही वाढून, संवर्धित होऊन असंख्य नामे बनली. ती खरोखर इतकी असंख्य बनली जितकी की महासागरामध्ये पाण्याचे थेंब असतात. परमेश्वर हा स्वत: प्रकाश आणि अंधाराच्या सत्तर हजार (७०,०००) पटलां (यवनिका, पडदे)मागे लपलेला असतो. या 'तायुनात' म्हणजेच तन्मात्रा (मर्यादा) आहेत. परंतु एखादी तन्मात्रा म्हणजे काय? अस्तित्वाच्या संबंधाने म्हणावे, तर ते स्वत: अस्तित्वाशिवाय दुसरे काहीच नसते, तर तन्मात्राच्या (मर्यादा) संबंधाने पाहावे तर अस्तित्व हे तन्मात्राचे वास्तव नसते, म्हणजेच चिकणमातीच्या संबंधाने पाहिल्यास एका खुजा (चंबू)चा आकार हा प्रत्यक्ष चिकणमातीशिवाय दुसरे काहीच नसते, तर या आकाराच्या संदर्भात पाहाता, ते आकाराचे वास्तव नसते. अशाच प्रकारची उपमा वर्णाक्षरे आणि शाई यांची देता येते. या सिद्धान्तास 'ऐनिय्यत-ए-हक़ीक़ी' आणि 'ग़ैरियत-ए-एतिबारी' (कल्पनेमधील समरूपता आणि विभेदाचे वास्तव) असे म्हणतात. म्हणून बाह्य रूपाकृती अस्तित्वाचे आकार असतात. एक दखनी कवी क़ाज़ी महमूद बहरी असे गुणगुणतात -

*''ए रूप तेरा रत्ती रत्ती है*
*परबत परबत पत्ती पत्ती है ।*
*परबत में अदिक न कम पत्ती में*
*यकसाँ रह्या रास हौर रत्ती में ।।'' - मनलगन*

भावानुवाद - हे परमेश्वरा ! तुझे आकार प्रत्येक अणू-रेणूमध्ये आहे, तसेच (महाकाय) पर्वतांमध्ये, तद्वत (वृक्षांच्या) पत्त्यांमध्ये (तुझे स्वरूप आहे) तुझे स्वरूप हे पर्वतांमध्ये मोठे नाही, तर पत्त्यांमध्ये लहान नाही. तुझे स्वरूप ढिगांमध्ये आणि अणूंमध्ये एकसमान आहे.

**अयान-ए-साबित (अखंड समरूपता, कल्पनेचे शाश्वत साम्राज्य, आदि प्ररूप)**

'अयान' ही सत्तेची चिंतन-रूपे असतात. हे एक प्रकारचे शाश्वत विचार-विश्व असते. हे कल्पनेचे शाश्वत साम्राज्य असते. तिची अनंत रूपे असतात. 'अयान'मधील रूपरेषेबरहुकूम अस्तित्व उदयास येते. 'अयान' काल्पनिक असल्यामुळे तिने कधीच अस्त्विाचे गंध हुंगलेले नाही असे म्हटले जाते. ईश्वरी ज्ञानाच्या अनुषंगाने त्या वास्तव आहेत, तर बहिरंगाच्या अनुषंगाने अवास्तव. त्यांना 'साबित' यासाठी म्हणतात की त्या बाह्यत: नित्य अवास्तव असतात. तत्त्वज्ञ त्यांना अस्तित्व-शून्य 'शय' म्हणजेच वांछित वस्तू आणि गुण वा वास्तव असे म्हणतात. ईश्वरी ज्ञानामध्ये त्या 'अदन-ए-मल्फ़ूजी' (कथित निवास) या नात्याने कायमस्वरूपी

असतात. म्हणून त्यांना 'अयान-ए-साबित' असे म्हणतात. अशाप्रकारे ते ईश्वराच्या ज्ञानामध्ये शाश्वत असतात, बाह्य स्वरूपात त्यांचे आविष्करण हे अस्थिर असते. आपल्या आंतरिक पैलूमध्ये त्यांना अ-शाश्वत म्हणता येऊ शकत नाही. हे अशक्य आहे. 'वाहिदिय्यत'च्या टप्प्यानंतर 'अयान'चे आविष्करण सुरू होते आणि आविष्करणानंतर त्यांना 'अयान-ए-ख़ारिजा' असे म्हणतात. या टप्प्यात त्या नाशवान होण्यायोग्य असतात. त्यांचा विध्वंस होतो. थोडक्यात, 'अयान-ए-साबित' म्हणजेच मूळरूप वा नमुना.

**अ) ग़ैरियत-ए-एतिबारी - (काल्पनीक - भ्रममूलक द्वैत )** - अठ्ठावीस (२८) गुण हे अठ्ठावीस (२८) नामे ('अस्मा') बनली. परमेश्वराचे प्रथम नाम ('इस्म' 'बदीअ' (अनुपम स्रष्टा) होते. याला 'क़लम-ए-आला' (श्रेष्ठ लेखणी) असेही म्हणतात. हे नाम सर्व नामांचे भांडार आहे, जे नेहमी स्वत: अभिव्यक्त - प्रकट होतात. तिला दोन दृष्टी आहेत अथवा आधुनिक शब्दावलीत असे म्हणता येईल की तिला दोन दृष्टिकोन आहेत, एक तर स्वतःची सत्ता अथवा 'ज़ात'वर, आणि दुसरा स्वतःच्या गुणांवर. प्रथम दृष्टिकोनानुसार, 'बाइस' अस्तित्वात आले, आणि द्वितीय दृष्टिकोनानुसार 'अक़्ल-ए-कुल' उदयास आले. त्याचप्रमाणे 'बाइस'च्या वैयक्तिक दृष्टिकोनानुसार, 'बातिन' हे नाव अस्तित्वात आले, तर गुणाच्या बाजूने 'नफ़्स-ए-कुल'चा उदय झाला, अशाच पद्धतीने शेवटचे दैवी नाम - ईश्वराचे नाम 'रफ़ीउदर्जात' (बहुगुणसंपन्न) आणि त्याची भौतिक खरी नक्कल (प्रतिरूप) 'इन्सान-उल्-कामिल' (पुरुषोत्तम, नरोत्तम) हे प्रकट होतात (उदय पावतात). अशाप्रकारे प्रत्येक नाम आपल्या परवर्ती नामाचे अवलोकन करते आणि त्यामधून पुढील परवर्ती नामाचे अवलोकन होते. हीच पद्धती सरतेशेवटपर्यंत चालते. म्हणून असे म्हटले जाते की आत्म्याच्या जगाची दृष्टी ही भौतिक जगावर असते. जोपर्यंत आत्म्याची दृष्टी 'रफ़ीउदर्जात'वर असते, तोपर्यंत त्याचे प्रतिरूप 'इन्सान-उल-कामिल' दृष्टिगत होते. जेव्हा आत्मा हा आपली दृष्टी 'मुमीत'कडे वळवितो, तेव्हा तिचे शरीर मृत बनते आणि तो 'मिसाल' (सादृश्य वा प्रतिकृती) जगामध्ये (जिवंत) राहतो. हे अवरोहण असल्यामुळे, सर्वोच्च वास्तव मानवामध्ये अभिव्यक्त होते. शेख मुहिय्युद्दीन इब्न-अरबीचे सुप्रसिद्ध ग्रंथ 'फुसुस-उल्-हिकम'चे एक भाष्यकार शेख़ मुहिबुल्ला अल्लाहाबादी यांनी असे सांगितले आहे - आमचे देह आमचे आत्मे आहेत, आणि आमचे आत्मे आमचे देह आहेत. (रकाना-२ मधील) प्रथम मालिकेची नावे 'अस्मा-ए-इलाही' (दैवी नावे वा ईश्वराची नावे) अथवा आवश्यक नामे असे म्हटले जातात, तर त्यांचे प्रतिरूप (रकाना - ४ मधील) नामे ही 'अस्मा-ए-कियानी' म्हणून ओळखली जातात. ज्याप्रमाणे 'अहदीयत' एक रूप धारण करताना 'हक़ीक़त-ए-मुहम्मदी' बनले त्याचप्रमाणे प्रथम सटमधील प्रत्येक 'इस्म' (नाम) एक रूप (ऐन) धारण करताना 'इस्म-ए-कियानी' बनले. आपल्या प्रतिरूपावर प्रभाव टाकणारे प्रत्येक 'इस्म' (नाम)ला दैवी उच्छ्वास वा 'नफ़्स-ए-रहमानी' असे म्हणतात. ''कोणताही सजीव असा नाही, ज्याच्या झिंज्या त्याच्या हातात नसतील. (म्हणजे प्रत्येक जीव पूर्णपणे अल्लाहवरच अवलंबून आहे, तसेच अल्लाहचे त्यावर पूर्ण नियंत्रण आहे) नि:संदेह माझ्या विधात्याचाच मार्ग सरळ मार्ग आहे.'' ११:५६ प्रत्येक 'इस्म-ए-इलाही'मध्ये इतर सर्व 'अस्मा' (नावे)चा समावेश होतो, परंतु त्या 'इस्म'च्या विशिष्ट नावाने ओळखला जातो- आपल्या विशिष्ट गुणाच्या प्राधान्यामुळे.

सुप्रसिद्ध फ़ारसी सूफी कवी महमूद शबिस्तरी आपली गूढवादी काव्यरचना 'गुलशन-ए-राज़' (रहस्यवाटिका) मध्ये म्हणतात –

*''अगर इक कत्रा रा दिल बर शिगाफ़ी*
*बीरून आयद अज़ू सद बहर-ए-साफ़ी''*

भावानुवाद – जर तुम्ही पाण्याच्या एका थेंबास चिरडाल तर त्यामधून शतकभर शुद्ध महासागरे (निर्माण होऊन) बाहेर पडतील.

हे सर्वान्तर्यामित्व (इंदिराज-ए-कुल फिल् कुल) सिद्धान्त म्हणून ओळखले जाते. याला सर्वेश्वरवाद असेही म्हणता येईल.

**ब) ग़ैरियत-ए-हक़ीक़ी (वास्तविक द्वैत)** – 'अयान'चा सिद्धान्त हा ख्रिश्चन ज्ञेयवादी कल्पां (युगां)च्या फार जवळ येत असल्याचे वाटते, परंतु ही संकल्पना ख्रिश्चन गूढवादापेक्षा काही शतके जुनी आहे. ही प्लेटोची 'शाश्वत संकल्पना' (बीजजाती, आद्य पदार्थ वा प्रत्यादर्श) आहे. त्याचा शिष्य ॲरिस्टॉटलने याला 'इंटलेकीया' (entelecheia) असे नाव दिले. ('आउटलाइन्स ऑफ दि हिस्ट्री ऑफ फिलॉसॉफी', पृ. १४५) 'शाश्वत संकल्पने'मध्ये जे काही व्यक्त होणारे आहे त्या सर्वांचा समावेश होतो. ईश्वराच्या ज्ञानामध्ये ज़ैद (या व्यक्तीची) संकल्पना माणसाची सर्वसाधारण संकल्पना असते. ही सर्वसाधारण संकल्पना मानवाच्या गर्भाशयात गर्भधारणेपासून ते मरणोत्तर मातीत मिसळून जाईपर्यंत, अथवा आणखी यापुढे 'मिसाल', 'अर्वाह'मधील परतीच्या प्रवासाची असते. हा प्रवास तो जेथून सुरू झाला होता त्या बिंदूपर्यंत येऊन पोहोचतो.

पुन्हा 'गुलशन-ए-राज़'मध्ये अभिव्यक्त आहे–

''जरी मानव हा, आपल्या ('स्व'च्या) शोधासाठी दारोदार भटकत राहिला तरी तो (शेवटी) त्या दाराकडे परततो, जेथून त्याने प्रयाण केले होते.''

होणारे बदल हे केवळ ती संकल्पना उघड करून दाखवतात, किंवा झेलरने सांगितल्याप्रमाणे, ''जरी संकल्पना या शाश्वत आणि अपरिवर्तनीय असल्या तरी, वस्तू (गोष्टी) निष्पाद्य, क्षयमाण आणि नित्य परिवर्तनीय समजल्या जातात.''

प्रथम निर्दिष्ट 'ग़ैरियत-ए-एतिबारी' सिद्धान्तामध्ये अवरोहण हा क्रमशः (उत्तरोत्तर) अहदीयतपासून वहदत, वाहिदीयत, सिफ़ात, अस्मा आणि अयान(पर्यंत) असा असतो. शेवटच्या (अयान) टप्प्यावर 'रब्ब' (प्रभू) आणि 'अब्द' (दास, भक्त)मधील फरक दिसून येतो. द्वितीय निर्दिष्ट 'ग़ैरियत-ए-हक़ीक़ी' सिद्धान्तामध्ये ईश्वर आणि त्याच्या 'शुयूनात' असतात. महासागरामध्ये जशा मोठ्या लाटा निर्माण होऊन नंतर त्याच्यामध्ये विलीन होतात, तशाच प्रकारे 'शुयूनात' हे 'ज़ात'शी सह-शाश्वत आणि त्यामध्ये विलय पावणारे असे दोन्ही असतात.

दुसरे सिद्धान्त – 'ग़ैरियत-ए-हक़ीक़ी'प्रमाणे 'बदीअ'चे आविष्करण 'अक़्ल-ए-कुल'मध्ये होते. परवर्तीस जेव्हा एका जगाचे आविष्करण करण्याच्या सुप्त शक्तीची जाणीव झाली तेव्हा तिने (आपल्यासाठी) एक सहकारी देण्याची विनंती (प्रार्थना) केली, मग 'बदीअ'चा अंतर्भाग असलेले 'बाइस' सक्रिय झाले, आणि

'नफ़्स-ए-कुल'चे आविष्करण झाले. 'अक़्ल-ए-कुल' आणि 'नफ़्स-ए-कुल' यांच्या संयोगाने 'तबियात-ए-कुल' उदयास आले. पॅटॅसेल्स असे म्हणाला होता की, हा स्वर्गीय (आकाशीय) प्रभाव आणि पार्थिव वस्तूंमधील एक विवाह आहे. याला ग्रीक ईश्वरशास्त्रज्ञाने 'विश्वविवाह' (Gamahea) असे नाव दिले आहे. (याला सूफी 'इज़्दवाज' (युग्म) असे म्हणतात.) मग एक तिसऱ्या 'इस्म'ची निर्मिती होते. तथापि, हे आक्षेपार्ह आहे, कारण जेव्हा एखादी वस्तू दुसऱ्या एका वस्तूंतून निर्माण होते, तिने दुसऱ्यामध्ये (परवर्तीमध्ये) एक भावशून्य निरंक सोडले पाहिजे.

पहिला सिद्धान्त – 'ग़ैरियत-ए-एतिबारी'प्रमाणे, 'अयान' हे ईश्वराच्या ज्ञानामध्ये निश्चित स्वरूपात असतात. ते कधीच तेथे एखादे भावशून्य, निरंक सोडून बाहेर येत नसतात. 'शेख अकबर', शेख मुहिय्युद्दीन इब्न अरबीने असे अभिप्राय नोंदवले आहे की, 'अयान' ने अस्तित्वाचा वास (सुद्धा) घेतलेला नाही. (इब्न अरबी- 'फुसूस-उल-हिकम' 'फुस-ए-इद्रिसी) प्लॉटिनस आणि इब्न अरबी यांच्या अभिप्रायामधील फरक असा आहे की, "आपल्या मनाबाहेरील कोणत्याही अस्तित्वाची संकल्पना प्लॉटिनसने फेटाळून लावली" तर इब्न अरबीने ईश्वराच्या मनाबाहेरील अस्तित्वाची संकल्पना नाकारली. ग्रीक तत्त्ववेत्त्यांचा असा विश्वास होता की ईश्वराच्या ज्ञानामधून कल्प, युग बाहेर आले आहेत, आणि त्यांना एक बाह्य अस्तित्व असते.

'अयान'ची परिवर्तनशीलता किंवा अपरिवर्तनशीलता यांच्याविषयी, तेच मुस्लिम अधिकारी विद्वान – इब्न अरबी, असा विचार करतात की आविष्करणामध्ये सुद्धा ते अपरिवर्तनशील असतात, कारण जर ते परिवर्तनशील असते, तर त्यांनी ईश्वराच्या शाश्वत ज्ञानामधील एक परिवर्तन – दैवी ज्ञानामधील एका अज्ञान विवृत्तीचा निर्देश केला असता. हे अतर्क्य आहे. काहींचे असे मत आहे की, 'अयान' हे अपरिवर्तनशील आहेत, परंतु त्यांचा विस्तार हा त्यांची वैशिष्ट्ये आणि परिणाम आहेत, आणि 'अयान' हे सत्त्व आहेत. सत्त्वामधील एखाद्या बदलाशिवाय, विस्तारामध्ये बदल होऊ शकत नाही. शेख अबू सईद अबुल ख़ैर यांचे असे मत होते की, जेव्हा प्रियकर हा प्रेयसी बनण्याच्या टप्प्यावर येऊन पोहोचतो अशा परिस्थितीत 'अयान' आणि त्यांचे परिणाम हे दोन्ही परिवर्तनाच्या आधीन असतात; 'शुयूनात', 'ज़ात'मध्ये विलुप्त होतात.

इराणमधील समनान प्रांताचा तत्त्ववेत्ता-राज्यपाल शेख अलाउद्दौला समनानी, शुहूदिया संप्रदायाचा खरा संस्थापक आणि अब्दुल करीम जीली याचा नमुना – प्रतिरूप याचेही पण तसेच मत होते, या अपवादासह की जरी 'मी'मधील आणि 'तू'मधील फरक नाहीसा होतो, तरी पण द्वैतता शिल्लक राहते. सावली-छाया (जग) ही मूळ वस्तू (ईश्वर) असू शकत नाही. 'अयान'चे उदय हे कोणत्या टप्प्यावर असते यासंबंधी मतभेद असल्याकारणाने उपरोक्त दोन्ही संप्रदायामध्ये भेद दिसून येतात.

उपरोक्त नकाशामधील 'फलक-उल्-मनाज़िल'पासून ते 'कमर'पर्यंत ग्रह आहेत. ते लघुत्तर भौतिक जगावर प्रभाव टाकतात (करतात) हे भौतिक जग अग्नीपासून ते पुरुषोत्तम-नरोत्तमापर्यंत ('इन्सान-उल्-कामिल') आहे त्या सर्वांचा एकूण परिणाम हा 'इन्सान-उल-कामिल'(पुरुषोत्तम, नरोत्तम)च्या निर्मितीमध्ये होतो. हा विचार नि:संशय फलज्योतिष्य आणि नक्षत्रविज्ञानामध्ये विश्वास ठेवण्यास भाग पाडतो.

फलज्योतिष्यामध्ये मानवाच्या प्रारब्धावर, दैवी ग्रहांचे होणारे परिणाम यांची गणती-हिशोब केला जातो. मानव हा 'अस्मा'चा एक समूह आहे. प्रत्येक दैवी ग्रह हा एखाद्या विशिष्ट 'इस्म' (नाम)चे एक आविष्करण

असते. म्हणून एका विशिष्ट व्यक्तीच्या प्रारब्धावर एका विशिष्ट वेळेस, एका विशिष्ट ग्रहाच्या स्थितीचा किंवा त्याच्या दर्शनाचा प्रभाव होतो. नक्षत्रविज्ञाना (इल्म-ए-तक्सीर)मध्ये पुन्हा एका विशिष्ट वेळेस अरबी भाषेच्या अठ्ठावीस (२८) वर्णाक्षरांपैकी प्रत्येकाचा एक प्रभाव असतो. उपरोक्त नकाशामध्ये प्रत्येक 'इस्म' (नाम) हे एका विशिष्ट वर्णाक्षराचे प्रतिनिधित्व करत असल्याचे निदर्शनास येईल. आत्मविलयापासून जेव्हा एक दिव्य अर्थात ईश्वर उदयास आला, तेव्हा त्याला आत्मबोधाची जाणीव झाली. हा आत्म-रतीचा टप्पा आहे. आपण ओळखले जावे म्हणून. प्रेमाच्या कंपनांमुळे ध्वनींची निर्मिती झाली. हेच वर्णाक्षरांचे ध्वनी बनले आणि हे ध्वनी स्वत: 'अस्मा-ए-इलाही' स्वरूपात व्यक्त झाले. हे फलज्योतिष्यामधील आकाशस्थ ग्रहांच्याबाबतीत सारखेच आहे. प्रत्येक ध्वनी, पर्यायाने अरबी भाषेमधील प्रत्येक वर्णाक्षर हा एखाद्या 'इस्म'चे प्रतिनिधित्व करतो. म्हणून जर विशिष्ट वर्णाक्षरांनी युक्त अशी एक तावीज़ (गंडा-दोरा) बनवला असता, त्या वर्णाक्षरांद्वारे व्यक्त 'अस्मा'चा प्रभाव हा पडला पाहिजे. या पाठीमागे अशी एक भूमिका आहे की एखाद्या नक्षत्रवैज्ञानिक किंवा 'मशायख़'ने ही विद्या आत्मसात करून नि:स्वार्थपणे अंमलात आणली असता तिचा अपेक्षित परिणाम निश्चितच दिसून येईल. याची अंमलबजावणी करण्यासाठी नक्षत्रवैज्ञानिकास आपले 'पीर' (सद्‌गुरू)ची पूर्व परवानगी घ्यावी लागते. खात्रीलायक योग्य शिष्यास ती दिली पण जाते. ही खात्री त्या शिष्याचे नैतिक चारित्र्य आणि निस्वार्थीपणा व निष्कलंकता पाहून केली जाते. अशीच सावधगिरी सम्मोहनविद्या शिकवताना बाळगली जाते.

अशाप्रकारे या दृश्य जगामध्ये आत्म्याचे जगत्, भौतिक जगत् आणि बर्ज़ख़ (मध्यजगत्, संचित, स्व-र्लोक) याला 'आलम-ए-मिसाल' पण म्हणतात, यांचा समावेश होतो.

## १) आलम-ए-अर्वाह (आत्म्याचे जग)

प्रथम चार 'अस्मा-ए-कियानी' म्हणजेच 'अक़्ल-ए-कुल', 'नफ़्स-ए-कुल', 'तबियात-ए-कुल' आणि 'जौहर-ए-हबा'पासून आत्म्याचे जग निर्माण होते. 'अक़्ल-ए-कुल' (सर्वंकष प्रज्ञा, विवेक) ईश्वर ज्ञानाच्या अस्तित्वाचे रूप आहे. यालाच 'शरा' (शास्त्रा)च्या भाषेमध्ये 'क़लम-ए-आला' ('उन्नत लेखणी') असे म्हणतात. सर्व वैयक्तिक आत्म्यांचा यामध्ये समावेश होतो आणि ते महान आत्म्याचे एक दृश्य स्वरूप असते. याला 'रूह-ए-आज़म' (महान आत्मा) असे म्हणतात आणि यामधून वैयक्तिक आत्मे प्रकट होतात. मौलाना जलालुद्दीन रूमी म्हणतात, ''पाशवी आत्म्यामध्ये फरक आहे, मानवजातीचा आत्मा हा एक आहे.''

*''तफ़्रिक़ दर रूह-ए-हैवानी बुवद ।*
*नफ़्स-ए-वाहिद रूह-ए-इन्सानी बुवद ।।''*

अर्थात पाशवी आत्म्यामध्ये भेद (अंतर-फरक) आढळून येतो; मात्र मानवी आत्मा हा (फरकाविना) एकमेव असा आत्मा असतो.

पाश्चात्त्य तत्त्वज्ञानामध्ये हा सिद्धान्त 'रुश्दवादी सिद्धान्त' (averroism) म्हणून ओळखला जातो. या सिद्धान्ताचा प्रणेता स्पेन (अंदलूस)चा मुस्लिम तत्त्वज्ञ इब्न-रुश्द (इ. स. ११२६-११९८) हा होता. त्याने असे प्रस्थापित केले की, ''चित् किंवा आत्म्याचा विवेचक अंश सर्वांमध्ये एकसमानच असतो. वैयक्तिक आत्मे हे

या एकाच आत्म्याचे आविष्करण असतात.'' 'नफ़्स-ए-कुल' म्हणजे 'ज़ात'चे श्वास (उच्छ्वास) आणि परमेश्वराच्या विश्वाचे, ज्ञानाचे दृश्य स्वरूप असते. तिच्यावर सर्व प्रकारच्या अस्तित्वाची छाप टाकली जाते. (ठसे उमटवले जातात.) याला 'लौह-ए-महफ़ूज़' (सुरक्षित पट्टिका) असेही म्हणतात. जणू जे काय घडणार होते किंवा घडणार आहे, ते सर्व या उन्नत लेखणीद्वारे या पट्टीकेवर लिहिले जाते. प्रथम ('अक़्ल-ए-कुल')मध्ये परमेश्वराचे ज्ञान एक अधिवास - निवारा शोधते, दुसऱ्यामध्ये ते आकार ग्रहण करते (साकार बनते). दुसऱ्याला ('नफ़्स-ए-कुल') 'उम्मुल-किताब' (ग्रंथ-मातृका) असेही संबोधतात (म्हणतात.) उन्नत देवदूत पण असतात. ते ईश्वरी आदेश आपोआप अमलात आणतात. त्यांच्या अधीन गौण लेखण्या आणि पट्टिका (दोन्ही गौण) देवदूत असतात. यांमधील आदेश हे परिवर्तनीय, परिवर्तनाच्या आधीन असतात. परंतु सुरक्षित पट्टिकेअंतर्गत असलेले आदेश हे अपरिवर्तनीय असतात. तिसरे, 'तबियात-ए-कुल' (निरपेक्ष प्रकृती) आहे. यांमध्येसुद्धा देवदूत असतात. ते प्रकृतीला आकार प्रदान करतात. प्रकृतीला साकार करणे हा ईश्वराचा स्वभाव असतो. त्या अनुषंगाने मानवी स्वभाव आविष्कृत होतो. 'जौहर-ए-हबा' हे जडद्रव्य सत्त्व वा उपदान सत्त्व (सकृत आधार, सकृत उत्पत्ती स्थान) असते. चौथे देवदूत हे नीहारिका (तारामंडळ) आहे. हे सृष्टी-विश्वाचे एक आविष्करण आहे. नंतर हेच कांट आणि लॅप्ले या पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांचे गृहीततत्त्व बनले. हे एखाद्या आरशाच्या पृष्ठभागावरील पाऱ्याच्या लेपासारखे आहे. यामुळे आरशांमध्ये पाहणाऱ्यांची प्रतिबिंबे उमटतात. 'जिस्म-ए-कुल' ही परम भौतिकता आहे. देवदूतांच्या प्रथम संचास 'मलाए-आला' (सर्वश्रेष्ठ देवदूत) असे म्हणतात आणि त्यांना आदमपुढे नतमस्तक होण्याची आज्ञा दिली गेली नव्हती.

वैयक्तिक आत्म्यांचे जन्मपूर्व अस्तित्व, पवित्र कुराणामध्ये मान्य केले गेले आहे. ''आदमच्या संततीच्या कटिप्रदेशामधून परमेश्वर हा त्यांची अपत्ये बाहेर काढतो.'' ७:१७२. जसे आत्मे बाहेर पडले तसे त्यांनी स्वत:स चार रांगांमध्ये उभे करून घेतले. पहिली रांग ही प्रेषितांची रांग होती, दुसरी रांग ही संतांची होती, तिसरी श्रद्धावंतांची होती आणि शेवटी चौथी अश्रद्धावंतांची होती. त्यांनाच त्यांच्याविरुद्ध साक्षी बनवतो व विचारतो काय मी तुमचा प्रभू नाही? त्या सर्वांनी उत्तर दिले, ''होय. आम्ही या गोष्टीस साक्ष आहोत.'' ७:१७२ देहाची तुलना एका दिव्याशी (दिवा) केली, वनस्पतींच्या आत्म्याची तुलना एका दीपकाशी, उपजत स्वाभाविक आत्म्याची तुलना तेलाशी केली आणि मानवजातीच्या आत्म्याची तुलना प्रदीप्त अग्नीशी. या संदर्भात पवित्र कुराण पुढील शब्दात वदते - ''अल्लाह आकाश आणि पृथ्वी यांचा प्रकाश आहे. (म्हणजे प्रकाशाचा तोच स्रोत आहे) त्याच्या प्रकाशाचे उदाहरण असे देता येईल, जसे एका कोनाड्यात एक दिवा आहे. आणि तो दिवा (कंदिलाप्रमाणे) एका काचेत आहे. आणि ती काच अशी आहे जणू चमकणारा एक तारा. तो दिवा जैतूनच्या एका आशीर्वादित वृक्षापासून निघालेल्या तेलाद्वारे प्रज्वलित केला जातो. तो जैतूनचा वृक्ष ना पूर्वेकडील आहे, ना पश्चिमेकडील. त्याचे (प्रकाशमान) तेल (इतके स्वच्छ) आहे की आगीचा स्पर्श न होता ही, ते स्वत:हून प्रज्वलीत होऊ शकते. (तेलही प्रकाशमान व आगही प्रकाशमान) म्हणजेच प्रकाशावर प्रकाश! अल्लाह आपल्या प्रकाशाकडे ज्याला इच्छितो मार्ग दाखवतो.'' २४:३५ ''मानवाचे जीवन हा ईश्वराचा दिवा आहे.'' ही म्हण उपरोक्त संकल्पनाच अभिव्यक्त करते. याच आशयाशी संबंधित एक हदीस (प्रेषित वचन) असे म्हणते, ''आत्मे हे एकजूट सैनिक आहेत. त्यामध्ये ज्यांनी परस्परास ओळखले, ते परस्परावर प्रेम करू

लागले आणि ज्यांनी परस्परास ओळखले नाही ते परस्पराचे विरोधी (शत्रू) बनले.'' अशाच प्रकारचा प्लेटोप्रणीत प्रेम-सिद्धान्त सुद्धा होता. इब्न खल्दून म्हणतो, यहूद्यांच्या (ज्यूंच्या) भडकावण्यामुळे नासिर इब्नुल हार्रिस आणि उत्बा यांनी प्रेषितांसमोर तीन प्रश्न प्रस्तुत केले. त्यांपैकी एक आत्म्याविषयी होता. त्यांनी विचारले ''आत्मा हा काय आहे?'' या प्रश्नाच्या उत्तरादाखल पवित्र कुराण म्हणते – ''जे तुम्हाला आत्म्याविषयी प्रश्न करतात, (त्यांना) सांगा, आत्मा माझ्या विधात्याच्या आज्ञेने (अस्तित्वात) आहे.'' १७:८५ अशाप्रकारे आत्मा हा आज्ञाजगताशी संबंधित आहे. याचा उदय तीन टप्प्यांनंतर म्हणजेच 'अहदीय्यत, वहदत आणि वाहिदीय्यत' नंतर होतो आणि हा मर्यादांमध्ये असतो. परंतु पवित्र कुराण असेही म्हणते, ''आणि जेव्हा मी त्या (मानवा)स पूर्णपणे घडवून टाकेन व त्यात माझा आत्मा फुंकलेला असेन.'' ३८:७२ ''नफ़ख़्तु फ़ीहि मिर्रुही' (त्यात [आदम-मानवामध्ये] माझा आत्मा फुंकलेला असेन) हा आत्मा 'रूह-ए-आज़म' (सर्वश्रेष्ठ आत्मा) आहे. हा टप्पा 'वहदत'चाच टप्पा आहे. याला मर्यादा नसते. 'रूह-ए-आज़म'ला 'हक़ीक़त-ए-मुहम्मदी' पण म्हणतात. जरी वैयक्तिक आत्म्यास एक मर्यादा असते, तरीपण तो (आत्मा) भौतिक तत्त्व आणि विस्तारापासून मुक्त असतो. त्याला ना रंग असते ना रूप. त्याला जीवात्मा आणि अ-जीवात्मा अवगत असतात. मात्र तो कोणत्याही संवेदनांच्या जाणिवांच्या आधीन नसतो. 'रूह-ए-आज़म'च्या मर्यादा मानवाचे आत्मे (मानव-आत्मे) असतात, आणि जेव्हा अशी मर्यादा देहामध्ये व्यक्त होते तेव्हा ते पशु-आत्मा बनते. ते स्वभावाने सूक्ष्म असते. तिचा प्रत्येक कण हा शरीराच्या प्रत्येक कणाशी जोडलेला (जुडलेला) असतो. फक्त एकटाच देहाचे सुख उपभोगल्यामुळे आत्मा हा दंड आणि बक्षिसास पात्र ठरतो. स्वभावाने तो (आत्मा) अमर आहे. देह नष्ट झाल्यावर तो (आत्मा) एक विचार-स्वरूप धारण करतो. श्रेणीसिद्धान्त वा सोपानसिद्धान्त ('तनज़्ज़ुलात')मध्ये असे सांगितले गेले आहे की, प्रत्येक श्रेणी ही नंतरच्या उच्चतर श्रेणीचा नमुना असतो, आणि सर्वात खालची श्रेणी ही सर्व उच्चतर श्रेणीपासून ते सर्वोच्च श्रेणीचा नमुना असतो. यापूर्वी दर्शवल्याप्रमाणे जेव्हा प्रत्येक 'इस्म-ए-इलाही' साकार होतो, तेव्हा ते व्यक्त जगामध्ये एक 'इस्म-ए-कियानी' बनते. गुणाशी संबंध प्रस्थापित केल्यानंतर 'ज़ात' एक 'इस्म' (नाम) बनते. म्हणजेच 'ज़ात' असीम असते तर 'इस्म' हे सान्त असते. जर 'इस्म'चा कल हा केवलवादा (निर्गुण)कडे असेल तर ते 'इस्म-ए-इलाही' असते, साकार बनल्यानंतर जर 'इस्म'चा कल, परिमिततेकडे – सान्ततेकडे (सगुण) असेल, तरे 'इस्म-ए-कियानी' बनते आणि मग ते एक 'ऐन' (समरूप) बनते. ही 'इस्म-ए-इलाही'ची पडछाया असते. प्रथम 'इस्म-ए-इलाही' हे आपल्या 'इस्म-ए-कियानी'वर प्रत्यक्ष प्रभाव टाकते आणि निम्नतर 'इस्म-ए-कियानी'पासून ते निम्नतम 'इस्म-ए-कियानी'पर्यंत तिचा अप्रत्यक्ष प्रभाव असतो. ''(मानवी) दृष्टी त्याच्यापर्यंत पोचू शकत नाही. परंतु तो सर्वांच्या दृष्टीपर्यंत पोचतो (सर्वांच्या नजरा त्याच्या आवाक्यात आहेत) आणि तो सूक्ष्मदर्शी व बहुश्रुत आहे.'' ६:१०३ अशाप्रकारे असे म्हटले जाते की तिची आपल्या समानांतर आणि निम्नतर 'अस्मा' (नामे) वर आपली दृष्टी अथवा नज़र असते.

ॲरिस्टॉटलच्या 'बुक ऑफ ॲपल्स'मध्ये असे लिहिले आहे की, आत्म्याच्या सत्तत्त्वामध्ये ज्ञान सामावलेले असते, आणि अज्ञानाची शिक्षा म्हणजे अज्ञाना (दरी)मध्ये आणखी जास्त खोलवर बुडणे होय. बर्गसाँने आत्म्याचे वर्णन स्मृतिस्वरूपात केले आहे, आणि जड पदार्थास प्रतिमांची मालिका मानले आहे.

तथापि, सूफींनी 'नफ़्स' (वासनेस) लालसेशी, 'कल्ब' ज्ञानाशी, आत्मा दृष्टीशी, 'सिर्र' चिंतन-मननाशी आणि 'ज़ात' अभिव्यक्ती, उगमाशी निगडित मानले आहे. ज्याअर्थी 'ज़ात'चा उगम झाला त्याअर्थी आम्ही उदयास आलो. सर्व प्रतिमा या स्वरूपाच्या आहेत. ज्याअर्थी 'ज़ात' चिंतन करते त्याअर्थी आम्ही ध्यान करतो. प्रकाश आत्म्याचे सोपान आहे-टप्पा आहे, 'ज़ात'ने ओळखले म्हणून आम्ही जाणतो-ओळखतो ('कल्ब'चा टप्पा). 'ज़ात'ने इच्छा केली, म्हणून आम्ही संकल्प करतो ('नफ़्स'चा टप्पा). ज्ञान नव्हे, तर दृष्टी ही आत्म्याची शक्ती आहे. ''जो कोणी या जगात (मनाने) आंधळा राहिला, तो मृत्युनंतरच्या जगात आंधळाच राहील.'' १७:७२ आणि याहीपेक्षा वाईट अवस्थेत राहील. यावर भाष्य करताना 'शरअ-ए-मुवाफ़िक़'चे लेखक (पृ. ५८३) म्हणतात की, ''आत्मा हा एकतर अज्ञानावस्थेमध्ये असेल किंवा तो प्रबोधन स्थितीमध्ये असेल. अज्ञानात असलेले आत्मे हे निकृष्ट अवस्थेपासून अधिक निकृष्ट अवस्थेकडे प्रयाण करतील, तर प्रबुद्ध आत्मे हे आपल्यात सुधारणा घडून येईपर्यंत दु:ख भोगतील.'' द्रष्टेपणाची शक्ती आत्म्यामध्ये असल्याकारणाने, तो न देहात असतो न देहाविना. सूर्य एखाद्या घरास प्रकाशमान करतो. तो प्रकाश न घरात असतो न घराबाहेर. आत्म्याला तीन (प्रकारच्या) दृष्टी असतात, जेव्हा त्याची दृष्टी 'ज़ात'वर असते, तेव्हा त्याला 'अमीनरूह' (विश्वस्त आत्मा) असे म्हणतात. त्याच्या या दृष्टीस 'अमीन नूर' असे म्हणतात. जेव्हा त्याची दृष्टी 'मुमकिन-उल-वुजूद' (विचार जगत्)वर असते, तेव्हा त्याला 'रूह-ए-मुक़ीम' (स्थिर आत्मा) असे म्हणतात, आणि अशा दृष्टीस 'अन-नूर' (जीवात्म्याची दृष्टी) असे म्हणतात. जेव्हा आत्म्याची दृष्टी 'वाजिब-उल-वुजूद' (कारण देह, भौतिक अस्तित्व) वर असते, तेव्हा तिला 'रूह-ए-जारी' (प्रवाही आत्मा) असे म्हणतात. हा आत्मा निद्रावस्थेमध्ये देहाला सोडून जातो आणि आत्म्याच्या जगामध्ये इकडेतिकडे भटकत असतो आणि त्याच्या या दृष्टीला 'मिन-नूर' असे म्हणतात. निद्रावस्थेपेक्षा जागृतावस्थेत या 'रूह'ची देहावर एक अधिक प्रभावकारी दृष्टी असते. निद्रावस्थेमध्ये त्याची 'मिसाल'वर जरा जास्त प्रभावकारी दृष्टी असते.

### २) आलम-ए-मिसाल (प्रतिरूप जगत्, सादृश्य जगत्)

ही पाचवी मर्यादा आहे. हे प्लेटोचे बीजजातीचे, प्रत्यादर्शाचे जगत् किंवा इम्यानुएल स्वीडनबर्गप्रणीत सादृश्य जगत आहे. हे आत्मा जगत् आणि कारण जगत् या दोहोंमधील सीमाभूमी आहे. हे भौतिक तत्त्वयुक्त नाही, तरीपण स्वप्नांच्या जगाप्रमाणे रंगाच्या गुणदोषांमुळे तिला आयाम आहे. तिला परिमाण आहे.

'आलम-ए-मिसाल'ला 'आलम-ए-ग़ैब' पण म्हणतात. ही दृष्टिआडची एक सृष्टी आहे. मौलाना जलालुद्दीन रूमी आपल्या 'मसनवी' (कथा-काव्य)मध्ये असे मत नोंदवतात की, 'मिसाल' जगतामध्ये वेगळ्याच प्रकारचे ढग असतात. तिचा पाऊस पण आगळाच असतो. तिचे आकाश वेगळे, तिचे सूर्य काही औरच. हे सामान्य माणसाच्या दृष्टिक्षेपात येत नाही. कारण तो जगाच्या मायाजालामध्ये फसलेला असतो.

सर सय्यद अहमद खान यांचा असा विचार आहे की, दृष्टिआड असलेले ते सर्व 'ग़ैब' (परोक्ष, इंद्रियातीत) आहे. ही बाब गुरूत्वाकर्षणशक्ती सारखी आहे, परंतु हे 'आलम-ए-ग़ैब' आमच्या खऱ्या जगास समांतर असे एक वास्तव (जग) आहे. जशी दोन घड्याळे अचूक वेळ दर्शवण्यासाठी लावून ठेवतात, तशाच प्रकारे या दोन्ही जगांमध्ये पूर्वप्रस्थापित असा मेळ आहे. बॅलफोर स्टिवर्ट व टेट म्हणतात, ''भौतिक जगत् हा

शब्दच मुळात एक मिथ्या आहे. (वास्तविक) जग हे एक आध्यात्मिक जग असते ते आपल्या आविष्करणासाठी भौतिक तत्त्व उपयोगात आणते. वैज्ञानिक तर्कशास्त्र आम्हास एका अव्यक्तापर्यंत, अदृश्यापर्यंत पोहोचवते, तर वैज्ञानिक साम्यानुमान अदृश्याच्या आध्यात्मिक वृत्तीच्या थरास पोहोचविते. सारांश, आमचे निष्कर्ष असे की, दृश्य विश्व (ब्रह्मांड) हे अदृश्यामध्ये स्थित एका प्रज्ञेमुळे विकसित झाले आहे.

मरणोत्तर येणाऱ्या जगास 'मिसाल' किंवा 'बर्ज़ख़' असे म्हणतात. आपल्या स्वभावाच्या विशिष्ट गुण-दोषांसह वैयक्तिक आत्मे परवर्ती 'बर्ज़ख़' जगाकडे प्रयाण करतात. प्रत्येक व्यक्तीस आपल्या कर्मांच्या गुण-दोषांची फळे भोगावी लागतात. न्याय-दिवसापर्यंत ती व्यक्ती तेथे राहते. याला अब्दुल करीम जीली 'हैकल-ए-ख़याली' (विचारचक्र) असे संबोधतात. अथवा प्लेटोच्या वास्तववादाचे प्रवर्तक शेख शिहाबुद्दीन मक़्तूल, हे शेखुल इश्राक़ म्हणून सुद्धा ओळखले जातात, याला 'आलम-ए-असबाब' (वस्तुजगत) म्हणतात किंवा शाह वलीउल्लाह देहलवी यांनी 'नुस्मा' (प्रकाशाचे आद्य किरण) असे म्हटले आहे. जे अशाप्रकारे 'मिसाल'च्या जगामध्ये राहतात आणि ते आशीर्वादित आत्मे आहेत, अशा (आत्म्यांना) पवित्र कुराणामध्ये 'हरित पक्षांच्या झुंडीमध्ये राहणारे' असे म्हटले आहे. विचाराचे दोन प्रकार आहेत- मेंदूच्या माध्यमातून कार्यरत होणारे विचारास 'ख़याल-ए-मुत्तसिल' (निगडित विचार, आबद्ध विचार) असे म्हणतात, आणि तो विचार जो त्याच्या माध्यमाने कार्यप्रवृत्त होत नाही, याला 'ख़याल-ए-मुनफ़सिल' (पृथक विचार) असे म्हणतात. एक मिथ्या आहे तर दुसरे सत्य आहे, असे श्री. मायरकृत 'Survival of Human Personality' या ग्रंथात सांगितलेले आढळते. नंतर सर ऑलिव्हर लॉजने लिहिलेले 'Survival of Man' हा ग्रंथ अशा दोन्ही ग्रंथांमध्ये सत्य विचाराच्या प्रकटीकरणाची नोंद असलेली बरीच उदाहरणे नोंद केली गेली आहेत. म्हणून 'मिसाल' जग हे एक प्रकारचे सत्य विचार जगत असते. ते जास्त नसले तरी (आमच्या) या जगाइतकेच वास्तविक असते. कारण जे काही या जगात घडते, ते अगोदरच तेथे आकार धारण करते.

विचार-जगताच्या आकारांसह, देवदूत पृथ्वीवर अवतरित होत असतात. जिब्राईल देवदूत हे प्रेषित मुहम्मद (त्यांच्यावर शांती असो) साहेब यांच्यासमोर 'ज़िया कल्बी' (शुद्धात्मा) स्वरूपात हजर (उपस्थित) होत असत. ख़िज़र पण 'विचार-देहा'मध्ये प्रकट होत असत. उमर मदीनेमधील एक मशिदीमध्ये प्रवचनपीठावरून प्रवचन देत असताना, सारिह इब्न रूस्तमच्या सेनेसमोर हजर राहू शकले होते व त्यांनी सारिहला एका विशिष्ट पर्वताकडे जाण्याविषयी मार्गदर्शन केले होते. याला तुम्ही वाटल्यास अतींद्रिय दृष्टी - परोक्ष दर्शन म्हणा किंवा वाटल्यास सूक्ष्मदर्शी म्हणता. थडग्यामध्ये मृतकाच्या शवासमोर, मुनकिर आणि नकीर या दोन देवदूतांचे हजर होणे हे विचार-देहच आहे. या जगामध्ये कर्म विस्तारतात. त्यांचे वास्तव हे 'जवाहिर' (सत्त्व) असते. विस्तार लुप्त झाल्यावर ते शिल्लक उरतात. हे 'जवाहिर' 'हूरान-ए-बहिश्त' (स्वर्गातील अप्सरा) इत्यादी स्वरूपात दिसतात. हे सत्कर्मांच्या बाबतीत घडते. दुष्कर्मे हे अग्नीचे रूप धारण करतात. कारण कुकर्माचे मूळ आग असते.

### ३) आलम–ए–अजसाम (कारण जगत, भौतिक जगत)

उपरोक्त प्रस्तुत नकाशावरून ही बाब नोंद करण्यासारखी आहे की 'अस्मा–ए–कियानी' क्रमांक १ ते ४ पर्यंत म्हणजेच – 'अक़्ल–ए–कुल', 'नफ़्स–ए–कुल', 'तबियात–ए–कुल' आणि 'जौहर–ए–हबा' यांच्यामुळे 'आत्मा–जगत' बनते. हे उच्चतर चार 'अस्मा' हे तेच चार 'मलाए आला' (श्रेष्ठ देवदूत) आहेत. (ते अबोधपणे नित्य ईशचिंतनामध्ये मग्न असतात.) ते 'बदीअ', 'बाइस', 'बातिन' आणि 'आख़िर' या चार ईश–नामांचे प्रतिरूप आहेत. हे चार आकार ('अयान–ए–साबित') धारण करून आपले प्रतिरूप म्हणजेच निरपेक्ष विवेक, निरपेक्ष श्वास, निरपेक्ष प्रकृती आणि भौतिक तत्त्व (सत्त्व) प्रगट करतात. नकाशामधील पाचव्यापासून ते आठव्यापर्यंत ही 'मिसाल' आविष्कारणे आहेत, तर नऊपासून ते सत्तावीसपर्यंत भौतिक आविष्करणे आहेत. पुन्हा आठव्यापासून ते सतराव्यापर्यंत यांना 'वरिष्ठ पितृका' ('आबा–ए–उलवी') म्हणतात, तर अठरापासून ते सत्तावीसपर्यंत यांना 'कनिष्ठ मातृका' ('उम्महात–ए–सिफ़्ली') असे म्हणतात. प्रथम संच हा दुसऱ्या संचाशी कार्यप्रवृत्त होऊन 'पुरुषोत्तम' वा 'नरोत्तम' ('इन्सान–उल–कामिल')ची निर्मिती करतो. जसे 'बदीअ' आपल्या स्वत:मध्ये सर्व परवर्ती नामे समाविष्ट करून घेतो, तसेच 'इन्सान–उल–कामिल' सर्व पूर्ववर्ती 'अस्मा–ए–कियानी' समाविष्ट करून घेतो, आणि तो त्या सर्वांचा प्रतिनिधी असतो. म्हणून 'इन्सान–उल–कामिल' (पुरुषोत्तम, नरोत्तम) हा पृथ्वीतलावर परमेश्वराचा प्रतिनिधी – उपप्रभारी असतो. अशारीतीने परमेश्वराने माणसास आपल्या स्वत:च्या प्रतिमेत बनवले. काही भाष्यकार 'परमेश्वराने' (आपल्या स्वत:च्या) या शब्दावलींचा 'माणसाची प्रतिमा' म्हणजे परमेश्वराने माणसास, माणसाच्या प्रतिमेमध्ये निर्माण केले असा अर्थ घेतात. ज्याअर्थी प्रत्येक 'अस्मा–ए–कियानी' हे प्रत्येक 'इस्म–इलाही'चे एक बाह्य रूप आहे, अशा स्पष्टीकरणामुळे मानवाचे श्रेष्ठत्व सिद्ध होत नाही. म्हणून मानव हा सर्व नामांचा प्रतिनिधी आहे. एक ख्रिश्चन गूढवादी 'फादर' संत अंथोनी (क्लॉडकृत 'The Pioneers of Evolution', पृ. १७) याने असे निरीक्षण केल्याचे सांगतात की सुईच्या एका टोकावर २०,००० (वीस हजार) देवदूत एका समूहात नाचत होते. म्हणजेच मानवाच्या 'ज़ात' (सत्ता) वर अनेक 'सिफ़ात' आणि 'अस्मा' यांचे एक प्रदर्शन असते. 'मला–ए–आला'मधील देवदूतांना आदम पुढे नतमस्तक होण्याची आज्ञा (दिली गेली) नव्हती, कारण जेव्हा इब्लीसने (सैतानाने) आदमसमोर नतमस्तक होण्याचे नाकारले तेव्हा तो म्हणाला, ''मी त्याच्यापेक्षा श्रेष्ठ आहे. तू मला अग्नीपासून निर्माण केले आहेस, तर आदमला मातीपासून निर्माण केले आहेस.'' ७:१२ अल्लाहने म्हटले, ''हे इब्लीस! ज्याला (म्हणजेच मानवाला) मी माझ्या दोन्ही हातांनी बनवले आहे, तर त्याच्यासमोर नतमस्तक न होण्यास तुझ्यासाठी कोणती गोष्ट कारणीभूत ठरली? तू हे मगरूरीचे प्रदर्शन करतोस की, तू त्या 'मला–ए–आला' पैकी आहेस'' ३८:७५ 'मला–ए–आला'ना सोडून (वगळून) सर्व देवदूत आदमपुढे नतमस्तक झाले. म्हणजेच इतर सर्व 'कियानी' नामे ही आदमच्या वशवर्ती आहेत. आदम हा सर्व 'कियानी' नामांचा दृश्य स्वरूप आहे. म्हणून मानवास कुठल्याही विशिष्ट 'कियानी' नाम अथवा नामांना पूजण्याची आवश्यकता नाही. त्याला अग्नी, वायू अथवा पृथ्वीवरील देव–देवता किंवा देवदूत यांची आराधना करण्याची गरज नाही. जरी त्याला हे माहीत आहे की ते आपले नियत कार्य अविरतपणे संपन्न करीत आहेत. प्रत्येक नामाशिवाय एक 'मर्यादा' आहे. 'नामिता'स दृष्टिक्षेपामध्ये न घेता तिच्या एका विशिष्ट पैलूची आराधना करता येऊ शकत नाही. जर 'असीम'

आणि 'अनामित' दृष्टिक्षेपात असतील तर एखाद्या नामाच्या माध्यमाने त्यांची आराधना करणे समर्थनीय ठरले असते. परंतु वस्तूंच्या स्वभावात हे अशक्य आहे. 'गुलशन-ए-राज़'चा कवी महमूद शबिस्तरी म्हणतो - (भावानुवाद)

"श्रद्धा काय आहे, हे खरोखर मुसलमान ओळखला असता तर त्याला कळून चुकले असते की श्रद्धा ही मूर्तिपूजा आहे. जर मूर्तिपूजकास, मूर्ती काय आहेत हे खरे कळले असते तर तो आपल्या धर्मात चुकीचे काय करत आहे! तो आपल्या मूर्तींमध्ये वास्तविक काहीच पाहत नही, परंतु तो दृश्य प्रतिमा पाहतो आणि हेच तर कारण आहे की तो धर्माच्या शास्त्राप्रमाणे एक श्रद्धाहीन, अ-भक्त आहे."

'जवाहर-हबा'नंतर 'अर्श' वा ईश-सिंहासन आहे. त्याने ब्रह्मांडास वेढलेले (घेरलेले) आहे. 'अर्श'च्या पोकळीमध्ये 'कुर्सी' (पादपीठ) आहे. ती चौरसाकृती आहे. या पादपीठावर परमेश्वराचे दोन पाय (प्रभा आणि कृपा) आहेत. या पादपीठापासून परमेश्वराची प्रभा आणि कृपा, अवनी (पृथ्वी)वर चमकतात. त्याची कृपा ही प्रभेस घेरून आहे. नंतर नित्य परिवर्तनशील असे पारदर्शक ग्रह आहेत. म्हणून तर ब्रह्मांडामध्ये सतत बदल घडतात. हे या महाव्योमामुळे घडते. नंतर येणारी सर्व नामे ही 'इन्सान-उल्-कामिल'मध्ये कळसास पोहोचतात. वाढीव वृक्ष शेवटी बीजामध्ये विलीन होते जिथून ते उगवले होते.

सर्व उपपत्ती सिद्धान्त वा प्रसर्जन सिद्धान्त वा निस्सरण सिद्धान्त हा साररूपात असा मांडता येईल - 'ज़ात'ने स्वतःस 'सिफ़ात'मध्ये पाहिले, ही एक 'तजल्ली' (रोशणाई म्हणजेच साक्षात्कार) होती. 'सिफ़ात' हे आरशाच्या पाऱ्याच्या लेपासारखे असतात. रोषणाई प्रकट होऊन द्वैतास उत्पन्न करते. ही रोषणाई स्वतःस आत्मा स्वरूपात प्रगट करते. जेव्हा आत्म्याने स्वतःस पाहिले, तेव्हा ते 'मिसाल' होते. शरीर हा आत्मारूपी आरशाचा लेप असतो. कारण लेपाविना प्रतिबिंब पडू शकत नाही. जेव्हा शरीराचे लेप आणि आणि द्रष्ट्यांची दृष्टी नाहीशी होते, तेव्हा द्रष्टा (आत्मा) स्वतः शिल्लक राहतो. तशाच प्रकारे शेवटी जेव्हा 'ज़ात'ची दृष्टी नाहीशी होते, तेव्हा आत्मा विलुप्त होतो आणि फक्त केवलवादच उरतो.

# विभाग - २

# अल्लाह* (परात्पर परब्रह्म)

*'अल्लाह' या अरबी भाषेच्या शब्दासाठी इतर भाषांमध्ये तंतोतंत असा समर्पक प्रतिशब्द नाही. तरी पण त्याच्या अर्थाशी निगडित व निकटतम भाषांतर आम्ही 'परात्पर परब्रह्म' असे केलेले आहे. परंतु इत:पर व या अगोदर प्रयुक्त ईश्वर, परम ईश्वर, परमेश्वर, परमात्मा, ब्रह्म, भगवंत हे सर्व शब्द 'अल्लाह'चे पर्यायवाचक म्हणून गृहीत धरावे.

५



प्रकरण ५

# अल्लाहचे अस्तित्व (वजूद)

### अल्लाहचे अस्तित्व

## क) वैज्ञानिक दृष्टी[१४]

### मानवशरीर आणि ब्रह्मांड

मानवाचे शरीर, त्याचे मन, त्याची बुद्धी आणि त्याचे प्राण हे सर्व मिळून एक सुव्यवस्थित मानव-संगठनेची निर्मिती करतात. ब्रह्मांडामध्ये असे अनेक संगठन आहेत. अखिल ब्रह्मांड हे स्वत: एक असेच बृहत संगठन आहे. यांना एकाच तत्त्वाची दोन संस्करणे म्हणता येईल. एक लघु संस्करण आहे, तर दुसरे विशाल. दोन्ही संस्करणांमध्ये विचित्र साम्य आहे. ज्याप्रमाणे लघु संस्करणाचे निष्पादक अवयव बाहेरून आतमध्ये, स्थुलाकडून सूक्ष्माकडे आणि निष्क्रियपासून सक्रिय होत गेले आहेत, तद्वत् बृहत् संस्करणाचे पण आहे.

मानव-संगठनेच्या निर्मितीमध्ये शरीराच्या आतमधील सात धातू - रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा आणि शुक्र कारण-कार्य-पूर्वक परस्पर संबंधित असे आहेत. (चरक संहिता २८:४) सत्, रज, तमच्या तीन भेदांमुळे एकूण एकवीस (२१) भेद बनतात. हाच भेद या ब्रह्मांडरूपी संगठनेमध्ये आहे. वैदिक पुरुषसूक्तामध्ये यांना एकवीस (२१) समिधा असे म्हटले गेले आहे.

शरीर जसे नितांत स्थूल परमाणूंचा संघात आहे, तसेच ब्रह्मांडाचे पृथ्वी आदी लोक पण आहेत. शरीराप्रमाणेच ब्रह्मांडामध्ये प्राणशक्ती संचरित होत आहे. आमचे सूक्ष्म मन ब्रह्मांडाचे सूक्ष्म आकाश आहे. आमची बुद्धी म्हणजे ब्रह्मांडाचे द्यौलोक - मानव-संगठनेच्या सर्व अवयवांचा प्रेरक जीवात्मा आहे. तर मग अखिल ब्रह्मांडाच्या अवयवांचा प्रेरक परम आत्मतत्त्व हा असलाच पाहिजे.

अशाप्रकारे पिंड आणि ब्रह्मांड या दोहोंमध्ये अद्‌भुत साम्य-शृंखला पाहावयास मिळते. हे साम्य बाहेरून आतमध्येपर्यंत विद्यमान आहे. जसे येथे एका संगठनेकडे पाहिल्यास त्याच्या निर्माणकर्त्याचे भान होते, तसेच या ब्रह्मांडाच्या संगठनेकडे पाहिल्यास त्याच्या निर्मात्याचे भान होते. रचनाकाराच्या रचनाशक्तीमध्ये प्रकाशात्मिका बुद्धी निहित असते. त्याच बुद्धीचे विशाल रूप ब्रह्मांडाच्या निर्मात्यामध्ये असायला पाहिजे.

### विज्ञान आणि ब्रह्मांड

सृष्टी-निर्मितीची योजना आणि तिची कार्य-परिणतीसंबंधी वैज्ञानिकांनी केलेल्या संशोधनावरून असा निष्कर्ष निघतो की सृष्टी अकस्मात उत्पन्न झालेली नाही. तिच्या पाठीमागे एक महान मेंदू कार्यरत आहे. सौर

मंडळातील सूर्य, चंद्र, पृथ्वी इत्यादी सर्व ग्रह आणि उपग्रह आकर्षणसंबंधामध्ये असे परस्पर संबद्ध आहेत की त्यांचे अंतर, त्यांची गती आणि परिणाम हे अत्यंत सुनिश्चित असे आहेत. ('यो अंतरिक्षे रजसो विमान: ।' – यजुर्वेद ३२:६ 'ज्याने अंतराळामध्ये लोकांना (जगतांना) मापूनतोलून ठेवले आहे.') ते एकमेकांचे सहायक बनून असे सुरक्षित आणि सुदृढ आहेत की त्यांना अशा स्थितीमध्ये पाहून याच्या पाठीमागे असलेल्या एका अनंत चेतन सत्तेच्या विद्यमानतेची खात्री पटते.

फ्रान्सचे सुप्रसिद्ध गणितज्ञ लाप्लास (इ. स. १७७९) यांनी नीहारिकावादाचा सिद्धान्त मांडला. या सिद्धान्तान्वये असे प्रतिपादन करण्यात येते की विश्वरचनेमध्ये क्रियाशील असा एक निर्धारित नियम आढळून येतो. या सिद्धान्तास तारामंडळाचा सिद्धान्त असेही म्हणतात.

**नीहारिकावाद आणि हिरण्यगर्भवाद**

नीहारिकावादाशी मिळताजुळता असा भारतीय मनीषींचा हिरण्यगर्भवाद आहे. याचा उल्लेख अथर्ववेद १०/७/२८, मनुस्मृति १/९, श्रीमद् भागवत २/५ व ३/२६ आणि गीता १४/३, ४ मध्ये आहे. छांदोग्य उपनिषदाच्या सहाव्या अध्यायामध्ये उद्दालकने आपले पुत्र श्वेतकेतुस जो उपदेश दिला होता, त्यामध्ये पण सृष्टीचा तोच क्रमिक विकास विद्यमान आहे जो नीहारिकावादामध्ये दाखवण्यात आला आहे. अग्नी, जल आणि अन्न हे क्रमश: सृष्टीनिर्मितीच्या वायूरूप, द्रवरूप आणि घनरूप अवस्थांना सूचित करतात. आपल्याकडे लोक पण तीन प्रकारचे मानले गेले आहेत. सूर्य, नक्षत्र आणि पृथ्वी. प्रथम प्रकारचे लोक प्रकाशमय आहेत, द्वितीय प्रकारचे तमोमय व प्रकाशमय आणि तृतीय प्रकारचे तमोमय आहेत. यात क्रमश: सत्, रज आणि तमची प्रधानता आहे. ऋग्वेद अनुसार सत्, रज आणि तम चे परमाणू – मिथुन ७२० आहेत.

**नैसर्गिक नियम**

सृष्टीचे नियम अटळ असतात. विश्वामध्ये हजारो वस्तू आहेत, परंतु त्यापैकी एकही वस्तू आवश्यकतेपेक्षा जादा नसते. प्रत्येक वस्तूस आपल्या अस्तित्वासाठी कोणत्या ना कोणत्या तरी अन्य वस्तूवर अवलंबून राहावे लागते. अशाप्रकारे अन्योन्याश्रय संबंधामुळे सर्व वस्तू परस्पर निगडित असतात. जेव्हा एखादी वस्तू गरजेपेक्षा अधिक प्रमाणात प्रसार पावते तेव्हा तिचे विनाशक कीटाणू कार्यमग्न होऊन तिच्या अधिक मात्रेस उदरस्थ करून तिला समतोल अवस्थेपर्यंत आणून सोडतात. निसर्गामध्ये अशाप्रकारचे अवरोधात्मक परंतु संतुलनात्मक तत्त्व सार्वभौम रूपात आढळून येते.

मानवीय बुद्धीच्या कृतींमध्ये जसा साधन आणि साध्यामध्ये संबंध दिसून येतो तसाच संबंध नैसर्गिक जगामध्ये सर्वत्र दिसून येतो. जर कार्यांमध्ये साम्य आढळते, तर मग कारणांमध्ये सुद्धा साम्य असलेच पाहिजे. म्हणून मानवी मेंदूप्रमाणेच, नैसर्गिक महान कार्यजगताचा रचनाकार एक असा महान मेंदू असला पाहिजे की ज्याच्यामध्ये महत् कार्यापेक्षा महत् शक्तीपण विद्यमान असल्या पाहिजेत. विज्ञानाच्या सर्व क्षेत्रांमधील संशोधनावरून उपरोक्त विधानाची वास्तविकता सिद्ध होत आहे.

जीवशास्त्राच्या दृष्टीने विचार केल्यास असे आढळून येते की जीवन हे स्वत: एक महान मेंदू किंवा सर्वव्यापक बुद्धीची ओळख करून देत आहे. पृथ्वीवर जे जीवन (जल) आढळून येते, ते आकस्मिक नव्हे. त्याचा एक विशिष्ट हेतू आहे. जीवन आणि जीवन-संबंधी साधनांचा हा विशाल कारखाना कोणाच्या

देखरेखीखाली चालू आहे? या जीवनाचा पण एक जीवन, नि:संदेह, एक मूळ महाजीवन आहे. हे जीवन निसर्गापासून उत्पन्न झालेले नाही. तर मग या जीवनाचा उगम कोठे आहे? हक्सलेच्या शब्दामध्ये – 'या जीवनाच्या स्रोत जीवनच आहे. जीवन कोणत्यातरी संगठनेचा परिणाम नव्हे, तर ते त्याचे कारण आहे.'

जीवनाच्या बाबतीत दोन परस्परविरोधी विचारधारा प्रचलित आहेत. एका विचारधारेनुसार जीवन खाली लुडकत निसर्गाच्या धरातळाशी एकरूप होऊन जाते, तर दुसऱ्यानुसार ते वर चढत आत्मतत्त्वाशी मिसळून जाते. निसर्गवाद संपूर्ण जीवन-जगतास निसर्गाचाच खेळ मानतो. आत्मवाद त्याला निसर्गाचा भाग किंवा नैसर्गिक बदलांचा परिणाम मानत नाही. याच आधारावर निसर्गवाद्यांना भोगवादी तर आत्मवाद्यांना आदर्शवादी म्हटले जाते. भोगवादाची दृष्टी ही केवळ प्रत्यक्षावरच खिळलेली असते, परंतु आदर्शवादी याला पशुकोटीचे जीवन समजून प्रत्यक्ष किंवा वर्तमानास भेदून आपल्या बुद्धीच्या बळावर प्रत्यक्षाच्या मागे-पुढे पण पाहात असतो. त्याच्या दृष्टीने वर्तमान जीवन हे विशाल जीवन-शृंखलेची एक साखळी मात्र आहे.

निर्मितीमध्ये विखुरलेली सामुग्री, त्या सामुग्रीचे व्यक्तिकरण आणि व्यक्तिकरणापासून व्यवस्थेकडे वाटचाल करण्यामध्ये एक सुनिश्चित असा क्रम आढळून येतो आणि त्या क्रमाच्या मुळाशी एका चेतन सत्तेचे हात असलेले दिसून येते. सर जेम्स जीन्सने याला चेतना आणि आइन्स्टाइनने यास बुद्धी असे नाव दिले आहे.

सृष्टी विविधरूपा असूनही एक आहे. सृष्टीची ही एकात्मकता अर्थात समतोलता ही त्याचा कोणीतरी स्रष्टा (निर्माता) असल्याची ग्वाही देते. बाहेर सृष्टीचे विभिन्न अवयव मिळून (एकवटून) एक दुसऱ्यास आकर्षित करून, एका नियमामध्ये आबद्ध असल्याकारणाने एक आहेत. त्यांची ही नियमबद्धताच या एकतेची निर्देशिका आहे. याचप्रमाणे अंतरंगामध्ये भावना, कल्पना आणि चेतना यांची एकता आहे. नियमांची ही एक प्रकारता पुन्हा एक नियम आहे. या नियमाचा एक नियामक आहे म्हणून आंतरिक किंवा बाह्य कोणत्याही दृष्टीने पाहिल्यास, हे विविधांगी जीवन आणि जगत् एका चेतन नियामकाचेच कार्य प्रतीत होते. याच सर्वोपरी चेतन नियामक तत्त्वास ईश्वर असे म्हणतात.

विज्ञानाचे संशोधन जेव्हा खुद्द वैज्ञानिकास विचार करण्याची संधी देतात आणि त्याच्या मेंदूवर-बुद्धीवर आपले प्रभाव उमटवतात, तेव्हा वैज्ञानिकाची स्थिती ही तत्त्ववेत्त्यासारखी बनून जाते. व्यापक नियमांच्या क्रियाशीलतेचा अनुभव घेऊन वैज्ञानिकांनी विविध शाखांच्या अध्ययनास एका विशाल शाखेच्या अध्ययनामध्ये पर्यवसित केले आहे. त्यांनी वनस्पतिशास्त्र आणि प्राणिशास्त्रास जीवशास्त्राचा एक भाग मानले आहे. जीवशास्त्र, भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र हे शेवटी दर्शनशास्त्र अर्थात तत्त्वज्ञानामध्ये मग्न होऊन जातात. म्हणून या परमतत्त्वाशी संबंधित दर्शनशास्त्राचा शोध कुठपर्यंत पोहोचला आहे, हेही पण पाहिले पाहिजे.

## ख) दार्शनिक दृष्टी[१४]

दर्शनशास्त्र किंवा तत्त्वज्ञान हे (१) सत्ताशास्त्र, (२) मानसशास्त्र आणि (३) नीतिशास्त्र या तीन भागांमध्ये विभाजित आहे. म्हणून येथे याच तीन क्षेत्रांचे विवेचन प्रस्तुत करण्यात येत आहे –

**१) सत्ताशास्त्र –** निसर्गात निरंतर रूप-परिवर्तन होत असते. जे काल होते ते आज नाही, जे आज आहे ते उद्या राहणार नाही. प्रत्येक क्षण अभिनवता जणू त्याची जीवन-संगिनी बनून राहिली आहे. तरी पण जो सूर्य

काल होता, तोच पुन्हा आज उदय पावतो आहे. जो पूर्ण चंद्र गत पूर्णिमेस उदित होता, तोच पुन्हा सुमारे ३० दिवसानंतर येणाऱ्या पूर्णिमेस पुन्हा दिसून येतो.

अभिनवतेमध्ये ही प्राचीनता कुठली बरे? हजारो परिवर्तनानंतर ही स्थिरता कसली? प्रपंचाचा हा चाक्षुष प्रत्यक्ष मानवास चिंतनाकडे अग्रेसर करतो. तो वैज्ञानिकासारखा नैसर्गिक दृश्ये आणि घटनांचे उद्घाटन करत नाही, तर या उद्घाटनेचे संश्लेषण – विश्लेषण करत, निसर्गाच्या पडद्यास भेदून (फाडून) त्या सत्तेचा साक्षात करून घेतो, जी निसर्गाच्या क्षणोक्षणी नवरूपता आणि स्थिरतेच्या मुळाशी विद्यमान आहे.

निसर्गाची विविधरूपा दृश्यावली शाश्वत नसते. तिच्यामध्ये नित्य बदल होत असतो. कारण ज्याची उत्पत्ती आहे, त्याचा विनाश अटळ आहे. तत्त्वज्ञ यांच्या स्रोताविषयी विचार करतो. उत्पत्तिसोबत तिच्या स्थिरतेवरसुद्धा तो विचार करतो. ज्याने याची उत्पत्ती केली, हिला स्थिर राखण्याची शक्ती पण त्याच्यात आहे. यांची उत्पत्ती आहे, स्थिरता आहे, तर एके दिवशी यांचा विनाश पण होणार. हा कोण बरे आहे जो यांचा संहार करतो? तत्त्ववेत्ता उत्पादकासच संहारकर्त्याच्या स्वरूपामध्ये पाहतो आणि म्हणतो, ''ही दृश्ये, या बाहुल्या (खेळण्या) त्याच खेळाडूच्या हातामध्ये आहेत. सूत्रधारकाच्या भातुकलीच्या खेळाप्रमाणे हे आपले रूप-रंग बदलत असतात, नाचत असतात, गात असतात, हावभाव दाखवतात आणि मग एकवटून त्याच्याच हातापर्यंत पोहोचतात. तो लीलामय यांच्या माध्यमाने आपली लीला दाखवतो आणि मग त्यांना बंद करून टाकतो.'' अर्नेस्ट अनविन लिहितो – 'हे विश्व त्याच कलाकाराची कला आहे आणि त्याच्याच स्वभावाची अभिव्यक्ती आहे.' भारताचे सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ बादरायण व्यासांनी ब्रह्मसूत्राच्या प्रारंभीच ब्रह्मविषयी जिज्ञासा व्यक्त करताना लिहिले आहे – 'जन्माद्यस्य यत:' जो विश्वाचे जन्म, स्थिती आणि संहाराचा कारण आहे, तो ब्रह्म आहे. हा ब्रह्मच परिवर्तनशीलांमध्ये अपरिवर्तनीय, अनित्यांमध्ये नित्य, मर्त्यांमध्ये अमर्त्य आणि अंतिम सत्य आहे. निसर्गाचे – प्रकृतीचे रूप विभक्त होऊ शकतात, परंतु ही अविभाज्य, एकरस, शाश्वत सत्ता आहे.

प्राचीन ग्रीक विद्वान एवेक्सेगोरस याने समस्त व्यवस्थित सृष्टीच्या मुळात एका चेतन सत्तेस नि:संदिग्द स्वरूपात स्वीकारले आहे. ॲरिस्टॉटल या विद्वानास याच आधारावर अनेक अंधामध्ये हा एकटा पाहणारा – दृष्टिधारी असे म्हणतो. अर्नेस्ट हेकल याने या चेतन सत्तेस नाकारले आहे. त्याचा सिद्धान्त जडवाद या नावाने प्रसिद्ध आहे. त्याने जड प्रकृतीपासूनच चेतनेची उत्पत्ती सिद्ध केली आहे. जडवाद या सिद्धान्तानुसार प्रकृती (Matter) मध्ये त्या सर्व शक्ती आणि संभावना आहेत, ज्या प्रत्येक विद्यमान आणि भावी सत्तेस जन्म देऊ शकते. प्रकृती नाना रूपांमध्ये विकसित झालेली दिसून येते, परंतु ती सर्व विद्यमान सत्तांचे मूळ आणि एकमात्र उपादान आहे.

जडवादाच्या विरोधात हर्बर्ट स्पेन्सर आणि हेगेलचा आदर्शवाद वा अध्यात्मवाद आहे. हा समस्त प्रपंचाच्या मुळात चेतन तत्त्वास ग्रहण करतो. आदर्शवादानुसार अंतिम सत्य आपल्या मूळ रूपामध्ये आध्यात्मिक आहे आणि सर्व पार्थिव पदार्थ गुणसमुच्चयाशिवाय काहीच नाहीत. हे गुण पण आमचे विचारच आहेत. ध्वनीचा विचारच ध्वनी हा आहे, रंगाचा विचारच रंग आहे. लिबनिज़च्या मतानुसार प्रत्येक पार्थिव पदार्थ अनेक मेंदूंची एक बृहत् निवासभूमी आहे. चेतनसंपन्न मानवासारख्या सत्तांमध्ये या मेंदूअतिरिक्त एक केंद्रिय मेंदू आहे, ज्याला आत्मा असे म्हणतात.

निसर्गवादी (प्रकृतीवादी) जड प्रकृतीस जगताचे उपादान कारण मानूनसुद्धा त्यामध्ये बुद्धितत्त्वाचा स्वीकार करतात. स्पिनोज़ाने पण एकाच तत्त्वामध्ये या दोहोंची स्थिती मान्य केली आहे. त्याच्या मतानुसार एकाच द्रव्यात अनंत गुण असतात, पण आमचे ज्ञान या गुणांच्या केवळ दोन रूपांपर्यंतच सीमित आहे. ही दोन रूपे आहेत, विचार आणि विस्तार, जी पुन्हा अनेक रूपांमध्ये अभिव्यक्त होतात. विचाराच्या रूपांना मन आणि विस्ताराच्या प्रत्येक रूपास वस्तू वा पदार्थ असे म्हणतात. कांटच्या अज्ञेयवादानुसार आम्हा सर्वांचे जीवन छायेच्या जगामध्ये व्यतीत होत असते. याच छायेस आपण पाहू शकतो आणि त्याचेच ज्ञान आम्हास होत असते, परंतु जो ही छाया पसरवतो, अर्थात ज्याची ही छाया आहे, त्याला आम्ही पाहू शकत नाही, त्याला समजू (जाणू) शकत नाही. आम्ही फक्त एवढेच जाणतो की तो छाया पसरवणारा आपले अस्तित्व धारण करतो. आदर्शवादानुसार तत्त्वज्ञानाचे मुख्य कार्य ही छाया किंवा या मायेस सारून मानव-मनास हिच्या मूळ तत्त्वाकडे प्रवृत्त करणे आणि तिचा साक्षात्कार घडवण्यामध्ये आहे. भारतीय तत्त्वज्ञानामध्ये महर्षी गौतम यांनी न्यायदर्शनामध्ये ईश्वरास समस्त प्रपंचाचे आदिकारण आणि जीवांचा कर्म-फल-प्रदान स्वरूपात स्वीकार केले आहे. नंतरच्या न्यायाचार्य किंवा नैयायिकांनी आत्म्याचे दोन प्रकार मानले आहेत- जीव आणि ईश्वर. जीव अनेक आहेत, ईश्वर एक आहे. जीव अल्पज्ञ आणि अल्प सामर्थ्यशील आहे, ईश्वर सर्वज्ञ आणि सर्वशक्तिमान आहे. न्याय आणि वैशेषिक, जीव आणि ईश्वरास वेगवेगळे मानतात.

नैयायिक उदयनच्या मते कार्यास कारणाची अपेक्षा असते. कारणाशिवाय कार्य संपन्न होत नाही. कार्य आणि कारणाचा हा संबंध अनादी आहे. प्रत्येक जीवाचा भोग हा वेगवेगळा असतो. आम्ही येथे इहलोकात शुभ वा अशुभ कर्मामुळेच सुखी किंवा दु:खी होतो. हे ठीक आहे की आमचे कर्म तत्काळ फलप्रद होत नाहीत. सत्कर्माचा संस्कार पुण्य तर दुष्कर्माचा संस्कार पाप असतो. हे पाप-पुण्यच अदृष्टास निर्माण करतात. पाप-पुण्य हे आत्म्याशी बांधील असतात. पाप आणि पुण्य संचित होत असतात. यांनाच अदृष्ट असे म्हणतात. हा अदृष्ट अचेतन आहे, म्हणून कोणत्या तरी चेतन सत्तेच्या निर्देशाशिवाय कुठलेच फळ देऊ शकत नाही. या परम चेतन सत्तेस सर्वज्ञ आणि सर्वशक्तिमान ईश्वर असे म्हणतात. ईश्वर अदृष्टास उत्पन्न करतो व त्याच्या आवश्यक मार्गात बदल घडवतो. तो केवळ याच्या कार्यास शक्य बनवतो. ईश्वर याच स्वरूपामध्ये कर्मफलदाता आहे. सृष्टीचे सर्व कार्य ईश्वराच्या इच्छेमुळेच घडत असते. ईश्वर जसा जगताचा निर्माता आणि विधाता आहे, तद्वत तो संहर्त्ता पण आहे. सृजन आणि विध्वंस या त्याच्या स्वाभाविक क्रिया आहेत. त्यामध्ये ज्ञान, इच्छा आणि क्रिया या तिन्ही शक्ती आहेत.

नैयायिकांचा ईश्वर हा सच्चिदानंद स्वरूप आहे. त्याच्यामध्ये अधर्म, मिथ्या ज्ञान आणि प्रमाद यांचा अभाव असतो, परंतु धर्म, ज्ञान आणि समाधी (एकरसता) रूप संपत्ती अवश्य असते. तो रचना करण्यामध्ये सर्वशक्तिमान आहे. तो आप्त-कर्म-फल आहे.

वैशेषिक दर्शन वेदास ईश्वराचे वचन समजून ईश्वरास ज्ञानाचे स्रोत म्हणून स्वीकार करते. वैशेषिकाच्या मते ईश्वर निर्दोष आहे. तो परमाणूंमध्ये गती उत्पन्न करतो. यामुळे सृष्टी निर्माण होते. न्याय आणि वैशेषिक दर्शन ईश्वरासोबत जीव आणि प्रकृतीस पण अनादी मानतात. त्यांच्या मते ईश्वर त्यांचा निर्माता नव्हे. ईश्वर आपली सर्वज्ञता आणि सर्वशक्तिमत्ता यामुळे जीवांपासून वेगळा आहे. हेच गुण त्याला सृष्टीच्या शासक पदावर

प्रतिष्ठित करतात. पूर्वमीमांसा आणि उत्तरमीमांसा (वेदान्त अथवा ब्रह्मसूत्र) क्रमशः धर्म आणि ईश्वराच्या व्याख्येशी संबंधित आहेत. उत्तरमीमांसेच्या पहिल्या अध्यायात ब्रह्माचे निरूपण आहे.

भारतीय तत्त्वज्ञानामध्ये सांख्य, बौद्ध आणि चार्वाक वा बार्हस्पत्य दर्शन निरीश्वरवादी मानले जातात. इतर सर्व दर्शनांमध्ये ईश्वराच्या अस्तित्वाचे प्रतिपादन आहे. जैनदर्शन जीवाच्या समुन्नत रूपास ईश्वराची संज्ञा देतात. परंतु त्यास सृष्टीचा रचनाकार आणि कर्मफळ देणारा दाता मानत नाहीत. कपिल आपल्या सांख्यदर्शन ५-४७ मध्ये वेदांचे अपौरूषेयत्व आणि ६-३४ व ५-५१ मध्ये वेदांचे स्वप्रामाण्य स्वीकार करतात, परंतु ईश्वराच्या बाबतीत त्यांचे असे मत आहे की त्यास प्रमाणांच्या आधारे सिद्ध करता येऊ शकत नाही. त्याच्या सिद्धीसाठी प्रमाणांचा अभाव आहे. सांख्यदर्शन १-९२ (ईश्वरासिद्धेः) आणि ५-१० (प्रमाणाभावान्न तत्सिद्धिः) मध्ये याच विचारास प्रगट केले गेले आहे. कपिलाच्या दृष्टीने सर्व प्रमाणांचा आधार प्रत्यक्ष आहे, आणि प्रत्यक्ष हा बुद्धीचा विषय आहे. बुद्धी ही बाह्य प्रपंचामध्ये गुरफटलेली आहे. ती ईश्वराची सिद्धी कसे बरे करू शकेल? जर्मनीचे प्रसिद्ध तत्त्वज्ञ कांटचे पण असेच मत आहे. जे काही आपण ओळखू शकतो, ते आंतरिक आणि बाह्य इंद्रियांनीच ओळखू शकतो. हे सर्व आपल्या क्षेत्रापुरतेच मर्यादित आहेत. मग सिद्ध करण्याचा अर्थ पण हाच आहे की एखादी वस्तू किंवा तत्त्व प्रथमपासून विद्यमान आहे, जिला आपण इंद्रियांच्या शक्तीमुळे जाणून घेतो, पण जेथे इंद्रियांची पोहोचच नसते, तेथील ज्ञान इंद्रियांना कसे बरे होऊ शकते? यावरून इंद्रियांच्या सीमित शक्तीची सिद्धी होते. ईश्वराच्या सत्तेचे खंडन होत नाही. ईश्वर ज्यामितिच्या स्वयंसिद्धीप्रमाणे आहे जो स्वयंसिद्ध आहे, त्याला प्रमाणांची गरजच भासत नाही.

योगदर्शनाचा प्रमुख विषय चित्तवृत्तींच्या निरोधाचे उपाय दाखवून आत्म्याचा परमात्म्याशी योग घडवून आणणे हा आहे. योगदर्शनामध्ये परमात्म्यास क्लेश, कर्म-विपाक आणि आशयापासून अपरामृष्ट अर्थात निःसंग पुरुषविशेष असे म्हटले गेले आहे. पुरुष जीवात्मापण आहे, परंतु तो या तिन्हीमध्ये आसक्त होऊन जातो. तो अविद्या, अस्मिता, राग, द्वेष आणि अभिनिवेष नामक पाच क्लेशांमध्ये फसतो, कर्म-विपाक अर्थात कर्मांचे फळ भोगतो आणि वासनांमध्ये गुरफटतो. जरी मुक्त अवस्थेमध्ये तो पण या फासापासून वेगळा होऊन जातो, तरीपण बद्ध अवस्थेमध्ये हा (गळ)फास त्याच्याशी लागलेला असतोच. परमात्मा या फासाशी नितान्त पृथक आहे. तो जीवात्म्यासारखा बद्ध आणि मुक्त होत नाही. तो सतत मुक्त, स्वाधीन आणि आनंदस्वरूप आहे. याच कारणामुळे योगदर्शनमध्ये त्याला पुरुषविशेष असे म्हणतात. गीता १५-१७ मध्ये पण ईश्वरास इतर सर्व पुरुषांहून उत्तम परमात्मा असे म्हटले गेले आहे.

दर्शनशास्त्र (तत्त्वज्ञान), अशाप्रकारे अंतिम सत्याचे उद्‌घाटन करण्याचा प्रयत्न करते, परंतु या अंतिम सत्याच्या स्वरूपासंबंधी सर्व दार्शनिक (तत्त्ववेत्ते) एकमत नाहीत. कोणी तत्त्वज्ञ अद्वैतवादाची प्रतिष्ठा करतो, तर कोणी द्वैतवादाचा पुरस्कार करतो, तर अन्य अनेकवादामध्ये आस्था ठेवतात. अद्वैतवादी पण दोन प्रकारचे आहेत - १) जडवादी आणि २) चेतनवादी. चेतन अद्वैतवादाचे पण अनेक प्रकार आहेत - विशिष्टाद्वैतवाद, द्वैताद्वैतवाद, शुद्धाद्वैतवाद इत्यादी. विशिष्टाद्वैतवाद पाश्चात्त्य दार्शनिक स्पिनोजाच्या मताशी फार मिळतेजुळते आहे. द्वैतवाद गुणाच्या आधारे प्रकृती आणि पुरुष, जड आणि चेतन या दोन सत्तांचा स्वीकार करतो. याचे पण दोन प्रकार आहेत-

१) अन्योन्यप्रभाववाद आणि २) समानांतरवाद. पहिल्यामध्ये दोन्ही तत्त्वे एक दुसऱ्यास प्रभावित करतात, तर दुसऱ्यामध्ये दोहोंची गतिविधी स्वतंत्र असते. स्वरूप अथवा शक्तीच्या दृष्टीने पुरुष, परमात्मा आणि जीवात्म्याच्या रूपात दोन प्रकारचे आहे. संस्थेच्या दृष्टीने पाहता परमात्मा एक आणि जीवात्मा अनेक आहेत. अनेकवाद हा सत्, सच्चित आणि सच्चिदानंद सारख्यातील सत्तांचे प्रतिपादन करतो. सत् प्रकृती आहे, जिच्यामध्ये सत, रज आणि तमची साम्यावस्था आहे. या साम्यावस्थेमध्ये वैषम्य अथवा विकृती परमात्म्यामुळे उत्पन्न होते. सच्चित जीव आहे. जीव अनेक आहेत. सच्चिदानंद परमात्मा आहे. थोडक्यात, मत-वैभिन्य असतानाही सर्व तत्त्ववेत्त्यांची प्रवृत्ती एक अशा वास्तविकता वा तथ्याकडे निश्चितपणे गेली आहे, जी आध्यात्मिक आहे आणि कोणत्याही अस्तित्वाचे ज्ञान जिच्याकडे अंगुलीनिर्देश करू शकते, कारण की ते समस्त अस्तित्वांचे मूलाधार आहे.

**२) मानसशास्त्र :** मानसशास्त्राच्या दृष्टीने आमचे मन हे सर्व क्रिया, सहज प्रवृत्ती आणि प्रेरणा यांचे स्रोत आहे, जे आमच्या मानसिक आणि शारीरिक व्यापारांना स्थिर ठेवते आणि आमच्या व्यवहाराचे नियमन करते. मानवी मनामध्ये निहित स्वभावगत पाच प्रवृत्ती आढळून येतात. त्या पाच प्रवृत्ती अशा आहेत - १) उपयोगिता, २) न्याय, ३) सौंदर्य, ४) ईश्वरभाव व ५) सत्य. यापैकी ईश्वरभाव म्हणजे पूजा आणि धार्मिकतेचे मूळ होय. हा भाव सर्व प्राणीमात्रांच्या मनात नसतो. याऐवजी नम्रतेचे भाव ठेवल्यास वावगे होणार नाही. हा भाव सरळ आहे आणि सर्वांच्या ठायी विद्यमान असतो. हाच भाव सक्रिय बनून उदात्त मानवतेचा संपूर्ण आधार निर्माण करतो. सत्य हा आपल्या सर्वोत्तम स्वरूपात दर्शनशास्त्र अर्थात तत्त्वज्ञानाचा जन्मदाता आहे.

'Ground work of Educational Psychology' या आपल्या ग्रंथामध्ये लेखक जेम्स एस. रॉस यांनी तीन मन:शक्तींचे वर्णन केले आहे. त्या तीन शक्ती आहेत - १) नेमी अर्थात स्मरणशक्ती, २) हॉर्मी अर्थात इच्छाशक्ती (संकल्पशक्ती) व ३) कोहीजन अर्थात संयोजनशक्ती. नेमीस चित्त किंवा स्मृती म्हणता येईल. ही मनाची अशा प्रकारची शक्ती आहे की जी अनुभवांचे परवर्ती प्रभाव अथवा संस्कारांना सुरक्षित ठेवते. हॉर्मी जीवनाच्या त्या इच्छाशक्तिचे नाव आहे, जी प्रेरणा, प्रयत्न आणि काम वा संकल्प यामध्ये दिसून येते. क्रियाशक्तीमध्ये समाविष्ट समस्त मनोदशांना हॉर्मीच्या उदाहरणादाखल घेता येते. कोहीजन मनाचे ते संयोजक तत्त्व आहे, जे विखुरलेले संस्कारांचे वर्गीकरण आणि संगठन करते. या क्रियेद्वारे संस्कारांची नानारूपता एकरूपतेमध्ये परिणत होते. वाघासारखा हिंस्र पशू अचानक दिसल्यास भयभीत होऊन पळण्याची इच्छा ही **सहजवृत्ती** आहे आणि तेथून लवकरात लवकर पलायन करणे हा **सहजस्वभाव** आहे.

ज्या व्यक्तीवर आपण परामर्शमंत्र टाकतो (फुंकतो) ती व्यक्ती त्या मंत्राच्या प्रभावामुळे आमच्या विचारांना आपले विचार समजू लागते. जर परामर्शदाता व्यक्ती कोणी आप्त पुरुष असेल अथवा आमची प्रशंसक व श्रद्धाळू असेल, अथवा जर ते एखादे प्रकाशित प्रामाणित ग्रंथ असेल, तर तिच्या वचनांची मान्यता आम्हाला जलद प्रभावित करेल. सद्गुरू अथवा धार्मिक ग्रंथ हेच कार्य संपन्न करतात. परामर्शाची ही प्रेरणा नम्रतेच्या सहजवृत्तीशी संबंधित आहे. परामर्शानंतर अनुकरण आणि तद्नंतर अहम् वृत्तीचा उदय होतो. म्हणून अनुकरण मौलिक आत्माविष्कारासाठी एक अद्भुत असे साधन आहे.

मानसशास्त्राच्या या पद्धतीने जर आम्ही भारतीय मान्यतेविषयी विचार करू तर ब्रह्मा आमच्या ज्ञानशक्तीची चरम सीमा आहे. त्याचे रक्षकरूप विष्णू आमच्या भावनांचा मूळ आश्रय आहे आणि रूद्र (महेश) हा कर्माची अंतिम पराकाष्ठा सिद्ध होतो. योगदर्शनानुसार काळाच्या व्यवधानापलीकडील परम प्रभू परमात्मा देव आम्हा सर्वांचे गुरू आहेत.

**मानसशास्त्र आणि ईश्वर** – ईश्वराच्या बाबतीत मानसशास्त्राची काय धारणा आहे? मानसशास्त्रज्ञ रॉस व मॅकडूगल यांनी मानवी मनामध्ये निहित नम्रतेच्या भावनेचा उल्लेख करून त्याचे महत्त्व पण प्रतिपादित केले आहे. नम्रता ही श्रद्धेची सहज संगिनी आहे. श्रद्धेची मनोवृत्ती निश्चितपणे एका अशा सत्तेकडे संकेत करते जी सर्वोपरी आहे. त्या सत्तेसमोर आम्हा सर्वांना आदरभावाने प्रणत झाले पाहिजे.

श्रद्धेची भावना ही प्रथम प्रशंसा, नंतर आदर आणि शेवटी पूजा (उपासना)च्या भावनेमध्ये परिणत होते. मानसशास्त्र हे एकीकडे ज्ञानधारेचे विश्लेषण करते तर दुसरीकडे तिच्या महत्त्वाचे मूल्यांकन पण प्रस्तुत करते. जो येथे सर्वाधिक श्रद्धेय आहे, तो पण आपल्या मनात एका सर्वाधिक अस्तित्वाच्या प्रति श्रद्धाभाव ठेवतो. जो श्रद्धेयांचा पण श्रद्धेय आहे, उपास्यांचा पण उपास्य आहे, तोच मानसशास्त्राच्या श्रद्धाभावनेचा सर्वोच्च आधार आहे. धर्म यालाच ईश्वर म्हणतो.

सृष्टीच्या सामूहिक मनाची संकल्पशक्ती, स्मरणशक्ती आणि संयोजनशक्ती पाठलाग करत शेवटी कोठे जाऊन पोहोचते? मानसशास्त्राचे उत्तर कदाचित सृष्टीचे मूळ कारण आणि अंतिम उद्दिष्टाच्या एकतेमध्ये निहित सापडेल. धर्माच्या परिभाषेमध्ये सृष्टीचे हे मूळ कारण आणि अंतिम उद्दिष्ट ईश्वर आहे.

**३) नीतिशास्त्र :** काही तत्त्ववेत्त्यांचे असे मत आहे की परमेश्वरासंबंधी विचारणा करण्यासाठी आम्हास नीतिशास्त्राकडेच गेले पाहिजे. प्लेटोने सदाचारावर आपले विचार व्यक्त करताना असे म्हटले आहे की, सर्वात महान विषय तर आत्म्याचे अमरत्व आहे, याच्यावर विचार झाला पाहिजे.

नीतिशास्त्रानुसार असत आणि सत, अशुभ आणि शुभ अथवा बरे-वाईट यांमध्ये वास्तविक अंतर आहे. सत्याचे आदर्श म्हणजे काल्पनिक सृष्टी नव्हे. ते एक वास्तविक तथ्य आहे. सत आणि असत मध्ये फरक करणारी आमची विवेकशक्ती या आदर्शास ओळखण्यास समर्थ आहे. नीतिशास्त्र आदर्शास वास्तविक, जाणणे योग्य आणि साक्षात करणे योग्य असे मानते.

सदाचाराची शक्ती ही संग्राहिका असते. तिच्यामुळे मानव हा आणखी अधिक शक्तिसंवर्धन करतो. सदाचार आमच्या योग्यतेस प्रदीप्त करतो, आमच्या आंतरिक विवेकास उत्तेजित करतो आणि आम्हास संपूर्ण सत्याच्या संपर्कामध्ये घेऊन जाऊन बसवितो. सदाचारी व्यक्ती सत्चे स्रोत ईश्वराच्या प्रति श्रद्धाभाव ठेवते.

मानवी जीवनामध्ये जे काही सत् आहे, उदात्त आहे, उत्तम आहे, त्याची पराकाष्ठा प्रभूमध्ये होते. म्हणून जी व्यक्ती सत्य, प्रेम, सुंदर आणि शिवची उपासना करते, ती प्रभूचीच उपासना करत असते. कांटच्या शब्दांमध्ये ईश्वर प्रमुख रूपाने आणि अनिवार्यतः सदाचाराच्या नियमाचा जनक आणि विधाता आहे. विश्वाची सदाचारव्यवस्था त्याच्या दर्शनाची अंतिम वाणी म्हटली जाऊ शकते. एका दुसऱ्या स्थळी कांट लिहितो – दोनच वस्तू अशा आहेत की ज्या माझ्या मनामध्ये सतत अभिनव आणि वर्धमान प्रशंसा आणि भीतीची भावना भरत असतात – एक ताऱ्यांनी भरलेले आकाश वर आणि द्वितीय सदाचाराचे नियम आतमध्ये.

प्रभू पवित्र आहे. पवित्रतेशी अमरताही निगडित असते. मानवास आपली इच्छाशक्ती आचाराच्या (नीतिच्या) नियमाशी एकरूप केली पाहिजे, तरच त्याला आनंदप्राप्तीचे पारपत्र मिळू शकेल. पवित्रता किंवा आचारांचे, नियमांचे परिपालन सतत झाले पाहिजे. याच्यातच आत्म्याच्या अमरत्वाची सिद्धी आहे. आचार (नीती) नियमाबरोबर त्याचे नियामक आणि सतचे स्रोत प्रभूची सत्ता पण स्वयमेव सिद्ध होते.

दर्शनशास्त्रा (तत्त्वज्ञाना)च्या अंतर्गत नीतिशास्त्र ही एक अशी शाखा आहे, जी चिरकालापासून पवित्र प्रभूची घोषणा करत आली आहे. जेथे नीती आहे तेथे श्रेष्ठता आहे, आणि जेथे श्रेष्ठता आहे तेथे ईश्वर आहे.

### ग) एक सूफी आचार्य व विचारवंताचा वैज्ञानिक युक्तिवाद[१५]

आधुनिक इस्लामी धर्मशास्त्रज्ञ आणि सूफी आचार्य व विचारवंत मौलाना वहीदुद्दीन खानप्रणीत 'ईश्वर अस्तित्वात आहे का?' या समस्येचा वैज्ञानिक युक्तिवाद पुढीलप्रमाणे आहे –

**ईश्वर अस्तित्वात आहे का? –** ईश्वर अस्तित्वात आहे का? हा प्रश्न नेहमी आपल्या मनात निर्माण होतो. या प्रश्नाचे उत्तर तर्कशुद्धपद्धतीने शोधण्याचा आपण प्रयत्न करू. या प्रश्नाचे माझे उत्तर होकारार्थी आहे.

माझे अध्ययन आणि अनुभवावरून मी पूर्ण दृढनिश्चयाने सांगू शकतो की, ईश्वर आहे. याबद्दल मुळीच संशयाला जागा नाही. जेव्हा मी म्हणतो की, ईश्वर आहे तेव्हा माझे म्हणणे प्रचलित अर्थाने नसून पूर्णपणे शास्त्रशुद्ध अर्थाने आहे.

लोक साधारणपणे मानतात की, काहीही सिद्ध करता येते, किंवा कुठल्याही गोष्टीचे खंडन करता येते. पण हा वैज्ञानिक दृष्टिकोन नाही. आधुनिक विज्ञानानुसार आपण कुठल्याही गोष्टीला सिद्ध किंवा खंडित करू शकत नाही. आपण केवळ निश्चिततेऐवजी शक्यतेपाशी पोहोचू शकतो. एखादी गोष्ट संभाव्यरीत्या अस्तित्वात आहे, हे दर्शवण्यासाठी आवश्यक माहिती असेल, तर आपण म्हणू शकतो की, ती गोष्ट अस्तित्वात आहे.

प्रस्तुत प्रश्न 'ईश्वर अस्तित्वात आहे किंवा नाही' ह्यातून आपोआप दुसरा प्रश्न उपस्थित होतो. मानववंशशास्त्राच्या अध्ययनाद्वारे हे सत्य स्थापित झाले आहे की, ईश्वराची संकल्पना मानवी स्वभावामध्ये घर करून आहे. ईश्वरावर श्रद्धा बाळगणे हे आपल्या रक्तात भिनलेले आहे. प्रत्येक स्त्री आणि पुरुष जन्मजात श्रद्धावंत आहे. विशेषत: आणीबाणीच्या आणि संकटसमयी असाहय्यतेच्या वेळी आपल्याला या गोष्टीची जाणीव होते की, एक सर्वशक्तिमान ईश्वर आहे. प्रत्येक स्त्री-पुरुषाने या स्वाभाविक घटनेचा आपल्या जीवनात किमान एकदा तरी अनुभव घेतला असणारच. मग हा प्रश्न का निर्माण होतो की, ईश्वर अस्तित्वात आहे किंवा नाही, जेव्हा ईश्वराची संकल्पना आपल्या रक्तामांसात भिनलेली आहे. याचे कारण अतिशय साधे आहे. लोक हे जाणू इच्छितात की, त्यांच्या अंतर्भूत श्रद्धेला आणि भावनांना बौद्धिक आधार अथवा वैज्ञानिक पुरावा आहे किंवा नाही.

मी ठामपणे सांगेन की, ईश्वराच्या अस्तित्वाच्या श्रद्धेला निश्चितपणे वैज्ञानिक आधार आहे. पण लोक साधारणपणे तो वैज्ञानिक पुरावा जाणून घेण्यास अपयशी ठरतात, कारण ते चुकीच्या कसोटीला वैज्ञानिक पुरावा समजतात. त्यांना निरीक्षणयोग्य पुरावा हवा असतो, पण असा कुठलाही वैज्ञानिक पुरावा अथवा कसोटी असू शकत नाही, ज्याद्वारे आपण आपले मत बनवू शकतो. जर आपण योग्य कसोटी लागू केली तर आपल्याला

उमजेल की, ईश्वराचे अस्तित्व हे सिद्ध वास्तव आहे. हल्ली कुठलीही संकल्पना सिद्ध करण्यासाठी अनुमानात्मक युक्तिवादाचा वापर केला जातो. आणि याच युक्तिवादाद्वारे ईश्वराची संकल्पनादेखील सिद्ध होणार आहे.

**ईश्वराच्या अस्तित्वाचा वैज्ञानिक पुरावा :**

मानवी ज्ञानाचे दोन भिन्न टप्पे आहेत. पहिला म्हणजे आईनस्टाइनपूर्व आणि दुसरा आईनस्टाइननंतरचा. आईनस्टाइनपूर्व टप्प्यात मानवी ज्ञान पदार्थविश्वापर्यंत मर्यादित होते. ते निरीक्षण आणि मोजमाप करण्याजोगे होते आणि म्हणून साधारणपणे असे ग्राह्य धरले जात असे की, प्रत्येक गोष्ट जिचे खरे अस्तित्व आहे, निरीक्षणयोग्य असायला पाहिजे आणि जी गोष्ट निरीक्षणयोग्य नाही ती मुळात अस्तित्वातच नाही. याचा अर्थ असा होतो की, जे दृश्य विश्व आहे तेच खरे विश्व आहे, आणि जे अदृश्य आहे ते असत्य आणि काल्पनिक आहे.

या संकल्पनेने जो सिद्धान्त निर्माण केला त्याला साधारणपणे तार्किक अनुभवसत्तावाद (अस्तिभाववाद) असे म्हणतात. याचा अर्थ असा होतो की, तोच खरा तार्किक युक्तिवाद आहे. जे भौतिकदृष्ट्या प्रदर्शनीय आहे, तेच सत्य आहे. याशिवाय इतर युक्तिवाद तार्किक युक्तिवाद नसून निराधार दावा आहे.

पण आईनस्टाइन नंतरच्या काळात विसाव्या शतकाच्या प्रारंभी जेव्हा अणूचे विभाजन झाले तेव्हा संपूर्ण परिस्थिती बदलून गेली. अणूच्या विभाजनानंतर भौतिकवादासंबंधीच्या सर्व कल्पना नाहीशा झाल्या आणि त्याची जागा अतिसूक्ष्म विश्वाने घेतली. अणूच्या विश्वापलीकडे प्रत्येक गोष्ट अदृश्य लहरींमध्ये रूपांतरित झाली. या लहरी मोजमापायोग्यही नाहीत आणि निरीक्षणयोग्यही नाहीत.

मानवी ज्ञानात झालेल्या या क्रांतीनंतर तार्किक आणि बौद्धिक युक्तिवाद मोठ्या प्रमाणात बदलले. या बदललेल्या परिस्थितीने विचारवंत आणि शास्त्रज्ञांना तार्किक कसोटीत सुधारणा करण्यास भाग पाडले. आता आनुमानिक युक्तिवाद प्रत्येक युक्तिवादाएवढेच सत्य म्हणून मानले जाते.

आधुनिक विज्ञानात अशा अनेक गोष्टींचा समावेश आहे, जसे – विद्युत परमाणू, गुरूत्वाकर्षण शक्ती, क्ष–किरण इ. या सर्व गोष्टी स्वभावत: पदार्थमय नाहीत. त्यांचे निरीक्षण केले जाऊ शकत नाही. तरीसुद्धा प्रत्येक वैज्ञानिक त्यांच्या अस्तित्वावर विश्वास ठेवतो. त्याचे साधे कारण असे आहे की, जरी आपण या वस्तूंना प्रत्यक्षरित्या पाहू शकत नाही, पण त्यांचा प्रभाव आपण अनुभवू शकतो. उदा. गुरुत्वाकर्षण शक्तीचा अनुभव झाडावरून पडणाऱ्या सफरचंदाच्या स्वरूपात, क्ष–किरणांचा प्रभाव छायाचित्र–पटलाच्या स्वरूपात. आपण या सर्व गोष्टींच्या अस्तित्वावर विश्वास ठेवतो. आपण त्यांचे निरीक्षण करू शकत नाही तरी पण आपण त्यांचा प्रभाव अनुभवतो. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे, अप्रत्यक्ष ज्ञान किंवा आनुमानिक युक्तिवादाद्वारे, आपण त्यांचा प्रभाव अनुभवतो. मानवी ज्ञानात या बदलाने तार्किकतेचा सिद्धान्त बदलला आहे. आता विज्ञानाच्या क्षेत्रात हे सुस्थापित झाले आहे की आनुमानिक युक्तिवाद प्रत्यक्ष युक्तिवादाएवढेच ग्राह्य आणि शास्त्रीय आहे.

आईनस्टाइनपूर्व कालखंडात ईश्वराला न मानणारे लोक, ईश्वराची संकल्पना अदृश्य जगाशी संबंधित आहे असे समजायचे. कारण ईश्वराच्या पुराव्यासाठी कोणताच प्रत्यक्ष युक्तिवाद उपलब्ध नव्हता. ईश्वरावरची श्रद्धा

तर्कशून्य मानली जायची. आणि सर्व संबंधित अप्रत्यक्ष युक्तिवाद वैज्ञानिकदृष्ट्या अशास्त्रीय मानले जायचे. कारण हे आनुमानिक स्वरूपात असायचे.

पण आता संपूर्ण परिस्थिती बदलली आहे. काहीच परीक्षण करण्याजोगे नाही, म्हणून कुठल्याही गोष्टीचे अस्तित्व प्रत्यक्ष युक्तिवादाशिवाय आनुमानिक युक्तिवादाद्वारे स्थापित केले जाऊ शकते. जर आनुमानिक युक्तिवाद अदृश्य अतिसूक्ष्म विश्वाच्या बाबतीत शास्त्रीय आहे तर हेच आनुमानिक युक्तिवाद ईश्वराच्या अस्तित्वासंबंधाने सुद्धा शास्त्रीय आणि वैध आहे.

बर्ट्रांड रसेल जरी नास्तिक होता, 'मी ख्रिश्चन का नाही?' (Why I am not a Christian?) आपल्या या पुस्तकात या वास्तवाला कबूल करतो. तो म्हणतो की, ईश्वरवाद्यांनी ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी निर्मिती (रचने)ला केंद्रीभूत ठेवून मांडलेला युक्तिवाद वैज्ञानिकदृष्ट्या वैध आहे.

प्राचीन काळापासून ईश्वरवाद्यांनी हाच युक्तिवाद केला आहे की रचना आहे तर रचनाकार असणारच. जसे आपण पाहतो की, आपले विश्व पूर्णपणे सुरचित आहे आणि हे सुरचित विश्व त्याच्या रचनाकाराचे अस्तित्व मानण्यास आपल्याला भाग पाडते.

**विश्वाची सुरुवात**

विज्ञान आपल्याला सांगतो की, १५ अब्ज वर्षांआधी अवकाशात भयानक स्फोट झाला आणि या महास्फोटानंतर आपले विश्व अस्तित्वात आले. वैज्ञानिकांना असा पुरावा आढळला आहे की, विश्वाच्या प्रारंभी वैश्विक कंदुक (Cosmic Ball) नावाची वस्तू होती. सध्या ब्रह्मांडामध्ये असलेले सर्व घटक या वैश्विक कंदुकामध्ये अतिशय घट्ट स्वरूपात एकत्रित होते.

ज्ञात भौतिक नियमानुसार या सर्व घटकांसाठी आतल्या बाजूच्या दिशेने प्रवास शक्य होता. अवकाशात त्यांच्या बाह्य प्रवासाची मुळीच शक्यता नव्हती. खगोलशास्त्राच्या अध्ययनानुसार पुढे या वैश्विक कंदुकामध्ये अचानक स्फोट झाला. अतिशय घट्ट अवस्थेत असलेले सर्व घटक बाह्य दिशेने विखरू लागले आणि अशाप्रकारे हे विश्व अस्तित्वात आले. कदाचित काही मिनिटांच्या कालावधीतच कोणत्या बाह्य शक्तीच्या हस्तक्षेपाने हे घडले की, घट्ट अवस्थेत असलेले सर्व घटक बाह्य दिशेने विखरू लागले? म्हणजेच एक हस्तक्षेप करणारा होता. तो म्हणजे सर्वशक्तिमान ईश्वर होय.

हा एक भयानक स्फोट होता आणि आपण जाणतो की पूर्वनियोजित स्फोटाशिवाय आकस्मिक स्फोट हा विनाशकारी असतो. रशियाच्या चेर्नोबिल स्फोटाची घटना त्याचे एक उदाहरण आहे. हा एक अचानक घडलेला स्फोट होता. तो पूर्णपणे विनाशकारी ठरला.

उलटपक्षी भुयार बांधण्यासाठी जे स्फोट घडवले जातात ते नेहमी पूर्वनियोजित असतात. परिणामतः ते उपयुक्त असतात. मात्र अचानक झालेल्या महास्फोटातून एक अतिशय विधायक आणि अर्थपूर्ण विश्व अस्तित्वात आले. ही चमत्कारिक घटना आपल्याला हे मानायला लावण्यासाठी पुरेशी आहे की महास्फोट हा निश्चितपणे पूर्वनियोजित होता व तो सुनियोजित पण असला पाहिजे. आणि जेव्हा हे सिद्ध होते की, तो पूर्वनियोजित होता, तेव्हा हेही आपोआप सिद्ध होते की, या पूर्वनियोजनाच्या मागे एक योजनाकार होता. खरोखर एक महान योजनाकार होता आणि तो महान योजनाकार म्हणजेच सर्वशक्तिमान ईश्वर होय.

जेव्हा आपण आपल्या या विश्वाबद्दल सखोल विचार करतो, तेव्हा आपल्याला आढळते की, विश्वभर सर्वत्र नियोजन, रचना आणि सुबुद्ध सुनियोजित नियंत्रण असणे या गोष्टीचे स्पष्ट प्रमाण आहे की, निर्मितीचा निर्माता आहे, रचनांचा रचनाकार आहे, सर्व हालचालींना हालचाल देणारा आहे.

**पृथ्वी या ग्रहाचा वेगळेपणा**

संपूर्ण ब्रह्मांडात 'पृथ्वी' हा ग्रह त्याच्या विशिष्ट गुणांमुळे एक अद्वितीय असा अपवाद आहे. पृथ्वीचा अपवाद वगळल्यास ब्रह्मांडातील सर्व ग्रह एक तर आगीचे तारे आहेत किंवा खडकाळ ग्रह आहेत. केवळ पृथ्वीवर जीवसृष्टी आहे, तिचे जीवन आहे, आणि जीवनासाठी लागणारे आवश्यक घटक आहेत. इथे ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे, की अपवाद आहे म्हणजे हस्तक्षेप आहे. आणि हस्तक्षेप आहे म्हणजे हस्तक्षेप करणारा आहे, आणि एकदा हस्तक्षेप करणाऱ्याचे अस्तित्व सिद्ध झाले की, ईश्वराचे अस्तित्व आपोआप सिद्ध होते.

इथे मी हे सांगू इच्छितो की, अशा परिस्थितीत आपल्यासमोर विकल्प 'ईश्वरासह विश्व' किंवा 'ईश्वराशिवाय विश्व' यामध्ये नाही तर खरा विकल्प 'ईश्वरासह विश्व' किंवा 'मुळात विश्वच अस्तित्वात नाही' यामध्ये आहे. आपण 'मुळात विश्वच अस्तित्वात नाही' या विकल्पाला स्वीकारू शकत नाही. कारण विश्वाचे अस्तित्व आपल्यासमोर उघड, वास्तव आहे, जे आपण नाकारू शकत नाही. आणि म्हणून 'ईश्वरासह विश्व' या विकल्पाला स्वीकारल्याशिवाय दुसरा पर्याय नाही.

## घ) ईश्वर-सत्ताविषयक प्रमाण वा युक्तिवाद[१६] (Proofs for the Existence of God)

समस्या आहे - ईश्वराची सत्ता किंवा अस्तित्वासंदर्भात प्रमाण किंवा युक्तिवादाचा काय अभिप्राय असतो? या समस्येच्या समाधानार्थ असे म्हणणे सर्वथा उचित होईल की ईश्वर-सत्ताविषयक किंवा अस्तित्वासंबंधी प्रमाण आस्थापरक युक्ती अथवा अनुनयात्मक युक्तिवादाचे सूचक आहेत. ईश्वरवादी हा तर्काच्या आधारे न ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करू शकतो न अनिश्वरवादी नास्तिक युक्तिवादाच्या साहाय्याने ईश्वराच्या अस्तित्वाचे निराकरण करू शकतो. ईश्वर एक आध्यात्मिक सर्वोच्च सत्ता आहे. तो तर्क-वितर्काचा विषय नसून श्रद्धा-भक्तीचा विषय आहे. ईश्वर-सत्तेसंबंधी सर्व प्रमाण वैज्ञानिक नसून दृढ विश्वाससूचक आहेत. हे अनुनयात्मक प्रमाण आहेत. अनुनयात्मक युक्तिवाद हा आस्थेस अभिव्यक्त करतो. ईश्वरावरील आस्था ही विवेकमयी श्रद्धा असते. म्हणूनच कांट म्हणतो की ईश्वर सिद्धी-असिद्धीच्या पलीकडे श्रद्धामूलक असतो.

ईश्वर अस्तित्व किंवा सत्ताविषयक पाच प्रमुख प्रमाण किंवा युक्तिवाद आहेत. ते असे - १) सत्तामूलक युक्तिवाद, २) विश्वमूलक युक्तिवाद, ३) उद्देश्यमूलक युक्तिवाद, ४) नैतिक युक्तिवाद, आणि ५) व्यवहारवादी युक्तिवाद. या सर्वांचे संक्षिप्त विवेचन पुढे क्रमशः प्रस्तुत करण्यात येत आहे -

**१) सत्ताशास्त्रीय युक्तिवाद (Ontological Argument) :** सत्ताशास्त्रीय युक्तिवादाचे सूत्र आहे - 'ईश्वर-प्रत्ययामध्ये ईश्वरसत्ता समाविष्ट आहे.' ईश्वर प्रत्यय हा पूर्ण प्रत्यय आहे. पूर्ण आणि अनंत प्रत्ययामध्ये 'अस्तित्वा'चा समावेश तर्कतः सिद्ध आहे. म्हणून, ईश्वराविषयक विचारा (प्रत्यया)पासून ईश्वराची सत्ता वेगळी केली जाऊ शकत नाही. ईश्वर प्रकृतितः पूर्ण आहे. ब्रह्मांडाचे सर्व पदार्थ अपूर्ण आणि सान्त आहेत. म्हणून

'ईश्वर–विचार' एक 'पूर्ण–प्रत्यय' आहे. म्हणून अस्तित्व पण त्याच्याशी अनिवार्यपणे संबंधित आहे. अस्तित्वहीन ईश्वर–प्रत्यय संप्रत्यय नसून प्रत्ययभास आहे. प्रत्ययाभास प्रसंग विशेष अर्थहीन असतो.

सत्ताशास्त्रीय युक्तिवादास शास्त्रीय स्वरूपामध्ये उपयोगात आणण्याचे श्रेय अन्सेल्म (इ. स. १०३५–११०९) याला आहे. चिदचिद्रूप विश्व प्रत्यय अथवा विज्ञानाची अभिव्यक्ती आहे. विविध प्रत्यय परम पित्याचे दिव्य विज्ञानाच्या रूपात आहेत. आमचे प्रत्यय (विज्ञान) हे ईश्वराचे उच्चारित शब्द आहेत आणि दिव्य विज्ञान ईश्वराचे अनुच्चारित शब्द आहेत. उच्चारणापूर्वी ज्याप्रमाणे शब्दाची सत्ता ही वक्त्यामध्ये निहित असते त्याचप्रमाणे सृष्टीनिर्मितिअगोदर दिव्य विज्ञान ईश्वरामध्ये अंतर्निहित असते.

पुन्हा, अन्सेल्मच्या दृष्टीने अस्तित्वसंपन्न प्रत्यय अस्तित्वहीन प्रत्ययापेक्षा अधिक पूर्ण असतो. ज्याचे अस्तित्व विचार आणि वास्तविकता या दोहोमध्ये असते, ते फक्त विचारामध्ये असलेल्या अस्तित्वापेक्षा उच्चतर असते. 'ईश्वर–प्रत्यय' इतर सर्व प्रत्ययांचे आधारभूत कारणस्वरूपात सर्वोच्च प्रत्यय आहे. ईश्वराची सत्ता विचार आणि वास्तव या दोहोंमध्ये आहे. त्याची सत्ता विचाराहून अधिक सूक्ष्म आणि वास्तवापेक्षा कितीतरी महान आहे. तसेच तथ्यात्मक सत्ता वास्तविक असल्यामुळे नश्वर आहे. ईश्वर अनश्वर सत्ता आहे. अन्सेल्म ईश्वरास 'अनिवार्य वास्तव' म्हणतो. अर्थात ईश्वर नित्य, अनंत, पूर्ण आणि अनश्वर वास्तव आहे. म्हणून 'पूर्ण ईश्वर–प्रत्यया'पासून ईश्वराची सत्ता अनिवार्य रूपात सिद्ध होते.

**२) विश्वोत्पत्तिवादी युक्तिवाद (Cosmological Argument)** – सत्ताशास्त्रीय युक्तिवाद हा प्राक् अनुभविक आहे, तर विश्वोत्पत्तिवादी युक्तिवाद हा आनुभविक आहे. सत्ताशास्त्रीय प्रमाणामध्ये प्रत्यया (विचारा)स प्राथमिकता दिली जाते, तर विश्वमूलक प्रमाणामध्ये वास्तविकतेस प्राधान्य दिले जाते. विश्वमूलक प्रमाणांचे प्रारंभिक बिंदू विश्वाची इंद्रियानुभूती वास्तविक वस्तू आहेत. येथे कार्यापासून कारणाकडे प्रस्थान (प्रयाण) केले जाते.

विश्वोत्पत्तिवादी युक्तिवादाचा सर्वप्रथम उपयोग प्लेटोने आपल्या तत्त्वज्ञानामध्ये केलेला आहे. प्लेटो इंद्रिय जगतास विज्ञान जगताची अभिव्यक्ती मानतो. ईश्वर विज्ञानाच्या सहाय्याने जागतिक वस्तूंची निर्मिती करतो. म्हणून, ईश्वरच हा विश्वाचे कारण आहे. ॲरिस्टॉटलने या युक्तिवादाचा विकास केला. ॲरिस्टॉटल इंद्रिय जगताच्या प्रत्येक वस्तूस द्रव्य आणि रूपाचे संमिश्रण मानतो. त्याच्या मते मूलप्रकृती विशुद्ध द्रव्य आहे आणि ईश्वर हा विशुद्ध स्वरूप आहे. हे दोन्ही या संसाराचे माता–पिता आहेत. ॲरिस्टॉटल द्रव्यास साध्य आणि ईश्वरास सिद्ध मानतो. ईश्वर हा पूर्णसिद्ध आहे. जसे सिद्ध साध्यामध्ये अंतनिर्हित असते, तसेच ईश्वर हा संपूर्ण जगामध्ये अंतनिर्हित असतो. ईश्वरच सृष्टीचा अदिनिमित्त कारण आहे. हाच ॲरिस्टॉटलचा गतिमूलक तर्क आहे, कारण अचल ईश्वर हा विश्वाच्या गतीचा कारण आहे.

ॲक्वीनसच्या मते ईश्वर हा विश्वाचा आद्य प्रवर्त्तक आहे. तो अकारण कारण अथवा स्वयंभू आहे. तो संसाराच्या वस्तूंना संचालित करत स्वतः गतिहीन असतो. विश्वमूलक प्रमाणास कार्यकारण युक्तिवाद पण म्हणतात. देकार्त म्हणतो की ईश्वर हा जीव आणि जगताचा स्रष्टा आहे. तो चिदचित् विश्वाचा निमित्तकारण आहे. त्रिकालिक अथवा नित्य सत्ताच तत्त्वज्ञानाचे लक्ष्य (उद्दिष्ट) आहे. ही नित्य सत्ता ईश्वर आहे. स्पिनोझाच्या दृष्टीमध्ये ईश्वर हा विश्वाचा उपादान आणि निमित्तकारण दोन्ही आहे. त्याचा ईश्वर हा सर्वेश्वर

आहे. सृष्टी ईश्वराची स्वाभाविक अभिव्यक्ती आहे. लाईबनिझच्या मते ईश्वर पर्याप्त कारण आहे. हा कार्यकारणाच्या श्रृंखलेपलीकडे असून तो स्वयंभू आहे. बर्कलेचे असे मत होते की या इंद्रियसंवेदनपुंजरूप विश्वाचा कर्ता परमात्मा (ईश्वर) हा आहे. प्रो. केयर्डच्या मतानुसार, 'ईश्वर एक आवश्यक आणि स्वतंत्र सत्तारूपात या आकस्मिक विश्वाचा आधार आहे.'' प्रो. फ्लिंटच्या मते असीम ईश्वरच ससीम विश्वाचे कारण आहे.

**३) प्रयोजनवादी युक्तिवाद (Teleological Argument)** – प्रयोजनवादी युक्तिवादास उद्देश्यमूलक प्रमाण पण म्हणतात. प्रयोजनात्मक युक्ती विश्वमूलक प्रमाणाचेच विस्तार आहे. विश्वमूलक प्रमाण आणि उद्देशमूलक प्रमाण या दोहोंचा प्रस्थान बिंदू विश्व किंवा प्रकृती आहे. विश्वमूलक प्रमाण विश्वाला एक कार्य अथवा घटना मानतो आणि ईश्वरास त्याचे कारण सिद्ध करतो. प्रयोजनमूलक तर्क विश्वाला एक व्यवस्था किंवा योजनेच्या रूपात पाहतो आणि ईश्वरास या व्यवस्थेचा व्यवस्थापक सिद्ध करतो.

सत्तामूलक प्रमाण सिद्ध करतो की ईश्वर आहे. विश्वमूलक प्रमाण विश्वाच्या कारणरूपामध्ये ईश्वराची सत्ता प्रमाण करतो. उद्देशमूलक प्रमाण प्रस्थापित करतो की ईश्वर हा विश्वामध्ये मूल्यांचा सुव्यवस्थापक आहे. तो अपरिमित बौद्धिक सत्ता आहे.

प्रयोजनवादी युक्तिवाद स्पष्ट करतो की विश्वामध्ये सर्वत्र अनुभूत योजना, सामंजस्य, आणि संगठन एक अपरिमित बुद्धिमान सत्तेचा बोध करून देतात. चित्र-विचित्र विश्व अपरिमित बौद्धिक शक्तीची देणगी आहे. कृतीवरून कर्त्याचा अनुभव घेतला जाऊ शकते. कवी ब्राउनिंगने आपल्या एका कवितेमध्ये स्पष्ट केले आहे की 'जरी मालक आढळून येत नसला तरी त्याच्या उपस्थितीचे प्रमाण – साक्ष वास्तूच्या छतापासून ते पायापर्यंत विखुरलेले आहेत.' बृहदारण्यक उपनिषदपण (४-३-१४) या गोष्टीचे समर्थन करते – ''आम्ही त्या विश्वात्म्याची दृष्टीच पाहू शकतो, त्याला पाहू शकत नाही.''

विश्वामधील कोणतीच घटना अकारण किंवा निष्प्रोजन नाही. प्रयोजन आणि व्यवस्था दोन्ही सहवर्ती आहेत. विश्वामध्ये परिव्याप्त व्यवस्था प्रयोजनास पुष्टी प्रदान करते. सूर्योदय आणि सूर्यास्तामध्ये एक निश्चित व्यवस्था आहे. ही व्यवस्था सप्रयोजन आहे. निसर्गामध्ये सर्वत्र निवड आणि बहिष्कार दिसून येतो. परिस्थितीनुसार सर्व जीवांना सुविधा उपलब्ध आहे. अशाप्रकारे समस्त ब्रह्मांड व्यवस्थेच्या नियमांचे एक अखंड साम्राज्य आहे.

उद्देश्यमूलक किंवा प्रयोजनवादी प्रमाण हे वैज्ञानिक प्रमाण नाही. भक्तामध्ये ईश्वराप्रती आस्था निर्माण करण्यासाठी हा एक अनुनय मात्र आहे.

**४) नैतिक युक्तिवाद (Moral Argument)** – नैतिक युक्तिवाद किंवा नीतिमूलक प्रमाण आदर्शाश्रित आहे. हा युक्तिवाद ईश्वरास ज्ञेय स्वरूपात सिद्ध करण्याचे धाडस करत नाही. ईश्वराचे अस्तित्व नैतिकतेची एक आवश्यक मान्यता आहे. ईश्वरसत्ता नैतिक जीवनाच्या समस्यांचे समाधान करण्यास समर्थ आहे. धर्मानुकूल सुख प्राप्ती हीच नैतिक संपूर्णता आहे. नैतिक व्यवस्थेनुसार, चांगल्याची बक्षिसी सुख आहे तर वाईटाचा दंड दु:ख. नैतिक जीवनाचा परम आदर्श 'सर्वोच्च शुभ' आहे. सर्वोच्च शुभ म्हणजे धर्म आणि सुख यांच समन्वय.

नैतिक नियम प्रकृतित: निरपेक्ष असतात. असले नियम न निसर्गाची देणगी असतात न मानवी मनाची उपज. म्हणून एका अतिमानवीय मताच्या सत्तेमध्ये विश्वास अपरिहार्य आहे. येथे नैतिक नियमांचे निवास असते. हे अतिमानवीय मन ईश्वर आहे. तो नैतिक मूल्यांचा स्रोत असतो. नीतिमानासच ईश्वर सच्चे सुख प्रदान करतो.

नैतिक गुणसंपन्न ईश्वरच उपास्य होऊ शकतो. न कोरा अस्तित्वपूर्ण ईश्वर उपास्य होऊ शकतो, न विश्वाचे कारण रूपात. अपरिमित बौद्धिक शक्तिसंपन्न ईश्वर. वस्तुत: नैतिक युक्तिवाद ईश्वरास सद्‌गुणांचा पुंज दाखवून त्याला आराधनायोग्य बनवतो. सत्‌संकल्पी ईश्वर सर्वशक्तिमान, सर्वज्ञ, सर्वव्यापक असा आहे. तो दया, करुणा, क्षमा, न्याय आणि प्रेमाचा पारावार आहे. म्हणून तो सर्वथा आराध्य आहे.

**५) व्यवहारवादी युक्तिवाद (Pragmatic Argument) :** व्यवहारवादी प्रमाणास फलत: प्रामाण्यवादी युक्तिवाद किंवा उपयोगितावादी प्रमाण पण म्हणतात. विलियम जेम्स हे व्यवहारवादी प्रमाणाचे प्रबळ समर्थक मानले जातात. फलत: प्रामाण्यवादाचा आधार घेऊन विलियम जेम्स धर्मास मानवी जीवनाचा अमूल्य निधी मानतो आणि धार्मिक अनुभूतीस चित्ताचे स्वास्थ्य म्हणून घोषित करतो. ईश्वरामधील आस्थेमुळे मलिनता दूर होते, जीवनसंघर्षामध्ये साहसाचा संचार होतो. जीवनामध्ये सार्थकता येते आणि मनुष्य आनंदमग्न होऊन जातो. जेम्सला हे मान्य आहे की मुमुक्षूस जीवन निस्सार वाटू लागते. सर्वोच्च सत्ते (ईश्वरा)शी संबंध जोडल्यामुळे मुमुक्षूची व्याकुळता नाहीशी होते आणि त्याचे चित्त शुद्ध आणि स्वस्थ होते (बनते.) दृढ विश्वासानंतरच भक्त ईश्वराशी तादात्म्य स्थापित करू शकतो. जेम्स उच्चतर सत्तेस यथार्थ मानतो. जे लाभदायक आहे ते सत्य आहे आणि जे सत्य आहे, ते लाभदायक आहे. ईश्वर सत्तेमध्ये विश्वास लाभदायक आहे. म्हणून ईश्वरसत्ता सर्वथा सत्य आहे. ईश्वराच्या प्रभावाखाली व्यभिचारी हा सदाचारी बनतो तर डाकू संत बनून जातो.

युंग संपूर्णत्व वृत्तीस धर्माची संज्ञा देतो. धर्म स्वस्थ मानसिक स्थितीचे दुसरे नाव आहे. धार्मिक अनुभूतीच जीवनास सार्थक, सुंदर आणि सुशोभित बनवते. तिला भ्रम म्हणण्याचा अधिकार कोणास आहे? जर ईश्वरामधील दृढ आस्थेने आत्मसंवर्धन होत असेल, तर तिला भ्रमात्मक कसे बरे म्हणता येईल? अशाप्रकारे व्यवहारामध्ये उपयोगी असल्याकारणाने ईश्वराची सत्ता सिद्ध आहे.

सारांश, ईश्वरसत्ताविषयक सर्व प्रमाण प्रतीकात्मक आहेत. प्रतीकात्मक कथन असंज्ञानात्मक असते. म्हणून ईश्वरास आस्थेच्या भाषेमध्येच ओळखले जाते. आस्थेची भाषा ही प्रतीकांची भाषा आहे. निष्कर्षत:, ईश्वरसत्तासंबंधी सर्व प्रमाणांना आस्थेच्या भाषेतच वाचले पाहिजे, विज्ञानाच्या भाषेमध्ये नाही. विज्ञानाच्या भाषेमध्ये वाचल्यास प्रमाण सदोष सिद्ध होतात.

## च) सूफीवादाचा दृष्टिकोन[१७]

'वजूद' (अस्तित्व वा सत्ता)चा अर्थ आहे, ती वस्तू किंवा गोष्ट की जिच्यामुळे निर्मिती दिसून येते. ही निर्मिती म्हणजे सृष्टी होय. म्हणून 'वजूद' म्हणजे निर्मितीचा निर्माता अर्थात सर्वश्रेष्ठ अल्लाहची सत्ता होय. 'वजूद'चा अर्थ 'आहे' आणि 'अस्तित्व' असा होतो. तत्त्वज्ञानामध्ये याचा अर्थ होतो 'द्वितीय बुद्धी' किंवा 'बोधि'. म्हणजेच शोध आणि प्रमाण. जे बाह्य स्वरूपात निष्पाद्य नाही, त्यास 'निरस्तित्व' ('मादूम') म्हणतात. जिला 'वजूद' आहे, तिलाच 'मौजूद' म्हणतात. ईश्वरवादी लोकांच्या (भक्तांच्या) दृष्टीने 'वजूद'

फक्त परमेश्वरासच असते, दुसऱ्यास नसते. म्हणून ते एकाच 'वजूद' म्हणजे सत्ता किंवा अस्तित्वास ग्राह्य धरतात. कारण की अल्लाह हा आपण स्वत:च अस्तित्वात आहे. कारण ''अल्लाहशिवाय (दुसरा) कोणीच ईश्वर नाही. तोच चिरंजीवी व चिरस्थायी आहे.'' ३:२ ते सृष्टीच्या नानाविधतेस त्याचे दृश्य स्वरूप समजतात.

'वजूद' (अस्तित्व) वेगळे आणि 'ज़ात' (सत्ता) वेगळे नाहीत. जर 'ज़ात'ला 'वजूद'पासून वेगळे किंवा भिन्न मानले, तर अनिवार्यत: दोष किंवा त्रुटी निर्माण होईल. कारण यामुळे दोहोमधून एकाचे प्रथम असणे अनिवार्य ठरेल. जर 'वजूद'ला प्रथम मानले तर परमेश्वराची सत्ता ही प्राचीन ठरेल. तथापि या दोहोंना प्रथम गणता येणार नाही. 'ज़ात'चे नावच 'वजूद' आहे. 'वजूद'चे नावच 'ज़ात' आहे.'' (ही) दोन नामे एकच आहेत.

सूफी यालाच 'हक़' (सत्य) व 'अल्लाह' (परात्पर परब्रह्म) म्हणतात. जो 'एक' आहे त्याला 'वहदत-ल-वजूद' (अद्वैतवाद) असे म्हणतात. हे 'वहदहुला शरीक'चे (तो एक असून सहभागित्वापासून मुक्त आहे) समानार्थी आहे.

'अस्तित्वाची' व्याख्याच मुळी अशी आहे की तो (परमेश्वर) स्वत:हून चिर आहे, शेष आहे आणि तो अपार आहे. पवित्र कुराणामध्ये याला 'हूयत' (तत्-त्त्व, तदत्त्व) म्हणतात. या संदर्भात एकच श्लोक आहे, जिचा भावार्थ आहे - ''तो आदी आहे व तोच अंत (आहे), आणि तो दृष्ट आहे व तोच अदृष्ट आहे.'' ५७:३

हदीस (प्रेषित वचन)मध्ये हिचे अनुमोदन पुन्हा असे आहे - ''हे अल्लाह! तूच प्रथम आहेस, तुझ्याअगोदर कोणतीच गोष्ट नाही. आणि तूच शेवट आहेस, तुझ्यानंतर कोणतीच गोष्ट नाही. आणि तूच व्यक्त आहेस. तुझ्यापेक्षा उच्च, श्रेष्ठ अशी कोणतीच गोष्ट नाही. आणि तूच अव्यक्त आहेस, तुझ्याशिवाय कोणतीच गोष्ट नाही.''

विद्वानांची अशी धारणा आहे की सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा स्वत: होऊन अस्तित्वात आहे. तो स्वयंभू आहे. समस्त ब्रह्मांडास त्याने आपल्या सामर्थ्याने निर्माण केले आहे. जसे कुंभकार हा कुंभांना बनवितो - घडवतो, सुतार हा आसन व पलंग बनवतो. परमेश्वर हा आपल्या ज्ञानाने आणि सामर्थ्याने प्रत्येक अणू-रेणूस घेरुन आहे असे म्हणतात. येथे असा प्रश्न उपस्थित होतो की सामर्थ्य हा गुण 'ज़ात' (परमेश्वरी सत्ता) पासून विभक्त नाही. त्याला वेगळे केल्यास अ-भक्तीचा आरोप निश्चितपणे होईल, कारण की 'ज़ात' (सत्ता) आणि 'सिफ़त'(गुण) वेगवेगळे नाहीत. यामध्ये सात प्रकारचे संमिश्रण आहे. कारण १) जीवन, २) ज्ञान, ३) संकल्प, ४) सामर्थ्य, ५) श्रवण, ६) दृक् आणि ७) वाणी. हे सप्त दैवी अक्षय गुण आहेत. विद्वान प्रस्तुत उपरोक्त दृष्टान्तामध्ये निर्माता-कलाकार हा वेगळा आहे आणि निर्मिती-कलाकृती ही वेगळी आहे असे मानतात. असला मामला परमेश्वर आणि त्याची सृष्टी यांमध्ये नाही. तथापि सृष्टीची निर्मिती ही परमेश्वरासोबत होते. कारण, ''तुम्ही जेथे कुठे असाल, तो तुमच्या सांगाती आहे.'' ५७:४ असा दाखला खुद्द 'पवित्र कुराण' प्रस्तुत करते. याच संदर्भात पुढे असे पण नमूद आहे की, 'तोच आकाश आणि जमीन यांचा आद्यप्रवर्तक आहे. आणि जेव्हा तो कोणतीही गोष्ट अस्तित्वात आणू इच्छितो, तेव्हा तो तिच्या बाबतील फक्त आज्ञा देतो की, 'अस्तित्वात ये', आणि ती गोष्ट अस्तित्वात येते.'' २:११७ ''आणि जेव्हाही आम्ही एखादी गोष्ट अस्तित्वात

आणू इच्छितो, तेव्हा तिच्या बाबतीत एवढेच म्हणतो, 'अस्तित्वात ये' आणि ती गोष्ट अस्तित्वात येते.'' १६:४० ''तो तर जेव्हा एखाद्या वस्तूचा संकल्प करतो तेव्हा त्याचे काम फक्त एवढेच की तिला आज्ञा द्यावी की अस्तित्व धारण कर, आणि ती अस्तित्वात येते.'' ३६:८२ ''तोच आहे जो जीवन देतो व मृत्यू देतो. आणि जेव्हा तो एखादी गोष्ट करण्याचा संकल्प करतो, तेव्हा तो केवळ तिला असे म्हणतो, 'हो' आणि 'ती होऊन जाते.'' ४०:६८

तिर्मिज़ी (या हदीस)मध्ये अशी नोंद आहे की अक़ीली याने प्रेषित मुहम्मदसाहेब यांना विचारले की सर्वश्रेष्ठ परमेश्वर आपली सृष्टी वा ब्रह्मांड निर्माण करण्याअगोदर कोठे होता? प्रेषितांनी उत्तर दिले – 'अमा' अर्थात गहन अंध:कारामध्ये होता. त्यावर न हवा होती न खाली. अर्थात निर्वात शून्य प्रदेश होता. त्याने आपल्या सिंहासनास पाण्यावर प्रस्थापित केले.

'अमा' गहन मेघास म्हणतात. इब्न असीर जज़रीच्या 'निहाया' (शब्दकोशा)मध्ये याचा अर्थ 'मेघ, ढग' असा दिलेला आहे. अबू अबीद म्हणतात की तो मेघ कशा प्रकारचा होता हे माहीत नाही. आणखी एका उद्धरणामध्ये असे नमूद आहे की 'तिच्यासोबत कोणतीच वस्तू नसणे' हा अर्थ आहे. कदाचित तो मेघ काळाकुट्ट असावा. अंधाराशी याचे साम्य जुळते.

'वजूद' (ईश्वरी अस्तित्व वा सत्ता)च्या संदर्भात प्राचीन तत्त्वज्ञांचे मत सूफींसारखेच आहे. ते तत्त्वज्ञ, श्रेणींमध्ये परमेश्वराचा प्रकाश मिसळलेला असतो, या मताचे समर्थक आहेत. याच्या रहस्य स्वरूपात ते असे नमूद करतात की 'वहदत' (एकत्त्वता, तदेकात्मक रूप)च्या स्थानापासून एक बिंदू निर्माण झाला. बिंदूच्या हालचालीमुळे रेषा, रेषेच्या हालचालीमुळे तळ व वरचा भाग आणि तळाच्या हालचालीमुळे देह वा शरीर निर्माण झाले. (असा हा उत्पत्तिक्रम आहे.)

मीर सय्यद शरीफ़ जर्ज़ानी शाह 'तज्रीद' (बहिर्मुखी नि:संगता)च्या तळटीपामध्ये लिहितात की, प्रत्येक पदार्थ हा 'वजूद' (अस्तित्वा)च्या विरोधात आहे, जसे मानवास त्याचे अस्तित्व जोपर्यंत प्रदान करण्यात येत नाही तोपर्यंत तो अस्तित्वात (मौजूद) आढळून येऊ शकत नाही, आणि जोपर्यंत त्याच्या अस्तित्वासोबत विवेक वा बुद्धीस जोडले जात नाही त्याचे 'मौजूद' अर्थात अस्तित्वात येण्याची मान्यता ग्रहीत केली जाऊ शकत नाही. तर मग जो काही पदार्थ असेल तो अस्तित्वाच्या विरोधात जाईल. म्हणजेच त्याचे अस्तित्व असणार नाही आणि त्याचे अस्तित्वात असणे खरोखर आपल्या स्वत:विना अपेक्षा धारण करणे असे मानले जाईल, म्हणजे त्याचा अभिप्राय किंवा आशय अस्तित्वात (मौजूद) आहे, आणि जी वस्तू अस्तित्वात असण्यामध्ये दुसऱ्यावर (इतरावर) निर्भर असेल तर ती संभाव्य होऊ शकते. कारण की संभावनेचा अर्थ याव्यतिरिक्त दुसरा नाही की अस्तित्वात असण्यामध्ये (मौजूद) दुसऱ्यावर निर्भर असेल, आणि जर त्याचा आशय दुसऱ्याचे अस्तित्व असा घेतल्यास जो पदार्थ अस्तित्वाच्या विरोधी असेल तो संभाव्य असेल आणि संभव-शक्य होण्यासाठी कोणतीच गोष्ट आवश्यक नाही. यामुळे निश्चित होते की अस्तित्वाच्या (वजूद) विरोधी वस्तूंसाठी कोणतीच गोष्ट आवश्यक अशी नाही. (या युक्तिवादामुळे सिद्ध झाले.)

पुष्ट प्रमाणांद्वारे जर आवश्यक हे प्रस्तुत (मौजूद) आहे तर मग अस्तित्व (वजूद) असणार नाही, परंतु ऐन आवश्यक, जो आपल्या जातीनिशी स्वत: प्रकट (अस्तित्वात) आहे, ज्यामध्ये अन्य इतर सत्तेचा हस्तक्षेपच

नसेल. अस्तित्व (वजूद) पण असेच असले पाहिजे की जे अस्तित्व त्याचे सत्तेचा (ज़ात) हू-ब-हू तंतोतंत (ऐन) आहे. 'वाजिब' (आवश्यक)चा अभिप्राय ते 'वजूद' (अस्तित्व) आहे की जे स्वत: कोणत्याच प्रकारच्या अटीशी आणि मिश्रणाशी बांधील नसेल. 'वजूद' अर्थात परम सत्ता ही आपल्या ज़ातीच्या ('नामा'च्या) सीमेमध्ये अस्तित्वहीनतेचे, शून्याचे घोतक आहे. यात मुळीच शंका नाही की 'वाजिब' तेच आहे की जे स्वत: जातीनिशी शून्याचा विलोम असेल, न हे की गैर मुळे (इतरेतरमुळे)

आता आपण हे समजून घेतले पाहिजे की त्या (परमेश्वरा)चे अस्तित्व ज्या स्वरूपात जसे आहे तसे समजण्यास आपण असमर्थ आहोत. म्हणून तर फक्त बौद्धिकदृष्ट्या आपण त्याच्यावर विश्वास ठेवतो. त्याच्याप्रती श्रद्धा बाळगतो (आणि यालाच) गुह्यज्ञानी व एकेश्वरवादी 'हूयत-ए-ग़ैब' अर्थात परोक्ष तदत्त्व, सत्य अर्थात परमेश्वर म्हणतात. याला ते 'हक़ीक़तुल हक़ायक़' (परमसत्याचे वास्तव) या नावाने संबोधतात आणि नावाच्या दृष्टीने 'अल्लाह' (परात्पर परब्रह्म) या नामाभिधानाने ओळखतात. ईश्वराच्या या अस्तित्वासाठी सापेक्षतेच्या पोशाखामध्ये अनेक नानारूपे आहेत. कधी गुण आणि सापेक्षतेपासून मुक्त तर कधी बंधनाच्या कैदेमध्ये प्रकट तर कधी बंधनांपासून निरपेक्ष. जेव्हा 'ज़ात' (परमसत्ता) तद् अधिक गुणांपासून उन्मुक्त असते (असे मानल्यास) तेव्हा त्या अवस्थेत तिला 'अहदियत' (स्वयंरूप) (एकत्त्वता) म्हणतात. ही 'अमा' (गहन अंध:कारा)ची अवस्था आहे. जेव्हा तिच्याकडे वास्तविक गुणांच्या अनुषंगाने पाहिले जाते तेव्हा त्या 'ज़ात'चे नाव 'वाहिदियत' (आवेशरूप) असे होते. यालाच 'आलम-ए-जबरूत' (कारण देह, तप:लोक) पण म्हणतात. जाणकार लोकांच्या मते अस्तित्वा (वजूद)चे वास्तव एकाहून अधिक नाही आणि तेच सत्य अर्थात परमेश्वराचे अस्तित्व आहे. समस्त सृष्टी आणि ब्रह्मांडाचे अस्तित्व त्याच्यावरच समाप्त होते आणि तोच स्तर सर्वांचा अंत आहे. सर्व लोकांमधून प्रत्येक लोकामध्ये त्याच अस्तित्वाचे विविधांगी प्रकटन आहे.

नाम-रूपांच्या गुणांसह खुद्द वैयक्तिकरीत्या स्वयंभू असण्यास 'तंज़ीह' (ग़ैरियत = द्वैत) असे म्हणतात. 'तंज़ीह'शिवाय पवित्र कुराणामध्ये काही असे श्लोक आहेत जे 'तश्बीह' (ऐनियत=अद्वैत) सप्रमाणित करतात. जसे - 'मी आपल्या हातांनी बनवले', 'त्याच्या सत्तेशिवाय प्रत्येक वस्तू नष्ट होणारी आहे', 'कृपाळू परमेश्वर सिंहासनावर आसनस्थ आहे', 'सर्वश्रेष्ठ परमेश्वराबाबतीत मजकडून जे प्रमाद घडले त्याबद्दल मला किती खेद आहे!' अशा प्रकारची अनेक उदाहरणे प्रेषित वचनं आणि दैवी ग्रंथांमध्ये विपुल प्रमाणात आढळतात. काहींनी त्यांचे स्पष्टीकरण दिले आहे, तर काही या संदर्भात मौन धारण करून आहेत आणि ते त्यांनी सर्वस्वी ईश्वरी ज्ञानावर सोपवले आहे. म्हणून अशा परिस्थितीमध्ये 'तंज़ीह' (द्वैत) आणि 'तश्बीह' (अद्वैत) या दोघांना एकत्रित करणे आवश्यक आहे.

अबू सईद खराज यांचे कथन आहे की ईश्वरास ओळखणे शक्य नाही. (अथवा ईश्वरास जाणले जाऊ शकत नाही) ते म्हणतात मी अल्लाहस दोन परस्परविरोधी एकत्रित गुणांच्या दरम्यान ओळखले, स्वतंत्रपणे ओळखले नाही. अर्थात ''तोच पहिल्यापासून आहे व तोच शेवटपर्यंत राहिल, आणि तो (आपल्या सामर्थ्याने) व्यक्त व (व्यक्ती व गुणाने) गुप्त होय.'' ५७:३ अल्लाह हा 'नाम-रूपा'मध्ये एकमेवाद्वितीय आहे. म्हणजेच तो नामा ('ज़ात')मध्ये एकमेव ('यगाना') आहे, तर रूपां ('सिफ़ात')मध्ये अद्वितीय ('यकता') आहे.

सुप्रसिद्ध सूफी आचार्य व तत्त्वज्ञ शेख़ मुहिय्युद्दीन इब्न अरबीच्या मते 'वजूद' अर्थात परमेश्वराचे अस्तित्व तीन तऱ्हेने आहे –

१) पदार्थाच्या अटीसह – हे अस्तित्व सापेक्ष आहे. हे रूपसहित आहे. (बशर्त शय)

२) पदार्थहीन होण्याच्या अटीच्या दृष्टीने – हे अस्तित्व सर्वसाधारण आहे. (बशर्त लाशय)

३) कोणत्याही पदार्थाच्या अटीशी बांधील नसलेले – हे अस्तित्व निरपेक्ष आहे. हे परमेश्वराचे 'ज़ात' ('नाम') आहे. हे रूपरहित आहे, (लाशर्त शय)

शेख़ मुहिय्युद्दीन इब्न अरबी यांनी परमेश्वराच्या 'ज़ात' ('नाम')ला निरेपक्ष अस्तित्व ('वजूद मुतलक़') असे जे म्हटले आहे ते या शेवटच्या अर्थाच्या दृष्टीनेच. परमेश्वराच्या 'वजूद' (अस्तित्व)च्या अटीच्या दृष्टीने त्याच्या 'ज़ात' (नामा)च्या मर्यादेपर्यंत श्रेणींमध्ये बंधने (मर्यादा) आहेत आणि 'तायुनात' ('तन्मात्रा') त्याच्या अभिव्यक्तीच्या अटी आहेत. आणि प्रत्येक माणसाचे वास्तव हे परमेश्वराचे अस्तित्व (वजूद) आहे.

सुप्रसिद्ध सूफी संत शेख शर्फुद्दीन यहिया मनेरी यांनी अल्लाहच्या सत्ते (अस्तित्वा – 'वजूद')चे सर्वव्यापी स्वरूप हे हदीस व पवित्र कुराणाच्या श्लोकांच्या माध्यमातून अत्यंत सुंदररीतीने उलगडून दाखवले आहे. ते असे – हे बंधू! विगत युगाच्या गोष्टी तुला ज्ञातच आहेत. ''अल्लाह (ईश्वर) होता आणि त्याच्या शिवाय काहीच नव्हते'' आणि भविष्याची कथा पण तू ऐकली आहेस. ''अल्लाहच्या सत्तेशिवाय सर्व वस्तू नष्ट होणार आहेत'' आणि आजची अवस्था पण तू वाचली आहेस, ''प्रत्येक दिवशी तो नित्य नवीन वैभवात असतो.'' आणि जर पुढे-मागे चालशील तर ''अल्लाहचाच आदेश मागील आणि पुढील आहे.'' जर वर-खाली जाशील तर ''अल्लाहच आकाशांचा आणि पृथ्वीचा प्रकाश आहे.'' जर उजवीकडे आणि डावीकडे पाहशील तर ''सावधानचित्त हो की नि:संशय तोच सर्व वस्तूंना व्यापून आहे.'' जर आत आणि बाहेर पाहशील तर ''तोच प्रकट आहे आणि तोच अप्रकट (गुप्त) आहे.'' आणि जर आरंभ व शेवटची इच्छा असेल तर ''तोच प्रथम आहे आणि तोच शेवटी आहे.'' हे (एवढे मात्र) पर्याप्त (पुरेसे) होईल. (मतालिब रशीदी, शाह तुराब अली कलंदर, 'मतलब'-४३, पृ. २२७-२८) ''प्रभू, तू सर्वव्यापक आहेस. माझ्यापुढे, मागे, उजवीकडे, डावीकडे, खाली, वर, आत, बाहेर सर्वत्र तुझे आत्मस्वरूप भरलेले आहे.'' – ऋग्वेद ७/८९/५

ईश्वराच्या संपूर्ण सत्ते (वजूद)च्या संदर्भात पाश्चात्त्य तत्त्वज्ञानामध्ये जॉन एरिजेना याने 'निसर्गाचे विभाजन' या नावाने संपूर्ण सत्तेचे चार वर्ग पाडलेले आहेत. जॉन स्कॉटस एरिजेना (सुमारे इ. स. ८१०-८७७) ही नवव्या शतकातील, पाश्चात्त्य तत्त्वज्ञान आणि ईश्वरशास्त्र या क्षेत्रांतील महत्त्वाची अशी एक व्यक्ती आहे. त्याने निसर्गाविषयी विवेचन प्रस्तुत केले आहे. तो निसर्ग म्हणजे संपूर्ण सत्ता अर्थात ईश्वर होय. या सत्तेचे त्याने पुढीलप्रमाणे चार वर्ग पाडले आहेत –

१) त्यांतील पहिल्या वर्गात, 'सर्जक परंतु असृष्ट अशा निसर्गा (संपूर्ण सत्ते)चा' समावेश होतो. ही सत्ता म्हणजेच ईश्वर होय. हे स्पष्ट आहे. त्याला कोणत्याही तत्त्वाची वा कारणाची आवश्यकता नाही. तो अगम्य आहे, त्याची व्याख्या आपण करू शकत नाही. त्याच्यासंबंधी आपण फक्त नास्तित्वाची विधाने करू शकतो. त्याच्या आविष्कारद्वाराच आपणास त्याचे ज्ञान होऊ शकते.

२) दुसऱ्या वर्गात 'सर्जक आणि स्रष्टा अशा निसर्गा (संपूर्ण सत्ता)चा' अंतर्भाव होतो. हा निसर्ग मूलकारणांचा अगर मूलजातीचा वा कल्पनांचा बनलेला असून, त्यांच्यावर सर्व प्रकारची सान्त पूर्णत्वे अवलंबून असतात. ह्या मूलकल्पना ईश्वरसृष्ट असल्यामुळे त्या निर्मित होत, परंतु ज्याप्रमाणे एकांकापासून संख्या निष्पन्न होत असताही त्यांची एकात्मता अबाधित राहते (खर्वित होत नाही) त्याचप्रमाणे या मूलकल्पना ईश्वरोद्भव असल्यामुळे ईश्वराची पूर्ण एकात्मता त्यांच्या वाट्यास येते. ईश्वरांतर्गत म्हणून त्यांच्याकडे पाहिल्यास त्यांचे ऐक्य आहे आणि त्यांच्यातील भेद हा केवळ बौद्धिक आहे. त्यांच्या परिणामांच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास त्या खरोखर भिन्न आहेत.

३) तिसऱ्या वर्गात 'सृष्ट परंतु सर्जक नसलेल्या निसर्गा (संपूर्ण सत्ते)चा' समावेश होतो. इंद्रियागोचर जग ह्यात मोडते. मूल कारणांचे परिणाम असलेल्या सर्व व्यक्तींचा हा वर्ग असतो. सर्जन ही तात्कालिक क्रिया नसून ती एक नित्य प्रक्रिया आहे. मनुष्य हा दृश्य व अदृश्य अशा सर्व सृष्टीचे प्रातिनिधिक स्वरूप आहे.

४) शेवटी चौथ्या वर्गात 'सर्जकही नाही आणि सृष्टही नाही असा निसर्ग' येतो. हाही ईश्वरच होय. परंतु सर्व वस्तूंचे उगमस्थान म्हणून नव्हे, तर त्यांची अंतिम अवस्था या दृष्टीने हा ईश्वर आहे.

इब्न अरबी आणि एरिजेना या दोहोंचे ईश्वर-संकल्पनेविषयी विचार व त्यांची मांडणी यांच्यात अतिशय साम्य असल्याचे आढळून येते. मात्र एरिजेनाप्रणीत चौथा वर्ग हा इतरांना व विशेषतः सूफींना मान्य होण्यासारखा नाही. याच मालिकेत आणखी एक पाश्चात्त्य तत्त्वज्ञ निकोलस याचेही ईश्वराच्या अस्तित्वाविषयीचे मत पाहण्यासारखे आहे. त्याने ईश्वराचे अस्तित्व त्रिविध स्वरूपात असल्याचे मानले आहे. तो म्हणतो, ईश्वर त्रिविध असून तोच अंतिम व सर्वसंपन्न सद्वस्तू आहे. अमर्यादितता त्याचे सारतत्त्व आहे. त्याची त्रिविधता ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान किंवा अस्तित्व, शक्ती व कृती इत्यादींतून प्रकट होते. ही भारतीय तत्त्वज्ञानातील 'त्रिपुटी' संकल्पनेसारखीच वाटते.

येथेच अस्तित्ववादा (भववादा)च्या सूत्रांचे उल्लेख केल्यास वावगे ठरणार नाही. म्हणून ज्या कशास 'आहे' असे म्हणता येईल ते सर्व 'सत्' होय आणि या 'सत्'चा असतेपणा म्हणजे सत्ता होय. ज्याचे अस्तित्व व वस्तुत्व स्वतंत्र असू शकते त्यालाच वेदांतात 'सत्' म्हणतात. अस्तित्ववादा (भववादा)ची दोन मुख्य सूत्रे आहेत. पहिले, अस्तित्व हे सारग्रहणाच्या नेहमी पूर्ववर्ती असते. दुसरे, सत्तेचे सम्यक आकलन करण्यासाठी बुद्धी ही सर्वथा अनुपयुक्त असून, तिच्याऐवजी भावनेलाच महत्त्व दिले पाहिजे. बुद्धीचा अस्तित्वाशी सुतराम संबंध नाही.

जिला आपण 'सत्ता' म्हणतो तीत आपणास दोन पैलू दिसून येतील. त्यात एक तर 'काय' असते व दुसरे 'ते' असते म्हणजे 'आशय' असतो व 'अस्तित्व' असते व हे दोघेही अविभाज्य असतात. सत्ता ही आध्यात्मिक असते. अंतिम सत्ता ही अनुत्पन्न, अविनाशी, अविभाज्य, अविकारी, अनाद्यनंत (अनादी-अनंत), निष्प्रपंच अशी समष्टी असते. 'असत्'चे अस्तित्व असू शकत नाही. 'सत्' म्हणजे नित्य स्वयंसिद्ध अस्तित्व. हे सत् तत्त्व नित्य असून सर्वत्र भरलेले आहे. ईश्वर केवळ चैतन्यमय (प्रकृतीच्या पलीकडचा) असून सर्व प्राणिमात्रांचे आदिकारण आहे. ईश्वराशी तुलना केल्यास सर्व प्राणी कःपदार्थ आहेत. कारण ईश्वर म्हणजेच सत्ता. ईश्वर एकमेव व शिवतत्त्व ह्यांचे एकीभूत रूप आहे. ईश्वर म्हणजेच स्वयंसिद्ध ज्ञान, व हे ज्ञान म्हणजेच

जीवन आणि त्यातील विविध व्यापार- ईश्वर सर्वातीत असून त्याची व्याख्या करण्यास अगर त्याचे वैशिष्ट्य सांगण्यास शब्द तोकडे पडतात. असे विचार पाश्चात्त्य तत्त्वज्ञ एखार्टने मांडले आहेत.

कोणत्याही वस्तूचे उपादान कारण हे त्या वस्तूचे 'स्वरूप' लक्षण असते, व त्या वस्तूच्या अंगातील इतर गुणधर्म हे त्या वस्तूचे 'तटस्थ' लक्षण होय. सत्, चित् आणि आनंद हे ईश्वराचे म्हणजेच ब्रह्माचे 'स्वरूप' लक्षण होय व नाम, रूप हे उपाधींचे धर्म हे ईश्वराचे अर्थात ब्रह्माचे 'तटस्थ लक्षण' होय. ते येतात व जातात. म्हणून मिथ्या होत. सोने हे दागिन्याचे उपादानकारण असते. ते मिथ्या नसते. त्याचे दागिन्याचे स्वरूप व नाव हे मात्र मिथ्या असते. त्याच सोन्याचा नवा दागिना केला की रूप व नाव बदलेल. पण मूळ सोने बदलणार नाही, हाच दृष्टान्त जगाला लावावयाचा. जगाचे अधिष्ठान सत्-चित्-आनंदस्वरूप ब्रह्म होय. आणि जगातील पदार्थांची रूपे व नावे ही नित्य बदलणारी व नाशवंत होत, म्हणून ती मिथ्या होत. पृथ्वीत ज्या एकंदर वस्तू आहेत, त्या 'सत्' वस्तूला सोडून नाहीत. प्रत्येक गोष्टीला, 'ही अमूक वस्तू आहे' 'ती तशी आहे' असे आपण संबोधितो. हा त्या वस्तूतील 'आहेपणा' हे ब्रह्माचे स्वरूपलक्षण होय. सृष्टीत ब्रह्माचे सत्, चित्, आनंद हे स्वरूपलक्षण सर्वत्र असते. ही तिन्ही लक्षणे कधी प्रकट, तर कधी अप्रकट असतात एवढेच.

### अल्लाहच्या अस्तित्वा (वजूद)चे स्वरूप[१८]

स्वरूपाची ओळख गुणांमुळे वा स्वभावधर्मामुळे होते. अल्लाहमध्ये दैवी सत्ता असते. त्या केवल सत्तेचे सप्त दैवी गुण आहेत. ते असे - १. जीवन, २. ज्ञान, ३. संकल्प, ४. सामर्थ्य, ५. श्रवण, ६. दर्शन (दृष्टी) आणि ७. वाणी. हे सप्त दैवी गुण हे त्याच्या पराकाष्ठेचे द्योतक आहेत. हे सर्व गुण अल्लाहने फक्त मानवजातीमध्ये आविष्कृत केले आहेत मानवेतर प्राण्यांमध्ये यांपैकी फक्त काहीच विद्यमान असतात. उपरोक्त सप्त दैवी अक्षय गुण किंवा आविष्करणक्षम गुणांमध्ये जीवन हा गुण इतर गुणांपेक्षा वरीय, वरचढ वा श्रेष्ठ आहे. ही श्रेष्ठता मौलिक आणि वास्तविक नाही. कारण की अल्लाहचे अर्थात ईश्वराचे सर्व गुण सारखे असतात. त्यांमध्ये उच्च-नीचता नसते, परंतु श्रेष्ठता यासाठी आवश्यक आहे की जोपर्यंत इतर गुणांमध्ये सप्राणता, सजीवता निर्माण होत नाही, तोपर्यंत ते गुण आपापल्या स्थळी आढळून येत नाहीत. उदाहरणार्थ, अंत:करणामध्ये -चित्तामध्ये जोपर्यंत प्राण निर्माण होत नाही तोपर्यंत ज्ञान किंवा संकल्पाचा उदय होऊ शकत नाही. अथवा शरीराचे अवयव जोपर्यंत सजीव नसतात तोपर्यंत त्यांच्यामध्ये हालचालीची शक्ती निर्माण होऊ शकत नाही. कानांमध्ये जोपर्यंत सप्राणता नसते तोपर्यंत श्रवणशक्ती निर्माण होऊ शकत नाही. डोळ्यांमध्ये जोपर्यंत जीवन शक्ती नसते तोपर्यंत त्यांना दृष्टी येऊ शकत नाही. जिव्हा जोपर्यंत सजीव नसते तोपर्यंत वाचा, वाणी निर्माण होऊ शकत नाही.

या जीवनाला स्थैर्य असणे पण आवश्यक आहे, कारण जर जीवन कायम नसेल तर तत्काळ ती वस्तू मृत होऊन जाईल. अतएव परमश्रेष्ठ परमेश्वराचे हे दोन गुण अर्थात जीवन (चेतना) आणि स्थैर्य हे इतर सर्व गुणांपेक्षा दर्जामध्ये श्रेष्ठ ठरतात. या गुणांची नावे आहेत - 'हय्यी' (चेतना) आणि 'क़य्यूम' (स्थैर्य). या गुणांचा उल्लेख पवित्र कुराणामध्ये असा आहे - ''अल्लाहाशिवाय (दुसरा) कोणीच ईश्वर नाही. तोच चिरंजीव व चिरस्थायी आहे.'' ३:२ येथे 'तोच' हा शब्द निश्चित एकमेवतेसाठी प्रयुक्त झालेला आहे. एकमेवतेचा असा

अर्थ होतो की, जो गुण एखाद्या वस्तूशी निगडित असतो तो दुसऱ्या कोणत्याच वस्तूमध्ये आढळून येत नाही. येथे एकमेवतेचा अभिप्राय वास्तविक व मौलिकतेशी आहे. म्हणून अल्लाह अर्थात ईश्वरच 'हय्यी' अर्थात चिरंजीवी, चिरचेतन आणि 'क़य्यूम' अर्थात चिरस्थायी आहे. जर ईश्वरावाचून इतर सर्व म्हणजेच उपाधी पण 'हय्यी' आणि 'क़य्यूम' असेल तर त्यांचे गुण म्हणजेच चेतना आणि स्थैर्य हे त्या पदार्थाचे आपले स्वत:चे वास्तविक आणि मौलिक असणार नाहीत, तथापि अल्लाहचीच म्हणजे ईश्वराचीच चेतना असेल जी त्या वस्तूमध्ये क्षणिक व विश्वस्त स्वरूपात असेल. जिच्यामध्ये सदैव चेतना किंवा जीवन आणि निरंतर स्थैर्य आढळून येते तिला 'वजूद' म्हणजेच अस्तित्व किंवा सत्ता असे म्हणतात. म्हणून 'वजूद' किंवा अस्तित्वाची व्याख्या अशी होईल की अस्तित्व (वजूद) ते असते की जिच्यामध्ये चैतन्य वा जीवन आणि स्थैर्य आढळून येते. म्हणून हे पण सिद्ध होते की उपाधिमधील प्रत्येक पदार्थाचे अस्तित्व हे अल्लाहचे अर्थात ईश्वराचे अस्तित्व असते. यालाच सूफी ईश्वर व जीव या दोहोंमध्ये एक 'वजूद' (अस्तित्व, सत्ता) असल्याची मान्यता प्रस्थापित करतात. 'वजूद' एक असल्याचे संदर्भात पवित्र कुराणामधील पुढील चार श्लोकांचा दाखला देण्यात येतो –

१) ''अल्लाह आकाशांचा व पृथ्वीचा प्रकाश आहे.'' २४:३५

२) ''असीम समृद्ध आहे तो, ज्याच्या हाती समस्त विश्वाची सत्ता आहे. प्रत्येक वस्तुमात्रावर त्याचेच नियंत्रण आहे आणि तुम्हा सर्वांना त्याच्याचकडे परत आणण्यात येणार आहे.'' ६७:१

३) ''प्रत्येक जीवाला मरणाची चव चाखावी लागणार आहे.'' ३:१८५

४) ''त्या (अल्लाह)च्या व्यतिरिक्त प्रत्येक गोष्ट नाश पावणे अटळ आहे.''

जर अस्तित्व (वजूद) एकाऐवजी दोन असते तर कोणीच मृत्यूची चव चाखली नसती, न कोणतीच गोष्ट नाश पावली असती.

वरील विवेचनावरून ही गोष्ट ज्ञात होते की सत्ता (ज़ात) दोन आहेत आणि हे पण ज्ञात होते की दोन्ही सत्ता या एक दुसऱ्याशी परके (गैर) आहेत. हे परकेपण, हे द्वैत पराकाष्ठेचे दैवी अक्षय गुण अथवा जीवांचे क्षय, क्षणभंगूर अथवा नाशिवंत गुण यामुळे आढळून येते. आता आपण याविषयी विचार करू की जन्मापूर्वी आपण कोठे होतो. याचे उत्तर असे की जन्मापूर्वी आम्ही अल्लाह अर्थात परमेश्वराच्या ज्ञानामध्ये ज्ञात स्वरूपात होतो. आणि जन्मानंतरसुद्धा आम्ही ईश्वराच्या ज्ञानामध्ये ज्ञात आहोत. आणि मृत्यूनंतरसुद्धा त्याच्या ज्ञानामध्ये ज्ञात असेच राहू. जी गोष्ट अल्लाहच्या ज्ञानामध्ये समाविष्ट नसेल ती गोष्ट अस्तित्वात येऊ शकणार नाही. म्हणून अल्लाहच्या ज्ञाताचे ज्ञात हे आदिपासून आहे व ते अंतकाळापर्यंत राहील. जर असे नसेल तर अल्लाह अर्थात परमेश्वराच्या सत्तेस अज्ञानाचे आवरण आले असते. तो अल्लाहच परम जाणकार आहे. यास्तव सत्ता (ज़ात) संदर्भात तीन मुद्दे उपस्थित होतात – (१) दोन सत्ता (ज़ात) अनादी काळापासून अस्तित्वात आहेत व ते अंतकाळापर्यंत राहतील. (२) या दोन्ही सत्ता एक दुसऱ्यापासून वेगळ्या आहेत. (एक अक्षर आहे, तर दुसरे क्षर आहे.) (३) अल्लाह अर्थात ईश्वराची सत्ता स्वयंभू आहे, तर जीवाची सत्ता ही ईश्वरावर अवलंबून आहे. या दुसऱ्या सत्तेशी अस्तित्व (वजूद) तेव्हापासून निगडित होते जेव्हापासून परमेश्वर त्याला बाह्य स्वरूपात प्रकट करू इच्छितो. म्हणून दुसरी सत्ता ही बाह्य प्रगट झाल्यावर तिचा अस्तित्वाशी संबंध येतो आणि जेव्हा ईश्वर त्या अस्तित्वाला नष्ट करू इच्छितो, तेव्हा मानवी आत्म्याशी तिचा संबंधविच्छेद घडवला जातो. याचेच नाव मृत्यू

आहे. यद्यपि त्या शवामध्ये (मृतामध्ये) जड संबंधी आत्मा विद्यमान असतो. हेतू हा की मृतास योग्यतेनुसार (बऱ्या-वाईट कर्मानुसार) कायम राखावे. म्हणून ईश्वराकरता सत्ता (ज़ात) प्रकट आहे, आणि अस्तित्वच सत्ता आहे. काहीच अंतर नाही, परंतु जीवात्म्यासाठी अस्तित्व हे त्याच्या सत्तेवर अधिक मात्रारूपाने असते. येथे फार मोठा फरक आहे. म्हणून सूफी तत्त्वज्ञानाचे मूलभूत कथन आहे – **अस्तित्व (वजूद) एक, सत्ता (ज़ात) दोन.**

चेतना (जीवन) आणि स्थैर्यास अस्तित्व (वजूद) असे म्हणतात. ज्या पदार्थामध्ये (गोष्टीमध्ये) चेतना आणि स्थैर्य आढळून येतात, तो पदार्थ अस्तित्वात असतो म्हणजे प्रगट असतो. त्या पदार्थामध्ये 'आहेपणा'चे असणे अनिवार्य असते. हाच 'आहेपणा' अस्तित्वास देहस्वरूपात वा आकाररूपात अभिव्यक्त करतो. हेच आकाररूप आमच्या संवेदना असतात. परंतु ज्या वस्तूचे सृजन होते, त्या वस्तूस अस्तित्व कदापि म्हटले जाऊ शकत नाही. तथापि असे म्हणता येईल की अस्तित्व ती शक्ती आहे, जी पदार्थास प्रगट करते आणि प्रगट ठेवते.

प्रत्येक पदार्थाचा संबंध शून्याशी आहे. जे अस्तित्व शून्य असते तिचा संबंध विचारांशी-कल्पनांशी असतो. तिला समजण्यासाठी बुद्धीची गरज भासते. बुद्धीने एखाद्या वस्तूचे आकलन करणे हे फार कठीण असते. यापेक्षा प्रगट वस्तूस समजणे सोपे असते. म्हणूनच प्रसिद्ध सूफी तत्त्वज्ञ 'महान शेख़' इब्न अरबी यांचे म्हणणे किती रास्त वाटते – 'अलहक़्क़ महसूस, वलख़ल्क़ माक़ौल' म्हणजे 'ईश्वर हा संवेद्य असतो, तर सृष्टी ही बोधगम्य असते.'

एक अस्तित्व आणि दोन सत्तेमुळे चार (४) महत्त्वपूर्ण विचारणीय विषय निघतात. यांचे संक्षिप्त विवेचन खालीलप्रमाणे आहे –

**१) वहदतलवजूद (अद्वैतवाद) :** याचा शब्दश: अर्थ आहे अस्तित्वाचे एक असणे. याचे संक्षिप्त स्पष्टीकरण असे आहे की जरी सत्ता दोन आहेत – एक परमेश्वराची सत्ता तर दुसरी जीवात्म्याची सत्ता, परंतु दोन्ही सत्तांमध्ये अस्तित्व एकच आहे म्हणजेच दोहोंमध्ये समाईक, संमिश्रित. ईश्वराकरिता अस्तित्व आणि सत्ता या दोन्ही सारख्याच आहेत. काहीच फरक नाही, परंतु जीवात्म्यासाठी अस्तित्व हे सत्तेवर अधिक प्रमाणात आहेत. हा फार मोठा फरक आहे आणि हा फरक न्यासवरून स्पष्ट आहे.

**२) हमा अूस्त (सर्वस्वी तोच) :** याचा अर्थ आहे सर्व काही तो (अल्लाह)च आहे. सर्व उपाधी अल्लाहच आहे. ईश्वरावाचून इतर सर्व म्हणजेच उपाधी. म्हणजे सृष्टीच्या ईश्वराची सत्ता म्हणजेच अल्लाहची सत्ता आहे, यामध्ये अभिप्रेत अर्थ असा आहे की अस्तित्वाच्या दृष्टीने पाहता (तो) ईश्वर आहे. क्षर, क्षय, सत्ता आणि अक्षर, अक्षय सत्ता हे दोन्ही अस्तित्वाच्या दृष्टीने ईश्वर (अल्लाह) आहे म्हणजेच एकच आहेत.

**३) अद्वैत आणि द्वैत :** अस्तित्वाच्या दृष्टीने परमात्मा आणि जीवात्मा एक आहेत म्हणजे (दोन्ही) हुबेहुब आहेत म्हणजेच यांच्यात अद्वैतता आणि एकसारखेपणा आहे, परंतु सत्तेच्या दृष्टीने पाहता परमात्मा आणि जीवात्मा या दोहोंमध्ये विभिन्नता आहे. त्यांच्यामध्ये द्वैत आहे. म्हणजे परकेपणा आहे. परकेपणाचा अर्थ आहे दोन्ही वेगवेगळे आणि स्वतंत्र आहेत. तसेच द्वैतासह अद्वैत आणि अद्वैतासह द्वैत याचा आशय असा आहे की परमात्मा आणि जीवात्म्यामध्ये जरी अस्तित्व एक असले तरी सत्ता दोन (वेगवेगळ्या) आहेत.

**४) 'तश्बीह' आणि 'तंज़ीह' (उपमेय आणि अनुपमेय) किंवा (गोचर व अगोचर) :** परमात्म्याची

अक्षय सत्ता आणि जीवात्म्याची क्षय सत्ता ह्या दोघांना सोबत पाहण्यास 'तश्बीह' असे म्हणतात. 'तंज़ीह' फक्त अक्षय सत्तेवर नज़र ठेवण्यास म्हणतात. या आधारे ज्ञान दोन प्रकारचे मानले जाते. (१) उपमेय ज्ञान (तश्बीही इर्फ़ान) आणि (२) अनुपमेय ज्ञान (तंज़ीही इर्फ़ान)

**उपमेय ज्ञानग्रहण करण्याचे पाच स्रोत आहेत** – (१) जीवात्म्याची क्षरता आणि परमात्म्याची पराकाष्ठा यांना भिन्न भिन्न (स्वरूपात) पाहाणे. (२) पराकाष्ठेचे आकर्षण फक्त परमात्म्याची सत्ता आहे आणि क्षरतेचे आकर्षण केवळ जीवात्म्याची सत्ता आहे. (३) जीवात्म्याकडून घडून येणाऱ्या प्रत्येक कर्मामध्ये, क्षरता आणि पराकाष्ठा असूनसुद्धा दोन्ही परस्पर विरोधी आणि विभिन्न असताना पण, दोन्ही एकत्रितपणे कार्यान्वित होतात. (४) परमात्माची सत्ता प्रभावकारी असते, तर जीवात्म्याची सत्ता प्रभावित. प्रभाव परमात्म्याच्या सत्तेची पराकाष्ठा असते. (५) जीवात्म्याची सत्ता ही या उपमेय ज्ञानामुळे परमात्म्याच्या सत्तेस जाणते, ओळखते आणि प्राप्त करते.

**अनुपमेय ज्ञानग्रहणाचे पण पाच स्रोत आहेत** – (१) परमात्म्याची सत्ता ही पराकाष्ठेचा खजिना आहे. त्याला न सीमा आहे न अंत. (२) परमात्म्याची सत्ता पराकाष्ठा प्राप्त करण्याअगोदर जशी विशुद्ध होती तशीच विशुद्ध ती पराकाष्ठा प्राप्त केल्यानंतर सुद्धा असते. विशुद्ध म्हणजे तिच्यात कमी-जास्त काहीच होत नाही. (३) परमात्म्याची सत्ता ही जीवात्म्याच्या सत्तेस तिच्या योग्यतेनुसार पराकाष्ठा-प्रतिष्ठा प्रदान करते. (४) प्रतिष्ठा प्रदान करण्याच्या संदर्भात परमात्म्याची सत्ता ही प्रत्येक शंका व आक्षेपापासून मुक्त आहे. ही त्याची कृपा आहे. (५) या अनुपमेय ज्ञानाने जीवात्म्याची सत्ता ही परमात्म्याच्या सत्तेस न यथाशक्य जाणू शकते, न ओळखू शकते, न पाहू शकते न प्राप्त करू शकते. (कारण अल्लाह-परमात्मा हा स्रष्टा आहे, तर जीवात्मा ही सृष्टी आहे. सृष्टी स्रष्ट्यास घेरू शकत नाही.)

सारांश, परमात्म्याची सत्ता अस्तित्व मात्र आहे. तो भौतिक अशाश्वत गुणांपासून मुक्त आहे. अस्तित्व हे त्याचे ऐन वास्तव आहे. त्याच्याशिवाय जे काही आहे ते अवस्था व तन्मात्रांचे जग आहे. सर्व अवस्था आणि तन्मात्रा ही त्याची प्रकट रूपे आहेत. तो त्यांमध्ये व्यक्त आहे. तो त्यांच्यामध्ये प्रवेश करणारा असतो. त्याचा प्रवेश हा जसे अवतारवादी मानतात किंवा एकेश्वरवादी म्हणतात तशा प्रकारचा नसतो. त्याचा प्रवेश हा गणितशास्त्रामध्ये गणनेच्या संख्येमध्ये एक या अंकाचे जसे महत्त्व आहे तशा प्रकारचा असतो. कारण गणनेच्या संख्यांमध्ये एककाशिवाय काहीच नसते. विश्वांमध्ये ब्रह्मांडामध्ये एकच सत्तेचे प्रकटन आहे. अनेकतेमध्ये तोच (एक) व्यक्त असतो. त्याच्या सत्तेमुळे अनेकतेचे अस्तित्व नाही. परमात्म्याच्या सत्तेच्या अस्तित्वामुळे त्याचे प्रकटन – उदय झाले आहे. परमात्म्याचीच सत्ता या अनेकतेमध्ये व्यक्त आहे.'' ''तोच पहिल्यापासून आहे व तोच शेवटपर्यंत राहील, आणि तो (आपल्या सामर्थ्याने) व्यक्त व (सत्ता व गुणाने) गुप्त होय. आणि तो सर्वज्ञानी होय.'' ५७:३ परमात्मा त्यांच्या सहभागित्वापासून मुक्त आहे. तो अधिसत्तेच्या दृष्टीने स्थूल देह (वाजिबुल वजूद) आहे. तो अनिर्बंध आहे. स्वातंत्र्याच्या बंधनापासून पण मुक्त आहे. तो प्रत्येक प्रकारच्या बंधनापासून मुक्त आहे. त्याच्या तन्मात्रा आणि अवस्थांचे नाव विश्व आहे. तो अमर्याद आहे. तो सत्ता (ज़ात) रूपाने निरपेक्ष, नि:स्पृह आहे. तो प्रकाशमात्र आहे. तत्सम कोणीही नाही. स्व-सत्तेने तो व्यक्त आहे व इतरांना तो व्यक्त करतो. त्याचे वास्तव त्याच्या व्यतिरिक्त इतरेतरांना व्यक्त नाही. सर्वसाधारण अस्तित्व, बौद्धिक-

काल्पनिक अस्तित्व आणि बाह्य अस्तित्व हे सर्व त्याची पडछाया आहेत. ''तू पाहिले नाहीस काय की तुझा विधाता सावली कशी पसरवतो?'' २५:४५ म्हणजेच वर्धित अस्तित्वास लिंग देहावर कशा प्रकारे पसरवतो. नामरूपाच्या वेषभूषेत तो व्यक्त-प्रकट आहे. आपल्या निर्मित सृष्टिमध्ये तो लपलेला आहे. अंतिम निवाड्याच्या दिवशी तो वास्तविक एकत्वतेच्या रूपामध्ये प्रकट होईल आणि तन्मात्रांच्या पडद्यास फाडून टाकील. ''त्या दिवशी अधिसत्ता कोणाची आहे?'' याचे उत्तर असेल - ''(तेव्हा सर्व हैबतीने स्तब्ध राहतील व खुद्द ईश्वरी वाणी होईल की अधिसत्ता) एकमेव महाप्रतापी अल्लाहचीच.'' ४०:१६ आणि लघु निवाड्यामध्ये तो दृश्य जगापासून अदृश्य जगामध्ये रूपांतरित होईल. तो प्रथम ज्ञानामध्ये प्रकट होतो, नंतर स्वयंरूपात (ऐनमध्ये) आणि अस्तित्वामध्ये त्याच्याशिवाय दुसरी कोणतीच वस्तू नाही.

## अल्लाहच्या (ईश्वरी) अस्तित्वविषयक चार संप्रदाय[१९]

ईश्वराच्या अस्तित्वासंबंधी सूफीवादामध्ये चार संप्रदाय प्रचलित आहेत. ते असे - १) ईजादिया (आविष्कारवादी वा आविष्करणवादी), २) शहूदिया (विशिष्टाद्वैतवादी), ३) वजूदिया (अद्वैतवादी) आणि ४) इलहादिया (निरीश्वरवादी वा नास्तिकवादी). यांचे विवेचन क्रमशः पुढे प्रस्तुत करण्यात येत आहे -

**१) ईजादिया (आविष्कारवादी वा अविष्करणवादी) :** यांचे घोषवाक्य आहे - 'हमा अज़ अस्तू' म्हणजेच सर्व काही त्या (ईश्वरा)च्या पासूनच आहे. या संप्रदायाच्या पुरस्कर्त्यांना 'ईजादिया' असे म्हणतात. या लोकांचा युक्तिवाद असा आहे की ज्याअर्थी अल्लाह अर्थात ईश्वर हा प्रत्येक पदार्थाचा निर्माता आहे तर मग प्रत्येक वस्तू ही निर्मिती झाली. म्हणून स्रष्टा आणि सृष्टी, निर्माता आणि निर्मिती यांच्यामधील संबंध फक्त निर्माणाचा आहे. ब्रह्मांडामधील प्रत्येक वस्तू यासाठी व्यक्त आहे की तिला अल्लाहने निर्माण केले आहे. 'प्रत्येक वस्तू त्याने निर्माण केलेली आहे' २५:२ याच आधारावर या संप्रदायाच्या समर्थकांना 'ईजादिया संप्रदायवादी' असे म्हणतात. 'हमा अज़ अूस्त'चा असा अर्थ आहे की 'हमा' ब्रह्मांडाच्या प्रत्येक अणू-रेणूस म्हणतात आणि 'अज़ अूस्त'चा अर्थ आहे 'अल्लाहमुळे आहे' म्हणून 'हमा अज़ अूस्त' हे दोन अस्तित्व आणि दोन सत्तेचे समर्थक लोकांना म्हणतात. दोन अस्तित्वांपैकी एक अस्तित्व हे स्वतः अल्लाहचे आहे. ते आत्मनिर्भर आहे. म्हणून ते स्वयंभू आहे. दुसरे अस्तित्व हे पदार्थाचे आहे, जिला अल्लाहने निर्माण करून तिला प्रदान केले आहे. दोन सत्तांमध्ये एक सत्ता अल्लाहची आहे जी अक्षय गुणांच्या पराकाष्ठेचा समुच्चय आहे. दुसरी सत्ता पदार्थाची आहे जी क्षर गुणांचा पुंज आहे. अल्लाह आणि पदार्थामधील संबंध फक्त आविष्कार म्हणजेच निर्मितीचा आहे. याला दृष्टान्ताद्वारे असेही पण म्हणतात की अल्लाह आणि पदार्थामध्ये तशाच प्रकारचा संबंध आहे ज्याप्रमाणे रचनाकार आणि त्याच्या रचनेच्या दरम्यान असते, आणि चित्रकाराचा चित्राशी जो संबंध असतो तसा. हा दृष्टिकोन अत्यंत सर्वसुलभ असा आहे. तो इतका सरळ आहे की मतिमंदसुद्धा सहज समजू शकेल. सर्वसाधारण मुस्लिम लोक या संप्रदायाशी निगडित आहेत. या सिद्धान्तास मानणारे काही जाणकार मुस्लिमपण आहेत. जर हे सर्वसाधारण आणि जाणकार लोक सद्गुरूंची दीक्षा घेऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरिक साधना आणि क्रियाकर्म व जप-साधना नियमितपणे करतील तर ते सूफी संप्रदायामध्ये दाखल गणले जातील. तरीपण ते 'कच्चे सूफी' म्हणूनच ओळखले जातील. कारण की त्यांचा

आविष्कारवादी विश्वास हा पवित्र कुराण आणि प्रेषित–वचन (हदीस) यांच्या शिकवणीनुसार हा त्रुटीपूर्ण सिद्ध होतो.

**२) शहूदिया (विशिष्टाद्वैतवादी) :** यांचे घोषवाक्य आहे – 'हमा बा अूस्त' म्हणजेच सर्व काही त्याच्यासोबत आहेत. या संप्रदायाचे समर्थक 'शहूदिया' नावाने ओळखले जातात. हे ते लोक आहेत जे ईजादिया संप्रदायाच्या निर्मितीच्या संबंधास मान्य करून त्यांच्यापेक्षा एक पाऊल पुढे टाकतात. त्यांचा युक्तिवाद हा आहे की कलाकार हा कलाकृती बनवल्यानंतर तो कलाकृतीशी असंबंधित होतो अथवा चित्रकार चित्र बनवल्यानंतर तो त्या चित्राशी संबंध ठेवत नाही. कलाकृती आणि चित्र एकदा बनून परिपूर्ण झाल्यानंतर त्यांच्यामध्ये कोणताच बदल कलाकार आणि चित्रकाराकडून घडवून आणला जात नाही. परंतु जगामध्ये आम्ही पाहतो की कलाकृती किंवा चित्र स्वरूपात असलेल्या प्रत्येक पदार्थामध्ये बदल, वाढ किंवा कमी होत राहते. यास्तव अल्लाह आणि सृष्टीमध्ये फक्त निर्मिती किंवा आविष्करणाचा संबंध पर्याप्त नसतो, प्रत्युत त्याच्याहून अधिक असा संबंध आहे जो त्या सृष्ट पदार्थामधील बदल, वाढ किंवा कमीस कारणीभूत ठरतो. हे लोक या संबंधास पवित्र कुराणाच्या फक्त या श्लोकामध्ये शोध घेतात. तो श्लोक आहे – "तुम्ही या गोष्टीचे (कधी) चिंतनपूर्वक निरीक्षण केले नाही का की, तुमचा विधाता कशाप्रकारे सावली पसरवतो." २५:४५ अतएव हे लोक स्रष्टा आणि सृष्टीमध्ये निर्मितीच्या संबंधाव्यतिरिक्त व्यक्ती आणि तिच्या छाये (पडछाया)सारखा संबंध पण मानतात, ज्याप्रमाणे छायेचा संबंध व्यक्तीशी असतो, तद्वत सृष्टीचा स्रष्ट्याशी संबंध हा 'छायावत' आहे. म्हणून ते फक्त यावर विश्वास ठेवतात की प्रत्येक वस्तूचे अस्तित्व हे अल्लाहच्या अस्तित्वाहून वेगळे आहे. त्यांच्यामधील परिवर्तन हे अल्लाहच्या सावलीमुळे घडून येतो. अतएव त्यांच्या धारणेचे दोन पैलू आहेत. एक तर हे की अल्लाह आणि सृष्टी यांचे अस्तित्व वेगवेगळे आहे. दुसरे हे की ज्याअर्थी प्रत्येक सृष्ट वस्तूच्या अस्तित्वामध्ये जो बदल, वाढ किंवा कमी घडून येत आहे, तो एकाच अल्लाहच्या 'छाये'मुळे घडत आहे. म्हणून अल्लाहच्या प्रेरणेच्या प्रभावाच्या आधिक्यामुळे मनुष्याच्या मनाची अशी अवस्था बनते की ब्रह्मांडाच्या सर्व वस्तूंमध्ये त्याला अल्लाहच अल्लाह दिसू लागतो. अशा प्रकारे असंख्य व नानाविध वस्तूंमध्ये एकच अस्तित्व दिसू लागतो. त्याला ते 'वहदत् शुहूद' (विशिष्टाद्वैतवाद) असे म्हणतात. आणि त्यांची अशी दृढ धारणा असते की जेव्हा अल्लाहच्या प्रेरणेचा प्रभाव समाप्त होतो तेव्हा सगळे अस्तित्व वेगवेगळे आणि भिन्न भिन्न होऊन जातात. ब्रह्मज्ञानाचा एक प्रमुख मुद्दा हा आहे की, परमात्मा आणि जीवात्मा यामध्ये अस्तित्व एक आहे (भलेही ईश्वरी प्रेरणेच्या प्रभावामुळे का होईना). या संप्रदायाचा पण समावेश सूफींमध्ये होतो. या संप्रदायास 'शहूदिया' पण म्हणतात. 'हमा बा अूस्त'चा अर्थ होतो सृष्टीचे सर्व पदार्थ हे ईश्वरी छायेमुळे कायम आहेत. ईजादिया संप्रदायाप्रमाणे हा संप्रदायपण दोन अस्तित्व आणि दोन सत्ता या सरणीचा समर्थक आहे. जरी हा संप्रदाय सूफींशी निगडित आहे, तरी पण तो 'अपरिपक्व' सूफींचा संप्रदाय आहे.

**३) वहदतल वजूद (अद्वैतवादी) :** यांचे घोषवाक्य आहे 'हमा अूस्त' म्हणजेच सर्व (काही) तोच आहे. हा संप्रदाय स्वतःस 'वजूदिया' म्हणवतो. हा परिपूर्ण सूफींचा संप्रदाय आहे. हा संप्रदाय शहूदियांच्या दुटप्पीपणास अनुसंधानाचे दोष मानतो. या संप्रदायाचा असा विश्वास आहे की परमात्मा आणि जीवात्म्यामध्ये असलेले 'वास्तविक संबंध', 'छायावत संबंध' याव्यतिरिक्त 'अस्तित्वाचा' संबंध पण आहे. म्हणजेच परमात्मा

आणि जीवात्मा यांमध्ये अस्तित्व एक आणि सत्ता दोन आहेत. अस्तित्व एक असल्याचे प्रमाण पवित्र कुराणातील पुढील श्लोक आहेत –

१. ''आणि जेव्हा माझे भक्त तुम्हाला माझ्याविषयी विचारतात, तेव्हा तुम्ही त्यांना असे सांगा की, मी (त्यांच्या) जवळच आहे.'' २:१८६
२. ''आम्ही त्याच्या कंठातील शिरेपेक्षाही (आत्म्यापेक्षाही) त्याच्या अधिक जवळ आहोत.'' ५०:१६
३. ''तुम्ही जिथे कुठे असता, तो तुमच्यासोबत असतो.'' ५७:४
४. ''स्वत: तुमच्यामध्ये (ही) (अनेक संकेत आहेत) तर मग ते तुम्ही पाहत का नाही?'' ५१:२१
५. ''तो आदी आहे व तोच अंत (आहे), आणि तो दृष्ट आहे व तोच अदृष्ट आहे. त्यालाच प्रत्येक गोष्टीचे पूर्ण ज्ञान आहे.'' ५७:३
६. ''आणि सर्व वस्तुमात्रांना अल्लाहने व्यापले आहे.'' ४:१२६
७. ''तुम्ही जिकडे तोंड वळवाल तिकडेच तुम्ही अल्लाहशी सामोरे व्हाल.'' २:११५
८. ''ही गोष्ट पुरेशी नाही का की, तुझा विधाता प्रत्येक गोष्टीवर (स्वत:) साक्ष आहे?'' ४१:५३
९. (क) ''(पैगंबर!) जे लोक आपली निष्ठा प्रकट करण्यासाठी तुमच्या हातावर हात ठेवून प्रतिज्ञा करत आहेत, वस्तुत: ते अल्लाहशी प्रतिज्ञा करीत आहेत. (जणू) अल्लाहचाच हात त्यांच्या हातावर आहे.'' ४८:१०

   (ख) ''(पैगंबर!) जेव्हा तुम्ही त्यांच्याकडे वाळूचे कण फेकले त्याद्वारे (त्यांच्या मनात) तुम्ही (दहशत) निर्माण केली नाही तर अल्लाहने केली. (म्हणजे वस्तुत: वाळूचे कण तुम्ही फेकले नाही तर अल्लाहनेच फेकले.)'' ८:१७
१०. ''आकाशात व पृथ्वीवर अगदी कणाइतकी वस्तूदेखील तुमच्या विधात्याच्या दृष्टीपासून लपून राहू शकत नाही.'' १०:६१
११. ''त्यालाच प्रत्येक गोष्टीचे परिपूर्ण ज्ञान आहे.'' २:२९
१२. ''आम्ही लवकरच तुम्हाला आमच्या (संदेशसूचक) खुणा दाखवू, बाह्य जगातही आणि खुद्द त्यांच्यामध्येही, जेव्हा त्यांना सुस्पष्टपणे असे कळून येईल की, हे कुराण (अल्लाहकडून) आलेले सत्य आहे. आणि ही गोष्ट पुरेशी नाही का की, तुझा विधाता प्रत्येक गोष्टीवर (स्वत:) साक्ष आहे? पण हे लोक आपल्या विधात्याशी होणाऱ्या भेटीसंबंधाने निश्चितच साशंक आहेत. सर्व गोष्टी या निश्चितच त्याच्या अधीन आहेत.'' ४१ : ५३ – ५४

आता प्रश्न असा उपस्थित होतो की अल्लाह (ईश्वर) हा कोणाच्या निकट–जवळ आहे, कोणाशी निकटतम – सर्वात जवळ आहे, तो कुणाच्या संगती आहे, तो कोणाच्या पिंडामध्ये आहे, तो कोणाचा आद्य आहे, तो कोणाचा शेवट आहे, तो कुणाचा प्रकट आहे, तो कुणाचा अंतरंग आहे, तो कोणाला घेरून आहे आणि तो अल्लाह कुणावर हजर आणि उपस्थित आहे. याचे उत्तर फक्त एक आहे अर्थात वस्तूजातावर. आणि त्याच पदार्थाची व्याख्या अल्लाहने पवित्र कुराणात अशी केली आहे – ''तो (अल्लाह) सर्वज्ञ (सर्व वस्तुजातांना जाणणारा) आहे.'' २:२९ म्हणून अल्लाह आणि पदार्थ, परमात्मा आणि जीवात्मा (असे) दोन

सत्ता झाले. या दोन्ही सत्ता एक दुसऱ्यापासून विभक्त, वेगळ्या आहेत. परंतु ही द्वैतता असूनसुद्धा अल्लाहचे त्या पदार्थाशी जवळ, अति जवळ, संगती, मध्ये, प्रथम, शेवटी, व्यक्त, अव्यक्त, चोहीकडून वेढलेला, हजर व विद्यमान असणे हे स्पष्टपणे सिद्ध करते की या दोन्ही सत्ता अस्तित्वाच्या दृष्टीने एकच आहेत. म्हणून हे सिद्ध झाले की अल्लाह आणि पदार्थ सत्तेच्या स्वरूपात भिन्न आहेत, मुळीच एक नाहीत आणि अस्तित्वाच्या दृष्टीने नितांत एक आहेत, मुळीच भिन्न नाहीत. अत: निष्कर्ष असा निघतो की अल्लाह आणि पदार्थादरम्यान अस्तित्व एक(च) आहे आणि सत्ता दोन आहेत. 'हमा अूस्त'चा खरा अर्थ हाच आहे. हे वर नमूद केलेले आहे. वास्तविक अद्वैत आणि द्वैत पण हाच आहे. हे पण वर नमूद केले आहे.

**समरूपता आणि समतुल्यता :** अल्लाहसम कोणीही नाही, परंतु अल्लाहचे दृष्टांत अनेक आहेत. ''(तो असा महान आहे की,) त्याची तुलना कशाशीच होऊ शकत नाही. (म्हणजेच) सृष्टीतील कोणतीही वस्तू त्याच्या समान नाही. तो सर्व काही ऐकणारा आणि सर्व काही पाहणारा आहे.'' ४२:११

या श्लोकामध्ये दोन गोष्टींचा उल्लेख आहे एक सदृशतेचा तर दुसरा एकरूपतेचा, समानतेचा. अल्लाहसदृश कोणतीच वस्तू (गोष्ट) नाही. तथापि प्रत्येक पदार्थ अल्लाह सारखा आहे. जर एक वस्तू दुसऱ्या वस्तुसारखी असेल तर त्या दोन्ही वस्तूंमध्ये सादृश्य असेल. सादृश्यतेमध्ये केवळ द्वैताशिवाय अद्वैत असते. जर एक वस्तू दुसऱ्या वस्तुसम असेल तर त्या दोन्ही वस्तूंमध्ये समानता, एकरूपता असेल. समानतेमध्ये काही घटकांमध्ये अद्वैत असते, इतर घटकांमध्ये द्वैत असते आणि हे अद्वैतच दोन्ही वस्तूंमध्ये हुबेहूब (तंतोतंत) नसते, परंतु यथाशक्ती असते.

उदाहरणार्थ, अली सिंह आहे. अली आणि सिंह हे दोन्ही वेगवेगळी आहेत. या दोहोंमध्ये समानता बहादुरीची आहे. म्हणजेच अली आणि सिंह फक्त बहादुरीमध्ये अद्वैत आहेत. शरीराचे इतर अवयव, त्याची बनावट इत्यादींमध्ये द्वैतभाव ठेवतात. हे अद्वैतपण हुबेहुब नाही, परंतु अली एवढा बहादूर आहे की जेवढा एक माणूस असू शकतो आणि सिंह एवढा बहादूर आहे की जेवढा एक हिंस्र पशू असू शकतो. याचप्रमाणे परमपवित्र अल्लाह. ''तो सर्व काही ऐकणारा आणि सर्व काही पाहणारा आहे.'' यामध्ये सांगतो की यद्यपि केवळ मीच ऐकणारा आणि मीच पाहणारा आहे. तथापि सृष्टीमध्ये आपापल्या शक्तीनुसार ऐकणारे आणि पाहणारे असे लाखो-करोडो जीव अस्तित्वात आहेत. हे सर्वच्या सर्व अल्लाहचे दृष्टान्त आहेत, आणि ते अल्लाहचे साम्य आहेत. ''तो सर्व काही ऐकणारा आणि सर्व काही पाहणारा आहे.'' या श्लोकामध्ये अल्लाह आपल्या भक्तांना एक अशी मुख्य शिकवण देत आहे की प्रथम परमात्मा आणि जीवात्मा यांमधील फरकामुळे जे द्वैत निर्माण होते ते त्यांनी चांगले लक्षात ठेवले पाहिजे. जेव्हा द्वैतची संकल्पना चांगल्याप्रकारे कळेल, म्हणजे दोन सत्ता लक्षात ठेवल्यानंतर तो दुसरी शिकवण ''सृष्टीतील कोणतीही वस्तू त्याच्या समान नाही'' असे म्हणून देतो. कोणतीही वस्तू अल्लाह समान नाही - याचा अर्थ असा आहे की दोन सत्तांना कायम ठेवून दोन अस्तित्व म्हणू नका. परंतु अस्तित्व एकच म्हणा. कारण की अस्तित्वामध्ये अल्लाहसमान कोणतीच वस्तू नाही. यास्तव हे सिद्ध होते की 'वजूद' एक आणि 'ज़ात' दोन म्हणजेच अस्तित्व एक आणि सत्ता दोन ही शिकवण निव्वळ कौराणिक शिकवण आहे आणि ही शिकवण आद्य प्रेषित आदमपासून ते शेवटचे प्रेषित मुहम्मदसाहेबपर्यंतचे सर्व संदेष्टे आणि संत-महात्मे देत आले आहेत. जर एखादी व्यक्ती दोन सत्तांसह दोन अस्तित्व म्हणत असेल तर

परमपवित्र अल्लाह ''सृष्टीतील कोणतीही वस्तू त्याच्यासमान नाही'' म्हणत तिला फटकारेल. दर्जामधील फरक लक्षात घेऊन ज्या व्यक्ती परमात्मा आणि जीवात्म्यामध्ये दोन अस्तित्व आणि दोन सत्ता मानू इच्छित होत्या, त्यांना उपरोक्त फटकारा लक्षात घेऊन अस्तित्व एक आणि सत्ता दोनची शिकवण ग्राह्य धरण्यास विवश व्हावे लागते.'' ही अल्लाहची कृपा आहे.

सादृश्यतेच्या संदर्भात ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे की, ब्रह्मांडाच्या सृष्टीमध्ये नाना प्रकारचे जीव लाखो नव्हे तर करोडोंच्या संख्येमध्ये आढळतात. परंतु कोणतेही एकाच प्रकारातील दोन जीव, कोणत्याही दोन व्यक्ती एक दुसऱ्यासारख्या, हुबेहूब मुळीच नसतात. म्हणून जेव्हा असंख्य जीवांमध्ये, एकाच प्रकारच्या दोन जीवांमध्ये सादृश्य नाही; तर मग अल्लाह अर्थात ईश्वर जो एक अत्यंत वेगळ्या प्रकारचा आहे आणि जो 'एकमेव व सहभागीविहीन' आहे, तत्सम समस्त ब्रह्मांडामध्ये कसे बरे आढळून येईल?

ज्या अर्थी अल्लाह आणि वस्तूमध्ये अस्तित्व एक आहे, म्हणून अल्लाहच्या अस्तित्वास प्रत्येक पदार्थामध्ये असण्यास, जर कोणी नवनिर्मित गुणांशी संबंधित मानत असेल तर अ-भक्ती आणि नास्तिकता उदयास येतील. अल्लाह अशा (दुर्मती)पासून आम्हास वाचवो! (या नास्तिकतेचे विवेचन पुढे चवथ्या संप्रदायात येणार आहे.) म्हणून आमच्यासाठी हे आवश्यक आहे की, अल्लाह आणि वस्तूमध्ये अस्तित्व एक असल्याबद्दल परिपूर्ण अनुपमेया (तंज़ीह)सह जाणावे. म्हणून अद्वैतास पुढीलप्रमाणे चांगल्याप्रकारे समजून घेता येईल –

(१) अल्लाह काल निरपेक्ष आहे, (२) अल्लाह स्थळ निरपेक्ष आहे, (३) अल्लाह वस्तूशी निगडित नाही, (४) अल्लाह वस्तूपासून विभक्त नाही, (५) अल्लाह पृथ्वी नाही, ६. अल्लाह तत्त्व नाही, ७. अल्लाह आणि वस्तूमध्ये अवतरण नाही, (८) अल्लाह आणि वस्तूमध्ये एकतत्त्व नाही, (९) अल्लाह कोणत्याच वस्तूचा बहुरूप नाही, (१०) अल्लाह कोणत्याही वस्तूमध्ये सीमित नाही, (११) अल्लाह हा कोणत्याच वस्तूचा रूपाकार नाही, (१२) अल्लाह एखाद्या विशिष्ट दिशेमध्ये नाही.

संक्षेपामध्ये, अल्लाह वस्तू नाही, परंतु वस्तूच्या सर्व उपाधीं (गुणधर्मा)पासून अलिप्त आणि विशुद्ध असूनसुद्धा तो प्रत्येक वस्तूचा हुबेहूब आहे. हे अद्वैत इंद्रियानुभवाच्या सर्व संकेतांपासून म्हणजेच बुद्धी, विवेक, बोध, ज्ञान, कल्पना, भावना, चेतना इत्यादीपासून सुदूरवर्ती अतीतपर्यंत लांब आहे की जेवढे खुद्द अल्लाहची सत्ता ही अतीत-अरूप प्रदेशामध्ये सर्वदूर असते. अशा अद्वैताचे ग्रहण व त्याचा लाभ हा केवळ अल्लाहच्या कृपेवर अवलंबून आहे. याचे साधन आहे सद्गुरू कृपा. साधकाने या रहस्यास आपल्या श्रद्धेचे अंग बनवावे. या संदर्भात सूफी कवी शम्स तबरेज़ म्हणतात, ''जर सद्गुरूशिवाय आपले काम करशील तर तू आपला सर्वनाश ओढवून घेशील.''

**४) इलहादिया (निरीश्वरवादी किंवा नास्तिकवादी) :** यांचे घोषवाक्य आहे 'अूस्त.' म्हणजे तो आहे. हा संप्रदाय 'इलहादिया' म्हणून ओळखला जातो. हा संप्रदाय पवित्र कुराण निर्दिष्ट उपरोक्त १३ (तेरा) श्लोकांचा मथितार्थ आपल्या इंद्रियानुभवांच्या साहाय्याने परमात्मा आणि जीवात्म्यामधील अद्वैत आत्मसात करण्याचा प्रयत्न करतो. अल्लाहस काल्पनिक संकेतांमध्ये मर्यादित करून हा संप्रदाय पथभ्रष्ट झालेला आहे. हा संप्रदाय वस्तूस स्वत: अल्लाह मानतो.

याचा परिणाम असा झाला की हा संप्रदाय सूर्यास अल्लाह कल्पितो. चंद्रास अल्लाह समजतो. दगडामध्ये देव पाहतो. पिंपळाचे वृक्ष आणि तुळशीस अल्लाह मानतो. सर्पामध्ये अल्लाह पाहतो. इतकेच नव्हे तर या संप्रदायाचा प्रत्येक मनुष्य हा स्वत:स अल्लाह समजतो. हा नास्तिक, जो आपल्या हातांनी एवढे अल्लाह स्वत:हून लादून घेतो, तो संपूर्णपणे विसरून जातो की त्याचे खंडन अल्लाहने आपले ग्रंथ पवित्र कुराणामध्ये केले आहे. प्रेषित इब्राहीम, जे अद्वैतामुळे सूर्य, चंद्र यांना अल्लाह समजू लागण्याच्या बेतात असताना, चूक उमजल्यानंतर तत्काळ अल्लाहने द्वैत आणि त्याची अनुपमेयतेची जाण करून देऊन त्यांना अशा दृढ संकल्पावर आणून ठेवले की त्यांनी (इब्राहीम) उद्घोषणा केली – ''हे माझ्या जातीबांधवांनो! मी त्या सर्वांपासून विरक्त आहे ज्यांना तुम्ही ईश्वराचा भागीदार ठरवता. (आता) मी एकाग्रचित्त होऊन (पूर्ण) निष्ठेने त्याच्याचकडे वळलो आहे. ज्याने आकाशांना व पृथ्वीला निर्माण केले. (म्हणजे आता मी सृष्टीच्या निर्मात्याचा सच्चा भक्त बनून राहणार आहे) आणि मी कदापि अनेकेश्वरवाद्यांपैकी नाही.'' ६:७८-७९

म्हणजेच स्रष्टा आणि सृष्टीमध्ये किती का अद्वैत असेना, परंतु तरी पण स्रष्टा आणि सृष्टीमध्ये परिपूर्ण द्वैत अस्तित्वात आहे. म्हणजेच स्रष्टा-निर्माता हा कोणत्याही परिस्थितीत सृष्टी-निर्मिती बनू शकत नाही आणि निर्मिती कधीच निर्माता होऊ शकत नाही. हा संप्रदाय आपल्या अज्ञानामुळे प्रत्येक वस्तूस ईश्वर म्हणतो. याचा अर्थ असा होतो की हा संप्रदाय ईश्वर आणि सृष्टीमध्ये एका अस्तित्वासह सत्ता पण एकच मानतो. जर वजूद एक आणि सत्ता पण एक होतील तर त्यामध्ये पुढील उणिवा वा त्रुटी आढळून येतील –

(१) परमात्मा आणि जीवात्मामधील विभेद शिल्लक उरणार नाही. (२) अल्लाह स्वत: हा अल्लाहचा प्रेषित बनून जातो. (३) अल्लाह स्वत: हा लहान लहान अल्लाहांसाठी दैवी ग्रंथ अवतरित करतो. (४) हे लहान लहान अल्लाह अथवा अल्लाह स्वत: अल्लाहची उपासना करतो. (५) अल्लाह स्वत: सत्कर्मे करून अल्लाहच स्वर्गामध्ये प्रवेश करतो. (६) अल्लाह स्वत: वाईट कर्मे करून अल्लाहच नरकामध्ये जाळला जातो. इत्यादी. परमेश्वर करो असे न होवो.

या नास्तिकतेपासून बचाव करण्यासाठी दोन गोष्टी आवश्यक आहेत. एक हे की ईश्वर आणि वस्तूमध्ये एक अस्तित्वासह ईश्वर आणि वस्तूच्या दोन सत्तांमध्ये श्रद्धा ठेवणे आवश्यक आहे. दुसरे हे की, ईश्वर आणि वस्तूमध्ये अस्तित्व एक म्हणजेच अद्वैतास आपल्यापरीने मुळीच ग्राह्य धरू नये. परंतु प्रभू कृपा आणि सद्गुरू कृपा यांच्या मदतीने अद्वैतास प्राप्त करावे. हा संप्रदाय पण स्वत:स सूफी म्हणवून घेतो. परंतु ज्या अर्थी आपल्या श्रद्धेने एक महत्त्वपूर्ण घटक अर्थात परमेश्वराचे अद्वैत अथवा सृष्टीसंबंधी चिंतन तो आपल्या इंद्रियानुभवांने करतो आणि अल्लाहस पवित्र मानत नाही त्याअर्थी तो बहिष्कृत झाला. हे या श्लोकानुरूप आहे – ''असीम आहे तुझ्या विधात्याचा महिमा, सन्मान (व सामर्थ्य) यांचा स्वामी... तो किती तरी पवित्र आहे.'' ३७:१८०

प्रथम दोन संप्रदाय म्हणजेच ईजादिया संप्रदाय आणि शहूदिया संप्रदाय हे दोघे श्रद्धावंत आहेत. अल्लाहचे कथन आहे – ''हे श्रद्धावंतांनो! श्रद्धा ठेवा अल्लाहवर व त्याच्या प्रेषितावर.'' ४:१३६

श्रद्धा दोन प्रकारची असते. एक गवेषित, ज्ञातव्य श्रद्धा आणि दुसरी अनुसरणीय श्रद्धा. उपरोक्त श्लोकामध्ये पवित्र अल्लाह आदेश देतो की, हे अनुसरणीय श्रद्धा राखणारे लोक हो! अल्लाह आणि त्याच्या प्रेषितावर गवेषित, अनुसंधनीय श्रद्धा ठेवा. प्रथम दोन संप्रदाय या श्लोकानुसार अनुसरणीय श्रद्धावंत असतात,

सच्चे वास्तविक श्रद्धावंत नसतात. अनुसरणीय श्रद्धा मुक्तीसाठी-मोक्षासाठी पुरेशी आहे, परंतु गवेषित वास्तविक सच्ची श्रद्धा ही मोक्षाशिवाय दर्जा उंचावणारी, चिरकाल टिकणारी, ईश्वर समीपता घडवून आणणारी आणि प्रभू दर्शनास सक्षम ठरणारी अशी असते. अनुसरणीय श्रद्धा अनिवार्य आहे. सच्ची गवेषित श्रद्धा ही आनंददायक असते. अनुसरणीय श्रद्धा ही श्रद्धा मात्र आहे, परंतु सच्ची गवेषित श्रद्धा ही श्रद्धेव्यतिरिक्त संतोष (समाधान) आणि विश्वास आहे. याचे प्रत्यंतर पुढील श्लोकावरून येईल - जेव्हा इब्राहीमने म्हटले, ''(हे) माझ्या विधात्या, मृताला तू जिवंत कसा करतोस ते मला दाखव.'' (त्यावर) त्याने (अल्लाहने) म्हटले, ''तुझा विश्वास बसलेला नाही का?'' (तेव्हा) त्याने (इब्राहीमने) म्हटले, ''होय (विश्वास तर ठेवतो), परंतु मी माझ्या मनाच्या समाधानासाठी (हे विचारीत) आहे.'' २:२६० म्हणून महान सूफी संत प्रथम दोन संप्रदायांना 'कच्चे सूफी' म्हणून संबोधतात. अनुसंधानाची त्रुटी श्रद्धा तर आहे, समाधान नव्हे. परंतु ती श्रद्धा विरोधी तर मुळीच नाही. म्हणून अल्लाह ज्यांना श्रद्धावंत म्हणून संबोधतो त्यांच्या प्रतिष्ठेस बट्टा लावणे, हे ईश्वर कोपामध्ये गुरफटण्यासारखे आहे. ''हे परमेश्वरा, आम्हाला इहलोकातील सर्व प्रकारच्या संकटांपासून सुरक्षित ठेव आणि परलोकातील शिक्षेपासून वाचव.''

तिसरा संप्रदाय म्हणजे 'वजूदिया' हा परिपूर्ण श्रद्धावंत आणि परिपूर्ण अनुसंधित्सु सूफींचा संप्रदाय आहे. म्हणजे ईश्वर आणि वस्तूमध्ये एका अस्तित्वास मानणे. म्हणजे अद्वैताची प्राप्ती दोन प्रकारे होते. एक आहे ज्ञानामुळे प्राप्ती, तर दुसरे आहे ईश्वरीय प्रेरणेमुळे प्राप्ती. साधकाने प्रथम अद्वैताच्या ज्ञानात्मक प्राप्तीवर ठाम असावे, त्यावर दृढ असावे. त्याची पद्धती अशी आहे की साधकाने अल्लाह आणि वस्तूमध्ये 'परोक्षांमध्ये श्रद्धा ठेवावी'च्या अनुषंगाने कसलेच आढे-वेढे न घेता अद्वैत अर्थात प्रत्येक वस्तूशी अल्लाहच्या 'आहेपणा'वर प्रत्येक क्षणी विश्वास ठेवला पाहिजे. यामुळे श्रद्धा सबळ बनेल आणि ईश्वरामध्ये तन्मयता जागृत होईल. आता त्याची गणना सदाचारी लोकांमध्ये होईल. यानंतर ईश्वरीय प्रेरणा प्राप्त करण्याचे प्रयत्न करावे. याचे दोन स्रोत आहेत. एक अल्लाहच्या कृपेची इच्छा व आकांक्षा आणि दुसरे सद्गुरूंच्या कृपेचा विश्वास. जेव्हा साधक हा या दोहोंमध्ये परिपूर्ण बनेल, तेव्हा अल्लाह आणि वस्तूच्या अद्वैताची ईश्वरीय प्रेरणेची प्राप्ती होईल. यांच्याशिवाय मुळीच होत नाही. जर यांच्याशिवाय कोणी दावा करत असेल तर तो खोटा आहे.

जेव्हा या अद्वैताची प्राप्ती ईश्वरीय प्रेरणेमुळे होऊ लागली असेल तर साधक हा हुतात्म्याचा दर्जा पार करत सत्यनिष्ठाच्या दर्जापर्यंत पोहोचतो. जर साधक आपले प्रयत्न सद्गुरूंच्या मार्गदर्शनाखाली सुरू ठेवत असेल तर अल्लाह त्याला आपल्या निकटवर्ती सान्निध्यात समाविष्ट करेल. ''आणि जे अल्लाहच्या आणि (त्याच्या) ह्या प्रेषिताच्या आज्ञेचे पालन करतील त्यांचे स्थान, अल्लाहने ज्यांच्यावर आपला कृपावर्षाव केलेला आहे अशा लोकांमध्ये, म्हणजेच प्रेषित, सत्यवादी, हुतात्मे, आणि सदाचरणी लोकांमध्ये असेल, आणि ते फार चांगले साथी आहेत.'' ४:६९

''(तिसरा गट) अग्रेसर असलेल्यांचा (असेल), ते लोक अग्रेसर आहेत, त्या (लोकांनी ईश्वराचे) सान्निध्य संपादन केलेले असेल.'' ५६:१०-११

## सूफी साधकाची अल्लाह(अस्तित्वा)कडे ओढ व तिच्या पद्धती[२०]

उपरोक्त विवेचनानुसार अल्लाहच्या अस्तित्वाचे गूढ उकलल्यानंतर व तिचे आकलन झाल्यानंतर आता सूफी साधकाचा आधार मजबूत होतो. त्याचा आत्मविश्वास दुणावतो आणि आता त्याचा प्रयत्न हा दैवी गुणांच्या चक्रामध्ये लीन होण्याचा असतो. दुसऱ्या शब्दात, अल्लाहच्या अस्तित्वामध्ये गाढ आस्था व दृढ श्रद्धा ठेवून सूफी साधक हा त्याच्या कृपेचा आकांक्षी बनून त्याचा सान्निध्यलाभ घेण्याचा प्रयत्न करतो. यासाठी प्राथमिक अवस्थेत तो नाम-पठन आणि मनन यामध्ये स्वत:स गुंतवून घेतो. यापुढची पायरी म्हणून तो सद्‌गुरूच्या सेवेत उपस्थित होतो.

जेव्हा तो या हेतूने 'मुर्शद', 'पीर' म्हणजेच सद्‌गुरूकडे जातो तेव्हा ब्रह्मांडामध्ये आपले काय स्थान आहे याची त्याला जाणीव करून देण्यात येते. ईश्वरी सत्तेच्या तेजोमय प्रदेशात प्रवेश करण्यासाठी आवश्यक असलेल्या ऊर्ध्व उड्डाणासाठी तत्पर होण्याकरता लागणारी साधने आणि पद्धती त्याने ओळखून घ्याव्यात. या पद्धती विविधांगी असून त्या नामस्मरण वा नामजप, चिंतन व मनन या स्वरूपात असतात.

आता त्याला सांगण्यात येते की विश्वाच्या बाह्य तत्त्वांपैकी अत्यंत भव्य आणि अत्यंत विशुद्ध अशी मानली गेलेली 'सुयोग्य मूलद्रव्ये अनुभवावी लागतात. ही दहा आहेत, पैकी पाच ही प्रभुसत्तेशी निगडित आहेत. तर इतर उरलेल्या पाचांचा संबंध सृष्टीशी आहे.

सूफी साधक हा साधना-मार्गावर असताना त्याला याची स्पष्ट जाणीव करून देण्यात येते की प्रभुसत्तेशी निगडित जी पाच 'सुयोग्य मूलद्रव्ये' आहेत ती चित्त, आत्मा, मर्म, गुह्य आणि ब्रह्मांडाशी संबंधित आहेत. त्यांची स्थानके ही सर्वोच्च परमेश्वराच्या भव्य सिंहासन-प्रदेशांमध्ये आहेत. याचा संबंध शून्यतेच्या क्षेत्राशी आहे.

परमेश्वराने या सुयोग्य मूलद्रव्यांना मानवाच्या शरीरामध्ये काही विशिष्ट ठिकाणी प्रस्थापित केले आहे, परंतु त्याने निर्माण केलेल्या भौतिकवादी (ऐहिक) अडथळ्यांमुळे याचे त्याला विस्मरण झाले आहे. एखाद्या पूज्य सद्‌गुरूच्या सुसाध्य प्रभावामुळे याची त्याला पुन्हा जाणीव होते, आणि त्याची मूलद्रव्ये मुळाकडे आकर्षिली जातात.

सृष्टीच्या क्षेत्राशी निगडित पाच श्रेयस्कर मूलद्रव्ये आहेत अहम् (वासना), वायू, आप, तेज आणि पृथ्वी. सृष्टीच्या क्षेत्राशी निगडित प्रत्येक श्रेयस्कर मूलद्रव्य हे प्रभुसत्तेच्या क्षेत्रामधील प्रत्येक श्रेयस्कर मूलद्रव्याच्या केंद्रस्थानी स्थित आहे, जसे – अहम् (वासना) चित्तामध्ये, वायू आत्म्यामध्ये, आप मर्मामध्ये, तेज गुह्यामध्ये आणि पृथ्वी ही ब्रह्मांडामध्ये.

या प्रत्येक श्रेयस्कर मूलद्रव्याचा आपला वर्ण (रंग) आहे, जसे चित्त पिवळे आहे, आत्मा लाल (रक्तवर्ण) आहे, मर्म शुभ्र (पांढरे) आहे, गुह्य काळे आहे आणि ब्रह्मांड हे हिरवे आहे. तसेच यांपैकी प्रत्येक हा वेगवेगळ्या प्रेषितांच्या मार्गदर्शनाखाली आहे. जसे, चित्त हे आदमच्या पायाखाली आहे, आत्मा हा नूह व इब्राहीमच्या पायाखाली आहे, मर्म हे मूसांच्या पायाखाली, गुह्य हे ईसा (येशू ख्रिस्त)च्या पायाखाली आणि ब्रह्मांड हे प्रेषित मुहम्मदसाहेब यांच्या पायाखाली आहे.

सूफी संप्रदायाच्या महान साधकांनी या श्रेयस्कर मूलद्रव्यांच्या वशीकरणाच्या तीन पद्धती विकसित केल्या आहेत. त्या पद्धती पुढीलप्रमाणे आहेत –

**१) नाम–स्मरण विधी वा जप–जाप पद्धती :** प्रथम पद्धती आहे नाम–स्मरणाची. ही अल्लाहच्या नामाच्या पाठांतराची पद्धती आहे. यामध्ये क्रमश: विधायक आणि निषेधात्मक आवृत्ती असते.

याचा विधी वा पद्धती अशी आहे – तोंडामधील टाळूला जिभेने स्पर्श करावा. चित्तापासून – मनातून सर्व बाह्य विचार हद्दपार करावेत. शेख़ वा आध्यात्मिक सद्‌गुरूची मुद्रा (चेहरा) यावर आपले लक्ष एकवटवावे.

डाव्या स्तनाग्राखाली (वक्षस्थळाखाली) दोन बोटे अंतरावर असलेल्या अंत:करणाच्या कृतीशी मेळ घालून अल्लाह, अल्लाह, अल्लाह या नामाची आवृत्ती करावयाची असते.

सदरहू प्रक्रियेमध्ये, अंत:चक्षूमध्ये या पुनरावृत्तीचा अर्थ आणि अभिप्राय हे ध्यानात ठेवले पाहिजे. इतका की सूफीने स्वत: असा विचार केला पाहिजे की एकमेव एकाचे ('अहद') पवित्र नाम हे पूर्णतम गुणांमध्ये पूर्णतम असल्याची दृढ श्रद्धा तोंडपाठ म्हणणाऱ्यामध्ये (जपीमध्ये) असावी. चित्ताच्या श्रेयस्कर मूलद्रव्यामध्ये असलेला विशुद्ध ठिपका हा दैवी आभेने (चमक) भरून प्रतिसाद देण्यास सुरुवात करेपर्यंत पुनरावृत्तीचा हा सराव त्या साधकाने सुरू ठेवला पाहिजे.

अशाच प्रकारच्या प्रयत्नांनी श्रेयस्कर मूलद्रव्यांचे इतर विशुद्ध ठिपके शोधले पाहिजेत – तोपर्यंत की जोपर्यंत प्रत्येक ठिपका हा चकाकत असेल. मानवी शरीरामध्ये त्यांची विविध अवस्थाने अशी आहेत आत्मा हा उजव्या स्तनाग्राच्या (वक्षस्थळाच्या) खाली, अवस्थित आहे, मर्म हे छातीच्या केंद्राकडील डाव्या वक्षस्थळापासून दोन बोटे रूंदीवर अवस्थित आहे, गुह्य हे छातीच्या केंद्रमुखी उजव्या वक्षस्थळापासून दोन बोटे रुंदीवर अवस्थित आहे, मग ब्रह्मंड हा छातीच्या केंद्रस्थानी अवस्थित आहे. पाच सुयोग्य मूलद्रव्ये प्रतिसादात्मक बनेपर्यंत ही प्रक्रिया सुरू असते. शेवटची दोन अर्थात गुह्य आणि ब्रह्मंडासाठी श्वास आणि समग्र (संपूर्ण) शरीर प्रयत्नशील असते.

एका विशिष्ट प्रेषिताच्या अंकित असलेला सुयोग्य मूलद्रव्यांचा प्रत्येक पवित्र ठिपका अल्लाहच्या नाम–रूपांचे निरंतर पठन व मनन यामुळे प्रतिसादात्मक झाल्यामुळे तो सूफी साधक संबंधित प्रेषिताच्या अधीन कार्यप्रवण असलेल्या ठिपक्यामुळे आध्यात्मिक तेजाशी संबंधित होऊन जातो.

उदाहरणार्थ, अशाप्रकारे जेव्हा चित्ताशी संबंधित पवित्र ठिपका आदमशी धर्मप्रवणतेच्या माध्यमातून प्रतिसंवेदी (प्रतिसादात्मक) बनला असेल तर त्याला 'आदमी–उल–मश्रूब' म्हणजेच आत्मसंप्रदायवादी असे म्हटले जाते. परिणामी त्या टप्प्यावर साधकाच्या सर्व कृती आणि त्याच्या सभोवतातील सर्व क्रियांकलाप त्याच्या दृष्टीने व्यर्थ, निरर्थक ठरतात आणि त्या पलीकडे सारभूत सत्यांच्या कृती दृष्टिगोचर होण्यापलीकडे त्याला कसलाच फरक ओळखता येऊ शकत नाही.

तद्वत इतर सर्व पवित्र ठिपके चकाकू लागतात. अशा प्रकारे साधक हा चित्ताच्या ठिपक्यापासून जसजसा अग्रेसर होत आत्म्याच्या ठिपक्यापासून मर्म, गुह्य आणि ब्रह्मंडापर्यंत पोहोचत जातो तसतसे त्याला क्रमश: नूह, इब्राहीम, मूसा, ईसा (येशू ख्रिस्त) आणि शेवटी प्रेषित मुहम्मद यांचा धर्मसंघी किंवा भक्त–अनुयायी गणला जातो.

अन्य नास्तिवाची आणि अस्तिवाची पुनरावृत्ती जपामध्ये 'ला इलाह इल्ललाह' या ब्रह्मसूत्रांशाची कंठाग्रता असते. म्हणजे अल्लाहशिवाय अन्य कोणीच (उपास्य) ईश्वर नाही. हे श्वासाचे अवरोधन करून संपन्न होत असते. या आध्यात्मिक कल्पनेमध्ये भक्तिभावाने– 'इतर ईश्वर नाही' ('ला इलाह') ब्रह्मसूत्राचा हा अंश उच्चारताना, नाभीपासून सुरू करून मस्तक–मुकुटपर्यंत पोचायचे असते. नंतर भक्तिभावाने 'इल्ल' अर्थात 'शिवाय'चा उच्चार वक्षस्थळाच्या उजव्या बाजूवर करायचा असतो, नंतर ही हालचाल डाव्या बाजूस वळवून आपला भक्तिभाव 'ल्लाह अर्थात अल्लाह'चे उच्चारण अंत:करणावर आणून पूर्ण करावयाचा असतो. उपरोक्त सर्व विशुद्ध ठिपक्यांशी संबंधित समस्त नास्तिवाची आणि अस्तिवाची संकल्पनेच्या सजग जाणीवेसह हा जप संपन्न केला पाहिजे. परमेश्वराचे दयापूर्ण, मधुर, सर्वशक्तिमत्त्व हे समस्त वर्तमान, भूत आणि भविष्यास घेरून आहे, या भावनेशी समरूपता निर्माण झाली पाहिजे. या नाम–जपाने सूफी साधकास ईश्वराचे प्रेम आणि त्याचे सान्निध्य या व्यतिरिक्त अन्य कशाचीही अपेक्षा पूर्ण करून घ्यावयाची नसते.

या नामस्मरणाच्या नित्य आणि अखंड सरावामुळे श्वासाचे अवरोधन हे भक्तीच्या उच्चतर पैलूंमध्ये चित्ताग्रता–एकाग्रता निर्माण करण्यात साहाय्यक सिद्ध होते. याशिवाय ब्रह्मसूत्र कंठाग्र पुनरावृत्तींची संख्या ही विषम असते. कमीतकमी एक लहान विषम संख्या एकवीस (२१) वेळा ब्रह्मसूत्राची पुनरावृत्ती करूनसुद्धा जर साधकाच्या मनातून सांसारिक चिंता यशस्वीपणे हद्दपार होत नसतील आणि एकाग्रचित्तता निर्माण होत नसेल, तर खाजा अब्दुल ख़ालीक़ ग़ज्दवानी यांच्या मतान्वये ही नामस्मरण प्रक्रिया पुन्हा सुरू ठेवली पाहिजे.

**२) चिंतन :** दुसरी पद्धती आहे चिंतन. चिंतन म्हणजे अल्लाहशिवाय इतर सर्वांचे विस्मरण, आणि अल्लाहचे अतिशय स्मरण. एखाद्या सद्गुरूच्या उपस्थितीशिवाय हे संपन्न केले जाऊ शकते. दुसरा साधना मार्ग हा एखाद्या सद्गुरूच्या उपस्थितीत आक्रमित केला जातो. त्याच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली अत्यंत आदरभावाने, श्रद्धेने जप–पाठ, चिंतन आणि मनन यांचा सराव केला जातो. ही एक सर्वात अत्यंत परिणामकारी पद्धत व सर्वात सुलभ मार्ग आहे. हा सहकारी प्रवेश मार्ग म्हणून गणला जातो.

**३) मनन (मुराक़बा) :** 'मुराक़बा'चा शाब्दिक अर्थ आहे उंटाच्या मानेवर स्वार होऊन आपल्या प्रियकराकडे प्रयाण करणे. सूफी साधनेच्या क्षेत्रात याचा अर्थ आहे आपल्या प्रियकराच्या उपस्थितीत मान तुकवणे आणि त्याला आपल्या दृष्टिक्षेपात राखणे. या संदर्भात सूफी आचार्य इमाम कुशेरी हे आपल्या 'रिसाला'मध्ये असे नमूद करतात की साधकास याची जाणीव असते की आपला प्रभू हा आपल्यावर लक्ष ठेवून आहे आणि या गोष्टीचे नित्य भान त्याच्या 'मुराक़बा' अर्थात मनन आहे. आणि हे मनन सर्व कल्याणाचे मूळ आहे. 'मुराक़बा' हा शब्द 'रक़ीब' या शब्दापासून बनलेला आहे. आणि 'रक़ीब'चा अर्थ आहे पहारा ठेवणे. या अर्थाच्या अनुषंगाने चित्तास ईश्वरेतर गोष्टींपासून वाचवणे व सुरक्षित ठेवणे म्हणजेच 'मुराक़बा' वा मनन होय. परमेश्वर हा आपल्या भक्तांवर सदैव लक्ष ठेवून आहे. तो त्यांचा संरक्षणकर्ता आहे. या जाणिवेचे मनन करणे म्हणजेच 'मुराक़बा' होय.

'मुराक़बा'चे निदर्शक असे पवित्र कुराणातील काही श्लोक याप्रमाणे आहेत –

१) 'नि:संशय, तुझा विधाता सदैव लक्ष ठेवून असतो.' ८९:१४

२) ‘त्यांना हे माहीत नाही का की, अल्लाह त्यांची (सर्व) रहस्ये आणि त्यांच्या सर्व गुप्त वार्ता जाणतो आणि अल्लाह (मानवासाठी अदृश्य असलेल्या) सर्व गोष्टींना जाणतो.’ ९:७८

३) ‘अल्लाह प्रत्येक गोष्टीवर लक्ष ठेवून आहे.’ ३३:५२

४) ‘जे काही आकाशात आहे व जे काही पृथ्वीवर आहे, ते सर्व तो जाणतो. तसेच तो तुम्ही जे लपवता व जे प्रकट करता तेही जाणतो. कारण अल्लाहलाच (लोकांच्या) मनात काय-काय आहे, याचे पूर्ण ज्ञान असते.’ ६४:४

५) ‘तुम्ही जिथे-कुठे असता, तो तुमच्याबरोबर असतो.’ ५७:४

६) ‘आम्ही त्याच्या कंठातील शिरेपेक्षाही त्याच्या अधिक जवळ असतो.’ ५०:१६

हज़रत मौलाना शाह अहमद सईद आपले ग्रंथ ‘अर्बाए अन्हर’ यामध्ये लिहितात की क़ादरी संप्रदायाचे प्रथम प्रवर्तक सय्यद अबू मुहम्मद मुहय्युद्दीन अब्दुल क़ादिर जीलानी हे होते. या संप्रदायामध्ये नामस्मरणाच्या सस्वर जप आणि मौन जप अशा दोन्ही पद्धती प्रचलित आहेत. साधकास परमेश्वराची नामरूपे सस्वर म्हणण्याचा उपदेश दिला जातो. ही दुहेरी पद्धत आहे, एक प्रभू नामाचा पाठ आणि दुसरे अस्तित्वाची व नास्तिवाची ब्रह्मसूत्राचे पाठ म्हणण्याचा प्रघात आहे.

प्रभू-नाम पाठाच्या चार रिती सांगण्यात आल्या आहेत - (१) यक-ज़रबी (एकाघाती), (२) दू-ज़रबी (द्वि-आघाती), (३) से-ज़रबी (त्रिआघाती) आणि (४) चहार-ज़रबी. (चार आघाती) साधकाचा आवाज असा असला पाहिजे की त्यामुळे निद्राधीन व्यक्तीच्या निद्रेमध्ये बाधा येऊ नये. यक-ज़रबीमध्ये साधक आपले चित्त (हृदय) आणि कंठापासून ‘अल्लाह’ या शब्दाचा उच्चारण करतो. असे करण्यामध्ये आवाज आणि उच्चारण करण्याच्या वेळी वेळेची एक विशेष परिमिती असते. तो एकदा ‘अल्लाह’ म्हणतो आणि तोपर्यंत पुन्हा म्हणत नाही जोपर्यंत त्याचा श्वास स्वाभाविकपणे आत-बाहेर होत नसेल. त्याच्यानंतर तो पुन्हा ‘अल्लाह’चे उच्चार करतो आणि याचप्रमाणे साधकाची क्रिया चालत राहते. दू-ज़रबी जपामध्ये तो नमाज संपन्न करत असताना जशी बैठक घेतो, म्हणजेच वज्रासन तशीच बैठक तो घेतो आणि अल्लाहचे नाव घेतो. यामध्ये तो एकदा आपल्या डोक्यास उजव्या बाजूस वळवितो आणि ‘अल्लाह’ म्हणतो आणि पुन्हा चित्ताकडे वळवून म्हणतो. से-ज़रबीमध्ये तो पालथी मारून बसतो आणि एकदा उजवीकडे, पुन्हा डावीकडे आणि मग चित्ताकडे डोके करून ‘अल्लाह’ म्हणतो. चहार ज़रबीमध्ये पण तो से-ज़रबीसारखीच क्रिया करतो, परंतु चित्ताकडे डोके करून ‘अल्लाह’ म्हटल्यावर तो आपल्या समोरच्या बाजूस जोराने पुन्हा ‘अल्लाह’ म्हणतो.

नास्तित्वाची आणि अस्तित्वाची ब्रह्मसूत्रांशाचे पाठ म्हणताना साधकास काबा-मुखी बसून आपले डोळे मिटावे लागतात. मग तो ‘ला इलाह इल्लल्लाह’ - ‘अल्लाहशिवाय अन्य कोणताच ईश्वर नाही’. ‘ला इलाह’चे उच्चारण बेंबीपासून सुरू करून ‘इल्ल’ -शिवायपर्यंत पोहोचेपर्यंत उजव्या बाजूपर्यंत आणावे आणि शेवटी डावीकडे जेथे अंत:करण (हृदय) आहे तेथपर्यंत ‘अल्लाह’ उच्चारास आणून पोहोचवावे, आणि या बिंदूवर समाप्त करावे. अल्लाहाशिवाय इतर सर्व जे काही आहे ते अनित्य आहे आणि मात्र अल्लाहचेच अस्तित्व नित्य क़ायम आहे या आंतरिक अर्थावर साधकाने आपले लक्ष एकवटणे आवश्यक असते.

लक्ष विचलित करणारे इतर बाह्य ध्वनी साधकाच्या जपाच्या सस्वर ध्वनीमध्ये विलीन झाल्याकारणाने, अशा पद्धतीचा सस्वर जाप हा चित्ताच्या एकाग्रतेस अनुकूल आणि सक्षम ठरतो, आणि पुन्हा अशी शिफारस (शिफारिश) केली जाते की प्रात:काळ आणि सायंकाळच्या प्रार्थने (नमाज)नंतर आपल्या सद्‌गुरूच्या उपस्थितीत सांप्रदायिक सूफी बंधूंनी वर्तुळाकार बसून हा पाठ सस्वर म्हणावा.

दुसरा आध्यात्मिक सराव हा मौन जपाचा आहे. –'अल्लाहू समीउन्' (अल्लाह हा ऐकणारा आहे.) 'अल्लाहू बसीरून्' (अल्लाह हा पाहणारा आहे), 'अल्लाहू अलीमुन' (अल्लाह सर्व काही जाणतो.) सूफी साधकाने बेंबीपासून प्रथम नामाची सुरुवात करावी, दुसऱ्या नावास वक्षस्थळावर न्यावे आणि तिसऱ्या नावाने आपले डोके आकाशाकडे उंचावत जपाची समाप्ती करावी. ही प्रक्रिया उलट्या क्रमाने अर्थात दिशेने पुनरावृत्त करून बेंबीवर समाप्त करावी. उपरोक्त पद्धतींनी मनन आणि पठण करून त्यांच्या माध्यमाने आध्यात्मिक सर्वोत्कृष्टता गाठावी.

**अल्लाहच्या अस्तित्वाचे आणखी काही कुराणोक्त प्रमाण – पुरावे (स्वैर अनुवाद)**

**अल्लाहच्या अस्तित्वाचा पुरावा[२१] :**

आता आपण पवित्र कुरआनामध्ये अल्लाहच्या अस्तित्वाविषयी जे उत्तम व अजोड पुरावे दिलेले आहे त्याकडे वळूया. त्यात एका ठिकाणी असे म्हटलेले आहे, ''आमचा विधाता तो आहे ज्याने प्रत्येक वस्तूस तिचे योग्य ते स्वरूप दिले आहे आणि मग तिला तिचे योग्य ते काम करण्याचा मार्ग दाखवला आहे. २०:५१ जर आपण या वचनामध्ये अभिप्रेत असलेला अर्थ लक्षात घेतला आणि मनुष्य व भूमीवरील व समुद्रातील सर्व प्राणीमात्र आणि पक्षी यांचा आकार आणि घडण याकडे पाहिले, तर ज्याने प्रत्येक वस्तूस तिचे योग्य ते स्वरूप दिलेले आहे त्या अल्लाहची शक्ती पाहून आपण अचंबित होतो. या विषयाची व्याप्ती खूप मोठी आहे म्हणून आम्ही आमच्या वाचकांना अशी विनंती करू इच्छितो की त्यांनी या विषयावर सखोल विचार करावा.

पवित्र कुरआनमध्ये अस्तित्वाविषयी दिलेला दुसरा पुरावा असा आहे की सर्व गोष्टींचा शेवट अल्लाहकडेच होत असतो असे त्यात म्हटलेले आहे. त्यात असे म्हटलेले आहे की ''सर्व गोष्टींचा शेवट तुझ्या विधात्याकडे होत असतो.'' ५३:४३ आपण जर बारकाईने पाहिले तर आपल्याला असे दिसून येते की सर्व विश्व हे कार्यकारण पद्धतीने एकत्रितपणे बांधले गेलेले आहे. ही पद्धतीच सर्व प्रकारच्या ज्ञानाचा मूलस्रोत आहे. सृष्टीमधील कोणतीही गोष्ट या पद्धतीच्या कक्षेच्या बाहेर नाही. काही गोष्टी इतर गोष्टींचा स्रोत आहेत. तर काही गोष्टी शाखांप्रमाणे किंवा फाद्यांप्रमाणे त्यातून निर्माण झालेल्या आहेत. कारण हे मूलभूत असू शकते किंवा दुसऱ्या एखाद्या कारणाचे परिणामस्वरूप कार्य असू शकते आणि ही साखळी अशीच आणखी वाढू शकते. या मर्यादित जगामध्ये या कार्यकारण पद्धतीला कोणतीही मर्यादा नसणे आणि ती अमर्यादित असणे शक्य नाही. त्यामुळे आम्हाला हे मान्य करावे लागते की कोणत्यातरी अंतिम कारणाच्या ठिकाणी ती समाप्त होत असली पाहिजे. हे अंतिम कारणतत्त्व अल्लाह हाच आहे. पुढील वचनात असे म्हटलेले आहे की ''सर्व गोष्टींचा शेवट तुझ्या विधात्याकडे होत असतो.'' ५३:४३ यात परिपूर्ण रीतीने हे म्हणणे नमूद करण्यात आलेले असून कार्यकारण पद्धती ही अल्लाहकडे समाप्त होत असते, असे निश्चित विधान करण्यात आलेले आहे.

कुरआनमध्ये अल्लाहच्या अस्तित्वाचा आणखी एक पुरावा दिलेला असून असे म्हटलेले आहे की, ''भ्रमण करताना सूर्य चंद्राला मागे टाकून पुढे जाऊ शकतो ना चंद्राचा आविष्कार असणारी रात्र सूर्याचा आविष्कार असणाऱ्या दिवसाला मागे टाकून पुढे जाऊ शकते. त्यांपैकी कोणीही आपल्या कक्षेबाहेर जाऊ शकत नाही.'' ३६:४१ पडद्यामागे या संपूर्ण पद्धतीचे नियंत्रण करणारा कोणी नियामक नसेल तर या पद्धतीमध्ये गोंधळ निर्माण होईल. खगोल शास्त्रज्ञांच्या अंदाजामध्ये असा पुरावा ठळकपणे दिसून येतो. आकाशामध्ये असंख्य ग्रहतारे असून ते अवकाशामध्ये भ्रमण करीत असतात आणि त्यांच्या गतीमध्ये किंवा भ्रमणामध्ये अल्पसा फरक पडला तरी या संपूर्ण जगाचा विनाश होईल. या ग्रहताऱ्यांची एकमेकांशी टक्कर होत नाही किंवा त्यांच्या गतीत फरक पडत नाही किंवा त्यांच्या भ्रमण कक्षेत किंचितसाही फरक पडत नाही आणि इतका प्रदीर्घ काल भ्रमण करूनही त्यांची झीज होत नाही किंवा त्यांच्या यंत्रणेत कोणताही बिघाड होत नाही. हा अल्लाहच्या शक्तीचा केवढा मोठा आविष्कार आहे. जर हे ग्रहतारे पालकाच्या देखरेखीखाली नसतील तर एवढी मोठी यंत्रणा स्वत:च्या बळावर असंख्य वर्षे कशी काय चालू राहिलेली आहे? कुरआनमध्ये दुसऱ्या एका ठिकाणी सर्वशक्तिमान परमेश्वर पुढील शब्दात याकडे लक्ष वेधतो. ''ज्याने आकाश आणि धरती निर्माण केली त्या ईश्वराच्या अस्तित्वाविषयी शंका असू शकते काय?'' १४:११ त्याने आपल्या अस्तित्वाविषयी पुढील शब्दात आणखी एक पुरावा दिला आहे. ''या धरतीवर जे काही आहे ते सर्व क्षणभंगूर आहे आणि केवळ तुझ्या विधात्याची, जो वैभव व सन्मान यांचा स्वामी आहे, कृपा कायम राहणार आहे.'' ५५:२७-२८ क्षणभर आपण असे मानले की या धरतीचे अनेक कणांत तुकडे होऊ शकतील आणि आकाशातील ग्रहताऱ्यांचे तुकडे होतील आणि एखाद्या आघाताने किंवा स्फोटाने या ग्रहताऱ्यांचे अस्तित्व दर्शवणारी प्रत्येक गोष्ट नष्ट होऊ शकेल तरी बुद्धीला आणि विवेकबुद्धीला हे मान्य करावे लागते की एवढा मोठा संहार होऊनही त्या एकाचे अस्तित्व कायम राहील ज्याच्यावर या संहाराचा काहीही परिणाम होणार नाही आणि त्याच्यामध्ये कोणताही फरक पडणार नाही व तो आपल्या पूर्वीच्याच अवस्थेत अस्तित्वात राहील. तो एक म्हणजे ज्याने सर्व काही क्षणभंगूर निर्माण केलेले आहे आणि तो स्वत: मृत्यूपासून मुक्त आहे. तो अल्लाहच होय. पवित्र कुरआनमध्ये अल्लाहने त्याच्या अस्तित्वाविषयी आणखी एक पुरावा दिलेला आहे. अल्लाह त्यांना विचारतो की, ''मी तुमचा विधाता नाही काय? ते म्हणतात होय.'' ७:१७३ या श्लोकामध्ये सर्वशक्तिमान अल्लाहने मनुष्याच्या ठायी त्याने जी गुणवैशिष्ट्ये स्थापित केलेली आहेत ती गुणवैशिष्ट्ये प्रश्नोत्तराच्या स्वरूपात दिलेली आहेत आणि या गुणवैशिष्ट्यांचे स्वरूपच असे आहे की कोणताही मनुष्य अल्लाहचे अस्तित्व नाकारू शकत नाही. जे लोक अल्लाहचे अस्तित्व मान्य करीत नाहीत ते या कारणामुळे तसे करीत असतात की त्यांना त्यांच्या तर्ककल्पनेप्रमाणे त्याच्या अस्तित्वाचा पुरावा मिळू शकत नाही. तरीही हे मान्य करतात की निर्माण करण्यात आलेल्या प्रत्येक गोष्टीचा एखादा निर्माता असलाच पाहिजे. आपण आजारी पडल्यास ज्या आजारामागे कोणतेच कारण नाही असे निश्चयपूर्वक सांगणारा मूर्ख मनुष्य या जगामध्ये आढळून येणार नाही. जर विश्वाची ही यंत्रणा कार्यकारण पद्धतीने स्थापित झालेली नसती तर झंझावाताची किंवा सूर्यग्रहणाची अथवा चंद्रग्रहणाची वेळ आधीच वर्तवता आली नसती किंवा एखाद्या रुग्णाचा विशिष्ट वेळी मृत्यू होईल किंवा एखाद्या विशिष्ट वेळी एखाद्या रोगाबरोबरच दुसरा रोग उद्‌भवेल हे अगोदरच वर्तवता आले नसते. अशाप्रकारे अल्लाहचे

अस्तित्व नाकारणारा संशोधक विद्वान प्रत्यक्षात मात्र अप्रत्यक्षपणे ईश्वराचे अस्तित्व मान्य करीत असतो. कारण तो देखील आपल्याप्रमाणेच कार्यांच्या कारणांचा शोध घेत असतो. ही पूर्णपणे नसली तरी ईश्वराचे अस्तित्व मान्य करणारी गोष्ट आहे. आम्ही जो श्लोक उधृत केलेला आहे त्यावरून असे दिसून येते की मनुष्याची स्वाभाविक वृत्ती किंवा स्वरूप हे ईश्वराचे अस्तित्व पूर्णपणे मान्य करीत असते. त्यामुळे ईश्वराचे अस्तित्व नाकारणे हा केवळ या ऐहिक जीवनाचा एक आविष्कार असतो.

''आकाशांच्या व पृथ्वीच्या निर्मितीमध्ये, रात्रंदिनाच्या परिवर्तनामध्ये, समुद्रात नौकांच्या संचलनामध्ये, आकाशातून पर्जन्यवृष्टिमध्ये, सर्व प्रकारच्या सजीवांच्या विस्तारामध्ये, हवेच्या परिवर्तनामध्ये ज्ञानी लोकांसाठी संकेत आहेत.'' २:१६४ विधात्याच्या पूर्ण अधिकारात जीवन व मृत्यू आहे. सूर्याला पूर्वेकडून तोच उदयास आणतो. २:२५८ तोच आहे ज्याने सूर्याला तेजस्वी बनवले व चंद्रास कांतिमान बनवले आणि चंद्रकलेचे टप्पे योग्यरीत्या सुनिश्चित केले. अल्लाहने हे सर्व काही सत्याधिष्ठित निर्माण केलेले आहे. ज्ञानी लोकांसाठी त्याने हे संकेत उघड करून प्रस्तुत केले आहेत. १०:५ त्यानेच पृथ्वी पसरून ठेवली आहे, पर्वत रोवले आहेत, नद्या प्रवाहित केल्या आहेत, फळांच्या जोड्या निर्मिल्या आहेत आणि तोच दिवसावर रात्र आच्छादित करीत असतो. १३:१३ आकाशात व जमिनीत जे काही आहे सर्व त्याचेच आहे. त्याच्याच निखालस धर्म सर्व सृष्टीत चालत आहे. १६:५२ लोकांनी पक्षांना पाहिले नाही की नभोमंडळात कशाप्रकारे ते वशीभूत आहेत? अल्लाहखेरीज कोणी त्यांना पेलले आहे? १६:७९ तुम्ही पाहत नाही की कशाप्रकारे तुमचा विधाता सावली पसरवतो, त्यानेच सूर्याला वाटाड्या बनवले आहे, तोच सावलीला आवळतो, त्यानेच रात्रीला पोशाख व झोपेला मृत्यू-शांती आणि दिवसाला जिवंत होण्याची घटका बनवले आहे. तोच आकाशातून पाणी वर्षावतो व मृत भूमीला जिवंत करतो. २५:४५ अल्लाहने तुम्हाला मातीपासून निर्माण केले. तुमचे जोडपे बनवले, खारे व गोड पाणी, तसेच चंद्र व सूर्य वशीभूत केले. बादशाही (शासन) त्याचेच आहे. ३५:११-१३ त्याने आकाशांना व पृथ्वीला सत्याधिष्ठित निर्माण केले आहे. तो तुमच्या मातांच्या पोटात, तीन तीन अंधारयुक्त पडद्यात तुम्हाला आकार देतो. ३९:४, ७ तो अल्लाहच आहे जो मृत्यूसमयी आत्मे ताब्यात घेतो आणि झोपेतही आत्मा ताब्यात घेतल्यानंतर हवे त्याचा आत्मा रोखून घेतो. ३९:४२ त्यानेच मृत्यू व जीवन निर्माण केले, थरावर थर अशी सात आकाशे बनवली. तुम्हाला अल्लाहच्या निर्मितीत विसंगती आढळणार नाही. ६७:१-५.

''त्या (अल्लाह) च्या (सत्तारूपी) सिंहासनाने आकाश व पृथ्वी ( ही सर्व) व्यापिली आहेत व (आकाश आणि पृथ्वी) या दोहोंचे संरक्षण त्याला (मुळीच) जड जात नाही आणि तो (अति) परात्पर व महिमावंत आहे.'' - २.२५५

### छ) अल्लाह (ईश्वरा)चे अस्तित्व (वजूद) : दार्शनिक दृष्टिकोन[२२]

सूफी तत्त्वज्ञानाच्या भाषेत 'वजूद' म्हटले की नित्य सर्वश्रेष्ठ अल्लाहचे अस्तित्व असाच अर्थ अभिप्रेत असतो. अस्तित्वा ('वजूद')ने अतीत शून्यापासून ज्या पायऱ्यांवरून क्रमश: अवतरित होऊन ब्रह्मांडाच्या उद्यानामध्ये जी फुले उगवली त्यांना 'तनज़्ज़ुलात' (अवरोहण, अवतरण)च्या नावाने ओळखतात. हा एक

परिभाषिक शब्द आहे आणि आपल्या प्रयोगामध्ये शाब्दिक अर्थापासून वेगळा आहे. शब्दकोशाच्या दृष्टीने वरची श्रेणी सोडून खालच्या श्रेणीवर आस्थापित होण्यास 'तनज़्ज़ुल' (अवरोहण) असे म्हणतात. उदाहरणार्थ एका उप-जिल्हाधिकाऱ्याची पदावनती तहसीलदार या पदावर झाल्यास, त्याचा असा अर्थ होतो की, आता ती व्यक्ती उप-जिल्हाधिकारी राहिली नाही, तथापि तहसीलदार बनली आहे. पहिल्या जागेपासून हटून आता ती व्यक्ती निम्नपदाच्या जागेवर उतरली आहे. वरची जागा रिकामी आणि खालची जागा (तिच्या पदावनतीमुळे) त्याच्यामुळे भरली गेली. परंतु सूफी तत्त्वज्ञानामध्ये 'तनज़्ज़ुलात' चा हा अर्थ नाही. 'वजूद' अर्थात अस्तित्व जसे होते तसेच आहे. तिच्यामध्ये कोणत्याच प्रकारचा बदल झालेला नाही. आता पण तशाच प्रकारचा आहे ज्याप्रमाणे पूर्वी होते. ते होते आणि कोणतीच वस्तू तिच्यासोबत आणि तिला सोडून नव्हती. हे सारे बदल दृश्य स्वरूपात ''सर्व अवरोहणे ('तनज़्ज़ुलात') बाह्य (दृश्य) जगात निर्माण झाली आहेत, अस्तित्वा ('वजूद')मध्ये नाही'' तेव्हा या विधानाचा अभिप्रेत अर्थ हाच होतो की अवरोहणे ('तनज़्ज़ुलात') काल्पनिक आहेत, वास्तविक नाहीत.

एखाद्या वस्तूचे अस्तित्व हे तिच्या रूप-आकारावरून, वर्णावरून, गुणधर्मावरून ठरत असते. म्हणून वस्तूचे दृश्य रूपाकार म्हणजे तिचे अस्तित्व. रूप, आकार, वर्ण, गुण-धर्म हे सर्व अस्तित्वाचे घटक म्हणून गणले जातात. या न्यायाने पाहिल्यास मानवी शरीराचे निरनिराळे अवयव जसे हात, पाय, कान, नाक, डोळे, तोंड, डोके इत्यादी सर्व मानवाचे घटक ठरतात. परंतु अल्लाह (ईश्वरा)च्या बाबतीत हा न्याय खोटा ठरतो. कारण अल्लाह हा परिपूर्ण आहे. तो अरूप आहे, तो निर्गुण आहे. म्हणून त्याची सत्ता अखंड आहे. अल्लाहच्या 'वजूद' (अस्तित्व)च्या संदर्भात 'घटक' हा शब्द प्रयोग आकलनामध्ये सुबोधता येण्याच्या दृष्टीने एकप्रकारची काल्पनिक सोय म्हणून गृहीत धरावे. (या बाबीची वाचकांनी जाणीव ठेवावी.)


### अल्लाहचे अस्तित्वा ('वजूद')चे घटक

अल्लाह (परात्पर परब्रह्म) आपल्या आद्य अवस्थेत निर्गुण आणि निरपेक्ष आहे. तो त्या अवस्थेत फक्त सत्ता मात्र ('अज़्ज़ात') आहे. तो संपूर्णपणे अनभिव्यक्त, निर्विशेष आणि संबंधविहीन आहे. तो असीम, अरूप आहे. तो तन्मात्राहीन आहे.


अल्लाह आपल्या मूळ स्वरूपात तन्मात्राहीन अवस्थेत असतो. त्याची सत्ता याच अवस्थेमध्ये असते. ही शून्यावस्थे ('वरा-उल-वरा')ची श्रेणी असते. ही शून्यावस्था सर्व प्रकारच्या तन्मात्रा, बंधन वा अवरोध आणि प्रचीतीपासून श्रेष्ठतर असते. याच आधारावर तिला तन्मात्राविरहित मानले जाते. प्रथम अवरोहण वा अवतरण याच्यानंतर आहे. प्रथम अवरोहण साररूपात आहे तर दुसरे अवरोहण सविस्तर. या तपशीलाने पुन्हा मानवी स्वरूपात साररूप ग्रहण केले आहे. याला तपशिलानंतरचे सार म्हटले जाऊ शकते. सोप्या शब्दांत असे म्हणता येईल की तन्मात्राविहीन सत्तेने प्रथम साररूप अवरोहण ग्रहण केले, मग नंतर तन्मात्राविहीन (ला ताय्युन), मग नंतर सविस्तर. या तपशिलानंतर आदम स्वरूपात पुन्हा साराग्रहण केले.

प्रथम अवतरणा (तजल्लि ए अव्वल)मध्ये ज्ञानाच्या दृष्टीने सत्तात्मक पराकाष्ठेचा उदय आहे. हा उदय संबंधाच्या दृष्टीने आहे. याच्याचकडे 'अहदिय्युत'चा संकेत आहे, आणि नामाच्या समष्टिगत पराकाष्ठेच्या

**लाताय्युन = तन्मात्राहीन, असीम**





**आकृती १**




**आकृती २**

**अहदियत (एकत्त्वते)चे कंस**




**वाहदियत (अनेकते)चे कंस**

**आकृती ३**

दृष्टीने याचा रोख म्हणजे 'वाहिदियत' (एकमेवता)शी संकेत आहे. द्वितीय अवतरणामध्ये नामात्मक पराकाष्ठेची अभिव्यक्ती सविस्तरपणे अशाप्रकारे झाली आहे की प्रथम नाम-रूपांचे ('अस्मा व सिफ़ात') म्हणजेच नाम व गुणांचे प्रभाव सविस्तरपणे विश्वाच्या घटकांमध्ये प्रकट झाले. तदनंतर संपूर्ण तपशिलाचे सार आदममध्ये एकवटले.

अधिक स्पष्टीकरणाच्या हेतूने पुढे तिन्ही श्रेणी अर्थात तन्मात्राविहीनता, प्रथम तन्मात्रा आणि द्वितीय तन्मात्राच्या अंतर्गत त्या पारिभाषित शब्दांची एक सूची देण्यात येत आहे की जिच्यामुळे त्या श्रेणींकडे संकेत केला जातो. ही पारिभाषिक शब्दावली आणि त्यांच्या प्रयोगांची कारणमीमांसा यावर विचार केल्यास विषयाचे आकलन करण्यामध्ये फारच मदत होईल.

**सत्तेच्या चार श्रेणी** – १) अस्तित्व (वजूद), २) ज्ञान (इल्म), ३) प्रकाश (नूर), ४) अभिव्यक्ती (शहूद).

**स्पष्टीकरण :** सत्ता मात्र आहे. ही तन्मात्राविहीन आहे. जेव्हा ती स्वत: समस्त नाम-रूपांच्या समष्टीस प्राप्त करते तेव्हा हा संबंध 'वजूद' (अस्तित्व) बनतो आणि जेव्हा गुण स्वयमेव ज्ञात झाले, तेव्हा यालाच 'इल्म' (ज्ञान) म्हणतात. जेव्हा सत्तेने स्वत:साठीच आपले सौंदर्य न्याहाळले, तेव्हा हिला 'नूर' (प्रकाश) म्हटले जाईल, जेव्हा स्वत:च ज्ञात (होऊन) प्रकट झाले तेव्हा तेच 'शहूद' (अभिव्यक्ती) या नावाने ओळखले जाते. याच सत्तेच्या चार श्रेणी आहेत.

| अल्लाह (ईश्वरा)चे अस्तित्वा (वजूद)चे घटक | | |
|---|---|---|
| **संच १**<br>**ला ताय्युन–तन्मात्राविहीनता** | **संच २**<br>**ताय्युन–ए–अव्वल–प्रथमतन्मात्रा** | **संच ३**<br>**ताय्युन–ए–सानी–द्वितीयतन्मात्रा** |
| ग़ैब–ए–हूय्यत = तदत्त्व परोक्ष | तजल्लिए अव्वल = प्रथम अवतरण, प्रकाश, प्रथम दैवी प्रकटन | तजल्लिए सानी = द्वितीय अवतरण, प्रकाश, द्वितीय दैवी प्रकटन |
| ग़ैब–उल–गयूब = परोक्षाचे परोक्ष | हक़ीक़त–ए–मुहम्मदिया=मुहम्मदीय वास्तव | हक़ीक़त–ए–इन्सानी = मानवी वास्तव |
| अज़ल–उल–आज़ाल = अनादि अनाद्य | वहदतल हक़ीक़िया = वास्तवाचे एकत्त्व | हज़रत अुलुवहियत = सर्वोच्च दृष्टिपात स्तर; तदत्त्व स्तर |
| ऐन–ए–काफ़ूर = कर्पूरसारखाच, मेणासारखाच, अस्तित्वशून्यता | इल्म–ए–मुतलक़ = निरपेक्ष ज्ञान | हज़रत अल अस्मावल सिफ़ात = नाम–रूप–स्तर |
| मनक़ता–अुल–वज्दानी = सहजानंदी प्रखंडन | अलतक़ाविलयत अल् अूला = सर्वप्रथम शक्ती–क्षमता | मुंतही–उल–आलमीन = द्विलोक अंत्य–सीमा (लक्ष्मणरेषा) |
| मनक़ता–उल–इशारात = संकेत प्रखंडन | अहदिय्युत अल्–जमा =एकत्त्वता अभेद | वजूद–ए–इज़ाफ़ी = वर्धित अस्तित्व |
| मजहूल–उल–नात = सिद्ध – गुणधर्म, शैथिल्य | वजूद–ए–मुतलक़ = निरपेक्ष अस्तित्व | मंशाए सिवा = संकल्प विहीनता |
| अलग़ैब–उल–मसकूत अन: = गुह्य मौन | मर्तब–ए–विलायत–ए–मुतलक़ा = निरपेक्ष संतत्त्व श्रेणी | अहदिय्युतअल–कसरत = अनेकतेमध्ये एकत्व (एकता) |
| ज़ात–ए–साज़िज़ = निर्भेळ सत्ता | हिजाव–ए–अज़्मत = सिद्धीचे पटल, महात्म्य पटल | वजूद–ए–इज़ाफ़ी = वर्धित अस्तित्व; |
| ज़ात–ए–बुहत = केवल सत्ता | मक़ाम–ए–औअदना = निकटतम स्थळ, निकटस्थता, समीपता | मंशाए सिवा = संकल्प विहीनता कारण विहीनता |
| ज़ात बिला एतबार = प्रचीतीविहीन सत्ता | अल–मुहब्बत–अल–हक़ीक़तिया = वास्तवतेची रती, प्रेम | फ़लक–उल–हैवात=जीव–आकाश किंवा क़ाबलियत–ए–ज़हूर = सृष्टीक्षमता |
| मर्तबल अल–हूय्यत = तदत्त्व श्रेणी | राब्त–ए–बैनुलज़हूर व अल–बतून = अंतर्बाह्य आंतर–स्वरूप संपर्क<br>बर्ज़ख़ अल बरा ज़ख़ = बांधांचे बांध स्व–र्लोकांचे स्व–र्लोक | नफ़्स–ए–रहमानी = कृपावंत आत्मा<br>आलम–ए–जबरूत = आत्म्यांचे जग<br>मादन अल–कसरत = अनेकतेची खाण<br>बर्ज़ख़–ए–कुब्रा = महान मध्यगा<br>मंशाए कसरत = अनेकतेचा हेतू अनेकत्व उन्मुखता<br>अमा = गहन तिमिर, ब्रह्मगुफा<br>हज़रत जमा अल–वजूद = अस्तित्व समष्टि स्तर<br>मुंतही अल–आबिदीन = उपासकांची पराकोटी, तपस्व्यांची पराकाष्ठा |

दैवी प्रकटनपूर्व श्रेणीशी जुळणारे पारिभाषिक शब्दांचे सविस्तर स्पष्टीकरण याप्रमाणे आहे -

**संच -१**

**ला ताय्युन : तन्मात्राविहीन -** सत्तेमध्ये येथे कुठल्याच तन्मात्रेची संभावना नाही - न नामात्मक न क्रियात्मक (अल्लाह-परब्रह्म) तो एकच आहे. तो सत्य स्वरूप, सर्वांचा स्रष्टा, परम समर्थ, निर्भय, निर्वैर अजन्मा, स्वयंभू आणि कालातीत अस्तित्वयुक्त आहे. तो भूत, वर्तमान आणि भविष्य तीन्ही काळांमध्ये केवळ सत्य स्वरूपामध्ये राहणारा आहे. त्याच्या सत्तेवाचून असे कोणतेच स्थान नाही. सत्य स्वरूपामध्ये तो निश्चितपणे 'आहे' एवढेच सांगितले जाऊ शकते आणि या व्यतिरिक्त त्याला 'केवल', 'नित्य', 'पूर्ण', 'एकरस' किंवा 'सर्वव्यापी' असे दर्शवणे पण त्याच्या परिचयाची व्याख्या करून त्याला अधिक स्पष्ट करणे आहे एवढेच.

**ग़ैब-ए-हूय्यत : तदत्त्व परोक्ष :** 'हूय्यत' (तदत्त्व) विशुद्ध सत्तेस म्हणतात. यामध्ये नाम-रीति, आणि गुण व गुणधर्म यांचा हस्तक्षेप नसतो. 'ग़ैब' (परोक्ष) यासाठी आहे की या श्रेणीमध्ये सत्तेचा बोध किंवा जाणीव अशक्य आहे.

**ग़ैब-उल्-ग़यूब : परोक्षाचे परोक्ष :** ही श्रेणी समस्त बुद्धिगम्य प्रचीतीपेक्षा उच्चतर आहे.

**अज़ल-उल्-आज़ाल : अनादी अनाद्य :** ही समस्त पुरातन अनादी श्रेणींची चरमसीमा आहे. यापेक्षा उच्चतर अशी कोणतीच श्रेणी नाही.

**ऐन-ए-काफ़ूर : कर्पूरसारखाच ऐन :** ऐन मेणासारखा- वितळण्याच्या गुणधर्मामुळे कापूरामध्ये मिसळलेली वस्तू ही कापूरामध्येच एकजीव होऊन कापूर बनून जाते. या श्रेणीमध्येसुद्धा असेच घडते. ही अस्तित्वशून्यता होय. ही परोक्ष सत्ता होय.

**मनक़ता-उल्-वज्दानी : सहजानंदी प्रखंडन :** येथे न सत्तात्मक सहजानंद आहे न गुणात्मक. काही ठिकाणी याला 'मनक़ता-उल-वहदानी'पण म्हटले - जाते. याचा अभिप्राय हा आहे की प्रथम तन्मात्रा म्हणजेच 'वहदत' एकता येथे खंडित होऊन जाते.

**मनक़ता-उल्-इशारत : संकेत प्रखंडन :** येथे संपूर्ण विभेद वा पदानुक्रम समाप्त होतात आणि कोणत्याच प्रकारच्या संकेताची येथे गुंजाइश नसते- संकेतास वाव नसतो.

**मजहूल-उल्-नात : सिद्ध गुणधर्म-शैथिल्य :** 'नात' म्हणतात सिद्ध गुणधर्मास, आणि येथे सिद्ध गुण अथवा कोणत्याच प्रकारची शाब्दिक वा नामात्मक संभावना अजिबात (मुळीच) नाही.

**अलग़ैब-उल् मसकूत अन: = गुह्य मौन -** मौन वाणी अथवा वाचेचा विलोम (शब्द) आहे. आणि वाणी निर्भर आहे नाम व गुणधर्मावर आणि येथे न नामास प्रवेश आहे, न गुणधर्मास, न वाणीस. मौनाशिवाय येथे दुसरा उपायच नाही.

**ज़ात-ए-साज़िज : निर्भेळ सत्ता :** 'साज़िज' हा विशुद्ध या अर्थी अरबी भाषेमध्ये प्रचलित असा शब्द आहे. येथे सत्तेमध्ये कोणतीच वस्तू समाविष्ट नाही.

**ज़ात-ए-बुहत : केवल सत्ता :** 'बुहत' म्हणजे केवल, मात्र. येथे सत्ता ही नाम व रीति तसेच गुण व गुणधर्म (यांच्या मिश्रणा)पासून शुद्ध आहे.

**ज़ात बिला एतबार : प्रचीतीविहीन सत्ता :** येथे समस्त प्रचीती आणि सापेक्षता विलुप्त आहेत.

**मर्तबए अल-हूय्यत : तदत्त्व श्रेणी :** केवल सत्ता, 'तो' स्वरूपामध्ये. म्हणजेच आपल्या सत्तत्वामध्ये परिपूर्ण असलेली सत्ता.

**संच २**

**ताय्युन-ए-अव्वल : प्रथम तन्मात्रा :** उपरोक्त आकृती क्रमांक तीनचे निरीक्षण केल्यास असे आढळून येईल की तन्मात्रा वा अवतरण (प्रकटन) वा प्रकाशन एक वर्तुळाकृती स्वरूपामध्ये विद्यमान आहे. या वर्तुळामध्ये दोन कंस आणि एक मध्यरेषा समाविष्ट आहेत. ही मध्यरेषा दोन्ही कंसांच्या दरम्यान एक मध्यगा आहे. वरचे कंस 'अहदियतचे' आहे आणि याचा संकेत निरपेक्षतेकडे आहे. खालचे कंस 'वहिदियतचे' आहे. येथे सत्तेची चेतना ही, नाम-रूपांच्या समष्टिगत स्वरूपामध्ये अहम् (ची) अवस्था ग्रहण करते. मध्यरेषा ही 'वहदत' आहे. ही मध्यगा आहे, 'अहदियत' आणि 'वाहिदियत'च्या दरम्यान. म्हणजेच ती दोहोंसाठी समाईक आहे आणि दोघांना एकदुसऱ्यापासून वेगळे करणारी आहे. संक्षिप्तपणे नाम-रूपांच्या अहम् अवस्थेमध्ये सत्तेची चेतना आढळते. मध्यरेषा ही 'वहदत' (एकता) आहे. ही 'अहदियत' (एकत्त्वता) आणि 'वाहिदियत' (एकमेकता) यांच्या दरम्यानची मध्यगा आहे. म्हणजेच दोघांना समाईक आहे आणि दोघांना परस्पर वेगळे ठेवते. उपरोक्त आकृती क्र. तीनमध्ये वरचे कंस 'अहदियत' आहे. म्हणजेच आधिक्याविहीन श्रेष्ठ सत्तात्मक (नामात्मक) वहदत, तदत्त्व परोक्ष, केवल सत्ता, पदार्थाच्या रूपविहीनतेसह, 'वजूद' (अस्तित्व) येथे सर्व बंधनांपासून मुक्त असते. इतके की ते निरपेक्षतेच्या बंधनापासून पण निरपेक्ष आणि क्षेत्ररहीत असते. (वेष्टणरहित असते) जणू की या वर्तुळामध्ये येऊन परोक्ष ज्ञात्याच्या अर्थात परमेश्वराच्या तदत्त्वाने आपले एकांतवास सोडून प्रथम अवतरण बंधनमुक्ततेमध्ये आविष्करण केले. बंधनमुक्ततेमध्ये अवतरित होण्याचा अभिप्राय हा आहे की सृष्टीनिर्मिती क्रमामध्ये विवेकाने सत्तेशी निगडित जो बोध प्राप्त केला आणि तिला जी सर्वप्रथम प्रचीती झाली – हे सर्व बंधनमुक्ततेमध्ये घडले. या बंधनमुक्ततेचा अभिप्राय खरोखर सापेक्षशून्यता असा नव्हे, तर बंधनांची प्रचीती नसणे किंवा तिचा अभाव असा आहे. येथे अप्रकटतेमधून प्रकट होण्याचा आदेश समाविष्ट आहे, कारण की या श्रेणीमध्ये सर्व काही आहे, मात्र बुद्धिविहीनतेसह संपूर्ण श्रेणींचे प्रकटन हे बंधनमुक्ततेमध्ये येताच वहदतच्या महाभयंकर प्रतापाच्या अधीन विलीन होऊन जाते. वास्तविक समाविष्टतेचा अभाव येथे आदेशमुलक समाविष्टतेमध्ये मिळून मिसळून जातो. अद्वैत आणि द्वैताविषयी तर्कवितर्क करण्यास येथे जागाच उरत नाही. नामाना येथे प्रवेश नाही, कारण की नामांमध्ये ज्ञान आहे, विवेक आहे. रिती येथे यास्तव नाही की रितीमध्ये गुणधर्म आढळतात. गुणधर्म येथे यासाठी नाहीत की गुणधर्म हे गुणांमुळे सार्थक होतात. गुणांचे येथे काय बरे काम? ज्याअर्थी ही श्रेणी अस्तित्व व निरस्तित्वापासून पण सर्वात जास्त अंध:कारमय अशी आहे. वस्तू जेव्हा व्यक्त आणि अव्यक्त प्रकट आणि अप्रकटच्या विभाजनाधीन असेल अशाच अवस्थेमध्ये वस्तू गुण धारण करते. आणि येथे तर कुठल्याच हस्तक्षेपाची पोहोच नाही. व्यक्त आणि अव्यक्ताचे विभाजन येथे कसे बरे होऊ शकेल, जेव्हा बहिरंगामध्ये अनेकता आहे आणि अंतरंगामध्ये एकता, आणि येथे अनेकता व एकतेमधील फरकच समाप्त होतो. अनेकता व एकता हे तर आवश्यकता व शक्यतेच्या निश्चिततेवर अवलंबून असतात.

आणि आवश्यकता व शक्यता यामधील फरकास येथे वावच नाही, परंतु त्याची फक्त एक बौद्धिक आणि गुह्य प्रचीती आहे. आवश्यकतेची प्राथमिकता – याची जरुरी आहे आणि जरुरी आहे शक्यतेचा शेवट. आणि हे सर्व विलुप्त आहेत. आणि सर्व तौलनिक प्रचीती येथून नाहीशा झाल्या आहेत. या प्रचीतींची शंका किंवा भ्रम पण दोषास्पद नाही. हे सत्तेचे परोक्ष आहे. याचे नामाभिधान 'अहदिय्युत' असे आहे. तदत्त्व परोक्षाचा एकांतसाक्षी हा आपल्या सत्तेपासून आपल्या सत्तेवर प्रकट होतो. याला ''हुज़ुरूश्शय लिनफ़्सिहि मआ तजर्रुदिहि'' असे म्हणतात. हा मानवी विवेका(बुद्धी)पासून फार अतीत आहे. म्हणजेच अगम्य आहे.

बंधनमुक्त झाल्यानंतर जे प्रथम बोध किंवा ज्ञान होते आणि जे मुक्त तदत्त्वाशी फार जवळचे असते ते 'वहदत' आहे. याच्याशी निगडित 'वाहिदियत'चे कंस आहे. अहदियत गुप्त आहे, तर वाहिदियत प्रकट आहे. जे काही अहदियतमध्ये गुप्त होते ते वाहिदियतमध्ये समष्टि रूपाने व्यक्त झाले. अहदियतमध्ये सत्तेची प्रचीती आहे, आणि वाहिदियतमध्ये गुणांसह सत्तेची प्रचीती. सत्ता अप्रकट आहे, तर गुण प्रकट आहेत. वहदतमध्ये अहदियत आणि वाहिदियत दोन्ही समाविष्ट आहेत. हे एका परीने अहदियतशी निगडित आहे तर दुसऱ्या परीने वाहिदियतशी. यामध्ये सत्ता व गुण आणि प्रकट व अप्रकट दोन्ही समाविष्ट आहेत. ही दोहोंची समष्टी आणि दोहोंच्या दरम्यान विभाजक सीमा आहे. दोहोंमध्ये भेदनिदर्शक आहे आणि दोघांना एकत्रित करते, मात्र संमिश्रित – भेसळ होऊ देत नाही. अहदियत आणि वाहिदियत या दोहोंचे प्रकटन वहदतमुळे झाले आहे. जसे प्रेमाच्या क्षेत्रात प्रियकराचा संबंध हा प्रेयसीशी असतो, तशाच प्रकारचा संबंध या दोहोंमध्ये आहे. अथवा ज्ञानाच्या क्षेत्रात ज्ञाता (म्हणजेच ज्ञानी) आणि ज्ञात यांच्या दरम्यान असते त्याप्रमाणे. वहदत व अहदित आणि वाहिदियत यांच्या दरम्यान असलेल्या संबंधाच्या ज्ञानासह सत्तेच्या श्रेणीमध्ये एकत्रित आहेत. 'हुवलकुल' म्हणजेच तोच सर्वेसर्वा आहे. परंतु अनुमिती वा गणना किंवा इतर ओळखीच्या प्रचितीचा तेथे अभाव आहे. वहदतमध्ये येऊन प्रचीतीची ओळख निर्माण होते. या ओळखीच्या अनुषंगाने वहदत हीच प्रथम तन्मात्रा आहे. उपरोक्त आकृती क्रमांक तीनचे वर्तुळ हे 'वहदत'चे स्पष्टीकरण आहे. वरचे आणि खालचे दोन्ही कंस 'वहदत'च्या दोन्ही दिशा आहेत. वहदतपण दोन बाजू आणि एक मध्यस्थता याची समष्टी आहे. यात दोन्ही पक्ष समाविष्ट आहेत. त्या पक्षांचे अद्वैत पण आहे, जणू काही संपूर्ण वर्तुळ 'वहदत' आहे. यालाच 'मुहम्मदीय स्थळ' म्हणतात. हाच आहे मुहम्मदसाहेब यांच्या आत्म्याचा हेतू.

'फ़कान क़ाब क़ौसैनि औ अदना' म्हणजेच ''त्यामुळे तो (जणू काही) दोन धनुष्यांची एक दोरी (असल्याप्रमाणे) जवळ किंवा त्यापेक्षाही जवळ आला.'' ५३:९ या श्लोकामध्ये प्रेषित मुहम्मद यांचा ईश्वरसान्निध्याचा संदर्भ आहे. 'क़ाब क़ौसैनि' एकत्रित येण्याचे ते ठिकाण (स्थान) आहे की जेथून अहदियत आणि वाहिदियतच्या कंसामध्ये अंतर (फरक) निर्माण होते. हे संगम-स्थळ आहे प्रेषित मुहम्मद यांची निर्विकल्प समाधी (फ़नाफ़िल्लाह). पूर्वी घडलेली उत्कर्ष-यात्रा म्हणजेच दिव्यारोहण, (प्रभू) दर्शन आणि आत्म-विस्मृतीचे अंतर दूर होताक्षणीच परमेश्वरी तेजाच्या-प्रतापाच्या अनुषंगाने सत्तेचा प्रकाश एकवटला आणि त्यांना निर्विकल्प समाधी लागली (फ़नाफ़िल्लाह साध्य झाले) 'औ अदना' म्हणजेच 'त्याच्यापेक्षाही जवळ' अर्थात अति-निकटचा संकेत तिच्याकडे आहे.

सूफ़ी पारिभाषिक अन्वयार्थानुसार 'क़ाब कौसेनि'चा आशय प्रभू आदेशामध्ये नामांचा परस्पर संवाद साधणे असे आहे. याला 'दायर ए वजूद' अर्थात अस्तित्वाचे वर्तुळ पण म्हणतात. परस्पर संवाद म्हणजे प्रारंभ, हर्ष आणि अवतरण व उत्कर्ष आणि कर्तृत्व व योग्यता, असाही अन्वय आहे. हे पृथकतेचे भान ठेवून परमेश्वराशी ऐक्य साधणे आहे. 'वहदत'चा निषेध 'औ अदना'ची श्रेणी आहे, तर होकाराच्या अनुषंगाने 'काब कौसेनि'ची श्रेणी आहे.

'वहदत'ची प्रकट होण्याची दिशा अर्थात वाहिदियतमध्ये जी समष्टिगत ओळख आहे ती या चार प्रचितींनीयुक्त आहे–

१) वजूद (अस्तित्व, सत्ता), २) इल्म (ज्ञान), ३) नूर (प्रकाश) आणि ४) शहूद (अभिव्यक्ती).

जेव्हा परमेश्वर स्वत:ला न्याहाळतो (दृष्टिक्षेप टाकतो) तेव्हा हाच नूर (प्रकाश) आहे. किंवा तो जेव्हा आपल्या सौंदर्यास स्वत:साठीच पाहतो तेव्हा त्याला नूर (प्रकाश) असे म्हणतात. स्वत:स प्राप्त करून घेणेच वजूद (अस्तित्व) आहे. आपल्या अहंकारासमेत उपस्थित होणेच शहूद (अभिव्यक्ती) आहे आणि या सर्वांना ओळखणे म्हणजे इल्म (ज्ञान) आहे.

सर्वश्रेष्ठ परमेश्वराने तदत्त्व परोक्षापासून प्रथम तन्मात्रा म्हणजेच वहदतमध्ये स्वत:वरच आपला प्रकाश पसरवला, हे ज्ञान आहे. आपल्यावर कटाक्ष टाकले. हा प्रकाश आहे. स्वत:स पाहिले. हे अस्तित्व आहे. स्वत:सह आपण उपस्थित झाला. ही अभिव्यक्ती आहे. येथे असा गैरसमज करून घेऊ नये की हे ज्ञान व हा प्रकाश व हे अस्तित्व व ही अभिव्यक्ती प्रथम नव्हते, नंतर निर्माण झाले कारण की या अनादीच्या श्रेणी आहेत. या नूतन नवनिर्मित भौतिक नाहीत. सर्वश्रेष्ठ पवित्र परमेश्वर हा नवनिर्माणापासून अलिप्त आहे. त्याच्या ज्ञानापूर्वी अज्ञान नव्हते. त्याच्या प्रकाशापूर्वी लुप्तता नव्हती. त्याच्या अस्तित्वावर अभाव आणि त्याच्या अभिव्यक्तीवर परोक्ष किंवा अनुपस्थितीस प्राधान्य नव्हते. येथे तर चर्चा प्रचीती संबंधी आहे. कोठे सत्तेच्या पराकाष्ठेची प्रचीती आहे, तर कोठे नामात्मक पराकाष्ठेची समष्टिगत प्रचीती आहे. तर कुठे नामात्मक पराकाष्ठेची सविस्तर प्रचीती आहे. नाही तर जे काही द्वितीय तन्मात्रेमध्ये आहे ते सर्वप्रथम तन्मात्रेमध्ये आढळतात. आणि जे काही प्रथम तन्मात्रेमध्ये आहे ते सर्व निरपेक्ष सत्तेमध्ये आहे. सत्ता आणि नामांमध्ये परकेपणा नाही. सत्तेची पराकाष्ठेची चकाकी असलेली 'वहदत'चे प्रभुत्व जेव्हा असेल तेव्हा तपशील अनिवार्यपणे अप्रकट होऊन जाईल, कारण तपशील अनेकतेची गरजवंत असते. या चर्चेत अज्ञान अनावश्यक आहे.

**ताय्युन–ए–अव्वल : प्रथम तन्मात्रा :** हिला तजल्लि ए अव्वल – प्रथम अवतरण, दैवी प्रकटन या आधारावर म्हणतात की हे 'वजूद' अर्थात अस्तित्वाची सर्वप्रथम अभिव्यक्ती आहे.

**हक़ीक़त–ए–मुहम्मदिया : मुहम्मदीय वास्तव** पण या दृष्टीने म्हणतात की हे स्थळ तजल्लिए अव्वल म्हणजेच प्रथम अवतरण वा प्रथम दैवी प्रकटन धारण करणारे आहे.

**वहदतल हक़ीक़िय :** अर्थात **वास्तवाचे एकत्व** या नामाभिधानाचे कारण वर स्पष्ट करण्यात आलेले आहे.

**इल्म–ए–मुतलक** म्हणजेच **निरपेक्ष ज्ञान** यासाठी म्हणतात की सत्तेची चेतना आणि सत्तेचा उत्कोच येथे सत्तेच्या ज्ञानाच्या अनुषंगाने आहे. नाम–रूपे अणि ऐन संभावना यांच्या प्रतीचीविना. या श्रेणीमध्ये चेतना आणि उत्कोच निरपेक्ष आणि समष्टिगत स्वरूपात आढळतात. याउलट नंतरच्या श्रेणीमध्ये विविध नामे सविस्तरपणे दिसून येतात. अतिरिक्त बंधन मुक्तीच्या दृष्टीने एक दुसरी बंधन मुक्ती आहे, जी नाम–रूपांच्या बंधनांपासून निरपेक्ष आहे. या श्रेणीस वजूद–ए–मुतलक़ अर्थात निरपेक्ष अस्तित्व पण म्हणतात.

**अलक़ाबलियत–ए–अूला :** अर्थात **सर्वप्रथम क्षमता–शक्ती** ही या अर्थी आहे की ही श्रेणी समस्त क्षमतेची एक निष्केवल – अमिश्रित अवस्था आहे. हिची निर्मिती सर्वप्रथम झाली. हे समस्त क्षमतांचे द्रव्य आणि मूलकारण आहे.

**अहदिय्युत अल्–जमा : एकतत्त्वता अभेद :** कारण की अहम अवस्था स्वरूप सत्तेची प्रचीती आहे. या श्रेणीमध्ये प्रचीतीविहीन निघून जाणारे गुण आणि टिकणारे गुण पण आहेत आणि शिवाय वाहिदियत म्हणजेच गुणांची समष्टिगत प्रचीती पण यामध्ये समाविष्ट आहे.

**मर्तब–ए–विलायत–ए–मुतलका : निरपेक्ष संतत्त्व श्रेणी :** या श्रेणीवर निरपेक्ष संतत्त्वाचा दारोमदार आहे आणि संतत्त्वाची कोणतीच श्रेणी निरपेक्ष संतत्त्वापेक्षा उच्चतर नाही. आणि विलायत–ए–मुतलक़ा म्हणतात. विलायत–ए–मुहम्मद स. यास आणि त्यांच्या संपूर्ण अनुसरणामुळे संतत्त्व परिसमाप्ती संतांना (विलायत–ए–ख़ातिम–ए–औलिया) म्हणतात.

**हिजाब–ए–अज़्मत : सिद्धिचे पटल :** हे या आधारावर आहे की प्रेषित मुहम्मद स. शिवाय कोणीच या अवस्थेपर्यंत पोहोचू शकत नाही.

**मक़ाम–ए–औ अदना : निकटतम स्थळ :** याची कारणमीमांसा वर दिलेली आहेच. येथे मध्यगाचे उंचावणे पण आहे.

**अल–मुहब्बत–अल–हक़ीक़तिया = वास्तवतेची रती, प्रेम :** हे स्थळ दैवी प्रेमाचे आहे. ''मी एक गुप्त कोश होतो...'' या उक्तीप्रमाणे येथे प्रेमाचे प्रकटीकरण आणि मानवावर दया व कृपा उदयास आले. गुप्त धन (गंज–ए–मख़फ़ी) ते एकत्त्वतेचे तदत्त्व आहे, जे अव्यक्तामध्ये लपलेले असल्याकारणाने गुह्यतम स्थळ आहे. प्रथम तन्मात्रामध्ये प्रेम प्रकटीकरणाची प्रथम अभिव्यक्ती आहे आणि म्हणून ही श्रेणी दैवी प्रेम स्थळाची आहे.

**राब्त–ए–बैनुल ज़हूर व अल–बतून : अंतर्बाह्य आंतर–स्वरूप संपर्क :** उपरोक्त सविस्तर विवेचनामध्ये याचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

**बर्ज़ख़ अल बराज़ख़ व बर्ज़ख़–ए–कुब्रा : बांधांचे बांध व बृहत् बांध :** याला बृहत बांध यासाठी म्हणतात की सर्वश्रेष्ठ परमेश्वर आणि सर्व बांधांच्या दरम्यान हा बांध स्थित आहे.

ताय्युन–ए–अव्वल अर्थात प्रथम तन्मात्राला वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळ्या स्वरूपांमध्ये उपरोक्त पारिभाषिक शब्दांव्यतिरिक्त अन्य पारिभाषिक शब्दांनी पण ओळखतात. जसे, अक़्ल–ए–कुल (विश्वज्ञान, निरपेक्ष विवेक), क़लम–ए–आज़म (महान लेखणी), रूह–ए–आज़म (महान आत्मा), उम्मुल किताब (ग्रंथ–मातृका) इत्यादी. सूफ़ींच्या लिखाणांमध्ये प्रतिकूलता आणि दोष (अशुद्धी) आढळत नाहीत. प्रत्युत त्यांची ही

सूक्ष्मदृष्टी आहे की ते एकाच गोष्टीचे विभिन्न पैलूंना वेगवेगळ्या तऱ्हेने व्यक्त करत राहतात. यास्तव इतरेजनांना व अनभिज्ञ लोकांना मतभेदाचा भ्रम होतो.

**पूर्वोक्त खुलाशाचे सार**

ब्रह्मांड वा विश्व परमेश्वराच्या सामर्थ्याची फलनिष्पत्ती आहे. परमेश्वराचेच सामर्थ्य, परमेश्वराचीच पराकाष्ठा आणि परमेश्वराचेच बुद्धिचातुर्य ब्रह्मांडाच्या या आरशामध्ये प्रतिबिंबित आहेत. दुसऱ्या शब्दांमध्ये परमेश्वराचीच सत्ता व गुण दिसून येतात. सूफ़ीवादाच्या भाषेमध्ये असे म्हणतात की सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा ब्रह्मांडामध्ये अवतरित झाला. 'अवतरण' हा शब्द एक पारिभाषिक शब्द आहे, ज्याच्यामध्ये या प्रकटीकरणाचे विवेचन केले जाते. या 'अवतरणा'मुळे काहीच परिवर्तन घडून येत नाही. कारण अल्लाह पूर्वी जसा होता तसाच आजपण आहे. त्याच्यामध्ये मुळीच बदल होत नाही. तुम्ही आपला चेहरा जेव्हा आरशासमोर आणता तेव्हा तुमचा चेहरा सूफ़ीवादाच्या भाषेमध्ये त्या आरशामध्ये 'अवतरित' होतो. या अवतरणामुळे तुमचा चेहरा आपल्या ठिकाणाहून ना सरकतो ना त्याच्यामध्ये कुठल्याही प्रकारचा बदल घडून येतो. परंतु तो जसा होता तसाच राहातो. आरशावर जरी धूळ टाकली तरी तुमच्या मूळ चेहऱ्यावर त्याचा काहीच परिणाम होणार नाही. आरशास फोडून तुकडे केले तरी तुमचा मूळ चेहरा बदलत नाही. आरसा आणि आरशातील चेहऱ्याचा तुमच्यावर काहीच परिणाम होत नाही, यद्यपि आरशामधील चेहरा आपले अस्तित्व आणि स्थैर्य यासाठी सर्वस्वी तुमच्या आणि तुमच्याचवर अवलंबून आहे. तुमचा चेहरा आपल्याच जागी स्वतंत्रपणे कायम आहे आणि आरशामध्ये पण बंदिस्त आहे. आरशामधील चेहरा ना तुमचा आपला (स्वतःचा) आहे ना परका आणि दुसऱ्या परीने आपला पण आहे आणि परका पण. दोहोंमध्ये द्वैत असते तर तुमचा चेहरा समोरून बाजूला केल्यानंतर आरशामधील चेहऱ्यामध्ये काहीच बदल घडला नसता, परंतु तो बदस्तूर कायम राहता. परंतु असे होत नाही. जर दोहोंमध्ये अद्वैत असते तर आरशाचे फुटणे आणि त्याच्यामधील तुमच्या चेहऱ्याचे अंतर्धान होण्याचा परिणाम तुमच्या चेहऱ्यावर पण झाला असता. परंतु असेही होत नाही. जर या दृष्टीने पाहिले तर जोपर्यंत तुमचा चेहरा उपस्थित आहे तोपर्यंत तो आरशामध्ये सुद्धा दिसतो. आणि जर तुमचा चेहराच आरशासमोरून बाजूला हटेल तर आरशाचे मैदान साफ आहे. जणू आरशामधील चेहरा तुमचाच चेहरा आहे. तर या दृष्टीने दोहोंमध्ये अद्वैत आहे आणि जर ही गोष्ट लक्षात घेतली गेली तर कुठे ना कुठे तो हा मूळ (चेहरा) तर तो त्याची पडछाया. हा सजीव तो निर्जीव. हा निरपेक्ष तो सापेक्ष. हा आत्मनिर्भर तर तो परावलंबी. तर या दृष्टीने या दोहोंमध्ये द्वैत आहे.

ब्रह्मांडाच्या आरशामध्ये अस्तित्वाने तन्मात्राविहीन (तन्मात्राशून्य) श्रेणीपासून प्रथम अवतरण निरपेक्षतेमध्ये दाखवले आणि या निरपेक्षतेचे संकेत 'वहदत'पासून दिले. सत्तेमध्ये गुण अव्यक्त स्वरूपात होते. 'वहदत'मध्ये सत्ता विलुप्त झाली आणि गुण समष्टिगतरीत्या प्रकट झाले. म्हणजे 'वहदत'मध्ये व्यक्त आणि अव्यक्त दोन्ही समाविष्ट आहेत. 'अहदिय्युत' अंतरंग आहे. 'वाहिदियत' बहिरंग आणि 'वहदत' दोहोंच्या दरम्यान समावेशक आणि विभेदक असा बांध आहे. 'अहदिय्युत' हे सत्ता इंगित करते, आणि 'वाहिदियत'पासून गुणांच्या बौद्धिक समष्टिगत अभिव्यक्तीकडे संकेत आहे. 'ताय्युन-ए-अव्वल' वा 'तनज़्ज़ुल-ए-अव्वल' वा 'तजल्लिए अव्वल'मध्ये 'अहदिय्युत', 'वहदत' आणि 'वाहिदिय्यत' या तीन्हींचा


समावेश आहे. आशय हा की या 'तजल्ली' म्हणजेच प्रकटीकरणापासून भेददर्शक सार आहे. येथे ज्ञानाच्या दृष्टीने सत्तेच्या पराकाष्ठेचा उदय आहे आणि साररूपात नामात्मक पराकाष्ठेचा पण.

### ताय्युन-ए-सानी : द्वितीय तन्मात्राची गरज

समष्टिगत प्रकटन नामात्मक पराकाष्ठेच्या परिपूर्ण अभिव्यक्तीसाठी पुरेसे नव्हते. आवश्यकता या गोष्टीची होती की प्रथम नामांच्या अनुषंगाने विश्व व आदमबरोबर बौद्धिक आणि ज्ञानात्मकदृष्ट्या संपूर्णपणे माहीत झाले पाहिजेत. मग नाम-रूपांची अभिव्यक्ती त्यांचा प्रभाव व दृश्य स्वरूपामध्ये सविस्तरपणे डोळ्यांसमोर बाह्य स्वरूपात व्यक्त झाले पाहिजेत. कारण की वास्तवांची ओळख आणि नामांचा आपसात एक दुसऱ्याशी प्राधान्य आणि संक्षिप्त व सविस्तर पराकाष्ठेची व्यक्तिशः अभिव्यक्ती, आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने प्रकटनावर द्वैताचा आदेश, जोपर्यंत या सर्व बाबींची सविस्तर माहिती हाती लागत नाही तोपर्यंत सत्ता, नाम व रूपे यांची सविस्तर अभिव्यक्ती अशक्य आहे. म्हणून सविस्तर अवतरणासाठी तजल्लिए सानी म्हणजेच द्वितीय अवतरण, दैवी प्रकटन याची गरज भासली.

तजल्लिए अव्वल अर्थात प्रथम अवतरणाच्या सारचा तपशील तजल्लिए सानी अर्थात द्वितीय अवतरणामध्ये अशाप्रकारे व्यक्त झाले की प्रथम विश्वाच्या घटकांमध्ये नाम-रूपांचे प्रभाव सविस्तरपणे व्यक्त झाले. मग या तपशिलांचा सार आदममध्ये झाला. या तपशील आणि सारनंतरच्या तपशिलीमुळे तजल्लिए सानी अर्थात द्वितीय अवतरण परिपूर्ण अवस्थेत पोहोचले आणि सत्तेच्या पराकाष्ठेची अभिव्यक्ती मोठ्या दिमाखाने आंतरबाह्य स्वरूपात प्रकटली.

**द्वितीय तन्मात्राचे वृत्त**




**आकृती ४**

### द्वितीय तन्मात्रा – सविस्तर विवेचन

जे काही प्रथम तन्मात्रामध्ये होते तेच द्वितीय तन्मात्रामध्ये आहे. फक्त सार व तपशील आणि अंतरंग व बहिरंगचा फरक आहे. सारमध्ये विस्तार दडलेला असतो, हा व्यापक नियम आहे. मानव आपल्या शक्तीच्या बळावर आपल्या आतील श्वासास बाहेर काढतो. तेव्हा जे काही त्याच्या आतमध्ये असते तेच बाहेर निघते. आत श्वास लपलेले होते. बाहेर येऊन प्रकट झाले. ते सारांशाच्या पिटाऱ्यामध्ये बंदिस्त होते. बाहेर येऊन तिने प्रसरण आणि विस्तार ग्रहण केले. अशाच प्रकारे प्रथम तन्मात्रेने जेव्हा श्वास बाहेर सोडले तेव्हा द्वितीय तन्मात्रा उदयास आली. याच आधारे द्वितीय तन्मात्रा 'तजल्लिए नफ़्सी' (वास्तविक वा आत्मिक प्रकाश), 'तजलिए ज़हूरी' (बाह्य प्रकटन), 'नफ़्स-ए-रहमानी' (दैवी आत्मा) आणि 'ज़हूरून्नफ़्स' (वासना प्रकटन) इत्यादी नावांनिशी नामाभिधान ग्रहण करते. ज्याअर्थी हे 'तज्जलिए नफ़्सी' (वासनिक प्रकटन) आहे, जिच्यामध्ये सजीवाच्याच आतमधील वस्तू बाहेर येते आणि फैलावते त्याअर्थी अंतत: विवशतापूर्वक हे प्रकटन पण 'तजल्लिए अव्वल' (प्रथम अवतरण)च्याच स्वरूपात वर्तुळाकृतीमध्ये व्यक्त होते. यामध्ये दोन कंस आणि एक मध्यगा समाविष्ट आहे. 'तजल्लिए अव्वल' (प्रथम अवतरण)मध्ये अहदिय्युत, वाहिदिय्यत आणि बर्ज़ख़ (मध्यगा) आहे. 'तज्जलिए सानी' (द्वितीय अवतरण)मध्ये वहदत, कसरत आणि बर्ज़ख़ आहे. तेथील अहदिय्युत सदृश येथे वहदत आहे, वाहिदिय्यत सदृश कसरत (अनेकता) आहे आणि बर्ज़ख़ सदृश बर्ज़ख़ आहे. ते बर्ज़ख़ 'हक़ीक़त-ए-मुहम्मदिया' (मुहम्मदीय वास्तव) आहे, आणि हा 'बर्ज़ख़' 'हक़ीक़त-ए-आदम' (आदमचे वास्तव) आहे. याला 'हक़ीक़त-ए-इन्सानी' पण म्हणतात. 'द्वितीय तन्मात्रा'चा नकाशा उपरोक्त आकृती ४ मध्ये पाहाता येईल.

### प्रकट व अप्रकट, आदी व अंत

या तन्मात्रामध्ये 'ग़ैब-ए-हूय्यत' (तदत्त्व परोक्ष) म्हणजेच 'मर्तबए ज़ात' अर्थात सत्तेची श्रेणी पासून सजीवाचे अंतरंग प्रकट झाले आणि जे काही लपलेले होते ते प्रकट झाले. आत असताना भेद (फरक) नव्हता. त्याचे उदय झाल्यावर प्रकट व अप्रकट हे शब्द निर्माण झाले. आत अंतरंगाच्या अनुषंगाने प्रथम होता. बहिरंगाच्या अनुषंगाने तो शेवट झाला. बंधनमुक्त अवस्था आणि प्रथम अवतरणामध्ये जे सत्तामूलक विभू वा गुण गुप्त होते ते द्वितीय अवतरणामध्ये येऊन प्रथम दैवी वास्तव व भौतिक वास्तवाचे वैशिष्ट्य ग्रहण केले. तदनंतर मानवामध्ये पोहोचून दैवी आणि भौतिक वास्तवांच्या समष्टीस पुन्हा दाखवले. सविस्तराच्या घटकांमधून प्रत्येक घटक कारण-कार्याच्या सुव्यवस्थित क्रमाने ओलांडत जाऊन नामात्मक कारणावर जाऊन तेथे त्याचा शेवट होतो. ही नामात्मक कारणे गुप्त असल्याकारणाने 'नफ़्स' (वासना) सारखी आहेत. भौतिक वास्तव आणि मानवी वास्तवाची पण अशीच स्थिती आहे की कारण-कार्य-श्रृंखला क्रमाने ओलांडत जाऊन नामात्मक कारणावर पोहोचून समाप्त होतात आणि 'अहदिय्युत'मध्ये जाऊन लुप्त होतात. तेथे सत्तेमध्ये नाम-रूपे गुप्त असतात, तर येथे नाम-रूपांमध्ये सत्ता दडलेली असते.

**वहदतलवजूद (अद्वैतवाद)**

एकच 'वजूद' (अस्तित्व) आहे, जे आतून बाहेर प्रकटले आणि अनेकतेच्या आरशामध्ये व्यक्त झाले. या प्रकट आणि अप्रकटामध्ये ना व्यष्टि-समष्टीचा संबंध आहे ना साधन-साध्याचा, परंतु चेहऱ्याचा आरशातील प्रतिमेशी समोरासमोर असताना जो संबंध आहे, तशा प्रकारचा हा संबंध आहे. मूळ चेहरा अंतरंग आहे आणि आरशामधील त्याची प्रतिमा ही बहिरंग (व्यक्त) आहे. याच आधारावर द्वितीय तन्मात्रास प्रकट अनेकरूपता पण म्हणतात. दृश्याच्या अनेकतेमुळे द्रष्ट्याची अनेकता सिद्ध होत नाही. वहदतलवजूद (अद्वैतवाद) खरोखर परमअस्तित्व (वजूदुलकुल) आहे. द्रव्यसमूहाचे अस्तित्व एकटा (प्रभू) आदेश आहे. परमेश्वराची अभिव्यक्ती समष्टीमध्ये (कुल) आहे. कारण तो 'हुवलकुल' (तो परम परिपूर्ण आहे) आहे आणि हे परिपूर्ण समस्त (कुल) प्रकट आणि अप्रकट यांचा समूह आहे. ''तो आदी, अंत, व्यक्त, अव्यक्त आहे.'' ५७:३ तोच समस्त आहे. या समस्ततेमध्ये 'उपाधी' 'वगैरा' पण समाविष्ट आहे. 'उपाधी'चा संकेत नवनिर्मित जगाशी आहे, तर 'वगैरा'चा संकेत नाम-रूपांशी आहे. तो ना गैर आहे ना ऐन आहे म्हणजेच ते ना परके आहे ना आपले.

**आलम-ए-हादिस (नवनिर्मित जग)**

नवनिर्मित जगाचे दोन प्रकार - १) चेतन २) जड. चेतन जग अव्यक्त आहे. हे एकाकी जग आहे. यामध्ये जडद्रव्य नसते. उदाहरणार्थ, आत्म्याचे जग. अर्थात मानवी वाणीचे अस्तित्व. याचा शरीराशी संबंध असू दे वा नसू दे. आणि विवेक अर्थात निकटस्थ देवदूत आणि आत्मे म्हणजेच आकाशीय देवदूत इत्यादी.

जड जगत प्रकट, व्यक्त आहे. हे देह जगत आहे आणि भौतिक आहे. हे दैवी सिंहासनापासून ते पृथ्वीतलापर्यंत विस्तारलेले आहे. हे दोन्ही म्हणजेच चेतन जगत व जड जगत वास्तव आणि गुणाच्या दृष्टीने समस्त आत्मा जगत आणि देह जगत आहेत आणि द्वितीय तन्मात्रेच्या वृत्तामध्ये व्यक्त केले गेले पाहिजे. हेच दैवी आत्म्याचे अवतरण आहे, आणि तपशील आहे आत्म्याचे जगत् आणि देह जगत्च्या स्वायत्ततेचे. याचा शेवटचा बिंदू मानव आहे. मानव हा समस्त दैवी आणि भौतिक वास्तवांचा समष्टी आहे. इतकेच नव्हे तर 'वहदत'च्या मध्यगेस आपल्यामध्ये सामावून घेतले आहे. म्हणून द्वितीय वृत्त हे समस्त चेतन व जड यांना आपल्यात सामावून घेते आणि समस्त लोक याच्यामध्ये अखंड आहेत. हीच प्रकटची कमाल (पराकाष्ठा) आहे. पवित्र कुराणामध्ये 'रक़्क़िन म्मन्शूरिन'चा आत्म्याच्या हर्षाकडे, आनंदाकडे संकेत आहे, आणि 'किताबिन् म्मस्तूरिन'चा ब्रह्मांडाच्या वास्तवतेच्या सिद्धतेकडे संकेत आहे. आणि संकेत आहे द्वितीय वृत्ताच्या सर्वसमावेशकतेकडे. 'रक़्क़िन' ती वस्तू म्हणजेच तो कागद आहे, की ज्याच्यावर लिखाण केले जाते. दैवी आत्मा हा गुंडाळलेल्या कागदासारखा आहे किंवा कागदांची गुंडाळी आहे, आणि ब्रह्मांडाचे वास्तव हे लिखित पुस्तकासारखे आहे. म्हणून दैवी सिंहासन, पादपीठ, सन्मार्गाचा सेतू, तराजू, स्वर्ग, नरक, पृथ्वी, आकाश इत्यादी म्हणजेच सर्व काही या वृत्तामध्ये समाविष्ट आहेत. यद्यपि ही दशा आणि तिची चिन्हे आणि वृत्तांमध्ये सन्मार्गाचा सेतू, तराजू इत्यादी सारखे अंश वा शाखांना दाखवले गेले नाही. फक्त समष्टी दाखवली गेली आहे. नाहीतर असंख्य वृत्ते आहेत जी एक दुसऱ्याच्या अधीन क्रमश: गेलेली आहेत. प्रत्येक वरचे वृत्त हे खालच्या वृत्तास घेरून आहे. त्याचप्रमाणे शाखांतर्गत शाखेची शृंखला अंतहीन गेलेली आहे.

**संच ३**

**ताय्युन-ए-सानी : द्वितीय तन्मात्रा :** अस्तित्वाच्या श्रेणींमध्ये हिचे स्थान प्रथम तन्मात्रानंतरचे आहे. सत्तेची सापेक्षता येथे नामांमध्ये झालेली आहे.

**तजल्लि-ए-सानी : द्वितीय अवतरण :** प्रकटनच्या दृष्टीने हे दुसरे अवतरण आहे आणि तपशील आहे प्रथम अवतरणाची. सत्तेची अभिव्यक्ती येथे नामांसह झाली.

**हज़रत अुलुवहियत : सर्वोच्च दृष्टिपात स्तर :** नाम 'अल्लाह' (परात्पर परब्रह्म) आहे. हा समस्त नामे, सत्ता, गुण आणि कर्मांना या दृष्टीने धारण करून आहे की या श्रेणीचा संबंध समस्त नाम-रूपांशी आहे. याला सर्वोच्च दृष्टिपात स्तर असे म्हणतात. अस्तित्वाच्या समस्त मर्यादा आणि त्यांच्या श्रेणींमध्ये दृष्टिपात करण्याचे नाव आहे उलुवहियत.

उलुवहियतचे (सर्वोच्चतेचे) अवतरण हे प्रेषित मुहम्मद स. यांच्यासाठी होते. सर्व अस्तित्वास नष्ट करून त्यांनी (मुहम्मद) आपल्या अस्तित्वाऐवजी 'उलुवहियत'चा स्वीकार केला आणि त्याला स्वीकृती प्रदान केली. ''(पैगंबर!) जे लोक आपली निष्ठा प्रकट करण्यासाठी तुमच्या हातावर हात ठेवून प्रतिज्ञा करत आहेत, वस्तुतः ते अल्लाहशी प्रतिज्ञा करत आहेत. (जणू) अल्लाहचाच हात त्यांच्या हातावर आहे.'' ४८:१० हा दर्जा संपूर्णपणे प्रेषितांपैकी इतर कुणास मिळालेला नाही. परंतु ही प्रतिष्ठा परमेश्वराने प्रेषित मुहम्मद यांना बहाल केली होती.

**हज़रत अल अस्मावल सिफात : नाम-रूप-स्तर :** या श्रेणीमध्ये नाम-रूपांचा समावेश आहे. भौतिक व मानवी वास्तवांपासून यांच्याशी संबंधित असलेले सर्व पदार्थ या श्रेणीशी निगडित आहेत.

**मुंतही-उल-आलमीन : द्वि-लोक लक्ष्मण रेषा :** याचा संकेत आहे तदत्त्व स्तरकडे. हा समस्त उपासनांचा सर्वोच्च बिंदू आहे आणि शिवाय मानवी वास्तवांच्या तन्मात्राचे उपासक या संधीशी तडजोड करू शकत नाहीत.

**अहदिय्युत अल-कस्रत : अनेकतेमध्ये एकता :** याच्या अनुषंगाने एकत्वतेची अभिव्यक्ती अनेकतेमध्ये झाली.

**वजूद-ए-इज़ाफ़ी : वर्धित अस्तित्व :** हे यासाठी आहे की ब्रह्मांडाशी याचा संबंध निष्कासित जिज्ञासेशी आहे. या श्रेणीमध्ये ब्रह्मांडाकडे अस्तित्व वर्धित झाले. नवनिर्मितीच्या दृष्टीने हिचे नाव ब्रह्मांड आहे आणि अस्तित्वाच्या उदयाच्या अनुषंगाने हिला सृष्टी म्हणतात.

**मंशाए सिवा : संकल्प विहीनता :** परमेश्वराचे अस्तित्व येथे संभाव्य स्वरूपात नामविहीनतेसह प्रकट झाले. याच आधारावर या जगास 'उपाधी' म्हणून संबोधतात. प्रकटनानंतर हिचे नामकरण झाले प्रकटनपूर्व नव्हे.

**फ़लक-उल्-हैवात = जीव-आकाश –** जगताचे जीवनाचे आधार यावर अवलंबून आहेत. ही श्रेणी आत्मा जगत व देह जगतच्या अधिनस्थ आहे अथवा दुसऱ्या शब्दामध्ये पादपीठाशी आणि पादपीठावरच मदार आहे जीव जगताची, कारण की प्रभाव यावरच निर्भर आहेत.

**नफ़्स-ए-रहमानी = कृपावंत आत्मा –** आत्म्याच्या आनंदाच्या अनुषंगाने प्रथम तन्मात्रा ही द्वितीय तन्मात्रामध्ये परिणत झाली.

**आलम–ए–जबरूत = आत्म्यांचे जग –** हे गुणांचे जगत आहे जिच्यावर द्वैतता आणि नामेतराची बंधन–मुक्ती नाही. नवनिर्मित जगावर द्वैतता आणि नामेतराची बंधन–मुक्ती असते म्हणून आत्म्यांचे जग ना ऐन आहे ना गैर. जबरूत म्हणजेच आत्मा यासाठी म्हणतात की अखंड समरूपतेने – येथे बळेच अस्तित्व प्राप्त करून घेतले अथवा असेही पण म्हणता येईल की शून्याच्या नम्रतेने येथे दैवी नामरूपे प्रबळ अशा अखंड समरूपतेचे अर्थात अपरिवर्तित जगतच्या प्रभावाने अस्तित्व लाभ कबूल केले.

**मादन अल्–कस्रत = अनेकतेची खाण –** या तन्मात्रेमध्ये अनेकता आहे, कारण की या तन्मात्रेचा हेतूच अनेकता आहे. याला अनेकतेचा हेतू पण म्हणतात. या दृष्टीने की हे वृत्त द्रव्यांच्या वास्तवाच्या दरम्यान स्थित आहे. यामध्ये अनेकता आणि बाह्य जगताची (विश्वाची) क्षमता आहे. याला क़ाबलियत अल्–कस्रत पण म्हणतात. या दृष्टीने की जगताचे (विश्वाचे) वास्तव्य येथे येऊन व्यक्त विश्वाची क्षमता ग्रहण करून घेतात. या श्रेणीस **क़ाबलियत–ए–ज़हूर** म्हणजेच **सृष्टीक्षमता** पण म्हणतात. **अमा = गहन तिमिर, ब्रह्मगुफा –** नफ़्स–ए–रहमानी म्हणजेच कृपावंत आत्म्यास श्वासाप्रमाणे बाहेरच्या बाजूस परागंदा केले गेले आहे आणि जी द्वितीय तन्मात्रा व अवतरण आहे, हे सौरमंडलास झाकून टाकणाऱ्या घनदाट मेघासारखे आहे. वास्तविक अस्तित्वाच्या सूर्यास ब्रह्मगुफेने उदय होण्यापासून लपवले आणि अवास्तवतेच्या श्रेणीमध्ये खेचून एवढे लपवले आहे की बहिरंगास आपल्या अंतरंगाची मुळीच कल्पना राहिली नाही.

**ب = अरबी ‘ब’ वर्णाक्षर –** अरबी वर्णाक्षरे आणि वर्णांकशास्त्रामधील ‘अबजद’ पद्धतीमध्ये ज्याप्रमाणे ب अर्थात ‘ब’ हे द्वितीय वर्णाक्षर आहे, इतर वर्णांशी न जोडता स्वतंत्रपणे, त्याचप्रमाणे द्वितीय तन्मात्रा पण अस्तित्वाची द्वितीय श्रेणी आहे आणि हे सर्व स्वतंत्रपणे – स्वायत्तपणे तपशीली अभिव्यक्तीचे. गुह्य ज्ञानवंतांमध्ये ب ‘ब’ चा अर्थ आहे कारण किंवा हेतू. या वर्णाक्षरामुळे संकेत होतो अस्तित्वाची द्वितीय श्रेणी आणि बाह्य सृष्टीकडे.

**मुंतही अल्–आबिदीन = उपासकांची पराकोटी, तपस्व्यांची पराकाष्ठा –** तदत्त्व श्रेणीकडे याचा संकेत आहे. ही समस्त उपासनांची पराकोटी आहे शिवाय उपासक वा तपस्वी मानवी वास्तवाच्या तन्मात्रेच्या संधीशी तडजोड करू शकत नाहीत.

**कंसांचे स्पष्टीकरण**

ज्या दोन कंसांनी द्वितीय तन्मात्रेचे वृत्त संयुक्त आहे, त्यापैकी एक कंस दैवी वास्तवांशी संबंधित आहे आणि दुसरा भौतिक वास्तवांशी. एक अनिवार्यतेशी संबंधित आहे तर दुसरा संभाव्यतेशी. एक विशेषकरून ‘रबूबिय्यत’ (प्रभुत्व)शी संबंधित आहे, तर दुसरा ‘उबूदिय्यत’शी म्हणजेच सूफ़ी साधना–मार्गातील सप्तसोपानांपैकी प्रथम सोपानाशी की ज्यामध्ये साधक हा आपल्या हृदयास पवित्र करण्याच्या प्रयत्नात असतो की ज्यामुळे तो अग्रेसर होऊ शकेल. म्हणजेच तो स्वतःला परमेश्वराच्या सेवेत समर्पित करतो. एक वरच्या तन्मात्रेच्या ‘अहदिय्युत’शी सदृश आहे, त्याला ‘ज़ाहिर अल्–वजूद’चे कंस म्हणजेच प्रकट अस्तित्व म्हणतात. कारण की अहदिय्युतची सत्ता नामरूपांमध्ये प्रकट झाली. जे कंस ‘वाहिदिय्यत’शी सदृश आहे त्याला ‘जाहिर–उल्–इल्म’चा कंस म्हणजेच प्रकट ज्ञानाचा कंस म्हणतात कारण की नाम–रूपाचे ज्ञान जे तेथे स्पष्ट रूपामध्ये बोधगम्य होते, ते येथे अनेकतेच्या लक्षणांमुळे सविस्तर प्रकट झाले. प्रकट अस्तित्वाच्या कंसामध्ये दैवी

वास्तवांची अभिव्यक्ती समस्त दैवी नामांपासून झाली ज्याचा अभिप्राय सर्वश्रेष्ठ परमेश्वराशी कायम असलेले विशेष अर्थबोध असा आहे; आणि प्रकट ज्ञानाच्या कंसामध्ये भौतिक वास्तवांची अभिव्यक्ती भौतिक नामांपासून झाली ज्याचा अभिप्राय सृष्टीशी निगडित अर्थबोधाशी आहे. हा किती बरे विचित्र योगायोग आहे! पाहा, समस्त दैवी नामे अठ्ठावीस आहेत. त्यांच्या अधीन भौतिक वा लौकिक नामे पण अठ्ठावीसच आहेत. अरबी वर्णाक्षरे अठ्ठावीस आहेत तसेच एकूण नक्षत्रेपण अठ्ठावीसच आहेत. दैवी नामे आणि त्यांच्या अधीनस्थ लौकिक नामे याच्यामधील संबंध हा पालक-पाल्यांसारखा आहे. दिव्यत्वाची प्रचीती लौकिकतेमुळे होते. म्हणून दैवी नामांचा बोध हा लौकिक नामांच्या बोधावर अवलंबून आहे.

आता आकृती क्रमांक १ मध्ये निर्दिष्ट परमेश्वराच्या अभिव्यक्ती क्रमाविषयी संक्षिप्त माहिती जाणून घेऊ या.

परमेश्वराची अभिव्यक्ती आणि सृष्टी-प्रक्रियेसंबंधात सूफींमध्ये 'तनज्जुल' (अवतरण)चा सिद्धान्त प्रचलित आहे. या सिद्धान्ताद्वारे त्यांनी ती परमसत्ता आपली अभिव्यक्ती कशा तऱ्हेने करते हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. येथे ज़ात (सत्ता) आणि सिफ़ात (गुण), तथा रब्ब (सृष्टीकर्ता) आणि अब्द (सृष्टी) यामध्ये कशाप्रकारचा संबंध आहे, हे तीन अवस्थांद्वारे दर्शविण्यात आले आहे. १. अहदिय्युत, २. वहदत आणि ३. वाहिदिय्यत. या एका परीने तन्मात्राविहीनतेपासून निर्मित तन्मायांकडे प्रयाण आहे. वस्तुत: या अखंड सत्तेमध्ये पण एका परीने स्तरविन्यास आढळून येतो. तो असा -

**१) अहदिय्युत** – ही प्रथम अवस्था आहे. या प्रथम अवस्थेमध्ये ती परमसत्ता (अल्-वुजूदल् मुतलक़) ही केवळ सत्ता (अज़्जात) मात्र आहे. या अवस्थेत ती सत्ता निर्गुण, निरपेक्ष अशी असते. ती संपूर्णपणे अनभिव्यक्त, निर्विशेष आणि संबंध विहीन असते. या अवस्थेची दोन रूपे आहेत - (१) अल-अमा, (२) अहदिय्युत. यातील 'अल-अमा' हे आभ्यंतर रूप आहे, तर 'अहदिय्युत' बाह्य रूप. 'अल-अमा'चा अर्थ गहन अंधकार असा आहे. ही एक प्रकारची ब्रह्मगुफाच आहे. निर्माणाधीन सृष्टीच्या बीजमात्र स्वरूपामध्ये परमेश्वर या अवस्थेमध्ये असतो. याचे समर्थन एका हदीसा (प्रेषित वचना)ने होते. अबीदर याने प्रेषित मुहम्मद स. यांना विचारले की सृष्टीच्या निर्मितीपूर्वी परमेश्वर कोठे होता? प्रेषितांनी उत्तर दिले की तो 'अल-अमा' अर्थात घनदाट अंध:काराच्या अवस्थेमध्ये होता. जिच्यावर ना हवा आहे ना खाली पण. म्हणजेच एक महाभयंकर निर्वात पोकळी असली पाहिजे. दुसरे 'अहदिय्युत' बाह्य रूप आहे. यामध्ये परमेश्वर आपल्या स्वत:स सर्वातीत सत्तेच्या रूपाने जाणतो. या अवस्थेमध्ये सर्वापासून अतीत आपल्या 'एकत्वा'चे ज्ञान परमेश्वरास असते.

**२) वहदत** – प्रथम अवस्थेच्या नंतरची दुसरी खालची अवस्था 'वहदत' या नावाने ओळखली जाते. याच अवस्थेस 'हक़ीक़तुल मुहम्मदिया' अर्थात मुहम्मदाचे वास्तव असे म्हणतात. असे म्हटले जाते की या अवस्थेमध्ये ज़ात (सत्ता)पासून वेगळेपण (भिन्नत्व) नसते आणि ना एक दुसऱ्यापासून भिन्नता असते. अशाप्रकारे ही सृष्टी बीजस्वरूपात परमेश्वराच्या ज्ञानामध्ये वर्तमान असते. या अवस्थेची पण दोन रूपे आहेत. आभ्यंतर रूप 'हुवीय्यत' म्हणून ओळखले जाते तर बाह्य रूप 'अनीय्यत'. हूवीय्यतचा अर्थ आहे 'तत्-त्व' (तदत्त्व). या अवस्थेमध्ये शुद्ध सत्ता ही 'अनेक' विरोधी रूपांमध्ये आपल्या 'एकत्वा'स ओळखते. आणि

बाह्यरूप असलेल्या 'अनीय्यत'मध्ये विशुद्ध सत्तेस 'एका'च्या 'अनेका'मधील अभिव्यक्तीचा बोध होतो. या अवस्थेमध्ये तिला 'अनेकत्वा'च्या मुळाशी 'एका'च्या असण्याचे ज्ञान होते. 'वहदत'च्या अवस्थेमध्ये 'तत्-त्व' त्या 'एका'पासून बाहेर नाही आणि या 'तत्-त्व'चे बोध करून देणारा हा त्याच्या बाहेर आहे. या अवस्थेमध्ये जणू तो 'एक' अन्तदर्शन करत असतो आणि जेव्हा या अवस्थेचे बाह्य रूप 'अनीय्यत' (अहं-ता)मध्ये तो जणू सृष्टीस ध्यानात ठेवून आपल्याकडे संकेत करत असतो. या द्वितीय अवस्थेमध्ये पण परमेश्वराचे रूप अनभिव्यक्तच असते; परंतु या अवस्थेमध्ये त्याला आपले स्वतःचे ज्ञान असते, तो या अवस्थेमध्ये अनभिव्यक्त असूनही आत्मज्ञ असतो. 'तत्-त्व' हा 'अनेका'चा विरोधी 'एक' आहे आणि त्या 'अहं-ते'मध्ये 'अनेका'चा आश्रय 'एक' आहे. परंतु येथे स्पष्टपणे लक्षात ठेवले पाहिजे की अशा प्रकारच्या दोन रूपांचा निर्देश करण्यामध्ये द्वैत नसते. कवी महमूद शबिस्तरी यांच्या 'गुलशन-ए-राज' या काव्य ग्रंथामध्ये म्हटले गेले आहे की त्या सृष्टीच्या कारणस्वरूप परम सत्यामध्ये 'तो', 'मी' आणि 'तू' (हे सर्व) एकच वस्तू आहेत. त्याचे 'एकत्व' हे विभेदापासून अतीत आहे.

**३) वाहिदिय्यत –** तृतीय अवस्था 'वाहिदिय्यत' आहे. ही परमेश्वराची नामरूप-विशिष्ट जगत-प्रपंचामध्ये अभिव्यक्त होण्याची अवस्था आहे. या अवस्थेमध्ये अनेकत्वमध्ये एकट्याची अभिव्यक्ती होते. परमेश्वराचे ज्ञान हे सर्व पदार्थांमध्ये परिव्याप्त होऊन जाते. आता स्थूल जगत प्रकाशात येते. सूक्ष्मावस्थेनंतर सत्तेचे स्थूल रूप उद्भासित होते. जीवन प्रकट होते.

अशा प्रकारे प्रथम विशुद्धस्वरूप मात्र परमसत्ता होती. त्या वेळेस परमेश्वर निरपेक्ष, संबंधविहीन, निर्गुण, अनभिव्यक्त असतो. ही 'अहदिय्युत'ची अवस्था आहे. यानंतर तो आत्मज्ञ बनतो आणि सत्ता, प्रकाश आणि शक्तीचे त्याला भान होते ही 'वहदत'ची अवस्था आहे. आणि तृतीय अवस्था वाहिदिय्यतमध्ये सत्ता जीवनमध्ये प्रकाश अहम् (अहंकार)मध्ये आणि शक्ती संकल्प (इच्छा)मध्ये परिणत होऊन जातात. यानंतर पाहणे, ऐकणे आणि बोलण्याच्या शक्तीचा आविर्भाव होतो.

जेव्हा (दैवी) सत्तेचे सप्तगुण - १) जीवन, २) ज्ञान, ३) शक्ती, ४) संकल्प, ५) ऐकणे, ६) पाहणे आणि ७) बोलणे प्रकट होतात तेव्हा तिला 'लाहूत' (देवत्व) या नावाने ओळखतात आणि जेव्हा तिचे गुण क्रियात्मक रूप धारण करतात, जसे सृष्टी (निर्माण) करणे, जीवनदान करणे, मारणे तेव्हा तिला जबरूत (शक्ती) असे म्हणतात. जेव्हा ते क्रियाशील गुण वेगवेगळ्या लोकांमध्ये (जगतांमध्ये) प्रकट झाले तेव्हा त्यांचे अनुरूप असे नामकरण पण झाले. जसे, जेव्हा ते देवलोकामध्ये प्रकट झाले तेव्हा ते 'आलम-ए-मलकूत' म्हटले गेले आणि सदृशरूपांमध्ये प्रकट झाल्याकारणाने 'आलम-ए-मिसाल' म्हटले गेले आणि भौतिक जगतामध्ये अभिव्यक्त झाल्यानंतर 'आलम-ए-नासूत' असे नाव प्राप्त झाले.

परमेश्वराच्या उपरोक्त अभिव्यक्तीक्रमाच्या संदर्भात सुप्रसिद्ध सूफी संत बाकी बिल्लाह नक्शबंदी देहलवी यांनी आपले प्रसिद्ध ग्रंथ 'हक़ीक़तुल हक़ायक़'मध्ये पवित्र कुराणातील एक गूढाक्षर वा त्रोटक अक्षराच्या दृष्टान्ताने स्पष्टीकरण अत्यंत मार्मिकपणे विशद केले आहे ते याप्रमाणे -

१) 'अलिफ़' वृक्ष आहे. वृक्ष **'अहदिय्युत'** आहे.'अहदिय्युत' अल्लाह अर्थात परमेश्वर आहे.

२) 'लाम' शाखा आहे. शाखा **'वहदत'** आहे. 'वहदत' त्याचे वैभव(शान) आहे.

३) 'मीम' फळ आहे. फळ **'वाहिदिय्यत'** आहे. 'वाहिदिय्यत' त्याच्या वैभवा (शान)ची अभिव्यक्ती आहे, आणि हेच 'प्रकाश' (नूर)ची अभिव्यक्ती आहे.

इस्लामी धारणेनुसार गूढाक्षर वा त्रोटक अक्षरांचे गूज (गुह्य) फक्त परमेश्वर (अल्लाह)च जाणतो. इतरेजनांचा अनुमान मात्र असते. अनुमानामध्ये निश्चिती नसते.

एक उदाहरण पाहा –'अलिफ़ लाम रा' १०:१

उपरोक्त श्लोकाचा संभाव्य संकेतार्थ असा आहे –'मी अल्लाह आहे जो सर्वसाक्षी आहे.'

दुसरे एक उदाहरण आहे 'साद' ३८:१ याचे एक अनुमानित अर्थ आहे – 'सत्यवचनी ईश्वर'.

गुह्य हे मानवासाठी अनाकलनीय असते. त्याची मजल अनुमान किंवा जास्तीत जास्त तर्कापर्यंत असते. त्यापलीकडील गूढाची उकल त्याला शक्य नाही. कारण यासाठी देखील एकच कुराणोक्त पुरावा पुरेसा आहे. तो पुरावा असा आहे –

''अदृष्टाच्या (ज्ञानाचा) अधिकारी केवळ अल्लाहच आहे.'' १०:२० शिवाय अनुमान हे सत्यासाठी कधीच पर्याय असू शकत नाही. याचा दाखला पण पवित्र कुराणात आहे. तो असा – ''परंतु खचितच अनुमान कधीही सत्याची जागा घेऊ शकत नाही.'' १०:३६ तसेच 'आणि तर्क सत्यापुढे' टिकू शकत नाही.'' ५३:२८

अलिफ़ लाम मीम याचे एक विवेचन असे(ही) आहे –'अलिफ' अल्लाहसाठी,'लाम' जिब्रईल – पवित्र आत्मा यासाठी आणि 'मीम' मोहंमदसाठी. म्हणजे 'परमेश्वराने जिब्रील – पवित्र आत्म्याद्वारे हज़रत मोहंमद पैगंबर यांच्यासाठी कुराण प्रकट केले.' तर दुसरे विवेचन असे आहे –'अलिफ' दैवी उपकरणासाठी,'लाम' ईश्वरी दया व करुणेसाठी आणि 'मीम' हे ईश्वरी साम्राज्यासाठी प्रयुक्त आहे. याचा अर्थ असा होतो – 'पवित्र कुरआन हे ईश्वरी दया व करुणा आणि त्याचे साम्राज्य यासाठी एक उपकरण – साधन आहे.' काही विद्वान असे मानतात की 'अलिफ' मी साठी, 'लाम' अल्लाहसाठी आणि 'मीम' सर्व काही जाणतो हे संकेतित होते. म्हणजेच, 'मी अल्लाह सर्वज्ञ आहे' असा अर्थ होतो. सुप्रसिद्ध भाष्यकार इब्न कसीर यांच्या मते (पवित्र कुराण) हा ग्रंथ दैवी मीमांसक अल्लाहकडून अवतरित गूढ गुंजनासह आहे. आंतरराष्ट्रीय ख्यातिप्राप्त आधुनिक इस्लामी विद्वान अब्दुल्लाह यूसुफ अली यांच्या भाष्यानुसार श्रद्धावंतांना ही तुटक अक्षरे अध्यात्मिक–आत्मिक शक्ती प्रदान करतात.''[२३]

## ज) ईश्वराचे अस्तित्व : पौर्वात्य व पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांच्या प्रवृत्ती

ईश्वराचे अस्तित्व अव्यवहितपणे स्पष्ट होत नसते, म्हणून ते सिद्ध करावे लागते. ईश्वराच्या अस्तित्वासंबंधी तत्त्ववेत्त्यांच्या प्रवृत्ती पुढील तीन प्रकारांत दर्शवता येतील. आस्तिक ते मान्य करतात, नास्तिक नाकारतात आणि अज्ञेयवादी त्याबद्दल शंका घेतात. आस्तिकांपैकी काही ते केवळ श्रद्धेने मान्य करतात. इतर काही असा दावा करतात की, माणसाला अस्फुट अंत:प्रज्ञेने त्याची जाणीव होते, पण त्यांच्यापैकी बहुतेकजण प्रमाणांच्या साहाय्याने ईश्वरी अस्तित्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात. ते सिद्ध करण्याचा त्यांनी प्रयत्न केला तरी त्यांपैकी बरेच असे मान्य करतात की, माणसाला तत्त्वज्ञानाचा आधार न घेताही ईश्वराच्या अस्तित्वाचे स्वंयस्फूर्त असे ज्ञान असते. या ज्ञानाचे वर्णन भगवद्‌गीताकारांनी 'अतींद्रिय आणि परमानंदकारक सत्' बादरायणाचार्यांनी

'प्रसन्न व तेजस्वी सत्', शंकराचार्यांनी 'मी ब्रह्म आहे' या उद्भासात प्रगट होणारे, सेंट दमासीनने 'मानवांत निहित असलेले', सेंट ऑगस्टीनने 'प्रत्येक सत्यात गर्भित असलेले', ॲक्वायनसने 'प्रत्येक ज्ञात वस्तूच्या ज्ञानात अंतर्भूत असलेले', डन्स स्कॉटसने 'विषयमात्राच्या ज्ञानाशी अस्पष्ट रीतीने निगडित असलेले', देकार्तने 'ज्ञानशक्तीला प्रवर्तित करणारे', श्लिअरमॅकने 'माणसाचा पूर्ण परावलंबित्वाच्या जाणिवेत उपलक्षित असलेले', ऑटोने 'दिव्यत्वाच्या म्हणजे पूज्य भावनोत्पादक व मनोवेधक अद्‌भुततेच्या जाणिवेत अभिप्रेत असलेले', शेलरने 'किमानपक्षी श्रद्धा, भय, प्रेम व उपासना या धार्मिक भावनांचे लक्ष्य झालेले सर्वश्रेष्ठ मूल्य' असे केले आहे.

वेद, इंजील (बायबल), कुराण यांसारख्या पवित्र धर्मग्रंथांतील निर्देशांचा अर्थ समजावून घेऊन, मनांतून सर्व परिमित विषय काढून टाकून, उर्वरित गूढतत्त्वावर मन केंद्रित करून (योग), अधिकाधिक सखोल व व्यापक होत जाणाऱ्या निरनिराळ्या विश्लेषणांच्या साहाय्याने विश्वजगताचा सर्वाधिपती असलेल्या ब्रह्माप्रत व सूक्ष्म जगतांतील सर्वश्रेष्ठ अशा आत्म्याप्रत पोचून (उपनिषदें), मूळ ओजसच्या उगमाशी जाऊन त्याचे आकलन करून घेऊन (बर्गसाँ), मानवाच्या जीवनविषयक व नैतिक गरजांतील विषमता, त्यांच्यातील प्रत्यक्ष न्यूनता आणि परम व नित्य सत्त्वाची आवश्यकता जाणून घेऊन (ब्लाँडेल व ला टॉय), संपूर्ण आत्मप्राप्तीच्या प्रयत्नाला ज्यामुळेच अर्थ व यश मिळू शकते हे मान्य करून (किर्केगार्ड, मार्सेल, चेस्टॉव्ह, जॅस्पर्स), किंवा ईश्वर खरोखर अस्तित्वात आहे अशी आपली खात्री करून देणाऱ्या अनुमानांचा शोध करून, अशा अनेक रीतीने अस्पष्टपणे अनुभवाला येणारी ही ईश्वराची उपस्थिती स्पष्ट करता येईल.

### अनुभवपूर्व–अनुभवोत्तर युक्तिवाद

अनुभवपूर्व किंवा अनुभवोत्तर असे युक्तिवाद या संदर्भात मांडले गेले आहेत. ज्याला कांटने 'सत्ताशास्त्रीय' म्हटले आहे. अशा अनुभवपूर्व युक्तिवादाचा उगम सेंट ॲन्सेल्मच्या विचारसरणीतून झाला. तो युक्तिवाद पुढीलप्रमाणे आहे :

'ईश्वर नाही' म्हणणारा नास्तिकही 'ज्याच्यापेक्षा अधिक श्रेष्ठ अशा कशाचीही कल्पना करता येणार नाही' असे सत् म्हणजेच ईश्वर असे समजतो, पण एखादी गोष्ट केवळ विचारसृष्टीत असण्यापेक्षा ती वास्तवतेत असणे अधिक महत्त्वाचे आहे; म्हणून ईश्वर हा केवळ विचारसृष्टीतच असतो असे नव्हे, तर तो सत्तेतही निःसंशयपणे असतो. सेंट बोनाव्हेंचर, डन्स स्कॉटस, देकार्त, स्पिनोझा, लायब्निझ, हेगेल, हार्टशॉर्न यांनी त्याची पुन्हा मांडणी केल्यानंतरही हा युक्तिवाद ॲक्वायनस, कांट व इतर अनेकांनी केलेल्या टीकेचा विषय होऊ शकतो. अस्तित्व हेच ईश्वराविषयक कल्पनेचे सारभूत तत्त्व असल्यामुळे ते निरूपाधिकपणे स्वयंसिद्ध आहे; पण हे खरे असले तरी ते आपल्या दृष्टीने स्वयंसिद्ध नसते, कारण त्याच्या संभवांतच नित्य अस्तित्व उपलक्षित असते अशा त्या सारभूत तत्त्वाचे आपणास आकलन होत नाही. ईश्वराची कल्पना ही आपल्या विचाराचाच एक आधारभूत घटक आहे असे जोपर्यंत सिद्ध होत नाही, तोपर्यंत तिच्या निरूपाधिक शक्यतेबद्दल आपण शंका घेऊ शकतो व ती कदाचित मूलतःच विसंगत असेल असेही मानू शकतो. ईश्वराचे अस्तित्व प्रत्यक्षपणे सिद्ध करणे दूरच राहिले, पण त्याच्या अस्तित्वाची निरूपाधिक शक्यताही सिद्ध करण्यात कोणालाही यश आले नाही, म्हणून हा युक्तिवाद किमानपक्षी लंगडा आहे.

प्लेटो, ॲरिस्टॉटल, प्लॉटिनस, दमास्कीन, ॲन्सेल्म, मेमोनायडीस, इब्न सीना यांनी केलेल्या सूचनांचा उपयोग करून ॲक्वायनसने पाच अनुभवोत्तर युक्तिवाद किंवा पद्धती मांडल्या आहेत. त्या सर्व कारण-कार्य-संबंधाच्या मार्गानेच ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करू पाहतात. वरीलपैकी प्रत्येक पद्धत गती अगर परिवर्तन, परावलंबित कार्यक्षमता, भ्रष्टता, गुणविषयक अपूर्णता, विश्वरचना यांसारख्या एखाद्या अनुभवातील घटनेपासून सुरुवात करते. अशा प्रत्येक घटनेला, अंतिम कारण म्हणून एखाद्या स्वयंभू सत्त्वाची आवश्यकता असते; परंतु अशा परस्परावलंबी कारणपरंपरेत कनिष्ठ कारण वरिष्ठ कारणापासून चालना मिळाल्याखेरीज कार्य करू शकत नाही; म्हणून अशा कारणपरंपरेत अनवस्था-दोष मान्य करता येत नाही.

**पहिली पद्धत –** सृष्टीत परिवर्तन आढळून येते; परंतु ते परिवर्तित होते, म्हणजे काही बाबतीत संभाव्यतेतून प्रत्यक्ष कृतीत उतरते, ते त्या बाबतीत क्रियाशील असणाऱ्या दुसऱ्या घटनेच्या प्रभावाखाली तसे करते. त्या दुसरीवर तिसरीचा प्रभाव पडतो व तिसरीवर चौथीचा, याप्रमाणे हा क्रम चालू राहतो; पण अशा मालिकेत अनवस्थेला वाव देता येणार नाही; म्हणून प्रत्येक क्रियेत हटकून असणारा एक अप्रेरित प्रेरक – म्हणजेच ईश्वर – शेवटी आपणास मान्य करावा लागतो.

**दुसरी पद्धत –** स्वतःच्या कार्यक्षमतेच्या बाबतीतसुद्धा दुसऱ्यावर अवलंबून असणाऱ्या निमित्त-कारणांच्या मालिकेच्या सुरुवातीस एका अनिर्मित आद्य निमित्त-कारणची आवश्यकता असते, त्यालाच ईश्वर असे म्हणतात.

**तिसरी पद्धत –** ज्या वस्तू उत्पन्न होतात व नाहीशा होतात, म्हणजे त्यांचे अस्तित्व ठराविक कालच असते त्यांच्यांत नष्ट होण्याची स्वाभाविक प्रवृत्ती असते. त्यांचे अस्तित्व निश्चित नसते, तर अनिश्चित असते. या अभ्युपगमाप्रमाणे परिमित जीवनमर्यादा असलेल्या वस्तूंनी बनलेल्या अमर्याद टिकणाऱ्या मालिका मानणे आवश्यक ठरेल; पण ही संकल्पना असंबद्ध आहे; म्हणून विश्वात एकतरी शाश्वत सत्त्व असलेच पाहिजे.

**चौथी पद्धत –** आपणास सृष्टीत कमीअधिक महत्त्वाच्या सत्ता आढळून येतात; पण निरनिराळ्या वस्तूंची अस्पष्ट रीतीने का होईना महत्तम सत्तेशी तुलना करून अशा वस्तूंचे महत्त्व-मापन करता आल्याखेरीज आपल्याला सत्तेचे लहानमोठे प्रकार मान्य करता येणार नाहीत; म्हणून एक महत्तम सत्ता विश्वांत असलीच पाहिजे. सत्तेच्या अंशात सत्ताच प्रगट होत असल्यामुळे महत्तम सत्ता हेच विश्वाचे निरूपाधिक विद्यमान निमित्त-कारण होय.

**पाचवी पद्धत –** अचेतन निसर्गातही एक प्रकारची गतिशील व्यवस्था दिसून येते. तिचे नियमही ठरवता येतात; पण अशा व्यवस्थेचे स्पष्टीकरण सचेतन तत्त्वाच्या साहाय्यानेच करता येईल. ती व्यवस्था निसर्गाच्या निव्वळ धाडसाचे किंवा धडपडीचे फळ आहे असे मानून तिचे स्पष्टीकरण करता येणार नाही; म्हणून विश्वाचा परमोच्च अधिपति व शुद्ध-चैतन्य-स्वरूप जो ईश्वर तोच सचेतन सृष्टीचा नियंता असला पाहिजे.

वरील दुसऱ्या आणि पाचव्या पद्धतींशी साम्य असणारे युक्तिवाद न्याय-वैशेषिकांनी मांडले आहेत आणि शंकराचार्यांच्या लिखाणांतून वरील पाचांपैकी प्रत्येक पद्धतीशी साम्य असणारी वचने उधृत करता येतील; पण त्या सर्व पद्धती उपादान किंवा निमित्त-कारणाच्या साहाय्याने ब्रह्माप्रत पोचण्याच्या दुहेरी पद्धतीखाली, म्हणजे कार्यकारण-संबंध-तत्त्वाच्या दुहेरी उपयोगाच्या सदराखाली अधिक सयुक्तिकपणे आणता येतील.

विश्वोत्पत्तिविषयक युक्तिवादाच्या वरील पाच नमुन्यांपैकी शेवटचा हा भौतिक, धार्मिक, प्रयोजनात्मक किंवा उद्देशवादी व्यवस्थेवर आधारलेल्या युक्तिवादासारखा आहे. सृष्टीत व्यवस्था आहे व तिच्या रचनेतच मानवी कल्याणाबद्दल आस्था आढळून येते. यावरूनच या व्यवस्थेला कोणीतरी कर्ता असला पाहिजे असे दिसून येते. वरील गृहीत तत्त्वावरच व्यवस्थाधिष्ठित प्रयोजनवाद आधारलेला आहे.

हे सर्व युक्तिवाद कांटला केवळ काल्पनिक (तार्किक), अतएव निराशाजनक वाटले व त्याने नैतिक उपपत्ति मांडून असे सांगितले की, सर्वांना न्याय देण्याकरता विश्वात ईश्वराचे अस्तित्व आहे.

ईश्वराच्या अस्तित्वाबद्दलची ही नैतिक उपपत्तीही खरोखर फारच बुद्धिप्रधान आहे, आणि विवेचकबुद्धीने ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करता येणारच नसेल, तर याही पलीकडे अनुभवावर आधारलेली शेवटची निर्णायक उपपत्ती आहे. बादरायणाचार्यांच्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास ‘संराधनावस्थेत त्याचा प्रत्यक्ष अनुभव येतो, म्हणून ईश्वर आहे असे मानले पाहिजे.’

६



प्रकरण - ६

# अल्लाहचे (ईश्वराचे) स्वरूप[२४]

उपनिषदाचे ऋषी 'तस्मिन् दृष्टे परावरे' (मुंडक-२, २, ८) म्हणत ईश्वराचे पर आणि अवर दोन रूपांचा उल्लेख करतात. ईश्वराचे अवर रूप हे जगत आणि आमच्या अपेक्षेशी जुळणारे आहे, म्हणून ते ईश्वराचे सापेक्ष रूप असे म्हटले जाऊ शकते. ईश्वराचे पर रूप हे त्याचे वास्तविक रूप आहे. याचा जगत आणि जीवाशी संबंध नसतो. याला निरपेक्ष रूप म्हटले जाऊ शकते. नाम आणि रूप हे कुठल्यातरी अस्तित्वाशी संलग्नित असतात. त्यांच्या अभावी कुठल्याच अस्तित्वाची कल्पना करणे अशक्य असते. नाम आणि रूप हे दोन्ही अस्तित्व-विशेषास आमच्या मनासमोर प्रत्यक्ष उपस्थित (उभे) करतात. नामाबरोबर रूप आणि रूपाशी नाम विद्यमान असते. दोन्ही सत्तेच्या गुणास प्रकट करणारे आहेत. नाम वाणीचा विषय आहे; तर गुण मनाचा. वाणी आत्म्याची सहज शक्ती आहे. त्याचे बाह्य रूप वैखरी या नावाने ओळखले जाते. साहित्यिक वाग्विलास याच वैखरी वाणीद्वारा निष्पन्न होतो. ईश्वराच्या निरपेक्ष रूपाविषयी विचार करू या.

**१) अल्लाहचे निरपेक्ष रूप**

जी सत्ता, जगत आणि जीवाशी असंबद्ध आहे, एकान्त, कूटस्थ आणि तटस्थ आहे, ती आहे की नाही, असा प्रश्न एखाद्या जिज्ञासूकरता अत्यंत स्वाभाविक आहे. मी एखाद्या वस्तूस एक तर आपल्याशी संबंधाने ओळखतो किंवा माझ्या शिवाय एखाद्या सांसारिक संबंधापासून जेथे या दोन्ही संबंधांचा अभाव असेल, तेथे साधारणपणे माझी पोहोच नसते. याच कारणामुळे ईश्वराच्या ज्या स्वरूपाशी माझा किंवा संसाराचा संबंध नसेल, तर मग त्याच्या अस्तित्वाच्या बाबतीत शंकेस वाव आहे. ऋग्वेदाचा ऋषी म्हणून तर म्हणतो, 'उने माहुर्नैषाऽस्ति इत्येनम ।' ऋ. २, १२, ५ अनेक लोकांच्या मतानुसार ईश्वर मुळीच नाही. परंतु विज्ञान आणि तत्त्वज्ञानाच्या शोधामुळे त्याच्या स्वरूपाचे उद्घाटन पण झाले आहे. ऋग्वेदचा ऋषी उपरोक्त शब्दानंतर युक्तिद्वारे ईश्वराच्या अस्तित्वाचे समर्थन करतो. पराजय, पराभव, वध, विवशता, असहाय अवस्था इत्यादी या युक्तीचे अचूक अस्त्र आहेत. यांचा वेध घेऊन हा आम्हास जगत् आणि जीवनामध्ये लपलेल्या अज्ञात ईश्वराच्या अस्तित्वास मानण्यास भाग पाडतो.

**काल्पनिक वा वास्तविक** - ईश्वराच्या निरपेक्ष रूपासंबंधी प्रत्येक युगातील मानव हा शंकेखोर (साशंक) राहिला आहे. कवी कल्पनेप्रमाणे ते (त्यास) मानावे म्हणून मानत आले आहेत. नाही तर त्याची

वास्तविकता संदेहास्पद आहे. हा विचार सर्वसामान्य लोकांचाच नव्हे, तर दिग्गज विद्वानांचा पण आहे. आधुनिक पाश्चात्य, विकासवादाच्या मतानुसार ईश्वराची सत्ता काल्पनिक आहे. पुरोहितांनी या काल्पनिक सत्तेचा प्रचार केला. या प्रचाराच्या प्रभावामुळे ईश्वराची सत्ता कालांतराने जनतेच्या विश्वासामध्ये दृढमूल झाली.

फ्रेडरिक नीत्सेचे असे मत आहे की, माणसाने परमेश्वराची कल्पना एका महान शक्तिसंपन्न पुरुषाच्या स्वरूपात केली आहे. जर घोडा परमेश्वराची कल्पना करता, तर तो एका विशाल घोड्याच्या स्वरूपात केला असता, जसे जल-तट-वासीय लोकांनी ईश्वराची कल्पना जल-देवता अथवा समुद्री अप्सराच्या स्वरूपात केली आहे, जिचा वरचा भाग हा स्त्रीसारखा आहे तर खालचा भाग माशाच्या आकारासारखा आहे. नीत्सेच्या मतानुसार अशा प्रकारच्या कल्पित परमेश्वरास आधुनिक विज्ञानाने नष्ट केले आहे. रशियाच्या बोल्शेविझमने ईश्वर विश्वासास वा श्रद्धेस धक्का पोहोचविला आहे. काही विद्वानांची असे म्हणण्यापर्यंत मजल गेली आहे की, ईश्वर जर असेलच, तर त्याला पदच्युत आणि उद्ध्वस्त करावे लागेल.

या मतानुसार मुख्य आशय हा आहे की, परमेश्वराची कोणतीच सत्ता नाही, ती कल्पित आहे. काही समाजवादी लोकांनी असेही पण म्हटले आहे की, हा कल्पित ईश्वर सामाजिक नियंत्रणासाठी फायदेशीर ठरला आहे. यास्तव याला लोकांच्या कल्पनेमध्ये जिवंत ठेवले पाहिजे.

**शक्ती वा द्रव्य** – हर्बर्ट स्पेन्सर आणि हेगेल यांनी एक दुसराच विचार ईश्वराच्या बाबतीत उपस्थित केला आहे. यांच्या मते जे काही दिसते ते सर्व एका शक्तीचा प्रकाश आहे. जगातील अचर आणि चर, जड आणि जंगम पदार्थ त्या शक्तीचे वेगवेगळे- विभिन्न चिन्ह प्रकट करतात. एकच शक्ती नाना रूपांमध्ये अभिव्यक्त होत आहे. येथे जे काही चित् आणि द्रव्यरूप आहे – लहानांपासून थोरांपर्यंत, फुलापासून ते नक्षत्रांपर्यंत, मुंगीपासून ते हत्तीपर्यंत – ते सर्व वर उठते, खाली पडते, नष्ट होते; परंतु सर्वांना उत्पन्न करत आणि त्यांना स्वाहा करत, निखिल पदार्थांचा महायोग, शक्ती आहे तसेच राहाते. हा शक्तिरूप महायोगच परमात्मा आहे, परंतु हा व्यक्तित्त्वविहीन, चेतनारहित आणि आचारशून्य आहे. त्यामध्ये अहंभाव, आपल्या सत्तेचे भाव नाही. जणू की बेहोश, आत्मविस्मृत सत्ता पडून आहे, तशाच प्रकारचे या ईश्वराचे अस्तित्व आहे. बौद्ध तत्त्ववेत्त्यांनी चेतन वा सज्ञान देवांपेक्षा ज्ञानशून्य देवांना श्रेष्ठ मानले आहे. उदासीन, निरपेक्ष वा तटस्थ ब्रह्मपण चेतनाशून्य मानले जात असे. ईश्वराचे असले रूप की जिचे ना व्यक्तित्व आहे ना चेतना; ज्यामध्ये ना सांगण्याची क्षमता आहे ना सांगितलेले ऐकू शकते, याला काही अर्थ नाही. ते भलेही काही मोजके पराशक्ती आणि योग्य चिंतकांसाठी उत्साहाचा स्रोत असेना का, सर्वसाधारण माणसांसाठी ते मातीच्या एका ढेकळाएवढेपण नाही. अशा ईश्वराचे अस्तित्व मानव-मनीषेच्या क्षेत्राबाहेरील आहे. त्याला कोणीच हृदयंगम करू शकत नाही.

**सानन्द वा निरानन्द** – अनेक चिंतकांनी ईश्वरास मानवाचे रूप दिले आहे. यांचा वाद नराकारावाद (Anthropomorphism) म्हणून गणला जातो. काही देशांमध्ये ईश्वराचे रूप मानवपशुमिश्रित आहे. याला अर्धनराकारवाद (Theriomorphism) म्हटले जाऊ शकते. दुसऱ्या स्वरूपामध्ये गूढवादाच्या विकासाकरता बराच अवकाश आहे. इजिप्त देशास याच कारणामुळे गूढवाद्यांचा देश आहे असे म्हटले जाते. इजिप्तची अनूबिस (Anubis) देवी ही श्वानमुखी आहे. भारतामध्ये बुद्धी आणि सिद्धीचे देव श्रीगणेश हे वक्रतुंड आहेत.

पशु-शिरीय देव हे भयोत्पादक वाटतात. भयोत्पादक हे कधीच आनंदमय वा आनंददायक होऊ शकत नाहीत. जेथे भीती आहे तेथे आनंद असू शकत नाही.

बायबलमध्ये नराकारवादशी मिळता-जुळता विचार आढळतो. या अनुसार येशू ख्रिस्त हा परमेश्वराचा पुत्र आहे. येथे मानव आणि ईश्वर यामधील भेद दूर करण्यात आला आहे. ईश्वर हा विशुद्ध मानव बनला आहे. ख्रिस्ताचे प्रमुख कार्य मानवाचे पाप स्वतःच्या शिरावर घेऊन स्वतः दुःखी जीवन व्यतीत करणे होते. मानवाच्या पापाचे प्रायश्चित्त येशू ख्रिस्तास स्वतः फासावर लटकून करावे लागले. मानव-वेषामध्ये ईश्वराचे हे एकान्त निरानन्द रूप आहे.

साररूपात ईश्वराचे निरपेक्ष रूप असे मांडता येईल - ईश्वर कपोलकल्पित नाही की, ज्याला एखाद्या चतुर मेंदूची उपज म्हणता येईल. ईश्वर वास्तविक सत्ता आहे. ही सत्ता व्यक्तित्त्वविहीन, संज्ञाशून्य आणि चेतना-रहित पण नाही. त्याचे एक असे व्यक्तित्त्व आहे की जे सज्ञान आहे, जे दुसऱ्यास सांगू शकते आणि दुसऱ्यांचे (इतरांचे) ऐकू शकते. तो पूर्ण आनंदमय आहे. त्याच्यामध्ये दुःखाचा लवलेशपण नाही. वेदप्रणीत सात व्याहृतीपैकी प्रथम तीन महाव्याहृती अर्थात भूः, भुवः, स्वः ईश्वराच्या याच स्वरूपाची व्याख्या करतात. तो भूः अर्थात सत्तावान आहे, त्याचे अस्तित्व आहे, तो सत्य आहे. तो भुवः अर्थात चेतन आणि ज्ञानी आहे. तो आमच्या प्रार्थना ऐकू शकतो. त्याला स्वतःचे ज्ञान आहे आणि तो आपले संदेश आमच्यापर्यंत पोहोचवत असतो. त्याचा ज्ञानप्रकाश जगरहाटीमध्ये नियमबद्ध आणि व्यवस्थितपणे प्रकट होत आहे. तो पूर्ण आहे. यास्तव त्याच्यामध्ये कोणत्याच प्रकारचा अभाव नाही. तो स्वः अर्थात आनंदस्वरूप आहे. क्लेशांमध्ये त्याला क्लेशित करण्याचे सामर्थ्यच नाही. क्लेश त्याच्या जवळपास फिरकत पण नाही. अशा प्रकारे ईश्वर हा सच्चिदानंद आहे. तिन्ही महाव्याहृती त्याचे निरपेक्ष, इतरांशी असंबद्ध, वास्तविक स्वरूपास प्रकाशित करतात. तो सत् आहे, चित् आहे आणि आनंद आहे.

**ससीम वा असीम** - स्थळ आणि काळ वस्तूंना सीमाबद्ध करतात. ते अंतिम सत्याच्या सर्वांशास आपल्यात सामावून घेऊ शकत नाहीत. ते आमच्या इंद्रियांसाठी अंतिम सत्याचे फक्त संदेशवाहक आहेत. मी या वेळेस आपल्या खोलीमध्ये बसलेलो आहे, यास्तव महाविद्यालयामध्ये असू शकत नाही. महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना शिकवत असताना, मी घरी सापडत नाही. झोपतो तर पलंग हा लांबी-रुंदीमध्ये मोठा असतो. मी त्यापेक्षा लहान जागेमध्ये सामावून जातो. अशा प्रकारे माझे शरीर हे स्थळ-काळाच्या दृष्टीने ससीम आहे. माझ्या मनाच्या बाबतीत अशी अवस्था नसते. माझे मन शरीरासोबत खोलीत बसले आहे, परंतु पापणी लवताक्षणीच ते महाविद्यालयामध्ये भ्रमण करून येते, तर कधी नदीकिनारी जाऊन पोहोचते आणि इच्छा असेल तर ते कल्पनेच्या बळावर कधीच न पाहिलेले, परंतु पुस्तकामध्ये नमूद असलेले पर्वत, समुद्र इत्यादीची झलक पण पाहू शकते. मनाचे विचार ज्ञानाश्रित असतात. ज्ञान असीम आहे. त्याची कोणतीच सीमा निर्धारित केली जाऊ शकत नाही.

स्थळ काय आहे? स्थळ ते स्थान आहे की जेथे वस्तू असतात किंवा ठेवल्या जातात. वस्तू जेथे ठेवल्या जातात, त्या स्थळाचे ज्ञान मला तिच्या लांबी-रुंदीवरून होते. या लांबी-रुंदीसंबंधी जर मी विचार करू लागलो आणि जेथे कोठे ते सापडते, तेथे-तेथे तिला पाहात-पाहात जाऊ लागतो, तेव्हा शेवटी एक अशी अवस्था येते

की जेथे लांबी–रुंदी माझ्यासोबत आढळून येत नाही. फक्त काळ माझ्या हातात असतो. हे सर्व पाहाता पाहाता मला किती वेळ लागला, याचाच मी विचार करतो. वेळ वा काळ काय आहे? काळ ते तत्त्व आहे की जिच्यामध्ये घटना घटित होत असतात अथवा क्रिया घडत असतात. घटना नैसर्गिक असतात, तर क्रिया मानवी. सूर्योदय झाला, ही घटना आहे, परंतु शिवाजी महाराजांनी अफ़जल खानचा वध केला, ही एक क्रिया आहे. एका क्रियेमध्ये पण अनेक लघुक्रियांचा समावेश होऊ शकतो. जर मी या क्रियांच्या काळाविषयी विचार करू लागलो आणि असेच मागे हटत–हटत सृष्टीरचनेच्या प्रारंभिक क्रियेपर्यंत पोहोचलो, तर त्याच्या पुढच्या वेळेचा पत्ता लागत नाही. फक्त वेळेचे ज्ञान हाती लागते. अशा प्रकारे स्थळाचे पर्यवसान काळामध्ये आणि कालाची समाप्ती ज्ञानामध्ये होते. ज्ञान स्रोत आहे, जनक आहे. उत्पन्न झालेल्या वस्तूशी स्थळ व काळाचे बंधन जोडले जाते. उत्पत्तीसोबतच क्रिया आरंभ होते, जी काळाची द्योतक बनते. (ऋग्वेदाच्या अधमर्षणसूक्तामध्ये द्यौ तत्त्वाच्या उत्पत्तीसोबतच संवत्सर अर्थात काळाच्या उत्पत्तीचे वर्णन आहे.) उत्पत्ती वस्तूंची होते. म्हणून त्यांना राहण्यासाठी स्थळाची आवश्यकता भासते. हेच स्थळ–काळ सीमा निर्धारित करणारे आहेत. ज्ञान या सीमेपलीकडे आहे. मागे आपण पाहिलेच आहे की ईश्वर ज्ञानस्वरूप आहे. तर मग तो ससीम कसा बरा होऊ शकतो?

एका दुसऱ्या दृष्टीने विचार करा. कारणाचे गुण कार्यामध्ये चिकटतात. कलाकाराचे मानस त्याच्या कलेमध्ये प्रत्यक्ष होते. कवीचा आत्मा त्याच्या काव्यामध्ये प्रतिध्वनित होतो. याच कारणामुळे जर सृष्टी ही सृष्टी आहे (कारण की सृष्टीचा शब्दार्थ आहे – 'रचली गेलेली' जर सृष्टी रचली गेली आहे) तर रचनेमध्ये रचनाकाराचे गुण उमटलेच पाहिजेत. सृष्टी विशाल आहे. हिच्या इयत्तेचा पत्ता हिच्या रचनाकाराशिवाय दुसऱ्या कुणालाच नाही. हिचा प्रवाह अनादी आहे. न जाणो कितीक वेळेस या स्वरूपात आली, थांबली आणि अंतर्धान झाली. यामध्ये अनंत नियम कार्यमग्न आहेत. म्हणून हिचा रचनाकार पण अनंत आहे, असीम आहे.

सीमित वस्तू कधी काळी कोठे होत्या, तर कधी कुठे इतरत्र असतील. त्या नेहमी सर्वत्र विद्यमान असत नाहीत. असीमसाठी स्थळ–काळाचे बंधन नाही. ते सतत सर्वत्र वर्तमान असते.

व्याहृतींमधील चौथी व्याहृती 'महः' आहे जी ईश्वराची महत्ता, विशालता, अनंतता आणि असीमतेची सूचना देते. ईश्वराची सत्ता, त्याचे ज्ञान, त्याची शक्ती आणि त्याच्या आनंदाची कोणतीच इयत्ता, सीमा वा अवधी नाही. ईश्वराची असीमता त्याची सूक्ष्मता आणि निराकारतेची पण द्योतक आहे. आकारवान स्थूल वस्तू स्थळ आणि काळाच्या सीमेमध्ये बद्ध असतात. ईश्वर मात्र असा नाही. तो निराकार आहे. आकारवान वस्तू अनेक घटकांनी मिळून बनते म्हणून ती अनेक खंडांमध्ये विभक्त होऊ शकते. निराकार वस्तूचे खंड नसतात. ती अखंड, अविभाज्य आणि एकरस असते. असीम आणि निराकार सूक्ष्म असल्याकारणाने ससीम आणि साकारच्या स्थूलतेमध्ये व्याप्त राहाते. ईश्वराहून अधिक सूक्ष्म कोणतीच सत्ता नाही. म्हणून त्याला सर्वव्यापक पण म्हटले जाते. अखंड सत्ता असल्याकारणाने तोच अंतिम सत्य आहे.

मागेच सिद्ध करण्यात आले आहे की एखाद्या वस्तूच्या उत्पत्तीशी स्थळ आणि काळाचे बंधन चिकटले जाते आणि ती वस्तू ससीम म्हटली जाते. ईश्वर असीम आहे, स्थळ–काळाच्या सीमेपासून पृथक् आहे. म्हणून उत्पन्नच होत नाही. त्याचा कोणीच जनक नाही. जे उत्पन्न होते, तिची वाढ होऊन मृत्युमुखी होते. ईश्वर ना

उत्पन्न झालेला आहे, वा तो वृद्धिंगत होतो आणि ना मृत्यू त्याच्या अंत घडवून आणतो. तो अज, अनन्त आणि अमृत आहे.

**एक वा अनेक –** ज्या परमेश्वरास आपण सच्चिदानन्दस्वरूप, असीम, अखंड, एकरस, अजर आणि अमर म्हणतो, तो एक आहे का अनेक, असा प्रश्न धर्माच्या इतिहासामध्ये अनेकदा निर्माण झालेला आहे. एकेश्वरवाद वा बहुदेववाद याच्या पाठीमागे एक निश्चित अशी विचारधारा आहे. हर्बर्ट स्पेन्सरचा विचार होता की ज्या जाती पितृपूजा अथवा वीरपूजेस महत्त्व देतात त्या स्वभावत: बहुदेववादी असतात. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की पितृपूजा आणि वीरपूजेमुळे बहुदेववादाचा जन्म झाला. निसर्गाची बहुरूपता पण बहुदेववादास कारणीभूत आहे. कलेची पराकाष्ठा पण बहुदेववादास हातभार लावते. कलाप्रिय जाती विभिन्न देवी-देवतांच्या सुंदर मूर्ती घडवत आणि परिणामी मूर्तिपूजा प्रचलित होत असे. कदाचित ग्रीकांच्या संपर्कामुळे भारतामध्ये बहुदेववादास आश्रय मिळाला. भारतामध्ये झालेला विभिन्न संप्रदायांचा जन्म पण याचाच परिणाम प्रतीत होतो. प्रत्येक संप्रदायाचे आपले वेगळे आराध्य दैवत आहे. इजिप्तमध्ये प्रत्येक गाव आणि जातीचा एक विशेष पशु-देव असायचा. संपूर्ण इजिप्त देश भारतासारखाच नाना मत-मतांतरांमध्ये विभक्त होता.

ईश्वराच्या निरपेक्ष संबंधाच्या दृष्टीने पाहाता, बहुदेववाद कोणत्याही परिस्थितीत ग्राह्य होऊ शकत नाही. तो प्रकृती आणि चेतनेच्या साधारण स्तरासच स्पर्श करतो. एवढेच नव्हे, तर त्यामध्ये दैवी शुभ अंशासोबत अशुभ अंशाचे पण संमिश्रण आहे. भूत-प्रेतादी पापात्म्यांना (evil spirits) बहुदेववादामध्येच स्थान प्राप्त होऊ शकते, एकेश्वरवादामध्ये नाही.

ईश्वर एक आहे, दोन, तीन, चार अर्थात अनेक नाही; हे तथ्य भारतीय संस्कृतीचे एक प्रमुख अंग आहे. वेदमंत्रांमध्ये अनेकदा या तथ्याचा स्पष्ट उल्लेख आहे. स्वयंभू, सर्वशक्तिमान, सर्वव्यापक, सत्च्चितानंदस्वरूप सत्ता एक आहे. तो ईश्वर निश्चितपणे एक आहे. देव अनेक आहेत, परंतु देवांचा देव परमेश्वर एकच आहे. तो एक असूनदेखील अनेक नावांनी पुकारला जातो. इंद्र, अग्नी, वरुण, मित्र, सुपर्ण इत्यादी विविध नावे त्याच एका परमेश्वराची आहेत. वेदांनी स्वत: या तथ्याची घोषणा अनेक वेळा केली आहे.

एकाच ईश्वराची अनेक नावे त्याच्या अनेक गुणांचे द्योतक असतात. कालांतराने बाह्य प्रभावामुळे हीच नावे बहुदेववादाचे व्यंजक बनली आणि मग आपल्याकडे मूर्तीपूजेचा प्रचार सुरू झाला. हा नि:संदेह आमच्या कल्पनेच्या ऱ्हासाचा सूचक आहे. ईश्वराची उपासना निसर्गाच्या उन्मुक्त प्रांगणामध्ये होते. मंदिराच्या भिंतींमध्ये दडून मानवबुद्धी घुटमळू लागते. ईश्वराच्या उपासनेचे सर्वश्रेष्ठ स्थान तर आपला आत्मा आहे, जो आपल्या आतमध्ये आहे.

ईश्वर एक आहे, अनेक नाही. त्याची रचना अर्थात विश्वपण त्याच्या एक असण्याचे संकेत देते. समस्त ब्रह्मांड एक व्यवस्था आहे. ब्रह्मांडाचा अर्थच आहे – एक फार मोठे अंडे, जिची एकता रचनाकाराच्या अद्भुत अटळ प्रबंधामुळे संपादित होते. सृष्टीमध्ये कार्यरत असलेली नियमबद्धता एकतेचे चिन्ह आहे. ज्याप्रमाणे भिन्न-भिन्न वस्तूंच्या एकप्रकारतेचे नाव नियम आहे, त्याचप्रमाणे भिन्न-भिन्न नियमांची एकप्रकारता पण एक

नियम आहे. हे नियम आपल्या नियामकास सिद्ध करतात, जे नियमांच्या एकप्रकारतेमुळे एकच आहे. जी सत्ता असीम आहे, अखंड आहे, अविभाज्य आहे, ती एकच असू शकते. अंतिम सत्य एकच आहे.

**सर्व शक्तिमान** – सर्वशक्तिमानचा अर्थ आहे समस्त उदात्त शक्तीने संपन्न. शक्तिसंपन्न व्यक्ती सीमागत बंधनांपासून स्वतंत्र असते. ईश्वरामध्ये कोणतेच बंधन नाही. तो कुणावर अवलंबून पण नाही. त्याला इतरांच्या मदतीची गरजच नाही. अल्पशक्ती जीवांना पदोपदी कुणाचे तरी अवलंबन ग्रहण करावे लागते; परंतु ईश्वर स्वतंत्र आहे.

ईश्वर अवलंबनांचा पण अवलंबन आहे. त्याच्याहून श्रेष्ठ कोणतेच अवलंबन नाही. त्याला कुणाच्या आश्रयाची गरज नाही; आवश्यकता नाही. तो सर्वांचा आश्रय आहे, निखिल शक्तीचा भांडार आहे. तो स्वत:ला मारू शकत नाही, आपल्याहून अधिक शक्तिशाली देवास उत्पन्न करू शकत नाही. तो अपवित्र कार्य करू शकत नाही. त्याची सर्वशक्तिमत्ता या तथ्यामध्ये विहित आहे की तो जे काम करू इच्छितो, त्यामध्ये कोणीच बाधा उत्पन्न करू शकत नाही. ईश्वर निखिल शक्तींचा अधिपती आहे. समस्त दिव्यशक्ती त्या ईश्वराचे आज्ञापालन करतात. तो मनीषी आहे, स्वयंभू आहे. त्याचे निरपेक्ष रूप ज्ञानमय, सत्यमय, आनंदमय, अज, अमृत, असीम, अनंत, निराकार, नित्य, अविभाज्य, एकरस आणि सर्वशक्तीसंपन्न आहे.

### २) ईश्वराचे सापेक्ष स्वरूप

जेव्हा आपण ईश्वराच्या सापेक्ष स्वरूपाविषयी बोलतो तेव्हा स्वाभाविकपणे आपल्यासमोर हा प्रश्न उपस्थित होतो की ईश्वराचे या सृष्टीशी आणि आमच्याशी काय नाते आहे? काय तो या जगाचा रचनाकार (निर्माता) आहे? काय तो ब्रह्मांडामध्ये प्रचलित नियमांचा संचालक आहे आणि हिच्या स्थितीचे कारण आहे? काय त्याच्यामुळेच रात्री नभांगणात तारे चमकू लागतात आणि दिवसा लपतात? पृथ्वीवरील त्या अनंत रत्नराशी फळे-फुले, धान्य ही सर्व त्यानेच दिलेली आहेत? दिवसानंतर रात्र आणि रात्रीनंतर दिवसाचे उगवणे, एका ऋतूनंतर दुसरा ऋतू, नंतर तिसरा आणि पुन्हा तोच क्रम... काय ही समस्त व्यवस्था, समुचित प्रबंध, अटळ नियमचक्र तोच चालवतो? तो आमचा कोण आहे? या वेगवेगळ्या योनी, विविध प्रकारचे कर्म आणि सुख-दु:खाचे परिणाम आमच्यावर कसे येऊन धडकतात? या प्रश्नांच्या समाधानामध्ये ईश्वराचे अनेक गुण अनुस्यूत आहेत म्हणून जगत आणि जीवास समोर ठेवून ईश्वराच्या ज्या गुणांचा उल्लेख केला जातो, ते गुण त्याच्या सापेक्ष स्वरूपासंबंधित असतात. खाली आम्ही याच दोन्ही जगत आणि जीवनाच्या अनुषंगाने ईश्वराच्या सापेक्ष स्वरूपाचे विवेचन करणार आहोत.

### क) जगतच्या अनुषंगाने

व्याहृतींमध्ये पाचवी व्याहृती जन: आहे. ईश्वर जन: अर्थात समस्त सृष्टीचा स्रष्टा, उत्पन्न करणारा आहे. एखाद्या वस्तूच्या उत्पत्ती अथवा निर्मितीमध्ये तीन मुख्य कारण असतात. १) निमित्त, २) उपादान आणि ३) साधारण. कुंभार घट निर्माण करतो (बनवतो). या क्रियेमध्ये तो स्वत: निमित्तकारण आहे, माती उपादानकारण आहे आणि चक्र आदी साधारणकारण आहे. जगताच्या निर्मितीमध्ये या कारणांचे काय स्थान आहे? या प्रश्नाच्या उत्तरासंबंधी विचारवंत विद्वानांमध्ये एकमत नाही. त्यांपैकी एक गट निमित्तकारणाची कल्पना तर करतो, पण उपादानकारणाची आवश्यकता त्याला मंजूर नाही. निमित्तकारणापाशी जगाच्या

निर्मितीमध्ये काही तरी सामग्री आहे, असे हा गट मानत नाही. उत्पत्तीचा हा सिद्धान्त अभाववाद या नावाने ओळखला जातो. या सिद्धान्तानुसार ईश्वराने आपल्यापाशी काहीच नसताना सृष्टीरचना केली. तो म्हणाला 'होऊन जा' आणि सृष्टी तयार झाली. पवित्र कुराणामध्ये अभाववादाचा हा सिद्धान्त स्पष्टपणे आढळून येतो. तो असा, ''तो (अल्लाह) इच्छिल ते निर्माण करतो. जेव्हा तो (एखादी गोष्ट निर्माण करण्याचा) निर्णय घेतो, तेव्हा तो त्या गोष्टीबाबत केवळ इतकेच म्हणतो की, 'हो' (अस्तित्वात ये) आणि ती गोष्ट होते (अस्तित्वात येते).'' ३:४७ ''अल्लाहने त्याला (आदमला) मातीपासून बनवले आणि मग (अल्लाह) त्याला म्हणाला, 'हो' आणि 'तो झाला' (त्याला जिवंत मानव बनण्याची अल्लाहने आज्ञा केली आणि लगेच तो अल्लाहच्या आज्ञेनुसार अस्तित्वात आला)'' ३:५९ ''तो (अल्लाह) तर असा (सामर्थ्यशाली) आहे की, जेव्हा तो एखाद्या गोष्टीला अस्तित्वात आणू इच्छितो, तो फक्त एवढेच म्हणतो, 'अस्तित्वात ये' आणि ती गोष्ट अस्तित्वात येते.'' ३६:८२

अभाव अथवा शून्यापासून जगाची उत्पत्ती झालेली आहे. हे मत आजच्या वैज्ञानिकांना मान्य नाही. कोणत्यातरी तत्त्वाच्या परिणामस्वरूप हे जग (उत्पन्न झाले) आहे, असे ते मानतात, परंतु काहीही नव्हते, असे असतानाही काही (तरी) निर्माण झाले, हे मत त्यांना मान्य नाही. विभिन्न स्वरूपांमध्ये परिणत होणाऱ्या अशा सातत्यपूर्ण स्थितीस परिणमन स्वीकारते. या तत्त्वाचे फक्त आविर्भाव आणि तिरोभाव होत असते, शून्यभाव नव्हे. हर्बर्ट स्पेन्सर लिहितो, 'सृष्टीच्या उपादानकारणाची सामग्री ना उत्पन्न केली जाते ना नष्ट होते. ज्याला आपण विनाश म्हणतो, सूक्ष्म अवलोकनानंतर असे आढळून येते की, ते फक्त एका अवस्थेपासून दुसऱ्या अवस्थेमध्ये रूपांतरण असते.' विचारवंत व तत्त्वज्ञ जे. एस. मिल्ल म्हणतो, 'निसर्गामध्ये एका स्थायी तत्त्वासोबतच एक परिवर्तनीय तत्त्व पण असते.'

भारतीय तत्त्वज्ञानामध्ये स्थायी तत्त्वास प्रकृती आणि नश्वर तत्त्वास नाम-रूपाची संज्ञा दिली गेली आहे. सांख्यकार ५, ७२ सूत्रामध्ये प्रकृतीच्या नित्यतेची घोषणा करतो. ही प्रकृतीच सांख्यांच्या मतानुसार सृष्टीचे मूल उपादानकारण आहे. या प्रकृतीपासून सात विकृती (महत्तत्त्व, अहंकार आणि पाच तन्मात्रा) आणि षोडश (१६) विकार (अकरा इंद्रिये आणि पाच भूते) उत्पन्न होतात. विनाश वा प्रलयाच्या वेळी हेच तिरोहित होऊन आपल्या मूळ स्वरूपात परिणत होतात. वेदामध्ये मूळ प्रकृतीस स्वधा, अजा, उत्, त्रिधातू, अदिति इत्यादी म्हटले गेले आहे. आजचा वैज्ञानिक या मताशी अधिकांशपणे सहमत आहे, यद्यपि सृष्टी-निर्मितीच्या मूल तत्त्वाच्या शोधासाठी त्याचे प्रयत्न अद्याप चालूच आहेत. उपादानकारणाच्या क्षेत्रामध्ये, शून्यवाद त्याला मान्य नाही.

सृष्टी-निर्मितीच्या अनुषंगाने दुसरे मत त्या विद्वानांचे आहे, जे ईश्वरासच जगाचे निमित्त आणि उपादानकारण मानतात. जसे कोळी आपल्या शरीरामधील द्रवापासून स्वत:स सुरक्षित ठेवण्यासाठी किंवा इतर कृमींना फसविण्यासाठी तंतुगृह बनवतो, तसेच ईश्वर आपल्यामधूनच सृष्टी निर्माण करतो. या मतानुसार जग आणि ईश्वर खरोखर एकाच तत्त्वाची दोन रूपे आहेत. ती संख्येच्या दृष्टीने दोन प्रतीत होतात, परंतु जाती, गुण आणि वास्तविकतेच्या दृष्टीने पाहाता एकच आहे. भारतीय अद्वैतवाद आणि विशेषत: शुद्धाद्वैतवाद याच मताचा समर्थक आहे. पाश्चात्य तत्त्वज्ञांपैकी हर्बर्ट स्पेन्सर आणि हेगेल यांनी जवळ-जवळ अशाच प्रकारचे मत प्रदर्शित केले आहे.

जर सदरहू मत मान्य केले गेले तर, एक तर ईश्वराचे भौतिकीकरण तरी झाले पाहिजे किंवा प्रकृतीचे चेतनीकरण; परंतु या दोन्ही अवस्था तर्क-भार उचलण्यास असमर्थ आहेत. ईश्वरास भौतिकतेशी समन्वित करणे म्हणजे त्याला ईश्वराच्या पदापासून च्युत (पतित) करण्यासारखे आहे. प्रकृतीस चेतन बनविणे म्हणजे वास्तवाशी डोळेझाक करण्यासारखे आहे. प्रकृतिशिवाय जीवास ईश्वरापासून निवृत्त मानल्यास, जीवाची अल्पज्ञता, पराश्रयता, आवागमनाचे बंधन, क्लेश, राग-द्वेष आदीचा आरोप ईश्वरावर करावे लागेल. काय माझी अपूर्णता ईश्वरामध्ये सुद्धा आहे? या प्रश्नाचे महत्त्व या मताच्या समर्थकांना विरोधी पक्षाकडे खेचते आणि ते आपल्याला सावरण्यासाठी अपूर्णतेला मनाची माया किंवा भ्रम म्हणू लागतात. परंतु मनाशी भ्रमाचे नाते अद्याप आहेच. या भ्रमाचे निराकरण कसे करता येणे शक्य आहे? हे सुद्धा अपूर्णतेअंतर्गतच आहे. भ्रमवाद किंवा मायावाद चक्रव्युहामध्ये गुरफटतो, बाहेर सुटका करून घेऊ शकत नाही. प्रकृती आणि जीवास ईश्वराची अभिव्यक्ती अथवा ईश्वराचेच रूप मानणे, हे मानवी विचारासमोर समाधानशून्य समस्या उभी करणे आहे.

उपरोक्त ज्या दोन मतांचा उल्लेख केला गेला आहे, ते जगाच्या उत्पत्तीसंबंधामध्ये ईश्वराचे अस्तित्व स्वीकार करतात. या विरुद्ध तिसरे मत त्या विद्वानांचे आहे, जे सृष्टीनिर्मितीमध्ये विशुद्ध स्वरूपात निसर्गवादासच महत्त्व देतात. ते ईश्वराच्या अस्तित्वाचा निषेध तर करत नाहीत, अवहेलना मात्र असंदिग्ध रूपात करतात. यांच्या मतानुसार जग हे भौतिक तत्त्वांच्या संमिश्रणाच्या परिणामस्वरूप आहे. हे संमिश्रण पण योगायोगाने झालेले आहे. याचा कर्ता कुठलेच चेतन तत्त्व नाही. जरी असले तत्त्व असलेच, तरी ते प्रेक्षकांप्रमाणे, जगत - प्रगतीचा द्रष्टा मात्र आहे. तिचे संचालन अथवा नियंत्रणामध्ये त्यावर कोणताच हातभार नाही.

काय हा संयोगवाद (योगायोगवाद) विश्व-व्याप्त व्यवस्थेची व्याख्या करू शकेल? विज्ञान या सृष्टीमधील एका नियमाचे शासन सिद्ध करतो. या नियमाचे अस्तित्व आणि संचालनाच्या मुळात कोण बरे आहे? काय हा सर्व योगायोगाचा खेळ आहे? मग सृष्टीच्या वयाचा विचार करा. प्रसिद्ध वैज्ञानिक सर जेम्स जीन्स यांच्या मतानुसार हे विश्व जवळजवळ दोन अरब वर्षांपूर्वी निर्माण झालेले आहे. एवढ्या सुदीर्घ काळापासून सृष्टीमध्ये नियमाचे हे शासन चालत आलेले आहे. काय हा फक्त योगायोग आहे?

उपरोक्त तीन्ही मते सृष्टीउत्पत्तीच्या समस्येचे पूर्ण समाधान करत नाहीत. या सुव्यस्थित जगाचे अस्तित्व ना कोणत्या तरी योगायोगाच्या परिणामास्वरूप आहे, ना अभावाचे. प्रत्येक कार्याचे कोणते ना कोणते तरी कारण असते. अभावापासून भाव आणि असत् पासून सत्चे आविर्भाव होऊ शकत नाही. निर्माणामध्ये जे तीन कारण कार्यप्रवृत्त असतात ते सृष्टीच्या निर्मितीमध्ये पण असले पाहिजेत. वैदिक वाङ्मयामध्ये ईश्वरास सृष्टीचे निमित्तकारण, प्रकृतीस उपादानकारण आणि जीव, काळ आदींना साधारणकारण म्हटले गेले आहे. जीवांना कर्मानुसार फलप्राप्ती देऊन बंधनापासून मुक्तीकडे अग्रेसर करणे हा सृष्टी-निर्मितीचा उद्देश आहे. सृष्टीची व्यवस्था आणि त्यामध्ये प्रचलित नियम याबाबतीत जीवाची मदत करतात. ऋग्वेदाच्या अघमर्षण सूक्तामध्ये सृष्टी-निर्मितीची प्रक्रिया आणि क्रमाचे वर्णन आहे.

म्हणून जगाच्या रचनेच्या दृष्टीने ईश्वर स्रष्टा आहे. त्याच्या अभीद्ध ज्ञानमय तपामुळे सृष्टीची उत्पत्ती होते. व्याहृतींमध्ये जन: बरोबरच तप: ही व्याहृती येते. ईश्वर तप: अर्थात परमप्रकाशस्वरूप आहे. जेथे प्रकाश नाही, तेथे कोणतीच निर्मिती नाही. ईश्वर प्रकाशस्वरूप आहे आणि याच हेतूने तो सृष्टीचा निर्माता आहे.

सृष्टीची निर्मिती एक महान नियामक, असाधारण प्रकाशस्वरूप, अनंत शक्तीचा पुंज अशा ईश्वरापासून झालेली आहे. म्हणून तिच्यामध्ये स्थैर्य आणि टिकाऊपणा पण असला पाहिजे. सृष्टी वा विश्व महान उद्देश वा प्रयोजन सूचित करते. म्हणून हिला बऱ्याच काळापर्यंत स्थिर असले पाहिजे. हे स्थैर्य सृष्टीमध्ये आढळून येते. आर्यांच्या ज्योतिष-गणनेनुसार हिची निर्मिती होऊन एक अरब सत्याणव कोटी (करोड) एकोणतीस लाख एकोणपन्नास हजार वर्षांहून अधिक काळ झाला. इतक्या सुदीर्घ काळापर्यंत स्थिर असणाऱ्या सृष्टीचे पालन तोच ईश्वर करतो. म्हणून तो स्रष्टा होण्यासोबत पालक पण आहे.

जी वस्तू बनलेली आहे, ती बिघडणार. जिचा प्रारंभ झाले, तिचा अंत पण होणार. सृष्टी निर्मित आहे, म्हणून तिचा विनाश पण होणार. या अंताचा वा प्रलयाचा कर्ता पण तोच ईश्वर आहे. तो सृष्टीचा संहारकर्ता आहे. भारतीय तत्त्वज्ञानामध्ये ईश्वराच्या निर्मातारूपास ब्रह्मा, पालकरूपास विष्णू आणि संहारकर्ता रूपास रुद्र किंवा महेश अशी नावे दिली गेली आहेत.

जगताच्या अनुषंगाने ईश्वर सृष्टा आहे, पालक आहे आणि संहारक आहे. त्याचे हे त्रिविध रूप पारस्परिक विरोध दर्शवत नाही, प्रत्युत त्याच्या स्वाभाविक शक्तींचे प्रकाशक आहे आणि या शक्ती निरंतर कार्यरत असतात.

**ख) जीवाच्या अनुषंगाने**

धर्माच्या इतिहासामध्ये जीवाच्या अनुषंगाने ईश्वराचे जे स्वरूप सर्वप्रथम प्रकाशात आले ते म्हणजे त्याचे शासकरूप. या रूपामध्ये ईश्वर जीव आणि जगत दोघांवर तो शासन चालवतो. शासनासाठी शक्तीची गरज असते. म्हणून त्याला सर्व शक्तिसंपन्न आणि अधिकार भावनेसह असले पाहिजे. त्याच्या अधिकारास कोणीच आव्हान देऊ शकत नाही. त्याची आज्ञा अनुल्लंघनीय आहे. ईश्वर राजा आहे. जीव त्याची प्रजा आहे.

शासकाच्या स्वरूपानंतर ईश्वराच्या न्यायी रूपाचा आविर्भाव झाला. शासकरूपामधील स्वेच्छाचारितेचा अंश काढून टाकण्यात आला. ईश्वर शासक आहे, परंतु न्यायी शासक आहे. त्याचे शासन न्यायाच्या आधारावर चालते. त्याच्या दृष्टीमध्ये सर्व जीव समान आहेत. तो सर्वांशी एकसारखा व्यवहार करतो. त्याचा न्यायाचा तराजू ही येशू ख्रिस्त आणि गौतम बुद्धामध्ये फरक करत नाही. प्रत्येक जीव हा आपल्या गुण-अवगुणांमुळे आपल्या कर्माचे फळ भोगतो. कर्मफळाचा सिद्धान्त हा ईश्वराच्या न्यायी स्वरूपाशी निगडित आहे.

ईश्वराच्या शासक आणि न्यायी रूपानंतर त्याचे पितृरूप प्रत्यक्ष प्रकट झाले. या रूपाशी प्रेमभाव संबंधित आहे. ईश्वर प्रेममूर्ती आहे. तो आपली प्रजा-जीवांवर प्रेम करतो. तो त्यांचे कल्याण इच्छितो. त्यांना तो वर उचलून आनंदधामा (स्वर्ग)मध्ये प्रतिष्ठित करू इच्छितो. हे ईश्वराचे प्रेममय दयाळू स्वरूप आहे. ईश्वर पिता आहे, आम्ही सर्व त्याचे पुत्र आहोत. विश्वबंधुत्व भावनेचा उदय ईश्वराच्या याच रूपाच्या संबंधाने झाला. न्याय एक कर्म आहे, दया एक भाव आहे. ईश्वर आमच्या कार्याचे फळ नियमानुसारच देतो. हा त्याचा न्याय आहे. त्याच्या शिक्षेमध्ये आमचे कल्याण निहित असते. ही त्याची दया आहे. ईश्वर न्यायी आहे आणि दयाळू पण.

ईश्वराशी सर्वश्रेष्ठता आणि सर्वोच्चता या भावांचे संयोजन आवश्यक आहे. पवित्रतेचा मूळ भाव पूर्णता आहे. ईश्वर पूर्ण आहे, अखंड आहे, आप्त आहे, ईश्वराचे हे रूप पण जीवांच्या अनुषंगानेच आहे. ईश्वर पवित्र आहे, पूर्ण आहे, आप्त आहे, म्हणून जीवासाठी आदर्श आहे.

देवदूतांमध्ये देवदूतत्त्व हे त्यांचे आपले स्वत:चे नाही. हे ईश्वराच्या संपर्कामुळे त्यांना मिळालेले आहे. ते दैवी प्रभाव आणि सत्यास ग्रहण करतात. ते ईश्वरी व्यवस्थेच्या नियमांचे पालन करतात. जीवास देव ही संज्ञा प्राप्त करण्यासाठी ईश्वराच्या या स्वरूपाशी संबंध ठेवणे आवश्यक आहे.

### ईश्वराच्या निरपेक्ष आणि सापेक्ष स्वरूपावर एक दृष्टिक्षेप

### १) ईश्वराचे निरपेक्ष स्वरूप

ईश्वराचे निरपेक्ष स्वरूप हे त्याचे स्वत:चे वास्तविक स्वरूप आहे. याबाबतीत त्याला जीव आणि जगताची अपेक्षा नाही. या दृष्टीने तो कूटस्थ आणि तटस्थ आहे. तो साक्षी आहे, चेतन आहे, परंतु परम कैवल्य-भावनेशी संयुक्त आहे. जीव आणि जगताच्या गुणांपलीकडे आहे, अर्थात आमच्या गुणांच्या दृष्टीने तो निर्गुण आहे. त्याची समरसता, अखंडता, केवलता त्याला सर्व सत्तेचे कूट म्हणजेच शिखरावर प्रस्थापित करून देतात. श्वेताश्वतर उपनिषद् ३, १९ मध्ये त्याला अपाणिपाद, अचक्षु, अकर्ता परंतु सर्वज्ञ परम-पुरुष असे म्हटले आहे. हा परम-पुरुष जीवांसारख्या आशय, क्लेश आणि कर्मविपाकाशी परामृष्ट नाही. तो अजर, अमर, अकल, अनीह, अनादी, अभय इत्यादी नावांनी ओळखला जातो. वैदिक साहित्यामध्ये अव्रणम्, अकायम्, अस्नाविरम्, अपापविद्धम आदी निषेधात्मक (नकारात्मक) शब्दांमध्ये त्याचे वर्णन करण्यात आले आहे. (यजुर्वेद, ४०, ८) केनोपनिषद् (१, ३)चा ऋषी असेही म्हणतो की परब्रह्मापर्यंत ना दृष्टी जाते, ना वाणी पोहोचते, ना मन पोहोचते. कुणी कशा प्रकारे त्याचा उपदेश करावा? आम्ही जाणत नाही, समजत नाही, कारण की तो ज्ञातापासून काही दुसरेच आहे आणि अज्ञातापासून तर फारच दूर आहे. पूर्वीचे सर्व ऋषी ईश्वराच्या निरपेक्ष स्वरूपाचे वर्णन करताना हेच म्हणत आले आहेत.

तर मग काय ईश्वर अगम्य आहे? काय आम्ही त्याला समजूच शकत नाही? नव्हे, असे नाही. आम्ही त्याला काही प्रमाणात का होईना जाणतोच. सामवेद (५, ५) मध्ये एका ठिकाणी ईश्वराला अग्नीची उपमा दिली गेली आहे. तो प्रज्ज्वलित पण आहे, परंतु सोबत धूम्राने आवृत्त पण आहे. जेवढा अग्नी प्रज्ज्वलित आहे, तेवढा तो दिसून येतो. परंतु जेवढा धूम्र-आवृत्त आहे, तेवढा (भाग) तो दिसत नाही. अशाच प्रकारे ईश्वर काहीसा प्रकट आहे. ओळखीचा आहे, समजून येतो, तर काही असा आहे, जो अप्रकट आहे, अज्ञात आहे आणि अविदित आहे. म्हणजेच ईश्वर ज्ञात आणि अज्ञात, प्रकट आणि अप्रकट दोन्ही स्वरूपात आहे. आम्ही अल्प-ज्ञानी जीव ईश्वराच्या संपूर्ण रूपास समजण्यास असमर्थ आहोत, परंतु त्याच्याशी संबंधित काहीना काही ज्ञान निश्चित स्वरूपात होतच आहे. आमची ही ससीम शक्ती त्या असीम पूर्ण रूपास कसे बरे समजू शकेल? तर मग तो काय गुप्त-लपलेला आहे?

सामवेदाचे मंत्र, क्रमांक ३, १, १, ३ हा निरावरण शब्दांमध्ये घोषणा करतो की ईश्वर गुप्त-लपलेला नाही. तो अनावृत, अभिव्यक्त आणि सधस्थ आहे. आपल्या समोरच विद्यमान उपस्थित आहे. तो सर्वशक्तिमान, परम ऐश्वर्यमंडित परमेश्वर आवृत, आच्छादित, झाकला गेला होता, लपलेला नव्हता. तो दृष्टीपासून आड नाही. तो आम्हा सर्वांना सतत आपल्याकडे आकर्षित करत आहे. तो सदैव आमच्याजवळ आहे आणि आमच्या सेवेत मग्न आहे. अंतरात्म्याच्या ध्वनीमध्ये जणू काही त्याची सेवा-भावना झाकोळली आहे. तो आम्हास सदैव

अभ्युत्थानाकडे प्रेरित करत आहे. त्याचा ध्वनी, त्याची वाणी, त्याची सृष्टी हे सर्व काही त्याचे ज्ञान करून देत आहेत. त्याचे निरपेक्ष रूप सृष्टीमध्ये विविध गुणांच्या प्रकाशाद्वारे फार हृदयंगम होऊन जाते. ईश्वर लपलेला नसतो. माझ्या स्वत:इतकाच तो प्रकट आहे.

### २) ईश्वराचे सापेक्ष स्वरूप

ईश्वराच्या सापेक्ष स्वरूपामध्ये त्याचा शासक, न्यायी आणि पित्याचा भाव क्रमश: विकसित झालेला आहे, असे पाश्चात्य विद्वानांचे मत आहे. या तीन्ही रूपांविषयी आम्हा जीवांना आदरभावना आहे. ईश्वराचे आप्त, आनंद आणि पूर्ण रूप जीवनासाठी आदर्श राहिलेले आहे. म्हणून ते पण जीवासाठी पूज्य आहे. पूज्य भावनेमध्ये मानसशास्त्रीय दृष्टीने जे तथ्य निहित आहे, ते आहे पूजकाद्वारे पूज्याचे अनुकरण करणे. हे अनुकरण अनुकरणीयाच्या गुणांचे होते. जीवामध्ये सर्वात मोठी कमतरता ज्ञान किंवा प्रकाशाची असते. ज्ञानियांची संज्ञा देव आहे. हे देवपण प्रकाशमय आहेत. देवांचा देव, प्रकाशकांचा प्रकाशक परमेश्वर आहे. यजुर्वेद ३५, १४ मध्ये त्याला अंधाराच्या पलीकडील परमोत्तम ज्योती असे म्हटले गेले आहे. श्वेताश्वतर उपनिषद् ६, १४ च्या अनुसार या परमप्रकाशाच्या पुढे सूर्य, चंद्र, तारकावली, विद्युत, अग्नी इत्यादी कुणाचाच प्रकाश टिकत नाही. वस्तुत: ईश्वरच प्रकाशाचा केंद्र आहे. त्याच्यापासूनच इतर आपला प्रकाश ग्रहण करतात. जीव आपल्यामध्ये हा प्रकाश अथवा दिव्यतेच्या कमतरतेचा अनुभव करतो. म्हणून दिव्यतेचे धाम त्या परमेश्वराची पूजा करतो. गायत्रीमंत्रामध्ये जी प्रार्थना आहे, ती पण त्या परमदेवाचे, ईश्वराचे सर्वश्रेष्ठ तेज अथवा प्रकाशाचे ध्यान अथवा धारणेद्वारा आपल्या प्रकाशिका बुद्धीस प्रबुद्ध आणि प्रेरित करण्यासाठी आहे. वेदामध्ये ईश्वराच्या या अजस्त्र ज्योतिमध्ये जीवाची मिळून-मिसळून जाण्याची भावना अनेक वेळा प्रकट झाली आहे.

यहूदी आणि मुसलमान ईश्वरास शासकरूपामध्येच मानत आले आहेत. पवित्र कुराणामध्ये याचे प्रत्यंतर असे आहे (स्वैर अनुवाद) – 'अल्लाह प्रत्येक वस्तूवर प्रभुत्व राखणारा आहे.' २:२० 'पृथ्वी व आकाशांचे अधिपत्य अल्लाहकरिताच आहे.' २:१०७ 'पृथ्वी व आकाशात अस्तित्वात असलेल्या सर्व गोष्टी त्याच्या मालकीच्या आहेत, सर्वच्या सर्व त्याच्या हुकुमाच्या आधीन आहेत.' २:११५-१६ 'सर्व सामर्थ्य आणि सारे अधिकार अल्लाहच्याच ताब्यात आहे.' २:१६५ 'आकाश व पृथ्वी आणि त्यांच्या अस्तित्वात असलेल्या सर्वांची बादशाही अल्लाहकरिताच आहे.' ५:१२० 'अल्लाह एकमेव आहे, सर्वांवर प्रभुत्वसंपन्न, आकाशांचा, पृथ्वीचा आणि त्यांच्यातील सर्व वस्तूंचा तो स्वामी आहे.' ३८:६५-६६ 'परमप्रतिष्ठित व उच्च आहे तो ज्याच्या हातात सृष्टीची सत्ता आहे.' ६७:१ 'सर्व गोष्टी या निश्चितच त्याच्या (परमेश्वराच्या) अधीन आहेत.' ४१:५४. पवित्र कुराणामध्ये परमेश्वराने आपल्या प्रभुत्वाची आठवण मानवास वारंवार करून देताना जागोजागी असे म्हटले आहे –''सर्व वस्तुमात्रांवर अल्लाहची सत्ता आहे.'' ५९:६ आणि पुढे असेही म्हटले आहे – ''हे सर्व अल्लाहचे कार्य आहे ज्याने प्रत्येक वस्तूमात्रास परिपूर्ण घडवले आहे.'' २७:८८ ''सत्ताधिकार त्याचाच आहे.'' २८:८८ ''सर्व सत्ताधीश तोच आहे.'' २३:९५

येशू ख्रिस्ताने शासकरूपासोबत पित्याच्या भावनेचा समावेश केला आणि ईश्वरास आदर आणि प्रेम या दोहोस पात्र ठरवले. पुत्र पित्याशी प्रेम करण्याबरोबर भीती पण बाळगतो. म्हणून पित्यास पुत्राचे विशुद्ध प्रेम

प्राप्त होत नाही. प्रेमाच्या या भावनेची पुढील परिणती मातृभावना, दांपत्यभावना आणि सख्यभावना यामध्ये झाली. भक्तीचा प्रारंभ पण याच भावनांनी होतो.

### ३) ईश्वराचे दार्शनिक स्वरूप

ईश्वराच्या सत्तेमध्ये भक्ताचा विश्वास असतो. त्याच्या सत्तेवर त्याची श्रद्धा असते. भक्तीभावना ही ईश्वराच्या अस्तित्वाचीच आश्रित असते. साधारण मनुष्य आपल्या दैनंदिन विविध क्रिया-कलापांमध्ये ईश्वरास विसरतो. परंतु भक्तासाठी मात्र तोच प्राण आहे, जीवन सर्वस्व आहे. उच्च कोटीचा परमभक्त हा क्षणभरसुद्धा ईश्वरापासून वेगळा होऊ इच्छित नाही. क्षणोक्षणी त्याला ईश्वराच्या उपस्थितीचा अनुभव येत असतो. जे श्रद्धाहीन आहेत, त्यांना देखील संकट कोसळल्यावर ईश्वराची आठवण होते. घोर नास्तिक देखील कष्ट, विघ्न आणि अपयशाच्या विविध दशेमध्ये अधिक शक्तिशाली अशा दैवी अस्तित्वाची कल्पना करू लागतो.

सामान्य अवस्थेमध्ये मनुष्य ज्या ईश्वरावर श्रद्धा आणि विश्वास ठेवतो, त्या ईश्वराची दोन वैशिष्ट्ये सत् आणि चित् , व्यक्तित्व आणि सज्ञानता यांचे वर्णन ऋग्वेदाच्या मंत्र क्रमांक १/१६५/९ मध्ये असे आहे – हे परम ऐश्वर्यसंपन्न प्रभू! हे सर्वात प्राचीन, सनातन, शाश्वत, परमेश्वरा! तुझ्या अस्तित्वाहून श्रेष्ठ अस्तित्व येथे कोणाचेच नाही. तुझीच सत्ता सर्वोत्तम सत्ता आहे. तुझ्यासारखा ज्ञानी देव पण येथे नाही. तू जे काय करतोस आणि जे काय करशील त्याला येथे उत्पन्न झालेले आणि उत्पन्न होणारे प्राण्यांमधून कोणीच जाणत नाही. तुझे व्यक्तित्व आणि तुझे ज्ञान अद्वितीय आहे.

ईश्वराचे अस्तित्व आहे, ईश्वर ज्ञानवान आहे शिवाय तो आनंदाने ओतप्रोत आहे. त्याच्या आनंद रूपाचा उल्लेख अथर्ववेद (१०/८/१) मध्ये असा आहे – केवळ ईश्वराचे आनंदरूप आहे. त्या सर्वश्रेष्ठ ईश्वरास आमचा नमस्कार. यजुर्वेद १७/८० अनुसार ईश्वर शुद्ध आहे, कांती आणि तेजाने युक्त आहे, ऋतपा आहे आणि प्रकाशसंपन्न आहे. अशाच प्रकारे अथर्ववेद (१०/८/४४) या मंत्रामध्ये ईश्वरास अमृत, स्वयंभू आणि आनंदाने ओतप्रोत असे म्हटले आहे. या मंत्राचा संपूर्ण भावार्थ असा आहे – ईश्वर कामनाशून्य, धीर, अमृत, आपल्या अस्तित्वाने सत्तावान आणि आनंदरसाने परितृप्त आहे. त्याच्यामध्ये कसल्याच प्रकारची न्यूनता नाही. अशा ईश्वरास जाणून मनुष्य मृत्यूने भयभीत होत नाही. ऋग्वेद ८/४३/३१ मध्ये ईश्वराविषयी 'मंद्र' ऋग्वेद ४/३१/२ मध्ये 'मदातां मंहिष्ठ' आणि ऋग्वेद १०/५०/१ मध्ये 'मन्दमानाय' असे लिहिलेले आहे. 'मंद्र'चा अर्थ आहे आनंदित, 'मदानां मंहिष्ठ'चा अर्थ आहे सर्वात जास्त आनंदपूर्ण आणि 'मंदमानाय'चा अर्थ आहे मोदमान, सदैव आनंदमय. ऋग्वेद ९/११३/७ मध्ये पण ईश्वरास अजस्रज्योतिसंपन्न आणि आनंदस्वरूप असे म्हटले गेले आहे. तैत्तिरीय उपनिषत्कार म्हणतो की ज्याने ईश्वराच्या आनंदस्वरूपास समजून घेतले, तो पुन्हा भयभीत होत नाही. ईश्वराच्या पावित्र्याचा उल्लेख ऋग्वेद (८/४४/२१) मध्ये असा आहे – ईश्वर सर्वात अधिक पवित्र, पवित्र ज्ञानी आणि पवित्र कवी आहे.

यजुर्वेद ४०/८ मध्ये ईश्वराच्या निर्गुण आणि सगुण रूपाचे वर्णन अशा प्रकारे आलेले आहे – ईश्वर प्राकृत गुणांनी विहीत असल्याकारणाने निर्गुण आणि आपल्या गुणांशी सहित असल्या कारणाने सगुण म्हटला जातो. उपरोक्त मंत्रामध्ये अकायम्, अव्रणम् , अस्नाविरम्, अपापविद्धम् शब्दांमध्ये ईश्वराच्या निर्गुण रूपाचे वर्णन केले

गेले आहे आणि शुक्रम्, शुद्धम्, कविः, मनीषी, परिभूः आणि स्वयंभूः शब्दांद्वारे त्याचे सगुण रूप प्रकट झाले आहे. ऋग्वेद ७/४/४ मध्ये ईश्वरास अकवींमध्ये कवी आणि मर्त्यांमध्ये अमृत म्हटले आहे. कठोपनिषद् २/५/१ मध्ये त्याला नित्यांमध्ये नित्य आणि चेतनांमध्ये चेतन असे संबोधले गेले आहे.

ईश्वर स्थळ-काळाच्या सीमांमध्ये बांधला जात नाही. तो समस्त सीमांना अतिक्रांत करतो. तो असीम आहे, अनंत आहे, सूक्ष्माहून सूक्ष्म आहे आणि महानांहून महान आहे. अथर्ववेद ४/१६/३ चा ऋषी लिहितो – ईश्वर महान आहे. तो इतका महान आहे की ही पृथ्वी आणि तो अति दूरवर्ती व समीपवर्ती वर्तमान द्यौलोक (आकाश) आणि या दोहोमधील सर्व काही त्याच्या अस्तित्वामध्ये समाविष्ट आहे. या सर्वांमध्ये तो विराजमान आहे. पृथ्वीवरील हा विस्तृत समुद्र आणि अंतरिक्षस्थानीय वाफेची बृहत जलराशी त्याच्या काखेतील घामासारखी आहे. आणि सूक्ष्म इतका आहे की पाण्याच्या एका छोट्याशा थेंबामध्येसुद्धा तो समाविष्ट आहे. खालील मंत्र पण ईश्वराच्या व्यापक रूपाचे वर्णन करतात – प्रकाशपूर्ण ईश्वराच्या प्रकाशाची किरणे चारीकडे (चोहोबाजूंनी) विस्तारलेली आहेत. (ऋग्वेद १/९७/५) तो विश्वतोमुख आणि सर्वांमध्ये सामावलेला आहे. (ऋग्वेद १/९७/६) कठोपनिषद् २/२० ईश्वरास 'अणोरणीयान' आणि 'महतो महीयान' असे म्हणते. यजुर्वेद ४०/५ अनुसार तो सुदूराहून दूर आणि निकटाहून निकट अर्थात अंतर्यामी स्वरूपात सर्वांमध्ये विद्यमान आहे आणि सर्वाबाहेर पण वर्तमान आहे. यजुर्वेद ३२/८ मध्ये पण त्यास सर्वांमध्ये ओतप्रोत आणि सर्वव्यापक असे म्हटले आहे. अथर्ववेद १०/८/१२ मध्ये ईश्वरास अनंत आणि सांतांना चारी बाजूने घेरलेले असे दाखवले आहे. यजुर्वेदाच्या पुरुषसूक्ताने पण सहस्रशीर्ष, सहस्रपात असे म्हणत ईश्वराच्या अनंततेचे वर्णन केले आहे. ऋग्वेदाच्या ४/१/११ अनुसार ईश्वर हा अपादशीर्षा पण आहे.

ईश्वर सर्वशक्तिमान आहे. मरणधर्मा मानव दिव्यगुणसंपन्न देवता आणि त्याच्या शक्तीस मापू शकत नाहीत, असे ऋग्वेद १/१००/१५ मध्ये वर्णन आले आहे. श्वेताश्वतर उपनिषद् ने ईश्वराच्या स्वाभाविक विविध शक्तींचा उल्लेख केलेला आहे.

स्वयंभू, सर्वशक्तिमान, सर्वव्यापक, सत्-चित्-आनंद-स्वरूप सत्ता एक आहे, याचा उल्लेख वेदामध्ये अनेक स्थळी आहे. तो ईश्वर निश्चितपणे एक आहे. देव अनेक आहेत, परंतु देवांचा देव परमेश्वर एकच आहे. तो एक असून पण अनेक नावांनी पुकारला जातो. इंद्र, अग्नी, वरुण, मित्र, सुपर्ण, गरूत्मान इत्यादी विविध नावे त्याच एका ईश्वराची आहेत. वेदाने या तथ्याची घोषणा कितीतरी वेळा केलेली आहे. ईश्वर एकमेवाद्वितीय सार तत्त्व असून, अस्तित्व हा त्याचा सारभूत गुण आहे.

ज्ञानावतार स्वामी श्रीयुक्तेश्वर प्रणीत **'कैवल्यदर्शनम्'**[२५] मध्ये ईश्वराचे स्वरूप असे निर्दिष्ट केले आहे –

परब्रह्म हा चिरंतन आणि परिपूर्ण असा आहे. तो अनादी, अनंत आहे. तो अविभाज्य परम सत्ता आहे. ते अविनाशी असे सत्-तत्त्व आहे. त्या परब्रह्माच्या ठिकाणीच संपूर्ण ज्ञानाचे व प्रेमाचे बीज, चैतन्य, सर्व शक्तीचे मूळ व आनंद आहे. ते परब्रह्म निर्मिती-स्रोत आहे. ते जड प्रकृती निर्माण करते. ॐ प्रणव हे सर्वशक्तिमान बळाचे आविष्करण आहे. ॐकारापासून काळ, दिशा आणि अणू निर्माण होतात. अणूमुळे सृष्टीनिर्मिती होते. अणुंच्या समष्टीस माया म्हणतात. ईश्वराची मायाशक्ती हेच या जगाच्या उत्पत्तीचे कारण आहे. त्याचे व्यष्टिरूप म्हणजे अविद्या. सर्वज्ञ प्रेमाचे बीज जे परब्रह्म, तेच कूटस्थ चैतन्य होय.

### ४) इस्लामी तत्त्व-चिंतनानुसार अल्लाह (परात्पर परब्रह्म)चे स्वरूप

एकेश्वरवादावर दृढ आस्था व निष्ठा हा इस्लामी तत्त्वज्ञानाचा कणा आहे. अल्लाह एक आहे, याचा मन:पूर्वक स्वीकार करणे आणि वाचेने त्याचे समर्थन करणे, याला एकेश्वरवाद असे म्हणतात. अल्लाहसारखा दुसरा कुणीही नाही. तो एक आहे. तो एकमेवाद्वितीय आहे. तो निस्पृह आणि निरपेक्ष आहे. तो न जनिता आहे न जन्य. अशी अल्लाहच्या स्वरूपाची ढोबळ रूपरेषा एकेश्वरवाद मांडतो.

अल्लाहसंबंधी इस्लामी तात्त्विक धारणा पुढीलप्रमाणे आहे – सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा एक आहे. तो परमेश्वरच उपासनेस योग्य असा आहे. त्याच्याशिवाय अन्य कोणीच उपास्य नाही. तोच आराध्य व पूज्य आहे. त्याचा कोणीही (दुसरा असा) सहभागी नाही. तो प्रत्येक गोष्ट जाणतो. कोणतीही गोष्ट त्याच्यापासून लपून नाही. तो मोठा शक्तिशाली आणि समर्थ असा आहे. त्यानेच पृथ्वी, आकाश, सूर्य, चंद्र, तारे, ग्रह, देवदूत, मानव, यक्ष-किन्नर अर्थात समस्त विश्वाची निर्मिती केली आहे, आणि तोच समस्त ब्रह्मांडाचा अधिपती आहे. तोच जन्म आणि मृत्यू देतो. म्हणजेच त्याच्याच आदेशाने सजीवांचा जन्म-मृत्यू हा होतो. तोच समस्त सृष्टीचा पोशिंदा आहे. त्याला ना गुंगी घेरते ना निद्रा वेढते. तो अन्नपान करत नाही. तो सदासर्वदा स्वयंभू आहे. तो चिरकाल असेल. त्याला कुणीच निर्माण केले नाही. त्याचे माता-पिता नाहीत. त्याला पत्नी, पुत्र-पौत्रादी नाहीत. त्याचे कुणाशीही नातेसंबंध नाहीत. तो सर्व नातेसंबंधांपासून मुक्त आहे. सर्व त्याच्यावर निर्भर आहेत. तो कुणावरही अवलंबून नाही. त्याला कशाचीही गरज नाही. तो अनुपमेय आहे. कोणतीच वस्तू त्याच्यासारखी नाही. तत्सम कोणीही नाही. तो सर्व दोषांपासून मुक्त आहे. त्याला सजीवांसारखे हात-पाय, नाक, कान आणि रूप-आकार नाही. तो निराकार आहे, निर्गुण आहे. त्याने देवदूतांना निर्माण केले आणि त्यांच्यावर ब्रह्मांडाच्या व्यवस्थेची जबाबदारी सोपविली. त्याने मानवास मार्गदर्शन करण्यासाठी प्रेषित पाठवले. लोकांना सद्धर्माची शिकवण देण्यासाठी, सदाचाराकडे प्रवृत्त करण्यासाठी आणि दुराचारापासून परावृत्त होण्यासाठी त्यानेच प्रेषितांकरवी सन्मार्गाची शिकवण दिली.

अल्लाह अनादी, अनंत व चिरंजीवी आहे. तो स्थिर आहे. त्याचे सिंहासन आकाश आणि पृथ्वी यांना व्यापून आहे. त्यांचा सांभाळ करण्याचा कंटाळा त्याला येत नाही. तो सर्वोच्च आहे, प्रचंड आहे. तो अल्लाहच होय आणि त्याच्याशिवाय अन्य कोणताही ईश्वर नाही. तो अव्यक्त-व्यक्ताचा ज्ञाता आहे. तो सर्वज्ञ आहे. तो कृपाळू आणि दयाळू आहे. तोच अल्लाह ईश्वर आहे, आणि त्याच्याशिवाय अन्य कोणताही ईश्वर नाही. तो सर्वाधिपती पवित्रतम, त्राता, शांतिदाता, श्रद्धा-प्रतिपालक, रक्षक, सर्वजित, सर्वशक्तिमान, नियंता, निर्माता, भव्य व सर्वश्रेष्ठ आहे. ते ज्यास त्याचे सहभागी ठरवतात त्यापेक्षा अल्लाह कितीतरी पवित्र आहे. तोच अल्लाह आहे, स्रष्टा, रचयिता, स्वरूपदाता. तो सर्वजित् व सर्वविद् आहे. तो अंतर्यामी आहे. अतिसुंदर नावे त्याचीच आहेत. आकाश, भूमी आणि त्यातील सर्व त्याच्या पावित्र्याचे गुणगान आणि जप करतात.

### ५) अल्लाहचे स्वरूप : सनातनपंथी इस्लामी दृष्टिकोन[२६]

सनातनपंथी इस्लामच्या अनुसार परमात्मा एक आहे आणि त्याच्यासारखा दुसरा कुणीच नाही. स्थळ-काळाच्या परिधीमध्ये तो बांधला जात नाही. तो स्वयंपूर्ण आहे. त्याला कुणाचीच अपेक्षा नाही. त्याची ज़ात

(सत्ता) आणि सिफ़ात (रूपे, गुण) अपरिवर्तनशील आहेत. तो सर्वशक्तिमान आहे. तो सर्व काही जाणणारा आहे. तो क्षमाशील आहे. त्याच्याबाहेर ना कोणत्या प्रकारचे ज्ञान आहे ना कुठल्याच प्रकारची सत्ता. जे काही आपण पाहातो आणि ज्या कुठल्याही वस्तूचे अस्तित्व आहे ते त्याच्यावरच निर्भर असते. तो सर्वज्ञ आहे. तो मनुष्याच्या ज्ञानाच्या सीमेबाहेर आहे. त्याचे ज्ञान, कर्म आणि स्वभाव हे माणसाचे ज्ञान, कर्म आणि स्वभावाहून भिन्न आहेत. त्याचे पाहाणे, ऐकणे हे आमच्यासारखे नाही. त्याच्या न्यायामध्ये कोणीच हस्तक्षेप करू शकत नाही. त्याचे न्याय हे त्याचेच न्याय आहे. सृष्टीकर्ता तोच आहे. चांगले वा वाईट निर्माण करणारा तोच आहे. तो अवतार धारण करत नाही. त्याची सृष्टी आणि त्याच्या दरम्यान दुसरा कोणीच नाही. काहीजण परमेश्वराचे प्रेषित अवश्य आहेत. त्यांचे कार्य त्याच्या आदेशांना मानवापर्यंत पोहोचविणेच असते. ईश्वर आणि मानव यांच्यामधील व्यवधानावर पवित्र कुराणामध्ये जोर देण्यात आला आहे. त्याने निर्माण केलेली सृष्टी आणि त्याची कार्ये यांना पाहूनच मानव हा त्याच्या गूढांस समजण्यास समर्थ होऊ शकतो. जे त्याला समजू इच्छितात, जाणू इच्छितात ते सृष्टीचे विभिन्न व्यापार पाहून त्याला समजू शकतात. पवित्र कुराणात म्हटले गेले आहे, ''खरोखर, आकाश आणि पृथ्वी यांच्या निर्मितीमध्ये आणि रात्र व दिवसाच्या एकापाठोपाठ येण्यामध्ये, मानवाच्या लाभार्थ सामग्री घेऊन समुद्रात संचार करणाऱ्या नौकांमध्ये, तसेच जे पर्जन्य अल्लाह आकाशातून वर्षवतो, आणि त्यापासून मृतप्राय झालेल्या जमिनीला पुनरूज्जीवित करतो, आणि त्याने पृथ्वीवर सर्व प्रकारच्या पशूंना वाढीस लावले यामध्ये आणि वाऱ्यांच्या बदलामध्ये आणि आकाश व पृथ्वी यांच्यादरम्यान नेमून दिलेल्या मार्गावर मार्गस्थ असलेल्या ढगांमध्ये, समजूतदार लोकांसाठी अनेक प्रकारचे संकेत आहेत.'' २:१६४ 'डोंगरात आणि झाडांमध्ये राहणाऱ्या मधमाशा' १६:६८ 'खजूर आणि द्राक्षे' १६:७ 'हवेत उडणारे पक्षी' १६:७९ खरोखर यामध्येही एक संदेश असलेली खूण आहे, चिंतन करणाऱ्या लोकांसाठी.

''अल्लाह आकाश आणि पृथ्वी यांचा प्रकाश आहे. (सृष्टीमध्ये) त्याच्या प्रकाशाची उपमा अशी आहे जणू एका कोनाड्यामध्ये दिव्याची ज्योत तेवत असेल. तो एक पारदर्शी काचेत ठेवलेला, जणूकाही मोत्याप्रमाणे चमकणारा तारा. ........... अल्लाह इच्छितो त्यास आपल्या प्रकाशाचा मार्ग दाखवतो. तो लोकांना दृष्टान्त देऊन गोष्ट समजावून देतो.'' २४:३५ (सन्मार्ग लाभलेले लोक) अशा प्रार्थनालयात त्याची उपासना करतात, ज्यांना निर्माण करण्याची परवानगी अल्लाहने दिलेली आहे, यासाठी की, तेथे सकाळ-संध्याकाळ त्याच्या असीम महतीचे गान केले जावे. हे असे लोक आहेत, ज्यांना व्यवसाय आणि देवाणघेवाणीचे व्यवहार या गोष्टी अल्लाहच्या स्मरणापासून बेसावध करू शकत नाहीत, तसेच नित्य उपासना (नमाज पढण्यापासून) करण्यापासून व दानधर्म (जकात देणे) करण्यापासून देखील, (ते बेसावध होत नाहीत). ते (नेहमी) त्या दिवसाचे भय बाळगून असतात, ज्या दिवशी हृदये आणि डोळे अगदी ढवळून निघतील (म्हणजे जो दिवस लोकांना हादरवून सोडेल).'' २४:३६-३७ ''(आणि ते केवळ ही आशा बाळगून असतात की), अल्लाह त्यांना त्यांच्या (सत्)कर्मांचा मोबदला देईल आणि आपल्या कृपेने त्यांना आणखी जास्तही देईल. अल्लाह ज्याच्या बाबतीत इच्छितो त्यास अमाप देतो. जे लोक सत्य नाकारण्यावर ठाम राहिले, त्यांची कर्मे वाळवंटातील मृगजळाप्रमाणे आहेत. तहानलेला माणूस त्याला पाणी समजतो. पण जेव्हा तो त्याच्याजवळ जातो तिथे काहीच असत नाही. पण तिथे त्याला अल्लाह असल्याचे आढळते. तो त्याला त्याच्या (कर्मांचा) पुरेपूर मोबदला देऊन टाकतो.

आणि अल्लाह हिशेब करण्याच्या बाबतीत फार शीघ्र आहे.'' २४:३८-३९ ''तुम्ही हे (चिंतनपूर्वक) पाहत नाही का? की, सर्व (प्राणिमात्र) जे आकाशात आहेत किंवा पृथ्वीवर आहेत, अल्लाहच्या असीम महानतेचे गान गात असतात. तसेच आपले पंख पसरवून उडणारे पक्षीदेखील. त्यांपैकी प्रत्येकाला आपापल्या प्रार्थनेची व स्तुतिगान करण्याची पद्धत माहीत आहे. आणि अल्लाहला ते जे काही करतात, याचे पूर्ण ज्ञान आहे. कारण अल्लाहची सत्ता आहे, आकाशात आणि पृथ्वीवर आणि सर्वांना त्याच्याकडेच परत जायचे आहे.'' २४:४०-४१

म्हणून आपणाला असे आढळून येते की कुराणोक्त अल्लाह समस्त ब्रह्मांडावर दृष्टी ठेवून म्हणजेच लक्ष ठेवून असतो आणि तो माणसांच्या बऱ्या-वाईट कर्मांना जाणतो. तो आपल्या न्यायासनावरून वाईट कर्मे करणाऱ्यांना दंड देतो आणि सत्कर्मे करणाऱ्यांना पुरस्कृत करतो. त्यांचे रक्षण करतो. त्याचे दुसरे एक रूप पण आपणासमोर येते आणि ते आहे अल हक़्क अर्थात सत्य (सत्याचे रूप), शाश्वत आणि अनश्वर रूप. याउलट अन्य सर्व वस्तू क्षणभंगुर आणि नश्वर आहेत. तो अनुपम आहे. तत्सम कोणीच नाही. तो निर्वैयक्तिक आहे. सनातन पंथी इस्लामी धारणेनुसार मानव आणि अल्लाहमधील संबंध हा निरंकुश स्वामी आणि दासाचा आहे. हा सेव्य-सेवक संबंध आहे. म्हणून तर पवित्र कुराण असे सांगते - ''आकाशात आणि पृथ्वीवर जे काही आहे सर्व त्याच्या ठायी दास म्हणून हजर होणार आहेत.'' १९:९३

### ६) अल्लाहचे स्वरूप : सूफ़ीवादी दृष्टिकोन

ईश्वराच्या स्वरूपासंबंधी प्राय: सर्व सूफ़ी संप्रदायांमध्ये स्वीकृत दृष्टिकोन पुढीलप्रमाणे आहे. सूफी पण सनातनपंथी मुसलमानांप्रमाणेच परमेश्वराच्या संबंधात 'एकेश्वरवादा'वर विश्वास ठेवतात, परंतु दोघेही ईश्वरास आपापल्या पद्धतीने मानतात. सनातनपंथी इस्लामी धारणेनुसार परमेश्वर हा स्वत:सारखा स्वत:च आहे. तत्सम कोणी नाही. सत्ता (ज़ात), गुण (सिफ़ात) आणि कर्म (अफ़आल) यांमध्ये परमेश्वर अद्वितीय आहे. त्यांची तुलना कशाशीच होत नाही. सृष्टीच्या सर्व पदार्थांहून तो भिन्न आहे. परंतु सूफींसाठी 'एकेश्वरवादा'चा अर्थ वेगळा आहे. परमेश्वर एक आणि अद्वितीय व निरपेक्ष आहे, हे स्वीकारूनसुद्धा सूफींचे असे मत आहे की या दृश्य जगामध्ये परिव्याप्त एकमात्र तोच सत्य आहे. केवळ त्याचीच एकमात्र सत्ता आहे, जी पूर्वी होती आणि भविष्यात पण राहणारी आहे. म्हणून या बाबीचा विचार करण्याच्या असा अर्थ होतो की जर परमेश्वरास सोडून इतर कोणत्याच वस्तूची सत्ता नाही आहे तर मग हे आखिल विश्व परमेश्वराशी एकरूप आहे आणि प्रतीयमान म्हणून जेवढ्या पण सत्ता आहेत ते सर्व त्याच्यामध्येच अंतर्निहित आहेत. फारसी सूफ़ी कवी जामी एके ठिकाणी लिहितो -

''तो अद्वितीय पदार्थ जो निरपेक्ष आहे, अगोचर आहे, अपरिमित आहे आणि जो 'नानात्व'च्या पलीकडे आहे, तोच अल-हक़्क़ (परमसत्य) आहे. दुसरीकडे आपले नानात्व आणि अनेकत्वामध्ये जेव्हा तो सर्व गोचर वस्तूंमध्ये स्वत:सच प्रकट करतो तेव्हा रचलेली ही संपूर्ण सृष्टी तोच आहे. म्हणून ही सृष्टी त्या परम सत्याची दृश्य बाह्य अभिव्यक्ती आहे आणि तो परमसत्य या सृष्टीचे अभ्यंतर अदृश्य सत्य आहे. ही सृष्टी गोचर होण्याअगोदर त्याच परम सत्यासारखी होती आणि गोचर झाल्यानंतर त्या परम सत्याचे या सृष्टीशी सादृश्य झाले.''

तो परम सत्याशिवाय परमकल्याण (शिव)पण आहे आणि ज्याअर्थी तो परमकल्याण आहे त्याअर्थी तो परमसौंदर्य आहे. सौंदर्य, कल्याणाचेच एक रूप आहे. संपूर्ण सृष्टी त्याच्याच प्रकाशामध्ये प्रकाशित आहे. ज्याप्रमाणे सूर्यापासून सूर्याची किरणे निघतात तरी पण सूर्य जसाचा तसाच राहातो, त्याचप्रमाणे परमेश्वर आणि सृष्टीचा संबंध आहे आणि त्यामुळे परमेश्वराच्या एकत्वास बाधा येत नाही. हे इंद्रियगोचर जग अग्नीच्या वर्तुळाकार चक्राप्रमाणे आहे, जे एकाच अग्नी-स्फुल्लिंगास चारी दिशेस जोराने फिरविल्यामुळे बनते. कित्येक असेही पण सूफी आहेत जे म्हणतात की सृष्टी आरशासारखी आहे की ज्यामध्ये परमेश्वराचे गुण प्रतिबिंबीत होतात. सूफी कवी जामीने त्याच्या एका कवितेमध्ये असे म्हटले आहे – ''तू परम सत्ता आहेस, आणि शेष सर्व काही मृगजळ मात्र आहे, कारण की तुझ्या सृष्टीमध्ये सर्व वस्तू एक आहेत. संपूर्ण सृष्टीस मुग्ध करणारे तुझे सौंदर्य आपल्या पूर्णतेस प्रकाशित करण्यासाठी हजारो आरशांमध्ये प्रतिभासित होते, परंतु ते (सौंदर्य) एकच आहे.''

अशा प्रकारच्या सूफींच्या या सिद्धान्तास मान्य करण्याचा हा अर्थ होतो की जर परमेश्वरास सोडून आणखी कुठल्याच वस्तूची सत्ता नाही तर हे अखिल विश्व परमेश्वराबरोबर एक आहे आणि अखिल विश्वाबरोबर मनुष्यपण परमेश्वराबरोबर आहे. मग भलेही सूर्यकिरणांशी त्या (मनुष्या)ची तुलना करू दे अथवा परमेश्वराच्या गुणांना प्रतिबिंबित करणारा आरसा म्हणून मानू दे. मग स्वाभाविकपणे असा प्रश्न उपस्थित होतो की आता जर परमेश्वरच सर्व काही आहे तर मग त्याला स्वत:स प्रकट करण्याची गरज का म्हणून भासली आणि तो 'एक' 'अनेक' कसा बरे झाला!

मागेच आपण पाहिले आहे की परमेश्वर निरपेक्ष आणि अनंत आहे आणि ही सृष्टी नाशवान आणि क्षणभंगुर आहे. परंतु कधी काळी असे पण असेल की, परमेश्वर एकटाच असला पाहिजे आणि त्याचे सौंदर्य आणि ऐश्वर्य चमकत असले पाहिजे. त्यावेळी त्या सौंदर्यास पाहून उन्मत्त होणारा दुसरा कोणीच नसेल. त्या परम सौंदर्याचा उपभोग करणारा दुसरा कोणीच नसला पाहिजे. ते सौंदर्य आणि त्या विभूतीस पाहून आत्मविभोर होऊन जाणारा कोणीच नसला पाहिजे. अशा त्या वेळेस त्या परम सौंदर्यास आपल्या स्वत:सच प्रकाशित करण्याची इच्छा झाली असली पाहिजे. आणि सौंदर्याची नेहमी स्वत:स प्रकट करण्याची इच्छा असते. स्वत:स प्रकट केल्याशिवाय सौंदर्यास राहवत नाही. स्वत:स प्रकट करण्याची ही बेचैनी नाना रूपांमध्ये नाना प्रकारे अभिव्यक्त होते. यास्तव ते अनंत सौंदर्य आणि अनंत विभूतिस आत्म-प्रकटीकरणाची जेव्हा अभिलाषा उत्पन्न झाली तेव्हा या दृश्य जगाचा (विश्वाचा) आविर्भाव झाला. हे जग त्या सौंदर्यास आंशिक रूपामध्ये प्रकट करते. याच्या समर्थनार्थ पुढील हदीस (प्रेषीतवचना)चा हवाला दिला जातो –

'मी स्वत:मध्ये आवृत्त एक कोश (खजिना) होतो. स्वत:स ओळखण्यासाठी, स्वत:च्या आत्मोपलब्धीसाठी मी स्वत:स वेगळे करून घेऊन ही सृष्टी निर्माण केली.' (हदीस-ए-कुदुसी) सूफी यालाच सृष्टीनिर्मितीचे कारण मानतात.

त्या निरपेक्ष परमसत्तेस, जी परमसौंदर्य आणि परमकल्याण पण आहे, स्वत:स प्रकट करण्यासाठी या असत् क्षणभंगुर जगाची निर्मिती करावी लागली. परस्पर विरोधी तत्त्वांच्या अस्तित्वामुळे त्या तत्त्वांचा परिचय सहज होऊन जातो. अंधाराचे असणे हे प्रकाशाचे ज्ञान करून देते. म्हणून त्या परम सत्तेचे ज्ञान या असत् सृष्टीच्या

मदतीने होणे शक्य आहे. वास्तविक सत्ता नसलेल्या सृष्टीच्या मदतीने त्या ईश्वरास जी परम सत्ता आहे, समजण्यास साहाय्यक सिद्ध होते. सुंदरतेचे ज्ञान असुंदरतेद्वारे, चांगल्याचे ज्ञान वाईटावरून, मांगल्याचे ज्ञान अमंगलवरून सहज प्राप्य आहे. त्या परमसत्तेचे, परमसौंदर्य आणि परमकल्याणाचे ज्ञान प्राप्त करणे या सृष्टीच्या मदतीने शक्य होते. परंतु याचा एक दुसरा पैलू पण आहे. आणि तो हा की, हे विश्व नाशिवंत आहे आणि खरोखर याची सत्ता नाही आणि ज्याला आपण वाईट, पाप, अमंगळ आणि अ-सुंदर समजतो तो वास्तवात भ्रम आहे. कारण, ज्याप्रकारे परमसौंदर्य आणि परमकल्याणची वास्तविकता आहे त्या प्रकारची यांची नाही. हे नकारात्मक आहेत. खरोखर मुळात ते नाहीतच. हे अवास्तविक दृश्य जग अ-सत्‌च्या आरशामध्ये प्रतिबिंबित होणारे त्या परम सत्तेचे प्रतिबिंब आहे. याची ओळख अधिक स्पष्टपणे अशी करून घेता येईल की सूर्यप्रकाश पाण्यावर पडतो आणि पाण्यामध्ये निर्माण होणाऱ्या त्याच्या प्रतिबिंबावरून आम्ही सूर्यास पाहू शकतो. हे प्रतिबिंब खरे म्हणजे सूर्यामुळे आहे. जर सूर्य नसेल तर प्रतिबिंब पण असणार नाही. त्या प्रतिबिंबास आपल्या अस्तित्वासाठी सूर्यावर अवलंबून रहावे लागते, परंतु सूर्याचे अस्तित्व प्रतिबिंबामुळे नसते. हे प्रतिबिंब हजारो वेळा निर्मित होऊन लुप्त होऊ शकते. त्यामुळे सूर्याचे काहीच बिघडत नाही. सूर्य आहे तसाच असतो. त्या प्रतिबिंबाच्या असण्या किंवा नसण्यामुळे त्या (सूर्या)च्या मध्ये काहीच कमी-जास्त होत नाही. अशाप्रकारे पाणी हे सूर्यास प्रतिबिंबित करणारे, आरशासारखे आहे. येथे स्पष्टपणे तीन गोष्टी दिसून येतात - एक तर सूर्य आहे आणि दुसरे त्या सूर्यास प्रतिबिंबित करणारे पाणी आणि तिसरे प्रतिबिंब. सूर्यासारखी ती परम सत्ता आहे, जिला आपण परमेश्वर म्हणून संबोधतो. अ-सत् हे तिला प्रतिबिंबित करणारे पाण्यासारखे आहे, जे सत्तेचे नकारात्मक रूप आहे आणि सूर्याच्या प्रतिबिंबासारखे हे दृश्य जग आहे, जे परमेश्वराचे प्रतिबिंब आहे. हे दृश्य जगत परमेश्वराच्या सत्तेवरच निर्भर असते. हिची आपली म्हणून कोणतीही स्वतंत्र सत्ता नाही.

हे दृश्य जग आणि मनुष्य यांच्या संबंधाच्या अनुषंगाने सूफींचे असे म्हणणे आहे की असत्‌च्या आरशामध्ये प्रतिबिंबित होणाऱ्या परमेश्वराच्या पडछायेसारखे हे दृश्य जग आहे तर मनुष्य हा त्या पडछायेच्या डोळ्यासारखा आहे. परमेश्वर हा आपल्या पडछायेमध्ये प्रकट होतो तसेच मनुष्यामध्ये पण स्वत:स प्रकट करतो. अशाप्रकारे एक तर ती सृष्टी आहे, जी परमेश्वराची पडछाया आहे आणि दुसरे ज्याप्रमाणे डोळ्याच्या बुबुळ्ळामध्ये संपूर्ण प्रतिबिंब उमटते त्याचप्रमाणे मनुष्य जो त्या पडछायेकरता डोळ्यासारखा आहे, त्या परमेश्वरास आणि त्याच्या पडछायेस आपल्यामध्ये सामावून (वसवून) घेतले आहे. यास्तव एकीकडे परमेश्वर आपली पडछाया अर्थात दृश्य जगामध्ये स्वत:स प्रकट करतो तर दुसरीकडे मानवामध्ये सुद्धा परमेश्वराच्या पडछायेच्या डोळ्यासारखा आहे.

आता आपल्याला कळून येते की मनुष्य एकीकडे तर सृष्टीचा घटक (अंग) आहे तर दुसरीकडे त्याने परमेश्वरास पण आपल्यात ग्रहण करून घेतले आहे. म्हणून त्याच्यामध्ये दोन गोष्टी आढळतात. त्याच्यामध्ये सत् आणि असत् दोन्ही विद्यमान आहेत. परमेश्वराच्या अंशस्वरूप या नात्याने त्याच्यामध्ये शाश्वत सत्तेचे पण अस्तित्व आहे आणि क्षणभंगुर सत्तेचा अंश आसल्याकारणाने त्याच्यामध्ये अ-सत्‌चे पण अस्तित्व आहे. या सृष्टीमध्ये त्याचे विशिष्ट स्थान आहे; त्याच्यामध्ये चांगुलपणसुद्धा आहे आणि वाईटपणा सुद्धा. या मनुष्यामध्ये जे काही चांगुलपण आहे, जे काही सत्य आहे ते परमेश्वराचे आहे, त्याव्यतिरिक्त या तत्त्वांच्या विपरीत इतर जी

काही वस्तू (गोष्ट) त्याच्यामध्ये आहे, ते अ-सत् आहे, क्षणभंगुर आहे आणि कल्याण व मंगलाच्या नकारात्मक स्वरूपात त्याच्यामध्ये विद्यमान आहे.

अशाप्रकारे आपण पाहतो की 'परमेश्वरच एकमात्र सत्ता आहे'. हा सिद्धान्त मान्य करण्याच्या फलस्वरूप सूफी हे पण मान्य करू लागले की, तो (ईश्वर) ब्रह्मांडाच्या सर्व पदार्थांमध्ये विद्यमान आहे. त्यांच्या मतानुसार सर्व दृश्य किंवा अदृश्य वस्तूंचा उगम तोच आहे आणि त्यामुळे त्यांची वेगळी सत्ता नाही. चांगले अथवा वाईटामध्ये काही फरक नाही, कारण की सर्वांचे पर्यवसन त्याच 'एक'मध्ये होते. माणसांच्या कर्मांचा विधायक तोच आहे. माणसामधील इच्छाशक्तीचा प्रेरक तोच आहे. म्हणून मनुष्य आपल्या कर्तव्य-कर्मामध्ये स्वतंत्र नाही. त्या परम ज्योतिच्या एका किरणासारखा तो आहे. माणसामध्ये जो ईश्वरीय अंश आहे आणि जो त्या विशुद्ध सत्तेच्या एका ठिणगीसारखा आहे, तो कळत-नकळत या गोष्टीच्या सतत प्रयत्नात असतो की त्याच उगम स्थळाकडे परतून त्याच्याशी एकरूप व्हावे; परंतु जोपर्यंत हे असत् तत्त्व (शरीर) सोबत असते तोपर्यंत तो यामध्ये कृतकार्य होत नाही. या शरीरापूर्वी जी आत्म्याची सत्ता होती ती जणू याच्यामध्ये कैदेत ठेवलेली आहे. म्हणून सूफी साधक मृत्युचे स्वागत करतात. त्यांचे असे म्हणणे आहे की मृत्युमुळे ते परमेश्वराजवळ पुन्हा पोहोचू शकतात; परंतु ते हे पण म्हणतात की, परमेश्वराच्या कृपेशिवाय मीलन शक्य नाही. म्हणून साधकाची सर्वात मोठी साधना ही असते की त्याने हे आपले अ-सत् तत्त्व आणि सत्य प्रतीत होणाऱ्या 'अहम'वर विजय मिळवावा. हा 'अहम' सर्वात जास्त भ्रमामध्ये टाकतो आणि सर्व दुःखांचे मूळ आहे, म्हणून याच्यावर विजय प्राप्त करायचा असतो आणि यासाठी या ज्ञानाची उपलब्धी आवश्यक आहे की खरोखर परमेश्वरास सोडून जे काही आहे ते नाशिवंत आहे, भ्रम आहे, अ-सत् आहे आणि कल्याणाचे नकारात्मक रूप आहे. त्यालाच सत्य समजणे आणि याच भ्रमामध्ये स्वतःस विसरून जाणे दुःखाचे कारण आहे. यामुळे सूफी साधकांचे म्हणणे आहे की ज्ञानप्राप्तीसाठी आणि परमेश्वराच्या कृपादृष्टीसाठी साधकास निरंतर परमेश्वराची आळवणी केली पाहिजे, कृपायाचना केली पाहिजे. त्यांच्या दृष्टीने सूफीचे मुख्य कर्तव्य आहे की त्याने 'वहदानिया' (परमेश्वराच्या 'एकत्वा'चे ध्यान) 'जिक्र' (परमेश्वराचे स्मरण) आणि 'तरीक़ा' (सूफी मार्गावर अग्रेसर होणे) यांमध्ये मग्न असावे. कारण की यांच्याद्वारेच शेवटी परमेश्वराशी एकमेक होणे संभव (शक्य) आहे.

अल्लाहच्या स्वरूपासंबंधी सूफी तत्त्वज्ञानामध्ये दोन प्रमुख सिद्धान्त 'वहदतुल वजूद' (अद्वैतवाद) आणि 'वहदतुश्शुहूद' (विशिष्टा द्वैतवाद) प्रचलित आहेत. यापैकी 'वहदतुल वजूद' या सिद्धान्ताचे विशिष्ट स्थान आहे. या सिद्धान्ताने संपूर्ण सूफी चिंतनधारेस प्रभावित केले आहे. या सिद्धान्ताचे प्रवर्तक शेख मुहियुद्दीन इब्नुल अरबी हे होते. हे एक महान सूफी साधक आणि विचारवंत होते. त्यांनी आपल्या आध्यात्मिक अनुभवांच्या आधारावर या सिद्धान्ताची प्रतिष्ठा केली होती आणि कुराण व हदीस (प्रोषित वचन)च्या आधारावर याची सुसंगती इस्लामशी बसविली होती. याच कारणामुळे या सिद्धान्ताचा प्रभाव इस्लामी जगतावर आणि विशेषतः विभिन्न सूफी संप्रदायांवर व्यापक प्रमाणावर होता. यानंतरचा कोणताच सिद्धान्त याच्या प्रभावाविना दिसून येत नाही. लोकांमध्ये यांना बराच आदर, मान होता. त्यांना 'शेख़ अकबर' (सर्वात महान शेख) असे म्हटले जाते आणि यावरूनच त्यांचे महत्त्व दिसून येते.

**१) वहदतुलवजूद : (अद्वैतवाद)** – या सिद्धान्तानुसार वास्तविक सत्ता 'एक' आहे. त्या सत्तेशिवाय अन्य कुठल्याच सत्तेचे अस्तित्व नाही आणि ती एकमात्र सत्ता – परमेश्वर आहे. हे संपूर्ण दृश्य जग त्याच परम सत्तेची अभिव्यक्ती आहे. म्हणून परमेश्वर आणि जग यामध्ये साम्य आहे. ही समानता ज़ात (सत्ता) आणि सिफ़ात (गुण, रूप)ची आहे. हे विश्व त्याचे सिफ़ात (गुणां)ची तजल्ली (अभिव्यक्ती) मात्र आहे. अशाप्रकारे इब्नुल अरबीच्या मते परमेश्वरच एकमात्र सत्ता आहे आणि इतर सर्व पदार्थ त्याची अभिव्यक्ती मात्र आहे. 'हमावुस्त' अर्थात 'सर्व काही तोच आहे', 'तोच सर्वस्व आहे'चा सिद्धान्त याच्यावरच आधारित आहे. या मतानुसार संपूर्ण सृष्टीचा एकच उगम आहे आणि ती त्याच्यातच विलय (विलीन) होऊन जाते. याला स्पष्ट करण्यासाठी असे म्हटले जाते की परमेश्वराची सत्ताच आपल्या अभिव्यक्तीमध्ये जादूगाराच्या रुपयाप्रमाणे सृष्टीची सत्ता बनून जाते.

इब्नुल अरबीचे मत आहे की शाश्वत आणि दृश्य वस्तू हे दोन्ही 'एका'चेच पूरक सारखे आहेत आणि त्यांच्यामध्ये परस्पर अन्योन्याश्रित संबंध आहे. जीव, सृष्टीकर्त्याची बाह्य अभिव्यक्ती आहे. मनुष्य, परमेश्वराचे चेतन अंश सिर्र अर्थात मर्म आहे, जे या सृष्टीमध्ये प्रकटपणे दिसून येते आणि ज्याअर्थी मनुष्याची ज्ञानपरिधी सीमित आहे त्याअर्थी सर्व वस्तू एकाच वेळेस, एकत्रितपणे त्याच्या चिंतनक्षेत्रामध्ये येऊ शकत नाहीत. म्हणून तो त्या चैतन्याच्या एका अंशासच प्रकट करू शकतो. हे सत्य (खरे) तर आहे परंतु तेच एकमात्र खरे नाही.

परमेश्वर आणि दृष्य जगताच्या अनुरूपतेस एका स्थायी अनुभव स्वरूपात तो स्वीकार करत नाही. अरबीचे म्हणणे आहे की त्या वास्तविक सत्तेस कुणी परमेश्वर म्हणू दे, वाटल्यास जगत म्हणू दे अथवा दोहोमधील फरक दर्शविण्यास आपली असमर्थता व्यक्त करू दे, परंतु ती आहे एकच. तो परमेश्वरास सर्वगत किंवा सर्वातीत पण मानण्यास तयार नाही, कारण की त्याच्या मते तसे म्हणण्याचा अर्थ होतो द्वैत–भावनेचा आरोप. त्याचे म्हणणे आहे की उपरोक्त दोन्हीपैकी काहीही म्हणण्यामध्ये परमेश्वराची असीमता बाधित होते. म्हणून तो त्याच्या 'एकत्व'तेस दोन्हीमध्ये प्रकट केले गेले पाहिजे. अल्लाहच मूळ (अस्सल) आहे आणि विश्व–जग ही त्याची छाया (जिल्ल), आणि छाया तर वास्तविकतेची अभिव्यक्ती असते. म्हणूनच जग हे त्याच्याशी अनुरूप आहे.

इब्नुल अरबीच्या परमेश्वरासंबंधी सिद्धान्तास सर्वेश्वरवाद (विश्वात्मवाद) म्हणून मानण्यात येते, परंतु असे मानणे हे योग्य नव्हे; कारण की त्याचा सिद्धान्त हा काहीसा असा आहे. मानव अथवा हे विश्व परमेश्वराच्या मेंदूपासून (विचारापासून) उत्पन्न झाले आहे. मनुष्य हा त्याच्या ज्ञानामुळे उत्पन्न होऊन या जगामध्ये येतो आणि येथील अनुभव ग्रहण करून पुन्हा त्यामध्येच परततो. म्हणून जरी सत्ता एक असली तरी पदार्थांचे अस्तित्व त्याच्या विचारामध्ये असते, जसे की एखाद्या निर्मात्याच्या विचारामध्ये योजनेचा आराखडा अस्तित्वात असतो आणि जर हे त्याच्या विचारामध्ये विद्यमान आहे तर असे म्हणता येत नाही की योजनाच निर्माता आहे. हे जग परमेश्वराच्या विचारामध्ये विद्यमान होते. याची सृष्टी जाणीवपूर्वक झालेली आहे. परमेश्वराचे ज्ञान आणि परमेश्वराची सत्ता दोन्ही अनादी आहेत. म्हणून 'हमावुस्त'च्या सिद्धांतास सर्वेश्वरवाद (विश्वात्मवाद) मानणे चुकीचे आहे.

हीच गोष्ट अधिक स्पष्ट करताना सूफी तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक आणि विद्वान खाजा खान असे मत मांडतात की परमेश्वर हा आपल्या ज्ञान–प्रकाशामध्येच प्रकट होतो. ज्याप्रमाणे एखाद्या काळोख्या

वस्तुसंग्रहालयामध्ये दिवा पेटविताच त्या वस्तुसंग्रहालयामधील प्रत्येक वस्तू एकाच वेळेस दिसू लागते. त्याचप्रमाणे सत्ता जेव्हा ज्ञानामुळे प्रकाशित झाली तेव्हा हे जग हळू हळू विकसित होत दृश्य स्वरूपामध्ये आले. या ज्ञानाच्या अभावास त्या सत्तेची त्रुटी म्हणता येणार नाही, तथापि एकाप्रकारे ते (ज्ञान) स्वत:मध्येच अंतर्निहित असते आणि त्यामुळे काहीच दृष्टिगोचर होत नाही आणि जेव्हा तेच स्वत:पासून स्वत:स स्वतंत्र करून घेते तेव्हा गुण प्रकट होतात. इब्नुल अरबीने म्हटले आहे – 'अना अना व अंता अंता! अर्थात मी, मीच आहे आणि तू, तूच आहेस. ती (सत्ता) अभिव्यक्त होते, परंतु तीच पदार्थांची सत्ता (ज़ात) नाही. ते पदार्थ (शै) नाही, ते तेच आहे.

**२) वहदतुश्शुहूद : (विशिष्टाद्वैतवाद)** – 'इन्सानुल कामिल' या सुप्रसिद्ध ग्रंथाचे प्रणेते शेख करीम जीली या सिद्धान्ताचे प्रवर्तक होते. यांचे असे मत आहे की परमेश्वराचे स्वरूप (ज़ात) इतके महान आहे की त्याच्यासमोर सृष्टीचे इतर अन्य पदार्थ नसल्यातच जमा आहेत. त्यांच्या मतानुसार ही 'ज़ात' (स्वरूप)च दृश्य आहे आणि 'सिफ़ात' (गुण) हे नेहमी अव्यक्त असतात. जसे उपकार करणाऱ्यामध्ये लपलेल्या उपकार नावाच्या गुणास कोणीच पाहू शकत नाही आणि उपकार करणाराच दिसतो. शुहूदिया (विशिष्टाद्वैतवादी) परमार्थ आणि अपरमार्थ अशा दोन सत्ता मानतात. एक परमेश्वराची सत्ता आहे, तर दुसरी जीवाची, परंतु जीवाची सत्ता शून्यवत आहे. तिला आपल्या अस्तित्वासाठी परमार्थ सत्तेवर अवलंबून राहावे लागते. जेव्हा गुण (सिफ़ात) अभिव्यक्त (ज़ाहिर) होतात तेव्हा त्यांना नामाभिधान प्राप्त होते. म्हणून ही नावे आरशासारखी आहेत. ती परमसत्तेच्या गूढास व्यक्त करतात. जीलीचे म्हणणे आहे – त्याची अभिव्यक्ती सर्व सत्तांमध्ये अंतर्निहित आहे आणि ती सृष्टीच्या प्रत्येक अणुरेणूमध्ये आपल्या पूर्णतेस अभिव्यक्त करते. ती खंडस्वरूपात विभक्त नाही. सृष्टीचे सर्व पदार्थ तिच्या पूर्णतेमुळे आहेत आणि तिने दिलेल्या नामानीच नामयुक्त आहेत. ........ सृष्टी बर्फासारखी आहे आणि तेज–स्वरूप परमेश्वर पाण्यासारखा आहे. पाणी हे बर्फाचे मूळ असते. त्या गोठलेल्या वस्तूचे नामकरण बर्फ म्हणून झाले तरी पाणीच त्याचे मूळ अस्सल नाव आहे.

सृष्टी परमेश्वराच्या गुणांमध्ये त्याची (परमेश्वराची) अभिव्यक्ती मात्र आहे. हे जगत – प्रपंच त्याच्या गुणावलीचा समाहार आहे. परमेश्वर आपल्या सत्तेस आपल्या गुणांमध्ये अभिव्यक्त करतो. याचा असा अर्थ आहे की तो स्वत: आपल्या स्वरूपाचे ज्ञान प्राप्त करून घेत असतो. वास्तविक मनुष्य हा परमेश्वराच्या नाम आणि गुणांवर विश्वास ठेवतो. म्हणून माणसाच्या विश्वासामध्ये – श्रद्धेमध्येच तो अभिव्यक्त होतो. हा विश्वास, ही श्रद्धा ज्ञान आणि चिंतनाच्या आधारावरच टिकलेली आहे. म्हणून तो ज्ञानाच्या आधारेच मानवाजवळ अभिव्यक्त होतो.

### ७) ज़ात (नाम) आणि सिफ़ात (गुण, रूपे)[२७]

अल्लाहच्या अस्तित्वामध्ये दोन घटक आढळतात. ते म्हणजे 'ज़ात' (नाम) आणि 'सिफ़ात' (रूपे, गुण). म्हणजेच सत्ता आणि तिचे गुण, अथवा सत्त्व आणि तिचे तेज. हे जगरहाटीमध्ये दिसून येणारे घटक आहेत. 'ज़ात' आणि 'सिफ़ात' हे दोन शब्द अनुक्रमे दैवी सत्तेचे सत्त्व अथवा सत्तत्त्व, आणि रूपे अथवा गुण यांचे निदर्शक आहेत. 'ज़ात' हे अरबी शब्द 'ज़ू' (धारक) या शब्दाचे स्त्रीलिंगी रूप आहे. यावरून 'ज़ात' या

शब्दाचा मूळ अरबीमधील भावार्थ होईल 'धारिका, प्रसवा, जन्मदात्री' आणि हा अर्थ समर्पक पण वाटतो. कारण की 'ज़ात' मधूनच 'सिफ़ात' म्हणजेच गुण प्रकट होतात. म्हणजेच 'ज़ात'ची प्रवृती स्त्रालिंगी (प्रसवधर्मा) आहे. यास्तव स्पष्ट आहे की 'ज़ात', 'सिफ़ात' अर्थात गुणधारिका आहे. हिच्यामुळे एखादे सत्य विधान करता येऊ शकेल, आणि एखाद्या विधेयपदामुळे 'ज़ात'विषयी निश्चित सांगता येईल. हा एक दुष्टचक्रीय युक्तिवाद आहे. खरोखर, 'अल्-मुग्रब' या शब्दकोशामध्ये 'ज़ात'ची व्याख्या अशी दिली आहे - ''एखाद्या वस्तूचे अस्तित्व आहे त्याप्रमाणे असणे, म्हणजे 'ज़ात' (सत्ता).'' ही जास्तीत जास्त यथाशक्य संदिग्ध आणि अस्पष्ट अशी व्याख्या आहे. सारांश, ईश्वराची सत्ता पारमार्थिक असते तर गुण दैवी असतात.

दुसऱ्या शब्दात असे सांगता येईल की 'ज़ात' हे परमेश्वरा (अल्लाह)च्या सत्त्वाचे निर्माणकारी तत्त्व आहे. त्यामुळेच 'ज़ात'पासून त्याचे विविध गुण निर्माण होतात वा गुणांचा उद्भव होतो. अल्लाहची 'ज़ात' ही आपल्या विविध गुणांची जन्मदात्री आहे.

ॲरिस्टॉटलचे विरोधी टीकाकार, शेख़ुल इश्राक़ (शेख शहाबुद्दीन मक़्तूल) यांनी ॲरिस्टॉटलप्रणीत व्याख्येवर आक्षेप घेतला. ॲरिस्टॉटलच्या मते व्याख्या ही अखिल ज्ञानाचा आदि व अंत होय. तिच्यामध्ये उद्देश्य किंवा व्याख्येय वस्तूसंबंधी सारस्वरूपाचे निवेदन असते. कोणत्याही पदाची व्याख्या म्हणजे त्या पदाचा संपूर्ण, सारगुणार्थ होय. 'ज़ात'विषयी काहीच निश्चित न सांगता, जर फक्त गुणच दर्शविण्यात आले तर, 'ज़ात' संपूर्णपणे विलुप्त होते. ''वस्तू वा द्रव्य म्हणजे स्वाद, गंध, रंग यांचा एक गुण-समूह होय. हे भौतिक विकासशील गुणांव्यतिरिक्त काहीच नसतात.'' हे बौद्धांच्या शून्यासारखेच आहे, कारण ते 'ज़ात'ला शून्यापर्यंत नेऊन भिडवतात. या आधारावर इमाम ग़ज़ाली यांनी 'ज़ात'ला संपूर्णपणे दुर्लक्षित केले, 'ज़ात'ची उपेक्षा करून 'सिफ़ात' (गुण)कडेच आपले लक्ष केंद्रीभूत केले. तो एक महान धर्मपंडित आणि नीतिशास्त्रज्ञ होता. इस्लामी नीतिमत्तेवर त्याचा फार मोठा पगडा होता. प्रभाव होता, इतका की त्याला 'हुज्जत-उल्-इस्लाम' (इस्लामचे खंबीर प्रमाण वा पुरावा)च्या पदवीने विभूषित केले गेले होते. तरी पण त्याची गणना एक शंकेखोर तत्त्वज्ञ म्हणून केली जाते.

आंतरिक दृष्टिकोनातून पाहाता जणू सद्वस्तूच 'ज़ात' (सत्ता) आहे, आणि बाह्य दृष्टिकोनातून पाहाता 'सिफ़ात' (रूपे, गुण). वर्तुळांतर्गत वर्तुळामध्ये परिवेष्टित 'ज़ात'च जणू 'सिफ़ात' स्वरूपात प्रकट होते. ईश्वरास एखादे 'शय' (वस्तू, पदार्थ) म्हणता येऊ शकेल काय हाही पण एक मतभेदाचा मुद्दा आहे. ''जिला जाणता येऊ शकेल आणि जिच्याविषयी खात्रीपूर्वक काही म्हणता येऊ शकेल अशास 'शय' (वस्तू, पदार्थ) म्हणतात. या अर्थी 'शय', 'ज़ात' बनते. पवित्र कुराणामध्ये नमूद आहे - ''त्या (अल्लाहच्या सत्ते)च्या व्यतिरिक्त इतर प्रत्येक गोष्ट नश्वर आहे.'' २८:८८ भारतीय तत्त्वज्ञानामधील 'बृहदारण्यक उपनिषद'चे स्पष्टीकरण करताना शंकराचार्यांनी पण हाच अद्वैत सिद्धान्त मांडलेला आहे.[२८] तर हा निष्कर्ष असा आहे की ईश्वराची 'ज़ात' ही आपल्या गुणधर्मामध्ये निरपवादपणे एकमेव वस्तू (द्रव्य) आहे.

परंतु दार्शनिक विचारवंतांनी, तरी पण ईश्वराच्या तीन आंतरिक (बातिनी) श्रेणी किंवा उत्पत्ती दिल्या आहेत :

१) 'ला बशर्ते शय' - कुठल्याच अटीशिवायची वस्तू - ही सत्ता निरपेक्ष आहे.

२) ‘बशर्ते ला शय’ – कुठल्याही अटीशी बांधील नसलेली वस्तू – ही सर्वसाधारण सत्ता आहे. आणि

३) ‘बशर्ते शय’ – एखाद्या वस्तूच्या अटीसह – ही सापेक्ष, सीमित सत्ता आहे.

परमेश्वराच्या अस्तित्वाच्या (वजूद) अटीच्या अनुषंगाने त्याचा नामा (ज़ात)च्या मर्यादेपर्यंत श्रेणींमध्ये बंधने. मर्यादा आहेत आणि तन्मात्रा तिच्या अभिव्यक्तिच्या अटी आहेत. शेख़ मुहिय्युद्दीन इब्न अल्–अरबी ठासून सांगतो की ईश्वर हा ‘शय’ (वस्तू) नाही; आणि आपल्या या अधिकारवाणीमध्ये तो पवित्र कुराणाच्या या महाश्लोकावर अवलंबून आहे – ‘‘सृष्टीतील कोणतीही वस्तू त्याच्या समान नाही.’’ ४२:११ एखादी वस्तू (शय) इच्छेच्या अधीन असते. ‘शा शैन’ अर्थात इच्छुकाने इच्छा केली. ईश्वर हा इच्छुक आहे आणि तो इच्छित नव्हे. याचा अर्थ असा होईल की तो स्वतःच वस्तू (सद्‌वस्तू) आहे. तो स्वयंभू आहे. तथापि शेख अरबीने स्पष्टपणे म्हटले आहे – ‘‘तो अभिव्यक्तिमध्ये आहे’’ आणि तरी पण तो वस्तूंचा ‘ज़ात’ (सत्ता) नाही. ‘‘तो तोच आहे, आणि ‘शय’ (वस्तू) ‘शयच’ (वस्तूच) आहे.’’ ‘‘अना अना व अंत अंत’’ (मी मीच आहे, आणि तू तूच आहे.) म्हणजेच अभिव्यक्तिमध्ये ‘शय’ची ‘ज़ात’ एक वेगळीच आहे.

पहिल्या उदाहरणामध्ये, ‘ज़ात’ ही सर्व अटींच्या वर आहे; कल्पनेची भरारी तिथपर्यंत पोहोचू शकत नाही. दुसऱ्यामध्ये निश्चित विधानाशिवाय अस्तित्व निहित –समाविष्ट आहे. तिसऱ्यामध्ये, तिच्याविषयी ठामपणे काही सांगता येऊ शकेल. दुसऱ्या विधानामुळे मुअतज़िला संप्रदायाचा उदय झाला. वासिल इब्न अल्–अता या संप्रदायाचा संस्थापक होता. त्याने असे निश्चित विधान केले की ‘ज़ात’ ही गुणरहित, लक्षणरहित आहे आणि त्याने स्वतंत्र गुणांना नाकारले. गुणांचे प्रतिपादन हे ईश्वराच्या एकत्त्वतेच्या विरोधात बाधक ठरते. या संदर्भात ‘इन्सानुल कामिल’या सुप्रसिद्ध ग्रंथाचे लेखक व सूफी तत्त्वज्ञ अब्दुल करीम जीली यांचे पण मत विचारणीय आहे. ते म्हणतात की, ‘सिफ़ात’ (गुण) हे नेहमी ‘ज़ात’ मध्ये लपलेले असतात. कारण की जर ‘सिफ़ात’ हे स्वतः होऊन व्यक्त झाले, तर मग ते स्वतंत्र स्वायत्त वस्तू बनतील. ते बुद्धीला ज्ञान प्रदान करतात. दया ही कधीच वस्तुरूपाने दिसून येत नाही, परंतु फक्त ‘ज़ात’ अर्थात दयाळू व्यक्तीच दिसते.

गुण हे ईश्वराचे सत्त्वच असतात. ‘ज़ात’मधील प्रथम चार गृहीतके, म्हणजेच १) इल्म (ज्ञान), २) नूर (प्रकाश), ३) वजूद (अस्तित्व) आणि ४) शुहूद (आत्म- चेतना) हे स्वतः सत्त्वच आहेत, आणि ते सत्त्वावरील अध्यारोपण नाहीत. अभिव्यक्तिकरणामध्ये, अस्तित्वाचा गुण, हा अस्तित्वपूर्ण अणुंवर म्हणजेच चेतनेच्या अमर्याद विस्तारामधील केंद्रांवर, ईश्वराकडून अध्यारोपित केला गेला आहे. अबू हुज़ला अल्लफ़चा शिष्य नज़्ज़ाम याने यांना दैवी सत्तेच्या तऱ्हा वा पद्धती (‘वुजूब’) असे नाव दिले आहे. हे सर्व व्यापकतेचा सिद्धान्त म्हणजेच सर्वेश्वरवादी सिद्धान्त मानणारे आहेत, म्हणजेच ‘ज़ात’ हे सर्व ब्रह्मांडास व्यापून टाकले आहे आणि समस्त ब्रह्मांड त्याच्यामध्ये व्याप्त आहे.

गुणांच्या विधेयकांच्या उपरोक्त समाहारामध्ये एखाद्या गुणाच्या शाश्वततेविषयी काहीच सांगण्यात आलेले नाही. फक्त एवढेच सांगण्यात आले आहे की ते एक तर अव्यक्त असतात किंवा व्यक्त (प्रकट). एवढे म्हणणे पुरेसे आहे की उपपत्तींच्या वरील श्रेणीमध्ये एखाद्या गुणाच्या उल्लेखाची गरज नाही. हा ‘ला बशर्ते शय’चा टप्पा आहे. म्हणजेच ‘कुठल्याच अटीशिवायची अवस्था’ आहे. याची वेगवेगळी नावे आहेत – ‘मनक़तुल – इशारात’ (या टप्प्यावर समस्त संकेत गाळले जातात), ‘ऐनुलकाफ़ूर’ (कर्पूर प्रवाह, कर्पूर निर्झर) म्हणजेच

कर्पूरामध्ये जे काही वितळते ते कर्पूरच बनून जाते, 'ज़ात-ए-साज़िज' (वर्णहीन निर्भेळ सत्तत्व). या टप्प्यामध्ये गुणांची कल्पनाच करवत नाही, आणि म्हणून त्यांच्याबाबतीत निश्चित विधान करता येऊ शकत नाही. फक्त अभिव्यक्ती करणाच्या चौथ्या टप्प्यामध्येच गुण व्यक्त, प्रकट होतात, आणि त्यांच्याविषयी ठामपणे काही तरी सांगता येऊ शकते.

असे म्हणतात की प्रेषित मुहम्मद स. चा ज़र्रार नावाच्या एका सहचराने असे प्रतिपादन केले की गुण हे शाश्वत नसतात. त्याच्या संप्रदायाचे नाव ज़र्रारी असे आहे. इमाम हंबल आणि मुअतज़ली यांचा तत्कालीन खलीफ़ाने यासाठी छळ केला की ते असे ठामपणे म्हणत की, 'कुरआन' (ईशवाणी) हे निर्मित आहे. ते अपौरुषेय नाही, म्हणजेच ते अशाश्वत आहे. इतर इमाम ठामपणे म्हणत की ते अ-निर्मित आहे. शाश्वत गुणांच्या ठाम मत प्रतिपादनामध्ये ईश्वरांची अनेकता अनुस्यूत आहे. ज्याप्रमाणे चित्रकार, चित्र आणि चित्रज्ञान हे ते चित्र काढणाऱ्या व्यक्तीच्या 'ज़ात' (सत्ता) मध्ये (एक)च असतात त्याचप्रमाणे ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान 'ज़ात'च्या टप्प्यावर एक(च) असतात.

तथापि, अबुल हसन अल्-अशअरी, इ. स. ८७३-९३५ द्वारा प्रस्थापित अश'अरी संप्रदायवाले असे ठाम प्रतिपादन करतात की गुण हे ना 'ज़ात'शी संबंधित असतात, ना त्यापासून विभक्त. हे जणू काही गुणांची तुलना कशाशीच होऊ शकत नाही. कोणतेच माध्यम शक्य नाही. ईश्वर हे अंतिम आवश्यक अस्तित्व आहे. त्याच्या अस्तित्वामध्येच त्याचे गुण अंगभूत आहेत. त्याचे अस्तित्व आणि सत्त्व एकसमान आहेत. त्यांचा सिद्धान्त काहीसा असा आहे- (१) सर्वप्रथम सत्त्व असते त्यानंतर गुणांचा क्रमांक आहे; (२) सत्त्व आत्मनिर्भर आहे. म्हणजेच ते स्व-अस्तित्वमय आहे, आणि गुण हे सत्त्वावर अवलंबून असतात. (जसे मेण आणि तिची मृदुता), (३) सत्त्व ही एकता आहे; तर गुण हे अनेकता दर्शवतात; (४) सत्त्वास आत्म-चेतना आहे; तर गुणांमध्ये याचा अभाव आहे; (५) सत्त्व हे नेहमी दडलेले असते, तर गुण हे कधी अप्रकट असतात तर कधी प्रकट; (६) गुणांना यथास्थानच राहावे लागते; (७) एका गुणाचे आविष्कारण हे दुसऱ्या गुणाच्या आविष्काराशी संघर्षरत असते किंवा तिचे दमन करते.

काय ईश्वराची 'ज़ात' ही जीवात्म्याच्या 'ज़ात' सारखी असते? असा प्रश्न नेहमी विचारला जातो. पवित्र कुराणाच्या ८५ व्या अध्याया (अल्-बुरूज)मध्ये ईश्वर नक्षत्रांची शपथ घेतो - ''नक्षत्रांचे मनोरे असलेल्या त्या आकाशाची शपथ,'' ८५:१ म्हणून ईश्वराची 'ज़ात' (सत्ता) ही जीवात्म्याच्या 'ज़ात' (सत्ता)हून वेगळी आहे.

आविष्कारणामध्ये दोन्ही वेगवेगळे आहेत, आणि पवित्र कुराणामध्ये अत्यंत सुबोध शब्द-प्रयोग झालेला आहे. ज्याप्रमाणे एका म्यानामध्ये दोन तलवारी राहू शकत नाहीत, तद्वत दोन 'ज़ात' (सत्ता) असू शकत नाहीत. जीवात्म्याची 'ज़ात' जादूगाराच्या रुपयासारखी आहे. जादूगार खापराचा एक तुकडा आपल्या हाती घेतो, तो हवेत उंच उडवतो आणि खाली आणून प्रेक्षकांना अस्सल रुपयाच्या नाण्याच्या स्वरूपात दाखवतो.

आपल्या स्वतःच्या सारतत्त्वां ('अयान') च्या माध्यमातून स्वतःच्या आविष्करणामध्ये, विधात्याची 'ज़ात' ही निर्मितीची 'ज़ात' म्हणून ओळखली जाते. अनाविष्कृत अवस्थेमध्ये; 'ज़ात' एक असते, परंतु आविष्करणामध्ये निर्मिती (असंख्य जीवात्मा)चे असंख्य आणि असीम 'ज़ात' म्हणून ओळखले जातात.

राजस्थानमधील नागोर येथील सुप्रसिद्ध सूफी संत हमीदुद्दीन नागोरी असे म्हणतात – (भावानुवाद)

*''महासागरामध्ये विविध रंगांच्या असंख्य लाटा निर्माण होतात*
*आणि नामविरहित अवस्थेपासून एक नाव धारण करतात.*
*काही वेळेस मजनूँच्या वेषामध्ये*
*आणि काही वेळेस लैलाच्या रूपामध्ये.''*

महासागर आणि लाटांची एकात्मता ही खरी सारूप्यता आहे, आणि विभेद हे फक्त हेय, ज्ञानगोचर आहे.

अल्-मामूनच्या शासन काळामध्ये पवित्र कुराण हे पौरुषेय वा अपौरुषेय ('कलाम-ए-लफ़्ज़ी' वा 'कलाम-ए-नफ़्सी') ग्रंथ आहे काय? या संदर्भात तीव्र मतभेत निर्माण झाले होते. या मतभेदाच्या उद्रेकामुळे, ज्यांनी कुराणाचे अपौरुषेयत्व नाकारले, त्यांच्या पाठीमागे चौकशी समितीचा ससेमिरा लागला आणि त्यांचा अनन्वित छळ झाला. असे सांगण्यात आले की, प्रथमत: ईश्वराचे गुण 'जलाली' (रुद्र) तरी आहेत किंवा 'जमाली' (भद्र) तरी आहेत. जेव्हा 'जलाली' गुण अभिव्यक्त होतात तेव्हा सर्व आविष्करणे ही शून्यामध्ये विलीन होतात आणि जेव्हा 'जमाली' गुण दृष्टिगोचर होतात तेव्हा सुंदर जग उदयास येते. प्रथम 'तंज़ीह' (दृश्य प्रपंचापासून मुक्त करणे) आणि दुसरे आहे 'तश्बीह' (तद्रूपता धारण करणे). झरतुष्तच्या तत्त्वज्ञानामध्ये अशाच प्रकारची गोष्ट दिसून येते. झरतुष्तचे असे ठाम प्रतिपादन आहे की सत् आणि असत्, चांगले आणि वाईट, ही यझ्दान देवतेची दोन प्राथमिक आविष्करणे आहेत. त्यांना ओर्मुझ आणि अहिर्मन असे म्हणतात. पारशी अद्वैती म्हणजेच मजूसी, एका चमकणाऱ्या ताऱ्याच्या मदतीने, ख्रिस्ताचे जन्मस्थळ शोधण्याच्या मोहिमेवर निघाले. ते सच्चे 'मुवहि्हद' (म्हणजेच एकत्त्ववादी) होते. झरतुष्तच्या काही अनुयायींचे असे अनुमान होते की ते दोन ईश्वर होते आणि त्यांना 'जिंदीक़' म्हणजेच जे हुद्द्याला मान देणारे नव्हते – असे म्हणण्यात आले. ज़र्वानी मात्र एकनिष्ठ राहिले.

तथापि इस्लामी संप्रदायामध्ये (धारणेमध्ये) 'जलाली' आणि 'जमाली' हे गुण स्पष्ट दिसून येतात. शिवाय, गुण हे 'वैयक्तिक', 'संबंधात्मक' अथवा 'मौखिक' (शाब्दिक) असतील. प्रथम हे विशुद्ध, पवित्र, संजीवनसारखे; दुसरे हे गुणांचे आविष्करण करणारे जसे, निर्माता, विध्वंसक; आणि तिसरे कृतीचे निदर्शन करणारे, जसे विधाता, इत्यादी. जिथपर्यंत 'ज़ात' आणि 'सिफ़ात'चे दार्शनिक पैलू कुराणाच्या शिकवणीवर आधारभूत आहेत तिथपर्यंत तत्त्ववेत्त्यांनी कुराणाच्या संदिग्ध श्लोकांवर (आयात-ए-मुतशाबिहात) चिंतन करून त्यांना सैद्धान्तिक रूप दिले. वर काही श्लोकांचा उल्लेख झालेला आहे; तर इतर काही पुढीलप्रमाणे आहेत :

१) ''पूर्व आणि पश्चिम (सर्व दिशा) अल्लाहच्याच आहेत. (त्यामुळे) तुम्ही जिकडे वळाल तिकडे तुम्ही अल्लाहशी सामोरे व्हाल.'' २:१९५
२) ''खरोखर अल्लाहने (आपल्या ज्ञानाने) प्रत्येक गोष्टीस वेढून ठेवलेले आहे.'' – ६५:१२
३) ''तुम्ही जिथे कुठे असता, तो (ईश्वर) तुमच्याबरोबर असतो.'' ५७:४
४) ''आम्ही मानवाच्या कंठातील शिरेपेक्षाही त्याचा अधिक जवळ असतो.'' ५०:१६
५) ''खुद्द तुमच्या स्वत:च्या अस्तित्वात (माझे संकेत) आहेत. तुम्हाला उमगत नाही काय?'' ५१:२१

६) ''(हे सर्व चराचर अस्तिवात येण्यापूर्वीही) त्याचे अस्तित्व होते, आणि (सर्व संपुष्टात आल्यानंतरही) त्याचेच अस्तित्व कायम राहील, दृश्य आणि अदृश्य त्याच्यासाठी सारखे आहेत. त्यालाच प्रत्येक गोष्टीचे पूर्ण ज्ञान आहे.'' ५७:३

७) ''अल्लाह आकाश आणि पृथ्वी यांचा प्रकाश आहे. (सृष्टीमध्ये) त्याच्या प्रकाशाची उपमा अशी आहे जणू एका कोनाड्यामध्ये दिव्याची ज्योत तेवत असेल. तो एका पारदर्शी काचेत ठेवलेला, जणू काही मोत्याप्रमाणे चमकणारा तारा... अल्लाह इच्छितो त्यास आपल्या प्रकाशाचा मार्ग दाखवतो. तो लोकांना दृष्टान्त देऊन गोष्ट समजाऊन देतो.'' २४:३५

पवित्र कुराण ईश्वराच्या गुणांनी भरलेले आहे; जसे सप्त दैवी गुण – जीवन, ज्ञान, शक्ती, संकल्प, ऐकणे, पाहणे आणि बोलणे. सर्वोत्तम व्याख्या सर्व नकारार्थी आहेत. खरोखर, जसे एका बिंदूच्या व्याख्येमध्ये, काहीच सकारात्मक, होकारार्थी असू शकत नाही. 'कल्मा' (ब्रह्मसूत्र) अथवा मुस्लिम श्रद्धेचे प्रथम कलम ठामपणे असे प्रतिपादन करते : ''अल्लाहशिवाय कोणीच ईश्वर नाही.'' 'अल्लाह' हा शब्द 'अल्-इलाह' पासून बनलेला आहे. 'इलाह' चा अर्थ आहे 'उपास्य योग्य', 'उपासना योग्य'. म्हणून 'कल्मा' (ब्रह्मसूत्र)चा आशय आहे, ''अल्लाहशिवाय दुसरे कोणीच उपासनेस योग्य नाही.'' काही लोक पुष्कळ गोष्टींची उपासना करतात; काही कशाचीही उपासना करतात आणि आपल्या इच्छापूर्तीमध्ये मदत होईल या विश्वासाने काही सर्वांची उपासना करतात. काहीजण स्वतःचीच उपासना करतात; काही जण, बेकनच्या शब्दामध्ये, बाजारातील मूर्तींची पूजा करतात, मंचावरील मूर्ती पूजतात, तसेच गुफेमधील मूर्ती आणि नटेश्वराची पूजा करतात. काही जगातील अद्भुत वा चमत्कारिक घटनांची पूजा करतात. मुस्लिम कल्मा (ब्रह्मसूत्र) घोषणा करतो की यांपैकी कुणीच उपासनेस योग्य नाही. या सर्व नश्वर, अनित्य, भ्रामक, मायिक आणि आभासी गोष्टी आहेत. उपासनेस योग्य असा एकच ईश्वर आहे. हे सर्व त्याच्यावरच निर्भर आहेत, आणि तो ही एक प्रामाणिक साक्ष म्हणून प्रमाणित करतो.

पवित्र कुराणातील ११२ क्रमांकाचे 'इख़्लास' हा लघु अध्याय (प्रकरण) पवित्र कुराणाचे सारतत्त्व आहे. यामध्ये परमेश्वराची नकारात्मक व्याख्या प्रस्तुत केलेली आहे. ईश्वर एक ('अहद') आहे. त्याची 'ज़ात' (सत्ता) एकरूप आहे. तो 'वाहिद' नाही. 'वाहिद' मध्ये व्यत्यास आणि तुलनेचा समावेश होतो, जसे एकाच्या विरोधात दोन, तीन आणि इतर कुठलीही संख्या असू शकते – परंतु तो (ईश्वर) 'अहद'चे स्वरूप स्पष्ट करतो. जेव्हा 'अहद'च्या 'ज़ात'चा प्रश्न उपस्थित होतो तेव्हा ती एकरूपता असते, अथवा अधिक बरोबर सांगायचे असेल तर एकरूपतेचे एकत्त्व असे म्हणता येईल. आविष्करणामध्ये विषमता असते. मग तो 'समद' (निरपेक्ष, निस्पृह) आहे. प्रत्येक त्याच्यावर अवलंबून आहे, तो कोणावरही अवलंबून नाही. जरी दिसायला सकारात्मक असले तरी स्वभावामध्ये हे नकारात्मक आहे. पुन्हा 'ना तो कोणाला (अपत्यरूपी) जन्म देतो. ना तो कोणापासून जन्माला आलेला आहे.' हे स्पष्टपणे नकारात्मक स्वरूपात आहे. हे एका बिंदूच्या व्याख्येसारखेच आहे, यामधूनच सर्व विश्व बनले (उदयास आले) आहे. या अध्यायामध्ये ईश्वराचे समस्त विशुद्ध स्वरूप एकवटलेले आहे.

आचार्य विनोबा भावे यांनी अत्यंत समर्पक असा पद्यानुवाद आपल्या 'कुराण-सार' या ग्रंथामध्ये दिलेला आहे. तोपुढील प्रमाणे आहे :

*देव तो एकचि एक*
*"म्हण रे देव तो एक ।*
*देव तो निरपेक्षचि ॥*
*नव्हे जनिता, नव्हे जन्य ।*
*नसे कोणीही तत्सम ॥"*

**–आचार्य विनोबा भावे**[२९]

याचे गद्य रूपांतर असे होईल – "सांगा, तो अल्लाह आहे एकमेव एकच. तो सर्वांपासून निरपेक्ष आहे. न तो जनिता आहे, न जन्य. आणि कुणी तत्सम नाही." ११२:१–४

**८) जीलीप्रणीत अल्लाहचे स्वरूप**[३०]

अब्दुल करीम बिन इब्राहीम जीली हे एक प्रख्यात सूफ़ी आचार्य व तत्त्वज्ञ होते. ते 'वहदतुश्शुहूद' (विशिष्टाद्वैतवाद) सिद्धान्ताचे प्रवर्तक होते. त्यांचा 'इन्सानुल कामिल' हा एक प्रख्यात ग्रंथ आहे. ५२२ पृष्ठांच्या या विशालकाय ग्रंथामध्ये त्यांनी ईश्वराचे स्वरूप सविस्तर विशद केले आहे. त्यातील फक्त समर्पक व वेचक अंश येथे प्रस्तुत करण्यात आले आहेत.

**१) ज़ात (सत्ता), सिफ़ात (गुण) आणि इस्म (नाम)**

परम सत्ता अथवा ईश्वराचे सत्त्व याशी नाम–रूपे (गुण) निगडित असतात. नाम–रूपे ही आपल्या अस्तित्वात भासतात तशी नसतात. ते आपल्या वास्तविक स्वरूपात असतात. ते ईश्वराचे स्वात्म (नफ़्स) दर्शवते जेणेकरून त्याचे अस्तित्व असते, कारण तो स्वयंभू असतो. आपल्या परिपूर्णतेस आवश्यक अशी नामे आणि सत्तत्त्वे ही ईश्वरदत्त असतात. त्यांपैकी अनंतता आणि अनाकलनियता ही आहेत. सत्त्व म्हणजे काय आहे, हे शब्दांमध्ये व्यक्त करणे अशक्य आहे. कारण तिच्यासारखी किंवा तिच्या विरोधात काहीच नाही. व्यक्तिकरणाच्या शाश्वत आधारामुळे आपल्या निरपेक्षतेमध्ये ते सर्व व्यत्यास रद्द करते. सत्त्वच गुणस्वरूप असल्यामुळे ते अगम्य, अव्यक्त असते.

एखाद्या वस्तूच्या गुणाची व्याख्या करताना जीली असे म्हणतो की वस्तूच्या अवस्थेचे बुद्धीस करून देणारे ज्ञान म्हणजे त्या वस्तूचे गुण होय. सत्त्वाचे गुण हे विचाराची रूपे असतात. त्यामुळे तिचे आविष्करण होते आणि उमगते. दृश्य जगामध्ये त्यांच्या मुळाशी असलेल्या आकारांपासून आपण सद्‌वस्तूमध्ये फरक करतो, परंतु हा फरक अंतिम नसतो. आपल्या मूळ स्वभावामध्ये गुण हे सत्त्वाशी तंतोतंत जुळणारे असतात. सत्त्व हे स्वत: 'अन्य' या नात्याने आविष्कृत होते. म्हणजेच बाह्य स्वरूपात आपणास त्याचा बोध होतो. ईश्वरशास्त्रामध्ये ज्याला विश्वनिर्मिती म्हणून म्हणतात ते हेच तर आविष्करण होय. सत्त्वाचे गुणरूपांमध्ये अथवा सत्तेचे विचार–विषय म्हणून सदरहू आविष्करण हे विभाजन आणि वर्धना (अनेकता)बरोबर जाते; आणि वस्तुतः (खरोखर) सत्त्व हेच गुण आहे ('अल्–ज़ात ऐनुल–सिफ़ात'). विश्व ही एक धारणा आहे, प्रत्यय आहे – "असले उपादान की त्यामुळे स्वप्ने निर्माण होतात."

हे जाणून असा की विचार हे अस्तित्वाचे मूळ असते आणि ते असे सत्त्व असते की ज्याच्यामध्ये ईश्वराचे परिपूर्ण आविष्कार होते. संपूर्ण विश्वाचे मूळ विचार हे आहे, कारण ईश्वर हा सर्व वस्तूंचे मूळ आहे, आणि त्यांचे सर्वात जास्त परिपूर्ण आविष्कारण फक्त एका बिंदुपथामध्ये होते की जे (त्याच्या आविष्काराचे) मूळ असते; आणि तो बिंदूपथ 'विचार' असतो. हे लक्षात घ्या की प्रेषित मुहम्मद यांनी इहलोकास एक स्वप्नवत मानले होते – आणि स्वप्न एक प्रकारचा विचार असतो. ते म्हणाले, ''मानवजात झोपलेली आहे, आणि जेव्हा ते मरतील, तेव्हा ते जागे होतील.'' येथे 'झोप' या शब्दाचा आशय 'विस्मरण' असा आहे. थोडक्यात, निद्रा हे विचाराचे जग असते.

नाम ('इस्म') नामीस ('मुसम्मी') बुद्धिमध्ये, जाणीवेमध्ये गोचर बनवते, मनामध्ये नामीची रूपरेषा बनवते, निर्णयासाठी प्रस्तुत करते, विचारामध्ये हालचाल करते आणि स्मृतीमध्ये शाबूत ठेवते. ते अज्ञात वस्तूंना ज्ञात बनवते, म्हणून नामाचे नामीशी संबंध हा बहिरंगाकडून अंतरंगाकडे असतो आणि या अनुषंगाने ते नामाशी तंतोतंत जुळणारे असते. काही वस्तूंचे फक्त नावामध्येच अस्तित्व असते आणि प्रत्यक्षात त्यांचे अस्तित्व मुळीच नसते; जसे 'अनक़ा' या काल्पनिक पक्ष्याचे अस्तित्व संपूर्णपणे नावाला आहे. सदरहू उदाहरणामध्ये 'नामी' हे अस्तित्वशून्य आहे. याउलट परमेश्वर हा वास्तव सत् (सत्ता) आहे; आणि ज्याप्रमाणे 'अनक़ा'विषयी आपले ज्ञान हे तिच्या नावावरून उगम पावते, त्याचप्रमाणे आपण परमेश्वरासंबंधी ज्ञान हे 'अल्लाह' या नावावरून ग्रहण करतो. अल्लाह या नामामध्ये सर्व दैवी नाम-रूपे अंतर्भूत समाविष्ट आहेत.

परमेश्वराने हे नाम माणसासाठी एक आरसा बनविले आहे. ते यासाठी की जेव्हा तो त्या आरशामध्ये पाहतो, तेव्हा त्याला ''परमेश्वर होता आणि त्याच्या व्यतिरिक्त काहीच नव्हते'' या उक्तीच्या खऱ्या अर्थाची जाणीव होते; आणि त्या क्षणी त्याला समजते की त्याचे ऐकणे हे परमेश्वराचे ऐकणे असते, त्याचे पाहाणे हे परमेश्वराचे पाहाणे असते, त्याची वाणी ही परमेश्वराची उक्ती असते, त्याचे जीवन हे परमेश्वराचे जीवन असते, त्याचे ज्ञान हे परमेश्वराचे ज्ञान असते, आणि परमेश्वरामध्ये हे सर्व गुण मूलभूत स्वरूपात असतात, आणि मग त्याला उमगते की उपरोक्त सर्व गुण हे उसने घेतलेले असतात आणि दृष्टान्त स्वरूपात त्याला लागू होतात. वस्तुतः ते परमेश्वराचेच असतात.

दैवी नामे ही एक तर सत्त्व म्हणजेच 'अल्-अहद' (एकमेव एकच) 'वाहिद' (एकमेव) असतात किंवा गुण-नामे अर्थात गुणदर्शक नावे असतात. जसे, अर्रहमान (कृपाशील), अल्-अलीम (सर्वज्ञ), 'अल्-अहद'व्यतिरिक्त, प्रत्येक गुण जो संबंधास मागे टाकून दृश्य स्वरूपात असलेल्या सत्त्वाच्या त्या विशिष्ट पैलूमध्ये अनुस्यूत परिणामास उघडकीस आणतो. चांगले-वाईट, श्रद्धा व अश्रद्धा, सर्व ऐहिक जीवन, विचार, भावना आणि कृती अपरिहार्यपणे दैवी नामांपासून उत्पन्न होतात.

### २) केवलतत्त्वाचे अवतरण वा अवरोहण

गुण आणि संबंध नसलेल्या विशुद्ध सत्तेस (अस्तित्वास), जीली 'काळसर अंधेरी' किंवा 'अंधार' ('अल्-अमा') असे म्हणतात. 'सृष्टी निर्मिती अगोदर परमेश्वर कोठे होता?' या प्रश्नाच्या उत्तरामध्ये प्रेषित मुहम्मद यांनी 'अल्-अमा' हा शब्द वापरलेला होता. आधुनिक इस्लामी तत्त्वज्ञ व सुप्रसिद्ध उर्दू कवी

डॉ. इक़्बाल यांनी आधुनिक परिभाषेमध्ये 'अल्-अमा'चे भाषांतर 'नेणीव' (unconsciousness) असा केला आहे. जीलींची सत्तामीमांसा ही तर्कशास्त्रावर आधारलेली आहे. त्यांचे तर्कशास्त्रीय विवेचन हे हीगेलच्या द्वंद्वात्मक पद्धतीसारखे आहे. 'अल्-अमा' ही एक प्रकारची ब्रह्मगुफाच होय.

जीलीच्या विवेचनानुसार 'अमा' ही धूसर, अचेतन शक्ती नसते. ती एक निरपेक्ष आंतरिकता ('बुतून') आणि गूढता ('इस्तितार') असते. यामध्ये बाह्यतेची ('ज़ुहूर') विरोधी संकल्पना, म्हणजेच 'सत्तत्त्वा'शी असलेले 'इतर' सर्व संबंध हे कसेही करून अंतर्लीन होतात आणि नाहीसे होतात, जसे सूर्यप्रकाशात ताऱ्यांचा प्रकाश विलुप्त होतो. जीली 'अमा'ची तुलना चकमकीमध्ये नित्य सुप्तावस्थेत असलेल्या आगीशी करतात. घर्षणानंतर त्या आगीची चमक दिसून येते. 'अमा' हा सत्चा शाश्वत आणि अपरिवर्तनीय आधार असतो. अशा प्रकारे 'अमा'ची तुलना चकमकीमध्ये नित्य सुप्तावस्थेत असलेल्या आगीशी करतात. घर्षणानंतर त्या आगीची चमक दिसून येते. 'अमा'स अंतरतम आत्मतत्त्व म्हणून मानता येईल. ही सत्तत्त्वाची अंतर्वर्ती नकारात्मकता असते. अशा प्रकारे, तिचा 'अहदिय्या'शी सयुक्तिकपणे सह-संबंध असतो. यामध्ये सत्त्वत्त्व स्वत:स परमार्थिक ऐक्य म्हणून ओळखते, आणि हे दोन्ही पैलू केवलतत्त्वामध्ये एकरूप होतात. येथे बाह्यता आपल्या आंतरिकतेशी समान बनते. केवलतत्त्व हे साधे सत्तत्त्व असते. यामध्ये नाम वा गुण वा संबंध यांपैकी कोणाचेच आविष्करण होत नाही.

'अहदिय्या' ही एकत्त्वाची अमूर्त संकल्पना आहे. जरी यामध्ये कशाचेच आविष्करण होत नसले तरी ते सत्तत्त्वाच्या आविष्करणाचे प्रथम प्रवेशद्वार आहे. तिचे स्वरूप हे दुरून दिसणाऱ्या एखाद्या अखंड भिंतीसारखी आहे. माती, लाकूड, विटा आणि चुना (सिमेंट) भिंतीच्या या घटकांना आपण वेगवेगळ्या स्वरूपात पाहात नाही. समस्त 'एक' भिंत म्हणून पाहातो. त्याचप्रमाणे 'अहदिय्या'मध्ये (एकत्त्वतेमध्ये) एकत्त्वतेच्या संकल्पनेचा नकार असलेल्या सर्व घटकांचा समावेश असतो. मग हे विशुद्ध एकत्त्व स्वत: परस्पर विरोधी जोड्यांमध्ये पृथक् (वेगळे) होते, की जेणेकरून एक तिसऱ्या संज्ञेमध्ये पुन्हा एकरूप होता यावे. इत:पर एक टप्पा पुढे तन्मात्राची प्रक्रिया सुरू होते. अशा प्रकारे आपण 'वाहिदिय्या' किंवा सापेक्ष एकतेपर्यंत पोहोचतो. हा टप्पा अनेकतेमधून एकतेचा असतो. दरम्यानच्या साम्य-विरोधास 'हुविय्या' (तदत्त्व) आणि 'अनिय्या' (अहंता) अशी नावे आहेत. 'अनिय्या' हा शब्द 'अना' म्हणजे 'मी'पासून बनलेला आहे. हे उपस्थिती दर्शवते. जसा सालीचा गराशी संबंध असतो तसाच 'हुविय्या' या संकल्पनेशी हिचा संबंध आहे. 'हुविय्या' आंतरिक एकता ('अल्-अहदिय्यत अल्-बातिन') दर्शवते. यामध्ये सत्त्वत्त्वेचे गुण नाहीसे होतात. 'अनिय्या' ही 'हुविय्या'ची उलट बाजू किंवा बाह्य आविष्करण हे आत्म-निषेध म्हणजेच स्व-निषेधाच्या परिणामास्वरूप असते. विशुद्ध विचार-विमर्श स्वरूपात असलेल्या सत्त्वत्त्वाच्या मूळ स्वभावातातच ते असते.

'हुव' या तृतीय पुरुषी एकवचनी सर्वनामास अरबी व्याकरणामध्ये 'अनुपस्थित असलेला' ('अल्-गैब') असे म्हणतात. म्हणून 'हुविय्या' सत्तत्त्वाचे, गुणांचे अभाव ('ग़ैबूबिय्या') निर्दिष्ट करते (आविष्करण आणि संवेदन, प्रत्यक्ष ज्ञानापासून). ही ईश्वराची सर्वात अंतरतम जाणीव, चेतना असते. ('सिर्र अल्लाह') ही दैवी अंत:स्चेतना असते. ही बाब जीली 'अल्लाह' नामाचे विश्लेषण करून प्रतिपादन करतात. अरबीमध्ये 'अल्लह़' असे लिहिले जाते. 'अ' काढून घ्या. 'ल्लह़' उरते. 'ल्लह़' = 'लिल्लाह' = 'ईश्वराकडे'.

मग प्रथम (पहिला) 'ल' काढून घ्या आणि उरते ल्ह = लहू = त्याच्याकडे. दुसरा 'ल' काढून घ्या, मग उरते ह = हुव = तो.

– 'किताब अल्-लुमा' पृ. ८९

सूफ़ी ईश्वराचे वर्णन नेहमी 'हुविय्या' अथवा मानव आणि विश्वाचे अंतरतम आत्मतत्त्व या स्वरूपात करतात, जोपर्यंत मानव आणि विश्व हे ईश्वराचे 'हुविय्या' ('हक़ीक़', वस्तुगत सारतत्त्व) आहेत, ईश्वर निरपेक्ष 'हुविय्या' (व्यक्तित्व) आहे, आणि प्रत्येकाची आपली स्वत:ची विशिष्ट अशी 'हुविय्या' असते, त्यामुळे प्रत्येक हा आहे त्या परिस्थितीत दिसतो. –'फ़ुसूस अल्-हिकम', पृ. १४६

'हुविय्या' (एकतेमध्ये विलीन झालेले अनेक) आणि 'अनिय्या' (अनेकतेमध्ये अभिव्यक्त एक) मधील भेद (भिन्नभाव) हा 'वाहिदिय्या' (अनेकता सत्तत्त्वामध्ये एक दुसऱ्याशी आणि 'एका'शी असलेली समानता). 'वाहिदिय्या'मध्ये ''सत्तत्त्व हे गुण म्हणून आणि गुण हे सत्तत्त्व या नात्याने अभिव्यक्त होते,'' की जेणेकरून गुणांमधील सर्व फरक नष्ट होतो– नाहीसा होतो. एक हा दुसऱ्यासारखा हुबेहूब ('ऐन') असतो. त्यांमध्ये सारूप्यता असते. दया आणि प्रतिशोध दोन्ही सारखेच असतात. या दृष्टिकोनातून पाहाता आपणास असे आढळून येईल की दैवत्त्वाचे ('इलाहिय्या') स्तर हे 'वाहिदिय्या'पासून एक प्रकारचे अवरोहण आहे, जिथपर्यंत पूर्ववर्तीमधील गुण हे परवर्तीमध्ये एकसमान होते, ते स्पष्ट आणि विरोधी बनतात.

**सत्ताशास्त्रीय अंतरणाची – न्यागमनाची लेखक जीलीची योजना** एक कोष्टक (तक्ता) स्वरूपात पुढीलप्रमाणे मांडता येईल –

**अ) केवलतत्त्व अथवा विशुद्ध विमर्श (विचार, प्रज्ञा) [अज़्ज़ात, अल्–वुजूदल मुतलक़]**

| | |
|---|---|
| **(क) अंतरंग पैलू :** तमस–तिमिर [अल्–अमा] | – स्वत:मध्ये अंतर्लीन–निमग्न सत्ता– अस्तित्व, केवल सुप्त शक्ती – अव्यक्तता. |
| **(ख) बहिरंग पैलू :** अमूर्त निर्गुण एकत्त्व [अहदिय्या] | – स्वत:च्या एकत्त्वतेची जाणीव असलेली सत्ता (अस्तित्व). |
| **ब) अमूर्त–निर्गुण एकत्त्व [अहदिया]** | |
| **(क) अंतरंग पैलू :** तदत्त्व [हुविय्या] | – अनेक गुणांचा निषेध करण्याची स्वत:स जाणीव असलेली सत्ता (अस्तित्व). |
| **(ख) बहिरंग पैलू :** अहंता, 'मी'पणा [अनिय्या] | – अनेकतेचे वास्तव या नात्याने स्वत:ची जाणीव असलेली सत्ता (अस्तित्व). |
| **क) अनेकतेमध्ये एकता [वाहिदिय्या]** | – अनेकतेमध्ये एकता, या नात्याने स्वत:स अभिन्न समजणारी सत्ता (अस्तित्व) |

### ३) अल्लाहस्वरूप सत्त्व

ज्याप्रमाणे वेदांतशास्त्रामध्ये गुणांनी समृद्ध असे सत् म्हणजेच सगुण ईश्वर आणि 'हेयगुणांरहित' असे निर्गुण ईश्वर यामध्ये भेद आहे त्याचप्रमाणे 'इन्सान-उल्-कामिल'मध्ये आपणास भेद दिसून येते. ईश्वराचे सत्त्व म्हणजे विशुद्ध सत्ता, परंतु ज्याचे निश्चितपणे अस्तित्व आहे असे अल्लाहचे क्षेत्र -दिव्यत्त्व ('इलाहिय्या') हे सत्त्वाचे सर्वोच्च आविष्करण असते. जे काही व्यक्त आहे, दृश्य आहे त्या सर्वांस हे व्यापून आहे. हे सत्तेच्या तन्मात्रांच्या समष्टिचे एक नाव आहे म्हणजेच ईश्वर (अल-हक़्क़) संबंधस्वरूपात सत्ता. या समष्टिमध्ये त्याचे पोषणकर्ता रूप असते. सर्व विरोध यथाशक्य जास्तीत जास्त परिपूर्णतेमध्ये आपली सापेक्षता व्यक्त करतात - दर्शवतात; जसे, स्रष्टा ('अल्-हक़्क़') सृष्टी अर्थात जीव स्वरूपात दिसून येतो, जसे हदीस (प्रेषित-वचना)प्रमाणे, ''मी ईश्वरास (मिसुरड्या न फुटलेल्या) एका दाढीरहित तरण्याबांड युवकाच्या रूपात पाहिले.'' व्यत्यास स्वरूपात सृष्टी स्रष्टा स्वरूपात व्यक्त होते, जसे, ईश्वराने मानवास आपली प्रतिमास्वरूप घडवले. ज्याअर्थी दिव्यत्त्व गुणांचे सारस्वरूपात प्रतिनिधित्व करते त्याअर्थी ते डोळ्यास अदृश्य असते, मात्र परिणामस्वरूप हे सर्वत्र दृश्य असते, म्हणजेच दृश्य जगामध्ये, दुसरीकडे सत्त्व हे दृश्य असते, जरी तिचे 'ठिकाण', 'स्थळ' असते. त्याचप्रमाणे, जेव्हा एका माणसास पाहाता, तेव्हा तुम्ही जाणता किंवा विश्वास करता की त्याचे काही विशिष्ट गुण आहेत, परंतु तुम्ही त्या (गुणां)ना पहात नाही, तथापि त्याची सत्ता (व्यक्तित्व), जरी त्याचे बरेचसे गुण तुम्हाला माहीत नसतील, तरीपण संपूर्णपणे तुम्ही पाहाता. फक्त गुणांचे प्रभाव दिसतात. प्रत्यक्ष गुणांना तुम्ही पाहू शकत नाही, कारण की गुणांना नेहमी सत्तेमध्ये -सत्त्वामध्ये अदृश्य स्वरूपातच रहावे लागते, नाहीतर सत्त्वापासून वेगळे करणे शक्य झाले असते, आणि हे तर अशक्य आहे. अस्तित्वाच्या एका श्रेणीमध्ये प्रत्येक निम्नतर तन्मात्रे (व्यक्तिकरण)मध्ये सुबोधतेचे एक ऱ्हास अगदी स्पष्ट दिसते. 'समानते'मध्ये, 'भेदा'मध्ये ('इलाहिय्या') केवलतत्त्वाचे अज्ञात वैभव संपूर्णपणे ज्ञात होते. त्याच्याजागी 'भेदामध्ये समानता' येण्याची अपेक्षा करता येऊ शकली असती. ही अवस्था 'वाहिदिय्या' या टप्प्याशी निगडित आहे. एक गूढवादी ब्रह्मज्ञानी या नात्याने जीली हा दृष्टिकोन विचारात घेत नाहीत. ते अल्लाहस केवलतत्त्वाच्या सिंहासनावर आरूढ करतात, आणि अवरोहणाची पुढील रूपरेषा प्रस्तुत करतात :

१) दिव्यत्त्व (इलाहिय्या), २) अमूर्त निराकार एकत्त्व (अहदिय्या), ३) अनेकतेमध्ये एकता 'एकोऽहं बहुस्याम' (वाहिदिय्या), ४) कृपाशीलता (रहमानिय्या), ५) प्रभुत्व, स्वामित्व (रूबूबिय्या)

कृपाशीलता आणि प्रभुत्व हे दिव्यत्त्वाचे विशेषीकृत पैलू आहेत. 'रहमानिय्या'पासून केवळ उत्पादक गुण ('अल्-सिफ़ातुल्-हक़्क़िय्या') अभिव्यक्त होतात, तर 'इलाहिय्या'मध्ये उत्पादक आणि उत्पादित दोन्ही प्रकारचे गुण समाविष्ट असतात. ईश्वराची प्रथम कृपा ('रहमत') म्हणजे स्वत:पासून विश्वाचे अस्तित्व आविष्कृत करणे हे होय. त्याचे आविष्करण समस्त अस्तित्वास वेढून आहे. समष्टिच्या प्रत्येक अणू-रेणूमध्ये त्याची पराकाष्ठा प्रदर्शित आहे, तरी पण अनेकतेमध्ये तो एकमेव ('वाहिद') स्वरूपात राहातो. तो अविभाज्य असल्यामुळे आपल्या स्वभावधर्मानुसार एकमेव एक ('अहद')च असतो. त्याने स्वत:पासून जगाची निर्मिती केली. तो वस्तूंना आपले गुण 'उसने देतो' (प्रदान करतो) असे म्हणणे चुकीचे आहे, खरोखर वस्तूच त्याचे गुण आहेत. दिव्यत्त्वाचे गूढ आणि त्यामधील स्वाभाविक विरोध प्रकट करण्याच्या हेतूने तो सृष्ट वस्तुत्वाचे


(‘ख़ल्क़िय्या’) नाव प्रदान करतो. ईश्वर आणि विश्व यांच्यामधील परस्पर संबंध हा पाणी व बर्फासारखा आहे. ईश्वर हा पाणी असून विश्व हे त्या पाण्यापासून बनलेल्या बर्फासारखे आहे. एकत्र जमलेल्या घनाकार गोळ्यास ‘बर्फा’चे नाव दिले जाते, परंतु त्याचे खरे नाव ‘पाणी’ आहे.

‘रहमानिय्या’पासून निर्माण होणारे सप्त उत्पादक गुण कसे आविष्कृत होतात हे पुढील आकृतीवरून सहजपणे समजेल. (हेच सप्त दैवी गुण पण आहेत.)

अरबी ‘रहमानिय्या’ हा शब्द ‘रहमान’ (कृपावंत)पासून बनलेला आहे. ‘पवित्र कुराणा’मधील लेखनातील वर्तनीनुसार याचे लेखन ‘अल्–रहमान’ असे केले जाते, यद्यपि याचे उच्चारण वेगळ्या तऱ्हेने होते. योगायोगाने अरबी भाषेप्रमाणे देवनागरी लिखाणामध्येसुद्धा या शब्दाची एकूण अक्षरे सातच होतात. म्हणून ‘अल्–रहमान’ हा सप्ताक्षरी शब्द सिद्ध होतो. यामधील प्रत्येक अक्षर हा एकेक गुणाचे निदर्शक आहे. जणू हा सप्ताक्षरी शब्द सप्तदैवी गुणधारी शब्द आहे.

उपरोक्त ‘रहमान’च्या अधीन सर्व दैवी नामे आहेत. शब्दांतर्गत अक्षर–संख्येच्या आधारे ती सप्त दैवी नामे अशी आहेत – १) हयात (जीवन), २) इल्म (ज्ञान), ३) कुद्रत (शक्ती, सामर्थ्य) ४) इरादत (इच्छा, संकल्प), ५) समा (ऐकणे, श्रवण), ६) बसर (पहाणे, दृक्) आणि ७) कलाम (बोलणे, वाणी)

**‘अल्–रहमान’ : सप्त दैवीगुणधारी सप्ताक्षरी शब्द**




**आकृती ५**

प्रभुत्व वा स्वामित्व ('रूबूबिय्या') ईश्वर आणि त्याची सृष्टी यामधील एक आवश्यक संबंध प्रस्थापित करते, कारण एक पूरक वस्तूची गरज अंतर्भूत (समाविष्ट) असलेली गुण-वर्गाचा नमुना दर्शवते, जसे 'स्वामी', 'सेवक' दर्शवते, आणि 'ज्ञाता' हे काहीतरी 'ज्ञात' इंगित करते.

हे समजून येईल की 'तुलना' ('तश्बीह') म्हणजेच ईश्वराचे सृष्टीशी संबंध प्रस्थापित करणे म्हणजे ''त्याच्याविषयी एक निवाडा (निर्णय) करणे होय, आणि यामुळे त्याच्या निरपेक्ष सर्वातीततेवर परिणाम होत नाही. कारण तो स्वत: आपल्यामध्येच असतो. तो आत्मगत असतो. तोच याची कल्पना करू शकतो आणि समजू शकतो. अंत:प्रज्ञा किंवा अंत:प्रेरणेमुळे पुरुषोत्तमांना (नरोत्तमांना) या वस्तुस्थितीची जाणीव होते, तर इतर गूढवाद्यांना श्रद्धेमुळे ती एक सत्य बाब स्वरूपात, याची जाणीव होते. सत्त्वमूलक सर्वातीततेस कुठलाच व्यत्यास नसतो. आपल्या उत्पादक आणि उत्पादित पैलूंमध्ये ईश्वर हा एक असल्याची जाणीव असलेल्यांना 'तंज़ीह' आणि 'तश्बीह'मध्ये फरक असल्याचे जाणवते. अस्तित्वात असलेल्या सर्व वस्तू दिव्य अत्युत्कृष्टतेचे (हुस्न) नमुने असतात. ईश्वराच्या खऱ्या ज्ञानामध्ये त्याची अनुभवातीतता ही त्याच्या सर्व व्यापकतेशी जुळलेली असते. संपूर्णपणे विचारात घेतल्यास, दैवी स्वभाव बदल स्वीकारत नाही. बदल हा ईश्वराशी संबंधांमध्ये निहित असतो, म्हणजेच आपणास दिसणाऱ्या त्याच्या विविध पैलूंमध्ये त्याचे स्वत:चे आविष्करण आणि त्याचे स्वत:मध्ये स्वत:चे दुरावबोधन (गूढता) हे चिरंतनपणे एकसमानच असते. आदि आणि अंत नसलेली, अनंततेची संकल्पना, जेव्हा ईश्वराला लागू केली जाते तेव्हा त्याच्या सृष्टीशी काळाचा संबंध नसतो, परंतु एक असा निर्णय की त्याचा स्वभाव हा अनिवार्यपणे कालरहित असतो.

जीली दैवी गुणांचे एक चार प्रकारचे विभाजन प्रस्तुत करतात : (१) सत्त्व गुण (अस्मा व सिफ़ाते ज़ातिया) जसे एक, शाश्वत, सत्य. ही ईश्वराची सत्तामूलक नामरूपे (गुण) आहेत. (२) भद्र गुण (अस्मा व सिफ़ाते जलालिया) जसे, क्षमा करणारा, जाणणारा, सन्मार्ग दाखवणारा. (३) रुद्रगुण (अस्मा व सिफ़ाते जमालिया), जसे सर्वशक्तिमान, पथभ्रष्ट करणारा. (४) पराकाष्ठेचे - पूर्णतेचे गुण (अस्मा व सिफ़ाते कमालिया) हे गुण संमिश्र असतात. जसे, कृपाशील, निर्माता, ऐकणारा, पाहणारा, व्यक्त, तत्त्वज्ञ (बुद्धिवंत).

प्रत्येक गुणाचा एक प्रभाव (असर) असतो. त्यामध्ये त्याचे जमाल किंवा जलाल अथवा कमाल गुणाचे आविष्करण होते. जसे, ज्ञानाचे विषय हे 'अल्-अलीम', सर्वज्ञ या नामाचा 'परिणाम', 'परिणती' आहे. प्रत्येक अस्तित्वामध्ये सर्व 'जमाल' आणि काही 'जलाल' गुण प्रदर्शित होतात. स्वर्ग हा परम, विशुद्ध 'जमाल'चा आरसा आहे; तर नरक परम 'जलाल'चा. यद्यपि पाप वा कुकर्माचे अस्तित्व नाही तरी पण विरोधाच्या जगामध्ये त्याचे एक निश्चित स्थान आहे. लेखकाने सप्त प्रमुख दैवी गुणांची - जीवन, ज्ञान, सामर्थ्य (शक्ती), संकल्प (इच्छा), ऐकणे, पाहाणे आणि बोलणे - मांडणी मोठ्या बारकाव्याने केली आहे. याचे काही नमुने पुढे दिले आहेत.

**१) जीवन -** एखाद्या वस्तूचे स्वत:चे अस्तित्व हे तिचे संपूर्ण जीवन असते, दुसऱ्यासाठी तिचे अस्तित्व हे सापेक्ष जीवन असते. ईश्वर हा स्वयंभू आहे अर्थात त्याचे अस्तित्व हे स्वयमेव आहे. तो सजीव (अल्-हय्य) आत्म-निर्भर आहे आणि त्याचे जीवन हे परिपूर्ण आणि अमर, शाश्वत आहे. सर्वसाधारणपणे सृष्टीचे अस्तित्व ईश्वरासाठी असते. सजीवांचे जीवन हे सापेक्ष असते आणि त्याच्या संबंध मृत्यूशी असतो. ज्याअर्थी जीवांमधील

दैवी जीवन हे एक आणि संपूर्ण असते, त्याअर्थी काही एक संपूर्ण स्वरूपात अभिव्यक्त होतात, जसे पुरुषोत्तम (नरोत्तम) आणि देवदूत, तर इतर अपूर्ण स्वरूपात, जसे पशु-मानव (अल्-इन्सानुल-हैवानी), गौण वा कनिष्ठ देवदूत, यक्ष-किन्नर (जिन्न), पशू, वनस्पती आणि खनिजे. तरीपण विश्वव्यवस्था टिकवण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रमाणात आणि मात्रांमध्ये सजीवांचे जीवन, विशिष्ट अर्थामध्ये पूर्ण असते. जीवन हे एक एकल सत्त्व आहे. प्रत्येकामध्ये तिचे अस्तित्व आहे. ऱ्हास अथवा विभाजनास ते असमर्थ आहे, आणि ज्यामुळे वस्तू आहे असे निदर्शनास येते तेच जीवन आहे, म्हणजेच, जेणेकरून सर्व वस्तू ईश्वराच्या जीवनामुळे अस्तित्वात असतात. ईश्वराच्या सर्व नामांच्या संदर्भात ते सर्व त्याचा गौरव करतात. 'सजीव' या नामाच्या संदर्भात त्यांची ईश्वराची उच्च प्रशंसा ही त्याच्या जीवनाच्या माध्यमातून त्यांच्या अस्तित्वाशी तंतोतंत जुळणारी असते. प्रत्येकाचे अस्तित्व हे स्वत:साठी असते, आणि त्याचे जीवन संपूर्णपणे स्वतंत्र आणि स्वेच्छा असते. दैवी माहितीनुसार, पुनरुत्थानाच्या दिवशी मानवाचे प्रत्येक कर्म दृश्य आकारामध्ये उपस्थित होईल आणि त्याला संबोधून म्हणेल, 'मी तुझे कर्म आहे.'

**२) ज्ञान :** जरी प्रत्येक गुण हे स्वतंत्र आणि अ-मिश्र असते तरी ज्ञान हे जीवनाशी जवळपास जुळलेले असते. जीली, इब्नुल अरबीच्या या सिद्धान्ताचा विरोध करतात की ईश्वराची ज्ञानप्राप्ती ही त्याला ज्ञात असलेल्या वस्तूंवरून होते. प्राणी, कृमि-कीटके यांना अंत:प्रेरित ज्ञान ('इल्म इल्हामी') असते. ईश्वराने निश्चितपणे निवाडा केले आहे की प्रत्येक वस्तू ही आपल्या स्वभावास अनुसरूनच असली पाहिजे; परंतु इब्नुल अरबीचे फलित, म्हणजे हे की, वस्तूंना आवश्यक असलेल्या आपल्या स्वभाव-धर्मापासून ईश्वराचे वस्तुविषयक ज्ञान निघालेले असते, हे चूक आहे; उलट निर्मिती आणि अस्तित्व प्रदान करण्याअगोदर ईश्वराच्या त्यांच्यासंबंधी ज्ञानाने त्याबरहुकूम बनवले. हे त्याच्या (ईश्वराच्या) ज्ञानामुळे घडते. हे वस्तूंच्या अंगभूत गुणांमुळे घडत नसते. नंतर म्हणजेच, त्यांच्या निर्मितीनंतर, प्रथम, त्यांच्या स्वभावांना, ईश्वर जाणत असलेल्या व्यतिरिक्तची गरज भासली, आणि मग त्याने दुसऱ्यांदा निवाडा दिला की वस्तू या त्यांच्या स्वभावांच्या गरजेनुसार असाव्यात. हे त्याच्या (ईश्वराच्या) ज्ञानाबरहुकूम असावे.

**३) संकल्प (इच्छा) :** ''आपल्या ज्ञानाच्या गरजेनुसार, वस्तूंचे विस्तृत विवरणाचे अस्तित्वाने त्याचे ज्ञान'', हा ईश्वराचा संकल्प आहे. आमची इच्छा ही दैवी शाश्वत संकल्पासारखी असते, परंतु आपल्या संबंधात ती आमच्या अस्थायीत्वाची (हुदूस) भागीदार होते, आणि आपण त्याला 'सृष्टी' असे म्हणतो. आपल्या वांछितास प्रत्यक्षात उतरवण्यामध्ये फक्त हे अवास्तविक आरोप अडथळा निर्माण करते. जर आम्ही आपले संकल्प ईश्वरावर सुपूर्द केले तर सर्व गोष्टी तिच्या अधीन होतात. जीली संकल्पाची नऊ (९) रूपे परिगणित करतात. त्याची सुरुवात कल वा ओढा ('मैल')पासून होते आणि सर्वोच्च व अत्यंत विशुद्ध प्रेम ('इश्क़') येथे समाप्त होते. येथे प्रियकर व प्रेयसी नसते. कारण दोन्ही प्रेमामध्ये म्हणजेच ईश्वराच्या सत्त्वामध्ये विलीन झालेले असतात. दैवी संकल्प हे अनिर्मित आणि संपूर्णपणे स्वतंत्र असते. ज्ञात्याच्या स्वभावाच्या गरजेनुसार कृती करण्याच्या बंधनाने हे निश्चित होत नसते.

**४) सामर्थ्य (शक्ती) :** जीलीप्रणीत याची व्याख्या अशी आहे -''अस्तित्वशून्यतेपासून अस्तित्वाची निर्मिती. येथे पण इब्नुल अरबीशी आपले मतभेद प्रदर्शित करतात. अरबीचे प्रतिपादन असे होते की ईश्वराने

जगाची निर्मिती अस्तित्वहीनतेपासून केलेली नाही. त्याने आपल्या ज्ञानामधून ती प्रत्यक्षात अवतरवली. जीली प्रतिवाद करतात की, परंतु त्या परिस्थितीत जग हे ईश्वराशी सह-शाश्वत होईल असे नव्हे. ईश्वर स्वत: अस्तित्वमय होता. हा निर्णय तर्कशास्त्रदृष्ट्या वस्तूंचे अस्तित्व त्याच्या ज्ञानामध्ये होते, या निर्णयापूर्वी होता, आणि पूर्वोक्त निर्णयामध्ये वस्तूंचे निरस्तित्व आणि फक्त ईश्वराचेच अस्तित्व याचा समावेश आहे. ईश्वराने वस्तूंना अभाव मात्रापासून (अस्तित्व हीनतेस) भाव मात्रामध्ये (अस्तित्वामध्ये) आणले आणि त्यांना आपल्या ज्ञानामध्ये अस्तित्वात असण्यास भाग पाडले, म्हणजेच त्याने त्यांना अस्तित्व हीनतेपासून अस्तित्वामध्ये आणल्याचे जाणले, मग त्याने त्यांना आपल्या ज्ञानापासून आणले आणि त्यांना बाह्य स्वरूपात अस्तित्व धारण करण्यास भाग पाडले. येथे प्राधान्य तर्काचे आहे, वेळेचे नव्हे. वस्तूंचे अस्तित्वात नसणे आणि ईश्वराच्या ज्ञानकक्षेमध्ये त्यांचे अस्तित्व या दोहोंमध्ये मध्यंतर नाही. तो स्वत:स ओळखतो त्याचप्रमाणे तो त्यांना (पण) जाणतो, परंतु ते त्याच्यासारखे शाश्वत नाहीत.

## ९) दैवी गुण : विवेचन (अल्लाहचे कुराणोक्त गुण)

स्वत: परम पवित्र आणि परमश्रेष्ठ अल्लाह (परमेश्वरा)ने आपले पवित्र ग्रंथ 'कुरआन'मध्ये आपल्या गुणांची उतरंड मंगलाचरण अर्थात 'सूरतुल्-फ़ातेहा' या प्रथम अध्यायामध्ये पुढीलप्रमाणे दर्शवली आहे -

''अल्हम्दु लिल्लाहि रब्बिल-आलमीन (१) अर्रह्मानिर्रहीमि (२) मालिकि यौमिद्दीनि (३)'' म्हणजेच ''सर्व स्तुतीचा अधिकारी **अल्लाह**[१] हाच (आहे) जो सकल जगांचा **पालनकर्ता** (रब्ब)[२] आहे (१) एकमात्र **दयाळू** (रहमान)[३] (आणि) **कृपाळू** (रहीम)[४] (२) (शेवटच्या) निर्णयाच्या दिवसाचा अधिपति (धनी) (**मालिक**)[५] (३)''.

उपरोक्त अवतरणामध्ये परमेश्वराने प्राधान्यक्रमाच्या आधारावर आपल्या सत्तेसह एकूण पाच दैवी गुणांचा उल्लेख केलेला आहे. तो असा - (१) 'अल्लाह', (२) 'रब्ब' (३) 'रहमान', (४) 'रहीम' आणि (५) 'मालिक'. येथे उतरंड समाप्त होते. त्यानंतर परमेश्वराच्या असंख्य गुणांची मालिका सुरू होते. त्याच्या असंख्य गुणांचे वर्गीकरण हे खालील चार वर्गात केले जाऊ शकते. ते असे -

१) सत्त्व गुण (अस्मा व सिफ़ाते ज़ातिया),

२) भद्र गुण (अस्मा व सिफ़ाते जमालिया),

३) रुद्र गुण (अस्मा व सिफ़ाते जलालिया).

४) पराकाष्ठेचे - पूर्णतेचे गुण (अस्मा व सिफ़ाते कमालिया).

**१) अल्लाह (परात्परपरब्रह्म) :** हा शब्द परमेश्वराच्या 'ज़ात' अर्थात सत्तेशी निगडित आहे. हा अरबी 'ज़्'पासून निर्माण झालेला शब्द आहे. 'ज़ात' हा अरबीमध्ये स्त्रीलिंगवाचक शब्द आहे. म्हणून तो प्रसवधर्मा आहे. त्यामुळेच सर्व गुणांचा उद्भव हा अल्लाहच्या 'ज़ात' पासून झालेला आहे. यास्तव सर्व गुणांचा उगम-स्रोत 'अल्लाह' आहे.

'अल्लाह' विश्वनिर्माता सत्तेचे नाव आहे. सर्वश्रेष्ठ व सर्वोत्तम गुण त्याचेच आहेत. कल्याण व सुख-समृद्धीचा स्रोत तोच आहे. ''खरोखर, अल्लाह हा सर्वोच्च (व) महान आहे.'' ४:३४ ''सर्व सन्मानाचा धनी

(फक्त) अल्लाह आहे.'' ४:१३९ ''अल्लाह (हा) अपार कृपेचा स्वामी आहे.'' ५७:२१ ''अल्लाह हा सर्व वस्तुमात्रांचा निर्माता आहे. आणि तो सर्व वस्तुमात्रांचा प्रतिपालक आहे.'' ३९:६२ ''त्याच्या हातात प्रत्येक वस्तूचे अधिपत्य आहे.'' ३६:८३ ''प्रत्येक वस्तूमात्रावर त्याची सत्ता आहे.'' ३०:५०

''सत्ताधिकार त्याचाच आहे.'' २८:८८ ''सर्व सत्ताधीश तोच आहे.'' २३:९५ ईश्वराच्या स्वरूपाविषयी सूफींचे मत याहून वेगळे तरी कसे असणार बरे! त्यांच्या मते परमेश्वर हा कैवल्यरूप असून साऱ्या वस्तूजाताचे उगमस्थान आहे. परमेश्वराहून निराळे दिसणारे व्यक्तिमत्त्वाचे अस्तित्व ही परमेश्वराची इच्छा अथवा लीला होय. ह्या मताप्रमाणे 'वस्तूजाताचे अस्तित्व हेच परमात्म्याचे साररूपी अस्तित्व होय.' हा एक प्रकारचा केवलाद्वैतच होय. उपनिषदांचे सार तरी हेच.

'अल्लाह' हा परमेश्वरासाठी 'इस्मे ज़ात' म्हणजेच सत्त्व गुण आहे. याव्यतिरिक्त कोणत्याच अस्तित्वाशी याचा अर्थ घेतलाच जाऊ शकत नाही. फारसी भाषेतील 'खुदा' किंवा आंग्ल भाषेतील 'गॉड' प्रमाणे 'अल्लाह' ही जातिवाचक संज्ञा नाही की 'माबूदे वाहिद' (केवळ एकच परमेश्वर की ज्याची उपासना-आराधना केली जावी) शिवाय दुसऱ्यांसाठी (इतरांसाठी) पण म्हटली जाऊ शकेल. 'अल्लाह' या शब्दाचे ना अनेक वचनी रूप आहे, ना स्त्रीलिंगी रूप, ना हे कोणत्याच शब्दाने सिद्ध झालेले (बनलेले) आहे आणि ना इतर भाषेमध्ये याचे अनुवाद शक्य आहे. खरोखर, हा अनुपमेय असा एकमेवाद्वितीय व्यक्तिवाचक शब्द आहे. 'अल्लाह' त्या सत्तेचे नाव आहे जी संपूर्ण सद्गुणांनी युक्त अशी आहे. तो संपूर्ण सृष्टीचा स्रष्टा आणि सर्वांचा स्वामी आहे.

**२) रब (पालनकर्ता, प्रभू) :** 'रब' हा शब्द अरबी भाषेत तीन अर्थांनी वापरला जातो - (१) मालक, (२) पोशिंदा, पालनपोषण करणारा, काळजी वाहणारा व देखरेख करणारा, (३) शासक, आज्ञापक, संयोजक आणि व्यवस्थापक. सर्वश्रेष्ठ अल्लाह या सर्व अर्थांनी सृष्टीचा रब-प्रभू आहे.

येथे 'रब' हा शब्द संज्ञा (नाम) स्वरूपात प्रयुक्त झालेला आहे. तो एक अंश आहे, जिचा अर्थ आहे 'प्रशिक्षण' आणि 'प्रशिक्षणा'चा अर्थ आहे एखाद्या वस्तूची एका स्थितीपासून दुसऱ्या स्थितीमध्ये प्रगती घडवून आणणे, इथपर्यंत की ती पराकाष्ठेच्या सीमेपर्यंत जाऊन पोहोचेल. 'रबूबियत'चा अर्थ आहे, एखाद्या वस्तूस क्रमा-क्रमाने हळू-हळू कमालच्या-पराकाष्ठेच्या हद्दीपर्यंत नेऊन पोचविणे. अरबीमध्ये याच्यापासून कुठल्याही बदलाशिवाय 'अल्लाह'चाच अर्थ निघतो. अध्यायाच्या सर्वप्रथम आलेला 'बिस्मिल्लाह' या शब्दाचा कानाडोळा करून पाहिल्यास, कुराणाच्या संहितेमध्ये सर्वप्रथम अल्लाहचा 'रबूबियत' हा गुण प्रकट होतो, जणू काही 'प्रभुत्वा'चा गुण इतर सर्व गुणांचा स्रोत आहे, आणि पुढे जेवढी म्हणून अल्लाहची नामे येतील त्या सर्वांच्या अर्थाचा उद्देश 'रबूबियत'च्या अंतर्गत मोडेल. (समाविष्ट होईल.)

पालनकर्ता याला अरबी शब्द 'रब' आहे. याचा मूळ अर्थ कोणत्याही वस्तूस हळूहळू तिच्या पूर्णावस्थेस आणणारा असा होतो. तर रब म्हणजे सर्वांचा स्वतंत्रपणे निर्माणकर्ता व प्रत्येक अवस्थेत पालनकर्ता असा जो परमेश्वर त्यालाच सर्व स्तुती योग्य होय. पालनकर्ता या नामाद्वारे परमेश्वराने आपल्या सर्व सृष्टीशी आपला प्रेममय संबंध दर्शवला आहे.

**३) रहमान (दयाळू) :** 'रहमान' व 'रहीम' हे दोन्ही शब्द एकाच धातूचे आहेत, परंतु रहमान म्हणजे परम दयाळू – जो ह्या जगात सर्वांवर दया करणारा तो, व रहीम म्हणजे परम कृपाळू – जो परमेश्वराला एक मानणाऱ्यांवरच परलोकमध्ये कृपा करणारा तो, – असा एकच परमेश्वर आहे.

परमेश्वराची परम दया ही की तो सर्वांस ह्या जगात निर्माण करतो व त्याला कोणी मानो अगर न मानो तो त्यांचे पालन पोषण करतो. ही सत्ता अपार दया करणारी आहे. या सत्तेचे दयेचे सत्र कधीच समाप्त होणारे असे नाही. दया ही सर्वव्यापक असते. दया हा 'रहमान'चा गुणधर्म आहे; तर क्षमा हा 'रहीम' अर्थात कृपाळूतेचा गुणधर्म आहे. क्षमा ही सीमित असून ती फक्त क्षमेस योग्य असणारासाठीच असते. न्याय हा 'रहमान'चा अविभाज्य घटक आहे.

मागे विवेचन केल्याप्रमाणे 'रहमान' म्हणजेच 'अल्–रहमान' हा सप्त दैवी गुणधारी सप्ताक्षरी शब्द आहे. या सप्त अक्षरांमधूनच परमेश्वराच्या आणखी इतर सात गुणांचा उदय होतो. ते सात गुण आहेत (१) जीवन, (२) ज्ञान, (३) सामर्थ्य (शक्ती), (४) संकल्प (इच्छा), (५) ऐकणे, (६) पहाणे आणि (७) बोलणे. या सर्व सात दैवी गुणांची देणगी परमेश्वराने फक्त मानवास दिली आहे, तर इतरांना यापैकी काहीच. अशाप्रकारे 'अल्–रहमान' हा दैवी गुण उपरोक्त सप्त दैवी गुणांचा जन्मदाता आहे.

''मानव हे अल्लाहचे प्रतिरूप आहे'' असे विधान करून सूफी विचारक मुहम्मद अल्–बर्क़वी यांनी असे दाखवून दिले आहे की अल्लाहच्या ९९ लाक्षणिक किंवा गुणात्मक नावांपैकी निम्नलिखित सप्त दैवी गुण हे मानवामध्ये आढळून येतात. ते याप्रमाणे आहेत –

१) हयात (जीवन) – मानवाचा आत्मा (रूह) हा हईचा प्रतिरूप आहे. [चिरंजीव]

२) इल्म (ज्ञान) – मानवाची बुद्धी (मन) (दिल) हे अलीमचे प्रतिरूप आहे. [सर्वज्ञ]

३) कुद्रत (शक्ती) – मानवाचे शरीर (जिस्म) हे क़दीरचे प्रतिरूप आहे. [सर्वसमर्थ]

४) इरादा (इच्छा) – मानवाची वासना (नफ़्स) ही मुरीदची प्रतिरूप आहे. [संकल्पक]

५) समा (श्रवण) – मानवाचे कान (गोश) हे समीअचे प्रतिरूप आहे. [बहुश्रुत]

६) बसर (दृष्टी) – मानवाचे नेत्र (चश्म) हे बसीरचे प्रतिरूप आहे. [सर्वद्रष्टा]

७) कलाम (वाणी) – मानवाची जिव्हा (ज़बान) ही कलीमची प्रतिरूप आहे.[३१] [वाचक]

**४) रहीम (कृपाळू) :** परमेश्वराने आपल्या कृपेने मानवास सर्वोत्तम देणग्या दिल्या. मानव हा परमेश्वराच्या कृपेच्या छत्रछायेमध्ये वाढतो आहे, प्रगती करत आहे, सत्कर्मांच्या मार्गावर अग्रेसर होत आहे, कर्माच्या स्वातंत्र्याच्या सवलतीचा फायदा घेत आहे आणि परलोकामध्ये श्रद्धावंत या गुणामुळे स्वर्गामध्ये ऐशआरामाचे जीवन कंठत असेल.

त्याची परम कृपा ही की जे लोक त्याला श्रद्धापूर्वक मानतात व त्याच्या आदेशांप्रमाणे वागतात त्यांना तो जाति व वर्णांचा भेद न पाळता परलोकी प्रत्येकाच्या कर्माच्या योग्यतेप्रमाणे अतोनात कल्याण व सुख देईल.

''तो (स्वर्ग) अशा लोकांसाठी तयार करण्यात आलेले आहे, जे अल्लाह व त्याच्या प्रेषितावर विश्वास ठेवणारे आहेत. ही अल्लाहची अपार कृपा आहे, तो इच्छितो त्यास ती प्रदान करतो आणि अल्लाहच्या कृपेला सीमाच नाही.'' ५७:२१ ''त्याने (अल्लाहने) दया व कृपेची नीती स्वत:साठी बंधनकारक ठरविली आहे.''

६:१२ किंवा ''त्याने दया व कृपेची नीति स्वत:साठी अनिवार्य करून घेतली आहे. (म्हणूनच तो अवज्ञा व उद्धटपणावर तुम्हाला लगेच पकडत नाही.)'' ६:१२

परमेश्वराचे दोन कृपा-हस्त आहेत - (१) अभयहस्त आणि (२) वरदहस्त. अभयहस्ताद्वारे तो भक्ताला अभय देऊन त्याचे रक्षण करतो, तर वरदहस्ताद्वारे तो भक्तांची मनोकामना पूर्ण करतो.

**५) मालिक (अधिपती, धनी) :** 'मालिक' म्हणजेच अधिपती तो असतो, ज्याला संपूर्ण अधिकार असतात. तो सर्वाधिकारी व सर्वेसर्वा असतो. तो वाटल्यास अपराध्यास क्षमा करेल, वाटल्यास शिक्षा देईल. त्याला कुणीच विचारणारा नसतो आणि त्याच्यावर अधिकार गाजविणारा कोणीच नसतो. 'हदीसे मुस्लिम'मध्ये असे नमूद आहे की सर्वश्रेष्ठ परमेश्वराशिवाय कोणीच 'मालिक' नाही. अधिपति नाही. संशोधकांचेही पण असेच मत आहे की अल्लाहाशिवाय इतरास 'मालिक' म्हणून संबोधणे उचित नाही, योग्य नाही. या शब्दाचा फ़ारसी अनुवाद पण 'सम्राट' या अर्थी सुफ़्यान ताबेई यांनी केले आहे, आणि भाष्यकारांनी पण याचा अर्थ संपूर्ण अधिकारांचा अधिपति असा केला आहे. त्या मालकास (म्हणजेच परमेश्वरास) संपूर्ण अधिकार आहे की अपराध्यास शिक्षा करेल, वाटल्यास शिफारस किंवा विना शिफारस पूर्णपणे माफी देईल. सर्व काही त्याच्या मर्जीवर आहे.

सारांश, आमचा निर्माणकर्ता, पालनकर्ता व शेवटच्या निर्णयाचा मालक, परमेश्वरच ठरतो म्हणून भक्तीस पात्रही केवळ तोच आहे.

इब्ने क़य्यूम म्हणतात की, ''या अध्यायामध्ये पाच नावे अल्लाहची आलेली आहेत आणि पाचीचे अर्थ वेगवेगळे दाखवले आहेत. सारांश हे की, संज्ञा (नाम) (१) **अल्लाह** त्याचे वैभव आणि त्याचे सौंदर्य या अर्थाशी परिपूर्ण आहे आणि यामध्ये संक्षिप्तपणे ते सर्व काही आलेले आहे, की जिला सर्व इतर नामांमध्ये सविस्तरपणे मांडले आहे, आणि संज्ञा (२) **अर्रब**च्या अंतर्गत त्याचे सर्व गुण, कार्य, शक्ती, लाभ आणि हानी, वरदान आणि वंचित करणे इत्यादीचा समावेश आहे, आणि संज्ञा (३) **अर्रहमान**च्या अंतर्गत त्याची कृपा आणि मेहेरबानी, त्याचे बक्षीस आणि दया आणि त्याचे स्नेह आणि प्रेम हे सर्व येतात. आणि संज्ञा (४) **अर्रहीम**चा अर्थ आहे, आपल्या दासांवर कृपा करणारा, आणि संज्ञा (५) **मालिक**च्या अंतर्गत न्याय, प्रतिशोध आणि दंड, प्रतिष्ठा-अप्रतिष्ठा देणे इत्यादी येतात.''[३२]

संपूर्ण कुराणामध्ये अल्लाहच्या जवळ-जवळ एकूण १३० गुणांचा उल्लेख येतो. त्यांचे विभाजन वा वर्गीकरण तीन प्रकारामध्ये करता येऊ शकते. ते असे - (१) निव्वळ एकल गुणवाचक शब्द, (२) एकल सामासिक गुणवाचक शब्द, (३) गुणवाचक युग्म शब्द.

**१) निव्वळ एकल गुणवाचक शब्द :** रऊफ़ (कनवाळू) २:२०७, ख़बीर (जाणीव असलेला) २:२३४, बसीर (पाहणारा) २:३३३, वह्हाब (दाता) ३:८, ग़नी (निरपेक्ष) ३:९७, क़दीर (समर्थ) ४:१३३, वकील (प्रतिपालक) ६:६६, हफ़ीज़ (रक्षणकर्ता) ११:५७, सुबहान (पवित्र) १२:१०८, सुबहान (पवित्र) ३७:१५९, ग़फ़्फ़ार (अतिशय क्षमाशील) २०:८२, ख़ालिद (चिरंजीव) २१:८, रहमान (कृपाशील) २५:६१, हय्यी (सचेतन) २५:५८, तआला (उदात्त) २७:६३, शहीद (सर्वसाक्षी) ३३:५५, मौला (संरक्षक) ४७:११, मुक़्तदिर (सर्व शक्तिमान सम्राट) ५४:५५, वाहिद (एकमेव) ३७:४, हय्यु (निरंतर जिवंत) ४०:६५, तबारक (वैभवशाली) २५:१

**२) एकल सामासिक गुणवाचक शब्द :** त्तव्वाबुर्रहीम (करुणा करणारा, दयाळू) २:३७, फ़ज़लिल्-अज़ीम (कृपेच्या बाबतीत अतिशय दानशूर, असीम कृपेचा दाता) २:१०५, सरीउल्-हिसाब (शीघ्र हिशेब करणारा) २:२०२, शदीदुल् इक़ाब (कठोर शिक्षा देणारा) २:२११, ५९:४; ख़ैरूल्माकरीन (सर्वोत्तम नियोजनकार) ३:५४, अल्लामुल्गुयूब (अदृष्टाचा फार मोठा ज्ञाता) ५:१०९, हकीमुल् ख़बीर (ज्ञानी, प्रत्येक गोष्टीची जाणीव असलेला) ६:१८, ख़ैरुल्फ़ासिलीन (सर्वोत्तम न्यायाधीश) ६:५७, अस्रुल हासिबीन (सर्वात जलद हिशेब करणारा) ६:६२, ख़ैरुल्हाकिमीन (सर्वोत्तम निर्णय करणारा) १०:१०९, अहकमुलहाकिमीन (सर्वोत्तम न्यायाधीश, न्याय करणांमध्ये सर्वाधिक न्यायी) ११:४५, क़विय्युल अज़ीज़ (शक्तिमान सामर्थ्यशाली) ११:६६, हलीमुर्रशीद (बुद्धिमान, समंजस) ११:८७, अर्हमुर्राहिमीन (दया करणारांमध्ये सर्वाधिक दयाळू) १२:९२, रफ़ीउद्दरजात ज़ुलअर्श (दर्जा उदात्त करणारा सिंहासनाचा स्वामी) ४०:१५, अल्कबीरूल मुतआल (महान, अतुलनीय, सर्वोच्च) १३:९, वाहिदुल्क़हहार (एकमेव सर्वाधिकारी) १३:१६, अज़ीज़ुल हमीद (सर्व शक्तीमान स्तुतिपात्र) १४:१, ख़ल्कुल अलीम (महान निर्माता सर्वज्ञ) १५:८६, ख़ैरूंव्व अब्क़ा (सर्वोत्तम परम चिरस्थायी) २०:७३, अलिय्युल्-कबीर (सर्वोत्तम, अतुलनीय, महान) २२:६२, निअमल-मौला निअमन्नसीर (कितीतरी उत्तम स्वामी (आणि) उत्तम साहाय्यकर्ता) २२:७८, तबारकल्लाहु अह्सनुल्-ख़ालिक़ीन (मोठा समृद्ध अल्लाह, सर्वोत्तम निर्मितीकार) २३:१४, ख़ैरूर्-राज़िक़ीन (उपजीविका देणारामध्ये सर्वोत्तम) २३:७२, ख़ैरूर राहिमीन (दया दाखवणारांमध्ये सर्वश्रेष्ठ, सर्वोत्तम) २३:१०९, रब्बिल्-आलमीन (सर्व जगांचा विधाता) १:१, समीउल्-बसीर (ऐकणारा पाहणारा) ४१:५६, र्रहमानिर्रहीम (कृपाशील दयाळू) २७:३०, रब्बुल्-आलमीन (समृद्धशाली अल्लाह सर्व जगांचा विधाता) ४०:६४, अलिय्युल्-अज़ीम (उत्तुंग महान) ४२:४, वलिय्युल हमीद (संरक्षक स्तुतीपात्र) ४२:२८, वलिय्युलमुत्तक़ीन (सदाचरणी लोकांचा मित्र) ४५:१९, अज़ीज़िल्-हकीम (सर्वशक्तिमान बुद्धिवंत) ४५:२, बर्रूर्रहीम (कल्याणकरणारा दयाळू) ५२:२८, ज़िल्जलालि वल्-इक्रामि (वैभव व सन्मान) ५५:७८, आलिमुल्-ग़ैब (अदृष्टाचा ज्ञाता) ७२:२६, सुब्हान रब्बिल्-इज़्ज़त (पवित्र सन्मानाचा स्वामी) ३७:१८०, अहसनल् - ख़ालिक़ीन (सर्वश्रेष्ठ निर्माता) ३७:१२५, ख़ल्लाकुल्-अलीम (निर्माता, सर्वज्ञ) ३६:८१, अज़ीज़िल्-अलीम (सर्वशक्तिमान सर्वज्ञ) ३६:३९, फ़ज़्ले आला (अत्यंत उदार) २:२५१, ग़ाफ़िरिज़्ज़म्ब क़ाबिलित्तौब शदीदिल्-इक़ाब (पापाची क्षमा करणारा, पश्चात्ताप स्वीकार करणारा, कठोर शिक्षा करणारा) ४०:३.

**३) गुणवाचक युग्म शब्द :** वली नसीर (रक्षणकर्ता, सहाय्यकर्ता) ९:११६, समीअ अलीम (ऐकणारा सर्वज्ञ) २:१२७, अज़ीज़ हकीम (सर्वशक्तीमान बुद्धिवंत) २७:९, रऊफ़ रहीम (कनवाळू कृपाशील) २:१४३, शाकिर अलीम (गुणज्ञ सर्वज्ञ) ४:१४७, रहमान रहीम (कृपाळू दयाळू) २:१६३, ग़फ़ूर हलीम (क्षमाशील संयमी) ५:१०१, वासिअ अलीम (उदार सर्वज्ञ) ३:७३, ग़नी हलीम (आत्मनिर्भर संयमी) २:२६३, ग़नी हमीद (स्वयंपूर्ण स्तवनीय) ३५:१५, हय्य क़य्यूम (चिरंजीव, स्थैर्य देणारा, स्थितप्रज्ञ) २०:१११, मौला नसीर (रक्षणकर्ता, सहाय्यकर्ता) ३:१५०, अलीम हकीम (सर्वज्ञ ज्ञानी) ४:१७, अलीम हलीम (सर्वज्ञ धीरोदत्त) ३३:५१, अलीम ख़बीर (सर्वज्ञ, नित्य जाणीव असलेला) ४९:१३, अफ़ुव्व ग़फ़ूर (कनवाळू क्षमाशील) ४:४३, समीअ बसीर (ऐकणारा पाहणारा) २२:७५, वासिअ हकीम (उदार बुद्धिवंत) ४:१३०, अफ़ुव्व क़दीर (क्षमा

करणारा, सर्वशक्तिमान) ४:१४९, हकीम अलीम (ज्ञानी सर्वज्ञ) १५:२५, अज़ीज़ अलीम (सर्वशक्तिमान, सर्वज्ञ) ४०:२, लतीफ़ ख़बीर (सूक्ष्मदर्शी, बहुश्रुत) ३३:३४, हमीद मजीद (स्तुतिपात्र, वैभवशाली) ११:७३, रहीम वदूद (दयाळू, अतिशय प्रेमळ) ११:९०, अलीम क़दीर (सर्वज्ञ, सामर्थ्यशाली) १६:७०, हलीम ग़फ़ूर (सहिष्णू, अतिशय क्षमाशील) १७:४४, क़वीय्यु अज़ीज़ (शक्तिमान, सामर्थ्यशाली) २२:४०, अफ़ुव्व ग़फ़ूर (पापविमोचक क्षमाशील) २२:६०; वासिअ अलीम (उदार सर्वज्ञ) २४:३२; तव्वाब हकीम (कृपाशील बुद्धिवंत) २४:१०; हादी नसीर (मार्गदर्शक सहाय्यकर्ता) २५:३१, आलिमिल ग़ैब व शहादत (अदृष्ट आणि दृष्ट दोन्ही जाणणारा) २३:९२; अज़ीज़ रहीम (सर्वशक्तिमान दयाळू ) २६:९; हकीम अलीम (बुद्धिवंत सर्वज्ञ) २७:६; ग़नी करीम (स्वयंपूर्ण उदार) २७:४०; रहीम ग़फ़ूर (दयाळू, अतिशय क्षमाशील) ३४:२; फ़त्ताह अलीम (निवाडा करणारा सर्वज्ञ) ३४:२६; समीअ क़रीब (ऐकणारा, निकटतम) ३४:५०; अज़ीज़ ग़फ़ूर (सर्वशक्तिमान, अतिशय क्षमाशील) ६७:२; ग़फ़ूर रहीम (क्षमाशील, दयाळू) २:१७३; ग़फ़ूर शकूर (अतिशय क्षमाशील, अतिशय गुणग्राहक) ३५:३०; अलीम क़दीर (सर्वज्ञ, सर्वशक्तिमान) ४२:५०; ख़ालिक़ वकील (निर्माता, प्रतिपालक) ३९:६२; ख़ालिक़ अलीम (सर्वश्रेष्ठ निर्माता, सर्वज्ञ) ३६:८१; वाहिद क़ह्हार (एकमेव, सर्वश्रेष्ठ) ४०:१६; अज़ीज़ ग़फ़्फ़ार (सर्वशक्तिमान, क्षमा करणारांमध्ये महान) ४०:२२; क़विय्यु इक़ाब (अतिशय शक्तिमान, शिक्षा करण्याच्याबाबतीत कठोर) ४०:२२; ख़बीर बसीर (सावध असतो – सर्वद्रष्टा, देखरेख ठेवतो – सर्वज्ञ) ४२:२७; रब्ब अज़ीम (विधाता महान) ५६:९६; अर्रज़्ज़ाकु कुव्वत मतीन (दाता शक्तिमान सामर्थ्यशाली) ५१:५८; शकूर हलीम (गुणग्राहक, सहिष्णु) ६४:१७; ग़फ़ूर वदूद (क्षमाशील, प्रेमळ) ८५:१४; रब्ब आली (विधाता परमश्रेष्ठ) ८७:१; अल्लाहुस्समद (अल्लाह निरपेक्ष, निस्पृह) ११२:२; अज़ीज़ वह्हाब (शक्तिमान, महान दाता) ३८:९; हकीम हमीद (बुद्धिवंत, स्तुतिपात्र) ४१:४२ उपरोक्त उदाहरणांमध्ये काही युग्मशब्दांमध्ये क्रम विपर्यय झाल्याचे आढळून येईल.

अल्लाहचे कुराणोक्त समस्त दैवी गुणांचे सूक्ष्म निरीक्षण केल्यास, संख्याशास्त्रामधील वारंवारतेचा सिद्धान्त लागू केल्यास, निष्कर्ष असा निघतो की अल्लाहने स्वत:स मानवासाठी क्षमाशील व दयाळू असल्याचे सर्वांत जास्त वेळा सांगितलेले आहे. यावरून त्याची क्षमाशीलता व दयाळुता अत्यंत व्यापक – त्याच्या शिक्षा आणि दंडाहून अधिक व्यापक असल्याचे दिसून येते. त्याच्या समस्त गुणांपैकी प्राधान्यक्रमाने प्रथम तीन गुण–युग्म याप्रमाणे ठरतात (१) गफ़ूर रहीम, (२) अज़ीम हकीम, (३) समीअ अलीम. ''तुमच्या पालनकर्त्याने दया व कृपेची परिपाठी स्वत:साठी आवश्यक केली आहे.'' ६:५४ ''तुमच्या पालनकर्त्याचे कृपाछत्र फार विस्तृत आहे.'' ६:१४७ ''अल्लाहची कृपा प्रत्येक वस्तूवर आच्छादित आहे.'' ७:१५६ ''अल्लाह आपल्या दासांवर फार कृपावंत आहे.'' ४२:१९ ''तो परम कृपाळू व क्षमाशील आहे.'' ३४:२ ''तो असीम कृपावंत आहे.'' २५:५९

सुप्रसिद्ध सूफ़ी आचार्य व तत्त्वज्ञ आणि 'इन्सानुल कामिल' या सुप्रसिद्ध ग्रंथाचे लेखक अब्दुल करीम बिन इब्राहीम जीली यांनी सदरहू ग्रंथामध्ये अल्लाहच्या गुणांचे वर्गीकरण चार प्रकारात पुढीलप्रमाणे केले आहे :

**१) सत्त्व गुण (अस्मा व सिफ़ाते ज़ातिया) :** ही ईश्वरी सत्तामूलक नाम–रूपे असतात. ती अशी आहेत अल्लाहु–अल–अहदु–अल–वाहिदु–अल–फ़र्दु–अल–वितरू–अस्समदु–अल्–कुद्दूसु–अल–हइय्यु–अन्नूरू–अल–हक़्कु.

**२) भद्र गुण (अस्मा व सिफ़ाते जमालिया) :** अल्-अलीमु-अर्रहीमु- अस्सलामु-अल्-मोमिनु-अल्-बारी-अल्-मुसव्विरू-अल्-ग़फ़्फ़ारू-अल्-वहह्यबु-अर्रज़्ज़ाकु-अल्-फ़त्ताहु-अल्-बासितु-अर्रफ़िउल्लतीफु-अल्-ख़बीरू-अल्-मुइज़्ज़ु-अल् -हफ़ीज़ु-अल्-मुक़ीतु-अल्-हसीबु-अल्जमीलु-अल्-हलीमु-अल्-करीमु-अल्-वकीलु -अल्-हमीदु-अल्-मुब्दियु-अल्-मुह्यु-अल्-मुसव्विरू-अल्-वाजिदु-अद्दाइमु-अल्-बाक़ी-अल्-बारियु-अल्-बर्रु-अल्-मुनइमु-अल्-अफुव्वु-अल्-गफूरू-अर्रऔफु-अल्-मुग़नी-अल्-मुअती-अन्नाफ़ि-अल्-हादी-अल्-बदी-अर्रशीदु-अल्-मुजमिलु-अल्-क़रीबु-अल्-मुजीबु-अल्-कफ़ीलु-अल्-हन्नानु-अल्-मन्नानु-अल्-कामिनु-लम् यलिद् व लम् यूलद्-अल्-काफ़ी-अल्-जवादु-ज़ुत्तोलि-अश्शाफ़ियु-अल्-मुआफ़ी.

**३) रुद्र गुण (अस्मा व सिफ़ाते जलालिया) :** अल्-कबीरु-अल्-मुतआलु- अल्-अज़ीज़ु-अल्-अज़ीमु-अल्-जलीलु-अल्-क़हह्यरू-अल्-क़ाहिरू-अल्-मुक़्तदिरू-अल्-माजिदु-अल्-वलिय्यु-अल्-जब्बारू-अल्-मुतकब्बिरू-अल्-क़ाबिज़ु-अल्-ख़ाफ़िज़ु-अल्-मुज़िल्लु-अर्रक़ीबु-अल्-वासिउ-अश्शहीदु-अल्-क़विय्यु-अल्-मुमीतु-अल्-मुअिदु-अल्-मुंतक़िमु-ज़ुलजलालि वल्इक्रामि-अल्-मानिउ-अज़्ज़ार्रु-अल्-वारिसु-अस्सबूरू-ज़ुलबत्शि-अल्-बसीरू-अद्दय्यानु-अल्-मुअज़िलु-अल् - मजीदुल्लज़ी - लम यकुल्लह कुफ़ुवन् अहदु - ज़ुलहौलश्शदीदु - अल् -क़ाहिरूलग़य्यूरि-शदीदुलइक़ाबि.

**४) पराकाष्ठेचे गुण (अस्मा व सिफ़ाते मुश्तरिका यानी कमालिया) :** ही संमिश्र नाम-रूपे असतात. ती अशी आहेत - अर्रहमानु - अल्-मालिकु - अर्रब्बु -अल्-मुह्यमनु-अल्-ख़ालिक़ु-अस्समी-अल्-बसीरू-अल्-हकमु-अल्-अदलु-अल्-हकीमु-अल्-वलिय्यु-अल्-क़य्युमु-अल्-मुक़द्दिमु-अल्-मुवख़्ख़िरू-अल्-अव्वलु-अल्-आख़िरू-अज़्ज़ाहिरू-अल्-बातिनु-अल्-वलियु-अल्-मुतालु-मालिकुलमुल्कि-अल् -मुक़सितु-अल्-जामि-अल्-ग़निय्यु-अल्लजी लैस कमसिलिहि शैयि-अल्-मुहीतु-अस्सुलतानु-अल्-मुरीदु-अल्-मुतकल्लिमु.

**५) अल्लाहची काही वेचक ९९ सुंदरच सुंदर नावे ['अस्माउल्-हुस्ना']:**

अल्लाह म्हणजे परात्पर परब्रह्म. त्याची सर्वच नावे सुंदर अशीच आहेत. त्याची आळवणी सुंदर नावांनीच होत असते. या बाबीचा स्पष्ट उल्लेख पवित्र कुराणात असा आहे - ''आणि अल्लाहची (सर्वच) सुंदर नावे होत. त्याच्या सुंदर नावांनीच त्याची आळवणी करा.'' ७:१८० ''अल्लाहाशिवाय अन्य कोणीच परमेश्वर नाही. त्याचीच नावे सर्वसुंदर आहेत.'' २०:८ ''तो अल्लाहच होय, यद्व्यतिरिक्त अन्य कोणताही ईश्वर नाही. अव्यक्त-व्यक्ताचा ज्ञाता, तो कृपाळू (आणि) दयाळू आहे. तो अल्लाहच होय, यद्व्यतिरिक्त अन्य कोणताही ईश्वर नाही. सर्वाधिपती, पवित्रतम, त्राता-शांतिदाता, श्रद्धा-प्रतिपालक, रक्षक, सर्वजित, नियंता, भव्य! ते ज्यास (त्याचे) सहभागी ठरवतात, त्यापेक्षा अल्लाह अत्यंत पवित्र आहे. तोच अल्लाह आहे, स्रष्टा, रचयिता, स्वरूपदाता-अतिसुंदर नावे त्याचीच आहेत. आकाश आणि भूमी आणि त्यातील सर्व त्याच्या पावित्र्याचा जयजयकार आणि जप करतात. तो सर्वजित, सर्वविद आहे.'' ५९:२२-२४

नामरूप किंवा गुणांनी अल्लाहचे अंकन केले जाऊ शकत नाही. हा तर मानव आहे की जो आपल्या सीमित बुद्धीच्या बळावर त्याच्या लाक्षणिक (सिफ़ाती) नावांनी त्याचा धावा करतो आणि त्याची उपासना

करतो. प्रेषित वचना (हदीस)नुसार एकदा प्रेषित मुहम्मद यांनी एकाच वेळेस अल्लाहची ९९ नावे सांगितली होती आणि यांपैकी पुष्कळशी पवित्र कुरआन मध्ये आलेली आहेत. जगामध्ये अल्लाहसाठी प्रचलित असलेली सर्व नावे पवित्र अशीच आहेत.

परमेश्वरद्योतक फक्त 'अल्लाह' हा शब्द त्याचे 'ज़ात' (नाम) दर्शवतो, तर इतर नावे 'सिफ़ात' (रूपे किंवा गुण)मध्ये मोडतात. म्हणून त्यांना 'सिफ़ाती' (गुणदर्शक) नावे असे म्हणतात. वर उल्लेखित अल्लाहची ९९ नावांची सूची, मराठी पर्यायवाचक शब्दांसहपुढे देण्यात आली आहे –

१. या अल्लाहु – हे ब्रह्म (एकमात्र भजनीय), २. या रहमानु – हे करुणाशील, ३. या रहीमु – हे दयाळु, ४. या मालिकु – हे अधीश्वर, ५. या कुद्दूसु – हे निर्विकार, ६. या सलामु – हे कल्याणकारी, ७. या मुअमिनु – हे शांतिदाता, ८. या मुहैमिनु – हे त्राता, ९. या अज़ीज़ु – हे प्रबळ, १०. या जब्बारू – हे ताडक, ११. या मुतकब्बिरू – हे प्रशंसनीय, १२. या ख़ालिकु – हे स्रष्टा, १३. या बारिउ – हे कर्तार, १४. या मुसव्विरू – हे रूपनिर्माता, १५. या ग़फ़्फ़ारू – हे क्षमाशील, १६. या क़हहारू – हे प्रकोपी, १७. या वहहाबु – हे महादाता, १८. या रज़्ज़ाकु – हे अन्नदाता, १९. या फ़त्ताहु – हे उद्घाटक, २०. या अलीमु– हे ज्ञानस्रोत, २१. या क़ाबिज़ु – हे अधिष्ठाता, २२. या बासितु – हे विकासमय, २३. या ख़ाफ़िज़ु – हे दलनकर्ता, २४. या राफ़िउ – हे उन्नायक, २५. या मुअिज़्ज़ु – हे प्रतिष्ठादायी, २६. या मुज़िल्लु – हे पराभूतकारी, २७. या समीउ – हे सर्वश्रोता, २८. या बसीरू – हे सर्वद्रष्टा, २९. या हकमु – हे निर्णायक, ३०. या अदलु – हे न्यायकारी, ३१. या लतीफु – हे सूक्ष्मदर्शी, ३२. या ख़बीरू – हे सर्वज्ञ, ३३. या हलीमु – हे सहनशील, ३४. या अज़ीमु – हे महान, ३५. या ग़फ़ूरू – हे क्षमावंत, ३६. या शकूरू – हे गुणग्राहक, ३७. या अलिय्यु – हे सर्वोच्च, ३८. या कबीरु – हे श्रेष्ठ, ३९. या हफ़ीज़ु – हे संरक्षक, ४०. या मुक़ीतु – हे जीविका स्रोत, ४१. या हसीबु – हे निरीक्षक, ४२. या जलीलु – हे पूज्य, ४३. या करीमु – हे कृपाळु, ४४. या रक़ीबु – हे पर्यवेक्षक, ४५. या मुजीबु – हे वांछितेश्वर, ४६. या वासिउ – हे विशाल, ४७. या हकीमु – हे तत्वविद्, ४८. या वदूदु – हे प्रेमळ, सखा, ४९. या मजीदु – हे वैभवशाली, ५०. या बाइसु – हे बीजरूप, ५१. या शहीदु – हे साक्षिन्, ५२. या हक़्क़ु – हे सत्य, ५३. या वकीलु – हे कार्यसाधक, ५४. या क़विय्यु – हे शक्तिमान, ५५. या मतीनु – हे शांतचित्त, ५६. या वलिय्यु – हे अभिभावक, ५७. या हमीदु – हे स्तुत्य, ५८. या मुह्यी – हे परिवेष्टक, ५९. या मुब्दिउ – हे उद्गम, ६०. या मुईदु – हे आवर्त्तक, ६१. या मुह्यी – हे जीवनदाता, ६२. या मुमीतु – हे मृत्युदाता, ६३. या हय्यु – हे चैतन्य, ६४. या क़य्यूमु – हे अविनाशी, ६५. या वाजिदु – हे सर्वग्राही, ६६. या माजिदु – हे पावन, ६७. या ज़ाहिरु – हे गोचर, ६८. या अहदु – हे एकमेव, ६१. या समदु – हे तुष्टिरूप, निरपेक्ष, ७०. या क़ादिरु – हे समर्थ, ७१. या मुक़्तदिरु – हे सत्त्व, ७२. या मुक़द्दिमु – हे आरंभ, ७३. या मुअख़्ख़िरु – हे शेष, ७४. या अव्वलु – हे आदि, ७५. या आख़िरू – हे अंत, ७६. या वाहिदु – हे अद्वितीय, ७७. या बातिनु – हे अगोचर, ७८. या वाली – हे शासक, ७९. या मुतअली – हे उदात्त, ८०. या बर्रु – हे कल्याणकारी, ८१. या तव्वाबु – हे क्षमावान, ८२. या मुंतक़िमु – हे प्रतिशोधी, ८३. या अफ़ूवु – हे क्षमाकर्ता, ८४. या रऊफु – हे दयासिंधू, ८५. या मालिकुल मुल्कि ज़ूल जलालि वल इक्रामी – हे लोकाधिपती महातेजस्विन, ८६. या मुक़सितु – हे यथोचित फलदायक,

८७. या ग़निय्यु – हे निःस्पृह, ८८. या मुग़नी – हे समृद्धिदाता, ८९. या मानिउ – हे विघ्नहारी, ९०. या ज़ार्रु– हे संघातक, ९१. या नाफ़िउ – हे सिद्धीदाता, ९२. या नूरू – हे प्रकाशरूप, ९३. या हादिय्यु – हे मार्गदर्शक, ९४. या बदीउ – हे अनुपम स्रष्टा, ९५. या बाक़ी – हे नित्य, ९६. या वारिसु – हे सर्वाधिकारी, ९७. या जामिउ – हे सर्वनिधान, ९८. या रशीदु – हे सन्मार्गदर्शक, ९९. या सबूरु – हे धैर्यरूप.

याशिवाय खाली दिलेली अल्लाहची नावे परमसुंदर आणि पवित्र आहेत.

या हाफ़िज़ु – हे संरक्षक, या मुनइमु – हे पुरस्कारदाता, या सत्तारू – हे दोषापहारी.

परमेश्वराच्या गुणांसंबंधी एक अत्यंत समर्पक तथ्य पवित्र कुराणामध्ये तीन अतिसंक्षिप्त श्लोकांत अभिव्यक्त आहे. ते असे –

''(सर्व) परिपूर्ण गुणांचा स्वामी (केवळ) अल्लाह हाच आहे.''[३३] ७:१८०[३३] ''अतिसुंदर नावे त्याचीच आहेत.'' ५९:२४ ''त्याचीच नावे सर्वसुंदर आहेत.'' २०:८

याशिवाय, ''अल्लाह आहे, सर्वांचा निर्माता, प्रत्येक गोष्टीचा प्रारंभकर्ता, सर्व रचनांचा रचनाकार, सर्व निर्दोष अशी गुणविशेषणे केवळ त्याच्यासाठीच आहेत.'' ५९:२४ ''अतिशय मंगल आहे तुझ्या वैभवशाली (प्रतापी) व उदार पालनकर्त्याचे नाव!'' ५५:७८ ''अल्लाहचा प्रत्येक गुण उदात्त आहे'' (सर्वोत्कृष्ट आहे.) १६:६०

अल्लाहाचे गुणगान कितीही केले तरी ते थोडेच आहे. ही बाब पुढील श्लोकावरून स्पष्ट होईल –

''(निःसंशय अल्लाहचा महिमा असा आहे की), जर पृथ्वीवरील सर्व वृक्ष लेखण्या झाल्या आणि समुद्र शाई झाले, आणि त्यात आणखी तसेच सात समुद्र (शाई बनून) सामील झाले, तरीदेखील अल्लाहची (महानता व्यक्त करणारे) शब्द संपणार नाहीत, कारण अल्लाह आहेच असा (महान व) सर्वशक्तिमान व अस्सल बुद्धिवान.'' ३१:२७.

### १०) सत्तेच्या अवरोहणाच्या सहा श्रेणी [षट् अवरोह वा षडवरोह]

ईश्वराचे अस्तित्व आणि त्याचे स्वरूप अभ्यासल्यानंतर सहाजिकच आपल्या मनामध्ये असा प्रश्न उपस्थित होतो की ईश्वर आपले स्वरूप कशा प्रकारे प्रकट करतो, त्याच्या अस्तित्वाची व स्वरूपाची अनुभूती आपल्याला कशा प्रकारे होते, ही जिज्ञासा साहजिकच उत्पन्न होते. या जिज्ञासेचे निराकरण करण्याचा उपाय सूफी तत्त्वज्ञानापाशी निश्चितपणे आहे. तो उपाय म्हणजे षट्अवरोहणाचा सिद्धान्त. याला 'तनज़्ज़ुलात-ए-सित्ता' असे म्हणतात. आता आपण तोच सिद्धान्त जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

**तनज़्ज़ुलात–ए–सित्ता (षडवरोह, षडवतरण) :** परमेश्वराची सत्ता विशुद्ध सत्ता असते. ती निरपेक्ष अस्तित्वयुक्त असते. ती आपल्या पराकाष्ठेसह अदृष्ट असते. तिला अदृष्टाचा अदृष्ट असे म्हणतात. आपले ज्ञान आणि सौंदर्य तत्त्वासह तिची अभिव्यक्ती होते, आणि ब्रह्मज्ञान्यांवर ती उकलते–उघडते. हे सौंदर्यदर्शन त्या सत्तेच्या तन्मात्रा ('ताय्युन') आणि विभू ('शुयूनात') असतात. त्या समाप्त होणाऱ्या नसतात.

सर्वश्रेष्ठ अल्लाहची सत्ता अस्तित्वमात्र असते. ती भौतिक गुणांपासून मुक्त असते. अल्लाह हा अस्तित्वाचा आत्मा आहे. ''त्याच्या अस्तित्वाखेरीज प्रत्येक वस्तू नश्वर आहे. सत्ताधिकार त्याचाच आहे.''

२८:८८ ''सर्वसत्ताधीश तोच आहे.'' २३:९६ कोणत्याही प्रकारच्या गरजेमुळे त्याचे अस्तित्व नाही. सर्व त्याचेच गरजवंत असतात.

एका वस्तूचे (पदार्थाचे) दुसऱ्या स्वरूपात व्यक्त होण्यास 'तक़य्युद' (बंदिस्त, बंधन, अट) आणि 'ताय्युन' (तन्मात्रा) असे म्हणतात. उदाहरणार्थ बर्फ़ हे पाण्याची 'ताय्युन' अर्थात तन्मात्रा आहे. 'ताय्युन' म्हणजे परिवर्तित स्वरूप. ईश्वरी सत्तेच्या तन्मात्रांच्या सहा श्रेणी आहेत. आणि यांनाच 'ताय्युनात-ए-सित्ता' म्हणजेच षट् अवरोह वा षडवरोह अथवा षट् अवतरण वा षडवतरण असे म्हणतात. यांपैकी प्रथम आणि द्वितीय तन्मात्रामध्ये परिगणनेस कोणताच वाव नाही. ज्याची कल्पनाच मुळी करता येऊ शकत नाही ते या दोन श्रेणींच्या अधीन असते. या श्रेणींमध्ये सहभागीत्वासाठी कोणताच मार्ग नाही. यांच्यानंतर चार श्रेणी आहेत आणि यांच्या अधीन असंख्य वस्तू, व्यक्ती आणि प्रकार असतात. या श्रेणींमध्ये सर्वश्रेष्ठ परमेश्वराची अभिव्यक्ती (प्रकटीकरण) पराकाष्ठेच्या नामांशी निगडित होण्यासाठी झालेली असते. षडवतरण किंवा षडवरोह म्हणजेच 'तनजुलात-ए-सित्ता' हा ईश्वराचा साधकाकडे प्रवास आहे. या प्रवासाच्या वरून खाली येणाऱ्या कमानीप्रमाणे सहा अवस्था असतात. या अवस्थांना 'तन्मात्रा' म्हणतात. एका परीने हा समुद्राचा प्रवास थेंबाकडे चालला आहे. साधकाचा प्रवास ईश्वराकडे होणे, ही तर सामान्य बाब आहे. पुढे 'षडवतरण' वा 'षडवरोह'चे सविस्तर विवेचन देण्यात आले आहे.[३४]

**१) पहिली तन्मात्रा :**

अवरोहण वा आविष्करणाच्या प्रथम श्रेणीस पहिली तन्मात्रा असे म्हणतात. तन्मात्रा म्हणजे भूतांच्या सूक्ष्मावस्था. या श्रेणीमध्ये सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा आपल्या सत्तेस आणि सविस्तरपणे ब्रह्मांडास ओळखतो. या श्रेणीमध्ये विश्व-जग वा ब्रह्मांड त्याच्या सत्तेशी एकरूप असते आणि यामध्ये प्रकट होण्याची क्षमता किंवा योग्यता असते. त्याच्या (परमेश्वराच्या) पवित्रतम सत्तेमध्ये यामुळे कोणत्याच प्रकारचा फरक आलेला नसतो. तो आपल्या नाम-रूपांशी समष्टिगतरित्या निगडित असतो. त्याच्या गुणांपैकी कुठल्याच गुणाची दुसऱ्या गुणाशी फरक नसते. उदाहरणार्थ बहुश्रुत (समीअ) हा सर्वशक्तिमान (क़दीर)हून आणि सर्वशक्तिमान (क़दीर) संकल्पक (मुरीद)हून विशेष किंवा श्रेष्ठ नसतो. या श्रेणीमध्ये त्याची सत्ता केवळ मात्र एकत्त्वत (अहदिय्युत) असते. अनेकतेस - मग भलेही ते वास्तविक असो वा काल्पनिक - येथे वाव नसतो. सर्व संभावना विनष्ट आहेत आणि सर्व नामे शिथिल आहेत. कारण की अल्लाह (ईश्वरा)च्या सत्तेने 'ग़ैबलग़ैब' म्हणजेच अदृष्टाहून अदृष्टपासून या श्रेणीमध्ये स्वत:चे आविष्करण केले. त्याची सत्ता अदृष्टाच्या या श्रेणीमध्ये सर्वाहून जास्त अदृष्ट आहे. तथापि ईश प्रेरित लोक या श्रेणीस दैवी प्रेरणेच्या आधारे समजून घेतात. याचा त्यांना संबोध होतो. काही लोक या श्रेणीस 'अमा' म्हणजेच ब्रह्मगुफा किंवा गहनतम अंधार असे म्हणतात.

**२) दुसरी तन्मात्रा :**

ही दुसरी श्रेणी आहे. या श्रेणीमध्ये अल्लाहची सत्ता आपल्या समस्त नाम-गुणांनिशी समष्टि स्वरूपात आणि व्यष्टि स्वरूपातील तपशील व्यापक आहे. प्रत्येक नाम दुसऱ्या नामाहून विशेष वा श्रेष्ठ आहे.

उदाहरणार्थ, बहुश्रुत (समीअ) हा सर्वशक्तिमान (क़दीर)हून, सर्वशक्तिमान (क़दीर) हा संकल्पक (मुरीद)हून श्रेष्ठ आहे. या श्रेणीमध्ये फक्त काल्पनिक दृष्टीने अनेकता आहे. विशुद्ध सत्ता ही आपल्या गुणांशी निगडित झाली आणि ते गुण त्याची नामे म्हणून ओळखली जातात. या श्रेणीमध्ये नामांची पराकाष्ठा व्यक्त, प्रकट झाली. जरी नामे व गुण अनेक आणि श्रेष्ठ आहेत, तरी नामी आणि गुणधारक अल्लाहची सत्ता आहे. याच कारणामुळे प्रत्येक नामाची गुणदर्शक व्याख्या दुसऱ्या नामामुळे साध्य होते. जसे, तो अल्लाह कृपाशील दयाळू आहे, अधिपति, पवित्र सत्ता आहे. या श्रेणीमध्ये अल्लाहास 'अयान'चे म्हणजेच कल्पनेच्या साम्राज्यातील रूपाचे सविस्तर ज्ञान आहे. आणि 'अयान-ए-मुमकिनात' म्हणजेच संभाव्य कल्पनांमुळे ज्ञानमूलक प्रमाण निर्माण झाले आणि ते 'अयान-ए-साबिता' म्हणजेच कल्पनेचे शाश्वत साम्राज्य किंवा शाश्वत विचार-विश्व या नावाने ओळखले जाते, आणि हे ज्ञान विश्वनिर्मात्याचे आहे. अल्लाहने या ज्ञानास त्या ज्ञानाबरहुकूम निर्माण केले, जे आविष्कारणामध्ये कल्पना शक्तीशी संबंधित आहे. 'अयान-ए-साबिता'स स्वैर कल्पना किंवा मुक्त विचार असेही म्हणता येऊ शकेल.

**आविष्करण (निर्मिती) पद्धती**

''तोच (सर्वश्रेष्ठ परमेश्वर) आकाश आणि पृथ्वीचा आद्य प्रवर्तक आहे. जेव्हा तो एखादी घटना घटित करण्याचे इच्छितो तेव्हा फक्त म्हणतो, 'तथास्तु' आणि क्षणार्धात तसे घडते. २:११७ आम्हाला कोणतीही वस्तू अस्तित्वात आणण्यासाठी यापेक्षा अधिक काही करावे लागत नाही की तिला आदेश देतो, 'घडो'. आणि बस्स तसे घडते. १६:४० म्हणजेच ईश्वराने संकल्प करण्याचाच अवकाश की निमिषमात्रात तो संकल्प सिद्धीस जातो. अल्लाहचा आदेश रूपाकृती आणि वर्णाक्षरांपासून मुक्त आहे. कल्पनांमध्ये ('अयान') आपल्या सत्तेपासून अस्तित्व (वजूद) निर्माण करण्याची क्षमता नसते. तथापि त्यांना अस्तित्वात येण्यासाठी विशिष्ट गुण आणि विशिष्ट अवधी- काळाची गरज असते. म्हणून प्रत्येक कल्पना ('ऐन') आपल्या विशिष्ट योग्यतेसह, सामर्थ्यासह योग्य वेळी प्रकट होते. सत्यनिष्ठांमधील सर्वश्रेष्ठ सत्यव्रती व प्रथम उत्तराधिकारी (ख़लीफ़ा) अबू बकरच्या कल्पनेमध्ये - विचारामध्ये सत्यनिष्ठता आणि संतत्त्वाच्या इतर सर्वश्रेष्ठ श्रेणींची योग्यता होती. त्या यांच्यासोबतच व्यक्त झाल्या. अबूजहलच्या विचारा ('ऐन')मध्ये श्रद्धाहीनता आणि उद्धटता होती. त्या त्याला घेऊनच प्रकट झाल्या. ईश्वराच्या निर्मिती पद्धतीमध्ये नेहमी 'समग्र समरूपतेचा' म्हणजेच 'अयात-ए-साबिता'चा सिद्धान्त कार्यरत असतो. म्हणून त्याच्या विचार-विश्वामध्ये व कल्पनेच्या साम्राज्यामध्ये घोडा हा माकडासारखा कधीच नसतो तद्वत हत्ती हा उंटासारखा कधीच नसणार. समस्त सृष्टीमध्ये 'समग्र समरूपता' म्हणजेच 'अयात-ए-साबिता' ('साबित=समग्र') दिसून येते.

**प्रारब्ध (क़ज़ा) व संकल्प (क़दर)**

विचार व कल्पना हे अल्लाहचे प्रकट होण्याचे स्रोत आहेत. जो विचार ज्या नामाचा स्रोत असते तेच नाम त्याचे अधिपति असते. सर्वश्रेष्ठ अल्लाह निश्चितपणे स्वयंभू आहे. त्याचे अस्तित्व निरपेक्ष असते. त्याच्या भांडारामध्ये कुठल्याच वस्तूची कमी नाही. तो प्रत्येक विचारास, कल्पनेस ('ऐन') तिच्या योग्यतेनुसार देत असतो. ज्या विचाराची योग्यता वाईट असते, त्याला वाईटपण लाभते आणि तो भ्रमात असतो, तो शंकेखोर असतो आणि ज्याच्या योग्यतेमध्ये चांगुलपण असते, त्याला चांगले लाभते. देणाऱ्याचा काहीच दोष नसतो.

दोष विचाराच्या योग्यतेचा आहे. संक्षिप्तपणे प्रारब्ध व संकल्पाचे हेच गूज आहे.

**दोन वास्तवांचे आविष्करण**

या दुसऱ्या श्रेणीमध्ये अनिवार्य आणि संभाव्य यांनी आपापसातील फरक ओळखले. अनिवार्यतेचे स्तर पराकाष्ठेच्या गुणाशी निगडित झाले आणि विचारवंत संभाव्यतेची लक्षणे प्रकट झाली. अशा प्रकारे दोन वास्तवांचे आविष्करण झाले. एक वास्तव स्थूल देहाचे (वाजिबुलवजूद) आहे, जे भौतिक गुणांनी युक्त आहे आणि उपास्य ईश्वर आहे. प्रथम श्रेणीमध्ये 'अहदिय्युत' (एकत्त्वता) आहे. समस्त नामे, दैवी गुण आणि भौतिक गुण प्रथम श्रेणीमध्ये एक (समान)च असतात. तेथे अनेकतेसाठी वाव नाही. म्हणून प्रथम श्रेणीस 'अहदिय्युत' म्हणतात, आणि दुसऱ्या श्रेणीस 'वाहिदिय्यत' (अनेकता). या दोन्ही श्रेणी दैवी श्रेणीपासून उद्भूत आहेत. भौतिक श्रेणी ही या दोन्ही श्रेणीनंतर आहे. अल्लाहचे प्रेषित मुहम्मद यांचे 'प्रमाणित विचार' म्हणजेच 'अयात-ए-साबिता' सर्व कल्पना आणि विचारांकरता-विचारांसाठी हितकारक-लाभदायक बनण्यासाठी सहाय्यक असतात.

**'अमा'चे विवेचन**

दुसऱ्या तन्मात्रेनंतर 'अमा' (ब्रह्मगुफा)चा आविर्भाव होतो. 'अमा'ते वास्तव आहे जे संभाव्य वास्तवाच्या प्रकटनासाठी शुभ लाभदायक आहे. समस्त ब्रह्मांडाचे आविष्करण 'अमा' मधून होते. जेव्हा 'रहमान' (कृपाशील) नामाची कृपा ब्रह्मांडावर झाली तेव्हा तिने विचारांवर कृपेचा वर्षाव केला. परिणामी त्याने अकस्मात फूंकर मारली. अशाप्रकारे 'अमा'चे निर्धारण झाले. म्हणून 'अमा' (ब्रह्मगुफा) कृपाशीलतेचा आत्मा ('नफ़्स-ए-रहमानी') आणि विधात्या ('रब')चा आविष्कार आहे. सर्वश्रेष्ठ विधात्याने त्यामध्ये आपले प्रकटन केले.

एक गूढाचा ज्ञाता ग्रामीण माणसाने प्रेषित (मुहम्मद)कडे विचारणा केली की आमचा परमेश्वर आकाश आणि पृथ्वीस निर्माण करण्याअगोदर कोठे होता? प्रेषितांनी उत्तर दिले - तो 'अमा' (गहन अंध:कार, घनदाट अंधार, ब्रह्मगुफा)मध्ये होता. ना त्याच्यावर हवा होती ना त्याच्याखाली. हवेशी तात्पर्य संभाव्य जगाशी आहे. म्हणजेच संभावनापैकी कुणाचेच प्रकटन झाले नव्हते. हवेशी संभाव्यतेची मीमांसा निसृत होते. कारण की शब्दकोशाच्या अनुषंगाने विरळ ढगास 'अमा' म्हणतात, आणि येथे त्या प्रकटनाचा आशय आहे हे वर आलेले आहेच. इमाम अहमद यांनी प्रेषित-वचन (हदीस)च्या विवेचनामध्ये म्हटले आहे - 'अमा'च्या आविष्कारामध्ये अल्लाच होता. त्याच्यासोबत कोणतीच वस्तू नव्हती. शेखुलइस्लाम हर्वी म्हणतात की, इमाम अहमद यांचे हे स्पष्टीकरण गूजांना व्यापून आहे. 'ख्वाजा जुनेद यांनी म्हटले आहे की तो आता पण पहिल्यासारखाच आहे. म्हणजेच परमेश्वराच्या सत्तेशिवाय आता पण काहीच नाही.

**३) तिसरी तन्मात्रा :**

ही तिसरी श्रेणी आहे, आणि हे आत्म्यांचे ('अर्वाह') आविष्करण आहे. हे देहांची सामग्री आणि बाधा व वर्ण-आकारांशी एकाकी आहे. हे आपले आणि इतराचे फक्त बोधगम्यता करते, इंद्रियसंबंधी संकेत करू शकत नाही.

आत्मा दोन प्रकारचा आहे. एक प्रकारचा तो आत्मा आहे जो शरीराचा आधार घेत नाही, त्याचा उपयोग करत नाही आणि त्याचा उपायही नसतो आणि दुसऱ्या प्रकारच्या आत्म्याचा संबंध शरीराशी असतो. तो शरीराचा उपयोग करतो. म्हणजेच एक प्रकारचा आत्मा हा अदेह असतो, तर दुसरा हा देहामध्ये बद्ध असतो. पहिल्या अदेही आत्म्याच्या प्रकारामध्ये एक समुदाय हा अपवादत्मक स्वरूपाचा आहे. हा समुदाय सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या निरीक्षणामध्ये स्वयंचलित असतो. त्याला न आपले स्वत:चे भान असते न इतरांचे. तो वैभवशाली निरीक्षणाच्या समुद्रामध्ये बुडालेला आहे अर्थात मग्न आहे. दैवी ग्रंथ आणि प्रेषित विचारसरणीमध्ये समुदायाचे नाव 'मलाए आला' म्हणजेच सर्वश्रेष्ठ देवदूत म्हणून आहे. ते आदम (मानवांचा आद्य प्रपितामह)ला प्रणिपात करण्यासाठी आदेशित नव्हते. कारण की कष्ट वा यातनेसाठी जाणीव असणे आवश्यक असते. ज्याला स्वत:चीच जाणीव नाही, तो कसा बरे प्रणिपाताचे कष्ट झेलणारा होऊ शकेल? या बाबीचा संकेत ईश्वराच्या त्या संबोधनामध्ये आढळतो जेव्हा ईश्वराने इब्लीसला म्हटले (की), ''हे इब्लीस, मी माझ्या दोन्ही हातांनी ज्यास निर्माण केले त्याच्यासमोर नतमस्तक होण्यास तुला कोणत्या गोष्टीने प्रतिबंध केला? काय तू फार घमेंड करत आहेस अथवा तू उच्च दर्जाच्या व्यक्तित्वांपैकी आहेस?'' ३८:७५ (येथे 'अल्लाहचे दोन्ही हात'चा आशय आहे त्याचे भद्र गुण आणि रुद्र गुण आणि त्याची कर्तृत्व-नामे व शाश्वत गुण आणि भौतिक नाम-रूपे, यांच्याशी आहे) आणि हदीस कुद्सी मध्ये आहे - सेवक जर माझे नाम-स्मरण भक्तांच्या समुदायामध्ये करत असेल तर मी पण त्याचे स्मरण अशा समुदायामध्ये करतो, जो त्याच्या समुदायापेक्षा अधिक चांगला असेल. आणि हा समुदाय 'मला-ए-अला' अर्थात सर्वश्रेष्ठ देवदूतांचा आहे.

**'अमा'ची सृष्टी**

सर्वश्रेष्ठ परमेश्वराने प्रथम सर्वश्रेष्ठ अशा अपवादात्मक देवदूतांना अस्तित्व प्रदान केले. आणि त्यांच्या शेवटच्या रांगेमध्ये एक असे देवदूत निर्माण केले की ज्याच्यामध्ये प्रत्येक वस्तूचे विवरण (सृष्टी निर्मितीच्या) पहिल्या दिवसापासून ते स्वर्गामध्ये - स्वर्गांत जाण्यास योग्य, आणि नरकामध्ये - नरकात जाण्यायोग्य अशा अनेकांचा प्रवेश निश्चित होईल आणि शेवटी मृत्यूचा बळी देण्याच्या वेळेपर्यंत सुरक्षित आहे. या देवदूतास सूफी **'अक़्ल-ए-अव्वल'** (प्रथम विवेक), **'अक़्ल-ए-कुल'** म्हणजेच विश्वज्ञान अथवा निरपेक्ष विवेक असे म्हणतात. पवित्र ग्रंथ आणि प्रेषिताच्या सरणीमध्ये हिचे नाव **'क़लम-ए-आला'** अर्थात सर्वोच्च लेखणी असे आहे. याच्याखाली एक दुसरा देवदूत आहे. सर्वोच्च लेखणी ही दुसऱ्या देवदूतामध्ये तपशीलवार, ज्ञानामध्ये वृद्धी करते. या दुसऱ्या देवदूतास सूफी **'नफ़्स-ए-कुल'** म्हणजेच विश्वात्मा असे म्हणतात. पवित्र ग्रंथ आणि प्रेषिताच्या सरणीमध्ये त्याचे नाव **'लौह-ए-महफ़ूज'** अर्थात 'सुरक्षित लेखशिला' ८५:२२ असे आहे. ही लेखशिला फेरफार व परिवर्तनापासून सुरक्षित आहे. जे काय होणार आहे आणि घडणार आहे, ते सर्व लेखणीने या शिळेवर लिहून ठेवलेले आहे. अक़्ल-ए-कुल (विश्वज्ञान) आणि नफ़्स-ए-कुल (विश्वात्मा) म्हणजेच क़ल्म-ए-आला (सर्वोच्च लेखणी) आणि लौह-ए-महफ़ूज (सुरक्षित लेखशिला) याशिवाय आणखी काही देवदूत आहेत, आणि हे देवदूत लेखशिलेच्या समुदायाशी निगडित आहेत. देश-प्रांतांमधील समुदायांस ब्रह्मांडाचे काहीसे ज्ञान देण्यात आले आहे. उदाहरणार्थ, ब्रह्मांडाचे एका वर्षाचे ज्ञान. यांच्या खाली लेखाशिलेचा समुदाय आहे. जे ज्ञान देश-प्रांतांच्या समुदायास दिले गेले आहे, ते लेखशिलेच्या समुदायाच्या

ज्ञानामध्ये वाढ करते, आणि ते ज्ञान त्यांच्यासाठी दृढ बनते. कधी असेही होते की या लेखशिलेमध्ये एखादा आदेश दृढ बनतो, परंतु त्याच्या मुदतीबद्दल काहीच सांगण्यात आलेले नसते आणि वरपांगी असे वाटते की हा आदेश अद्याप बाकी राहणाऱ्या आदेशांपैकी आहे, यद्यपि तिची मुदत संपलेली असते. म्हणून तो आदेश रद्द केला जातो आणि तिच्या जागी दुसरा आदेश लिहिला जातो. अशा प्रकारच्या होकारात्मकता व नकारात्मकतेपासून नफ़्स-ए-कुल म्हणजे विश्वात्मा सुरक्षित आहे. जर एखादा आदेश यथासमय होणारा असेल तर त्याची मुदत पण सांगितली जाते. सर्वश्रेष्ठ अल्लाहचा आदेश आहे - प्रत्येक मुदतीसाठी एक ग्रंथ आहे. ती मुदत त्याच्यामध्ये लिहिलेली असते. अल्लाह ज्या वस्तूस इच्छितो त्या वस्तूस मज़बूत करतो आणि 'उमुलकिताब' म्हणजेच ग्रंथमातृका त्याच्याजवळ आहे, की जे विश्वात्मा आहे. याला लौह-ए-महफ़ूज अर्थात सुरक्षित लेखशिला म्हणतात. नफ़्स-ए-कुल अर्थात विश्वात्मामध्ये बनणे-मिटणे यासाठी कुठलाच वाव नाही. तथापि दुसरे इतर लेखशिलेमध्ये होकार-नकार असतो.

**ब्रह्मगुफेच्या तत्त्वा ('जौहर-ए-अमा')** मध्ये सर्वश्रेष्ठ देवदूत, विश्वज्ञान, विश्वात्मा यांच्या खाली इतर देवदूत आपापल्या दर्जानुसार रांगारांगाने उभे आहेत. ते सर्व आपापल्या सेवेत तत्पर असतात, आणि दैवी आदेश लागू करण्यासाठी नित्य कटिबद्ध असतात. देवदूतांचे कथन सर्वश्रेष्ठ अल्लाह निवेदन करतो- आमच्यापैकी प्रत्येकासाठी एक ज्ञात दर्जा (स्थळ) आहे. आपल्या दर्जाशी (स्थानाशी) कोणीही समेट करू शकत नाही.

विश्वज्ञान आणि विश्वात्मानंतर सर्वोच्च रांगेमध्ये 'मुक़र्रबून' (सान्निध्य लाभलेले). ८३:२८ देवदूतांचा समाज आहे. जसे, जिब्रील, मीकाईल. हे देवदूत सदैव (ईश्वरी) आदेशांची वाट पाहात असतात. आदेश मिळण्याचाच अवकाश की तत्काळ त्याची परिपूर्तता झाली म्हणून समजा. आज्ञापालन हा त्यांचा स्वाभाविक गुण आहे. ते अवज्ञा करूच शकत नाहीत. त्यांच्यानंतर ब्रह्मगुफे ('अमा')च्या प्रकटनामध्ये परिवर्तनशील स्वभावाचे देवदूत आहेत जे उच्च देहधारी आणि कनिष्ठ देहधारींचे वेताळ ('मुवक्किल') आहेत म्हणजेच पृथ्वी आणि आकाशांची सेवा त्यांच्यावर सुपुर्द आहे. या देवदूतांना 'मुदब्बिर' म्हणजे प्रबंधकुशल, योजनाकार असे म्हणतात. यांच्यापैकी काहींवर मानवास चांगल्या चांगल्या वस्तू प्रदान करणे, निर्मिती आणि पालनपोषण करण्याची जबाबदारी सोपवलेली असते आणि काहींवर मानवाच्या कर्मांची नोंद करण्याची जबाबदारी असते. हा समुदाय कर्म नोंद करणारे देवदूत आणि लेखशिला जपून ठेवणारे देवदूत यांच्या समुदायांपैकी आहे. हा एक प्रकारचा मेहरबानांचा समाज असतो. या लेखशिलेवर निर्मिती व विनाश लिहिलेला असतो. हे देवदूत दासांच्या अवज्ञा लिहितात, आणि अल्लाहची कृपा त्यांना नष्ट करते. या समुदायामध्ये काही देवदूत असे पण आहेत की जे दासांना सत्कर्माची प्रेरणा देतात.

उपरोक्त सर्व देवदूत अल्लाहच्या पावित्र्याचे गुणगान करतात. यांना उपमा नामांचे मुळीच ज्ञान नसते. प्रत्येक देवदूताचे अल्लाहचे गुणगान हे त्या नामाशी निगडित असते जे त्याचे निदर्शक असते. देहधारी देवदूतांचे अस्तित्व यद्यपि दृश्य जगामध्ये म्हणजेच पाचव्या श्रेणीनंतर आहे, परंतु त्यांची सूक्ष्मता आणि सामिप्य हे ब्रह्मलोका (आलम-ए-जबरूत)शी, जे अधिकांश दुसऱ्या श्रेणीमधून आहे, त्यांना तिसऱ्या श्रेणीमध्ये दाखल करते -निगडित असते. आणि त्यांची गणना तिसऱ्या श्रेणीमध्ये होते आणि ते देहाशी संबंधित आकाशीय

लोकांचे आत्मे असतात – मग भलेही ते शैतानी असोत वा किन्नरी–यक्षी (जिन्नी). शैतानी लोक सर्वश्रेष्ठ अल्लाहचे 'अल्–मुज़िल' (नष्टकर्ता, घातक, विनाशक) या नामाचे निदर्शक असतात. ते याच नामाने अल्लाहचे गुणगान करतात. त्यांनी इतरांना पथभ्रष्ट करण्याची शपथ घेतलेली आहे, कारण की त्यांचे सुखसमाधान यातच सामावलेले आहे.

**'अर्वाह' (आत्म्यां)चे विवेचन**

देहाशी निगडित असलेल्या आत्म्यांपैकी मानवी आत्मा पण आहे, आणि हा आत्मा अल्लाहच्या सूक्ष्मतेमधील एक सूक्ष्म चेतना आहे. यामध्ये समस्त वस्तूंचे ज्ञान लपवलेले आहे, परंतु कर्म या नात्याने विद्यमान आहे आणि तो संपूर्णपणे दुसऱ्या तन्मात्रेचा निदर्शक आहे आणि विश्वज्ञानाशी साम्य राखणारा आहे, तथापि विश्वज्ञानाहून श्रेष्ठतम आहे, कारण की विश्वज्ञानामध्ये त्या वस्तूंचे ज्ञान आहे जे महाप्रलयाचा दिवस संपेपर्यंत येणाऱ्या आहेत आणि मानवी आत्म्यामध्ये समस्त वस्तूंचे ज्ञान अनंत काळापर्यंतच लपवलेला आहे. आत्मा यद्यपि एकमेव आदेश (स्वरूप) आहे. परंतु तो नानाविध तन्मात्रांमध्ये निश्चित होतो. या तन्मात्रा पाशवी आत्मे आहेत. प्रत्येक माणसाच्या शरीरामध्ये एक पाशवी आत्मा कार्यरत आहे. पाशवी आत्म्याचा देह सूक्ष्म आहे. याच्या देहाचा प्रत्येक भाग (अवयव) मानवी देहाच्या प्रत्येक अवयवाशी बरोबर असतो आणि त्याचे ज्ञान प्राप्त करणे हे अज्ञात राहिले. शेख मुहिब्बुल्लाह अलाहबादी म्हणतात – आमचा आत्मा हा आमचा देह आहे, आणि आमचे देह हा आमचा आत्मा. याच आत्म्यास सुख–दुःखाचा बोध होतो. मानवी आत्म्याचे या पाशवी आत्म्यामध्ये तन्मात्र झाले आहे. या तन्मात्रेस दृष्टिआड करून पाहिल्यास असे आढळून येते की मानवी आत्मा हा आपल्या एकत्त्वते ('वहदत')च्या श्रेणीमध्ये सुख–दुःखाच्या अनुभूतीपासून मुक्त आहे. याचे विवेचन शेख अकबर मुहियुद्दीन इब्न–अरबी यांनी प्रभावीपणे केले आहे. तन्मात्रित पाशवी आत्म्यास मानवी आत्म्याशी संयुक्त मानले गेले आहे; यद्यपि मानवी आत्मा हा तन्मात्रेपासून एकाकी आहे आणि तो निरपेक्ष आहे; परंतु त्याची अभिव्यक्ती पाशवी आत्म्यामध्ये झालेली आहे. मौलाना रूमी म्हणतात –'भेद (अंतर) हा पाशवी आत्म्यामध्ये असतो. एकमेव ('वाहिद') आत्मा हा मानवी आत्मा बनला.' साम्य–भेद पाशवी आत्म्यामध्ये असतो, कारण की तो तन्मात्रित आहे आणि बहुविध संबंधांना सोडल्यास मानवी आत्मा आपल्या सत्तेच्या श्रेणीमध्ये एकमेव ('वाहिद') आत्मा असतो. यामध्ये अनेकतेस वाव नाही. पाशवी आत्मा एक सूक्ष्म आणि अनंत असे तत्त्व आहे. मानवाच्या मृत्यूनंतर तो मृत होत नाही, ना तो अस्तित्वशून्य होतो. मृत्यू अस्तित्वहीनतेस म्हणत नाहीत, परंतु अवयवांचे विखुरण्यास मृत्यू म्हणतात. जेव्हा शरीरापासून आत्म्याची ताटातूट होते, तेव्हा तो वेगळ्या नमुन्यांमध्ये आकार धारण करतो. वेगळ्या नमुन्याचे विवेचन चौथ्या तन्मात्रेमध्ये येणार आहे. कबरी (समाधी)मध्ये – थडग्यामध्ये विचारणा याच पाशवी आत्म्याशी होते. प्रश्न विचारणारे दोन देवदूत मुन्किर व नकीर आहेत. धर्म–विधान ('शरीअत')मध्ये याचे सविस्तर विवेचन येते.

तत्त्ववेत्ते म्हणतात की पाशवी आत्मा हा बाष्पीयशरीरी असतो. मृत्यूनंतर हा विलुप्त होतो. त्याचे अस्तित्व नष्ट होते. परंतु ही शारीरिक उष्णता वेगळी वस्तू आहे, आणि आमची चर्चा पाशवी आत्म्याशी आहे. पाशवी आत्म्यामध्ये प्राधान्यता असते. जे लोक परिपूर्ण असतात, जे नरोत्तम असतात ते या आत्म्यास विषयवासनेपासून वाचवून मानवी आत्म्याच्या दर्शनामध्ये विलीन करतात. मानवी आत्म्याचे वास्तव एक दैवी

आदेश आहे आणि तो दैवी सूक्ष्मतेमधील एक सूक्ष्म तत्त्व आहे. नरोत्तम मानवी आत्म्याच्या वास्तवाचे संपूर्ण ज्ञान राखतात. शेख सद्रुद्दीन क़ोनवी असे नमूद करतात की आत्मे समष्टिगतपणे प्रारंभिक असतात, याचा अर्थ हाच आहे की, ईश्वराचे मित्रांसारखे ईश्वरनिष्ठ भक्त आत्म्याच्या सर्वांगांशी परिचित असतात. मात्र या दैवी सूक्ष्मतेच्या ज्ञानप्राप्तीमध्ये तफावत असते. आपापल्या श्रेणींनुसार प्रत्येकाचे ज्ञान-स्तर असतात. याचे कारण असे आहे की यद्यपि आत्मा आपल्या सत्तेने एकमेव आदेश (स्वरूप) आहे आणि तो परिपूर्ण आहे. परंतु त्याच्या तन्मात्रा फार आहेत आणि प्रत्येक तन्मात्रेचे आपले वेगळे वैशिष्ट्य असते. या वैशिष्ट्याचा दुसऱ्यामध्ये अभाव असतो. अपितु त्याचे वैशिष्ट्य काही औरच असते. काही तन्मात्रांच्या कारणामुळे आत्मा हा सर्वश्रेष्ठ 'इल्लिय्यीन'वर पोहोचतो. ''परंतु सदाचरणी लोकांच्या कर्मांची नोंद उच्चपदस्थ लोकांच्या नोंदवहीत आहे. आणि तुम्हाला काय माहीत की काय आहे ती उच्च दर्जाच्या लोकांची नोंदवही ('इल्लिय्यीन')? (ती) एक (सविस्तर) लिहिण्यात आलेली नोंदवही (आहे).'' ८३:१८-२० आणि ती तन्मात्रित दैवी ज्ञानामध्ये विशिष्ट अशी असते. कुणी सर्वश्रेष्ठ दर्जाच्या पराकाष्ठेवर आरूढ असतो तर कुणी त्यापेक्षा कमी दर्जावर आणि कुणी त्यापेक्षाही कमी दर्जावर. ही पराकाष्ठा आणि हानी आत्म्यामध्ये होते. सुख-दुःखाची अनुभूती त्यालाच होते आणि हे सर्व तन्मात्रा आणि तन्मात्रिततेमुळे घडते.

**मुहम्मदी आत्मा ('रूह')**

इहलोक व परलोक या दोन्ही जगांचे सरदार मुहम्मद यांचा पवित्र आत्मा सर्व आत्म्यांमध्ये सर्वश्रेष्ठ आणि सर्वोच्च आहे. तो प्रत्येक स्थळी परिपूर्ण गुणांनी युक्त आहे. आत्म्यांच्या जगामध्ये संदेष्टे, संत-महात्मे, साधू आणि साधारण या सर्वांचे आत्मे यांनी मुहम्मदी आत्म्याच्या प्रेषितत्त्वावर श्रद्धा ठेवली आहे. आणि सर्वांनी मान्य केले की भौतिक जगामध्ये आल्यानंतर त्यांचे अनुसरण करतील. ते आपल्या पवित्र आत्म्यास प्रेषितत्त्व प्राप्त झाल्याची घोषणा अशाप्रकारे करतात - अद्याप आदमच्या शारीरिक कवचामध्ये आत्मासुद्धा प्रविष्ट झाला नव्हता, त्यावेळेस माझ्या आत्म्यास प्रेषितत्त्व प्राप्त झाले होते. आणि म्हणतात - जर इम्रानचे सुपुत्र मूसा हयात असते, तर माझ्या अनुसरणाशिवाय त्यांच्यासाठी तरणोपाय नव्हता, आणि ते माझेच अनुसरण करते (केले असते). कारण की आत्म्यांच्या जगामध्ये त्यांचा आत्म्याने माझ्या आत्म्याचे अनुसरण केले होते. प्रेषितांचा समुदाय पापी लोकांपासून सुरक्षित आहे. ते निरागस आहेत. म्हणून प्रेषित मूसाने जर प्रेषित मुहम्मद यांना पाहिले असते तर निश्चितपणे त्यांनी यांचे अनुसरण केले असते. निवाड्याच्या दिवशी सर्व प्रेषित त्यांच्या पताकेखाली असतील.

**४) चौथी तन्मात्रा :**

चौथी श्रेणी 'आलम-ए-मिसाल' अर्थात प्रतिकृती जग वा सादृश्य जगाची आहे. हे आत्मा जगत ('आलम-ए-अर्वाह') आणि भौतिक-दृश्य जगत ('आलम-ए-शहादत') यांच्या दरम्यान आहे. आपल्या सूक्ष्मतेच्या कारणाने आत्म्याचे जगताशी आणि देहाच्या अनेकविधतेमुळे भौतिक जगाशी याचे साम्य आहे. म्हणून हे जग उपरोक्त दोन्ही जगांच्या दरम्यान 'बर्ज़ख़' अर्थात मध्यलोक वा भुवर्लोक आहे. आणि याचे दोन प्रकार आहेत. एक प्रकार तो आहे की याला समजण्यासाठी विचारशक्ती असणे ही अट आहे आणि दुसऱ्या प्रकारासाठी विवेकशक्ती अंमलात आणणे ही अट आहे आणि याला निर्णित दृष्टान्त असे म्हणतात.

### निर्णित दृष्टान्त

निर्णित दृष्टान्त एक सूक्ष्म जग आहे. नि:संदेह याचे आस्तित्व आहे. या जगामध्ये आत्मा देहधारी बनतो. प्रेषित मुहम्मद यांचेकडे देवदूत जिब्रीलचे येणे याच जगामध्ये व्हायचे. संदेष्टे, संत–महात्मे आणि ख़िज़र यांचे याच जगामध्ये प्रकटन व्हायचे. ज्यांच्यावर इच्छा असते त्यांच्यावर सादृश्य देह स्वरूपात प्रकट होतात. सारियतिया बिन ज़नीम वर अमीरुल मोमिनीन उमर हे याच जगामध्ये प्रकट झाले होते. हा प्रसंग असा आहे –

### उमर यांचा प्रसंग

हज़रत उमर यांनी एकदा धर्मयुद्धा('जिहाद')साठी सारियतिया बिन ज़नीम यांच्या नेतृत्वाखाली एक लष्करी दळ पाठवले. हे दळ शत्रूंशी युद्ध करण्यामध्ये मग्न होते. शत्रूपक्षाने अगोदरच या धर्मयोद्ध्याविरुद्ध एका गनिमीकावा युक्तिची मांडणी केली होती. त्यांनी युद्धभूमिजवळ टेकडीच्या पाठीमागे आपल्या सैन्याची एक तुकडी लपवून ठेवली होती. त्यांची योजना अशी होती की युद्ध सुरू झाल्यानंतर काही वेळाने त्या टेकडीपर्यंत माघार घ्यायची. मुसलमानांचे सैनिक पाठलाग करत जेव्हा या टेकडीजवळ पोहोचतील तेव्हा घात करण्यासाठी लपण्याच्या ठिकाणाहून ते लपलेले सैनिक मुसलमान सेनेवर हल्लाबोल करतील. अर्थात शत्रूने असेच केले. युद्ध सुरू झाले आणि त्यांनी टेकडीकडे माघार घ्यावयास सुरुवात केली. मुसलमानी सेनेने त्यांचा पाठलाग सुरू केला. तो शुक्रवारचा दिवस होता. आणि हज़रत उमर हे मदीनेमधील प्रेषितांच्या मशिदीत प्रवचनपीठावर उभे राहून प्रवचन करत होते. त्याच दरम्यान युद्धामधील घटनेचे वास्तव त्यांच्यासमोर उघड झाले आणि धर्मप्रवचनामध्येच ते जोराने म्हणून लागले – हे! सारियतिया बिन ज़नीम, टेकडीपासून वाचवून घ्या. सारियाने युद्धभूमिवर ना फक्त उमरचा आवाज ऐकला, परंतु त्याने आपल्या डोळ्यांनी उमर यांना समक्ष पाहिले; यद्यपि त्यांचे भौतिक शरीर मदीनेतील मशिदीमध्ये प्रवचनपीठावर आरूढ होते. उमरचे प्रतिरूप वा सादृश्य देह सारियावर उघड झाले होते.

### थडग्या (कबरी)मधील सुख–दु:ख

मृतास याच जगामध्ये, इहलोकामध्ये मृत्यूचा देवदूत इज्राईलकडून प्राणहरण, देहाशी ताटातूट, प्राणोत्क्रमणानंतर आत्म्याचे शरीराशी पुन्हा संबंध प्रस्थापित होणे, प्रश्नकर्ते देवदूत मुन्किर–नकीर यांचे प्रश्न उपस्थित करणे आणि थडग्या (कबरी)मध्ये सुख–दु:खाची अनुभूती येणे, या सर्व गोष्टी घडतात.

सर्वश्रेष्ठ परमेश्वर आज्ञापितो – ''(राहिले नास्तिक–श्रद्धाहीन, ते तर मानणारच नाहीत,) येथपर्यंत की जेव्हा यांच्यातून कोणाला मृत्यू येऊन ठेपेल, तेव्हा तो प्रार्थना करू लागेल की, हे माझ्या पालनकर्त्या! तू मला (एकदा) पुन्हा परत पाठवून दे, म्हणजे ज्या (जगा)ला मी सोडून आलो आहे त्यांत (पुन्हा जाऊन) सुकृत्य करीन. (आम्ही दूतांस संबोधून म्हणू की) छे छे! तो एक (अघटित) गोष्ट बोलतो आहे (तर त्याला बोलू दे, असल्या मागण्या कोठे मंज़ूर होऊ लागल्या आहेत? आणि लोकांच्या (मरणा)पलीकडे एक (मध्यवर्ती जग) 'बर्ज़ख़' होय (की तेथे) त्यास जेव्हा (पुन्हा जिवंत करून) उठवून उभे केले जाईल त्या दिवसापर्यंत (राहावे लागेल).'' २३:९९–१०० यावेळेस यद्यपि श्रद्धाहीन ही गोष्ट म्हणत आहेत, परंतु ते खोटे बोलत आहेत. दुसऱ्या एका श्लोकामध्ये सर्वश्रेष्ठ परमेश्वर म्हणत आहे – ''जर त्यांना पार्थिव जीवनाकडे परत पाठविण्यात आले तर ते त्याच कामांकडे वळतील, ज्यांची

त्यांना मनाई करण्यात आली आहे, कारण की अवज्ञा करण्यामध्येच त्यांचा आनंद सामावलेला आहे; त्यांच्यासाठी पुनरूत्थानाच्या दिवसापर्यंत एक अडकण ('बर्ज़ख') आहे.'' याच 'बर्ज़ख़'मध्ये त्यांना शिक्षा होत राहील आणि हे 'बर्ज़ख़' अर्थात अडकण आहे प्रतिरूप जगाचे निर्णित दृष्टान्त. ''मृत्यूनंतर पुनरूत्थान होईपर्यंत आत्म्याचे ज्या अवस्थेत वास्तव्य होईल तिचे नाव 'बर्ज़ख़' होय. हे मध्यवर्ती जग आहे. जणू की 'बर्ज़ख़' हे इहलौकिक आयुष्य व पुनरूत्थान यांच्यामधील वेगळेपणाची एक हद्द आहे.''[३५]

मुल्ला सद्रुद्दीन यांनी इमाम रब्बानी मुजद्दे अल्लफ़ सानी (दुसऱ्या सहस्रकातील जीर्णोद्धारक) शेख अहमद फ़ारूक़ी सरहिंदी यांच्याशी 'आलम-ए-अर्वाह' (आत्म्याचे जग), 'आलम-ए-अजसाम' (भौतिक जग) आणि 'आलम-ए-मिसाल' (प्रतिरूप जग) याबाबतीत विचारणा करून थडग्यामधील यातनेविषयी जिज्ञासा व्यक्त करून विचारले की, काय हे प्रतिरूप जगापैकी आहे आणि काय ते स्वप्नामधील सुख-दु:खासारखे आहे? सरहिंदी यांचा खुलासा याप्रमाणे आहे -

संभाव्य जगाचे तीन प्रकार मानण्यात आलेले आहेत - १) आलम-ए-अर्वाह (आत्म्याचे जग), २) आलम-ए-मिसाल (प्रतिरूप जग), ३) आलम-ए-अजसाद (भौतिक जग). 'आलम-ए-मिसाल'ला 'आलम-ए-अर्वाह' आणि 'आलम-ए-अजसाद'चे 'बर्ज़ख़' (मध्यवर्ती जग, अडकण) मानण्यात आले आहे; आणि म्हटले गेले आहे की ते या दोन्ही जगासाठी आरशासारखे आहे. दोहोंचे वास्तव आणि भावार्थाची अभिव्यक्ती सूक्ष्म स्वरूपामध्ये होते. प्रत्येक वास्तव आणि भावार्थ आपल्या यथायोग्य आकारामध्ये व्यक्त होते. 'आलम-ए-मिसाल' आपल्या सत्तेशी नाद, रूप व आकारावर निर्भर नसते. यामध्ये जे स्वरूप व्यक्त होते ते बाहेरून येणारे असते. मग आत्म्याचा संबंध शरीराशी झाला आणि या संबंधाअगोदर तो आपल्या जगामध्ये होता म्हणजेच 'आलम-ए-अर्वाह'मध्ये. हे जग 'आलम-ए-मिसाल'पेक्षा वरचढ आहे. शरीराशी संबंधित झाल्यानंतर प्रेम-प्रदेशासह 'आलम-ए-अजसाद'मध्ये राहिला. 'आलम-ए-मिसाल'शी त्याचा संबंध, ना शरीराशी संबंध येण्याअगोदर होता ना त्याच्या संबंधानंतर. फक्त ही अशी अवस्था आहे की, सहसा आपल्या अवस्थांचे निरीक्षण करण्यासाठी 'आलम-ए-मिसाल' मध्ये येतो. तो आपल्या बऱ्यावाईट दशेस पाहातो. जसे की वास्तविक जग आणि स्वप्नांच्या जगामध्ये प्रकट होत असते. बऱ्याचदा असेही पण होत असते की तो संवेदनाशून्य नसतो, परंतु आशयाची जाणीव करून घेतो, आणि आत्मा जेव्हा शरीरापासून वेगळा होतो तेव्हा तो जर उच्च आत्म्यापैकी असेल, तर तो वरच्या जगाकडे प्रयाण करतो, आणि जर अधमपैकी असेल तर तो रसातळामध्ये अटकतो. 'आलम-ए-मिसाल'शी त्याचा संबंध नसतो. 'आलम-ए-मिसाल' अर्थात प्रतिरूप जग हे पाहण्याचे जग आहे, राहाण्याचे जग नव्हे. राहाण्याचे स्थळ 'आलम-ए-अर्वाह' आहे किंवा 'आलम-ए-अजसाद'.'आलम-ए-मिसाल' शेष दोन्ही जगांसाठी आरशासारखे आहे. या व्यतिरिक्त काहीच नाही.

'आलम-ए-मिसाल' अर्थात प्रतिरूप जगाचे जे दु:ख स्वप्नामध्ये दिसते, ते पापाच्या मुळाचे दृष्टान्त आहे, आणि चेतावणी देण्यासाठी स्वप्नामध्ये दाखवले जाते. थडग्याचे दु:ख अशा प्रकारचे नसते. ते पाप आणि दंडाचे दृष्टान्त नाही, परंतु खरोखरीची यातना आहे, आणि स्वप्नामध्ये ज्या यातनेची अनुभूती होते, जर खरोखर तिचे वास्तव पण असेल, तर ती इहलौकिक शिक्षेसारखी आहे आणि थडग्याची यातना पारलौकिक शिक्षेपैकी

आहे. दोहोंमध्ये फार फरक आहे. थोडक्यात, पारलौकिक शिक्षा ही इहलौकिक शिक्षेसारखी आहे, असा विचार करणे चुकीचे आहे.

'बर्ज़ख़' (अडकण, मध्यवर्ती जग) त्या आडपडद्यास म्हणतात जे दोन वस्तूंच्या दरम्यान असते. तो आडपडदा एकास दुसऱ्यात मिसळू देत नाही. अबू सख़रने म्हटले आहे की 'बर्ज़ख़' थडगे आहे. शेखुल इस्लाम अन्सारी हर्वी यांनी म्हटले आहे की थडग्याची मुदत 'बर्ज़ख़' आहे. मुजद्दद सरहिंदी म्हणतात की इहलोक व परलोक यांच्या दरम्यान थडगे (कबर) 'बर्ज़ख़' (मध्यलोक) आहे.

**देहांचा कर्म-हिशेब**

प्रलय दिवशी याच सूक्ष्म भौतिक शरीराच्या शुभाशुभ कर्मांचा हिशेब होईल; परंतु हा भौतिक शरीर प्रतिरूप शरीरासारखा अत्यंत सूक्ष्म असेल. स्वर्गामधील लोक आपल्या सत्कर्मांना चांगल्या स्वरूपात पाहून आनंदित होतील आणि नरकातील लोक आपली अपकर्मे वाईट स्वरूपात पाहून भयभीत होतील.

कर्मांच्या स्वरूपावरून पुरस्कार प्राप्त होणे आणि दंडित होणे हे घडते. याचे कारण असे आहे की या भौतिक जगामध्ये जरी कर्म उपेक्षित असतात आणि आपल्या सत्तेशी कायमस्वरूपी नसतात, तरी प्रतिरूप जगाच्या निर्मित दृष्टान्तामध्ये प्रत्येक कर्माचे वास्तव तत्त्वस्वरूपात प्रकट होते. सत्कर्म अप्सरा, भवन इत्यादीच्या आकारामध्ये आणि दुष्कर्म दंड स्वरूपात प्रकट होतो. उदाहरणस्वरूपामध्ये व्यभिचारास प्रस्तुत करता येऊ शकते. जरी या दुष्कर्माचे गंभीर परिणाम दृष्टिआड करून आणि वासनेच्या आहारी जाऊन या जगामध्ये सदरहू दुष्कर्म (संभोगसुखामुळे) आनंददायक वाटते; परंतु प्रतिरूप जगाच्या निर्मित दृष्टान्तामध्ये याचे वास्तव दग्ध करणारी आग म्हणजेच नरकाग्नी आहे. परलोकाचे जीवन वास्तवावर आधारित आहे. तेथे कर्मांचे वास्तव समोर येतात. आणि ते सुख किंवा दु:खाचे कारण बनतात. सर्वश्रेष्ठ अल्लाह श्रद्धाहीनांना संबोधित करत आहे – जे काय तुम्ही केलेले आहे त्याचेच फळ तुम्हाला मिळत आहे. हा एक स्पष्टार्थक श्लोक आहे की माणसाचा बदला हा त्याचे आचरण आहे.

**प्रतिरूप जगा ('आलम-ए-मिसाल')चा पहिला प्रकार – स्वप्न**

प्रतिरूप जगाचा तो पहिला प्रकार आहे की ज्याच्या प्रबोधनासाठी विवेकशक्ती उपयोगात आणणे ही अट आहे. हा प्रकार त्या वेळेस प्रकट होतो जेव्हा विवेकशक्ती कार्यरत असते. जी रूपे स्वप्नात दिसतात, ती याच प्रकारामधील आहेत. स्वप्नात दिसणारी रूपे कधी वास्तवाशी जुळणारी असतात तर कधी नसतात. वास्तवाशी अनुकूल स्वप्नाची मीमांसा करण्याची गरज नसते. प्रेषित धर्मपत्नी आयशा म्हणतात की, प्रेषित मुहम्मद यांच्या प्रेषितत्त्वाची सुरुवात सच्च्या स्वप्नाने झाली. उष:कालाच्या प्रभेमध्ये जी स्पष्टता असते त्याप्रमाणे स्वप्नात ते जे काही पाहात, ते अगदी स्पष्ट दिसत असे. ही अवस्था ईश्वराज्ञा किंवा दैवी प्रज्ञान प्रकट होणे आणि देवदूताच्या आगमनाअगोदर असायची. स्वप्न जर प्रतिकूल असतील तर त्यांच्या मीमांसेची आवश्यकता असते. अशाच प्रकारच्या स्वप्नांपैकी ते एक स्वप्न आहे ज्याचे कथन बुखारी यांनी केले आहे. प्रेषित मुहम्मद म्हणाले की स्वप्नात माझ्यापाशी एका भांड्यात दूध आणण्यात आले. मी ते भरपूर प्यालो. काही उरले. ते मी उमर यांना दिले. याचा खुलासा विचारल्यावर ते म्हणाले याची मीमांसा ज्ञान आहे. बुखारी यांनी आणखी एक स्वप्नाचा उल्लेख केला आहे. तो असा – प्रेषित म्हणतात, माझ्यासमोर लोकांना उभे केले गेले. कुणाचा अंगरखा फार

लहान छातीपर्यंतच होता आणि कुणाचा कंबरेपर्यंत, आणि कुणाचा पिंडरीपर्यंत होता. आणि मी उमर यांना पाहिले की त्यांचा अंगरखा जमिनीपर्यंत लोंबकळलेला होता आणि त्यांनी या स्वप्नाची मीमांसा श्रद्धा अशी केली. अशाच प्रकारच्या स्वप्नांपैकी प्रेषित इब्राहीम यांचे ते स्वप्न आहे की ते आपल्या मुलाचा बळी देत आहेत. मेंढा ही त्याची मीमांसा होती. ईश्वराच्या निकटवर्ती संतांना याची जाणीव झाली की (प्रेषित इब्राहीम यांचा) तो मुलगा म्हणजे इसहाक् होय.


स्वप्नाचे विश्व अजब असते. जी ठिकाणे, जे लोक व ज्या घटना जागृत अवस्थेत आपल्या ध्यानीमनी नसतात, त्यांच्याशी आपला स्वप्नात सामना होतो. स्वप्नांनी अशा प्रकारे भविष्यातील घटनांचे संकेत दिल्यानतंर त्या घटनांना कसे सामोरे जायचे हे आपल्यावर अवलंबून आहे. पात्रता व विवेकबुद्धीवर स्वप्नाचे परिणाम अवलंबून असतात.

स्वप्नात दिसणारी घटना जशीच्या तशी प्रत्यक्ष घडेलच असे नाही. कधी नेमके त्याच्या उलट घडते. स्वप्नात पाणी दिसणे संपत्तीचे, पतंग सौभाग्याचे, हिरवळ-हिरवीगार झाडी हे समृद्धीचे, प्रवास हे प्रगतीचे, हवेत उडणे हे विकासाचे, विवाह अवनती व मरणासन्न वेदनेचे सूचक आहे. स्वप्नात आकाश, तारे, ग्रहण, सूर्यदर्शन, कबूतर, गिधाडे, कावळे, राक्षस, वीज, उंट-गाढवावर स्वार होणे, अग्नीप्रवेश, मरणदृश्य आदी स्वप्ने आरोग्याच्या दृष्टीने अपायकारक असून रोग-पीडा यांची पूर्वकल्पना देतात. कोल्हा, कुत्रा, मांजर, कोंबडा, मुंगूस, साप, माशी, विंचू यांचे दर्शन अशुभ मानले जाते. तर हत्ती, घोडा, सिंह, गाय, कमळ, रत्ने, चांदी, गहू, मोहरी, फळे, फळदार वृक्ष, भोजन, नौकानयन, संगीत श्रवणयुक्त अशी स्वप्ने शुभ संकेत देतात.

**५) पाचवी तन्मात्रा**

ही पाचवी श्रेणी आहे. याला दृश्य जग ('आलम-ए-शहादत') आणि भौतिक जग ('आलम-ए-अजसाम') असे म्हणतात. विश्वज्ञान ('अक़्ल-ए-कुल') आणि विश्वात्मा ('नफ़्स-ए-कुल') नंतर तिमिर तत्त्वा ('जौहर-ए-अमा')मध्ये भौतिक सत्त्व आणि प्रकृतीची निर्मिती झाली. भौतिक सत्त्व शरीरांचे मूलतत्त्व आहे. परमेश्वराच्या आज्ञेने, प्रकृती, त्या अवस्थेशी अनुकूल, जे विश्वात्म्यामध्ये विश्वज्ञानाच्या वृद्धिमुळे प्रमाणित आहे, नकळत प्रभाव करते. सुरुवातीस भौतिक सत्त्वाने तात्त्विक विस्तार ग्रहण करून क्षेत्रीय स्वरूपात स्वत:स प्रकट केले. हे क्षेत्र सर्व भौतिक जगावर व्याप्त आहे आणि हेच महान दैवी सिंहासन ('अर्श') आहे. ब्रह्मगुफेमध्ये ('अमा') चार देवदूत निर्माण झाले. यांनी 'अर्श'ला आपल्या खांद्यावर उचललेले आहे. प्रलयाच्या ('क़यामत') दिवशी आठ देवदूत याला उचलतील. हे दैवी सिंहासन ('अर्श') कृपाशील ('रहमान') परमेश्वराचे आसन आहे. परमेश्वर याच्यावर प्रकट झाला आहे. 'अर्रहमानु अलील अर्शिअस्तवा.' म्हणून त्याच्या कृपेने समस्त जगात घेरलेले आहे. जीवसृष्टीमध्ये कोणताच जीव असा नाही की त्याच्यावर कृपेची सावली नसेल. इथपर्यंत की त्याच्या क्रोधामध्येसुद्धा त्याची कृपा दडलेली असते. ज्याच्यावर त्याचा क्रोध प्रहार करतो, तो क्रोध त्याचे आजारपण आणि वाईटपणासाठी कृपाच ठरते. आजारपणा आणि वाईटपणा एक वास्तव आहे आणि ते वास्तव त्यावेळेस समोर आले जेव्हा कृपा त्याच्याशी निगडित झाली आणि ज्याच्यावर क्रोधाचा वर्षाव झाला त्याच्यासाठी पण क्रोधामध्ये कृपा समाविष्ट असते. अवज्ञा करणारास अग्नीची शिक्षा दिली जाते की

जेणेकरून त्याच्यावरील अपराधाचा लेप नष्ट होईल आणि तो चमकेल म्हणजेच निरपराध होऊन जाईल. ज्याप्रमाणे सोने तापवून त्याला कुंदनस्वरूप बनवले जाते त्याचप्रमाणे हे घडते. शरीरावरील फोडास शस्त्रकर्म करून, चिरफाड करून, आतील पू काढून जखम औषधोपचाराने दुरूस्त करता येते. ठीक अशीच अवस्था धर्मशास्त्रीय मर्यादांची असते. धर्मशास्त्राचे नियम पाळताना शारीरिक कष्ट किंवा थकवा जरूर जाणवतो; परंतु ते अपराधाच्या प्रभावास नष्ट करण्यामध्ये प्रभावी असतात; आणि आंतरिक दृष्टीने ती ऐन कृपाच असते.




**आकृती ६**

**अर्श आणि कुर्सी (दैवी सिंहासन आणि पादपीठ) :** 'अर्श' म्हणजेच उच्च दैवी सिंहासनाच्या अंतर्गत एक दुसरा भौतिक देह याच स्वरूपाचा आहे, आणि ही 'कुर्सी' अर्थात पादपीठ आहे. याच्याशी 'रहमान' म्हणजेच कृपाळू परमेश्वराचे दोन्ही पाय ('क़दम') लटकलेले आहेत. दोन्ही पायाशी आशय आहे शुद्ध कृपा आणि क्रोधाचा प्रकाश. सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे क्रोध आणि त्याची कृपा यांचा त्याच्या दासांशी संबंध या पादपीठा ('कुर्सी')मुळे होतो. या पादपीठामध्ये देवदूत आहेत. त्यांची सेवा, कृपा आणि क्रोध दासांपर्यंत पोहोचवायचा असतो.

त्या पादपीठाच्या अंतर्गत आणखी एक पादपीठ आहे. याला 'फ़लक-ए-अत्लस' म्हणजेच सर्वोपरि साधे आकाश असे म्हटले जाते. याला 'अर्श-ए-मुतग़ैयर' म्हणजेच परिवर्तनशील सिंहासन पण म्हणतात. अर्थात परिवर्तन देणारे सिंहासन. जगामध्ये जे परिवर्तन दिसते, जो बदल घडून येतो, तो याच्यामुळे होतो. ज्या पवित्र दैवी नामाचे हे सिंहासन, अभिव्यक्ती आहे, त्याच पवित्र नामाचे प्रकट देवदूत यामध्ये आहेत. जगामध्ये बदल घडवून आणण्याची सेवा या देवदूतांच्या सुपुर्द आहे. 'फ़लक-ए-अतलस' अर्थात सर्वोपरि साधे आकाश अंतर्गत 'फलक-ए-सवाबित' म्हणजेच स्थिर ताऱ्यांचे आकाश आहे आणि याच्यामध्ये एक दुसरे पादपीठ आहे, आणि या पादपीठामध्ये त्याच्याशी सुसंगत असे देवदूत आहेत.

सत्तात्मक गुण आणि त्यांच्या त्रुटिंना 'क़दमैन' म्हणजेच दोन्ही पाय असे म्हणतात. सत्तात्मक गुण ते गुण आहेत, ज्यांचा संबंध सत्तेच्या स्तराशी असतो. जसे अस्तित्व, प्राचीनता, चिरंतनता यांच्या त्रुटी क्रमशः अशा आहेत अस्तित्वशून्य, अर्वाचीनता आणि निर्वाण वा अशाश्वतता. ज्याअर्थी पाय ('क़दम') संपूर्ण सत्तेपासून आहे त्याअर्थी ते गुण आणि त्या त्रुटींना दोन्ही पाय अर्थात 'क़दमैन' म्हटले जाते.

आणि कर्तृत्वगुणांना आणि त्यांच्या त्रुटींना 'नालैन' म्हणजेच पायातील जोडा असे म्हणतात. कर्तृत्वगुण ते गुण आहेत ज्यांचा प्रभाव सृष्टीवरून दिसून येतो. जसे, करुणा, प्रसन्नता, पाप यांच्या त्रुटी क्रमशः क्रोध, अप्रसन्नता, पुण्य आहेत. जोड्याचे स्थान पायाखाली असते, तद्वत कर्तृत्वगुण हे सत्तात्मक गुणांच्या अधीन असतात. म्हणून या कर्तृत्वगुणांना व त्यांच्या त्रुटींना 'नालैन' असे म्हणतात. अर्थातच सद्गुण हे दुर्गुणांहून नेहमी वरचढ असतात.

दृश्य जगामध्ये 'फ़लक-ए-अतलस' अर्थात सर्वोपरि साधे आकाशच महान सिंहासन आहे. आणि 'फ़लक-ए-सवाबित' म्हणजेच स्थिर ताऱ्यांचे आकाश हे सर्वोपरि आकाशाशी जुळलेले नाही; परंतु या दोहोंच्या दरम्यान अंतराळ आहे. या अंतराळामध्ये स्वर्गाची निर्मिती झाली आहे. स्वर्गाची पर्वतासारखी उंचवटलेली, उंटाच्या कुकुदसारखे मदारवत छत, सर्वोपरि आकाशाची जमीन आणि स्वर्गाची खोलवरची

जमीन, स्थिर ताऱ्यांच्या आकाशाची पर्वताकार उंचवटलेली मदारासारखे छत आहे. यांच्यानंतर पाणी, जमीन आणि हवा यांची निर्मिती झाली आणि हवेमुळे आग निर्माण झाली. नंतर पाणी आणि जमीनपासून वाफ निर्माण झाली आणि तिने उंचीवर जाऊन सप्त आकाशांचे रूप धारण केले. प्रत्येक आकाशावर देवदूत आहेत, जे सेवेसाठी तत्पर असतात आणि जमिनीखाली नरकाची निर्मिती झाली.

**६) सहावी तन्मात्रा**

ही सहावी श्रेणी आहे. हा मानवाचा दर्जा आहे. तो समस्त स्रोतांचा संग्राहक आहे. पहिली तन्मात्रा आपल्या संपूर्ण पराकाष्ठेसह दुसऱ्या तन्मात्रामध्ये प्रकट झाली. मानव हा त्रैलोक्यांचा, त्रिभुवनांचा संग्राहक आहे. सर्वश्रेष्ठ अल्लाह हा आपल्या समस्त नाम-रूपांसह आणि समस्त भौतिक गुण आणि स्रोतांसह मानवामध्ये प्रकट झालेला आहे. मानव अनादिपासून अनंतापर्यंत सर्व सृष्टींचा संपादनकर्ता आहे. मानवास 'लघुजगत' म्हणजेच 'आलम-ए-सग़ीर' असे म्हणतात, आणि पुरुषोत्तम वा नरोत्तम हा अल्लाहचा उत्तराधिकारी ('ख़लीफ़ा') असतो. तो सर्व जगांचा अधिकारी असतो. विश्वाच्या घटकांना सर्वश्रेष्ठ अल्लाहचे उपकार नरोत्तमाच्या अंतरंगाच्या स्रोतापासून प्राप्त होतात. म्हणून मानव हा देवदूतांसाठी प्रणिपात करण्यास योग्य असा ठरला.

**नरोत्तम वा पुरुषोत्तम ('इन्सान-ए-कामिल')**

आपल्या निर्मितीच्या अनुषंगाने नरोत्तम हा शेवटचा आहे, परंतु आपल्या वास्तवाच्या अनुषंगाने पहिला आहे आणि तो पहिल्या तन्मात्रासारखा आहे, आणि सृष्टीनिर्मितीचा हेतू तोच आहे. अल्लाहने आपल्या दोन्ही हातांनी त्याला निर्माण केले. 'दोन्ही हातांनी'चा आशय आहे त्याचे भद्रगुण व रुद्रगुण, कर्तृत्वगुण, शाश्वतगुण आणि भौतिक नाम-रूपे होत. अल्लाहने शेष समस्त सृष्टीस आपल्या एका हाताने निर्माण केले आहे. या रहस्याची जाणीव देहधारी देवदूतांना नव्हती म्हणून जेव्हा परमेश्वराने देवदूतांना असे म्हटले, ''मी पृथ्वीवर एक उत्तराधिकारी ('ख़लीफ़ा') नेमणार आहे.'' त्यावर त्यांनी विनवणी केली, ''तू (पृथ्वीवर) अशांना वसवणार आहेस का जे अनाचार घडवतील आणि रक्तपात करतील? (हे प्रभू) आम्ही तर तुझ्या असीम महानतेचे व पावित्र्याचे गुणगान करतो!'' (अल्लाहने) उत्तर दिले, ''तुम्ही ते जाणत नाही, जे मी जाणतो.'' २:३०

देवदूतांचे गुणगान हे फक्त त्या नामानेच होते, जो त्यांचा स्रोत असतो. त्यांना इतर नामांची कल्पनाच असत नाही. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने पुरुषोत्तम आदम यांना समस्त नामांचे ज्ञान दिले. कारण की ते त्याच्या सत्तेचे स्रोत आहेत आणि म्हणून तो अल्लाहच्या समस्त नामांनिशी त्याचे गुणगान करतो. त्याचे गुणगान देवदूतांच्या गुणगानाहून परिपूर्णतम आहे. देवदूतांना या वास्तवाची मुळीच जाण नव्हती आणि त्यांनी आपली विनवणी समोर ठेवली. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने देवदूतांसमोर सृष्टीस व्यक्त केले, आणि मग त्यांना तो म्हणाला की तुम्ही यांची नावे सांगा. म्हणजेच ज्या नामांनी ब्रह्मांड गुणगान करते ती नावे सांगा, आणि ब्रह्मांड ज्यांचे स्रोत आहे ती. ज्याअर्थी देवदूत अहंकारापासून मुक्त आहेत, त्याअर्थी त्यांनी आपली विनम्रता प्रदर्शित केली आणि ते म्हणाले, आम्हाला त्यांची जाणीव नाही. आम्ही फक्त तेवढेच जाणतो जेवढे ज्ञान तू आम्हाला दिले आहेस. या

संदर्भात प्रत्यक्ष पवित्र कुराणाचे शब्द असे आहेत ''आणि अल्लाहने आदमला सर्व (गोष्टींची) नावे शिकविली आणि त्या सर्वांना देवदूतांसमोर उपस्थित केले आणि म्हटले, 'तुमचे म्हणणे खरे असेल, तर मला या सर्वांची नावे सांगा.' त्यांनी उत्तर दिले, 'असीम आहे तुझी कीर्ती! जे ज्ञान तू आम्हाला प्रदान केलेस त्याच्याव्यतिरिक्त आम्हाला कोणतेही ज्ञान नाही. नि:संशय, तूच सर्व गोष्टींचा जाणकार आणि अस्सल बुद्धिमान आहेस.' २:३१-३२ (तेव्हा) अल्लाहने सांगितले, ''हे आदम ! त्यांना यांची नावे सांग.'' जेव्हा आदमने (स्वर्गदूतांना) त्यांची नावे सांगितली, तेव्हा अल्लाहने म्हटले, ''मी तुम्हाला सांगितलं नव्हतं का? की, केवळ मीच जाणतो, पृथ्वी व आकाशातील सर्व गुपिते आणि ते सर्व (मीच) जाणतो, जे तुम्ही प्रकट करता आणि जे तुम्ही लपवता.'' आणि (ती वेळही आठवा) जेव्हा आम्ही स्वर्गदूतांना म्हटले, ''आदम (आद्यप्रपितामह मानव)समोर नतमस्तक व्हा,'' तेव्हा ते सर्व (आज्ञापालन करीत) नतमस्तक झाले. फक्त इब्लीस सोडून. अहंकारपोटी त्याने तसे करण्यास नकार दिला. (अशाप्रकारे) त्याने स्वत:ला त्या लोकांत सामील करून घेतले जे सत्याला नाकारतात. २:३३-३४


देवदूत नरोत्तम आदम यांची सर्वज्ञता मान्य करून त्यास ईश्वराज्ञेनुसार प्रणिपात करते झाले, परंतु इब्लीसाने मात्र प्रणिपात करण्यास नकार दिला आणि आपल्या नकाराचे स्पष्टीकरण देत तो म्हणाला, ''मी त्याच्यापेक्षा श्रेष्ठ आहे. तू मला अग्नीपासून निर्माण केले आहेस, तर आदमला (क्षुल्लक) मातीपासून निर्माण केले आहेस.'' ७:१२ म्हणजेच अग्नी हा मातीहून श्रेष्ठ असतो, असा भाव-आशय. इब्लीसला हे जाणवले नाही की नरोत्तम हा अल्लाहच्या सत्तेचा स्रोत असतो. सर्व नाम-रूपे आणि सर्व सृष्टीच्या वास्तवामध्ये अग्नीचीसुद्धा गणती होते. त्याने फक्त एकाच (अग्नी या) स्रोतावर आपला अहंकार (घमेंड) व्यक्त केला. त्याला असे करायला नको होते. म्हणून तो चिरंतन काळासाठी ईश्वराकडून धिकृत, तिरस्कृत बनवला गेला आणि ज्याअर्थी तो 'अल्-मुज़िल्लु' अर्थात 'पथभ्रष्ट करणारा' या नामाचा स्रोत आहे, म्हणून तर तो पथभ्रष्टतेशिवाय दुसरे काहीच करू शकत नाही. तो अल्लाहचे गुणगान 'अल-मुज़िल्लु' या नामाने व तत्समानार्थी इतर नामांनी करतो. म्हणून त्याने अल्लाहस आव्हान देत असे म्हटले, ''हे परमेश्वरा! तुझ्या इभ्रतीची, प्रतिष्ठेची शपथ! मी आदमच्या समुदायातील लोकांना पथभ्रष्ट करून न सोडीन तरच सई! म्हणजेच तो मानवसमुदायास पथभ्रष्ट करण्यास कटिबद्ध आहे. त्याने पथभ्रष्टता व सन्मार्गच्युतीच्या सेवेमध्ये स्वत:स समर्पित करून घेतले आहे, म्हणजे 'पथभ्रष्टता' या नामाचे प्रकटन व्हावे. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने त्यास म्हटले - ''आणि त्यांच्यापैकी ज्यांनाही तू (हे इब्लीस!) आपल्या मोहक स्वराने बहकावू शकशील त्यांना बहकव. आणि त्यांच्यावर आपले स्वार व प्यादे यांच्या साहाय्याने चढाई कर. आणि त्यांच्या धनसंपत्ती व संततीत त्यांचा भागीदार (म्हणजेच पापाचा वाटेकरी) हो, आणि त्यांच्याशी (फसवणूक करणारे) वायदे कर, आणि सैतान जे वायदे करतो, ते फसवणुकीशिवाय दुसरे काहीच नाही.'' १७:६४ सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या या कथनाने हे माहीत होते की त्याने सैतानास पथभ्रष्ट करण्याच्या जबाबदारीवर नेमलेले आहे. म्हणून त्याने वाटेल त्या पद्धतीने लोकांना पथभ्रष्ठ करून सोडावे म्हणजे त्याचे 'पथभ्रष्ट' हे नाम अभिव्यक्त व्हावे. पथभ्रष्टतेची सेवा ही इब्लीसवर सुपूर्द करण्यात आलेली आहे आणि तो ही सेवा तत्परतेने करत आहे.

नरोत्तम वा पुरुषोत्तम आपल्या वास्तवाच्या अनुषंगाने समस्त नामांचा धारणकर्ता आहे. तो 'पथभ्रष्ट' या नामामध्ये इब्लीसचा साथी-भागीदार आहे. याच्यासोबत तो इहलोक व परलोकामध्ये 'पथप्रदर्शक'चा स्रोत आहे. याच कारणास्तव नरोत्तमापासून सुयोग्य मार्गदर्शनाशिवाय इतर काहीच सादर होऊ शकत नाही आणि तो जे काय कार्य करतो, ते मार्गदर्शनासाठीच असते. संत-महात्म्यांमधून ज्या व्यक्ती सर्वगुणसंपन्न आहेत त्या व्यक्ती आहेत संदेष्टे व प्रेषित. ते नि:संशय निष्पाप, निरागस असतात आणि ईश्वरनिष्ठांचा समाज सुरक्षित आहे. जर नव्याने त्यांच्याकडून एखादा अपराध घडत असेल तर ते तत्काळ क्षमायाचना करून प्रायश्चित्त करतात, आणि हे पण मार्गदर्शनाच्या लक्षणांपैकी एक लक्षण आहे. याच कारणामुळे करुणा करणारा ('तव्वाब'), पापिविमोचक ('अफ़ुव्व'), क्षमाशील ('ग़फ़ूर') या दैवी गुणांचा उद्भव होतो.

थोडक्यात, समष्टिगत दैवी गुणांचे व्यष्टिगत रूप म्हणजे मानव! पुढे ईश्वरी सत्तेचे त्रिविध पैलू आणि षडवरोह वा षडवतरण हे कोष्टकस्वरूपात आकृतीबद्ध केले आहे (आकृती ७ व ८ पहा).


### (१) अल्लाहच्या सत्तेचे त्रिविध पैलू

"ईश्वर त्रिविध असून तोच अंतिम व सर्वसंपन्न सद्वस्तू आहे. त्याची त्रिविधता ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान या त्रिपुटीने किंवा अस्तित्व, शक्ती, कृती यातून प्रकट होते."- **निकोलस**




**आकृती ७**

**(२) तनज़ुलात-ए-सित्ता [षडवरोह, षडवतरण]**




**आकृती ८**

*** तुलनीय :** भारतीय तत्त्वज्ञानांतर्गत भागवतधर्माच्या सिद्धान्तामध्ये भगवंताचे (परमेश्वराचे) स्वरूप तीन प्रकारांनी प्रतीत होते – (१) स्वयंरूप, (२) तदेकात्मक रूप आणि (३) आवेशरूप. या तिन्हींत स्वयंरूप हे मुख्य होय. सच्चिदानंदविग्रह, सौंदर्यनिकेतन, नयनभिराम असा सगुण परमात्मा भक्ताला स्वयंरूपातच दृष्टीगोचर होतो. तदेकात्मक रूप हे स्वयंरूपाशी एकता दाखवित असले तरी आकृती, चरित्र इत्यादीच्या योगे ते स्वयंरूपाहून भिन्न होते. आवेशरूपात भगवान जिवाच्या ठिकाणी न्यूनाधिक रूपाने आपल्या शक्तीचे आधान करतो. भगवद्प्राप्तीचा एकमेव उपाय म्हणजे भक्ती. भगवंताची कृपा हेच भक्तीचे साधन होय.

**३) तनज़ुलात-ए-सित्ता[३६] (षडवरोह किंवा षडवतरण) चा तक्ता***

| १<br>पहिली<br>श्रेणी | २<br>दुसरी<br>श्रेणी | ३<br>तिसरी<br>श्रेणी | ४<br>चौथी<br>श्रेणी | ५<br>पाचवी<br>श्रेणी | ६<br>सहावी<br>श्रेणी | ७<br>सातवी<br>श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| ज़ात(सत्ता) | पहिली तन्मात्रा | दुसरी तन्मात्रा | तिसरी तन्मात्रा | चौथी तन्मात्रा | पाचवी तन्मात्रा | सहावी तन्मात्रा |
| अहदिय्युत<br>एकत्व | वहदत वा<br>वहदिय्यत एकता | वाहिदिय्यत<br>अनेकता | रूह<br>आत्मा | मिसाल<br>प्रतिरूप,<br>सादृष्य | जिस्म<br>देह | इन्सान<br>मानव |
| बातिन<br>आंतरिक,<br>अंतस्त | हक़ीक़त-ए-मुहम्मदिया<br>मुहम्मदीय वास्तव | अयात-ए-साबिता<br>समग्र समरूपता | - | - | - | - |

१ ते ३ पर्यंत मरातिब इलाहिया = ईश्वरी (दैवी) श्रेणी;
४ ते ६ पर्यंत मरातिब कोनिया = सांसारिक श्रेणी समाष्टिगत श्रेणी
२ ते ६ पर्यंत हज़रत-ए-ख़म्सा = पंचस्तर
२ ते ३ पर्यंत ज़हूर इल्मी = ज्ञानमूलक आविष्करण;
४ ते ७ चाक्षुष (दृष्टिगत) आविष्करण = ज़हूर ऐनी
२ ते ७ पर्यंत तनज़ुलात-ए- सित्ता = षडवरोह किंवा षडवतरण

* उपरोक्त तक्ता डॉ.मीर वलियुद्दीन यांनी मौलाना अश्रफ़ अली थानवी याचे ग्रंथ ''किताबुतकश्फ'' पृ. ३९ वरून उधृत केल्याचे नमूद केले आहे.
तुलनीय - **शैवदर्शना**मध्ये विश्वसर्जनाच्या म्हणजेच पराशक्तीच्या प्रकटनाच्या गूढ व सांप्रदायिक अशा एकून सहा अध्वा (ध्रुवीकरण) सांगितल्या गेल्या आहेत.
त्या सहा अध्वा अर्थात **षडध्वा** अशा आहेत - (१) नाद, (२) बिंदू, (३) कला, (४) वर्ण, (५) भुवन आणि (६) पद

## ११) पवित्र कुराण निर्दिष्ट अल्लाहची नाम-रूपे : स्वरूप[३७]

अरबी भाषेतील 'अल्लाह' हा शब्द वास्तविकपणे 'अलइलाह' असा होता, परंतु ज्या शब्दाचा वापर मोठ्या प्रमाणात होत असेल व ज्याचा उच्चार तोंडातून वरचेवर केला जात असेल तो जास्तीत जास्त सोपा असावा आणि सुलभतेने तोंडातून काढता यावा अशी अरब लोकांच्या भाषिक रसिकतेची वांछना असे. म्हणून आपल्या भाषिक नियमानुसार त्यांनी 'अलइलाह' या शब्दाला **'अल्लाह'** असे रूप दिले. 'अलइलाह' याच्यात 'इलाह' हा मूळ शब्द आहे, व ईश्वर आणि उपास्य असा त्याचा अर्थ होतो. त्यातील 'अल' हे इंग्रजी भाषेतील 'The' प्रमाणे सामान्यनामाला विशेषनाम बनविण्यासाठी उपपद म्हणून आहे.

दिव्य कुरआन अवतरण्यापूर्वी अरब लोकांची 'अल्लाह' विषयीची संकल्पना जवळपास अशी होती – 'अल्लाह' परमोच्च गुणांनी संपन्न असे अस्तित्व आहे. तो इतर सर्वांचे आशास्थान व आश्रयस्थान आहे, प्रिय आणि साध्य म्हणून आहे, गरज भागविणारा, सत्ताधीश आहे, वैभवशाली आहे, पंचज्ञानेंद्रियांच्या आवाक्याबाहेरचा आहे. याच्याव्यतिरिक्त इतर सर्व परमोच्च गुण उदा. सर्जन, पालकत्व आणि स्वामित्व, अन्नदान व शासन इ. देखील त्याच्याच अधिकारात आहेत. अशा गुणांनी संपन्न असल्याकारणाने तो उपास्य आहे. म्हणून त्याच्या कोपाची भीती बाळगली पाहिजे. ईशत्व आणि उपास्यत्वाचे सर्व गुण केवळ अल्लाहसाठीच विशेष आहेत. अरबांची अशीही धारणा होती की, कुणा दुसऱ्या अस्तित्वात, मग ते कितीही महान का असेना, उपास्यत्वाचा एकही गुण मौजूद नाही. त्याच एकमेव अस्तित्वासाठी 'अल्लाह' हा शब्द उच्चारला गेला पाहिजे. इतर कोणतेही अस्तित्व 'अल्लाह' या नावाने पुकारले जाण्याच्या लायकीचे नाही. सृष्टीच्या निर्माणकर्त्याला व पालनकर्त्याला 'अल्लाह' याच नावाने त्यांनी पुकारले. अरबांच्या दृष्टीने परमोच्च सीमेला पोहोचलेल्या गुणांना कुरआनने उणीवपूर्ण ठरवताना त्यांच्यामध्ये नीचताही असल्याचे दाखवून दिले आणि परमोच्च गुणांसंबंधी त्यांची कल्पना कशी चुकीची आणि अपूर्ण आहे, हे दाखवून दिले. यास्तव पवित्र कुराणनिर्दिष्ट अल्लाहचे स्वरूप आणि गुण पुढीलप्रमाणे आहेत –

'अल्लाह'चे अस्तित्व कुरआनने ज्या गुणांनी संपन्न ठरवले आहे त्यांची संख्या मोठी आहे. थोडक्यात असे समजा की कोणताही चांगला गुण असा नाही जो त्याच्यात नसेल. त्यापैकी प्रमुख गुण असे,

१. अल्लाह मोठा कृपाळू आणि दयाळू आहे. (१. फ़ातिहा)
२. तो आणि केवळ तोच नेहमीपासून आहे व सदैव राहील. (२ बक़रा, २८ कसस)
३. तो शरीर बाळगत नाही शारीरिकतेपासून पूर्णपणे तो पवित्र व उच्चतम आहे. (६ अनआम)
४. तो कधी शारीरिक रूपही धारण करीत नाही, कोणत्याही वस्तूत प्रवेशही करीत नाही आणि कोणत्याही वस्तूशी एकरूपही होत नाही. (५ माईदा)
५. प्रत्येक वस्तूचा सर्जनकर्ता आहे व सर्व विद्यमान सृष्टी त्याची निर्मिती आहे. (६ अनआम)
६. तो कुणाचा पिताही नाही व पुत्रही नाही. (११२ इख़्लास)
७. सर्व सृष्टीचे शासनाधिकार प्रत्यक्षपणे त्याच्याच हातात आहे. (३६ यासीन)
८. आकाशापासून ते पृथ्वीपर्यंत विद्यमान सर्व विश्वाची व्यवस्था तोच चालवतो. (४१ सजदा)
९. सर्वांचा अन्नदाता व पालनकर्ता आहे. (३७ साफ़्फ़ात)
१०. जीवन व मृत्यू दोन्हींचा निर्माणकर्ता आहे. (६७ मुल्क)
११. सर्वांसाठी अभय व आश्रयस्थान आहे. (५९ हश्र)
१२. गुप्त व लपलेले गतकालीन व भावी सर्व काही जाणतो. (२ बक़रा, ५९ हश्र)
१३. प्रत्येक गोष्टीला समर्थ आहे. (२ बक़रा)
१४. सर्व काही ऐकतो. (६ अनआम)
१५. सर्वांवर प्रभुत्व राखणारा आहे, कोणी त्याच्या निर्णयाला व हुकूमाला आव्हान देऊ शकत नाही. (५९ हश्र)

१६. बुद्धिमान आहे, त्याचे कोणतेही काम बुद्धिमत्तारहित व हेतूरहित असत नाही. (३४ सबा)

१७. प्रेम व मेहेरबानी त्याचा बाणा आहे. (२ बक़रा) त्याची कृपा व मेहेरबानी कणाकणाला व्याप्त आहे. (७ आअराफ़), न्यायी आहे, लोकांशी न्यायपूर्ण वर्तन करतो (१० यूनुस), कोणावर तिळमात्रही जुलूम करीत नाही. (५० काफ़) त्याचे फ़र्मान व आदेश सर्वचे सर्व न्यायपूर्ण असतात. (६ अनआम)

१८. अवज्ञाकारी व शिरजोरांवर सूड उगविणारा आहे. (३ आइलइम्रान)

१९. क्षमायाचना करणाऱ्यांना माफी देत असतो. (८५ बुरूज) अत्यंत पश्चात्ताप स्वीकारणारा आहे. (१०३ नस्र)

२०. सत्कर्मांची मोठी कदर करणारा आहे. (६४ तग़ाबुन)

२१. त्याचा इरादा पूर्ण झाल्याशिवाय राहात नाही. (२ बक़रा)

२२. बोलणारा आहे आणि संभाषण करतो. (२ बक़रा)

२३. जे इच्छितो ते करतो (३ आलिइम्रान) आणि जे काही इच्छितो तेच केवळ अस्तित्वात येऊ शकते इथपावेतो की त्याच्या मनोरथाविना स्वत: होऊन कोणी काही इच्छाही करू शकत नाही. (७६ दहर)

२४. निस्पृह आहे, प्रत्येक गोष्टीपासून निरपेक्ष आहे, त्याला कोणत्याही गोष्टीची गरज नाही. (३५ फ़ातिर)

२५. स्वयंमेव स्तुत्य आणि सर्वगुणसंपन्न आहे. (११ हूद)

२६. प्रत्येक उणीवेपासून अलिप्त व प्रत्येक परमोच्च गुणाने संपन्न आहे, ईशत्वाच्या वैभवाला साजेशी नसेल अशी कोणतीही गोष्ट त्याच्यात नाही. (५९ हश्र)

२७. तो सर्वंकषपणे अनुपम आहे. त्याला कोणत्याही गोष्टीने उपमाही दिली जाऊ शकत नाही. (४२ शूरा) पृथ्वी व आकाशातील कोणत्याही गोष्टीने त्याचा अनुमान केला जाऊ शकत नाही. (३० रूम)

२८. उपास्य केवळ तोच आहे. (२ बक़रा) संपूर्ण सृष्टीत केवळ त्याच्याच अंमल आहे. (४५ ज़ासिया) व त्याच्याशिवाय कोणीच नाही ज्यात या ईशत्वाचा व महानतेचा अंशमात्रही आढळावा. सर्वचे सर्व पूर्णपणे विवश व आज्ञांकित आहेत व त्याचेच दास आहेत. (३० रूम) शिवाय असेही नाही की तो आपल्या या दासांपैकी व गुलामांपैकी कुणाला जवळिकीचा बहुमान देऊन आपल्या शासनात सहभागी करीत असेल. (१८ कहफ़)

अल्लाहचे अस्तित्व आणि त्याच्या गुणवैशिष्ट्यांसंबंधी वरील स्पष्टीकरणानंतर या प्रश्नासंबंधी आणखीन काही गोष्टी आहेत, त्या माहीत असणे आवश्यक आहे.

१) पहिली गोष्ट अशी की जेथपावेतो 'अल्लाह'च्या अस्तित्वाचा संबंध आहे, त्याच्या वास्तवतेचा ठाव घेणे मानवी विचारशक्तीला शक्य नाही. म्हणून अल्लाहला केवळ त्याच्या गुणांद्वारेच ओळखले जाऊ शकते. ज्यांच्या तेजोवलयांनी हे संपूर्ण सृष्टीजीवन भारले आहे. या ठिकाणी जे काही आहे ते सर्व त्याच्याच कोणत्या ना कोणत्या गुणाचेच प्रदर्शन आहे. याच कारणाने प्रेषित मुहम्मद यांनी आदेश दिला आहे, ''अल्लाहच्या निर्मितीवर विचार व चिंतन करीत रहा, परंतु खुद्द त्याच्या अस्तित्वासंबंधी तसे प्रयत्न करू नका.''

ईश्वरी अस्तित्वाचे वास्तव मानवी दृष्टी व विचारशक्ती या पलीकडील आहे, हे एक उघड सत्य आहे. निर्मितीपैकी अगदी सामान्यातील सामान्य गोष्टीची स्थिती अशी आहे की मानवी ज्ञान तिच्या गुणापर्यंतच

पोहचून थांबते, त्याच्या अस्तित्वाची काय हकीकत आहे ही गोष्ट बव्हंशी एक रहस्यच राहते. मग त्या अस्तित्वाचा ठाव घेणे आमच्यासाठी कसे शक्य आहे, जे इतर सर्व निर्मितीपासून मूलतःच वेगळे आहे, जे सर्वंकषपणे अनुपम आहे, ज्याला इतर कोणत्याही वस्तूशी कसलीही सादृश्यता नाही, जो निर्माता आहे व त्याच्या व्यतिरिक्त इतर प्रत्येक निर्मिती आहे. जे अस्तित्व स्वयंभू आहे, तर इतर प्रत्येक वस्तू ऱ्हास पावणारी आहे, नश्वर आहे. ज्याचा प्रत्येक गुण परमोच्च बिंदूला पोहचलेला आणि अनादी व अनश्वर आहे, जेव्हा की या चिंतनाच्या कक्षेत जर कोणती गोष्ट येऊ शकते तर तरी सर्वोच्च अल्लाहच्या केवळ गुणांचे ज्ञान होय. त्याच्या अस्तित्वाच्या वास्तवतेचा ठाव घेणे बौद्धिकदृष्टीने केवळ अशक्य गोष्ट आहे.

२) दुसरी गोष्ट अशी की परमोच्च गुणांची ही मोठी संख्या अस्तित्वाची अनेकता दर्शवणारी आहे असे कदापि नाही. किंबहुना हे गुण व या शक्ती सर्वच्या सर्व त्याच एका अस्तित्वात, 'अल्लाह'त केंद्रित आहेत. म्हणून पवित्र कुराणने हे उघड सत्य मध्यान्हीच्या सूर्यासमान स्पष्ट केले आहे, ''हवे तर तुम्ही 'अल्लाह' म्हणून पुकारा, हवे तर 'रहमान' (मेहेरबान) म्हणून. जे कोणते चांगले नाव तुम्ही घ्याल तर (त्याच्याने अभिप्रेत अल्लाहचे अस्तित्वच असेल) कारण सर्व चांगली नावे त्याच्यासाठीच आहेत.'' (१७ बनी इस्राईल)

म्हणजे तुम्ही ईशत्वाचा जो गुण व ज्या शक्तीला दृष्टीसमोर ठेवून ईश अस्तित्वाचे ध्यान कराल, त्याच्याने अभिप्रेत नेहमी तेच एक अस्तित्व असेल ज्याचे नाव 'अल्लाह' आहे.

या जगात परस्परविरुद्ध प्रकारच्या घटना व प्रसंग घडत असतात. येथे आरोग्य व जीवनही आहे व आजार आणि मृत्यूही आहे, येथे अभय व शांतीही आहे आणि गोंधळ व उपद्रव देखील. परंतु याचा असा अर्थ खचितच नाही की या विभिन्न व परस्परविरुद्ध घटनांची उगमस्थानेही वेगवेगळी आहेत. परंतु याउलट वस्तुस्थिती अशी आहे की या सर्व घटना व प्रसंगांचे उगमस्थान केवळ एकमेव 'अल्लाह' आहे. येथे जे काही घडत असते त्याच्याच (ईश्वराच्याच) आज्ञेने घडत असते. त्या सर्व शक्ती व ज्यांचे प्रकटन या घटना आहेत, त्या सर्व त्याच एका अस्तित्वाचे विविध गुण आहेत व सर्वच्या सर्व त्याच्यातच केंद्रित आहेत. कोणतीही शक्ती स्वतःचे वेगळे व स्वतंत्र अस्तित्व बाळगत नाही व कोणताही गुण असा नाही ज्याचा स्वामी इतर अन्य अस्तित्व असेल.

३) तिसरी गोष्ट अशी की हे गुण, ज्यांनी सर्वोच्च अल्लाहचे अस्तित्व संपन्न आहे, सर्वच्या सर्व सौंदर्याचे व उत्तमतेचे गुण आहेत. सर्व तऱ्हेचे दोष व सर्व उणीवांपासून ते पूर्णपणे मुक्त आहेत. त्यापैकी एकालादेखील वाईटपणाचे गुण म्हटले जाऊ शकत नाही. या संदर्भात पवित्र कुराणामध्ये निवेदन आहे - ''तो अल्लाह असा आहे ज्याच्याखेरीज कोणीही उपास्य नाही, (सकल जगांचा) सम्राट आहे व सर्व दोष व उणीवांपासून उच्च आणि पवित्र आहे, (प्रत्येक दोषापासून) अलिप्त आहे.'' (५९ हश्र) तसेच ही गोष्ट स्पष्ट सांगितली आहे, ''त्याच्यासाठीच आहेत सर्व उत्तम गुण.'' (१७ बनी इस्राईल)

जगात सातत्याने अप्रिय घटना आणि कटू प्रसंग घडत असतात. हे प्रसंग केवळ तात्कालिक परिणाम आणि अगदी मर्यादित अर्थाने अप्रिय असतात. अंतिम आणि वास्तविक परिणाम तसेच व्यापक हेतूंच्या दृष्टीने व विस्तृत अर्थाने अप्रिय खचितच नसतात. अगदी त्याच्याप्रमाणे ज्याप्रमाणे रुग्णावर डॉक्टरकडून शस्त्रक्रिया होणे किंवा त्याच्या तोंडात कडू औषध टाकणे, उद्यानातील झुडूपाची माळ्याकरवी छाटणी होणे, खुनी आणि द्रोहींना न्यायालयाकरवी फाशी दिली जाणे, अशा सर्व गोष्टी बाह्यतः अप्रिय असताना देखील वास्तविक अप्रिय

कदापि असत नाहीत. अशा प्रकारच्या घटनांच्या बाह्य स्तरावर जो बिघाड दिसतो प्रत्यक्षात महानतम असा सुधार त्यात गर्भित असतो. वरवर दिसणारा बिघाड अधिक महत्त्वपूर्ण रचनेची नांदी असते. म्हणून सर्वोच्च अल्लाहचा तो गुणदेखील जो अप्रिय घटनेला कारणीभूत असतो, अपरिहार्यपणे सौंदर्य आणि उत्तमतेचाच गुण असतो.

४) चौथी गोष्ट अशी की या विविध गुणांच्या कृती व प्रभावात पूर्णपणे अनुकूलता आहे. यापैकी कोणताही गुण अशाप्रकारे कार्य करीत नाही की त्याचा परिणाम म्हणून एखाद्या दुसऱ्या गुणाच्या निकडी नाकारल्या जाव्यात. या उलट प्रत्येक गुणाच्या स्वतःच्या कार्यमर्यादा आहेत, त्या एका ठराविक सीमेपर्यंत, अर्थात समतोल सीमेपर्यंत पोहचतात, आणि आधिक्य व अतिरेकाची लक्षणे दिसताक्षणीच, आपली पुढील वाटचाल थांबवतात. उदा. अल्लाहचा 'कृपा' हा एक गुण आहे परंतु त्याचे परम कृपाळू व दयाळू असण्याचा अर्थ, सदाचारी व दुराचारी सर्वच त्याच्या क्षमेने उपकृत होतील व त्याची अवज्ञा करणाऱ्यांना देखील तो शिक्षा करणार नाही, असा मुळीच नाही. कारण त्यामुळे तो न्यायी, बुद्धिमान आणि गुणग्राहक काहीच म्हटला जाणार नाही. त्याचप्रमाणे 'स्वेच्छाधिपती' असणे असाही त्याचा एक गुण आहे, म्हणजे असे की, तो जे इच्छितो ते करतो व जे इच्छितो केवळ तेच घडते. परंतु याचा असा अर्थ खचितच नाही की मनुष्याचा स्वतःचा इरादा (संकल्प) व त्याचे कृत्य काहीच नाही, अल्लाहच ज्याला इच्छितो व जेव्हा इच्छितो, कसलेही कारण व कोणत्याही पात्रतेविना सरळमार्गी व पुण्यशील बनवतो आणि ज्याला इच्छितो त्याला पथभ्रष्टता आणि दुराचाराच्या खाईत लोटून देतो, तसेच हवे त्याला तो क्षमा करील व हवे त्याला नरकात ढकलून देईल, याकडे लक्ष न देता की कोणाचे कर्म जगात कसे राहिले आहेत, कारण अशा स्थितीत तर त्याचे बुद्धिमान, न्यायी व सत्य जाणणारा असण्याला काही अर्थच उरत नाही. म्हणून हीच वस्तुस्थिती होती जी ध्यानात बसविण्यासाठी पवित्र कुराणने, ''अल्लाह ज्यावर इच्छितो कृपादृष्टी करतो,'' असे फर्माविल्यानंतर आणि ''अल्लाह सर्व काही जाणणारा व बुद्धिमान आहे,'' असे प्रतिपादन करणे जरूरीचे मानले. म्हणजे एखाद्या वेळेस असा समज होऊ नये की अल्लाहची इच्छा डोळे बंद करून निर्णय घेत असते. नव्हे, असे मुळीच नाही. तो जो काही निर्णय घेत असतो तो पूर्णपणे ज्ञान व माहितीच्या आधारे व सत्य आणि न्यायाला धरूनच घेत असतो. बुद्धिमत्ता आणि शहाणपणाची कोणतीही निकड विसरली जात नाही.

अल्लाहचे कुराणोक्त स्वरूप ढोबळ मानाने असे निर्दिष्ट करता येऊ शकते -''तोच एकमेव परमेश्वर आहे, परमदयाळू व परमकृपाळू'' २:१६३, ''अल्लाह चिरंतन जीवी, सृष्टीव्यवस्थेला सांभाळणारा, तोच एकमेव ईश्वर आहे.'' ३:२६-२७ ''एकमेव ईश्वर व उपास्य तोच आहे, सत्यवचनी आहे.'' ४:८७, ''सर्वसत्ताधीश तोच आहे.'' २३:९६, ''स्तुती सर्वथैव त्याच्यासाठीच आहे, शासनही त्याचेच आहे.'' २८:७०, ''त्याच्या अस्तित्वाखेरीज प्रत्येक वस्तू नश्वर आहे. (तो अनश्वर आहे.) सत्ताधिकार त्याच्याच आहे.'' २८:८८ ''प्रत्येक गुप्त आणि प्रकट गोष्ट जाणणारा तोच आहे.'' ३२:६-७, ''तो पवित्र आहे. त्याच्या हातात प्रत्येक वस्तूचे पूर्ण आधिपत्य आहे.'' ३६:८३, ''अल्लाहच तुमचा पालनकर्ता आहे. बादशाही त्याचीच आहे.'' ३९:६, ''तो मोठा क्षमाशील आणि भयंकर यातनादायक शिक्षा देणाराही आहे.'' ४१:४२, ''तो सर्वसाक्षी आहे, प्रत्येक वस्तूला वेढून आहे.'' ४१:५३-५४, ''तोच वाली व त्राता आहे, तोच मृतांना जिवंत करतो.'' ४२:९,

''त्याच्या सदृश कोणतीही वस्तू नाही.'' ४२:११, ''तोच आकाशांचा व पृथ्वीचा पालनकर्ता आहे.'' ४४:६, ''तोच सर्व विश्वाचा पालनकर्ता आहे.'' ४५:३७, ''तोच ईश्वर आहे, अदृश्य आणि दृश्य सर्व गोष्टींचे ज्ञान असणारा तोच आहे. कृपावंत व दयावान आहे, तोच पवित्र व सर्वस्वी शांती, अभयदान देणारा, आपली आज्ञा बळाने लागू करणाराही तोच आहे.'' ५९:२२-२४, ''तो अत्यंत पवित्र, जबरदस्त व बुद्धिमान आहे.'' ६२:१, ''साम्राज्य त्याचेच आहे. प्रत्येक वस्तूला तोच समर्थ आहे.'' ६४:१, ''त्यानेच निर्माण केले, प्रमाणबद्धता प्रस्थापित केली, भाग्य बनवले व मार्ग दाखवला आहे.'' ८७:१-५, ''तोच सर्वात मोठा शासक आहे.'' ९५:८, ''तो निरपेक्ष आहे.'' ११२:२

### १२) पवित्र कुराण निर्दिष्ट अल्लाहची कार्य-प्रणाली

अल्लाहचे अस्तित्व आणि स्वरूप सविस्तर जाणून घेतल्यानंतर आपल्यासमोर असा प्रश्न उपस्थित होतो की तो जगरहाटी कशा प्रकारे चालवतो? त्याची कर्तृत्वकर्मे कार्ये कशी घडवून आणतात? याचे साधे व सरळ उत्तर आहे की अल्लाह हा सर्वांचा अंतर्यामी आहे. तो अंतर्यामी हा कृतींचा प्रेरक आहे. तसेच त्याच्या अनुमतीशिवाय जीव कार्य करू शकत नाही, परंतु कार्याच्या मुळाशी ऐच्छिक प्रयत्न असल्याने विधिनिषेध निरर्थक होऊ शकत नाहीत. ईश्वराच्या उपासनेने सुख-दुःखांचा निरास होतो. परिणामी स्वकारणसरूपता मुक्ती मिळते. परब्रह्माची अल्लाहची नित्य उपासना करण्याचा अधिकार प्राप्त होतो व ज्ञानानंद पूर्ण होते. प्रपत्तीत ईश्वर आपले रक्षण करील असा महाविश्वास असतो. ईश्वराची कृपा किंवा अनुग्रह यांना याच संदर्भात महत्त्व आहे. ब्रह्मज्ञान हे सद्गुरूस शरण जाऊन मिळवावे लागते व ईशप्रसादाने मोक्ष मिळवावा लागतो. ज्ञानाला उपासनेचे साहाय्य लागते, कारण उपासनेव्यतिरिक्त ज्ञानाला अखंड स्थैर्य येणार नाही. ज्ञान हा जीवाचा गुण आहे. ज्ञाता परमेश्वर हा चैतन्यात्मक, सद्रूप, स्वयंभू, स्वतःप्रमाण, स्वयंप्रकाश व सर्वप्रकाशक आहे. परब्रह्म अर्थात अल्लाह अद्वितीय आहे. तो ज्ञानी असून अनंतकल्याण गुण समुच्चयाचे निवासस्थान आहे. तो 'हेयगुणांनी रहित' असा निर्गुण ब्रह्म आहे. तो भक्तिप्रिय असून, भक्तांचा परमपुरुषार्थ साध्य करणारा दयाघन आहे. जीव हा उपासक व ब्रह्म (अल्लाह) उपास्य हा संबंध नित्याचा आहे. पवित्र कुराण अभेद, अद्वैत सांगत नाही. परमेश्वर नियामक आणि जीव नियाम्य असाच उल्लेख सर्वत्र आहे. अल्लाहची कार्यप्रणाली समजण्यासाठी एवढी तात्त्विक वा दार्शनिक पूर्वपीठिका पुरेशी आहे.


पवित्र कुराणोक्त दैवी आदेशांचे निरीक्षण केल्यास असे आढळून येते की अल्लाह हा मनुष्याशी थेट संवाद साधत नाही. तो त्याच्याशी प्रत्यक्ष बोलत नाही, पण फक्त प्रकटीकरणद्वारे (प्रज्ञानाद्वारे वा अंतःप्रेरणेद्वारे) किंवा पडद्यामागून अदृश्यपणे किंवा स्वर्गदूत पाठवून आपले आदेश पोहोचवतो. (४२:५१) ही एक प्रकारची त्रिविध साक्षात्कार प्रणालीच आहे.

प्रकटीकरण म्हणजे काय? एखाद्या गोष्टीविषयी चिंतन करणाऱ्या मनुष्याच्या मनात एखादी कल्पना येणे म्हणजे प्रकटीकरण नव्हे. तर मग प्रकटीकरण म्हणजे पवित्र व शक्तिमान ईश्वराने त्याच्या निवडक भक्तांशी किंवा त्याने ज्यांची त्याचे निवडक सेवक म्हणून निवड करायचे ठरवले आहे त्यांच्याशी होणारे जिवंत व समर्थ संभाषण होय. जेव्हा हे संभाषण किंवा संवाद पुरेशा व समाधानकारक रीतीने सुरू होतो आणि काही अपूर्ण व

निरर्थक शब्दांनी त्याची रचना झालेली नसते व तो आनंद, ज्ञान व उच्च प्रतीच्या गोष्टींनी भरलेला असतो तेव्हाच त्यास निश्चितपणे ईश्वरी वाणी असे म्हटले जाते आणि या ईश्वरी वाणीनेच तो आपल्या भक्तास आनंद व सुख देत असतो व स्वत: त्याच्याकडे प्रकट होत असतो.

अल्लाहची पवित्र कुराणप्रणीत कार्य-प्रणालीची रूप-रेषा पुढील प्रमाणे आकृतीबद्ध करता येऊ शकेल.ह्व

**अल्लाहची कार्यप्रणाली : प्रकार**




**आकृती ९**

सदरहू आकृतीचे विवेचन पुढे दिले आहे -

**१) साक्षात्कार : प्रेषितांसाठी**

**१) मूसांचा साक्षात्कार - प्रभू बोलला, परोक्षसंभाषण :** ''आणि जेव्हा मूसा (सिनाई पर्वतावर) आपल्या निर्धारित केलेल्या वेळी पोहोचला, आणि त्याच्या विधात्याने त्याच्याशी संभाषण केले, तेव्हा तो म्हणाला, ''माझ्या प्रभो! तू मला स्वत:चे दर्शन घडव, म्हणजे मी तुला (डोळे भरून) पाहीन.'' त्यावर (अल्लाह) म्हणाला, 'तू मला कदापि पाहू शकणार नाहीस, पण तू त्या पर्वताकडे पाहा, तो जर आपल्या

ठिकाणी स्थिर राहिला तरच, तू मला पाहू शकशील.' मग त्याच्या प्रभूने आपले तेज त्या पर्वतावर प्रकटवले, तोच तत्काल त्या पर्वताचे तुकडे-तुकडे होऊन धुळीत रूपांतरित झाले. आणि (ते पाहून) मूसा बेशुद्ध होऊन खाली पडला. आणि जेव्हा तो शुद्धीवर आला तेव्हा म्हणाला, 'असीम आहे तुझा महिमा, मी तुझ्याकडे क्षमायाचना करतो आणि मी तुझा सर्व-प्रथम श्रद्धावंत आहे. (त्यावर अल्लाहने) म्हटले, हे मूसा, माझा संदेश आणि माझे संभाषण यामुळे मी तुला सर्व लोकांमध्ये श्रेष्ठत्व प्रदान केले आहे. तर, मी तुला जे दिले आहे, ते दृढतापूर्वक पकडून ठेव आणि मजविषयी कृतज्ञ रहा आणि आम्ही त्याच्यासाठी लेखशिलांवर प्रत्येक गोष्टीचे स्पष्टीकरण व सर्व प्रकारचे उपदेश (सर्व प्रकारचे कायदे) लिहून दिले, (आणि आम्ही म्हणालो, 'तर तू (आपल्या) पूर्ण शक्तीनिशी त्यांना दृढतापूर्वक पकडून ठेव आणि त्यातील उत्कृष्ट (आज्ञा) तीव्रतेने पाळावयाला तुझ्या समाजाला सांग. लवकरच मी तुला दुराचारी लोकांचे ठिकाण दाखवणार आहे.'' ७:१४३-४५

**२) मूसांचा साक्षात्कार : अग्नीज्योति-दर्शन –** ''आणि पैगंबर मूसाची गोष्ट तुमच्यापर्यंत पोचली आहे का? (एका प्रवासादरम्यान) जेव्हा आग त्याच्या दृष्टीस पडली, तेव्हा त्याने आपल्या कुटुंबीयांना म्हटले, तुम्ही इथे थांबा, मला एक आग दिसली आहे, कदाचित मी तुमच्यासाठी तिथून काही विस्तव घेऊन येईन किंवा त्या आगीच्या ठिकाणी मला काही मार्गदर्शन मिळू शकेल.' जेव्हा त्या (आगीच्या) जवळ पोहोचला, तेव्हा एक आवाज ऐकू आला, 'हे मूसा! मीच आहे तुझा विधाता! आपली पादत्राणे पायातून काढून टाक, कारण तू 'तुवा'च्या पवित्र खोऱ्यात (उभा) आहेस. मी तुला (माझा संदेशवाहक म्हणून) निवडले आहे, तर जे काही प्रज्ञान तुला दिले जात आहे, ते ऐक. नि:संशय, मी, मीच अल्लाह आहे, माझ्याशिवाय दुसरा कोणीच ईश्वर नाही. म्हणून माझीच उपासना (भक्ती) कर आणि माझे तुला स्मरण रहावे, यासाठी नित्य प्रार्थना करीत अस. (नमाज पढत जा.)'' २०:९-१४

**३) मुहम्मदांचा साक्षात्कार – प्रज्ञान वा अंत:प्रेरणा :** ''कुणा माणसाचा अधिकार नाही, की अल्लाह त्याच्याशी (साक्षात्) बोलेल. (तो बोलतो) प्रज्ञानाच्या वा अंत:प्रेरणेच्याद्वारे, किंवा पडद्याआडून किंवा कुणी स्वर्गदूत पाठवून, की ज्याने ईश्वराच्या आज्ञेने, ईश्वरेच्छेनुसार (त्याचा संदेश) पोचवावा. खरोखर तो सर्वोच्च आहे, सर्वविद् आहे. आणि या प्रकारे, आम्ही आमचा चिदंश-प्रज्ञान-अंत:प्रेरणा आमच्या आज्ञेने तुझ्यात संचरवला. तुला हे कळत नव्हते, की ग्रंथ काय आहे, आणि ईश्वर, श्रद्धा काय आहे. परंतु आम्ही असा प्रकाश केला, की जो आमच्या दासांपैकी, ज्यांना आम्ही इच्छितो त्यांना मार्ग दाखवतो आणि नि:संशय तू लोकांना सरळ मार्ग दाखवीत आहेस. त्या ईश्वराचा मार्ग, ज्याच्यासाठी आकाश पृथ्वी आणि त्यांतील सर्व आहे. लक्षात ठेव, सर्व कर्मे ईश्वराकडेच पोचतात.'' ४२ : ५१ – ५३

उपरोक्त श्लोकांमध्ये त्रिविध साक्षात्कार दिसून येतो. (१) प्रज्ञान वा अंत:प्रेरणा, (२) पडद्याआडून अदृश्य स्वरूपात आणि (३) स्वर्गदूताकरवी संदेश स्वरूपात.

**४) मुहम्मदांचा साक्षात्कार – दिव्य प्रवास व दिव्यारोहण :** ''(सूर्याच्या तेजात आपले तेज मिळविण्यासाठी) मावळणाऱ्या ताऱ्यांची शपथ. तुमचा हा साथी भटकलेला नाही, मार्ग सोडून चाललेला नाही. आणि तो आपल्या मनोवांछेने काही बोलत नाही. हे तर केवळ प्रज्ञान वा अंत:प्रेरणा आहे, जे (त्याला)

जाणवले जात आहे. अत्यंत बलवंताने त्याला ते शिकवले आहे. तो शक्तिमंत तेव्हा संपूर्ण प्रकट झाला. तो सर्वोच्च क्षितिजावर होता. मग तो जवळ आला. मग उतरला. मग दोन धनुष्यांइतके अंतर राहिले, अथवा त्याहूनही जवळ. त्यावेळी आम्ही आमच्या दासाकडे प्रज्ञान (अंत:प्रेरणा) पोहोचवले, ते (आम्ही) पोहचवले. जे पाहिले (ते पाहण्यात) हृदयाने काही लबाडी केली नाही. आता तुम्ही, त्याने जे पाहिले त्याबाबत त्याच्याशी भांडता काय? आणि त्याने त्याला आणखीही एक वेळ उतरताना पाहिले आहे. अंतिम सीमेवरील बदरीवृक्षासमीप – त्याच्या निकट ते विश्राम स्थान, स्वर्ग आहे – ज्यावेळी तो बदरीवृक्ष, वलयांकित होता, (आणि वलयांकितच होता,) त्यावेळी दृष्टी ढळली नाही आणि चळली नाही. खरोखर त्याने आपल्या प्रभूच्या (सामर्थ्याचे) महान संकेत पाहिले!'' ५३:१–१८

''पवित्र आहे तो जो आपला सेवक ('मुहम्मद') यास रातोरात पवित्र मशिदी (काबा मशिदी)पासून त्या लांबच्या पल्ल्याच्या मशीदी (म्हणजे यरूशलेम)पावेतो घेऊन गेला, की जिच्या सभोवतालच्या (प्रदेशास) आम्ही (प्रत्येक ऐहिक व पारमार्थिक प्रसादाने) आशिर्वादित केले आहे. (आणि ह्या नेण्याचा उद्देश हा होता) की आम्ही त्याला आपले (परम सामर्थ्याचे) अनेक चमत्कार निरीक्षण करवावेत (व त्याला कित्येक गुप्त भेद माहीत व्हावेत, नाहीतर, मुळात) ऐकता व पाहता (म्हणजे अदृष्टज्ञानी) तोच परमेश्वर होय.'' १७:१

हा दिव्य प्रवास म्हणजे सर्वोच्च अल्लाहच्या असामान्य अशा सामर्थ्याने साकार झालेली ही एखादी अत्यंत महान अशी असामान्य घटना होती. ती केवळ एक आध्यात्मिक अनुभूती नव्हती तर सर्वोच्च अल्लाहने अंतिम प्रेषित मुहम्मद यांना घडवलेला एक देही प्रवास आणि साक्षात निरीक्षण होते. मुहम्मद पैगंबरसाहेब यांचे सदरहू दिव्यारोहण हे सशरीर, सदेह होते. पुढे त्यांना परमेश्वराचे साक्षात दर्शन होऊन मानवी उद्धाराच्या नव्या नव्या गोष्टी प्रकट झाल्या; तर पैगंबर साहेबांस दिव्यारोहण झाले हे निश्चित. आणि त्याचा अंतिम हेतू हा होता की पैगंबरांस अदृष्टाचे काही ज्ञान व्हावे, यद्यपि एके जागी म्हटले आहे की, ''तो (परमेश्वर) आपले अदृष्ट कोणालाही प्रगट करीत नाही, पण पैगंबरांपैकी ज्याच्यावर त्याची मर्जी होईल त्यालाच मात्र (प्रगट करतो).'' तथापि काही झाले तरी त्यांचे हे ज्ञान मर्यादित होय, मुळात अदृष्टाचा खरा ज्ञाता परमेश्वरच होय. त्याचे ज्ञान पूर्ण व अमर्याद होय.

साक्षात्कार घडवणे हे सर्वस्वी परमेश्वराच्या इच्छेवर अवलंबून असते. याबाबतीत त्याच्या लाडक्या भक्ताने मुळीच अपेक्षा ठेऊ नये. आग्रह तर मुळीच करू नये. अधीरता बाळगू नये. म्हणून तर परमेश्वराचे प्रेषित मुहम्मद यांना साक्षात्कारासाठी घाई नकोचा उपदेश दिला. तो उपदेश असा आहे – ''परमात्मा परमोच्चपदी विराजमान आहे. खरा राजराजेश्वर आहे. आणि तू कुराणाच्या साक्षात्काराची तोवर घाई करू नकोस, जोवर ते प्रज्ञान, ती अंत:प्रेरणा तुझ्याकडे पूर्णरूपात पोचत नाही. आणि म्हण – माझ्या प्रभो, माझे ज्ञान वाढव.'' २०:११४

## २) आदेशपरोक्ष रीत – प्रेषितेतरांसाठी

**१) संबोधन पद्धती :** ''श्रद्धावंतांनो! अल्लाहची जाण बाळगून (जीवन व्यतीत करा)'' ५९:१८, ''हे श्रद्धावंत लोक हो! अनेकेश्वरवादी लोक निश्चितच गलिच्छ आहेत.'' ९:२८, ''हे श्रद्धावंत लोकहो! मादक द्रव्ये, जुगार, वेदी (मूर्ती) आणि शकुन ही केवळ सैतानाची किळसवाणी कामे आहेत, म्हणून या प्रत्येक

(गोष्टी)पासून दूर रहा, म्हणजे तुमचा उत्कर्ष होईल.'' ५:९०, ''हे अपराधी लोकांनो! आज तुम्ही (सदाचारी लोकांपासून कायम) वेगळे व्हा!'' ३६:५९, ''ऐका हो! जे काही आकाशात आणि जमिनीत आहे ते सर्व अल्लाहचेच आहे. ऐका! अल्लाहचेच वचन निःसंशय सत्य आहे.'' १०:५५

**२) आव्हानात्मक प्रश्नपद्धती :** ''सांगा, आम्ही (आमच्या जीवनाला) अल्लाहच्या रंगात रंगवून घेतले, आणि अल्लाहच्या रंगापेक्षा श्रेष्ठ रंग कोणता असणार? तर तुम्ही आपल्या पालनकर्त्याच्या कोणकोणत्या कृपाप्रसादांना नाकारणार?'' ५५:६०-६१, ''तुम्ही जे पेरता त्यावर कधी तुम्ही चिंतन केले आहेत का? त्यास तुम्ही उगवता की, आम्ही उगवणारे आहोत?'' ५६: ६३-६४, ''(लोकांनो!) तुम्ही जे पाणी पीत असता, त्याबद्दल तुम्ही कधी चिंतन केले आहे का?'' ५६:६८, ''पण नाही! त्याच्यासाठी तर नरकाची धगधगती आग तयार असेल.'' ७०:१५ ''ती अटळरीत्या घडणारी घटका. काय आहे ती अटळ घटका? ती अटळ घटका काय आहे, हे तुम्हाला कशामुळे ज्ञात होईल?'' ६९:१-३ ''श्रद्धाहीन लोकांचे स्थान नरकातच नाही काय?'' ३९:३२

**३) आज्ञा-निषेधाज्ञा पद्धती :** ''निःसंशय, तुमचा विधाता अल्लाहच आहे. म्हणून त्याची उपासना करा.'' १०:३, ''अतिशय लीनतेने आणि गुप्तपणे तुमच्या विधात्याची आळवणी करा.'' ७:५५, ''होय, तुम्ही केवळ अल्लाहची उपासना करा, आणि कृतज्ञ दासांपैकी बना.'' ३९:६६, ''स्वतःवर चादर पांघरून असलेल्या (हे पैगंबरा) रात्रीच्या समयी (नमाजामध्ये अल्लाहसमोर) उभे राहा.'' ७३:१-२, ''म्हण, माझा प्रभू सत्याचा आविष्कार करीत आहे आणि तो अव्यक्त वस्तूंचा ज्ञाता आहे.'' ३४:४८, ''सावधान, सर्व बाबी अल्लाहकडेच रूजू होतात.'' ४२:५३, ''सावध राहा, अत्याचारी लोक कायमचे प्रकोपात राहतील.'' ४२:४५, ''तुम्ही सत्कृत्यांसाठी एकमेकात चढाओढ करा.'' ५:५१, ''नित्य प्रार्थना करा (नमाज पढा) आणि दान (ज़कात) द्या आणि (नमाजमध्ये) नमन करा. नमन करणाऱ्यांसोबत.'' २:४३, ''जाणूनबुजून सत्य व असत्याची भेसळ करू नका आणि सत्य लपवू नका.'' २:४२, ''तुम्ही सर्वप्रथम सत्य नाकारणारे बनू नका आणि माझेच भय बाळगा (माझी जाण ठेवा).'' २:४१, ''सत्कर्मात आणि धर्मनिष्ठेत सहकार्य करा आणि पापकर्मात व दुष्टपणात सहकार्य देऊ नका.'' ५:२, ''निःसंशय, सैतान तुमचा केवळ शत्रू (आणि शत्रूच) आहे. तर तुम्हीही त्याला केवळ शत्रूच समजा.'' ३५:६, ''तू (ईश्वरोपासनेसाठी) कष्ट घे, आणि आपल्या विधात्याकडे एकाग्रचित्त होऊन वळ.'' ९४:७-८, ''क्षमाशीलतेची (कास) धर आणि सत्कृत्यांची आज्ञा दे.'' ७:१९९, ''परस्पर व्यवहारात औदार्याचा विसर पडू देऊ नका.'' २:२३७

**४) शपथ-शाप पद्धती :** ''लेखणीची शपथ, आणि ते जे काही (लेखणीने) लिहितात (त्याची शपथ) ६८:१, ''कदापि नाही! मी सूर्योदयाच्या व सूर्यास्ताच्या सर्व स्थानांचा मालक असलेल्या (अल्लाहची) शपथ घेऊन सांगतो.'' ७०:४०, ''नाही, त्या चंद्राची शपथ! आणि रात्रीची जेव्हा ती सरते.'' ७४:३२-३३ ''त्या वाऱ्यांची शपथ जे एकामागून एक पाठवले जातात.'' ७७:१, ''त्यांची (शपथ) ज्या वेगाने तरंगत दूरवर जात असतात.'' ७९:३, ''(नक्षत्रांचे) मनोरे असलेल्या (त्या) आकाशाची शपथ'' ८५:१ ''शपथ (त्या) उषःकालाची,'' ८९:१, ''सूर्याची व त्याच्या तेजाची शपथ'' ९१:१, ''चढत्या दिवसाच्या प्रकाशाची (शपथ)'' ९४:१, ''अंजीर व जैतूनची शपथ, सिनिन पर्वताची (शपथ) आणि शांती (असलेल्या) या नगराची

(शपथ)'' ९५:१-३, ''त्याचा नाश होवो! त्याने कशी कटकारस्थाने रचली! पुन्हा त्याच्या सर्वनाश होवो! त्याने कशा अटकळी बांधल्या!'' ७४:१९-२०, ''विनाश होवो (त्या) खोटे बोलणारांचा!''-५१:१०

**५) निवेदन पद्धती :** ''नि:संशय, अल्लाह हा मानवजातीसाठी कृपेचे (भांडार) आहे. तरीही अनेक लोक कृतज्ञता व्यक्त करीत नाहीत.'' ४०:६५, ''तोच सर्वांवर आपल्या कृपेचे छत्र पसरवतो.'' ४२:२८, ''श्रद्धा बाळगणारे, सत्याचा उपदेश करणारे, सत्कर्मे करणारे, स्थिरचित्त राहणारे हे सर्व फायद्यात असतात.'' १०३:३, ''जे काही आकाशात व पृथ्वीमध्ये आहे ते सर्व अल्लाहने तुमच्या सेवेत कार्यरत केलेले आहे.'' ३१:२०, ''नरकाने (आधीच) श्रद्धाहीनांना घेरण्यास सुरुवात केलेली आहे.'' २९:५४, ''त्यास आपल्या सेवकांमध्ये कृतघ्नतेची भावना मुळीच आवडत नाही.'' ३९:७, ''त्या लोकांचा खेद वाटतो ज्यांची अंत:करणे अल्लाहच्या नामस्मरणाच्या बाबतीत कठोर झालेली आहेत. ते उघड उघड वाट चुकलेले (लोक) आहेत.'' - ३९:२२, ''अल्लाह विद्रोही आणि दुराचारी लोकांना कदापी सन्मार्ग दाखवीत नसतो.'' ६१:५-७, ''प्रत्येक माणूस आपल्या केलेल्या कर्मांत बांधलेला आहे.'' ५२:२१, ''आम्ही प्रत्येक मनुष्याचे प्रारब्ध त्याच्या गळ्यात बांधून टाकले आहे.'' १७:१३, अल्लाह प्रत्येक गोष्टीचा निर्माता आहे.'' ३९:६२, ''शुभ आणि अशुभ एकसमान नव्हेत.'' ५:१००, ''ईश्वराचे वरदान सत्कर्मे करणाऱ्यांसाठी उपलब्ध आहे.'' ७:५६, ''नि:संशय, अल्लाहच्या लेखी असलेला (खरा) धर्म इस्लाम (पूर्ण समर्पण) हाच आहे.'' ३:१९, ''आम्ही नरकास श्रद्धाहीनांसाठी कारागृह बनवले आहे.''- १७:८

तर अशी विविधांगी आहे अल्लाहची कार्यप्रणाली!

### १३) अल्लाहच्या कार्यप्रणालीचे संचालन

परमेश्वराने मानवास स्वत:च्या दोन्ही हातांनी निर्माण करून (३८:७५) त्यास परिपूर्ण व प्रमाणबद्ध बनवले (८२:६) आणि त्यास परमेश्वराच्या निकटवर्ती देवदूतांना पण न दिलेले ज्ञान प्रदान करून (२:३१-३३) प्राणीमात्रांमध्ये सर्वश्रेष्ठत्व (अश्रफुलमख़्लूक़ात) प्रदान केले. ब्रह्मांडामध्ये सर्वोच्च ठरवून त्यास स्वर्गामध्ये बसवले आणि सृष्टीमध्ये कुणालाही न दिलेले कर्मस्वातंत्र्य बहाल केले. एका परीने परमेश्वराने मानवासाठी सत्त्वपरीक्षेचे एक अस्त्रच निर्माण केले. नेमका याच कर्मस्वातंत्र्याचा गैरफायदा तिरस्कृत, धिकृत सैतानाने उचलला व त्यास भुरळ पाडून परमेश्वराची अवज्ञा करण्यास भाग पाडले व त्यास अध:पतित करून सोडले.

मानवाचे हे अध:पतन परमेश्वरास रूचले नाही. त्यास त्याचे अध:पतन पाहणे फार जड जाऊ लागले. म्हणून त्यांने त्यास पश्चात्ताप व्यक्त करण्याचे बोल शिकवले व त्या बोलाचे निवेदन करून मानवाने ईश्वरी शिक्षेपासून स्वत:ची सुटका करून घेतली आणि भावी काळासाठी त्याची दया आणि कृपेची छत्रछाया स्वत:साठी आरक्षित करून घेतली. परिणामी त्याला नेहमी वारंवार घडणाऱ्या अपराधांबद्दल क्षमाच मिळत गेली. आणि स्वत:मध्ये सुधारणा घडवून आणण्याची सुवर्णसंधी त्याला वेळोवेळी मिळत गेली. यावरून मानवाने आपले गमावलेले सर्वोच्च स्थान पुन्हा प्राप्त करावे अशीच परमेश्वराची मनोमन सदिच्छा दिसते. यासाठी परमेश्वराने आपल्या कृपेची छत्रछाया त्याच्यावर पसरवून आपले दयेचे सत्र सतत उघडे ठेवले. प्रकोप, दंड व शिक्षेच्या क्षेत्राहून कृपा व दयेचे क्षेत्र अधिक विस्तृत आणि व्यापक ठेवले. यावरून असे स्पष्ट दिसते की

परमेश्वरास सतत मानवाच्या कल्याणाची चिंता लागून राहिलेली आहे. परिणामी ''अल्लाह आपल्या दासांवर फार कृपावंत आहे.'' ४२:१९, ''अल्लाहने आपल्या देणग्या तुमच्यावर पूर्ण केल्या आहेत.'' ३१:२० इतकेच नव्हे तर परमेश्वराची मानवावर एवढी मोठी कृपा आहे की त्याने आकाश व पृथ्वीवर सर्व काही त्याच्या अधीन केलेले आहे. याचा पुरावा सदरहू श्लोक आहे – ''आकाशात जे काही आहे व पृथ्वीमध्ये जे काही आहे ते त्याने तुमच्या अधीन केलेले आहे.'' ४५:१३ पूर्ण समर्पणभाव बाळगून अल्लाहची सश्रद्धा उपासना करावी ही ईश्वराज्ञा आहे.'' (पैगंबर! तुम्ही लोकांना) सांगा, 'मला अशी आज्ञा देण्यात आलेली आहे की, मी अल्लाहच्याप्रती माझी श्रद्धा अर्पण करून त्याची उपासना करावी, आणि मला अशी आज्ञा करण्यात आलेली आहे की, (त्यास) शरण जाणाऱ्यांमध्ये मी अग्रेसर असावे.'' ३९:११–१२ कारण ''तो आपल्या दासांवर सर्वाधिकार बाळगतो.'' ६:१८

अल्लाह हा मानवास पथभ्रष्टतेपासून परावृत्त करण्यासाठी आणि सन्मार्गाकडे प्रवृत्त करण्यासाठी आपण पाठवलेल्या प्रेषितांकरवी योग्य त्या संदेशांद्वारे त्याचे मार्गदर्शन करतो. तो आपले संदेश दिव्य वाणी ('वह्यी')च्या माध्यमातून संबंधित जनसमूहाच्या भाषेमध्ये प्रकट करतो. मानवाची अंगभूत मर्यादा लक्षात घेऊन व त्याला आपल्या अत्युच्च आदर्शाचा मार्ग स्वतंत्रपणे सापडणे अशक्यप्राय आहे हे गृहीत धरून ईश्वरच परमकृपेने पवित्र ग्रंथांच्याद्वारा वा संत–महात्म्यांच्या माध्यमांतून मनुष्याचे अंतिम हित कशात आहे व त्याकरिता त्याने कसे वागावे या 'डोळस श्रद्धे'विषयी मार्गदर्शन करतो. अर्थात ती त्याने स्वीकारावी अशीच त्याची अपेक्षा असते. मानवाची मुक्तता व्हावी हाच ईश्वराचा हेतू असतो. उद्धटांना तो अनेक प्रकारचे दृष्टान्त देऊन कुमार्गापासून वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. त्यांना सुधारण्यासाठी अनेकदा संधी देतो. त्यांच्याकडून सीमेचे उल्लंघन झाल्यावरच तो आपले शिक्षेचे आसूड त्यांच्यावर चालवतो. इतके असूनही ईश्वराची इच्छा या पथभ्रष्टांनी सन्मार्गावर यावे अशीच असते. त्याचा न्याय हा त्याच्याच न्याय असतो. तो कुणावरही तिळमात्र अन्याय करीत नाही. पथभ्रष्ट मात्र आपल्या हेकेखोर स्वभावामुळे स्वत:वरच अन्याय ओढून घेतात व शिक्षेस पात्र ठरतात. अपराधाच्या प्रमाणातच दैवी शिक्षेचे स्वरूप आणि मात्रा असते. सत्कर्मांसाठी मात्र जादा श्रेयांक दिले जाते. मात्र ज्यांनी ईश्वरावर श्रद्धा बाळगली व सत्कर्मे केली त्यांना योग्य तो पुरस्कार त्याच्याकडून मिळतो. सत्कर्मांसाठी पुरस्कार आणि दुष्कर्मांसाठी शिक्षा असा त्याचा सुयोग्य न्याय असतो.

श्रद्धाहीन, अवज्ञाकारी, पाखंडी, दांभिक, उद्धट, सन्मार्गापासून बहकलेले (६८:७), सत्याचा इन्कार करणारे (६८:८), निंदानालस्ती करणारा चहाडखोर (६८:११), सत्कृत्यास प्रतिबंध करणारे, अत्याचारी, पापी, असभ्य (६८:१२–१३), खोटारडे, खोटी साक्ष देणारे, दुराचरणी, पापाच्या बाबतीत दुराग्रही, मग्रुर, गर्विष्ठ, सत्यास नाकारून पाठ फिरविणारे (७५:३२) या सर्वांना ''आम्ही टप्प्या टप्प्याने त्यांना अशा दिशेने (विनाशाच्या निकट) घेऊन जाऊ जिचे त्यांना ज्ञान नाही.'' ६८:४४ परिणामी हे सर्वच्या सर्व शिक्षेस पात्र ठरतात. ''खरोखर, श्रद्धाहीनांकरता आम्ही साखळदंड, गळ्यात (घालावयाची) लोखंडी कडी आणि (नरकाचा) धगधगता अग्नी तयार ठेवलेला आहे.'' ७६:४, ''दुराचरणी लोकांसाठी त्याने यातनामय शिक्षा तयार केलेली आहे.'' ७६:३९, ''सत्याचा इन्कार करतात त्यांचा त्या (निर्णयाच्या) दिवशी सर्वनाश होणार आहे!'' ७७:१५ ''सत्यास नाकारून पाठ फिरवणाऱ्या लोकांबद्दल परमेश्वरास खेद आहे.'' ७५:३२ परमेश्वर

स्वत: या संदर्भात म्हणतो, ''(हे मानवा!) खेद आहे तुझ्याबद्दल, खेद! पुन्हा तुझ्याविषयी खेद वाटतो, फक्त खेद!'' ७५:३४-३५ हे सर्वच्या सर्व ईश्वराच्या भयंकर शिक्षेचे वाटेकरी आहेत.

परमेश्वराने अवज्ञाकारी पथभ्रष्टांना इहलोकीच वेगवेगळ्या प्रकारची शिक्षा ठोठावली. जसे ''म्हणून (अवज्ञाकारी पथभ्रष्टांपैकी) प्रत्येकाला आम्ही त्याच्या पापकर्माबद्दल पकडले, त्यांच्यापैकी काही असे होते ज्यांच्यावर आम्ही वाळूचे भयंकर वादळ पाठवले आणि त्यांच्यापैकी काही असे होते त्यांना भयंकर गर्जना करणाऱ्या स्फोटाने ग्रासून टाकले. आणि त्यांच्यापैकी काही असे होते त्यांना आम्ही जमिनीत गाडून टाकले, आणि काही असे होते ज्यांना आम्ही बुडवून टाकले. आणि अल्लाह त्यांच्यावर मुळीच अन्याय करणार नव्हता, परंतु ते आपणा स्वत:वरच अन्याय करीत होते.'' २९:४० परमेश्वराने नूहच्या लोकांना बुडवले (७:६४), आदच्या लोकांची पाळेमुळे कापून टाकली (७:७२), समूदच्या लोकांना भूकंपाने पछाडले (७:७८), लूतच्या लोकांवर मुसळधार पावसाचा वर्षाव केला (७:८४), मदयनच्या लोकांना भूकंपाने पछाडले (७:९१), ''फिरऔनने प्रेषिताची (मूसाची) अवज्ञा केली, म्हणून आम्ही त्यास भयंकर शिक्षेने जखडून टाकले.'' ७३:१६

पथभ्रष्ट लोकांना सावध करण्यासाठी अल्लाह प्रेषित पाठवत असतो. म्हणून त्याने वेळोवेळी नूह, इब्राहीम, मूसा, हारून, इलियास, लूत आणि यूनुस या प्रेषितांना पाठवून त्यांच्या सत्कृत्यांबद्दल त्यांना पुण्यफल दिले. ''जे सत्कृत्ये करतात त्यांना आम्ही खरोखर अशा प्रकारे पुण्यफल देत असतो.'' ३७:१२१ ''हे (पूर्वकालीन प्रेषित) असे होत की ज्यांना परमेश्वराने सरळ मार्ग दाखवला. (हे प्रेषिता!) त्यांच्याच पद्धतीचे (तूही) अनुसरण कर.'' ६:९०

नूह, आद, समूद, लूत आणि फिरऔनच्या लोकांना, त्यांनी सत्याचा इन्कार केला म्हणून ईश्वराच्या सावधगिरीचा इशारा आणि शिक्षा अत्यंत कठोर (अशी) होती. तिने नूहच्या लोकांना महापुरात बुडवले, आदच्या लोकांना झंझावती वादळात मुळापासून उखडलेल्या खजुराच्या झाडांच्या फांद्यांप्रमाणे उखडून फेकून दिले, समूदच्या लोकांना (विजेचा) लोळ पाठवून त्यांना तुडवल्या गेलेल्या वाळल्या खुंटाप्रमाणे केले, लूतच्या लोकांवर दगडधोंड्याचे वादळ पाठवले, फिरऔनच्या लोकांना सतत वाढत जाणाऱ्या शिक्षेने जखडून टाकले.'' ६९:१० आद, समूद, नूह, लूत या सर्व जातिसमूहांचा विनाश केला.'' ५३:५०-५३ ''(इहलोकाची) शिक्षा ही अशी आहे आणि परलोकातील शिक्षा तर (यापेक्षाही) मोठी आहे. जर त्यांना जाण असती!'' ६८:३३

अशाप्रकारे श्रद्धाहीन जातिसमूहांवर आपली भयंकर शिक्षा कोसळवून पुढील पिढ्यांना सत्कर्मे आणि ईश्वराज्ञापालनाचा उपदेश देऊन त्यांना स्वत:स भयंकर शिक्षेपासून वाचविण्यास परमेश्वर सचेत करतो, जागरूक करतो. यामध्ये ईश्वराची मानवासाठी कल्याणकारी भावनाच दिसून येते.

अल्लाहने विश्वाची निर्मिती व्यर्थ व निरुद्देश पेलेली नाही. कर्मफळे मिळवण्यासाठी परलोक असणे अनिवार्य आहे. (३:१९१-९२) कर्माबद्दल पकड करण्यासाठी परलोक आवश्यक आहे. आणि कर्मानुसार पकड करणे ही न्यायाची निकड आहे. (७:४-९) प्रलयाच्या दिवशी सर्वांना एकत्रित आणले जाईल आणि सर्वांना अल्लाह समोर हजर केले जाईल. (११:१११) प्रत्येक व्यक्ती स्वत:ची कर्मनोंद पाहून स्वत:च आपला निकाल जाणून घेईल. (१७:१३-१४) त्या दिवशी काटेकोर वजन देणारा तराजू उभारला जाईल व कोणावर यत्किंचितही अन्याय होणार नाही. (२१:४७) प्रत्येकाला त्याच्या कृत्यानुसार मोबदला दिला जाईल. (३६:५४)

मार्गभ्रष्ट झालेले लोक (त्या) प्रलयाच्या दिवशी आंधळे, मुके व बहिरे होऊन उठतील. (१७:९७-९९) अपराध्यांविरुद्ध त्यांचे डोळे, त्यांची त्वचा, त्यांचे कान ग्वाही देतील. (४१:२०-२४)

अल्लाहच्या कार्यप्रणालीच्या संचालनाची अशी रीत आहे.

### १४) विश्व संचालन – सूफ़ी दृष्टिकोन :

### विश्वसंचालनामध्ये ईश्वरनिष्ठ महात्म्यां('रिजालुल्लाह')ची भूमिका:

सर्वश्रेष्ठ अल्लाहने सृष्टीमध्ये इतर सजीवांसोबतच मानवजातीस पण प्रस्थापित केले. आपल्या प्रेषितांच्या माध्यमाने त्याने मानवास चांगले-वाईट ते काय आहे, हे शिकवले. ईश्वरपुरस्कृत विधि-निषेध आणि ईश्वराज्ञा पाळण्याची ताकीद दिली. ईश्वराची भक्ती हे सर्वोच्च कर्तव्य ठरवले. सदाचार अंगीकारण्याचे आव्हान केले. ईशभीरुता व ईशपरायणतेची शिकवण दिली. मात्र ईश्वराचे उपरोक्त उपदेश अंमलात आणण्याच्या संदर्भात माणसामाणसामध्ये भेद दिसून आले. या भेदाच्या आधारे ईश्वरी दृष्टिकोनातून मनुष्याचे अनेक भेद निर्माण झाले. जसे प्रेषित, संत-महात्मे, श्रद्धावान, श्रद्धाहीन, कृतज्ञ, अकृतज्ञ, इत्यादी. पैकी प्रेषितांचा दर्जा सर्वोच्च असून त्याखालोखाल संत-महात्म्यांचा दर्जा आहे. ही उतरंड खालपर्यंत नास्तिकतेवर जाऊन थांबते. ढोबळ मानाने मानवाचे दोन प्रकार सांगता येतील (१) भक्त आणि (२) अभक्त (म्हणजेच श्रद्धाहीन) ईश्वरास भक्त प्रिय असतात. त्यातल्या त्यात ईश्वरनिष्ठ भक्त हे त्याचे फार जवळचे असतात. त्यांच्यावर परमेश्वराची विशेष कृपा असते, इतकी की त्यांना काही दैवी गुणांचे वरदान लाभलेले असते. या वरदानाच्या आधारे दैवी शक्तीच्या बळावर ते अनेक प्रकारचे चमत्कार दाखवू शकतात. अशाच प्रकारच्या भक्तांमध्ये 'रिजालुल्लाह' म्हणजेच ईश्वरनिष्ठ महात्मा लोकांचा समावेश होतो.

'रिजालुल्लाह'चे बारा गट तसेच ईशजनांचे बारा प्रकार असल्याचे संकेत पवित्र कुराणामध्ये आढळतात. ते याप्रमाणे आहेत-

''मूसाच्या जमातीमध्ये लोकांचा एक गट असाही आहे जो लोकांना **सत्याचा उपदेश** करतो आणि त्यानुसारच **न्याय करीत असतो** आणि आम्ही त्यांची (विभिन्न) अशा **बारा गटात** विभागणी केली.'' ७:१५९-६०

उपरोक्त श्लोकांमध्ये उल्लेखित बारा गट म्हणजेच 'रिजालुल्लाह' अर्थात ईश्वरनिष्ठ महात्म्यांचे पुढे दिलेले बारा प्रकारांचे संकेत होय.

**'रिजालुल्लाह' ईश्वरनिष्ठांचे बारा गट**

१) अक़ताब (कुत्ब) म्हणजेच महाविश्वाधार महर्षी,
२) ग़ौस म्हणजेच महात्मा,
३) इमामान अर्थात पथप्रदर्शक अधिनायक
४) अवताद अर्थात खुंटीसारखे मज़बूत दृढ, स्थिरचित्त ईश्वरनिष्ठ भक्त,
५) अब्दाल म्हणजे बदल घडविणारे ईश्वरनिष्ठ भक्त,
६) अख़्यार अर्थात कल्याणकारी ईश्वरनिष्ठ संत

७) अब्रार अर्थात ऋषी–मुनी

८) नुक़बा म्हणजे पूर्वसूचना देणारे ईश्वरनिष्ठ भक्त

९) नुजबा म्हणजे कुलीन ईश्वरनिष्ठ संत

१०) अमद अर्थात प्रतिष्ठित ईश्वरनिष्ठ महात्मा,

११) मक्तूमान म्हणजे अदृष्ट, गुह्य असे ईश्वरनिष्ठ भक्त आणि

१२) मुफ़्रदान म्हणजेच एकटे ईश्वरनिष्ठ महात्मा

आणि तंतोतंत याचप्रमाणे ईशजनांचे बारा प्रकार असल्याचे निवेदन पवित्र कुराणामध्ये पुढीलप्रमाणे आढळते –

(आठवा ती वेळ) जेव्हा मूसाने आपल्या लोकांसाठी (अल्लाहकडे) पाणी मागितले, तेव्हा आम्ही त्याला म्हणालो, 'तुझी काठी (अमुक) खडकावर आपट! मग त्यातून पाण्याचे **बारा स्रोत** उसळून बाहेर पडले. त्यामुळे प्रत्येक जातीसमूहाला आपापल्या पाणवठ्याची माहिती झाली.'' २:६०

ते बारा स्रोत म्हणजेच ईशजनांचे पुढील बारा प्रकार होत. आणि सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे अग्रगण्य गुण पण बाराच आहेत, ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. ते बारा अग्रगण्य गुण आहेत – (१) मालिक, (२) कुद्दूस, (३) स्सलाम, (४) मुअ्मिन, (५) मुहैमिन, (६) अज़ीज़, (७) जब्बार, (८) मुतकब्बिर, (९) अलीम, (१०) हय्यु, (११) क़य्यूम आणि (१२) क़ादिर.

**ईशजनांचे बारा प्रकार :**

१) मुवह्हिद अर्थात एकनिष्ठ एकेश्वरवादी भक्त,

२) आरिफ़ अर्थात ब्रह्मज्ञानी भक्त,

३) आशिक़ अर्थात ईशप्रेमी भक्त,

४) साबिक़ म्हणजेच अग्रगामी – अग्रेसर भक्त,

५) मुह्हिब म्हणजेच ईशसखा भक्त,

६) मुवक्किन म्हणजेच दृढ विश्वासू भक्त,

७) मुकाशिफ़ अर्थात दिव्यदृष्टी ज्ञाता भक्त,

८) मुशाहिद अर्थात द्रष्टा भक्त,

९) सालिक अर्थात साधक (भक्त),

१०) सादिक़ म्हणजेच सत्यनिष्ठ भक्त,

११) राज़ी ब रज़ा म्हणजेच संतुष्ट भक्त, आणि

१२) मुरीद म्हणजेच संकल्पक भक्त

उपरोक्त श्लोकामधील 'खडक' हा शब्द रूपकाच्या भाषेत आलेला आहे. त्याचे निरूपण 'गुह्य ज्ञानाचे बाह्य कवच' असे केल्यास अर्थ सहज खुलतो. बारा प्रकारच्या भक्तांची व्यवच्छेदक लक्षणे 'उसळून बाहेर येतात' म्हणजेच प्रकट होतात. त्या लक्षणांचे आधारे ईशजनांचे उपरोक्त बारा प्रकार उदयास आले.

मात्र ईश्वरनिष्ठ महात्म्यांच्या संदर्भात त्यांची प्रमुख लक्षणे स्पष्टपणे सांगण्यात आलेली आहेत. ती म्हणजे – (१) सत्याचा उपदेश करणे आणि (२) त्या सत्यानुसारच न्याय प्रस्थापित करणे. या अनुषंगाने त्यांची इतर ठळक लक्षणे त्यांच्या नावामध्येच निहित आहेत.

स्वत: अल्लाहने आपले पवित्र ग्रंथ 'कुरआन'मध्ये 'रिजालुल्लाह' अर्थात ईश्वरनिष्ठ महात्म्यांची ओळख लक्षण स्वरूपामध्ये याप्रमाणे करून दिली आहे –

''(ईश्वरनिष्ठ महात्मा) हे असे लोक आहेत, ज्यांना व्यवसाय आणि देवाणघेवाणीचे व्यवहार या गोष्टी अल्लाहच्या स्मरणापासून बेसावध करू शकत नाहीत.'' २४:३७

या ईश्वरनिष्ठ महात्म्यांचे अस्तित्त्व आद्य प्रेषित आदमच्या काळापासून ते सगळ्यात शेवटचे संदेष्टे मुहम्मद यांच्या काळापर्यंत व तेथून पुढे महदीचे प्रकटन उदय आणि ईसाच्या अवरोहणापर्यंत आहे आणि राहील. ब्रह्मांड कायम राहण्याची निर्भरता यांच्यावर आहे. ईश्वराची भक्तांवर (मानवावर) कृपा यांच्या माध्यमाने होत असते. सांसारिक कार्यांमध्ये स्थैर्य आणि परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता व सामर्थ्य सर्वश्रेष्ठ परमेश्वर त्यांच्यामध्ये उत्पन्न करतो. यांच्या सौभाग्यामुळे व कल्याणामुळे पाऊस पडतो, वनस्पती हिरव्यागार होतात, वेगवेगळ्या पशुपक्षांना चारा-पाणी मिळतो, शहर व कस्ब्यातील लोकांना उपजीविका मिळते, तसेच मामले उलटतात, भाग्य बदलते, धनवान, निर्धनांच्या परिस्थितीमध्ये बदल घडून येतो, छोटी-मोठी प्रगती व अधोगती होत असते. सैन्यांमध्ये एकजूट व फूट निर्माण होते, संकट निवारण व रोगराई निर्मूलन होत असते. ही सर्व कार्ये व आणखी इतर कार्ये त्यांच्यामुळे (परमेश्वर इच्छेने) घडत असतात. आपल्या प्रगल्भ बुद्धिमत्तेने सर्वश्रेष्ठ परमेश्वर जसे सूर्यास प्रकाश प्रदान करून त्याद्वारे जगास प्रकाशमान करतो तद्वत सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा अदृष्टांहून अदृष्टापासून एक प्रकाश या महात्म्यांवर अवतरित करतो आणि मग त्या प्रकाशास जगाची सुधारणा आणि मानवजातीमधील सुव्यवस्था यांचे साधन बनवतो.

या महात्म्यांचे दोन प्रकार पडतात – (१) दृश्य ईश्वरनिष्ठ आणि (२) अदृश्य ईश्वरनिष्ठ. सांसारिक कामांमध्ये स्थैर्य प्रस्थापित करण्याचे काम अदृश्य ईश्वरनिष्ठांवर सोपवलेले असते. ते इतरांच्या दृष्टीआड असतात. हे सेवेचे अधिकारी असतात. प्रशासन व्यवस्थेला स्थैर्यासाठी यांना प्रकट होण्याची गरज भासत नाही. यांना 'रिजालुल ग़ैब' अर्थात 'अदृश्य ईश्वरनिष्ठ' आणि 'मर्दान-ए-ग़ैब' म्हणजेच 'अदृश्य महात्मा' असे म्हणतात. यांच्यामध्ये असे लोक पण असतात की ज्यांनी प्रेषितांच्या पद-चिन्हांचे अनुसरण करून इहलोकापासून (दृश्य जगापासून) प्रयाण करून अदृश्याकडे कूच केले आहे. यांना ''मुस्तवीउर्रमान'' असे म्हणतात. म्हणजेच हे रहमान अर्थात ईश्वराचे समतुल्य असतात. ते ओळखले जात नाहीत ना त्यांचे गुण-वर्णन केले जाऊ शकते, यद्यपि ते मानव आहेत. यांच्यामध्ये असे लोक पण असतात जे फक्त आपल्याच स्थळी दिसून येतात. अनुभूतीच्या जगामध्ये हे आपल्याला वाटेल त्या माणसाचा चेहरा ग्रहण करतात. लोकांचे गूज प्रकट करतात आणि अव्यक्त कार्ये व्यक्त करतात. यांच्यामध्ये असे लोक पण असतात की ज्यांचा संपूर्ण विश्वभर संचार असतो. लोकांमध्ये प्रकट होतात व पुन्हा अदृश्य होतात. त्यांच्याशी संभाषण करतात आणि त्यांना उत्तर देतात. वन, पर्वत आणि निर्झराच्या किनाऱ्यावर वसती करतात; परंतु यांच्यापैकी जे अधिक बलवान असतात ते शहरांमध्ये वसती करतात. मानवी स्वभावास आपल्यावर गुंडाळून घेतात. उत्तोमत्तोम

घरांमध्ये राहतात. लोक त्यांची ईर्ष्या पण करतात. ते त्यांचा मत्सर करतात. ते विवाह करतात. खान-पान करतात. आजारी पडतात. इलाज करून घेतात. धन-वित्त-दारा राखतात. लोक त्यांच्याशी शत्रुत्व भावना ठेवतात. त्यांना इजा पोहोचवतात. परंतु सर्वश्रेष्ठ परमेश्वर त्यांचे सदाचरण आणि आंतरिक पराकाष्ठांना इतरेजनांच्या दृष्टीआड करतो (ठेवतो). यांच्याच वैशिष्ट्यासंबंधी असे म्हटले गेले आहे की, ''ईशसखाही माझ्या लांब झग्याच्या अधीन असतात, म्हणून इतरांना ते दिसू शकत नाहीत.''

**रिजालुल ग़ैब** – रिजालुलग़ैब अर्थात अदृश्य ईश्वरनिष्ठ हे भौतिक जगामधील अंतस्तमवाद (बातिनी) शासक असतात. पवित्र प्रेषित वचना (हदीस पाक)नुसार पृथ्वीतलावर परमेश्वराचे असे विशेष आवडते सेवक असतात की ज्यांची कृपायाचना आणि बर्कतीमुळे सर्वश्रेष्ठ परमेश्वर लोकांवर दया करतो. आकाशामधून पाऊस वर्षवतो आणि जमिनीवर पीक वगैरे उगवतो. हे लोक विश्व शांतीस कारणीभूत असतात. हे ३६० इसम (व्यक्ती) असतात. यांपैकी काहींची अंत:करणे प्रेषित आदमसारखी असतात, तर काहींची प्रेषित मूसा यांच्यासारखी असतात. तर काहींची प्रेषित इब्राहीमसारखी असतात. आणि काहींचे चित्त ईश्वर सान्निध्यात असलेले देवदूत (मलायका अल्-मुक़र्रबीन) आणि इतर देवदूतांसारखे असते.

'करामात-ए-औलिया' या ग्रंथामध्ये असे नमूद आहे की पृथ्वीतल हे कधीच अशा चाळीस माणसांपासून रहित (मोकळी) नसते की ज्यांच्या बर्कतीमुळे आकाशातून पाऊस पडतो आणि जमीन वनस्पती उगविते. यांना 'अब्दाल' असे म्हणतात. प्रेषित म्हणतात की माझ्या धर्मप्रजे (उम्मत)मध्ये चाळीस माणसे अशी असतील की ज्यांच्यामुळे पृथ्वी आणि आकाशाची व्यवस्था कायम राहील. त्यांचा स्वभाव असा असतो की त्यांच्यावर जुलूम झाल्यावर ते क्षमा करतात आणि वाईट करणारावर उपकार करतात आणि परमेश्वराने दिलेल्या उपजीविकेमध्ये इतरांना सहभागी करून घेतात.

'रूहुलबयान' या ग्रंथाच्या आधारे असे म्हणता येईल की इस्लामी धर्मप्रजेमध्ये नेहमी पाचशे 'वली' आणि चाळीस 'अब्दाल' असतात. यांच्यापैकी एखाद्याचे निर्वाण झाल्यास, दुसरा त्याची जागा घेतो. या पुण्यात्म्यांशी जर कोणी केसाएवढासुद्धा उद्धटपणा करील तर ईश्वर त्याच्याशी युद्ध पुकारतो.

अल्लामा ख़तीब यांनी 'बगदादचा इतिहास' या ग्रंथाच्या संदर्भाने असे नमूद केले आहे की 'नुक़बा' १०० असतात, 'नुजबा' ७०, अब्दाल ४० आणि ७ असतात तर अवताद ४ आणि कुत्ब पृथ्वीवर ३ (तीन) असतात आणि १ (एक) कुत्बुल अक़ताब किंवा ग़ौस हा प्रेषित मुहम्मद स. यांचा सारखा असतो. जगामध्ये तो त्यांचा उत्तराधिकारी व नायब असतो. तर अब्दाल हे देवदूतांसारखे असतात. अवताद हे संदेष्टे आणि महाप्रेषितांसारखे असतात, आणि नुक़बा व नुजबा हे बनी इस्राईल यांच्या संदेष्टेसारखे असतात आणि चार कुत्ब हे प्रेषितांच्या चार उत्तराधिकाऱ्यां (ख़लीफ़ा)सारखे असतात.

मुहम्मदी धर्मप्रजेमध्ये अंतस्तमवाद (बातिनी) लोकांचा एक गट असतो. त्यांना 'रिजालुल ग़ैब' असे म्हणतात. हा गट श्रेणीनुसार ग़ौस, कुत्ब, अवताद, अब्दाल, नुजबा, नुक़बा आणि अख़यार असा असतो. या उतरंडीमध्ये कुत्बुलअक़ताब किंवा ग़ौस या सर्वांचा प्रमुख असतो. तो शीर्षस्थानी असतो. ग़ौस हा जगामध्ये एकटाच असतो. बाकीचे तीन त्याच्या अधीन काम करतात.

'रिजालुल्लाह' म्हणजेच ईश्वरनिष्ठ महात्मा हे व्यक्त असोत की गुप्त, हे बारा प्रकारांमध्ये विभागलेले आहेत. यांच्या नामांतर्गत अर्थावरून परमेश्वराने यांच्यावर सोपवलेली कामगिरी आणि जबाबदारी यांची जाणीव होते. ते बारा याप्रमाणे आहेत –

१) अक़ताब (महाविश्वाधार महर्षी),

२) .गौस (महात्मा),

३) इमामान (पथप्रदर्शक अधिनायक),

४) अवताद (मज़बूत स्थिरचित्त ईश्वरनिष्ठ भक्त),

५) अब्दाल (परिवर्तनकारक ईश्वरनिष्ठ भक्त),

६) अख़्यार (कल्याणकारी ईश्वरनिष्ठ संत),

७) अब्रार (ऋषी–मुनी)

८) नुक़बा (पूर्वसूचना देणारा ईश्वरनिष्ठ भक्त),

९) नुजबा (कुलीन ईश्वरनिष्ठ संत),

१०) अमद (प्रतिष्ठित ईश्वरनिष्ठ महात्मा),

११) मक्तूमान (अदृष्ट – गुह्य ईश्वरनिष्ठ भक्त) आणि

१२) मुफ़्रदान (एकटे ईश्वरनिष्ठ महात्मा).

**१) अक़ताब (कुत्ब) :** 'कुत्ब' जगाच्या समस्त जनतेपैकी ती एकमेव सत्ता आहे, (प्रत्येक वेळ–काळी) जिच्यावर ईश्वराची नजर असते आणि तो चार आद्य देवदूतांपैकी विश्वाच्या अखेरीस तुतारी फुंकणारे देवदूत इस्राफ़ीलच्या अंत:करणावर असतो. तो 'कुत्बुलअक़ताब'चा दर्जा असलेले महान कुत्बुबियतच्या जबाबदारीवर नियुक्त असतो, आणि हे प्रेषितत्त्वाचे अंतरंग आहे. म्हणून तो (कुत्ब) प्रेषिताच्या परम पराकाष्ठेशी विशेष संबंधित असल्याकारणाने त्यांच्या अंतरंगाच्या अनुषंगाने तो त्यांचा वारस (उत्तराधिकारी) असतो.

प्रत्येक युगामध्ये सर्व जगामध्ये सर्वात मोठा 'कुत्ब' एक(च) असतो. याला 'कुत्ब–ए–आलम' अथवा 'कुत्ब–ए–कुब्रा' वा 'कुत्ब–ए–इर्शाद' वा 'कुत्ब–ए मदार' किंवा 'कुत्बुलअक़ताब' वा 'कुत्ब–ए–जहान' अथवा 'जहाँगीर–ए–आलम', 'ग़ौसुल आज़म', 'इन्साल कामिल' या नांवांनी पण ओळखतात. अधो जगत आणि ऊर्ध्व जगत यामध्ये त्याचा अधिकार असतो. आणि संपूर्ण जग हे त्याच्या कृपेच्या बरकतीने कायम असते. जर 'कुत्ब–ए–आलम'चे अस्तित्व त्यांच्यामधून काढून टाकण्यात आले, तर संपूर्ण जग अस्त–व्यस्त होऊन जाईल. कुत्ब–ए–आलम सर्वश्रेष्ठ परमेश्वराशी थेट आणि संबंधाशिवाय प्रभू–कृपा प्राप्त करतो आणि त्या कृपेचे वाटप आपल्या अधिनस्थ अक़ताबमध्ये करतो. एखाद्या मोठ्या शहरामध्ये वसती करतो. याला दीर्घायुष्य लाभते. प्रेषित मुहम्मदच्या विशेष प्रकाशाच्या बरकतीमुळे तो प्रत्येक दिशेमध्ये पाहातो. त्याचे डोळे मिटलेले असोत वा उघडे. आपल्या अधिनस्थ अक़ताबची नेमणूक, बढती किंवा पदावनतीचा अधिकार आपल्या स्वाधीन राखतो. पालकास पदच्युत करणे व नेमणे याचा स्वभाव (लक्षण) आहे. स्वत: 'विलायत–ए–शम्सी' ('सौर–संतत्व') धारण करतो. याउलट 'कुत्ब–ए–अब्दाल'ची 'विलायत–ए–क़मरी' ('चांद्र–संतत्त्व') असते. 'कुत्ब–ए–आलम', 'रहमान' नामाच्या प्रकाशाची अभिव्यक्ती आहे आणि प्रेषित मुहम्मद हे

सर्वश्रेष्ठ प्रकाशाचे आविष्करण आहेत. 'कुत्ब-ए-आलम' साधक असतो आणि त्याची प्रगती सुरू-चालू असते. प्रगती करत करत तो 'मक़ाम-ए-फ़र्दानियत' म्हणजेच एकटेपणाच्या स्थळापर्यंत पोहोचतो. यालाच 'महबूबियत' (प्रेयत्व) असे पण म्हणतात. समस्त ईश्वरनिष्ठ महात्म्यांच्या अंतरंगामध्ये आणखीन बरीचशी नावे असतात. यास्तव 'कुत्ब-ए-आलम'चे नाव 'अब्दुल्ला' असे असते.

अक़ताबचे पण असंख्य प्रकार आहेत. हे सर्व कुत्ब-ए-आलमच्या अधीन असतात. उदाहरणार्थ, 'कुत्ब-ए-अब्दाल', 'कुत्ब-ए-विलायत' इत्यादी. प्रत्येक प्रकारासाठी एक वेगळा (स्वतंत्र) कुत्ब असतो. उदाहरणार्थ, 'कुत्ब-ए-ज़ुह्हाद', 'कुत्ब-ए-उब्बाद', 'कुत्ब-ए-उर्फ़ा', 'कुत्ब-ए-मतवक्कलान'. प्रत्येक स्थळ, प्रत्येक शहर, प्रत्येक क़स्बा व प्रत्येक गावाचा एक कुत्ब असतो. तो तिचे संरक्षण करतो. भलेही ती वसती श्रद्धावंतांची असो वा श्रद्धाहीनांची. श्रद्धावंतांचे पालन-पोषण 'हादी' (मार्गदर्शक) या नामाच्या प्रकाशाच्या अधीन होत असते, आणि श्रद्धाहीनांचे पालनपोषण 'मुज़िल्लु' (घातक) या नामाच्या अधीन. आणि ही दोन्ही नामे सर्वश्रेष्ठ परमेश्वराचीच आहेत.

*''च: दानंद मुर्ग़ान दाम-ए-हवा*
*तरन्नुम सराए तय्यूर-ए-अला''*

उपरोक्त फ़ारसी काव्यचरणाचा आशय असा आहे - आकाशाच्या वातावरणापर्यंत उडणारे पक्षी (अर्थात सर्वसाधारण मनुष्य) आत्म्यांच्या जगामध्ये विहार करणाऱ्यांची पद-प्रतिष्ठा कसे बरे समजतील?

**२) ग़ौस :** ग़ौसचे शरीर प्रत्येक वस्तूपेक्षा जादा (अधिक) पवित्र, सूक्ष्म, कोमल व मृदूल असते. हा सर्वोच्च दर्जा प्राप्त होण्यासाठी परमेश्वराकडे अशी विनवणी प्रस्तुत केली जाते, ''हे परमेश्वरा! आम्हास आणि सर्व श्रद्धावंतांना हा श्रेष्ठ दर्जा प्रदान कर.'' काही विचारवंतांच्या मते 'कुत्ब' आणि 'ग़ौस' एकच असतात. परंतु सर्वात थोरले शेख मुहीयुद्दीन इब्न अरबी यांच्या मते 'कुत्बुल अक़ताब' आणि 'ग़ौस' दोघे वेगवेगळे आहेत. काहीना कुत्बियत आणि ग़ौसियत ही दोन वेगवेगळी पदं वाटतात. ही दोन्ही एकाच व्यक्तीमध्ये एकवटलेली असतात. 'कुत्बियत'च्या अनुषंगाने त्यास 'कुत्बुल अक़ताब' आणि 'ग़ौसियत'च्या अनुषंगाने 'ग़ौस' असे म्हणतात.

**३) इमामान :** 'कुत्बुल अक़ताब'चे दोन वज़ीर असतात. यांना 'इमामान' असे म्हणतात. एक त्याच्या उजव्या बाजूस असतो. याचे नाव आहे 'अब्दुल मलिक'; आणि दुसरा डाव्या बाजूस असतो. याचे नाव 'अब्दुर्रब' आहे. उजव्या बाजूकडचा इमाम हा 'कुत्ब मदार'पासून कृपाप्रसाद प्राप्त करून त्याचे वाटप उर्ध्व जगासाठी करतो. डाव्या बाजूवाला इमाम पण 'कुत्ब मदार'पासून कृपाप्रसाद प्राप्त करून त्याचे वितरण अधो जगतामध्ये करतो. परंतु डाव्या बाजूवाल्या इमामचा दर्जा हा उजव्या बाजूवाल्यापेक्षा उच्चतर असतो. जेव्हा 'कुत्बुल अक़ताब'ची जागा रिकामी (खाली) होते तेव्हा ती जागा डाव्या बाजूकडील इमामास मिळते आणि उजव्या बाजूकडील इमाम हा डाव्या बाजूकडील इमामाच्या जागी येतो. उपद्रवग्रस्त इहलोकामध्ये सुव्यवस्था प्रस्थापित करणे हे फार कठीण असते. ते ऊर्ध्व जगापेक्षा जास्त कठीण असते. म्हणून डाव्या बाजूकडील वजीर हा जादा शक्तिशाली आणि जादा अनुभवी असतो.

**४) अवताद :** अवताद हे दृढनिश्चयी ईश्वरनिष्ठ भक्त असतात. सर्वश्रेष्ठ परमेश्वर यांच्याद्वारे जगाचे संरक्षण करतो. अवताद चार आहेत. संपूर्ण जगामध्ये चारी दिशेस चार अवताद आहेत. याच्याहून ते कमी नसतात न जादा. या वेळेस (सध्या) जे चार आहेत, त्यांची नावे अशी आहेत – एक पूर्वेकडे ज्यांचे नाव आहे अब्दुल हयी, दुसरे पश्चिमेकडे ज्यांचे नाव आहे अब्दुल अलीम, तिसरे दक्षिणेकडे त्यांचे नाव आहे अब्दुल क़ादर आणि चौथे आहेत उत्तरेकडे यांचे नाव आहे अब्दुल मुरीद.

दुसऱ्या एका मतान्वये अवताद चार असतात. जगाच्या चारी खुंटीवर यांच्यापैकी एक-एक निर्धारित असतो – नेमलेला असतो. ''जेव्हा गौसने या तंबूस क़ायम केले तेव्हा त्याने चार दोऱ्यांना चार खुंट्यांशी मजबूतपणे आवळले.'' (१) एक पश्चिमेकडे असतो त्याचे नाव अब्दुलवदूद आहे. (२) दुसरा पूर्वेकडे ज्याचे नाव अब्दुर्रहमान आहे. (३) तिसरा दक्षिणेकडे, ज्याचे नाव आहे – अब्दुर्रहीम. (४) चौथा उत्तरेकडे, ज्याचे नाव अब्दुल कुद्दूस आहे. जगाच्या स्थैर्यासाठी यांच्याकडून खुंट्यांचे काम घेतले जाते. हे पर्वतासारखे असतात, याच्याशी अभिप्रेत हेतू आहे जमिनीचे हिरवेगार होणे, स्थैर्यलाभ होणे आणि शांती प्राप्त होणे. जसे सर्वश्रेष्ठ अल्लाह पवित्र कुराणामध्ये फ़र्मावतो, ''काय ही वस्तुस्थिती नाही की आम्ही पृथ्वीला अंथरुण (म्हणजेच विश्रांतीचे स्थान) नाही बनवले? आणि पर्वतांना (खुंटीसमान) आधारस्तंभ (नाही बनवले का)? ७८:६-७

**५) अब्दाल :** यांना 'बदला' (परिवर्तन, क्षतिपूर्ती) पण म्हणतात. हे सात असतात आणि सप्तखंडांवर नियुक्त आहेत. हे परमेश्वराचे प्रतिनिधी असे असतात की ज्यांच्या अस्तित्वामुळे जगताचे व्यवहार सातत्याने टिकून असतात. त्यांच्यापैकी कुणी मृत्यू पावल्यास परमेश्वर त्यांच्या रिकाम्या जागी दुसरे नेमतो. सर्वसाधारण लोकांस त्यांच्या अस्तित्वाबद्दल काहीच समजत नसते. पण ते आहेत म्हणून विश्व चालले आहे हे मात्र खरे.

या सात अब्दालची श्रद्धा सात प्रेषितांच्या मतावर असते. त्यांचे काम छुपी मदत करणे आणि असहाय्यांच्या हाकेला हो देणे असते. हे सात अब्दाल पुढीलप्रमाणे आहेत –

१) प्रथम खंडाचे अब्दाल – इब्राहीम अ.च्या मतावर श्रद्धा – नाव आहे अब्दुल हयी

२) द्वितीय खंडाचे अब्दाल – मूसा अ.च्या मतावर श्रद्धा – नाव आहे अब्दुल अलीम

३) तृतीय खंडाचे अब्दाल – हारून अ.च्या मतावर श्रद्धा – नाव आहे अब्दुल मुरीद

४) चतुर्थ खंडाचे अब्दाल – इद्रीस अ.च्या मतावर श्रद्धा – नाव आहे अब्दुल क़ादर

५) पंचम खंडाचे अब्दाल – यूसुफ़ अ.च्या मतावर श्रद्धा – नाव आहे अब्दुल क़ाहिर

६) षष्ठ खंडाचे अब्दाल – ईसा अ.च्या मतावर श्रद्धा – नाव आहे अब्दुस्समीअ

७) सप्तम खंडाचे अब्दाल – आदम अ.च्या मतावर श्रद्धा – नाव आहे अब्दुलबसीर

या सात अब्दालांपैकी अब्दुल क़ादर आणि अब्दुल क़ाहिर ते आहेत की ज्यांना तो प्रदेश किंवा ते राष्ट्र यावर आच्छादित केले जाते, ज्यांच्यावर सर्वश्रेष्ठ परमेश्वर आपले प्रकोप उतरवतो. आणि हेच प्रकुपिताचे साधक बनतात. या सात अब्दालना 'कुत्ब-ए-अक़लीम' पण म्हणतात.

उपरोक्त दोन अब्दालच्या व्यतिरिक्त, आणखी पाच अब्दाल असतात. हे यमनमध्ये राहतात आणि यांना 'कुत्ब-ए-विलायत' असे म्हणतात. 'कुत्ब-ए-आलम'ची कृपा 'कुत्ब-ए-अक़ालीम'वर आणि 'कुत्ब-ए-

अक़ालीम'ची कृपा 'कुत्ब-ए-विलायत'वर आणि 'कुत्ब-ए-विलायत'ची कृपा समस्त संतांवर पसरते. अहिंसा ही 'अब्दाल'ची जीवन-पद्धती आहे. ते कोणत्याच सजीवाला त्रास देत नाही.

यांच्याव्यतिरिक्त तीनशे पन्नास (३५०) अब्दाल आणखीन आहेत. यांपैकी तीनशे (३००) आदमच्या मतावर श्रद्धा असलेले आहेत. मीर सय्यद मुहम्मद जाफ़र मक्की यांच्या मतान्वये तीनशे पन्नास (३५०) नाहीत, तर चारशेचार (४०४) अब्दाल आहेत जे विविध प्रेषितांच्या मतावर चालणारे आहेत आणि यांची विविध सेवा हस्तांतरित होत असते.

असे म्हटले जाते की अब्दाल सात आहेत. यांच्यापैकी चार अवताद आहेत, दोन इमाम आणि एक कुत्ब, आणि हे सर्वच्या सर्व अब्दाल आहेत. असे म्हणतात की यांना अब्दाल याच्यासाठी म्हणतात की जेव्हा यांच्यापैकी कुणाचा मृत्यू घडल्यास त्याची जागा दुसरा (अब्दाल) घेतो. या चाळीसपैकी एकाला घेतले जाते आणि चाळीसमध्ये जी कमी राहाते ती तीनशेमधून पूर्ण केली जाते आणि तीनशेची कमी सदाचारी श्रद्धावंतांच्या जगापासून भरपाई केली जाते. ''जेव्हा धर्मपरायण लोक अल्लाहचे काम करतात तेव्हा ते पूर्वेकडून चालत पश्चिमेकडील काम पूर्ण करतात.''

अब्दाल चाळीस असल्याबद्दल पुढील प्रेषितवचनाचे ('हदीस') प्रमाण प्रस्तुत केले जाते. ''माझ्या धर्मबांधवांचे 'अब्दाल' चाळीस आहेत. पैकी बारा इराक़मध्ये आहेत तर अठ्ठावीस शाममध्ये.''

अली बिन उस्मान हुज्वीरी दाता गंजबख्श यांच्या 'कश्फ़ुल महजूब' या ग्रंथावरून पण असे ज्ञात होते की 'अब्दाल' सात आहेत. हुज्वीरी लिहितात, ''तीनशे आहेत ज्यांना 'अख़्यार' म्हणतात. आणि चाळीस आहेत, ज्यांना 'अब्रार' म्हणतात, आणि सात आहेत, ज्यांना 'अब्दाल' म्हणतात, आणि चार आहेत, ज्यांना 'अवताद' म्हणतात, आणि तीन आहेत, ज्यांना 'नुक़बा' म्हणतात; आणि एक (१) आहेत ज्यांना 'कुत्ब' आणि 'ग़ौस' म्हणतात. अब्दाल अहिंसेचे पुजारी असतात. म्हणून ते हिंस्र पशुंना पण मारत नाहीत.

**६) अख़्यार :** उपरोक्त अब्दालांपैकी सात अब्दाल हे नेहमी प्रवासामध्ये असतात. यांना 'अख़्यार' असे म्हणतात आणि त्या सर्वांचे नाव हुसैन आहे. हे सर्व परमेश्वराचे सहायक व लेश्या म्हणजेच पटल आहेत.

**७) अब्रार :** यांच्यामधूनच चाळीस (४०) अब्दाल हे 'अब्रार' म्हणून ओळखले जातात.

**८) नुक़बा :** हे सर्व तीनशे (३००) आहेत, आणि या सर्वांचे नाव 'अली' आहे.

**९) नुजबा :** हे सत्तर (७०) आहेत. नाव त्यांचे 'हसन' आहे. इजिप्तमध्ये राहतात. हे लोकांचे मामले दुरूस्त करतात आणि त्यांच्या व्यथा दूर करतात. लोकांच्या अधिकारामध्ये बदल घडवतात.

**१०) अमद :** हे चार (४) आहेत. नाव त्यांचे मुहम्मद आहे. भूतलावर राहतात.

**११) मक्तूमान :** हे लोक चार हजार असतात. आपसात एक दुसऱ्यास ओळखतात, परंतु स्वतःस ओळखत नाहीत. असा पोशाख नेसतात की अनोळखी त्यांना ओळखू शकत नाहीत. हे सदाचाराच्या वस्त्रप्रावरणामध्ये लपलेले असतात. आपल्या स्थितीच्या चांगुलपणाशी परिचित नसतात. आपल्या आणि लोकांच्या कामांच्या सर्व परिस्थितीमध्ये लपलेले असतात.

**१२) मुफ़्रदान :** 'मुफ़्रदान' माणसांना किंवा व्यक्तींना 'अफ़्राद' म्हणतात. जेव्हा 'कुत्ब-ए-आलम' प्रगती करतो तेव्हा तो 'फ़र्द' (व्यक्ती) बनतो. वैयक्तिकतेमध्ये ('फ़र्दानियत') पोहोचून तो परिवर्तनाशी वेगळा

होतो. 'कुत्ब-ए-मदार' हा दैवी सिंहासनापासून ते पाताळापर्यंत परिवर्तित होत असतो आणि 'फ़र्द' संशोधित बनतो म्हणजेच ज्ञात होतो. व्यवहार आणि ज्ञानामध्ये मोठा फरक आहे. कुत्ब-ए-मदार निरंतर गुणांच्या प्रकाशामध्ये असतो, तर 'फ़र्द' सत्तेच्या प्रकाशामध्ये. 'कुत्ब-ए-मदार' विशिष्ट आहे आणि 'फ़र्द' सर्वात जास्त विशिष्ट आहे. 'फ़र्दानियत' (वैयक्तिकता) प्रेमानंदाचे स्थान (स्थळ) आहे, आणि येथे येऊन मनोकामना उरत नाही. काही संतांना कार्मिक प्रकाश प्राप्त होतो, तर काहींना नामात्मक प्रकाश, काहींना प्रभावात्मक प्रकाश मिळतो. काही सचेष्ट असतात, तर काही निश्चेष्ट, तर काही दोन्ही असतात. ईशजनांच्या स्थळांना सीमा नसते, परंतु एकमेव लोक या सर्व स्थळांहून श्रेष्ठतर असतात. आविष्करणासाठी एक सीमा असते. परंतु उत्कर्ष व प्रगतीसाठी कोणतीच हद्द नसते. एकमेव व्यक्ती जेव्हा अधिकाधिक प्रगती साधत वैयक्तिकतेमध्ये परिपूर्ण बनतात तेव्हा त्यांना प्रेयत्वाचा दर्जा प्राप्त होतो. पुन्हा प्रेयत्वा ('महबूनियत')मध्ये पण काही ईश्वरी दरबाराचे स्वीकृत सदस्य एक विशेष गौरवपूर्ण वैभवाने सन्मानित केले जातात. जसे, ग़ौसुल सक़लैन महबूब-ए-सुबहानी सय्यद, अब्दुलक़ादर जीलानी आणि सुलतानुल मशायख़ महबूब-ए-इलाही सुलतान निज़ामुद्दीन औलिया.


शेख मुहियुद्दीन इब्न अरबी आपले ग्रंथ 'फ़तूहात मक्किया'मध्ये म्हणतात की मुफ़्रदान एक संघ (जमात) आहेत, जे 'कुत्ब'च्या परिवृत्तापासून बाहेर आहेत, आणि ख़िज्र यांच्यापैकी एक आहेत आणि प्रेषित मुहम्मद हे संदेष्टत्वाअगोदर यांच्यापैकी होते. **ख़िज्र** यांच्या निर्देश प्रेषित मूसा यांच्या संदर्भात आलेला आहे. ही एक विभूति अशी आहे की, परमेश्वराच्या आज्ञेने ती अवतरते, जे काम तीस सोपवलेले असते ती ते आज्ञेबरहुकूम पुरे करते व अंतर्धान पावते. याबाबत अनेक आख्यायिका आहेत. पण हे मात्र खरे की अडचणीत असणाऱ्यास मार्गदर्शन परमेश्वराकडून त्यांच्याकरवी होते. ते हिरव्या वर्णाचे आहेत असे सांगण्यात येते. प्रेषिताचा दर्जा असलेले हे अक्षय, अमर मानले जातात.

अदृश्य ईश्वरनिष्ठ हे पूर्वेपासून ते पश्चिमेपर्यंत सर्वांना पाहतात आणि सर्वांच्या गोष्टी (कथा) ऐकतात.

### रिजालुल ग़ैब (परोक्ष ईश्वरनिष्ठ)

पूर्वजांचे अनुभवांचे बोल सांगतात की त्यांना जी काय यशप्राप्ती झाली होती ती केवळ 'रिजालुल ग़ैब' अर्थात परोक्ष ईश्वरनिष्ठांची बरकत होती. म्हणून 'रिजालुल ग़ैब'चा मान-मरातब राखला पाहिजे. हिच्या पाबंदीमुळे सर्व ऐहिक आणि पारमार्थिक मोहिमा फत्ते होतात. विद्वानांनी व जाणकारांनी 'रिजालुल ग़ैब'चे परिवृत्त पाहण्याची पद्धती सांगितली आहे. ती अशी – सकाळचे मंत्र जप-जाप उरकल्यानंतर त्यांच्या परिवृत्ताकडे पहावे. ते ज्या दिशेमध्ये असतील त्या दिशेकडे अभिमुख व्हावे आणि आपले मन त्यांच्याकडे वळवून मन:पूर्वक (हे मंत्र) असे म्हणावे ''बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम – अस्सलामु अलैकुम या रिजालुल ग़ैब! या अर्वाह मुक़द्दसतः अग़सयूनी बिग़ौसतः वन्नज़रूनी बिनज़रतः व ऐनूनी बिऔनतः इय्याकुम या रूक़बा, या नुक़बा, या नुजबा, या अब्दाल, या अवताद, या अख़यार, या अमद, या ग़ौस, या कुत्ब अग़सयूनी बिरहमतः मुहम्मद बिरहमतक् या अर्रहमार्रहिमीन.''

पुढे 'रिजालुल ग़ैब'चा नकाशा देण्यात आलेला आहे. तो लक्षपूर्वक पहावा. (आकृती १०)




**आकृती १०**

*** संदर्भ :**

१. मुहम्मद ग़ौस ग्वालियरी - जवाहर-ए-ख़म्सा कामिल, पृ. २४०

२. मौलवी सय्यद पीर मुहम्मद-चिराग़-ए-दीन नबवी, पृ. २३०

सुप्रसिद्ध सूफ़ी तत्त्वज्ञ व आचार्य शेख मुहियुद्दीन इब्न अरबी यांनी आपले विख्यात ग्रंथ 'फ़तूहात मक्किया' मध्ये लिहिले आहे की रिजालुल ग़ैबच्या लोकांची अशी संघटना (जमात) आहे की ज्यामध्ये एक आपल्या युगाचा - काळाचा 'कुत्ब' असतो की ज्याच्या समृद्ध सत्तेवर सर्वश्रेष्ठ परमेश्वराची कृपादृष्टी असते आणि ईश्वराच्या दरबारामध्ये तो अब्दुल्ला या नावाने ओळखला जातो आणि त्याच्या उजव्या डाव्या बाजूस दोन व्यक्ती असतात. यांना 'इमाम' असे म्हणतात. कुत्बच्या उजव्या बाजूस जो इमाम (अधिनायक) असतो त्याची दृष्टी नेहमी 'आलम-ए-मलकूत' अर्थात देवदूतांचे जगावर असते आणि त्याचे नाव अब्दुर्रब आहे. डाव्या बाजूच्या इमामाचे नाव अब्दुलमलिक आहे. आणि त्याची दृष्टी नेहमी 'आलम-ए-नासूत' अर्थात इहलोकावर असते. या जमातीमध्ये चार (४) व्यक्ती (काहींच्या मते त्यांची संख्या बारा (१२) सांगितली जाते) असतात.

त्यांना 'अवताद' म्हणतात. यापैकी एक हा पूर्वेकडे असतो, ज्याला अब्दुल हयी या नावाने संबोधले जाते. दुसरा पश्चिमेकडचा. याचे नाव अब्दुल अलीम आहे, तिसरा उत्तरेकडे आहे जो अब्दुल मुरीद या नावाने मशहूर आहे. चौथा दक्षिणेकडे असलेला, याला अब्दुल क़ादर या नावाने नामांकित केले गेले आहे. यांच्याशिवाय या जमातीमध्ये आणखी सात व्यक्ती आहेत. हे 'अब्दाल' या नावाने ओळखले जातात. यांना 'अब्दाल' या कारणासाठी म्हणतात की उल्लेखित जमातमध्ये त्यांना आपले शरीर व स्वरूप बदलण्याचे सामर्थ्य दिले गेले आहे. या जमातीमध्ये ३१२ व्यक्ती 'नुक़बा' या नावाने नामांकित आहेत. ते लोकांच्या रहस्यांची जाण ठेवतात, आणि अठ्ठेचाळीस (४८) 'नुजबा' आहेत. हे प्राणीमात्रांच्या गर्भाकृती बनविण्यासाठी नियुक्त आहेत आणि शिवाय या श्रेष्ठ जमातीमध्ये चाळीसजण 'रजबैन' नावाचे असतात. यांचे नाव 'रजबैन' असण्याचे हे कारण आहे की यांच्यामध्ये 'रजब' महिन्याच्या पूर्वार्धामध्ये एक (१) महामानव जन्मतो आणि त्या महामानवाचे (अध:)पतन 'शाबान' महिन्याच्या सुरुवातीस होतो. शेवटी त्याची अशी अवस्था होते की त्याच्यामध्ये हालचालीची शक्ती नसते, त्राण नसतो.

निष्कर्ष असे की या प्रचुर जमातीच्या सदस्यांचे तपशील (विवरण) वर आलेले आहेच. या सर्वांचे 'रिजालुल ग़ैब' अर्थात ईश्वरनिष्ठ महात्मे असे नामाभिधान आहे. यांना 'मर्दान-ए-ग़ैब' पण म्हणतात. म्हणजेच परोक्ष भक्त-लोक वा परोक्ष भक्त-गण.

**'रिजालुल ग़ैब'चे सहा प्रकार :** 'इन्सान-ए-कामिल' या आपल्या ग्रंथात (पृ. ३५९-६०) सुप्रसिद्ध सूफी आचार्य व तत्त्वज्ञ अब्दुल करीम इब्राहीम जीली यांनी 'रिजालुल ग़ैब'चे सहा प्रकार असल्याचे नमूद केले आहे. त्यापैकी काही मानव जातीमधील आहेत, तर काही आत्म्यांच्या जगाशी निगडित आहेत. त्यांचे वेगवेगळे दर्जे आहेत. त्यांचे प्रकार असे आहेत – (१) सर्वांग परिपूर्ण चमत्कारी साधू, (२) अंतर्ज्ञानी, (३) देवदूत, (४) ईशप्रार्थना मग्न पवित्रात्मा, (५) वनमानुष आणि (६) अव्यक्त बोधिसत्त्व

१) या सर्वांग परिपूर्ण चमत्कारी साधू-जनांना 'कामिलीन' असे म्हणतात. ही सर्वांग परिपूर्ण अशा लोकांची जमात आहे. हे प्रेषितांचे अनुसरण करणारे संत-महात्मे आहेत. हे भौतिक जगांपासून त्या अदृश्य जगामध्ये विलुप्त झालले आहेत, की ज्यांचे नाव 'मुस्तवी उर्रहमान' आहे. त्यांना ओळखता येत नाही, ना त्यांचे गुणधर्म सांगितले जाऊ शकतात, आणि ते मानव आहेत.

२) दुसरे ते अंतर्ज्ञानी लोक आहेत की ज्यांना 'अहल-ए-मआनी' असे म्हणतात. हे देहधारी आत्मे आहेत. ते ईश्वरानिष्ठ संतांच्या स्वरूपामध्ये प्रकट होतात. यांच्या बरकतीमुळे लोक आंतरबाह्य स्वरूपात पराकाष्ठेस पोहोचतात. ते असे आत्मे आहेत, जणू की ते शरीरच आहेत. कारण की त्यांच्यामध्ये अशी शक्ती विद्यमान आहे की ते दृश्य जगापासून प्रवास करत तन्मात्रांच्या जगामध्ये सदेह प्रकट होतात आणि यांचे श्वास म्हणजे उपासना होय. हे लोक पृथ्वीतलावरील 'अवताद' अर्थात दृढचित्त ईश्वरनिष्ठ भक्त आहेत. प्रेषित मार्ग आणि ईश्वराज्ञेसह ते क़ायम (नित्य) आहेत.

३) तिसरे ते देवदूत अर्थात फ़रिश्ते आहेत जे अंत:करणामध्ये देववाणी (आकाशवाणी) आणि संदेह निर्माण करतात आणि निरोप पोहोचवतात. ते संतांपाशी येतात. पवित्राचरणी लोकांशी संवाद साधतात. शरीर स्वरूपात संवेदनाच्या जगामध्ये प्रकट होतात. सर्वसाधारण लोक यांना ओळखत नाहीत.

४) चौथे ते ईशवंदनी पवित्र लोक आहेत. जे आपल्या जागी ईश-प्रार्थनेमध्ये मग्न व व्यस्त आहेत. आपल्या जगापासून निघतात. ते प्रत्यक्ष न आढळता संकेत स्वरूपात आढळतात. सर्व लोकांसाठी त्यांची जाणीव होते आणि काही वेळेस पवित्रात्मा लोक त्यांच्या पताकेखाली येतात, मग ते त्यांना परोक्षाची वार्ता देतात आणि अव्यक्त गोष्टी त्यांना उघडून सांगतात, त्यांच्यावर प्रकट करतात.

५) पाचवे ते ईश्वरनिष्ठ आहेत जे वनक्षेत्रामध्ये राहतात. जगामध्ये त्यांचाही पण एक दर्जा आहे. ते मानवजातीपैकी आहेत. मानवांवर प्रकट होतात आणि मग लुप्त होतात. त्यांच्याशी बोलतात. त्यांना उत्तर देतात. ते बहुधा वन, पर्वत, नदी किनाऱ्यावर राहतात. त्यांच्यापैकी जे शक्तिशाली असतात ते शहरांमध्ये, चांगल्या घरांमध्ये निवास करतात, आपली प्रतिष्ठा बनवतात, परंतु शहराकडे त्यांचा ओढा नसतो. आणि शहरावर त्यांचा काही भरवसा नसतो.

६) हे ना शंकेचे कैदी आहेत, ना वासनेचे गुलाम. ते चिंतन-पिता व कल्पना-मातेची संतती आहेत. त्यांच्या वचनांकडे कोणी लक्ष देत नाही. ते लोकांप्रमाणे कोणता छंद बाळगत नाहीत. ते पाप-पुण्याच्या दरम्यान असतात. हे गुह्यज्ञानी व अव्यक्त बोधिसत्त्व असतात. ते तेज, पद्म, व शुक्ल अशा सत्पटलामागे लपलेले असतात.

**मर्दान-ए-ग़ैब (परोक्ष भक्त-लोक/भक्त-गण)**

काही सूफी आचार्यांचे असे मत आहे की 'मर्दान-ए-ग़ैब' अर्थात परोक्ष भक्त-लोकांची संख्या तीन हजार छप्पन (३०५६) आहे. हे नित्य जगामध्ये असतात. त्यांचा विश्वभर संचार असतो. जेव्हा यांच्यापैकी कोणा एकाचे निधन होते तेव्हा दुसरा त्याची जागा घेतो. म्हणजे तीन हजार छप्पन मधून एक पण कमी नसावे – आणि या तीन हजार छप्पन परोक्ष भक्त-लोकांचे सहा गट आहेत. पहिल्या गटामध्ये तीन हजार भक्त-लोकांचा समावेश आहे. यांना 'औलिया' अर्थात संत-महात्मे आणि 'मर्दान-ए-ग़ैब' म्हणजेच परोक्ष भक्त-लोक असे म्हणतात. दुसऱ्या गटामध्ये चाळीस जणांचा समावेश आहे. यांना 'अब्दाल' आणि 'मर्दान-ए-ग़ैब' असे म्हणतात. तिसऱ्या गटामध्ये सात जणांचा समावेश आहे. यांना 'अवताद' आणि 'मर्दान-ए-नौब' असे म्हणतात. चौथ्या गटामध्ये पाच जण आहेत. यांना 'अख़यार' व 'मर्दान-ए-ग़ैब' म्हणतात. पाचव्या गटामध्ये तीन जणांचा समावेश होतो. यांना 'नुक़बा' व 'मर्दान-ए-ग़ैब' असे म्हणतात. सहाव्या गटामध्ये मात्र एक जणच असतो. याला 'कुत्ब' आणि 'ग़ौस' असे म्हणतात.

'मर्दान-ए-ग़ैब' (परोक्ष भक्त-गण) हे दररोज निर्धारित तारखेस पृथ्वीच्या सर्व दिशांमध्ये आपल्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी कमी-अधिक प्रमाणात विहार-संचार करण्यामध्ये मग्न असतात. या वरिष्ठ भक्तगणाचा असा प्रभाव असतो की जर एखादा इसम (व्यक्ती) प्रवासासाठी त्यांच्या समोरून निघालेला असेल तर त्याला आपल्या प्रवासामध्ये अपयशाचे तोंड पाहिल्याशिवाय राहवत नाही. त्याला संकटाचे दुःख भोगावे लागतील. याच कारणास्तव 'रिजालुल ग़ैब'च्या वारी (विहार, सहल)चा नकाशा, तारीख व दिशेसह उपरोक्त दिला गेलेला आहे. जर एखाद्याला आपल्या प्रवासामध्ये यांच्या भीतीची शक्यता वाटत असेल तर त्यांनी

उपरोक्त कृपायाचनेच्या मदतीने, संकट निवारण करण्यासाठी त्यांच्या मदतीची याचना करावी. ईश्वर कृपेने संकटापासून सुरक्षितता लाभेल.

या 'मर्दान–ए–ग़ैब' चे खास वैशिष्ट्य हे आहे की ते पूर्वेपासून ते पश्चिमेपर्यंत सर्वांना पाहू शकतात आणि सर्वांचे बोलणे ऐकू शकतात. हे सर्व एकूण ४२७ हुद्देदार आहेत. यांच्या दर्ज्यांमध्ये त्यांच्या योग्यतेनुसार परमेश्वराकडून बढती मिळत असते. उदाहरणार्थ, जर 'ग़ौस'चे निधन झाले तर 'अवताद'मधून एकास 'ग़ौस'च्या जागी नेमले जाते. जर 'इमाम'चे निधन झाले असेल तर 'अवताद'मधून कोणी एकास 'इमाम' म्हणून नियुक्त केले जाते आणि बाक़ी याचप्रमाणे क़यास करता येईल.

आशय हा की, जसजसा काळ हा प्रलय दिवसाच्या जवळ जवळ येत जातो तसतसे या भक्त–गणांची संख्या कमी–कमी होत राहील, परंतु निर्धारित हुद्द्यांमध्ये कुठलीच कमी होणार नाही. परमेश्वराकडून एकेकास दोन–दोन, चार–चार हुद्दे बहाल केले जातील आणि विश्वसंचालन व्यवस्थितपणे होत राहील. शेवटी अशी एक वेळ येईल की सर्व हुद्दे एकाच व्यक्तीवर सोपवले जातील आणि मग इकडे त्याचे निधन होण्याच्याच अवकाश की तिकडे पश्चिमेकडून सूर्योदय होईल आणि प्रलय सुरू होईल.

''आम्ही तर निश्चितपणे अल्लाहचेच आहोत आणि आम्ही त्याच्याकडेच परतणार आहोत.'' २:१५६

### १५) अल्लाहचे ओवीबद्ध स्वरूप–सार[३८]

शेवटी, इस्लाम धर्माचे गाढे अभ्यासक व प्रसिद्ध विद्वान डॉ. मुहम्मद दळवी यांनी अल्लाहच्या स्वरूपाचे जे सारगर्भित समर्पक व मार्मिक वर्णन ओवीबद्ध केले आहे, ते उधृत करण्याचा मोह आवरता येत नाही.

अल्लाह म्हणजे परमेश्वर, विधाता. 'अल्लाह' हे त्याचे स्वत:चे नाव आहे. त्याची थोरवी मोठी. त्याची सदैव प्रशंसा असो. ''त्याचे वर्णन करण्यास आभाळाचा फळा, सातही महासागरांची शाई आणि अगणीत वृक्ष यांच्या लेखण्या अपुऱ्याच पडतील.'' पण त्याच्याच शब्द संकलनात त्याचे वर्णन संक्षिप्तपणे असे होऊ शकते–

*प्रारंभ असो हा ।*
*अल्लाहच्या नावे ।*
*दयाळु जो भावे ।*
*व कृपाळु ।।*
*अल्लाह तो अल्लाह ।*
*आहे एकी एक ।*
*एकमेव एक ।*
*फक्त एक ।।*
*अक्षय अनंत ।*
*अनन्य, शाश्वत ।*
*आणि अबाधित ।*
*निरंतर ।।*

*त्याच्यापासून नाही ।*
*कुणी जन्म घेत ।*
*तैसा तो जन्मत ।*
*स्वतः नाही ।।*
*कुणी कोठे नाही ।*
*असा त्याचा सम ।*
*तोच त्याच्या सम ।*
*तोच सम ।।*
*अल्लाह, अल्लाहच ।*
*बाळगावे भय ।*
*त्याचेच अक्षय ।*
*सर्वंकष ।।*
*सत्य आणि श्रेष्ठ ।*
*शब्द अल्लाहचे ।*
*सिद्धी सामर्थ्याचे ।*
*एकमेव ।।*

**१६) अल्लाहचे स्वरूप : तौलनिक विवेचन**[३९]

अल्लाहचे अस्तित्व आणि त्याच्या गुणांमध्ये विश्वास या इस्लाम धर्माच्या आधारभूत आणि मौलिक श्रद्धा आहेत. 'ईश्वर' हा शब्द 'ईशा' शब्दापासून बनलेला आहे. याचा अर्थ आहे 'प्रशासन करणारा', 'राज्य करणारा'. सर्वांचे 'ईशन' म्हणजेच प्रशासन करणारा परमेश्वर, परमात्मा आहे, अल्लाह आहे. 'अल्लाह' शब्द जो मुळात 'अल-इलाह' होता, याचाच समानार्थी आहे. 'अल-इलाह'मध्ये 'अल' आंग्ल भाषेच्या 'दि' (The) उपपद वा अव्ययासमान आहे. जातिवाचकापासून व्यक्तिवाचक नाम (संज्ञा) बनविण्यासाठी याचा उपयोग होतो. 'इलाह' पूज्य, उपास्य या अर्थी येतो. अशा प्रकारे 'अल्लाह'चा अभिप्राय त्या विशिष्ट सत्तेशी आहे, जी सर्वथा 'इलाह' म्हणजेच पूज्य वा उपास्य अशी आहे, सर्वोच्च आणि रहस्यमय-गूढ आहे आणि जी आमच्या कल्पनेच्या पलीकडील आहे. वेदामध्ये पण 'ईल्य' शब्द याच अर्थाने प्रयुक्त आहे. ऋग्वेदाचा एक मंत्र आहे १/१/२ याचा भावार्थ आहे, ''तोच ज्ञानस्वरूप, सर्व पदार्थांचा प्रकाश, परमेश्वरापूर्वीचे, शास्त्रांचे विज्ञ-विद्वान, मंत्रार्थांचे द्रष्टा ऋषी, विद्वान अध्यापक आणि तर्काच्या आधारे नवीन अर्थात वेदार्थांचे वाचन करणारे ब्रह्मचारी यांच्याद्वारे स्तुती, वंदना, मनन आणि शोध करण्यायोग्य आहे. तोच सूर्यासारखा ऋतुंना, आत्म्यासारखा प्राणांना, भोक्तासारखा भोगांना, आचार्यासमान विद्यादि दिव्य गुणांना या जगामध्ये धारण करतो आणि सर्वांना मिळवून (प्राप्त करून) देतो.'' पवित्र कुराणामध्ये 'बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम' १:१, 'अर्रहमानिर्रहीम' १:२, 'त्तव्वाबुर्रहीम' ४९:१२, 'रहमान रहीम' २:१६३, 'ग़फ़ूर रहीम' ७३:२० इत्यादी

समासांमध्ये 'रहमान' आणि 'रहीम' या शब्दांचा प्रयोग केला जातो. अल्लाह आपल्या कृपाशीलतेमुळे 'रहमान' आहे आणि दयावान असल्याकारणाने तो 'रहीम' आहे. त्याला समस्त संसारांचा 'रब' अर्थात पालनकर्ता, विधाता म्हटले आहे. १:१ व ४०:६४

इस्लाम-धर्म ईश्वराच्या एकत्वामध्ये विश्वास ठेवतो. याचसाठी तर 'कुरआन'मध्ये ईश्वराचे एक असणे या सबंधी विभिन्न तर्क प्रस्तुत करण्यात आलेले आहेत. या तर्कांच्या माध्यमाद्वारे या धारणेची पुष्टी करण्यात आली आहे की ब्रह्मांडास बनविणारी जी शक्ती आहे, ती अद्वितीय आहे, निरपेक्ष आहे. अल्लाहशिवाय इतर कुणी ईश्वर असेल ही कल्पनाच मुळी हास्यास्पद आहे. 'अल-इख़्लास' या प्रकरणामध्ये याच गोष्टीस - 'ख़ालिस तौहीद' म्हणजेच विशुद्ध एकेश्वरवाद फार उत्तम प्रकारे समजावून सांगितला आहे. याचा आशय आहे, ''(पैगंबर! हे लोक अल्लाहविषयी विचारतात) तुम्ही त्यांना सांगा, अल्लाह, ज्याची आपण उपासना करतो तो एकच एक आहे. त्याचा कोणीच सहभागी साथीदार नाही. प्रत्येक दृष्टीने तो अनुपम आहे. तो निरपेक्ष आहे. तो एक अशी सत्ता आहे, जी संपूर्णपणे निरंश आहे, विशुद्ध आहे. ११२:१ इतरत्र असे सांगण्यात आले आहे की, ''(लोकांनो!) तुमचा उपास्य केवळ अल्लाह आहे. त्या कृपाळू व दयावंताशिवाय दुसरा कोणीही ईश्वर नाही.'' २:१६३, ४:८७ ''(निःसंदेह) तुमचा ईश्वर एकच आहे.'' ३७:४, ''हाच अल्लाह तुमचा विधाता आहे. सर्व अधिसत्ता त्याचीच आहे. त्याच्याशिवाय अन्य कोणताही ईश्वर नाही. तर मग तुम्ही कोठे भरकटत चालला आहोत?'' ३९:६ ''होय, केवळ अल्लाहची उपासना करा आणि कृतज्ञ (लोकां)पैकी एक व्हा.'' ३९:६६ अनेकेश्वरवाद्यां (मुश्रिकां)ना अल्लाह तोपर्यंत क्षमा करत नाही जोपर्यंत ते अनेकेश्वरते (शिर्क)चा त्याग करून एकेश्वरवाद ('तौहीद') ग्रहण करत नाहीत इत्यादी अनेक विधाने ईश्वराचे एकत्व आणि त्याच्या अविभाज्यतेवर बळ (जोर) देतात.

अशा प्रकारची, 'ला इलाह इल्-लल्लाह' - अल्लाहाशिवाय कुणीच इलाह (उपास्य) नाही - अल्लाहसंबंधी विधाने की ज्यांच्यामध्ये 'तौहीद' अर्थात एकेश्वरवादच सत्य असल्याचे म्हटले गेले आहे आणि फक्त अल्लाहची उपासना करण्याच्या निर्देशासोबत त्याच्याशी इतर कुणाचे सहभागित्व न ठरविण्याचा आदेश आहे. अशाप्रकारचे आदेश पवित्र कुराणामध्ये प्रचुर प्रमाणात आढळतील. इस्लाम-धर्माच्या या विचारधारेचे ऋग्वेदामधील 'य एक इत् तमुष्टिहि,' ६/४५/१६ अर्थात तो एक आहे, त्याचीच उपासना करा आणि 'मा चिदन्यद विशसत' ८/१/१ अर्थात कुणी दुसऱ्याची उपासना करू नका इत्यादी विभिन्न सूक्तांमध्ये समर्थन आहे. अथर्ववेदाच्या 'प्रजापते न त्वदेतानि अन्यो विश्वा जातानि परिता बभूव' ७/८/३ अर्थात हे प्रजेच्या पालका परमेश्वरा! तुझ्याशिवाय कुणीच या उत्पन्न पदार्थांचा मालक (स्वामी) नाही - अशासारख्या मंत्रांमध्येपण ईश्वराच्या एकत्वतेचे समर्थन आहे. याच गोष्टीस छांदोग्य उपनिषदामध्ये अशा प्रकारे म्हटले गेले आहे - 'ओमित्येतद क्षरमुद्‌गीथमुपासते' (मंत्र - १) अर्थात ओम् (ॐ) ज्याचे नाव आहे आणि जो कधीच नष्ट होत नाही तोच उपासना करण्यायोग्य आहे, इतर नव्हेत.

शंकराचार्यांच्या अद्वैतवादामध्ये 'एकोब्रह्म द्वितीयोनास्ति'चे जे स्पष्टीकरण आहे, ते इस्लाम-धर्माच्या उक्त मान्यतेशी भिन्न नाही. परंतु पुन्हा 'जीवो ब्रह्मै वनापरः'द्वारे शंकराचार्य इस्लामाच्या या एकेश्वरवादापासून अलग हटून

जातात. ईसाई-धर्मा (ख्रिश्चन धर्म)मध्ये पण ही मान्यता दिसून येते. 'इंजील' अर्थात बायबलमध्ये वेगवेगळ्या प्रसंगांमध्ये ईश्वराची अद्वैतता मान्य आहे. 'यिहूदाची पत्री'मध्ये स्पष्टपणे त्याला (ईश्वराला) 'अद्वैत स्वामी' आणि 'अद्वैत बुद्धिमान'ची संज्ञा दिली गेली आहे. ४:२५ 'योहनरचित सुसमाचार'मध्ये त्याला 'अद्वैत सत्य ईश्वर' (यौ. प. १७ आ. ३) असे सांगण्यात आले आहे.

इस्लाम-धर्मामध्ये अल्लाहची अनेक वैशिष्ट्ये सांगण्यात आली आहेत. त्याला सृष्टा, दृष्टा, पोषणकर्ता आणि संहर्ता असे म्हटले गेले आहे. अशाप्रकारे ब्रह्मा, विष्णू आणि महेश - तीन्ही दैवतांच्या गुणांचे समाहार त्याच्या (अल्लाह)मध्ये आहे. भारतीय तत्त्वज्ञानाची विचारधारापण याच्यासोबत चालत असलेली प्रतीत होते. पवित्र कुराणाच्या अनेक श्लोकांमध्ये स्पष्ट उल्लेख आहे की, ''तोच आकाश आणि जमीन यांचा आद्यप्रवर्तक आहे.'' २:११७, २०:४, २५:५९ ''तो चिरंजीव आणि चिरस्थायी आहे.'' ३:२, ''खरोखर तोच आहे अल्लाह जो (धान्याच्या) दाण्यांना आणि फळांच्या (टणक) गुठळीला फोडतो, तोच दिवसाचा उदय घडवून आणतो.'' ६:९५-९६, ''तोच जीवन देतो आणि तोच मृत्यू देतो.'' ७:१५८, १०:५६, ''तोच आहे, ज्याने तुमच्यासाठी कान, डोळे व मन निर्माण केले, आणि तोच आहे, ज्याने तुम्हाला पृथ्वीवर (चोहीकडे) पसरवून टाकले, आणि तोच आहे, जो जीवन आणि मृत्यू देतो.'' २३:७८-८०, ''अल्लाह सर्वोत्कृष्ट उपजीविका प्रदान करणारा आहे.'' २२:५८, ६२:११, आणि तोच होय जो (मनुष्यास) हसवतो आणि रडवतो; आणि तोच होय जो मरण देतो आणि जीवन(ही) देतो.'' ५३:४३-४४, आणि त्याच प्रकारे, ''अल्लाहशी दृढ संबंध स्थापित करा. तोच तुमचा खराखुरा स्वामी आहे, कितीतरी उत्तम स्वामी आणि किती उत्तम सहाय्यकर्ता!'' २२:७८ एवढेच नव्हे तर, संपूर्ण सृष्टीचा 'रब' अर्थात प्रभू असण्याच्या अनुषंगाने तो जगाच्या प्रत्येक वस्तूचा पालनकर्ता आणि नियंता आहे.'' १:१ संपूर्ण ब्रह्मांड त्याच्या अधीन आहे, त्याच्या वशामध्ये आहे. 'अथर्ववेदा'मध्ये ईश्वराच्या नियंतत्त्वाच्या या गुणाचे विवेचन अशाप्रकारे आहे -

''***प्राणाय नमो यस्य सर्वमिदं वशे***
***यो भूतः सर्वस्येश्वरो यास्मिन्नसर्व प्रतिष्ठितम् ।।***''

- अथर्ववेद, कांड ११, सूक्त ४, मंत्र १

अर्थात जसे प्राणाच्या वशामध्ये सर्व शरीर आणि इंद्रिये असतात तद्वत संपूर्ण जग हे परमेश्वराच्या वशामध्ये असते.

ईसाई (ख्रिश्चन) मतावलंबी पण ईश्वरास जगाचा रचिता(निर्माण करणारा), एकाच (प्रकारच्या) रक्ताने मानवाच्या सर्व जातीना संपूर्ण पृथ्वीवर वसवण्यासाठी बनवणारा, भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळाचा प्रणेता, 'अलफ़ा' आणि 'ओमिगा' अर्थात आदी आणि अंताचा तटस्थ प्रेक्षक मानतात. (प्रेरितांची क्रिया १७वे पर्व, २४-२६, योहनचे प्रकाशित वाक्य, पहिले पर्व) इंजील (बायबल) मध्ये एके ठिकाणी त्याची प्रशंसा-स्तुती करताना म्हटले गेले आहे की,'हे परमेश्वर, आमचा ईश्वर तू महिमा, आदर आणि सामर्थ्ययोग्य आहेस, कारण की तूच सर्व वस्तूंना निर्माण केलेस आणि तुझ्या इच्छेमुळेच ते अस्तित्वात आले आणि निर्माण झाल्या (योहनचे प्रकाशित वाक्य, चौथे पर्व, ११)

शीख धर्माचे संस्थापक गुरू नानक यांनी पण ईश्वरास 'कर्ता पुरुषा'ची संज्ञा दिली आहे, भय आणि वैर रहित असे म्हटले आहे आणि त्याच्या शाश्वत स्वरूपास स्वीकारले आहे. ''ओ सत्यनाम कर्ता पुरुष निर्भो निर्वैर अकालमूर्त अजोनि सहभं गुरू प्रसाद जब आदि सच, जुगादि सच, है भी सच, होसी भी सच.'' जपुजी पौडी-१

पवित्र कुराणामध्ये अल्लाहच्या इतर दिव्य गुणांसोबतच त्याच्या क्षमाशीलतेवर फार भर देण्यात आलेला आहे. यामुळेच जो 'तौबा' अर्थात पश्चात्ताप, अनुताप, क्षमायाचना म्हणजेच इत:पर अपराध आणि निषिद्ध कर्म भविष्यामध्ये करणार नसल्याची दृढ प्रतिज्ञा करतो आणि त्या (अल्लाह)ची भक्ती आणि आज्ञापालनाच्या कर्मांमध्ये जोडला जातो, ईश्वर त्याला क्षमा करतो. ''पण मी अशा लोकांच्या बाबतीत फार क्षमाशील आहे, जे (भूतकाळातील चुकांविषयी) पश्चात्ताप करतात आणि श्रद्धा धारण करून सत्कर्मे करतात आणि अढळपणे सन्मार्गावर कायम राहतात.'' २०:८२ दासांचा पश्चात्ताप ताबडतोब स्वीकारणे हा त्याचा स्वभाव आहे. ''तोच आपल्या दासांकडून त्यांच्या क्षमायाचनेचा स्वीकार करतो आणि (त्यांच्या) चुका माफ करतो.'' ४२:२५ म्हणून तर, त्याच्यासंबंधी वारंवार म्हटले गेले आहे, ''अलैहि इन्नह् हुवत्तव्वाबुर्रहीम'' २:३७ म्हणजेच ''खात्रीने तो वारंवार पश्चात्तापाचा स्वीकार करणारा व असीम दयाळू आहे.'' २:३७ त्याच्या उदारतेविषयी याहूनही जास्त आणखी काय प्रमाण होऊ शकते की तो लोकांच्या अत्याचारासंबंधाने त्यांना एक निश्चित वेळेपर्यंत सवलत देत असतो. ''पण तो लोकांना एका निर्धारित कालावधीपर्यंत उसंत देत असतो.'' १६:६१ कदाचित् स्वत: होऊन माणूस जागरूक होऊन जाईल. तसे तो, कुणाच्याही कामाबद्दल बेसावध नसतो.'' ''हे त्यांना माहीत नाही की काय, जे काही ते लपवीत आहेत आणि जे काही प्रकट करत आहेत, ते सर्व अल्लाह जाणून आहे.'' २:७७ ''आणि ते जे काही करत आहेत ते सर्व अल्लाह पहात आहे.'' २:९६, एवढेच नव्हे तर, ''आणि याची जाणीव ठेवा की, अल्लाह तुमच्या मनातील सर्व गोष्टींना जाणून आहे आणि म्हणून त्याचे भय बाळगा.'' २:२३५ ईश्वराची सर्वज्ञता, सर्व शक्तिमानता, दयाळुता, न्यायतत्परता आणि त्याच्या अंतर्यामी स्वरूपाविषयी न्यायदर्शनामध्ये अशाप्रकारे विवेचन केले गेले आहे (त्याचा आशय असा आहे) -

ईश्वर निराकार, सर्वज्ञ आणि सर्वशक्तिमान आहे. तो अनादी, अविकारी, अनंत आणि सर्वव्यापक शक्ती आहे. तो सच्चिदानंद (सत्, चित् आणि आनंदयुक्त)स्वरूपाचा, दयाळु आणि न्यायतत्पर आहे. तो समस्त जगांमधील प्राणीमात्रांना पोषण प्रदान करतो.

'गीते'मध्ये सुद्धा त्याला 'वेत्ता' अर्थात सर्व काही जाणणारा असे म्हटले गेले आहे. (अध्याय ११, श्लोक ३८) 'वेत्तासि वद्यं च परं चं धाम' अर्थात ''तुम्ही सर्वज्ञ आहात आणि जे जे ज्ञेय आहे ते सर्व तुम्हीच आहात. तुम्ही त्रिगुणातीत असे परम आश्रयस्थान आहात.'' ११:३८ दुसऱ्या एका ठिकाणी

''ईश्वर : सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन्सर्वभूतानि...'' १८:६१

अर्थात ''हे अर्जुना! परमेश्वर प्रत्येक जीवाच्या हृदयात स्थित आहे आणि तो सर्व जीवांचे भ्रमण निर्देशित करीत आहे.'' १८:६१ असे म्हणत परमेश्वराच्या निर्बाध गतीचा स्वीकार करण्यात आला आहे. त्याची ही निर्बाध गतीच त्याचे अंतर्यामी स्वरूपाचे परिचायक आहे.

पवित्र कुराणामध्ये मानवावर अल्लाहच्या उपकारांचे विवेचन विशद केले आहे. या वर्णनाद्वारे सेवक-दासाच्या मनामध्ये ईश्वराप्रती आस्था आणि निष्ठेस दृढ-मजबूत करण्याचे प्रयत्न केले गेले आहे. या संदर्भात वारंवार असे निवेदन केले गेले आहे की, ''अल्लाह आकाशातून (ढगांद्वारे) पाणी वर्षितो. आणि जमीन मृतप्राय झाल्यानंतर त्या (पाण्या)द्वारे तिला जीवन प्रदान करतो.'' १६:६५ ''तसेच (आम्ही तुम्हाला पौष्टिक आहार प्रदान करीत आहोत) खजूर आणि द्राक्षांच्या रूपाने देखील. तुम्ही यांपासून कैफ आणणारे पेय तसेच आरोग्यदायी अन्न प्राप्त करता. आणि (पाहा कशा प्रकारे) तुमच्या विधात्याने मधमाशीला अंत:प्रेरणा दिली की सर्व प्रकारच्या फळांचे (व फुलांचे) रस शोषित राहा. तिच्या पोटातून विविधरंगी पेय बाहेर पडते (म्हणजेच मध), जे लोकांसाठी आरोग्यदायी आहे.'' १६:६७-६९ ''अल्लाहनेच तुम्हाला तुमच्या मातांच्या उदरांतून बाहेर काढले, रहाण्यास घरे दिली आणि जनावरांच्या लोकर, केस आणि कातड्यांपासून वस्त्र बनविण्याची प्रेरणा दिली. ही वस्त्रप्रावरणे तुमची गुप्तांगे लपवतात १६:७८-८१ ''हे आदमची संतती! तुमची लज्जा झाकून टाकण्यासाठी आम्ही (भूतलावर) तुमच्याकडे वस्त्रप्रावरणे अवतरवली आहेत आणि खरोखरच ते सुंदर पोषाख आहेत.'' ७:२६ ''हे मानवा! खरोखर तुमच्याप्रत तुमच्या विधात्याकडून उपदेश आलेला आहे व तो अंत:करणामध्ये जो काही (विकार) आहे त्यावर एक उपाय (आहे), आणि श्रद्धावंतांसाठी मार्गदर्शन व कृपा आहे.'' - १०:५७ ''त्यानेच श्रद्धावंतांना आपल्याकडून मन:शांती प्रदान केली.'' ४८:४

नास्तिकांना समजावण्यासाठी, ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी पवित्र कुराणामध्ये अनेक तर्क प्रस्तुत केले गेले आहेत. मानवाच्या चहूकडे आणि स्वत: त्याच्या व्यक्तित्वामध्ये ईश्वराच्या अस्तित्वाच्या खुणा पसरलेल्या आहेत. पवित्र कुराण त्यांना ईश्वराच्या अस्तित्वासंबंधी पुरावा-प्रमाण म्हणून उपस्थित करते. एके ठिकाणी श्लोकांचा अर्थ आहे - ''आणि (जे जे अस्तित्वात आहे) त्यांपैकी त्यांच्यासाठी एक खूण (संकेत) म्हणजे रात्र आहे. आम्ही तिच्यातून दिवसाला बाहेर काढतो. तेव्हा (लोक) अंधारात राहून जातात. आणि सूर्य, तो ठरवून दिलेल्या कक्षेत भ्रमण करीत असतो. तो सर्वशक्तिमान व सर्वज्ञ अशा (अल्लाहचा) नियम आहे. आणि आम्ही चंद्राच्या कला ठरवून दिलेल्या आहेत, तो हळूहळू क्षीण होत जातो, आणि शेवटी खजुरीच्या सुकलेल्या फांदीसारखा होऊन जातो. (भ्रमण करताना) ना सूर्य चंद्राला मागे टाकून पुढे जाऊ शकतो, ना रात्र दिवसाच्या वेळेला कमी करू शकते. सर्व (आमच्या नियमानुसार) आपापल्या कक्षेत गतिमान आहेत.'' ३६-३७-४० इत्यादी कथनांमध्ये ईश्वराच्या अस्तित्वाचे समुचित प्रमाण आहेत. पवित्र कुराणामध्ये दुसऱ्या एका ठिकाणी असे सांगितले गेले आहे ''कैफ़ तक्फुरून बिल्लाहि व कुंतुम् अम्वातन् फ़ अह्याकुम् सुम्म युमीतुकुम् सुम्म युह्यीकुम् सुम्म इलैहि तुर्जऊन'' २:२८

अर्थात ''तुम्ही अल्लाहला मानण्यास नकार कसा काय देऊ शकता? (हे तर तुम्ही जाणून आहात की), तुम्ही तर निर्जीव अवस्थेत होता, तेव्हा त्याने तुम्हाला जीवन प्रदान केले, आणि तोच तुमचा मृत्यू घडवून आणेल आणि (मृत्यू)नंतर (तोच) तुम्हाला पुन्हा जिवंत करेल आणि नंतर तुम्हाला त्याच्याकडेत परत आणले जाईल. तोच तर आहे (तुमचा विधाता), ज्याने या पृथ्वीवर जे काही आहे तुमच्यासाठी निर्माण केले.'' २:२८-२९ एक दुसरा तर्क असा आहे ''का या लोकांनी पक्ष्यांवर नजर केली नाही की ते यांच्या (शिरा) वरती

पंख (फडफडवतात व कधी आपले पंख) पसरून ठेवतात व (कधी) आखडून घेतात, (दोन्ही स्थितीत) परम दयाळू (परमेश्वर)च त्यांस (हवेवर) थांबवून राखतो. काही संशय नाही की तोच प्रत्येक वस्तूवर नजर राखतो.'' ६७:१९ खरोखर, ही अल्लाहची दयाळुता आहे, की ज्यामुळे पक्षी हवेत उडतात. आणि मासे पाण्यावर पोहतात, तरी पण खेद आहे की अनिश्वर – वाद्यांचे डोळे उघडत नाहीत. त्याचप्रमाणे आणखी एक तर्क प्रस्तुत केला गेला आहे यात म्हटले गेले आहे ''(सत्य नाकारणाऱ्यांना) सांगा, ''तुम्ही यावर कधी विचार केला आहात का की, जर तुमचे सर्व पाण्याचे साठे जमिनीत अचानक लुप्त झाले तर (अल्लाह शिवाय दुसरा) कोण आहे, जो तुमच्यासाठी शुद्ध पाणी उपलब्ध करून देऊ शकतो?'' ६७:३० खरी गोष्ट तर ही आहे की अल्लाहच्या कृपा–दृष्टीशिवाय एक क्षणभर पण जिवंत राहू शकत नाही. अशा परिस्थितीमध्ये, त्याच्याशी पराङ्मुख राहणे अक्षम्य अपराध आहे. अशा प्रकारच्या लोकांना तो कठोरात कठोर दंड देण्यास पण संकोच करत नाही. पवित्र कुराणामध्ये म्हटले आहे, ''हेच लोक होत की ज्यांनी आपल्या विधात्या (च्या सामर्थ्या)स नाकारले, आणि हेच लोक होत की ज्यांच्या गळ्यांत (पुनरुत्थानाचे दिवशी) मानखोडे (पडलेले) असतील आणि हेच लोक नरकवासी होतील, की ते नरकात निरंतर राहतील.'' १३:५ अशाप्रकारे नाना प्रकारच्या उक्तींच्या माध्यमाने लोकांना ईश्वर–भक्तीचा आदेश दिला गेला आहे आणि पथभ्रष्टतेपासून वाचविण्याचे यथासाध्य प्रयत्न केले गेले आहेत.

पवित्र कुराणामध्ये ईश्वराची वास्तविक शक्ती आणि दयाळुतेस यथाशक्य जास्तीत जास्त स्पष्टपणे उघडून दाखवण्याचे प्रयत्न केले गेले आहेत. 'सूर: अन्–नूर'च्या ३५व्या श्लोकामध्ये त्याच्यासंबंधी म्हटले गेले आहे की तो (अल्लाह), ''अल्लाहु नुरूम्समावाति वल्अर्ज़'' आणि ''नूरून् अला नूरिन'' २४:३५ म्हणजेच ''अल्लाह आकाश आणि पृथ्वी यांचा प्रकाश आहे'' आणि ''प्रकाशावर प्रकाश!'' भगवद्गीतेमध्ये पण ईश्वरास 'प्रभास्मि शशि सूर्य यो:' (७:८) आणि 'ज्योतिषामपि तज्ज्योति' (१३:१८) म्हणजेच ''चंद्र व सूर्याचा प्रकाश मी आहे.'' आणि ''सर्व प्रकाशमान वस्तूंमधील प्रकाशाचे उगम तो आहे.'' (१३:१८) म्हणजेच ईश्वराला ज्योतिची ज्योति मानले गेले आहे. मुंडकोपनिषद्मध्ये त्या ब्रह्मास ''आवि: सनिहितं गुहाचरं नाम'' अर्थात प्रकाशस्वरूप सर्वांच्या हृदयामध्ये स्थित आणि गुहाचर हे नाव धारण करणारा म्हटले गेले आहे. छांदोग्योपनिषदामध्ये त्याच्यासाठी 'भामनी' शब्दाचा प्रयोग केला गेला आहे, ज्याचा अर्थ आहे प्रकाशरूप– ''एष उएव भामनीरेषहि सर्वेषु लोकेषु भाति'' (अ. ४, खंड १५, मंत्रसंख्या ४) म्हणजेच ''हा पुरुष निस्संदेहच प्रकाशरूप आहे, कारण की हा पुरुष सर्व जगांमध्ये आदित्य रूपाने प्रकाशतो.'' यजुर्वेदमध्ये त्याला सूर्यादि तेज:स्वरूप सर्व पदार्थांचा गर्भ (उत्पत्ती स्थान) असल्याकारणाने 'हिरण्यगर्भ' असे म्हटले गेले आहे. (यजुर्वेद, अध्याय १३, मंत्र ४) पवित्र कुराण म्हणते – ''अल्लाह (त्याच्यावर), विश्वास ठेवणाऱ्या लोकांचा आश्रयदाता आहे. तो त्यांना अंधकारातून बाहेर काढून प्रकाशाकडे आणतो.'' २:२५६ म्हणून तर प्रेषित मुहम्मद साहेब यांची कृपायाचना ('दुआ') आहे, ''हे अल्लाह! मला प्रकाश दे.'' उपनिषदांमध्ये पण जागोजागी 'तमसो मा ज्योतिर्गमय' अशी प्रार्थना केली गेली आहे. अर्थात ''हे प्रभो ! तू मला अंधाराकडून प्रकाशाकडे घेऊन चल.'' भगवद्गीते'मध्ये पण ''मी, ज्ञानरूपी तेजस्वी दीपाने, अज्ञानामुळे उत्पन्न झालेल्या अंधकाराचा नाश करतो.''

(१०-११) याशिवाय पवित्र कुराणामध्ये ईश्वरासाठी 'रब्बुल आलमीन' (सर्व जगांचा विधाता) 'हुवल हक्क़' (तोच सत्य आहे) आणि 'इन्नहू बेकुल्ले शैइम्मुहीत' (सर्व वस्तुमात्रांना घेरलेले आहे) इत्यादी शब्दांचे प्रयोग केले गेले आहे. या शब्दांमध्ये 'ब्रह्म सत्यं जगत्मिथ्या' (शंकराचार्य) तथा 'ईशावास्यमिदं सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत' (ईशावास्योपनिषद्, मंत्र १) इत्यादी सूक्तांचा गूढार्थ ध्वनित आणि व्यंजित आहे. त्याचप्रमाणे अल्लाहस अचिंत्य आणि बुद्धिपलीकडील स्वीकारून पवित्र कुराणामध्ये म्हटले गेले आहे - ''(मानवी)दृष्टी त्याच्यापर्यंत पोचू शकत नाही परंतु तो सर्वांच्या दृष्टीपर्यंत पोचतो (सर्वांच्या नजरा त्याच्या आवाक्यात आहेत.)'' ६:१०३ त्याची सर्वव्यापकता आणि अणु-रेणूमध्ये त्याचा निवास असल्याची गोष्ट अशाप्रकारे प्रस्तुत करण्यात आलेली आहे- ''तुम्ही जिकडे वळाल तिकडे तुम्ही अल्लाहशी सामोरे व्हाल.'' २:११५

भगवद्गीताचे खालील उद्धरण या आशयाहून काही वेगळे नाही-

*अक्षराणामकारोऽस्मि द्वन्द्वः सामासिकस्य च ।*
*अहमेवाक्षयः कालो धाताहं विश्वतोमुखः ।।* १०:३३

अर्थात अक्षरांमध्ये 'अ'कार मी आहे आणि समासांमध्ये द्वंद्व समास मी आहे. अविनाशी काळ मी आहे आणि सृष्टीकर्त्यांमध्ये ब्रह्मदेव मी आहे.

सारांश, ऋग्वेदाच्या खालील श्लोकामध्ये ईश्वराचे जे वर्णन आहे, त्यामध्ये त्या समस्त गुणांचा समाहार आहे -

''*युञ्जन्ति ब्रह्म मरूषं चरन्तं परि तस्थुषः*
*रोचन्ते रोचना दिवि ।।* २।६।१ ।।''

अर्थात विद्वान योगीजन सर्वांना नियम-व्यवस्थेमध्ये बांधणारे महान, सर्वाश्रय दोषरहित, अहिंसक, तेजस्वी, समस्त स्थावर अचेतन नैसर्गिक संसारामध्ये व्यापक परमेश्वराचे समाहित चित्तयुक्त बनून ध्यान करतात. त्याच्या योगाभ्यासाच्या आधारे साक्षात्कार करतात. तेच ज्ञानमय प्रकाशमय आणि परमज्योतिर्मय तपामुळे तेजस्वी बनून प्रकाशस्वरूप परमेश्वर अथवा मोक्षामध्ये प्रकाशित होतात, विराजमान होतात.

अशाप्रकारे आपण पाहतो की पवित्र कुराणामध्ये ईश्वरासंबंधी अनेक उल्लेख आहेत. हे उल्लेख कुठे त्याची सत्ता आणि गुण व्यक्त करतात, तर कुठे त्याची दयाळुता, कृपाशीलता आणि शक्तिमत्तेची ओळख करून देतात. इतरत्र नास्तिक विचारधारेचे खंडन आहे तर कुठे ईश्वरभक्ती, सदाचरण आणि सर्वस्व समर्पणाची प्रेरणा देतात.

## १७) अल्लाहचे अस्तित्व, त्याची सत्ता, त्याचे गुण व परोक्ष जगाशी निगडित पारिभाषिक शब्दार्थ संग्रह

समस्त ब्रह्मांड त्रयीने व्याप्त आहे. अल्लाह (परात्पर परब्रह्म), ब्रह्मांड आणि मानव हीच ती त्रयी होय. या त्रयीचे, परस्पर सहसंबंध या दृष्टीने दोन गट पडतात. ते गट आहेत - (१) ब्रह्मांड आणि पिंडांड (मानव) अथवा विश्व आणि मानव, व (२) ब्रह्म आणि ब्रह्मांड किंवा विश्वंभर आणि विश्व. या दोन गटांशी निगडित पारिभाषिक शब्दार्थ संग्रह अनुक्रमे पुढे देण्यात आला आहे.

| १) ब्रह्मांड आणि पिंडांड (मानव) अथवा विश्व आणि मानव : यौग पद्य (सहसंबंध) | | | | |
|---|---|---|---|---|
| ब्रह्मांड वा विश्व | | | पिंडांड वा मानव | |
| १ | **अक़्ल (कुल्ल)** | विश्व-ज्ञान | **रूह** | आत्मा, प्रज्ञा |
| | **वा (अव्वल)** | | **मलकूत** | देवलोक, जीवात्मा |
| २ | **नफ़्स (कुल्ल)** | विश्वात्मा | **तबीयत** | चित्त |
| | **वा (अव्वलु)** | | **मादः** | पदार्थ (गुण) |
| ३ | **तबीयत (कुल्ल)** | स्वभाव | **जिस्म** | देह |
| ४ | **जौहर-ए-हबा** | मूल पदार्थ | **शक्ल** | रूपा-कार |
| ५ | **जिस्म वा** | विश्व-शरीर | **लतीफ़-ए-क़ल्बी** | मनोमृदुलता |
| | **जिस्म कुल्ल** | | **अनिय्यत:** | अहंता, अहंकार |
| ६ | **शक्ल** | विश्वरूप | **राय** | परामर्श |
| ७ | **अर्श** | दिव्यासन, | **अंदाज़ा** | अनुमान, अटकळ |
| | | ईश्वरी सिंहासन | **कुव्वत-ए-इल्म व नफ़्स** | ज्ञानशक्ती व प्राण |
| ८ | **कुर्सी** | आसन, पादपीठ | **कुव्वते हाफ़िज़ा व** | स्मरणशक्ती व |
| ९ | **अतलस** | खग, आकाश | **मुवख़्ख़िर दिमाग़** | पश्च मेंदू |
| १० | **मनाज़िल/बुरूज** | नक्षत्र/राशी | **कुव्वते आक़िला व तालू** | विवेकशक्ती व टाळू |
| ११ | **ज़ुहल** | शनी | **कुव्वते मुफ़ाक़िरा व** | चिंतनशक्ती व |
| १२ | **मुश्तरी** | गुरू | **वस्त दिमाग़** | मध्य मेंदू |
| १३ | **मिर्रीख़** | मंगल | **कुव्वते वाहिमा व** | कल्पनाशक्ती व |
| १४ | **शम्स** | रवी | **रूहे हैवानी** | पाशविक वासना |
| १५ | **ज़ुहरा** | शुक्र | **कुव्वते ख़याल व** | विचारशक्ती व |
| १६ | **उतारद** | बुध | **मुक़द्दम दिमाग़** | अग्र मेंदू |
| १७ | **क़मर** | सोम | **हवासे ज़ाहिर व** | बाह्येंद्रिये व |
| १८ | **नार** | अग्नी, तेज | **उनकी आज़ा** | त्यांचे अंग |
| १९ | **हवा** | वायू | **हरारत व सफ़राए हाज़मा** | उष्णता व जठराग्नी |
| २० | **माए** | आप (पाणी), (जलक्षेत्र) | **रतूबत व ख़ून-ए-जाज़बा** | आर्द्रता व आकर्षण शक्ती |
| २१ | **अर्ज़** | पृथ्वी(जमीन), (धरातल) | **बलग़म व दाफ़े बरूदत** | श्लेष्मा व शीतलता निवारक |
| २२ | **जमाद (मादन)** | खनिज | **पोस्त व सोदा मासका** | चर्मधातू व वात |
| २३ | **नबात** | वनस्पती | **दाँत व हड्डियाँ** | दात आणि हाडे |
| २४ | **हैवान** | प्राणी | **बाल व नाख़ून** | केस आणि नखे |
| २५ | **मलायक** | देवदूत | **क़वाई शहवानिया** | वासना-शक्ती |
| २६ | **जिन्न** | दैत्य, पिशाच्च, | **ख़वातिर-ए-नेक** | सुविचार |
| | | यक्ष, किन्नर | **ख़वातिर-ए-बद** | कुविचार |
| २७ | **इन्सान** | मानव | **इन्सान** | मानव |

येथेच विश्व आणि मानव यांच्या संबंधाच्या अनुषंगाने काही इतर महत्त्वपूर्ण बाबींचा खुलासा केल्यास वावगे ठरणार नाही. यास्तव, विश्व आणि मानव यांच्या अस्तित्वाचे स्वरूप आणि अर्थविषयक मूलभूत प्रश्नांचा शब्दप्रामाण्य न स्वीकारता केला जाणारा विचार म्हणजे **तत्त्वज्ञान**. परमेश्वराने आपल्या कृपेने मानवास 'अश्रफ़ुमलख़लूक़ात' म्हणजेच प्राणिमात्रांचा अर्थात विश्वशिरोमणी बनवले आहे. म्हणून तर मनुष्य हा सृष्टीचा मुकुटमणीच आहे. मानव हा ईश्वराची सर्वोच्च रचना आहे. याचेप्रमाण 'पवित्र कुराण' असे प्रस्तुत करते – ''आम्ही मानवाला उत्तम आकार देऊन (उत्कृष्ट निर्मितीच्या रूपाने) निर्माण केलेले आहे.'' ९५:४ याची सिद्धता व पुष्टी उपरोक्त सहसंबंधाचे' 'अब्जद' वर्णांकशास्त्राच्या सांख्यिकीय हिशोबाने सुद्धा होते. ब्रह्मांडाच्या उपरोक्त एकूण २६ घटकांची वर्णांकशास्त्राच्या हिशोबाने – उत्तमा (शतक), मध्यमा (दशक), आणि निम्नगा (एकक, सुटे) या सर्वांची एकूण बेरीज ही १८९ होते आणि एकमात्र 'इन्सान' या शब्दाची बेरीज १६२ होते. याचे रूपांतर वरील हिशेबाने केल्यास याची पण एकूण बेरीज १८९ होते. म्हणून हे सिद्ध होते की ईश्वर सोडून संपूर्ण ब्रह्मांड तराजूच्या एका पारड्यात ठेवले, आणि दुसऱ्या पारड्यात 'इन्सान' अर्थात मानवास ठेवले तर दोन्ही पारडे तंतोतंत जुळतात. खाली–वर तिळमात्र पण होत नाहीत. म्हणून 'मानव' हा विश्वशिरोमणी असल्याचे सिद्ध होते.

वर्णांकशास्त्राचे हे गणित असे आहे –

| | |
|---|---|
| ''انسان'' = → ن + ا + س + ن + ا | 'इन्सान' → इन्सान |
| १६२ = ५० + १ + ६० + ५० + १ | इ + न् + स् + आ + न |
| | अ + न + स + अ (ा) + न |
| | १ + ५० + ६० + १ + ५० = १६२ |

ही एकूण आलेली '१६२' ही संख्या वर्णांकशास्त्राचा सांख्यिकीय नियमान्वये '१८९' इतकी भरते. ती अशी–

| उत्तमा | मध्यमा | निम्नगा |
|---|---|---|
| १६२ | १८ | ९ |

= (१६२ + १८ + ९)

= १८९

∴ १८९ = १८९ म्हणून, मानव = समस्त ब्रह्मांड हे सिद्ध झाले.

**२) ब्रह्म आणि ब्रह्मांड किंवा विश्वंभर आणि विश्व – सह–संबंध :** ब्रह्मांड ही ब्रम्हाची लीला आहे – विश्व ही विश्वंभराची लीला आहे. ब्रह्मांडामधील चाळीस (४०) विश्वे ही ईश्वरी लीलेची चाळीस (४०) आविष्करणे आहेत. 'रसूल अल्लाह' अर्थात प्रेषित मुहम्मद यांच्या शुभनामामध्ये 'म' (م) हे आद्याक्षर आहे. 'अब्जद' वर्णांकशास्त्रानुसार त्याचे मूल्यभारांक चाळीस (४०) होते. ही संख्या प्रत्येक वस्तूमध्ये साक्षात् समतोलासह निहित आहे, आणि तो समतोल सर्वश्रेष्ठ पवित्र परमेश्वराचे अभिवचन स्थळी ('मीक़ात') आहे.

'मीक़ात'चा अर्थ हा आहे की सदरहू (४० ही) संख्या अस्तित्वाच्या श्रेणींनुसार आहे. यानंतर मात्र तोच (परमेश्वर) आहे जो त्यांच्या अगोदर होता. (सर्वात अगोदर परमेश्वरच होता व सर्वांत शेवटी तोच असेल.)

सद्‌गुरू नानकदेव यांनी आपल्या पुढील काव्य-चरणाच्या आधारे 'अब्जद' वर्णांकशास्त्राच्या नियमानुसार सिद्ध करून दाखवले आहे की ब्रह्मांडामधील प्रत्येक वस्तू ही नरोत्तम मुहम्मद यांच्या नावाशी मूल्यांच्या अनुषंगाने तंतोतंत जुळणारी आहे. त्यांचे काव्यचरण याप्रमाणे आहे -

*" नाम जिस वस्तु का करो तुम चौगुने दावो*
*दो मिलाके पचगुन कीजिए बीस से भाग लगावो*
*बाक़ी बचे तो नौगुन कीजिए पिछे दो मिलावो*
*नानक इस बुध हर शय में नाम-ए-मुहम्मद पावो।। "*

(शब्दार्थ : दावो=बनवा, तयार करा; बुध=प्रमाणे, सारखे; शय=पदार्थ, वस्तू; पचगुन=पाचपट; पिछे=नंतर)

'अल्लाह'च्या असंख्य गुणनामांपैकी, प्रेषित मुहम्मदच्या मतान्वये प्रमुख अशी ९९ शुभ-नामे गणली गेली आहेत. त्यामध्ये (१) हयात (जीवन), (२) इल्म (ज्ञान), (३) कुद्रत (सामर्थ्य), (४) इरादा (संकल्प, इच्छा), (५) समा (श्रवण), (६) बसर (दृष्टी), (७) कलाम (वाणी) हे सात गुण समाईक आहेत. या गुण-नामांना हटवल्यास ९२ गुण-नामे उरतात. आणि 'अब्जद' वर्णांकशास्त्रानुसार प्रेषित यांच्या 'मुहम्मद' या नावाचे वर्णमूल्यभारांक ९२ निघते. हे अल्लाहच्या शेष (उरलेले) ९२ नावांइतकेच आहे. हा योगायोग नसून ती साक्षात ईश्वरी योजनाच आहे. कारण त्याची योजना प्रेषितांना नरोत्तम बनवण्याचीच होती.

एक उदाहरण पहा -

मुहम्मद = म + ह + म + द                محمد = م + ح + م + د

४० + ८ + ४० + ४ = ९२ ;९२ ← ४ + ४० + ८ + ४०

**१) पाणी = पा + णी (दोन अक्षरी शब्द)**

अक्षरे = २

२ × ४ = ८

\+ २

१० × ५ = ५०

५० ÷ २० = २

१०

× ९

९०

\+ २

∴ ९२

**२) दगड = द + ग + ड (तीन अक्षरी शब्द)**

अक्षरे = ३

३ × ४ = १२

\+ २

१४ ×ह्न ५ = ७०

७० ÷ २० = ३

१०

× ९

९०

\+ २

∴ ९२

म्हणजेच कितीही अक्षरसंख्या असलेले कोणतेही शब्द घेतले तरी उपरोक्त वर्णांकशास्त्राचे नियम व पद्धतीने मुहम्मद यांच्या नावाची जी बेरीज ९२ आहे, नेमकी तितकीच म्हणजे ९२च येणार, हे नि:संशय आहे. यावरून स्पष्ट होते की मुहम्मद हे ब्रह्मांडातील समस्त चराचर व अणू-रेणूशी तुल्यबळ होते. ते मानवजातीमधील महामानव म्हणजेच पुरुषोत्तम वा नरोत्तम होते, हे नि:संशय, सिद्ध होते. हे निर्विवाद आहे की ते मानवांमध्ये सर्वश्रेष्ठ मानव होते.

चाळीस श्रेणी अर्थात चाळीस (४०) जगत वा जग पुढील प्रमाणे आहेत -

**विश्वा (ब्रह्मांडा)च्या चाळीस श्रेणी**

१. प्रथम श्रेणी : **अल्लाह** -तेजपात-तेजस्वी सत्ता (ज़ात). अर्थात प्रतापी ईशनाम म्हणजेच 'अल्लाह'.

२. द्वितीय श्रेणी : **अमा** - घनघोर अंधार - घोर तिमिर - अंधाराचे साम्राज्य.
ही ब्रह्मगुफा आहे. याची मीमांसा ब्रह्मज्ञानाने केली जाते.

३. तृतीय श्रेणी : **अहदिय्युत** - म्हणजेच एकत्त्वता. हे त्या विशुद्ध सत्तेकडे (ज़ातमहज़)कडे संकेत आहे की जिच्यामुळे गुप्त कोष किंवा ब्रह्मगुफेकडे निर्देश होतो. ही तुर्यातीत अवस्था आहे. सर्वदा मुक्त.

४. चतुर्थ श्रेणी : **वाहिदिय्यत** - एकमेवता. हे सत्ते (ज़ात)चे नाम-रूपां (अस्मा व सिफ़ात) मध्ये सर्वप्रथम अवतरण आहे. ही तुर्यावस्था आहे. जीवन मुक्त.

५. पंचम श्रेणी : **उलुवहियत** - ही ईश्वराच्या सत्तेची सर्वोच्च श्रेणी आहे. याला सर्वोच्च दृष्टीपात स्तर असे म्हणतात. अस्तित्वाच्या समस्त मर्यादा आणि त्यांच्या श्रेणींमध्ये दृष्टिपात करण्याचे नाव आहे उलुवहियत. ही प्रतिष्ठा परमेश्वराने प्रेषित मुहम्मद यांना बहाल केली होती. ही श्रेणी अस्तित्वाच्या ऊर्ध्वमुखी आणि अधोमुखी श्रेणींमध्ये समाविष्ट आहे. अर्थात हेच स्वर्ग-पाताळ आहे. ही सर्वोच्च आणि रसातळाच्या अवस्थेचे द्योतक आहे.

६. षष्ठम् श्रेणी : **रहमानियत** – दयाळुता. ही विशेषकरून अस्तित्वाच्या श्रेष्ठ श्रेणींशी निगडित आहे.

७. सप्तम श्रेणी : **रबूबियत.** प्रभुत्व. परमेश्वर आपले पालनकर्त्याचे रूप प्रकट करतो. अस्तित्वाची ही श्रेणी सृष्टी (मरबूब)ची इच्छुक असते आणि आणि सृष्टी (उत्पत्ती) येथूनच दृष्टिगोचर झाली.

८. अष्टम श्रेणी : **अर्श.** हे परमधाम अर्थात दैवी सिंहासन आहे. हे विश्वशरीर अथवा निरपेक्ष देह (जिस्म कुल्ल) आहे.

९. नवम श्रेणी : **क़लम–ए–आला.** ही लेखणी आहे – दैवी लेखणी! हे विश्व–ज्ञान आहे (अक़्ल कुल्ल).

१०. दहावी श्रेणी : **लौह–ए–महफ़ूज.** ही सुरक्षित लेखशिळा आहे अर्थात विश्वाचे भाग्यलेख आहे. हे भाग्यलेख परमधामा (अर्श)च्या अंतर्गत आहे. हा विश्वात्मा (नफ़्स कुल) आहे.

११. अकरावी श्रेणी : **कुर्सी.** हे पादपीठ आहे आणि ही विश्व–प्रकृती (तबियते कुल्ली) आहे. याचा आशय मना (क़ल्ब)शी आहे.

१२. बारावी श्रेणी : **हैयूला.** ही मूल प्रकृती आहे. हे जड तत्त्व आहे.

१३. तेरावी श्रेणी : **हबा.** हे भौतिक तत्त्व आहे. हिचे आशय निरपेक्ष रूपा (शक्ल कुल्ल)शी आहे.

१४. चौदावी श्रेणी : **फ़लकुल अनासिर.** हे महाभूत आकाश आहे.

१५. पंधरावी श्रेणी : **फ़लक–ए–अतलस.** हे सर्वोपरि आकाश आहे.

१६. सोळावी श्रेणी : **फ़लक–उल्–बुरूज.** हे राशिचक्र आहे.

१७. सत्रावी श्रेणी : **फ़लक–उल्–जुहल** – हे शनी ग्रह आहे.

१८. अठरावी श्रेणी : **फ़लक–उल्–मुश्तरी** – हे गुरू ग्रह आहे.

१९. एकोणीसावी श्रेणी : **फ़लक–उल्–मिर्रीख़.** हे मंगळ ग्रह आहे.

२०. वीसावी श्रेणी : **फ़लक–उल्–शम्स.** हे रवी ग्रह आहे.

२१. एकविसावी श्रेणी : **फ़लक–उल्–जुहरा.** हे शुक्र ग्रह आहे.

२२. बावीसावी श्रेणी : **फ़लक–उल्–उतारद.** हा बुध ग्रह आहे.

२३. तेवीसावी श्रेणी : **फ़लक–उल्–क़मर.** हा सोम ग्रह आहे.

२४. चोवीसावी श्रेणी : **फ़लक–उल्–असीर.** हे अंतराळ आहे. हे तेज (अग्नी–नार) महाभूत आहे.

२५. पंचविसावी श्रेणी : **हवा.** हे वायू महाभूत आहे.

२६. सव्वीसावी श्रेणी : **माए.** हे आप महाभूत आहे.

२७. सत्तावीसावी श्रेणी : **अर्ज़.** हे पृथ्वी महाभूत आहे.

२८. अठ्ठावीसावी श्रेणी : **समावात.** हे मूळ आकाश आहे. हे लघुआकाश आहे.

२९. एकोंतिसावी श्रेणी : **आलम–ए–मिसाल.** हे सत्त्व आकाश आहे. हे प्रतिकृती किंवा सादृश्य जग आहे. ही स्वप्नावस्था आहे.

| | | |
|---|---|---|
| ३०. तीसावी श्रेणी | : | **स्समा.** हे भूमंडळ आकाश आहे. |
| ३१. एकतिसावी श्रेणी | : | **मादन.** हे खनिज आहे. हे संयुग आहे. |
| ३२. बत्तीसावी श्रेणी | : | **नबात.** वनस्पती. |
| ३३. तेहतिसावी श्रेणी | : | **जौहर.** जड पदार्थ. |
| ३४. चौतीसावी श्रेणी | : | **हैवान.** प्राणी जगत. जनावर. |
| ३५. पस्तिसावी श्रेणी | : | **इन्सान.** मानव – मानवजात. |
| ३६. छत्तीसावी श्रेणी | : | **आलम–ए–अजसाम.** हे दृश्य जग आहे. याच्याशी संसार जोडलेला आहे. |
| ३७. सदोतिसावी श्रेणी | : | **आलम–ए–मानी.** स्व–र्लोक. मध्यजगत अर्थात् हे आलम–ए–बर्ज़ख़ आहे. |
| ३८. अडोतिसावी श्रेणी | : | **क़यामत.** हिच्याशी वास्तविक जग म्हणजेच इहलोक आणि तिच्याशी प्रलय दिवस म्हणजेच कयामत संबंधित आहे. |
| ३९. एकोणचाळीसावी श्रेणी | : | **जन्नत व दोज़ख़.** स्वर्ग आणि नरक. |
| ४०. चाळीसावी श्रेणी | : | **अज़्ज़ात बुहत.** केवल परमसत्ता. हे ते अतिशुभ्र–धवल स्थळ आहे. जिच्याकडे स्वर्गाचे निवासी धाव घेतात. याचा संकेत परमश्रेष्ठ परमेश्वराशी आहे. हे 'दारुदौर' म्हणजेच परिवर्तित लोकांपासून (जगांपासून) आहे. याच्यानंतर मात्र 'अज़्ज़ात' अर्थात 'अल्लाह' – परात्पर परब्रह्मशिवाय काहीच नाही. |

उपरोक्त श्रेणींच्या आधारे चिंतनप्रवाहाच्या दिशेची रूपरेषा पुढीलप्रमाणे ठरवता येईल –

**३) चिंतन–प्रवाहाची दिशा – रूपरेषा :** प्रेषितोत्तम मुहम्मद यांनी चिंतनासंबंधी मानवास एक अत्यंत बहुमोल सल्ला दिलेला आहे. तो असा – सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या प्रभुसत्तेसंबंधी चिंतन करू नका. चिंतन करा त्याने निर्माण केलेल्या सृष्टीविषयी, विश्वाविषयी, ब्रह्मांडाविषयी. यासंबंधी परमेश्वराने दिलेल्या आज्ञा पाळा. परमेश्वराचे, चिंतन करण्याविषयी मानवास केलेले आव्हानाची रूपरेषा अशी आहे –

विश्वाच्या रचनेचा हेतू, तिचे स्वरूप, तिची विविधता, तिचे वैशिष्ट्य या सर्वांवर चिंतन करण्यासाठी उद्युक्त व्हावे म्हणून परमेश्वर मानवास आव्हान स्वरूपात असे म्हणतो, ''काय या लोकांनी आकाश आणि पृथ्वीच्या व्यवस्थेवर कधी विचार केला नाही आणि कोणत्याही वस्तूला देखील जी अल्लाहने निर्मिली आहे डोळे उघडून पाहिले नाही? ७:१८५ ''यांना विचारा, वाळवंट व समुद्राच्या अंधकारांत कोण तुम्हाला संकटापासून वाचवतो? कोण आहे ज्याच्याजवळ तुम्ही (संकट समयी) गयावया करून आणि गुपचुपपणे प्रार्थना करता? ६:६३ ''काय या लोकांनी कधी पक्षांना पाहिले नाही की नभोमंडळात वातावरणाच्या कशा प्रकारे अधीन आहेत? अल्लाहखेरीज कोणी त्यांना पेलले आहे? यात अनेक संकेत आहेत त्या लोकांकरता जे श्रद्धा ठेवतात.'' १६:७९ ''तुम्ही या गोष्टीचे (कधी) चिंतनपूर्वक निरीक्षण केले नाही का की, तुमचा विधाता कशा प्रकारे सावली पसरवतो. त्याने जर इच्छिले असते तर तो तिला स्थिर ठेवू शकला असता, पण आम्ही सूर्याला तिचे मार्गदर्शक बनवले. मग आम्ही तिला लीलया आमच्याकडे ओढून घेतो. आणि तोच होय ज्याने तुमच्यासाठी रात्रीला पांघरूण बनवले आणि झोपेला विश्रांती (व तरतरीत होण्याचे) साधन बनवले. आणि

दिवसाला जागे होऊन (आपले जीवन पुढे सुरू ठेवण्याचे) माध्यम बनवले, आणि तोच आहे, जो वाऱ्यांना आपल्या कृपेची शुभवार्ता म्हणून पुढे पाठवतो. आणि मग आम्ही आकाशातून शुद्ध (गोड) पाण्याचा वर्षाव करतो. यासाठी की, त्याद्वारे मृत अवस्थेत असलेल्या जमिनीस जीवन प्रदान करावे आणि आमच्या निर्मितीपैकी अनेक प्रकारच्या जनावरांना व माणसांना पिण्याचे पाणी उपलब्ध करण्यासाठी (आम्ही पाण्याचा वर्षाव करतो). हा चमत्कार आम्ही वरचेवर त्यांच्यासमोर आणतो जेणेकरून त्यांनी काही बोध घ्यावा.'' २५:४५-५० ''आणि जर तुम्ही लोकांना विचाराल की, तो कोण आहे, ज्याने आकाश आणि पृथ्वी यांची निर्मिती केली आणि कोणी सूर्य व चंद्राला (आपल्या कायद्याच्या) अधीन कार्यरत केले? तेव्हा ते निश्चितपणे उत्तर देतील, 'हे सर्व अल्लाहने केले.' मग ते (सन्मार्ग सोडून) भलतीकडे का जातात?'' २९:६१ ''(मरणोत्तर जीवन नाकारणारे) उंटाकडे कधी चिंतनपूर्वक पाहत नाहीत का की, त्यास कसे निर्माण करण्यात आलेले आहे? आणि आकाशाकडे की, त्यास कशाप्रकारे उंच स्थापित करण्यात आले? आणि पर्वतांकडे की, त्यांना कसे उभे करण्यात आले? आणि पृथ्वीकडे, तिला कसे पसरवले गेले?'' ८८:१७-२० ''श्रद्धावंतांसाठी आकाशात आणि पृथ्वीवर (संदेशसूचक) खुणा आहेत, यात मुळीच शंका नाही आणि तुमच्या स्वतःच्या निर्मितीमध्ये आणि त्या सर्व प्राण्यांमध्ये, जे त्याने पृथ्वीवर पसरवलेले आहेत (त्याच्या सामर्थ्याच्या) खुणा आहेत, त्या लोकांसाठी जे दृढ विश्वास ठेवणारे आहेत. तसेच रात्र व दिवस यांच्या एकामागून एक येण्यामध्ये आणि अल्लाहने आकाशातून खाली पाठवलेल्या जीवनदायी (पाण्यामध्ये व पाठवण्याच्या प्रक्रियेमध्ये) आणि त्याद्वारे मृतप्राय झालेल्या जमिनीला जिवंत करण्यामध्ये आणि वाऱ्यांच्या दिशा बदलण्यामध्ये (म्हणजेच निसर्ग पातळीवर होत असलेल्या प्रत्येक घटनेमध्ये) (संदेश असलेल्या खुणा) त्या लोकांसाठी आहेत, जे बुद्धीचा वापर करतात. हे अल्लाहचे संदेश आहेत, जे आम्ही तुम्हाला सत्य प्रस्तुत करण्याच्या उद्देशाने ऐकवीत आहोत.'' ४५:३-६

''तोच आहे (अल्लाह) ज्याने पृथ्वीला विस्तृत केले आणि तिच्यात पर्वत स्थापित केले व नद्या (प्रवाहित केल्या) आणि यावर सर्व प्रकारच्या फळांना (व वनस्पतींना) जोडीच्या रूपाने (म्हणजेच नर व मादी असे) निर्माण केले. तो दिवसावर रात्रीचे आवरण घालतो (व रात्रीवर दिवसाचे). खरोखर या सर्व (प्रकारच्या निर्मितीमध्ये संदेश असलेल्या) खुणा आहेत, त्या लोकांसाठी, जे चिंतन करतात आणि पृथ्वीवर द्राक्षांच्या बागा व धान्याने भरलेली शेतं, खजुरीची झाडे आहेत. (त्यांच्यापैकी काहींची फळे) एक-एक असतात तर काही घोसदार असतात. हे सर्व एकाच प्रकारच्या पाण्याने तृप्त होतात, तरीसुद्धा चवीच्या बाबतीत आम्ही काहींना दुसऱ्यांपेक्षा श्रेष्ठत्व देतो. खरोखर, (या सर्वांमध्ये संदेश असलेल्या) खुणा आहेत, त्या लोकांसाठी जे आपल्या बुद्धीचा वापर करतात.'' १३:३-४ ''तोच आहे ज्याने आकाशातून (ढगांद्वारे) पाण्याचा वर्षाव केला, आणि त्यातूनच पिण्याचे पाणी मिळते आणि त्याच्यापासूनच झाडाझुडपांची वाढ होते, ज्यात तुम्ही (आपली गुरेढोरे) चारता आणि तो त्याच्यापासूनच तुमच्यासाठी धान्य, जैतून (आलिव्ह), खजूर व द्राक्षे आणि सर्व प्रकारची फळे निर्माण करतो. निश्चितच यामध्ये संदेश असलेली खूण आहे, त्यांच्यासाठी जे खरोखर चिंतन करतात. त्यानेच रात्र व दिवस आणि सूर्य व चंद्र यांना तुमच्या सेवेत कार्यरत केलेले आहे. आणि तारे देखील त्याच्या आज्ञेच्या अधीन आहेत. निश्चितच यात संदेश असलेल्या खुणा आहेत, त्या लोकांसाठी जे आपल्या बुद्धीचा

वापर करणारे आहेत आणि त्याने या पृथ्वीवर तुमच्यासाठीच्या विविधरंगी वस्तू निर्माण केल्या. निश्चितच यात त्या लोकांसाठी संदेश असलेल्या खुणा आहेत, जे बोध घेऊ इच्छितात आणि तोच आहे, ज्याने समुद्राला तुमच्या सेवेत लावले, म्हणजे तुम्हाला त्यातून ताज्या माशांचे भक्षण करता यावे, तसेच त्यातून जडजवाहीर, जे तुम्ही लोक परिधान करत असता, तेही काढता यावे. आणि (त्याच समुद्रावर) तुम्हाला (हेही) पाहायला मिळते की, नौका कशा प्रकारे समुद्राला फाडून वाहत आहेत. (ही सर्व व्यवस्था तुमच्या अधीन आहे) म्हणजे तुम्ही त्याच्या कृपेचा शोध घ्यावा, आणि (त्याचे) आभार मानावे. आणि (त्यानेच) नद्या व मार्ग बनवले आहेत, म्हणजे तुम्हाला योग्य मार्ग सापडावा. तसेच (त्याने इतर अनेक) दिशादर्शक साधनेही (निर्माण केलेली आहेत) याद्वारे आणि नक्षत्रांद्वारेही लोक (प्रवासात) मार्ग निश्चित करतात.'' १६:१०-१६

निसर्गामधील नाना प्रकारचे दृष्टान्त देण्याचा आपला हेतू स्पष्ट करताना परमेश्वर म्हणतो, ''त्याच्या (सामर्थ्याच्या) निशाण्यांपैकी हेही आहे की, तो शुभवार्ता देणारे वारे पाठवतो. ते यासाठी की, तुमच्यावर आपला अनुग्रह करावा. (समुद्रात) नौका त्याच्या आज्ञेने चालतात, यासाठी की, तुम्हाला (आपल्या उपजीविकेच्या रूपाने) त्याची कृपा प्राप्त करता यावी. (आणि हे सर्व यासाठीच तो करतो की), तुम्ही त्याच्याप्रति आभार व्यक्त करावे.'' ३०:४६

शेवटी निसर्ग आणि स्वत: माणसाच्या व्यक्तित्वामध्ये निहित परमेश्वरी खुणांचे अवलोकन करण्यासाठी आव्हान करताना परमेश्वर म्हणतो, ''दृढ श्रद्धा बाळगणाऱ्यांसाठी भूतलावर (अल्लाहच्या सामर्थ्यांच्या अनेक) खुणा आहेत. तसेच स्वत: तुमच्यामध्येही (अनेक खुणा आहेत,) तर मग ते तुम्ही पाहत नाही?'' ५१:२०-२१

बुद्धिवान लोकांना संबोधून परमेश्वर त्यांना चिंतनास उद्युक्त करण्यासाठी आपले समापन या शब्दांत करतो, ''निश्चितच पृथ्वी आणि आकाशाच्या निर्मितीमध्ये आणि रात्र व दिवसाच्या एकापाठोपाठ येण्यामध्ये; त्या नौकांमध्ये ज्या मानवाच्या उपयोगी वस्तू घेऊन समुद्रात संचार करतात; तसेच त्या पाण्यामध्ये ज्याचा अल्लाह आकाशातून वर्षाव करतो आणि त्यापासून मृतप्राय झालेल्या जमिनीला पुनरूज्जीवित करतो; त्याने पृथ्वीवर सर्व प्रकारच्या पशूंना वाढीस लावले यामध्ये आणि वाऱ्यांच्या बदलामध्ये; आकाश व पृथ्वी यांच्या दरम्यान नेमून दिलेल्या मार्गावर मार्गस्थ असलेल्या ढगांमध्ये (या सर्वांमध्ये) बुद्धीचा वापर करणाऱ्या लोकांसाठी खरोखर संदेश असलेल्या अनेक खुणा आहेत.'' २:१६४

**४) एका परोक्ष संकेताची उकल – 'ज़कात' (धर्मकर) २.५०%च का? याचा उलगडा :** उपरोक्त शीर्षक वाचून वाचकांना कदाचित, विषयांतराच्या आरोपाचा मोह होईल, परंतु तसे कदापी नव्हे. 'ज़कात' (धर्मकर)चे गूज जाणण्याचे हेच योग्य ठिकाण आहे. कारण याचा संबंध विश्वाच्या उपरोक्त चाळीस (४०) श्रेणींशी आहे. वाचकांना याचे प्रत्यंतर पुढील विवेचनावरून येईल.

मानव हा सृष्टीचा मुकुटमणी असल्याचे, आपण मागे पाहिलेच आहे. परमेश्वराने ''नि:संशय, प्रत्येक वस्तू (योग्य) अंदाजानुसार निर्माण केलेली आहे.'' ५४:४९ मानवास मात्र उत्कृष्टपणे घडवले. ''त्याने तुम्हाला घडवले आणि उत्तम आकार दिला.'' ६४:३ माणसाची इतर प्राणीमात्रांशी तुलना करून पाहिले असता, माणसाची आकृती, रूप व रचना ही सामान्यत: सुंदरच आहे. इतर प्राण्यांपैकी काही भूमीस सरपटत जातात, काही चतुष्पाद (जनावरे) आहेत, कोणी सरळ उभे राहू शकत नाहीत आणि बहुतेकांस भूमीस तोंड लावून खावे

घ्यावे लागते. तात्पर्य, एकंदरीत माणसा(च्या योग्यते)स कोणताही प्राणी पोहोचू शकत नाही. त्याची सरळ काठी या गोष्टीची द्योतक होय की, तो सर्वांवर सत्ता चालवण्यासाठीच निर्माण केला गेला आहे. म्हणूनच की काय परमेश्वर घोषणा करतो, ''अल्लाहने तुम्हाला पृथ्वीतलावर उत्तराधिकारी (ख़लीफ़ा) बनवले.'' ३५:३९ आणि सर्वांना त्याच्या अधीन केले. ''अल्लाहने पृथ्वी व आकाशांच्या सर्व वस्तू (तुमच्या) अधीनस्थ करून ठेवल्या आहेत, आपल्या देणग्यांचा तुमच्यावर वर्षाव केला आहे.'' ३१:२०/४५:१३ मानव परमेश्वराची उत्कृष्ट निर्मिती असल्याबद्दल परमेश्वर पुन्हा एकदा दुसऱ्या ठिकाणी म्हणतो, ''आम्ही मानवाला उत्तम आकार देऊन (उत्कृष्ट निर्मितीच्या रूपाने) निर्माण केलेले आहे.'' ९५:४ इतकेच नव्हे तर, त्याने मानवाची निर्मिती आपल्या दोन्ही हातांनी केलेली आहे. ३८:७५ तथापि मानवेतर शेष सृष्टी त्याने आपल्या एका हाताने केलेली आहे. शिवाय मानवामध्ये त्याने आपला आत्मा फुंकलेला आहे. १५:२९ यास्तव मानव हा समस्त ब्रह्मांडामध्ये सर्वश्रेष्ठ ठरतो. म्हणून तर परमेश्वराने देवदूतांना मानवास प्रणिपात करण्याचा आदेश दिला होता. १५:२९ मात्र अहंकारग्रस्त होऊन इब्लीस (सैतानांचा महानेता)ने यास नकार दिला व अवज्ञाकारी बनून स्वत: घमेंडखोर असल्याचे सिद्ध करून दाखवले. (ईश्वर) म्हणाला – ''इब्लीसा, तुला कोणती गोष्ट त्या (मानवा)च्या समोर नतमस्तक होण्यास बाधक ठरली ज्याला मी आपल्या दोन्ही हातांनी बनवले आहे? तू घमेंडीचे प्रदर्शन करतोस का की, तू उच्च दर्जाच्या व्यक्तित्वांपैकी आहेस?'' ३८:७५ अशा प्रकारे ''आम्ही मानवजातीला मोठेपण दिले.'' १७:७०

मानवाने आपले मोठेपण शाबूत ठेवावे, अशीच परमेश्वराची मनोमन इच्छा आहे. मात्र मानव हा प्रमादांचा पुतळा असल्याकारणाने त्याच्याकडून कळत-नकळत अपकर्म स्वरूपांत चुका घडत असतात. या चुकांचे निराकरण करण्याचे उपाय पण त्याने मानवास दाखवून दिले आहेत. त्याच्या चुका व त्यांच्या निराकरणाचे उपाय परमेश्वराने पवित्र कुराणामध्ये असे सुचवले आहेत – सर्वप्रथम चुकांचा निर्देश असा आहे – ''तो गरीबांना भोजन देण्यास उद्युक्तही करीत नव्हता'' ६९:३४ ''तुम्ही अनाथांचा आदर करीत नाही, गरीब-गरजवंतांना अन्नदान करण्याच्या बाबतीत एकमेकांना प्रेरित करीत नाही, तुम्ही दुर्बलांची वारस मालमत्ता पूर्णपणे हडप करता. तुम्हाला संपत्तीचा अत्यंत अतृप्त लोभ वाटतो.'' ८९:१७-२०

''नि:संशय, मनुष्य आपल्या विधात्याप्रती अतिशय कृतघ्न आहे, आणि नि:संशय तो याबद्दल स्वत: साक्षी आहे आणि तो धनसंपत्तीच्या मोहात वाईटरित्या गुरफटलेला आहे.'' १००:६-८, ''खरोखर माणूस (आपल्या निर्णयांच्या बाबतीत) फारच उतावीळ आहे.'' १७:११ ''बरे तुम्ही त्या माणसाचे कधी (चिंतनपूर्वक) अवलोकन केले आहात का जो निर्णया(च्या दिवसा)स पाखंड म्हणतो; आणि त्यामुळेच हा असा (पाषाणहृदय होऊन गेला) आहे की तो अनाथास धक्के देऊन हाकलून लावतो आणि गोरगरीबाला स्वत: जेऊ घालणे तर राहोच, लोकांनाही त्याच्या जेऊ घालण्याचे प्रोत्साहन देत नाही. मग विनाश आहे त्यांचा जे (सत्कृत्यांचा) दिखाऊपणा करतात आणि क्षुल्लक गरजेच्या वस्तू (लोकांना) देण्यास टाळाटाळ करतात.'' १०७:१-३, ६-७ ''मनुष्य (जणू काय) उतावळतेचा (पुतळा) निर्मिला गेला आहे.'' २१:३७ ''मनुष्यास तो जे काय इच्छितो ते मिळू शकते का? नव्हे, इहलोक आणि परलोक अल्लाहच्या अधीन आहे.'' ५३:२४-२५ कृपानिधी ईश्वर मानवास गरीबांवर उपकार करण्याची शिकवण देत असे म्हणतो, ''उपकाराचा मोबदला

उपकाराशिवाय आणखी दुसरा कोणता असू शकेल?'' ५५:६० ''अल्लाह शिक्षेच्या संबंधात अतिशय कठोर असतो. (म्हणून) हे डोळस माणसांनो! बोध घ्या.'' ५९:४, २ ''आणि जे लोक अल्लाहने आपल्या (असीम) कृपेने त्यांना जे दिले आहे त्याबाबतीत कृपणता (कंजूसपणा) दर्शवतात, त्यांनी असे समजू नये की ते त्यांच्या हिताचे आहे, नव्हे ते त्यांच्या अहिताचे आहे. ज्यांच्या बाबतीत ते कृपणता दाखवीत होते ते सर्व पुनरूत्थानाच्या दिवशी एक गळफास किंवा गळपट्टा म्हणून त्यांच्या गळ्यात अडकवण्यात येईल.'' ३:१८० तरी पण त्याचे आश्वासन आहे की, ''आणि कोणावरही (अजिबात) अन्याय केला जाणार नाही.'' ६:१६० मात्र पुण्याचा बदला तो दहापट देतो. ''जो मनुष्य (पुनरूत्थानाचे दिवशी) सत्कर्मांचे पुण्य घेऊन येईल, त्याच्या दसपट (दहापट) पुण्य त्याला प्राप्त होईल.'' ६:१६० मात्र दंड किंवा शिक्षा अपराधाच्या प्रमाणाइतकीच असते. ना कमी असते ना जास्त. ''खरोखर, मनुष्य कंजुष जन्मास येत असतो. जेव्हा त्याच्यावर संकट येते तेव्हा तो घाबरून जातो. आणि जेव्हा त्याला सुस्थिती लाभते तेव्हा कंजुषपणा करू लागतो. यास अपवाद केवळ त्यांचा आहे, जे उपासना (नमाज) करतात.'' ७०:१९-२२ कंजुषपणा हा आहे मानवाचा नैसर्गिक स्वभाव. मात्र त्यावर मात करण्याचा उपाय परमेश्वराने लगेच सांगून टाकलेला आहे. तो आहे नित्यनेमाची उपासना संपन्न करीत राहणे.

याच संदर्भात परमेश्वराने सत्कर्मांची रूपरेषा अशी मांडली आहे ''अल्लाहच्या प्रेमाखातर ते मोताद गोरगरीब, अनाथ बालक व बंदीजन यांना भोजन खाऊ घालतात (उपकार म्हणून नव्हे तर) केवळ अल्लाहची प्रसन्नता लाभावी म्हणून. कारण यांना (पुनरूत्थानाच्या) त्या भयानक दिवसाचे भय वाटते.'' ७६:८-९ ''त्या (माणसा)ला (पाप व पुण्याचे) दोन्ही मार्गही (स्पष्ट) दाखवून दिले. तरीही त्याने (या) दुर्गम घाटातून जाण्याचे साहस केले नाही. आणि तुम्हाला काय कल्पना, की काय आहे तो दुर्गम घाट? दासांना किंवा कर्जबाजाऱ्यांना मुक्त करणे, उपासमारीच्या दिवशी अन्न खाऊ घालणे, (मुख्यत्वेकरून) नातेवाइक, अनाथास किंवा मातीमध्ये धुळीवर पडून असलेल्या एखाद्या गोरगरीबास. हा अत्यंत बिकट व दुष्कर असा घाट आहे. मग (याबरोबर असे की) माणसाने त्या लोकांत सामील व्हावे ज्यांनी श्रद्धा ठेवली आणि ज्यांनी एकमेकाला संयम व एकमेकाप्रती कनवाळूपणा बाळगण्याचे उपदेश करतात. असेच लोक खरे नशीबवान आहेत.'' ९०:१०-१८

परमेश्वर माणसाच्या दुर्गम घाट न पेलण्याइतके ओझे लादू इच्छित नाही. त्याने जरी कमीत-कमी सत्कर्म केले तरी (त्याच्या पापक्षालनासाठी) पुरेसे आहे. आणि हे सत्कर्म आहे 'ज़कात' अदा करण्याचे, धर्मकर देण्याचे. 'ज़कात' (धर्मकर) हे मनोवांछितेवर (लादलेले) असते. अथक प्रयत्न आणि साधनेनंतर जेव्हा तुमची मनोकामना वा मनोवांछा (सवाद-ए-आज़म) पूर्ण होते, तेव्हा ईश्वराच्या आज्ञेनुसार तत्संबंधी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी परमेश्वराकडून जी काय दानशीलता (कृपा) तुम्हाला पात्र होते, तिचा काही भाग परमेश्वराच्या मार्गात खर्च करा, आणि परलोकातील सन्मानाचे जीवन-लाभ करून घ्या. या संदर्भात खुद्द परमेश्वराचे शब्द पहा- ''जे आपल्या संपत्तीतून योग्य तो हिस्सा (दानकार्यात याचकांना व वंचितांना) देतात (तोंड पसरून) मागणाऱ्या गरजू लोकांना आणि (लज्जेमुळे) न मागणाऱ्या गरजू लोकांना, यांना(च) (सर्वसुखसंपन्न) अशा स्वर्गात सन्मानाचे जीवन लाभेल.'' ७०:२४,३५

अवैध संपत्तीस वैध आणि शुद्ध बनविण्याचा उपाय म्हणून कृपानिधी, दयाघन आणि उदार परमेश्वराने इहलोकातील अल्लाहचे प्रतिनिधींना दान करण्याचे, आवाहन केले आहे. मग या दानाचे धर्मकराचे ('ज़कात')चे प्रमाण ठरणार तरी कसे? याचे प्रमाण ठरते ब्रह्मांडाच्या- विश्वाच्या चाळीस श्रेणींच्या आधारावर. अल्लाहने मानवास पृथ्वीतलावर आपले प्रतिनिधी बनवून पृथ्वी व आकाशांच्या सर्व वस्तू त्याच्या अधीनस्थ करून ठेवल्या आहेत. त्या सर्वच्या सर्व मानवाच्या सेवेत तत्पर आहेत. ही परमेश्वराची मानवावर अपार कृपाच होय. या कृपेविषयी कृतज्ञता व्यक्त करणे हे त्याचे कर्तव्य ठरते. या उपकाराचे उतराई होण्याचे एक साधन आहे दान-धर्म. पैकी धर्मकर अर्थात 'ज़कात' एक साधन आहे. ब्रह्मांडातील चाळीस जग हे मानवाच्या सेवेत तत्पर आहेत. त्यांचा या सेवेप्रित्यर्थ उतराई होण्यासाठी मानवाचे कमीत-कमी अंश दान ठरते १/४०. एवढेच जरी धर्मकर प्रतिवर्ष मानवाने अदा केले तरी ते पुरेसे आहे. १/४० हिस्सा 'ज़कात' म्हणजे २.५०% एवढे प्रमाण भरते. कारण परमेश्वर हा कुणावरही प्रमाणापेक्षा जास्त भार घालू इच्छित नाही. असे त्याचे अभिवचन पण आहे.

"अल्लाह कोणत्याही जिवावर त्याच्या क्षमतेपेक्षा अधिक ओझे टाकत नाही." २:२८६. "आम्ही कोणत्याही जिवावर त्याच्या क्षमतेपेक्षा अधिक ओझे लादत नसतो." २३:६२. "अल्लाह कोणत्याही जीवावर त्याने त्यास जे दिलेले आहे त्यापेक्षा अधिक भार टाकीत नाही." ६५:७. ईश्वराने मानवास संपूर्ण चाळीस (४०) विश्वाच्या देणग्या दिल्या आहेत. संपूर्ण सृष्टीमध्ये इतर कुणालाच एवढ्या देणग्या दिलेल्या नाहीत. याविषयी त्याने ईश्वराचे आभार मानणे अगत्याचे आहे. त्याने जरी कमीतकमी आभारप्रदर्शन केले, तरी ते ईश्वरासाठी पुरेसे आहेत. म्हणून कमीत-कमी मर्यादा ही चाळीस पैकी (४०) एक (१) ठरते. म्हणजेच हे प्रमाण ४०:१ असे ठरते. अर्थात हे प्रमाण २.५०% एवढे भरते. म्हणून माणसाने आपल्या वैध उत्पन्नाचा २.५०% एवढा भाग दरसाल अनिवार्यपणे दान-धर्म करून त्याऐवजी ईश्वराकडून पुण्य आपल्या पदरात पाडून घ्यावे. ईश्वराची अपेक्षा, सदिच्छा पण अशीच आहे.

'ज़कात'ची पुढची उच्च पायरी म्हणजे 'उश्र्'. 'उश्र्' म्हणजे वैध उत्पन्नाचा दहावा हिस्सा (१०%) दान करणे होय. हे स्वेच्छा आहे. याचे श्रेयांक 'ज़कात'पेक्षा जास्त असते. पण जवळच्या नातलगांपासून ते हक्कदार गरजवंत इतरेजनांपैकी कुणालाही देणे इष्ट असते. इस्लामच्या महदवी संप्रदायामध्ये 'उश्र्' धर्मदानाची प्रथा अद्याप बाकी असल्याचे आढळते.

मग प्रश्न उपस्थित होतो की 'ज़कात' घेण्यास पात्र कोण आहेत. ईश्वराचे प्रतिनिधी 'ज़कात' घेण्यास पात्र आहेत. याचक-वर्ग हे त्याचे खरे प्रतिनिधी आहेत. यांनाच 'जक़ात' देणे श्रेयस्कर आहे. 'ज़कात' घेण्यास तेच लायक आहेत. ईश्वराने उपरोक्त समस्त श्लोकांमध्ये आपल्या प्रतिनिधींचा उल्लेख केलेला आहे. तदनुसार-(१) मागणारे याचक, (२) न मागणारे याचक, (३) गरीब, (४) भिक्षेकरी, (५) अनाथ, (६) बंदीजन, (७) दीन-दुबळे, (८) उपेक्षित, (९) असहाय्य, (१०) उपाशी लोक, (११) धुळीवर पडलेली निराधार मुले, (१२) आज़ारी लोक (१३) लुळे-पांगळे म्हणजेच अपंग, (१४) वंचित, (१५) पीडित, (१६) पददलित, (१७) गरजवंत थोडक्यात, ज्याचा कोणी नाही वाली, त्याचा परमेश्वर! हेच 'ज़कात' घेण्याचे खरे हक्कदार आहेत.

'ज़कात' (धर्मकर) म्हणून देताना याचकांचा सन्मान राखला पाहिजे. त्यांना झिडकारू नका. त्यांची मानहानी करू नका. त्यांची अवहेलना करू नका. त्यांना अपशब्द बोलू नका. त्यांना रिकाम्या हाती परत पाठवू

नका. उलट ते तुमच्या दारी आलेत याविषयी धन्यता बाळगा. कारण जे ईश्वराचे प्रतिनिधी म्हणून तुमच्या दारी हजर आहेत त्यांना दान देणे म्हणजे साक्षात परमेश्वरास दान देणे होय. धनिकांकडून परमेश्वराची अशीच अपेक्षा असते, आणि ही अपेक्षा आहे रास्तच. गरीबांना दान देणे म्हणजे स्वतःच्या पदरी पुण्य पाडून घेणे होय. अशी उदात्त भावना परमेश्वर तुम्हा धनिकांकडून अपेक्षितो. याचकास आपल्या दारी पाहून धन्यता मानावी. कारण तो दानधर्म स्वीकारून त्याच्या बदल्यात पुण्याचे वाटप करतो. असा महिमान आहे दानधर्माचा!

इस्लाम-धर्माने ऐपतदार मुसलमानांसाठी 'ज़कात'ची सक्ती करून एका परीने त्यांच्या पदरी पुण्य टाकण्याचेच सत्कार्य केले आहे. पापक्षालनाविषयी निराश न होण्याविषयी दिलासा देत परमेश्वर म्हणतो, ''माझ्या सेवकांनो! अल्लाहच्या दयेसंबंधात निराश होऊ नका, निःसंशय अल्लाह सर्व पापाची क्षमा करील.'' ३९:५३ ''निःसंशय, अल्लाह हा मानवजातीसाठी कृपेचे भांडार आहे.'' ४०:६१ ''तो सर्वांवर आपल्या कृपेचे छत्र पसरवतो.'' ४२:२८

७

प्रकरण ७

# ईश्वरवाद[४०] अथवा ईश्वरसंबंधी संकल्पना

## (Conceptions of God)

**प्रस्तावना**

धर्माच्या तत्त्वज्ञानामध्ये ईश्वरवादाची मोठी भूमिका राहिलेली आहे. ईश्वर हा धर्म-चिंतनाचा केंद्र-बिंदू आहे. विविध धर्म हे ईश्वराविषयी अभिव्यक्त प्रतिक्रियेच्या परिणामस्वरूप आहेत. धर्म ना निष्प्रयोजन आहे, ना निर्विषयक पण. सर्व उपासनामूलक धर्म ईश्वरास आपला मुख्य विषय मानतात. समाधिमूलक धर्म मूल्यांना आपला विषय मानतात. भक्ताच्या दृष्टीमध्ये, ईश्वर मूल्य आणि आदर्शांचे स्रोत आहे. प्लेटोचा ईश्वर हा सर्वोच्च शुभ आहे. अशाप्रकारे समाधिमूलक धर्मामध्ये तोच ईश्वर हा सर्वोच्च शुभ अथवा परम मूल्यामध्ये परिणत होऊन जातो. अनीश्वरवादीची ईश्वरामध्ये अनास्था असते. परंतु तो मूल्यांची कदर करतो. येथे ईश्वर प्रकारांतराने आदर्श (मूल्य) बनून जातो आणि अशा परिस्थितीमध्ये तो अनीश्वरवादाचा प्रमुख प्रतिपाद्य बनून जातो. नास्तिकाची नास्तिकताच एका दृष्टीने मूल्य(च) आहे. सत्याहून भिन्न तो ईश्वराची परवा करत नाही. क्षणभंगुरास कमी मूल्यवान तर चिरस्थाईस जास्त मूल्यवान मानले जाते. ईश्वराच्या सत्तेस नित्य आणि चिरंतन कल्पून भक्त वास्तविक 'नित्य मूल्यांचा शोध करू इच्छितो. ईश्वर वस्तुत: अंतर्निहित मूल्यांचे बाह्यीकरण आहे.

प्रा. फ्लिंट यांच्या मते, ईश्वरवाद धर्मासाठी पर्याय-विकल्प आहे. ईश्वरानुभूतीच सच्ची धार्मिक अनुभूती आहे. धर्माचा कोपरा न कोपरा ईश्वरमय आहे. धर्म-तत्त्वज्ञानाच्या समस्त युक्तिवादामध्ये एकमात्र प्रमेय ईश्वरच आहे. आद्य (आदिम) धर्मामध्ये पण ईश्वरवाद बीजवत् विद्यमान होता. जसजशी मानवाची धार्मिक चेतना विकसित होत गेली, तसतसे मानवाने निसर्ग-पूजेचा त्याग करून ईश्वरोपासनेकडे आपले तोंड वळवले.

**धर्म-तत्त्वज्ञानाच्या विकासामध्ये ईश्वरवादाचे योगदान**

सिगमंड फ्रायडने धर्माच्या विकासास ऋजुरेखीय मानले आहे. फ्रायडच्या मतान्वये टोटेमवादापासून अनेकेश्वरवाद आणि अनेकेश्वरवाद पासून एकेश्वरवाद निघालेला आहे. फ्रायडच्या या विचारास मान्यता मिळाली नाही. आदिम धर्मांमध्ये कोणता धर्म अति प्राचीन आहे, हे निश्चित करणे कठीण आहे. म्हणून टोटेमवादाच्या आधारावर एकेश्वरवादाचे स्पष्टीकरण करता येऊ शकत नाही. काही धर्म-चिंतकांनी टोटेमवादाअगोदर शक्तीवाद आणि सर्वात्मवादास आदिम धर्म स्वरूपात स्वीकारले आहे. हेही निश्चित करणे कठीण आहे की

द्वैतवादापासून एकेश्वरवाद निघालेला आहे अथवा एकेश्वरवादापासून द्वैतवाद, कारण की दोघांना एक दुसऱ्याच्या अगोदर सिद्ध केले जाऊ शकते.

मॅक्समूलरच्या कथनानुसार, एकेश्वरवादाची संकल्पना वैदिककालीन धर्मचिंतनामध्ये बीजवत विद्यमान होती. एकेश्वरवादाच्या विकासामध्ये वैदिक विकल्पेश्वरवादाची महत्त्वपूर्ण भूमिका राहिलेली आहे. वैदिक कालामध्ये निहित सर्वोच्च शक्तीसंबंधी विचार विकासमार्गावर अग्रेसर होऊन कालांतराने एकेश्वरवादामध्ये बदलून गेले. वैदिक धर्मचिंतनास आपल्या दृष्टीपथामध्ये ठेवून डॉ. मसीह यांनी हा विकासक्रम असा दाखवला आहे –

आदिमधर्म ⟶ विकल्पेश्वरवाद ⟶ द्वैतवाद ⟶ एकेश्वरवाद. असे निर्विवादपणे म्हटले जाऊ शकते की, आदिम धर्मांमध्ये उपासनामूलक आणि समाधिमूलक धर्मांचे बीज विद्यमान होते. एकेश्वरवादाचा विकास हा बहुमुखी अथवा बहुपदरी आहे.

**ईश्वरवाद : आवश्यकता आणि उपयोगिता**

फ्रायड ईश्वरोपासनेस मनोव्याधी म्हणतो. ईश्वराप्रती केल्या गेलेल्या कर्मकांडांना तो मनस्ताप म्हणतो. त्याच्या दृष्टीने, ईश्वर हा शैशवकालीन पित्याची प्रतिछाया अथवा बालक्रीडा मात्र आहे. मार्क्स आणि नीत्शे यांनी तळमळपूर्वक अशी घोषणा केली की ईश्वर मरण पावला आहे.

उपरोक्त मतांना खरे म्हणता येऊ शकत नाही. ईश्वरामध्ये आस्था ठेवणे हानिकारक असण्यापेक्षा लाभदायक जास्त आहे. ईश्वरास सर्वज्ञ आणि सर्वव्यापक मानल्यामुळे मनुष्य हा कुत्सित कर्मांपासून वाचतो, कारण की त्याला त्याची पुरेपूर जाणीव असते की ईश्वरापासून लपून तो कोणतेच कार्य संपन्न करू शकत नाही. ईश्वराप्रति प्रेमामुळे हिंसक प्रवृत्तींचा विनाश होतो आणि मानवामध्ये नैतिक गुणांचा विकास होतो. ईश्वराप्रति अतूट आस्थेमुळे जीवनामध्ये शांती, स्थैर्य आणि सद्भावनांचा संचार होतो. इतकेच नव्हे तर, ईश्वरी सत्तेचा स्वीकार केल्यामुळे व्यक्ती मनस्तापापासून मुक्त होते, कुतर्काच्या वेटोळ्यापासून बाहेर पडून निश्चिंत बनते आणि जीवनामधील संकटे आणि समस्यांशी तिच्यामध्ये अभियोजन–क्षमता निर्माण होते.

जेम्स ईश्वरवादास स्वस्थ मानसिक व्यापार मानतो; तर युंग हा धर्मास मानसिक स्थिती समजतो. युंगच्या मते धर्म ही 'संपूर्णत्व प्राप्ती'विषयी अनुप्रेरणा आहे. संपूर्णत्वाप्रति व्याकुळता ही ईश्वरीय बेचैनी असते. 'संपूर्णत्व–वृत्ती' ही व्यक्तीमध्ये अंतर्निहित सर्वोच्च आदर्श असते.

ईश्वरच व्यावहारिक जगामध्ये आमचे सर्जनात्मक आदर्शांचे स्रोत स्वरूपात विद्यमान असतो आणि परमार्थिक जगामध्ये तो समस्त शक्यतांचे आगार आहे. ईश्वरास्थेमुळेच कर्म–फळाच्या सुनिश्चित संबंधामध्ये दृढविश्वास जमू शकतो. माणसास खात्री आहे की कृतकर्मांचा ना नाश होतो, ना अकृत कर्मांचे फळ मिळते. ईश्वरच शुभाशुभकर्मांचा हिशोब ठेवतो. म्हणून ईश्वरच नैतिक व्यवस्थेचा एकमात्र व्यवस्थापक आहे. तो नैतिक गुणांचा धाम आहे. ईश्वरवादी अनीश्वरवादीपेक्षा अधिक आशावान, आशावादी दिसून येतो.

## ईश्वरवादाचे प्रकार

### १) अनीश्वरवाद (Atheism) :

### १] पूर्वपीठिका –

**१) भारतीय चिंतन परंपरेमध्ये अनीश्वरवाद :** अनीश्वरवाद हा भारतीय चिंतन–परंपरेमध्ये कोणत्या ना कोणत्या स्वरूपात प्रचलित आहे. वेदमत आणि लोकमत, वेदान्त आणि लोकायत बहुधा एकाच वेळेस विकसित झाले. उपनिषदांमध्ये 'अन्नमय'ला ब्रह्म म्हटले गेले आहे. शांडिल्याने 'तज्जलान' (प्रकृती) याला ब्रह्म मानले आहे. छांदोग्योपनिषद्मध्ये विरोचन–प्रजापति संवादामध्ये विरोचनाने देह स्वरूपामध्येच आत्म्यास स्वीकारले आहे. श्वेताश्वतरोपनिषदामध्ये विश्वसृष्टीच्या कारणस्वरूपामध्ये 'कालवाद', 'यदृच्छावाद', 'स्वभाववाद' आणि 'नियतिवाद'चे वर्णन मिळते. शंकराचार्यांनी स्वाभाविक शक्तीसच पदार्थांच्या उत्पत्तीचे कारण मानले आहे. यदृच्छावादानुसार, पदार्थांची उत्पत्ती अकारण होते. याला 'आकस्मिकतावाद' पण म्हणतात. भगवद्गीता प्रकृतीसच कार्य आणि कारणाचा हेतू मानते. अनीश्वरवादी विचारधारेच्या प्रतिनिधी स्वरूपात बृहस्पती, चार्वाक्, कपिल, महावीर जैन आणि गौतमबुद्ध हे विशेष उल्लेखनीय आहेत.

डॉ. राधाकृष्णन् यांचे असे मत आहे, ''भौतिकवाद हे तत्त्वज्ञानाइतकेच प्राचीन आहे. बुद्धपूर्वकाळामध्ये हे विद्यमान होते. याचे बीजाणू ऋग्वेदच्या सूक्तांमध्येपण आढळात.'' ऋग्वेदाचे बृहस्पती हे भारतीय अनीश्वरवादाचे आदिप्रवर्तक गणले जातात. राक्षसांना पथभ्रष्ट करण्यासाठी त्यांनी प्रस्तुत मत प्रचारात आणले. बृहस्पतींचे शिष्य चार्वाक् हे अनीश्वरवादी, अनात्मवादी आणि वैदिक कर्मकांडाचे घोर विरोधी होते. प्राचीन भौतिकवादी विचारवंत भृगूंचे असे म्हणणे आहे की पदार्थ शाश्वत आहेत. पदार्थापासूनच जीवांची उत्पत्ती होते. पदार्थामुळेच ते जीवंत असतात आणि शेवटी ते पदार्थामध्येच विलीन होतात. बौद्ध आणि जैन ग्रंथांमध्ये नास्तिक रूपात मक्खलिगोसाल, अजित केश कंबलि, पकिधकच्चायन, निगंठनातपुत्त आणि संजयवेलाथिपुत्र इत्यादींची नावे उल्लेखनीय आहेत. अजित केश कंबलि मानवास चार मूलतत्त्वाचे संमिश्रण मानतो. त्याच्या दृष्टीने न कोणते पाप आहे, न पुण्य, न इहलोक आहे, न परलोक आहे, आणि ना कर्म–फल–विपाक. यज्ञ आणि बळींचे काहीच महत्त्व नाही. मरणोत्तर कुठलेच जीवन नाही. परलोकामधील आनंदाची लालसा मृगतृष्णेसारखी आहे. आजीवक मतावलंबी कर्मकांडाचा विरोध करत आणि पुनर्जन्मासंबंधी पुरोहितांची टिंगल उडवत. भौतिकवादी विचारवंत कंबलाश्वरधर चेतनेच्या उत्पत्तीच्या मुळाशी शरीरास मानत असे. रामायण आणि महाभारतामध्येपण भौतिकवाद आणि अनीश्वरवादाची स्पष्ट झलक दिसून येते. महाभारतामध्ये स्वभाववाद आणि यदृच्छावाद यांची स्पष्ट चर्चा आहे. प्राणी मृत्यूला कवटाळतात. विश्वाच्या पदार्थांच्या मुळात प्रकृती आहेत. सांख्यदर्शनाचे प्रणेते ईश्वराचे खंडन करतात आणि सृष्टीच्या मुळात प्रकृती आणि पुरुषास पहातात. मीमांसा कर्मस्वरूपात 'अपूर्वशक्ती'सच विश्व–सृष्टीच्या मुळात पाहते आणि ईश्वराच्या अस्तित्वास नाकारते. चार्वाक् चतुर्भूत तत्त्वाला सृष्टीचे कारण मानतो. मृत्यूस अपवर्ग म्हणतो. चैतन्यविशिष्ट कायेस आत्मा म्हणतो. तसेच ईश्वराच्या सत्तेस नाकारतो. जैन धर्म आणि बौद्ध धर्म तर सर्वथा ईश्वराचे खंडन करतात.

**२) पाश्चात्य चिंतन–परंपरेमध्ये अनीश्वरवाद :** ग्रीक तत्त्वज्ञानामध्ये माइलेशियन मत हे अनीश्वरवादाचे समर्थक आहे. थेलीज याने जलास (पाण्यास) आणि एनेक्झिमेनेस याने वायूस परमतत्त्वाच्या रूपाने स्वीकारले.

गौतमबुद्धाचा समकालीन हेराक्लाइटस अग्नीस विशुद्ध विज्ञानस्वरूप परमतत्त्व मानत असे. जगामध्ये नित्य परिवर्तन आहे, एकता, भ्रांति आहे. कालांतराने नीत्शे आणि ह्यूमपण या विचाराने प्रभावित झाले. एंपोडोक्लीस याने चतुर्महाभूतांना मूलसत्ता स्वरूपात स्वीकारले. आकाशास याने महाभूत म्हणून स्वीकारले नाही. ल्यूसिपस आणि डिमॉक्रिटीस यांच्या मतानुसार अविभाज्य, अतींद्रिय आणि नित्य परमाणूंमध्ये स्वत: गती असते आणि विश्वसृष्टीच्या व्याख्येसाठी ते स्वत: समर्थ आहेत. आत्मा परमाणूंच्या विशिष्ट संयोगाच्या परिणामस्वरूप आहे. जैन गतीच्या मुळाशी कर्मास पाहतात, आणि त्यास ईश्वरस्वरूप पाहतात. परंतु ग्रीक परमाणुवाद्यांनी गतीस परमाणूंचा स्वत:चा धर्म मानले आहे. जार्जियसच्या दृष्टीमध्ये सत्य सापेक्ष आहे. निरपेक्ष सत्य अर्थात ईश्वर असंभव आहे आणि जर निरपेक्ष सत्य असेलच तर तो संपूर्णपणे अज्ञेय आहे. ॲरिस्टिपस आणि एपिक्यूरस ईश्वर आणि देवी–देवतांना शुद्ध कल्पना मानत. त्यांच्या विचारान्वये, भौतिक परमाणुच नित्य असतात. ते जड आणि चेतन पदार्थांची रचना करण्यास समर्थ असतात. मरणोत्तर कोणतेच जीवन नाही. ॲरिस्टिपस आणि एपिक्यूरसला क्रमशः 'धूर्त चार्वाक्' आणि 'शिष्ट चार्वाक्' म्हणून गणले जाऊ शकते.

हॉब्स इंद्रियजन्य ज्ञानासच निर्भ्रान्त मानत. अतींद्रिय तत्त्वास ते काल्पनिक मानत. हॉब्स भौतिकवादी होते आणि जडवाद, इंद्रियसंवेदनवाद आणि यांत्रिकवाद यांचे पक्के समर्थक होते. ह्यूमच्या मतान्वये मानवी ज्ञानाची गती संस्कार आणि विज्ञानापर्यंतच सीमित आहे. कार्यकारण संबंधाच्या सार्वभौतिकतेचे उच्छेदन करून ह्यूम आत्मतत्त्व, जडतत्त्व आणि ईश्वरतत्त्व यांचे मूळच कापून टाकतो. ह्यूम क्षणभंगवाद्यांप्रमाणे एकता आणि आंतरिक अनिवार्यता यांना भ्रम समजतो. पंच ज्ञानेंद्रिय आणि अंत:करण परमतत्त्वास स्पर्श करू शकत नाहीत. म्हणून तो संपूर्णपणे असिद्ध आहे.

## २] अनीश्वरवाद : सिद्धान्त आणि प्रकार

अनीश्वरवाद हा शुद्ध, संपूर्ण ईश्वरविरोधी सिद्धान्त आहे. वास्तवात, 'ईश्वरविरोधी सिद्धान्त' अनीश्वरवादापेक्षा अधिक व्यापक आहे. अनीश्वरवादाशिवाय आणखीन काही सिद्धान्त आहेत, ज्यांना ईश्वरविरोधी सिद्धान्त म्हटले जाऊ शकते. जसे – अनेकेश्वरवाद, देववाद आणि सर्वेश्वरवाद. ईश्वरवादाचा 'ईश्वर' हा एक, नित्य, सर्वव्यापक, विश्वापासून अतीत आणि व्यक्तित्वपूर्ण असा आहे. अनेकेश्वरवाद हा एकाहून अधिक ईश्वरांमध्ये विश्वास ठेवणारा आहे. देववादाचा ईश्वर हा विश्वातीत आहे, तर सर्वेश्वरवादाचा ईश्वर हा विश्वामध्ये अंतर्व्याप्त आहे. अशाप्रकारे हे सिद्धान्त ईश्वरवादाच्या विरोधात स्पष्टपणे समोर उभे ठाकतात. याच्या परिणामस्वरूप यांना ईश्वरविरोधी सिद्धान्त म्हटले जाते. हे सिद्धान्त अनीश्वरवादप्रमाणे ईश्वराचे खंडन करीत नाहीत. ते 'ईश्वरवादा'चा विरोध करतात, ईश्वराचा नव्हे. अनेकेश्वरवाद, निमित्तेश्वरवाद आणि सर्वेश्वरवाद आपापल्या पद्धतीने ईश्वराच्या सत्तेचा स्वीकार करतात. निष्कर्षत: ते सेश्वरवादी आहेत, ईश्वरवादी नाहीत. ईश्वरवादचा सिद्धान्त त्यांना मान्य नाही. 'ईश्वरवाद'चा विरोध करत असल्यामुळे त्यांना ईश्वर विरोधी म्हटले गेले. प्रा. फ्लिंटच्या मतानुसार, ''अनीश्वरवाद ईश्वरामधील श्रद्धेचे खंडन आहे. हा सिद्धान्त हे स्पष्ट करतो की एक तर ईश्वर असत् आहे अथवा मानवाची ज्ञानशक्ती ईश्वरास समजण्यास असमर्थ आहे किंवा ईश्वर–सत्ताविषयक प्रमाण संतोषजनक नाहीत.''

हे निर्विवाद आहे की अनीश्वरवाद ईश्वराच्या अस्तित्वाचे खंडन करतो. धर्माचा एकमात्र विषय फक्त ईश्वरच नाही. मूल्यांच्या संरक्षणामध्ये विश्वासाचे नाव धर्म आहे. धर्म मात्र ईश्वरास्था नव्हे. एटकिंसन ली यांच्या मतानुसार, ''अनीश्वरवादास धर्म विरोधी किंवा धर्माचा निषेध म्हणता येऊ शकत नाही.''

अनीश्वरवाद्यांचे विचार आपापसात टक्कर घेतात. परिणामी अनीश्वरवादाचे विविध प्रकार (रूपे) दिसून येतात. अनीश्वरवादाचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत –

१. हठवादी वा रूढवादी अनीश्वरवाद (Dogmatic Atheism)
२. संदेहवादी अनीश्वरवाद (Sceptical Atheism)
३. समीक्षात्मक अनीश्वरवाद (Critical Atheism)
४. भौतिकवादी अनीश्वरवाद (Materialistic Atheism)
५. व्यवहारवादी अनीश्वरवाद (Pragmatic Atheism)
६. सत्तामूलक अनीश्वरवाद (Existential Atheism)

ईश्वरवादास मुख्यत्वे करून दोन विभागामध्ये विभाजित केले जाऊ शकते –

(१) नैकेश्वरवाद आणि (२) एकेश्वरवाद. नैकेश्वरवाद हे एकाहून अधिक ईश्वरामध्ये विश्वासाचे नाव आहे, तर एकेश्वरवाद म्हणजे 'एकाच ईश्वरा'मध्ये आस्था. नैकेश्वरवादच्या अंतर्गत दोन सिद्धान्त समाविष्ट आहेत– अनेकेश्वरवाद आणि द्वैतवाद.

### २) अनेकेश्वरवाद (Polytheism) :

### १] पूर्वपीठिका –

आदिम धर्म जर मानवाच्या अविकसित बुद्धीची देणगी असेल तर आध्यात्मिक धर्म मानवाच्या विकसित बुद्धीचा परिपाक आहे. अनेकेश्वरवादाचा आविर्भाव आदिम धर्माच्या शेवटी तर आध्यात्मिक धर्माच्या प्रारंभी झाला असावा. एटकिंसन ली यांना पण हे मत नि:संशयपणे मान्य आहे.

आदिम धर्मामध्ये बहुदेववाद किंवा अनेकेश्वरवादची धारणा बीजवत् विद्यमान होती. आदिम धर्माच्या रूपात सर्वात्मवाद हे मान्य करून चालते की सर्वात प्रथम शक्तिशाली जीवांविषयी रहस्यमयता, गुढता आणि आश्चर्याची भावना विकसित झाली. ह्याच भावनेने कालांतराने शक्तिशाली जीवांना देवता समजून त्यांची पूजा करावयास सुरुवात झाली. अशा प्रकारे बहुदेववाद उदयास आला. वैदिक संस्कृतीमध्ये तेहतीस कोटी देवतांची कल्पना विद्यमान आहे. 'हरि–हर', 'त्रिमूर्ति', 'देवताकुल', 'सर्वेदेवा:' वैदिक साहित्यामध्ये अनेकेश्वरवादास बळ देतात. दार्शनिक (तत्त्वज्ञानात्मक) दृष्टीने पाहिल्यास परमाणुवाद, आध्यात्मिक बहुत्ववाद आणि वैदिक बहुदेववाद अनेकेश्वरवादाचेच विविध रूप आहेत.

हे अद्यापही अनिश्चित असे तथ्य आहे की अनेकेश्वरवादापासून एकेश्वरवाद निघालेला आहे अथवा एकेश्वरवादापासून अनेकेश्वरवाद नि:सृत झालेले आहे. तरी पण हे विवादातीत आहे की धार्मिक चिंतनाचा विकास हा ऋजुरेखीय नाही. वैदिक बहुदेववादाच्या मुळात एकेश्वरवादाची संकल्पना विद्यमान आहे – 'एकं सद्विप्राबहुधावन्ति ।' मॅक्समूलरचा विकल्पेश्वरवाद याच्यासाठी एक सबळ पुरावा आहे. शांकर अद्वैतवादामध्ये

गौण स्वरूपात साधन-रूपामध्ये अनेकेश्वरवादाचे स्थान सर्वथा सुरक्षित आहे. स्पिनोझाच्या अद्वैत तत्त्वज्ञानानंतर लाइब्निजचा बहुतत्ववाद प्रकाशामध्ये आला.

वैदिक धर्मामध्ये अनेकेश्वरवादाची विविध रूपे प्राप्त होतात. जसे -

१) प्राकृतिक अनेकेश्वरवाद (Naturalistic Polytheism)

२) संगठित अनेकेश्वरवाद (Organized Polytheism)

३) मानवीय अनेकेश्वरवाद (Anthropamorphic Polytheism)

४) विकल्पेश्वरवाद (Henotheism)

५) त्रयक ईश्वरवाद (Tri-theism)

प्रमुखपणे अनेकेश्वरवादाचे दोन प्रकार आहेत. (१) लौकिक अनेकेश्वरवाद आणि (२) गूढ अनेकेश्वरवाद. ग्रीक आणि रोमच्या आदिकाळामध्ये यहूदी धर्माच्या प्रारंभी आणि वैदिक काळाच्या धर्मामध्ये लौकिक अनेकेश्वरवादाची स्पष्ट झलक दिसते. गूढ एकेश्वरवादाच्या विविध देवता एकच सत्तेची विविध रूपे आहेत. त्यांची आपली स्वतंत्र सत्ता नाही. उपनिषद्, गीता आणि शांकर अद्वैतवादामध्ये गूढ अनेकेश्वरवादच आढळून येतो. मॅक्समूलरचा विकल्पेश्वरवाद व हिंदूधर्माचा त्रयक ईश्वरवाद (ब्रह्मा, विष्णू व महेश) गूढ अनेकेश्वरवाद आहे. भगवद्गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण स्वत:स सर्व देवी-देवतांचे मूळ असल्याचे सांगतात. भगवान श्रीकृष्णाची वाणी 'मामेकंशरणव्रज' याच्यासाठी एक पुरावा आहे. यहूदी जाती 'यवोहा' यास देवराज स्वरूपात प्रतिष्ठित करते आणि आपल्या अनेक देवी-देवतांना 'यवोहा'च्या विविध रूपांमध्ये पाहाते. गूढ एकेश्वरवादाचे हे पण एक सबळ उदाहरण आहे. लौकिक अनेकेश्वरवाद देवतांना स्वतंत्र सत्ता मानतो आणि त्यांच्या मुळात कोणा एका सत्तेस पहात नाही.

## २] सिद्धान्त -

१) अनेकेश्वरवाद एकाहून अधिक ईश्वरामध्ये विश्वास ठेवणे आहे. अनेकेश्वरवाद हा विविध नैसर्गिक घटनांच्या व्याख्या स्वरूपात एकाधिक ईश्वरांमध्ये विश्वास करतो. देवी-देवतांची आपापली वेग-वेगळी कार्यक्षेत्रे असतात. यांपैकी काही शुभ घटनांचे प्रेरक असतात तर काही अशुभ घटनांचे. महापूर, भूकंप, अतिवृष्टी, अनावृष्टी आणि महामारी इत्यादींच्या मुळात अशुभ देवता असतात. यहूदी धर्मामध्ये 'यवोहा' आणि 'शैतान' हे अनुक्रमे शुभ आणि अशुभाच्या व्याख्येसाठी आहेत.

२) अनेकेश्वरवादानुसार, ईश्वराचे मूळ निवास परलोकामध्ये आहे. देवी-देवता पारलौकिक आणि मानवेतर सत्ता आहेत. पाताळलोक, यमलोक, स्वर्गलोक, इंद्रपुरी इत्यादी देवतांचे निवासस्थान आहेत. मृत्यूलोक त्यांचे अस्थायी निवास-स्थान आहे. ''जेव्हा जेव्हा धर्माला ग्लानी येते आणि अधर्माचा अभ्युदय होतो, तेव्हा तेव्हा सज्जनां (भक्तां)च्या रक्षणासाठी, दुर्जनांच्या विनाशासाठी आणि धर्माची पुनर्स्थापना करण्यासाठी मी स्वत: युगायुगात अवतीर्ण होतो.''- ।।भगवद्गीता।। ४:७८

*''यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।*
*अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।७।।*

*परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्*
*धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥८॥"* – भगवद्गीता ४:७-८

३) अनेकेश्वरवादाचा ईश्वर हा व्यक्तित्वपूर्ण आहे. तो अत्यंत शक्तिशाली आहे आणि मानवांच्या इच्छा संतुष्ट करण्यामध्ये समर्थ आहे. भक्तास पूर्ण भरवसा असतो की त्याचा इष्टदेव दुर्दिनांमध्ये त्याची मदत करेल. देवतेने कुपित होऊन आपले अनिष्ट करू नये म्हणून तो देवतेची पूजा करतो.

४) देवतागण नैतिक गुणांचे स्रोत असतात. मानवाप्रमाणे देवतापण दानवांशी युद्ध करतात. ते (देवतागण) मानवजातीचे माता-पिता आहेत आणि शिशुवत् त्याचे लालन पालन करतात. देवतांना दया, क्षमा, करुणा, सहानुभूती, प्रेम, पराक्रम आणि धैर्य यांचे आगार म्हटले जाते. अशा प्रकारे देवतांचे मानवीकरण झाले आणि मानव स्वरूपात कल्पित देवांकडून संकटाच्यावेळी मदतीची आशा बळावली. भक्त अशा देवतांशी अनुनय-विनय करून आपली गरज भागवू शकतो.

५) ईश्वर स्वभावत: अमर आहे, पूर्ण आणि नित्य आहे. त्यांच्या जीवनामध्ये अपार आनंद असतो. 'कर्म-फळ-विपाका'च्या परिपाशामध्ये देवता पण बांधले गेले आहेत.

### ३) द्वैतवाद (Dualism)

**सिद्धान्त –**

द्वैतवादानुसार, परमतत्त्व संख्येमध्ये 'दोन' आहेत; तर अनेकेश्वरवाद परमतत्त्वाच्या संख्येच्या दृष्टीने 'अनेक' आणि एकेश्वरवादानुसार परमतत्त्व 'एक' आहे. द्वैतवादी ईश्वरास 'नित्यशुभ' मानतात आणि विपत्तीच्या मुळाशी आपली वैयक्तिक चूक असल्याचे मान्य करतो. तो भौतिक, नैतिक आणि आध्यात्मिक अशुभाच्या व्याख्येकरिता ईश्वरेतर शक्तीची कल्पना करतो. अशा प्रकारे धर्माच्या इतिहासामध्ये द्वैतवादाचा आविर्भाव झाला. धार्मिकतेच्या दृष्टिकोनातून द्वैताची अनेक रूपे दिसून येतात. जसे शुभ-अशुभाचे द्वैत, व्यवस्था-अव्यवस्थेचे द्वैत, आशा-निराशेचे द्वैत, ज्ञान-अज्ञानाचे द्वैत, जड-चेतन अथवा शरीर-आत्म्याचे द्वैत. द्वैतवादाचे दोन प्रमुख रूप (प्रकार) दिसून येतात- १) तत्वमीमांसीय द्वैतवाद आणि २) धर्मशास्त्रीय द्वैतवाद.

**१) तत्वमीमांसीय द्वैतवाद –** प्लेटोच्या तत्त्वज्ञानामध्ये प्रत्यय जगत (विज्ञान जगत) आणि प्रतिभासिक जगत (इंद्रिय जगत) यांचे द्वैत आहे. प्लेटोने जगतास 'सत्' आणि 'असत्'चे अपत्य आणि 'पूर्ण ज्ञान' व 'पूर्ण अज्ञाना'मधील अवस्था म्हटले आहे. ॲरिस्टॉटलच्या तत्त्वज्ञानामध्ये द्रव्य आणि स्वरूपाचे द्वैत आहे. ॲरिस्टॉटलच्या मते विशुद्ध द्रव्य मूळ प्रकृती आहे आणि विशुद्ध स्वरूप, ईश्वर आहे. एक संपूर्ण जडता आहे तर दुसरे पूर्ण चैतन्य, एक शुद्धकर्म आहे तर दुसरे शुद्ध ज्ञान, एक गती आणि परिणाम आहे तर दुसरे अचल व कूटस्थ आहे. हे दोन्ही या जगाचे माता-पिता आहेत. ॲरिस्टॉटलचा द्वैतवाद साध्य (सुप्त शक्ती) आणि सिद्ध (जागृत शक्ती)च्या स्वरूपामध्ये प्रकट होतो. जगामधील प्रत्येक वस्तू साध्याकडून सिद्धतेकडे अग्रेसर होते. साध्यामध्ये सिद्ध सामावलेले आहे, जसे बीजामध्ये अंकुर. शुद्ध स्वरूपा(ईश्वरा)ची प्राप्तीच पूर्ण सिद्धी आहे.

देकार्तनेपण चित् आणि अचित् स्वरूपात द्वैतवाद स्वीकारलेला आहे. तो चित् आणि अचित्‌ला परस्परांहून स्वतंत्र मानतो आणि ईश्वराश्रित असल्याकारणामुळे त्यांना सापेक्ष द्रव्याच्या श्रेणीमध्ये ठेवतो. देकार्तच्या

दृष्टीमध्ये फक्त ईश्वरच निरपेक्ष द्रव्य आहे, कारण की तो कोणावरही अवलंबून नाही. अशा प्रकारे सापेक्ष द्रव्य आणि निरपेक्ष द्रव्य स्वरूपात पण द्वैतवाद देकार्तच्या तत्त्वज्ञानामध्ये परिलक्षित होते. कांटच्या तत्त्वज्ञानामध्ये उल्लेखित व्यावहारिक सत्ता आणि पारमार्थिक सत्ता द्वैतवादाच्या समर्थनार्थ एक प्रमाण (युक्तिवाद) आहे. जेम्सप्रमाणे मिल्लने पण सीमित ईश्वर आणि जड पदार्थाचे द्वैत स्वीकार केले आहे. मिल्लच्या मते, जगामध्ये अशुभ आहे. शुभ ईश्वर अशुभची व्याख्या करण्यास असमर्थ आहे.

भारतीय तत्त्वज्ञानामध्ये पण द्वैतवाद स्पष्टपणे आढळून येतो. सांख्य, मीमांसा, जैन, बौद्ध, रामानुज आणि न्याय-वैशेषिक तत्त्वज्ञान कोणत्या ना कोणत्या प्रकारे द्वैतवादाचा स्वीकार करतात. सांख्यांच्या मते दोन मूल तत्त्वे आहेत - १) पुरुष आणि २) प्रकृती. नागार्जुननेपण संवृतिसत्य आणि पारमार्थिक सत्य स्वरूपात द्वैतवाद स्वीकारले आहे. चंद्रकीर्तिने पण व्यवहार आणि परमार्थच्या द्वैतास स्वीकारले आहे. महावीर जैन यांनी अस्तिकाय-अनास्तिकाय, जीव-अजीव, मुक्त जीव-बद्ध जीव स्वरूपामध्ये द्वैतवाद मानले आहे. मीमांसक बद्ध जीव आणि मुक्त जीव स्वरूपात द्वैतवादाची प्रतिस्थापना करतात. शंकराचार्यांचे व्यवहार-परमार्थ आणि रामानुजचे जड-चेतन द्वैतवादासाठी प्रमाण आहेत. न्याय-वैशेषिकांच्या अनुसार, ईश्वर कर्मानुसार जगाची सृष्टी करतो आणि जीवांच्या सुख-दुःखाचे विधान करतो. वैशेषिक दिक, काल, मन, आत्मा आणि भौतिक परमाणूंना नित्य मानतात आणि सांसारिक वस्तूंना अनित्य घोषित करतात. ही पण द्वैतवादाची एक झलक आहे.

**२) धर्मशास्त्रीय द्वैतवाद** - पाश्चात्य आणि भारतीय धर्मांमध्ये द्वैतवादाचे दर्शन घडते. पुराण आणि वेदांमध्ये देव आणि दानवांची चर्चा आहे. देव शुभचे प्रतीक आहेत तर दानव हे अशुभाचे. हिंदू धर्मामध्ये राम-रावण, कृष्ण-कंस, पांडव-कौरव यांच्यामधील संघर्षाची उदाहरणे सापडतात. छांदोग्योपनिषदानुसार प्रत्येक व्यक्तीमध्ये नित्य आसुरी आणि दैवी प्रवृत्तींमध्ये संघर्ष होत राहत असतो. मानव-शरीर हे शुभ आणि अशुभ वृत्तीचे संग्रामस्थळ आहे.

द्वैतवादाची खरी झलक पारसी धर्मामध्ये विद्यमान आहे. या धर्माचा अति प्राचीन ग्रंथ 'जिंदावेस्ता' वेदांच्या समकक्ष मानला जातो. या ग्रंथामध्ये 'अहुर-मजदा' आणि 'अहिरमन' क्रमशः दिव्य आणि अदिव्य अथवा शुभ आणि अशुभ स्वरूपामध्ये दोन वेगळ्या सत्तास्वरूपात चर्चित आहेत. 'अहुरमजदा' शुभचे कारण आहे तर 'अहिरमन' हा अशुभाचा स्रोत आहे. पारसीधर्माचा असा दृढ विश्वास आहे की शेवटी विजय हा अहुरमजदाचाच होणार. हिंदू धर्म पण देव-दानव संघर्षामध्ये शेवटी देव अथवा शुभा (सत्य)चा विजय होत असल्याचे मानतो. 'सत्यमेव जयते नानृतं ।' सैद्धान्तिक रूपामध्ये पारसी धर्म हा भलेही एकेश्वरवादी वाटो, परंतु व्यावहारिक दृष्ट्या त्याचा द्वैतवाद अबाध आहे. याचप्रमाणे शांकर तत्त्वज्ञान पण व्यवहारतः द्वैतवादी मानला जाईल.

ख्रिश्चन धर्म पण व्यावहारिक दृष्टीने द्वैतवादाचे समर्थन करतो. ख्रिश्चन धर्मामध्ये देव आणि शैतानचे द्वैत आणि इस्लाम धर्मामध्ये अल्लाह आणि शैतानचे द्वैत पहावयास मिळते. शैतान अधर्म, अशुभ, अविश्वास आणि सर्व अपकर्म, कुकर्मांचे मूळ आहे. शैतान ईश्वराच्या विरोधात बंडाळी करतो, विद्रोह करतो आणि धार्मिकांना भ्रमित करून पथभ्रष्ट करतो.

निष्कर्ष स्वरूपात असे म्हणता येईल की, द्वैतवाद दोन स्वतंत्र सत्तांमध्ये आस्थेचे नाव आहे. जगाच्या व्याख्येसाठी 'एक सत्ता' असमर्थ आहे. ज्याप्रमाणे माता-पित्याच्या सहयोगाने, सहवासाने संततीनिर्मिती शक्य आहे, त्याचप्रमाणे जड-चेतनच्या सहयोगाने विश्व-सृष्टी संभव आहे. जड ना चेतनची उत्पत्ती आहे ना चेतन जडची.

**४) एकेश्वरवाद (Monotheism)**

**१] पूर्वपीठिका –**

एक ईश्वरामध्ये आस्था म्हणजे एकेश्वरवाद. जग हे त्या एक ईश्वराचे परिणाम वा विवर्त आहे. एकेश्वरवाद सुविकसित मानवबुद्धीची देणगी आहे आणि धर्माची परिपक्व अवस्था आहे.

मानवी-सभ्यतेच्या आरंभी मानवाने आश्चर्यकारी नैसर्गिक शक्तींना आपले उपास्य मानले. परिणामी, अनेकेश्वरवाद अस्तित्वात आला. वैज्ञानिक प्रगतीसोबतच मानव हा अनेकतेपासून ते एकतेकडे अग्रेसर होत गेला, कारण की विज्ञानपण जगाच्या मुळात एकरूपतेस पाहू इच्छिते. याच कारणामुळे अनेकेश्वरवाद मानवाच्या मनास संतुष्ट करू शकला नाही. याच्या परिणामस्वरूप ईश्वरासंबंधी शोध निरवरोध-अबाध रीतीने चालूच राहिले. सृष्टीमध्ये निहित एकरूपता आणि समतोल व्यवस्थेच्या व्याख्येच्या हेतूसाठी एक, असीम, नित्य, सर्वशक्तिमान आणि सर्वज्ञ ईश्वरावर श्रद्धा ठेवणे मनुष्यासाठी एक बौद्धिक गरज ठरली. अनेकेश्वरवादाच्या दृष्टीने एकाच वेळेस एकापेक्षा जास्त देवी-देवतांना पूजणे व्यावहारिक दृष्टीने अतिसीमित मानवास नितांत अशक्य आहे. उपासनेच्या या व्यावहारिक अडचणीमुळे मनुष्यास एकेश्वरवादाकडे कलणे आवश्यक ठरले.

अनेकेश्वरापासून एकेश्वराचा विकास अंदाधुंद स्वरूपात नाही. वैदिक काळामध्ये पण अनेकेश्वरास प्रातिभासिक समजले जात असे आणि केवलैकेश्वरास पारमार्थिक सत्याच्या श्रेणीमध्ये ठेवले जाई. वेदाची प्रत्येक देवी-देवता पूजेच्या वेळेस सर्वशक्तिमान, सर्वज्ञ, सर्वव्यापक आणि सर्वोच्च समजले जाई. या विचारास कालांतराने मॅक्समूलर यांनी 'विकल्पेश्वरवाद' या स्वरूपात अभिव्यक्त केले. विकल्पेश्वरवादानुसार, पूज्य सत्ता एक आहे आणि अनेक देवी-देवता तिच्या पूजा-विधीचे परिणाम आहेत. ऋग्वेदामध्ये याचे दाखले आहेत. योगवाशिष्ट याच मतास पुष्टि देते. भगवद्गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णाने याच मतास परिपुष्ट केले आहे. ''जो मला सर्वत्र पाहतो आणि सर्व काही माझ्यामध्ये पाहतो, त्याला मी कधी दुरावत नाही, तसेच तोही मला कधी दुरावत नाही. जो परमात्म्याच्या भक्तिपूर्ण सेवेमध्ये युक्त होतो, तो सर्व परिस्थितीत माझ्यामध्ये सदैव निवास करतो.'' ६:३०-३१

याच विकल्पेश्वरवादाने कालांतराने एकेश्वरवादाचे रूप धारण केले. अनेकेश्वरवादापासून एकेश्वरवादपर्यंतची यात्रा हा धार्मिक अनुभूतीच्या उत्तरोत्तर प्रगाढतेचा परिणाम आहे. समृद्ध एकेश्वरवादाच्या स्थापनेमध्ये शांकर अद्वैताची प्रमुख भूमिका राहिली आहे.

यहूदियांचे आदी पिता मूसा यानी यहूद्यांमध्ये एकेश्वराचा प्रचार-प्रसार केला. ईसाई (ख्रिश्चन) धर्म एकेश्वरवादाचा समर्थक आहे. इस्लाम धर्म तर विशुद्ध एकेश्वरवादी आहे.

आधुनिक पाश्चात्य तत्त्वज्ञानामध्ये एकेश्वरवादाची झलक दिसते. आधुनिक तत्त्वज्ञानाचा जनक देकार्त याने तत्त्वत्रयाची स्थापना केली. त्याने चित् आणि अचित्ला सापेक्ष द्रव्य म्हटले आहे आणि ईश्वरास निरपेक्ष द्रव्याच्या श्रेणीमध्ये ठेवले आहे. लक्षपूर्वक पाहिल्यास देकार्तच्या तत्त्वज्ञानामध्ये एकेश्वरवादाची झलक दिसून येते, कारण की सापेक्ष द्रव्य हे मुळी द्रव्य नसते. द्रव्य तर स्वाभाविकपणे निरपेक्ष असते. या आधारावर फक्त ईश्वरच द्रव्य ठरला जातो. स्पिनोझाच्या तत्त्वज्ञानामध्ये ही संकल्पना सुस्पष्ट झाली आहे. त्याने सापेक्ष द्रव्यास आत्मविरोधी घोषित करून ईश्वरच एक मात्र द्रव्य असल्याची घोषणा केली. स्पिनोझाचा एकेश्वरवाद वास्तविक सर्वेश्वरवाद आहे. स्पिनोझा आणि शंकराचार्यांच्या एकेश्वरवादास 'अमूर्त एकतत्त्ववाद' म्हटले जाऊ शकते. हेगेल, ग्रीन आणि ब्रॅडले यांच्या एकेश्वरवादास 'मूर्त एकतत्ववादा'च्या अंतर्गत समाविष्ट केले जाऊ शकते. काही एकेश्वरवादी ईश्वरास व्यक्तित्वपूर्ण, सगुण, आणि विश्वव्यापी मानतात तर काही निर्वैयक्तिक, निर्विशेष आणि विश्वातीत– तरीपण, ते एकच ईश्वरास मानतात.

**२] सिद्धान्त –**

१) ईश्वर विश्वाचा कर्ता, मूल्यांचा संरक्षक आणि सृष्टीचा आद्यन्त संचालक आहे.

२) ईश्वर एक असीम, नित्य, सर्वशक्तिमान, सर्वज्ञ, सर्वव्यापक आणि सर्वोच्च शुभ–सत्ता आहे.

३) काही एकेश्वरवादी ईश्वरास सगुण आणि विश्वव्यापी मानतात तर काही त्याला निर्गुण, व्यक्तित्वशून्य आणि विश्वातीत.

४) ईश्वर हा 'अकारण कारण' (uncaused cause) आहे. उपनिषदामध्ये ईश्वरास 'स्वयंभू' म्हटले गेले आहे. ॲरिस्टॉटलने त्याला 'गतिदायक अगतिमान' (unmoved Mover) म्हटले आहे. ईश्वर जगाच्या समस्त घटनांचा आद्य प्रवर्तक आहे आणि तो स्वत: गतिमान आहे.

५) ईश्वर सद्गुणांचे अधिष्ठान आहे. मानवाच्या तुलनेने ईश्वरी चेतनेचा विस्तार अनंत आहे आणि त्याच्या चेतनेच्या अवधानामध्ये असंख्य घटना समाविष्ट असतात. तो अनंत शक्यतांचा आगार आहे आणि संपूर्णत्वाची अनुप्रेरणा आहे.

६) ईश्वराने विश्वाची सृष्टी या हेतुने केलेली आहे की शेवटी संकल्प स्वातंत्र्यपूर्ण मानव ईश्वराच्या आदेशांचे पालन करून सत्यसंकल्पी जीव बनून जावे आणि सांसारिक पाशापासून मुक्त होऊन जावे.

७) ईश्वर अनंत सर्जनात्मक शक्तिसंपन्न आहे. विश्व हे अनंत घटनांची क्रमावली आहे. घटनांची मालिका आहे. अशा विश्वाची रचना ना सांत मानव करू शकतो ना जड पदार्थ. रचनात्मक कार्य स्वत: चेतन सत्तेस पुष्ट करते. जो जड आहे तो रचना करण्यामध्ये असमर्थ असतो. अशाप्रकारे एका अप्रतिम शिल्पकाराच्या स्वरूपात ईश्वराची सत्ता सिद्ध होते. काही एकेश्वरवादी ईश्वरास जगाचा निमित्तकारण मानतात, तर काही निमित्तकारण आणि उपादानकारण दोन्ही आणि काही फक्त उपादानकारण स्वरूपात त्याच्या सत्तेचा स्वीकार करतात.

एकेश्वरवादाचे प्रमुख चार प्रकार आहेत – (१) निमित्तेश्वरवाद, (२) सर्वेश्वरवाद, (३) परसर्वेश्वरवाद किंवा पुरुषोत्तमवाद आणि (४) व्यावहारिक ईश्वरवाद. पुढे यांचे क्रमशः विवेचन प्रस्तुत करण्यात आले आहे.

### ५) निमित्तेश्वरवाद (Dism)

#### १] पूर्वपीठिका –

निमित्तेश्वरवादास देववाद किंवा तटस्थ ईश्वरवाद पण म्हणतात. इंग्रज धर्मतत्त्ववेत्त्यांनी या सिद्धान्तास विशेष मान दिला आहे. देववादास सुव्यवस्थित रूप देण्याचे श्रेय जाते चरबरीचे हर्बर्ट यांना. सुप्रसिद्ध विचारक वाल्टेयर याच विचारधारेचे समर्थक होते. सोळाव्या–सत्राव्या शताब्दीमध्ये जॉन टोलँड, मैथ्यू टिंडल आणि टॉमस चब यांनी तटस्थ ईश्वरवादाचे विधिवत् प्रतिपादन केले. न्यूटन, लैपलेस आणि डार्विनसारख्या सुप्रसिद्ध वैज्ञानिकांनी पण निमित्तेश्वरवादाचे समर्थन केले.

देववादाच्या दोन प्रमुख मान्यता आहेत – (१) ईश्वराचे अतीतत्त्व आणि (२) तर्क बुद्धीची पर्याप्तता. हा सिद्धान्त प्रोटेस्टंट ईसाई (ख्रिश्चन) संप्रदायापासून निघालेला आहे असे वाटते.

तटस्थ ईश्वरवाद हा ना विज्ञानाचा एखादा पैलू आहे ना ही कोणता सिद्धान्त. आपण एवढेच म्हणू शकतो की हा सिद्धान्त वैज्ञानिक प्रगतीची एक देणगी आहे, स्वत: विज्ञान नव्हे. असे वाटते की विज्ञानाच्या प्रसारासोबत तटस्थ ईश्वरवाद पण लोकप्रिय होत गेला. विज्ञानाप्रमाणेच हा सिद्धान्त तर्कास सर्वोच्च महत्त्व देतो. ईश्वरीय प्रयोजनास समजण्यासाठी निमित्तेश्वरवाद मानवबुद्धीस पुरेसा समजतो.

#### २] सिद्धान्त –

१) ईश्वर जगाचा मात्र निमित्तकारण आहे. विश्वाच्या सृष्टीस त्याला बाह्य उपादानांची गरज नसते. ईश्वर जगाची रचना (निर्मिती) शून्यापासून करतो.

२) ईश्वर मात्र सृष्टीकर्ता आहे, तो सृष्टी–रक्षक किंवा संहारक नाही.

३) ईश्वराची विश्व–सृष्टी कालिक आहे. एका निश्चित वेळेस जगाची निर्मिती झालेली आहे. जगाच्या निर्मिती अगोदर कोणत्याच चेतन अथवा अचेतन पदार्थाचे अस्तित्व नव्हते. संसाराचे ईश्वरीय कारण अनादी काळापासून विद्यमान आहे. सृष्टीच्या अगोदर आणि तिच्या लयानंतर ईश्वरीय कारण यथावत् आहे तसेच राहते.

४) विश्वाच्या निर्मितीच्या वेळी ईश्वराने विश्वामध्ये यथेष्ट शक्ती अथवा नियम भरून टाकले. परिणामी विश्व स्व–संचालित झाले.

५) ईश्वराची सृष्टी ही सोद्देश्य आहे. विश्वाच्या निर्मितीमध्ये ईश्वराचा कोणताच स्वार्थ नाही. सजीवांच्या–प्राण्यांच्या सुख–सुविधांसाठी त्याने स्वेच्छा विश्वाची निर्मिती केली. त्यांच्या हितासाठी त्याने विश्वाचे सर्जन केले. हेच सृष्टीचे मूळ प्रयोजन आहे.

६) निमित्तेश्वरवाद संकल्प–स्वातंत्र्याचे जोरदार समर्थन करते आणि माणसास आपले कार्य करण्यासाठी संपूर्ण स्वातंत्र्य दिलेले आहे.

७) वस्तुत: ईश्वर विश्वातीत आणि तटस्थ आहे.

### ६) सर्वेश्वरवाद (Pantheism)

#### १] पूर्वपीठिका –

सर्वेश्वरवादास विश्वव्याप्त ईश्वरवाद अथवा अमूर्त एकतत्ववाद पण म्हणतात. सर्वेश्वरवादाचा शाब्दिक अर्थ आहे – 'सर्व काही ईश्वर आहे आणि ईश्वरच सर्व काही आहे.' निमित्तेश्वरवादाच्या अतीतपणामुळे भक्त आणि ईश्वरामधील अंतर वाढत जाते. फलस्वरूप उपासनेमध्ये अवरोध निर्माण होतो. उपासनेसाठी आराधक आणि आराध्याच्या दरम्यान 'सामीप्य भाव' असणे परम आवश्यक असते. सर्वेश्वरवाद जगास ईश्वराचा परिणाम मानतो परिणामी भक्त सर्वत्र ईश्वर उपस्थित असल्याचे भान ठेवून त्याच्या प्रेममय उपासनेमध्ये बुडून जातो. अशा प्रकारे अतीतपणामुळे निर्माण होणारी अडचण दूर होते. सर्वेश्वरवाद वास्तविक बहुदेववाद अथवा तटस्थ ईश्वरवादाच्या विरोधात प्रतिक्रियेच्या परिणामस्वरूप उदयास आला. सर्वेश्वरवादाचा ईश्वर व्यक्तित्वशून्य, संकल्पविहीन, पूर्ण आणि अनंत आहे. विश्व आणि ईश्वरामध्ये अपृथक् सिद्धसंबंध आहे. स्पिनोझा जगास ईश्वराची स्वाभाविक अभिव्यक्ती मानतो, आाणि त्याला स्वयंभू, नित्य, अनंत आणि निर्वैयक्तिक घोषित करतो. अशा प्रकारे स्पिनोझा सर्वेश्वरवादाचा प्रबळ समर्थक आहे.

ईशावास्योपनिषदामध्ये स्पष्ट आहे की विश्वामध्ये जे काही आहे, ते ईश्वरामुळे आहे. 'ईशावास्यमिदं सर्वं यत्किंचित् जगत्यां जगत।' ईशावास्योपनिषद–१ तसेच, भगवद्गीतेमध्ये पण ईश्वरास सर्वत्र विद्यमान मानले गेले आहे. ''जो मला सर्वत्र पाहतो आणि सर्व काही माझ्यामध्ये पाहतो, त्याला मी कधी दुरावत नाही, तसेच तोही मला कधी दुरावत नाही.'' ६:३०

#### २] सिद्धान्त –

१) सर्वेश्वरवादचा ईश्वर व्यक्तित्वशून्य आहे. तो ईश्वरास एक, नित्य, निर्गुण, स्वयंभू आणि निर्वैयक्तिक सिद्ध करतो.

२) ईश्वर आणि विश्वामध्ये अविभाज्य संबंध आहे. ईश्वर विश्वामध्ये अंतर्व्याप्त आहे आणि विश्व संपूर्णपणे ईश्वराश्रित आहे.

३) ईश्वर विश्वाचे मात्र उपादानकारण आहे. ज्याप्रमाणे तेल हे तिळाच्या परिणामस्वरूप आहे, त्याचप्रमाणे विश्व ईश्वराचा परिणाम आहे. ईश्वर कुंभाराप्रमाणे विश्वाचा सृष्टा नाही. कुंभार आणि कुंभामध्ये भेद–संबंध आहे, मात्र ईश्वर आणि विश्वामध्ये अभेद–संबंध आहे.

४) ईश्वर विश्वाच्या माध्यमाने स्वत:स अभिव्यक्त (प्रकट) करतो आणि विश्व आपल्या अस्तित्वासाठी ईश्वरावर निर्भर असते. ईश्वर हा विश्वाचा रचनाकार आहे. विश्व तर ईश्वराची स्वाभाविक अभिव्यक्ती आहे. ज्याप्रमाणे सूर्याची किरणे स्वाभाविकपणे बाहेर पडतात त्याचप्रमाणे विश्व पण ईश्वराचे सहज परिणाम आहे.

५) सर्वेश्वरवाद 'अनेकत्ववादा'चा विरोधी आहे.

६) ईश्वर आणि विश्वाचा संबंध अकालिक आहे. हा सिद्धान्त ईश्वर आणि विश्व दोहोंस शाश्वत आणि चिरंतन मानतो.

७) सर्वेश्वरवादाचा ईश्वर पूर्ण आणि निर्वैयक्तिक असल्याकारणाने संकल्प–शून्य आहे.

८) 'परमसत्'ला प्राप्त करण्यासाठी केवळ उपासनाच एकमात्र विधी नाही, ध्यान, योग आणि समाधीमुळे ईश्वर–लाभ किंवा आत्म–लाभ सर्वथा संभव आहे.

## ७) परसर्वेश्वरवाद वा पुरुषोत्तमवाद (Panetheism)

### १] पूर्वपीठिका –

कदाचित, सर्वेश्वरवादाच्या त्रुटींना दृष्टीक्षेपात ठेवून परसर्वेश्वरवाद प्रस्तुत केला गेला असला पाहिजे. देववाद ईश्वरास विश्व आणि सान्त आत्म्यांपासून सर्वस्वी अतीत मानतो. सर्वेश्वरवाद ईश्वरास सान्त जीवात्म्यांसह जगामध्ये अंतर्व्याप्त मानतो. व्यावहारिक ईश्वरवाद ईश्वरास विश्वातीत आणि विश्वव्यापी दोन्ही मानतो. व्यावहारिक ईश्वरवादानुसार, ईश्वर सान्त आत्म्यांपासून नितांत पलीकडे आहे. सर्वेश्वरवाद भक्तास भगवान सिद्ध करतो, अहंकाराचे मूळ मजबूत करतो आणि अशाप्रकारे उपासनेच्या विरोधात असल्याचे सिद्ध करतो. म्हणून, हा सिद्धान्त पण धार्मिक भावनेची उपेक्षा करतो.

परसर्वेश्वरवाद ईश्वरास विश्वव्यापी आणि विश्वातीत दोन्ही मानतो. तो ईश्वरास विश्व आणि जीवात्मा दोहोंमध्ये अंतर्व्याप्त आणि दोहोंहून अतीत असे मानतो. ईश्वर जीवात्म्यांचा अंतर्यामी आहे. तो त्यांच्या संकल्प स्वातंत्र्याचा रक्षक आहे. ईश्वर सीमित आत्म्यांमध्ये व्याप्त आहे, कारण की तो स्वत:स आदर्श आत्म्यांच्या माध्यमातून प्रकट करतो आणि सीमित आत्म्यांना नैतिक आदर्शाकडे उन्मुख करतो. 'ईश्वर अनंत आणि पूर्ण आदर्श आहे'– या दृष्टीने तो सीमित आत्म्यांहून पलीकडे आहे. अतीत आहे. जीवात्म्यांमध्ये अंतर्व्याप्त असूनही ईश्वर त्यांच्या स्वतंत्रेच्छेस बाधित करत नाही. परसर्वेश्वरवादाचे हेच मूळ वैशिष्ट्य आहे.

या सिद्धान्तानुसार विश्व ईश्वरामध्ये आहे, परंतु ईश्वर विश्वामध्ये संपूर्णपणे विहित नाही. तो विश्वामध्ये अंतर्व्याप्त असण्यासोबतच त्याच्यापासून अतीत पण आहे. याच अर्थी हा सिद्धान्त सर्वेश्वरवादाहून भिन्न आहे, कारण की सर्वेश्वरवाद विश्वास ईश्वराचे प्रतिरूप मानतो. खरोखर हा सिद्धान्त म्हणजे देववाद आणि सर्वेश्वरवाद यामधील समेट आहे.

### २] सिद्धान्त –

१) ईश्वर जगाचा निमित्तकारण आणि उपादानकारण दोन्ही आहे. जसे, कुंभार हा कुंभाचा निमित्तकारण असतो, तद्वत ईश्वर विश्वाचा निमित्तकारण नाही. ईश्वर विश्वाची रचना सृष्टी अशा प्रकारे करतो की जसे कोळी आपल्या शरीरामधून द्रवपदार्थ बाहेर काढून जाळे विणतो. विश्वामध्ये व्याप्त असल्याकारणाने ईश्वर हा विश्वाचे उपादानकारण आहे आणि विश्वापासून बहिर्निष्ठ असल्याकारणाने तो विश्वाचा निमित्तकारण आहे.

२) हा सिद्धान्त ईश्वर आणि विश्वाचा संबंध अकालिक मानतो.

३) ईश्वर विश्वातीत आणि विश्वव्यापी दोन्ही आहे. अंतर्यामी अथवा आंतरिक पथ-प्रदर्शक या नात्याने तो जीवात्म्यांमध्ये विद्यमान असतो. अनंत सत्तेच्या रूपाने तो विश्वापासून अतीत आहे. विश्वामध्ये अंतर्व्याप्त असूनसुद्धा तो विश्वामध्ये समाप्त होत नाही. जीवात्म्यांमध्ये असूनही तो त्यांच्या संकल्प-स्वातंत्र्यास बाधित करत नाही. अशाप्रकारे मानव हा आपल्या बऱ्या-वाईट कर्मांप्रति स्वत: जबाबदार असतो, कारण की तो आपल्या स्वत:च्या स्वतंत्र इच्छेने कार्य करीत असतो.

४) चेतन आणि जड दोन्ही आपल्या सत्तेसाठी ईश्वराश्रित आहेत.

५) परसर्वेश्वरवादानुसार, ईश्वर हा विविधतेमध्ये एकता आहे. 'एकोऽहंबहुस्याम' सर्वेश्वरवाद 'बहुशून्य एकत्ववाद' आहे, तर परसर्वेश्वरवाद 'प्रपंचयुक्त एकतत्ववाद' आहे. पुरुषोत्तमवाद ईश्वरास विश्वाचा कर्ता, धर्ता आणि हर्ता मानतो.

६) ईश्वर-मध्य-विश्ववाद अथवा परसर्वेश्वरवाद ईश्वर आणि विश्व यांच्यामध्ये अंग-अंगी-संबंध (अंगांगी संबंध) मानतो. हा सिद्धान्त ईश्वरास, विश्वासाठी आवश्यक मानतो. विश्व ईश्वराचे प्रकटीकरण अथवा आत्म-प्रकाशन आहे. म्हणून, ईश्वरास स्वत:स अभिव्यक्त करण्यासाठी विश्वाची नितांत गरज आहे. अशाप्रकारे विश्व आणि ईश्वरामध्ये अपृथक्सिद्ध संबंध आहे. जसे आधार-विधानावरून निष्कर्ष निघतो, तद्वत ईश्वरापासून विश्व निघालेले आहे.

७) ईश्वर एक, अनंत, असीम, पूर्ण, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान आणि निर्वैयक्तिक आहे. बर्गसाँने प्राणशक्तीस मूल सत्ता म्हटले आहे, जी स्वतंत्र आणि व्यक्तित्वशून्य आहे. हीच शक्ती ईश्वर आहे, जी कोणत्याही स्वरूपात स्वत:स अभिव्यक्त करू शकते.

भारतीय तत्त्वज्ञानामध्ये शंकराचार्यांच्या विचार-धारेत परसर्वेश्वरवादाची झलक दिसते. त्यांनी पण ब्रह्मास निर्गुण, निर्विशेष, निर्वैयक्तिक, विश्वातीत आणि विश्वव्यापी मानले आहे. त्यांच्या दृष्टीने विश्वव्यापी ब्रह्म ईश्वर आहे आणि विश्वातीत ब्रह्म वास्तविक ब्रह्म आहे. हेगेल विश्वास ईश्वराची वास्तविक अभिव्यक्ती मानतो, तर शंकराचार्य ब्रह्मास सत्य आणि जगतास मिथ्या सिद्ध करतात.

### ८) व्यावहारिक ईश्वरवाद (Theism)

### १] पूर्वपीठिका –

व्यावहारिक ईश्वरवादाचा धार्मिक आचरणावर विशेष भर असतो. हा सर्वेश्वरवादाच्या प्रतिक्रियास्वरूप निर्माण झाला. सर्वेश्वरवाद विश्वास ईश्वराकडे संपूर्णपणे विलीन करतो आणि मानवी इच्छेस ईश्वरी इच्छेची बाहुली बनवून नैतिकतेचे मूळ कापतो, परंतु व्यावहारिक ईश्वरवाद मानवाच्या संकल्प स्वातंत्र्यास अक्षुण्ण दाखवून नैतिक चेतनेची गरज पूर्ण करतो.

व्यावहारिक ईश्वरवाद व्यावहारिक एकेश्वरवाद आहे. या वादाचा ईश्वर व्यक्तित्वपूर्ण असल्याकारणाने धार्मिक भावनेस संतुष्ट करण्यामध्ये समर्थ आहे, तर परसर्वेश्वरवाद ईश्वरास निर्वैयक्तिक समजून धार्मिक भावनांना कुचलतो-तुडवतो. व्यावहारिक ईश्वरवादाची अशी मान्यता आहे की ईश्वर कोणत्याही रूपामध्ये येऊन भक्ताचे रक्षण करण्यामध्ये पूर्ण समर्थ असतो. विश्व ईश्वरीलीलेचा परिणाम आहे. मनुष्य स्वत: आपल्या कर्मांचा कर्ता आणि फळाचा भोक्ता आहे.

**१) भारतेतर ईश्वरवाद :** जगामधील अधिकांश धर्म ईश्वरवादाचे समर्थक आहेत. यहूदी धर्माची मान्यता आहे की एकेश्वर 'यवोहा' सृष्टीकर्ता, विश्वरक्षक आणि न्यायप्रिय आहे. पारसीधर्म अहुरमज़दास ईश्वर मानतो आणि त्याला विश्वाचा सृष्टा आणि शुभ-रक्षक मानतो. ईसाई (ख्रिश्चन) धर्म ईश्वरास पवित्र आस्थेच्या रूपात स्वीकार करतो. हा ईश्वर मानवजातीचा प्रेममय परमपिता आहे. येशू मसीह ईश्वर-पुत्र आहेत आणि त्यांच्यामध्ये पण दैवी गुण विद्यमान आहेत.

यहूदी धर्म, ईसाई (ख्रिश्चन) धर्म आणि इस्लाम धर्म हे सर्व ग्रंथधारक धर्म असून प्रेषित समर्थक आहेत. म्हणून हे सर्व प्रैषित्यधर्म किंवा नबीमूलक धर्म (Prophetic Religion) आहेत. या सर्व नबीमूलक धर्मांचे हे वैशिष्ट्य आहे की ते आपल्या एकेश्वराच्या एकमात्र सत्तेस ईश्वर मानतात. यहूदी धर्माचा ईश्वर न्यायाधीश आहे आणि ईसाई धर्माचा ईश्वर हा प्रेमाचा पारावार आहे. इस्लाम धर्मानुसार ईश्वर न्यायाधीश आहे आणि निवाड्याच्या अंतिम दिवशी तो व्यक्तीस तिच्या कर्मानुसार स्वर्ग किंवा नरक प्रदान करतो.

आधुनिक पाश्चात्य विचारधारेमध्ये पण ईश्वरवादाची स्पष्ट झलक दिसते. देकार्त, बर्कले, सोर्ले, जेम्सवार्ड आणि प्रिंगल पैटिसन यांनी ईश्वरवादाचे समर्थन केले आहे. देकार्तच्या मते ईश्वर नित्य, निरपेक्ष, सर्वशक्तिमान, व्यक्तित्वपूर्ण, सृष्टीकर्ता आणि विश्वरक्षक आहे. बर्कले इंद्रियानुभववादी असूनसुद्धा ईश्वरवादी होते. ते ईश्वरास असीम आणि परम सत्ता मानतात. ते ईश्वरास ससीम आत्म्यांचा आधार सिद्ध करतात. कांटचा नैतिक ईश्वर व्यावहारिक ईश्वरवादाच्या अंतर्गतच गणला जातो. जेम्सवार्ड ईश्वरास 'परमसत्ता' म्हणतात आणि इतर आत्म्यांना याचेच परिवर्तित रूप मानतात. प्रिंगल पैटिसन ईश्वर आणि जीवाच्या संबंधास अंग-अंगाचा संबंध दर्शवतात.

**२) भारतीय ईश्वरवाद :** वेद, उपनिषद् आणि गीतेमध्ये ईश्वरवादाचे सच्चे रूप पहावयास मिळते. ऋग्वेदच्या पुरुष सूत्राच्या दशम मंडलामध्ये ईश्वरास विराट रूप दिले गेले आहे. श्वेताश्वतर उपनिषद ईश्वरास विश्वव्यापी आणि विश्वातीत दोन्ही मानतो. गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णाने स्वत:स सृष्टीकर्ता आणि सृष्टीच्या अतीत असल्याचे म्हटले आहे. ईश्वराने प्रेम आणि करुणेच्या वशीभूत होऊन विश्वाची निर्मिती केलेली आहे, आवश्यकता अथवा इच्छेच्या वशीभूत होऊन नाही. एकच 'परमसत्' ब्रह्माच्या रूपात चिंतनाचा विषय आहे आणि ईश्वर स्वरूपात पूजा-अर्चनेचा.

अशा प्रकारे ईश्वरप्राप्तीचे मुख्यत्वे करून तीन मार्ग आहेत - १) ज्ञान, २) कर्म आणि ३) भक्ती

**२] सिद्धान्त -**

१) ईश्वरवादानुसार, ईश्वर जगामध्ये अंत:स्थित आणि त्याच्यापलीकडे पण आहे. ईश्वर सान्त जीवात्म्याहून सर्वथा पार आहे. सान्त मतांची ईश्वराद्वारे सृष्टी झाली आहे आणि त्यांना कर्म-स्वातंत्र्य लाभलेले आहे.

२) ईश्वर विश्वाचा उपादान आणि निमित्तकारण दोन्ही आहे. ईश्वर विश्वाची रचना शून्यापासून करत नाही. विश्व त्याचे स्वाभाविक परिणाम (स्वरूप) आहे. विश्वाच्या अणू-रेणूमध्ये ईश्वर विद्यमान आहे. ईश्वर सर्वशक्तिमान, सर्वव्यापक, सर्वज्ञ, नित्य, पूर्ण आणि दयाळू आहे. विश्वसृष्टीच्या मुळात ईश्वराचा सर्जनात्मक स्वभाव आहे.

३) ईश्वर व्यक्तिपूर्ण आहे. तो सद्गुणांचा धाम आहे. ईश्वरवादानुसार मनुष्य संकल्प-स्वातंत्र्याचा सदुपयोग करून ईश्वराची सत्कृपा प्राप्त करू शकतो आणि अशुभापासून मुक्त होऊ शकतो.

४) व्यावहारिक ईश्वरवादानुसार ना विश्व ईश्वरापासून स्वतंत्र आहे ना विश्व ईश्वरमय आहे आणि ना जीवात्मा पण ईश्वराच्या हातची बाहुली आहे. वास्तवात विश्व आणि जीवात्मा ईश्वराश्रित आहेत.

५) हे खरे आहे की ईश्वरवाद 'एकेश्वरा'च्या उपासनेवर जोर देतो, तरी पण हा सिद्धान्त इतर देवी-देवतांची पूजा करण्यास मानवास प्रतिबंध करत नाही. वैदिक काळामध्ये अनेक देवी-देवतांची पूजा होत असे. गीतेमध्ये

भगवान श्रीकृष्ण स्वत:स पुरुषोत्तम म्हणतात आणि इतर देवी-देवतांच्या पूजेस प्रकारांतराने स्वत:ची पूजाच समजतात.

६) धर्माची सार्थकता यामध्येच आहे की व्यावहारिक रीतीने धार्मिक जीवनास समृद्ध करावे. ईश्वरवादाचा ईश्वर व्यक्तिपूर्ण आत्माश्रयी सत्ता आहे. तो आपल्या भक्तांविषयी सक्रिय असतो. तो मूल्यांचा संरक्षक आणि विश्वाचा आद्यंत संचालक असतो. सोबतच मानवाच्या अमरतेची आशा आहे. म्हणून तर या सिद्धान्तास व्यावहारिक ईश्वरवाद पण म्हटले जाते.

### निष्कर्ष

ईश्वरासंबंधीची संकल्पना ही ईश्वराविषयीचे कोणतेच वैज्ञानिक कथन नाही. ईश्वर हा स्वरूपत: असंज्ञानात्मक आहे, कारण की तो निर्विकल्प अतीन्द्रिय अनुभूती आहे. ईश्वराच्या बाबतीत भक्ताचे जे काही निवेदन असते, ते त्याच्या प्रेमन्मोत्ततेचे उसळलेले रूप असते. ईश्वरवादास विज्ञानाच्या भाषेमध्ये समजले जाऊ शकत नाही. त्याला धर्माच्या भाषेमध्येच समजून घ्यावे लागेल. धर्माची भाषा ही श्रद्धेची भाषा असते. ही भाषा ईश्वराचे हृदयगत निर्वचन करण्यामध्ये समर्थ असते. ईश्वरानुभूतीमध्ये सर्वस्वी डुंबून भक्त ईश्वराविषयी काही सांगू इच्छितो. ही उत्कंठाच ईश्वरवादाची जननी आहे. ईश्वरवादास परमार्थत: जाणून घेतले पाहिजे, शब्दश: नव्हे.

अनेकेश्वरवाद, द्वैतवाद, एकेश्वरवाद, निमित्तेश्वरवाद, सर्वेश्वरवाद, परसर्वेश्वरवाद आणि व्यावहारिक ईश्वरवाद हे सर्व ईश्वरविषयक हृदयगत अनुभूतीचे उद्गार आहेत. यांना सत्यापित-मिथ्यापित केले जाऊ शकत नाही. मात्र होय, त्यांना स्वस्थ-अस्वस्थ म्हटले जाऊ शकते. ज्याची ईश्वरानुभूती जेवढी गहन असते, त्याची अभिव्यक्ती ही तितकीच प्रगाढ असते. जरी कोणी ईश्वरवादी आपलेच विचार खरे असल्याचे ठासून सांगत असेल आणि इतर ईश्वरवाद्यांचे विचार नाकारत असेल तर ही त्याची केवळ धृष्टता आहे. तर्काच्या आधारे सर्व ईश्वरवाद्यांचाच्या मताचे निर्मूलन वा खंडन केले जाऊ शकते. अशा प्रकारे ईश्वरविषयक संकल्पना तर्क-वितर्काचा विषय नसून, तो श्रद्धेचा विषय आहे. श्रद्धेच्या प्रकाशात सर्व ईश्वरवाद चमकतात आणि तर्काच्या आगीमध्ये ते भस्मसात होतात.

### ईश्वरवाद : सूफ़ी दृष्टिकोन

सूफ़ी तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात ईश्वरवादावर सविस्तर विवेचन सुप्रसिद्ध सूफ़ी आचार्य व तत्त्वज्ञ अब्दुल करीम इब्राहीम जीली यांनी 'इन्सान-ए-कामिल' या आपल्या ग्रंथात (पृ. ४८०-५००) केलेले आहे. त्यांच्या या विवेचनास सूफ़ींचा प्रातिनिधिक दृष्टिकोन म्हणून मानण्यास मुळीच हरकत नाही. यास्तव आम्ही तोच दृष्टिकोन येथे प्रस्तुत करत आहोत.

मानवाचे ईश्वरविषयक चिंतन म्हणजेच धार्मिक श्रद्धा (विश्वास) होय. विश्वामधील समस्त वस्तू आणि विचार हे ईश्वराचे गुण आहेत, अशी सूफ़ींची धारणा आहे, हे आपण सर्व जाणतो. म्हणजेच मानवी मनास स्वत:स उलगडून देण्याचे ईश्वराचे हे पैलू आहेत. शिवाय गुण हे सत्तेशी तंतोतंत जुळणारे आहेत. हे या दृष्टीने की, प्रत्येक यथाशक्य दृष्टिकोनातून पाहिल्यास गुण हे सत्तेव्यतिरिक्त काहीच नसतात. म्हणून ईश्वर हा सर्व

विचारांचे सारतत्त्व आहे, आणि समस्त विचार ईश्वरासंबंधी असतात. अशा सिद्धान्तांच्या अनुषंगाने पाहिल्यास अब्दुल करीम जीलीचे धर्म-तत्त्वज्ञान समजण्यास सोपे जाते.

जीली म्हणतात, ''सर्व वस्तूंचे निर्मितीचे उद्दिष्ट, दैवी (ईश्वराची) उपासना हा आहे.'' आणि (त्यांना सांगा की), ''मी जिन्न (यक्ष, किन्नर) व मानवाला अन्य कामासाठी नव्हे तर त्यांनी माझी उपासना करावी यासाठी निर्माण केलेले आहे.'' ५१:५६ म्हणून हे सर्व आपले मूळ स्वभाव आणि स्वरूपाशी (सदैव) निगडित असतात. उपासनेचे वेगवेगळे प्रकार हे, आपल्या सृष्टीमध्ये ईश्वराचे नानाविध नाम-रूपांमध्ये अभिव्यक्त होण्याच्या परिणामास्वरूप आहेत. प्रत्येक नाम-रूप हा आपले विशिष्ट परिणामाची छाप टाकतो. उदाहरणार्थ, परमेश्वर हा सच्चा मार्गदर्शक ('अल्-हादी') आहे, परंतु तो पथभ्रष्ट करणारा ('अल्-मुज़िल्ल') पण आहे, कारण पवित्र कुराण म्हणते, ''अत्याचाऱ्यांना अल्लाह सन्मार्गाची बुद्धी देत नसतो.'' ६१:७ तो बदला घेणारा ('अल्-मुंतक़िम') तसेच क्षमा करणारा ('अल्-मुनइम') पण आहे. जर त्याच्या नामांपैकी एखादे नाव अ-परिणामकारी आणि अननुभूत राहिले असते तर त्याचे आत्म-आविष्करण पूर्ण झाले नसते. म्हणून त्याने आपले प्रेषित यासाठी पाठवले की त्याचे अनुसरण करणाऱ्या मानवजातीने मोक्षदायी मार्गदर्शन करणाऱ्या एकमेव परमेश्वराची उपासना करावी. आणि ज्यांनी त्याची अवज्ञा केली त्या मानव जातीस सर्वनाश घडून नरकवासाकडे घेऊन जाणाऱ्या परमेश्वराची उपासना करावी.

ईश्वराचे सर्व जीवात्मे हे त्याच्या इच्छेप्रमाणे त्याची उपासना करतात, आणि उपासनेचा प्रत्येक प्रकार हा त्यांचे विशिष्ट पैलू अभिव्यक्त करतो. नास्तिकता आणि पाप हे दैवी कृतीचे परिणामस्वरूप विद्यमान आहेत, आणि यामुळेच दैवी परिपूर्णतेस हातभार लावला जातो. शैतान हा स्वत: ईश्वराचे गुणगौरव करतो, त्याची स्तुती करतो, कारण त्याची अवज्ञा ही शाश्वत संकल्पाहून गौण आहे, खालच्या दर्जाची आहे. तरी पण काही पैलूंमध्ये ईश्वराचे गुण हे इतर गुणांच्या मानाने कमी परिपूर्ण आहेत. जसे वैभव आणि क्रोध हे सौंदर्य आणि दयेच्या मानाने कमी परिपूर्ण आहेत आणि शिवाय कोणत्याही प्रकारच्या उपासनेमध्ये ईश्वराची संकल्पना ही जितक्या जास्त प्रमाणात संपूर्णपणे आणि सर्वत्र प्रस्तुत केली जाते, तितक्या जास्त प्रमाणात ती उपासना परिपूर्ण बनते. प्रैषित्य धर्मांमध्ये (नबीमूलक धर्म) सत्य हे सर्वंकषपणे विद्यमान असते. प्रैषित्यधर्मामध्ये इस्लाम हा सर्वोत्तम धर्म आहे. मूसांचे मूसवी, दाऊदचे दाऊदी, ईसाचे ईसवी आणि मुहम्मदचे मुहम्मदी अर्थात इस्लाम हे प्रैषित्यधर्म आहेत.

अब्दुल करीम जीली हे दहा प्रमुख धर्मसंप्रदायांचा उल्लेख करतात. या दहांमधूनच इतर सर्व धर्म उदयास आलेले आहेत. आधुनिक दृष्टिकोनातून पाहिल्यास त्यांची ही सूची विलक्षण वाटते. या सूचीमध्ये पुढील दहा प्रमुख धर्मांचा समावेश आहे - (१) मूर्तिपूजक वा श्रद्धाहीन (२) मूल तत्त्वोपासक वा भौतिकशास्त्रवादी, (३) तत्त्वज्ञ वा दार्शनिक, (४) द्वैतवादी, (५) अग्नीपूजक (मजूसी), (६) जडवादी वा निसर्गपूजक ('दहरिय्यून'), (७) ब्राह्मण, (८) यहूदी (ज्यू), (९) नसारा वा ईसाई (ख्रिश्चन) आणि (१०) इस्लाम.

त्यांच्या उपरोक्त वर्गीकरणाच्या मागे असलेली भूमिका सविस्तरपणे पाहू या-

हे सर्वज्ञात आहे की सर्वश्रेष्ठ परमेश्वाने विश्वामधील समस्त चराचरांना आपल्या उपासनेसाठी निर्माण केले आहे. मुळात ते याबाबतीत निर्विघ्न आहेत. ब्रह्मांडामधील प्रत्येक वस्तू आपली अवस्था व परिस्थिती आणि शक्तीनुसार, इतकेच नव्हे तर आपल्या नाम-रूपासह परमेश्वराची उपासना करते. म्हणून प्रत्येक पदार्थ

अल्लाहच्या आज्ञापालनामध्ये आहे. म्हणून परमेश्वर पृथ्वी आणि आकाशांना संबोधून म्हणाला होता, ''खुशीने किंवा नाखुशीने (तुम्ही) माझ्यापाशी या. तर ते म्हणाले, आम्ही खुशीने आलोत.''

''त्याने आकाश आणि पृथ्वी यांना म्हटले, ''तुम्ही दोघे या, (आमच्या नियमांचे पालन करण्यासाठी) स्वेच्छेने किंवा अनिच्छेने.'' ते दोघे म्हणाले, ''आम्ही (तुझ्या नियमांचे पालन करण्यासाठी) स्वेच्छेने हजर आहोत.'' ४१:११ असे 'पवित्र कुराण'चे शब्द आहेत.

या विधानामध्ये 'आकाशांना'शी अभिप्रेत आहे त्याचे निवासी अर्थात देवदूत आणि 'पृथ्वी'शी अभिप्राय आहे त्याच्यावर राहणारे लोक, आणि परमेश्वर निवेदन करतो की, ''मनुष्य आणि जिन्न (यक्ष, किन्नर) यांना मी यासाठी निर्मिले की त्यांनी माझी भक्ती (उपासना) करावी.'' ५१:५६ पुन्हा प्रेषित मुहम्मद यांनी पण या गोष्टीविषयी ग्वाही दिली की ते (मानव) त्याची उपासना करतात. म्हणून त्यांनी सांगितले की, 'प्रत्येक माणसासाठी ते कार्य सोपे असते. ज्याच्यासाठी त्याला निर्माण केले गेले आहे.' ज्याअर्थी हे कर्म अर्थात भक्ती-उपासना त्यांच्यासाठी सोपी केली गेली आहे. म्हणून हे स्वीकारणे अगत्याचे बनले की ते सर्व ईशभक्त आहेत. परंतु नाम-रूपाची गरज ही भिन्न-भिन्न असल्याकारणाने त्यांची भक्ती ही वेगवेगळ्या प्रकारांची झाली. आणि हे या कारणास्तव की सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा जसा मार्गदर्शक या नामाने प्रकट होतो तद्वत तो पथभ्रष्टकारी या नावाने पण व्यक्त होतो. आणि जसे की पुरस्कारदाता या नामाच्या प्रभावाची अभिव्यक्ती अनिवार्य आहे त्याचप्रमाणे बदला घेणारा या नामाच्या प्रभावाचे प्रकट होणे पण अगत्याचे आहे. नामे व रूपे यांची पात्रता, योग्यता वेगवेगळी असल्याकारणाने लोकांची अवस्था पण वेगवेगळी दिसून येते. सर्वश्रेष्ठ परमेश्वर म्हणतो, लोक अल्लाहचे दास होते. त्यांच्या मूळ स्वभावाच्या अनुषंगाने त्यांना परमेश्वराच्या आज्ञापालनासाठी निर्माण केले गेले होते. मग परमेश्वराने शुभवार्ता देणारे आणि भयाची सूचना देणारे संदेष्टे (मानवजातीकडे) पाठवले. हेतू हा की मार्गदर्शक या नामाच्या अनुषंगाने प्रेषितांच्या अनुसरणार्थ त्यांनी (परमेश्वराची) भक्ती करावी, आणि जे प्रेषितांच्या विरोधात होते त्यांनी पथभ्रष्टकारी या नामाच्या अनुषंगाने, विमुख होऊन त्याची भक्ती करावी म्हणजेच त्यांनी श्रद्धाहीनता अंगीकारावी. अशा प्रकारे (भक्तीच्या संदर्भात) लोकांचे वेगवेगळे गट निर्माण झाले. जनसमुदाय व राष्ट्रे वेगवेगळे गट निर्माण झाले. जनसमुदाय व राष्ट्रे वेगवेगळी झाली आणि मग धर्म उदयास आले. प्रत्येक दळाने आपल्यास जे चांगले वाटले ते ग्रहण केले. चांगल्या असलेल्या मार्गाव्यतिरिक्त जो मार्ग असतो तो वाईटाकडे घेऊन जातो. परंतु पथभ्रष्टांच्या दृष्टीमध्ये परमेश्वर वाईट मार्गच चांगला असल्याचे भासवतो की जेणे करून त्या पद्धतीने त्यांनी परमेश्वराची उपासना करावी. या कार्यामध्ये तो गुण प्रभावशाली सिद्ध होतो. म्हणून परमेश्वर हा त्यांचा कर्ता करवीता असतो. तो त्यांच्या गरजेनुसार त्यांच्याकडून करवून घेत असतो. हे सर्व त्यांच्या गरजेबरहुकूम होते. तो सर्वश्रेष्ठ परमेश्वर आपल्या नाम-रूपांच्या गरजेनुसार त्यांना लाभ (फायदा) पोहोचवतो म्हणून प्रभुत्वाचा स्वीकार करण्यामध्ये ना त्याचा लाभ (नफा) आहे, ना त्याच्या नकारामुळे त्याची हानी (तोटा). तथापि सर्वश्रेष्ठ परमेश्वर त्यांचा त्या वस्तूप्रमाणे उपयोग करतो की जिचा तो नाना प्रकारच्या उपासनांपासून आपली पराकाष्ठा इच्छितो, आणि जी त्यास योग्य असते. ब्रह्मांडातील प्रत्येक वस्तू ही सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या अधीन असून ती त्याची उपासक पण आहे. जसे की परमेश्वर स्वत: निवेदन करतो, ''अशी कोणतीही वस्तू नाही जी त्याच्या प्रशंसेसह त्याच्या वैभवाचे गुणगान करीत नाही, परंतु त्यांचे

गुणगान तुम्हाला समजत नाही.'' १७:४४ कारण की त्यांच्या गुणगानांमधून एक विरोध, अपराध, पापाचार, नकार इत्यादी पण आहे आणि ही बाब प्रत्येक समजत नाही – समजू शकत नाही. म्हणून नकार सर्वांवर स्वार झाला. म्हणून हे खरे ठरते की काही त्याला समजू शकतात. सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे हे म्हणणे की तुम्ही त्यांचे गुणगान समजू शकत नाही हे समस्त मानवाच्या दृष्टीने आहे. म्हणून काही लोक त्याला समजू शकतात, असे म्हणणे योग्य ठरते. संबंधित संपूर्ण श्लोक असा आहे – ''सप्त आकाश व पृथ्वी आणि त्यांमध्ये जे काय आहे ते सर्व त्याच्या वैभवाचे-पावित्र्याचे गुणगान करीत आहेत, आणि अशी कोणतीही वस्तू नाही जी त्याच्या प्रशंसेसह त्याच्या वैभवाचे गुणगान करीत नाही, परंतु त्यांचे पावित्र्य-गान तुम्हाला समजत नाही.'' १७:४४

**विविध धर्मांची निर्मिती कशी झाली ?**

पुन्हा हे समजून घेतले पाहिजे की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने जेव्हा या जगास निर्माण केले तेव्हा आणि (प्रथम प्रेषित व मानवजातीचे आद्य प्र-पितामह, आदी मानव) आदम यांना स्वर्गामधून इहलोकी पाठवून दिले तत्पूर्वी या अवरोहणा-अपकर्षा अगोदर ते संत-महात्मा ('वली') होते. स्वर्गामधून या जगात आल्यानंतर त्यांना प्रेषितत्व -संदेशवाहकत्व बहाल करण्यात आले. यासाठी की प्रेषितत्व हे भाष्य करण्याचे, कष्टदायक असे जबाबदारीचे कर्म असते. हे संसार-जग कष्ट सहन करण्याचे स्थळ आहे, तर स्वर्ग ही ऐष-आराम व सुखोपभोगाचे स्थान आहे. हे नंदनवन आहे. आदम स्वर्गामध्ये संत-महात्मा ('वली') होते, कारण की ते (स्वर्ग) चमत्कार आणि (ईश) दर्शनाचे गृह आहे आणि हेच संतत्व ('विलायत') आहे. मग (तेथे) आमचे आद्य प्रपितामह (आदम) हे स्वत: संत-महात्मा ('वली') म्हणूनच (अर्थात स्वरूपात) राहिले. कालांतराने त्यांना संतती झाली. मग त्यांनी त्यांना परमेश्वर आदेशानुसार तिकडे पाठवून दिले. त्यांना ते उपदेश करीत, त्यांना चांगली शिकवण देत राहिले. त्यांच्यासाठी धर्माज्ञापत्रे पण होती. ही परमेश्वराने त्यांच्यावर अवतरित केली होती. मग त्यांच्या संततीपैकी ज्यांनी ती वाचली व तदनुसार ज्या गोष्टींवर श्रद्धा ठेवण्याचे आदेश होते त्यांवर त्यांनी श्रद्धा ठेवली. परस्पर मिळून मिसळून काम करताना यांचे खंडन करणे अशक्य होते, म्हणून त्यांनी त्यांचे अनुसरण केले. ज्यांनी परमेश्वराच्या आदेशांना न जुमानता त्याची अवहेलना केली ते आपल्या मनोरंजनामध्ये मग्न होऊन गेले आणि शेवटी ते आपल्या वासनांच्या आहारी जाऊन त्यांचे गुलाम बनले. शेवटी अज्ञान आणि जुलूमाने त्यांच्यावर भुरळ पाडून त्यांना इहलौकिक सुखाच्या मोहपाशात अडकवून टाकले. परिणामी त्यांनी ईश्वराज्ञा नाकारल्या. परिणामी ते श्रद्धाहीनतेच्या खाईमध्ये लोटले गेले. आणि शेवटी ते श्रद्धाहीन बनले.

मग प्रेषित आदम यांच्या निधनानंतर त्यांची संतती वेगवेगळी झाली. त्यांच्यात मतभेद निर्माण झाले. त्यांच्यापैकी एक गट जो प्रेषित आदम हे ईश्वराचे निकटवर्ती आहेत, या धारणेवर श्रद्धा ठेवत होता, त्या गटाने आदम यांच्या गुणांस आधार मानून त्यांची तशी एक मूर्ती बनविली (घडवली), की जेणेकरून तिच्या (त्या मूर्तीच्या) सेवेत राहून त्यांच्या प्रतिष्ठेस, मान-सन्मानास सुरक्षित ठेवता येईल. ते सदैव (नित्य) त्यांच्या प्रतिमेकडे न्याहाळून, लक्षपूर्वक पाहून त्यांची इभ्रत व आदरासह प्रेम कायम सुरक्षित ठेवत असत. त्यांना असे वाटत असे की त्यांच्या अशा कृत्यामुळे ते परमेश्वरासमीप आणले जातील. कारण की त्यांची अशी मनोमन धारणा होती की आदम यांच्या हयातीमध्ये त्यांची सेवा ही ईश्वरसमीप जाण्याचे साधन होते. तर मग त्यांच्या

मरणोत्तर त्यांची प्रतिमा पण ईश्वरसमीप जाण्याचे साधन असणारच. मग यांच्यानंतर दुसऱ्या एका गटाने त्यांचे अनुसरण केले आणि तो गट सेवेमध्ये पथभ्रष्ट झाला. स्वत: प्रतिमा-पूजन त्यांनी सुरू केले. अशा प्रकारे हे लोक मूर्तीस पूजणारे आहेत. यानंतर आणखी एक गट उदयास आला. या गटातील लोकांनी आपल्या बुद्धीच्या बळावर अनुमान काढून मूर्तिपूजकांना वाईट ठरवले. मूर्तिपूजेपेक्षा मूलतत्त्वांची उपासना श्रेयस्कर समजून त्यांनी तत्त्वोपासना सुरू केली. ते यासाठी की अस्तित्वाचे पर्यायाने जगाचे मूळ ही चार महाभूते आहेत. सूफी तत्त्वज्ञान आकाशास महाभूतामध्ये परिगणित (समाविष्ट) करीत नाही. म्हणून पंच महाभूतांऐवजी चार महाभूते मानण्यात येतात. पृथ्वी, आप, तेज आणि वायू ही चार महाभूते आहेत. जग हे उष्णता, शुष्कता, शीतलता आणि आर्द्रता यांचे संयुग आहे, संमिश्रण आहे. म्हणून मूळाची उपासना ही शाखेच्या उपासनेहून अधिक चांगली असते. कारण मूर्ती ही उपासकाची शाखा असते. कारण मूर्ती ही उपासकाच्या अधीन असते. म्हणून उपासक हे मूर्तीचे मूळ ठरतात. यास्तव हे मूळ तत्त्वांची उपासना करू लागले. या लोकांना मूलतत्त्वोपासक म्हणून मानण्यात येते. हे एका परीने भौतिकशास्त्रवादी असतात.

आणखी एक दुसऱ्या गटाने सप्त ग्रहांची-ताऱ्यांची उपासना सुरू केली. त्यांचे असे मत होते की उष्णता, शुष्कता, शीतलता आणि आर्द्रता यांपैकी कुणामध्येही अशी वस्तू नाही की खुद्द ज्यामुळे स्वयंचालनेची शक्ती असावी. म्हणून त्यांच्या उपासनेमध्ये कोणताच लाभ-फायदा नाही. उपासनेस योग्य असे सप्तग्रह अर्थात तारे आहेत. आणि ते सप्तग्रह आहेत - (१) शनी, (२) गुरू, (३) मंगळ, (४) रवी, (५) शुक्र, (६) बुध आणि (७) सोम हे उपास्य यासाठी आहेत की यापैकी प्रत्येक हा स्वत: दृढ प्रस्थापित आहे. आपल्या आकाशात भ्रमण करणारा आहे. प्रत्येक अशा प्रकारच्या गतीने गतिमान आहे की तो या जगावर आपले लाभदायक किंवा हानिकारक प्रभाव सोडतो. उपासनेस योग्य अशी तीच वस्तू असते जी अलौकिक शक्ती धारण करणारी असते. म्हणून ते ग्रहांची पूजा करू लागले. यांना दार्शनिकगण किंवा नैयायिकगण म्हणून संबोधण्यात येते.

आणखी एक दुसऱ्या गटाने प्रकाश आणि अंधाराची उपासना सुरू केली. यावर त्यांचा युक्तिवाद (प्रमाण) असा आहे की उपासनेमध्ये प्रकाशास वैशिष्ट्य प्रदान करणे म्हणजे दुसऱ्या बाजूस व्यर्थ करण्यासारखे आहे. यासाठी की अस्तित्व हे प्रकाश आणि अंधार या दोहोंवर निर्भर आहे. म्हणून त्यांची उपासना ही श्रेयस्कर वाटते. या विचाराच्या आधारावर त्यांनी निरपेक्ष प्रकाशाची पूजा करण्यास सुरुवात केली. कारण की त्याचा वावर हा मुक्त जगामध्ये असतो आणि त्यामध्ये ग्रहांचा प्रकाश, अग्नीचा प्रकाश इत्यादीसारख्या विशिष्ट प्रकाशाची विशेषता ठेवली नाही आणि अशाच प्रकारे की ज्या स्वरूपात तो प्रकट आहे. त्या स्वरूपातील निरपेक्ष अंधाराची पण त्यांनी उपासना सुरू केली. प्रकाशाचे नाव त्यांनी 'यज़दाँ' ठेवले आणि अंधाराचे 'आहुरमन'. या लोकांना 'द्वैतवादी' म्हटले जाते.

आणखी एक दुसऱ्या गटाने अग्नीची उपासना सुरू केली. ते म्हणू लागले की जीवन हे आवश्यक त्या उष्णतेवर अवलंबून असते, आणि ते कारणस्वरूप असते आणि त्याचे भौतिक रूप अग्नी आहे. म्हणून हीच एक वस्तू अस्तित्वाचे मूळ आहे. ते अग्नीस पूजू लागले. अग्नीची उपासना करू लागले. त्यांना अग्नीपूजक ('मजूसी') असे म्हणतात.

पुन्हा आणखी एक संप्रदाय असा आहे की ज्याने सुरुवातीपासूनच उपासना सोडून दिली, या विचारामुळे की या वस्तूंचा उपासनेचा काहीच फायदा नाही. दैवी स्वभावाच्या दृष्टीने, नास्तिक, घटित होणाऱ्या अनुरूप अशा आवश्यक असणाऱ्या वस्तूवर निर्माण केले गेले. म्हणून येथे कोणी गर्भस्थ म्हणजेच निर्मातीचा गर्भ नाही की जो बालकाला जन्म देऊ शकेल, ना कोणती जमीन आहे की मृतास गिळंकृत करेल. काळाशिवाय काहीच नाही. म्हणून हे लोक नास्तिक म्हणून गणले जातात, आणि यांचे नाव निरीश्वरवादी असे आहे.

ईश्वर पाताळात नाही, भूतळी नाही व आकाशातही नाही; त्याचप्रमाणे तो पाण्यातही नाही व तीर्थांतही नाही, तर फक्त आहे तो भक्ताच्या अंतःकरणात, त्याच्या भावात. भावावाचून भक्ती घडणे शक्य नाही व भक्तीवाचून मुक्ती मिळणे शक्य नाही, ही खूणगाठ बांधून ठेवणेच इष्ट असते.

'भाव' शब्दाचा धात्वार्थ 'असणे' असा आहे. (भूसत्तायां), अर्थात 'अभाव' म्हणजे 'नसणे'. ईश्वराचा भाव म्हणजे अस्तित्व मानतो तो **आस्तिक** व ईश्वराचे अस्तित्व मानीत नाही तो **नास्तिक**, हे सहजच ठरते. ईश्वराच्या अस्तित्वाच्या, गुणांचा, स्वरूपाचा व शक्तीचा विचार धर्मांत केलेला असतो, म्हणून धर्माने वागणारा तो **आस्तिक** व त्या उलट वागणारा तो **नास्तिक** असे म्हणण्याचा किंवा मानण्याचा प्रघात आहे. ईश्वराचा वास सर्वत्र आहे, तो सर्वसाक्षी असून न्यायी आहे, याविषयी दुमत असण्याचे कारण नाही. ईश्वराच्या सर्वात्मभावाचा ('सर्वं खल्विदं ब्रह्मं) अभ्यास पचनी पडण्याकरता ईश्वराच्या अस्तित्वाच्या भावाचा अभ्यास (सराव) केला पाहिजे, अशी रास्त अपेक्षा नास्तिकतेच्या संदर्भात केल्यास मुळीच वावगे नाही.

### मूलभूत धर्म

हे सर्वज्ञातच आहे की ग्रंथधारी लोकांचे ('अहल-ए-किताब') चार संप्रदाय आहेत. (१) 'ब्राहिमः' अथवा 'ब्राह्मणी' हा एक ग्रंथधारी संप्रदाय आहे. हे स्वतःस प्रेषित इब्राहीम यांचे अनुसरण करणारे मानतात, व स्वतःस त्यांचे वंशज मानतात. यांची एक विशिष्ट अशी प्रार्थना आहे. (२) 'यहूदी' हा दुसरा संप्रदाय आहे. हे ज्यू धर्माचे आहेत. हे स्वतःस 'मूसवी' (धर्माचे) मानतात. हे मूसा या प्रेषितास मानतात. (३) 'नसारा' हा तिसरा संप्रदाय आहे. यांना 'ईसवी'पण म्हणतात. हे येशू ख्रिस्तास मानतात. आणि (४) मुसलमान आहेत. यांना 'मुहम्मदी' असे म्हणतात. हे प्रेषित मुहम्मद यांचे अनुयायी असून 'इस्लाम' धर्मीय गणले जातात.

उपरोक्त चारी संप्रदायांच्या लोकांना ग्रंथधारी यासाठी म्हणतात की प्रत्येकास आपापल्या प्रेषिताकडून अवतरित झालेला दिव्य ग्रंथ प्रदान करण्यात आला आहे. ते अनुक्रमे असे आहेत - (१) इब्राहीमकडून अवतरित झालेल्या दिव्य ग्रंथास 'सहिफ़े' (अर्थात धर्माज्ञापत्रावली) असे म्हणतात, (२) मूसावर 'तौरात' हा धर्मग्रंथ अवतरित झाला, (३) ईसावर 'इंजिल' (बायबल) हा धर्मग्रंथ अवतरित झाला तर (४) मुहम्मदवर 'फ़ुर्कान' म्हणजेच 'कुरआन' हा पवित्र धर्म ग्रंथ अवतरित झाला आहे. याशिवाय प्रेषित दाऊदवर 'ज़बूर' हा धर्मग्रंथ अवतरित झाला आहे.

प्रमुख असे दहा धर्म आहेत. विभिन्न धर्मांचे विभिन्न सिद्धान्त असल्यामुळे अनेक (असंख्य) धर्मांची निर्मिती झाली आणि या सर्वांचा आधार पुढील दहा धर्म आहेत - (१) श्रद्धाहीन वा मूर्तिपूजक, (२) मूल तत्त्वोपासक वा भौतिकशास्त्रवादी, (३) दार्शनिकगण वा नैयायिकगण, (४) द्वैतवादी, (५) अग्नीपूजक ('मजूसी'),

(६) जडवादी वा निसर्गपूजक (नास्तिक वा निरीश्वरवादी), (७) ब्राह्मण, (८) यहूदी (ज्यू), (९) नसारा-ईसाई (ख्रिश्चन) आणि (१०) इस्लाम.

यांच्यापैकी प्रत्येकाची अशी स्थिती आहे की काही स्वर्गासाठी आहेत, तर काही नरकासाठी. प्राचीनकाळी श्रद्धाहीनांच्या प्रदेशात धर्माचा सरळ मार्ग दाखवण्यासाठी प्रेषितांनी त्यांना निमंत्रित केले. त्यांचे दोन गट झाले. एक त्यांचे निमंत्रण स्वीकारणारे तर दुसरे त्यांच्या निमंत्रणास नाकारणारे. ज्यांनी प्रेषितांचे निमंत्रण स्वीकारून सत्कर्मे केली त्यांना स्वर्गाची बक्षिसी प्राप्त झाली. तर दुसरे ज्यांनी अपकर्मे, दुष्कृत्ये केली त्यांना परमेश्वराने नरकाची दुःखद शिक्षा दिली. अशीच अवस्था ग्रंथधारी लोकांची पण आहे. प्रेषितांकडून धर्मनियम अवतरित होण्यापूर्वी, स्वतःच्या मनास चांगले भासणारे, वासनेस प्रिय असणारी, चित्त प्रसन्न करणारी कृत्येच लोकांना सत्कर्मे भासू लागायची, तर धर्मनियम अवतरित झाल्यानंतर सत्कर्म म्हणजे परमेश्वराची मनःपूर्वक भक्ती व त्याचे आज्ञापालन. तसेच धर्मनियम प्रकट होण्यापूर्वी वाईट कर्म ते मानले जायचे जे त्यांच्या मनास वाईट वाटायचे. जे मनास प्रिय वाटले, चित्त त्याच्याशी प्रसन्न झाले. मनाने जे वाईट कल्पिले, चित्तास त्यामुळे दुःख पोहोचे. मन त्यास नापसंत करे. मन दुःखी होई. उलट धर्मनियम प्रकट झाल्यानंतर अल्लाहने निषिद्ध ठरवलेले कर्मच वाईट असते. आणि हे सर्व संप्रदाय अल्लाहची उपासना करणारे आहेत. ईश्वराने आज्ञापित केलेल्या पद्धतीनुसार त्याची भक्ती केली पाहिजे ते यासाठी की त्यांने आपल्या आत्म्यासाठी त्यां (मानवां)ना निर्माण केले आहे. त्यांच्या स्वतःसाठी नव्हे. म्हणून ते त्याच्यासाठी असेच आहेत जसा त्याचा अधिकार आहे. मग ईश्वराने या मानव समूहांमध्ये आपल्या नाम-रूपाचे वास्तव उघडून दाखवले-प्रकट केले आणि या सर्वांमध्ये आपल्या सत्तेचा प्रकाश टाकला, अभिव्यक्ती केली.

## भक्तीच्या पद्धती (उपासना विधी) - तदनुषंगिक प्रमुख धर्म

### १) श्रद्धाहीन मूर्तिपूजक धर्म

सर्व मानव समुदायांनी ईश्वराची उपासना केली, परंतु त्यांच्या विधीमध्ये फरक होता. कारण त्यांच्या श्रद्धा वेगवेगळ्या प्रकारच्या होत्या. प्रत्येक समुदायास आपलीच भक्ती-पद्धती योग्य वाटली. म्हणून श्रद्धांनुसार अनेक धर्म निर्माण झाले. यापैकी प्रमुख धर्म दहा असल्याचे वर उल्लेख झालेला आहेच.

श्रद्धाहीनांनी तर परमेश्वराच्या सत्तेचीच उपासना केली. ते यासाठी की ज्याअर्थी परम पवित्र व सर्वश्रेष्ठ परमेश्वर समष्टिगत सर्व अस्तित्वाचे वास्तव आहे आणि या समष्टिगत अस्तित्वामध्ये श्रद्धाहीन पण एक आहेत आणि सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा त्यांचे वास्तव आहे, त्याअर्थी त्यांनी या गोष्टीस नाकारले की त्यांच्यासाठी दुसरा प्रभू वा विधाता पण आहे. म्हणून सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा त्यांचे वास्तव आहे आणि परमेश्वराचा कोणी विधाता किंवा प्रभू नाही, परंतु तोच निरपेक्ष प्रभू आहे. अतएव सत्तांच्या गरजेसाठी तो त्यांचा हुबेहूब आहे. त्यांनी त्यांची उपासना केली. मग त्यांच्यापैकी ज्याने मूर्तिपूजा केली तर ती सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या अस्तित्वाच्या त्या गुह्यामुळे आहे जो अवताराशिवाय, संमिश्रणाशिवाय आणि अस्तित्वाच्या अणूरेणूच्या ऐक्याशिवाय प्रत्येक व्यक्तीमध्ये आपल्या पराकाष्ठेसह विद्यमान आहे आणि सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा, ते ज्यांची पूजा करतात त्या मूर्तींचे वास्तव आहे. तर मग ते अल्लाहशिवाय कुणाचेच उपासक नाहीत आणि या गोष्टीसाठी तो त्यांच्या ज्ञानाची

अपेक्षा ठेवत नाही. ना तो त्यांच्या निश्चयांचा, संकल्पाचा अपेक्षी आहे. म्हणून तर यद्यपि वास्तव याच काळपर्यंत अव्यक्त राहिले, त्यांना या गोष्टीशिवाय पर्याय राहिला नाही जसे की (ईश्वरी) आदेशाच्या वास्तवामध्ये आहेत ते हिशोबाने व्यक्त होतात आणि हे त्यांच्या मनामध्ये परमेश्वरासाठी त्यांचे अनुसरणाचे रहस्य आहे – गुपित आहे. कारण की त्यांच्या अंत:करणांनी अशी ग्वाही दिली की त्यांचे हित–कल्याण यातच सामावलेले आहे. म्हणून त्यांची श्रद्धा आदेशाच्या या वास्तवावर दृढ जमली आणि तो (परमेश्वर) आपल्या भक्ताच्या त्या अनुमानासोबत आहे जे तो आपल्या ईश्वराच्या बाबतीत राखतो. प्रेषित मुहम्मद यांनी या संदर्भात म्हटले आहे की, 'आपल्या मनाशी आदेशाची मागणी कर, यद्यपि धर्माधिकाऱ्याने तुला धर्माज्ञा दिली असेल.' हे कर्म सर्वसाधारणपणे मनाच्या स्पष्टीकरणार्थ आहे, आणि विशेषत: ही गोष्ट आहे की ना प्रत्येकासाठी धर्मादेश असतो ना प्रत्येक व्यक्ती योग्य धर्मादेश देण्याच्या योग्यतेची असते. मग या आधारावर काही लोकांच्या मनोकामना पूर्ण झाल्या, सर्वांच्या नव्हे. या आदेशाच्या वास्तवाची ही श्रद्धामूलक लहानशी गोष्ट की जी ते अंमलात आणणार आहेत, याच न्यायाच्या आधारे, परलोकामध्ये आदेशाच्या वास्तवाच्या अभिव्यक्तीकडे त्यांना आकर्षिले जाईल, आणि सर्वश्रेष्ठ परमेश्वराने म्हटले आहे, ''पण नंतर लोकांनी आपसात आपल्या श्रद्धांचे तुकडे–तुकडे पाडून वेगवेगळ्या धर्मांची शकले निर्माण केलीत. आणि (आता) ज्या संप्रदाया (समूह, गटा)कडे जे आहे, इहलोकी व परलोकी त्यातच तो गट प्रसन्न आहे – गुंग आहे.'' २३:५१

या कारणासाठी की नाम हे नामीपासून वेगळे असत नाही आणि सर्वश्रेष्ठ परमेश्वराने त्यांचे नाव 'फ़रिहून' अर्थात प्रसन्नचित्त असे ठेवले आहे. ते इहलोकी आपल्या कर्मांशी संतुष्ट, प्रसन्न आहेत. मनाई केलेल्या कर्मांची शिक्षा अवगत करूनसुद्धा ते त्या गोष्टींकडे पुन्हा वळतात. हे त्या लहानशा गोष्टीमुळे घडते की त्यांना त्या कामांमध्ये रस वाटतो. त्यांना ती कर्मे प्रिय असतात. त्या कर्मांपासून ते परावृत्त होत नाहीत. यासाठी की परमेश्वर एखाद्या व्यक्तीस परलोकाची शिक्षा देऊ इच्छित असेल तर तो आपल्या कृपेच्या साहाय्याने त्या व्यक्तीसाठी त्या शिक्षेमध्ये मौलिक आणि प्रिय अशी गोडी त्या व्यक्तीमध्ये निर्माण करतो. यामुळे शिक्षेस पात्र त्या व्यक्तीच्या शरीरामध्ये प्रेमभावना उत्पन्न करतो की ज्यामुळे त्या शिक्षेपासून वाचविण्याची विनवणी त्या व्यक्तीने करू नये आणि त्याचा (कृपाछत्राचा) आश्रय मागू नये. जोपर्यंत ही गोडी त्याच्यामध्ये विद्यमान असेल तोपर्यंत त्याने शिक्षा भोगतच रहावी. जेव्हा परमेश्वराची इच्छा त्याची शिक्षा कमी करण्याची होते, तेव्हा त्याची ती गोडी नष्ट करतो. मग तो कृपेसाठी अधीर, बेचैन बनतो आणि सर्वश्रेष्ठ अल्लाहचे वैभव असे आहे की तो पीडिताची कृपायाचना कबूल करतो. त्या वेळेस त्याची विनवणी मान्य होते व त्याला आश्रय मिळतो. अशाप्रकारे त्याची कृपायाचना योग्य ठरते आणि मग त्याला सर्वश्रेष्ठ परमेश्वराकडून कृपाछत्राचा आश्रय मिळतो. अशा प्रकारे श्रद्धाहीनांची उपासना ही त्यांच्यासाठी सत्तामूलक उपासना असते, यद्यपि त्याचा कल चांगुलपणाकडे का असेना, परंतु सत्कर्मांपर्यंत पोहोचणे हे त्याच्यासाठी फार लांबचा पल्ला असतो. म्हणून तो अप्रतिष्ठेचा मार्ग आहे. कारण की या भाग्यवानासाठी वास्तव उघडत नाहीत. परंतु सर्व प्रकारच्या नरकांची शिक्षा भोगल्यानंतर त्या दुष्कृत्याच्या दंडस्वरूपात की त्याने इहलोकामध्ये मानवी गरजेनुसार स्वभावाच्या अग्नीच्या सर्व क्षेत्रांमध्ये म्हणजेच कर्माने, वचनाने आणि मनाने त्याने जाणूनबुजून केले असेल. ही शिक्षा संपूर्णपणे भोगून चुकल्यानंतर त्याला ईश्वराचा मार्ग सापडेल. यानंतर त्याला आश्वस्ततेचा आवाज दिला जातो. यानंतर तो पुन्हा ईश्वरी

सौभाग्यापर्यंत पोहोचतो आणि शेवटी त्याची मनोकामना पूर्ण होते. ईश्वराच्या निकटवर्ती लोकांना तर पहिल्याच पावलावर मनोकामनापूर्तीचे भाग्य लाभते. कारण की त्यांना जवळून हाक दिली गेली होती.

### २) मूल तत्त्वोपासकांचा धर्म : मूल तत्त्वपूजन

मूल तत्त्वोपासकांच्या बाबतीत ही गोष्ट आहे की त्यांनी परमेश्वराची उपासना त्याच्या चार गुणांच्या स्वरूपात केली. ते चार गुण आहेत – (१) जीवन, (२) ज्ञान, (३) सामर्थ्य आणि (४) संकल्प. अस्तित्वाचे हेच चार गुण मूळ आधार आहेत. उष्णता, शुष्कता, आर्द्रता व शीतलता हे अस्तित्वाचे गुणधर्म आहेत. भौतिक जगामध्ये हे चारी गुणांचे स्रोत आढळतात. आर्द्रता जीवनाचे स्रोत आहे, शुष्कता (रूक्षता) ज्ञानाचे, उष्णता संकल्पाचे तर शीतलता हे सामर्थ्याचे स्रोत आहे. या तत्त्वांचे वास्तव सर्वश्रेष्ठ परमेश्वर आहे. तो या गुणांनी युक्त आहे. जेव्हा त्यांच्यावर (उपरोक्त) चार दैवी गुणांचा प्रभाव झाला, मग अस्तित्वामध्ये उष्णता, शुष्कता, शीतलता आणि आर्द्रता या स्वरूपात त्यांच्याशी संयोग घडवून आणला, तेव्हा त्यांनी दैवी योग्यतेच्या संबंधात आपल्या पात्रतेनुसार हे समजून घेतले की (उपरोक्त) दैवी चार गुण हे उष्णता, शुष्कता, शीतलता आणि आर्द्रता यांच्या हेतू स्वरूपात आहेत. किंवा असे म्हणा की या शरीरांचे आत्मे आहेत, किंवा हे की त्या स्रोतांचे निसृत रूप आहेत. म्हणून त्यांनी या आधारावर या तत्त्वांची पूजा करणे सुरू केले. यांच्यापैकी काही या गुणास जाणतात, तर काहींना याची कल्पना नसते. जाणणारा अगोदर आहे आणि न जाणणारा त्याच्या नंतर आहे. म्हणून गुणांच्या अनुषंगाने ते ईश्वराचे उपासक आहेत. इतर पैलूंप्रमाणे त्यांचा शेवट पण शुभच असेल, जेव्हा या वास्तवाचे उद्‌घाटन होईल, की ज्यांच्यावर त्यांचे कृत्य अवलंबून आहे.

### ३) दार्शनिकगण किंवा नैयायिकगणाचा धर्म अर्थात नक्षत्रपूजक

जसे गुणांच्या अनुषंगाने मूल तत्त्वोपासक ईश्वराचे उपासक आहेत तसेच दार्शनिकगण हे दैवी नामांच्या उपासनेमुळे ईश्वराचे उपासक आहेत. नैयायिकांनी ईश्वराची उपासना नामस्वरूपात केली. ते या आधारावर की ग्रह (नक्षत्र) हे दैवी नामांचे दृश्य रूप आहेत, आणि सर्वश्रेष्ठ परमेश्वर आपल्या सत्तेमुळे त्याचे वास्तव आहे. सूर्य (रवी) तर त्याचे नाम 'अल्लाह'चा स्रोत आहे. यासाठी की तो आपल्या तेजस्वी, प्रखर प्रकाशामुळे समस्त ताऱ्यांना असाच सहाय्यक आहे जसे की 'अल्लाह' (परब्रह्म) या नामापासून (इतर) समस्त नामे आपल्या वास्तवेची सहायता घेतात. आणि चंद्र (सोम) हा त्याचे 'रहमान' (कृपाळू) नामाचा स्रोत आहे, कारण की तो पराकाष्ठेमध्ये सर्व ताऱ्यांहून श्रेष्ठ आहे. तो सूर्याच्या प्रकाशास उचलतो. आकाशामधील सर्व ताऱ्यांमध्ये चंद्राचे स्थान त्याप्रमाणे सर्वोच्च आहे ज्याप्रमाणे समस्त नामांहून अल्लाह नामामध्ये 'रहमान' या नावाचा दर्जा सर्वश्रेष्ठ असा आहे. गुरू (ग्रह) त्याचे नाव 'रब' (प्रभू, विधाता)चा स्रोत आहे. यासाठी की तो आकाशामधील सर्व ग्रहांहून सौभाग्यशाली आहे, जसे की नाम 'रब' समस्त दैवी श्रेणींहून जास्त विशेष आहे. कारण की त्याच्यामध्ये ईश्वरी पराकाष्ठा आहे. त्याला पाल्यांची गरज असते. शनी हा एकत्वतेचा स्रोत आहे, कारण की संपूर्ण आकाश हा त्याच्या सीमांतार्गत आहे. जसे की नाम 'एकमेवता'च्या अधीन सर्व नाम–रूपे आहेत. आणि मंगळ हा सामर्थ्याचे प्रतीक–स्रोत आहे. यासाठी की तो असा ग्रह आहे जो प्रकोपकर्मांशी निगडित आहे. शुक्र हा

संकल्पाचा स्रोत आहे. यासाठी की तो मनाने चंचल आहे. तो चलबिचल होत असतो. अशाच प्रकारे ईश्वर पण प्रत्येक क्षणी एक वेगळी वस्तू निर्माण करण्याचा संकल्प-निश्चय करतो. बुध हा ज्ञानाचा स्रोत आहे. कारण की तो आकाशाचा लिहिणारा आहे. आणि बाकीचे सर्वसाधारण ग्रह-तारे त्या शुभ नामांचे स्रोत आहेत ज्यांची गणती करणे शक्य नाही. आणि असाधारण ग्रह-तारे त्या नामांचे स्रोत आहेत जे गणतीमध्ये येऊ शकत नाहीत. दार्शनिकगणामध्ये दैवी स्वभावाचा काही अंश विद्यमान असतो. ते आपल्या ज्ञानाच्या योग्यतेनुसार आपल्या बुद्धीने आपल्या अभिरुचीनुसार, प्रत्येक ग्रहामध्ये विद्यमान असलेल्या अल्पशा अंशामुळे, त्याला समजून घेतले. त्या ग्रहांची पूजा करू लागले. पुन्हा ज्याअर्थी ईश्वर हा त्या ग्रहांचे वास्तव आहे, त्याने इच्छिले की तो आपल्या सत्तेकरिता उपास्य बनावे. मग याच गुजामुळे त्यांनी त्याची उपासना सुरू केली. अस्तित्वाची म्हणजेच ईश्वराची कोणतीच अशी वस्तू नाही की जिची मानवजातीने (आदमपुत्रांनी) आणि त्याच्याशिवाय अन्य प्राण्यांनी त्याची पूजा केली नसेल. सरड्यासमान तो सूर्याची पूजा करतो. आणि शेण इत्यादी घाणीचा किडा हा दुर्गंधाची पूजा करतो. सारांश, समस्त सृष्टीमध्ये कोणताच प्राणी असा नाही की जो सर्वश्रेष्ठ अल्लाहची पूजा करीत नसेल. एकतर दुसरे दृश्य स्रोत आणि नवनिर्मित वस्तूशी निगडित राहून उपासना करतात किंवा निरपेक्ष स्वरूपात. पुन्हा जो कोणी ईश्वराची निरपेक्ष स्वरूपात उपासना करतो तो एकेश्वरवादी (एकतत्त्ववादी) गणला जातो आणि ज्याने एखाद्या स्रोताशी निगडित राहून उपासना केली तो ईशसहभागी ('मुशरिक') ठरतो. वस्तुतः सर्वजण अल्लाहचे उपासक-भक्त आहेत. कारण की परमेश्वराचे अस्तित्व त्यांच्यामध्ये विद्यमान आहे. शिवाय सर्वश्रेष्ठ परमेश्वराची आपल्या सत्तेच्या अनुषंगाने अशी अपेक्षा असते की तो ज्या वस्तूमध्ये प्रकट होतो, तिची पूजा केली गेली पाहिजे. आणि वस्तुस्थिती अशी आहे की तो सर्व अणू-रेणूंमध्ये व्यक्त आहे. म्हणून काही लोकांनी मूलतत्त्वांची उपासना ग्रहण केली. मूलतत्त्वे विश्वाचे मूळ आहेत. तर काहींनी ग्रहांची-नक्षत्रांची पूजा सुरू केली. काहीनी खनिज पदार्थांची, तर काहींनी अग्नीची. सारांश, अस्तित्वाची कोणतीच वस्तू शिल्लक राहिली नाही की जिची पूजा केली गेली नसेल. मुहम्मदी अर्थात मुसलमान मात्र याला अपवाद ठरतात. त्यांना सोडून आपल्या सामर्थ्यानिशी त्यांनी उपासना केलेली आहे - ना नवनिर्मित वस्तूंमध्ये एखादी वस्तू निगडित करून. तात्पर्य हे की सर्वस्व पणाला लावून त्यांनी ईश्वराची उपासना केली आहे. पुन्हा त्यांची उपासना ही व्यक्त आणि अव्यक्तामधून एका कारणास-उद्देशास सोडून दुसऱ्या उद्देश्याशी निगडित होण्यापासून मुक्त आहे. म्हणून त्यांची (भक्ती) पद्धती ईश्वरी सत्तेचा मार्ग आहे. त्यामुळेच ते पहिल्याच चरणामध्ये सामिप्याच्या दर्जास जाऊन पोहोचले. हे ते लोक आहेत की ज्यांच्याविषयी सर्वश्रेष्ठ परमेश्वराने आपल्या पुढील वचनामध्ये संकेत केले आहे - "हे ते लोक आहेत, की ज्यांना जवळून बोलावण्यात येईल." (श्रद्धा व सत्कर्मांच्या बाबतीत) अग्रेसर राहिलेल्या लोकांना (अल्लाहच्या) सर्वांत निकटचे स्थान लाभेल. (ते) ऐश्वर्यसंपन्न स्वर्गात वास्तव्य करतील." ५६:१०-१२ याउलट त्यांनी यथास्थान त्याची उपासना केली. अथवा एखादे स्रोत अथवा माध्यमाने त्याची उपासना केली. जसे, मूलतत्त्व, ग्रह-तारे अथवा मूर्ती इत्यादीशी निगडित राहून सापेक्षपणे त्याची पूजा केली, अशा लोकांचा संकेत ईश्वराने आपल्या या वचनामध्ये असा केला आहे - "की ते लांबून (दूरस्थ ठिकाणाहून) बोलावले जातील." यासाठी की ते त्याच्याकडे प्रवृत्त होत नाहीत. मात्र त्या माध्यमाच्या मार्गाने ज्याची की ते उपासना करतात. या अनुषंगाने तो तोच आहे आणि तो या माध्यमाशिवाय प्रकट होत नाही, आणि हे साक्षात्

सुदूर, फार लांब आहे ज्याच्याकडे ते यथाशक्ती बोलावले जातील आणि मजल गाठल्यावर, ध्येयप्राप्तीनंतर जवळून बोलावले गेलेले आणि लांबून बोलावले गेलेले एक होऊन जातील.

### ४) द्वैतवाद्यांची उपासना पद्धती

द्वैतवाद्यांनी आपल्या मनाच्या अपेक्षेप्रमाणे त्या (परमेश्वरा)ची उपासना केली. यासाठी की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने खुद्द आपल्या जातीनिशी विरोधी गुणांना एकत्रित केलेले आहे की परिणामी दैवी गुण आणि भौतिक गुण दोन्ही समाविष्ट आहेत. ईश्वर हा दोन आदेशान्वये दोन गुणांमध्ये व्यक्त झाला आहे. तो इहलोक आणि परलोक या दोन्ही लोकांमध्ये दोन गुणांनी व्यक्त झाला आहे. जे गुण दैवी वास्तवापासून निर्मित आहेत ते प्रकाशामध्ये व्यक्त झाले, तर जे भौतिक गुणाच्या वास्तवापासून निर्मित झाले त्यांना अंधार म्हणून मानण्यात आले. म्हणूनच या दैवी गुह्यामुळे जे दोन गुण व दोन परस्पर विरोधी गुण व दोन प्रचीती व दोन आदेशांनी युक्त आहे. द्वैतवाद्यांनी प्रकाश आणि अंधार या दोहोंची पूजा केली, मनाच्या गरजेनुसार ईश्वरासपण (पूजिले) कारण की तो ईश्वर (सृष्टा) नामी पण आहे आणि तसेच सृष्टी नामी पण आणि तो प्रकाश व अंधार आहे.

### ५) अग्नीपूजकांची उपासना

अग्नीपूजकांनी एकत्त्वतेस यथायोग्य अशी ईश्वराची पूजा केली आहे. पुन्हा जसे की एकत्त्वता समस्त श्रेणी, नाम व गुणांना संग्रहीत करणारी आहे, तसाच अग्नी पण आहे. यासाठी की तो समस्त महाभूतांमध्ये सर्वशक्तिमान व सर्वश्रेष्ठ आहे. कारण की तो सर्व तत्त्वांना भस्मसात करणारा आहे. जे तत्त्व त्याचा सामना करण्यासाठी पुढे येते, ते त्याच्या भयंकर शक्तीमुळे आग बनून जाते. एकत्त्वतेचा गुण पण असाच आहे. कारण की जे नाम आणि जो गुण त्याचा सामना करण्यासाठी पुढे सरसावतो ते त्याच्यामध्ये विलीन होऊन जाते, समाविष्ट होते. या बाबीमुळे अग्नीपूजकांनी आगीची पूजा केली आणि त्याचे वास्तव हे सर्वश्रेष्ठ परमेश्वराची सत्ता आहे.

हे लक्षात असले पाहिजे की मूलद्रव्य वा मूलतत्त्व म्हणजेच चार महाभूते अर्थात पृथ्वी, आप, तेज आणि वायूपैकी कोणत्यातरी एका भूतामध्ये अभिव्यक्त होण्याअगोदर या गोष्टीची क्षमता धारण करून असे की मग ते भलेही कोणते का भूत असेना, समाईक गुणांच्या आधारे हे दुसऱ्या रूपामध्ये परिवर्तित होत राहतात. जसे तेज (अग्नी) शुष्क आणि उष्ण आहे, वायू उष्ण आणि आर्द्र आहे, आप आर्द्र आणि शीतल आहे आणि पृथ्वी शीतल आणि शुष्क आहे. अशा प्रकारे संपूर्ण चक्र पूर्ण होते. तेज (अग्नी) आणि वायू (हवा)मध्ये समाईक गुण उष्णतेचा आहे. म्हणून या समाईक गुणामुळे एकाचे परिवर्तन दुसऱ्यामध्ये होते. मात्र एकदा रूपपरिवर्तन झाल्यानंतर पुन्हा परिवर्तन शक्य नाही. अशाच प्रकारची स्थिती नवनिर्मितीमध्ये नाम-रूपाची आहे. यापैकी प्रत्येकाचे वेगळे अर्थ होऊ शकतात. या स्वरूपात बक्षीस देणारा, कृपा करणारा हा बदला घेणारा होऊ शकतो. प्रत्येक तत्त्वामध्ये प्रकट झाल्यानंतर नाम वास्तवास आवश्यक त्या वस्तूचा उत्तम प्रभाव पाडू लागले. अशा प्रकारच्या अभिव्यक्तीमध्ये (मात्र) बक्षीस देणारा हा बदला घेणाऱ्याच्या विरोधात असतो. म्हणून तेज (अग्नी) हा महाभूतामध्ये अशा प्रकारची वस्तू आहे जसे एकत्वतेच्या अभिव्यक्तीमध्ये नामे आहेत. मग अग्नीपूजकांच्या

चित्तवृत्तीने जेव्हा त्या कस्तुरीच्या अत्तराचा वास घेतला, तेव्हा त्याच्या अल्पशा हुंगण्यामुळे त्यांना पडसे झाले आणि मग ते अग्नीची पूजा करू लागले. त्यांना असे वाटले की ते शक्तीशाली आणि महाभयंकर विपत्ती आणणाऱ्या सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या केवल सत्तेचीच उपासना करीत आहेत.

### ६) निसर्गपूजकांची उपासना पद्धती

निसर्गपूजक ईश्वरास न मानता निसर्गच सर्व काही आहे, असे मानतात. निसर्गपूजकांनी, तदत्त्वास यथायोग्य, अशी उपासना केली. प्रेषित मुहम्मद यांनी असे बजावले आहे की, ''निसर्गपूजकास शिव्या देऊ नका, कारण की सर्वश्रेष्ठ परमेश्वर हाच (समस्त) निसर्ग आहे.''

नैसर्गिक घटनांना समजणे आणि आपल्या गरजेनुसार त्यांचा फायदा घेणे प्राचीन मानवाच्या आवाक्यापलीकडील गोष्ट होती. सूर्य आणि चंद्र, प्रकाश आणि अंधार, महापूर आणि दुष्काळ, विद्युल्लतेची चमक आणि मेघगर्जना – यासारख्या नैसर्गिक घटना व वस्तू त्याला प्रतिकूल आणि भीतिदायक वाटत असत. त्याच्या भोळ्याभाबड्या (सहज-सरळ) आस्थेनेच निसर्गाचे प्रत्येक तत्त्व आणि प्रत्येक शक्तीवर देवत्व आरोपित केले. त्यांच्या दैनंदिन जीवनास नियंत्रित करणाऱ्या या पार्थिव शक्ती त्यांच्यासाठी अलौकिक अशा शक्ती होत्या. परिणामी इंद्र, वरूण, अग्नी, सूर्य यांसारख्या नैसर्गिक घटकांची त्यांनी पूजा करणे सुरू केले. अशी निसर्ग पूजकांची उपासना पद्धती होती. जड तत्त्वांची उपासना करणारे असल्यामुळे निसर्गपूजकास जडवादी पण म्हणतात.

अरबी भाषेत निसर्गपूजकास 'दहरिय्यून' असे म्हणतात. 'दह्र' या शब्दाचा मूळ अर्थ आहे – काळ वा युग. एका परीने हे लोक काळाची पूजा करत. म्हणजेच ते 'काळपुरुष' किंवा 'युगपुरुष'ची पूजा करीत, असेच म्हणावे लागेल. काळास दूषणे न देण्याबद्दल ताकीद देण्यात आलेली आहे. 'काळास दूषणे देऊ नका, कारण काळच हा साक्षात् परमेश्वर आहे.'

### ७) 'ब्राहिमः' वा ब्राह्मणांची उपासना

'ब्राहिमः' निरपेक्षपणे अल्लाहची उपासना करतात. ना संदेशवाहकाच्या अनुषंगाने ना प्रेषिताच्या अनुषंगाने ते उपासना करतात, तथापि त्यांचे तर असे वचन (म्हणणे) आहे की सृष्टीची प्रत्येक वस्तू ही अल्लाहची निर्मिती आहे. अशा प्रकारे ते अस्तित्वामध्ये सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या एकत्वतेमध्ये आस्था ठेवतात, परंतु ते निर्विवादपणे संदेशवाहक आणि प्रेषितांना नाकारतात. ईश्वरासाठी त्यांची उपासना एक प्रकारची प्रेषितांसारखी उपासना होती. प्रेषित हे आपल्या जन्मापूर्वी (त्याप्रमाणे) उपासना करीत. त्यांचे असे अनुमान आहे की, ते प्रेषित इब्राहीम यांचे वंशज आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, आमच्यापाशी एक ग्रंथ आहे. तो ग्रंथ ईशमित्र प्रेषित इब्राहीम यांनी स्वतः लिहिला होता. या ग्रंथासंबंधी त्यांची अशी श्रद्धा नव्हती की तो ग्रंथ इब्राहीमच्या विधात्याकडून (अवतरित झालेला) आहे. या ग्रंथामध्ये वास्तवाचे विवेचन आहे. हे वास्तव पाच गोष्टींवर अवलंबून आहे. पैकी चार गोष्टींचे पठण सर्वांसाठी आहे. पाचवी गोष्ट फार गहन व गंभीर असल्याकारणाने त्यांच्यापैकी फार थोड्यानाच ती वाचण्याची मुभा आहे. त्यांच्यामध्ये ही गोष्ट महशूर आहे की

जो कोणी ही पाचवी गोष्ट वाचतो तो शेवटी निश्चितपणे मुसलमान बनून मुहम्मदी धर्माचा अर्थात इस्लामचा अनुयायी बनतो.

हा संप्रदाय मुख्यत्वेकरून भारतात आढळतो. काही लोक ब्राह्मणी वेश (वस्त्र) परिधान करून असा दावा करतात की ते (सच्चे) ब्राह्मण आहेत, यद्यपि ते खरोखर तसे नाहीत. ते मूर्तिपूजक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्यापैकी जो मूर्तिपूजा करतो तो या संप्रदायाचा गणला जात नाही. भारतातील शहरांमधील उपरोक्त समस्त लोकांमध्ये फूट आहे, यद्यपि त्यांचा कल सत्कर्मांकडे आहे. कारण की फूट त्याला म्हणतात, जेव्हा एकजूट (एकी) दुभंगते. त्यांच्यापैकी काहींनी एकेश्वरवादाच्या आड मूर्तिपूजा सुरू केली. या विधी-विधानानुसार ज्याने सर्वश्रेष्ठ परमेश्वराची उपासना केली, ज्याची आज्ञा परमेश्वराकडून प्रेषितांमार्फत दिली गेली नव्हती, तो उपासक विशुद्ध एकेश्वरवादी ('हनीफ़') समजला जात नाही. म्हणून तो 'हनफ़ी' ठरत नाही. विशुद्ध एकेश्वरवादीचे सत्कर्म त्याच्याशी सदैव निगडित असते आणि ते हळूहळू प्रकट होत राहते. मात्र ग्रंथधारी लोकांना दैवी प्रेरणेद्वारे ज्या काही आज्ञा पोहोचल्या होत्या, त्या त्यांनी तंतोतंत न पाळता, आपल्या सोयीनुसार त्यात त्यांनी बदल घडवून आणला. त्यांनी आपल्या मताने प्रविष्ट केलेली गोष्टच त्यांच्या फुटीचे कारण बनले. जेवढ्या मोठ्या प्रमाणात त्यांनी दैवी आज्ञांचे विरोध केले तेवढ्या मोठ्या प्रमाणात त्यांच्यामध्ये मोठी फूट पडली. ज्या प्रमाणात त्यांनी दैवी ग्रंथाचे अनुसरण केले त्या प्रमाणातच त्यांचे सत्कर्म राहिले. कारण की सर्वश्रेष्ठ परमेश्वर भलाईसाठीच जनसमुदायाकडे प्रेषितांना आपल्या आदेशांसह पाठवतो.

### ८) यहूदी-ज्यूंची उपासना पद्धती

यहूदी धर्मामध्ये, ईश्वर हा एकच आहे, अशी मूलभूत धारणा आहे. सर्वप्रकारच्या अनेक देवतावादाशी येथे विरोध आहे. हा ईश्वर विश्वाचा निर्माता आहे. अब्राहमची निवड करणारा व अनुगृहीत माणसांशी आपल्या संदेष्ट्यांद्वारा बोलणारा ईश्वर तो हाच. ईश्वराने दिलेल्या दहा आज्ञा यहूदी लोकांचे नैतिक व धार्मिक जीवनाचे सिद्धान्त निश्चित करतात.

'पेंटाट्यूक' अर्थात 'पंचग्रंथ' म्हणजेच जेनेसिस, एक्झोडस, लेव्हिटिक, नंबर्स आणि ड्यूटेरोनोमी हे पाच ग्रंथ म्हणजे यहूद्यांची अधिष्ठानरूप विधिसंहिता होय. ही विधिसंहिताच त्यांचा 'तौरात' हा ग्रंथ आहे. 'यौम किप्पुर' यांचा क्षमा-याचनेचा दिवस असतो. या खास दिवशी ते परमेश्वर दयाळू, कृपाळू, प्रेमळ, ज्ञानी व क्षमा करणारा असल्याची भावना बळकट करतात. तसेच प्रज्ञान व दिव्य दृष्टीमध्ये प्रेषित मूसास ज्ञात झालेल्या परमेश्वराच्या स्वरूपाचे तेरा (१३) गुणांची आठवण यहूदी लोक 'यौम किप्पुर' या दिवशी हमखास करतात.

यहूदी (ज्यू) तर ईश्वराच्या एकत्वाच्या हिशोबाने उपासना करतात. ते दररोज दोन वेळेस उपासना (नमाज) संपन्न करतात. ते कँवारच्या दिवशी उपवासव्रत करतात, कारण की तो नववर्ष आरंभाचा दहावा दिवस असतो. तो 'यौम-ए-आशूरा' म्हणजेच दहावा दिवस असतो. 'सबत' अर्थात शनिवारी एकांतवास करतात. त्यांच्या एकांतवासाची अशी अट असते की एकांतसेवन करणाराच्या घरी श्रीमंत बनविणारी अशी कोणतीच वस्तू येता कामा नये. खाद्यपदार्थसुद्धा घरी येऊ नये आणि त्याच्यापासून एखादी वस्तू निर्माण होऊ नये. विवाह करता येत नाही. कोणतेच कार्य करता कामा नये. फक्त ईश्वराच्या उपासनेसाठी त्याला मोकळीक (सूट) आहे. यासाठी की

त्यांचे पवित्र धर्मग्रंथ 'तौरात'मध्ये असा आदेश आहे की, 'तू, तुझा दास, तुझी दासी 'सबत' (शनिवार)च्या दिवशी परमेश्वराच्या सेवेतच समर्पित व्हावेत.' म्हणून तर त्यांच्यासाठी 'सबत' दिवसाची सुरुवात ही शुक्रवारच्या सूर्यास्तापासून सुरू होते आणि त्याचा शेवट सबत दिवसाचा शेवट आहे जेव्हा सूर्य हा पिवळा पडतो. यामध्ये एक फार सबळ तत्त्वज्ञान आहे ते हे की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने आकाशांना आणि पृथ्वीस सहा दिवसांत निर्माण केले. रविवारपासून त्याने निर्मितीस सुरू केले आणि सातव्या दिवशी आपले सिंहासन 'अर्श'वर तो आरूढ झाला. आणि तो शनिवारचा दिवस होता. ब्रह्मांडाच्या उत्पत्तीपासून तो विश्रांतीचा-निवांतपणाचा दिवस आहे. यासाठी यहूदी (ज्यू) लोकांनी एकांतवासाच्या या उपासनेसाठी खास आरक्षित ठेवले की जेणेकरून आसनस्थ कृपाशीलतेच्या लाभाकडे संकेत होत रहावे.

पूर्ववर्ती ग्रंथधारकांच्या धर्मामधील सर्व चांगल्या गोष्टी मुहम्मदी धर्माने आत्मसात केल्या. प्रेषित मुहम्मदसाठी कुठल्याच गोष्टीचे गूज शिल्लक राहिले नाही. म्हणून तर यांचा (इस्लाम) धर्म हा सर्व धर्मांमध्ये परिपूर्णतम आहे आणि त्यांची धर्मप्रजा ('उम्मत') ही कल्याणकारक धर्मप्रजा ('उम्मत') आहे.

### ९) नसारा – ईसाई (ख्रिश्चन) लोकांची उपासना

सर्व प्राचीन धर्मप्रजेच्या तुलनेत नसारा अर्थात ख्रिश्चन हे सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या अधिक जवळ आहेत. ते मुहम्मदींपेक्षा जराशा खालच्या दर्जावर आहेत. याचे कारण हे आहे की त्यांनी सर्वश्रेष्ठ परमेश्वरास शोधले, आणि ईसा (येशू ख्रिस्त), मरियम (मेरी) आणि 'रूहुलकुदूस' (पवित्रात्मा) या तीन्हींच्या माध्यमामधून त्यांनी उपासना सुरू केली. प्रेषित ईसा (जीजस क्राइस्ट)च्या अस्तित्वामध्ये त्याच्या नवनिर्माणाचे पण समर्थक आहेत. या सर्व उपमेमध्ये पावित्र्य आहे. येशू हा ईश्वराच्या लायक आहे, परंतु जेव्हा त्यांनी या तिघांमध्ये परमेश्वरास आश्रय दिला अर्थात या तिघांना ईश्वरस्वरूप मानले, तेव्हा ते एकेश्वरवादापासून पतित झाले. तरी पण ते इतर धर्मांहून मुहम्मदींच्या अधिक जवळ आहेत. यासाठी की ज्याने मानवामध्ये परमेश्वराचे दर्शन केले (परमेश्वरास पाहिले), त्याचे हे दर्शन दुसऱ्या लोकांच्या त्या दर्शनाहून अधिक परिपूर्ण आहे की जे मानवेतर सृष्टीमध्ये त्याचे दर्शन करतात. त्यांचे हे दर्शन ईसवी वास्तवामध्ये त्यांच्याकडे प्रवृत्त करते. मग जेव्हा हिशोबाने हे कर्म प्रकट होईल म्हणजेच त्या कर्माचे स्पष्टपणे दर्शन होईल, तेव्हा त्याला कळेल की मानवजात ही आरशाप्रमाणे आहे. ते एकमेकासमोर ठेवले गेले आहेत. आणि त्यांच्यापैकी प्रत्येकामध्ये ती गोष्ट दिसून येते जी दुसऱ्यामध्ये आहे. म्हणून ते आपल्या अंत:करणामध्ये अल्लाहची ग्वाही देतात, आणि निरपेक्ष स्वरूपात त्याचे एकेश्वरत्त्व मान्य करतात आणि अशा प्रकारे ते एकेश्वरवादीच्या दर्जापर्यंत जाऊन पोहोचतात, परंतु त्यांना हा दर्जा ईश्वराशी विमुख झाल्यानंतर प्राप्त होतो. ही विमुखता मानवाचे वासनेच्या आहारी जाऊन ईश्वरापासून दूर जाण्यामुळे आणि वास्तवतेच्या स्थितीशी बेसावध राहण्यामुळे उत्पन्न होते. शिवाय मानव हा स्वत:शी जेवढा जवळ आहे तो ईश्वरापासून तितकाच लांब (दूर) आहे. त्यांची ही विमुखताच त्यांचे श्रद्धामूलक आश्रय व बंधन आहे. नसारां (ख्रिश्चनां)ची उपासना म्हणजे एकोणपन्नास (४९) दिवसांचे उपवास-व्रत. हे उपवासव्रत रविवारपासून सुरू होऊन पुन्हा त्याच दिवशी संपते. त्यांच्यासाठी ही मुभा (सवलत) आहे की रविवारच्या बाकी दिवसामध्ये उपवास व्रत राखला नाही तरी चालतो. यामुळे (सूट मिळालेले) आठ रविवार निघून जातात आणि बाकी

एकेच्चाळीस (४१) दिवस उरतात, आणि ही त्यांच्या उपवासव्रताची मुदत आहे. त्यांच्या उपवासव्रताची रीत अशी आहे की ते तेवीस (२३) तास सायंकाळच्या एक तास अगोदर पर्यंत खात नाहीत आणि हीच त्यांच्या जेवण्याची वेळ आहे. बाकीच्या वेळेस जेव्हा ते उपवास पाळतात तेव्हा सुरापान आणि जलपान त्यांच्यासाठी निषिद्ध नाही. मात्र फलाहार, जे जेवण मानले जात नाही, घेऊ नये. या प्रत्येक कृतीपाठीमागे काही ना काही दैवी रहस्य दडलेले आहे. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने त्यांना रविवारी एकांतवास करण्याचा आदेश दिलेला आहे, आणि नवीन सणांसाठी पण हाच आदेश आहे.

ज्या दृश्य आणि अदृश्य वस्तूंनी हे विश्व बनले आहे त्या सर्वांचा ईश्वर हा एकमेव स्रष्टा होय. हा सर्वज्ञ व सर्व शक्तिमान असल्याने त्याने हे जग शून्यातून निर्माण केले आहे. ईश्वराने हे जग मुक्त अशा स्वेच्छेने घडवले आहे, म्हणजेच हे जग केवळ त्याच्या आज्ञापक शब्दाच्या सामर्थ्यातून निर्माण झाले आहे. त्याच्या याच कार्यपद्धतीने तो जगाचे संगोपन करतो व सर्व वस्तूंना त्यांच्या नियत उद्दिष्टाप्रत नेत असतो. नसारांची ईश्वरविषयक सदरहू संकल्पना इस्लामला फार जवळची आहे.

### १०) इस्लाम धर्म

मुसलमानांच्या संदर्भात असे म्हणता येईल की ते सर्व धर्मप्रजां (मानव समुदायां) मध्ये सर्वश्रेष्ठ धर्मप्रजा ('उम्मत') आहेत. जसे की त्यांच्याबाबतीत सर्वश्रेष्ठ परमेश्वराने म्हटले आहे, ''तुम्ही एक सर्वोत्तम जनसमुदाय (संप्रदाय) आहात, ज्यांना मानवजातीच्या कल्याणासाठी उभे करण्यात आलेले आहे. तुम्ही सत्कर्मांची शिकवण देता आणि दुष्कृत्यांपासून परावृत्त करता व अल्लाहवर श्रद्धा ठेवता.'' ३:११० यासाठी की त्यांचे संदेशवाहक प्रेषित मुहम्मद हे आहेत, आणि त्यांचा धर्म हा सर्व धर्मांहून अधिक चांगला आहे. याचे प्रमाण 'पवित्र कुराण' या शब्दात प्रस्तुत करते – ''नि:संशय, अल्लाहच्या लेखी असलेला (खरा) धर्म इस्लाम (पूर्ण समर्पण) हाच आहे आणि ज्यांना ग्रंथ देण्यात आला होता त्यांनी ज्ञानप्राप्तीनंतरदेखील परस्परांतील मत्सरामुळे मतभेद केला.'' ३:१९. मुहम्मदच्या संदेशवाहकत्व आणि प्रेषितत्त्वानंतर माजी धर्मप्रजांपैकी जी त्यांच्या धर्माच्या विरोधी होती, ते काही का असेना, ती धर्मप्रजा पथभ्रष्ट आहे, शंकेखोर आहे. त्या पथभ्रष्टांना नरकामध्ये शिक्षा दिली जाईल, जसे की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने सूचित केले आहे की, ''ते कृपेकडे वळणार नाहीत, मात्र अनंतकाळापर्यंत यातना भोगल्यानंतर.'' याचे गूज असे आहे की ''परमेश्वराची कृपा ही त्याच्या क्रोधावर भारी आहे. अन्यथा ते प्रकोपाखाली आहेत. कारण की तो (हा) मार्ग आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना आपल्या आत्म्या (नफ़्स)कडे बोलावले आहे. (परंतु) दुर्भाग्य, क्रोध, व्यथा, दु:ख आणि ताप हा (त्यांचा) मार्ग आहे. म्हणून ते सर्व नाश पावणारे आहेत.'' इस्लामसारख्या कल्याणकारी सन्मार्गाचा त्याग करण्याहून आणखी कोणते दुर्भाग्य होऊ शकते! हा सन्मार्ग प्रेषिताना ईश्वराच्या समीपवर्ती दर्जामध्ये बहाल करण्यात आला होता, आणि त्यांना लांबून हाका मारले जाणेच त्यांच्या तोट्याचे आहे. हे साक्षात दुर्भाग्य आणि यातनादायक शिक्षाच आहे. अशांचा धर्म कशातच नाही, यद्यपि त्यांना हा सद्धर्म मोठ्या प्रयासाने आणि कष्टाने का मिळालेला असेना! संशय हा त्यांचा धर्म आहे, आणि त्या धर्माच्या अनुसरणामुळे ते संशयखोर बनले आहेत. का तुम्ही या गोष्टीकडे लक्ष देत नाही? की, सर्व प्रकारच्या ऐहिक शिक्षा एकत्रित करून एका दिवसाची दिली

गेलेली शिक्षा, यद्यपि ती परलोकातील मोहरीच्या दाण्याएवढी (म्हणजेच कमीत कमी) शिक्षा का असेना, अशा शिक्षेस पात्र असलेला माणूस हा दुर्भाग्यामध्ये किंवा शंकेखोरांमध्ये समाविष्ट असतो. तर मग त्या लोकांची दुर्दशाच विचारू नका जे युगानुयुगे नरकातच खितपत पडलेले असतील आणि त्यांच्याबाबतीत ईश्वराने सूचित केले आहे की जोपर्यंत आकाश व पृथ्वी कायम आहेत तोपर्यंत ते ती शिक्षा भोगतच राहतील आणि कृपेकडे त्यांना वळवण्यात येणार नाही. ज्या गोष्टीपासून त्यांची सुरुवात झाली होती त्या गोष्टीकडेच त्यांना वळवण्यात येईल. म्हणजेच त्यांना अल्लाहकडेच खेचले जाईल.

## अस्सल एकेश्वरवादी ('मुवह्हिद')

मुसलमान हे प्रेषित मुहम्मद यांना अनुसरण्याच्या बरकतीमुळे सर्वच्या सर्व भाग्यशाली आहेत. जसे की एका ग्रामीण अरब इसमाने विचारणा केल्यावर की, हे अल्लाहचे प्रेषित तुम्ही मला सांगा की जेव्हा मी वैध गोष्टीस वैध समजेन, निषिद्ध गोष्टीस निषिद्ध मानीन, अनिवार्य कर्मे संपन्न करीत असेन, यापेक्षा कमी-जास्त काहीच न करीन, तर मग मी स्वर्गामध्ये प्रवेश करीन की नाही? तेव्हा प्रेषित उत्तरले की, होय, तू (अवश्य) प्रवेश करशील. ही बाब त्यांनी इतर कोणत्याही अटीवर निर्भर ठेवली नाही, परंतु निरपेक्षपणे या कर्मांमुळे त्याचे स्वर्गामध्ये प्रविष्ट होणे स्पष्टपणे सांगून दिले आणि तो इसम स्वर्गामध्ये दाखल झाला. तो ईश्वर सामीप्याच्या दर्जांमधील पहिल्या दर्जामध्ये जाऊन पोहोचला. सर्वश्रेष्ठ परमेश्वर सांगतो, ''ज्याची नरकाच्या शिक्षेपासून सुटका झाली आणि स्वर्गामध्ये दाखल केला गेला त्याची मनोकामना नि:संदेह पूर्ण झाली.'' आणि मुसलमान सरळ मार्गावर आहेत. दुसऱ्या एका ठिकाणी सर्वश्रेष्ठ परमेश्वर उपरोक्त बाब जरा सविस्तरपणे अशा शब्दात सांगतो, ''मग आम्ही (अपराध्यांच्या) प्रत्येक गटातून अशांना अवश्य वेगळे काढू, जे कृपावंत (अल्लाहच्या) विरुद्ध फारच निश्चयपूर्वक बंडखोरीचे प्रदर्शन करीत असत. कारण आम्ही अशांना चांगल्या प्रकारे ओळखतो, जे नरकामध्ये प्रवेशास अधिक पात्र आहेत. आणि तुमच्यात असा कोणीही नसेल, ज्याला नरकाच्या आगीजवळून जावे लागणार नाही. तुझ्या विधात्याचा असा हा आदेश आहे, ज्याची अंमलबजावणी होणारच. तेव्हा आम्ही त्या लोकांना (नरकापासून) वाचवू, ज्यांनी आमची जाण ठेवून (जीवन व्यतीत केलेले असणार). आणि दुराचारी लोकाना गुडघे घासीत (त्यात दाखल होण्यासाठी) सोडून देऊ.'' १९:६९-७२

मुसलमानांचा सरळ मार्ग हा परिश्रमाशिवाय कल्याणापर्यंत घेऊन जाणारा मार्ग आहे. मुसलमानांमधील एकेश्वरवादी हे वास्तविक एकेश्वरवादी लोक आहेत. ते अल्लाहच्या मार्गावर आहेत आणि हा मार्ग प्रथम मार्गाहून सर्वात विशिष्ट आणि सर्वात श्रेष्ठ आहे. यासाठी की तो सत्याचा, सत्यासाठी नाना प्रकारच्या प्रकाशाने उजळलेला (मार्ग) आहे. सन्मार्ग अशा प्रकारचा मार्ग आहे जो या बाबीस ईश्वरीय प्रेरणेपर्यंत पोहोचवतो. म्हणून मुसलमान सच्चे एकेश्वरवादी लोक आहेत, आणि ब्रह्मज्ञानी वास्तव आणि एकेश्वरवादाचे लोक आहेत आणि यांच्या व्यतिरिक्त बाकी सर्व वि-भक्त ('मुश्रिक') आहेत. या बाबतीत उपरोक्त नऊ (९) धर्म एकसारखे आहेत. म्हणून मुसलमानांशिवाय अस्सल एकेश्वरवादी कोणीच नाहीत.

**उपासकांच्या श्रेणी (दर्जे)**

सर्वश्रेष्ठ परमेश्वराने आपले नाम 'विधाता' वा 'पालनकर्ता' ('रब्ब')च्या अनुषंगाने मुसलमानांना उपासक (भक्त) बनवले. ते त्याच्या विधी–निषेधांचे पालन करणारे आहेत. हे यासाठी की संदेशवाहक मुहम्मद यांच्यावर सर्वप्रथम अवतरित झालेला दैवी श्लोक आहे, ''इक्रा बिस्मि रब्बिक'' म्हणजेच ''वाच, तुझ्या प्रभूच्या नावाने'' ९६:१ या गोष्टीस आपल्या प्रभुत्वाशी जवळ केले. कारण की ते त्याचे अवसर आहे. याचसाठी त्यांच्यावर उपासना संपन्न करणे अनिवार्य झाले. कारण की भक्तास आपल्या प्रभूची उपासना करणे आवश्यक असते. यास्तव सर्व मुसलमान लोक 'रब' ('प्रभू') या नावाच्या अनुषंगाने सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे उपासक आहेत. या नावाशिवाय ते ईश्वराची उपासना करू शकत नाहीत. याउलट ब्रह्मज्ञानी 'रहमान' ('कृपाशील') या नावाच्या अनुषंगाने ईश्वराची उपासना करतात. यासाठी की समस्त सृष्टीमध्ये प्रवेश करणारे त्याचे अस्तित्व त्यांच्यावर प्रकाशित होते – प्रकट होते. आणि ते कृपावंत ('रहमान')चे निरीक्षण करणारे आहेत आणि कृपाशीलतेच्या श्रेणीच्या अनुषंगाने ईश्वराची उपासना करतात. याउलट सत्यान्वेषीं ('मुहक़्क़िक़ीन')ची उपासना ही 'अल्लाह' नामाच्या अनुषंगाने होते. यासाठी की ते त्या नाम–गुणांशी त्याची स्तुती आणि स्तवन करतात, जे त्यास योग्य आहेत आणि ज्यांच्याशी ते निगडित आहेत. कारण की स्तुती आणि स्तवनचे वास्तव हे आहे की ज्या नाम वा गुणाने ईश्वराची स्तुती आणि स्तवन केले गेले असेल, ते स्वत: त्याच्याशी निगडित असले पाहिजेत. म्हणून ते अल्लाहच्या उपासनेमध्ये सत्यानन्वेषणी आहेत – सत्यनिष्ठ आहेत. ब्रह्मज्ञानी हे 'इबादुर्रहमान' अर्थात कृपाळूचे भक्त असतात, सर्वसाधारण मुसलमान हे 'इबादुर्रब' म्हणजेच प्रभूचे उपासक असतात. सत्यान्वेषींचे स्थान ईशस्तवन आहे. ब्रह्मज्ञान्यांचे स्थान म्हणजे हे महाश्लोक आहे – ''अर्रहमानु अललअर्शि उस्तवा ल: मा फ़िस्समावाति व मा फ़िल् अर्ज़ि व मा बयनहुमा व मा तहतस्सरा'' आणि सर्वसाधारण मुसलमानांचे स्थान हे आहे – ''रब्बना इन्नना समिअना मुनादियँ युनादी लिल ईमानी अन् आमिनू बिरब्बिकुम् फ़आमन्ना रब्बना फ़ग़फ़िरलना जुनूबना व क़फ़्फ़िरअन्ना सय्यातिना व तवफ़्फ़ना माल अब्रारि'' सर्वसाधारण मुसलमानांशी सूफी आचार्य आणि तत्त्वज्ञ अब्दुल करीम जीली यांचा अभिप्राय आहे ब्रह्मज्ञान्यांना वगळून हुतात्मे ('शुहदा'), सदाचरणी ('सालिहीन'), ज्ञानी ('उल्मा') आणि विद्वान ('आलिमीन') असे सर्व मुसलमान आहेत, आणि निकटवर्ती ('मुक़र्रबियुन') पेक्षा जवळ आहे. 'मुक़र्रबियुन'शी अभिप्राय आहे ते सत्यान्वेषी आहेत की ज्यांच्यावर या अस्तित्वाचा पाया रचला आहे. त्यांच्या पवित्र आत्म्यांवर जगांच्या आकाशांना फैलावले (पसरवले) आहे. ते संपूर्ण जगासाठी सत्य दृष्टीचे शुभ मुहूर्त आहेत. इतकेच नव्हे तर ते समस्त सृष्टीमध्ये अल्लाहचे सुसंधी आहेत. शब्द 'सुसंधी' ('महल')शी सूफी आचार्य जीली यांचा अभिप्राय अवतार, उपमा आणि हेतू वा कारण नाही; परंतु अभिप्राय हा आहे की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने त्यांच्यामध्ये आपली नामे आणि गुण व्यक्त केल्यामुळे त्यांच्यामध्ये प्रकट झालेला आहे, आणि ते नानाविध गुह्यांनी संबोधित केले जातात. आणि ते उघडपणे पुण्यात्मा आहेत. ईश्वराने त्यांना इस्लाम धर्माचे आधारस्तंभ बनवले आहे. तथापि सर्व धर्म हे त्यांच्या ज्ञानाच्या जमिनीवर निर्भर आहेत. त्यांचे अंत:करण सर्वश्रेष्ठ परमेश्वराची वाणी त्यांच्यासाठी उपासना आहेत. त्यामध्ये वास्तवांचे संकेत आहेत. त्यांच्यामध्ये ईश्वराचे आदेश, धर्मविधान, कर्मकांड यांच्या सूक्ष्म गोष्टी आहेत. यांच्यामध्ये दैवी ज्ञानाचे खजिने आहेत. सर्वश्रेष्ठ

परमेश्वर त्यांना प्रदान केलेल्या ज्ञानापासून, एका स्थानापासून दुसऱ्या स्थानाकडे, एका स्तराहून दुसऱ्या स्तराकडे, ज्ञानापासून सूक्ष्म निरीक्षणाकडे, सूक्ष्म निरीक्षणापासून ते संशोधक होण्यापर्यंत अनुकृती करत असतो, आणि इथपर्यंत की तो त्या स्थळापर्यंत पोहोचतो की ज्याच्याकडे संकेत केले जाऊ शकत नाही. म्हणून संपूर्ण लोक त्यांच्यासाठी साधनासारखे वा हत्यारासारखे आहेत. ही साधने त्या ठेवीस उचलणारी आहेत ज्यांना ईश्वराने या संप्रदायास स्वाधीन बनवले आहे. लोक भौतिक (लौकिक) दृष्टीने या ठेवीस उचलून धरलेले आहेत आणि खरोखर ते सर्वश्रेष्ठ परमेश्वरासाठी या ठेवींना उचलणारे आहेत आणि दैवी वाणीचे ते संबोध्य आहेत आणि संकेतांचे पात्र (योग्य) व विवरणाचे संग्रह आहेत. बाकीचे लोक त्या मार्गावर चालणाऱ्यांशी संबंधित आहेत आणि ते ईश्वराचे दास आहेत जे खास कर्पूरच्या झऱ्यातून पाणी पितात आणि बाकिच्यांना पण त्या झऱ्यातून पिण्यासाठी प्याले दिले जाते. प्रत्येकाची स्थिती ही त्या प्याल्याच्या आकाराशी अनुरूप अशी असते. ''क़ाल अल्लाह तआला इन्नल अब्रारि यश्रबून मिन् कासिन् कन मिज़ जुह काफ़ूरन ऐनन् य्यश्रबु बिह इबादुल्ला युफ़ज्जरू व् न् ह् तफ्यूरन्'' ईश्वरासोबत ईश्वराच्या भक्ताची आर्द्रता वास्तविक आहे, तर ऋषी-मुनींची ('अब्रार') ऐहिक आणि शेष इतर अल्लाहशी आपल्या स्वभावाप्रमाणे आहेत, आणि आदेश हा वास्तवासाठी असतो, तो वास्तवास लागू असतो. आणि सर्व (जण) अल्लाहसोबत आहेत, जसे की अल्लाहसाठी त्यांची आर्द्रता अनुरूप आहे, यथायोग्य आहे, आणि सर्वच ईश्वराचे उपासक ('इबादुल्ला') आहेत आणि सर्वजण कृपाळूचे उपासक-भक्त ('इबादुर्रहमान') आहेत आणि सारेजण प्रभूचे भक्त ('इबादुर्रब्ब') आहेत.

### सात श्रेणी

यानंतर हे जाणले पाहिजे की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने मुहम्मदी धर्मप्रजेचे ('उम्मत-ए-मुहम्मदिया') निरपेक्ष असे सात दर्जे बनवले आहेत. (१) पहिला दर्जा इस्लाम (संपूर्ण समर्पण) आहे. (२) दुसरा श्रद्धा (ईमान), (३) तिसरा संशोधन वा सुधारणा (इस्लाह), (४) चौथा भक्त्युत्कर्ष म्हणजेच भक्तीचा उत्कर्ष (एहसान), (५) पाचवा हौतात्म्य (शहादत), (६) सहावा सत्यनिष्ठता (सिद्दीक़ियत) आणि (७) सातवा सामिप्य (कुर्बत) आहे. आणि या दर्जापुढे संदेष्टत्व ('नबुव्वत')चा दर्जा आहे. याचे द्वार प्रेषित मुहम्मदपासून बंद झालेले आहे. अर्थात इत:पर कोणत्याच नबीचे (संदेष्टाचे) आगमन मुळीच होणार नाही, हे ओघाने आलेच.

### एक नम्र सूचना

'ईश्वरवादा'विषयी इस्लामी तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने, सखोल, सविस्तर आणि सुंदर विवेचनासाठी जिज्ञासू वाचकांनी इस्लाम धर्माचे गाढे विद्वान, आंतरराष्ट्रीय ख्यातिप्राप्त 'कुरआन'चे सुरस इंग्रजी भाषांतरकार अब्दुल्ला यूसुफ़ अली यांचे आंग्ल भाषेतील 'दि होली कुरआन' मधील पृ. १६१९ ते १६२३ वरील विवेचन अवश्य वाचावे.

# विभाग - ३

# ब्रह्माण्ड

८

प्रकरण – ८

# उपनिषदें प्रणीत विश्वोत्पत्ती विचार[४१]

## १) विश्वोत्पत्तीविषयी उपनिषद्पूर्व कल्पना

वैदिक आर्यांचा धर्म अनेक देवतात्मक होता. या देवता निरनिराळ्या नैसर्गिक अथवा भौतिक प्रभावी चमत्कारांच्या अगर शक्तींच्या अधिष्ठांनी होत्या. ऋग्वेद म्हणजे ऋषींनी रचलेल्या या देवतांच्या स्तुतिपर सूक्तांचा प्रमुख संग्रह होय. ऋग्वेदात प्रजापती हा एकच सर्व जगाचा उत्पादक व चालक आहे असे म्हणून त्याची स्तुती केलेली आहे. त्याचप्रमाणे परमेश्वर एक असून ज्ञाते त्याला अनेक प्रकारे अग्नी, यम, मातरिश्वा इत्यादी नावांनी संबोधतात असेही म्हटले आहे. ऋग्वेद १/१६४/४६ इंद्र आपल्या शक्तीने अनेक रूपे धारण करतो असाही उल्लेख ऋग्वेदात आहे. ऋग्वेद ६/४७/४८ याशिवाय ऋग्वेदाच्या नासदीय सूक्तात सृष्टींच्या आधी एकच परमेश्वर–स्वरूप होते व त्याला सत् अथवा असत् काहीच म्हणता येत नव्हते, असे वर्णन आले आहे.

हे तात्त्विक विचार लक्षात घेतले तर ईश्वर एक असून निरनिराळ्या देवता ह्या एका ईश्वराचीच भिन्न भिन्न स्वरूपे आहेत, असे मानले पाहिजे. या निरनिराळ्या देवता आपापल्यापरीने सृष्टीचक्र चालवण्याचे काम करीत असल्या तरी त्यांची ही कामे त्यांना नेमून देणारा व त्यांच्यावर नियंत्रण करणारा परमेश्वर निराळा आहे अशी एकसूत्रीपणाची व सुसंघटनेची कल्पना ऋषींनी केली आहे. 'त्या ब्रह्माच्या भीतीमुळेच वायू वाहतो, त्याच्या भीतीनेच सूर्य नियमाने उगवतो. त्याच्या भीतीमुळे अग्नी, इंद्र आणि पाचवा मृत्यू हे स्वकार्यतत्पर असतात.' तैत्तिरीयोपनिषद २/८/१ पण विचाराची ही वाढ येथेच स्थगित झाली नाही. उपनिषदांतील ऋषींना देवता व परमेश्वर यांमधील हा भेदही सहन झाला नाही. स्वयंभू, सर्वशक्तिमान, अनंत, सर्वव्यापी असे एकमेव ब्रह्मच या जगात सर्वत्र भरून राहिले आहे असा त्यांचा अखेरचा सिद्धान्त आहे.

विश्व उत्पन्न करणारी कोणीतरी एक देवता असावी, अशा विचाराने प्रेरित होऊन तिचा शोध संहिता काळीच सुरू झाला होता. ब्राह्मणकाळात हा मान प्रजापतीला व प्रजापतीचे यज्ञाशी ऐक्यरूप्य कल्पून यज्ञाला देण्यात आल्याचे आढळते; परंतु प्रजापतीने सृष्टी कशी निर्माण केली, याबाबत वेगवेगळ्या कल्पना आढळतात. प्रजापतीने तप केले व त्यामुळे त्याच्यापासून देव व असुर निर्माण झाले. दुसरा प्रकार म्हणजे प्रजापति आपल्या कन्येला पाहून मोहीत झाला, आणि मृगीचे रूप धारण करून ती तेथून जाऊ लागली. तेव्हा प्रजापति मृगाचे रूप धारण करून तिचा पाठलाग करू लागला. या वेळी स्खलित झालेल्या रेतस्पासून विविध

सृष्टी निर्माण झाली. पहिल्या कथेत तपस् या कल्पनेला महत्त्व आहे. देवांनाही काही गोष्ट हवी असे तेव्हा ते 'अर्चन्तः श्राम्यन्तः तपश्चेरूः (तप करीत)' असे वर्णन केलेले आहे. 'तपस'चे मूलस्थान ऋग्वेदात आढळते. तेथे 'अभीद्ध तपस'पासून ऋत व सत्य उत्पन्न होऊन त्यांपासून समुद्रादि सर्व विश्व उत्पन्न झाले असे स्पष्ट वर्णन आहे. दुसऱ्यांत मिथुनापासून उत्पत्ती ही कल्पना आहे. ही अर्थात रोजच्या व्यवहारावर आधारलेली आहे. प्रथम काहीही नव्हते, त्यांतून पाणी उत्पन्न झाले व त्यानंतर क्रमाने वायू इत्यादी सृष्टी निर्माण झाली असेही वर्णन ब्राह्मणांत आढळते. अशाप्रकारे विश्वोत्पत्तीविषयी अनेक कल्पना या वाङ्मयात आढळून आल्या, तरी त्यात संहिताकाळातील जोम दिसत नाही. विश्वाचे मूळ कारण कोणीही देवता अथवा तत्त्व असले तरी यज्ञधर्माला त्याच्याशी फारसे कर्तव्य नाही. देवतांच्या प्राधान्याबरोबरच, विश्वाच्या मूलकारणाच्या शोधालाही उतरती कळा लागल्यासारखे झाले होते. त्यामुळे विश्वाच्या मूलकारणाच्या शोधाला वेगळेच वळण लागले. ते आपणास उपनिषदांत पाहावयास मिळते.

## २) उपनिषदेंप्रणीत सृष्टी-निर्मिती वा विश्वोत्पत्ती-विचार

प्रथमारंभीच हे कबूल केले पाहिजे, की सृष्टीची उत्पत्ती कशी झाली याची अतिप्राचीन उपनिषदांतून केलेली मांडणी तितकीशी पद्धतशीर नाही. आरंभी उपनिषदांतील ऋषींच्या मनावर ब्राह्मणांतील यज्ञसंस्थेचा पगडा बराच असल्यामुळे सृष्टी-उत्पत्तीच्या त्यांच्या मतावर त्याचा थोडाबहुत परिणाम झाल्यावाचून राहिला नाही. उदाहरणार्थ, **बृहदारण्यकांत** दिलेल्या सृष्टीच्या उत्पत्तीचा क्रम पहा. तेथे असे म्हटले आहे की, सुरुवातीला या जगात काही नव्हते. बुभुक्षारूपी मृत्यूने हे सर्व व्यापलेले होते. बुभुक्षा-भक्षण करण्याची इच्छा-हाच मृत्यू होय. आपण देहधारी व्हावे असे त्याच्या मनाने घेतले. तो मृत्यूरूपी देव उपासना करीत फिरू लागला. त्याच्यापासून आप, पृथ्वी व अग्नी ही महाभूते उत्पन्न झाली. या अग्नीची सूर्य, अग्नी व वायू अशी तीन स्वरूपे होती. हा वायू म्हणजेच प्राण होय. या प्राणापासून निरनिराळे लोक उत्पन्न झाले असे पुढे म्हटले आहे. बुभुक्षास्वरूप मृत्यूने आपले दुसरे स्वरूप तयार करावे अशी इच्छा केली. त्याने मन व वाणी यांच्या जोडप्यांचे रूप धारण केले. त्याचे रेत (बीज) हेच संवत्सर झाले. परंतु एवढी सृष्टी उत्पन्न करूनही त्या मृत्यूदेवाचे समाधान झाले नाही. त्याला ती अगदी अल्प वाटली. वाणीपासून त्याने ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, छंद, यज्ञ, प्रजा आणि पशू हे सर्व उत्पन्न केले. त्याने जे जे उत्पन्न केले ते ते सर्व भक्षण करण्याचे ठरवले. (प्रत्येक सृष्ट पदार्थ कालवश बनला.) आपण मोठ्या यज्ञाने यजन करावे अशी त्या मृत्यूदेवाला इच्छा उत्पन्न झाली म्हणून तो अश्व झाला. बृहदारण्यकोपनिषद १/२. या वर्णनावरून यज्ञसंस्थेची पूर्तता हेच सृष्टी-उत्पत्तीचे ध्येय असल्याचे ऋषींचे मत दिसते. शिवाय, ज्या क्रमाने सृष्टीची उत्पत्ती येथे दिली आहे, त्यात तर्कशुद्धता फारच थोडी आहे.

**मुंडकोपनिषदांत** सृष्टीच्या उत्पत्तीचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे - प्रारंभी अक्षर पुरुष होता. त्याच्यापासून प्राण, मन व इंद्रिये, आकाश, वायू, तेज, जल व सर्वांचे धारण करणारी पृथ्वी उत्पन्न झाली. त्या पुरुषापासूनच सूर्य व चंद्र झाले. चंद्रापासून पर्जन्य, पर्जन्यापासून पृथ्वीवरील वनस्पती झाल्या. त्या वनस्पतींपासून प्राणी निर्माण झाले. स्त्रीपुरुषसंयोगाने अनेक प्रकारची प्रजा वाढली. त्याच विराट पुरुषापासून तीन वेद, दीक्षा, सर्व यज्ञ, ऋतू, दक्षिणा, संवत्सरादि काल, यज्ञकर्ता आणि चंद्रसूर्य ज्यांना पावन करतात ते

लोक उत्पन्न झाले. त्या विराट पुरुषापासूनच अनेक देव, देवगण, मनुष्यप्राणी, पशूपक्षी, प्राणादी वायू, तांदूळ इत्यादी धान्ये, व्रताचरण, आत्मिक बुद्धी, सत्यनिष्ठा, ब्रह्मचर्य व विधी उत्पन्न झाले. मुंडकोपनिषद २/१. मुंडकोपनिषदांत आणखी एका ठिकाणी दिलेला सृष्टी-उत्पत्तीचा क्रम लक्षात ठेवण्यासारखा आहे. येथे अक्षरब्रह्मापासून उत्पत्तीला प्रारंभ होतो. या अक्षर तत्त्वापासून प्रथम अन्न, अन्नापासून प्राण, प्राणापासून मन, आणि मनापासून कर्म व पंचभूतात्मक सृष्टी उत्पन्न होते असे म्हटले आहे. मुंडकोपनिषद् १/१/८. येथे अन्न म्हणजे जड प्रकृती. प्राण आणि मन किंवा बुद्धी ही तीन तत्त्वे उत्पत्तीचे तीन महत्त्वाचे विभाग मानले आहे.

**प्रश्नोपनिषदांत** प्रजापतीने रयि व प्राण हे मिथुन उत्पन्न केले असे म्हटले आहे. त्याचा अर्थ जड व चेतन सृष्टी असाच समजला पाहिजे.

सृष्टीच्या उत्पत्तीविषयी उपनिषदांत जी अनेक निरनिराळी मते आढळतात, त्यांपैकी कित्येक मतांत पंचमहाभूतांपैकी एक किंवा अनेक भूते सृष्टीचे मूळ कारण मानलेले आढळते. काही ठिकाणी असत्, सत् अथवा प्राण यांपैकी एखाद्या निर्विशेष तत्त्वाला आदिकारण म्हटलेले आहे, तर इतर काही ठिकाणी आत्मा, ईश्वर, अगर प्रजापति यांपैकी एखाद्याला सृष्टी-उत्पत्तीकर्ता बनवले आहे. शेवटच्या प्रकारात काही ठिकाणी सृष्टी-उत्पत्तीचे कर्तृत्व परमेश्वराकडे दिलेले आहे, तर काही ठिकाणी ती त्याच्यापासून निघाली असे म्हटले आहे. तर अन्य काही ठिकाणी सृष्टी प्रथम निर्माण करून नंतर तींत ईश्वराने प्रवेश केला असे म्हटले आहे. (बृहदारण्यक ५/५/१, छांदोग्य४/३/१-२; कठ २/५, तैत्तिरीय २/७)

**तैत्तिरीयोपनिषदांत** 'हे पूर्वी असत् होते. त्यापासून सत् म्हणजे नामरूपात्मक जगत् झाले' असे म्हटले आहे. तैत्तिरीय २/७. यांतील असत् या शब्दाने अभावाचा अगर शून्याचा बोध होतो असे म्हणता येणार नाही. कारण पुढच्याच वाक्यात 'त्याने स्वत:च स्वत:ला कार्यरूप बनवले' असे म्हटले आहे. आपला पुत्र श्वेतकेतु याला ब्रह्मविद्येचे प्रवचन करीत असता अभावातून हे सर्व जग निर्माण झाले असे म्हणणाऱ्या मंडळींची आरुणि ऋषीने सौम्य शब्दांत निंदा केली आहे. आरुणि श्वेतकेतूला म्हणतो, ''हे वत्सा! हे सर्व कार्यरूप जगत उत्पन्न होण्याच्यापूर्वी अद्वितीय, एकजिनसी, भावरूपच होते. त्याविषयी काही लोक म्हणतात, 'हे जग उत्पन्न होण्याच्या पूर्वी अद्वितीय, एकाजिनसी, अभावरूपच होते. असतपासून सत् म्हणजे अभावापासून भाव उत्पन्न झाला. वत्सा! असे खरोखर कोणत्या प्रमाणावरून सिद्ध होईल? कारण अभावापासून भाव कसा उत्पन्न होणार? म्हणून वत्सा! हे जग उत्पन्न होण्यापूर्वी अद्वितीय, एकजिनसी भावरूपच होते.''- छांदोग्य - ६/२/१-२ आरूणीने श्वेतकेतूला सृष्टी-उत्पत्तीचे जे वर्णन सांगितले आहे त्यात पुढील गोष्टी लक्षात ठेवण्यासारख्या आहेत - सृष्टीच्या प्रारंभी जे काही होते ते भावरूप होते व अद्वितीय होते. या भावरूप सत्‌तत्त्वापासून क्रमाने तेज, आप व पृथ्वी ही भूते उत्पन्न झाली. पुढील कालात प्रसिद्धीस आलेले पंचीकरणाचे मत उपनिषदांत प्रारंभी नव्हते. तैत्तिरीयोपनिषदांत सृष्टीचा जो उत्पत्तीक्रम सांगितला आहे, त्यात पंचमहाभूतांचा उल्लेख आहे. तैत्तिरीय -२/१ तो काल दृष्यानंतरचा आहे. येथे फक्त त्रिवृत्करण सांगितले आहे. पंचीकरण म्हणजे आकाश, वायू, अग्नी, जल व पृथ्वी या पंचमहाभूतांच्या मिश्रणाने सृष्टीतील सर्व पदार्थ बनले आहेत हे मत होय. त्रिवृतकरण म्हणजे आरूणीने सांगितल्याप्रमाणे तेज, आप व पृथ्वी या तीन तत्त्वांच्या मिश्रणाने सर्व सृष्टी तयार झाली हे मत होय.

उपनिषदांत सर्व भूते प्राणापासून उत्पन्न होतात व प्राणांत विलीन होतात असेही वर्णन केलेले आहे. छांदोग्य १/११/५.

**कौषीतकी उपनिषदांत** प्राणाचे जे वर्णन केले आहे त्यात काही गोष्टी विशेष नमूद करण्यासारख्या आहेत. उदाहरणार्थ, प्राणच आयुष्य आहे असे म्हटले आहे. कारण, जोपर्यंत प्राण असतो तोपर्यंत मनुष्य जिवंत असतो व प्राणाच्या मागोमाग जीवही हे कलेवर सोडून जातो. त्याचप्रमाणे प्राणालाच प्रज्ञा म्हटले आहे. जीवतत्त्वापेक्षा प्रज्ञातत्त्व श्रेष्ठ आहे. जेथे जीवतत्त्वाचे अस्तित्व आहे तेथे प्रज्ञातत्त्व असतेच असे नाही. मात्र जेथे प्रज्ञातत्त्व आहे तेथे जीवतत्त्व असतेच. शेवटी आत्मा व प्राण एकच होत असेही म्हटले आहे. अशा रीतीने या उपनिषत्काराला जीवशास्त्राच्या दृष्टीने प्राण जीवतत्त्व आहे, मानसशास्त्राच्या दृष्टीने प्रज्ञातत्त्व आहे व अध्यात्मशास्त्राच्या दृष्टीने आत्मतत्त्व आहे असे दाखवावयाचे आहे.

आता सृष्टीनिर्मितीच्या ज्या उपपत्तींचा आपण विचार करणार आहोत, त्यात सगुण ब्रह्म अथवा ईश्वर याला सृष्टी उत्पन्न करण्याची इच्छा होऊन त्याने ती उत्पन्न केली असे म्हटले आहे. प्र. १/४

**ऐतरेयोपनिषदांत** सृष्टी-उत्पत्तीचा क्रम फारच व्यवस्थित व विस्ताराने दिलेला आहे. उपनिषद्-वाङ्मयात इतके विस्तृत व सुसूत्र वर्णन दुसरीकडे क्वचितच आढळते. ''सृष्टी उत्पन्न होण्याच्या अगोदर एक आत्मतत्त्वच होते. दुसरे व्यापारवत् असे काहीच नव्हते. आपण लोक निर्माण करावे, अशी त्याला इच्छा झाली'' ऐ. १/१ या मंत्रांत सृष्टीच्या पूर्वीची स्थिती दर्शवली आहे. सृष्टी उत्पन्न होण्याच्या अगोदर एकजिनसी एकच एक असे आत्मतत्त्व होते. दुसरे काही अस्तित्वातच नव्हते. श्रुतीचे हे वाक्य अद्वैतसिद्धान्ताचे स्पष्ट निदर्शक आहे. अशा स्थितीत सृष्टी उत्पन्न करण्याची इच्छा आत्मतत्त्वात प्रादुर्भूत झाली. यातील 'लोक' हा शब्द स्थावर-जंगमात्मक सर्व सृष्टीचा बोधक आहे. आत्मवस्तू एकच एक असताना तीत इच्छा का व कशी उत्पन्न झाली या प्रश्नाचा विचार या ठिकाणी केलेला नाही. 'आत्म्याने प्रथम अंभः, मरीची, मर आणि आप असे लोक निर्माण केले. हे लोक तयार झाले. आता आपण लोकपाल उत्पन्न करावे अशी त्याला इच्छा झाली. त्याने दिव्य आपापासून पुरुष निर्माण केला.' – ऐ १/१ लोकांची उत्पत्ती झाल्यानंतर लोकपाल उत्पन्न करावेत अशी आत्म्याला झालेली इच्छा क्रमप्राप्तच होती, कारण उत्पन्न केलेले लोक स्थिर व कार्यक्षम व्हावेत असा हेतू असणे स्वाभाविक आहे. लोकपालांची निर्मिती म्हणजेच जीवसृष्टीचा प्रारंभ होय. जडसृष्टी व जीवसृष्टी मिळूनच पूर्ण सृष्टी होते.

**प्रश्नोपनिषदात** रयि व प्राण याचे मिथुन प्रजापतीने केले असल्याचे जे वर्णन मागे आले आहे त्यात हाच सिद्धान्त मानला आहे. (विराट) पुरुष निर्माण केल्यावर आत्म्याने त्याची इंद्रिये, त्यांचे कार्य व त्यांच्या देवता निर्माण केल्या. 'तो त्या पुरुषाला ईश्वरी सामर्थ्याने तापवता झाला. तो तापल्यावर अंडे फुटावे त्याप्रमाणे फुटून त्याचे मुख बाहेर आले. मुखापासून वाणी उत्पन्न झाली. वाणीपासून अग्नी उत्पन्न झाला. नाक निर्माण झाले. नाकापासून प्राण व प्राणापासून वायू उत्पन्न झाला, इत्यादी. ऐ. १/१ येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की, प्रथम इंद्रिये उत्पन्न केली, मग त्यांचे कार्य उत्पन्न केले आणि नंतर त्यांच्या बाह्य जगातील अधिष्ठात्री देवता निर्माण केल्या. उदाहरणार्थ प्रथम डोळे, मग दृष्टी व नंतर सूर्य असा हा क्रम आहे. ''त्या निर्माण केलेल्या देवता क्षुधा व तृषा यांनी त्रस्त होऊन आत्म्याला म्हणाल्या, ज्या स्थानी राहून आम्ही अन्नभक्षण करू ते स्थान आम्हाला

दाखवा.'' त्याने बैल निर्माण करून त्या देवतांकडे आणला. त्या म्हणाल्या, 'आम्हाला पाहिजे तसे हे स्थान नाही.' तेव्हा आत्म्याने घोडा उत्पन्न करून त्यांच्याकडे आणला. त्या म्हणाल्या, 'हे देखील आम्हाला पाहिजे तसे नाही.' आत्म्याने त्या देवतांकडे मनुष्यप्राणी उत्पन्न करून आणला. तेव्हा त्या म्हणाल्या की, 'हे स्थान चांगले आहे. पुरुष हेच देवतांना योग्य स्थान होय.' आत्मा देवतांना म्हणाला की, 'तुम्ही आपापल्या स्थानात प्रवेश करा.' ऐ. १/२ अग्नी इत्यादी सर्व देवतांना मानवी शरीर पसंत पडले. कारण ते सर्व देवता व त्यांच्या क्रिया यांना उपयोगी होते. मनुष्य देहात सर्व शक्तींचा विकास होण्याला जसा अवकाश आहे, तसा तो इतर कोणत्याही देहांत नाही. लोक आणि लोकपाल उत्पन्न केल्यावर त्यांच्यासाठी आत्म्याने अन्न उत्पन्न केले. नंतर त्याने असा विचार केला की, मी या शरीरात इंद्रिये व त्यांच्या देवता निर्माण केल्या खऱ्या, पण जोपर्यंत त्यांचा चालक म्हणून या शरीरात कोणी असणार नाही, तोपर्यंत ती आपापला व्यापार कसा करू शकतील? म्हणून आत्म्याने मनुष्याच्या मस्तकावरील टाळूचे विदारण करून शरीरात प्रवेश केला. शरीरात प्रवेश केल्याने जीव बनलेल्या आत्म्याच्या जागृती स्वप्न व सुषुप्ती अशा तीन अवस्था आपण पाहतो. ऐ. १/३ ईश्वराच्या कलामंदिरातील मानव ही अखेरची सुंदर मूर्ती आहे व जीवात्मा आणि परमात्मा यांच्यामध्ये परमार्थत: अभेद आहे हे तत्त्व येथे सूचित केले आहे.

**तैत्तिरीयोपनिषदांत** असे सांगितले आहे की, आत्म्यापासून म्हणजे ब्रह्मापासून आकाश उत्पन्न झाले, आकाशापासून वायू, वायूपासून अग्नी, अग्नीपासून पाणी, पाण्यापासून पृथ्वी, पृथ्वीपासून वनस्पती, वनस्पतीपासून अन्न व अन्नापासून पुरुष उत्पन्न झाला. तै. २/१ येथे आत्म्याला सृष्टी उत्पन्न करण्याची इच्छा झाली असे वर्णन नसून आत्म्यापासून क्रमाने आकाशादी पंचमहाभूते निर्माण झाली असे म्हटले आहे. उत्पत्तीच्या वेळी आत्म्यांतून आकाश, आकाशातून वायू असा क्रम आहे, तर प्रलयाच्या वेळी यांच्या उलट म्हणजे पृथ्वी पाण्यांत, पाणी अग्नींत असा क्रम येथे सांगितलेला आहे. फक्त या उपनिषदांतच पंचमहाभूतांचा उल्लेख स्पष्ट आढळतो.

**श्वेताश्वतर उपनिषदांत** सृष्टी-उत्पत्तीचे कर्तृत्व सगुण ईश्वराकडे दिलेले आढळते - श्वे. ६/१

उपनिषदांतील सृष्टी-उत्पत्तीचे आतापर्यंत जे वर्णन केले त्यावरून तीन गोष्टी निश्चित सिद्ध होतात. ही सर्व सृष्टी एका आत्म्यापासूनच उत्पन्न झाली आहे ही पहिली, सृष्टी सत्य आहे ही दुसरी व आत्मा किंवा ब्रह्म या सृष्टीच्या आत-बाहेर ओतप्रोत भरून राहिले आहे ही तिसरी.

या जगाची उत्पत्ती, स्थिती व लय आत्म्यांतच आहे. तै. ३/१ आत्म्याच्या बाहेर त्याला स्वतंत्र अस्तित्व नाही आणि आधारही नाही. या विश्वांतील सर्व वस्तू आत्म्यापासूनच उत्पन्न झाल्या असल्यामुळे ब्रह्मज्ञानी पुरुषाचा ज्या ज्या पदार्थांशी संबंध येईल त्याच्याशी त्याची बुद्धी आत्मौप्य दृष्टीने तादात्म्य पावते. म्हणून जो हे सर्व विश्व आत्म्याहून भिन्न समजतो, त्याला हे सर्व विश्व दुरावते. पाण्यात मीठ मिसळावे तसा आत्मा किंवा ब्रह्म जगात मिसळून गेलेले आहे.

थोडक्यात उपनिषत्कारांच्या मते विश्व आत्म्याहून निराळे नाही. सर्व अनुभव आपल्यामध्ये सामावून घेऊ शकेल इतका आत्मा महान आहे. सर्व पदार्थांच्या मुळाशी एकच सद्वस्तू आहे या अर्थानेच उपनिषदे मायावादाला मान्यता देतात. सर्व पदार्थ एकाच सद्वस्तूच्या निरनिराळ्या अंशांपासून बनलेले आहेत. माया ही

परमेश्वराचीच मूलशक्ती आहे. तिच्यामुळेच विश्व निर्माण करण्याची इच्छा परमेश्वराला उत्पन्न होते. पदार्थ आहेतही व नाहीतही. उत्पत्ती व लय यांच्यामधील काळात त्यांना अस्तित्व आहे. द्वैत व नानात्व ही सत्य नाहीत. अविवेकी मनुष्य आपल्या डोळ्यांना दिसणारे सान्त जगच सत्य धरून चालतो. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. सान्त जग कशाचे तरी कार्य आहे. ते स्वयंभू नाही व स्वाश्रयीही नाही. त्याच्या पलीकडे दुसरी काही तरी नित्यवस्तू आहे. ती नित्यवस्तू म्हणजे ब्रह्मच असली पाहिजे, हे नि:संशय होय.

ईश्वर हा मायेच्या स्वच्छ रूपांतील आत्म्याचे प्रतिबिंब असून, सृष्टीच्यापूर्वी तो एकटाच होता. या एकाकीपणाचा कंटाळा आल्याने विरंगुळा म्हणून त्याने सृष्टीचा खेळ केला. दुसरे काहीच साधन उपलब्ध नसल्याने स्वत:च्या मायामय रूपांतून अनेक शरीरे उत्पन्न करून स्वत: प्राणमय रसाने त्यांत प्रवेश करता झाला. विद्यारण्य माधव यांचा हा प्रतिबिंबवाद उपनिषदाच्या उपरोक्त मतास पोषक वा दुजोरा देणारा असा आहे.

९

प्रकरण ९

# सृष्टी–प्रपंच – तौलनिक विवेचन
# (इस्लामी व भारतीय दृष्टिकोन)

**१) इस्लामप्रणीत विश्वरचना व मानव–निर्मितीचे प्रयोजन व पद्धती**

इस्लामप्रणीत विश्वरचना व मानव–निर्मितीचे प्रयोजन व पद्धत सुस्पष्ट रीतीने व्यक्त करण्यात आल्या आहेत. तत्संबंधी विवेचनात संदिग्धता मुळीच नाही. विश्वरचनेच्या पद्धती व मानव–निर्मितीचे टप्पे हे आधुनिक वैज्ञानिक सिद्धान्तांशी मिळते–जुळते आहेत. त्यात विरोधाचा वा व्यत्यासाचा अभाव आहे. या बाबी पुढील विवेचनावरून स्पष्ट दिसून येतील. मात्र याच्या तुलनेत विश्वोत्पत्तीसंबंधी भारतीय दार्शनिक दृष्टिकोनात विविधता, अस्पष्टता, संदिग्धता आणि अपूर्णता असल्याचे जाणवेल. सर्वप्रथम विश्वोत्पत्ती आणि विश्वरचनेविषयी भारतीय दार्शनिक दृष्टिकोनाचे विवेचन प्रस्तुत करून त्यानंतर इस्लामी धारणा प्रस्तुत करण्यात येत आहे. दोन्ही दृष्टिकोन एकसाथ ठेवल्यामुळे तुलना आपोआप सिद्ध होते.

डॉ. राधाकृष्णन लिहितात, "उपनिषदे ब्रह्मांडासंबंधी कोणतेच सुसंगत दृष्टिकोन प्रस्तुत करीत नाहीत. उपनिषदांचे रचनाकार अनेक होते. शिवाय ते सर्व एकाच कालखंडामधील नव्हते. ब्रह्मांडाविषयी ते सर्व एकच दृष्टिकोन प्रस्तुत करू इच्छित होते, याविषयी संदिग्धता आहे." (इंडियन फिलॉसफी, द्वितीय खंड, पृ. ४६७) अशा प्रकारे भारतीय तत्त्वज्ञानाच्या प्राचीन प्रणालीमध्ये मुख्य विवाद होता ब्रह्मांडाच्या उत्पत्तीसंबंधी. काही तत्त्वज्ञ म्हणत की ब्रह्मांडाचा उगम वायूपासून झाला, तर काही इतरांचे असे मत होते की आप (पाणी)च मूल पदार्थ आहे की ज्याच्यापासून सर्व वस्तू प्रकट झाल्या. वेदांती अशी घोषणा करीत की ब्रह्मांडाचे मूळ कारण हा ब्रह्म आहे, तर सांख्यवादी या गोष्टीवर भर देत की नाम–रूपमय अशा या जगाचा उगम प्रकृतीपासून झालेला आहे. अशा प्रकारे प्राचीन तत्त्ववेत्त्यांच्या मतानुसार हा शरीर आणि आत्मा, पदार्थ आणि प्रकृती, एकाच तत्त्वापासून उत्पन्न झालेत. पदार्थ किंवा आत्म्यापासून भौतिकवादी एकतत्ववाद आणि आदर्शवादी एक तत्ववाद हे दोन्ही या जगास केवळ एका तत्त्वापासून संपूर्णपणे विकसित झालेले मानतात. अशा प्रकारे सृष्टी–प्रपंचाच्या संबंधात भारतीय तत्त्वज्ञानामध्ये मतमतांतरे आढळून येतात. तरी पण सर्वप्रथम विश्वनिर्मिती व विश्वरचना या विषयी भारतीय तत्त्वज्ञानाची भूमिका जाणून घेऊ या.

### २) बहुविध सृष्टी[४२] : भारतीय दार्शनिक दृष्टिकोन

ज्या वेळी ईश्वराचे तेज प्रकृतीवर पडून प्रकृती आकार धारण करावयास लागते, त्या वेळी जे पहिले आकार दिसू लागतात ते त्रिमूर्तींचे म्हणजेच ब्रह्मा, विष्णू आणि शिव (महेश) यांचे होत. ब्रह्मांड अथवा विश्व उत्पन्न करण्यासाठी ईश्वरानेच धारण केलेली ती तीन व्यक्त स्वरूपे होत. जे स्वरूप धारण करून ईश्वर सृष्टी निर्माण करतो त्या स्वरूपाला ब्रह्मा असे म्हणतात. अर्थात ब्रह्मा हा सृष्टीकर्ता आहे. ज्या स्वरूपाने ईश्वर सृष्टी धारण करितो, अथवा सृष्टीचे पालन करितो, त्या स्वरूपास विष्णू असे म्हणतात, अर्थात विष्णू हा पालनकर्ता आहे. जेव्हा सृष्टीचे वैभव नाहीसे होऊन ती जीर्ण व निरुपयोगी होते, तेव्हा तिचा संहार ईश्वर ज्या स्वरूपाने करतो त्यास शिव अथवा महेश (महादेव) असे म्हणतात. अर्थात शिव हा संहारकर्ता आहे. ब्रह्मा, विष्णू व महेश अशी ही तीन ईश्वराची पहिली व्यक्त स्वरूपे होत, याच्या तीन दिव्य मूर्ती होत. एकच सगुण ब्रह्म अथवा परमेश्वर या तीन प्रकारांनी व्यक्त होतो.

सृष्टीकर्ता ब्रह्मा मूळ प्रकृतीचे सात विभाग करितो, त्यांना सात तत्त्व असे म्हणतात. पहिले तत्त्व आहे महत्‌बुद्धी किंवा शुद्ध बुद्धी, व प्रकृतीचे अणु-प्रमाण विभाग करणारे दुसरे तत्त्व अहंकार आहे. बाकी पाच तत्त्वे आकाश, वायू, अग्नी, आप व पृथ्वी ही होत. ही तत्त्वे म्हणजेच पंचमहाभूते होत. रसायनशास्त्रात सत्तर मूलपदार्थ किंवा मूलतत्त्वे सांगितलेली आहेत. मात्र रसायनशास्त्र भूलोकाच्या पलीकडे विचार करीत नाही. भूलोकचे सर्व पदार्थ सत्तर मूलतत्त्वांपासून झाले आहेत असे रसायनशास्त्राचे म्हणणे आहे. ज्या पदार्थाचे आणखी पृथक्करण करता येत नाही, ते 'मूलतत्त्व' अशी रसायनशास्त्राची 'मूलतत्त्व' याची व्याख्या आहे. धर्म-तत्त्वज्ञानात 'मूलतत्त्व' किंवा 'महाभूत' हा शब्द 'द्रव्याची एक विशिष्ट अवस्था' या अर्थाने योजण्यात येतो. पाणी घन अवस्थेत 'बर्फ' होते. या जशा पाण्याच्या 'अवस्था', तशाच प्रकृतीच्या पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश या अवस्थांना धर्म-तत्त्वज्ञानांत मूलतत्त्वे किंवा महाभूते म्हणतात. सर्व दृश्य जग 'पृथ्वी' या महाभूताने बनले आहे. उपरोक्त पाच तत्त्वांना भूतादि सृष्टी म्हणतात, व ह्यापासूनच सर्व वस्तू अंशतः उत्पन्न होतात. ह्या भूतादि सृष्टीमध्ये सत्त्व-रजोगुणांपेक्षा तमोगुणाचेच प्राबल्य असल्यामुळे तन्निर्मित वस्तू जड व मंद असतात, व ह्या प्रकृतीचे आवरण दाट व जड असल्यामुळे आतील जीवशक्ती प्रकट होत नाही.

ह्या तत्त्वांच्या मागाहून दशेंद्रिय निर्माण होतात. ही प्रथमतः ब्रह्मदेवाच्या मनोमय सृष्टीत तयार होतात व नंतर त्यांना जड तत्त्वाचे आवरण प्राप्त होते. त्वागिंद्रिय, चक्षुरिंद्रिय, रसनेंद्रिय, कर्णेंद्रिय व घ्राणेंद्रिय ही मूळ पाच ज्ञानेंद्रिय होत व त्वचा, डोळे, जीभ, कान व नाक ही त्यांची पाच इंद्रियद्वारे होत. त्याचप्रमाणे पाच सूक्ष्म कर्मेंद्रिय असून हात, पाय, तोंड, पायु व उपस्थ ही त्यांची द्वारे होत. ह्या इंद्रियांमध्ये सत्त्व व तमोगुणांपेक्षा रजोगुणांचे प्राबल्य असते, म्हणून ती विशेष चंचल असतात, व आतील जीवशक्ती यांच्याद्वारे अधिक प्रकट होते.

इंद्रियांनंतर ब्रह्मदेवाने आपल्या मनोमय भूमिकेवर इंद्रियांशी संबंधित असणारे देव निर्माण केले. तसेच मन हे आणखी एक इंद्रिय निर्माण केले. म्हणजे पूर्वीची पाचच इंद्रिये मानिली तर हे सहावे, व दहा मानली तर अकरावे होय. बाह्यसृष्टीपासून इंद्रियांद्वारे जे ज्ञान प्राप्त होते ते स्वतःच्या अंतरंगात नेऊन मन त्यास

व्यवस्थित स्वरूप देते व त्यावर विचार करते. देवता व मन ह्यांच्या ठिकाणी रजोगुण व तमोगुण ह्यांच्यापेक्षा सत्त्वगुण प्रबल असतो.

सत्त्व, रज आणि तम हे तीनही गुण केव्हांही पृथक्‌पणे असत नाहीत. सर्वच गुण पदार्थांत असतात, मात्र एका पदार्थात एका गुणाचे विशेष प्राबल्य असू शकते. जेव्हा तमोगुणाचे प्राबल्य असते तेव्हा त्यास तामसिक, रजोगुणाचे प्राबल्य असते तेव्हा राजसिक व सत्त्वगुणाचे प्राबल्य असते तेव्हा सात्त्विक असे विभाग करता येतील. म्हणून ''भौतिक प्रकृती सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांनी बनलेली आहे.'' ''सत्त्वं रजस्तम इति गुणा: प्रकृतिसम्भवा:'' भगवद्‌गीता १४:५. या तीन प्राकृतिक गुणांनुसार मनुष्याची श्रद्धा सात्त्विकी, राजसी आणि तामसी अशी तीन प्रकारची असू शकते.

नंतर ब्रह्मदेवाने आपल्या मनोमय सृष्टीमध्ये ईश्वरी नियमांची अंमलबजावणी करणारे, व सर्व विश्वाची व्यवस्था योग्य प्रकारे पाहणारे असे असंख्य दुसरे 'देव' निर्माण केले. ज्याप्रमाणे एखादा शासक (राजा) असून त्याचे मंत्रिमंडळ असते, त्याचप्रमाणे ईश्वर हा एक प्रभू व देव हे त्याचे मंत्री होत. ज्याप्रमाणे आम्ही मनुष्य ह्या एका पृथ्वीतलापुरते त्या ईश्वराचे खालच्या दर्जाचे अधिकारी म्हणजेच उप-प्रभारी आहोत, त्याचप्रमाणे देव हे ब्रह्मांडापुरते त्याचे वरिष्ठ दर्जाचे अधिकारी आहेत.

प्रत्येक मनुष्याला आपल्या कर्माप्रमाणे फलनिष्पत्ती होत आहे किंवा नाही हे, हे देव पहातात. देवांना सुर असेही नाव आहे. प्रत्येक मनुष्याला ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे ऐहिक गोष्टीत ते जय किंवा पराजय देत असतात. जेव्हा मनुष्य त्यांची सेवा करण्याचा प्रयत्न करतात तेव्हा ते त्यांना अनेक प्रकारे साह्य करतात व लोक जेव्हा त्यांच्यासंबंधी आपली कर्तव्ये विसरतात, तेव्हाच भयंकर वादळे, भयंकर साथी, भयंकर दुष्काळ, भूकंप, महापूर व अशाच इतर राष्ट्रीय आपत्ती, अरिष्टे उद्‌भवतात. देव असंख्य असून इंद्र, वायू, अग्नी, वरुण व कुबेर ह्या पाच अधिपतींच्या हाताखाली त्यांची विभागणी झालेली आहे. इंद्राचे अधिपत्य आकाशावर, वायूचे हवेवर, अग्नीचे विस्तवावर, वरुणाचे पाण्यावर व कुबेराचे पृथ्वीवर आहे. प्रत्येक अधिपतीच्या हाताखालील देवांना निरनिराळी नावे आहेत. उदाहरणार्थ, कुबेर, यक्ष इत्यादी.

ह्या देवांमध्ये रजोगुणाचे प्राबल्य असते, म्हणूनच ''कर्म हा त्यांचा स्वभाव आहे'' असे मनूने आपल्या स्मृतीत म्हटले आहे. ''कर्मात्मनां च देवानाम्'' मनुस्मृति, १/२२. देवाचे शत्रू जे असुर त्यांच्यामध्ये तमोगुणाचे प्राबल्य असल्यामुळे प्रकृतीमधील प्रतिकारता हा गुण त्यांच्या ठिकाणी दिसतो.

नंतर ब्रह्मदेवाने खनिज व उद्‌भिज पदार्थ, पशुपक्ष्यादि प्राणी व मनुष्य-प्राणी निर्माण करून आपल्या मनोमय भूमिकेवर जगताचा चित्रपट तयार केला. या चित्रपटांतील जगत प्रवृत्तीला संस्कृत भाषेत संसार असे म्हटले आहे व सतत परिभ्रमण करणाऱ्या चक्राशी त्याची तुलना केलेली आहे. ह्या संसारचक्रालाच सर्व जीव बांधले गेले आहेत.

ह्याप्रमाणे सृष्टी निर्माण करण्याच्या उद्योगापैकी आपले काम ब्रह्मदेवाने पूर्ण केले, परंतु ह्या निर्माण झालेल्या आकारांना स्थूल द्रव्याचे आवरण देऊन अद्यापि कार्यक्षम बनवावयाचे होते. सृष्टीचे पालन व रक्षण करणारा सर्वव्यापी जो विष्णू त्याचे हे काम होते. ह्या सर्व आकारांमध्ये त्याने आपला प्राण ओतला. म्हणजेच विष्णू हा त्यांस जाणीव देणारा सर्व आकारांच्या अंतर्यामींचा प्राण झाला. अर्थात यामुळे सर्व ब्रह्मांड प्राणमय

व चैतन्यमय बनले. परंतु मनुष्यप्राणी निर्माण होण्याच्या वेळी एवढ्यानेही भागेना. ईश्वराच्या दोन मूर्तींनी आपापले काम केले होते, परंतु आकाराचा नाश करून जीवांची मुक्तता करावी व त्यांना योगावस्थेमध्ये नेऊन आनंदानुभव द्यावा हे तिसऱ्या मूर्तीचे काम होण्याचे राहिले होते. ईश्वराच्या त्रिगुणत्वाचे पूर्ण प्रतिबिंब दर्शविणारे जीवाचे त्रिगुणत्व पुरे करण्यासाठी महादेवाची शक्ती खर्च व्हावयास पाहिजे होती. हे कार्य तेव्हा करण्यात आले, जीवांनी पूर्वीच्या कल्पामधील खनिज कोटी (श्रेणी), उदभिज कोटी व प्राणी कोटीमधून आपली उत्क्रांती करून घेतली होती. त्यांनी आता मानव होऊन ह्या कल्पांत आपला दीर्घ मानवी उत्क्रांतिमार्ग आक्रमण्यास सुरुवात केली. मनुष्यामध्ये 'प्रज्ञानेन संपन्नतम' होईपर्यंत व 'मर्त्येन अमृत' होण्याची त्यास इच्छा होईपर्यंत उद्‌भिज व प्राणी ह्या कोटींमधून मनुष्यकोटीपर्यंतच्या जीवाच्या उत्क्रांतिमार्गाचे सुंदर वर्णन ऐतरेयारण्यकामध्ये वाचावयास मिळेल. (ऐतरेयारण्यक; २/३)

विष्णूच्या मुख्य अवतारांचाही येथे उल्लेख केला पाहिजे. 'अवतार' ह्या शब्दाचा धात्वर्थ, तृ म्हणजे पलीकडे जाणे, व अव म्हणजे खाली, ह्यावरून 'खाली उतरणे' असा आहे. ईश्वर ज्या वेळी एखादे विशेष कार्य घडवून आणण्यासाठी कोणते तरी रूप धारण करून विशेष प्रकाराने प्रगट होतो, त्या वेळी हा शब्द योजतात. जेव्हा जगताची घडी बिघडते, व त्याला उत्क्रांतीच्या योग्य मार्गावर आणण्याची जरूरी असते, तेव्हा विष्णू असे रूप धारण करून अवतार घेतो व नीट व्यवस्था लावतो. त्याच्या इतर अवतारांपेक्षा दहा अवतार विशेष महत्त्वाचे मानले गेले आहेत, व त्यांना 'दशावतार' अशी संज्ञा आहे. ते असे–

१) **मत्स्य** – मत्स्यावताराबरोबर ह्या जगांत प्राणिकोटीची उत्क्रांती सुरू झाली.
२) **कूर्म** – कूर्मावतरामध्ये जरूर ते सर्व देह तयार व्हावे म्हणून प्रकृतिरूपी जलनिधीचे मंथन झाले.
३) **वराह** – पाण्यामध्ये बुडालेली पृथ्वी विष्णूने वर काढली व वराहप्रमाणे कोरड्या जमिनीवर राहणारे सस्तन प्राणी उत्पन्न केले.
४) **नृसिंह** – दैत्यांच्या त्रासापासून पृथ्वीची सुटका करण्यासाठी हा अवतार झाला.
५) **वामन** – सरतेशेवटी मानव-वंशाच्या उत्क्रांतीला मदत करण्यासाठी तो मनुष्यरूपाने प्रगट झाला. एका पदाने सर्व भूमी व्यापून टाकली व मनुष्याला त्याच्या उत्क्रांतीसाठी जागा करून दिली.
६) **परशुराम** – दुष्टांच्या निर्दालनासाठी हा अवतार झाला.
७) **राम** – मानवी सदाचरणाचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून हा अवतार जगापुढे आला.
८) **कृष्ण** – दिव्य प्रेमाची व ज्ञानाची ही मूर्ती असून असंख्य लोक त्याचे भक्त आहेत.
९) **बुद्ध** – ह्या कुलीन राजपुत्राने परिव्राजक बनून सत्याचा उपदेश करण्याकरता आपल्या राज्याचा व वैभवाचा त्याग केला. पुढे तो बौद्ध या मोठ्या धर्माचा संस्थापक झाला. त्याच्या द्वारे विष्णूने असंख्य अनार्य लोकांना उपदेश केला.
१०) **कल्कि** – हा अवतार पुढे व्हावयाचा असून त्याने कलियुगाची समाप्ती होणार आहे. हा अवतार होईल तेव्हा नव्या वळणाला सुरुवात होईल व पुन्हा सत्ययुगाला प्रारंभ होईल.

ह्या अवतारांनी मानवी जीवाची उन्नती व पूर्णावस्था सूचित केलेली आहे.

अवताराचे प्रयोजन भगवद्‌गीतेमध्ये अत्यंत समर्पकपणे या शब्दांत मांडले आहे – ''हे अर्जुना, जेव्हा जेव्हा

धर्माची ग्लानी होते व अधर्म वाढतो तेव्हा तेव्हा मी अवतार घेतो. साधूंचे रक्षण करण्याकरता, दुष्टांचा समूळ नाश करण्याकरता व धर्मसंस्थापना करण्याकरता मी प्रत्येक युगी अवतार घेतो.'' भगवद्गीता ४:७-८

''*यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।*
*अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।*'' ४:७

### ३) सृष्टी-प्रपंच : इस्लामी धारणा

सृष्टीचा आरंभ, विकास, विलय, तिची पुनरावृत्ती व नूतन सृष्टी-निर्मिती, सृष्टी-निर्मितीचा कालखंड व तिचे अधिष्ठान, मानव निर्मितीचे शारीरिक टप्पे व त्याच्या निर्मितीचे प्रयोजन आणि ब्रह्मांडामधील त्याचे सर्वोच्च स्थान याविषयी 'पवित्र कुराणा'मध्ये जागोजागी स्पष्ट शब्दांत प्रस्तुतीकरण व विवेचन आलेले आहे. त्यामुळे सृष्टी-प्रपंचाचा एक स्पष्ट आराखडा वाचकांच्या डोळ्यांसमोर निर्माण होतो. परिणामी, कुराणोक्त श्लोकांचा भावानुवाद जरी जसाचा तसा ठेवला असला तरी विश्वरचनेचे एक सुस्पष्ट चित्र आपोआप दृष्टीस पडू लागते. यास्तव विषय-विवेचनाची गरज मुळीच भासत नाही. कुराणोक्त सत्यसंकल्पी निर्मात्याची निर्मिती अर्थात सृष्टी-प्रपंच पद्धती अशी आहे -

''नि:संदेह तो (ईश्वर)च सृष्टीचा प्रारंभ (निर्मितीची सुरुवात) करतो आणि तोच (ती सृष्टी संपुष्टात आल्यानंतर) तिची (पुनरुत्थानात) पुन्हा निर्मिती करील.'' १०:४ ''बरे, असा कोण आहे की जो सृष्टीस प्रथम निर्माण करतो व मग त्याच प्रकारची सृष्टी पुन्हा पुन्हा बनवित राहतो?'' २७:६४ ''का लोकांनी (या गोष्टीचे) अवलोकन केले नाही की अल्लाह कशा प्रकारे पहिल्या वेळेस सृष्टी निर्माण करतो. मग त्याची पुनरावृत्ती करीत असतो. खरोखर, हे अल्लाहसाठी अगदी सहज शक्य आहे. खरोखर, अल्लाह सर्व काही करण्यास समर्थ आहे.'' २९:१९-२० ''तो इच्छितो त्याची निर्मिती करतो.'' ४२:४९ अशा प्रकारे अल्लाह सृष्टीनिर्मितीचा आरंभ करून त्याची पुनरावृत्ती पण करतो.

''अल्लाहने आकाश व पृथ्वीला (कोणा) सत्यसंकल्पानेच उत्पन्न केले आहे.'' ४५:२२ ''आम्ही आकाशास व पृथ्वीस व जे काय या दोहोंच्या दरम्यान आहे त्यास केवळ (कोणा) सत्य संकल्पानेच व एका नियमित काळासाठीच निर्माण केले आहे.'' ४६:३ ''त्यानेच आकाश व पृथ्वी यांना सत्याधिष्ठित निर्माण केले आहे.'' १६:३ (आकाश व पृथ्वी) या सर्वांना आम्ही सत्य संकल्पानेच निर्माण केलेले आहे. पण बहुसंख्य लोकांना या (वास्तवा)ची जाण नाही.'' ४४:३९

''सत्य नाकारणाऱ्या लोकांना या गोष्टीची जाणीव नाही का की, पृथ्वी आणि आकाश आधी एकमेकाला घट्ट चिकटलेला एक गोळा होता, आणि आम्ही त्यांना दुभंगून वेगळे केले. आणि प्रत्येक सजीवाला आम्ही पाण्यापासून निर्माण केले.'' २१:३०

यावरून हे स्पष्ट होते की अल्लाहने विश्व-निर्मिती सत्य संकल्पासह व सत्याधिष्ठित केलेली आहे. आणि पुन्हा हीच बाब अशी ठासून सांगण्यात आलेली आहे - ''(आणि हे जाणून घ्या की) आम्ही आकाश आणि पृथ्वी आणि त्यांच्या दरम्यान जे काही आहे, ते सर्व खेळ म्हणून निर्माण केलेले नाही. (तर ही गंभीर उद्देश्यासहित केलेली निर्मिती आहे.) २१:१६ शेवटी ''तोच आकाश आणि पृथ्वीचा आद्यप्रवर्तक आहे.'' २:११७

सृष्टी-निर्मितीचा कालावधी पण स्पष्टपणे सांगण्यात आलेला आहे. तो असा- ''तुम्ही त्या (सामर्थ्यशाली अल्लाहला) नाकारत आहात का, ज्याने पृथ्वीला दोन दिवसात निर्माण केले. तोच समस्त विश्वाचा (मालक) व पालक आहे. आणि त्यानेच (पृथ्वी निर्माण केल्यानंतर) भूतलावर भक्कम असे पर्वत स्थापित केले आणि तिच्यामध्ये सर्व प्रकारची संपन्नता ठेवून दिली. आणि त्यावरील निर्वाह सामग्रीची आखणी केली. चार दिवसात (म्हणजे चार अवधीत) आणि सर्व गोष्टींना उचित प्रमाण घालून दिले, प्रत्येकाच्या मागणी व गरजांप्रमाणे. मग तो आकाशाकडे वळला, तेव्हा ते एका प्रकारच्या धुरासारखे होते. त्याने आकाश व पृथ्वीला सांगितले, ''अस्तित्वात या, मग तुमची इच्छा असो वा नसो.'' दोघांनी सांगितले, ''आम्ही आलो आज्ञाधारकांप्रमाणे- स्वेच्छेने.'' त्यानंतर दोन दिवसात, त्याने सात आकाश निर्माण केलेत आणि प्रत्येक आकाशाकडे त्यांच्या कार्यसंबंधाने आपला आदेश प्रकट केला. आणि आम्ही पृथ्वीसाठी सर्वात जवळ असलेल्या आकाशाला (ताऱ्यांचे) दिवे लावून सुशोभित केले. आणि त्याच्या सुरक्षिततेची व्यवस्था केली. हे सर्व काही सर्वशक्तिमान आणि सर्वज्ञ अशा (अल्लाहच्या) योजनेप्रमाणे (कार्यान्वित) झाले.'' ४१:९-१२ ''तुमचा विधाता अल्लाह आहे. (यात मुळीच शंका नाही) ज्याने सहा दिवसा (कालखंडा)त आकाश आणि पृथ्वी यांची निर्मिती केली. मग तो सिंहासनावर विराजमान झाला.'' ७:५४ ''तो अल्लाह आहे, ज्याने निर्माण केले आकाशांना आणि पृथ्वीला आणि जे काही यांच्या दरम्यान आहे त्या सर्वांना सहा अवधी (दिवसा)मध्ये. आणि मग तो समस्त विश्वाच्या सत्ता केंद्रावर (सिंहासनावर) विराजमान झाला'' ३२:४ ''त्यानेच आकाश व पृथ्वी यांचा सहा कालावधीत निर्मिती केली आणि समस्त विश्वांच्या सत्ता केंद्राचे नियंत्रण स्वतःकडे घेतले.'' ५७:४ यावरून निष्कर्ष असा निघतो की परमेश्वराने समस्त ब्रह्मांड सहा दिवसात निर्माण केले व मग सातव्या दिवशी त्याने विश्रांती घेतली. कदाचित याचे अनुसरण करण्याप्रित्यर्थ मानवाने सुद्धा आठवड्यातील सहा दिवसात कार्यमग्न राहून सातव्या दिवशी सुट्टी घेण्यास सुरू केले असावे.

सृष्टी-निर्मितीमध्ये अल्लाहने शेवटी मानवाची निर्मिती केली. त्याने मानवास क्षुल्लक मातीपासून निर्माण करून त्याला सृष्टीमध्ये सर्वोच्च स्थानावर आरूढ केले. ('अश्रफुलमखलूकात') समस्त सृष्टी त्याच्या अधीन केली. समस्त ब्रह्मांडास त्याच्या सेवेकरिता आज्ञापित केले. असा हा सर्वोच्च मानव आपल्या (दुः)कर्मगतीमुळे रसातळासपण पोहोचतो. या तथ्याचे उद्‌घाटन त्याने (ईश्वराने) पुढीलप्रमाणे केले आहे.

''तोच आहे (अल्लाह), ज्याने मातीपासून तुमची निर्मिती केली.'' ६:२ ''आम्ही मानवाला खणखणाऱ्या मातीच्या सडलेल्या चिखलापासून निर्माण केले आहे.'' १५:२६

''अल्लाहने तुमच्यापैकी (प्रत्येकाला) मातीपासून (म्हणजेच मातीतील रासायनिक घटकांपासून) निर्माण केले आहे. मग शुक्राच्या एका बिंदूपासून (मानवी वंश पुढे सुरू ठेवले). मग त्याने (स्त्री-पुरुषाच्या रूपाने) तुमच्या जोड्या बनविल्या.'' ३५:११

''(लोकांनो!) आम्ही तुम्हांस एका तुच्छ वीर्यबिंदूपासून निर्माण केलेले नाही का? मग त्यास एका सुरक्षित ठिकाणी ठेवले (म्हणजेच गर्भाशयात) एका निर्धारित मुदतीपर्यंत. अशाप्रकारे आम्ही (गर्भाच्या) वाढीचे टप्पे निश्चित केले. होय! आम्ही किती कुशल रचनाकार आहोत!'' ७७:२०-२३ ''आम्ही मानवाला मातीच्या सत्त्वापासून निर्माण केले. मग आम्ही त्यास वीर्याचा एक बिंदूच्या रूपात, एका सुरक्षित स्थळी (म्हणजेच

गर्भाशयात) ठेवले. मग आम्ही त्या वीर्याला गोठलेल्या रक्ताच्या रूपात विकसित केले. आणि पुढे आम्ही त्यास मांसाच्या गोळ्याच्या रूपात विकसित केले. पुढे आम्ही मांसाच्या त्या गोळ्यात हाडे विकसित केली आणि आम्ही त्या हाडांवर मांसाचे आवरण चढवले. मग (शेवटी) त्याला एक नवीन निर्मितीच्या रूपाने (नवजात शिशूस्वरूपात) घडवून टाकले. खरोखर, प्रशंसनीय आहे अल्लाह. सर्वोत्तम निर्मितीकार!'' २३:१२-१४ हे आहेत मानव-जन्माचे शारीरिक नैसर्गिक टप्पे. मात्र 'पवित्र कुराणा'त एके ठिकाणी असे नमूद केले आहे की मानवाची निर्मिती ईश्वराच्या दोन्ही हातांनी झालेली आहे व मानवामध्ये ईश्वराने आपला आत्मा फुंकलेला आहे. कुराणातील शब्द असे आहेत - ''(ईश्वराने) म्हटले की, 'हे इब्लीस (शैतानांचा महानेता, महानायक), मी माझ्या दोन्ही हातांनी ज्या (मानवा)स निर्माण केले त्याच्यासमोर नतमस्तक होण्यास कोणत्या (गोष्टीने) प्रतिबंध केला? काय तू फार घमेंड करत आहेस की तू मोठेपणाचा दावा करणाऱ्यांपैकी आहेस?'' ३८:७५ ''आणि (ती वेळ आठव) जेव्हा विधात्याने स्वर्गदूतांना म्हटले, ''मी सडलेल्या चिखलाच्या खणखणीत मातीपासून मानवाची निर्मिती करणार आहे आणि जेव्हा मी त्याला पूर्ण आकार देऊन, त्यात माझ्या आत्म्याची फुंकर मारेन, तेव्हा तुम्ही त्याच्यासमोर नतमस्तक व्हा. तेव्हा सर्व स्वर्गदूत (साष्टांग नमस्कार घालीत) नतमस्तक झाले. पण इब्लीसने तसे केले नाही. त्याने नतमस्तक होणाऱ्यांमध्ये सहभागी होण्यास नकार दिला.'' १५:२८-३१

देवदूतांना पण नतमस्तक होण्याएवढे महात्म्य परमेश्वराने मानवास बहाल केले. हे एक फार मोठे असे वरदान मानवासाठी होते. शिवाय समस्त ब्रह्मांड पण त्याच्या (सेवेत) अधीन केले. जसे ''त्याने आकाशात आणि पृथ्वीवर जे काही आहे, ते तुमच्या अधीन करून टाकले आहे. हे सर्व त्याच्याकडून (वरदान) आहे.'' ४५:१३ कारण मानव हा सृष्टीचा मुकुटमणी आहे, हे त्याचे द्योतक आहे. तसेच त्यास परिपूर्ण स्वरूपात घडवले गेले होते. ''त्याने जे काही निर्माण केले परिपूर्ण नमुन्यातच निर्माण केले. आणि त्याने मानवाच्या निर्मितीची सुरुवात चिखलमातीपासून केली. मग मानवाचा वंश त्याने (वीर्यरूपी) तुच्छ द्रव्याच्या सत्वाद्वारे पुढे सुरू ठेवला. मग त्याला नखशिखांत व्यवस्थित घडवले. आणि आपल्या आत्म्याची फुंकर मारली, आणि (अशाप्रकारे) हे मानवा!) त्याने तुला कान, डोळे आणि बुद्धी या गोष्टी प्रदान केल्या (म्हणजे हे गुण असलेला परिपूर्ण माणूस बनून तू तयार झालास). पण तुम्ही लोक फारच अल्प कृतज्ञता व्यक्त करता.'' ३२:७-९. सृष्टीमधील सर्वात थोर असा हा मानव आपल्या कृतघ्नतेमुळे रसातळास पोहोचतो. याचाही निर्देश परमेश्वराने केला आहे. तो असा - ''त्यानेच मानवाला (केवळ) एका वीर्याच्या थेंबापासून निर्माण केले. पण (हाच तुच्छ थेंबापासून निर्मित मानव) एकदम धडधडीत भांडखोर बनला.'' १६:४ ''मानवाला या गोष्टीची जाणीव नाही का की, आम्ही त्याला वीर्याच्या केवळ एका बिंदूपासून निर्माण केलेले आहे? मग तो (आपल्या वास्तवाला विसरून) फारच भांडखोर बनलेला आहे. आणि तो आमच्याविषयी उपमा रचून (वादविवाद करू लागला) आणि त्याला आपल्या स्वतःच्या निर्मितीचा विसर पडला.'' ३६:७७-७८ ''नाश पावो माणूस! किती कृतघ्न आहे तो! (अल्लाहने) त्यास कशापासून निर्माण केले? वीर्याच्या एका बिंदूपासून! त्यास तो निर्माण करतो आणि त्याची स्वभाववैशिष्ट्ये निश्चित करतो. आणि त्याच्यासाठी (जीवनाचा) मार्ग सुकर करतो.'' ८०:१७-२० ''वाच! आपल्या विधात्याच्या नावाने (आरंभ करून) ज्याने सर्वांना निर्माण केले. ज्याने मानवाला

गोठलेल्या (रक्तापासून) निर्माण केले. वाच! तुझ्या विधात्याच्या (नावाने) तो फार उदार आहे. ज्याने (मानवाला ज्ञानप्राप्तीसाठी) लेखणीचा उपयोग करणे शिकवले. मानवाला ते सर्व शिकवले, जे त्यास माहीत नव्हते. तरीही मनुष्य मगरूरीने वागतो. कारण तो (आत्मनिर्भर नसतानाही) स्वत:ला आत्मनिर्भर समजतो.'' ९६:१-७. बडेजाव, भांडखोर वृत्ती आणि कृतघ्नता या अपप्रवृत्तींमुळे सर्वोच्च मानव हा आपली सर्वोच्चता गमावून रसातळाला जाऊन पोहोचतो ही वस्तुस्थिती परमेश्वर या शब्दांत मांडतो - ''आम्ही मानवाला उत्तम आकार देऊन (उत्कृष्ट निर्मितीच्या रूपाने) निर्माण केलेले आहे. पण त्याच्या (अन्यायी वर्तनामुळे) त्यास (रसातळासारख्या) सर्वात खालच्या दर्जाच्या ठिकाणी फेकून दिले आहे.'' ९५:४-५ तत्पूर्वी ईश्वराने मानवास या शब्दांत सावधान पण केले होते - ''मनुष्यावर एक अशी वेळ आलेली नाही का, जो वर्णन करण्यास योग्य असा नव्हता? (म्हणजेच तो अत्यंत क्षुल्लक होता). आम्ही मानवास एका मिश्रित अशा वीर्यबिंदूने निर्माण केले आणि त्याची परीक्षा पाहण्यासाठी आम्ही त्याला ऐकणारा व पाहणारा बनवले. आम्हीच त्यास सन्मार्ग दाखवला आहे, मग त्याने कृतज्ञता दाखवावी किंवा कृतघ्न व्हावे.'' ७६:१-३

### ४) सृष्टी-प्रपंच : इस्लामी व भारतीय दृष्टिकोन - तौलनिक विवेचन[४३]

विविध धर्मग्रंथांमध्ये सृष्टीरचनेसंबंधी सविस्तर विचार मांडण्यात आले आहेत. 'कुरआन'मध्ये अल्लाहस सृष्टा म्हणून सांगण्यात आले आहे. त्याच्याच कृपेच्या परिणामस्वरूप हे विश्व अस्तित्वात आलेले आहे. त्यानेच अंधारास नष्ट करून सृष्टीस निर्माण केले आहे.'' त्यानेच मृत अवस्थेत असलेल्या जमिनीमध्ये प्राण ओतले आणि तिला जीवन प्रदान केले.'' २५:४९ ''त्याने पृथ्वीला दोन दिवसात निर्माण केले. तोच समस्त विश्वाचा (मालक) पालक आहे. आणि त्यानेच (पृथ्वी निर्माण केल्यानंतर) भूतलावर भक्कम असे पर्वत स्थापित केले. आणि त्याच्यामध्ये सर्व प्रकारची संपन्नता ठेवून दिली. आणि त्यावरील निर्वाह सामग्रीची आखणी केली, चार दिवसात (म्हणजे चार अवधीत) आणि सर्व गोष्टींना उचित प्रमाण घालून दिले, प्रत्येकाच्या मागणी व गरजेप्रमाणे. मग तो आकाशाकडे वळला, तेव्हा ते एका प्रकारच्या धुरासारखे होते. त्याने आकाश आणि पृथ्वी यांना म्हटले, 'तुम्ही दोघे या, (आमच्या नियमांचे पालन करण्यासाठी) स्वेच्छेने किंवा अनिच्छेने.' ते दोघे म्हणाले, 'आम्ही (तुझ्या नियमांचे पालन करण्यासाठी) स्वेच्छेने हजर आहोत.' त्यानंतर दोन दिवसात त्याने सात आकाश निर्माण केले आणि प्रत्येक आकाशाकडे त्यांच्या कार्यासंबंधाने आपला आदेश प्रकट केला. आणि आम्ही पृथ्वीसाठी सर्वात जवळ असलेल्या आकाशाला (ताऱ्यांचे) दिवे लावून सुशोभित केले, आणि त्याच्या सुरक्षिततेची व्यवस्था केली. हे सर्व काही सर्वशक्तिमान आणि सर्वज्ञ अशा (अल्लाहच्या) योजनेप्रमाणे (कार्यान्वित) झाले.'' ४१:९-१२ ''आकाश आणि पृथ्वी या दोहोंमध्ये त्याने सजीवांची निर्मिती पसरवून ठेवली.'' ४२:१९ ''पृथ्वीला विश्रांतीचे ठिकाण बनवले आणि आकाशाला छत्र बनवले.'' ४०:६४ ''त्याने आकाशांना आणि पृथ्वीला आणि जे काही यांच्या दरम्यान आहे, त्या सर्वांना सहा दिवसात (म्हणजेच सहा कालावधीत) निर्माण केले, मग तो राजसिंहासनावर विराजमान झाला. (समस्त सत्ता केंद्र आपल्या नियंत्रणात घेतले)'' २५:५९ ''असीम पावन याने आकाशात (प्रकाशवान) नक्षत्रांचे समूहचे समूह निर्माण केले. आणि त्यात (सूर्याच्या रूपाने) एक देदीप्यमान दिवा व (थंड) सुखद प्रकाश देणारा चंद्र ठेवून दिला आहे.'' २५:६१

उपरोक्त वर्णनावरून असे प्रतीत होते की अल्लाहने प्रथम दोन दिवसांमध्ये जमीन बनवली नंतर दोन दिवसांमध्ये त्या सर्व वस्तू एकत्रित (निर्माण) केल्या, ज्या जीवन-निर्वाहासाठी आणि सुख-समृद्धीसाठी आवश्यक होत्या. नंतर तो आकाशाकडे वळला. याची निर्मिती पृथ्वीच्या निर्मितीसोबतच झालेली होती. त्याचे हल्लीचे रूप दोन दिवसांमध्ये दिले गेले आणि सात भागांमध्ये विभक्त करून यथोचित स्वरूपामध्ये सुव्यवस्थित केले गेले. अशा प्रकारे एकूण सहा दिवसांमध्ये सृष्टीची रचना झाली. एका दुसऱ्या उल्लेखानुसार, आजचे स्वरूप प्राप्त होण्याअगोदर हे विश्व संपूर्णपणे एकच पदार्थ स्वरूपात होते. परस्पर जुळलेल्या एकाच प्रकारच्या वस्तूस अल्लाहने वेगवेगळ्या विभागात वाटले. विभाजित केले. ''पृथ्वी आणि आकाश आधी एकमेकाला घट्ट चिकटलेल्या गोळ्याप्रमाणे होते. मग आम्ही त्यांना एकमेकांपासून अलग केले.'' २१:३० ''तोच आहे (अल्लाह) ज्याने रात्र व दिवस आणि सूर्य व चंद्र निर्माण केले. प्रत्येक आपापल्या कक्षात प्रदक्षिणा घालीत आहेत.'' २१:३३ सर मुहम्मद यामीन खाँ यांनी या श्लोकांपासून एक वैज्ञानिक सत्याचे प्रतिपादन केले आहे आणि ते हे की ''सृष्टीच्या प्रारंभी मूलतत्त्व द्रव्य वा पदार्थ एका विशाल नीहारिका अथवा तारामंडळ स्वरूपात ब्रह्मांडामध्ये स्थित होते. तोच पदार्थ चक्रक्रमाने कालांतराने अनेक ग्रहांमध्ये विभक्त झाला. हे ग्रह आपापल्या मंडळामध्ये तरंगत आहेत. (सर मुहम्मद यामीन खाँ, 'गॉड, सोल अँड युनिवर्स इन सायन्स अँड इस्लाम', पृ. ५६) आर्हीनियसने पण हेच तथ्य प्रतिपादित केलेले आहे. त्यांच्या मतानुसार सजीव ब्रह्मांडीय द्रव्यांपासून बनलेले आहेत. हे ब्रह्मांडीय द्रव्य उल्कापिंडांद्वारे पृथ्वीच्या वायू मंडळामध्ये आणले गेलेत. नभोमंडळामधील नक्षत्रांच्या गतिशीलतेच्या या उल्लेखामुळे, तारे ठोस (घन) आकाशामध्ये जडले गेले आहेत आणि तो आकाश यांच्यासह परिभ्रमण करत आहे, या मताचे खंडन होते. आता प्रश्न असा उपस्थित होतो की, ज्या पदार्थामुळे या सृष्टीची रचना झालेली आहे, तो पदार्थ काय होता? या प्रश्नाच्या उत्तरादाखल असे म्हटले जाते की हा पदार्थ एक अवकाश होता. जो कालांतराने बाष्प, द्रव, घन इत्यादी रूपांमध्ये परिवर्तित झालेला आहे. या अवकाशास एके ठिकाणी धूर म्हणून सांगितले गेले आहे. आकाशाच्या रचनेप्रित्यर्थ अल्लाहने जेव्हा तिकडे आपली दृष्टी वळवली तेव्हा, ते धुरासारखे होते.'' मग तो आकाशाकडे वळला, तेव्हा ते एका प्रकारच्या धुरासारखे होते.'' ४१:११ दुसऱ्या एका ठिकाणी सृष्टी-रचनेअगोदर ईश्वराचे सिंहासन हे पाण्यावर होते असे सांगितले गेले आहे. ''(त्याने जीवनाची निर्मिती करण्याची योजना बनविण्यापूर्वी) त्याचे सिंहासन पाण्यावर होते.'' ११:७ येथे पाण्याशी तात्पर्य आहे, पदार्थाच्या त्या द्रव-अवस्थेशी, जी ब्रह्मांडास हल्लीचे रूप देण्याअगोदर होती. अशा प्रकारे समस्त विश्व हे प्रथम विशाल नीहारिका किंवा तारामंडळ होते. अल्लाहने आपल्या योजनेअंतर्गत जमीन (पृथ्वी) आणि आकाश यांची रचना केली. त्याने पृथ्वीला एका पाळण्यासारखे बनवले. तो 'पाळणा' वायूमंडळावर लटकलेला (लोंबकळलेला) आहे. तो ताशी एक हजार मैल या गतीच्या हिशोबाने आपल्या आसाभोवती फिरत आहे. पृथ्वी ताशी सहासष्ठ हजार मैल या हिशोबाने सूर्याभोवती फिरत आहे. हा भ्रमण-मार्ग एकोणीस कोटी मैलाचा आहे. एवढेच नव्हे तर ''त्याने पृथ्वीवर जीवनदायी व्यवस्था स्थापित केली (ज्यामुळे हे वास्तव्य करण्याजोगे ग्रह बनले)'' २७:६१ अशा प्रकारे त्याने पृथ्वीस मानवासाठी जीवनयापन करण्यायोग्य बनवले. याच्यासाठी पृथ्वीमध्ये अत्यंत उचित मात्रेमध्ये गुरूत्वाकर्षण शक्ती समाविष्ट केले आणि उल्कापातापासून वाचविण्यासाठी तिच्याभोवती वायूमंडळ पसरवले (म्हणजेच वायूमंडलाने तिला

घेरले आहे). ''पृथ्वीनंतर तो आकाशाच्या (निर्मिती) कडे वळला आणि सात आकाशांना आकार दिले.'' - २:२९ या सात आकाशांशी तात्पर्य आहे संभवत: पृथ्वीशिवाय शेष सृष्टीचे सप्त विभागाशी. इस्लाम धर्मानुसार अल्लाहचा एक दिवस म्हणजे माणसाचे (लौकिक) एक हजार वर्षांबरोबर आहे. ''तुझ्या विधात्याकडचा एक दिवस हा तुमच्या गणनेच्या एक हजार वर्षांच्या बरोबरचा असतो.'' २२:४७ ''तो आकाशापासून पृथ्वीपर्यंत जगाच्या मामल्यांची तजवीज करतो आणि त्या तजविजीचा अहवाल वर त्याच्या ठायी सादर होतो, एका अशा दिवसात ज्याचे प्रमाण तुमच्या (इहलौकिक) गणनेनुसार एक हजार वर्षे आहे.'' ३२:५

यावरून सिद्ध होते की अल्लाहने संपूर्ण सृष्टीची रचना सहा हजार वर्षांमध्ये केली. काही लोक सहा दिवसाचा अर्थ सहा युगे पण घेतात. ''त्याने त्याची रात्र काळोखी बनवली व त्यातून प्रकाशमान दिवस प्रकट केला.'' ७९:२९ आणि अशी व्यवस्था केली की ज्यामुळे सूर्य आणि चंद्र नियमबद्ध बनून येत जात रहावेत. त्यानंतर त्याने आकाशातून पाणी वर्षावले आणि प्रत्येक प्रकारची वनस्पती उगवली. या अनुषंगाने, पावसाचे वैज्ञानिक कारणाचे निर्देश करत (असे) सांगितले गेले आहे की आकाशामधील ढगांच्या वेगवेगळ्या तुकड्यांपासून पाऊस पडतो. ''तुम्ही हे (चिंतनपूर्वक) पाहिले नाही का? अल्लाह ढगांना हाकून नेत असतो. मग त्यांना एकत्र करतो, मग त्यांचे थरावर थर रचतो, आणि मग तुम्हाला त्यातून पाऊस पडताना दिसतो. आणि आकाशात (गोठलेल्या) ढगांचा पर्वतच एकत्रित करून तो गारांचा वर्षाव करतो.'' २४:४३ ढगांच्या परस्पर संघर्षणाच्या परिणामस्वरूप मेघांचा गडगडाट आणि विद्युल्लतेची चमक ऐकायला आणि पहायला मिळते.

''परमेश्वराने प्रत्येक सजीवाला पाण्यापासून निर्माण केले.'' २१:३० ही सृष्टी तीन प्रकारांची आहे. पोटावर चालणारे जीवधारी म्हणजेच सरिसृप यांचा पहिला प्रकार. दुसरा प्रकार म्हणजे दोन पायांवर चालणारे सजीव म्हणजेच मनुष्यप्राणी आणि तिसऱ्या प्रकारामध्ये चार पायांवर चालणारे चतुष्पाद प्राणी (जनावरे) यांचा समावेश होतो.'' अल्लाहने प्रत्येक सजीवाला पाण्यापासून निर्माण केले, त्यांच्यात काही असे आहेत, जे आपल्या पोटांवर सरपटत चालतात, आणि काही दोन पायांवर चालणारे आहेत आणि काही चार पायांवर चालणारे आहेत.'' २४:४५ ''अल्लाहने आठ नर-माद्या निर्माण केल्या आहेत, दोन जोड्या मेंढ्यांच्या आणि दोन बकऱ्यांच्या, याचप्रमाणे उंटाच्या दोन आणि बैलाच्या दोन (नर व मादी अश्या जोड्या)'' ६:१४३-४४ फक्त निर्माणच केले नाहीत तर ''ज्याने (सर्व सृष्टीला) निर्मिले व (फारच) परिपूर्ण बनवले, जो अस्तित्वात असलेल्या प्रत्येक गोष्टीचे स्वभावगुण निश्चित करतो आणि त्यानुसार त्यांना मार्गदर्शन करतो.'' ८७:२-३ म्हणजेच परमेश्वर हा प्रत्येक वस्तूसाठी रंग, रूप, गुण, शक्ती, वैशिष्ट्य आणि विकासाच्या सीमा इत्यादी निर्धारित करतो.

मानव-सृष्टीच्या संदर्भात 'कुरआन' सविस्तर विवेचन प्रस्तुत करते. या विवेचनानुसार, अल्लाहने ''मानवाला खणखणणाऱ्या मातीच्या सडलेल्या चिखलापासून म्हणजेच कुजलेल्या मातीच्या सुक्या गाऱ्यापासून निर्माण केले.'' १५:२६ येथे गाऱ्याशी तात्पर्य मातीच्या सत्त्वाशी आहे. ('इंजिल अर्थात बायबलमध्येसुद्धा मानवाची रचना मातीच्या धुळीपासून झाली असल्याचे नमूद आहे.'' पर्व २:७) 'कुरआन'च्या उपरोक्त उल्लेखामुळे डार्विनच्या विकासवादी सिद्धान्ताचे खंडन होते. ॲरिस्टॉटलच्या 'स्वत: उत्स्फूर्त सिद्धान्त' (थियरी ऑफ स्पॉंटेनियस जनरेशन)ला पण हा उल्लेख निरर्थक सिद्ध करतो. ज्या अर्थी मानवाची रचना ईश्वराने केलेली

आहे, तर मग त्याअर्थी जगत जीवनाचा आरंभ एका आकस्मिक घटनेस्वरूपात कसा बरे स्वीकारले जाऊ शकतो? याच संदर्भात, मानव-वंश परंपरेचा उल्लेख करत पुढे म्हटले गेले आहे – ''मग मानवाचा वंश त्याने (वीर्यरूपी) तुच्छ द्रवाच्या सत्त्वाद्वारे पुढे सुरू ठेवला. मग त्याने त्याची घडवणूक केली, आणि आपल्या आत्म्याची फुंकर मारली, आणि (अशा प्रकारे हे मानवा!) त्याने तुला कान, डोळे आणि बुद्धी या गोष्टी प्रदान केल्या (म्हणजे हे गुण असलेल्या परिपूर्ण माणूस बनून तू तयार झालास) ३२:८-९ येथे आत्मा फुंकणेचा अर्थ चेतना प्रदान करण्याशी आहे. मानवामध्ये जी चेतना शक्ती दिसून येते ती पदार्थांच्या भौतिक अथवा रासायनिक मिश्रण अथवा रासायनिक मिश्रण अथवा प्रक्रियेच्या परिणामस्वरूप नसून त्याचे मूळ स्रोत आहे अल्लाहची सत्ता. वास्तविक, मानवी चेतना ही अल्लाहच्या गुणांची पुसटशी प्रतिछाया आहे. उपनिषदांमध्ये पण या तथ्याचे प्रतिपादन आहे. 'यदिद किंच प्राण एजति निःश्रुतम्' जे काही आहे, ते सर्व त्याच अमर व्यापक जीवनाशी प्राणित झालेला आहे आणि होत आहे. या विधानाद्वारे इस्लाम-धर्म समर्थित मानवी चेतनेसंबंधी मान्यतेचे समर्थन आहे. दुसऱ्या एका उल्लेखानुसार, ''अल्लाहने तुमच्यापैकी (प्रत्येकाला) मातीपासून निर्माण केले आहे. मग शुक्राच्या एका बिंदूपासून (मानवी वंश पुढे सुरू ठेवले) मग त्याने (स्त्री-पुरुषाच्या रूपाने) तुमच्या जोड्या बनविल्या.'' ३५:११ येथेच, युग्मांच्या सम्मिलनामुळे विकासाची प्रक्रिया समाप्त होत नाही. खरे पाहता, जैविक विकास इथूनच सुरू होतो. या विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांचे संकेत-निर्देश करताना म्हटले गेले आहे – ''लक्षात ठेवा आम्ही तुमच्यापैकी प्रत्येकाला सुरुवातीला मातीपासून निर्माण केले. मग वीर्याच्या एका बिंदूपासून, नंतर गोठलेल्या रक्तापासून, मग गर्भातील मांसाच्या गोळ्यापासून, जो काही अंशी आकारयुक्त व काही अंशी आकार नसलेल्या अवस्थेत असतो.'' २२:५ गर्भधारणेनंतर सुरुवातीस ''जीव गोठलेल्या रक्ता-मांसाचा निराकार गोळा असतो, मग आम्ही त्या मांसाच्या (निराकार) गोळ्यातून हाडे तयार केली; नंतर आम्ही त्या हाडांवर मांस (चढवले), मग आम्ही त्यास वेगवेगळ्या रूपात घडवले.'' २३:१४ अशा प्रकारे हळूहळू त्यामध्ये मानवीय रूप आणि आकार स्पष्ट होत जातो. ''तो तुम्हाला तुमच्या मातांच्या गर्भाशयात अंधकाराच्या तीन अवस्थांदरम्यान, (एका नंतर दुसरी अशा पद्धतीने) निर्माण करीत असतो.'' ३९:६ अंधाराच्या तीन अवस्थांशी अभिप्रेत तीन पडदे आहेत – १) पोट, २) गर्भाशय आणि ३) पापुद्रा, की ज्यामध्ये शिशु गुंडाळलेला असतो. अशा प्रकारे सृष्टी-रचनेच्या मुळामध्ये परस्पर एकीकरण, संगती आणि अनुकूलतेचा भाव विद्यमान असतो. याच कारणामुळे युग्म आणि अयुग्म अलिंगबद्ध दिसून येतात. परस्पर विरोधी वस्तूंमध्ये एकरसता आणि सामंजस्य दिसून येतो. ईश्वराच्या या नियमामध्ये व्यतिक्रमाचा सर्वथा अभाव असतो. म्हणून तर म्हटले गेले आहे, ''तुम्हाला अल्लाहच्या नियमात कधीही बदल झाल्याचे आढळून येणार नाही.'' ३५:४३ याच गोष्टीस ऋग्वेदामध्ये 'अदब्धानि वरूणस्य व्रतानि' १/२४/१० ईश्वराचे नियम अटळ असतात, आणि अथर्ववेदामध्ये 'न किरस्य प्रभिनन्ति व्रतानि' १८/१/५ ईश्वराच्या नियमांना कोणी बदलू शकत नाही – असे म्हणून स्वीकारले गेले आहे.

'कुरआन'च्या 'अल-बकरा', 'अल-आराफ़', 'सॉद' इत्यादी विभिन्न अध्यायांमध्ये मानवी रचनेचा संक्षिप्त इतिहास वर्णित आहे. विस्तृत विवेचन हदीसांमध्ये अर्थात प्रेषित-वचनांमध्ये आहे.

'कुरआन'मध्ये रचनेनंतरचे विवेचन दिले गेले आहे. ज्यावेळेस परमेश्वराने आदमला पृथ्वीवर 'ख़लीफ़ा' (उत्तराधिकारी) बनवून पाठविण्याची गोष्ट देवदूतांसमोर ठेवली तेव्हा त्यांनी याचा विरोध करत असे म्हणाले, ''तू (पृथ्वीवर) अशांना वसवणार आहेस का जे अनाचार घडवतील आणि रक्तपात करतील? (हे प्रभू) आम्ही तर तुझ्या असीम महानतेने व पावित्र्याचे गुणगान करतो!' (अल्लाहने) उत्तर दिले, 'तुम्ही ते जाणत नाही, जे मी जाणतो.' आणि अल्लाहने आदमला सर्व (गोष्टींची) नावे शिकविली. आणि त्या सर्वांना दूतांसमोर उपस्थित केले आणि म्हटले, 'तुमचे म्हणणे खरे असेल, तर मला या सर्वांची नावे सांगा.' त्यांनी उत्तर दिले, 'असीम आहे तुझी कीर्ती! जे ज्ञान तू आम्हाला प्रदान केले. त्या व्यतिरिक्त आम्हाला कोणतेही ज्ञान नाही. निःसंशय तूच सर्व गोष्टींचा जाणकार आणि अस्सल बुद्धिमान आहेस. (तेव्हा) अल्लाहने सांगितले, ''हे आदम! त्यांना यांची नावे सांग.'' जेव्हा आदमने (स्वर्गदूतांना) त्यांची नावे सांगितली, तेव्हा अल्लाहने म्हटले, ''मी तुम्हाला सांगितलं नव्हतं का? की, केवळ मीच जाणतो, पृथ्वी व आकाशातील सर्व गुपिते, आणि ते सर्व (मीच) जाणतो, जे तुम्ही लपवता.'' २:३०-३३ अशा प्रकारे देवदूतांचा हा गर्व की, ईश्वराने त्यांना अग्नीपासून निर्माण केले आहे ७ :१२ म्हणून ते श्रेष्ठ आहेत, नाहीसा झाला आणि त्यांनी आदमची श्रेष्ठता स्वीकारली, इंजिल (बायबल)मध्येसुद्धा आदमच्या श्रेष्ठतेसंबंधीच्या प्रश्नाशी निगडित प्रभू आणि देवदूतांमध्ये अशाच प्रकारचा संवाद झाला.

इस्लामी जनताजनार्दनाचे हे मत 'कुरआन'मध्ये वर्णित या तथ्याचे समर्थन करते की जिच्या अंतर्गत हे स्वीकार केले गेले आहे की संपूर्ण सजीव सृष्टीची उत्पत्ती पाण्यापासून झालेली आहे. ''अल्लाहने सर्व सजीवांना पाण्यापासून निर्माण केले. २४:४५ प्रसिद्ध तत्त्वज्ञ थेल्सने पण पाण्यासच प्रत्येक वस्तूचे स्त्रोत मानले आहे. त्यांच्या मतानुसार प्रत्येक वस्तू, मग ती सजीव असो वा निर्जीव, पाण्यापासून उत्पन्न झालेली आहे. सृष्टी-उत्पत्तीच्या संदर्भात वरील विवेचनाच्या विश्लेषणावरून पुढील तथ्ये हाती लागतात -

१) सृष्टीरचने (निर्मिती)च्या अगोदर सर्वत्र अंधाराचे साम्राज्य होते. पृथ्वी निर्जीव होती.

२) सध्याच्या अवस्थेमध्ये येण्यापूर्वी विश्व संपूर्णपणे एक पदार्थ वा द्रव्य होते. काही काही ठिकाणी या द्रव्यास धूर असे म्हटले आहे.

३) सृष्टी-रचनेपाठीमागे ईश्वराची इच्छा विद्यमान आहे. त्याने पृथ्वीवर मानवास उत्तराधिकारी किंवा उप-प्रभारी ('ख़लिफ़ा') या नात्याने पाठवण्याच्या हेतूनेच मानव सृष्टी निर्माण केली.

४) समस्त सजीव पदार्थांची रचना (निर्मिती) पाण्यापासून झालेली आहे.

आता आपण वेगवेगळ्या धर्मग्रंथांमध्ये वर्णित सृष्टीसंबंधी सिद्धान्तांना दृष्टिक्षेपात ठेवून उपरोक्त तथ्यांच्या यथार्थतेसंबंधी विचार करू या.

जगामधील सर्व तत्त्ववेत्ते आणि धर्मग्रंथ या गोष्टीशी सहमत आहेत की, सृष्टीरचनेच्या अगोदर सर्वत्र अंधाराचे साम्राज्य होते. ऋग्वेदामध्ये 'तमआसीत्तमसा गूढमग्रे' १०।१२९।३ असे म्हणून आणि 'आसीदिदं तमोभूतमप्रज्ञातमलक्षणम् । अप्रतर्क्यमविज्ञेयं प्रसुप्तमिव सर्वतः' १।५ पूर्वी हे विश्व अंधकारमय - अंधाराने युक्त होते. काहीच प्रत्यक्ष माहीत नसल्याकारणाने त्या प्रलय युगामध्ये कुणीही तर्काच्या मदतीने ज्ञान आणि लक्षण स्थिर करू शकत नव्हते. सर्वत्र अज्ञान आणि शून्यावस्था होती - असे म्हणून विश्वनिर्मिती अगोदर सगळीकडे

अंधारच अंधार असण्याच्या गोष्टीवर भर दिला गेला आहे. शीख धर्म संस्थापक गुरू नानकजीनी पण या गोष्टीस स्वीकार करत म्हटले आहे, ''कित्येक अरब वर्षांपूर्वी (अगणित युगांपर्यंत) अंधारच अंधार होता. (त्या वेळेस) ना पृथ्वी होती ना आकाश. (प्रभूचा) अपार (असा) आदेश (मात्र) होता. ना दिवस होता ना रात्र, ना चंद्रच होता ना सूर्य; (प्रभू) शून्य समाधीमध्ये होता.'' नानकवाणी, मारू सोलहे, १५:१ इंजिल अर्थात बायबलमध्ये पृथ्वी ओबडधोबड (अव्यवस्थित) आणि उजाड असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यावेळेस पृथ्वीतलावर अंधार होता आणि ईश्वराचा आत्मा पाण्यावर तरंगत होता. (पर्व १/आ. १-२) असे सांगून इस्लाम धर्माच्या उपरोक्त मान्यतेचे (मताचे) समर्थन करण्यात आले आहे.

'ब्रह्मवैवर्तपुराणा'मध्ये सृष्टीरचनेचे प्रतीकात्मक वर्णन आहे. या संदर्भात असे म्हटले आहे की, कृष्णा (योग्यांच्या चित्तास आकृष्ट करणारा ब्रह्म)च्या कामा (एकोऽहं बहुस्याम् रूप संकल्प)च्या क्षोभामुळे रेतः (उत्पादनात्मक) वीर्य-पात झाले. ज्याला लाजेमुळे देवतांच्या सभे (पाण्या)मध्ये सोडले गेले. एक हजार वर्षांनंतर याच्यापासूनच 'विराट्'ची उत्पत्ती झाली. (ब्र. ख. अध्याय ४)

उपरोक्त रूपकामध्ये प्रकृतीच्या अनेक शक्ती आणि त्यांचे अधिष्ठातृ देवच रास-समाज आहे. समस्त शक्तींचा आधारभूत 'ब्रह्म' हा कृष्ण आहे. तो सर्वांच्या मधोमध उभा असल्याकारणाने सृष्टी विधानाचे केंद्र आहे. 'एकोऽहं बहुस्याम्'ची भावनाच स्खलन आहे आणि सृष्टीचे सर्गोन्मुख असण्याचे संपूर्ण कार्य-कारण-कलापच पाणी आहे. ब्रह्माच्या माध्यमाने प्रकृतीच्या प्रेरणेमुळे ज्या आरंभिक कारण-सामुग्रीचे प्रादुर्भाव झाले तिलाच 'विराट्' या नावाने ओळखले जाते. 'ब्रह्मवैवर्त पुराणा'च्या उपरोक्त कथनाचे समर्थन व पुष्टी ऋग्वेद, तैत्तिरीय, शतपथ ब्राह्मण आणि यजुर्वेदामधील खालील अवतरणांमध्ये आहे -

क) 'कामस्तदग्रे समवर्तताधिमनसोरेतः प्रथमं यदासीत ।' १०।१२९।४ अर्थात सृष्टीच्या आरंभी (एकोऽहं बहुस्याम् रूप) संकल्प होते. याच्यानंतर ज्ञानरूप ब्रह्मापासून जे मुख्य अथवा प्रथम वीर्य आहे, (ते) उत्पन्न झाले.

ख) 'तस्य रेतः परापतत्' - तैत्तिरीय १।१।३।८ अर्थात त्याचे (अनेक होण्याच्या भावनेस्वरूप) वीर्यपतन झाले.

ग) शतपथ २।१।१।५ मध्ये असे म्हटले गेले आहे की, अग्नीने पाण्याशी अशी इच्छा प्रकट केली की मी यांच्याशी मैथुन (संभोग) करावे, ती इच्छा सफल झाली. त्या पाण्यामध्ये रेतः वीर्य-उत्पादक प्रगतीचे सेवन केले, आणि तेव्हा 'ततोविराऽजायत' - यजुर्वेद ३१।५ त्याच्यापासून 'विराट्' उत्पन्न झाले. इस्लाम धर्मामध्येसुद्धा ईश्वराच्या संकल्पास सृष्टीरचनेचे कारण मानले जाते.

इस्लाम धर्मामध्ये सृष्टीक्रमासंबंधाने विवेचन उपलब्ध नाही. त्याच कारणामुळे तेथे तर्क-वितर्कास फार वाव आहे. द्रव्य अथवा पदार्थापूर्वी काय होते, त्याची उत्पत्ती कशी झाली, धूर कोठून आले इत्यादी अनेक प्रश्न मनामध्ये घोळू लागतात. यांचे समाधान होऊ शकत नाही. हिंदू धर्मग्रंथ सृष्टीक्रमाचे विशद विवेचन प्रस्तुत करतात. 'श्रीमद्भागवता'मध्ये सृष्टीच्या उत्पत्तीशी संबंधित विवरण अशा प्रकारे आहे -

'सत्त्वादि गुणांचे परिणाम, आदी आणि अंतरहित, जो निर्विशेष आहे, त्यालाच काळ असे म्हणतात. परमात्मा त्या काळासच निमित्तभूत बनवून आपल्या लीलांमुळे स्वतः आपणासच विश्वरूप स्वरूपात प्रकट करत

असतो. तत्पूर्वी हे समस्त संसार दैवी मायेमध्ये मग्न बनून ब्रह्मस्वरूपामध्येच स्थित होते. त्याच विश्वास अव्यक्त मूर्त काळाद्वारे परमेश्वराने पुन्हा वेगळे प्रकाशित केले आहे.' श्रीमद्‌भागवत, स्कंध-३, अध्याय १०, श्लोक क्रमांक ११-१३.

ऋग्वेदामध्ये पण 'असतः सद् अजायत्'च्या अनुसार नामरूप उपाधिरहित ब्रह्मामध्ये 'एकोऽहं बहुस्यां प्रजायेय'च्या भावनेस सृष्टीचे मूळ कारण मानले गेले आहे. १०।७२।३. गुरू नानकांनी पण शून्य अर्थात परमेश्वराच्या निर्गुण स्वरूपापासून सृष्टीची उत्पत्ती मानली आहे. शुन्यावस्थेशी तात्पर्य त्या स्थितीशी आहे जेव्हा जगाच्या उत्पत्तीपूर्वी सर्व शक्ती एकमात्र निर्गुण ब्रह्मामध्ये केंद्रीभूत होत्या.

त्या ब्रह्माच्या इच्छेच्या परिणामस्वरूप हे जग निर्माण झाले. 'जा तिसु भाणाता जगतु उपाइया' अर्थात जेव्हा त्या (प्रभू)ची मर्जी अर्थात इच्छा झाली, तेव्हा त्याने निमिषमात्रामध्ये (एका पळातच) जगास उत्पन्न केले. 'कुरआन' पण ईश्वराच्या इच्छेच्याच परिणामस्वरूप सृष्टीनिर्मितीस मानते. वास्तवात तो परमेश्वरच सृष्टीचा निमित्त आणि उपादानकारण आहे. यामुळेच तर, 'आपीन्है आपु साजियो आपीन्है रिचओ नाउ' (आसाकी वार). त्याने आपण स्वतःसच सृष्ट स्वरूपामध्ये व्यक्त केले आहे. या सृष्टीस सर्ग पण म्हटले गेले आहे. 'श्रीमद्‌भागवत'मध्ये सर्गची व्याख्या याप्रमाणे केली आहे – जेव्हा मूल प्रकृतिमध्ये लीन गुणांचा क्षोभ होतो, तेव्हा 'महत्तत्व' उत्पन्न होते. महत्तत्वापासून तामस, राजस, आणि सात्त्विक (वैकारिक) हे तीन अहंकार उत्पन्न होतात. या अहंकारापासून पंचतन्मात्रा, इंद्रिये आणि विषयांची उत्पत्ती होते. याच उत्पत्तीक्रमांचे नाव 'सर्ग' असे आहे. हे सर्ग तीन प्रकारचे गणले गेले आहेत प्राकृत सर्ग, प्रतिसर्ग आणि वैकृत सर्ग. 'श्रीमद्‌भागवत'मध्ये प्राकृत सर्गाचे सहा प्रकार सांगितले आहेत. यांपैकी प्रथम सर्ग 'महत्तत्व' आहे. ही ईश्वराच्या गुणांची विषमता मात्र आहे. दुसरा सर्ग 'अहंकार' आहे. यामध्ये द्रव्य, ज्ञान आणि क्रिया यांचा उदय होतो. तिसरा सर्ग 'भूतसूक्ष्म' आहे. हा महाभूतांचा उत्पादक आहे. चौथा ज्ञान आणि कर्मसाधक इंद्रियांचा सर्ग आहे. पाचवा इंद्रियाधिष्ठाता देवगणांचा आणि मनाचा सर्ग आहे, आणि सहावा 'तमः'चा सर्ग आहे. हे अविद्येचे सर्ग आहे. अविद्या पाच प्रकारची असते. ती आवरण विक्षेप स्वरूपात पुरुषांच्या बुद्धीस मुग्ध करते. (श्रीमद्‌भागवत, ३।१०।१४). याच महत्तत्व आणि अहंकार इत्यादीपासून चराचर प्राण्यांची उत्पत्ती होते. ही उत्पत्ती अशा प्रकारची असते की ज्याप्रमाणे एका बी पासून दुसरे बी उत्पन्न होते. ईश्वराच्या प्रेरणेमुळे पूर्वजन्माच्या वासना जागृत होतात. परिणामी जीव आपापले नाम आणि रूप ग्रहण करून घेतात. त्याच उत्पन्न झालेल्या सृष्टीचे नाव 'विसर्ग' अथवा 'प्रतिसर्ग' असे आहे. (श्रीमद्‌भागवत १२।७।१२). स्थावर, तिर्यग् आणि मानव-सृष्टीस वैकृतसृष्टी असे मानले गेले आहे. स्थावर सृष्टीच्या सहा श्रेणी किंवा कोटी आहेत – (१) वनस्पती, (२) औषधी, (३) लता, (४) त्वक्सार (बांबू, ऊस इत्यादी. यांची साल अत्यंत दारूण असते.) (५) विरुध (यांच्या वेली फक्त जमिनीवरच पसरतात, वर चढत नाहीत. जसे टरबूज, खरबूज, भुईमूग इत्यादी) आणि (६) द्रुम (यांना प्रथम फुले येतात. नंतर फुले फळांचे रूप घेतात. जसे जांभूळ, डाळींब इत्यादी) तिर्यग अर्थात पशू-पक्षांची सृष्टी अठ्ठावीस प्रकारची मानली गेली आहे. यामध्ये एका खुराचे, दोन खुरांचे, पाच नखधारी पशूंसोबतच बगळा, गिधाड, ससाणा, कबूतर, हंस, मोर, सारस, कावळा, चकोर, घुबड इत्यादी आकाशामध्ये उडणाऱ्या पक्ष्यांची गणना होते. मानवाची सृष्टी स्त्री-पुरुषात्मक आहे. या संपूर्ण वैकृत सृष्टीस

उद्‌भिज्ज, पश्वादिक आणि मनुष्य – या तीन श्रेणींमध्ये पण ठेवले जाऊ शकते. ‘श्री सूर्य्य गीता’मध्ये पण सृष्टी तीन प्रकारची दाखविण्यात आली आहे (१) आधिभौतिकी, (२) आधिदैविकी, (३) आध्यात्मिकी – सूर्य्यगीता ५।५–६

यापैकी आधिभौतिकी सृष्टी पिंड-संबंधी, आधिदैविकी ब्रह्मांडसंबंधी आणि आध्यात्मिकी विराटसंबंधी आहे. विराटसंबंधी असल्याकारणाने आध्यात्मिकी सृष्टी अनादी आणि अनंत आहे. स्पष्टतेच्या दृष्टीने ‘श्रीसूर्य्य गीता’चे सृष्टीक्रम संबंधी विवरण प्रशंसनीय आहे. या दृष्टीने (एतदर्थ) द्रष्टव्यपण – ‘‘पश्चात् सृष्टीच्या वेळेस पुरुषद्वारा अधिष्ठित गुणसाम्यामुळे गुणव्यंजन अर्थात महत्तत्व त्रिविध आहे. – सात्त्विकी, राजसिकी आणि तामसिकी. बी ज्याप्रमाणे आवरणा (त्वचा)द्वारे आवृत्त असते, त्याचप्रमाणे पूर्वोक्त गुण–साम्य (प्रधानतत्त्व)ने महत्तत्व आवृत्त केले. अर्थात प्रधानतत्त्व महत्तत्वामध्ये व्यापक होऊन स्थित झाले. महत्तत्वापासून वैकारिक अर्थात सात्त्विक, तैजस (राजस) आणि तामस (भूतादी) या त्रिविध अहंकाराची उत्पत्ती झाली. अहंकार त्रिगुणात्मक आहे, म्हणून तो पंचभूत आणि इंद्रिये यांच्या उत्पत्तीचे कारण आहे. ज्याप्रमाणे प्रधान तत्त्वाने महत्तत्व आवृत्त आहे, त्याचप्रमाणे महत्तत्वाने अहंकार तत्त्व पण आवृत्त आहे. तामस अहंकार तत्त्वाने क्षुभित अर्थात कार्योन्मुख होऊन शब्दतन्मात्रा आणि शब्दतन्मात्रापासून शब्दगुणविशिष्ट आकाशाची सृष्टी (उत्पन्न) केली आणि दोघांना आवृत्त करून घेतले. तदनंतर वायूच्या क्षुभित होण्याच्या परिणामस्वरूप रूपमात्र आणि ज्योती उत्पन्न झाली. ज्योती वायूने आवृत्त झाली. ज्योतीच्या क्षुभित होण्याच्या परिणामस्वरूप रसतन्मात्रा उत्पन्न झाली. त्यामुळे रसगुणविशिष्ट आप (पाणी)चा जन्म झाला. ते ज्योतीने आवृत्त झाले. आपने क्षुभित होऊन गंधतन्मात्राची सृष्टी केली. त्यामुळे पृथ्वीची उत्पत्ती झाली. तिचे गुण गंध आहे. ‘वेदांत’ पण याच क्रमाचा स्वीकार करते.

उपरोक्त विवेचनावरून हे माहीत होते की, ‘अहंकार’च सृष्टीच्या उत्पत्तीचे मुख्य कारण आहे. गुरू नानक यांनी अहंकारास ‘हउमै’ असे म्हटले आहे. ‘हउमै विची जगु उपजै’ (सिधगोसटि, पउडी – ६८). या ‘हउमै’ची उत्पत्ती ‘हुकम’ अर्थात प्रभूची इच्छा पासून झालेली आहे. ‘योगवासिष्ठ’च्या अनुसार पण हाच अहंकार सूक्ष्म आणि स्थूल सृष्टीचा कारण आहे. उपनिषदांमध्ये पण प्रकारांतरे सृष्टी–क्रमाचे अशाच प्रकारचे वर्णन आलेले आहे. ‘प्रश्नोपनिषद’मध्ये या क्रमाचा अशा प्रकारे निर्देश आहे ‘‘त्या पुरुषाने प्राणाची निर्मिती केली. मग प्राणापासून श्रद्धा, आकाश, वायू, तेज, आप, पृथ्वी, इंद्रिय, मन आणि अन्नास निर्माण केले आणि अन्नापासून वीर्य, तप, मंत्र, कर्म आणि लोकांची सृष्टी केली आणि लोकांमध्ये नामास उत्पन्न केले.’’ प्रश्नोपनिषद ६।४. ‘सामवेद’च्या निम्नलिखित मंत्रास सृष्टीरचनेशी संबंधित वरील विवेचनाच्या सारांश स्वरूपात स्वीकारले जाऊ शकते –

‘‘*जज्ञानः सप्त मातृभिर्मेधामाशासत श्रिये ।*
*अयध्रुणो रयीणां चिकेतदा ॥*’’

– सामवेद – प्रथम प्रपाठक, नवम् खण्ड, मंत्र क्रमांक ५

अर्थात हा नित्य, कधीही विचलित न होणारा, सात माता म्हणजेच सृष्टीचे निर्माते पाच भूते, महत्, अहंकार यांच्या साहाय्याने सृष्टीस प्रकट करत आपली विभूतिरूप शोभा अथवा आश्रयासाठी उत्तम धारणाशक्तीने वश

करतो. तोच परमेश्वर समस्त ऐश्वर्यास चांगल्या प्रकारे जाणतो. या सृष्टी प्रक्रियेस पूर्ण होण्यासाठी लाखो वर्षे लागली. 'देवीभागवता'नुसार, ती माया शेकडो मन्वंतरांपर्यंत ब्रह्मतेजाच्या साहाय्याने जाज्ज्वल्यमान राहिली. तदनंतर तिच्यापासून समस्त विश्वास आधारभूत असे, सोन्यासारखे चमकणारे डिंभ (शिशु) जन्मले. याच गोष्टीस 'श्रीमद्‌भागवता'मध्ये या स्वरूपात मांडले गेले आहे –

'वर्षे पूगसहस्त्रान्ते तदण्डमुदकेशयम्' २।५।३४

अर्थात कित्येक हजारो वर्षेपर्यंत ते ब्रह्माण्डलोकरूपी अंडे पाण्यामध्ये झोपत राहिले. तदुपरांत विराट पुरुष त्या अंड्याला भेदून (छेदून, फोडून) प्रकट झाला. त्याचे हे प्रकटीकरणच सृष्टीची उत्पत्ती आहे. 'कुरआन'मध्ये निर्दिष्ट सहा दिवसांमध्ये सृष्टीची निर्मितीचा अर्थ सहा युगे असाच घेतला पाहिजे. तरच उपरोक्त विवरणाशी त्याचे सामंजस्य प्रस्थापित होऊ शकेल.

'ऐतरेयोपनिषदा'मध्ये पुरुषाच्या रचनेचे सुंदर वर्णन आहे. या वर्णनानुसार, 'आत्म्या'ने लोकांची निर्मिती केल्यानंतर, लोकपालांची निर्मिती करण्याच्या उद्देशाने पाण्यापासूनच एका पुरुषास प्रकट केले. 'ऐतरेयोपनिषदा'चे हे कथन 'कुरुआन'चे 'सजीवांची पाण्यापासून उत्पत्ती' या सिद्धान्ताचे समर्थन करते. त्या पुरुषास सावयव (अवयवयुक्त) केल्यानंतर त्याने इंद्रियगोलक तथा इंद्रियाधिष्ठाता देवतांची उत्पत्ती केली. त्या विराट पुरुषाच्या उद्देश्यासाठी ईश्वराने संकल्प केले. त्या संकल्पित पिंडापासून अंड्यासारखे तोंड उत्पन्न केले. मुखा (तोंडा)पासून वाक् आणि वागींद्रियापासून अग्नी उत्पन्न झाला. नंतर नासिकारंध्र प्रकट झाले. नासिका रंध्रापासून प्राण उत्पन्न झाले आणि प्राणापासून वायू. अशाच प्रकारे नेत्र प्रकट झाले आणि नेत्रांपासून चक्षू-इंद्रिय आणि चक्षुपासून आदित्य उत्पन्न झाले. मग कान उत्पन्न झाले, आणि कानांपासून श्रोत्रेंद्रिय आणि श्रोत्रपासून दिशा प्रकट झाल्या. तदनंतर त्वचा प्रकट झाली आणि त्वचापासून लोम आणि लोमापासून औषधी आणि वनस्पती उत्पन्न झाल्या. याचप्रमाणे हृदय उत्पन्न झाले आणि हृदयापासून मन आणि मनापासून चंद्र प्रकटला. नंतर नाभि उत्पन्न झाली आणि नाभिपासून अपान आणि अपानपासून मृत्यूची अभिव्यक्ती झाली. तदनंतर शिश्न (तसेच योनि) प्रकट झाले आणि शिश्नापासून रेतस् आणि रेतस्‌पासून आप (पाणी) झाले. इंद्रियाधिष्ठाता देवतांकडून अन्न आणि आयतनाची याचना करण्यात आल्यावर तो त्यांच्यासाठी पुरुष घेऊन आला. मनुष्य-शरीरास पाहून ते देवता प्रसन्न झाले. 'पुरुषो नाव सुकृतम्' म्हणून अधिष्ठानाची प्रशंसा पण केली. तेव्हा ईश्वराने त्यांना म्हटले – 'यथायतनं प्रविश' – आपापल्या आयतनांमध्ये प्रवेश करून घ्या. परिणामी अग्नीने वागिंद्रिय बनून मुखामध्ये प्रवेश केला, वायूने प्राण बनून नासिका-रंध्रामध्ये, सूर्याने चक्षूइंद्रिय बनून नेत्रांमध्ये, दिशांनी श्रवणेंद्रिय बनून कानांमध्ये, औषधी आणि वनस्पतींनी लोम बनून त्वचेमध्ये, चंद्राने मन बनून हृदयामध्ये, मृत्यूने अपान बनून नाभिमध्ये आणि आप (पाण्या)ने वीर्य बनून शिश्नामध्ये प्रवेश केले. अशा प्रकारे पिंडाची तर निर्मिती झाली, परंतु प्राणप्रतिष्ठा अद्याप बाकी होती. म्हणून परमेश्वराने मूर्द्धद्वारामधून शरीरामध्ये प्रवेश केला. 'स एतमेवा सीमान विदार्येतया द्वारा प्रापद्यत' – ऐतरेयोपनिषद १।३।१२ तो त्या सीमेसच (मुर्द्धा) विदीर्ण करून याच्याद्वारे शरीरामध्ये प्रवेश करता झाला. 'कुरआन'मध्ये तर इथपर्यंत म्हटले गेले आहे की ''त्याच्यात आपला आत्मा ('रूह') फुंकला.'' ३२:९. ईश्वराच्या आत्म्यामध्ये कुठल्याच प्रकारच्या विकाराचे प्रश्नच उपस्थित होत नाही. ईसाई (ख्रिश्चन) मतप्रणालीपण 'आदम'ची श्रेष्ठता स्वीकार करते. इंजिल (बायबल)मध्ये, पुरुषरचनेशी

संबंधित उल्लेख अशा प्रकारे आहे तेव्हा ईश्वराने म्हटले की आदमला आपल्या स्वरूपात, आपल्यासारखे बनवावे. तेव्हा ईश्वराने आदमला आपल्या स्वरूपात उत्पन्न केले. जमिनीच्या माती (धुळी)पासून आदमला घडवले. त्याच्या नाकपुड्यांत जीवनाचा श्वास फुंकला, आणि आदम सजीव प्राण बनला... त्याने त्यास ईश्वर स्वरूपात उत्पन्न केले. त्यांना स्त्री-पुरुष बनवले. आणि परमेश्वराने आदमला घोर निद्रेमध्ये टाकले आणि तो झोपला, तेव्हा त्याच्या बरगड्यांमधून एक बरगडी काढली आणि त्यावर मांसाचे आवरण चढविले आणि परमेश्वराने आदमच्या त्या बरगडीपासून एक स्त्री बनवली आणि तिला आदमजवळ आणले. (२:७-८ व २१।२२) अशा प्रकारे नर-नारीच्या संयोगापासून सृष्टीचा विकास झाला.

अशाप्रकारे आपण पाहतो की इस्लाम-धर्मामध्ये सृष्टीचे विस्तृत विवेचन आहे. हे विवरण प्रकीर्ण आहे. त्यामुळेच तर, क्रमबद्धतेचा अभाव आहे. 'कुरआन'मध्ये सृष्टीची व्याख्या तर आहे, परंतु क्रमाचा निर्देश नाही. हिंदू धर्मग्रंथांमध्ये हा निर्देश फारच वैज्ञानिक, बुद्धिसम्मत आणि ग्राह्य आहे. इंजिल (बायबल)चा सृष्टीसंबंधी उल्लेख इस्लाम धर्माच्या एतद्‌विषयक मान्यतांशी फारच जवळ आहे.

हिब्रू लोकांची किंवा प्रेषित मूसाप्रणीत विश्वोत्पत्ति-कल्पना 'जुना करार' ('ओल्ड टेस्टॅमेंट')मध्ये आढळून येते. त्यांत सांगितले आहे की, ''प्रथमारंभी सर्वत्र अंधकार व पोकळी होती. नंतर प्रभूने इच्छा व्यक्त केली की, 'प्रकाश निर्माण होवो' व लगेच प्रकाश प्रकट झाला. याप्रमाणे दिवस व रात्र, प्रकाश व अंधकार यांतील विरोध स्पष्ट झाला. नंतर विश्वाची भूमि व जल अशी विभागणी केली गेली, व नंतर सूर्य व चंद्र निर्माण करण्यात आले. नंतर विविध सजीव प्राणी अस्तित्वात आणले गेले व सर्वांत शेवटी मानवाची उत्पत्ती केली गेली.''

१०

प्रकरण – १०

# विश्वोत्पत्तीविषयक वैज्ञानिक सिद्धान्त, व तद्विषयक इस्लामी दृष्टिकोनाची वैज्ञानिकता

## १) विश्वोत्पत्तीविषयक वैज्ञानिक सिद्धान्त[४४]

**विश्वाचा जन्म :** विश्व हा शब्दच एक स्पष्ट दिसणारी बहुव्यापक व्यवस्था दर्शवतो. ''ही व्यवस्था कार्ये, तथ्ये, सिद्धान्त आणि वर्गीकृत नियमांच्या एका संचाशी निगडित असते. विविध वस्तुंना एका साखळीत गुंफण्यासाठी, एक तर्कबद्ध योजनेचे निर्देश करणारा, एक नियमित आणि सुव्यवस्थित स्वरूपाचा असा हा संच असतो.'' (ब्रिटानिका विश्वकोश)

ग्रीक तत्त्ववेत्त्यांच्या दृष्टीने विश्व हे एक सतत संवर्धनशील असून ते एकाच वेळी नवीन स्वरूपात विकास पावणारे असे आहे. तत्त्वज्ञ सेंट टॉमस अक्वायनसच्या मते विश्वामध्ये सुव्यवस्था प्रस्थापित करणारा, प्रमुख विवेक–बुद्धिधारक, तार्किक अकारण कारण असणारा ईश्वर हा विश्व निर्माण करणारा निर्माता, तिची धारणा करणारा धाता, तिला पूर्ततेकडे नेणारा प्रभू आहे. अनुभवातीत असूनसुद्धा तो प्रत्येक प्राणीमात्राचा संनिध असतो. व्हॉन हंबोल्ट यांच्या शब्दात रूप, आकार आणि घटना यांच्या नियत कालिक ठराविक वेळी घडून येणाऱ्या प्रागतिक विकासाने प्रकृती बनली आहे. प्राचीन तत्त्ववेत्ता हेरॅक्लिट्सचे असे मत होते की 'सर्व काही सातत्याने बदलत असते.' हे मानव जातीला ज्ञात झालेले एक अत्यंत मूलगामी आध्यात्मिक सत्य होय. विश्वात अखंड परिवर्तन नांदते. येथले परिवर्तन म्हणजे निव्वळ गोंधळ नसून, त्यात सुयोग्य प्रमाणबद्धता असते. उदाहरणार्थ, दिवस व रात्र, तसेच वर्षाचे ऋतू हे नियमित क्रमानुसार अवतीर्ण होतात. तप्त वस्तू थंडावतात, आर्द्र वस्तू वाळतात. खगोलामध्ये सुसूत्रता दिसून येते इत्यादी. सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ आइनस्टाईनने असे घोषित केले की, माझा परमेश्वरावर विश्वास आहे. तो ब्रह्मांडाच्या नियमबद्ध सुसंगततेमध्ये स्वतःस प्रकट करतो. ते पुढे म्हणतात, विश्व ही एक आकस्मिक वस्तू नसून, ती एक सुव्यवस्थित बहुव्यापक वस्तू आहे. अशी दृढ धारणा वैज्ञानिक कार्याचा मूळ आधार असते.

१) ''श्रद्धाहीनांनी हे पाहिले नाही काय की आकाश व पृथ्वी पूर्वी एकमेकाला चिकटलेला एक गोळा होता, आणि आम्ही त्यांना दुभंगून वेगळे केले, आणि प्रत्येक सजीवाला आम्ही पाण्यापासून निर्माण केले. (या सर्व अर्थपूर्ण खुणा आपल्या डोळ्यांनी पाहूनदेखील) ते श्रद्धा धारण करणार नाहीत का?'' २१:३० आधुनिक विज्ञान ज्या गोष्टीला 'महाविस्फोट' (Big Bang) म्हणतो, आणि 'महाविस्फोटा'द्वारेच विश्वाची निर्मिती झाली, त्याच गोष्टीचे इथे वर्णन आहे.

२) ''मग अल्लाह आकाशाकडे वळला, तेव्हा ते एक प्रकारच्या धुरासारखे होते. त्याने आकाश आणि पृथ्वी यांना महटले, 'तुम्ही दोघे या, (आमच्या नियमांचे पालन करण्यासाठी) स्वेच्छेने किंवा अनिच्छेने.' ते दोघे म्हणाले, 'आम्ही (तुझ्या नियमांचे पालन करण्यासाठी) स्वेच्छेने हजर आहोत'.'' ४१:११

३) ''(लोकांनो!) तुम्हाला निर्माण करणे अधिक कठीण आहे की, त्या आकाशाला निर्माण करणे, ज्याला अल्लाहने निर्माण केले आहे. त्याचे (विशाल घुमट) उंच स्थापित केले, आणि त्यास दोषरहित (परिपूर्ण) बनवले, आणि त्याने रात्र काळोखी बनवली व त्यातून प्रकाशमान दिवस प्रकट केला, आणि त्यानंतर पृथ्वीला विस्तीर्ण केले, आणि तिच्यातून पाणी व चारा निर्माण केला, आणि पर्वतांना तिच्यावर भक्कमपणे स्थापित केले. हे सर्व तुमच्या आणि तुमच्या गुराढोरांसाठी उपजीविकेचे साधन आहे.'' ७९: २६-३३

उपरोक्त प्रथम उदाहरण हे प्रस्थापित करते की अज्ञात अशा अतिप्राचीन काळी पृथ्वी आणि आकाश हे दोन्ही संयुक्तरित्या एक घटक होते, आणि जेव्हा अल्लाहने आदमला निर्माण करून त्याला आपला प्रतिनिधी म्हणून पाठवण्याचे इच्छिले, तेव्हा त्याने धुरापासून विश्व निर्माण केले, आणि मग त्याने पृथ्वी, आकाश व इतर सर्व रम्यता निर्माण केली. शेवटचे उदाहरण तर सुस्पष्टच आहे. की अल्लाहने रात्र, दिवस, पाणी आणि वारा, पर्वत, कुरणे आणि गुरे-ढोरे या स्वरूपात मानवासाठी सर्व भौतिक सुख-साधने निर्माण केली. हे सर्व मानवाच्या निर्वाहासाठी आणि त्याच्या सुखसोईसाठी आहेत. हे सर्व अल्लाच्या 'भव' या इच्छेच्या फलस्वरूप निमिषमात्रात निर्माण झाले. आधुनिक वैज्ञानिक साधन घटक हे यास अनुरूप व योग्य असेच आहेत, आणि ते पवित्र कुराणामध्ये ईश्वरोक्त ठाम प्रतिपादनाच्या विरोधात मुळीच नाहीत.

**किती सुंदर आपले विश्व !**

हे विशाल विश्व नाना प्रकारच्या सुंदर दृश्यांनी नटलेले आहे. जसे, सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या सभोवतालचे मंत्रमुग्ध करणारा एखादा देखावा, उमलणाऱ्या फुलांचा सुगंध, नानाविध पक्ष्यांचे मंजुळ स्वर, अकस्मात दाटून येणारे काळेकुट्ट मेघ (ढग) व त्यांचा मुसळधार वर्षाव, सकाळचे - उषःकालचे शीतल वारे, बर्फाच्छादित शुभ्र हिमशिखरे, खोल खोल दऱ्या, पर्वतरांगांमधून वाहणारे निर्झर, नद्यांचा निरंतर वाहणारा जलप्रवाह, नयनरम्य इंद्रधनुष्य, पावसाच्या सरी, अंतराळाची भव्यता, आकाशांची विशालता, लुकलुकणारे असंख्य तारे, चंद्र-चांदण्यांची शीतलता, सूर्यप्रकाशाची उबदारता, सुंदर वसुंधरा, अथांग सागर, तारामंडळातील तिच्या भगिनी-ग्रह, नित्य परिवर्तनशील ऋतुचक्र, रात्रीचे वैभव, दिवसाचा स्वच्छ प्रकाश, हे सर्व मानवाच्या दैनंदिन जीवनातील अत्यंत मोहक व आश्चर्यकारक असे निसर्गामधील साथी आहेत. हे सर्व निसर्गाचे आणि विश्वाचे वैभव आहेत. परमेश्वराची निर्मिती - किती सुंदर आहे बरे ही वसुंधरा !

ऊन, पाऊस (पाणी), वादळ (वारे), हिमनग, समुद्राच्या लाटा यांच्यात अफाट शक्ती असते. या शक्ती पृथ्वीच्या पृष्ठभागाला सतत कुरतडतात, धारदार करतात आणि चमकदारही करतात. परिणामी पृथ्वीतलावर सतत परिवर्तन होत असते. हा बदल हिरव्यागार डोंगर रांगा, सपाट जमीन, विस्तीर्ण वाळवंट, रुंद दऱ्या, खोल घळ्या, अरुंद खिंडी, वाळूचे डोंगर, गोलाकार टेकड्या, उंच पर्वत व धारदार सुळके या स्वरूपात दिसतो.

खरोखर नैसर्गिक सौंदर्याची ही विविध रूपे हे सर्व सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे विविध स्वरूपात विश्वामधील अभिव्यक्त गुण आहेत. चिंतन-मनन करणाऱ्या मानवासाठी आकर्षित करणारे असे हे नानाविध सौंदर्याने

नटलेले विश्व आहे. किती बरे उपकार आहेत, त्या सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे मानवावर की ज्याने त्याला पृथ्वीतलावर आपला प्रतिनिधी म्हणून पाठविले व ब्रह्मांडातील समस्त वस्तू त्याच्या सेवेप्रित्यर्थ त्याच्या अधीन केल्या.

**रात्रीचा कुराणोक्त गौरव पहा –**

''आम्ही पृथ्वीच्या जवळच्या आकाशाला सुंदर नक्षत्रांनी सजवले आहे.'' ३७:६ किंवा ''आम्ही अनंत आकाशाला नक्षत्रांच्या शृंगाराने सुशोभित केले आहे.'' ३७:६ ''आम्ही तुम्हास जवळ असलेल्या आकाशाला वैभवशाली दिव्यांनी सुशोभित केले.'' ६७:५ ''असीम पावन आहे तो, ज्याने आकाशात समूहचे समूह (पुंज) निर्माण केले, आणि त्यात (सूर्याच्या रूपाने) एक देदीप्यमान दिवा व (शीतल) प्रकाश देणारा चंद्र ठेवून दिला आहे.'' २५:६१. ''तोच (परम समर्थ) होय की, ज्याने रात्र व दिवस आणि सूर्य व चंद्रही निर्माण केले, की (आकाशमंडळातील) सर्व (ग्रह आपापल्या) कक्षेत तरंगत राहतात.'' २१:३३

**विश्वोत्पत्तीचे वैज्ञानिक सिद्धान्त**

विश्वोत्पत्तीचे वैज्ञानिक सिद्धान्त हे आपापल्या परीने विश्वनिर्मितीचे कोडे उलगडण्याचा प्रयत्न करतात. विश्वनिर्मिती व त्याच्या प्रसारणाविषयीचे कोडे मानवाला अनादीकालापासून असून, त्या त्या शतकात शास्त्रज्ञ व तत्त्ववेत्त्यांनी त्याविषयी भाकितेही केली आहेत. विसाव्या शतकाआधी कोणाही शास्त्रज्ञाला विश्वप्रसारणाविषयी कल्पना नव्हती. विश्वाचे आकारमान स्थिर आहे, असेच सारे समजत होते. मात्र विसाव्या शतकाच्या प्रारंभी विश्व चौदा-पंधरा अब्ज वर्षांपूर्वी अस्तित्वात आल्याचे समजताच, त्याचा उलगडा शास्त्रज्ञ वेगवेगळ्या पद्धतीने करू लागले. त्यातूनच सिद्धान्तांची पायाभरणी झाली.

**१) स्थिर अवस्था सिद्धान्त (Steady State Theory) :**

फ्रेड हॉयल, हर्मन बंडी आणि टॉमस गोल्ड या त्रयींनी विश्वाचे स्थिर अवस्था सिद्धान्त प्रस्थापित केले. त्यांनी असे प्रतिपादन केले की अंतराळामध्ये विश्वाचा एक अनंत विस्तार आहे, अथवा काळामध्ये त्याला अमर्याद भविष्य आहे. म्हणून विश्वाला ना आदी आहे ना अंत.

**२) उत्क्रांती सिद्धान्त (Evolutionary Theory Or Alpha, Beta and Gamma Theory) :**

स्थिर अवस्था सिद्धान्ताच्या विरोधात अल्फा, बेटा आणि गॅमो या त्रयींनी इ. स. १९५३ मध्ये विश्वाचे 'अबक' सिद्धान्त अर्थात 'अल्फा', 'बिटा' आणि 'गॅमा' विश्वसिद्धान्त विचारार्थ पुढे मांडले. या 'अबक' सिद्धान्तानुसार हे विश्व सर्वप्रथम विद्युत् सूक्ष्म कण आणि विद्युत् परमाणूंचे एक एकसारखे वितरण होते. नंतर ते हळूहळू एक वायुरूप अस्सल विश्वघटनाशास्त्र बनले. याविषयी पवित्र कुराण असे म्हणते –

''नंतर त्या (परमेश्वरा)ने आकाशाच्या (रचने)कडे लक्ष लावले व ते (त्या वेळपर्यंत) धुकेसे (वायुरूप) होते. तेव्हा त्या (धुक्या)स व पृथ्वीस त्याने आज्ञा केली की, तुम्ही उभयता (अस्तित्वात) या. स्वखुषीने (याल तरी) अगर बळजबरीने (याल तरी, आम्ही जी आज्ञा देतो ती पाळा). उभयतांनीही विनंती केली की, आम्ही स्वखुषीने (आज्ञापालनासाठी) हजर आहोत.'' ४१:११

''सत्य नाकारणाऱ्या लोकांना या गोष्टीची जाणीव नाही का की, आकाश आणि पृथ्वी आधी एकमेकाला चिकटलेल्या घट्ट गोळ्याप्रमाणे होते. मग आम्ही त्यांना एकमेकांपासून अलग केले, आणि प्रत्येक सजीवाला आम्ही पाण्यापासून निर्माण केले. (या सर्व अर्थपूर्ण खुणा आपल्या डोळ्यांनी पाहून देखील) हे श्रद्धा धारण करणार नाहीत का?'' २१:३०

या सिद्धान्ताचे आद्य प्रवर्तक असा विचार मांडतात की आंतरपरिवर्तनाच्या प्रभावामुळे जडतत्त्व हे एका अकल्पनीय अशा स्फोटामुळे दुभंगले आणि परिणामी विश्वाची उत्पत्ती झाली. तद्वत, अनंत भविष्यामध्ये एक वेळ निश्चितपणे असा येणार आहे की, नैसर्गिक शक्तींच्या बळाने प्रतिक्षेप किंवा विकर्षण सुरू होऊन समस्त विश्व पुन्हा आकुंचित होऊन एक वैश्विक अंडे होऊन जाईल. या तथ्याचे वर्णन पवित्र कुराण असे करते की विश्वाचे आकुंचित स्वरूप प्रस्थापित करून प्रलय दिवस आल्याचे जाहीर केले जाईल. या संबंधी पुढील श्लोक उधृत करता येतील –

''मानवा आपल्या पालनकर्त्याची जाण ठेवून (जीवन व्यतीत कर). कारण वस्तुस्थिती अशी आहे की पुनरुत्थानाचा हादरा महाभयंकर गोष्ट आहे.'' २२:१

''जेव्हा सूर्य गुंडाळून टाकला जाईल, आणि जेव्हा तारे निस्तेज होतील, आणि जेव्हा पर्वतांना चालविले जाईल.'' ८१:१-३

''त्या दिवसाची (आठवण कर) ज्या दिवशी एखादा लेखनिक (आपल्या) लिहिलेल्या कागदांची ज्याप्रमाणे गुंडाळी करतो, त्याप्रमाणे या आकाशांना आम्ही गुंडाळून टाकू. ज्याप्रमाणे पहिल्या निर्मितीची आम्ही सुरुवात केली होती, त्याचप्रमाणे आम्ही त्याची पुनरावृत्ती करू आमच्यावर (बंधनकारक) असलेले हे एक वचन आहे आणि त्या वचनाची पूर्तता आम्ही करणारच.'' २१:१०४.

''(जेव्हा ती भयंकर आपत्ती अर्थात प्रलय येईल) तेव्हा संपूर्ण मानवजात (पुनरुत्थानाच्या मैदानात) दाणादाण होऊन पडलेल्या पतंगासारखे (पडलेली) असेल, आणि पर्वत पिंजरलेल्या रंगीत लोकरीप्रमाणे (उडत उडत फिरत) असतील.'' १०१:४-५.

आणि अशा प्रकारे प्रसरण-आकुंचनाचे चक्र सतत नित्य चालू राहील. जवळ जवळ सर्व वैज्ञानिक, खगोल भौतिक शास्त्रज्ञ आणि खगोल शास्त्रवेत्त्यांनी या सिद्धान्ताला सर्वांत जास्त समर्पक सिद्धान्त म्हणून मान्यता दिली आहे.

### ३) महाविस्फोट सिद्धान्त (Big-Bang Theory) :

हे विश्व चौदा अब्ज वर्षांपूर्वी एका बिंदूत किंवा शून्यात सीमित होते, त्यात प्रचंड ऊर्जा होती. कालांतराने त्याचा स्फोट होऊन या अवाढव्य विश्वाची निर्मिती झाल्याचे 'बिग बँग' म्हणजेच महाविस्फोट सिद्धान्त सांगतो. ज्यावेळी हा स्फोट झाला, त्यावेळी अवकाश, पदार्थ, ऊर्जा हे सारे एका बिंदूत प्रचंड घनतेसह सामावलेले होते, आणि त्याचे प्रसरण होत गेले. त्यातून अनेक मूल कणांची निर्मिती झाली. महास्फोटाच्यावेळी तापमान अपरिमित होते आणि ते घसरून आज तीनशे अंश केल्वीनपर्यंत झाले आणि पुढेही प्रसरणानुसार कमी होत राहणार.

या महाविस्फोट सिद्धान्तानुसार, एक अविश्वसनीय अशा महाभयंकर प्रहारामुळे अस्सल सर्वप्रथम वैश्विक अंडे क्षणार्धात दुभंगले आणि परिणाम स्वरूप या महाभयंकर विस्फोटामुळे निमिषमात्रात हे विश्व अस्तित्वात आले. या सिद्धान्ताच्या समर्थनार्थ पवित्र कुराणातील पुढील श्लोक अगदी स्पष्ट आहेत. हा सिद्धान्त त्यांना चपखल लागू होतो.

''आकाश आणि पृथ्वी आधी एकमेकाला घट्ट चिकटलेल्या गोळ्याप्रमाणे होते. मग आम्ही त्यांना एकमेकांपासून अलग केले.'' २१:३०.

''अल्लाह जे इच्छितो ते निर्माण करतो. जेव्हा तो (एखादी गोष्ट निर्माण करण्याचा) निर्णय घेतो, तेव्हा तो त्या गोष्टीबाबत केवळ इतकेच म्हणतो, 'अस्तित्वात ये' आणि ती गोष्ट (लगेच) अस्तित्वात येते.'' ३.४७

''मग तो (परमेश्वर) आकाशाकडे वळला, तेव्हा ते एक प्रकारच्या धुरासारखे होते, त्याने आकाश व पृथ्वी यांना म्हटले, 'तुम्ही दोघे या, (आमच्या नियमांचे पालन करण्यासाठी) स्वेच्छेने किंवा अनिच्छेने.' ते दोघे म्हणाले, 'आम्ही (तुझ्या नियमांचे पालन करण्यासाठी) स्वेच्छेने हजर आहोत.'' ४१:११

''आकाशाला आम्ही (आमच्या सर्जनशील शक्तीने) स्वबळाने बनवले आहे, आणि आम्हीच त्याचा विस्तार करत आहोत. आणि पृथ्वीचा विस्तारही आम्हीच केलेला आहे. आणि किती (उत्तम संतुलनासह) आम्ही तिचा विस्तार केलेला आहे!'' ५१:४७-४८.

### ४) प्रसरण सिद्धान्त (Theory of Expnsion) :

एडिंग्टन, हॅमसन आणि हबलसारख्या शास्त्रज्ञांच्या निरिक्षणावर भरवसा ठेवून आइन्स्टाईनने घोषित केले की आकाशामध्ये अति दूरवर असलेल्या धूम्रमय नक्षत्रसमूहामधील प्रकाशाच्या लाल बदलाशी संबंधित, असे वाटण्याची शक्यता आहे की विश्वाची सर्वसाधारण संरचना स्थिर नाही, परंतु ती प्रसरण पावणारी आहे.

आइन्स्टाईनबरोबरच, इतर शास्त्रज्ञांनी पण विश्वाचे निरीक्षण केले आणि त्यांनी पण आपले निष्कर्ष प्रसरण सिद्धान्ताला अनुकूल असणारे असेच काढले. इ. स. १८४२ मध्ये ख्रिश्चन डॉप्पलर यांनी आपले असे निरीक्षण नोंदविले आहे की, त्यांना दूरस्थ आकाशगंगांच्या विच्छिन्न किरणांमध्ये लाल बदल आढळले, आणि या आधारावर त्यांनी विचारार्थ पुढे असे मांडले की, घटना असे निर्देशित करतात की विश्व हे प्रसरण पावत आहे. इ. स. १९२७ मध्ये, एक बेल्जियन खगोल भौतिक शास्त्रज्ञ जॉर्ज लेमैत्रे यांनी आकाशगंगांच्या लाल बदलांवर अभ्यास करून डॉप्पलरसारखेच निष्कर्ष काढले. केवळ आइन्स्टाईनच नव्हे तर इतर अनेक शास्त्रज्ञांनी परोक्षपणे विश्वाच्या प्रसरणासंबंधी कुराणातील विधानाशी सहमती दाखविली आहे.

### ५) उष्मा-गतिकी सिद्धान्त (Thermo-Dynamic Theory) :

विश्वाच्या उत्पत्तीसंबंधी आणखी एक सिद्धान्त आहे उष्मा-गतिकी सिद्धान्त. परंतु हा प्रसरण सिद्धान्तास एक साहाय्याभूत सिद्धान्त आहे. हा सिद्धान्त शास्त्रज्ञांचा तो विचार उचलून धरतो की, गुरुत्वाकर्षणीय ताणामुळे अपार भविष्यामध्ये केव्हा तरी एकदा सर्व आकाशगंगा एकमेकांच्या अत्यंत जवळ येतील. हा ताण आकाशगंगांच्या चल गतीमध्ये सतत वाढ करत आहे. परिणामी संपूर्ण उष्णतामानवाढ होत आहे. पवित्र

कुराणाचे निवेदन आहे –

“(प्रलय तेव्हा घटित होईल) जेव्हा तारे निस्तेज होऊन जातील, आणि जेव्हा आकाश फाटून जाईल, आणि जेव्हा पर्वत धुळीप्रमाणे विखुरले जातील.” ७७:८–१०

“जेव्हा सूर्य गुंडाळून टाकला जाईल, आणि जेव्हा तारे निस्तेज होतील, आणि जेव्हा पर्वतांना चालविले जाईल.” ८१:१–३

“हे लोकहो, आपल्या विधात्याचे भय बाळगा. कारण पुनरुत्थानाचा भूकंप फारच भयंकर घटना आहे.” २२:१

परिणामी तारे एकसमान वायूमध्ये बदलून जातील. यामुळे उष्णतामान लक्षावधी अंश फॅरनहाइटपर्यंत वाढेल. यानंतर विकिरण सुरू होईल. विकिरणमुळे तारे हे कृष्ण–विवरामध्ये पडतील. विश्वामध्ये अनेक कृष्णविवरे आहेत. कृष्णविवर हे अवकाशामधील असे एक स्थळ आहे की जेथे गुरुत्वाकर्षण प्रबळतम असते. प्रकाश आणि विकिरणसह, कृष्ण–विवराच्या ओढाताणीपासून काहीच सुटू शकणार नाही. खगोलशास्त्रज्ञ म्हणतात की, कृष्ण–विवरे अजस्त्र ग्रहांचा निर्दयपणे फन्ना उडवतील. एकदा कृष्णविवरांनी स्वाहा केल्यानंतर, प्रसरण पावणारे विश्व (स्तब्ध) थांबविले जाईल. मग, गुरुत्वाकर्षण शक्तीमुळे विश्व आकुंचन पावण्यास सुरुवात होईल. हे आकुंचन ब्रह्मांड निर्माण होईपर्यंत वाढतच जाईल…कदाचित पुन्हा एकदा शोध करण्यासाठी.

### ६) पुंज सिद्धान्त (Quantum Theory) :

पुंज सिद्धान्त असे भाकित करते की, कृष्ण–विवरामध्ये संकोचाच्या मार्गे निर्मित अग्नी कंदुक कधीच पडणार नाही, परंतु ते एक नवीन विश्वासह पुन्हा निर्माण होईल. त्याचा पुन्हा उदय होईल, किंवा निरंतर अनेक विश्वे निर्माण होतील. अशा प्रकारे जीवांच्या नवीन पिढ्या नवीन वातावरणामध्ये उत्पन्न होतील. अशा प्रकारे उत्क्रांती–विलयाचे एक शाश्वत चक्र निरंतर सुरू राहील.

“(पुनरुत्थानाच्या) त्या दिवशी आम्ही आकाशांना गुंडाळून टाकू, ज्याप्रमाणे लेखपट गुंडाळले जाते. (आणि) ज्याप्रमाणे आम्ही निर्मितीचा प्रारंभ केला होता, त्याचप्रमाणे आम्ही त्याची पुनरावृत्ती करू. आमच्यावर बंधनकारक असे हे एक वचन आहे. आणि त्या वचनाची पूर्तता आम्ही करणारच.” २१:१०४

सदरहू श्लोक असे प्रतिपादन करते की सद्यः स्वरूपात अस्तित्वात असलेले विश्व अल्लाहने निर्माण केले आहे. पुनरुत्थानाच्या दिवशी तिला तो गुंडाळून टाकेल आणि मग पुन्हा एक नवीन सृष्टी निर्माण करेल. पहिल्या सृष्टीचे अधःपतन, अर्थात विलय झाल्यानंतर दुसरी एक नवीन सृष्टी उदयास येईल, या भाकिताशी पुंज सिद्धान्त सहमत आहे. अशा प्रकारे, पुंज सिद्धान्ताचे प्रतिपादन हे पवित्र कुराणाच्या उपरोक्त श्लोकाशी अनुरूप असेच आहे.

### आइन्स्टाइनप्रणीत विश्वाची नवीन संकल्पना

सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ आइन्स्टाइन यांनी इ. स. १९०५ मध्ये आपला शोध–प्रबंध एक नवीन दृष्टिकोनासह प्रसिद्ध केला. त्यांनी निरीक्षकाचे स्थान (दर्जा) आणि गती यावर निर्भर नसलेली विद्युत आणि चुंबकत्वाची,

एका नवीन दृष्टिकोनानुसार, प्रस्थापना केली. आपल्या सदरहू अध्ययनादरम्यान त्यांनी आपल्या बुद्धीकौशल्याने असे स्पष्ट केले की काळ आणि अवकाश हे दोन्ही परस्पर स्वतंत्र नाहीत. परंतु प्रत्यक्षतः ते परस्पर संबंधित आहेत. त्यांनी असे दाखवून दिले की पदार्थ आणि ऊर्जा दोन्ही एकच आहेत, वेगळे नाहीत. ज्याअर्थी ते परस्पर संबंधित आहेत, त्याअर्थी त्यांच्यामध्ये आंतररूपांतरणाची स्वाभाविक क्षमता आहे. अशा प्रकारे, त्यांनी घोषित केले की विश्वास हाच खरा कूट प्रश्न आहे की पदार्थ आणि ऊर्जेच्या या आंतर-रूपांतरणामुळे, विश्वामध्ये समतोलता आणि (आकलनक्षमता) ग्राह्यता भरून राहिलेली आहे. कुराणामध्येपण अशाच स्वरूपाचे विधान पुढील श्लोकामध्ये विद्यमान आहे –

''विश्वाच्या विविध भागांमध्ये समतोल राखणारा तो अल्लाहच आहे आणि अशा प्रकारे तो विनाशापासून तिचे रक्षण करतो. वस्तुस्थिती अशी आहे की तो अल्लाहच आहे, ज्याने आकाशांना व पृथ्वीला ढळण्यापासून सावरले आहे. आणि जर ते ढळले तर अल्लाहाशिवाय दुसरा कोणी त्यांना सावरू शकणार नाही. निःसंशय अल्लाह मोठा सहिष्णु आणि क्षमाशील आहे.'' ३५:४१

विश्वाला जाणून घेण्याचा आइन्स्टाईनचा दृष्टिकोन, त्या अर्थी, इतर शास्त्रज्ञांहून वेगळा आहे. दार्शनिकपणे त्याने विश्वाचे निरीक्षण केले आणि वास्तवाच्या एका अप्रतिम भावनेने आपली निरीक्षणे तार्किक दृष्ट्या सुसंगत पद्धतीने निष्कर्ष स्वरूपात मांडली. त्याने नंतर प्रस्तुत केलेल्या समीकरण सिद्धान्तामुळे नंतरच्या शास्त्रज्ञांनी आण्विक ऊर्जेचा विकास केला. आपले निष्कर्ष त्याने गणितीय शब्दांमध्ये सिद्ध करून दाखवले. त्याने आपले सिद्धान्त भूमितीय आणि गोलाकार आकृतींमध्ये दाखवून दिले, आणि विश्व व ग्रहांचा वाक (वक्रता) यांचे स्पष्टीकरण केले.

हॉयल व जयंत नारळीकरांच्या 'हे विश्व अनादी व अनंत असून, त्याला अंत व आरंभ नाही. फक्त वेळोवेळी त्याचे स्वरूप बदलत राहून, ते आज प्रसरण पावत असले तरी, पुढे ते आकुंचनही पावेल' या सिद्धान्ताने आव्हान मात्र दिले. अशी काही आव्हाने सोडली, तरी महाविस्फोट सिद्धान्ताला शास्त्रज्ञांना प्रायोगिक पुरावे मिळाल्याची जास्त पुष्टी मिळत गेली. त्यातच सर्वसारखया प्रयोगशाळेत लार्ज हॅड्रॉन कोलयडरची निर्मिती करून शास्त्रज्ञांनी हा महाविस्फोट सिद्धान्त सिद्ध करण्यासाठी घाट घातला आहे. भविष्यात या प्रयोगाने विश्वकोड्याची रहस्ये सुटतील व नवीन काही गूढ रहस्ये उदयाला येतील असे वाटते. यातून काही मूलकणांचे आस्तित्व सिद्ध होऊन, वेगळं तंत्रज्ञान विकसितही होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**ब्रह्मांडनिर्मितीचा उलगडा – नवीनतम अद्ययावत शोध**

(जगातील कणाकणात दडलेल्या 'हिग्स बोसॉन' [ हिग्स–बोस–आईनस्टाईन ] वा 'देवकण'च्या God Particle संकल्पनेत बुधवार दि. ०४.७.२०१२ रोजी मूर्त रूप मिळाले. त्यामुळे भौतिकशास्त्रातील शून्य सापडले व सृष्टीची गणनाही पूर्ण झाली. 'देवकण' अस्तित्वात असून त्यांच्यामुळेच विश्वाला वस्तुमान प्राप्त झाल्याचे हिग्ज यांनी ४८ वर्षापूर्वी म्हणजेच इ.स. १९६४ मध्ये प्रथम स्पष्ट केले होते.)

युरोपीय वैज्ञानिकांनी ज्या पीटर हिग्स बोसॉन 'ब्रह्मकणा'शी मिळत्या जुळत्या कणांना शोधल्याचा दावा केला आहे, त्याचा व बिगबँग (महाविस्फोट) सिद्धांताचा सर्वात प्राचीन व पहिला उल्लेख वेदांमध्ये आढळला आहे.

वैज्ञानिकांनी हिग्स बोसॉनला गॉड पार्टिकल म्हणजे देवकण वा ब्रह्मकण असे नाव दिले आहे. सर्वात प्राचीन वेद ऋग्वेदामध्ये व नारद सुक्तामध्ये प्राचीन मानव व अंतराळाला समजण्याच्या त्याच्या मूलभूत जिज्ञासेचा शोध लागला आहे. नारद सुक्तामध्ये असे म्हटले आहे की, सृष्टीच्या आधीच काहीच नव्हते, ना आकाश, ना जल, ना पाणी (वायू?) या श्लोकात ब्रह्माची चर्चा करताना म्हटले आहे की, सृष्टीच्यापूर्वी प्रथम ब्रह्म विद्यमान होते व त्यातूनच सर्व सृष्टीचा विकास झाला.

वैज्ञानिकांनी बिगबँग (महाविस्फोट) सिद्धांताने याच समजुतीला अधिक विस्तृत बनवले. त्यात म्हटले आहे की, १३.७ अब्ज वर्षापूर्वी संपूर्ण अंतराळ सुईच्या टोकावर स्थिर बिंदूप्रमाणे केंद्रीत होते. बिग बँग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या महाविस्फोटानंतर या बिंदूतदेखील विस्तार होत चालला असून ज्याने अंतराळ आकाराला आले. आपले अंतराळ संशोधन अजूनही अपूर्ण आहे. अंतराळाच्या सृजनासोबत हिग्स बोसॉन अस्तित्वात आला. ज्यातून नक्षत्र, ग्रह, आकाशगंगा, जीवनाची उत्पत्ती शक्य झाली.

वेद, उपनिषदानंतर पुराणात अवकाश सृजनाचा सिद्धांत पुढे चर्चेत ठेवताना युगाची सुरुवात आणि त्याच्या शेवटाचाही उल्लेख करण्यात आला आहे. पुराणात ब्रह्माचा एक दिवस चार अब्ज बत्तीस कोटी वर्षांच्या बरोबर असल्याचे सांगितले आहे, जो एक महायुग व चार युगाच्या बरोबर असतो. एका महायुगाच्या समाप्तीनंतर प्रलय येतो व सर्व काही नष्ट होते व एका नव्या सृष्टीचा जन्म होतो.

## २) धर्म आणि विज्ञान : तुलना[४५]

धर्माच्या स्वरूपास सुस्पष्टपणे समजून घेण्यासाठी विविध शास्त्रांच्या परिप्रेक्ष्यांमध्ये धर्माचे अध्ययन आवश्यक ठरते. इतर शास्त्रांच्या विकासामध्ये धर्माची कोणती भूमिका होती? धर्म आणि इतर शास्त्रांमध्ये काय अंतर आहे? कोणते भेद आहेत? इत्यादी प्रश्नांचे संतोषजनक उत्तर देणे धर्मपंडितांसाठी अत्यंत आवश्यक ठरते. ज्याप्रमाणे धर्माचा तत्त्वज्ञानाशी, मानसशास्त्राशी, नितिशास्त्राशी, मानववंशशास्त्राशी, राज्यशास्त्राशी, साहित्य आणि कलेशी जवळचा संबंध आहे, तितकाच जवळचा संबंध विज्ञानाशीपण आहे. इतर धर्मांच्या तुलनेत इस्लाम हा एक आधुनिकतम धर्म आहे, त्याचा विज्ञानाशी संबंध पण आहे. परंतु तो कितपत विज्ञानसंमत आहे, हाच खरा प्रश्न आहे. याचा उलगडा पुढे होणारच आहे. तत्पूर्वी धर्म आणि विज्ञानाची तुलना प्रस्तुत करणे श्रेयस्कर ठरेल.

**१) धर्म आणि विज्ञान – परस्पर संबंध :** धर्म आणि विज्ञान या दोहोंमध्ये जवळचे संबंध आहेत. धर्माशी संबंध-विच्छेद केल्यास विज्ञान मानव जीवनासाठी वरदान न ठरता अभिशाप सिद्ध होते. विज्ञानाशी फारकत घेतल्यास धर्म रूढींचे दास बनून जाते. धर्माच्या अभावी विज्ञान हे अंध असते, कारण की धर्मच विज्ञानास दिशा प्रदान करून त्याचे मार्गदर्शन करते. विज्ञानाच्या अभावी धर्म अपंग आहे. कारण की विज्ञानाच्या खांद्यावर आरूढ होऊन धर्म मानवाच्या कल्याणार्थ कार्यप्रवृत्त होते. विज्ञानच धर्मास युगानुरूप बनवते आणि त्याला नित्य नूतन मूल्यांच्या आधारे परिपूर्ण बनण्यास प्रेरित करते. हक्सले यांचे असे मत आहे की, 'विज्ञानामुळे प्राप्त नवीन उपलब्धींचा योग्य फायदा मानव तेव्हाच उठवेल, जेव्हा त्याच्या जीवनामध्ये धर्मांची तत्त्वे उजळत असतील.' धार्मिक मान्यतांची उपेक्षा केल्यामुळे वैज्ञानिक शोध मानवतेस सहजतेने

पायदळी तुडवतात आणि मानवास आपल्या हातचे बाहुले बनवून पाशविक अथवा दानवी (राक्षसी) आचरण करण्यासाठी विवश करतात.

आजचा मानव विज्ञानाच्या ऋणाखाली दबलेला आहे. विज्ञानाने मानवास भौतिक प्रगतीच्या शिखरावर पोहोचवले आहे. विज्ञानाच्या कृपेमुळे मानव आकाश पादाक्रांत करण्यास सरसावला आहे. विज्ञानाने मानवास जवळ जवळ सर्व सुखसोयी उपलब्ध करून दिल्या आहेत. म्हणूनच आजचा मानव हा विज्ञानाची पूजा करतो. इतकेच नव्हे तर, विज्ञानाच्या परिघाबाहेर तो कोणत्याच धर्मास स्वीकारायला तयार नाही. विज्ञानाची जसजशी प्रगती होत राहिली आहे, तसतशी धर्माच्या प्राचीन मान्यता गळून पडत आहेत. याच कारणामुळे उपासनामुलक धर्माऐवजी मूल्यात्मक धर्मास या वैज्ञानिक युगामध्ये विशेष महत्त्व प्राप्त होत आहे.

**२) धर्म आणि विज्ञान – समानता :** हे निर्विवाद आहे की, धर्म आणि विज्ञान दोन्ही मानवतेच्या सेवेमध्ये तत्पर आहेत. दोहोंचे उद्दिष्ट आहे सत्याचा शोध. दोघांमध्ये मानव चेतनेचा ज्ञानात्मक पैलू सक्रिय आहे. विश्वाच्या कोणा एका विभागाच्या सुव्यवस्थित आणि क्रमबद्ध अध्ययनास विज्ञान असे म्हणतात. या दृष्टीने धर्म पण विज्ञानाच्या कोटीमध्ये येते, कारण की धर्म म्हणजे धार्मिक अनुभूतीचे सुव्यवस्थित अध्ययन.

व्यापक दृष्टीने पाहता धर्म आणि विज्ञानामध्ये विरोध असण्याचे कारण नाही. विज्ञानाप्रमाणेच धर्म पण परिवर्धन आणि परिवर्तनाच्या दिशेमध्ये स्वतःस युग-सापेक्ष बनवते. ज्याप्रमाणे आधुनिक विज्ञानाचा आधार गणिताचा इंद्रियातीत प्रत्यय आहे, त्याचप्रमाणे धर्माच्या आतमध्ये मुळाशी अतिंद्रीय विराट् आहे. हा विराट् स्वरूपतः निर्गुण आहे. भौतिकशास्त्र पण धर्माचा विरोध करत नाही. आधुनिक भौतिकशास्त्र अनिश्चिततेस स्वीकारते, कारण की आधुनिक भौतिकशास्त्र विद्युत परमाणु आणि विजेचा सूक्ष्म कण यांना कधी वस्तू तर कधी अवस्तू; कधी सूक्ष्म तर कधी तरंग म्हणून मानते. धर्म पण एखाद्या घटनेसंबंधी निश्चित विधान करणे शक्य नसल्याचे मानते.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून उप-आण्विक शोधाच्या संदर्भामध्ये शास्त्रज्ञ कारण-कार्य नियमास अभिग्रह स्वरूपात स्वीकार करतात, तथ्यात्मक नियम स्वरूपात नव्हे. कारण-कार्य नियम एक मान्यता आहे. या अभिग्रहास स्वीकारल्यामुळे विज्ञानामध्ये प्रगती होत गेली. शास्त्रज्ञास वाटल्यास या अभिग्रहास शास्त्रीय प्रगतीमध्ये अडचण वा अडथळा समजून त्यागपण करू शकतो. म्हणून कारणतेचा नियम हा काही सार्वभौम आणि अनिवार्य नाही, की कोणत्याही घटनेच्या स्पष्टीकरणासाठी याची मदत घेणे जरूरीचे असेल. विश्वाच्या व्याख्येसाठी कारणतेचा नियम पूर्णपणे सक्षम नाही. हे धर्माचे आव्हान आहे. विश्व समस्त घटनांची समष्टी आहे. कारणतेचा नियम हा घटना विशेषाशी निगडित असतो, घटनांच्या समष्टीसाठी नसतो. अशा प्रकारे कारण-कार्याचा सिद्धान्त हा विश्वाची व्याख्या तिच्या समग्रतेमध्ये करू शकत नाही. म्हणून, धर्म आणि विज्ञान दोन्ही कारणतेच्या नियमास शेवटी दुर्बळ आणि अनावश्यक सिद्ध करतात.

विकासवादी स्पेन्सर कालांतराने आपल्याच गोष्टींवर शंका व्यक्त करू लागला. त्याने पुद्गल (पदार्थ) वा जडतत्त्व, गती आणि शक्तीस एका अज्ञेय सत्तेचे रूप मानले. म्हणून त्याने स्वतःस धर्माच्या क्षेत्रामध्ये सुरक्षित ठेवण्याचे प्रयत्न केले.

धर्म आणि विज्ञान परस्पर सहयोगी आहेत. हे खरे आहे की धर्म आणि विज्ञानाच्या स्वभावामध्ये फरक आहे. अंतर आहे. तरी पण, ते एक दुसऱ्याच्या प्रगतीमध्ये सहाय्यक सिद्ध होऊ शकतात.

**क) धर्म विज्ञानाचा सहयोगी आहे.** धर्म आणि विज्ञान दोन्ही पूर्व मान्यतांवर निर्भर आहेत. धर्म विज्ञानास मानवेतर शक्तीमध्ये विश्वास आणि तिच्याप्रती अंतर्बद्धतेची शिकवण देते. हे खरे आहे की शास्त्रज्ञ हा ज्या मानवेतर शक्तींमध्ये आस्था ठेवतो, तिला तो ईश्वराची संज्ञा देत नाही. श्रद्धा अथवा विश्वास धर्माचा विषय आहे, विज्ञानाचा नव्हे. विज्ञानास ही श्रद्धा धर्मापासून प्राप्त होते. रसेलचा विचार आहे – 'तर्कवाद्यांमध्ये श्रद्धा आणि आशावादितेचा पुंज विद्यमान असतो.'

मानव हा स्वतःस पदोपदी सीमित, असुरक्षित आणि अपूर्ण असा समजतो. विज्ञान पण 'संपूर्णत्व प्राप्ती'मध्ये त्याची मदत करू शकला नाही. परिणामी, विज्ञानास खुद्द धर्माची शरण घ्यावी लागली. जीवनामध्ये सर्वथा सुरक्षा आणि निश्चिंतता यासाठी ईश्वराच्या अस्तित्वास स्वीकारणे आवश्यक ठरते. व्यवहारामध्ये असे आढळते की संकटांचे डोंगर कोसळल्यावर नास्तिक पण अस्तिक बनून जातो. शेवटी धर्म सगळ्यांसाठी स्वीकारणीय बाब ठरून जाते, मग तो अध्यात्मवादी असो अथवा निसर्गवादी असो वा विज्ञानवादी. एखाद्या कोणत्या तरी अपूर्व शक्ती अथवा सत्तेमधील विश्वासच तर धर्म आहे. ती सत्ता मग भलेही ईश्वराच्या स्वरूपात असेल, मूल्याच्या रूपात असेल किंवा परमाणू वा शक्तीरूपात असेल. अशा प्रकारे शास्त्रज्ञास पण धार्मिक बनावे लागते. नित्य धर्माधिष्ठित शोधच शास्त्रज्ञास महान बनवू शकतात. धर्माच्या स्पर्शाने विज्ञान विश्वास स्वर्गामध्ये बदलू शकतो. विश्वामध्ये चिरस्थायी शांती प्रस्थापित करू शकते, लोकां-लोकांमध्ये प्रेम, सौहार्द आणि सहकार्याची अजस्त्रधारा प्रवाहित करू शकते. अशा प्रकारे वैज्ञानिकास महान बनविण्याचे श्रेय धर्माकडे आहे.

धर्म परस्पर सहकार्याच्या भावनेच्या आधारे जैव विकास शक्य मानते. धर्माच्या या सिद्धान्ताने विकासवादी शास्त्रज्ञांस सर्वांत जास्त प्रभावित केले आहे. क्रोपोट्किन, केसलर आणि पॅट्रीक गेट्रस यांनी जीवास स्वार्थी न मानता, परस्पर सहकार्याच्या भावनेवर अवलंबित मानले आहे. मुंग्या परस्पर सहकार्यामुळे जिवंत राहतात. पॅट्रिक गेट्रसच्या मते, स्वार्थी वृत्तीच्या दमनामुळे, जातीचा विकास शक्य झाले आहे. एफ. आर. टेनेंटच्या दृष्टीमध्ये, वरवर पाहता निर्जीव आणि सजीव दोन्ही एकमेकांचे विरोधी प्रतीत होतात. परंतु दोघांमध्ये गाढ संबंध आहे, कारण की शेवटी निर्जीव जगावर सजीव जग आश्रित आहे. निर्जीव सृष्टीपासून सजीव, सजीवपासून चेतन प्राणी, चेतन प्राणीपासून आदर्शचा उदय होतो. (प्रकाशात येतो). शिवाय, वनस्पती जगापासून पशूंचे जग आपला आहार प्राप्त करते, आणि वनस्पतींचे जग पण कृमी-कीटक, मधमाशा, फुलपाखरे इत्यादींमुळे पुष्पित होऊन फलधारणा करते. मधमाशा फुलांपासून मध गोळा करतात. सोबतच पराग-कण एका फुलापासून दुसऱ्या फुलापर्यंत पोहोचवितात. परिणामी बीज उत्पन्न होते आणि फुलझाडांचे भविष्य सुरक्षित राहते.

थॉमसनने स्पष्ट केले आहे की डार्विनने जीवन-संघर्षाचे नियमाचे प्रतिपादन करून एक घृणित तत्त्वज्ञानास जन्म दिले आहे. यामुळे निरंकुश शासनास प्रोत्साहन मिळाले. डार्विनचा सिद्धान्त ब्रिटिशांची युद्धप्रियता आणि

सैनिकी यशाचे अपत्य आहे. जैव-विकास जीव-संघर्षापेक्षा परस्पर सहकार्यावर जास्त प्रमाणात आधारलेला आहे. परस्पर सहकार्याची भावना विज्ञानास धर्माकडून मिळालेली आहे.

न्यूटन आणि लॅपलेससारख्या शास्त्रज्ञांनी प्रयोजनात्मक तत्त्वास सृष्टीमध्ये समाविष्ट मानले आहे. ते विश्वाची व्याख्या प्रयोजनात्मक दृष्टिकोनातून करतात. धर्माचा दृष्टिकोन प्रयोजनात्मक आहे, तर विज्ञानाचा दृष्टिकोन कारणात्मक आहे. धर्म विश्वाची व्याख्या विश्वामध्ये निहित प्रयोजन अथवा एकरूपता यांच्या आधारावर करते. हे समष्टीचे अध्ययन आहे. विज्ञान विश्वाच्या घटनांचा पृथक्-पृथक् अध्ययन करते. अशा प्रकारच्या अध्यनामध्ये ते कारण-कार्य नियमाचा आधार घेते. (मदत घेते.) हे व्यष्टीचे अध्ययन आहे. म्हणून, हे उघड आहे की न्यूटन आणि लॅपलेस यांची विश्वासंबंधी व्याख्या धर्माकडे झुकलेली आहे. न्यूटन विश्वास एका चतुर यंत्रनिर्मात्याचा खेळ मानतो. त्याच्या मतानुसार ईश्वराने ब्रह्मांडामध्ये काही अशी व्यवस्था करून ठेवली आहे की, मधे-मधे त्याला ब्रह्मांडाच्या कार्यप्रणालीमध्ये हस्तक्षेप करण्यास वाव मिळावा. सूर्याच्या चारी बाजूस नक्षत्रे परिक्रमा करतात. जर परमेश्वराने नक्षत्रांना पथभ्रष्ट होण्यापासून वाचविले नाही तर एक तर ते सूर्यावर आपटून नष्ट तरी होतील किंवा अनियमितपणे तरी परिभ्रमण करतील. लॅपलेस नक्षत्रांच्या पथ-भ्रष्ट होण्याच्या कल्पनेस निराधार मानतो. ईश्वर अपिरमित बुद्धिसंपन्न सत्ता आहे. त्याने विश्वरूपी यांत्रिकीमध्ये असे नियम पेरून ठेवलेले आहेत की ते परिभ्रमणाच्या त्रुटींना स्वतःच सुधारत राहतात आणि पर्यायाने ईश्वरास हस्तक्षेप करण्याची गरज भासत नाही.

**ख) विज्ञान धर्मास सहाय्यक आहे.** विश्वामध्ये सुव्यवस्था आणि समतोल पाहून धर्म, व्यवस्थापक या स्वरूपात ईश्वराची सत्ता स्वत: सिद्ध असल्याचे मान्य करतो. विज्ञान विश्वामध्ये सुव्यवस्थेचा शोध घेते. ते सर्वत्र विविधतेमध्ये एकतेचे दर्शन करते. 'विश्वामध्ये एकरूपतेचा नियम आहे' – हा सिद्धान्त विज्ञानाची देणगी आहे. विज्ञान ठामपणे म्हणते की, 'विश्वामध्ये कोणतीच घटना ना मनमानी आहे ना निष्प्रयोजनच'. विज्ञानाच्या प्रकाशात विश्वाच्या अणू-रेणूमध्ये सुव्यवस्थेस पाहून धर्म एका सुनियोजकाच्या स्वरूपात ईश्वराच्या अस्तित्वाची प्रतिष्ठापना करतो. अशा प्रकारे ईश्वराच्या अस्तित्वास सिद्ध करण्याच्या हेतूने विज्ञान सामुग्री गोळा करते.

धर्म 'वसुधैव कुटुंबकम्' ('हे विश्वची माझे घर')च्या भावनेस तेव्हाच सार्थक करू शकेल, जेव्हा ते विज्ञानास आत्मसात करून घेईल. ['No religion can unite man in a world-community unless in conformity with science.' – Dr. Radhakrishnan] विज्ञानाच्या संपर्कामध्ये येऊनच धर्म विश्वव्यापी बनू शकतो आणि विश्वधर्माची कल्पना साकार होऊ शकते.

विज्ञान रूढी आणि अंधश्रद्धेपासून धर्माचे संरक्षण करते. रूढीवादी धर्म व्यक्ती आणि समाज दोघांना मार्गभ्रष्ट करतो, आणि त्यांच्या प्रगतीमध्ये अडथळा निर्माण करून त्यांना विनाशाकडे ओढतो. विज्ञान धर्मास युगाच्या विचारधारेनुसार घडवते, आणि त्याला नवीन मूल्यांच्या शोधासाठी प्रेरणा देते. सोबतच त्याला कूपमंडूक वृत्तीपासून वाचविते. विज्ञानास सोबत घेऊन जाणारा धर्म कुठल्याही अवरोधाशिवाय विकासमार्गावर पुढे जात असतो.

न्यूटन आणि लॅपलेस यांनी धर्माची वैज्ञानिक व्याख्या प्रस्तुत करून धर्माचा पाया मजबूत बनविला आहे. न्यूटनने स्वतःस ईश्वरभक्त आणि धर्मवैज्ञानिक असे म्हटले आहे. आधुनिक युगाचा धर्म विज्ञानाने ओथंबलेला

आहे. साम्यवाद, समाजवाद, मानवतावाद धर्म हे सर्व विज्ञानाच्या देणग्या आहेत. अशा वैज्ञानिक धर्मास परंपरागत उपासनामूलक धर्मापेक्षा अधिक विकसित, प्रभावोत्पादक आणि प्रगत मानले जाते. विकासवाद व्यष्टिपासून समष्टीकडे अग्रेसर होतो. धर्म पण पुरुषास विराट् आणि महत्तम बनवू इच्छितो, आणि जागतिक प्रपंचाच्या मुळात एकच 'परम सत्'चे दर्शन करू इच्छितो. म्हणून विकासवाद हा धर्माचा सहचर आहे, अनुचर आहे.

**३) धर्म आणि विज्ञान – अंतर, फरक :** विज्ञान आणि धर्माचे क्षेत्र वेगवेगळे आहेत. विज्ञानाची आपली सीमा आहे, एक निश्चित परिघ आहे. क्षेत्र आहे. याच्या पलीकडे जाण्याचे त्याला कोणतेच अधिकार नाहीत. विज्ञानाचा अध्ययनाचा विषय आहे विश्वाच्या विशिष्ट अशा घटना. ते विश्वास घटनांच्या समष्टिगत स्वरूपात समजू शकत नाही. आत्मा, परमात्मा आणि विश्वाच्या रहस्योद्घटनांमध्ये ते स्वाभाविकपणे असमर्थ आहे. विज्ञान फक्त घटना विशेषांच्या अध्ययनासाठी उपयोगी आहे. विज्ञानापाशी ती प्रतिभा दृष्टी नाही की जिच्यामुळे 'परम सत्'चे दर्शन करणे शक्य झाले असते. अशा प्रकारची दृष्टी फक्त घटना-विशेषांच्या अध्ययनासाठी उपयोगी आहे. अशा प्रकारची दृष्टी फक्त धर्मापाशी आहे. म्हणून, धर्मच 'परम सत्या'स समजण्यास समर्थ आहे. विश्वाच्या मूळ कारणस्वरूपात शक्ती आणि गतीचा सिद्धान्त विज्ञानाद्वारे सर्वथा असिद्ध आहे. विज्ञान 'कारण-कार्या'च्या साखळीमध्ये गुंतलेले असते. ते मूळ कारण किंवा आद्य प्रवर्तकाला स्पर्श करू शकत नाही, कारण की मूलसत्तेची बौद्धिक व्याख्या कदापि शक्य नाही. तो तर हृदयानुभूतीचा विषय आहे, आणि हे धर्माचे अध्ययन-क्षेत्र आहे.

धर्म पण आध्यात्मिक तत्त्वाची तथ्यात्मक व्याख्या प्रस्तुत करू शकत नाही. तो आध्यात्मिक तत्त्वाची मूल्यात्मक व्याख्या करू शकतो. मूल्यात्मक व्याख्या आणि तथ्यात्मक व्याख्या यामध्ये अंतर आहे. विश्वाची फक्त तथ्यात्मक अथवा यथार्थमूलक व्याख्या शक्य आहे. अशा प्रकारची व्याख्या प्रमाणाच्या अधीन असते; तर मूल्यात्मक व्याख्या अनुनयात्मक युक्तिवादावर अवलंबून असते. अनुनयात्मक युक्तिवादाचा हा अभिप्राय आहे की भक्ताने ईश्वरानुभूतीस लोकांसमोर अशा रीतीने प्रस्तुत करावे की ते पण त्याच्याचसारखे ईश्वराच्या अस्तित्वामध्ये दृढ आस्था ठेवू लागतील आणि ते जीवनामध्ये शांती, स्थैर्य आणि आनंदाचा अनुभव घेऊ लागतील. अशा प्रकारे अनुनयात्मक युक्तीवाद दृढ विश्वाससूचक आहे. कांटचे पण मत आहे की ईश्वर हा सिद्धी-असिद्धीच्या पलीकडे विश्वास अथवा श्रद्धेचा विषय आहे. धर्म विश्वासाच्या आधारावर ईश्वराचे अध्ययन करतो. धर्म जेव्हा ईश्वर आणि विश्व यांची व्याख्या भौतिकवादी तत्त्वज्ञान स्वरूपात करू लागतो, तेव्हा धर्मामध्ये विरोध दिसणे स्वाभाविक आहे. तर्क-वितर्क अथवा वैज्ञानिक युक्तिवादाच्या आधारे पारमार्थिक सत्तेस धरले जाऊ शकत नाही, ती सत्ता मग ईश्वर असो अथवा आत्मा किंवा घटनांच्या समष्टिगत स्वरूपात विश्वच का असेना. निष्कर्षतः, विज्ञानास ईश्वरास सिद्ध किंवा असिद्ध करण्याचा अधिकार नाही; कारण की विज्ञानाचा स्वभाव सीमित आहे, तर ईश्वर हा असीम आहे. तसेच ना धर्मास पण ईश्वराच्या व्याख्येमध्ये भौतिक विधीचा उपयोग करण्याचा अधिकार आहे, कारण की ईश्वर हा विश्वास किंवा श्रद्धेचा विषय आहे. वैज्ञानिक पुराव्याचा नव्हे. धर्म आणि विज्ञानामधील फरक कोष्टक स्वरूपात असे मांडता येईल.

| तुलना | |
|---|---|
| **धर्म** | **विज्ञान** |
| १. धर्म सत्याची व्याख्या आपल्या संपूर्णत्वामध्ये करतो. धर्माचे प्रतिपाद्य समग्र विश्व आहे. येथे सर्व घटना 'परमसत्'मध्ये विलीन होण्याच्या हेतूने सुव्यवस्थित स्वरूपात आहेत. | १. विज्ञान स्वरूपतः सादृष्टीक आहे. ते सत्याचे एकांगी ज्ञान आहे. ज्ञान-व्यूह अथवा ज्ञान-विशेषास विज्ञान असे म्हणतात. |
| २. धर्माचा विषय तात्त्विक आहे, वास्तविक आहे, वस्तुनिष्ठ आहे. ते विश्वाचे तत्त्वतः विवेचन करते, आणि वस्तु-वैशिष्ट्यावर विशेष भर देते. अशा प्रकारे धर्म सत्शास्त्र आहे. धर्म विश्वाससमष्टिगत स्वरूपात पाहतो. तो विश्वाची व्याख्या प्रयोजनात्मक आधारावर करतो. | २. विज्ञानाचे विश्व काल्पनिक आहे, ते एका सीमेपर्यंत कल्पनेची सृष्टी आहे. यामध्ये त्रुटी, दोष नित्य संभवनीय आहेत. विज्ञानाचे आधार गणित आहे. गणित 'संख्यां'वर निर्भर असल्याकारणाने काल्पनिक अथवा असत् शास्त्र आहे. विज्ञान विश्वाचे अध्ययन कारणतेच्या आधारावर करते; प्रयोजनाच्या आधारावर नव्हे. कारणतेचा नियम विश्वाच्या सर्व वस्तूंना निष्प्रयोजन सिद्ध करते. वस्तुतः कोणतीच वस्तू निष्प्रयोजन नाही. |
| ३. धर्म सत्याचा साक्षात्कार करतो. धर्माचारी अर्थात उत्कट भक्त हा अत्यंत जवळून अव्यवहित रूपात पारमार्थिक सत्तेशी संभाषण करतो. त्याचे दर्शन करतो. | ३. विज्ञान फार लांबून व्यवस्थितपणे सत्याचा अंदाज करते. वैज्ञानिक निर्णय मानवाच्या तार्किक मनाचे प्रक्षेपण असतात. |
| ४. धर्माचा संबंध आध्यात्मिक मूल्यांशी असतो. धर्म अलौकिक आणि अति प्राकृतिक सत्तेचे अध्ययन करतो. | ४. विज्ञानाचा संबंध यथार्थ वस्तूंशी असतो. ते प्रचीतीशी संबंधित असते, तर धर्माचा संबंध हा तात्त्विक वस्तूंशी असतो. |
| ५. धर्मामध्ये भावना आणि अंतःअनुभूतीस विशेष महत्त्व असते. धर्माच्या अध्ययनाची पद्धती निगमनात्मक आणि अंतर्बोधमूलक असते. | ५. विज्ञानाच्या अध्यनाची पद्धती आगमनात्मक असते. प्रयोगात्मक असते. इंद्रियानुभूतिमूलक असते. विज्ञान निर्वैयक्तिक असते, आणि धर्म हा व्यक्तिगत अनुभूतीवर निर्भर असतो. |
| ६. धर्माचा संबंध 'सत्यं, शिवं आणि सुंदरम्'शी असतो. धर्म सद्वृत्तींच्या साहाय्याने मोक्ष (परमसत्य)पर्यंत पोहोचतो. येथे सत्यं, शिवं आणि सुंदरम्ची पावन त्रिवेणी अबाधित प्रवाहित होत असते. | ६. विज्ञानाचा संबंध फक्त सत्याशी असतो. विज्ञान नैसर्गिक नियमांच्या मदतीने सत्यापर्यंत पोहोचते. याचा भर सत्याच्या व्यावहारिक पैलूवर तेवढा नसतो, जेवढा भर त्यावर धर्म देतो. |

| धर्म | विज्ञान |
|---|---|
| ७. धर्म आदर्शमूलक आहे. तो कर्तव्यता, विधिपरता याच्याशी संबंधित असतो. जे आहे ते त्याला नको असते. जे नाही, ते त्याला हवे असते. अशा प्रकारे धर्म हा विकासाचे आश्रयस्थान आहे. | ७. विज्ञान यथार्थमूलक आहे. हा 'असणेपणा'शी संबंधित आहे. हा वस्तूच्या यथार्थ घटनांचे अध्ययन करतो. मात्र मानवजीवनामध्ये त्यांचे काय मूल्य आहे, याचे ते समाधान करत नाही. |
| ८. धर्म सत्याच्या उद्घाटनामध्ये श्रद्धेची मदत घेतो. धर्माचे तर्क श्रद्धेवर अवलंबून आहे. धर्मामध्ये बुद्धी हृदयावर अवलंबून असते. | ८. विज्ञान सत्याच्या उद्घाटनामध्ये तर्काची मदत घेते. विज्ञानाची श्रद्धा तर्कावर अवलंबून असते. विज्ञानामध्ये हृदयास बुद्धीची अपेक्षा असते. |
| ९. धर्म जीवनाची आध्यात्मिक व्याख्या करून नैतिकतेस मानवजीवनाचे भूषण सिद्ध करतो. | ९. विज्ञान विश्वाची यांत्रिक व्याख्या करून नैतिकतेस व्यर्थ ठरवते. |
| १०. धर्म आत्म-तत्त्वाच्या शोधासाठी एक प्रयत्न आहे. हे अतिसूक्ष्म तत्त्व आहे, जे परमाणुपेक्षा अणुतर आहे. 'अणोरणीयान्'. म्हणूनच धर्मास विज्ञानाचे विज्ञान म्हटले जाते. 'अध्यात्मविद्या विद्यायां'. सीमेपासून भूमाकडे जाण्याची इच्छा धर्मामुळेच संतुष्ट होऊ शकते. | १०. विज्ञान विज्ञानबाह्य पदार्थांच्या अंतराळात जाऊन अणू आणि परमाणूंच्या समष्टीस शोधण्याचा एक स्पर्धक आणि उपयोगी प्रयास-प्रयत्न आहे. |

### ३) विश्वोत्पत्तीसंबंधी इस्लामी दृष्टिकोनाची वैज्ञानिकता[४६]

सृष्टीकर्त्याची सृष्टीरचना - काळ, क्रम, पद्धती, त्याने निर्मित आकाश, ग्रह, सूर्य, चंद्र, पृथ्वी, पर्वत, वृक्ष, प्राणी, वनस्पती, पाणी, पशु-पक्षी, भूमी, रात्र, दिवस, समुद्र, मानव - त्याचे विविध रंग, त्याच्या विविध भाषा, त्याच्या जन्माचे विविध टप्पे, त्याचे जीवन, त्याचा मृत्यू इत्यादीमध्ये कृपावंत परमेश्वराच्या कृतींमध्ये जो समतोल, जी सुव्यवस्था, जो सुसंगत क्रम, जी मांडणी आढळून येते ते सर्वच्या सर्व वैज्ञानिक नियमांचे ठळक पुरावे आहेत. पवित्र कुराणामध्ये याविषयी जागोजागी निवेदन व विवेचन आहे. 'पवित्र कुराण' हा इस्लामचा पवित्र असा धर्मग्रंथ आहे. त्याला संपूर्णपणे सत्य मानणे हे केवळ मुसलमानांचेच कर्तव्य नसून, सर्व मानवजातीचे कर्तव्य ठरते. कारण पवित्र कुराण हा सर्व मानवजातीसाठी अवतीर्ण झालेला एक दैवी ग्रंथ आहे. एक अपौरुषेय ग्रंथ आहे.

उपरोक्त बाबींविषयी सप्रमाण व सविस्तर असे पुढील विवेचन वाचल्यानंतर विश्वोत्पत्तीसंबंधी इस्लामी धारणा कशी वैज्ञानिक आहे, याचे प्रत्यंतर आल्याशिवाय राहणार नाही. या संदर्भात सर्वप्रथम आपण आकाश आणि पृथ्वीच्या निर्मितीपासून विवेचन सुरू करू या.

**आकाश व पृथ्वीची निर्मिती :**

लागोपाठ एका पाठीमागून एक येणाऱ्या निर्मितीच्या टप्प्यांची कुराणोक्त सहा दिवसांची संख्या ही इंजील (बायबल)मधील दिलेल्या सहा या संख्येशी तंतोतंत जुळणारी अशी आहे. यात कुठल्याही प्रकारची संदिग्धता मुळीच नाही. इंजीलमध्ये असे नमूद आहे की सहा दिवस सृष्टी निर्माण केल्यानंतर सब्बाथ (अर्थात शनिवार) या सातव्या दिवशी परमेश्वराने विश्रांती घेतली. हे सर्व आठवड्यातील सात दिवसांशी साम्य दर्शविणारे असेच आहेत. हीच बाब पवित्र कुराणामध्ये अशी नमूद आहे ''तुमचा पालनकर्ता अल्लाह आहे (यात मुळीच शंका नाही), ज्याने सहा दिवसात (म्हणजे सहा कालखंडात) आकाश आणि पृथ्वी यांची निर्मिती केली. मग तो सिंहासनावर विराजमान झाला.'' ७:५४

'सहा दिवस' म्हणजे 'सहा कालावधी' किंवा 'सहा कालखंड' या अर्थी वापरण्यात आलेले श्लोक पुढीलप्रमाणे आहेत ''तो आकाशापासून पृथ्वीपर्यंत जगाच्या मामल्यांची तजवीज करतो आणि त्या तजविजीचा अहवाल, वर त्याच्या ठायी सादर होतो. एका अशा दिवसात त्याचे प्रमाण तुमच्या गणनेनुसार एक हजार वर्षे आहे.'' ३२:५ ''त्याच्याकडे स्वर्गदूत व जिब्रील (प्रमुख स्वर्गदूतांपैकी एक) (दररोज) चढून जात असतात. जो दिवस (म्हणजे पृथ्वीवरील) पन्नास हजार वर्षांचा असल्याप्रमाणे असतो.'' ७०:४ येथे आधुनिक विज्ञानाने मांडलेली 'प्रकाशवर्ष' या संकल्पनेची आठवण झाल्याशिवाय रहात नाही.

पृथ्वी आणि आकाशांमधील निर्मितीसंबंधी घटनांना एकमेकाजवळ ठेवून कुराणात असे प्रतिपादन करण्यात आले आहे की, (परमेश्वर प्रेषिताशी संभाषण करत आहे) – ''प्रेषित! त्यांना विचारा, 'तुम्ही त्या (सामर्थ्यशाली अल्लाहला) नाकारत आहात का, ज्याने पृथ्वीला दोन दिवसांत निर्माण केले, आणि तुम्ही त्याचे सहभागी ठरवता? तोच समस्त विश्वाचा (मालक व) पालक आहे. आणि त्यानेच (पृथ्वी निर्माण केल्यानंतर) भूतलावर भक्कम असे पर्वत स्थापित केले, आणि त्यांच्यामध्ये सर्व प्रकारची संपन्नता ठेवून दिली, आणि त्यावरील निर्वाहसामग्रीची आखणी केली. चार दिवसांत (म्हणजे चार अवधीत) सर्व गोष्टींना उचित प्रमाण घालून दिले. प्रत्येकाच्या मागणी व गरजांप्रमाणे. मग तो आकाशाकडे वळला. तेव्हा ते एक प्रकारच्या धुरासारखे होते. त्याने आकाश आणि पृथ्वी यांना म्हटले, ''तुम्ही दोघे या, (आमच्या नियमांचे पालन करण्यासाठी) स्वेच्छेने किंवा अनिच्छेने.'' ते दोघे म्हणाले, 'आम्ही (तुझ्या नियमांचे पालन करण्यासाठी) स्वेच्छेने हजर आहोत.' त्यानंतर दोन दिवसांत, त्याने सात आकाशे निर्माण केली आणि प्रत्येक आकाशाकडे त्यांच्या कार्यासंबंधाने आपला आदेश प्रकट केला, आणि पृथ्वीसाठी सर्वांत जवळ असलेल्या आकाशाला (ताऱ्यांचे) दिवे लावून सुशोभित केले, आणि त्याच्या सुरक्षिततेची व्यवस्था केली. हे सर्व काही सर्व शक्तिमान आणि सर्वज्ञ अशा (अल्लाहच्या) योजनेप्रमाणे (कार्यान्वित) झाले.'' ४१:९-१२

सृष्टीच्या निर्मित घटनांमध्ये एक सुनिश्चित क्रम आम्हास पवित्र कुराणामध्ये फक्त एकाच ठिकाणी आढळून येतो. तो असा – ''(लोकांनो!) बरे, तुमचे (पुनरुत्थानात पुन्हा) निर्माण करणे अधिक कठीण आहे, किंवा त्या आकाशाला निर्माण करणे की, ज्याला अल्लाहने निर्माण केले आहे. त्याचे छत (विशाल घुमट) खूप उंच उभारले, आणि मग त्याच्यात संतुलन प्रस्थापित केले, आणि त्याची रात्र काळोखी बनवली व त्यातून

प्रकाशमान दिवस प्रकट केला, आणि त्यानंतर पृथ्वीला विस्तीर्ण केले. त्याने तीमधून तिचे पाणी व चारा निर्माण केला, आणि पर्वतांना तिच्यावर भक्कमपणे रोवून टाकले (स्थापित केले). (हे सर्व) तुमच्या व तुमच्या पशुधनांच्या उपजिविकेसाठीच (सामग्री आहे).'' ७९ : २७-३३

विश्वनिर्मितीच्या मूलभूत प्रक्रियेशी निगडित पृथ्वी व आकाशाच्या संश्लेषणासंबंधी संक्षिप्त उल्लेख पवित्र कुराणामध्ये असा आढळतो - ''पृथ्वी आणि आकाश आधी एकमेकाला घट्ट चिकटलेल्या गोळ्याप्रमाणे होते. मग आम्ही त्यांना एकमेकांपासून अलग केले, आणि प्रत्येक सजिवाला आम्ही पाण्यापासून निर्माण केले. (या सर्व अर्थपूर्ण खुणा आपल्या डोळ्यांनी पाहूनदेखील) ते श्रद्धा धारण करणार नाहीत का? २१:३०

आधुनिक विज्ञान या गोष्टीला महाविस्फोट (Big Bang) म्हणतो, आणि महाविस्फोटाद्वारेच विश्वाची निर्मिती झाली. याच गोष्टीचे इथे वर्णन आहे.

पृथ्वीच्या निर्मितीसंबंधी चिंतन करण्याविषयी परमेश्वर प्रेषितामार्फत मानवास आव्हान करतो. ''मग तो (परमेश्वर) आकाशाकडे वळला, तेव्हा ते एका प्रकारच्या धुरासारखे होते. त्याने आकाश आणि पृथ्वी यांना म्हटले, ........'' मग त्या दोघांना हजर होण्याचा आदेश परमेश्वर देतो, याचा सविस्तर उल्लेख उपरोक्त ४१:९-१२ मध्ये आलेला आहेच.

'विश्वे' ('आलमीन') हा शब्द पवित्र कुराणामध्ये वारंवार - निदान एक डझन (१२) भर वेळा तरी आलेला आहे. हे आकाशाचे अनेकवचनी रूप या स्वरूपातच नव्हे, तर ते ७ (सात) या सांकेतिक संख्यात्मक स्वरूपात पण आले आहे; 'सप्तआकाश' म्हणून. 'असंख्य' या अर्थी 'सात' या संख्येचा उल्लेख संपूर्ण कुराणामध्ये एकूण चोवीस वेळा आलेला आहे. परंतु याचा निश्चित उलगडा अद्याप झालेला नाही. ग्रीक व रोमन लोकांनी पण अनेकतेची मोघम संकल्पना दर्शविण्यासाठी सात (७) या संख्येचा उपयोग केल्याचे वाटते. पवित्र कुराणामध्ये सात (७) हा आकडा प्रत्यक्ष 'आकाशां'साठी वापरलेला आहे. आकाशांचे सात (७) मार्ग याचा उल्लेख एकदा आलेला आहे. तो असा ''तो (ईश्वर)च तर आहे ज्याने पृथ्वीमध्ये तुमच्यासाठी सर्व गोष्टी निर्माण केल्या. नंतर आकाशाभिमुख झाला आणि सप्तआकाश बनवले. त्यालाच प्रत्येक गोष्टीचे परिपूर्ण ज्ञान आहे.'' २:२९

''आम्ही तुमच्यावर सात आकाश निर्माण केले, आणि आम्ही आमच्या निर्मिती-पासून कधीही गाफील असत नाही. आम्ही आकाशातून एका उचित प्रमाणानुसार पाण्याचा वर्षाव केला, आणि त्यास जमिनीवर साठवून ठेवले. पण (लक्षात ठेवा) आम्ही हे वरदान परत घेण्यासही समर्थ आहोत.'' २३:१७-१८

''ज्या (ईश्वरा)ने एकावर एक असे सात आकाश निर्माण केले. कृपावंत (अल्लाहच्या) निर्मितीमध्ये पाहणाऱ्याला कोणताही दोष असल्याचे आढळून येणार नाही. (एकदा पाहिल्याने दोष न आढळल्यास) पुन्हा एकदा पाहा की, तुम्हाला आढळतो का कुठे काही दोष?'' ६७:३

''तुम्ही कधी (चिंतनपूर्वक) अवलोकन केले नाही का की, अल्लाहने एकावर एक सात आकाश कशा प्रकारे पूर्ण संतुलनासह निर्माण केलेले आहेत? आणि (आकाशात) चंद्राला (प्रतिबिंबित) प्रकाश देणारा आणि सूर्याला दैदीप्यमान दीपक बनवले आहे, आणि (वनस्पतीप्रमाणे) वाढीस लावले.'' ७१:१५-१७

परमेश्वराने पृथ्वीवर अन्नपाण्याची योग्य सोय लावून मानवासाठी जीवनाधार प्रणाली निर्माण केली व त्यामुळे लांब अशा संतुलित प्रक्रियेचे चक्र निरंतर फिरत आहे. याच हेतूने ''(पाहा!) अल्लाहने तुमच्यासाठी पृथ्वीला कशा प्रकारे विस्तीर्ण बनवले आहे.'' ७१:१९

''आम्ही तुमच्यावर सात भक्कम आकाश निर्माण केले, आणि (आकाशात) एक अत्यंत तेजस्वी व उष्ण दीपक (सूर्य) स्थापित केले.'' ७८:१२

येथे तेजस्वी दीपक म्हणजेच सूर्य होय. कुराणाच्या भाष्यकारांमध्ये याबाबतीत एकमत आहे की उपरोक्त श्लोकांमधील 'सात' या संख्येचा अर्थ 'अनेकतेशिवाय', 'बाहुल्याशिवाय' दुसरे नाही.

''तो अल्लाहच तर होय की, ज्याने (एकावर एक अशी) सात आकाशे निर्माण केली व त्यांच्याचसारखी पृथ्वी पण (देखील). आकाश व पृथ्वीत (व्यवस्थेचे) आदेश (वेळोवेळी) प्रकट होत असतात, (आणि त्या आदेशांनुसार विश्वाचा हा प्रचंड कारखाना कार्यरत असतो) ते यासाठी की, तुम्हाला कळून यावे की, प्रत्येक वस्तुमात्रांवर अल्लाहचे पूर्ण नियंत्रण आहे, आणि अल्लाहने आपल्या ज्ञानाने प्रत्येक गोष्टीस वेढून ठेवलेले आहे.'' ६५:१२ असे अल्लाह वस्तुस्थितीचे भाकित करतो.

ज्या अर्थी सात (७) हा अंक अनिश्चित बाहुल्य इंगित करतो, त्या अर्थी असा निष्कर्ष काढणे शक्य आहे की तत्संबंधी कुराणाची संहिता हे स्पष्टपणे दर्शविते की एकापेक्षा जास्त पृथ्वींचे अस्तित्व या ब्रह्मांडात शक्य आहे – आमची ही वसुंधरा सोडून. या विश्वामध्ये इतरही पण निवास करतात.

एकविसाव्या शतकाच्या मानवासाठी कुराणाच्या वाचकांना ही वस्तुस्थिती आश्चर्यात टाकल्याशिवाय राहणार नाही की सृष्टीनिर्मित वस्तूंचे तीन गट आहेत. म्हणजेच,

१) आकाशांमधील निर्मिती,

२) पृथ्वीवरील निर्मिती, आणि

३) आकाश व पृथ्वी यांच्या दरम्यान असलेली निर्मिती.

यांपैकी काही श्लोक असे आहेत ह्न

''त्याने आकाशांना आणि पृथ्वीला आणि जे काही यांच्या दरम्यान आहे, त्या सर्वांना सहा दिवसांत (म्हणजेच सहा कालावधीत) निर्माण केले. मग त्याने समस्त विश्वाचे सत्ता केंद्र आपल्या नियंत्रणात घेतले. (तो आहे), कृपावंत (अल्लाह)!'' २५:५९

''तो अल्लाह आहे, ज्याने निर्माण केले आकाशांना आणि पृथ्वीला आणि जे काही यांच्या दरम्यान आहे त्या सर्वांना सहा दिवसांत, आणि मग तो राजसिंहासनावर विराजमान झाला.'' ३२:४

''आम्ही आकाश व पृथ्वी या दोहोंच्यामध्ये जे काही आहे, ते सर्व सहा दिवसांत (म्हणजे सहा कालखंडात) निर्माण केले आहे, आणि त्यामुळे आम्ही अजिबात थकलो नाही.'' ५०:३८

''आकाश व पृथ्वी आणि या दोहोंच्यामध्ये जे काही आहे ते सर्व'' याचा संदर्भ पुन्हा पुढील श्लोकांमध्ये आढळून येतो २१:१६; ४७:७,३८; ७८:३७; १५:८५; ४६:३; ४३:८५.

आकाशांबाहेरील (पलीकडे) आणि पृथ्वीबाहेरील सृष्टीचा, अनेकवेळा जो उल्लेख आलेला आहे, तो अनुभवनिरपेक्ष असल्यामुळे कल्पनातीत आहे. या तथ्याशी निगडित श्लोकांच्या आकलनासाठी, वैश्विक अति

(आकाश) गांगेय वास्तविकाच्या अस्तित्वासंबंधी अगदी अलीकडील मानवी निरीक्षणांचे संदर्भ लक्षात घ्यावे लागतील. अत्यंत साध्या तत्त्वापासून सुरू करून अति जटिल तत्त्वयुक्त अशा विश्वाच्या निर्मितीसंबंधी समकालीन विज्ञानाने ज्या कल्पना प्रस्थापित केल्या आहेत, त्या विचारात घ्याव्या लागतील.

तथापि, हे विशुद्ध वैज्ञानिक विवेचन संपवण्यापूर्वी सृष्टीनिर्मितीसंबंधी उपरोक्त विवेचनाचा गोषवारा देणे अप्रस्तुत ठरणार नाही. हा गोषवारा असा आहे–

१) सर्वसाधारणपणे विश्वनिर्मितासाठी सहा कालावधीचे अस्तित्व.

२) आकाश आणि पृथ्वीच्या निर्मितीमध्ये टप्प्यांचे अंतःपाशन (एकमेकांत गुंतणे)

३) आरंभी एक जड गोळ्याच्या रूपात विश्वनिर्मिती, मग तिचे दुभंगणे.

४) आकाश आणि पृथ्वीचे बाहुल्य.

५) आकाश व पृथ्वी यांच्या दरम्यान एक मध्यवर्ती सृष्टीची निर्मिती.

उपरोक्त कौराणिक तथ्यांचा वैज्ञानिक पडताळा तपासल्यास त्यांची वैज्ञानिकता पुढीलप्रमाणे दिसून येते –

१) कुराणप्रणीत आकाश आणि पृथ्वी यांच्या निर्मितीचे सहा कालखंड, यामध्ये खपिंड आणि पृथ्वी यांची घडण, आणि पृथ्वीचे तिच्यावर आपल्या जीवननिर्वाहासह मानवजातीचे वस्ती करून राहण्यापर्यंतचा पृथ्वीचा विकास या गोष्टी समाविष्ट आहेत. पृथ्वीच्या संदर्भात कुराणोक्त घटना या चार कालावधीमध्ये घडलेल्या (पूर्ण झालेल्या) आहेत. यामध्ये कदाचित आधुनिक शास्त्रज्ञांनी वर्णन केल्याप्रमाणे चार भूगर्भीय कालखंडाचे प्रतिबिंब पाहाता येऊ शकेल. मानवाचा उदय चतुर्थयुगीन कालखंडामध्ये झाल्याचे आपण जाणतोच. या प्रश्नाचे निश्चित असे उत्तर नसल्यामुळे हे एक विशुद्ध अनुमान – प्राक्‌कल्पना मात्र आहे.

तथापि हे लक्षात ठेवले पाहिजे की कुराणोक्त ४१:९–१२ मध्ये निर्दिष्ट विवेचनानुसार आकाशीय ग्रह (पिंड) आणि पृथ्वी यांची रचना दोन अवस्थांमध्ये झाली. जर आपण सूर्य आणि त्याची उप–फलोत्पत्ती पृथ्वी यांना एक उदाहरणस्वरूप घेतले (जे आपणास एकमात्र सुसाध्य आहे), तर विज्ञान आपणास असे सांगते की प्राथमिक तारामंडळा (नीहारिका)चे दृढीकरण आणि त्यांच्या विच्छेदाच्या एका प्रक्रियेमुळे यांची घडण झाली. हीच बाब तर कुराण स्पष्टपणे मांडते, जेव्हा ते निर्देश करते की एक आकाशीय 'धुरा'पासून एकीकरणाच्या प्रक्रियेने बनलेला एक गोळा व नंतर त्याचे विभक्तीकरण म्हणजे दुभंगणे या गोष्टी संपन्न झाल्या. म्हणून कुराणोक्त वस्तुस्थिती आणि विज्ञानाने (या संदर्भात) प्रस्तुत केलेली वस्तुस्थिती या दोघांमध्ये संपूर्ण सादृश्य आहे.

२) (सूर्यासारखा) एक ग्रह आणि (पृथ्वीसारखे) त्याचे उपग्रह यांच्या रचनेमध्ये दोन टप्प्यांचे अंतःपाशन (एकमेकांत गुंतणे) असते, हे विज्ञानाने दाखवून दिले आहे. हा आंतरसंबंध निश्चितपणे परीक्षित कौराणिक संहितेमध्ये सुस्पष्ट प्रमाण स्वरूपात विद्यमान आहे.

३) कुराणमध्ये निर्दिष्ट, विश्वाच्या आद्य अवस्थेमध्ये विद्यमान 'धूरा'चे अस्तित्व हे द्रव्याच्या मुख्यत्वेकरून वायूमय अवस्थेने बनलेले आहे. हे आधुनिक विज्ञानाने प्रस्तुत केलेल्या प्राथमिक तारामंडळा(नीहारिका)च्या संकल्पनेशी स्पष्टपणे सादृश्य आहे.

४) सात (७) या संख्येने कुराणाद्वारे निर्दिष्ट आकाशांची बहुलता (अनेकता) (ज्याचे विवेचन या अगोदर आलेलेच आहे) ही बाब (वस्तुस्थिती) आधुनिक विज्ञानाद्वारे बळकट झाली आहे. खगोलभौतिक शास्त्रज्ञांना आपल्या निरीक्षणामध्ये असंख्य अशा (आकाश) गांगेय संरचना आढळून आल्या. ही वस्तुस्थिती सप्ताकाशांसाठी पुरेसा पुरावा आहे. दुसरीकडे आपल्या वसुंधरेसारखी पृथ्वीची बहुलता (निदान काही विशिष्ट दृष्टिकोनातून) कुराणाच्या संहितेमधून निघालेली एक परिकल्पना (संकल्पना) आहे; परंतु ते सत्य असल्याचे अद्याप विज्ञानाद्वारे सप्रमाण सिद्ध झालेले नाही, तरी पण (तथापि) तज्ज्ञांना असे वाटते की हे अगदी संभाव्य (शक्य) आहे.

५) आकाश व पृथ्वी यांच्यादरम्यान एक मध्यवर्ती सृष्टीचे जगाचे अस्तित्व असल्याच्या कुराणोक्त निवेदनाची तुलना खगोलशास्त्रीय संरचनेच्या कक्षेपलीकडे अस्तित्वात असलेल्या द्रव्य–सेतूंच्या शोधाशी केली जाऊ शकते.

जरी कुराणोक्त वर्णनामध्ये उपस्थित सर्व प्रश्नांना वैज्ञानिक गृहीत गोष्टींमुळे संपूर्णपणे बळकटी प्राप्त होत नसेल; तरी पण ते काही का असेना सृष्टीशी – विश्वाशी निगडित कुराणोक्त गृहीत गोष्टी आणि विश्वाच्या रचनेविषयी आधुनिक ज्ञान यामध्ये विरोध मुळीच नाही. कौराणिक दैवी अवतरणासाठी ही वस्तुस्थिती अधिक महत्त्वपूर्ण अशी आहे. मात्र हे खरोखर स्पष्ट आहे की 'जुन्या करारा'च्या आधुनिक संहितेमध्ये याच घटनांशी – विषयांशी संबंधित गृहीत गोष्टी या वैज्ञानिक दृष्टीने अग्राह्य ठरतात. (आहेत.)

विश्वासंबंधी, पंधरा शतकापूर्वीची कुराणामधील अशी विधाने, अर्थातच स्वतः होऊन एखाद्या मानवी खुलाशास (स्पष्टीकरणास) वाव देत नाहीत.

## कुराणोक्त खगोलशास्त्र

### क) आकाशाविषयी सर्वसाधारण मनन

आकाशांविषयी मननासंबंधी भरपूर स्थळे कुराणामध्ये विद्यमान आहेत. जसे – ''अल्लाहने आकाशाची निर्मिती केली. कोणत्याही आधारस्तंभाविना, जे की, तुम्ही पाहू शकता. आणि त्यानेच पृथ्वीवर पर्वतांना स्थापित केले. यासाठी की, ती तुम्हाला घेऊन डोलायला लागू नये, आणि पृथ्वीवर सर्व प्रकारचे प्राणी पसरून ठेवले आहे. आणि आकाशातून पाण्याचा वर्षाव केला व त्याद्वारे विविध प्रकारच्या उत्तम वस्तू निर्माण केल्या.'' ३१:१० ''तो अल्लाह आहे, ज्याने आकाशांना कोणत्याही आधाराविना उंच उभे केले, ज्यांना तुम्ही पाहू शकाल. (म्हणजे तुम्हाला असा कोणताही आधार दिसत नाही, ज्यावर आकाश उभे आहे.), आणि तो (महाशक्तिमान) सिंहासनावर आरूढ झाला. (म्हणजे समस्त विश्वाचे नियंत्रण आपल्याकडे घेतले) त्यानेच सूर्य आणि चंद्राला (आपल्या) नियमांच्या अधीन केले. (त्याने) निर्धारित केलेल्या अवधीप्रमाणे प्रत्येक आपल्या क्रमानुसार चालत असतो. जे जे अस्तित्वात आहे त्यांना तोच नियंत्रित करतो.'' १३:२ याशिवाय पुढील श्लोक पाहता येतील – ५०:६; ५५:७; २२:६५.

तसेच दैवी आदेशाशी आकाशांची अधीनता पण व्यक्त करण्यात आली आहे. ''(त्यांना) विचारा, 'सप्त आकाश आणि ते महान सिंहासन यांचा स्वामी कोण आहे?' ते म्हणतील की, 'त्यांचा स्वामी अल्लाहच

(आहे.)'.'' २३:८७-८८ याशिवाय सूर्य, चंद्र, तारे, वृक्ष इत्यादींची पण अधीनता व्यक्त करण्यात आलेली आहे. जसे – ''सूर्य आणि चंद्र (त्यांच्या निर्मात्याने) नेमून दिलेल्या मार्गावर मार्गस्थ आहेत. तारे व वृक्ष त्याच्यासमोर नतमस्तक होतात (म्हणजे सर्व त्याच्या इच्छेला समर्पित आहेत.) त्यानेच आकाशाला (एका) उंच पातळीवर उभारून आणि (प्रत्येक गोष्टीसाठी) संतुलन स्थापित केले. म्हणून (हे मानवा) तू कदापी (अल्लाहद्वारे प्रस्थापित) संतुलन बिघडवण्याचे प्रयत्न करू नकोस.'' ५५:५-८ ''तोच दिवसाचा उदय घडवून आणतो, आणि त्यानेच विश्रांतीसाठी रात्र बनवली, आणि सूर्य व चंद्राला एका ठराविक कक्षेत कामाला लावले. सर्वशक्तिमान व सर्वज्ञ असलेल्या (अल्लाहने) हे ठरवून दिलेले आहे, आणि तोच आहे ज्याने तुमच्यासाठी (आकाशात) ताऱ्यांना स्थापित केले, म्हणजे त्याच्या साह्याने तुम्हाला जमीन आणि समुद्राच्या घोर अंधकारात मार्ग प्राप्त व्हावा.'' ६:९६ याच कोटीतील आणखी काही श्लोक आहेत – १४:३३; ४५:१३.

येथे एक श्लोक दुसऱ्यास पूर्ण बनवते. जसे ''सूर्य, तो ठरवून दिलेल्या कक्षेत भ्रमण करत असतो. तो सर्व शक्तिमान व सर्वज्ञ अशा (अल्लाहचा) नियम आहे, आणि आम्ही चंद्राच्या कला ठरवून दिलेल्या आहेत. तो हळूहळू क्षीण होत जातो, आणि शेवटी खजुरीच्या सुकलेल्या फांदीसारखा होऊन जातो. (भ्रमण करताना) ना सूर्य चंद्राला मागे टाकून पुढे जाऊ शकतो, ना रात्र दिवसाच्या वेळेला कमी करू शकते. सर्व (आमच्या नियमानुसार) आपापल्या कक्षेत गतिमान आहेत.'' ३६:३८-४० त्यानेच रात्र व दिवस आणि सूर्य व चंद्र यांना तुमच्या सेवेत कार्यरत केलेले आहे आणि तारेदेखील त्याच्या आज्ञेच्या अधीन आहेत. निश्चितच यात, संदेश असलेल्या खुणा आहेत; त्या लोकांसाठी जे आपल्या बुद्धीचा वापर करणारे आहेत.'' १६:१२; १६:१६; १०:५ पहावे.

### ख) आकाश-ग्रहांचे स्वरूप

**सूर्य आणि चंद्र :** ''मोठा वैभवशाली आहे तो ज्याने आकाशात नक्षत्रांचे पुंज बनवले आहेत, आणि त्यात (सूर्याच्या रूपाने) एक दैदीप्यमान दिवा व (शीतल) प्रकाश देणारा चंद्र ठेवून दिला आहे.'' २५:६१ ''तुम्ही कधी (चिंतनपूर्वक) अवलोकन केले नाही का की, अल्लाहने एकावर एक सात आकाश कशा प्रकारे पूर्ण संतुलनासह निर्माण केलेले आहेत? आणि (आकाशात) चंद्राला (प्रतिबिंबित) प्रकाश देणारा आणि सूर्याला देदीप्यमान दीपक बनवले आहे.'' ७१:१५-१६ ''आम्ही तुमच्यावर सात भक्कम आकाश निर्माण केले, आणि (आकाशात सूर्यरूपी) एक दीपक स्थापित केले.'' ७८:१२-१३

**तारे :** ''आम्ही पृथ्वीच्या जवळच्या आकाशाला नक्षत्रां(ताऱ्यां)नी सजवले आहे.'' ३७:६ ''आकाशांची शपथ आणि त्याची जो रात्री प्रकट होतो. रात्री प्रकटणारा तो काय आहे, तुम्हाला काय माहीत? तो प्रखर तेज असलेला तारा आहे.'' ८६:१-३

**ग्रह :** ''जेव्हा आकाश फाटून जाईल, आणि जेव्हा तारे विखरून जातील.'' ८२:१-२ ''जेव्हा त्याच्यावर रात्रीचा काळोख दाटला. तेव्हा त्याला एक तारा दिसला.'' ६:७६

**पृथ्वीजवळचे आकाश :** ''आम्ही पृथ्वीच्या जवळच्या आकाशाला नक्षत्रांनी सजवले आहे.'' ३७:६ ''आम्ही पृथ्वीसाठी सर्वांत जवळ असलेल्या आकाशाला (ताऱ्यांचे) दिवे लावून सुशोभित केले.'' ४१:१२

### ग) खपिंड व्यवस्था

सूर्य आणि चंद्राच्या कक्षांविषयी दोन महत्त्वपूर्ण श्लोक आहेत. ''तोच आहे (अल्लाह) ज्याने रात्र व दिवस आणि सूर्य व चंद्र निर्माण केले. प्रत्येक आपापल्या कक्षेत प्रदक्षिणा घालीत आहेत.'' २१:३३ ''(भ्रमण करताना) ना सूर्य चंद्राला मागे टाकून पुढे जाऊ शकतो, ना रात्र दिवसाच्या वेळेला कमी करू शकते. सर्व (आमच्या नियमानुसार) आपापल्या कक्षेत गतिमान आहेत.'' ३६:४०

**रात्रं दिवसाचा अनुक्रम :** ''तो रात्रीने दिवसाला झाकून टाकतो, (ते) एकमेकांच्या मागे वेगाने येत असतात. ७ : ५४ ''त्यांच्याकरिता आणखीन एक संकेत रात्र आहे, आम्ही तिच्यावरून दिवस हटवितो तेव्हा त्यांच्यावर अंधकार पसरतो.'' ३६:३७ ''काय तुम्ही पाहात नाही की अल्लाह रात्रीला दिवसात ओवीत आणतो आणि दिवसाला रात्रीत?'' ३१:२९ ''तोच दिवसावर रात्र आणि रात्रीवर दिवसाला गुंडाळतो.'' – ३९:५ ''तोच सूर्याच्या दोन्ही उदयस्थानांचा (पूर्व दिशांचा) व दोन्ही अस्तस्थानांचा (पश्चिम दिशांचा) मालक आहे.'' ५५:१७

### घ) आकाशाची उत्क्रांती

पवित्र कुराण आम्हाला अनेक वेळा आठवण करून देते की परमेश्वराने सूर्य आणि चंद्रास आपल्या अधीन केलेले आहे. प्रत्येक, ईश्वराने निर्धारित केलेल्या अवधीप्रमाणे आपल्या क्रमानुसार चालत असतो. हे विधान याप्रमाणे आहे – ''त्यानेच सूर्य आणि चंद्राला (आपल्या) नियमांच्या अधीन केले. (त्याने निर्धारित केलेल्या) अवधीप्रमाणे प्रत्येक आपल्या क्रमानुसार चालत असतो.'' १३:२. शिवाय ३१:२९; ३५:१३; ३९:५.

या व्यतिरिक्त, एक नियत स्थानाची संकल्पना ही इष्ट स्थळाशी निगडित आहे. ती कशी आहे हे पहा – ''सूर्य त्यास ठरवून दिलेल्या कक्षेत भ्रमण करत असतो. तो सर्व शक्तिमान, (व) सर्वज्ञ अशा (अल्लाहचा) नियम आहे, आणि चंद्राला आम्ही कला (टप्पे) ठरवून दिलेले आहेत. (भ्रमण करताना) ना सूर्य चंद्राला मागे टाकून पुढे जाऊ शकतो आणि ना रात्र दिवसाला मागे टाकून पुढे जाऊ शकते. ते सर्वजण (आमच्या नियमानुसार) आपापल्या कक्षेत तरंगत आहेत.'' ३६:३८–४०

'ठरवून दिलेली कक्षा' हे भाषांतर आहे 'मुस्तक़र्र' या शब्दाचे, आणि यात मुळीच शंका नाही की, 'एक अगदी बरोबर स्थळा'ची संकल्पना याच्याशी निगडित आहे.

आधुनिक विज्ञानाने प्रस्थापित केलेल्या गृहीतकांशी तुलना केल्यानंतर उपरोक्त विधाने किती चपखल वाटतात!

सूर्याची उत्क्रांती आणि त्याची एक नियत कक्षा यासंबंधी अंतिम सीमा निर्धारित असल्याचे कुराण निदर्शनास आणते. त्याचप्रमाणे चंद्रासाठी पण एक निर्धारित कक्षा घालून देण्यात आलेली आहे.

सूर्याचे परिभ्रमण त्याच्यासाठी निर्धारित कक्षेतच होत असते. आधुनिक खगोलशास्त्राने त्याचे निश्चित स्थान निर्धारण करण्यामध्ये यश प्राप्त केले आहे., आणि त्याला एक नाव पण दिले आहे, ते नाव आहे 'सौर शिखर'.

ही सर्व खगोलशास्त्रीय गृहीतके उपरोक्त तीन कौराणिक श्लोकांच्या तुलनेत उल्लेखनीय अशी आहेत, कारण असे विधान करता येणे शक्य आहे की त्या श्लोकांचा आशय हा संपूर्णपणे आधुनिक वैज्ञानिक गृहीतकांशी मेळ खाणारा असाच आहे.

**विश्वाचे प्रसरण**

पुढील कौराणिक श्लोकामध्ये परमेश्वर जे बोलत आहे, त्याची तुलना आधुनिक संकल्पनांशी कदाचित केली जाऊ शकेल – ''आकाशाला आम्ही स्वबळाने बनवले आहे, आणि निःसंशय, आम्हीच त्याचा सातत्याने विस्तार करत आहोत.'' ५१:४७

'आकाश' म्हणजे तंतोतंत लोकोत्तर जग किंवा परलोक होय.

**च) अवकाशावर विजय**

या दृष्टिकोनातून पवित्र कुराणामधील तीन श्लोक संपूर्णपणे लक्षवेधक ठरतात. या क्षेत्रात मानवाने काय प्राप्त करावे आणि तो काय प्राप्त करील, हे निःसंदिग्धपणे एक श्लोक अभिव्यक्त करतो. तर इतर दोन श्लोकांमध्ये, मक्केचे श्रद्धाहीन जरी आकाशामध्ये वर चढण्यात यशस्वी झाले तरी ते आश्चर्यचकित झाल्याशिवाय राहिले नसते. त्यांना अशक्यप्राय असलेल्या एका प्राक्–कल्पनेचा उल्लेख केला जातो.

१) यापैकी प्रथम श्लोक असे आहे –

''हे जिन्न व मानव समूहांनो! जर तुम्हाला (वाटत असेल) की, तुमच्याकडे आकाश व पृथ्वी यांच्या सीमा ओलांडून निघून जाण्याचे सामर्थ्य आहे, तर त्या ओलांडाच! पण तुम्ही त्या (आमच्या) परवानगीशिवाय ओलांडूच शकत नाही!'' ५५:३३

यात काही शंका नाही की, हे श्लोक असे निर्दिष्ट करते की एके दिवशी मानव, ज्याला आज आपण (कदाचित् अयोग्य पण वाटेल) 'अवकाशावर विजय' म्हणतो, तो प्राप्त करण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे लक्षात ठेवले पाहिजे की कुराणाची संहिता असे भाकित करते की मानवाचा केवळ आकाशामध्येच शिरकाव होणार नसून तो पृथ्वी अर्थात भूगर्भाच्या अति खोलवर आपली शोध मोहीम राबवील.

२) इतर दोन श्लोक आहेत १५:१४–१५. श्लोकांतर्गत मजकुराच्या संदर्भावरून असे वाटते की मक्केमधील श्रद्धाहीनांच्या बाबतीत परमेश्वर सांगत आहे–

''जर आम्ही त्यांच्यासाठी आकाशाचे एखादे द्वार उघडले असते, तर ते त्यातून वर चढून जाऊ लागले असते. तेव्हाही त्यांनी निश्चितपणे असे म्हटले असते, 'आमची तर नजरबंदी करण्यात आलेली आहे. आमच्यावर तर जादू करण्यात आली आहे'.'' – १५:१४ –१५

कल्पनातीत असे विलक्षण आश्चर्याचे जाहीर प्रदर्शन उपरोक्त श्लोक व्यक्त करते.

अवकाशावर विजयासंबंधी बोलताना कौराणिक संहितेचे दोन उतारे आहेत. त्यापैकी एक असे निर्दिष्ट करते की, एके दिवशी वास्तवात काय घडेल, यासाठी आवश्यक ते कौशल्य आणि कल्पक बुद्धीची देणगी परमेश्वर मानवास प्रदान करील; आणि दुसरा श्लोक त्या एक घटनेचे वर्णन प्रस्तुत करते की जे मक्केचे नास्तिक – श्रद्धाहीन कधीच पाहू शकणार नाहीत. म्हणून त्यांना त्याची कधीच अनुभूती येणार नाही. तथापि उपरोक्त

पहिल्या श्लोकाने सूचित केल्याप्रमाणे तथापि इतरांना मात्र ते बघता येऊ शकेल. अंतराळ उड्डाणवीरांना दिसणारी अनपेक्षित दृश्य पाहिल्यानंतर जी मानवी प्रतिक्रिया होते, तिचे वर्णन नोंदविताना : नजरबंदी – झिंगलेल्या अवस्थेमधील, जादूटोण्याचा प्रभाव इ. शब्द वापरलेले दिसतात.

इ. स. १९६१ मध्ये जगाभोवती सर्वप्रथम साहसी मानवी अंतराळ उड्डाण मोहीम संपन्न झाली. अंतराळवीरांना पण तंतोतंत अशाच प्रकारची अप्रतिम अनुभूती अनुभवायास मिळाली.

## पृथ्वी

पृथ्वीशी संबंधित श्लोक संपूर्ण कुराणभर विखुरलेले आहेत. त्यांचे वर्गीकरण करणे कठीण आहे, तथापि अधिक निश्चित अशा विषयांशी निगडित श्लोक वेचता येऊ शकतील. जसे – जलचक्र आणि समुद्र, पृथ्वीचा विस्तार, पृथ्वीचे वातावरण.

### अ) सर्वसाधारण विधानयुक्त श्लोक

''तोच तर आहे (तुमचा पालनकर्ता), ज्याने पृथ्वीला तुमच्यासाठी विसाव्याचे ठिकाण बनवले आणि आकाशाला छत बनवले.'' २:२२ ''त्याने पृथ्वीवर सर्व प्रकारच्या पशूंना वाढीस लावले.'' २:१६४ ''तोच आहे (अल्लाह) ज्याने पृथ्वीला विस्तृत केले, आणि तिच्यात पर्वत स्थापित (उभे) केले व नद्या (प्रवाहित केल्या) आणि यावर सर्व प्रकारच्या फळांना (व वनस्पतींना) जोडीच्या रूपाने (म्हणजे नर व मादी असे) निर्माण केले.'' १३:३ ''आम्ही पृथ्वीचा विस्तार केला आणि तिच्यामध्ये भक्कम पर्वत रोवून टाकले आणि तिच्यात प्रत्येक प्रकारचे (जीवन) संतुलित प्रमाणात वाढीस लागण्याची व्यवस्था केली, आणि (हे मानवा!) आम्ही तुझ्यासाठी (पृथ्वीवर) उदरनिर्वाहाची (सर्व आवश्यक साधने) उपलब्ध करून दिली, आणि त्यांच्याही उदरनिर्वाहाची व्यवस्था केली, ज्यांना तुम्ही निर्वाहाची सामग्री देत नाही. (म्हणजे मानवाखेरीज सर्व प्राणीमात्रांसाठी. (कारण अशी एकही वस्तू नाही जिचे खजिने (जिच्या असीम खाणी) आमच्याजवळ नसाव्यात. पण आम्ही ती एका निश्चित प्रमाणातच पाठवीत असतो. आम्हीच त्या वाऱ्यांना पाठवतो जे पाण्याने भरलेल्या ढगांना (आम्ही इच्छितो तिकडे) वाहून नेतात. मग आम्ही ढगांकडून पाण्याचा वर्षाव करतो, व त्याद्वारे तुम्हाला तृप्त करतो.'' १५:१९–२२ याशिवाय, २०:५३–५४; २७:६१; ६७:१५; ७९:३०–३३.

### ब) जलचक्र आणि समुद्रे

''तो अल्लाह आहे, जो वारे पाठवतो, आणि ते वारे ढगांना उंच नेतात. मग तो आपल्या इच्छेप्रमाणे आकाशात त्यांना पसरवून टाकतो, आणि तो त्यांची थरावर थर अशी मांडणी करतो. तेव्हा त्यांच्यामधून तुम्ही पाऊस पडताना पाहता. मग तो आपल्या भक्तांपैकी ज्यांच्यावर इच्छितो, त्यांच्यावर त्याचा वर्षाव करतो. तेव्हा पाहा, ते आनंदाने किती प्रफुल्लित होतात!'' ३०:४८ ''तो अल्लाह आहे, जो आपल्या कृपेआधी शुभवार्ता म्हणून (मोसमी) वारे पाठवीत असतो, आणि जेव्हा ते वारे आपल्या सोबत (पाण्याने भरलेले) ढग घेऊन येतात, तेव्हा आम्ही या ढगांना मृत जमिनीच्या दिशेने वळवतो. मग त्याद्वारे आम्ही जमिनीवर पाण्याचा वर्षाव

करतो, आणि त्यापासून आम्ही सर्व प्रकारची फळे निर्माण करतो. अगदी अशाच प्रकारे आम्ही मृतांना जिवंत करून बाहेर काढू. कदाचित तुम्ही या निरीक्षणावरून धडा घ्यावा, (ही अपेक्षा)'' ७:५७ ''(जेव्हाही) अल्लाह आकाशातून पाण्याचा वर्षाव करतो, त्याद्वारे ओढे आपापल्या व्याप्तीनुसार वाहू लागतात, आणि पुराचा प्रवाह पाण्याच्या पृष्ठभागावर उफाळणारा फेस वाहून आणतो.'' १३:१७ ''(सत्य नाकारणाऱ्यांना) सांगा, 'तुम्ही यावर कधी विचार केला आहात का की, जर तुमचे सर्व पाण्याचे साठे जमिनीत अचानक लुप्त झाले तर (अल्लाहशिवाय दुसरा) कोण आहे, जो तुमच्यासाठी शुद्ध पाणी उपलब्ध करू शकतो?'' ६७:३० ''आम्ही तिच्यात (मृतप्राय जमिनीत) खजुरीच्या व द्राक्षांच्या बागा निर्माण केल्या आणि तिच्यात (पाण्याचे) झरे प्रवाहित केले.'' ३६:३४ ''(लोकांनो!) तुम्हाला याची जाणीव नाही का की, अल्लाह आकाशातून (ढगांद्वारे) पाण्याचा वर्षाव करतो. मग जमिनीत पाण्याचे झरे प्रवाहित करतो. तोच जमिनीवर नानाविध रंगांच्या वनस्पती उगवतो. नंतर जेव्हा त्या सुकून जातात, तेव्हा त्या तुम्हाला पिवळ्या झालेल्या दिसतात. मग तो त्यांचा अगदी भुसा करून टाकतो. खरोखर या (खुणांमध्ये) संदेश आहेत, बुद्धीचा वापर करणाऱ्या लोकांसाठी.'' ३९:२१ ''(लोकांनो!) तुम्ही जे पाणी पीत असता, त्याबद्दल तुम्ही कधी चिंतन केले आहे का? तुम्ही त्याचा ढगांद्वारे वर्षाव करता की, आम्ही आहोत त्याचा वर्षाव करणारे? आम्ही इच्छिल्यास त्यास खारट (व कडू) बनवू शकतो. तर मग तुम्ही आमच्या प्रती आभार का व्यक्त करत नाही?'' ५६:६८-७०. शिवाय ५०:९-११; २३:१८-१९; १५:२२; २५:९; २५:४८-४९; ४५:५.

''आणि तोच होय, ज्याने दोन समुद्रांना मिळवून ठेवले आहे. एक चवदार व गोड आणि दुसरे कडू व खारे, आणि दोघांच्या दरम्यान एक अडसर व एक मोठा विभाजक बांध उभा केला आहे, ज्याने त्यांना सरमिसळ होण्यापासून रोखले आहे.'' २५:५३ ''तो अल्लाहच तर आहे ज्याने तुमच्यासाठी समुद्रास अधीन केले, जेणे करून नौकांनी त्याच्या आज्ञेने त्यावर संचार करावा, आणि तुम्ही त्याचा कृपाप्रसाद शोधावा व तुम्ही कृतज्ञता व्यक्त करावी.'' ४५:१२ तसेच, १७:६६; ३१:३१

तोच आहे, ज्याने समुद्राला तुमच्या सेवेत लावले, म्हणजे तुम्हाला त्यातून ताज्या मांसाचे भक्षण करता यावे, तसेच त्यातून जडजवाहीर, जे तुम्ही लोक परिधान करत असता, तेही काढता यावे, आणि (त्याच समुद्रावर तुम्हाला (हेही) पाहायला मिळते की, नौका कशा प्रकारे समुद्राला फाडून वाहत आहेत. (ही सर्व व्यवस्था तुमच्या अधीन आहे) म्हणजे तुम्ही त्याच्या कृपेचा शोध घ्यावा, आणि (त्याचे) आभार मानावे. १६:१४ ''(त्याच्यासाठी समानता व विविधता निर्माण करणे ही साधी गोष्ट आहे.) आणि दोन समुद्र एकसारखे नाहीत. एक (असा आहे की, ज्याचे पाणी) स्वादिष्ट, गोड व पिण्यास रुचकर व तहान भागवणारे असे आहे. तर दुसरा खारट व कडू. तुम्ही दोन्ही समुद्रातून (मासे पकडून) ताजे मांस खात असता, आणि त्यातून अशा अलंकारिक वस्तूंना काढत असता जे तुम्ही धारण करता, आणि (त्या दोन्ही समुद्रांत) नौका त्या लहान लाटांना चिरून पुढे कशा जातात हे दृश्य तुम्ही पाहात असता. (हे सर्व) यासाठी आहे की, तुम्ही त्याच्या कृपेचा शोध घ्यावा आणि त्याद्वारे तुमच्यामध्ये त्याच्या प्रति कृतज्ञतेचा भाव नेहमी संचार करत राहावा.'' ३५:१२ या व्यतिरिक्त १४:३२; ३१:३१; ५५:२४; ३६-४१-४४; २५:५३; ५५:१९-२०,२२.

### क) पृथ्वीचा विस्तार

"(पाहा!) अल्लाहने तुमच्यासाठी पृथ्वीला कशाप्रकारे विस्तीर्ण बनवले आहे. यासाठी की, तुम्हाला तिच्या खुल्या मार्गावर संचार करता यावा, (म्हणजे अशी तिची रचना केली.)" ७२:१९-२० "पृथ्वीचा विस्तार ही आम्हीच केलेले आहे, आणि किती (उत्तम संतुलनासह) आम्ही तिचा विस्तार केलेला आहे!" ५१:४८ आणि त्यानंतर पृथ्वीला विस्तीर्ण केले, आणि तिच्यातून तिचे पाणी व चारा निर्माण केला, आणि पर्वतांना तिच्यावर भक्कमपणे रोवले (स्थापित केले)." ७९:३०-३२ याशिवाय, ८८:१९-२०; ७८:६-७; ३१:१०; १६:१५; २१:३१.

### ड) पृथ्वीचे वातावरण

"तोच आहे जो तुम्हाला (आकाशात) विजा कडाडत (असल्याचे दृश्य) दाखवतो. ज्या द्वारे भय वाटू लागते, तसेच आशाही जागृत होते, आणि तोच आहे (अल्लाह) जो पाण्याने भरलेल्या ढगांना उंचावर नेतो, आणि मेघगर्जना त्याची स्तुती करत, त्याच्या पावित्र्याचे गुणगान करत असतात. तो कोसळणाऱ्या वीजा पाठवितो आणि इच्छितो त्यावर त्याद्वारे प्रहार करतो." १३:१२-१३ "तुम्ही हे (चिंतनपूर्वक) पाहिले नाही का? अल्लाह ढगांना हाकून नेत असतो. मग त्यांना एकत्र करतो. मग त्यांचे थरावर थर रचतो, आणि मग तुम्हाला त्यातून पाऊस पडताना दिसतो, आणि आकाशात (गोठलेल्या) ढगांचा पर्वतच एकत्रित करून त्यातून तो गारांचा वर्षाव करतो. ज्या (भूभागावर) इच्छितो, तिथे त्यांचा वर्षाव करतो, आणि ज्या (भूभागावर) त्यांचा वर्षाव करावयाचा नाही, तिथून (त्या ढगांना) हाकून नेतो. त्याच्या विजेची चमक इतकी प्रखर असते की, असे वाटते की, ती (लोकांची) दृष्टी हिरावून घेते की काय? तो अल्लाह आहे, जो रात्र आणि दिवस यांना एका पाठोपाठ आणत असतो. खरोखर, यात बोध आहे, त्या लोकांसाठी जे बोध ग्रहण करण्यासाठी डोळ्यांचा वापर करतात." २४:४३-४४ (सत्य नाकारणाऱ्या लोकांनी) या गोष्टीचे कधी निरीक्षण केले नाही का की, अल्लाहने जे काही निर्माण केलेले आहे, त्यांच्या छाया (सावल्या) उजवीकडे किंवा डावीकडे, वाकून (कशाप्रकारे) अल्लाहसमोर पूर्ण नम्र भावाने नतमस्तक होत आहेत. कारण आकाशातील प्रत्येक वस्तू किंवा पृथ्वीवरील सर्व प्राणीमात्र अल्लाहसमोरच नतमस्तक होत असतात." १६:४८-४९ "तुम्ही पाहिले नाही की तुमचा पालनकर्ता कशाप्रकारे सावली पसरवितो? जर त्याने इच्छिले असते तर तिला त्याने कायमस्वरूपी सावली बनवले असते. आम्ही सूर्याला त्यावर पुरावा बनवले. मग (जसजसा सूर्य वर येत जातो) आम्ही त्या सावलीला हळूहळू आमच्याकडे आवळीत जातो." २५:४५-४६ शिवाय, ६:१२५; १३:१२-१३; १६:८१.

## प्राणी आणि वनस्पती जग

### क) सजीवांचे उगम (उत्पत्ती)

"प्रत्येक सजीवाला आम्ही पाण्यापासून निर्माण केले." २१:३० "(लोकांनो!) याच मातीद्वारे आम्ही तुम्हाला निर्माण केले." २०:५५ "अल्लाहने प्रत्येक सजीवाला पाण्यापासून निर्माण केले, त्यांच्यात काही असे आहेत, जे आपल्या पोटांवर चालतात (अर्थात सरीसृप), आणि काही दोन पायांवर (म्हणजेच मानव व पक्षी)

चालणारे आहेत आणि काही चार पायांवर (म्हणजेच जनावरे, पशू) चालणारे आहेत. अल्लाह निर्माण करतो, जे तो इच्छितो. अल्लाह सर्व काही करू शकतो यात मुळीच शंका नाही.'' २४:४५

सजीवांच्या सर्वसाधारण उगमाविषयी असो, किंवा वनस्पतींना जन्म देणारे तत्त्व असो वा प्राण्याचं आदिकारण असो, सजीवांच्या उगमासंबंधी सर्व कुराणोक्त विधाने ही आधुनिक वैज्ञानिक सिद्धान्तांशी संपूर्णपणे मेळ खाणारी अशी आहेत. कुराण अवतरित होण्याच्या काळी सजीवांच्या उत्पत्तीशी संबंधित ज्या काल्पनिक वा पुराणकथा प्रचलित होत्या त्यांपैकी कुणाचाही उल्लेख पवित्र कुराणामध्ये नाही.

**ख) वनस्पती जग**

वनस्पती जगामधील संतुलन, विविध फळांच्या विविध चवी, वनस्पती जगातील पुनरुत्पादन या विषयांशी संबंधित उल्लेख व विवेचन पवित्र कुराणामध्ये अनेक ठिकाणी आलेले आहे. जसे – ''तोच आहे ज्याने आकाशातून (ढगांद्वारे) पाण्याचा वर्षाव केला, आणि त्यातूनच तुम्हाला पिण्याचे पाणी मिळते, आणि त्यापासूनच झाडाझुडपांची वाढ होते, ज्यात तुम्ही (आपली गुरेढोरे) चारता, आणि आणि तो त्यापासूनच तुमच्यासाठी धान्य, जैतून, खजूर, द्राक्षे व सर्व प्रकारची फळे निर्माण करतो.'' १६:१०–११ ''तोच आहे ज्याने आकाशातून पाण्याचा वर्षाव केला, मग त्याद्वारे सर्व प्रकारच्या वनस्पती उगविल्या, मग त्याद्वारे हिरवीगार शेते व झाडे उगविली, मग त्याच्यापासून थरावर थर असलेले दाणे काढले आणि खजुराच्या फुलोऱ्यांतून फळांचे घोसच्या घोस उत्पन्न केले जे ओझ्यापायी झुकले जात आहेत आणि द्राक्षे, जैतून व डाळिंबाच्या बागा, ज्यांची फळे एक दुसऱ्याशी साम्य तर ठेवतात तरीसुद्धा त्यांची वैशिष्ट्ये वेगवेगळी आहेत. या झाडांना जेव्हा फळे येतात तेव्हा फळे येण्याची व मग ती पिकण्याची प्रक्रिया जरा विचारपूर्वक पाहा, या गोष्टीत संकेत आहेत त्या लोकांसाठी जे श्रद्धा ठेवतात.'' ६:९९ ''आकाशांतून आम्ही समृद्धशाली जल उतरवले, मग त्यापासून बागा आणि धान्याची पिके आणि उंच उंच खजुरीची झाडे निर्माण केली. ज्यांना फळांनी भरलेले घड थरावर थर लागतात. अशी व्यवस्था आहे दासांना उपजीविका देण्याची. या पाण्याने आम्ही एका मृत जमिनीला जीवन प्रदान करतो (मेलेल्या माणसांचे जमिनीतून) निघणेसुद्धा अशाच प्रकारे प्रकारचे असेल.'' ५०:९–११ ''तोच आकाशातून (ढगांद्वारे) पाणी वर्षवितो, आणि त्याद्वारे आम्ही विविध प्रकारच्या वनस्पती निर्माण करतो. तर त्यातून तुम्ही खा आणि आपल्या गुराढोरांना चारा. खरोखर, यामध्ये बुद्धी बाळगणाऱ्या लोकांसाठी संदेश असलेल्या खुणा आहेत.'' २०:५३–५४ ''तुम्ही पाहता जमीन कोरडी आणि निर्जीव असते. पण जेव्हा तिच्यावर आम्ही पाण्याचा वर्षाव करतो, ती (अचानकपणे) सचेत होऊन फुलू लागते आणि (आम्ही) तिच्यातून सर्व प्रकारच्या नयनरम्य वनस्पती उगवतो.'' २२:५. तसेच, ३१:१०; १३:३; ६:९५; ३६:३६.

**ग) प्राण्याचे जग**

प्राणी जगतातील प्रजोत्पादन, विभिन्न प्राणी–समुदायांचे अस्तित्व, मधमाशा, कृमी–किटकांचे विश्व जसे कोळी, पक्षी, प्राण्याचे दुधाचे घटक यासंबंधी माहिती पण कुराणामध्ये विद्यमान आहे. जसे, ''त्यानेच पशुधनाचीही निर्मिती केली आणि तुम्ही त्यांच्यापासून (उबदार) वस्त्रे आणि इतर (अनेक) लाभही प्राप्त करता,

आणि त्यांच्यापैकी काहींचे (तुम्ही अन्न म्हणून) भक्षणदेखील करता, आणि (त्या दृश्यात) तुमच्यासाठी नयनरम्यता देखील आहे. जेव्हा तुम्ही सायंकाळी त्यांना (चारून) घरी घेऊन येता व सकाळी चरण्यासाठी सोडून देता आणि तुमची ओझी (विविध) ठिकाणी वाहून नेतात, जिथे तुम्हाला (स्वतः) वाहून न्यायचे असेल तर तुम्ही फार कष्ट सोसल्याशिवाय वाहून नेऊ शकणार नाही. निःसंदेह तुमचा पालनकर्ता फार कनवाळू दयाळू आहे, आणि त्यानेच घोडे, खेचरे आणि गाढवे निर्माण केली आहेत; ती यासाठी की, तुम्ही त्यांच्यापासून स्वारीचे काम घ्यावे, तसेच ती तुमच्या शोभेची साधने व्हावीत. आणि तो अशांचीही निर्मिती करतो, ज्यांच्याबद्दल तुम्हाला (सध्या) ज्ञान नाही.'' १६:५-८. ''त्यानेच नर व मादी अशा जोड्या निर्माण केल्या. (केवळ) एका वीर्यबिंदूपासून जेव्हा तो (मादीच्या गर्भाशयात) टाकला जातो.'' ५३:४५-४६ ''जमिनीवर चालणारा कोणताही प्राणी असो किंवा आपल्या दोन पंखावर उडणारा कुठलाही पक्षी असो, (याशिवाय दुसरे काही नाही की), ते सर्व तुमच्याप्रमाणेच (अल्लाहने निर्माण केलेल्या) प्राणीमात्रांपैकी (विविध) समुदाय (समूह) आहेत.'' ६:३-८. ''आणि (पाहा कशाप्रकारे) तुमच्या पालनकर्त्याने मधमाशीला अंतःप्रेरणा दिली की डोंगरात, झाडांमध्ये आणि (लोक) उभारतात त्या मांडवात तू आपले पोळे बनव, आणि मग सर्व प्रकारच्या फळांचे (व फुलांचे) रस शोषित राहा. तिच्या पोटातून विविध रंगी पेय (म्हणजेच मध) बाहेर पडतो, जो लोकांसाठी आरोग्यदायी आहे (म्हणजे त्यात तसे गुणधर्म आहेत). खरोखर यामध्येही एक संदेश असलेली खूण आहे, चिंतन करणाऱ्या लोकांसाठी.'' १६:६८-६९. ''ज्या लोकांनी अल्लाहला सोडून इतरांना आपला रक्षणकर्ता मानले, त्याचे उदाहरण कोळ्यासारखे आहे. जो स्वतःसाठी घर बनवतो, पण सर्वांत तकलादू घर कोळ्याचेच असते. कदाचित त्यांना या (वास्तवाची) जाणीव झाली असती.'' २९:४१ (सत्य नाकारणाऱ्या लोकांनी) आकाशात या गोष्टीचे कधी निरीक्षण केले नाही का, की (अल्लाहने) पक्षांना कशा प्रकारे (आकाशाच्या) वातावरणात उडण्याचे सामर्थ्य प्रदान केलेले आहे. त्यांना अल्लाहशिवाय कोणीही रोखून धरलेले नाही. खरोखर, यात त्या लोकांसाठी संदेश असलेल्या खुणा आहेत, जे विश्वास ठेवणारे (श्रद्धावंत) आहेत. १६:७९ ''ते त्यांच्यावर उडणाऱ्या पक्ष्यांचे कधी (चिंतनपूर्वक) अवलोकन करत नाहीत का, जे आपले पंख पसरवितात आणि (गरजेनुसार) ते आत मिटून घेत असतात. त्यांना थांबवून ठेवणारा कृपावंत (अल्लाहशिवाय) दुसरा कोणीच नाही. कारण तोच सर्व गोष्टींवर नजर ठेवून असतो.'' ६७:१९ ''तसेच गुराढोरांमध्येही निश्चितपणे तुमच्यासाठी बोध आहे. त्यांच्या पोटात असलेल्या शेण व रक्त यांच्यामधून बाहेर काढून तुम्हाला पिण्यासाठी शुद्ध दूध उपलब्ध करवितो. पिणाऱ्यांसाठी स्वादिष्ट असे दूध!'' १६:६६

खरोखर किती महान आहे तो अल्लाह! ज्याने गाई, म्हशी इत्यादी प्राण्यांना ओल्या किंवा सुक्या गवताला चक्क स्वादिष्ट दुधात परिवर्तित करणाऱ्या मशीनच (यंत्रेच) बनवलेल्या आहेत.

**मानवी प्रजोत्पादन :**

वीर्याच्या एका क्षुल्लक बिंदूपासून गर्भधारणा, गर्भधारक द्रव्याचे घटक, जननेंद्रियांमध्ये अंडकोशाचे रोपण, गर्भाशयामध्ये भ्रूणाची उत्क्रांती (विकास), कामभावनेची माहिती इत्यादी सारख्या मानवजन्मापूर्वीच्या घटकांची

माहिती पण पवित्र कुराणामध्ये प्राप्त होते. ही सर्व माहिती वैज्ञानिक तत्त्वे वा सिद्धान्तांशी सुसंगत अशीच आहे. जसे–

''वास्तविक पाहता, त्यानेच तुम्हाला विविध अवस्थांमधून नेऊन, निर्माण केलेले आहे.'' ७१:१४ ''हे मानवा! आपल्या कृपावंत पालनकर्त्याविषयी तुझी कोणत्या गोष्टीने फसवणूक केली आहे? ज्याने तुला निर्माण केले, मग तुझ्या शरीरातील अवयवांची संतुलित अशी रचना करून तुला घडवले. ज्या रूपात इच्छिले तसे तुला रूप दिले.'' ८२:६–८

''त्यानेच मानवाला (केवळ) एका वीर्याच्या थेंबापासून निर्माण केले. पण (हाच तुच्छ थेंबापासून निर्मित मानव) एकदम धडधडीत भांडखोर बनला.'' १६:४ ''प्रथमतः तो (मानव) गर्भाशयात टाकल्या गेलेल्या वीर्याचा एक बिंदू नव्हता का? वीर्यापासून पुढे तो गुठळी झाला, मग अल्लाहने त्यास घडवले व पूर्ण संतुलनासह त्याच्या अवयवांची रचना केली, आणि त्याचे दोन प्रकार बनवले. म्हणजे नर व नारी.'' ७५:३७–३९ ''आम्ही मानवाला मातीच्या सत्त्वापासून निर्माण केले. मग आम्ही त्यास वीर्याच्या एका बिंदूच्या रूपात, एका सुरक्षित स्थानी (म्हणजेच गर्भाशयात) ठेवले. मग आम्ही त्या वीर्याला गोठलेल्या रक्ताच्या रूपात विकसित केले, आणि पुढे आम्ही त्यास मांसाच्या गोळ्याच्या रूपात विकसित केले. पुढे आम्ही मांसाच्या त्या गोळ्यात हाडे विकसित केली, आणि आम्ही त्या हाडांवर मांसाचे आवरण चढवले. मग (शेवटी) त्याला एक नवीन निर्मितीच्या रूपाने घडवून टाकले. खरोखर, प्रशंसनीय आहे अल्लाह, सर्वोत्तम निर्मितीकार!'' २३:१२–१४

''माणसाने विचार करायला हवा की, त्यास कशापासून निर्माण करण्यात आलेले आहे. त्याला अशा पाण्यापासून (म्हणजे वीर्यबिंदूपासून) निर्माण करण्यात आले, जो उचंबळून, पाठीतून व उराच्या हाडांमधून निघतो. निःसंदेह, तोच त्याला पुन्हा जिवंत करण्याचे सामर्थ्य बाळगतो.'' ८६:५–८ ''त्याने मानवाच्या निर्मितीची सुरुवात मातीपासून केली. मग मानवाचा वंश त्याने (वीर्यरूपी) तुच्छ द्रवाच्या सत्त्वाद्वारे पुढे सुरू ठेवला. मग त्याने त्याची घडवणूक केली, आणि आपल्या आत्म्याची फुंकर मारली, आणि (अशा प्रकारे हे मानवा) त्याने तुला कान, डोळे आणि बुद्धी या गोष्टी प्रदान केल्या (म्हणजे हे गुण असलेला परिपूर्ण माणूस बनून तू तयार झालास). पण तुम्ही लोक अल्प कृतज्ञता व्यक्त करता.'' ३२:७–९ ''(लोकांनो!) आम्ही तुम्हांस एका तुच्छ वीर्यबिंदूपासून निर्माण केलेले नाही का? मग त्यास एका सुरक्षित ठिकाणी ठेवले (म्हणजे गर्भाशयात). एका निर्धारित मुदतीपर्यंत. अशा प्रकारे आम्ही (गर्भाच्या) वाढीचे टप्पे निश्चित केले. होय! आम्ही किती कुशल रचनाकार आहोत!'' ७७:२०–२३. तसेच, ७६:२; ३२:८.

''आम्ही तुमच्यापैकी प्रत्येकाला, सुरुवातीला मातीपासून (म्हणजे मातीतील घटकांपासून) निर्माण केले. मग वीर्याच्या एका बिंदूपासून, नंतर गोठलेल्या रक्तापासून, मग गर्भातील मांसाच्या गोळ्यापासून जे काही अंशी आकारयुक्त व काही अंशी आकार नसलेल्या अवस्थेत असतो (अशा विविध अवस्थेतून नेऊन तुमची निर्मिती) यासाठी केली की, तुम्हाला (आमच्या सामर्थ्याची) जाणीव व्हावी, आणि आम्ही ज्यास (जन्म देऊ इच्छितो) त्यास एका निर्धारित अवधीपर्यंत (मातेच्या) गर्भाशयात राहू देतो. मग तुम्हास बाळाच्या रूपात बाहेर आणतो (व जगण्याची संधी प्रदान करतो) यासाठी की (तुमच्यापैकी काहींना) परिपक्वतेच्या वयापर्यंत पोहोचता यावे. तुमच्यापैकी काही (बालपणीच) मृत्यू पावतात आणि काही वार्धक्याची शेवटची पातळी गाठतात, तेव्हा त्याची

अवस्था अशी होते, एकेकाळी जी गोष्ट ते चांगल्या प्रकारे जाणायचे, पण या वार्धक्याच्या अवस्थेत त्यांना काही उमजत नाही.'' २२:५ ''तोच आहे ज्याने (प्रथम) तुम्हाला मातीपासून, नंतर वीर्यापासून, मग पुढे, रक्ताच्या गुठळीपासून निर्माण केले. मग तो तुम्हाला अर्भकाच्या रूपात बाहेर काढतो. मग तो तुम्हाला वृद्धावस्थेकडे घेऊन जातो. पण तुमच्यापैकी काही (यापूर्वीच) मृत्यू पावतात. (अशा प्रकारे प्रत्येकजण) आपापली नियत अवधी गाठतो. (विविध अवस्थेतून हा जीवनाचा प्रवास आणि मृत्युरूपी शेवट हे सर्व) यासाठी आहे की, तुम्ही यावर चिंतन करावे.'' ४०:६७ याशिवाय, ९६:१-२; ७५:३७-३८; २३:१३; ७७:२१

''अल्लाहने तुमच्यापैकी (प्रत्येकाला) मातीपासून (म्हणजेच मातीतील रासायनिक घटकांपासून) निर्माण केले आहे. मग शुक्राच्या एका बिंदूपासून (मानवी वंश पुढे सुरू ठेवले). मग त्याने (स्त्री-पुरुषांच्या रूपाने) तुमच्या जोड्या बनविल्या, आणि त्याचे ज्ञान (व परवानगीशिवाय) कोणतीही स्त्री गर्भधारणा करत नाही, ना ती (बाळ) जन्माला घालते. तसेच कोणालाही (योगायोगाने) ना दीर्घायुष्य लाभते, ना कोणाला कमी आयुष्य, तर जे घडते ते (अल्लाहच्या) हुकूमनाम्यात (आदेशात) नमूद असल्याप्रमाणे घडते. आणि निःसंशय, अल्लाहसाठी ही अगदी सोपी गोष्ट आहे.'' ३५:११ तसेच, ७५:१९; ५३:४५-४६; २३:१४; २२:५; ३२:९.

''माणसाने विचार करायला हवा की, त्यास कशापासून निर्माण करण्यात आलेले आहे. त्याला अशा पाण्यापासून (म्हणजे वीर्यबिंदूपासून) निर्माण करण्यात आले, जो उचंबळून पाठींतून व उराच्या हाडांमधून निघतो. निःसंदेह, तोच त्याला पुन्हा जिवंत करण्याचे सामर्थ्य बाळगतो.'' ८६:५-८ ''ते तुम्हाला (स्त्रियांच्या) मासिक पाळीविषयी विचारतात, तुम्ही त्यांना सांगा, 'तो एक अस्वच्छ अवस्थेचा (काळ) आहे.' म्हणून त्या मासिक पाळीच्या काळात स्त्रियांपासून (स्वतःला) दूर ठेवा, जोपर्यंत त्या स्वच्छ होत नाहीत, आणि त्या (मासिक पाळी पूर्ण करून) स्वच्छ व शुद्ध झाल्यावर, तुम्ही अल्लाहने जशी तुम्हाला आज्ञा केलेली आहे, त्यानुसार त्यांच्याकडे जा. निश्चितच अल्लाह त्यांना पसंत करतो जे त्याच्याकडे पश्चातापासह वळतात, आणि जे स्वतःला स्वच्छ व शुद्ध ठेवतात त्यांनाही (तो) पसंत करतो. तुमच्या पत्नी तुमच्यासाठी शेतजमिनीप्रमाणे आहेत, म्हणून तुम्हाला जेव्हा व जसे आवडेल तेव्हा व तसे जमिनीकडे जा, आणि स्वतःकरिता (चांगले कृत्य) पुढे पाठवा आणि अल्लाहचे भय बाळगा, आणि तुम्हाला त्याच्यासमोर हजर व्हायचे आहे, हे नीट लक्षात असू द्या. (पैगंबर) जे आज्ञा पाळत आहेत त्यांना शुभ वार्ता द्या.'' २:२२२-२३ ''उपवासाच्या रात्री तुमच्या पत्नीकडे जाणे तुमच्यासाठी वैध ठरविण्यात आले आहे. त्या तुमच्यासाठी पोषाखाप्रमाणे आहेत आणि तुम्ही(ही) त्यांच्यासाठी पोषाखाप्रमाणे आहात. तुम्ही स्वतःचीच फसवणूक करत होता याची अल्लाहला जाणीव आहे. म्हणून त्याने तुमच्यावर कृपादृष्टी केली आणि तुम्हाला क्षमा केली. तर आता तुम्ही त्यांच्याकडे (पत्नींकडे) जा, आणि अल्लाहने तुमच्यासाठी जे काही नेमून दिले आहे त्यासाठी प्रयत्नरत राहा. आणि जेव्हा तुम्ही मशिदीमध्ये एकांतवासीय उपासना करत असाल (त्या काळात) रात्री त्यांच्याकडे (पत्नींकडे) जाऊ नका. या अल्लाहने घालून दिलेल्या मर्यादा आहेत. म्हणून त्या मर्यादांना ओलांडण्याचा प्रयत्न करू नका. अशा प्रकारे अल्लाह आपले आदेश सुस्पष्टपणे देत आहे, यासाठी की, लोकांनी दुष्कृत्यापासून स्वतःला दूर ठेवावे.'' २:१८७

धर्म आणि विज्ञान यामधील संबंध स्थळ–काळ विशेष नेहमी एकसारखे राहिलेले नाही. कुराणोक्त गोष्टी (तथ्ये) आणि विज्ञान यामधील संबंध अनुभव निरपेक्ष असा आहे, विशेषतः जेव्हा हा संबंध असमतोल नसून संतुलित असा असल्याचे दिसून येते, तेव्हा एक प्रकारचे आश्चर्य वाटते. कोणत्याही एका एकेश्वरवादी धर्माशी निगडित लिखाणाने विज्ञानाला निराकृत केले नाही. इंजिल अर्थात बायबलमध्ये विज्ञानाच्या दृष्टीने मोठ्या चुका आढळून येतात; मात्र याबाबतीत एक पण चूक कुराणामध्ये आढळून येत नाही, असे परखड मत इस्लामचे गाढे अभ्यासक व फ्रेंच विद्वान मॉरिस बुकैल्ले यांनी आपला सुप्रसिद्ध ग्रंथ ''दि बायबल, दि कुरआन अँड सायन्स'' मध्ये नोंदविले आहे.

११

प्रकरण ११

# विश्वरचना–विचार : दार्शनिक दृष्टिकोन (भारतीय व पाश्चात्त्य)[४७]

**विश्वशास्त्र : विश्वरचना विचार म्हणजे काय?**

सुव्यवस्थित विश्वाचा विचार अथवा शास्त्र म्हणजेच विश्वरचना विचार. 'विश्व' ही कल्पनाच सुसंघटितपणा वा सुव्यवस्था या कल्पनेवर आधारलेली आहे. त्यामुळे ती 'निर्व्यवस्थित जगा'च्या कल्पनेशी विरोधी अशी आहे. विश्वाच्या सुव्यवस्थित स्वरूपाचे वर्णन व स्पष्टीकरण करणे हे विश्वरचनाविचाराचे उद्दिष्ट मानता येईल. विश्वाचा अभ्यास वैज्ञानिक व तात्त्विक अशा दोन्ही दृष्टिकोनांतून करता येणे शक्य आहे. यामुळे विश्वरचना विचाराचे दोन भिन्न प्रकार होतात : एक वैज्ञानिक कल असणारा व दुसरा तात्त्विक कल असणारा.

**१) वैज्ञानिक विश्वरचना–विचार :** विश्वरचना विचार ही विश्वाचा भागशः अभ्यास न करता, सर्व विश्वाचा संकलित विचार करणारी अशी पदार्थविज्ञान शास्त्राची एक शाखाच आहे असे शास्त्रज्ञ मानतात. शास्त्रीय (वैज्ञानिक) विश्वरचना विचार हा विश्वरचनेच्या काही नमुन्यांपासून (म्हणजेच काही वैचारिक आराखड्यांपासून) सुरू होतो. नंतर त्या आराखड्यांच्या आधाराने भावी घटनांसंबंधी काही आडाखे बांधले जातात. हे आडाखे खरे ठरले तर गृहीत धरलेले नमुने बरोबर आहेत असे मानले जाते. निरनिराळ्या पदार्थविज्ञान शास्त्रज्ञांनी विश्वरचनेबाबत अनेक परस्परविरुद्ध अशा कल्पना केल्या आहेत; परंतु त्यांतील खालील दोन नमुने परस्परविरोधाच्या बाबतीत विशेष उल्लेखनीय आहेत. (१) विश्व संकोच पावत आहे अशी कल्पना मांडणारा; व (२) विश्वाचा विकास होत आहे ही कल्पना पुरस्कारणारा. अशा तऱ्हेने विश्वाचे संकलित वर्णन करण्याकरिता दिक् (अवकाश), काल व द्रव्य यांच्यावर आधारित अशा मूलभूत कल्पना व अंगोपांगांचे परस्पर संबंध, यांच्या मदतीने विश्वाचा आराखडा तयार करणे हाच शास्त्रीय (वैज्ञानिक) विश्वरचना विचाराचा उद्देश आहे.

**२) तात्त्विक विश्वरचना–विचार :** तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने विश्वरचना विचार हा समग्र विश्वाची रचना, आदिकरण व विश्वाची गतिप्रेरणा या गोष्टींचा शोध घेणाऱ्या तत्त्वज्ञानाचा एक भाग समजला जातो. सृष्टीतील प्रक्रियांचा अभ्यास करून निसर्गनियमांचे स्वरूप निश्चित करण्याचा प्रयत्न करणाऱ्या निसर्ग–तत्त्वज्ञानाशी हा विचार जवळचा आहे, परंतु तत्त्वज्ञानाधिष्ठीत विश्वरचनाविचार हा सत्ताशास्त्रापेक्षा कमी व्यापक आहे; कारण सत्ताशास्त्राचा विषय आध्यात्मिक–अध्यात्मरहित, भौतिक–आधिभौतिक अशी संपूर्ण सत्ता हा आहे. विश्वरचना विचाराच्या व्याप्तीबद्दल सर्व तत्त्ववेत्त्यांचे एकमत नाही. उदा. हेगेल हा तत्त्वज्ञ मानवाची स्वतंत्रता व असत्‌चे मूळ या दोन्ही गोष्टी विश्वरचना विचाराच्या कक्षेत येतात असे मानतो. 'सुव्यवस्थित विश्व' हा शब्द

त्यात मानव व त्याचे आध्यात्मिक विश्व सामावून घेण्याइतपत व्यापक असला तरी मानव व आत्मा (मन) या संबंधीच्या समस्या या विश्वरचना विचाराच्या कक्षेतून वगळण्याची प्रवृत्ती अलीकडील विचारवंतांमध्ये दिसून येते. दिक्-काल-मर्यादित जगताबद्दल त्यांना विशेष आस्था वाटते व निसर्गातील विविध घडामोडींचा अर्थ जिच्या मदतीने लावता येईल अशा विश्वाच्या मूलभूत रचनेचा शोध घेण्याचा ते प्रयत्न करतात. त्यांच्या स्वतःच्या विश्वविषयक प्रणालींची युक्तता ठरवण्याकरता विश्वरचनाविचार हा अनुभव व बुद्धी या दोन्हींचा आधार घेतात. नैसर्गिक घडामोडी अगर वस्तुस्थिती यांच्या निरीक्षणाच्या आधाराने विश्वविषयक प्रणालीची जेव्हा ते उभारणी करतात, तेव्हा ते प्रत्यक्षाप्रमाणेच तत्त्व स्वीकारतात व जेव्हा ते विश्वविषयक तत्त्वज्ञानाची उभारणी करतात तेव्हा ते तत्त्वशास्त्रीय तत्त्वाचा आधार घेतात.

तत्त्वज्ञानाची एक शाखा म्हणून विश्वरचना विचारास त्याच्या उभारणीला लागणारे साहित्य शास्त्रीय (वैज्ञानिक) विश्वरचना विचारांमधूनच उपलब्ध होते, हे सांगण्याची आवश्यकता नाही. त्यामुळेच या दोहोंमधील अंतर पुष्कळ वेळा कमी कमी होत जाऊन शास्त्रीय विश्वरचना विचारांची परिणती तात्त्विक विश्वरचना विचारात होते. आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, आदिकालांतील मानव व आरंभीचे विचारवंत लोक यांना विश्वनिर्मिती कशी झाली असावी याविषयी विशेष उत्सुकता वाटत असे. त्यामुळे त्यांनी विश्वोत्पत्तीसंबंधी अगम्य व चित्रमय अशा अनेक उपपत्ती रचल्या. पुढील काळांत विश्वोत्पत्तीविषयी वैचारिक उपपत्ती निर्माण झाल्या. विश्वाच्या उत्पत्तीविषयीच्या या सर्व उपपत्तींमधूनच 'विश्वोत्पत्ती विचार' म्हणजेच विश्वोत्पत्तीशास्त्र, सृष्टीनिर्मितीशास्त्र बनले आहे. या प्राचीन विश्वोत्पत्ती विचारांतूनच पुढे विश्वरचना विचार प्रसृत झाला आहे.

विश्वरचना विचारांत विश्वोत्पत्ती विचाराचा अंतर्भाव होतो व तो विचार विश्वोत्पत्ती विचारापेक्षा अधिक व्यापक आहे. विश्वोत्पत्ती विचार विश्वाच्या उत्पत्तीच्या समस्येपुरताच मर्यादित आहे. विश्वविज्ञानशास्त्राने त्याच्या पलीकडे बरीच मजल मारली आहे. विश्वरचना विचारात त्यापलीकडे जाऊन विश्वाचे 'अस्तित्व', त्याचा हेतू यासंबंधी प्रश्न निर्माण केले जातात. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, विश्वरचना विचारांत विश्वाचे अंतिम स्वरूप व हेतू (उद्दिष्ट) यांविषयी व्यापक असे प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे तो सत्ताशास्त्र वा तत्त्वज्ञान यांचाच एक भाग होतो.

### अतिप्राचीन विश्वोत्पत्ती विचार

आता आपण अतिप्राचीन काळच्या विश्वोत्पत्तीविषयक विचारांचा परामर्श घेऊ.

ऋग्वेदात आपणास असे सांगितल्याचे आढळते की, आरंभी सर्व विश्व अंधकारमय होते. सर्वत्र निर्व्यवस्था भरून राहिली होती. परंतु परमेश्वराने आपल्या तेजाने अंधकार घालवून दिला. (नाहीसा केला). प्रथम त्याने जल (पाणी) निर्माण केले व त्यातच प्रकाशाचे बीज उत्पन्न केले. त्या बीजाची वाढ होऊन एक सुवर्णमय अंडे उत्पन्न झाले. त्या अंड्यात ब्रह्मा पूर्ण वर्षभर ध्यानस्थ होऊन राहिला. शेवटी ते अंडे फोडून ब्रह्मा बाहेर आला, आणि त्याने अंड्याच्या दोन शकलांतून स्वर्ग व पृथ्वी निर्माण केली.

जुन्या बौद्ध वाङ्मयांत आपला शिष्य आनंद याला (भूकंपाचे कारण समजावून सांगताना) बुद्धदेव पुढीलप्रमाणे सांगत असल्याचा उल्लेख आहे : ''पृथ्वी पाण्यावर आधारलेली आहे, पाणी वायूवर व वायू

आकाशावर आधारलेला आहे.'' त्याचप्रमाणे दुसऱ्या ठिकाणी असे सांगितले आहे की, ''पृथ्वी जलचक्रावर आधारित आहे, जलचक्र वायूवर व वायू अवकाशावर. अवकाशाला कशाचाच आधार नाही.'' प्राचीन इराणी (पर्शियन) पौराणिक कथा असे सांगते की, ''ओर्मझ्दने (अहुरमझ्द) सहा कालखंडात विश्व निर्माण केले. निर्मितीचा क्रम असा आकाश व प्रकाश, जल, पृथ्वी, प्राणिसृष्टी व मानव.'' बॅबिलोनियन लोकांचे असे मत होते : ''प्रथम सर्व विश्व अंधकाराने वेढलेले होते, व त्यावर मर्काया या जलदेवतेचे वर्चस्व होते. देवाधिदेव बेलझ्यूस याने तिचे दोन तुकडे केले. एका तुकड्याचे आकाश झाले व दुसऱ्या तुकड्याची पृथ्वी झाली. नंतर देवाधिदेवाने स्वतःचे शिर कापले व त्यातून वाहणाऱ्या रक्तांतून मानव निर्माण झाले. प्राचीन मिस्री (इजिप्शिअन) लोकांचा असा विश्वास होता की, ''विश्वनिर्माता देवाधिदेव अमुन किंवा थॉथ याने आकाश व पृथ्वी, प्राणी आणि मानव यांच्यासह निर्माण केली.'' त्यांचा असाही विश्वास होता की, ''मूलद्रव्ये प्रथम एकमेकात मिसळलेली होती. नंतर स्वतःहून गतिमान असलेल्या वायूमुळे त्यांचे पृथक्करण झाले. हलकी मूलद्रव्ये ऊर्ध्वदिशेला गेली, व जड मूलद्रव्ये खाली खाली येऊन त्यांतून जमीन व समुद्र निर्माण झाला.'' एका फिनिशिअन लोककथेत असे प्रतिपादन केले आहे की, ''प्रथम सर्वत्र निर्व्यवस्था होती. नंतर (कृष्णवायूचे रूप धारण केलेल्या) चित्-शक्तीचा त्या अस्ताव्यस्त अवस्थेतील जड द्रव्याशी संयोग झाला, व त्या संयोगातून जल निर्माण झाले. भिन्न भिन्न वस्तू निर्माण झाल्या. आकाश मात्र अनादी अंड्याच्या स्वरूपातच होते. त्या अंड्यातून सूर्य, चंद्र व तारे यांची उत्पत्ती झाली.'' प्राचीन ग्रीक पौराणिक वाङ्मयाप्रमाणे प्रथमारंभी सर्वत्र निर्व्यवस्था होती. त्यांतूनच प्रथम पृथ्वीची उत्पत्ती झाली. नंतर (१) अंधकार व रात्र, (२) आकाशांतील प्रकाश व दिवस, (३) वातावरणातील विविध प्रकारच्या शक्ती व देवदेवता आणि शेवटी (४) मानवप्राणी अशा क्रमाने उत्पत्ती झाली.

हिब्रू लोकांची (किंवा मूसाप्रणीत) विश्वोत्पत्ती-कल्पना 'जुना करार'मध्ये आढळून येते. यात सांगितले आहे की, ''प्रथमारंभी सर्वत्र अंधकार व पोकळी होती. नंतर प्रभूने इच्छा केली की, 'प्रकाश निर्माण होवो' व लगेच प्रकाश प्रकट झाला. या प्रमाणे दिवस व रात्र, प्रकाश व अंधकार यातील विरोध स्पष्ट झाला. नंतर विश्वाची भूमी व जल अशी विभागणी केली गेली, व नंतर सूर्य व चंद्र निर्माण करण्यात आले. नंतर विविध सजीव प्राणी अस्तित्वात आणले गेले व सर्वांत शेवटी मानवाची उत्पत्ती केली गेली.''

प्राचीन लोकांच्या विश्वोत्पत्तीसंबंधीच्या या भिन्न भिन्न कल्पनांचा विचार केल्यावर आपल्याला असे आढळून येते की, विश्वोत्पत्तीसंबधी काहीना काही तरी उपपत्ती रचण्याचा प्रघात त्या काळी सार्वत्रिक व सर्वसामान्य असा होता. विश्वोत्पत्तीबद्दल या सर्वच विवेचनाच्या कल्पनाशक्तीचाच प्रभाव विशेष तऱ्हेने दिसून येत असला तरी विवेचक बुद्धीचाही उपयोग करण्याची प्रवृत्ती त्यात दिसून येते. विश्वोत्पत्तीच्या या पुराणकालीन कथांत सर्वसामान्य असे काही विशेष आढळून येतात. आरंभीच्या निर्व्यवस्थित, अस्ताव्यस्त व अंधकारमय परिस्थितीतूनच विश्वोत्पत्ती झाली असे या सर्वच कथा प्रतिपादतात. अगदी आरंभीच्या टप्प्यांत जलाचेच (पाण्याचेच) प्राधान्य (प्राबल्य) होते, यावर त्यांनी भर दिलेला आहे. अपूर्णावस्थेतून पूर्णावस्थेकडे वाटचाल करणे असे उत्पत्तीचे लक्षण त्यांनी मानलेले दिसते. मानवाच्या उत्पत्तीला सर्वांनीच विशेष महत्त्व दिले आहे. परंतु हे प्राचीन काळचे लोक उत्पत्तीत काही नैतिक अर्थ शोधत नाहीत. तसेच ते विश्वोत्पत्तीच्या मुळाशी एखादी

योजना असावी याचा शोध घेण्याचा प्रयत्न करत नाहीत. तसेच विश्वाची उत्पत्ती अभावातून झाली असावी ही कल्पना बहुतेक सर्व प्राचीन उपपत्तीतून दिसून येत नाही. ऋग्वेदकालीन हिंदूंनी मात्र 'असत्‌पासून सत्' निर्माण झाले असल्याची कल्पना मांडली आहे.

यानंतर आपण तत्त्वज्ञानाधिष्ठित विश्वरचना विचाराकडे वळू या.

**अ) प्राचीन भारतीय विश्वरचना विचार**

विश्वविज्ञान विचाराच्या समस्यांकडे पाहण्याचा भारतीय दृष्टिकोनाचे वर्णन थोडक्यात पुढीलप्रमाणे करता येईल. निरनिराळ्या दर्शनांत विविधता दिसून येत असली, तरी विश्वरचना विचाराच्या समस्यांबाबत काही सामान्य गोष्टी त्यांच्यात आढळून येतात. कालसंबंध, दिक्‌संबंध व कार्यकारणसंबंध अशा तीन प्रकारांच्या संबंधांनी विश्वरचना बनलेली आहे अशी सर्वसाधारण समजूत आहे. प्रत्येक भावपदार्थाला आदी व अंत असतात आणि ज्या ज्या गोष्टीला आदी आहे, त्याला कारण हे असलेच पाहिजे. सर्वसामान्यपणे कार्यकारणभावाचा अर्थ दोन भिन्न दृष्टिकोनांतून लावला जातो. एका दृष्टीने पाहिले तर जी गोष्ट निर्माण होते (कार्य) ती नव्यानेच अस्तित्वात येते. दुसऱ्या दृष्टीने कार्य म्हणजे पूर्वी अप्रकट असलेल्या गोष्टीचे प्रकटीकरण. याचा अर्थ असा की, निसर्गाला (निसर्गाचा उल्लेख 'स्वभाव', 'प्रकृती', 'माया' अशा भिन्न संज्ञांनी केला जातो.) परिणाम अगर आरंभ असतो. निसर्गामध्ये नियम (तत्त्वांचा अंमल), प्रतिनियतकरणत्व (कार्यकारणभावाचे सातत्य) व वर्तनक्रम (नियमित बदल) या गोष्टी दिसून येतात. वर्तनाचे (बदल किंवा रूपांतर याचे) दोन प्रकार सांगितले आहेत. वस्तूंच्या अंतर्गत घडामोडीमुळे आपोआप होणारा बदल विश्वाची रचना अणूंनी घडलेली वा पृथक् अशी आहे, असे काही तत्त्वज्ञ मानतात, तर काही जण हे विश्व म्हणजे संलग्न (वा एकसंध) असे द्रव्य असावे असे मानतात. एका द्रव्याची इतर द्रव्यांवर होणारी क्रिया अखेरपक्षी परिसंवादात्मक (गतीलहरीयुक्त) आहे; म्हणूनच विश्व म्हणजे सातत्याने वर्तुळाकार फिरणाऱ्या अगर स्पंदन पावणाऱ्या असंख्य कणांचा समूह आहे. विश्वामध्ये सर्जनामागून विसर्जन व विसर्जनामागून सर्जन हा क्रम सतत चालू असतो. (म्हणूनच या विश्वचक्राला सृष्टीसंहार प्रवाह म्हणतात.) चक्रनेमिक्रमाने निर्माण होणारी ही विश्वमाला आहे असे मानले जाते. विश्वनिर्मितीचा नैतिक अर्थ शोधून काढण्याची प्रवृत्ती दिसून येते. कारण सर्व साधारणपणे असे मानले जाते की, सृष्टी ही जीवात्म्यांच्या कर्मफलानुरूप प्राप्त होणाऱ्या भोगासाठी निर्माण झाली आहे. या दृष्टीने सृष्टी ही जीवात्म्यांकरिता निर्माण केलेली एक रंगभूमीच आहे. भारतीय तत्त्वज्ञानाची बैठक आध्यात्मिक असल्यामुळे त्या तत्त्वज्ञानात जड सृष्टीला कमी महत्त्व दिले गेले आहे.

१) **न्याय-वैशेषिक दर्शनांचे** मत असे आहे की, सृष्टी, पृथ्वी, जल, तेज, वायू यांच्या अविनाशी अणूंनी बनलेली आहे. तीत असलेल्या सर्व वस्तू अणूंच्या संयोगातून वा मिश्रणातून तयार झालेल्या आहेत. आकाश, काल आणि दिक् या गोष्टीही भौतिक सृष्टीतच आहेत. ईश्वर सृष्टीचे बौद्धिक कारण आहे; परंतु त्याचे कार्य निसर्गाला फक्त व्यवस्था लावून देण्याचे आहे. अविनाशी अणूंचा उपयोग करून ईश्वर सृष्टी निर्माण करतो; पण त्या अणूंच्या अस्तित्त्वाची जबाबदारी मात्र त्याच्यावर नाही. सृष्टीनिर्मिती म्हणजे आदी, नवीन उद्‌गम वा आरंभ.

२) **सांख्य–योगदर्शनांप्रमाणे** प्रकृती व पुरुष ही दोनच अंतिम तत्त्वे आहेत. सृष्टीनिर्मितीची सर्व प्रक्रिया प्रकृतीत सुप्त अशा अवस्थेत वसत असते. प्रकृती ही क्रियाशील परंतु चित्‌शक्तिविरहित असल्यामुळे निष्क्रिय परंतु चित्‌शक्तिसंपन्न अशा पुरुषाशी तिचा संबंध येतो, तेव्हाच उत्क्रांतीला सुरुवात होते. प्रकृतीमध्ये सुप्तावस्थेत असलेल्या गोष्टी प्रत्यक्षात येणे म्हणजेच सृष्टीची उत्पत्ती होय. प्रकृतीचा विकास होऊन निर्माण होणाऱ्या पदार्थांत पंचतत्त्वाचे (सूक्ष्म मूलतत्त्वे) यांचा प्रामुख्याने उल्लेख करणे अवश्य आहे. पुरुष व प्रकृती ही स्वयंपूर्ण तत्त्वे असल्यामुळे 'ईश्वर' म्हणून कोणी सृष्टीचा कर्ता आहे, असे मानण्याचे कारण नाही; असे सांख्यशास्त्राचे मत आहे. परंतु योग शास्त्राला ईश्वराचे अस्तित्व मान्य आहे, व पुरुष आणि प्रकृती यांच्या संयोग–वियोगांची उपपत्ती लावण्याच्या दृष्टीने ईश्वराचे अस्तित्व गृहीत धरणे अशक्य आहे असे ते शास्त्र मानते.

३) **मीमांसाशास्त्राचे** असे मत आहे की, ''अविनाशी जडतत्त्वाचा संयोग झाल्यामुळे भौतिक सृष्टी निर्माण झाली आहे व म्हणून ईश्वराचे अस्तित्व गृहीत धरण्याचे प्रयोजन नाही. कर्मसिद्धान्त हा स्वतंत्र आहे, व जीवात्म्यांच्या कर्मफलानुरूप त्यांना योग्य असे विश्व निर्माण करण्यास अणूंना या सिद्धान्ताचे मार्गदर्शन घडते.''

४) **अद्वैत वेदान्त शास्त्राच्या** दृष्टीने सृष्टी–निर्मिती ही मिथ्या आहे, कारण ब्रह्म हे कोणत्याही क्रियेपासून पूर्णपणे अलिप्त असते. सृष्टी हा केवळ मायेचा परिपाक आहे. सृष्टीस जरी प्रत्यक्षानुभवाची युक्तता लाभली तरी अनुभवातीत अशा दृष्टिकोनातून ती मिथ्याच आहे. ब्रह्म हेच एकमेव सत्य आहे. विशुद्ध निरवय अशा ब्रह्मस्वरूपावर बहुरूपी सृष्टीचा निव्वळ आरोप केला गेला आहे. या आरोपामुळे ब्रह्माचे सत्य स्वरूप लपले जाते, इतकेच नव्हे तर ते विकृत स्वरूपात मांडले जाते. रज्जू–सर्प न्यायासारखी ही स्थिती आहे. सत्ताशास्त्राच्या दृष्टीने अद्वैती तत्त्ववेत्त्यांना विश्वरचनाविचाराची फारशी किंमत वाटत नाही.

विशिष्टाद्वैती लोक सृष्टी काही प्रमाणात वास्तव मानतात. ब्रह्माची माया ही निव्वळ आभास निर्माण करणारी शक्ती आहे. ब्रह्मामध्ये चैतन्य व जड अशी दोन मूलतत्त्वे आहेत. त्यातील पहिल्या तत्त्वापासून म्हणजे चैतन्यापासून जीवात्मे निर्माण होतात, व दुसऱ्या तत्त्वापासून म्हणजे जडत्त्वापासून जड वस्तू निर्माण होतात.

५) **बौद्धमत :** 'विश्व निर्माण करणारा कोणी परमात्मा आहे' असे बौद्ध तत्त्वज्ञ मानत नाहीत. तसेच पदार्थात अंगभूत अशी शक्ती असते यावरही त्यांचा विश्वास नाही. त्यामुळे ते बौद्धेतरांच्या विश्वरचनेसंबंधीच्या क्षुद्र व अनावश्यक कुतूहलाला थारा देत नाहीत. दुसऱ्या शब्दांत बोलायचे म्हणजे, ते याबाबतीत ईश्वरवादी व जडवादी दृष्टिकोनांचा त्याग करतात. 'कर्म हेच विश्वोत्पत्तीचे कारण आहे (कर्मजं लोकवैचित्र्यम्)' हीच बौद्धाची अधिकृत भूमिका आहे. असे असले तरी, बौद्धांमध्ये विश्वोत्पत्तीसंबंधीच्या अनेक उपपत्ती व पौराणिक कथा प्रचलित आहेत.

६) **जैन मत :** 'विश्व शाश्वत असून त्याला आदी अंत नाहीत.' असे जैनांचे मत असल्यामुळे त्यांना (या त्यांच्या मताशी विसंगत अशी) विश्वोत्पत्तीची उपपत्ती मांडता येत नाही. तरी पण त्यांनी विश्वाचे ऊर्ध्व व अधर असे दोन भाग कल्पून त्यांचे वर्णन केलेले आहे. याचा विश्ववर्णन विचार असा उल्लेख करता येईल. अखिल विश्वाच्या क्षेत्राचे त्यांनी स्थूलमानाने दोन भाग कल्पिले आहेत : एक अ–लोकाकाश व दुसरा लोकाकाश. पहिला म्हणजे अ–लोकाकाश हा भाग पूर्णपणे अभावरूप असून त्यात भौतिक किंवा आध्यात्मिक अशा

कोणत्याच पदार्थाचा शिरकाव होऊ शकत नाही. दुसरा म्हणजे लोकाकाश हा भाग धर्म व अधर्म यांची भूमी आहे. धर्म म्हणजेच गती व अधर्म म्हणजेच स्थैर्य, या दोन तत्त्वांनीच सर्व पदार्थांचे नियमन होते.

७) **चार्वाक मत :** चार्वाक मताचे लोक हे जडवादी आहेत. त्यांच्या तत्त्वज्ञानास अनुसरून ते विश्वाला कोणी परमकर्ता आहे ही गोष्ट मान्य करत नाहीत. पृथ्वी, जल, वायू व तेज या चार इंद्रियगोचर महाभूतांच्या आकस्मिक रीतीने होणाऱ्या संयोगांतून सर्व सृष्टी (जीवन व मन यासंहित) निर्माण झाली आहे. आकाश हे इंद्रिगोचर नसल्यामुळे त्याला पंचमहाभूतांपैकी एक असे ते मानीत नाहीत.

८) **जगदुत्पत्ती पुराण कल्पना :** भारतीयांच्या धार्मिक ग्रंथांत पुराणांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. वेदांच्या खालोखाल त्यांची महती मानलेली आहे. महाभारताला ज्याप्रमाणे पाचवा वेद मानण्याची प्रथा आहे, त्याचप्रमाणे पुराणांनाही पाचव्या वेदाइतकीच श्रेष्ठता दिलेली आहे. महत्त्वाची अशी दोन पुराणे गणलेली आहेत (१) महापुराणे (२) उपमहापुराणे. महापुराणे अठरा असून उपपुराणे (प्रमुख) अठराच मानलेली आहेत.

बहुतेक पुराणांनी जगदुत्पत्तीची कारणमीमांसा सांख्य-तत्त्वज्ञानाप्रमाणे दिली आहे. सांख्य मताप्रमाणे सृष्टीचा विकास हा पुरुष आणि प्रधान (प्रकृती) या दोन मूळ व नित्य तत्त्वांचा संयोग झाल्यामुळे घडतो. पुराणांच्या मताने ही दोनही तत्त्वे मूळ परमेश्वराचीच दोन अंगे होत. अर्थात सृष्टीची उत्पत्ती व विकास या गोष्टी पुराणांनी ईश्वराधिष्ठित मानलेल्या आहेत. परमेश्वराच्या उपाधीरहित स्वरूपापासून पुरुष व प्रधान-रूपे होतात; आणि तिसरे जे काळ-रूप त्यांच्या एकत्र येण्याने सृष्टीची रचना घडते. परमेश्वरच सृष्टीची रचना करतो व तिचा लय करतो.

पुराणांच्या मते विश्व हे अनादी आहे, तसेच अनंत आहे. गंगेच्या ओघाप्रमाणे ते सतत वाहते आहे. ते नित्य आहे, तसेच बदलणारे आहे. म्हणून प्रकृती, पुरुष, व्यक्त जगत आणि काळ ही त्या अनादी, अनंत परमेश्वराचीच रूपे पुराणांनी मानलेली आहेत.

पुराणांतून सृष्टीचे नऊ (९) प्रकार सांगितलेले आहेत. (१) प्राकृत-सर्ग, (२) वैकृत-सर्ग, (३) प्राकृत-वैकृत-सर्ग. प्राकृत-सर्गात (१) ब्रह्मसर्ग-महत्तत्व हा प्रथम सर्ग होय. महत्तत्त्व म्हणजेच ब्रह्म, म्हणजेच बुद्धीतत्त्व होय. (२) भूत सर्ग – तन्मात्रांची म्हणजेच पंचमहातत्त्वांची अत्यंत सूक्ष्म रूपाची सृष्टी, (३) वैकारिक सर्ग – सात्त्विक, राजस व तामस सृष्टीचे स्वरूप. पांच ज्ञानेंद्रिये, पांच कर्मेंद्रिये, आणि अकरावे मन मिळून ही सृष्टी होते. वैकृत-सर्गाचे पाच प्रकार आहेत. ते असे – (४) मुख्यसर्ग – ब्रह्मदेवाने पूर्व सर्ग आठवून तयार केलेली सृष्टी. (५) तिर्यक्-सर्ग – मानवेतर प्राणी-सृष्टी. (६) देवसर्ग (७) मानुष-सर्ग-मनुष्य सृष्टी. (८) अनुग्रह-सर्ग- सांख्य मताप्रमाणे प्रत्यय-सर्ग आणि (९) कौमार-सर्ग – सनतकुमार वगैरे सृष्टी. यात प्राकृत-वैकृत-सर्गसृष्टी मिळविली म्हणजे नऊ (९) प्रकार होतात. श्रीमद्भागवताने आणखी एक सृष्टी धरून सर्गाचे दहा प्रकार मानलेले आहेत.

ब्रह्मदेवाच्या एका अहोरात्र एवढ्या कालाला 'कल्प' म्हणतात. हा काल म्हणजे १००० चतुर्युगांचा होय. एका युगात मानवांची अनेक वर्षे असतात. त्रेचाळीस लक्ष वीस हजार (४३,२०,०००) मानवी वर्षांचा काळ म्हणजे एक चतुर्युग होय. कृत, त्रेता, द्वापार व कलि ही ती चार युगे होत. या युगांचा काळ ४:३:२:१ या प्रमाणात कमी कमी होत असतो. युग म्हणजे केवढा काळ हे निश्चित नाही. दिवसाचा चौथा भाग, एक महिना,

एक वर्ष, चार वर्षें, पांच वर्षें, दहा वर्षें, हजार वर्षें असा वेगवेगळा अर्थ पंडितांनी केलेला आहे. चौदा मनु व त्यांची मन्वंतरे यांची पुनरावृत्ती घडते, अशी पुराणांची साधारण धारणा आहे.

आत्मतत्त्वालाच पुराणात ईश्वर मानलेले आहे. त्या आत्म्याचे ज्ञान पराविद्येने होते. पुराणांच्या मताने ब्रह्म हे सर्व-नामी, सर्व-रूपी आणि सर्व-भावमय आहे. पुराणांनी एकच सत्य-तत्त्व या विश्वात भरून राहिलेले आहे व प्रेमाने, भक्तीने त्याची निरनिराळी रूपे होतात, दिसतात, भासतात असे मानले आहे.

देहापासून देही हा भिन्न वेगळा व निराळा असला तरी तो सर्व भरून व्यापून राहिलेला आहे. तो सत्-चित्-आनंदरूप, सर्वव्यापी, साक्षात्कारी, साक्षीभूत, विभू, अजर, अमर, विनाशरहित आहे, अशी पुराणांची शिकवण आहे.

पुराणात विश्वाची उत्पत्ती विश्वाचा लय, मन्वंतरे आणि आख्यान-उपाख्यानद्वारा सांगितला असला, तरी ही सर्व ईश्वराची लीला आहे, असेच सांगितलेले आहे. वेद, उपनिषदें, ज्याला उपाख्यानद्वारा 'आत्मतत्त्व' म्हणतात, त्या तत्त्वालाच पुराणात 'ईश्वर' म्हटलेले आहे. ईश्वरतत्त्व जाणणे, ओळखणे, अनुभवणे हे पुराणाचे साध्य आहे.

### ब) प्राचीन पाश्चात्त्य विश्वरचना विचार

पाश्चात्त्य विचारधारांमध्ये आद्य तत्त्ववेत्ता म्हणून मानल्या गेलेल्या थेलीसपासूनच्या ग्रीक तत्त्ववेत्त्यांनी विश्वरचनेचा ऊहापोह केलेला आपणांस आढळून येतो. **थेलिस, ॲनॅक्झिमँडर, ॲनाक्झिमेनीस** या **आयोनिक विचारवंतांनी** विश्वाचे स्पष्टीकरण करणाऱ्या एका तत्त्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. या सर्वांनी (या संदर्भात) जडतत्त्वाचा निर्देश केलेला आहे. सृष्ट पदार्थांचे मूलद्रव्य 'जल' (पाणी) आहे, असे थेलीसचे मत होते, तर ॲनाक्झिमेनीसच्या मताप्रमाणे हे द्रव्य 'वायू' आहे. ॲनॅक्झिमँडर याने मात्र निराकार लक्षणरहित व अनिश्चित स्वरूपाच्या अशा द्रव्याचा सर्व सृष्टीचे मूलभूत कारण म्हणून निर्देश केला आहे. पायथॅगोरस व त्याचे अनुयायी यांना 'संख्ये'चे आकर्षण वाटले. सृष्टीतील सर्व पदार्थ भिन्नस्वरूपी असून सुद्धा त्यांची मोजदाद करता येते; म्हणून त्यांनी सृष्टी ही संख्यानिर्मित आहे असे प्रतिपादले.

**हेरॅक्लिटस** याने 'परिवर्तनशीलता' हाच सृष्टीच एकमेव गुणधर्म आहे यावर भर दिला. 'तेज' हे सर्व द्रव्यांत अधिक परिवर्तनशील असल्यामुळे सर्व पदार्थ तेजापासूनच निर्माण होतात व तेजातच विलीन होतात असे त्याचे मत होते. एकमेव, आकाशरूप, आदिमहाभूत असे तेज विश्वाचे मूलभूत तत्त्व आहे व त्याचे परिवर्तन वायूत, वायूचे जलात व जलाचे पृथ्वीत होते असे त्याचे मत होते. **एलिआटिक तत्त्ववेत्त्यांनी** शाश्वत, अविनाशी व अपरिवर्तनीय सत्त्व हेच सृष्टीचे खरे स्वरूप आहे असे मानले, व सृष्टीच्या स्वरूपात होणारे बदल हे केवळ भासमय आहेत. एलिआटिक विचार प्रणालीचा प्रणेता झेनोफेनीस याने सृष्टीविषयी एक मजेदार कल्पना मांडली आहे. ती कल्पना अशी : ''पृथ्वी समुद्रातून निर्माण झाली असून अखेर ती समुद्रातच बुडणार व मानवजात खलास होणार; परंतु पृथ्वी पुनश्च प्रादुर्भूत होणार व मानवाचे पुनरुज्जीवन होणार. सूर्य, तारे हे वायूमय ज्वलंत असे गोळे आहेत. सूर्य पृथ्वीभोवती फिरत नाही, पण तो स्थिरही नाही. तो पूर्वेकडून पश्चिमेकडे सरळ रेषेत जातो व दूर क्षितिजापलीकडे जाऊन दिसेनासा होतो. प्रतिदिनी महासागराच्या वाफांतून नवीन सूर्य

जन्मास येतो.'' **पार्मेनायडीस** याचे असे मत होते की, सृष्टीत अवकाश नाहीच व कधीही निर्माण होणार नाही. सृष्टीतील सर्व जागा सत्त्वाने भरलेली आहे व त्याचा आकार गोलरूप आहे. सृष्टीस्वरूपाच्या आपल्या विचारांशी संबंधित असलेल्या गति, अनेकता या कल्पनांवर झीनोने टीका केली व असा युक्तिवाद मांडला की, या कल्पनांतून स्वयंविरोध निर्माण होतात. **एंपेडॉक्लीस** याने 'पृथ्वी, वायू, जल व तेज' अशी चारच मूलतत्त्वे असल्याचे म्हटले आहे. इतर सर्व द्रव्ये या मूलतत्त्वांच्या मिश्रणाने अगर संयोगाने झाली आहेत असे त्याचे मत आहे. एक मूलतत्त्व दुसऱ्या मूलतत्त्वांत प्रवेश करू शकत नाही. मूलतत्त्वांचे संयोग अथवा वियोग होण्यास त्यातील कणांचे संचलन व्हावे लागते आणि हे संचलन अनुराग व द्वेष या परस्परविरुद्ध प्रेरणांनीच घडून येते. द्रव्य व प्रेरणा यात फरक करणारा एंपेडॉक्लीस हा पहिलाच तत्त्ववेत्ता होय. विश्वचक्राची उपपत्ती त्याने प्रतिपादली होती. विश्व-प्रक्रिया ही वर्तुळाकार असून तिला आद्यंत मुळीच नाही. **लुसिपस** व **डिमॉक्रिटस** या अणुवादी तत्त्ववेत्त्यांनी मूलतत्त्व चतुष्टयीच्या कल्पनेचा त्याग केला व असे मानले की, जड द्रव्याचे 'अणू' नामक अविभाज्य अशा घटकात विभाजन करता येते, वेगवेगळ्या अणूंच्या संघातांतूनच विश्वाची निर्मिती झाली. विश्व हा अहेतूक यांत्रिक प्रेरणांचा परिपाक आहे, व या विश्वाच्या पाठीशी काही चित्शक्ती वा बुद्धी आहे असे मानण्याचे प्रयोजन नाही. परंतु **ॲनॅक्झॅगोरस** याने अणुवाद्यांना विरोध करून असे दाखवून दिले की, प्रेरणाशक्ती ही जड असू शकणार नाही, आणि ती अभौतिक व अशारीरिक असली पाहिजे. तिला 'नाउस' (मन किंवा बुद्धी) म्हणजेच प्रेरकचित्-तत्त्व असे म्हटले जाते. ती शक्ती गतीचा मूलाधार असून तीच विश्व निर्माण करणारी बुद्धी होय. या 'नाउस'मुळेच सृष्टीत व्यवस्था, रचनात्मकता व संवाद निर्माण होऊन सृष्टीला व्यवस्थित विश्वाचे रूप प्राप्त होते. 'नाउस' नसते तर विश्वात एकामागून एक गोंधळाची व अव्यवस्थेची एक मालिका निर्माण झाली असती.

सॉक्रेटीसनंतरच्या काळात विश्वरचना विचारांचे विस्तारपूर्वक विवेचन **प्लेटो** याच्या ग्रंथात, विशेषतः त्याच्या 'टिमिअस' नावाच्या संवादात आढळते. प्लेटोची सर्वसाधारण विचारसरणी अशी आहे की 'आयडिआं'चे विश्व हेच वास्तव विश्व होय. भौतिक विश्वांपासून ते अलग असून त्याला स्वतंत्र अस्तित्व आहे. भौतिक विश्व किंवा निव्वळ इंद्रियानुभवावर आधारलेले विश्व हा केवळ भास आहे. 'टिमिअस'मध्ये सुचवलेली विश्वाची उत्पत्ती थोड्याफार प्रमाणात पौराणिक अगर काव्यमय आहे. आपण पौराणिक कथांचा भाग बाजूला केला, तर विश्वाबद्दल प्लेटोचे विचार असे आहेत की, जड सृष्टीची निर्मिती कोणा कारागिराने किंवा 'डेमिअर्ज'ने केली आहे. सृष्टीनिर्मिती ही कोणत्या तरी एका क्षणाला झालेली प्रत्यक्ष घटना आहे. प्लेटोने 'सृष्टी' हा शब्द बरोबर कोणत्या अर्थाने वापरला आहे हे समजणे फार कठीण आहे. त्याने आत्मा, सत्त्व (फॉर्म) व जडद्रव्य अशी तीन भिन्न तत्त्वे मान्य केल्यासारखे दिसते. ही तीन अंतिम तत्त्वे असून ती दुसऱ्या कोणत्याही तत्त्वांतून निघालेली नाहीत. आत्मा हे सृष्टीत क्रिया व बदल घडवून आणणारे तत्त्व असून त्याच्यामुळेच सृष्टीतील घडामोडी होतात. भौतिक सृष्टीत चैतन्य निर्माण करून तिला बुद्धिनिष्ठ उद्दिष्टांकडे नेण्याचे काम हेच तत्त्व करते. सृष्टीची योजनाबद्ध रचना ठरवणारा कारागीर म्हणजेच परमेश्वर पहिल्याने विश्वात्मा निमाण करतो. विश्वाचा कारागीर व विश्वात्मा हे अंतिमदृष्ट्या एकच आहेत व दोहोमधील फरक हा आत्म्याच्याच दोन भिन्न छटांचे प्रतीक आहे, असे प्लेटोच्या काही टीकाकारांचे मत आहे. सत्त्वे (फॉर्म) हे आदर्श नमुने असून त्यांच्या

धर्तीवरच विश्वात्मा विश्वाची रचना घडवतो. शेवटी त्याच नमुन्याप्रमाणे जड द्रव्यापासून विविध भौतिक वस्तूंची निर्मिती केली जाते. प्लेटोची या संदर्भातील भाषा ही अलंकारिक आहे, हे मान्य केलेच पाहिजे व त्याने वापरलेल्या 'मॅटर' या शब्दाचा अर्थ 'सामान्य जडद्रव्य' अगर 'फॉर्म' या शब्दाचा अर्थ 'सर्वसाधारण साचा' असा अक्षरशः घ्यावयाचा नाही. एकंदरीत प्लेटोला सांगावयाचे आहे ते हे की, विश्वात्म्याने निसर्गातील विविध पदार्थ अभावांतून निर्माण केलेले नसून, विश्वांत खरोखर अस्तित्वात असलेल्या स्वतंत्र मूलभूत द्रव्यांतूनच बनवलेले आहेत. (मानवी शरीराचे नियमन आत्म्याकडून होते, त्याप्रमाणेच) संपूर्ण विश्व हे सचेतन विश्व आहे व त्यास विश्वात्म्याकडून चेतना मिळते, अशी प्लेटोची विचारसरणी आहे. हे आपणास मान्य करता येईल.

**ॲरिस्टॉटलने**ही विश्वरचना विचारात लक्ष घातले होते. त्याचे असे मत होते की, ''निराकार जडद्रव्य व जडद्रव्यरहीत आकार या दोन टोकांच्यामध्ये आपले विद्यमान विश्व आहे. गतिमानता निसर्गात अंगभूत आहे. सर्व निसर्ग हा जड द्रव्यापासून आकाराकडे वाटचाल करत आहे. याचाच अर्थ त्याची गती उद्दिष्टाकडे आहे. निसर्गाच्या सर्व प्रक्रियांत काही ना काहीतरी उद्दिष्ट आहे. निसर्गात काहीही उगाच वा कसेतरी घडून येत नाही. विश्व हे विस्ताराच्या दृष्टीने मर्यादित, पण काळाच्या दृष्टीने अनंत आहे. पृथ्वी गोलाकार असून ती विश्वाच्या केंद्रस्थानी आहे. पृथ्वी स्थिर असून आकाशस्थ ग्रहगोल तिच्याभोवती फिरतात. या आकाशस्थ ग्रहगोलांत दैवी लक्षण आहे. सर्वांत दूर (उंचीवर) असणाऱ्या अचल ताऱ्यांच्या गोलाला स्वतः परमेश्वर गती देतो व नंतर तीच गती खालच्या इतर गोलांनाही प्राप्त होते.'' यावरून असे दिसून येईल की, ॲरिस्टॉटलची आकाशस्थ ग्रहगोलांविषयीची विचारसरणी बुद्धी व दैवी गोष्टींवरील विश्वास यांच्या समन्वयावर आधारलेली आहे. विश्व हा समकेंद्रीत गोलांचा समूह आहे व त्यांच्या केंद्रस्थानी पृथ्वी आहे. या त्याच्या कल्पनेवर गणितज्ज्ञ यूडॉक्सस याचा प्रभाव पडलेला आहे, पृथ्वी ही केंद्रस्थानी असून आकाशांतील सूर्य व इतर ग्रहगोल तिच्याभोवती फिरतात ही उपपत्ती टॉलेमीची उपपत्ती म्हणून ओळखिली जाते.

### क) अर्वाचीन पाश्चात्त्य विश्वरचनाविचार

आता आपण पाश्चात्त्य तत्त्वज्ञानेतिहासाच्या आधुनिक कालखंडाकडे वळू. प्रथम आपले लक्ष **देकार्त** याने दिलेल्या भौतिक विश्वाच्या उपपत्तीकडे वेधले. भौतिक विश्व हे अचेतन व अवकाशव्याप्त असे असून त्याचा मनाशी (आत्म्याशी) काहीही संबंध नाही. त्याचे नियमन यांत्रिक नियमांनी केले जाते. अवकाशमयत्व व जडत्व यात देकार्त भेद करत नाही. त्यामुळे अव्याप्त अवकाश अगर पोकळी यावर त्याचा विश्वास नाही. जडद्रव्याचा नाश केला गेला, तर त्या द्रव्याने व्यापलेला अवकाशही नाहीसा होईल. जडद्रव्याच्या दोन अवस्था आहेत. एक गतीयुक्त व दुसरी स्थिर. विश्वातील सर्व गतींचे आदिकरण ईश्वरच आहे. सृष्टीत तीन प्रकारची जडद्रव्ये आहेत : (१) आकाश बनवणारे, (२) आकाश व पृथ्वी यांमधील वातावरण बनवणारे व (३) पृथ्वी बनवणारे. जगाचे नियमन यांत्रिक नियमांनी होत असल्यामुळे प्रयोजनवादाची (सृष्टी काही उद्दिष्ट साधण्याकरिता निर्माण केली गेली आहे असे मानण्याची) जरूरीच नाही.

विश्वाबद्दल **कांट**चे विचार असे आहेत : सद्वस्तूंच्या प्रभावावर दिक् आणि काल हे अनुभवपूर्ण असे सांकल्पनिक आकार व (मनाने पुरविलेली) बारा नियामक तत्त्वे (कॅटेगरीज) यांच्या उपयोजनाने जो परिपाक

घडून येतो तेच आपल्याला ज्ञात असलेले विश्व. आपल्या 'क्रिटिक ऑफ प्युअर रीझन' या ग्रंथात त्याने दाखवू दिले आहे की, ''बुद्धीच्या निकषावर आधारलेला असा विश्वरचना विचार मांडताच येणार नाही, कारण बुद्धीच्या निकषावर आधारलेल्या विश्वरचना-विचारांत परस्परविरुद्ध प्रमेये निर्माण होतात.'' मूलभूत द्रव्य दिशादिशांत सतत पसरून त्यामुळेच ताऱ्यांची क्रमशः वाढ झाली, या उपपत्तीचा त्याने आपल्या 'जनरल नॅचरल हिस्टरी अँड थिअरी ऑफ दि हेवन्स' या ग्रंथात पाठपुरावा केला आहे. कांटने मांडलेली ही उपपत्ती नंतरच्या काळात **लाप्लास**ने मांडलेल्या आकाररहित मूलद्रव्यांतून यथावकाश निर्माण झालेल्या विश्वाच्या उपपत्तीशी मिळती जुळती आहे. किंबहुना लाप्लासचा नीहारिका (नेब्युलर) अभ्युपगम हा सिद्धान्त कांटने आधीच सुचवला होता असे म्हणणे वावगे होणार नाही.

**हेगेल**नेसुद्धा विश्वरचना विचाराकडे लक्ष पुरविलेले दिसते. (काहींचे मात्र असे मत आहे की, हेगेलचे विश्वरचनेसंबंधीचे विचार हा त्याच्या तत्त्वज्ञानातील सर्वांत दुर्बल भाग आहे.) तो म्हणतो, ''निसर्ग व तर्कशास्त्र ही दोन परस्परविरुद्ध टोके आहेत. निसर्गात परम चित्रत्त्व बाह्य सृष्टीच्या रूपात प्रकट होते. सर्जनशील विचार दिक् व काल यांसारख्या अत्यंत अमूर्त व संदिग्ध गोष्टीपासून सुरू होतो व त्याची गती मानवासारखी अत्यंत मूर्त व संपन्न अशा गोष्टींकडे असते.'' अशा तऱ्हेने हेगेलने विश्वरचनेच्या संदर्भातील उत्क्रांतिवादाची उपपत्ती अगोदरच सूचित केली होती. आकाशस्थ ग्रहगोलांचे साधारण मूलकारण अनादी कालांतील निराकार जडद्रव्य आहे. (या मूलभूत द्रव्याचे अनिश्चित सत्त्व या तार्किक परिकल्पनेशी सादृश्य आहे.) आकाशस्थ ग्रहगोलांच्या विश्वाचे स्वरूप आरंभीच्या मानवी समाजासारखेच आहे.

चालू काळातील काही तत्त्ववेत्त्यांचे लिखाण विश्वरचनाविचाराच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ **ॲलक्झँडर**चे मत असे आहे की, विश्वोत्पत्तीच्या आरंभापूर्वीच अस्तित्वात असलेल्या दिक्काल या तत्त्वांतूनच सर्व वस्तू उत्क्रांत झालेल्या आहेत. विश्वाचे रूप सतत बदलत असते. विश्वात स्थिर असे काहीच नाही. **बर्गसाँ**च्या मताप्रमाणे, सत्तत्त्व हे प्रभावी आहे. ते गतिमान असून सारखे बदलत असते. विश्व स्थिररूप आहे ही कल्पना अगदी खोटी आहे. सत्तत्त्व ही एक जिवंत प्रेरणाच आहे, म्हणजेच तिचे स्वरूप चैतन्यमय आहे. या तत्त्वाची उलटी गती म्हणजेच जडद्रव्य होय. **व्हाइटहेड** म्हणतो, ''विश्व ही एक प्रक्रिया आहे. ती केवळ भौतिक अगर केवळ अमूर्त कल्पना आहे. 'प्रेरणे'च्या कल्पनेमुळे निसर्गात काही अर्थ अगर मूल्य राहणार नाही. विज्ञान हे द्रव्य व गुणधर्म, कारण व कार्य, वस्तू व परिसर आणि जीव व शरीर यांना एकमेकांपासून अलग करते. या सर्वांना अलग करण्याची कल्पना व्हाइटहेडला मान्य नाही. व्हाइटहेडच्या मते विश्व अविभाज्य असून त्यात होणाऱ्या घडामोडी अगदी आखीव स्वरूपाच्या प्रक्रिया होत. **एडिंग्टन, जीन्स** यांसारख्या शास्त्रज्ञांना विश्वाचे भौतिक दृष्टीने निरूपण करणे मान्य नाही. चैतन्यमय निरूपण करणेच त्यांना उचित वाटते व विश्वाकडे एखाद्या यंत्रासारखे पाहण्यापेक्षा विश्वाला ते एखाद्या महान् विचाराप्रमाणे मानतात.

**दिक्‌संबंधी कल्पना व विश्वरचनाविचाराच्या प्रणाली :** रचनेचा कोणताही विचार अवकाश (दिक्) या कल्पनेशी संबद्ध असल्यामुळे अवकाशासंबंधीची कल्पना बदलली की विश्वरचनेकडे पाहण्याची दृष्टीही बदलते हे अगदी उघड आहे.

**अवकाश ही कल्पना चार टप्प्यातून विकसित झाली आहे :**

अ) अवकाशाला अंतिम, ऊर्ध्व व अधर आहेत.

आ) अवकाश गोलाकार आहे.

इ) अवकाश अनंत असून ते सजातीय आहे.

ई) अवकाश सान्त असून तो विजातीय आहे.

**अ)** अवकाशाला अंतिम, ऊर्ध्व व अधर आहे ही अवकाशासंबंधीची अगदी प्रारंभिक कल्पना. ग्रीक तत्त्ववेत्ता **ॲनॅक्झिमँडर** याचे मत असे होते की, पृथ्वी हा विश्वाचा पाया नसून ती विश्वाचा एक घटक आहे व तिचा आकार लंबगोलाकार आहे. (या लंबगोलाच्या एका बाजूवर मानवप्राणी राहतात.)

**आ)** पायथॅगोरसच्या संप्रदायातील एक तत्त्ववेत्ता **फिलॉलाउस** याचे मत असे होते की, अवकाशाच्या ऊर्ध्व व अधर बाजू नेहमी एकाच दिशेत नसतात. आकाशस्थ ग्रहगोल सारखे भ्रमण करत किंवा स्वतःभोवती फिरत असतात. त्यांचे परिभ्रमण अर्धे झाले की वर असलेला भाग खाली येतो. पृथ्वी एका मध्यबिंदूभोवती फिरते. तो मध्यबिंदू सूर्य नसून गोलाकार विश्वाचा जो मध्यबिंदू तोच तो मध्यबिंदू होय. विश्वाच्या त्या मध्यबिंदूकडे जाणाऱ्या भागाला 'खालचा भाग' व त्या मध्यबिंदूपासून दूर जाणाऱ्या भागाला 'वरचा भाग' असे म्हटले जाते. पृथ्वी ही मध्यबिंदू असलेले सत्तावीस समकेंद्र गोल आपल्या विश्वात आहेत, असे प्रमेय ग्रीक गणितज्ज्ञ **यूडॉक्सस** याने मांडले होते. वर निर्देश केल्याप्रमाणे **ॲरिस्टॉटल** याच्या विचारावर या कल्पनेचा प्रभाव पडलेला होता. कालांतराने समकेंद्र गोलांच्या कल्पनेऐवजी मोठ्या वर्तुळाच्या परिघांत फिरणाऱ्या छोट्या वर्तुळांची (एपिसायकल्स) कल्पना करण्यात आली. प्रत्येक ग्रह वर्तुळाकार रेषेत फिरत असतो व अशा सर्व वर्तुळांचा मध्यबिंदू पृथ्वीभोवती फिरत असतो असे **ॲपोलोनियस** याचे मत होते. त्यानंतरच्या काळात ''सूर्य हा स्थिर तारा आहे, आणि पृथ्वी व इतर ग्रह त्याच्याभोवती फिरतात'' ही क्रांतिकारक उपपत्ती **कोपर्निकस** याने मांडली. परंतु 'अवकाश गोलाकार आहे' या गृहीत प्रमेयात काही अंगभूत अडचणी दिसून आल्या. म्हणून **केप्लरने** यात फरक करून असे प्रमेय मांडले की, प्रत्येक ग्रहाची कक्षा वर्तुळाकार नसून लंबवर्तुळाकार आहे. याचाच अर्थ असा की, ''सर्व ग्रह सूर्याभोवती लंबवर्तुळाकार कक्षेत फिरतात.''

**इ) न्यूटनने** गुरूत्वाकर्षणाचा नियम तयार केला व त्याच्या आधाराने ग्रहांच्या गतींचे स्पष्टीकरण दिले. गुरूत्वाकर्षण (पदार्थांतील) द्रव्यावर अवलंबून असते, अवकाशाच्या रचनेवर नव्हे. अवकाशाला वरची – खालची बाजू नसते, किंवा विशिष्ट दिशाही नसते. अवकाश सजातीय आहे. अवकाशाला स्थिर मध्यबिंदू नाही. त्याला सीमारेषा नसते. त्याचा विस्तार अनंत आहे.

**ई) आईन्स्टाइनच्या** नवीन पदार्थविज्ञानात अवकाशाचे घटक विजातीय असतात असे मानले आहे. आईन्स्टाइन युक्लिडची भूमिती मानीत नाही. समांतर रेषा एकत्र येऊन एकमेकांना छेदू शकतात असे त्याचे मत आहे. अवकाश अमर्याद असला (व त्याचे आकारमान निश्चित करता येत नसले) तरी तो सान्त आहे. कालाची कल्पना बाजूस ठेवून अवकाशाची कल्पना समजू शकणार नाही. म्हणून विश्व हे दिक्कालयुक्त चौमिती पण एकसंधपदार्थ आहे असे समजले पाहिजे. अवकाशात न बदलणारे (ॲब्सोल्यूट) असे स्थान नाही. अवकाशातील प्रत्येक बिंदू निरीक्षकाच्या स्थानाशी सापेक्ष असा असतो. तसेच निरीक्षकाच्या दृष्टिकोनाशीही त्याचा संबंध आहेच.

**निष्कर्ष : वरील विवेचनाचा सारांश**

तत्त्वज्ञानाधिष्ठित विश्वरचनाविचार, विश्वाची उत्पत्ती, विश्वाचे स्वरूप व त्याचे उद्दिष्ट याविषयी असतो. या संदर्भातील उपपत्त्यांवर तत्त्ववेत्त्यांची स्वतःची भूमिका व वैज्ञानिक प्रगती या दोहोंची छाप काही प्रमाणात पडलेली असते.

एकंदरीत या विषयासंबंधी दोन परस्पर भिन्न मते आढळतात :

**अ) उत्पत्ती :**

१) कोणीतरी व्यक्ती अगर आत्मा विश्वनिर्मितीच्या मागे आहे.

२) विश्व आकस्मिक रीतीने उत्पन्न झालेले आहे, आणि कर्ता कोणीही नाही.

३) विश्वाची निर्मिती कोणत्यातरी क्षणाला झालेली आहे.

४) विश्व अनादी आहे.

**ब) स्वरूप अगर वस्तुस्वरूप विचाराच्या दृष्टीने**

१) विश्वाचे स्वरूप आध्यात्मिक आहे.

२) विश्वाचे स्वरूप अनाध्यात्मिक आहे.

**क) उद्दिष्ट**

१) विश्वाला उद्दिष्ट असून त्याच्या अस्तित्वास काही तरी हेतू आहे.

२) विश्वाला कसलेही उद्दिष्ट नाही आणि त्याचे नियमन यांत्रिक नियमानुसार होते.

**सृष्टीचा खेळ व सृष्टी-प्रपंच**

**सृष्टीचा खेळ** : प्रतिबिंबवादामध्ये सृष्टीचा खेळ प्रतिबिंबित झालेला आहे. ईश्वर हे मायेचे स्वच्छ रूपांतील आत्म्याचे प्रतिबिंब असून, सृष्टीच्यापूर्वी तो एकटाच होता. या एकाकीपणाचा कंटाळा आल्याने विरंगुळा म्हणून त्याने सृष्टीचा खेळ केला (रचला.) दुसरे काहीच साधन उपलब्ध नसल्याने स्वतःच्या मायामय रूपांतून अनेक शरीरे उत्पन्न करून स्वतः प्राणमय रूपाने त्यात प्रवेश करता झाला. त्यामुळे आत्मा मुळात निःसंग असला, तरी मायामय आवरणामुळे भोगी भासतो.

प्रकृती ही सत्त्व, रजस् व तमस् या तीन गुणांची बनलेली असून सर्व जड सृष्टीचे ती आदिकारण होय असा सिद्धान्त सांख्यांचा आहे. सृष्टीप्रपंचाची प्रक्रिया सांगण्यासाठी अद्वैत वेदांतीसुद्धा प्रकृतीची संकल्पना वापरतात; पण ते प्रकृतीला तत्त्व अथवा सद्वस्तू मानण्यास तयार नाहीत. कारण ब्रह्मानुभवात जडाच्या अनुभवाचा निरास होतो. शैवसिद्धान्त, विशिष्टाद्वैत, द्वैताद्वैत, वीरशैव इत्यादी मतांतसुद्धा प्रकृतीचे अस्तित्व मानले आहे. पण त्यामध्ये तिला सांख्यप्रमाणे स्वतंत्र तत्त्वाचा दर्जा न देता परमेश्वराची शक्ती ठरवले आहे. शक्ती व शक्तिमान ही एकमेकांहून भिन्नही नव्हेत, आणि अभिन्नही नव्हेत. भगवंताच्या अध्यक्षतेखाली स्थावर जंगम सर्व पदार्थांना प्रकृती जन्म देते असे भगवद्‌गीतेत म्हटले आहे. ''माझ्या अनेक शक्तिंपैकी एक असणारी ही भौतिक प्रकृती माझ्या अध्यक्षतेखाली कार्य करत सर्व चराचर प्राण्यांची निर्मिती करते. तिच्या नियंत्रणाखालीच या सृष्टीची वारंवार उत्पत्ती आणि संहार होतो.'' भगवद्‌गीता ९:१०

प्रकृती या संकल्पनेचा उगम श्वेताश्वतर उपनिषदात (४:५ व ४:१०) आहे. दार्शनिक विचारात अनेक ठिकाणी तिचा उपयोग केला असला तरी तिला नीट शास्त्रीय स्वरूप दिले गेले, ते सांख्यदर्शनात होय. सांख्यांनी जड प्रकृतीची चेतन पुरुषापासून आत्यंतिक फारकत केली. दृश्य सृष्टीतील सर्व घटना प्रकृतीचे विकार होत. सत्व्-रजस्-तमोरूपा तीनही घटक जेव्हा एकमेकांना तोलून धरतात. तेव्हा प्रकृतीस साम्यावस्था प्राप्त होते व सर्व विकार यांबाबत गुणांचा क्षोभ झाल्यावर सृष्टीप्रक्रिया सुरू होते.

**सृष्टी-प्रपंच :** मूलप्रकृतीपासून सृष्टीप्रपंचास सुरुवात झाली म्हणजे सत्त्वगुण थोडा वरचढ होऊन प्रथम महत् अथवा बुद्धी हे तत्त्व तयार होते. बुद्धीचे काम निश्चय करण्याचे. बुद्धीनंतर अहंकार या तत्त्वाची उत्पत्ती होते. प्रकृतीचे तीन्ही गुण कोणत्याही प्राकृतिक पदार्थात असतात. त्याप्रमाणे ते वैश्विक अहंकारातही असतात. त्यांतील सत्त्वगुण बलवान होऊन तो रजोगुणाकडून प्रेरित झाला म्हणजे अहंकाराच्या त्या स्थितीस 'वैकृत अहंकार' म्हणतात व त्यातून पांच ज्ञानेंद्रिये व पांच कर्मेंद्रिये निर्माण होतात. अहंकारातील तमोगुण बलवान् होऊन रजोगुणाची त्यास प्रेरणा मिळाली म्हणजे त्या अवस्थेस 'भूतादी' असे नाव आहे. या भूतादींपासून पांच ज्ञानेंद्रियांचे विषय असलेली शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध ही तन्मात्रे निर्माण होतात व पुढे त्या प्रत्येकापासून अनुक्रमे आकाश, वायू, अग्नी, जल (पाणी) व पृथ्वी ही पाच महाभूते निर्माण होतात. प्रकृतीच्या या तेवीस (२३) विकारांना तत्त्वे म्हटलेले आहे. पांच महाभूतांच्या विविध घटना घडत असताना अशा रीतीने सर्व भौतिक सृष्टीची उपपत्ती सांख्यांनी प्रकृती या संकल्पनेच्या साहाय्याने केली आहे. मूलभूत तात्त्विक मतभेद असूनसुद्धा इतर बऱ्याच दर्शनांनी व्यवहारात ती स्वीकारलेली आहे.

१२

प्रकरण – १२

# ब्रह्मांड निर्मिती : सूफ़ी दार्शनिक दृष्टिकोन[४८]

**ब्रह्मांड वा विश्व व त्यामधील लोक**

विश्वाची भव्यता व विशालतेकडे पाहून मानवाची मती गुंग होते. विश्व हे इंद्रियगोचर नसून त्यापलीकडे इंद्रियातीत असलेले असे अदृश्य जगाचे पण अस्तित्व आहे. ते मानवी बुद्धीस अगम्य असते. अशा प्रकारे विश्व दोन प्रकारात मोडते – एक इंद्रियगोचर विश्व आणि दुसरे इंद्रिय अगोचर. इंद्रियगोचर विश्वास दृश्य जग, आणि इंद्रिय अगोचर विश्वास अदृश्य जग असे म्हणतात. म्हणजेच दृश्य जग हे इहलोक होय, तर अदृश्य जग हे परलोक. परलोक दोन प्रकारचे असते. एक स्व-र्लोक किंवा मध्य जगत वा अंतराय; तर दुसरे स्वर्ग-लोक. मानव हा इहलोकीची यात्रा संपवून परलोकाकडे प्रयाण करतो, अशी समजूत आहे.

विश्वाच्या निर्मात्यास विश्वंभर असे म्हणतात. विश्वंभराचे स्वरूप काय आहे, त्याची कार्यप्रणाली कशी असते. तो आपले आविष्करण कसे करतो, या बाबींचा संबंध विश्वनिर्मितीशी असल्याकारणाने विश्वनिर्माता या दृष्टीने त्याचाही पण समावेश ब्रह्मांड-निर्मिती प्रक्रियेमध्ये करणे आवश्यक ठरते. म्हणून सर्वप्रथम विश्वंभरास संक्षिप्तपणे जाणून घेऊन नंतर ब्रह्मांड-निर्मितीची प्रक्रिया सविस्तर जाणून घेऊ. या नंतर परलोकाची पण सविस्तर माहिती घेऊ.

**विश्वंभराची विश्वनिर्मिती-इच्छा**

आपली सर्वांची अशी धारणा आहे की, परमेश्वर हा निरपेक्ष आणि अनंत आहे, आणि हे विश्व – ही सृष्टी नाशवान आणि क्षणभंगुर आहे. परंतु एक वेळ असाही पण असेल की, परमेश्वर हा एकटाच असला पाहिजे आणि त्याचे ऐश्वर्य आणि सौंदर्य आलोकित (चमकत) होत असले पाहिजे. त्यावेळेस त्या सौंदर्याकडे पाहून उन्मत्त होणारा असा दुसरा कोणीच नसावा. त्या सौंदर्याचा उपभोग घेणारा अन्य दुसरा कोणीच नसावा. ते सौंदर्य आणि त्या विभूतीस पाहून आत्मविभोर होणारा कुणीच नसावा. अशा एकाकीपणाच्या वेळेस परमेश्वरास आत्माभिव्यक्तीची – आत्मआविष्करणाची उत्कट इच्छा झाली असावी. कारण आत्मप्रदर्शन हे सौंदर्याचे मूळ गुण असते. ते स्वतःस अभिव्यक्त केल्याशिवाय राहात नाही. स्वतःस प्रकट करण्याची ही इच्छा तिला व्याकूळ बनवते. ती नाना रूपांमध्ये प्रकट होऊ इच्छिते. म्हणून त्या अनंत सौंदर्य आणि विभूतीस आत्मप्रकाशनाची जेव्हा अभिलाषा झाली, तेव्हा या दृश्य जगाचे आविर्भाव झाले. हे जग त्या सौंदर्याचे अंशतः प्रकट करणारे असे आहे. याच्या पुष्टीसाठी पुढील हदीस (प्रेषित वचन)चा संदर्भ दिला जातो – ''मी एक गुप्त खजीना होतो.

लोकांनी जाणावे म्हणून अशी इच्छा माझ्या मनात निर्माण झाली. म्हणून मी विश्वाची (सृष्टीची) रचना केली.'' सूफी यालाच सृष्टीचे (आदी) कारण मानतात.

परम सौंदर्य आणि परम कल्याण असलेल्या त्या निरपेक्ष, परम सत्तेस, स्वतःस प्रकट करण्यासाठी या असत् क्षणभंगुर जगाची सृष्टी करावी लागली. विरोधी तत्त्वांच्या विद्यमानतेमुळे त्या तत्त्वांची ओळख सहजपणे होऊन जाते. अंधाराचे असणे हे प्रकाशाच्या ज्ञानासाठी आवश्यक आहे. म्हणून या असत् सृष्टीद्वारे त्या परम सत्तेचे ज्ञान होणे शक्य आहे. वास्तविक सत्ता नसलेली ही सृष्टी, परमसत्ता असलेल्या त्या परमेश्वरास समजण्यासाठी सहायक सिद्ध होते. अमंगलतेमुळे मंगलतेचे ज्ञान, असुंदरतेमुळे सुंदरतेचे ज्ञान, वाईटामुळे चांगल्याचे ज्ञान सहजपणे होऊन जाते. ती परम सत्ता, ते परम सौंदर्य आणि परम कल्याणाचे ज्ञान या विश्वापासून सृष्टीपासून होणे संभवनीय आहे. हे दृश्य जग परमेश्वराच्या सत्तेवरच निर्भर आहे.

सूफींचे असे मत आहे की, हे दृश्य जग अ-सत्च्या आरशामध्ये प्रतिबिंबित होणाऱ्या परमेश्वराच्या पडछायेसारखे आहे. परमेश्वर हा आपल्या पडछायेमध्ये प्रकट होत असतो, आणि मनुष्यांमध्ये पण तो स्वतःस प्रकट करत असतो. मनुष्य हा एकीकडे सृष्टीचा अंश आहे तर दुसरीकडे त्याने परमेश्वरास पण आत्मसात केले आहे. म्हणून त्याच्यामध्ये सत् आणि अ-सत् या दोन्ही गोष्टी आढळतात.

**सृष्टीचा आरंभ : 'तनज़्ज़ुल' म्हणजेच आविष्करण सिद्धान्त**

परमेश्वराची अभिव्यक्ती संपूर्ण सत्तांमध्ये अंतर्निहित असते, आणि तो परमेश्वर सृष्टीच्या प्रत्येक अणूरेणूमध्ये आपल्या संपूर्णतेसह अभिव्यक्त करत असतो. तो तुकड्यांमध्ये - खंडशः विभक्त नाही. सृष्टीचे संपूर्ण पदार्थ - वस्तू त्याच्या पूर्णतेमुळे आहेत आणि त्याने प्रदान केलेल्या नामांमुळेच ते नाव धारण करणारे आहेत. सृष्टी बर्फासारखी आहे तर तेजस्वरूप परमेश्वर हा जलसमान (पाण्यासारखा) आहे. पाणी हेच बर्फाचे मूळ आहे. त्या घनीभूत वस्तूचे नामकरण बर्फ असे झाले. परंतु पाणीच त्याचे अस्सल नाव आहे.

सृष्टी परमेश्वराच्या गुणांमध्ये अभिव्यक्ती मात्र आहे. हे जग-प्रपंच त्याच्या गुणावलीचे समाहार आहे. परमेश्वर आपल्या सत्तेस आपल्या गुणांमध्ये व्यक्त करतो. याचा अर्थ असा आहे की, तो स्वतः आपल्या स्वरूपाचे ज्ञान प्राप्त करत असतो. वास्तविक मनुष्य हा परमेश्वराचे नाम आणि गुणांमध्ये श्रद्धा (विश्वास) ठेवत असतो. माणसाच्या श्रद्धेमध्येच तो अभिव्यक्त - प्रकट होत असतो. ही श्रद्धा ज्ञान आणि चिंतनाच्या आधारावरच टिकलेली आहे. म्हणून तो ज्ञानाच्या आश्रयानेच मानवाच्या निकट प्रकट - अभिव्यक्त होत असतो.

परमेश्वराची अभिव्यक्ती - प्रकटीकरण आणि सृष्टी-प्रक्रियेसंबंधी सूफींमध्ये 'तनज़्ज़ुल'चा सिद्धान्त म्हणजेच आविष्करण सिद्धान्त प्रचलित आहे. याच्या मदतीने त्यांनी कशा प्रकारे ती परम सत्ता अर्थात परमेश्वर स्वतःस अभिव्यक्त करते हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच परमेश्वराची सत्ता (ज़ात) आणि गुण (सिफ़ात) व सृष्टा (सृष्टीकर्ता) (रब) आणि सृष्टी (अब्द) यांच्यामध्ये कोणता संबंध आहे, हेही दाखवून देण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. यामध्ये तीन अवस्था दर्शविल्या जातात.

प्रथम अवस्थेमध्ये ती परमसत्ता (अल्-वुजूदुल मुतलक) केवळ सत्ता (अज़्ज़ात) मात्र असते. त्या अवस्थेमध्ये ती निर्गुण, निरपेक्ष अशी असते. ती संपूर्णपणे अनभिव्यक्त, निर्विशेष आणि संबंधविहिन असते.

या अवस्थेची दोन रूपे आहेत. (१) अल–अमा, (२) अहदियत. यापैकी 'अल–अमा' हे आंतरिक रूप आहे, तर 'अहदियत' बाह्यरूप. 'अल–अमा'चा अभिप्राय आहे 'घोर अंधार'. निर्माणाधीन सृष्टीच्या बीजमात्र स्वरूपात परमेश्वर या अवस्थेमध्ये असतो. याचे समर्थन एका हदीस (प्रेषित–वचना)शी होतो. अबी दर याने पैगंबरास विचारले की सृष्टीच्यापूर्वी (अगोदर) परमेश्वर कोठे होता. प्रेषितांनी उत्तर दिले की तो 'अल–अमा' म्हणजेच घोर अंधारामध्ये होता. त्याच्या वर ना हवा होती ना खाली (पण). दुसरे 'अहदियत' हे बाह्य रूप आहे. या अवस्थेमध्ये परमेश्वर हा स्वतःस सर्वांतीत सत्तेच्या स्वरूपात ओळखतो. या अवस्थेमध्ये परमेश्वरास सर्वाच्या पलीकडे आपल्या 'एकत्वा'चे ज्ञान असते.

प्रथम अवस्थेनंतरची दुसरी अवस्था 'वहदत' म्हणून ओळखली जाते. याच अवस्थेस 'हक़ीक़तुल मुहम्मदिया' असे म्हणतात. असे म्हटले जाते की या अवस्थेमध्ये सत्ते(ज़ात)शी भिन्नता असत नाही, आणि ना एक दुसऱ्यापासून भिन्नता असते. अशा प्रकारे ही सृष्टी बीज स्वरूपात परमेश्वराच्या ज्ञानामध्ये वर्तमान (विद्यमान) असते. या अवस्थेची पण दोन रूपे आहेत. आंतरिक रूपास 'हूवीय्यत' अर्थात 'तत्–त्व'मध्ये शुद्ध सत्ता ही 'अनेक' विरोधी रूपांमध्येच आपल्या 'एकत्व'तेस ओळखते आणि बाह्य रूप असलेली 'अनीय्यत' म्हणजेच (अहं–ता)मध्ये विशुद्ध सत्तेस असलेल्या 'एका'चे ज्ञान होते. 'वहदत'च्या अवस्थेमध्ये 'तत्–त्व' त्या 'एका'पासून बाहेर नाही आणि ना या 'तत्–त्व'चा बोध करून देणारा त्याच्यापासून बाहेर आहे. या अवस्थेमध्ये जणू काही तो 'एक' अंतर्दर्शन करत असतो, आणि या अवस्थेचे बाह्य रूप 'अनीय्यत' म्हणजेच (अहं–ता)मध्ये विशुद्ध सत्तेस असलेल्या 'एका'चे ज्ञान होते. 'वहदत'च्या अवस्थेमध्ये 'तत्–त्व' त्या 'एका'पासून बाहेर नाही. आणि ना या 'तत्–त्व'चा बोध करून देणारा त्याच्यापासून बाहेर आहे. या अवस्थेमध्ये जणू काही तो 'एक' अंतर्दर्शन करत असतो आणि या अवस्थेचे बाह्य रूप 'अनीय्यत' (अहं–ता)मध्ये तो जसे काही सृष्टीस ध्यानामध्ये (लक्षामध्ये) ठेवून स्वतःकडे संकेत करत असतो. या द्वितीय अवस्थेमध्ये पण परमेश्वराचे अनभिव्यक्त रूपच असते. परंतु यामध्ये त्याला आपली जाण असते. तो या अवस्थेमध्ये अनभिव्यक्त असूनसुद्धा आत्मज्ञ असतो. 'तत्–त्व' तो 'अनेका'चा विरोधी 'एक' आहे, आणि 'अहं–ते'मध्ये 'अनेका'चा आश्रय 'एक' आहे. परंतु येथे हे स्पष्टपणे समजून घेतले पाहिजे की अशा प्रकारे दोन रूपांच्या म्हणण्यामध्ये द्वैत नाही. गूढवादी फारसी कवी महमूद शबिस्तही यांनी 'गुलशन–ए–राज़' या काव्य ग्रंथामध्ये म्हटले आहे की त्या सृष्टीचे कारणस्वरूप परम सत्यामध्ये 'तो', 'मी' आणि 'तू' (हे सर्व) एकच वस्तू (गोष्ट) आहेत, त्याचे एकत्व हे विभेदांपासून पलीकडे आहे.

तृतीय अवस्था 'वहिदीयत' आहे. ही परमेश्वराची नामरूप – विशिष्ट जगत–प्रपंचामध्ये अभिव्यक्त होण्याची अवस्था आहे. या अवस्थेमध्ये अनेकत्वामध्ये एकत्वाची अभिव्यक्ती होते. परमेश्वराचे ज्ञान सर्व पदार्थांमध्ये व्याप्त होऊन जाते. आता स्थूल जग प्रकाशित होते. सूक्ष्मावस्थेनंतर सत्तेचे स्थूल रूप उद्भासित होते. जीवन प्रकट होते.

अशा प्रकारे प्रथम विशुद्ध स्वरूप मात्र परमसत्ता होती. त्यावेळेस परमेश्वर निरपेक्ष, संबंधविहीत, निर्गुण, अनभिव्यक्त असतो. ही 'अहदियत'ची अवस्था आहे. याच्यानंतर तो आत्मज्ञ होतो (बनतो) आणि सत्ता, प्रकाश व शक्तीचे त्याला भान होते. ही 'वहदत'ची अवस्था आहे. आणि तृतीय अवस्था वाहिदीयतमध्ये सत्ता

जीवनामध्ये, प्रकाश अहंमध्ये आणि शक्ती इच्छा वा संकल्पामध्ये परिणत होते. याच्यानंतर पाहणे, ऐकणे आणि बोलण्याच्या शक्तीचा आविर्भाव होतो.

जेव्हा सत्तेचे विभिन्न असे सप्त गुण (१) जीवन, (२) ज्ञान, (३) शक्ती, (४) इच्छा वा संकल्प, (५) ऐकणे, (६) पाहणे आणि (७) बोलणे प्रकट होतात, तेव्हा ते 'लाहूत' देवत्व या नावाने अभिहित होते (ओळखले जाते). आणि जेव्हा त्याचे गुण क्रियात्मक रूप धारण करतात, जसे सृष्टी करणे, जीवनदान करणे, मारणे तेव्हा त्यास 'जबरूत' (प्रतिष्ठा, श्रेष्ठता, शक्ती) असे म्हणतात. जेव्हा ते क्रियाशील गुण वेगवेगळ्या लोकांमध्ये प्रकट झाले, तेव्हा त्यांच्याशीच अनुरूप असे नामकरण पण झाले. जसे, जेव्हा हे देवलोकात प्रकट झाले, तेव्हा ते 'आलम-ए-मलकूत' म्हणून गणले गेले, आणि सदृश्यस्वरूपात प्रकट झाल्याकारणाने त्यांना 'आलम-ए-मिसाल' हे नाव प्राप्त झाले, आणि भौतिक जगामध्ये अभिव्यक्त झाल्यावर 'आलम-ए-नासूत' हे नाव प्राप्त झाले.

**सूफी तत्त्वज्ञानानुसार ब्रह्मांडाची रचना**

सूफी तत्त्वज्ञानामध्ये 'पांच जगांची' कल्पना पण मांडण्यात आली आहे. यांना सूफी विद्वान 'अवालिम-ए-ख़म्स' अर्थात पंचजगत असे म्हणतात. परंतु येथे असे स्पष्टपणे नमूद करावेसे वाटते की हे पांच जगत (अवालिम-ए-ख़म्स) पांच स्थानविशेष नसून त्या 'तनज़्ज़ुल' (अवतरण)मधील अस्तित्वाच्या पांच स्थिती आहेत. (अवस्था आहेत.)

एका हदीसमध्ये म्हटले गेले आहे - 'अठरा हजार जगांपैकी तुमचे एक जग आहे.' सूफींनी पांच जगांची कल्पना संभवतः याच आधारावर केली असेल. 'अ हिस्टरी ऑफ ऑटोमन पोएट्री' पृ. ५४-५६ (उस्मानी काव्य) या आपल्या ग्रंथामध्ये ई. जे. डब्ल्यू गिब्ब यांनी या पांच जगांविषयी जे लिहिले आहे त्याचा सारांश असा आहे -

| स्थिती | जगत |
|---|---|
| १) हज़रत-ए-ग़ैब-ए-मुतलक़ (संपूर्ण अदृश्यावस्था) अथवा हज़रत-ए-अमा (घोर तिमिरावस्था) | १) आलम-ए-अयान-ए-साबित (अपरिवर्तित जगत) |
| २) ग़ैब-ए-मुज़ाफ़ (सापेक्षतः अदृश्य) | २) आलम-ए-जबरूत (ज्ञान-विज्ञान आणि आत्म्याचे जग) |
| ३) आलम-ए-मिसाल (सादृश्यावस्था) | ३) आलम-ए-मलकूत (देव लोक) आणि कधी कधी यास आलम-ए-बर्ज़ख (मध्य जगत) पण म्हणतात. कारण की हे चौथे जगतच्या प्राय: सीमेजवळ आहे. |
| ४) आलम-ए-शहादत (दृश्य जगत) | ४) आलम-ए- मुल्क (भौतिक जगत) |
| ५) आलम-ए-इन्सान (मानव जगत) | ५) 'पिंडामध्ये ब्रह्मांड.' हे संपूर्ण ब्रह्मांडास आपल्या शरीरामध्ये सामावून घेतलेले आहे. आपल्या शरीरामध्ये त्यास लपवून ठेवलेले आहे. |

या दृश्य भौतिक जगाद्वारे देवलोक अभिव्यक्त होते; तर स्वतः देवलोकाद्वारे आलम-ए-जबरूतची अभिव्यक्ती होते. आलम-ए-अयान-ए-साबितची अभिव्यक्ती आलम-ए-जबरूतद्वारा होते, आणि आलम-ए-अयान-ए-साबित (अपरिवर्तित जगत) परमेश्वराचे नाम-गुणांना प्रकट करणारा आहे. नाम आणि गुणांचे जग, परमेश्वराच्या एकत्वतेस अभिव्यक्त करते. यामध्ये आलम-ए-मिसाल, भावाविष्टावस्था पण आहे, ज्याच्यामध्ये आत्मा हा त्या परम सौंदर्यास पाहात बेहोश (अचेत) होऊन जातो. ही स्वप्नावस्था नव्हे. तो झोपत नाही, तरी पण जागे असताना पण या जगासाठी तो 'नसल्यातच' जमा आहे.

सृष्टीद्वारे स्वतःस अभिव्यक्त करण्याची इच्छा जेव्हा परमेश्वरास झाली, तेव्हा परमेश्वराने आपल्याच ज्योतीपासून एक ज्योत निर्माण केली. ती ज्योत 'नूर-ए-मुहम्मद' अथवा 'नूर-ए-अहमद' या नावाने ओळखली जाते. या ज्योतिस पाहून परमेश्वर तिच्यावर मुग्ध झाला. याच ज्योतीसाठी परमेश्वराने सृष्टीची रचना केली. ही ज्योतच सृष्टीचे आदी-कारण आहे. या ज्योतीद्वारे परमेश्वराने ब्रह्मांड निर्माण केले.

या ज्योतीच्या मदतीने सृष्टी रचनेचा क्रम पण दर्शवण्यात आलेला आहे. जेव्हा परमेश्वराने आपल्या प्रेमळ दृष्टीने या ज्योतिकडे पाहिले, तेव्हा लज्जेमुळे तिला घाम फुटला. त्या घामाच्या सूक्ष्म तत्त्वापासून परमेश्वराने प्रथम आत्म्याची रचना केली आणि नंतर अशाच प्रकारे निम्नाहून निम्न स्तराच्या विभिन्न आत्म्यांची रचना केली.

दुसऱ्यांदा परमेश्वराने पुन्हा त्या ज्योतीकडे पाहिले, तेव्हा पण तिला घाम फुटला, आणि त्यापासून परमेश्वराने शरीरधारी जगाची सृष्टी केली. आणि जी सर्वप्रथम वस्तू निर्माण झाली ती वस्तू म्हणजे 'अर्श' अर्थात ईश्वरी राजसिंहासन. हे 'अर्श' म्हणजे परमेश्वराचे सिंहासन होय. आणि या 'अर्श' खाली 'कुर्सी' अर्थात पादपीठाची सृष्टी केली. या 'कुर्सी'वर परमेश्वराचे पाय असतात, आणि ही 'अर्श'खाली आहे. या 'अर्श' आणि 'कुर्सी'ची कल्पना थोडीशी कठीण आहे. याची काहीशी कल्पना या गोष्टीवरून होऊ शकते की सूर्याच्या विशाल आकाराच्या तुलनेमध्ये मानवाचे शरीर हे सूक्ष्मातिसूक्ष्म असे आहे. (तसेच) आता सूर्य ज्या आकाशामध्ये आहे आणि त्याच्या चारी बाजूस जे आकाश विस्तारलेले आहे, त्याच्या तुलनेमध्ये त्याचे अस्तित्व नसल्यातच जमा आहे. अशा प्रकारे पुढे सरकत सरकत जर 'कुर्सी'पर्यंत पोहोचले, तर ज्या 'कुर्सी'मध्ये या सर्व वस्तू समाविष्ट होतात, तर मग एका नंतर दुसऱ्याची तुलना कल्पनातीत बनून जाते. आणि या 'कुर्सी'ची तुलना परमेश्वराच्या 'अर्श'शी करणे कठीण बनते. कारण की 'कुर्सी' तुलनेने अत्यंत लहान सिद्ध होते. इमाम ग़ज़ालीने आत्म्याचे (हक़ीक़त-ए-इन्सानी) स्वरूपाचे निरूपणामध्ये उपरोक्त विवेचन उपस्थित केले आहे की ज्यामुळे या सृष्टी-क्रमाच्या वैचित्र्याचा अनुभव घेतला जाऊ शकतो.

'अर्श' आणि तिच्या ज्योतीच्याखाली परमेश्वराने एका हिरव्या रंगाची पाटी निर्माण केली आहे, आणि पाचुसारख्या-मरकताप्रमाणे हिरव्या रंगाची लेखणी बनवली आणि तिला शुभ्र रंगाच्या ज्योतीच्या शाईने भरले आणि मग त्या लेखणीस 'लिहिण्या'चा आदेश दिला आणि लेखणीने त्या पाटीवर प्रलय-दिवसापर्यंत जे काही होणार आहे - घडणार आहे ते सर्व लिहून ठेवले आणि त्या लिखाणाने ती सर्व पाटी भरली.

'कुर्सी'खाली थोडे उजवीकडे वाकून त्याने शुभ्र मोत्यासारखे एक जग (लोक) निर्माण केले. या जगामध्ये कमळ-वृक्ष आहे. याच्यावरील लोका(जगा)मध्ये जाणे शक्य नाही. शुभ्र मोत्याचे जग हे जिब्रील या सर्वप्रमुख देवदूताचे निवास-स्थान आहे. याच जागेवर तूबा वृक्षाचे मूळ आहे.

हा तूबा वृक्ष आठ स्वर्गांच्या आठ उद्यानांमध्ये विस्तारलेला आहे. याच्या शाखा प्रत्येक स्वर्गामध्ये असलेल्या उद्यानात विस्तारलेल्या आहेत, आणि त्या स्वर्गांमध्ये राहणाऱ्या व्यक्तींपैकी प्रत्येकाच्या निवास-स्थानावर त्याची फांदी गेलेली आहे. 'तूबा'चा अर्थ आहे नैसर्गिक आनंद. हे आठ स्वर्ग एकामध्ये एक असे आहेत, आणि विभिन्न स्तरांमध्ये वर निघालेले आहेत. यांपैकी सर्वांत उंच आणि सर्वांत आत असलेला स्वर्ग म्हणजे 'जन्नत-ए-अदन' आणि याच 'जन्नत-ए-अदन'मध्ये स्वर्गीय विभूतीची एक झलक आढळून येऊ शकते. या विभूतीचे दर्शन करणे सर्वांच्या भाग्यात नसते. साधक हा आपल्या साधनेमध्ये अग्रेसर होत होत परमेश्वराच्या कृपाप्रसादामुळेच या विभूतीचे दर्शन करण्यामध्ये समर्थ होऊ शकतो. या स्वर्गांमध्ये तेच लोक निवास करतात की ज्यांना भगवत् कृपा प्राप्त झालेली असते. या पुण्यात्म्यांसाठी स्वर्गामध्ये मोठमोठे असे प्रासाद तयार आहेत. त्यांच्यामध्ये सुंदर सुंदर बागा आहेत. या स्वर्गांमध्ये नद्या प्रवाहित होतात. त्यापैकी तीन मुख्य आहेत. त्यांची नावे आहेत - कौसर, तसनीम आणि सल्सबील. या नद्यांचे उगमस्थळ सर्वांत उंच असलेले 'जन्नत-ए-अदन'मध्ये आहे. या नद्या सर्वांत खालच्या स्वर्गापर्यंत वहात गेलेल्या आहेत. येथील निवासी हूर आणि गिल्मे आहेत. ही हुरे स्वर्गीय शोभा असलेली आहेत, आणि त्या सर्वगुणसंपन्न अशा आहेत. या पुण्यात्म्यांच्या बायका (पत्नी) आहेत. गिल्मे हे सदासर्वदा तरणेबांड असणारे नवयुवक आहेत. ते या पुण्यात्म्यांच्या सेवेसाठी (नेमलेले) आहेत. ते त्यांच्या सेवेत मग्न असतात. स्वर्गाची व्यवस्था पाहणारा असा एक देवदूत आहे. त्याचे नाव रिज़वाँ आहे. या आठ स्वर्गांची अशी नावे आहेत - (१) जन्नतुल अदन हा सर्वोच्च स्वर्ग आहे आणि त्याच्यानंतर खालचे स्वर्ग क्रमशः याप्रमाणे आहेत - (२) विशुद्ध कस्तूरीचा स्वर्ग - जन्नतुल क़रार, (३) लाल सुवर्णमय स्वर्ग - कानन, जन्नतुल फ़िरदौस, (४) शुभ्र चंदेरी आनंद-कानन, जन्नतुल-नईम, (५) पिवळ्या रत्नाचे शाश्वत कानन, जन्नतुल-ख़ुल्द, (६) हिरव्या प्रस्तरांचा आवास-कानन, जन्नतुल-मावा, (७) लाल रूबीचा शांति-प्रासाद, दारुस्सलाम आणि (८) शुभ्र मोत्यांचा विभूती-प्रासाद, दारुल-जलाल आहे. पुष्कळांनी या क्रमामध्ये फेरफार केलेला आहे.

आठही स्वर्गांच्याखाली सहा समुद्र आहेत, आणि त्यांच्या खाली सात आकाश. हे सात आकाश एक दुसऱ्यावरती मंडपासारखे पसरलेले आहेत, आणि काफ़ (नावाच्या) पर्वताच्या (कोहकाफ़) आठ श्रेणींपैकी ज्या सात श्रेणी बाहेर निघालेल्या आहेत, त्यांच्यावर ते आकाश टिकलेले (टेकलेले) आहेत. हा कोहकाफ़ समस्त पृथ्वीस चारी बाजूने वेढलेला आहे. सर्वांत खालच्या आकाशाच्याखाली पाण्याचा एक समुद्र आहे, आणि याच समुद्रामध्ये सूर्य, चंद्र आणि तारे तरंगत फिरत असतात. हा समुद्र हवेवर स्थित आहे, परंतु त्याचे एक थेंब पण खाली पडत नाही. या हवेच्या समुद्राच्यामध्ये आणखी एक दुसरा पाण्याचा समुद्र आहे. तो आकाश आणि पृथ्वीच्या मधोमध आहे. पाण्याच्या याच समुद्रापासून पाऊस खाली पडतो. या पावसाच्या प्रत्येक थेंबासोबत एक देवदूत खाली येतो आणि त्या थेंबास यथास्थान ठेवतो. हे देवदूत प्रकाशाने बनलेले असे अशरीरी आहेत. म्हणून त्यांच्यामध्ये आपसात टक्कर निर्माण होण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही.

ही संपूर्ण पृथ्वी आठ पर्वतमालांनी घेरली गेलेली आहे. काफ़ पर्वतांच्या या आठ रांगांच्या आठ वर्तुळाकृती बनल्या आहेत. ही पृथ्वी त्यांना चिकटलेली आहे. जो सर्वांत बाहेरचा पर्वत आहे, त्याच्या चारी बाजूस एक मोठा सर्प लपटलेला आहे. या पर्वतरांगांमध्ये एका पाठोपाठ एक समुद्र आहेत. एका पर्वत रांगेनंतर

एक समुद्र याप्रमाणे समुद्रांची संख्या सात आहे. यांनी पृथ्वी घेरली गेली आहे, आणि हे समुद्र स्वतः पर्वतांनी घेरले गेलेले आहेत. सर्वांत आतील पर्वत सर्वांत आतल्या समुद्राने वेढला गेलेला आहे. या समुद्राचे नाव 'बहर-ए-मुहीत' आहे. प्रत्येक पर्वत आणि प्रत्येक समुद्राची रुंदी इतकी विशाल आहे की तिला ओलांडण्यासाठी पाचशे वर्षांची लांब यात्रा पार करावी लागेल. या पृथ्वीचा फारच थोडा हिस्सा लोकवस्तीमय आहे, आणि पर्वत व समुद्रांच्या निर्जन प्रदेशांमध्ये जिन्न (यक्ष, किन्नर) आणि अप्सरांचे निवास आहे.

मनुष्यांची वस्ती असलेली ही पृथ्वी सर्वांत वरची पृथ्वी आहे. हिच्या खाली आणखी सहा पृथ्व्या आहेत. या सर्व पूर्वी समुद्रात तरंगणाऱ्या जहाजासारख्या तरंगत फिरत असत. परमेश्वराने एका एका देवदूतास धरून त्याला आपल्या खांद्यावर स्थिर करण्याचा आदेश दिला. त्या देवदूताच्या खाली परमेश्वराने एक मोठेसे चट्टान - सुळके ठेवून दिले, आणि त्या चट्टाना(सुळक्या)खाली एक फार मोठा पोळ ठेवले. या पोळाखाली एक मोठा मासा आणि त्या माशाखाली एक महासागर. या महासागराच्याखाली नरकाचे सात स्तर आहेत. हे स्तर म्हणजे कदाचित इस्लामी धारणेनुसार नरकाचे सात प्रकार असावेत. ते सप्तनरक याप्रमाणे आहेत. (१) जहन्नुम, (२) लज़ा, (३) हुतमा, (४) सैर, (५) सक़र, (६) जहीम आणि (७) हाविया. या सप्त नरकांच्याखाली एक भयंकर वादळ आणि त्याच्याखाली मानवी बुद्धीची पोहोच नाही. (ई. जे. डब्ल्यू. गिब्ब : ए हिस्ट्री ऑफ ऑट्टोमन पोएट्री (उस्मानी काव्य), पृ. ३४-३९ च्या आधारे.)

## 'इन्सान कामिल'चे ग्रंथकार अब्दुल करीम जीली प्रणीत सृष्टी-प्रपंच

या सृष्टीनिर्मितीच्या अगोदर अव्यक्त परमेश्वर आपल्यामध्ये आप होता आणि सर्व तत्त्वे त्याच्यामध्येच विद्यमान होती. अव्यक्त परमेश्वर 'अल-अमा'च्या अवस्थेमध्ये होता, आणि तो संबंधविहिन अवस्थेमध्ये होता, हेच 'हक़ीक़तुल हक़ायक़' (परमेश्वराचे संपूर्ण ज्ञान) आहे आणि हे सर्व संबंधांच्या पलीकडे होते. हे 'हक़ीक़तुल हक़ायक़' आणि 'हक़ीक़तुल मुहम्मदिया' दोन्ही एकच आहेत. एका हदीस (प्रेषित-वचना)मध्ये 'अल-याकूत-उल्-बैज़ा' (शुभ्र याकूत) पण म्हटले गेले आहे. परमेश्वर याच अवस्थेमध्ये होता. त्यावेळेस ही सृष्टी निर्माण झाली नव्हती. परमेश्वरास सृष्टी-रचनेची इच्छा झाली, तेव्हा त्याने 'हक़ीक़तुल मुहम्मदिया'वर आपली संपूर्ण दृष्टी टाकली. परमेश्वराच्या या पूर्ण अभिव्यक्तीस सहन करणे हे तिच्या शक्तीपलीकडे होते, जरी तेच (हक़ीक़तुल मुहम्मदिया) सृष्टीचे उगम होते. म्हणून परमेश्वराचा दृष्टिक्षेप होताक्षणीच ते द्रवरूप बनून पाणी झाले. आता परमेश्वराने तिच्यावर आपली ऐश्वर्यपूर्ण दृष्टी टाकली. ही दृष्टी पडताच त्यामध्ये तरंग (लाटा) आणि फेस निर्माण झाले. या फेसाच्या मदतीने परमेश्वराने सात पृथ्व्या आणि त्यांचे निवासी बनवले. त्या पाण्यापासून जी वाफ तयार झाली त्याच्या साहाय्याने परमेश्वराने सात आकाश आणि प्रत्येकामध्ये राहणाऱ्या देवदूतांची सृष्टी केली. तेव्हा परमेश्वराने त्या पाण्यास सात समुद्रांमध्ये परिणत केले. हे जगाच्या चारी दिशेस पसरलेले - विस्तारलेले आहेत, आणि अशाच प्रकारे सृष्टी बनली.

'आदि-कारण' (परमेश्वराने) आपल्याच अनुरूप अशी आदिभूतांची रचना केली. ही प्रथम अभिव्यक्ती विशुद्ध ज्ञान आहे आणि याला 'अक़्ल-ए-अव्वल' अथवा 'अक़्ल-ए-कुल' (विश्व-ज्ञान) असे म्हणतात. त्या विश्व-ज्ञानाचे तीन पैलू आहेत. प्रथम 'हक़्क़' ज्याच्याद्वारे तो 'आदी-कारणास' समजण्यास समर्थ होतो. दुसरे

'नफ़्स'च्या फलस्वरूप तो स्वतःस ओळखतो आणि तिसरे 'मुहताज' (निर्भरता) ज्याच्यामुळे तो जाणतो की त्याला परमेश्वराचे आधार आहे, त्याला त्याच्यावरच निर्भर रहावयाचे आहे. असे म्हटले जाते की एका वस्तुपासून एकच वस्तू अभिव्यक्त होते. म्हणून या तिन्हींपासून क्रमशः पुन्हा तीन वस्तू निघाल्या. 'हक़्क़'पासून 'द्वितीय ज्ञान' आणि 'नफ़्स'पासून 'नफ़्स-ए-कुल' अथवा 'नफ़्स-ए-अव्वल' (विश्वात्मा) आणि 'मुहताज'पासून 'जिस्म-ए-कुल्ल' (विश्व-शरीर). अशाच प्रकारे हा क्रम चालत असतो, आणि शेवटी 'दहावे ज्ञान', 'नववे आत्मा' आणि चंद्रलोकापर्यंत पोहोचते.

**सप्तग्रहासंबंधी पुढील गोष्टी सांगितल्या जातात –**

१) चंद्रलोक वा सोम, परमेश्वराने याला 'अल-रूह'पासून तयार केले. याचा रंग चांदीहून शुभ्र आहे. परमेश्वराने याला आदमचे निवासस्थान निर्धारित केले. चंद्रलोकाला सोम पण म्हणतात.

२) बुध, हे धूसर वर्णाचे आहे. हे देवदूतांचे निवासस्थान आहे.

३) शुक्र, हे 'आलमुल-मिसाल'चे लोक अर्थात प्रतिकृती जगत किंवा सादृश्य जगत आहे. हे पिवळ्या रंगाचे आहे. यामध्ये नाना प्रकारचे देवदूत असतात. यांच्यावर नाना प्रकारची कामे सोपवलेली असतात.

४) सूर्य वा रवी, याचे निर्माण 'कल्ब' अर्थात अंतःकरणापासून झाले आहे. याच्यामध्ये इद्रीस, येशू, सुलेमान इत्यादी प्रेषितांचे निवास आहे. याचे अधिपती देवदूत इस्त्राफ़ील आहेत.

५) मंगल, याचे अधिपती मृत्यूचे देवदूत 'इज़राइल' आहेत. हा घट्ट रक्तवर्णाचा आहे.

६) गुरू (बृहस्पती), हा नीलवर्ण आहे. येथील देवदूतांचा प्रमुख मीकाईल आहे. येथील देवदूत मंगलकारी आणि करुणामय आहेत. यांच्यापैकी काही पशूंच्या आकृतीसारखे आहेत. काही पक्षांच्या आकृतीसारखे आहेत. तर काही मनुष्यांसारखे आहेत. यांच्यापैकी काही असे आहेत की अर्धे आगीचे तर अर्धे बर्फाचे बनलेले आहेत.

७) शनि, सर्वप्रथम याची रचना झाली होती. याचा रंग कृष्णवर्ण आहे. मुहम्मदांच्या ज्योतीपासून याचे निर्माण झाले होते. या सातनंतर एक आठवे लोक पण आहे, आणि ते स्थिर तारांगणाचे लोक आहे, आणि सर्वांत बाहेरचे नववे लोक 'फ़लकुल अफ़लाक'चे आहे. याला 'चर्ख़-ए-आज़म' अर्थात महदाकाश पण म्हणतात. येथे ना तारे आहेत, ना कोणत्याच प्रकारचे चिन्ह. या नऊ लोकांमध्ये प्रत्येकास ज्ञान, आत्मा आणि शरीर आहे.

उपरोक्त सप्तग्रह हे मानवाच्या शरीरावयवाशी निगडित आहेत. जसे सोम हातांशी, बुध वक्षःस्थळाशी, शुक्र पोटाशी, सूर्य पायांशी, मंगल चेहऱ्याशी, गुरू पाठीशी आणि शनि डोळ्यांशी निगडित आहे.

**सृष्टी-प्रपंचामध्ये मानवाचे आविर्भाव**

सृष्टीच्या प्रारंभापासून मानवाच्या आविर्भावापर्यंतच्या क्रमास काहीसे अशा प्रकारे समजून घेतले जाऊ शकते. परमेश्वराने जेव्हा सृष्टीची इच्छा व्यक्त केली, तेव्हा आपल्या ज्योतीपासून 'नुरूल मुहम्मदिया'स निर्माण केले. हे आदीभूतांसोबत परमेश्वराचा साक्षात संबंध आहे. हेच 'विश्व-ज्ञान' आहे आणि हेच जगताचे आदिरूप आहे. आदीभूतापासून मूलतत्त्वे, स्वर्ग, चार महाभूते, आकाश, तारे इत्यादींचे आविर्भाव झाले. चार महाभूते अर्थात अग्नी, वायू, आप आणि पृथ्वी हे सर्वांत अगोदर आविर्भूत होणारे पदार्थ आहेत. दृश्य जगामध्ये

सर्वप्रथम रूप ग्रहण करणारी हीच चार तत्त्वे होत. यांपैकी सर्वांत वर अग्नी आहे, त्यानंतर वायू, नंतर आप (जल) आणि मग पृथ्वी. हे जणुकाही वर्तुळांतर्गत वर्तुळासारखे एक दुसऱ्याच्या वर क्रमाने आहेत. यांचे गुण वेगळे आहेत, आणि त्यांचे असेही पण काही गुण आहेत जे सामाईक आहेत. त्याच सामाईक गुणांच्या आधारे ते एकापासून दुसऱ्या रूपामध्ये परिवर्तित होत राहतात. जसे अग्नी शुष्क आणि उष्ण आहे. वायू उष्ण आणि ओलसर आहे. पाणी (आप) ओलसर आणि थंड आणि पृथ्वी थंड आणि शुष्क. अशा प्रकारे संपूर्ण चक्र पूर्ण होऊन जाते. अग्नी आणि वायूमध्ये सामाईक गुण 'उष्णते'चा आहे. म्हणून या समान गुणांमुळे एकाचे दुसऱ्या रूपात परिवर्तन घडते. अशाच प्रकारे इतर तत्त्वांमध्ये घडते. हे परिवर्तन सप्तग्रहांच्या प्रभावामुळे होत असते. याच्यामुळे धातू, उद्‌भिद्‌ आणि जीव-जंतूंचा उगम होतो. यामुळे सप्तग्रहांना 'पितृसप्तक' (अबा-ए-सबा) असे म्हणतात, आणि चार महाभूतांना 'मातृचतुष्टय' (उम्महात-ए-अरबा) असे म्हणतात. सर्वांत शेवटी मानवाचा उदय होतो. जीव-जंतूंची चरम परिणती मानवामध्ये होऊन समाप्त होऊन जाते.

जीवजगतामध्ये अन्यतम मानव आहे, आणि मानवांमध्ये पण उच्चतम आणि अन्यतम 'पुरुषोत्तम' वा 'नरोत्तम' (इन्सातुल कामिल) आहे. सर्व प्राणी जाणूनबुजून किंवा अजाणतेपणे या नरोत्तमाच्या स्तरापर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्नशील असतात, कारण की येथे पोचून ते 'प्रथम ज्ञान' (अक़्ल-ए-अव्वल)मध्ये प्रवेश करतात, आणि येथेच पोचून आत्मा त्या परम ऐश्वर्याच्या अंतःकरणामध्ये प्रवेश करू शकतो. तेथूनच खालच्या बाजूस त्याची यात्रा सुरू झाली होती आणि पुन्हा तेथेच पोचून ती समाप्त होऊन जाते. या यात्रेस 'दौरान-ए-वुजूद' अर्थात अस्तित्व यात्रा म्हणतात.

खालच्या बाजूकडील या यात्रेस 'तरीके-मब्द' अर्थात गृहापसारी म्हणजेच बाहेरच्या बाजूकडील यात्रा म्हणतात. ज्योतिकिरण, ज्ञान, आत्मा, लोक आणि तत्त्वांपासून सुरू होऊन पृथ्वीपर्यंत पोहोचते. यानंतर वरच्या बाजूस यात्रा सुरू होते. यास 'तरीके-मआद' अर्थात गृहाभिमुख यात्रा म्हणतात. ही यात्रा धातू, उद्‌भिद्‌, जीवजंतूंपासून मानवापर्यंत पोचते. मानवाची यात्रा वरच्या बाजूस 'नरोत्तमा'च्या स्तरापर्यंत पोहोचते.

### इमाम ग़ज़ालीप्रणीत विश्वोत्पत्ती क्रम वा ब्रह्मांड-व्यवस्था[४९]

विश्व वा ब्रह्मांड एक समष्टीचे नाव आहे. याचे अनेक घटक असतात. जसे पृथ्वी आणि आकाश आणि जे काही यांच्या दरम्यान आहे ते सर्व यांचा समावेश यात होतो. परंतु जेव्हा हे सोडून ब्रह्मांडाचे नाव घेतले जाते, तेव्हा याचा आशय आकाश असा होतो. कारण की सर्वोच्च आकाशाने समस्त वस्तुजातींना आपल्यात समाविष्ट करून घेतले आहे, आणि सर्वांना घेरलेले आहे. विश्वाचे सर्व घटक हे एकमेव निर्मात्या ईश्वराची सृष्टी या नात्याने सगळे समान आहेत. आपली सृष्टी परमेश्वरावर निर्भर असल्याकारणाने सामर्थ्य, दुर्बलता आणि विलय यांमध्ये या सर्व घटकांपैकी प्रत्येक घटक एकसारखा आहे; कारण की सृष्टीची निर्मिती या दृष्टीने सृष्टा-ईश्वरामध्ये काहीच फरक नसतो, परंतु तफ़ावत (भेद, अंतर) हा सृष्टीच्या जीवांमध्येच दिसून येतो. तफ़ावत निर्मात्याकडून नव्हे तर, जीवांच्या आपापल्या संभावनेवर अवलंबून असते. विश्वाच्या प्रत्येक कारागिरी व पदार्थाने यथाशक्ती आपले प्रमाण ग्रहण केले आहे, आणि सृष्टीमधील प्रत्येकाने आपले रूप ग्रहण केले आहे. कमी-जास्त, आरंभ व शेवट, गुण-दोष यांसह श्रेणींचे विभिन्नतेचे रहस्य यामध्येच निहित आहे.

**जगाची नवनिर्मिती : जगाची अर्वाचीनता**

जगाचे नवनिर्मित होणे हे खरे आहे. कारण की जग हे परिवर्तनशील व गतिमान (चल) आहे. ते गतीदाता आणि परिवर्तनकर्ता प्रचालक परमेश्वरावर निर्भर असते. गतिशील हा नेहमी गतीदात्यावर अवलंबून असतो. गतीच्या आंदोलनामध्ये आणि तिच्या स्थिरतेमध्येसुद्धा ते निर्भर असते. आणि परिवर्तन हे नेहमी सृष्टीमध्ये – जगामध्ये आणि विकारांमध्ये घडत असते. जी वस्तू (मुळात) नव्हती; मग मात्र ती निर्माण झाली, ती अर्वाचिन असते. नवनिर्माणाचा अर्थ आहे निर्भर असणे. ही निर्भरता असते पूर्वी अस्तित्वात असलेल्या अशा सत्तेवर की जिच्या अगोदर कोणीच अस्तित्वात नसेल; आणि ते अस्तित्व की जिच्या अगोदर कुणाचेच अस्तित्व नसेल. ते अस्तित्व म्हणजे प्रत्यक्ष सर्वश्रेष्ठ परमपवित्र अशा परमेश्वराची सत्ता होय. कोणतीही गरज, अपेक्षा, आवश्यकता आणि विकाराशिवाय त्याने समस्त वस्तू जातांना निर्माण केले.

**अल्लाहची सर्वप्रथम निर्मिती**

सर्वप्रथम वस्तू की जिला सर्वश्रेष्ठ परमेश्वराने कोणतेही साधन, तत्त्व, अवधी आणि सामुग्री याशिवाय निर्माण केले आणि जिच्यानंतर इतर सर्व वस्तू निर्माण केल्या ती वस्तू म्हणजे बुद्धी (विवेक) होय. बुद्धी सृष्टीचे आद्य कारण आहे. ते एक स्पष्ट असे तत्त्व आहे. ते आपल्या सर्व सत्तेमध्ये परिपूर्ण आहे. इतरांना समजून घेणारी आहे. हिलाच 'अक़्ल-ए-कुल्ली' अर्थात विश्व-ज्ञान असे म्हणतात.

आद्य निर्मितीसंबंधाविषयी तीन प्रेषित-वचने (अहादीस) आढळून येतात :

१) ''अव्वलु मा ख़लक़ अल्लाहुल अक़्ल'' अर्थात सर्वप्रथम वस्तू जी अल्लाहने निर्माण केली ती बुद्धी आहे.

२) ''अव्वलु मा ख़लक़ अल्लाहु नूरी'' अर्थात प्रथम जी वस्तू अल्लाहने निर्माण केली ती (वस्तू) माझा प्रकाश आहे.

३) ''अव्वलु मा ख़लक़ अल्लाहुल क़लम'' अर्थात सर्वप्रथम जी वस्तू अल्लाहने निर्माण केली ती (वस्तू) लेखणी आहे.

उपरोक्त प्रेषित-वचनां(अहादीस) मधील मेळ असा आहे –

**प्रारंभिकता : अग्रिमता**

प्रारंभिकतेचे दोन प्रकारचे प्रयोग आहेत. एक काळानुसार प्रयोग तर दुसरे पद-प्रतिष्ठेनुसार प्रयोग. काळानुसार प्रारंभिकतेचे उदाहरणस्वरूप आपल्याला पिता-पुत्रामधील संबंध लक्षात घेता येईल. पिता हा पुत्राच्या अगोदर (अस्तित्वात) असतो. पद-प्रतिष्ठेची अग्रता आपल्याला पदाच्या श्रेणीवरून निर्धारित करता येते. जसे पद प्रतिष्ठेच्या दृष्टीने सर्वप्रथम आहेत संदेशहर (नबी) नंतर त्यांचे सहचर (सहाबा) मग शेवटी त्यांची धर्मप्रजा (उम्मत). काळाची अग्रिमता ही भौतिक आहे, लौकिक आहे आणि पदाची अग्रिमता ही वास्तविक आहे. जी वस्तू काळाच्या दृष्टीने सुरुवातीस असेल; हे शक्य आहे की तिच्या अगोदर पण दुसरी एखादी वस्तू अस्तित्वात असावी त्यामुळे हिच्या तुलनेत अगोदरची वस्तू ही दुसऱ्या दर्जावर येऊन ठेपेल, परंतु जी वस्तू पद-प्रतिष्ठा आणि वास्तवात प्रथम आहे, ती या परिवर्तनापासून सुरक्षित आहे. हीच वास्तविक अग्रिमता बुद्धीसाठी प्रमाण-सिद्ध आहे. कारण की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने बुद्धीच्या अगोदर कोणतीच वस्तू उत्पन्न (निर्माण) केलेली

नाही, ना सृष्टीमध्ये कुणालाही तिच्या बरोबरचा दर्जा दिला गेलेला आहे. संपूर्ण मूलतत्त्वे आणि संयुगांमध्ये बुद्धी ही सर्वांत प्रथम अशी सर्वप्रथमच आहे. इतर पदार्थांचे प्रकटन तिच्यापासून झाले. आणि शेवटी सर्व वस्तू तिच्याचकडे प्रयाण करतात, आणि या दृष्टीने, या अनुषंगाने बुद्धीच सर्वप्रथम आहे. हीच शेवटी आहे. हीच (सृष्टीचे) मूळ कारण (पूर्ववर्ती) आहे. हीच (सर्वांत) शेवटी आहे. (परवर्ती आहे.)

हीच बुद्धी परमेश्वराची लेखणी आहे की जिच्या मदतीने त्याने ब्रह्मांडामधील वस्तूंची अक्षरे, कारीगिरीचे पृष्ठ सृष्टीच्या पाटीवर लिहिले.

एखाद्या व्यक्तीमध्ये बुद्धीच्या साहाय्याने प्रभाव उत्पन्न करणाऱ्या शक्तीस 'नबुव्वत' म्हणजेच संदेशहरत्व असे म्हणतात. दुसऱ्या 'हदीस'मध्ये 'नूरी'चा मथितार्थ संदेशहरत्वाचे प्रकाश. संदेशहरत्वाचा प्रकाश हा सृष्टीमधील सर्व पदार्थांपेक्षा सर्वांत अगोदर(चा) आहे. हा प्रकाश सर्वांत आधी आहे कारण की अल्लाह(ईश्वरा)ने प्रथम याच प्रकाशास उत्पन्न केले, म्हणजे की जेणे करून सर्व विश्वाने संदेशहरत्वाच्या प्रकाशाचे अनुसरण करावे; आणि संदेशहरत्वाचा प्रकाश खरोखर बुद्धीच आहे, आणि निर्मितीमध्ये सर्वांअगोदर निर्मिती ही संदेशहरांचीच आहे. समस्त संदेशहर हे दैवी प्रज्ञांना (वह्यी इलाही)च्या अनुषंगाने एक व्यक्तीसारखेच आहेत. कारण की यद्यपि संदेशहरांची संख्या या वेगवेगळ्या विभिन्न आहेत. मात्र संदेशहरत्वाच्या संख्या विभिन्न नाहीत. प्रेषित पुष्कळ आहेत. मार्ग पण अनेक आहेत, परंतु उद्दिष्ट एक आहे. बुद्धी (विवेक) एक आहे. आत्मा एक आहे आणि दैवी प्रज्ञान पण एकच आहे. (म्हणजेच या प्रत्येक कोटीची लक्षणे एकसारखीच असतात.) मात्र संदेशहरत्वाचे वास्तव विभिन्न नाही. म्हणूनच आदमचा संबंध तिच्याकडे तसाच आहे, जसा की मुहम्मदचा तिच्याकडे आहे. जणू की एकच वास्तव दोन्ही स्वरूपात अभिव्यक्त आहे. म्हणून ज्या अर्थी मुहम्मद यांनी आदमच्या संदेशहरत्वास सिद्ध केले. त्या अर्थी जणू काही त्यांनी आपल्या संदेशहरत्वास सिद्ध केले. आणि जेव्हा त्यांनी आपल्या जातिनिशी आपली पराकाष्ठा सिद्ध केली तेव्हा जणू काही आदमची पराकाष्ठा सिद्ध केली.

तर आता असे ज्ञात झाले की बुद्धी आणि लेखणी आणि संदेशहरत्वाचा प्रकाश या सर्वांचा अभिप्राय एक समान वस्तूशीच आहे, मात्र विविध स्वरूपात, विविध प्रचितींच्या स्वरूपात. जेव्हा वस्तूंना सतर्कता प्रदान केली, तेव्हा सृष्टीच्या सर्वप्रथम मूळ कारणास 'बुद्धी' (विवेक) म्हणून हाक मारली. जेव्हा वस्तूंना लेख स्वरूपात प्रस्तुत केले तेव्हा सर्वप्रथम मूळ कारणास 'लेखणी' ठरवले. जेव्हा लोकांना आपल्याकडे बोलावण्याचे उल्लेख केले तेव्हा सर्वप्रथम मूळ कारणास 'संदेशहरत्वाचा प्रकाश' या नावाने नामप्रदान केले. वस्तुतः विवेक-बुद्धीची सत्ता एकच आहे, जिला परमेश्वराने सर्वप्रथम निर्माण केले, आणि तिचे गुण प्रचुर आहेत, असंख्य आहेत. कधी ती बुद्धी आहे, कधी निकटवर्ती देवदूत, कधी दैवी सिंहासनवाहक, तर कधी निमंत्रण करणारा निमंत्रक. आणि हेच अग्रिमतेचे वास्तव आहे.

विविध प्रचितींना (विचारात) घेतल्यास प्रत्येक प्रकारासाठी एक आद्य कारण आहे, असे दिसून येते. म्हणून आत्म्याचे मूलकारण बुद्धी आहे. देहाचे मूलकारण लेखणी आहे. संदेशहरत्वाच्या प्रकाशाचे मूलकारण प्रेषित मुहम्मद आहेत. मानवाचे आद्य कारण आदम आहेत. आणि या सर्व मूलकारणांचे आद्य कारण सर्वश्रेष्ठ परमेश्वराचा शब्द 'कुन' अर्थात 'भव' 'हो' हा आहे. हा प्रथमापैकी सर्वप्रथम आहे.

येथे ‘कुन’ची कार्यप्रणाली संक्षिप्तपणे समजून घेतल्यास वावगे ठरणार नाही. पवित्र कुराणमध्ये एके ठिकाणी याचा दाखला असा आहे. – ‘‘अल्लाह जे इच्छितो ते निर्माण करतो. तो जेव्हा एखादे कार्य (गोष्ट) करण्याचा निर्णय घेतो तेव्हा फक्त म्हणतो की, ‘हो’ तर ते होते.’’ ३:४७ या श्लोकाची मूळ अरबी संहिता पुढीलप्रमाणे आहे –

‘‘यख़्लुकु मा यशाअु अिज़ा क़ज़ा अम्रन फ़ अिन्नमा यक़ूलु लह् कुन् फ़यकूनु’’ ३:४७ शिवाय, ‘‘जेव्हा आम्ही एखादी गोष्ट इच्छितो तेव्हा तिच्या बाबतीत आम्ही एवढेच म्हणतो की ‘हो’, आणि बस्स ती होते.’’ १६:४०

‘‘तोच आकाश आणि पृथ्वीचा आद्यप्रवर्तक आहे. जेव्हा एखादी घटना घटीत करण्याचे (तो) इच्छितो. तेव्हा फक्त म्हणतो, ‘तथास्तु’ आणि क्षणार्धात तसे घडते.’’ २ : ११७

‘‘तोच खरा सर्वश्रेष्ठ निर्माता (व) निपुण आहे की, जेव्हा (तो एखादी गोष्ट घडवू इच्छितो) तेव्हा तो फक्त एवढेच म्हणतो की, ‘हो’ आणि ती होऊन जाते.’’ ३६ : ८१-८२

याचे तात्पर्य असे आहे की परमेश्वराने इच्छाशक्तीद्वारे आपल्या स्वरूपामध्ये स्थित पदार्थसमूहास उपादानाशिवायाच बाह्य रूपामध्ये प्रकट केले. म्हणजेच परमेश्वराच्या केवळ इच्छामात्रामुळे वस्तुसृष्टी बनते. चैतन्यरूपी परमेश्वरच विश्वाचे मूलकारण आहे. तो अखंड, एक आणि अद्वितीय आहे. तेथे निमित्त आणि उपादानामध्ये काहीच फरक नाही. लौकिक जगामध्ये जर एखादी वस्तू निर्माण करायची असेल तर एकीकडे जसे त्या वस्तुच्या उपादानाची आवश्यकता भासते तर दुसरीकडे त्याचप्रमाणे सृष्टीकर्त्याची इच्छा इत्यादीची गरज पण लागते. यापैकी एक उपादान कारण आहे तर दुसरे निमित्त कारण. सर्वत्र असाच अनुभव आहे. परंतु आदिसृष्टीमध्ये निमित्त आणि उपादानचे विभाग नसल्यामुळे सृष्टीकर्त्याच्या आत्मस्वरूपानेच, केवळ त्याच्या इच्छेच्या प्रभावामुळे वाटेल त्या पदार्थाची सृष्टी होऊ शकते. वास्तविक येथे उपादानकारण आणि निमित्तकारण दोन्ही अभिन्न आहेत.

प्रेषित मुहम्मद हे बुद्धीस्वरूप आहेत. ते ईश्वराची लेखणी आहेत आणि ईश्वर भक्तीकडे निमंत्रित करणारे वास्तव आहेत. धर्मशास्त्र (शरीयत) निर्माण करण्यामध्ये ते बुद्धीचे किंचित अंश आहेत. उपरोक्त तिन्ही ‘अहादीस’ (प्रेषित-वचने)शी अभिप्राय त्यांचीच सत्ता आहे. कारण की संदेशहरत्वाच्यावर ईश्वरत्वाशिवाय दुसरा कोणताच दर्जा नाही. म्हणून पद-प्रतिष्ठेमध्ये सर्वप्रथम बुद्धी आहे, आणि वास्तवामध्ये सर्वांत प्रथम वास्तवाचे प्रकाश आहे. हे संदेशहरत्वाच्या प्रकाशाचे दुसरे नाव आहे आणि संदेशहरत्वाचा हा प्रकाश बुद्धी आणि लेखणीवर भारी आहे म्हणजेच प्रभावी आहे.

### कर्म आणि कर्मफल (फ़ेल व अनफ़आल)

जेव्हा बुद्धीच्या डोळ्यांमध्ये परमेश्वराने एकतत्त्वतेचा सुर्मा लावला (नेत्रांजन लावले) तेव्हा तिने दोन दृष्टीपात केले. एक दृष्टीपात होते सृष्टीच्या मूळ कारणाच्या पराकाष्ठेकडे; तर दुसरे नवनिर्मित जगाच्या त्रुटीकडे. प्रथम तिची दृष्टी निर्माता परमेश्वराच्या पराकाष्ठेकडे वळली आणि मग जेव्हा ती सृष्टीकडे वळली, तेव्हा तिने निर्मित सृष्टीच्या त्रुटींना पाहिले. या दोन्ही दृष्टी एकापाठोपाठ एक पडल्यामुळे कर्म आणि कर्मफल

प्रकट झाले; कारण की पराकाष्ठा व त्रुटी (कमी) हेच कर्म आणि कर्मफळाचे प्रमाण असतात. हेच गुज, हेच रहस्य शब्द 'कुन' मध्ये दडलेले आहे. वर्णाक्षर 'काफ़' त्या पराकाष्ठेचे स्थळ आहे. हे कर्मामध्ये ठेवलेले आहे. कर्मामध्ये स्थित आहे, आणि 'नून' हे वर्णाक्षर त्रुटीचे, कमीचे स्थळ असून ते कर्मफळामध्ये निहित आहे. हीच बाब कोष्टक स्वरूपात अशी ठेवता येईल :-

'कुन्' = (क + न्) = क = कमाल = पराकाष्ठा (प्रत्येक बाबतीत)

न् = नुक़सान = त्रुटी, दोष, हानी, कमी

याचाच अर्थ असा की, ईश्वरी इच्छा ही क्षणार्धात निमिषमात्रात एकीकडे पराकाष्ठेपर्यंत पोहोचण्यास तर दुसरीकडे महाभयंकर विध्वंस स्वरूपात विनाश घडविण्यास समर्थ आहे. फक्त इच्छा किंवा संकल्प निर्माण होण्याचाच अवकाश! अवधी!

हीच कर्म आणि कर्मफळ अशी सर्वप्रथम दोन मूलतत्त्वे आहेत की ज्यामुळे संपूर्ण ब्रह्मांड अस्तित्वात आले. महान व शक्तिशाली परमेश्वराच्या सामर्थ्यामुळे कर्म उत्पन्न झाले आणि नवनिर्मितीच्या (नवनिर्मित सृष्टीच्या) स्वीकृतीमुळे कर्मफळ निर्माण झाले. कर्म हे नरासारखे आहे, तर कर्मफळ हे मादीसारखे आहे. आणि दोन्ही ईश्वराच्या आदेशामुळे नवनिर्मित आहेत. कर्माने बुद्धीच्या सत्तेमध्ये स्थैर्य धारण केले म्हणजेच कर्म हे बुद्धीसामर्थ्यामुळे स्थिर दृढ असते. कर्मफळाने मनामध्ये आपली जागा शोधली. नर आणि मादी (या जोडी)मध्ये ईश्वराच्या आदेशामुळे विवाह झाला - दोन्ही विवाहबद्ध झाले. मन (चित्त) बुद्धीशी क्रियान्वित झाले म्हणजेच बुद्धीने चित्तमध्ये आपले कार्य सुरू केले. बुद्धी आणि मना(चित्ता)चे दृष्टांत हे ऐहिक जगामधील लोकांत असलेले आदिप्रपितामह व प्रमातामह आदम व हव्वा आहेत. प्रथम वस्तू जी अल्लाहने मूलकारणस्वरूप निर्माण केली ती म्हणजे बुद्धी (विवेक) आणि प्रथम वस्तू जी अल्लाहने मूलकारणस्वरूप निर्माण केली ती म्हणजे मन (चित्त) ज्याप्रमाणे आदमपासून हव्वा जन्मली तद्वत बुद्धीपासून मन (चित्त) निर्माण झाले. मग पुन्हा ज्याप्रमाणे आदम व हव्वापासून समस्त मानवजात जन्मली, त्याचप्रमाणे बुद्धी आणि मना(चित्ता)च्या संयोगामुळे संपूर्ण विश्व उदयास आले.

### या नंतरचा क्रम (सृष्टी-प्रपंच)

(१) बुद्धीसाठीच तर सर्वश्रेष्ठ परमेश्वराने, एक परिपूर्ण असे मूलतत्त्व - विवेकशील, सप्राण, सशक्त (मात्र) सकर्म नव्हे असे, कायम संतुलित जग उत्पन्न (निर्माण) केले. याला (२) आत्मा (मन वा चित्त) असे म्हणतात. ज्याप्रमाणे मानवी बाळास जन्म देण्यासाठी आसुसलेली स्त्री आपल्या पोटात सुव्यवस्थित क्रमाने वाढविण्याच्या इच्छेने पुरुषाच्या शुक्राणु (वीर्य बिंदू)ची गरजवंत असते, त्याचप्रमाणे आत्मा हा विवेकबुद्धीच्या शुक्राणुचा अपेक्षी असतो. त्यामुळे तो तिच्यावर अनुरक्त झाला. तो तिचा प्रेमी बनला. तेव्हा सर्वश्रेष्ठ परमेश्वराने बुद्धी-तत्त्वास पण त्याच्याकडे आकृष्ट होण्याचा आदेश दिला की जेणेकरून आत्म्यामध्ये त्याने बीजारोपण करावे. कारण की बीजारोपणास स्वीकार करण्याची स्वाभाविक क्षमता व योग्यता आत्म्यामध्ये ठेवण्यात आली होती. आत्म्यानंतर सर्वश्रेष्ठ परमेश्वराने (३) मूलद्रव्यशक्तीस निर्माण केले. हे एक मूलतत्त्व आहे, प्रकृती आहे. ते कामवासनेसारखे आहे. ते सर्व प्रकारच्या स्वरूपांना ग्रहण करते. उदाहरणार्थ, कामवासना ही जर घोड्यामध्ये

प्रबळ झाली तर ती घोड्याच्या स्वरूपातच व्यक्त होणार, तसेच गाढवामध्ये प्रबळ झाली तर गाढव स्वरूपातच व्यक्त होणार. आणि मानवजातीमध्ये कामोत्तेजना निर्माण झाली तर ती मानवाच्या आकृतीमध्येच प्रकट होणार. मूलद्रव्यानंतर सर्वश्रेष्ठ परमेश्वराने (४) स्वभावास वा प्रकृतीस निर्माण केले. स्वभाव हा मूलद्रव्यावर आच्छादित आहे. मूलद्रव्य स्वभावाच्या अधीन असते. त्याने मूलद्रव्यास साजेसे असे अनुरूप घडवले. उदाहरणार्थ, आकाशाच्या मूलद्रव्यास आकाशासारखे, घोड्याच्या मूलद्रव्यास घोड्यासारखे घडवले, तर माणसाच्या मूलद्रव्यास माणसाचे रूप प्रदान केले. म्हणून परमेश्वराचे प्रेषित मुहम्मद यांनी याच गोष्टीकडे संकेत केले आहे की –

निःसंदेह सर्वश्रेष्ठ परमेश्वराचा एक देवदूत (असा) आहे, जो ज्यासाठी योग्य आहे, त्याला त्याच्याकडे घेऊन जातो. (अर्थात प्रत्येकास स्वभाव व योग्यतेनुसार घडवले जाते.)

हा देवदूतच स्वाभाविक शक्ती आहे, जी प्रत्येक स्वरूपास तिला योग्य अशा मूलपदार्थाकडे घेऊन जाते. मग त्यानंतर (५) निरपेक्ष चल शक्ती उत्पन्न झाली. ही हालचाल स्वभावाच्या आत्म्यामध्ये असते की जेणेकरून स्वभावामध्ये गती उत्पन्न होईल आणि तिच्यामुळे मूलपदार्थ आणि स्वरूप पण गतीशील बनावेत. म्हणून स्वभाव चंचल बनले आणि स्वभावास (६) शारीरिक मूलद्रव्याशी जोडण्यात आले की, त्यामुळे देहत्त्व प्रकट व्हावे. आता प्रकृती (स्वभाव) ईश्वरी आदेशामुळे (७) निरपेक्ष देहस्वरूपात प्रकट झाली. याला सर्वश्रेष्ठ – सर्वोच्च आकाश असे म्हणतात. यामुळे सर्व आकाशे निर्माण झाली. स्वभावाच्या परिवर्तनामुळे सर्वोच्च आकाशामध्ये नऊ (९) भाग निर्माण झाले. त्यामुळे नऊ (९) आकाशे प्रकट झाली, आणि राशीचक्रामध्ये सतेज तारे निर्माण केले. त्यांपैकी सात तारे वेगळे होऊन आकाशामध्ये त्यांनी आपापले वेगळे स्थान ग्रहण केले. यांनाच सप्त ग्रह म्हणतात. इथपर्यंत की प्रकृती (स्वभाव) अशा प्रकारे परिवर्तित होत होत शेवटी सोम ग्रहापर्यंत पोहोचली. हे सर्वांत शेवटचे आकाश आहे. नंतर निरपेक्ष मूलद्रव्यापासून चार जड पदार्थांचे आधारस्तंभ अर्थात (८) चार महाभूते निर्माण झाली.(सूफी तत्त्वज्ञानामध्ये आकाशतत्त्वाची गणती महाभूतांमध्ये केली जात नाही. म्हणून पाच ऐवजी चार महाभूते होतात.) ही महाभूते आपल्या वेगळ्या स्वरूपाची क्षमता राखतात (धारण करतात.) यांना विश्वाच्या (ब्रह्मांडाच्या) केंद्रस्थानी प्रस्थापित करण्यात आले. हे केंद्र वर्तुळांतर्गत एक मध्यबिंदू आहे आणि तो अंतःकरणस्थानी स्थित आहे. ज्याप्रमाणे मानवाचे समस्त अवयव अंतःकरणाकडे प्रवृत्त होत असतात, त्याचप्रमाणे विश्वाच्या या केंद्रभागाकडे संपूर्ण विश्व प्रवृत्त होते. हा अननुभव असा केंद्र आहे. मग सर्वश्रेष्ठ परमेश्वराने स्वाभाविक शक्तीसह भूतांमध्ये (९) स्वभाव (प्रकृती) निर्माण केले. परिणामी ही तत्त्वे आपसात सरमिसळ झाली आणि नानाविध पदार्थ उदयास आले. अतएव सर्वप्रथम खनिजे (खनिज पदार्थ) निर्माण झाली. खनिज पदार्थ सुरुवातीस फार अशक्त होते. परंतु स्वाभाविक शक्तीच्या जोरावर ते प्रवाळ इत्यादीसारखे प्रबळ अर्थात कठीण झाले. यांच्या नंतर वनस्पती निर्माण झाल्या. ह्या पण सुरुवातीस फार अशक्त होत्या, परंतु पुढे कालांतराने स्वाभाविक शक्तीच्या मदतीने हे मजबूत व शक्तिशाली बनले. नंतर स्वभाव पशुत्वाकडे उन्मुख झाले. प्रथम अशक्त लहान-लहान असे कृमी-कीटक जन्मले. आपले पालनपोषण करत करत ते कालांतराने सरिसृप आदीमध्ये विकसित झाले. पुढे पक्षी, पशू आणि जंगली जनावरे निर्माण झाली. तसेच भारी भक्कम शरीरधारी व काही प्रमाणात अजस्त्र असे पशू निर्माण झाले. जसे हत्ती, उंट, जिराफ इत्यादी प्रकट होऊ लागले.

ज्याप्रमाणे वनस्पती – जगत (वानस्पत्य) आणि वृक्षाचे स्वरूप हे पशुत्वासाठी नाविन्य आहे, आणि जसे उदाहरणार्थ हत्तीचे स्वरूप मानवासाठी नाविन्य आहे, त्याचप्रमाणे मानवी स्वरूप संदेशहरत्वाचे नाविन्य आहे. या सर्व कामांपासून कार्यमुक्त झाल्यानंतर प्रकृतीने मानवाच्या जन्माकडे लक्ष दिले. सर्वांग सुंदर, सुव्यवस्थित, संतुलित अशा परिपूर्ण स्वरूपात मानवास निर्माण केले. येथे येऊन विश्व–निर्मितीची इतिश्री झाली. विश्वरचना पराकाष्ठेस पोहोचली. ईश्वरत्वाची सर्वोच्चता गाठली गेली. प्रतिनिधित्व–उप–प्रभारित्व अनिवार्य झाले. प्रभुत्वाचा मेळ बसला (प्रभुत्वाचे एकापाठोपाठ येणे झाले). ''आणि गलबत (नौका)'जूदी' (पर्वता)वर (जाऊन) टेकले. आणि (जगाच्या चारही दिशेस) पुकारले गेले की दुराचारी लोक (ईश्वरसान्निध्यापासून) दुरावले गेले.'' ११:४४ जणू काही मानवी चेहरा हा प्रेषित नूहच्या नौकेसारखा आहे, जी भयंकर समुद्री वादळाच्या आकांडतांडव अजस्त्र लाटांमध्ये फसलेली आहे, आणि त्या मानवी स्वरूपाच्या पराकाष्ठेशी निगडित असणे हे दैवी सिंहासनावर साक्षात आरूढ कृपाळू परमेश्वरासारखे आहे.

थोडक्यात, उपरोक्त क्रम अशा प्रकारे प्रकट झाले की एकत्त्वतेच्या सत्तेनंतर पहिल्या श्रेणीमध्ये बुद्धी, दुसऱ्या स्तरावर आत्मा, तिसऱ्या दर्जावर मूलद्रव्य, चौथ्या श्रेणीवर प्रकृती (स्वभाव), पाचव्या दर्जावर गती, सहाव्या श्रेणीवर शारीरिक मूलद्रव्य, सातव्या श्रेणीवर आकाशे, आठव्या दर्जावर मूलतत्त्वे आणि संयुगे म्हणजेच पृथ्वी, आप, तेज आणि वायू, ही चार महाभूते, नवव्या श्रेणीवर त्रितत्त्वे म्हणजेच सृष्टीचे तीन वर्ग – (१) प्राणी, (२) वनस्पती आणि (३) जड पदार्थ आणि दहाव्या श्रेणीवर मानव. ज्याप्रमाणे गणती ही दहाच्या संख्येवर येऊन पूर्ण होते, त्याचप्रमाणे निरपेक्ष स्वरूप पण मानवी स्वरूपात परिपूर्ण होते. ज्याप्रमाणे ''सृष्टीतील कोणतीही वस्तू त्याच्या समान नाही.'' ४२:११ (किंवा, ''त्याच्यासारखे कोणीही नाही.'' ४२:११) असे व्यक्त करून विश्वनिर्माता परमेश्वराने आपली अनुपमता विशद केली आहे. त्याचप्रमाणे ''ते तुमच्यासारखे असणार नाहीत.'' ४७:३८ असे नमूद करून आपला उत्तराधिकारी मानवाची पण अनुपमता व्यक्त केली आहे.

### मानवजातीमध्ये काहीना काहीवर श्रेष्ठता

मानवजातीच्या जन्मानंतर सर्वश्रेष्ठ परमेश्वराने त्याच्या जातीमध्ये काही लोकांना ज्ञान आणि कर्माच्या बळावर दुसऱ्या इतर लोकांवर वर्चस्व प्रस्थापित करण्याचे बळ दिले. जसे की तो परमेश्वर स्वतः म्हणतो : ''ज्या लोकांनी श्रद्धा धारण केली, आणि सत्कर्मे केली त्यांच्या मनात कृपावंत (अल्लाह) (एकमेकांप्रती) प्रेम निर्माण करील.'' १९:९६ येथे श्रद्धेशी अभिप्राय आहे वस्तूंचे ज्ञान, सत्कर्मांशी अभिप्राय आहे त्या ज्ञानास अनुरूप अशा पद्धतीने सक्रिय होणे; आणि प्रेम निर्माण करील याचा अभिप्राय अन्य प्राणीमात्र व इतरेजनांवर अधिकार गाजविणारी अशी श्रेष्ठता व वरीयता त्यांना बहाल करण्यात आली आहे. ज्या अर्थी मूलतत्त्वांमध्ये (मूलतत्त्वांपैकी) सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या सत्तेच्या निकटतम वस्तू विवेक–बुद्धी आहे, त्या अर्थी संयुगांमध्ये सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या निकटतम ज्ञानी माणूसच असला पाहिजे, आणि तो म्हणजे मानव आहे. बुद्धीच्या कमी–जास्त प्रमाणाच्या आधारावर मानवजातीच्या व्यक्तींमध्ये आपसात तफ़ावत अवलंबून आहे.

**सारांश**

इमाम ग़ज़ाली यांच्या शब्दांमध्येच सारांश प्रस्तुत करून सदरहू विवेचन समाप्त करण्यात येत आहे.

सर्वप्रथम सर्वश्रेष्ठ परमेश्वराने विश्व-ज्ञानास निर्माण केले. त्यानंतर विश्वात्म्यास उत्पन्न केले. मग त्याने या दोहोंपासून कर्म आणि कर्मफल प्रकट केले आणि निरपेक्ष तत्त्वामध्ये या दोहोंस प्रचलित केले. इथपर्यंत की त्यांनी देहत्वामध्ये (शरीर धारण करण्यामध्ये) खूप परिश्रम घेतले. याच दोघांच्या माध्यमाने परमेश्वराने देहापासून आकाश व सतेज तारे निर्माण केले. नंतर चार महाभूते उत्पन्न केली. मग कर्म व कर्मफळास त्यांच्यावर दृष्टिक्षेप करण्यास भाग पाडले. त्यांनी अनेक प्रकारचे जीव पदार्थ जसे, खनिजे, वनस्पती व पशू-प्राणी यांना प्रकट केले. परंतु तरी पण ते संतुष्ट झाले नाहीत. विश्व-ज्ञानास (अक़्ल-ए-अव्वल) खनिजे, वनस्पती व प्राणी-जगत निर्माण करूनसुद्धा संतुष्टी मिळाली नाही. त्याने अशी इच्छा केली की यापेक्षा चांगली निर्मिती करता आली तर बरे होईल. यांच्यापेक्षा अधिक उत्तम, चांगले व शक्यतो परिपूर्ण व श्रेष्ठ दर्जाची निर्मिती करण्याच्या इच्छेने जेव्हा कर्म आणि कर्मफल या दोघांनी एक उत्तम मूल(जड)पदार्थ पाणी आणि मातीमध्ये पाहिले तेव्हा ते दोघे त्यांच्या आतमध्ये घुसले. तेव्हा ते जड पदार्थ प्रभुत्वाच्या दारापर्यंत विस्तृत झाले, इथपर्यंत की ईश्वरी शक्तीने त्याच्यामध्ये संकल्पाच्या प्रभावासह प्रभाव पाडले आणि त्या मूल जड पदार्थापासून एक सापेक्ष, प्रतिष्ठित वाक्-शक्ती (वाचा) योग्य अशी एक व्यक्ती निर्माण केली. नंतर विश्वात्मा त्या व्यक्तीकडे प्रवृत्त झाला. तेव्हा विश्व-ज्ञानाचे त्याच्याकडे लक्ष गेले. आणि विश्व-ज्ञाना (अक़्ल-ए-कुल्ली)ने त्या व्यक्तीस चमत्कार आणि त्याचे सौंदर्य व पराकाष्ठेस त्याची दृष्टी आणि बुद्धिमत्ते (प्रतिभेस)वर प्रकाशित केले. त्यावेळेस बुद्धीच्या अनुमोदनाने त्याची जिव्हा उघडली म्हणजेच मानव हा बोलू लागला. ईश्वरी दरबारा-साम्राज्यापासून त्याला ज्या असंख्य देणग्या लाभल्या त्याच्यावर जी अनंत अशी प्रभु-कृपा झाली याप्रित्यर्थ त्याने परमेश्वराचे मनःपूर्वक आभार मानले.

## ब्रह्मांडाचे घटक : सूफ़ी तात्त्विक संक्षिप्त परिचय

### १) अल्लाह (परात्पर परब्रह्म)

अल्लाह अर्थात परात्पर परब्रह्म एकमेव एकच आहे. तो निरपेक्ष, निस्पृह आहे. सत्ता व सामर्थ्याच्या मानाने एकच आहे. कोणीही त्याचा अंश किंवा अवतार नाही. तो स्वयंभू, नित्यसिद्ध व अविनाशी आहे. तो सर्वगुणसंपन्न आहे. तो निराकार आहे. त्याचा कोणी एकही प्रतिस्पर्धी, विरोधी व सहभागी नाही. तो न जनिता आहे न जन्य. तत्सम कोणीही नाही. अल्लाह असा परम पवित्र होय की त्याच्याशिवाय अन्य कोणी उपास्य (देव) नाही; तो निरंतर जिवंत व आत्मनिर्भर आहे. प्रत्येक गोष्टीचा प्रारंभकर्ता आणि अवघ्या सृष्टीचा शाश्वत सांभाळकर्ता तोच आहे. त्याला ना गुंगी घेरते व ना निद्रा. जे काही आकाशात आहे व जे काही पृथ्वीत आहे ते त्याचेच होय. लोकांसमोर उघड असलेल्या आणि त्यांच्यापासून छुप्या असलेल्या सर्व गोष्टी तो जाणून आहे. आणि तो इच्छील त्याच्या व्यतिरिक्त त्याच्या ज्ञानातून काहीच प्राप्त करू शकत नाहीत. त्याच्या सत्तारूपी सिंहासनाने पृथ्वी आणि आकाश यांना व्यापून टाकलेले आहे, व या दोहोंचे संरक्षण त्याला मुळीच जड जात नाही, आणि तो अति परात्पर व महिमावंत आहे.

तो सर्वज्ञ आहे. तो मोठा उदार, क्षमाशील आहे. तो दयावान व कृपाशील आहे. तो सर्व शक्तिमान व शासक आहे. तो सर्जनकर्ता व पालनकर्ता आहे. त्याचे मानवजातीवर अनंत उपकार आहेत. तोच एकमेव परमेश्वर आहे. सकल सृष्टीचा स्वामी तोच आहे. तोच जीवन व मृत्यू देणारा आहे. तो चिरस्थायी आहे. सर्व सत्ताधीश तोच आहे. तो सर्व काही करू शकतो. तो आकाशांचा व पृथ्वीचा प्रकाश आहे. तो सूक्ष्मदर्शी आहे. मान व प्रतिष्ठांचा तोच स्वामी आहे. तो सर्वसाक्षी आहे. तोच वाली व त्राता आहे. तोच हसवतो, तोच रडवतो. तो अत्यंत पवित्र, जबरदस्त व बुद्धिमान आहे. त्याचे वैभव उच्च व श्रेष्ठ आहे. त्याची पकड अत्यंत कठोर आहे. अल्लाह उरात लपवलेली गुपितेही जाणतो. तो परोक्षांचा ज्ञाता आहे. तो माणसाच्या मानेच्या शिरेपेक्षाही अधिक जवळ आहे. त्याचे कृपाछत्र फार विस्तृत आहे. तो जे इच्छितो ते करतो. त्याच्या आदेशाची अंमलबजावणी निमिषमात्रात होते. ''आमची आज्ञा अगदी पापणीच्या लवण्याप्रमाणे एका (शब्दात पार पाडली जाते.)'' ५४:५० तोच सृष्टीचा प्रारंभ करतो व तिची पुनरावृत्ती करतो. त्याने आकाशांना व पृथ्वीला सत्याधिष्ठित निर्माण केले आहे. तोच सर्व सृष्टीचा पालनकर्ता, रक्षक, आज्ञापक, संयोजक, व्यवस्थापक व शासक सर्व काही आहे. तो जगात सर्वांना उपजीविका देतो.

'अल्लाह' हे सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे – परात्पर परब्रह्माचे सत्तात्मक नाम आहे. त्याची इतर प्रमुख ९९ प्रचलित नावे ही गुणदर्शक आहेत. यांपैकी तीन 'रब्ब', 'रहमान' आणि 'रहीम' अर्थात पालनकर्ता, दयाळू आणि कृपाळू ही त्याच्या सत्तेशी सर्वांत जवळ अशी इतकी घनिष्टपणे निगडित आहेत की, ते पण त्याच्या सत्तेचे ('ज़ात') अंश असल्यासारखेच वाटतात. यास्तव, अपवाद म्हणून यांना वगळून परमेश्वराचे – अल्लाहचे यानंतरचे जे आठ गुण आहेत, ते त्याचे अग्रगण्य अष्टगुण म्हणून गणले जातात. हेच त्याचे अष्टगुण त्याच्या ईशसिंहासनाचे आधारस्तंभ आहेत. ते अग्रगण्य अष्टगुण याप्रमाणे आहेत – (१) मालिक (अधीश्वर), (२) कुद्दूस (निर्विकार), (३) सलाम (कल्याणकारी), (४) मुअ्मिन (शांतिदाता), (५) मुहैमिन (त्राता), (६) अज़ीज़ (प्रबळ), (७) जब्बार (ताडक) आणि (८) मुतकब्बिर (प्रशंसनीय). ईशसिंहासनाप्रमाणेच त्याच्या पादपीठास ('कुर्सी') आधार देणारे पण चार अतिरिक्त अग्रगण्य गुण पण आहेत. हे अतिरिक्त अग्रगण्य गुण येणेप्रमाणे आहेत –

(१) अलीम (ज्ञानस्त्रोत, सर्वज्ञ), (२) ह्य्य (चैतन्य), (३) क़य्यूम (अविनाशी), (४) क़ादिर (सर्वसमर्थ) खरोखरच अल्लाची सर्वच नावे सुंदरच सुंदर आहेत!

सारांश, अल्लाह अर्थात परात्पर परब्रह्म हा एकमेवाद्वितीय आहे. तो ज्ञानमय व प्रकाशस्वरूप आहे. तो सर्वज्ञ आहे. तो दृष्टीचा द्रष्टा आहे. तो सूक्ष्मदर्शी व नित्य सावध आहे. ''तो आदी, अंत, व्यक्त, अव्यक्त आणि सर्व वस्तूंचा ज्ञाता आहे.'' ५७:३ तो सृष्टीकर्ता आणि दयामय आहे. तो सर्वशक्तिमान आहे, सर्वाधिपती आहे. तो इच्छा-समर्थ आहे. शेवटी तो अवर्णनीय महान् असा आहे.

### २) अक़्ल-ए-अव्वल वा अक़्ल-ए-कुल्ल (विश्व-ज्ञान) वा (मूर्खता वा अज्ञान)

अक़्ल-ए-अव्वल अर्थात विश्व-ज्ञान हे ब्रह्मांडामध्ये ईश्वरी ज्ञानाच्या स्वरूपाचे प्रासाद आहे. यासाठी की ते सर्वोच्च लेखणी आहे. नंतर तिच्यापासून सुरक्षित पाटीमध्ये (लौह-ए-महफ़ूज़) ज्ञान प्रकट होते. ते पाटीचे

सार तत्त्व आहे, आणि पाटी हे तिचे सविस्तर विवेचन आहे. अपितु ते दिव्य ज्ञानाच्या सारतत्त्वाचे सविस्तर विवरण आहे, आणि पाटी ही तिची तन्मात्रा आणि आविष्करणाचे स्थान आहे. विश्व-ज्ञानामध्ये ती दैवी रहस्ये दडलेली आहेत की पाटीमध्ये त्यांच्यासाठी अवकाश नाही. जसे की दैवी ज्ञानामध्ये ती वस्तू आहे की जिच्यासाठी विश्व-ज्ञान हे स्थळ होऊ शकत नाही. मग दैवी ज्ञान हेच 'उम्मुल किताब' अर्थात ग्रंथ-मातृका निश्चित होते. तर अक़्ल-ए-अव्वल अर्थात विश्व-ज्ञान 'इमाम मुबीन' सुस्पष्ट अधिनायक आणि पाटी ही 'किताब-मुबीन' म्हणजेच सुस्पष्ट ग्रंथ ठरतात. म्हणून पाटी ही लेखणीच्या अधीन असून (तिचे स्थान) तिच्यानंतर आहे, आणि लेखणी जे की विश्व-ज्ञान आहे पाटीवर शासक असते. ते शेष बाकीचे अथवा संक्षिप्ताचे सविस्तर विवेचन करणारी आहे.ज्या दौती(दऊती) ईश्वरी ज्ञानामध्ये आहेत त्या 'नून'(अरबी भाषेत 'न' हे वर्णाक्षरा)पासून अभिव्यक्त-प्रकट आहेत.विश्व-ज्ञान हे दैवी ज्ञानाचा प्रकाश आहे. दैवी सार-तत्त्वाचे प्रथम तपशील (सविस्तर विवेचन) आहे. म्हणूनच प्रेषित मुहम्मद यांनी म्हटले आहे की प्रथमतः परमेश्वराने (विवेक) बुद्धीस निर्माण केले. आणि सर्व निर्मित भौतिक वस्तूंमध्ये ते दैवी वास्तवांशी अधिक जवळ आहे. विश्व-ज्ञान हा एक सरळ - शास्त्रशुद्ध तराजू आहे. सारांश हा की, विश्व-ज्ञान ही बौद्धिक शक्ती आहे, ज्ञान सामर्थ्य आहे. म्हणजेच प्रकाशमान समंजसपणा यामध्येच समस्त ज्ञानांची रूपे प्रकट झाली. ही रूपे विश्व-ज्ञानामध्ये ठेवी स्वरूपात ठेवण्यात आलेली आहेत, असे नव्हे.

**व्यवहार ज्ञान**

व्यवहार ज्ञान हा एक प्रकाश आहे. चिंतनात्मक नियमाने याचे वजन केले जाते. केवळ विश्वज्ञानाच्या कारणांपैकी कोणत्या तरी एका कारणामुळे याचा बोध होतो. विश्व-ज्ञान अनुमानाच्या कैदे (बंधना)पासून मुक्त आहे. याचा समोरचा भाग वैषयिक आत्मा आणि विश्व-ज्ञानाच्या केंद्राकडे असतो. ते सविस्तर आदेशाच्या न्यायाची तराजू आहे. ते प्रत्येक निकषाने वस्तूंना तोलते. व्यवहार ज्ञानाचा एकच निकष आहे. त्याचे एकच पारडे असते आणि ते पारडे म्हणजे सवय. सवयीची एकच बाजू असते, आणि ते ज्ञात आहे. त्याचे एकच काटे असते आणि ते म्हणजे स्वभाव. या उलट विश्व-ज्ञानास दोन पारडी असतात. एक पारडे बुद्धिचातुर्याचे आहे तर दुसरे सामर्थ्याचे, आणि त्याला दोन बाजू आहेत. एक आहे दैवी इच्छा तर दुसरी स्वभावाच्या योग्यता. त्याचे दोन काटे आहेत. एक दैवी संकल्प तर दुसरा मानवी गरजा. याचे वेगवेगळे निकष आहेत. यांपैकी एक ते आहे की त्याचे कोणतेच निकष नाही. म्हणून तर विश्व-ज्ञानच तंतोतंत योग्य व खरी तराजू आहे. कारण की त्याच्यामध्ये खोट निर्माण होत नाही, आणि ना त्याच्यामुळे कोणतीही वस्तू नष्ट होते. याउलट व्यवहार ज्ञान जुलूम - अन्याय करून बसते. त्याच्यामुळे पुष्कळशा वस्तू नष्ट पण होतात. व्यवहाराचे अनुमान हे सुधारण्यासाठी नसते. परंतु ते लालसेचा, तृष्णेचा महामार्ग असते. परमेश्वराने म्हटले आहे, ''अनुमान करणारे नष्ट झाले.''

म्हणून विश्व-ज्ञानाच्या संबंधाची तुलना सूर्याशी करता येते. आणि स्वभाव (तबियत-ए-कुल्ली)ची तुलना सूर्यकिरणे पडणाऱ्या त्या पाण्याशी करता येते आणि व्यवहारज्ञानाची तुलना भिंतीवर पडणाऱ्या पाण्यावरील त्या किरणांशी आहे. जी व्यक्ती उदाहरणार्थ, पाण्यावर आपली नजर (दृष्टी) टाकते, ती सूर्याच्या स्वरूपाचा खरा अंदाज घेते आणि त्याचा प्रकाश प्रकटपणे प्राप्त करते. या दोन्हीमध्ये फरक दिसून येत नाही. परंतु प्रत्यक्ष सूर्यास

पाहणारा हा आपले डोके वर करतो, आणि पाण्यात पाहणारा हा आपले डोके खाली वाकवितो. अशाच प्रकारे स्वभाव हे विश्व-ज्ञानापासून आहे, आणि त्याच्या ज्ञानास ग्रहण करणारा प्रकाश अंतःकरण-मना (क़ल्ब)पासून दैवी ज्ञानास उचलून घेते. विश्व-ज्ञानापासून त्याच्या ज्ञानास ग्रहण करणारे स्थान ग्रंथाकडे अंतःकरणाच्या प्रकाशामुळे खालच्या बाजूस वळलेले असते. आणि ही एक सीमा आहे. ती सर्वश्रेष्ठ परमेश्वराने सुरक्षित पाटीवर ठेवस्वरूपात (सुरक्षित) ठेवली आहे. या उलट विश्व-ज्ञान हे स्वतः साक्षात परमेश्वराकडून ज्ञान ग्रहण करते.

**अक़्ल-ए-कुल्ल (कुल्ली) – मूर्खता वा अज्ञान वा अति ज्ञान**

अक़्ल-ए-कुल्ली म्हणजेच मूर्खतेचा अभिप्राय कधी निष्ठूर, दुर्भागी अशा नास्तिकाचा चमत्कार असा घेतला जातो. त्यांच्या इच्छा वा वासनांच्या क्षेत्रामध्ये याचे काहीसे ज्ञान त्यांना दिले जाते. नंतर प्रकृती, आकाश, प्रकाश इत्यादींसारख्या जगाच्या पडद्यांपासून ते निसर्गाच्या वा मायेच्या रहस्यांवर विजय प्राप्त करतात आणि ते त्या वस्तूंची उपासना व पूजा करण्यास सुरुवात करतात. आणि हे अल्लाहचे-परमेश्वराचे त्यांच्याशी षडयंत्र असते. यामध्ये एक सूक्ष्म गोष्ट अशी आहे की, सर्वश्रेष्ठ परमेश्वर त्यांच्यावर ते पूजित असलेल्या त्या वस्तूंच्या वस्त्रप्रावरणामध्ये प्रकाशित होतो, आणि हे आपल्या मूर्खतेच्या सहाय्याने त्याचा बोध करतात, आणि त्याच्या प्रभावशाली असल्याचे ते कबूल करतात, कारण की मूर्खता सृष्टीचे सीमोल्लंघन करत नाही आणि मग त्यामुळे ते अल्लाहस-परमेश्वरास ओळखत नाहीत. कारण की बुद्धी अल्लाहस ओळखू शकत नाही. बुद्धीस श्रद्धेच्या प्रकाशाची साथ-जोड असेल तरच परमेश्वरास ओळखणे शक्य आहे, नाही तर बुद्धीसाठी हे अशक्य आहे. विचार आणि अनुमानाने पण ओळखता येणे शक्य नाही. या संदर्भात व्यवहार ज्ञान आणि मूर्खता दोन्ही एकसारखेच आहेत. बुद्धी ही ब्रह्मज्ञानाच्या साधनांपैकी एक आहे, याकडे आमच्या आचार्यांची दृष्टी गेलेली आहे. त्यांचे हे विधान एखाद्या गोष्टीस सोपे समजून त्याची उपेक्षा करण्याकडे आहे की जेणेकरून प्रमाण बाकी राहावे. बुद्धीमुळे लाभान्वित होणारे ब्रह्मज्ञान हे प्रमाण आणि प्रभावांवर निर्भर असणारे असते. या उलट श्रद्धेचे ज्ञान हे एक निरपेक्ष ज्ञान असते. म्हणून श्रद्धेचे ज्ञान नामरूपाशी निगडित असते, आणि बुद्धीचे ज्ञान प्रभावावर अवलंबून असते. व्यवहारज्ञानाचा मूर्खतेशी संबंध हा (सूर्य)किरणांकडे पाहण्यासारखा आहे आणि किरण हे फक्त एकाच दिशेकडून येत असतात. त्यामुळे सूर्याच्या स्वरूपाचा बोध होत नाही. म्हणून तो ना त्याच्या स्वरूपास ओळखतो ना त्या प्रकाशास जे पाण्यात प्रतिबिंबित होते. त्याच्या लांबीरुंदीसही ओळखत नाही. परंतु कल्पना आणि अनुभवाने त्याचा अंदाज करतो. तो कधी लांबी कबूल करतो, तर कधी रुंदी. त्याचा हा निर्णय पारख न करता असतो. अशीच स्थिती व्यवहारज्ञानाची असते. कारण त्याची दृष्टीपण एकाच दिशेकडे असते. ती म्हणजे अनुमानाच्या दिशेपासून प्रमाणाच्या दिशेकडे असते. निर्णयकर्ता जेव्हा तिला परमेश्वराच्या ज्ञानस्वरूपात घेतो, तेव्हा त्याच्याकडून चूक होत नाही. म्हणूनच जेव्हा असे म्हटले जाते की परमेश्वरास बुद्धीच्या मदतीने ओळखता येत नाही, तेव्हा त्याचा मथितार्थ असतो व्यवहारज्ञानाशी. आणि जेव्हा असे म्हटले जाते की परमेश्वरास बुद्धीच्या बळावर ओळखले जाऊ शकते, तेव्हा त्याचा संकेत असतो विश्व-ज्ञानाशी. म्हणजेच व्यवहारज्ञानाच्या आधारे परमेश्वरास ओळखता येत नाही, तर विश्व-ज्ञानाच्या साहाय्याने तो ओळखला जाऊ शकतो. म्हणून तर सर्वश्रेष्ठ परमेश्वर म्हणतो – ''ते अनुमान करणारे नष्ट झाले. बेसावधगिरी आणि पथभ्रष्टतेमुळे त्यांना परमेश्वराचे विस्मरण झाले होते.''

ते केवळ या कारणामुळे नष्ट झाले की अनुमानाने त्यांनी जी गोष्ट ओळखली त्यावरच ते अटळ राहिले, कारण त्यांच्या दृष्टीने तेच सत्य होते आणि परिणामी ते नष्ट झाले. हानिकारक गोष्टींवरच ते दृढ राहिल्यामुळे नष्ट झाले. त्यांच्या ज्ञान-प्रकाशास नष्ट करणारे असेच त्याचे अनुमान होते. उदाहरणार्थ, त्यांनी आपल्या आत्म्यांच्या संबंधात अशी कल्पना - धारणा केली व ती मान्य पण केली की त्यांची शरीरे असणार नाहीत आणि मरणोपरांत मरणोत्तर जीवन नाही आणि या गोष्टीवर ते खात्रीपूर्वक दृढ राहिले. मग सत्य सांगणारे व सन्मार्गावर घेऊन जाणारे जेव्हा ईश्वराकडून पाठविण्यात आले तेव्हा त्यांचे शत्रुत्व त्यांच्या मनात पक्के बसले. इथपर्यंत की त्यांच्यासमोर सत्य प्रकट होऊनसुद्धा ते त्यावर श्रद्धा ठेवीत नाहीत. म्हणून ते नष्ट झाले आणि कत्तल केले गेले. त्यांच्या वासनेने त्यांना नष्ट केले. ज्यावर ते दृढ राहिले त्याच वस्तूने त्यांचा नाश केला.

**अक्ल-ए-अव्वल अर्थात विश्व-ज्ञान आणि जिब्रील (देवदूत)**

विश्व-ज्ञानाचे ज्ञान आणि सर्वोच्च लेखणी दोन्ही एकच प्रकाश आहेत. जेव्हा मानवाशी त्यांचा संबंध असेल तेव्हा त्याला विश्व-ज्ञान (क्ल-ए-अव्वल) असे म्हणतात. पुन्हा अक्ल-ए-अव्वल अर्थात विश्व-ज्ञानाचा संबंध प्रेषित मुहम्मदशी आहे. सर्वप्रथम विश्व-ज्ञानापासून सर्वश्रेष्ठ परमेश्वराने सर्व प्रमुख देवदूत जिब्रील यांना निर्माण केले. या दृष्टीने पाहिल्यास प्रेषित मुहम्मद हे जिब्रीलचे पिता ठरतात आणि ते सर्व ब्रह्मांडाचे मूळ आहेत. म्हणून 'शब-ए-मेराज' अर्थात दिव्यारोहणाच्या रात्री 'सिद्रतुलमुंतहा' म्हणजेच आकाशस्थ बोरीसारख्या झाडाजवळ सर्वप्रमुख देवदूत जिब्रील येऊन थांबले. येथे प्रेषित मुहम्मद यांच्या सोबतचे आपले प्रयाण त्यांनी थांबवले. येथून पुढे प्रेषित एकटेच गेले.

अक्ल-ए-अव्वल अर्थात विश्व-ज्ञानाचे नाव 'रूहुलअमीन' म्हणजेच विश्वासू प्रामाणिक आत्मा या कारणास्तव ठेवण्यात आलेले आहे की ते दैवी भांडार-कोष आणि त्याचे विश्वस्त आहे; आणि जिब्रील यांचे हे नाव (वृक्षाच्या) मुळाच्या नावावरून शाखेचे नाव ठेवले आहे. यासाठी की ते अक्ल-ए-अव्वल म्हणजेच विश्व-ज्ञानाची शाखा आहेत.

**३) अर्श (दैवी राजसिंहासन)**

'अर्श' हे परमेश्वराचे महान राजसिंहासन आहे. ते सर्वज्ञ आणि सर्वश्रुत परमेश्वराचे प्रभावशाली आणि सुप्रतिष्ठित असे महान आसन आहे. तिच्यासमोर सर्व जगांचे शासन नतमस्तक आहे. याच सर्वश्रेष्ठ आणि उच्चतम स्थानापासून समस्त जगतांसाठी आदेश सादर होत असतात. या महान आणि प्रतिष्ठित दैवी सिंहासनास उचलून धरणारे असे आठ अग्रगण्य व पवित्र देवदूत आहेत. ते आपले माहात्म्य व श्रेष्ठतेच्या अनुषंगाने अप्रतिम आहेत. या सर्वांचे आपापले गुण 'अर्श'चे आधारस्तंभ आहेत. ते आठ अग्रगण्य गुण असे आहेत - (१) अधीश्वर, (२) निर्विकार, (३) कल्याणकारी, (४) शांतिदाता, (५) त्राता, (६) प्रबळ, (७) ताडक आणि (८) प्रशंसनीय.

'अर्श' महान यासाठी आहे की, त्याला परमेश्वराने निर्माण केलेले आहे. ते उपरोक्त आठ विशेष गुणांचे स्रोत-स्थळ आहे. ते नवनिर्मित आहे. ती अनंत परमेश्वराची महाभयंकरता, अतिसुंदरता आणि पराकाष्ठेची

अभिव्यक्ती आहे. ते असे आसन आहे की ज्यामध्ये सर्व प्रकारची महानता आणि सर्व गुण सामावलेले आहेत. ते अपार, अनंत असून सर्वसमावेशक पण आहे. ते शाश्वत पण आहे. ''देवदूत त्या (आकाशा)च्या काठाशी (उभे) असतील, व आठ देवदूत त्या दिवशी तुझ्या विधात्याचे महान सिंहासन वर उचलून धरतील.'' ६९:१७

अर्श'चा पवित्र कुराणामध्ये उल्लेख असा आहे – ''निश्चितच, तुमचा पालनकर्ता अल्लाह आहे, ज्याने सहा दिवसांत (म्हणजे सहा टप्प्यांत) आकाश आणि पृथ्वीची निर्मिती केली, मग तो (समस्त विश्वाचा मालक म्हणून) **सिंहासनावर** ('अर्श'वर) विराजमान झाला. तोच सर्व सृष्टीची व्यवस्था चालवितो.'' १०:३ ''(त्यांना) विचारा, 'सप्त आकाश आणि ते महान सिंहासन ('रब्बुल अर्श') यांचा स्वामी कोण आहे?'' ते म्हणतील की, ''त्यांचा (स्वामी) अल्लाहच (आहे).'' २३:८६–८७

हे स्पष्ट आहे की 'अर्श' महानतेचे स्रोत–स्थळ, प्रकाशाचे उद्‌गम–स्रोत आणि सत्ते ('ज़ात')चे वैशिष्ट्य आहे. शारीरिक दरबार आणि दैवी – परमेश्वराची सत्ता असे त्याचे नामाभिधान आहे. परंतु स्थळ–कालापासून निरपेक्ष आहे. ते सर्वोच्च दृश्य आणि प्रकाशाचे स्थान आहे. प्रकाश–स्रोत आहे. ते समस्त सृष्टीस आपल्या कुशीत घेऊन आहे. निरपेक्ष अस्तित्वामध्ये त्याचे दृष्टान्त मानवी अस्तित्वाचे देह आहे. ते या दृष्टीने की, भौतिक जग, आध्यात्मिक जग, विचार, बुद्धी इत्यादी त्यामध्ये समाविष्ट आहेत. म्हणून सूफींना अर्शशी अभिप्रेत विश्व–शरीर म्हणजेच जिस्म कुल्ली आहे. या बाबतीत चर्चित गोष्ट अशी आहे की जरी विश्व–शरीर आत्म्याच्या जगामध्ये ('आलम–ए–अरवाह') समाविष्ट आहे, तरी आत्मा त्याच्या वर आहे आणि विश्वात्मा म्हणजेच नफ़्स कुल्ली त्याच्यावर आहे. यद्यपि आम्हास हे माहीत नाही की परमेश्वर ('रहमानम')शिवाय 'अर्श' वर आणखी कोणती तरी वस्तू (गोष्ट) असावी आणि सूफींनी विश्वात्मा अर्थात नफ़्स कुल्लीशी अभिप्राय पाटी म्हणजेच 'लौह' असे घेतले आहे. आणि हे 'लौह' अर्थात पाटीचे 'अर्श'च्या म्हणजेच सिंहासनाच्यावर होण्याचे आदेश देणे आहे. हे मतैक्याच्या विरोधात आहे. परंतु ज्या सूफी बांधवांनी असे प्रतिपादन केले आहे की 'अर्श' हे 'जिस्म कुल्ली' आहे अर्थात सिंहासन हे विश्व–शरीर आहे आणि ते 'लौह' म्हणजेच पाटीवर आहे आणि 'लौह' अर्थात पाटीशी तात्पर्य 'नफ़्स कुल्ली' म्हणजेच विश्वात्मा आहे, त्यांचे सदरहू विधान सूफी तत्त्वज्ञ व आचार्य अब्दुल करीम जीली यांच्या मताच्या विरोधात नाही. आणि यात मुळीच शंका नाही की आत्म्याची श्रेणी शरीराच्या श्रेणीपेक्षा उच्चतम आहे. ईश्वरीय प्रेरणे ('कश्फ़')मुळे मिळालेल्या माहितीनुसार असे वाटते की सिंहासन एक निरपेक्ष वस्तू आहे. उपासनेमध्ये जेव्हा त्याचा उल्लेख होतो तेव्हा त्याचा अर्थ होतो, एक असे आकाश की ज्याने समस्त काल्पनिक आणि वास्तविक आकाशांना चारी बाजूने घेरलेले आहे. या आकाशाचे स्तर पोशिंद्याचे ('रहमानियत') स्थळ आहे. आणि या आकाशाच्या तदत्वाचा आत्मा निरपेक्ष अस्तित्व आहे. साक्षात 'हू' म्हणजेच तोच परमेश्वर किंवा सम्राटत्व. हा आकाश प्रकट आणि अप्रकटपण आहे. त्याचा अंतर्भाग पवित्र जग अर्थात 'आलम–ए–कुद्स' आहे आणि ते पवित्र परमेश्वराच्या नाम–रूपांचे जग आहे, पवित्र जग आहे आणि त्याचे स्रोतस्थळ आहे. त्याचे नाव 'कसीब' अर्थात परम पवित्र स्थळ असे आहे. स्वर्गात राहणारे लोक प्रभू दर्शनासाठी याच स्थळाकडे जातील. त्याचा बहिर्भाग प्रेमाचे जग म्हणजेच 'आलम–ए–उन्स' आहे. प्रत्येक उपमा, कल्पना, प्रतिमांचे ते स्थळ आहे. ही उपमा, कल्पना, प्रतिमा मग शरीराशी असो किंवा आत्म्याशी; शब्द असो किंवा अर्थ, आदेश असो किंवा साक्षात तो त्या आकाशाचे प्रकट रूप आहे. म्हणून

'अर्श' म्हणजे सदरहू आकाश, वैभवशाली सिंहासन म्हणण्याचे तात्पर्य आहे पवित्र जग. हा कृपाळूतेचा दर्जा आहे. महानतेचा हाच मूळ हेतू आहे. असेच महान सिंहासनाच्या बाबतीत आहे. याचे तात्पर्य आहे सत्त्वमूलक वास्तव आणि वासनात्मक गरजा. यांचा दर्जा सिद्धीचे धनी आहे. पवित्र आत्मा हा त्या दैवी अर्थाशी तात्पर्य आहे, जे सृष्टीचे नियम आणि सांसारिक दोषांपासून मुक्त आहे.

**जिस्म–ए–कुल्ली (विश्व–शरीर)**

शरीर हे मानवी लक्षणांमधील त्या सर्व वस्तूंची समष्टी आहे, ज्यामध्ये मानवी अस्तित्व सम्मिलित (समाविष्ट) आहे आणि त्या वस्तू आहेत आत्मा, बुद्धी, अंतःकरण, चेतना इत्यादी. शरीर हे मानवामध्ये त्या 'अर्श' अर्थात सिंहासनाच्या दृष्टान्तासारखे आहे, जे बाह्य जगामध्ये आहे. म्हणून 'अर्श' अर्थात ईशसिंहासन हे जगाचे लक्षण आहे, त्याची शोभा आहे. देह आहे. ते तिच्या समस्त विविध अंगांची समष्टी आहे. याच अनुषंगाने आमच्या सहचरांनी म्हटले आहे की, ते विश्व–शरीर ('जिस्म कुल्ली') आहे वा सुव्यवस्थित जगाची रचना आहे. ('हैकल अल्–आलम व जस्दा')

**४) कुर्सी (पादपीठ)**

कुर्सी म्हणजे लघु सिंहासन, लहान आसन, राजचौकी. हे आठवे आकाश आहे. 'कुर्सी', 'अर्श' म्हणजेच दैवी राजसिंहासनाखाली आहे. 'अर्श' प्रकट झाल्यानंतर हिचे अस्तित्व उदयास आले. अर्शप्रमाणेच ही पण नवनिर्मित आहे. सोबत असीम, अनंत पण आहे. कुर्सीमध्ये पण सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या चार अग्रगण्य गुणांचे प्रकाश व कृपा–प्रसाद एकवटलेले आहेत. ते गुण पुढीलप्रमाणे आहेत – (१) ज्ञान (इल्म), (२) जीवन (हयात), (३) अविनाशित्व (क़य्युमियत), आणि (४) सामर्थ्य (कुद्रत).

कुर्सीला कुर्सी या आधारे म्हटले जाते की तिचे चारी पाय समोरासमोर योग्य प्रमाणात जवळ जवळ सारख्याच वजनाचे असतात. ते सर्व मिळून आपला भार उचलतात – वहन करतात. सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या उपरोक्त चार अग्रगण्य गुणांच्या कृपा प्रसादामुळे पण समस्त जगतांना ज्ञान व शक्ती; जीवन आणि स्थैर्य लाभते. यांच्या साहाय्याने जग स्थिर आहे. लक्षपूर्वक पाहिल्यास असे आढळून येईल की या चारी गुणांच्या एकत्रित होण्यामुळे चार तत्त्व अर्थात पृथ्वी, आप, तेज आणि वायू ही चार महाभूते आपापल्या जागी स्थिर आहेत. हे सर्व भौतिक जगामध्ये एक दुसऱ्याशी मिळून गेलेले आहेत.

'अर्श'चे आधारस्तंभ असलेले आठ अग्रगण्य गुण व 'कुर्सी'शी निगडित असलेले चार अग्रगण्य गुण असे एकूण पुढील बारा गुण – (१) अधीश्वर, (२) निर्विकार, (३) कल्याणकारी, (४) शांतिदाता, (५) त्राता, (६) प्रबल, (७) ताडक, (८) प्रशंसनीय, (९) ज्ञान, (१०) जीवन, (११) आविनाशित्व आणि (१२) सामर्थ्य हे पुढील बारा राशींवर (१) मेष, (२) वृषभ, (३) मिथुन, (४) कर्क, (५) सिंह, (६) कन्या, (७) तूळ, (८) वृश्चिक, (९) धनु, (१०) मकर, (११) कुंभ आणि (१२) मीन आपले प्रकाश आणि प्रभाव टाकत असतात. ही व्यवस्था जेव्हा सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या संकेतामुळे अस्तव्यस्त होऊन जाईल तेव्हा प्रलय ('क़यामत') सुरू होईल.

कुर्सी (पादपीठ) समस्त क्रियात्मक गुणांचे प्रकटीकरणाचे नाव आहे. हे विधी–निषेधाज्ञांचे सुरू होण्याचे स्थान आहे. परमेश्वराने आपले दोन्ही पाय याच्यावर लटकवले (टेकले) आहेत. हे निर्माणकारी आणि निर्मिती असे दोन्हीचे स्थान आहे. हानि–लाभ, भेदाभेद या सर्वांचे केंद्र आहे. याच्यामध्ये परस्पर विरोधी गुणांच्या प्रभावाचे प्रकटीकरण तपशीलवार (सविस्तर) आहे. याच्या आधारेच दैवी आज्ञा अस्तित्वात येऊन प्रकट होतात. प्रारब्ध–निर्णय, भाग्य–लेख आणि सुरक्षित पट्टिका ('लौह–ए–महफ़ूज़') यांचे क्रम–निर्धारण आणि लिखाणाचे हे स्थळ आहे. सर्वश्रेष्ठ परमेश्वर म्हणतो की त्याच्या पादपीठा (कुर्सी)ने आकाश आणि पृथ्वी यांना घेरलेले (वेढलेले) आहे.

**विस्ताराचे दोन प्रकार**

विस्तार दोन प्रकारचे आहेत. (१) आदेशात्मक व (२) प्रत्यक्ष दृश्य विस्तार. आदेशात्मक विस्तार ते आहे की आकाश व पृथ्वी ही क्रियात्मक गुणांपैकी कोणत्या तरी गुणाचे प्रभावस्वरूप असावेत. आणि 'कुर्सी' (पादपीठ) समस्त क्रियात्मक गुणांचे स्रोतस्थळ आहे. पादपीठाच्या प्रत्येक रूपाकार क्रियात्मक गुणांपैकी कोणते तरी एक स्वरूप आहे. प्रत्यक्ष विस्ताराचे स्वरूप असे आहे की आकाश व पृथ्वी यांच्याशिवाय समस्त सापेक्ष सृष्टीमधील अन्य वस्तूंवर घेरलेले आहे. म्हणजेच सापेक्ष अस्तित्वाचे नाव 'कुर्सी' (पादपीठ) आहे. या कुर्सीवर परमेश्वराने आपले दोन्ही पाय लटकावलेले – टेकलेले आहेत. ते दोन पाय (चरण) असे आहेत –

| अल्लाहचे पहिले चरण (पाय) | अल्लाहचे दुसरे चरण (पाय) |
|---|---|
| १. तो निर्माण करतो. | १. तो नष्ट करतो. |
| २. तो सुरक्षित ठेवतो. | २. तो मारून टाकतो. |
| ३. तो देतो. | ३. तो काढून घेतो. |
| ४. तो महिमान वाढवितो. | ४. तो खाली दाबून टाकतो. |
| ५. तो प्रतिष्ठा देतो. | ५. तो मानहानी करतो. |
| ६. तो पवित्र आहे. | ६. तो प्रबळ व सुंदर आहे. |

**५) उम्मुल किताब (ग्रंथ–मातृका)**

'उम्मुल किताब' म्हणजेच मूलग्रंथ वा ग्रंथ मातृका त्या सत्तेचे कुल–नाम आहे. ती त्याची जातकुळी आहे. तो एक बिंदू आहे. हाच गुणांचा उद्देश्य (हेतू) आहे. तो अक्षरांसाठी दौतीसारखे आहे. ते क्रमशः अस्तित्वाच्या पृष्ठांवर व्यक्त होतात. तसेच बिंदूविरहित अक्षरांशी संकेत त्या वस्तुकडे आहे जी त्या (परमेश्वरा)च्या स्वयंभू अस्तित्वाशी संबंधित आहे, आणि त्या बिंदूधारी अक्षरांशी अभिप्राय नवनिर्मित वस्तूंशी आहे, या अनुषंगाने की नवनिर्मिती ही त्या अक्षरांवर प्रकट आहे. जेव्हा अक्षरं यथाक्रम येतात, तेव्हा शब्द बनतात. मग (त्यांच्या साहाय्याने) लोक बोलू लागतात. सर्वसाधारणपणे 'कुरआन'चे प्रथम अध्याय 'फ़ातिहा' अर्थात मंगलाचरण यास 'उम्मुल किताब' असे म्हणतात. कारण यामध्ये समस्त 'कुरआन' चे सार एकवटलेले आहे.

## अल्लाहचे सत्तेचे वास्तविक स्वरूप

हे लक्षात घेतले पाहिजे की ग्रंथमातृका ('उम्मुल किताब') सत्तेच्या कुळनामाच्या वास्तविक स्वरूपाशी अभिप्राय आहे जे काही कारणांमुळे त्या वास्तवांच्या गुणधर्मांचा निर्देश करण्यात आलेला आहे की ज्यांच्यावर नामाभिधान, गुण, अस्तित्व, निरस्तित्व, स्रष्टा व सृष्टी यांना लावता येऊ शकत नाही.'ग्रंथ'('किताब')हे निरपेक्ष अस्तित्व आहे. यामध्ये शून्यता नाही आणि या ग्रंथाच्या जातकुळीच्या स्वरूपाची माता म्हणजेच मूळ आहे. यासाठी की अस्तित्व याच्यामध्ये त्याचप्रमाणे प्रविष्ट असते. ज्याप्रमाणे अक्षरे दौतीमध्ये(दऊतीमध्ये)अंकित असतात. मग अक्षरांमधील नामांपासून कोणतेही नाम त्या दौतीवर बोलले जात नाही. भलेही बिंदूयुक्त अक्षरे असोत वा बिंदूविरहित. अशाच प्रकारे जात कुळीच्या गुणांवर अस्तित्वाचे नाम लावता येत नाही, ना अस्तित्व हीनतेचे (शून्याचे) नाम. कारण की बुद्धी त्यास ग्रहण करू शकत नाही. अशा वस्तूवर दुसऱ्या वस्तूचे आरोप करणे अशक्य आहे. त्यास ना विश्वंभर म्हणता येऊ शकते ना विश्व, न आपला ना परका. ते एका अनुषंगाने 'अल्-वहिय्यत' अर्थात सर्वश्रेष्ठता आहे. ते वस्तूंचे स्थान आहे, अस्तित्वाचे मूळ स्रोत आहे, आणि अस्तित्व त्याच्यामध्ये परिपूर्ण तर्कासारखी बुद्धी आहे, विवेक आहे. यद्यपि बुद्धीची अशी अपेक्षा असते की वास्तवांच्या तत्त्वामध्ये अस्तित्व आपल्या संपूर्ण ताकदीसह विद्यमान असावे. जसे की वृक्षाचे बीजामध्ये अस्तित्व (दडलेले) असते. परंतु प्रत्यक्षात कर्म त्यापासून अस्तित्व प्रदान करते ना शक्तिनिशी. हा त्याचा सत्तात्मक दैवी-ईश्वरी तगादा (अपेक्षा) आहे, परंतु निरपेक्ष समष्टि रूपात.

## वास्तवाचे तत्त्व वा गुणधर्म

जेव्हा आपणास कळून चुकते की 'ग्रंथ' हे निरपेक्ष अस्तित्व आहे, तर मग ही गोष्ट स्पष्ट होते की तो आदेश की ज्याच्यावर ना अस्तित्वाचा हुकूम दिला जातो ना निरस्तित्वाचा (शून्याचा), तेच तर 'उम्मुल किताब' अर्थात ग्रंथमातृका आहे. ते वास्तवांचे वास्तविक स्वरूप या नावाने ओळखले जाते. यासाठी की ज्याच्यामुळे ग्रंथ निर्माण होतो, त्या वस्तूसारखेच हे आहे. वास्तविक स्वरूपाच्या कुलनामाच्या दोन कारणांपैकी ग्रंथास एक कारण लागू पडते. कारण की त्याचे अस्तित्व एका बाजूस आहे तर अस्तित्वहीनता (शून्यता) दुसऱ्या बाजूस. याच कारणास्तव लेखन-शैलीने त्यास ना अस्तित्वासह कबूल (ग्रहण) केले ना अस्तित्व हीनतेसह. कारण की या कारणांपैकी कोणतेच कारण असे नाही की ते त्याचे व्यत्यास (विरोधी) नसेल. तो (पवित्र) ग्रंथ जो सर्वश्रेष्ठ परमेश्वराने प्रेषित - संदेशहर मुहम्मद यांच्या जिव्हेवर अवतरित केला, त्याचा अभिप्राय निरपेक्ष अस्तित्वाच्या आदेशांशी आहे. हे वास्तवाच्या दोन वास्तविक गुणधर्मांपैकी एक कारणस्वरूप आहे. म्हणून निरपेक्ष अस्तित्व अर्थात परात्पर परब्रह्म म्हणजेच ग्रंथ-मातृका आहे. यास्तव परमेश्वराने या विधानामध्ये याच गोष्टीकडे संकेत केला आहे -

''एका **स्पष्ट सुबोध ग्रंथात** म्हणजेच **इमाम-ए-मुबीन** अर्थात **लौह-ए-महफ़ूज़**मध्ये प्रत्येक गोष्टीची आम्ही नोंद केलेली आहे.'' ३६:१२ ('कुल्ल शैअिन् अह्सैनाहु फ़ी अिमामिम्''-मुबीनिन्' ३६:१२) येथे 'इमाम' या शब्दाचा अर्थ नेता व राजमार्ग आहे. 'लौह-ए-महफ़ूज़' यास या दोन्ही गोष्टी लागू पडतात. कारण

सर्व मागील व पुढील गोष्टी त्याच्याच अनुरोधाने घडून आल्या व पुढेही घडून येतील. जणू सर्व गोष्टी ठळक रीतीने नोंदलेल्या आहेत. शिवाय याचा अर्थ ईश्वरीज्ञान असाही होऊ शकतो. ''आर्द्र व शुष्क सर्व काही एका **सुस्पष्ट ग्रंथात** म्हणजेच **'किताब-ए-मुबीन'**मध्ये लिहिलेले आहे.'' ६:५९ ('ला रत्‌बिंव्व ला याबिसिन् अिल्ला फ़ी किताबिम्-मुबीनिन्' ६:५९) ''समस्त वस्तूंचे सविस्तर तपशील आम्ही सुरक्षित ठेवलेले आहे.''

### लौह (पाटी) (सुस्पष्ट दैवी ग्रंथ)

स्वर्ग आणि नरकाच्या स्वरूपाचे सविस्तर वर्णन, दैवी प्रकटन व तत्सम इतर गोष्टींविषयी विवेचन यांचे 'लौह'मध्ये नमूद होणे अशक्य आहे; परंतु या सर्व गोष्टी (दैवी) ग्रंथामध्ये विद्यमान आहेत. ग्रंथ एक सर्वसाधारण समष्टी आहे, तर 'लौह' हे तिचे एक विशेष अंग आहे; तिचा एक विशिष्ट भाग आहे.

### ६) .कलम-ए-आला (सर्वश्रेष्ठ लेखणी)

ज्ञानाच्या अनुषंगाने, भौतिक (ऐहिक) स्रोतांमध्ये, क़लम-ए-आला अर्थात सर्वश्रेष्ठ लेखणीचा अभिप्राय परमेश्वराच्या प्रथम तन्मात्रेशी आहे. ज्ञानाचे बंधन यासाठी लावण्यात आले आहे की सर्वप्रथम दैवी ज्ञानामध्ये सृष्टी ही समष्टीगत स्वरूपात व दैवी प्रज्ञान स्वरूपात निर्धारित झाली होती. नंतर 'अर्श' अर्थात दैवी राजसिंहासनामध्ये तिचे अस्तित्व सार स्वरूपात आणि आदेशात्मक पद्धतीवर आहे, निर्मित भौतिक वस्तू 'अर्श'च्या रूप-आकारांपैकी एक रूप-आकार आहे. पुन्हा 'कुर्सी' अर्थात पादपीठामध्ये सृष्टी ही तपशीलवार अभिव्यक्ती आहे. पुन्हा सर्वश्रेष्ठ लेखणी ('क़लम-ए-अला')मध्ये त्याचे प्रकटीकरण ज्ञानाच्या अनुषंगाने आहे. यासाठी की प्रथम स्रोतामध्ये त्याची अभिव्यक्ती संपूर्णपणे अव्यक्त - परोक्ष होती; आणि सर्वश्रेष्ठ लेखणी एक असा नमुना आहे की आपल्या मनाला वाटेल तिचे रूप-रेखाटन ती सुरक्षित अशा लेखशिलेवर करते - बुद्धीप्रमाणेच. बुद्धी पण असाच एक नमुना आहे की जी आपल्या मर्जीप्रमाणे आत्म्यामध्ये आपला ठसा उमटवते. म्हणून बुद्धी ही लेखणीसारखीच आहे, तर आत्मा हा लेखशिलेसारखा आहे. काळजी आणि चिंतेच्या बाबी, ज्या विवेकाच्या नियमाधीन असतात, मनामध्ये आढळून येतात, त्या प्रत्यक्ष स्वरूपात असतात. या 'लौह-ए-महफ़ूज़' म्हणजेच सुरक्षित लेखशिलेवर लिहिल्या गेलेल्या आहेत. म्हणूनच प्रेषित मुहम्मद यांनी म्हटले आहे की, सर्वप्रथम वस्तू जी परमेश्वराने **निर्माण केलेली** आहे, ती बुद्धी आहे, आणि प्रथम वस्तू जी **निर्माण झाली**, ती लेखणी आहे; आणि लेखणी 'अक्ल-ए-अव्वल' म्हणजेच विश्व-ज्ञान आहे व हे दोन्ही मुहम्मदी आत्म्याचे समोरचे भाग आहेत. ते म्हणाले, हे जाबिर! प्रथम जी वस्तू सर्वश्रेष्ठ परमेश्वराने निर्माण केली ती तुम्हा प्रेषितांचा आत्मा आहे. म्हणून सर्वश्रेष्ठ लेखणी, विश्व-ज्ञान, मुहम्मदी आत्मा हे सर्व एकच तत्त्व ('जौहर') आहेत. सृष्टीशी निगडित केल्यास सर्वश्रेष्ठ लेखणी बनते, निव्वळ मानवाशी निगडित केल्यास विश्व-ज्ञान होते आणि नरोत्तमाशी संबंध प्रस्थापित केल्यास मुहम्मदी आत्मा (चेतना) असे नामाभिधान प्राप्त होते.

### ७) लौह–ए–महफ़ूज़ (सुरक्षित लेखशिला) (सुबोध ग्रंथ)

आत्म्या ('नफ़्स')ने आपल्या सत्तेनिशी विश्वाच्या ज्ञानास सामावून घेतलेले आहे. ती आमची सुरक्षित लेखशिला म्हणजेच 'लौह–ए–महफ़ूज़' आहे. अस्तित्वाची सर्व रूपे प्रकट न होता, अव्यक्त स्वरूपात तिच्या योग्यतेमध्ये अंकित आहेत. नंतर जेव्हा ते निळे व काळे पडद्यांच्या मेघांच्या अंधारापासून, जे त्याच्यामध्ये कायम असतात, स्वच्छ बनते, तेव्हा तिला 'लौह–ए–महफ़ूज़' म्हणजेच सुरक्षित लेखशिला नावाने ओळखले जाते. ज्या वस्तू यामध्ये आहेत, त्या सर्व यामध्ये व्यक्त होतात आणि विश्वाची रहस्ये यामध्ये आपले चेहरे उघड करतात.

हे जाणून असावे की सुरक्षित लेखाशिलाचा अभिप्राय परमेश्वराच्या दिव्य प्रकाशाशी आहे. ते भौतिक दृश्यामध्ये प्रकाशमान आहे. यामध्ये वस्तू आपल्या मूळ स्वरूपात अंकित आहेत. ती (सुरक्षित लेखशिला) विश्वतत्त्वाची माता अर्थात 'उम्मुल हयूला' आहे. कारण की तत्त्व वा द्रव्य कोणत्याही आकाराची अपेक्षा ठेवीत नाही, मात्र सुरक्षित लेखशिलेमध्ये स्वभाव ग्रहण केल्याशिवाय. मग जेव्हा तत्त्व वा द्रव्या ('हयूला')स आकाराची गरज भासते तेव्हा ते आकार तत्काळ किंवा सवडीने परमेश्वराच्या आदेशानुसार आपल्या गरजेनुसार ग्रहण करते. पुन्हा ती आदेशीत वस्तू निर्माण (घटित) होत नाही. भौतिक वस्तूंच्या गरजा आणि निरपेक्ष दैवी गुणांची अपेक्षा यामध्ये अंतर (भेद) आहे. भौतिक गरजा या कधी पूर्ण होतात तर कधी पूर्ण होत नाहीत, परंतु निरपेक्ष दैवी गुणांच्या अपेक्षा या सदैव पूर्ण होतात. येथे आणखी एक कारण पण आहे, आणि ते हे की भौतिक गरजा या संभाव्य असतात आणि संभावना – शक्यतेचे असे वैशिष्ट्य असते की ती एका वस्तूस कबूल (ग्रहण) करते; तद्वत तिच्या विरोधा (विरोधी वस्तू)स पण कबूल करते. नंतर जेव्हा योग्यतेस एखाद्या वस्तूची गरज भासते आणि मूल्य त्याच्या विरोधात आव्हान स्वरूपात उपस्थित होते, तेव्हा हा विरोधपण त्या योग्यतेच्या गरजेनुसारच असतो. हे संभावना शक्यतेमध्ये असते. म्हणून आपण असे म्हणू की, बुद्धिग्राह्य नियमानुसारच भौतिक गरजा निर्माण होतात आणि जेव्हा योग्यतेनुसार स्पष्टपणे हे घडून येते, तेव्हा आदेशाच्या नियमानुसार ही घटना योग्य (दुरूस्त) आहे असे म्हणता येईल. हे एक सत्तामूलक कार्य आहे – ही एक सत्तात्मक घटना आहे. बुद्धी आपल्या चिंतनात्मक दृष्टिकोनातून हिला पाहू शकत नाही, समजू शकत नाही. परंतु सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा आपल्या दासांमधून (भक्तांमधून) ज्याला इच्छितो त्याला ईश्वरीय प्रेरणा बहाल करतो. अटळ प्रारब्ध ते आहे की, ज्यामध्ये बदल घडून येत नाही आणि परिवर्तनीय प्रारब्ध ते आहे की ज्यामध्ये बदल शक्य आहे. म्हणून तर प्रेषित मुहम्मद यांनी परिवर्तनीय प्रारब्धाची शरण घेतली आहे. यासाठी की त्यांना माहित होते की यामध्ये बदल घडून येणे शक्य आहे. याविरुद्ध अटळ प्रारब्धाविषयी सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे वचन आहे की, ''व कान अम्रुल्लाहि क़दरन् मुक़दुरन्'' म्हणजेच ते सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे एक अटळ असे प्रारब्ध आहे. (आता यात बदल अशक्य आहे.) पुन्हा परमेश्वर ज्यास अटळ प्रारब्ध ठरवतो त्यामध्ये तो शिष्टाचाराचे ध्यान ठेवतो (लक्ष ठेवतो); आणि ज्यास परिवर्तनशील समजतो त्यासंबंधी तो शिफारशीस वाव ठेवतो. परमेश्वराचे त्यास परिवर्तनशील प्रारब्धाची जाण देणे हे त्याच्यासाठी आपल्या शिफारशीचा आदेश आहे.

### नूर-ए-इलाही (प्रभू-प्रकाश)

प्रभू प्रकाशाचा अभिप्राय आहे सुरक्षित लेखशिलेशी. ती ईश्वरी सत्तेचा प्रकाश आहे आणि ईश्वरी सत्तेचा प्रकाश हा साक्षात ईश्वरी सत्ता आहे. कारण की ईश्वरी सत्तेचे विघटन आणि विभाजन अशक्य आहे आणि तो परमेश्वर निरपेक्ष आहे. हा परिपूर्ण आत्मा या स्वरूपामध्ये दाखवला जातो आणि तो ब्रह्मांडापासून निःस्पृह आहे. याकडे सर्वश्रेष्ठ परमेश्वराचा असा संकेत आहे - ''बल हुव कुरआनुन् मजीदुन् फ़ी लौहिन् महफ़ूज़िन्'' याचा अर्थ 'परिपूर्ण आत्मा' असा आहे. म्हणजेच अभिप्राय हा आहे की 'परिपूर्ण आत्मा' म्हणजेच नरोत्तमाचा आत्मा आहे (कारण) की परमेश्वराची सत्ता अवताराशिवाय विद्यमान आहे. कारण की तो अवतार आणि एकत्त्वता यापासून मुक्त आहे.

### ८) 'सिद्रतुल मुंतहा' (कल्पवृक्ष, कामधेनू, 'लक्ष्मण-रेषा')

'सिद्रतुल मुंतहा' सातव्या आकाशावर बोरीच्या झाडासारखा एक वृक्ष आहे. येथून पुढे जिब्रील हे सर्वप्रमुख देवदूत जाऊ शकत नाहीत. म्हणून ही त्यांच्यासाठी 'लक्ष्मण-रेषा'च ठरते. ही परिसीमा आहे. हा शेवट आहे. 'सिद्रतुल मुंतहा' 'कुर्सी' खाली स्थित आहे. हे स्थळ प्रकाशाच्या देवदूतांसाठी ज्ञान आणि कर्तव्याच्या वारीसाठी शेवट आहे. म्हणजेच देवदूतपण यापुढे जाऊ शकत नाहीत. येथे बोरीच्या झाडासारखा प्रकाशाचा एक वृक्ष आहे. येथून समस्त भाग्यवान आत्म्यांना चैन, संतोष, मनःशांती, विश्वास, सुख, आनंद आणि प्रसन्नता या सर्वांचा अलभ्य लाभ होतो. सर्वश्रेष्ठ परमेश्वराजवळ त्याच्या आदेशांचे परिपालन करण्यासाठी त्याच्याजवळच्या निवडक देवदूतांचा समूह येथे जमलेला असतो.

'सिद्रतुल् मुंतहा' ही शेवटची हद्द आहे. ही आकाशातील ती लक्ष्मणरेषा आहे की जिथून पुढे साधारण देवदूतच काय प्रमुख देवदूतांचा देह-हीन आत्मा ही ईश्वराच्या भेटीस जाऊ शकत नाही. म्हणून तर महादूत जिब्रीलपण प्रेषितासोबत पुढे जाण्यास धजावला नाही. तो तेथेच थांबला.

'सिद्रतुल् मुंतहा' त्या अस्तित्वाची सीमा आहे, जेथे सृष्टीच्या जीवांसाठी परमेश्वराकडील वारीची यात्रा समाप्त होते. याच्यापुढे फक्त परमेश्वराशीच विशेष करून निगडित असलेल्या पदाशिवाय वा श्रेणीशिवाय दुसरे कोणतेच पद (शिल्लक) नाही. जीवांना तेथे पाय ठेवण्यास मुळीच वाव नाही. कोणतेही जीव येथे पोहोचण्याचे धाडस पण करू शकणार नाही. ना जीवांना या स्थानापासून पुढे जाणे सुद्धा शक्य आहे. कारण की जीव येथे कुचलला जातो आणि नष्ट होतो. तो नेस्तनाबूत होऊन जातो. (बनतो). तेथे त्याचे कसलेच अस्तित्व नाही. सर्व प्रमुख देवदूत जिब्रीलच्या पुढील कथनामध्ये या बाबीकडेच संकेत आहे, ज्याचे निवेदन त्यांनी प्रेषित मुहम्मद समोर प्रस्तुत केले होते, की जर मी यापुढे एक वितभर सुद्धा पुढे जाईन तर मी भस्मसात होऊन जाईन. बस्स. तेथून पुढे जाणे प्रतिबंधित आहे, निषिद्ध आहे. तिथूनच प्रतिबंधित क्षेत्र सुरू होते. प्रेषितांनीच ही बातमी दिली की तेथे त्यांनी एक बोरीचा वृक्ष पाहिला. त्यांची पाने हत्तीच्या कानाएवढी मोठी होती.

पवित्र कुराणामध्ये हा संदर्भ असा आहे -

''(लोकांनो! आम्हास) नक्षत्राची शपथ, की जेव्हा ते (आकाशातून) तुटून पडते; की तुमचा सोबती (मुहम्मद सरळ मार्गाहून) चळलाही नाही व बहकलाही नाही. आणि तो (आपल्या) मनेच्छेने बोलत नाही.

(किंबहुना) हे (कुराण जे तो वाचून ऐकवितो ते दिव्य) प्रकटीकरण होय की ते त्याला प्रकट केले जाते. (आणि) त्याला ('जिब्रील' देवदूताने) ज्याच्या (आत्मिक) शक्ती (फारच) अवाढव्य अशा आहेत (अल्लाहच्या संदेशाचे) धडे दिले आहेत. तो प्रबुद्ध व विवेकशील असा आहे. (आणि) त्याची (शारीरिक) शक्तीही (फार) जबरदस्त होय, की तो (आपल्या मूळच्या स्वरूपात) साराच्या सारा (पैगंबरासमक्ष) येऊन उभा झाला; व तो त्यावेळीही अत्युच्च क्षितिजावर (म्हणजे आकाशाच्या एके बाजूस चांगल्या उंच जागी) होता. नंतर तो त्याच्या जवळ आला व (इतका त्याच्याकडे) झुकला की (उभयतांमध्ये) दोन कमानी इतके अंतर राहून गेले; किंबहुना त्याहूनही कमीच. त्यावेळी परमेश्वराने आपला सेवक (प्रेषित मुहम्मद) यास ('जिब्रील'द्वारे) जे काही प्रकट करावयाचे होते ते प्रकट केले. (पैगंबराने) जे काही पाहिले होते त्यात (त्याच्या) मनाने काही खोटे (मिसळून) दाखवले नाही. पैगंबर जो (जिब्रीलला) पाहतो आहे, त्यावर का तुम्ही लोक त्याच्याशी झगडता? आणि वास्तविक पाहता (झगडण्याची काही गोष्टच नाही, कारण,) त्याने तर) ('मेराज' म्हणजे आकाशरोहणावेळी) 'जिब्रील'ला आणखीही एकदा (मूळ स्वरूपात आपल्यापाशी आलेला) पाहिले होते, (व ही गोष्ट) 'सिद्रतुल् मुंतहा' म्हणजेच बोरीच्या झाडाजवळ (घडून आली होती) की जेथे (पवित्राचरणी सेवकांच्या) राहण्याची जागा, स्वर्ग आहे. त्या समयी (त्या) 'सिद्रा'वर जे काही आच्छादून राहिले होते ते आच्छादिले होते; (म्हणजे दिव्य तेज) (तेव्हा आध्यात्मिक अशा तेजाने बोरीच्या झाडाला झाकून टाकले होते). (त्यावेळीही पैगंबराची) दृष्टी ना विचलित झाली, ना मर्यादेपलीकडे गेली. काही संशय नाही की पैगंबराने (याप्रसंगी) आपल्या पालनकर्त्या (च्या सामर्थ्या) चे मोठमोठे चमत्कार पाहिले.'' ५३:१-१८

म्हणून यावर (दिव्या रोहणावर) संपूर्णपणे विश्वास ठेवला पाहिजे. यासाठी की प्रेषितांनी आपल्या अंत:करणापासून याची सूचना दिली आहे. प्रतिरूप दृश्यांमध्ये आणि दैवी टप्प्यांमध्ये त्यांनी एक वृक्ष पाहिला असेल, जो त्यांना बोरीचे झाड वाटला असेल आणि आपल्या पराकाष्ठेच्या डोळ्यांनी त्याला पाहिले असेल की जेणेकरून सत्य ईश्वरीय प्रेरणा एकत्रित होऊन जावी. येथे वृक्षाचा अभिप्राय श्रद्धेशी आहे. म्हणून प्रेषितांनी म्हटले आहे की, ज्याचे पोट बोरीने भरले आहे, सर्वश्रेष्ठ परमेश्वराने त्याचे अंत:करण श्रद्धेने भरून ठेवले आहे आणि त्याची पाने हत्तीच्या कानाएवढी मोठी असणे हे एक म्हण अथवा वाक्प्रचारासारखे आहे. हे त्यांच्या श्रद्धेचे महात्म्य आणि सामर्थ्याचे प्रमाण आहे, आणि स्वर्गामध्ये प्रत्येक घरात या पानांचे पसरलेले असणे हे त्या घरात राहणाऱ्यांच्या श्रद्धेशी अभिप्राय आहे.

'सिद्रा' अरबी भाषेत बोरीच्या झाडाला म्हणतात, आणि 'सिद्रतुल मुंतहा' म्हणजे सातव्या आकाशावर जे बोरीचे झाड आहे ते होय. त्याच्यापलीकडे 'जिब्रील'सारख्या प्रमुख देवदूतासही रीघ नाही व ते येथपर्यंतच पोहोचू शकतात. ह्या जगात कित्येक गोष्टी अशा असतात की, ज्यांची आम्ही खरी कल्पनादेखील करू शकत नाही. तर मग मनुष्याचे ज्ञान दिव्य गोष्टीचे आकलन कसे करणार? यावरून हे समजता कामा नये की, ह्या गोष्टी कल्पनातीत आहेत म्हणून खऱ्या नव्हेत. कारण, काही वर्षांपूर्वी माणूस चंद्रावर पाऊल ठेवू शकेल याची कल्पनाही आली नव्हती; पण कालांतराने ही घटना प्रत्यक्षात यशस्वीपणे अवतरली. ह्याचप्रमाणे मानवांतील गुप्त शक्तीने विकास पावून पुढे त्यास दिव्य दृष्टी प्राप्त होऊन या गोष्टीचे सत्यत्व पटेल हे संभाव्य आहे. म्हणून आताच त्याविषयी चर्वितचर्वण करणे व्यर्थ आहे, व ह्या गोष्टी विश्वासास बाधक नाहीत.

**'सिद्रतुल मुंतहा' ('लक्ष्मण-रेषा') : परिचय (ओळख)**

'सिद्रतुल मुंतहा' हे एक असे स्थळ आहे की ज्यामध्ये आठ दरबार आहेत. प्रत्येक दरबारामध्ये उच्च दर्जाची असंख्य दृश्ये आहेत. या दरबारींच्या अभिरूचीनुसार या दृश्यांमध्ये परस्पर तफावत आढळून येते. स्थळाचा अभिप्राय आपल्या दृश्यांमध्ये परमेश्वराच्या प्रकट होण्याशी आहे. आणि त्या वस्तूमध्ये त्याचे प्रकाशमान होण्याशी आहे. दैवी वास्तव आणि भौतिक सार्थकता त्याला लाभलेली आहे.

आठ दरबार म्हणजेच आठ अभिव्यक्ती पुढीलप्रमाणे आहेत ह्व

१) **पहिला दरबार – पहिली अभिव्यक्ती :** यामध्ये अल्लाह हा भक्ताच्या अंतरंगस्वरूपात आपल्या प्रकट (व्यक्त) या नावाने प्रकाशमान होतो.

२) **दुसरा दरबार – दुसरी अभिव्यक्ती :** यामध्ये अल्लाह हा भक्ताच्या अंतरंग स्वरूपात आपल्या अप्रकट (अव्यक्त) या नावाने प्रकाशमान होतो.

३) **तिसरा दरबार – तिसरी अभिव्यक्ती :** यामध्ये अल्लाह हा भक्ताच्या आत्म्यास्वरूपात आपले अल्लाह या नावाने प्रकाशमान होतो.

४) **चौथा दरबार – चौथी अभिव्यक्ती :** यामध्ये अल्लाह हा भक्ताच्या वासनेच्या स्वरूपात आपले गुण प्रभू वा विधाता ('रब') अर्थात पालनकर्ता या नावाने प्रकाशमान होतो.

५) **पाचवा दरबार – पाचवी अभिव्यक्ती :** हे पदाचे प्रकाशन आहे, आणि ते भक्ताच्या विवेकबुद्धीमध्ये कृपाळू ('रहमान') या गुणांची अभिव्यक्ती आहे.

६) **सहावा दरबार – सहावी अभिव्यक्ती :** यामध्ये सर्वश्रेष्ठ अल्लाह हा भक्ताच्या मिथ्या धारणा वा विभ्रम स्वरूपात प्रकाशमान होतो.

७) **सातवा दरबार – सातवी अभिव्यक्ती :** यामध्ये तदत्त्वा ('हूवीय्यत')चे ब्रह्मज्ञान होते. यामध्ये सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा भक्ताची अहंता ('अनीय्यत') नामस्वरूपात प्रकाशमान होतो.

८) **आठवा दरबार – आठवी अभिव्यक्ती :** ही निरपेक्ष भक्तापासून सत्तेची ओळख आहे. या ठिकाणी सर्वश्रेष्ठ अल्लाह हा आपल्या पराकाष्ठेसह मानवी लक्षणेच्या अंतरंग व बहिरंगामध्ये प्रकाशमान होतो. त्यामध्ये अल्लाहचे अंतरंग हे भक्ताच्या अंतरंगासोबत असते. तर बहिरंग हे बहिरंगासोबत असते, आणि अल्लाहचे तदत्व भक्ताच्या तदत्वासोबत असते. तद्वत ईश्वराची अहंता भक्ताच्या अहंतेसोबत (असते). आणि ही अभिव्यक्ती सर्व अभिव्यक्तींहून श्रेष्ठ आहे. याच्यापुढे एकत्त्वतेशिवाय ('अहदिय्युत') काहीच नाही, आणि यामध्ये सृष्टीची काहीच मजाल नाही. कारण की ते मात्र ईश्वरच असते, आणि सत्ता ही मात्र परमेश्वराशीच निगडित असते. जेव्हा एखाद्या पुरुषोत्तमास वा नरोत्तमास यापासून काही प्राप्त होत असेल, तर त्याच्याबाबतीत आम्ही म्हणू की, तो त्याच्यासाठी त्याच्यासोबतच प्रभू-प्रकटन आहे. भक्ताचा यामध्ये काहीच वश नाही. आणि ते विवरण भक्ताशी निगडित केले जात नाही, अपितु ते परमेश्वरासाठी आहे.

## ९) बैतुल मामूर (देवदूतांचे नमनस्थळ)

हे एक प्रार्थनास्थळ (मशीद) आहे चौथ्या आकाशावर. ते लाल रत्नांनी बनलेले आहे. हे ठीक 'काबा'गृहावर स्थित आहे. हे 'कुर्सी' - पादपीठाखाली आहे. हे देवदूतांचे नमनस्थळ आहे. हे आकाशांमध्ये आहे. प्रत्येक क्षण असंख्य देवदूत याची परिक्रमा करत असतात. ते प्रदक्षिणा घालत असतात. 'अर्श' आणि 'कुर्सी'पासून प्रत्येक क्षण प्रखर प्रकाश आणि कृपाप्रसादाची वर्षा होत असते. हा वर्षाव होतच असतो. 'बैतुलमामूर' आणि 'बैतुल्ला' हे क्रमशः 'अर्श' आणि 'कुर्सी' यांच्या ठीक सरळ खाली स्थित आहेत.

## १०) नूर-ए-अक़्ल (ज्ञान-प्रकाश)

अर्थात बुद्धिमत्तेचा प्रकाश. सर्वप्रथम सर्वश्रेष्ठ परमेश्वराने ज्ञान-प्रकाशास निर्माण केले. याचे दुसरे नाव मुहम्मदीय वास्तव म्हणजेच 'हक़ीक़त-ए-मुहम्मदी' आहे. यावरून माहीत होते की सृष्टीच्या अनुषंगाने नूर-ए-मुहम्मदी म्हणजेच मुहम्मदांचे प्रकाश सर्व निर्मितीमध्ये सर्वप्रथम आहे, आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने सर्वात शेवटी आहे. याच कारणामुळे मुहम्मदी प्रकाशाचा आरंभ व शेवट परमेश्वराचा प्रकाश तर होऊ शकतो, परंतु इतर कोणत्याही संदेशत्वाच्या प्रकाशास हा अधिकार असू शकत नाही. प्रेषित मुहम्मद यांच्या नंतर कोणत्याही संदेशत्वास स्वीकार केले जाऊ शकत नाही. ज्ञान-प्रकाशास निर्माण केल्यानंतर सर्वश्रेष्ठ परमेश्वराने लेखशिला ('लौह') आणि लेखणी, पदार्थ आणि आत्मा, दैवी राजसिंहासन आणि पादपीठ ('कुर्सी') यांना निर्माण केले. मग परमेश्वराने किन्नर-यक्षयोनि ('जिन')आणि देवदूत; स्वर्ग आणि नरक; पृथ्वी आणि आकाश; चंद्र आणि सूर्य आणि इतर असंख्य ग्रह-तारे इत्यादी निर्माण केले.

एक हदीस (प्रेषित-वचन) आहे - सर्वश्रेष्ठ परमेश्वराने सर्व वस्तू निर्माण करण्याअगोदर तुमच्या संदेशहरा ('नबी')च्या प्रकाशास आपल्या प्रकाशापासून निर्माण केले. मग जेव्हा सृष्टी व त्यामधील इतर जीवांना निर्माण करण्याचे इच्छिले, तेव्हा त्याने या प्रकाशाचे चार भाग केले. एका भागापासून लेखणीस निर्माण केले, दुसऱ्या भागापासून लेखशिलेस आणि तिसऱ्या भागापासून दैवी राजसिंहासन अर्थात 'अर्श' निर्माण केले. हीच 'हदीस' आता या शब्दांनी प्रसिद्ध झाली आहे - ''अव्वल मा ख़ल्क़ अल्लाहु नूरी.''

## ११) रूह, रूहुल कुद्स व क़ल्ब (आत्मा, पवित्र आत्मा आणि अंत:करण)

ईश्वराशी संबंधित असताना शाश्वत, तर मानवाशी संबंधित असल्यास अशाश्वत; वस्तूंचे अंतरतम सत्त्व अथवा त्यांच्या अस्तित्त्वाचे स्वरूप या नात्याने **रूहुल कुदूस** (पवित्र आत्मा) आणि रूह (आत्मा) हे एक चैतन्यस्वरूपात असतात. सर्व नैसर्गिक उणीवांवर मात करणारे अनिर्मित ईश्वरी चैतन्याचा संकेत पुढील पौराणिक श्लोकांमध्ये असा करण्यात आलेला आहे - ''जेव्हा मी त्याला पूर्ण आकार देऊन, त्यात माझ्या आत्म्याची फुंकर मारेन, तेव्हा तुम्ही त्याच्यासमोर नतमस्तक व्हा.'' १५:२९ ''जेव्हा मी त्यास पूर्णपणे घडवून टाकेन व त्यात माझा आत्मा फुंकलेला असेल, तेव्हा तुम्ही (सर्व) त्याच्या समोर नतमस्तक व्हा.'' ३८:७२ ''तुम्ही जिकडे तोंड वळवाल तिकडेच अल्लाहचा चेहरा असेल'' २:११५ (''जिकडे तुम्ही तोंड कराल तिथे अल्लाहचे

अस्तित्त्व आहे.'') अथवा ''तुम्ही जिकडे वळाल तिकडे तुम्ही अल्लाहशी सामोरे व्हाल'' किंवा ''जेथेही कोठे तुम्ही तोंड कराल, तेथेच परमेश्वराचा सामना आहे.'' २:११५) म्हणजेच संवेदनाचा प्रत्येक विषय किंवा प्रत्येक विचारामध्ये 'रूहुल कुदूस' आपली पूर्ण अवस्थेच्या तन्मात्रित स्वरूपामध्ये अस्तित्वात असतो. ज्याअर्थी एखाद्या वस्तूचे चैतन्य (आत्मा) हे तिचे 'स्व' ('नफ़्स') असते, त्याअर्थी अस्तित्व हे ईश्वराच्या 'स्व'ने बनलेले असते; आणि त्याचे 'स्व' हे त्याचे सत्त्व असते. गुह्य जीवनाची पूर्तता व पूर्णता या नात्याने 'रूहुल कुदूस'चा पवित्र ('कुद्सी') या नात्याने मिलाफ फक्त तेव्हाच होतो जेव्हा दैवी मर्म ('सिर्र') हे अव्याहतपणे मनन करते. आणि हेच त्याचे मूळ आहे, की जेणेकरून तिचे नियम त्याच्यामध्ये अभिव्यक्त व्हावेत आणि ईश्वर हा त्याचा कान, हात, डोळे आणि जिव्हा बनून जातो. तो आजाऱ्यांना स्पर्श करतो आणि ते बरे होतात, एखादी वस्तू निर्माण करण्याची इच्छा करतो आणि ती तत्काळ बनून जाते (होते); कारण येशू मसीहप्रमाणे त्याला पवित्र आत्म्यानिशी सबल बनवले होते. ''मरियमपुत्र येशू मसीहला, आम्ही सत्याचे सर्व स्पष्ट प्रमाण दिले आणि पवित्र आत्म्याद्वारे त्याला बळ प्रदान केले.'' २:८७ ''मरियमचा पुत्र ईसा (येशू) यासही आम्ही ढळढळीत चमत्कार दिले व पवित्र आत्मा (म्हणजे जिब्रील) याद्वारे आम्ही त्याला पाठबळ दिले.'' २:८७

**'रूह'** अथवा मुहम्मदाची प्रत्यादर्श चेतना ही अनिर्मित पवित्र दिव्य चेतनेचा एक प्रकार आहे. सृष्टीमध्ये ईश्वर हा स्वतःस मुहम्मदाच्या प्रत्यादर्श चेतनेच्या माध्यमातून चित्स्वरूप बनतो. परमेश्वराने स्वप्रकाशापासून 'रूह' नावाचा एक नामांकित देवदूत निर्माण केला, आणि या नामी देवदूतापासून जगास निर्माण केले आणि त्याने त्यास जगामधील आपले नेत्र बनवले. त्याच्या नामांपैकी एक नाम आहे 'अम्र अल्लाह' ('अम्र' हा शब्द, नादब्रह्म वा शब्दब्रह्म (logos)साठी पण वापरला जातो.) तो अस्तित्वात असलेल्या सर्व जीवांमध्ये सर्वात थोर व सर्वोच्च आहे. त्याच्यावाचून वरचढ कोणताच देवदूत नाही. तो प्रमुख देवदूत-देवदूतांचा सेनापती आहे. ईश्वराने जीवांच्या अस्तित्वाचे जात्याचे पाट निर्माण केले. ते जाते चालवण्यासाठी त्याने त्या प्रमुख देवदूतास सृष्टीचे अक्ष बनवले. प्रत्येक निर्मित वस्तूसाठी ईश्वराने आपला एक विशेष पैलू निर्धारित केला आहे. त्याच अनुषंगाने तो त्यांच्याकडे पाहतो आणि निर्मितीच्या क्रमपरंपरेत तिचे योग्य स्थान सुरक्षित ठेवतो. त्याचे आठ प्रकार आहेत. ते 'अल-अर्श' म्हणजेच दैवी राजसिंहासनाचे धारक आहेत. 'अर्श' हे विश्व-शरीर ('अल्-जिस्मकुल्ली') अथवा सुव्यवस्थित जगाची रचना ('हैकल अल्-आलम व जस्द:') आहे. ईश सिंहासनास ('अर्श'ला) उचलून धरणारे आठ (८) देवदूत आहेत. हे अग्रगण्य पवित्र देवदूत आहेत. याचा उल्लेख पवित्र कुराणात असा आहे - ''त्या दिवशी (महान) घटना घडेल. आणि आकाश दुभंगून जाईल व त्या दिवशी ते निस्तेज होऊन जाईल. आणि देवदूत त्याच्या काठाशी (उभे) असतील. त्या दिवशी तुझ्या विधात्या (पालनकर्त्या)च्या महासिंहासनाला आठ देवदूतांनी उचलून धरलेले असेल. त्या दिवशी तुम्हाला (ईश्वरासमोर) हजर करण्यात येईल.'' ६९:१५-१८. त्याच्यापासून भव्य आणि प्रारंभिक असे सर्व देवदूत निर्माण झाले. समुद्रासाठी जसे पाण्याचे थेंब वाटावे तसेच हे देवदूत त्याच्यासाठी आहेत. मानवी अस्तित्व प्रस्थापित करणाऱ्या आठ मनःशक्तींचा मानवी चैतन्याशी जो संबंध असतो तसाच संबंध आठ 'अर्श' अर्थात दिव्य सिंहासनधारक देवदूतांचा परमेश्वराशी असतो.

मानवाच्या या अष्ट मन:शक्ती आहेत – (१) विवेक–बुद्धी ('अक्ल'), (२) निर्णयशक्ती ('वह्म'), (३) चिंतन ('फ़िक्र'), (४) विचार–मन ('ख़याल'), (५) परिकल्पना ('अल्–मुसव्विर'), (६) स्मरण शक्ती ('अल्–हिफ़्ज़'), (७) संवेदनशीलता–बोध ('अल्–मुद्रिक'), आणि (८) चैतन्य ('नफ़्स').

'रूह' म्हणजेच नामी देवदूत हा त्याच्यामध्ये ईश्वरनिर्मित दैवी पालकत्वाची एक भूमिका समस्त ब्रह्मांडावर वटवतो. तो आपल्या पूर्णावस्थेमध्ये स्वत:स 'हक़ीक़तुल्–मुहम्मदिय्या'मध्ये अभिव्यक्त करतो, प्रकट करतो. म्हणून प्रेषित मुहम्मद हे मानवजातीमधील सर्वोत्तम आहेत. (म्हणूनच ते नरोत्तम वा पुरुषोत्तम आहेत). जसा परमेश्वर हा आपल्या गुणांनिशी अभिव्यक्त होतो तसाच तो आपल्या सत्त्वामध्ये स्वत:च या एकट्याच देवदूतामध्ये प्रकट होतो. त्याबरहुकूम 'रूह' हे इहलोक व परलोकाचे 'कल्ब' म्हणजेच अंत:करण वा चित्त आहे. नरोत्तमा– शिवाय तो आपली जाणीव कुणालाच होऊ देत नाही. जेव्हा संत ('वली') त्याला ओळखतो आणि 'रूह' अर्थात नामी देवदूताची शिकवण खरोखर आत्मसात करतो, तेव्हा तो एक ध्रुव वा मेरू ('कुत्ब') बनतो. त्यावर समस्त विश्व परिक्रमा करत असते; परंतु मूलतः ध्रुवत्व ('कुत्बिय्या') हे 'रूह'शी निगडित असते, आणि जर इतर धारण करत असतील तर ते त्याचे प्रतिनिधी मात्र असतात. दैवी आदेश ग्रहण करणारा तो नामी देवदूत सर्व प्रथम असतो. मग तो इतर देवदूतांना आदेश पाठवितो. जेव्हा एखादी आज्ञा जगात अंमलात आणायची असते तेव्हा परमेश्वर त्याच्यापासून त्या आज्ञेस योग्य असा एक देवदूत निर्माण करतो आणि तो नामी देवदूत ('रूह') ती आज्ञा पालनासाठी त्याच्याकडे पाठवितो. सर्व प्रमुख देवदूत हे या नामी देवदूतापासून बनलेले आहेत, जसे इस्राफ़ील, जिब्रील, मीकाईल आणि इज्राईल आणि यांच्यावरील, जसे 'अल–नून नामी' याचे स्थान. सुरक्षित लेखशिला ('लौह–ए–महफूज') आणि 'लेखणी' ('अल्–क़लम') नामक देवदूताखाली आहे. 'कुर्सी' अर्थात पादपीठाखाली स्थित असलेले देवदूताचे नाव आहे 'अल्–मुदब्बिर'. 'इमामुल्–मुबीन'खाली 'अल्–मुफ़स्सिल' नावाचा देवदूत उभा आहे. हे आहेत महान, उदात्त, भव्य आणि प्रतापी असे देवदूत. त्यांना आदमपुढे नतमस्तक होण्याची आज्ञा नव्हती. आपल्या चातुर्यामध्ये परमेश्वराने त्यांना तसे आज्ञापित केले नव्हते. जर यदाकदा त्यांना पण आदम पुढे नतमस्तक होण्याची आज्ञा दिली गेली असती तर आदमच्या वंशजांमधील प्रत्येकाने त्यांना ओळखले असते. ज्याअर्थी देवदूतांना आदमपुढे नतमस्तक होण्याची आज्ञा दिली गेली होती त्याअर्थी, जरा विचार करा की परमेश्वराने मानवावर स्वप्नामध्ये उघड केल्यावर सादृश्य स्वरूपात ते देवदूत त्यांना कसे दिसून आले असते. या कारणामुळे माणूस स्वप्नांमध्ये निर्जिव वस्तूंना बोलताना पाहतो. जर ते खरोखर निष्प्राण स्वरूपातील चैतन्ये असते, तर ते बोलले नसते. प्रेषित मुहम्मद म्हणाले होते की, एखादे खरे स्वप्न हे परमेश्वराकडील एक दैवी स्फुरण असते. कारण त्या स्वप्नास एक देवदूत आणतो आणि तसेच एक सच्चे स्वप्न हे भविष्याचे सेहेचाळीसावा (१/४६) वा हिस्सा असते. आदमपुढे नतमस्तक होणाऱ्यांमध्ये समाविष्ट असतानाही पण इब्लीसने (शैतानांचा प्रमुख व नेता) नतमस्तक होण्यास नकार दिला व अशा प्रकारे त्याने ईश्वरी आज्ञेचे उल्लंघन केले. इब्लीसची अपत्ये शैतानांना स्वप्नामध्ये देवदूत स्वरूपात व्यक्त होण्यास आज्ञापित केल्यावर ते शैतान असताना देखील देवदूतांच्या रूपात स्वप्नामध्ये येतात. अशा प्रकारे ते एक सच्चे स्वप्न नसून, एक छद्म स्वप्न ठरते. इब्लीस पर्यायाने शैतान मानवास छद्म स्वरूपामध्ये भुरळ पाडतो. या युक्तिवादानुसार महान, उदात्त, भव्य आणि प्रतापी देवदूत हे अज्ञातव्य असतात.


मानवी मर्यादांपासून सुटका झालेले, एका विशेष प्रकारच्या दैवी ज्ञानाची देणगी लाभलेले 'दिव्य पुरुष'च ('अल्-इलाहिय्यून') या प्रतापी नामी देवदूतांना ओळखू शकतात.

पैलूंच्या संख्येनुसार 'रूह' म्हणजेच नामी देवदूतांची अनेक नावे आहेत. व्युत्पत्तीशास्त्राच्या आधारे या नामी देवदूतास पुढील नामाभिधाने प्राप्त झालेली आहेत 'सर्वश्रेष्ठ लेखणी', 'मुहम्मदांचे चैतन्य' वा 'मुहम्मदीय चैतन्य', 'विश्व-ज्ञान' आणि 'दैवी चैतन्य'; परंतु ईश्वराच्या उपस्थितीमध्ये त्याचे एकच नाव आहे, ते म्हणजे 'चैतन्य'. म्हणजेच नामी देवदूत ('अल्-रूह').

**क़ल्ब (अंत:करण वा चित्त)**

काही बाबतीत सूफ़ी मानसिक अवयव 'अंत:करण वा चित्त' ('क़ल्ब') आणि चैतन्य ('रूह') यामधील भेद क्वचितच मानतात. खरोखर, मर्मज्ञ सूफ़ी अब्दुल करीम जीली यांचे असे मत आहे की जेव्हा पवित्र कुराण निवेदन करते की 'आदममध्ये दैवी आत्मा फुंकलेला आहे, तेव्हा त्याचा आशय 'अंत:करण वा चित्त' असा आहे. तो आत्मा ''शाश्वत प्रकाश आणि भव्य-उदात्त मर्म ('सिर्र') निर्मित व्यक्ती (मुहम्मद)च्या सारतत्वा ('ऐन')मध्ये प्रकट केला, म्हणजे त्यायोगे ईश्वरास मानवाकडे पाहता यावे'' ईश्वराचे सिंहासन ('अल्-अर्श') आणि त्याचे उपासनागृह मानवामध्ये या स्वरूपात... दैवी चैतन्याचे केंद्र आणि प्रत्यक्ष स्वरूपात किंवा आदर्श स्वरूपात काही अस्तित्वात असलेल्या वर्तुळाच्या परिघस्वरूपात, ते तत्काळ सर्व दैवी नाम-रूपे परावर्तीत करते, तरी सुद्धा विशिष्ट नामांच्या प्रभावाखाली लवकर बदलते. आरशाप्रमाणे त्या (चित्ता)ला एक पुढची बाजू असते. समोरची बाजू ही नेहमी एका प्रकाशाकडे, की ज्याला लक्ष किंवा अवधान ('अल्-हम्म') म्हणतात, उन्मूख असते. हा अंत:करणाचा डोळा असतो. यालाच आपण अंत:चक्षू म्हणतो. जेव्हा एखादे नाम ध्यान आकर्षित करते तेव्हा चित्त त्याकडे पाहते आणि त्याचे छाप (प्रभाव) ग्रहण करते. मग हे नाम विलुप्त होते आणि त्या जागी इतर नामे येतात. चित्ताची 'मागील' बाजू म्हणजे अवधान नसलेले स्थळ. अब्दुल करीम जीली आपला मथितार्थ पुढील आकृतीच्या मदतीने स्पष्ट करतात.

**प्रबळ, प्रमुख नाम**




**आकृती १० – नाम-रूपांचे वृत्त (वर्तुळ)**

अंत:करणाचा वास्तविक स्वभाव म्हणजे दैवी नाम-रूपे. काही लोक इतके भाग्यवान असतात की त्यांना आपले अंत:करण शुद्ध ठेवण्यासाठी सायास करावे लागत नाहीत; परंतु आपल्यापैकी बऱ्याच जणांना चित्तावरील कलंक धुण्यासाठी कष्टप्रद तपस्या – आत्मदमनासाठी करावी लागते. ईश्वर प्रदत्त ठपक्याच्या प्रमाणांत सत्कार्याची भरपाई अवलंबून असते. तो एक आवश्यक अधिकार आहे, यादृच्छिक देणगी नव्हे. अंत:करण गुणांचे जग परावर्तीत करते, अथवा, वास्तविक पाहता, जसे जीली याचे मत आहे, अंत:करणच ब्रह्मांडाने परावर्तित होते. ''पृथ्वी आणि आकाशामध्ये मी सामावत नाही, मात्र श्रद्धावंताच्या अंत:करणात मी सामावतो.'' जर विश्व प्राथमिक असेल आणि अंत:करण दुय्यम असेल, म्हणजेच जर अंत:करण हेच एक आरसा असेल तरच समाविष्ट करण्याची आणि आकलन (ग्रहण) करण्याची शक्तीचा संबंध विश्वाशी लावता येईल; अंत:करणाशी नव्हे. परंतु वस्तुत: ज्ञान, चिंतन आणि शेवटी तत्त्वपरिवर्तनाच्या साहाय्याने अंत:करणच ईश्वराचे आकलन करते.

जेव्हा परमेश्वराने संपूर्ण विश्व मुहम्मदांच्या प्रकाशापासून निर्माण केले तेव्हा त्याने मुहम्मदांच्या अंत:करणापासून, देवदूतांमध्ये सर्वशक्तिमान असलेल्या आणि ईश्वराच्या सर्वात जवळ असलेल्या इस्त्राफ़िल या देवदूतास निर्माण केले.

**१) विवेक बुद्धी ('अक़्ल') :** या मन:शक्तीचे तीन प्रकार आहेत. म्हणजेच – (१) विश्व-ज्ञान ('अल्-अक़्लुल-अव्वल'), (२) अतिज्ञान किंवा अज्ञान ('अल्-अक़्लुल-कुल्ली') आणि (३) व्यवहार ज्ञान किंवा सामान्य ज्ञान ('अक़्लुल-मआश'). जीली विश्व-ज्ञानासंबंधी असे मानतात की ते विश्वसनीय आत्मा (चेतना) ('अल्-रूहुल-अमीन') जिब्रील या दैवी ज्ञानाचा कोषाध्यक्ष आहे. अस्तित्वात असलेल्या दैवी ज्ञानाच्या स्वरूपात एका बिंदूपथासारखे आहे. आणि अतिज्ञान किंवा अज्ञान हे एक अवक्षेपक प्रकाशित माध्यम आहे, जेणेकरून विश्व-ज्ञानामध्ये संचित ज्ञानाची रूपे व्यक्त होतात. व्यवहारज्ञान किंवा सामान्य ज्ञान हे मननाच्या नियमाने मोजले गेलेले अति ज्ञान किंवा अज्ञानाचे प्रकाश आहे. मननाशिवाय याचा बोध होत नाही. म्हणून ते निर्बाधपणे विश्वज्ञानापर्यंत पोहोचू शकत नाही. प्राय: निशाणा चुकतो आणि बऱ्याच गोष्टी समजण्यामध्ये अपयशी ठरते. दुसरीकडे अतिज्ञान अचूक असते, कारण ते चातुर्य आणि शक्ती या दोन मापदंडाने वजन करते, परंतु सृष्टीच्या क्षेत्रापलीकडे हे कधीच प्रवेश करू शकत नाही, ना प्रातिभ विवेक ना विवेचक विवेक ईश्वराचे ज्ञान प्राप्त करू शकतात. सच्चे ब्रह्मज्ञान ही श्रद्धा देते. श्रद्धा प्रमाण आणि परिणामावर अवलंबून नसते, परंतु ती सर्वस्वी दैवी गुणांवर अवलंबून असते.

**२) मुहम्मदांची निर्णयशक्ती ('वहम') :** ही 'अल्-कामिल' (पारंगत) या दैवी नामाच्या प्रकाशापासून निर्माण झालेली आहे. परमेश्वराने मुहम्मद यांच्या निर्णयशक्तीपासून मृत्युचा देवदूत म्हणजेच यमदूत इज्राईल यास निर्माण केले. निर्णयशक्ती ही मानवी मनाच्या शक्तींमधील सर्वात प्रबळ अशी शक्ती आहे. समज, विचार आणि कल्पना यावर ती वरचढ आहे. ....... जगामधील कुठलीच गोष्ट अधिक सत्वरपणे समजली जात नाही. (मात्र) मानवास पाण्यावर चालणे आणि हवेत उडणे शक्य आहे. ती निश्चितीचे प्रकाश आहे, आधिपत्याचा पाया आहे. ज्याच्याकडे निर्णयशक्तीचे आधिपत्य असेल ते सर्व लहान-मोठ्या वस्तूंवर आपला अधिकार गाजवते, आणि ज्याच्यावर तिच्या शक्ती-बळाचे राज्य चालते तो स्तंभित होऊन किंकर्तव्यमूढ बनतो. 'वहम'

अर्थात निर्णयशक्तीची सर्वसाधारण व्याख्या अशी केली जाते की ती 'शारीरिक' शक्ती असते. एखाद्या इंद्रियगोचर वस्तूचे तिला ज्ञान होते आणि तिच्याविषयी एक पारख वा मत निर्धारित होते. उदाहरणार्थ, लांडग्यापासून शेळ्या पळतात. अब्दुल करीम जीली यांचे असे मत आहे की निर्णयशक्तीमुळे वस्तूंविषयी सहजपणे योग्य तो निर्णय घेणे सोपे जाते. ते म्हणतात की निर्णयशक्ती आधारे ईश्वराचे जीव आपला पालनकर्ता या नात्याने भक्ती-उपासना करण्यास प्रवृत्त होतात. शरीरामध्ये प्रवेश केल्यानंतर चैतन्य एक तर देवदूतांचे स्वभाव ग्रहण करून स्वर्गाकडे आरोहण करेल किंवा पाशविक प्रवृत्ती धारण करून नरकात खितपत पडेल. मानवी स्वरूपाच्या मर्यादा म्हणजेच स्थूलत्व आणि दुर्बलता मान्य केल्यावरच ते आरोहण करते. आपल्या हयातीत मरणासन्न व्यक्तीने ज्या श्रद्धा बाळगल्या असतील, जी कर्मे केली असतील आणि जो तिचा स्वभाव असेल त्यांना अनुसरूनच मृत्युच्या वेळी यमदूत इज्राईल हा चैतन्यासमोर दाखल होतो. अथवा, पुन्हा तो अशरीरी आणि अदृश्य स्वरूपामध्ये हजर होतो, की जेणेकरून एखादा माणूस हा 'चांगल्या शांत मृत्यूने' किंवा वाईट यातनामय मृत्युने मृत्यू पावेल, जेव्हा चैतन्य इज्राईलला पाहते तेव्हा ते तिच्यावर मोहित होते आणि तिची एकाग्र दृष्टी शरीरापासून संपूर्णपणे काढून घेतली जाते. चैतन्य एकदम आपले शारीरिक रूप त्यागत नाही; परंतु त्यामध्ये एक क्षणभर राहते, जसे की कुठलेच दृश्य न बघता झोपणाऱ्या एखाद्या माणसासारखे. या स्वप्नविरहित झोपेनंतर, हाच त्याचा मृत्यू ('मौतुल-अर्वाह') असतो. चैतन्य मध्यावस्थे ('अल्-बर्ज़ख़')मध्ये प्रवेश करते.

**३) चिंतन ('हिम्म') :** ही आध्यात्मिक शक्तींपैकी सर्वात महान शक्ती आहे, कारण तिचा विषय ईश्वराव्यतिरिक्त दुसरा काहीच नसतो. अंत:करणाची परमेश्वराप्रति परिपूर्ण एकाग्रचित्तता म्हणजे 'हिम्म'. यापासून मीकाईल हा प्रमुख देवदूत निर्माण झालेला आहे. भाग्य-वाटपाची जबाबदारी याच्यावर सोपवण्यात आलेली आहे. तो प्रत्येकाचे विधिलिखित भाग्यांश वितरित करतो.

मुहम्मदांच्या चिंतनापासून ('फ़िक्र') परमेश्वराने स्वर्गीय आणि पार्थिव देवदूतांची निर्मिती केली. अस्तित्वाच्या उच्चतर आणि निम्नतर कार्यक्षेत्रांचे प्रलय दिवसापर्यंत संरक्षण करण्यासाठी याची नेमणूक आहे. प्रलय दिवशी जगाचे खरे स्वरूप स्पष्ट होऊन जाईल. त्याची एक किल्ली आहे चिंतन-मनन. चिंतन मानवी स्वभावाचे सत्य ज्ञान उघड करते. हा सर्वोपरि पैलू आहे; (मात्र) दयाळू ('अल्-रहमान') पैलूंच्या विरोधात. अर्थात दयाळू हा पैलू सोडून परंतु चिंतना ('फ़िक्र')चे विशुद्ध क्षेत्र केवळ गूढवाद्यांसाठीच उघडे आहे : तर्कप्रधान तत्त्वज्ञानाची एका मृगजळामध्ये इतिश्री झाली.

**विचार**

इंद्रियगोचर वस्तूंचे मूलभूत द्रव्य नष्ट झाल्यानंतर कल्पनाशक्ती जी रूपे पाहते त्या रूपांना मनात ठेवणाऱ्या शक्तीचे नाव आहे विचार. अब्दुल करीम जीली याला विश्वाचे तत्त्व म्हणून घोषित करतात. तत्त्वज्ञ हेगेलच्या भाषेमध्ये, ''वस्तू या आत्मनिर्भर नसतात. त्यांचे अस्तित्व दैवी संकल्पनेवर अवलंबून असते. म्हणून ज्ञात वस्तूचे वर्णन आपण यथार्थपणे करतो. ''स्वप्न पाहणाऱ्यास जसे स्वप्नाचे संवेदन होते त्याच्याव्यतिरिक्त कशाचेही अस्तित्व नसते, आणि सुव्यवस्थित जग हे ''एका विचारांतर्गत असलेल्या एका विचारांतर्गत एक विचार असते.'' ('ख़याल फ़ी ख़याल फ़ी ख़याल'). तथापि, येथे हे आणखी नमूद करावेसे वाटते की जेव्हा

प्रत्येक वस्तू अर्थात प्रत्येक विचार, काही वास्तवाची अभिव्यक्ती करते, तेव्हा नरोत्तम वा पुरुषोत्तम (जरी तो स्वत: सत्तत्त्व नसतो) हा सत्तत्त्वाचे संपूर्ण आत्माभिव्यक्ती असतो.

**१२) हैयूला**

ही मूल प्रकृती आहे. हे जड तत्त्व आहे.

**१३) हबा**

हे भौतिक तत्त्व आहे. हिचा अभिप्राय निरपेक्ष रूपा (शक्ल-ए-कुल्ल)शी आहे.

**१४) फलक-उल्-बुरूज (राशिचक्र)**

एकूण सप्त राशी आहेत. त्या याप्रमाणे आहेत. (१) फलक-उल्-जुहल म्हणजेच शनी ग्रह. सर्वप्रथम या ग्रहाची निर्मिती झाली. हा कृष्णवर्णीय ग्रह आहे. मुहम्मदांच्या ज्योतीमुळे याची निर्मिती झाली. (२) फ़लक-उल्-मुश्तरी म्हणजेच गुरू ग्रह. हा निळ्या रंगाचा आहे. या ग्रहाच्या देवदूतांचा प्रमुख हा मीकाईल आहे. येथील देवदूत हे मंगलकारी आणि करुणामय आहेत. यांच्यापैकी काही पशूंची आकृती धारण करणारे आहेत, काही पक्ष्यांची आकृती धारण करणारे, तर काही माणसांसारखे आहेत. यांच्यापैकी काही असेही आहेत की जे निम्मे अग्नीने आणि निम्मे बर्फाने बनलेले आहेत. (३) फ़लक-उल्-मिरींख़ अर्थात मंगळ ग्रह. याचे अधिपती मृत्युचे देवदूत इज़रायल म्हणजेच यमदूत आहेत. हा ग्रह गडद रक्तवर्णाचा आहे. (४) फ़लक-उल्-शम्स् अर्थात रवी ग्रह. याचा निर्माण 'क़ल्ब' म्हणजेच अंत:करणाने झालेला आहे. याच्यामध्ये इद्रीस, सुलेमान, येशू मसीह इत्यादी अन्य प्रेषितांचा निवास आहे. याचे अधिपती देवदूत इस्राफ़ील आहेत. (५) फ़लक-उल्-ज़ुहरा म्हणजेच शुक्र ग्रह. हे आलम-उल्-मिसाल अर्थात प्रतिकृती जगत वा सादृश्य जग आहे. हा ग्रह पिवळ्या रंगाचा आहे. याच्यामध्ये नाना प्रकारचे देवदूत आहेत. यांच्यावर अनेक प्रकारची कामे सोपवली गेली आहेत. (६) फ़लक-उल्-उतारद म्हणजेच बुध ग्रह. हा धूसर वर्णाचा आहे आणि देवदूतांचे निवासस्थान आहे. (७) फ़लक-उल्-क़मर म्हणजेच सोम ग्रह होय. अल्लाहने याला 'अल्-रूह' अर्थात आत्म्यापासून बनवले आहे. याचा रंग चांदीहून शुभ्र आहे. परमेश्वराने याला (आदि प्रपितामह) आदमचे निवासस्थान बनवले आहे.

या सप्तग्रहांनंतर एक आठवा लोक (पण) आहे, आणि तो स्थिर तारांगणाचा लोक आहे. सर्वांत बाहेरचा नववा लोक फ़लकुल-अफ़लाकचा आहे. याला 'चर्ख-ए-आज़म' म्हणजेच महदाकाश (महत् आकाश) पण म्हणतात. येथे ना तारे आहेत, ना कोणत्याच प्रकारचे चिन्ह. या नऊ लोकांमध्ये प्रत्येकास ज्ञान, आत्मा आणि शरीर आहे.

**१५) फलकुल अनासिर**

हे महाभूत आकाश आहे.

**१६) फ़लक–ए–अतलस**

हे सर्वोपरि आकाश आहे. हे तारे रहित आहे.

**१७) फलक–उल्–असीर**

हे अंतराळ आहे. हे तेज (अग्नी–नार) महाभूत आहे.

**१८) हवा**

हे वायू महाभूत आहे. हवा ही समस्त सजीवांसाठी प्राणाधार आहे. ती आर्द्र, शुष्क व शीतोष्ण स्वरूपामध्ये आढळते.

**१९) माए**

हे आप महाभूत आहे. द्रवरूप, वायुरूप आणि घनरूप स्वरूपात जीवनरेखा स्वरूपामध्ये परमेश्वराने मानवास पाण्याची ही देणगी दिलेली आहे.

**२०) मादन**

हे खनिज आहे. हे संयुग आहे. भूगर्भात घनरूप आणि अणू स्वरूपात नानाविध खनिजांचा खजिना ईश्वराने मानवाच्या उपयोगासाठी दडवून ठेवलेला आहे.

**२१) नबात**

वनस्पती. परमेश्वराने नानाविध नयनरम्य अशा हरित वनस्पतींचा शालू धरणीमातेला नेसविला आहे. यांच्यामुळे मानवास शीतल छाया आणि नानाविध सुमधूर फळांचे वरदान लाभले आहे.

**२२) जौहर**

जड पदार्थ. हे पण मानवासाठी फार उपयोगी आहेत.

**२३) हैवान**

प्राणी जगत. जनावर. जलचर, उभयचर, सरिसृप, हिंस्त्र श्वापद, अनेक प्रकारचे पशू, पक्षी या सर्वांना परमेश्वराने मानवाच्या सेवेसाठी निर्माण करून त्याच्या अधीन केले आहे.

**२४) आलम–ए–मिसाल**

हे सत्त्व आकाश आहे. हे प्रतिकृती किंवा साहस जग आहे. ही स्वप्नावस्था आहे.

**२५) आलम–ए–अजसाम**

हे दृष्य जग आहे. याच्याशी संसार जुडलेले आहेत.

**२६) आलम–ए–मानी**

स्व–र्लोक. मध्य जगत् अर्थात हे आलम–ए–बरज़ख़ आहे. मृतांचे आत्मे येथे स्थिरावतात. प्रलय दिवशी त्यांना आपापल्या देहांमध्ये पुन्हा प्रस्थापित केले जाते.

**२७) सप्त आकाश**

सूफ़ी आचार्य आणि तत्त्वज्ञ अब्दुल करीम जीली यांनी नभोमंडलीय, पार्थिव आणि जलमय विश्वाचे सविस्तर सर्वेक्षण प्रस्तुत केले आहे. त्याचीच रूपरेषा प्रस्तुत करण्याचा येथे प्रयत्न करण्यात येत आहे. प्रथम त्यांनी सप्त आकाशांचे विवेचन हाताळले आहे. सप्त आकाश हे पृथ्वी, आप, तेज आणि वायू या चार महाभूतांच्या टप्प्यांवर समकेंद्रक आणि उत्तरोत्तर विस्तारत उंच जाणारे आहेत. त्यांचे असे मत आहे की गूढवाद्यांनी यांना पाहिले असून सांसारिक मानवासाठी ते त्यांचे भाष्य व्यक्त करू शकतात. त्या सप्त आकाशांची रूपरेषा याप्रमाणे आहे :

**१) रूक़ैया – सोम (चंद्र) ग्रहाचे आकाश**

ज्याला आपण आकाश म्हणतो असे हे पृथ्वीनिर्मित बाष्प नव्हे. परंतु अति सुदूरता आणि अति सूक्ष्मता यामुळे ते अदृश्य आहे. परमेश्वराने याची निर्मिती चैतन्य वा आत्म्या ('अल्–रूह')पासून केली आहे. जसा आत्म्याचा शरीराशी संबंध असतो तसाच याचा पृथ्वीशी संबंध असावा. त्याने याला प्रेषित आदमचे निवास–स्थान बनवले. याचा रंग चांदीपेक्षा शुभ्रतर आहे. हे आकाश यद्यपि दुधाहूनही अधिक शुभ्र आहे, तथापि कोह–ए–काफ़ (काफ़ पर्वत)च्या हरित वर्णामुळे हे हिरवे दिसते. याचा ग्रह सोम (क़मर) आहे आणि वार सोमवार आहे.

**२) माऊन किंवा फ़ैदूम – बुध ग्रहाचे आकाश**

ईश्वराने याची निर्मिती मनन वा विचाराच्या (फ़िक्र) स्वभावानुसार केली आहे. कारागीरांना मदत करणारे सर्व देवदूत यामध्ये वसवले. हे फिकट करड्या रंगाचे आहे. हे प्रकाश किरणोत्सारी लोखंडाचे आहे. याचा ग्रह बुध (उतारद) आहे आणि वार बुधवार आहे.

**३) मलकूत किंवा हार्योन – शुक्र ताऱ्याचे आकाश**

कल्पने ('ख़याल')च्या साम्राज्यापासून निर्मित आहे. ही प्रतिकृती किंवा सादृश्य जगा ('आलमुल मिसाल')ची जागा आहे. हिचा रंग पिवळा आहे. हे तांब्याचे आहे. या आकाशातील देवदूतांना वेगवेगळी कामे सोपविण्यात आलेली आहेत. येथे प्रेषित यूसुफ़ भेटतात. याचा ग्रह शुक्र (ज़ुहरा) आहे, आणि वार शुक्रवार आहे.

**४) ज़ाहिरा – रवी ग्रहाचे आकाश**

हे अंत:करण वा चित्ता ('क़ल्ब')च्या प्रकाशापासून निर्मित आहे. मानवामधील अंत:करणाप्रमाणे आकाशात सूर्य आहे – देवतेचा एक आरसा. ज्याप्रमाणे अंत:करण हे अल्लाहशी निगडित अस्तित्त्वाचे उदात्त अंश प्रदर्शित करते, त्याचप्रमाणे सूर्य हा मूलद्रव्यात्मक जगाच्या तत्त्वाचा स्रोत आहे. इद्रीस, ईसा, सुलेमान, दाऊद आणि अधिकांश प्रेषित रवी ग्रहाच्या आकाशामध्ये निवास करतात. याचा शासक देवदूत इस्त्राफ़िल हा आहे. याचा ग्रह रवी (शम्स) आहे, आणि वार रविवार आहे. सदरहू आकाश नेत्रसुखदायक शुभ्र चांदीचे आहे.

**५) मसहरा किंवा मज़ीना – मंगळ ग्रहाचे आकाश**

या लाल रक्तवर्णीय आकाशावर, मृत्युचा देवदूत अर्थात यमदूत इज्राईल हा अध्यक्षपद विभूषित करतो. हे निर्णयशक्ती वा विचारशक्ती ('वह्म')पासून निर्मित आहे. हे लाल सोन्याचे आहे. याचा ग्रह मंगळ (मिर्रीख़) आहे, आणि वार मंगळवार आहे.

**६) ख़ालसा – गुरू ग्रहाचे आकाश**

याचा रंग निळा आहे. मनन-चिंतना ('हिम्म')च्या प्रकाशापासून परमेश्वराने याची निर्मिती केली. या सहाव्या आकाशाचे देवदूत हे दया व आशीर्वादाचे असतात. यांचा प्रमुख मीकाईल देवदूत आहे. काहींचा रूपाकार हा पशू, पक्षी आणि मानवांचा आहे, तर इतर हे वस्तू आणि घटना स्वरूपात असतात. हे आजाऱ्यांना बरे करतात. अथवा काही देवदूत हे घनरूप आणि द्रवरूप असतात. ते सजीवांना अन्न-पाणी पुरवतात. इतर हे अर्धे अग्नीरूप असतात आणि अर्धे बर्फ स्वरूपात असतात. हे आकाश चमकदार मोत्यांनी बनलेले आहे. या आकाशात प्रेषित मूसा यांचे दर्शन घडते. ''जेव्हा मूसा (सिनाई पर्वतावर) आमच्या निर्धारित केलेल्या वेळी पोहोचला, आणि त्याच्या पालनकर्त्याने त्याच्याशी संभाषण केले, तेव्हा तो म्हणाला, 'हे माझ्या पालनकर्त्या! तू मला स्वत:चे दर्शन घडव, म्हणजे मी तुला पाहू शकेन.' त्यावर (अल्लाह) म्हणाला, 'तू मला कधीही पाहू शकणार नाहीस.'' ७:१४३ याचा ग्रह गुरू (मुश्तरी) आहे, आणि वार गुरूवार आहे.

**७) लाबिया किंवा दामिआ – शनी ग्रहाचे आकाश**

सातवे आकाश हे प्रथम निर्माण झाले. हे विश्व-ज्ञानाच्या प्रकाशापासून निर्माण झाले आहे. याचा रंग काळा आहे. काहींच्या मते हे, लाल (तांबडे) याकूतचे आहे. ताराराहित आकाश ('अल्-फ़लकुल-अत्लस') आणि याच्या दरम्यान (आणखी) तीन आकाश आहेत. यांचे वास्तविक अस्तित्व नसून केवळ एक तार्किक अस्तित्व आहे. ते आकाश आहेत – जड द्रव्याकाश ('फ़लकुल-हयूला'). या तीनपैकी हे सर्वोच्च आहे; अण्वाकाश (अणु आकाश) ('फ़लकुल-हबा') आणि मूल द्रव्याकाश ('फ़लकुल-अनासिर'); तत्त्ववेत्ते एक चौथे आकाश पण जोडतात, म्हणजेच स्वाभाविक गुणधर्मांचे आकाश ('फ़लकुल-तबाई').

विश्व अंतराळामध्ये असल्याकारणाने, तिला एका ठिकाणाची गरज असते. हे ठिकाण म्हणजे 'अल्-हबा'. हे 'तार्किक' ('हुक्मी') आहे. कारण ते विश्वाशी सजातीय असू शकत नाही; नाही तर तिला एका ठिकाणाची गरज भासली असती. गूढवादी याला विश्व-ज्ञान आणि मुहम्मदीय चेतना असे म्हणतात.

याच आकाशामध्ये 'बैतुलमामूर' म्हणजेच देवदूतांचा 'काबा' अर्थात नमनस्थळ किंवा नमनदिशा आहे. हे सर्वोच्च आकाश आहे. याचा ग्रह शनी (ज़ुहल) आहे, आणि वार शनिवार आहे.

सप्त आकाशाचा संकेत पवित्र कुराणामध्ये असा आहे – ''त्यानंतर दोन दिवसांत, त्याने सात आकाश निर्माण केलेत आणि प्रत्येक आकाशाकडे त्यांच्या कार्यासंबंधाने आपला आदेश प्रकट केला आणि आम्ही पृथ्वीसाठी सर्वात जवळ असलेल्या आकाशाला (ताऱ्यांचे) दिवे लावून सुशोभित (एकावर एक) केले, आणि त्याच्या सुरक्षिततेची व्यवस्था केली.'' ४१:१२ ''ज्याने सुसंगती ठेवून सप्त आकाशाची निर्मिती केली आहे त्या कृपानिधी (ईश्वराच्या) निर्मितीमध्ये तुला कोणतीही विसंगती दिसून येत नाही. पुन्हा एकवार पाहा – तुला कोणतेही वैगुण्य दिसते काय?'' ६७:३ ''तुम्ही कधी (चिंतनपूर्वक) अवलोकन केले नाही का की, अल्लाहने एकावर एक सात आकाश कशा प्रकारे पूर्ण संतुलनासह निर्माण केले.'' ७८:१२

**२८) सप्त पृथ्वी**

पृथ्वीचे सप्त खंड पुढीलप्रमाणे आहेत –

**१) अर्ज़ुल–नफ़ूस – मानव लोकांची पृथ्वी**

या पृथ्वीस परमेश्वराने दुधापेक्षा अधिक शुभ्र आणि कस्तुरीपेक्षा अधिक सुगंधित बनवले आहे, परंतु आपल्या अध:पतनानंतर आदम जेव्हा याच्यावर चालले, तेव्हा ही धुरळा रंगाची बनली. मात्र उत्तरेकडील एका टापूमध्ये कोणताच पापी मनुष्य पोहोचला नाही. याचे शासक अल्–ख़िज़र हे होते. येथील जमीन परमेश्वराने निर्माण केलेल्या अवस्थेप्रमाणे अद्यापही पांढरीशुभ्र आहे. ते 'रिजालुल गैब' म्हणजेच परोक्ष ईश्वरनिष्ठांचे निवासस्थान आहे.

ही सजीवांची पृथ्वी असल्यामुळे यामध्ये जनावरे राहात होती. ख़िज़र यांच्या प्रांताच्या रहिवाश्यांशी देवदूत संवाद साधतात. येथे प्रेषित आदम पोहोचले नाहीत. तसेच ईश्वराचा कोणीच अवज्ञाकारी तेथे पोहोचला नाही. ती अद्याप आपल्या मूळ स्वरूपामध्ये कायम आहे. आणि ही पृथ्वी बल्ग़ार या शहराजवळ आहे. शिशिर ऋतूमध्ये बल्ग़ारमध्ये रात्रीची नमाज (उपासना) संपन्न होत नाही. कारण सूर्यास्ताअगोदर येथे पहाट उजाडते. परमेश्वरापाशी ही पृथ्वी मूल्याच्या दृष्टीने इतर सर्व पृथ्वींहून सर्वश्रेष्ठ आहे. कारण की हे संदेष्टे, प्रेषित, संत–महात्मे आणि सदाचारी लोकांचे स्थळ आहे.

**२) अर्ज़ुल ईबादात – ईश्वरनिष्ठांची पृथ्वी**

रंगांमध्ये हे एखाद्या पाचुसारखे आहे. ईश्वरामध्ये निष्ठा आणि श्रद्धा ठेवणारे यक्ष, किन्नर ('जिन्न') याचे निवासी आहेत. त्यांची रात्र आमचा दिवस असतो, आणि त्यांचा दिवस आमची रात्र असते. आमच्या पृथ्वीवर सूर्यास्त झाल्यानंतर ते तीवर प्रकट होतात आणि लोकांच्या बालकांच्या प्रेमात पडतात. अधिकांश यक्ष–किन्नर हे गूढवादी साधनमार्गावरील शिष्यांचा हेवा करतात. त्यांना बेसावध अवस्थेत गाठून रसातळास पोहोचवतात. अब्दुल करीम जीली यांनी अशा काही सूफींचे दृष्टांत नोंदवले आहेत की जे त्यांच्या गुलामगिरीत जखडले जाऊन इतके मूक–बधिर होऊन गेले की जिन्नशिवाय इतरांच्या मुखांतून निघालेली ईश्वरवाणी ना ते ऐकू शकत ना समजू शकत.

### ३) अर्जुल तबा – प्रकृतीची पृथ्वी

हिचे रंग केशरी–पिवळे आहे. हिच्यावर श्रद्धाहीन यक्ष–किन्नर राहतात. ते मानवजातीमध्ये मानवी आकारात व्यक्त होतात. ते मानवास ईश्वराच्या भक्तीपासून परावृत्त करतात.

### ४) अर्जुल शह्व – वासनेचे जग

हिचे रंग रक्तासारखे लाल आहे. नाना प्रकारची पिशाच्चे येथे राहतात. ही सर्व इब्लीसाच्या आत्म्याची अपत्ये आहेत.

### ५) अर्जुल तुग़यान – अमर्याद पृथ्वी

ही नीळ रंगाची पृथ्वी आहे. हिच्यामध्ये शक्तिशाली यक्ष–किन्नर (जिन्न) आणि पिशाच्च राहतात. यांचे काम अपराध्यांकरवी मोठमोठाली पापकर्मे करवून घेण्याचे आहे. अपराध घडवून आणण्याशिवाय यांना दुसरे कामच नाही. हे सर्व नेमकी उलटी कामे करतात. यांना या म्हटले तर ते निघून जातात. फसवेगिरीच्या कामामध्ये हे सर्व शैतानांमध्ये सर्वात जास्त शक्तिशाली आहेत. मानवजातीवर हे भयाच्या (भीतीच्या) बळाचे अधिकार गाजवतात. त्यांना यांचा विरोध करणे शक्य नाही.

### ६) अर्जुल इल्हाद – अधर्माची पृथ्वी

घोर अंध:कारमय रात्रीसारखा हिचा रंग काळा आहे. हे 'मारिद' नावाचे सर्वात वाईट व बंडखोर यक्ष–किन्नर (जिन्न) यांचे निवासस्थान आहे. यामध्ये उद्दंड यक्ष आणि ईशभक्तांचे कोणतेच आदेश न जुमानणारे यक्ष राहतात.

स्वाभाविक गुणधर्मानुसार जिन्नां (यक्ष–किन्नरां)चे चार प्रकार संभवतात. (१) आधिभौतिक, (२) अग्निमय, (३) वायवीय आणि (४) पार्थिव.

आधिभौतिक यक्ष आत्म्याच्या जगापासून बाहेर येत नाहीत. यांच्यावर सामर्थ्याचे प्राबल्य असते आणि ते शक्तीमध्ये फार मजबूत असतात. देवदूतांशी प्रबळ साम्यामुळे त्यांना हे नामाभिधान प्राप्त झाले आहे. आणि ही गोष्ट त्यांच्या स्वाभाविक कर्मांवर आत्मिक–आध्यात्मिक कर्मांच्या प्राबल्यामुळे आहे. फक्त वासनात्मक विचारांमध्ये यांचे प्रकटीकरण होते. ते दिसत नाहीत. मात्र संत–महात्मे यांना पाहू शकतात. अग्निमय यक्षांची स्थिती अशी आहे की ते संभवत: आध्यात्मिक जगापासून निघतात आणि प्रत्येक परिस्थितीत ते अनेक प्रकारे प्रकट होतात. बहुतांश प्रतिकृती जग वा सादृश्य जगामध्ये मानवास भेटण्याचा योग येतो. मग ते त्याच्याकडून वाटेल ते काम काढून घेतात. त्यांची फसवेगिरी मोठी जबरदस्त असते. त्यांपैकी काही असे आहेत की ते माणसास एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी आणून सोडतात. आणि काही असे आहेत की ते माणसासोबत कायम असतात. म्हणून जोपर्यंत ते त्यांच्यासोबत असतात तोपर्यंत पाहणारा हा बेहोश पडलेला असतो. वायवाय (वायूमय) यक्षांची अशी स्थिती आहे की ते मानवाच्या आत्म्यासमोर येऊन संवेदनाच्या स्वरूपात दिसू लागतात. पाहणारास त्यांचे चेहरे दिसू लागतात. मग ते बेहोश (अचेतन) होऊन जातात. आणि पार्थिव यक्षांची अशी स्थिती आहे की ते माणसास शंकेमध्ये गुरफटतात आणि ते आपल्या मातीपासून धुळीने माखतात. हे शक्ती आणि फसवणुकीमध्ये अत्यंत दुर्बळ असतात.

### ७) अर्ज़ुल शक़ावत – दुर्दशा–विपत्तीचे प्रांत

ही नरकभूमी ('जहन्नुम') आहे. ही स्वभावाच्या अधोगतीपासून निर्माण केली गेलेली आहे. यामध्ये सर्प आणि विंचू राहतात. यातनेचे काही देवदूत पण येथे आहेत. याचे सर्प आणि विंचू हे पर्वताच्या सुळक्यासारखे आहेत. आणि हे स्तर नरकाला जाऊन मिळालेले आहे. परमेश्वराने या गोष्टी पृथ्वीतळावर यासाठी निर्माण केल्या आहेत की इहलोकामध्येच नरकाच्या स्वरूपाची कल्पना यावी.

सप्त आकाश व सप्त पृथ्वीप्रमाणेच सप्त पाताळाची पण संकल्पना सूफ़ी तत्त्वज्ञानामध्ये परोक्षपणे गृहीत आहे. सप्त पाताळ याप्रमाणे आहेत – (१) अतल, (२) वितल, (३) सुतल, (४) रसातळ, (५) तलातळ, (६) महातल आणि (७) पाताळ.

सप्त आकाश व सप्त पृथ्वीसंबंधी पवित्र कुराणात असा उल्लेख सापडतो – ''अल्लाहच तर होय की, ज्याने (एकावर एक अशी) सात आकाशे निर्माण केली व तशाच पृथ्वी (earth) देखील.'' ६५:१२

### २९) इब्लीस (शैतान)

इब्लीस हे एका यक्ष–किन्नरा ('जिन्न')चे नाव आहे. हा अगोदर अल्लाहचा फार मोठा निष्ठावान भक्त होता. त्याने परमेश्वराची अविरतपणे कित्येक हजार वर्षे भक्ती केली. जेव्हा परमेश्वराने मातीचा पुतळा 'आदम' याच्यापुढे नतमस्तक होण्याचे आदेश सर्व देवदूतांना दिले, तेव्हा सर्व देवदूत परमेश्वराच्या आदेशाबरहुकूम आदमपुढे नतमस्तक झाले. मात्र इब्लीसला आपल्या श्रेष्ठत्वाचा गर्व झाला. तो घमेंडीत आला. त्याने परमेश्वराची अवज्ञा केली व नतमस्तक होण्यास साफ नकार दिला. आपल्या उद्धटपणामुळे तो अल्लाहकडून धिकृत झाला. आणि त्यावर धिक्काराचा अभिशाप प्रलय दिवसापर्यंत लागू झाला. याचे दुसरे नाव शैतान असे आहे. मानवास पथभ्रष्ट करणे हे त्याचे आवडते काम आहे. तसे आव्हान त्याने परमेश्वरास दिलेही पण आहे. वासना हे त्याचे अमोघ अस्त्र आहे.

### इब्लीसची तारांबळ (गोंधळ) [तलबीस–ए–इब्लीस]

सर्वश्रेष्ठ परमेश्वराने मुहम्मदीय आत्म्यास ('नफ़्स–ए–मुहम्मदिया') आपल्या सत्तेपासून ('ज़ात') निर्माण केले आहे, आणि परमेश्वराची सत्ता ही व्यत्यासांची (परस्पर विरोधी गुणांची) समष्टी आहे. म्हणून दोन परस्पर विरोधी शाखा त्यापासून उद्‌भवल्या. परमेश्वराने मुहम्मदीय आत्म्यापासून (१) सौंदर्य, प्रकाश आणि मार्गदर्शन वा अग्रेसरता यापासून उच्च देवदूत आणि (२) प्रताप, तमस आणि पथभ्रष्टता यापासून इब्लीस आणि त्याचे अनुयायी यांना निर्माण केले. **इब्लीसचे** नाव **इज़ाज़ील** होते. विश्व निर्माण होण्याअगोदर त्याने हजारो वर्षे सर्वश्रेष्ठ परमेश्वराची भक्ती–उपासना केली. त्या वेळी परमेश्वराने त्याला बजावले होते की हे इज़ाज़ील! माझ्याव्यतिरिक्त कुणाचीच उपासना करू नकोस. मग नंतर त्याने जेव्हा आदमला निर्माण केले आणि देवदूतांना आदेश दिला की त्यांनी आदमपुढे नतमस्तक व्हावे, तेव्हा इब्लीस हा साशंक झाला. त्याने विचार केला की जर मी आदमपुढे नतमस्तक होऊन जाईन तर मी परमेश्वराव्यतिरिक्ताची उपासना केल्यासारखे होईल. त्याला ही गोष्ट उमगली नाही की ज्याने प्रभू आदेशानुसार प्रणिपात केला, मग भलेही तो ईश्वरेतराला असेल, तो प्रणिपात

साक्षात ईश्वरासाठीच असतो. तथापि साशंकतेने त्याला संभ्रमावस्थेत गुरफटले. परिणामी त्याची तारांबळ झाली व गोंधळ उडाला. याचे रूपांतर अवज्ञेत झाले. याच गोंधळामध्ये गुरफटल्याकारणाने त्याचे नाव इब्लीस पडले. अरबी भाषेमध्ये गोंधळ, तारांबळसाठी 'तलबीस' हा शब्द वापरला जातो. तारांबळ उडालेला वा गोंधळलेल्यास 'इब्लीस' असे शब्द-रूपांतर होते. अरबी भाषेच्या वैशिष्ट्यामुळे अर्थ चफकल बसतो. मग इत:पर इज़ाज़ीलचे 'इब्लीस' हेच नाव रूढ झाले. 'इब्लीस'चे नातेदर्शक नाम अबू मर्र: हे होते.

या संदर्भात पवित्र कुराणाचे शब्द असे आहेत - ''आणि क्षणिक (आठवण करा) जेव्हा आम्ही देवदूतांना आदेश दिला की, आदमपुढे नतमस्तक व्हा. तेव्हा सर्वजण नतमस्तक झाले. परंतु इब्लीस झाला नाही. त्याने नाकारले व अहंकार केला आणि अवज्ञा करणारांपैकी झाला.'' २:३४. अल्लाहने म्हटले, ''हे इब्लीस! ज्याला (म्हणजेच मानवाला) मी माझ्या दोन्ही हातांनी बनवले आहे, तर त्याच्यासमोर नतमस्तक न होण्यास तुझ्यासाठी कोणती गोष्ट कारणीभूत ठरली? काय तू फार घमेंड करत आहेस की तू मोठेपणाचा दावा करणारापैकी आहेस? ३८:७५ या श्लोकांशाची मूळ अरबी संहिता अशी आहे - 'कुन्त मिनल्आलीन' अर्थात 'अथवा तू दर्जामध्ये (माणसापेक्षा) श्रेष्ठ (मोठा) आहेस?' आणि 'आलीन' ते देवदूत आहेत की ज्यांना परमेश्वराच्या प्रकाशापासून निर्माण करण्यात आले आहे. उदाहरणार्थ 'नून' व त्यासारखे देवदूत. आणि बाकीचे देवदूत हे मूलतत्त्वांपासून निर्माण केले गेले आहेत आणि यांनाच आदमपुढे नतमस्तक होण्याचा आदेश दिला गेला होता. परमेश्वराच्या आदेशाच्या उत्तरस्वरूपात इब्लीस म्हणाला, ''मी त्या (आदम)हून श्रेष्ठ आहे. तू मला अग्नीपासून निर्माण केलेस आणि त्याला (क्षुद्र) मातीपासून बनवलेस.'' ७:१२. इब्लीसचे सदरहू उत्तर हे या गोष्टीचे प्रमाण आहे की ईश्वरी दरबाराचे शिष्टाचार त्याला अवगत होते. प्रश्नाचे मर्म आणि त्याचे यथायोग्य उत्तर तो जाणत होता. याचसाठी ईश्वराने त्याला नकाराचे कारण विचारले नाही. जर असे असते तर प्रश्नाचे स्वरूप असे असते की तू त्याला प्रणिपात करण्यापासून का (बरे) थांबलास? की ज्याला मी आपल्या हातांनी बनवले आहे. परंतु परमेश्वरास नकाराची वास्तविकता अभिप्रेत होती, नकाराचे कारण नव्हे. म्हणून इब्लीसने पण या आदेशाच्या उत्तरादाखल म्हटले की (मी) त्याच्याहून श्रेष्ठ आहे. अग्नी उर्ध्वमुखी असतो, तर माती (मृत्तिका) ही अधोमुखी असते. अग्नीच्या ज्वाला या नेहमी वर उफाळतात, तर मातीस वर फेकल्यास ती नेहमी खाली पृथ्वीतळावर येते. वर जाणारा हा खाली पडणारापेक्षा अर्थातच श्रेष्ठ गणला जातो. याच न्यायाने इब्लीसने म्हटले की मी त्याच्यापेक्षा श्रेष्ठ आहे. अग्नी आणि मातीचे उपरोक्त गुणधर्म हे ईश्वरी नैसर्गिक नियमानुसार असल्यामुळे त्या उलट क्रिया कधीच घडत नाही. ही एक अनुभवसिद्ध गोष्ट आहे. उदाहरणार्थ, जर आपण जळती मेणबत्ती उलट धरली तरी सुद्धा तिच्या ज्वाला वरच उफाळतात, मेणबत्ती खालच्या बाजूला केल्यामुळे ज्वाला खाली जात नाहीत. तसेच मूठभर माती हातात घेऊन वर आकाशात फेकल्यास तिची धूळ वर न जाता, पुन्हा खालीच जमिनीवर येऊन आपटते. या निसर्ग-नियमाची जाण ठेवूनच इब्लीसने म्हटले होते की मी त्या (आदम म्हणजेच माणसा)पेक्षा श्रेष्ठ आहे. तू मला अग्नीपासून निर्माण केले आहेस, तर त्याला (क्षुल्लक) मातीपासून. त्याने या उत्तरामध्ये आणखी काही जोडले नाही. कारण की तो जाणत होता की परमेश्वरास हे गूज माहीत आहे. शिवाय त्याला हेही माहीत होते की हे आकुंचनाचे ('क़ब्ज') स्थळ आहे, प्रसरणा ('बस्त')चे नव्हे. जर प्रसरणाचे स्थळ असते तर या सोबत तो असे सांगून गेला असता की माझा तुझ्या या आदेशावर दृढ विश्वास आहे की

ज्यामध्ये तू मला आदेश दिला होतास की माझ्या व्यतिरिक्त अन्य कुणासमोर नतमस्तक होऊ नकोस; परंतु जेव्हा त्याने हे पाहिले की ही वेळ परमेश्वराच्या प्रकोपाची आहे, तेव्हा त्याने शिष्टता पाळली आणि या प्रकोपामुळे त्याने हे पण ओळखले की खरोखर नतमस्तक होण्याचा आदेश संदेहास्पद आहे. कारण की परमेश्वराने त्याला 'इब्लीस' या नावाने हाक मारली होती. (संबोधन केले होते.) 'इब्लीस' हा शब्द 'इल्तबास' अर्थातच तारांबळ, गोंधळ या शब्दापासून व्युत्पन्न आहे. याचा अर्थ शंकाकुशंका, संदेह असा आहे. याच्या अगोदर त्याला या नावाने संबोधित केले गेले नव्हते. अशा प्रकारे हे प्रमाणित होते की तो या आदेशापासून मुक्त झालेला आहे. यामुळे तो ना रडला, ना त्याने हाय-हाय केली, ना त्याला पश्चाताप झाला; आणि ना लज्जित झाला, ना क्षमायाचना केली. कारण की तो हे पक्के ओळखून होता की परमेश्वर तेच करतो, ज्याचा तो संकल्प करतो. आणि तो त्याच गोष्टीचा संकल्प करतो जी नैसर्गिक नियमांची गरज असते. कारण परमेश्वराच्या नियमामध्ये कधीच बदल होत नसतो. नंतर परमेश्वराने त्याला धिक्कारून आपल्या जवळच्या स्थानापासून दूरवर शापित अवस्थेमध्ये फेकून दिले. आणि म्हटले की चालता हो, लांब जा. तू ईश्वरी दरबारापासून बहिष्कृत केला गेलेला आहे. तू रसातळाकडे चालता हो. 'निरजीम' म्हणजेच उच्च स्थानापासून निम्न स्थानाकडे कोलमडणे. 'रजम' या शब्दाचा अर्थ आहे एखाद्या वस्तूस (गोष्टीस) वरून खाली फेकणे अर्थातच अध:पतन. आणि परमेश्वराने इब्लीसला अभिशाप दिला की तुजवर प्रलयदिवसापर्यंत धिक्कार आहे. 'मलऊन' म्हणजेच धिकृत. आणि 'लानत' या शब्दाचा अर्थ आहे, लांब फेकणे आणि भयभीत करणे. भावार्थ आहे लांछन; (स्वर्गापासून) बहिष्कृत.

**इब्लीसचा धिक्कार (लांछन)**

परमेश्वराची अवज्ञा केल्यामुळे इब्लीस कशा प्रकारे धिक्कारला गेला व शापग्रस्त झाला, हे पवित्र कुराणच्या शब्दांमध्येच पहाण्यासारखे आहे. तो पुढीलप्रमाणे लांछनास्पद झाला –

''आणि आम्हीच, काळ्या मातीचा घाणलेला गारा, जो (सुकून) खणखणा बोलू लागतो त्यांतून 'आदम'ला निर्माण केले. आणि आम्ही जिन्नां (किन्नरांच्या कुलपती)स (मनुष्याच्याही)पूर्वी सूक्ष्म अग्नीतून निर्माण करून चुकलो होतो. आणि (हे पैगंबरा! तो वेळ आठवण कर की) जेव्हा तुझ्या पालनकर्त्याने देवदूतांस सांगितले की मी काळ्या मातीचा कुजलेला गारा जो (सुकून) खणखणा बोलू लागतो, त्यांतून एक मनुष्य निर्माण करणार आहे. तर जेव्हा मी त्याला पूर्णपणे बनवून चुकेन व त्यात आपला (स्वनिर्मित) आत्मा फुंकेन, तेव्हा तुम्ही त्याच्यापुढे साष्टांग नमस्कार घालीत (भराभर पालथे) पडा. सारांश, दरोबस्त साऱ्याच्या साऱ्या देवदूतांनी (आदमपुढे) साष्टांग नमस्कार घातला. परंतु 'इब्लीस' याने साष्टांग नमस्कार घालणारांबरोबर सामील होण्याचे नाकारले. (त्यावर परमेश्वराने) म्हटले की हे इब्लीसा! तुला काय (कारण) घडले की तू साष्टांग नमस्कार घालणारांत सामील होत नाहीस. तो बोलला, मी असा नव्हे की ज्या मनुष्यास तू, काळ्या मातीचा कुजलेला गारा जो (सुकून) खणखणा बोलू लागतो त्यातून निर्माण केलेस त्याला मी साष्टांग नमस्कार घालीन. (परमेश्वराने) सांगितले (की साष्टांग नमस्कार घालीत नाहीस) तर तू या (स्वर्गा)तून निघ; नाहीतर तू धोंडमार करून पिटाळला जाशील. आणि निर्णयाच्या दिवसापर्यंत तुजवर शाप(वृष्टी) होईल. (शैतान) म्हणाला की हे

माझ्या पालनकर्त्या! (असो,) ज्या दिवशी (मनुष्ये पुनरुत्थानात पुन्हा) उठवून उभे केले जातील त्या दिवसापर्यंत तू मला अवकाश (उसंत) दे. (परमेश्वराने) म्हटले की (बरे,) तू अवकाश दिलेल्यापैकी आहेस. (व तोही एका) नियमित काळाच्या (म्हणजे पुनरुत्थानाच्या) दिवसापर्यंतचाच. (शैतान) म्हणाला, हे माझ्या पालनकर्त्या! तू जशी (मानवाखातर) माझी वाट मारलीस, (तसेच) मी ही पृथ्वीत त्यांना (संसाराचे) उत्तम चित्र दाखवून या सर्वांस बहकवीन तरच सई. परंतु यांच्यातून तुझे निस्सीम निवडक सेवक मात्र (माझ्या बहकवण्यात येणार नाहीत). (परमेश्वराने बजावले की हाच (निस्सीम भक्तीचा) एक सरळ मार्ग होय (की जो) थेट मजपर्यंत (येऊन पोहोचतो). (जे) माझे सेवक (होत). त्यांच्यावर तर तुझा कोणाही तऱ्हेचा जोर (सत्ता) नाही; पण बहकलेल्यांपैकी जो कोणी तुझ्या नादी लागेल (तर लागो). आणि अर्थात अशा सर्व लोकांसाठी (आमच्या येथून शेवटचे) अभिवचन नरकाचेच होय. त्याची सात द्वारे असतील; प्रत्येक द्वारां (तून दाखल होण्या)साठी नरकवासी लोकांच्या टोळ्या विभागलेल्या असतील.'' १५:२६-४४.

ईश्वरी मर्यादेस कायम करण्यासाठी जे वाईट स्वभावापासून मुक्त झाले अशा सदाचरणी भक्तांवर इब्लीसची सत्ता मुळीच चालणार नाही. कारण परमेश्वराने त्यांना आपल्याकडे आकर्षित करून वाईट स्वभावापासून मुक्त केले. म्हणजेच आपली सत्कर्मे आणि आपले सदाचरण यामुळे त्यांना मोक्षप्राप्ती झाली. मानवास बहकवून सोडण्याचे जेव्हा इब्लीसने परमेश्वरास आव्हान दिले तेव्हा या आव्हानास प्रत्युत्तर म्हणून परमेश्वर म्हणतो की 'हे सत्य आहे, आणि मी पण सत्यच म्हणतो की मी तुझ्यासमेत तुझ्या अनुयायांनी नरक भरून टाकीन.' असे म्हणून परमेश्वराने इब्लीसला जशास तसे उत्तर दिले. याचे कारण असे आहे की दुष्ट स्वभावामुळे इब्लीस हा त्यांच्यावर कुरघोडी करतो आणि त्यांना बहकवून सोडण्याची शपथ घेतली (खाल्ली). हीच गोष्ट त्यांना नरकाकडे खेचेल. अपितु हेच साक्षात नरक आहे. कारण की प्रकोपी दुष्ट स्वभाव एक प्रकारचा अग्नी असतो. यास परमेश्वर उपद्रवी लोकांच्या अंत:करणावर आच्छादित करतो. म्हणून कोणीच (भला माणूस) इब्लीसचे अनुसरण करणार नाही. त्याचे अनुसरण केवळ वाईट स्वभावाचे लोकच करतात.

सर्वश्रेष्ठ अल्लाहची एकूण ९९ अग्रगण्य शुभनामे असल्याचे बहुतांश विद्वान मान्य करतात. यांना प्रतिस्पर्धी म्हणून पथभ्रष्ट करणारी इब्लीसकडे पण तेवढीच म्हणजेच ९९ दुर्गुण आहेत. त्यापैकी सप्त दैवी गुणांस समांतर अशी इब्लीसची पण दुर्गुणांची सात प्रमुख शस्त्रे आहेत. या शस्त्रांच्या बळावर तो मोठमोठ्या साधकांना देखील त्यांच्या साधनेपासून विचलित करतो व सर्वसामान्यांना पथभ्रष्ट करतो. त्याच्या दुर्गुणांची सात साधने याप्रमाणे आहेत-

(१) जगाची मायावी भुरळ, (२) दुष्ट स्वभावाची प्रबळ पकड, (३) कु-विचारांचा संकल्प, (४) अपकर्मे, (५) फसवे ज्ञान, (६) वाईट सवयींचे दास (गुलाम) बनवणे आणि (७) छद्म दिव्य बोध. इब्लीसच्या या फसव्या पिंजऱ्यापासून सावधगिरी बाळगण्याचे आव्हान परमेश्वराने मानवास करून त्याने त्याला मानवाचा शत्रू म्हणून घोषित केले आहे. 'बोलून-चालून शैतान हा तुम्हा मानवांचा शत्रू आहे, आणि त्याला शत्रू म्हणून ओळखा (समजा).' ''शैतान लोकांदरम्यान विसंवाद निर्माण करण्यासाठी नेहमी तयार असतो. कारण शैतान मानवासाठी शत्रूशिवाय दुसरा कोणीच नाही.'' १७:५३. ''शैतान जे वायदे करतो, ते फसवणुकीशिवाय दुसरे काहीच नाही.'' १७:६४ शैतान साथी कोणाचा? ''जो कोणी परमदयाळू

(परमेश्वरा)च्या स्मरणाकडून तोंड चुकवत असतो त्याच्यावर आम्ही एक शैतान तैनात करून ठेवतो; व तो त्याच्या सोबती (होऊन) राहतो. आणि शैतान हे पाप्यांस (परमेश्वराच्या) मार्गापासून अडथळा करत राहतात. तरी देखील पापी (आपल्या ठिकाणी) अशी कल्पना करतात की ते सरळ मार्गावरच होत, येथपर्यंत की जेव्हा पापी (पुनरुत्थानाचे दिवशी) आपल्या हुजुरात हजर होईल. तेव्हा तो (आपला सोबती शैतान याकडे पाहून) म्हणेल की अरेरे! तुमच्या व माझ्या दरम्यान पूर्वपश्चिमचा पल्ला असता तर बरे होते! तर शैतान हा ही माणसाचा किती तरी वाईट सोबती होय!'' ४३:३६-३८.

**शैतान कुणास ग्रासतो?**

''मी तुम्हाला सांगू, शैतान कुणावर झेप घेतात? ते झेप घेतात प्रत्येक लबाड (व पापी (चांडाळा)वर की शैतान (कर्णोपकर्णी) ऐकलेल्या गोष्टी (त्याच्यात) भरवतात आणि त्यांच्यात बहुतेक (तर निव्वळ) लबाडच असतात. आणि कवी! त्यांच्यामागे तर तीच माणसे जातात, जी पथभ्रष्ट आहेत (हे वाचक – श्रोत्या!) तू का या गोष्टीकडे नजर केली नाहीस की हे (कवी काल्पनिक गोष्टींच्या) प्रत्येक दऱ्याखोऱ्यात हैराण होऊन भटकतात. आणि हे की ते जे काही बोलतात, ते करत नाहीत.'' २६:२२१-२६

**३०) देवदूत (मलाईका-फ़रिश्ते)**

सर्वसामान्य माणसासाठी देवदूत, परोक्ष-इंद्रियातीत म्हणून आहेत. ते आमच्या ज्ञानेंद्रियांच्या आवाक्यापलिकडचे आहेत. म्हणून त्यांची वास्तवता आम्ही समजू शकत नाही. देवदूतांपैकी काही जण संदेशहरांपर्यंत अल्लाहचे प्र-ज्ञान ('वही') पोहचवण्याचे माध्यम राहिले आहेत. दिव्य कुरआनातील प्रतिपादने आणि प्रेषित मुहम्मद यांनी सांगितलेल्या स्पष्टीकरणानुसार देवदूतांचा दर्जा व त्यांचे गुण पुढीलप्रमाणे आहेत –

१) देवदूत, सर्वोच्च अल्लाहची एक प्रतिष्ठित, उच्च दर्जा बाळगणारी व निकटवर्ती अशी निर्मिती आहे. ते त्याचे सन्मानीय सेवक आहेत. ते केवळ त्याच्या आज्ञेनुसार काम करतात. ते त्याच्या परवानगीशिवाय मध्यस्थी करत नाहीत. ते अल्लाहप्रति सदैव आदरयुक्त भय बाळगून असतात.

२) ते सदैव सर्वोच्च अल्लाहच्या आज्ञांचे पूर्णपणे पालन करतात. ते त्याच्या मर्जीचे अनुकरण करण्यात लागलेले असतात. व्यवहारत: ते कधीच ईश्वराची अवज्ञा करत नाहीत व पूर्णपणे आज्ञांकित राहणे हाच त्यांचा बाणा आहे. सर्वोच्च अल्लाहच्या स्तुती व पावित्र्य गायनात सदैव मग्न असतात व त्यांच्यावर नेहमी ईशभय पसरलेले असते.

३) देवदूतांना असामान्य आणि अमाप कुवती दिल्या गेल्या आहेत. त्यांची संख्यादेखील अगणित किंबहुना कल्पनेपलीकडची आहे.

४) सृष्टीत त्यांचा दर्जा, शासकीय कर्मचाऱ्यांसमान आहे. ईश्वरी आज्ञा व सूचनेनुसार ते या संपूर्ण विश्वव्यवस्थेचा कारभार चालवत आहेत. आमच्या या जगापासून ते सृष्टीच्या अंतिम टोकापर्यंत ज्या आज्ञा व योजना राबवल्या जातात, याच देवदूतांद्वारे राबवल्या जातात. अशा प्रकारे की त्यांचे स्वत:चे मत व इच्छेला त्याबाबतीत काही एक वाव नसतो. किंबहुना त्यांना आपल्या स्वामीकडून जी आज्ञा मिळालेली असते, केवळ

तिचीच ते अंमलबजावणी करतात. जी महान कर्तव्ये त्यांच्या सुपूर्त केली जातात, ती यथायोग्य प्रकारे पार पाडण्याची त्यांना पुरेपूर शक्ती दिली गेली आहे.

५) श्रेष्ठतेच्या दृष्टीने त्यांचे असंख्य वर्ग आहेत. त्याचे ज्ञान अल्लाहशिवाय कुणालाच नाही. तथापि मूलतः त्यांचे दोन वर्ग आहेत एक सामान्यजनांचा वर्ग, दुसरा विशेषजनांचा वर्ग. विशेषजनांच्या वर्गाला दिव्य कुरआनात 'रूह' या एका विशिष्ट नावाने संबोधले गेले आहे. यांना सामान्य देवदूतांपेक्षा उच्च दर्जा प्राप्त असतो व सर्वोच्च अल्लाहच्या ते अधिक जवळ राहतात. ईश आदेशांनी सर्वप्रथम तेच उपकृत होतात. त्यानंतर ते आदेश घेऊन खालच्या वर्गातील त्या देवदूतांप्रत पोहचते करतात, ज्यांच्या विभागाशी त्या आदेशांचा संबंध असतो. या विशेष वर्गाच्या म्होरक्याचे नाव 'जिब्रईल' असे आहे. प्रेषितापर्यंत सर्वोच्च अल्लाहचे प्र-ज्ञान ('वही') पोहोचवण्याचे महान कर्तव्य जो पार पाडत राहिला आहे व ज्याने प्रेषित मुहम्मद स. यांच्या हृदयावर कुरआन उतरवले होते, तो हाच देवदूत आहे.

जिब्रईल, मीकाईल, इस्राफ़ील व इज्राईल हे सर्व प्रमुख चार देवदूत मानले गेले आहेत. ते अल्लाहचे निकटवर्ती देवदूत आहेत. सर्व आकाशे आणि पृथ्वीमध्ये असंख्य देवदूत वेगवेगळ्या कामांप्रती नियुक्त आहेत. आकाश आणि पृथ्वीवरील सर्व व्यवस्था सर्वोच्च परमेश्वराने देवदूतांवर सोपवली आहे. ईश्वरी आदेशानुसार ते सर्व व्यवस्था लावत असतात. उपरोक्त चार सर्वप्रमुख देवदूतांचे कार्यविभाजन आणि कार्यभार पुढीलप्रमाणे आहे -

**१) जिब्रईल :** हे सर्वप्रमुख देवदूत सर्वोच्च परमेश्वराचे संदेश, आदेश आणि ग्रंथ प्रेषितांपर्यंत पोहोचवत; काही वेळेस संदेशहरच्या मदतीसाठी धावत आणि परमेश्वर व प्रेषितांच्या शत्रूशी लढा देण्यासाठी पाठवले जात. काही वेळेस परमेश्वराच्या अवज्ञाकारी सेवकांस शिक्षा करण्यासाठी परमेश्वराने यांना पाठवले.

**२) मीकाईल :** सर्व सजीवांना उपजीविका पोहोचवणे, वर्षावृष्टी करणे इत्यादी कामांसाठी हे नियुक्त आहेत. असंख्य देवदूत यांच्या आधिपत्याखाली कार्यरत आहेत. काही मेघव्यवस्थेसाठी नियुक्त आहेत, तर काही हवेच्या व्यवस्थेसाठी. काही नदी, नाले, जलप्रवाह आणि तलावांवर देखरेख ठेवण्यासाठी नेमण्यात आले आहेत आणि ही सर्व कामे ते परमेश्वराच्या आदेशाबरहुकूम संपन्न करतात.

**३) इस्राफ़ील :** हे प्रलयाच्या वेळी शिंग फुंकतील. यावरून प्रलयकाळाची पूर्वसूचना मिळते. ही प्रलय सुरू होण्याची ग्वाही आहे.

**४) इज्राईल :** हे सजीवांचे प्राण हरण करण्यासाठी नियुक्त आहेत. यांच्या अधीन पण असंख्य देवदूत कार्यरत आहेत. सदाचारी माणसांचे प्राण हरण करणारे देवदूत वेगळे आहेत, आणि दुराचारी माणसांचे प्राण हरण करणारे वेगळे.

या व्यतिरिक्त देवदूतांची काही कामे अशी आहेत -

१) प्रत्येक माणसासोबत दोन देवदूत असतात. एक देवदूत त्याची सत्कर्मे नोंदवितो. तर दुसरा दुष्कर्मे. या देवदूतांना 'करामन् कातिबैन' असे म्हणतात. 'करामन् कातिबैन' ही शब्दलेखन पद्धती अरबी भाषेच्या स्वभावानुसार आहे. भारतीय भाषांच्या परंपरेनुसार याचे लेखन 'कातिबैन कराम' असे असावयास हवे होते.

२) काही देवदूत विपत्ती (आपत्ती) व संकटांपासून मानवास संरक्षण प्रदान करण्यासाठी नियुक्त आहेत. बालके, वृद्ध, अशक्त आणि ज्या लोकांना परमेश्वर सुरक्षित ठेवू इच्छितो, या सर्वांचे ते संरक्षण करतात.

३) काही देवदूत मृत्यूनंतर कबरीमध्ये मृतास प्रश्न विचारण्यासाठी नियुक्त आहेत. प्रत्येक माणसाच्या थडग्यामध्ये दोन देवदूत येतात. त्यांना 'मुनकर' आणि 'नकीर' असे म्हणतात.

४) काही देवदूत या कामासाठी नियुक्त आहेत की जगामध्ये भ्रमंती करत राहावे आणि जेथे कोठे परमेश्वराचे स्मरण होत असेल, प्रवचन होत असेल, पवित्र कुराण पठण होत असेल, प्रेषितांवर स्वस्तिश्री होत असेल, धर्मज्ञानाचे प्रशिक्षण दिले जात असेल अशा सभांमध्ये हजर राहून त्यांमध्ये उपस्थित असणाऱ्या लोकांच्या सहभागित्वाची ग्वाही परमेश्वराजवळ देणे, हे त्यांचे प्रमुख काम असते.

जगामध्ये जे देवदूत कार्यरत आहेत, सकाळ-संध्याकाळ त्यांची बदली होत असते. प्रात:काळच्या उपासने (नमाज)च्या वेळी रात्री कार्यरत असणारे देवदूत आकाशांवर प्रयाण करतात आणि दिवसा काम करणारे हजर होतात. आणि सायंकालीन उपासने (नमाज)नंतर दिवसा काम करणारे देवदूत निघून जातात. रात्री काम करणारे देवदूत हजर होतात.

५) काही देवदूत स्वर्गाच्या व्यवस्थेसाठी आणि तेथील कारभार पाहण्यासाठी नेमले गेलेले आहेत.

६) काही देवदूत नरकाच्या व्यवस्थेसाठी नियुक्त आहेत.

७) काही देवदूत सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे राजसिंहासन ('अर्श') उचलून धरणारे आहेत.

८) काही देवदूत सर्वोच्च परमेश्वराचे गुणगान, पावित्र्यगान आणि उपासनेमध्ये व्यस्त असतात.

**३१) धर्माज्ञा पत्रावली (शास्त्रलेख) आणि दिव्य ग्रंथ (सहीफ़े व मुक़द्दस किताबें)**

सामी धर्मपरंपरेनुसार चार दैवी ग्रंथ अवतरित झाले असल्याचे मान्य करण्यात येते. ते चार दैवी ग्रंथ मान्य करणाऱ्यांना 'ग्रंथधारक लोक' ('अहल-ए-किताब') म्हणून संबोधण्यात येते. ते चार दिव्य ग्रंथ आहेत- (१) तौरात, (२) इंजील, (३) ज़बूर आणि (४) कुरआन. या ग्रंथ प्रकटनापूर्वी सर्वश्रेष्ठ परमेश्वराने काही प्रेषितांवर धर्माज्ञा पत्रावली अवतरित केल्या होत्या. आता पत्रावलींची एकूण संख्या शंभर (१००) असल्याचे मान्य करण्यात येते आणि ती वेळोवेळी एकूण चार प्रेषितांवर प्रकट झाल्याचे समजते. त्या पत्रावली पुढीलप्रमाणे आहेत -

१) प्रेषित आदम वर दहा (१०) पत्रावली ('सहीफ़े') अवतरित झाल्या.

२) प्रेषित शीस वर पन्नास (५०) पत्रावली अवतरित झाल्या.

३) प्रेषित इद्रीस वर तीस (३०) पत्रावली अवतरित झाल्या, आणि

४) प्रेषित इब्राहीम यांच्यावर दहा (१०) पत्रावली अर्थात शास्त्रलेख अवतरित झाले.

अशा प्रकारे एकूण शंभर दैवी पत्रावली म्हणजे शास्त्रलेख अवतरित झाले आहेत.

संदेशहर व प्रेषित यांच्यावर सर्वश्रेष्ठ परमेश्वराकडून अवतरित झालेल्या ग्रंथांना दैवी ग्रंथ ('आसमानी कुतुब') म्हणून संबोधण्यात येते. हे ग्रंथ अपौरुषेय आहेत. यांची एकूण संख्या चार (४) आहे. ते पुढीलप्रमाणे आहेत -

१) प्रेषित मूसा यांच्यावर ‘तौरात’ हा दिव्य ग्रंथ अवतरित झाला आहे.

२) प्रेषित ईसा यांच्यावर ‘इंजील’ हा दिव्य ग्रंथ अवतरित झाला आहे.

३) प्रेषित दाऊद यांच्यावर ‘ज़बूर’ हा दिव्य ग्रंथ अवतरित झाला आहे. तर

४) शेवटचे संदेशहर मुहम्मद मुस्तफ़ा स. यांच्यावर ‘फ़ुर्क़ान’ अर्थात् पवित्र ‘कुरआन’ हा दिव्य ग्रंथ अवतरित झाला आहे.

अशा प्रकारे धर्माज्ञापत्रावली व दैवी ग्रंथ मिळून आतापर्यंत एकूण १०४ दिव्य ग्रंथांचे अवतरण झाले आहे. उपरोक्त प्रथम तीन दैवी ग्रंथांचा उल्लेख पवित्र कुरआनमध्ये असा आहे –

‘‘नि:संशय, आम्हीच **तौरात** (ग्रंथ) प्रकट केले, की त्यात (हर तऱ्हेची) बोधवचने व (विश्वासाचा) प्रकाश होय.’’ ५:४४. ‘‘आणि ह्या मागून ह्या (पैगंबरां)च्याच पदोपदी आम्ही मरयमचा पुत्र ईसा यास चालवले, की तो आपल्या (वेळी) पूर्वीपासूनच जे **तौरात** होते त्याचे सत्यत्व दर्शवत होता. आणि आम्ही त्याला **इंजील**ही दिले की त्यात (हर तऱ्हेचा) बोध व (सन्मार्ग) प्रकाश ही होत. आणि **तौरात** जे त्याच्या (प्रकटीकरण काळाचे) पूर्वीपासूनच (अस्तित्वात) होते त्याचे (हे **इंजील**) सत्यत्व दर्शवते व ते (स्वत:ही परमेश्वराला) भिऊन वागणाऱ्यांसाठी सन्मार्ग व बोध असे होय.’’ ५:४६ ‘‘आणि आम्ही दाऊदला **ज़बूर** (धर्मग्रंथ) दिला होता.’’ ४:१६३. ‘‘आणि आम्ही (पैगंबर) दाऊदला **‘ज़बूर’** (नावाचे) ग्रंथ प्रदान केले होते.’’ १७:५५. ‘‘(सत्याच्या स्पष्ट प्रमाणासाठी) आम्ही नूहला व इब्राहीमला (आमचे प्रतिनिधी) बनवून पाठवले होते. आणि त्याच्या वंशजांमध्ये संदेशवाहक बनवण्याचा व ग्रंथ प्रदान करण्याचा क्रम सुरू ठेवला होता. त्यांच्यापैकी काही सन्मार्ग लाभलेले होते, पण अनेक आज्ञापालन न करणारे होते. त्यांच्यानंतर त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून चालणारे आमचे (इतर) प्रेषित आम्ही पाठवले. (कालांतराने) आम्ही त्यांचेच अनुसरण करणारा (पैगंबर बनवून) मरियमपुत्र येशू मसीह यास पाठवले. आणि आम्ही त्यास **इंजील** हा ग्रंथ प्रदान केला होता.’’ ५७:२६–२७ ‘‘(हे पैगंबरा!) नि:संशय, आम्हीच तुला (वेळोवेळी) क्रमाक्रमाने **कुरआन** प्रकट केले आहे.’’ ७६:२३ ‘‘श्रद्धा ठेवणाऱ्यांसाठी हा (कुरआन) ग्रंथ मार्गदर्शन व कृपा बनून उतरला आहे.’’ १६:६४ ‘‘हा सकल जगांच्या पालनकर्त्याकडून अवतरित आहे.’’ ५६:८० ‘‘आम्ही या **कुरआन**ला उपदेशासाठी सुलभ साधन बनवले आहे.’’ ५४:४० ‘‘सर्व मानवजातीसाठी हा पूर्ण असा हितोपदेश आहे.’’ १४:५२ ‘‘लोकांना अंधाराच्या गर्तेतून काढून दिव्य प्रकाशाकडे आणणारा (हा) ग्रंथ आहे.’’ १४:१ ‘‘हे (कुराण) लोकांसाठी शहाणपणाच्या गोष्टींचा संग्रह होय; आणि जे लोक (याचा) निश्चय बाळगतात त्यांच्यासाठी (नखशिखांत) सद्बोध व कृपा होय.’’ ४५:२०. मात्र **‘कुरआन’** हा एकमेव असा दैवी ग्रंथ आहे की ज्यामध्ये आजतागायत काडीमात्राचा फरक झालेला नाही. त्याचे आणखी एक वैशिष्ट्य हे आहे की त्याला आद्योपान्त कंठाग्र (तोंडपाठ) करणारे हजारो तोंडपाठी (हाफ़िज) जगभर विद्यमान आहेत. कारण स्वत: परमेश्वरानेच अशी हमी घेतली आहे की ‘‘याचे आम्हीच संरक्षणकर्ते आहोत.’’ जगामध्ये **‘कुरआन’** हाच एकमेव असा अद्वितीय ग्रंथ आहे जो सुरुवातीपासून शेवटपर्यंत काहीच न विसरता क्रमबद्ध रीतीने तोंडपाठ केला जाऊ शकतो. याबाबतीत जगातील अन्य सर्व धर्मग्रंथ ही पातळी गाठू शकत नाहीत. या संदर्भात त्याचे अद्वितीय वैशिष्ट्य नजरेत भरण्यासारखे आहे. शिवाय स्वत: परमेश्वराचे अभिवचन आहे – ‘‘त्या (कुराणा)चे संकलन व त्याचे पठण करण्याची (जबाबदारी) नि:संशय आमच्यावर आहे.’’ ७५:१७

### ३२) प्रेषित व संदेशहर (रसूल व नबी)

'रसूल' (प्रेषित) व 'नबी' (संदेष्टा) असा मनुष्य असतो ज्यावर सर्वोच्च अल्लाहचे मार्गदर्शन उतरत असते जेणेकरून त्याने स्वत:देखील त्याचे अनुसरण करावे आणि अल्लाहच्या इतर दासांपर्यंत ते पोहोचवावे.

'नबी' अरबी भाषेत उंच जमिनीलादेखील म्हणतात आणि मार्गातील खुणेलाही. त्याचप्रमाणे 'रसूल'चा शाब्दिक अर्थ 'पाठवलेला' असा होतो. मग तो एखादा संदेश असो की दूत असो. जणू काय अशा व्यक्तीला, जिच्यावर अल्लाहचे मार्गदर्शन उतरते. 'नबी' अशासाठी सांगितले गेले आहे की आपल्या प्रतिष्ठेच्या दृष्टीने तो इतर सर्व माणसांपेक्षा उच्चही असतो व मानवजातीसाठी कल्याण व मुक्तीच्या सन्मार्गातील खूणही असतो. त्याचप्रमाणे त्याला 'रसूल' याकरिता सांगितले गेले आहे की तो सृष्टीसम्राटाकडून त्याच्या रयतेजवळ पाठवलेला संदेशवाहक आणि दूत म्हणून असतो, त्यांच्या प्रत तो त्यांचे आदेश पोहोचते करतो.

'नबी' आणि 'रसूल'च्या व्यक्तित्वासंबंधी महान कुरआनात पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण दिलेले आहे –

१) तो मनुष्य असतो, म्हणूनच निरपवादपणे सर्वच प्रेषित स्वत:संबंधी ''आम्ही तुमच्याप्रमाणेच मनुष्य आहोत'', अत्यंत स्पष्ट शब्दात असे घोषित करत राहिले आहेत. शिवाय मनुष्यजातीपैकी देखील केवळ पुरुषांनाच नबी बनवलेले आहे. स्त्रियांना या कार्यासाठी कधीही निवडले गेलेले नाही.''(पैगंबर!) आम्ही तुमच्यापूर्वी पाठवलेले पैगंबर माणूस (पुरुष)च होते, ते वेगवेगळ्या वस्त्यांच्या निवासितांपैकीच होते. ज्यांच्याकडे आम्ही (आमचे संदेश) प्रकट केले होते.'' १२:१०९. नबी ज्या अर्थी मनुष्य होते त्या अर्थी स्वाभाविकपणे इतर माणसांप्रमाणे भौतिक गरजा आणि मानवी आवश्यकता त्यांनाही लागल्या होत्या, जसे सांगितले आहे, ''नि:संशय हे लोक अन्न घेत असत व बाजारातही संचार करत असत.'' तसेच ''तुमच्यापूर्वी आम्ही कित्येक पैगंबर (प्रेषित) पाठवले आणि आम्ही त्यांना बायका मुलेही दिली.'' १३:१८

संदेशहर देवदूतांपैकी नसत. ''जर पृथ्वीवर देवदूत असते आणि त्यावर ते संचार करत असते, तर तेव्हा मात्र आम्ही आकाशातून देवदूतालाच आमचा पैगंबर बनवून पाठवले असते.'' १७:९५ शिवाय, सर्वोच्च अल्लाह 'अवतार' घेऊन स्वत:च मानवी रूप धारण करून जगात येत राहिला असता, असे देखील नाही. म्हणूनच ईसाई लोकांच्या एका गटाने जेव्हा असे सांगितले, ''अल्लाहच मरयमपुत्र येशू आहे,'' तेव्हा कुरआनने त्यास श्रद्धाहीनता ठरवले. ''खचितच श्रद्धाहीनता ('कुफ्र') केली त्या लोकांनी, ज्यांनी सांगितले की अल्लाहच मरयमपुत्र येशू आहे.''

२) नबी आणि रसूल असणे, म्हणजे संदेशहरत्व व प्रेषितत्व, हे एक अधिकारपद आहे. सर्वोच्च अल्लाहकडून त्यासाठी विशिष्ट व्यक्तींची निवड व नियुक्ती होत असते. ''अल्लाह देवदूतांमधून आपला संदेशवाहक निवडतो, तसेच माणसांमधून देखील तो (पैगंबर) निवडतो. लक्षात ठेवा, अल्लाह सर्व काही ऐकणारा आणि सर्व काही पाहणारा आहे.'' २१:७५ या संबंधाने अशा निवडलेल्या व नियुक्ती झालेल्या व्यक्तींच्या स्वत:च्या इराद्यालाही काही वाव असत नाही व त्यांच्या प्रयत्नांना देखील नाही. माणसाचा स्वत:चा निर्धार व संकल्प आणि धडपड व प्रयत्नांनी ही गोष्ट प्राप्त होत नसते. आपला प्रेषित कुणाला करावा याचा निर्णय घेणारा तो अल्लाहच आहे. ''आपला संदेशवाहक कोणाला नियुक्त करावे हे अल्लाहला चांगले ठाऊक आहे.'' ६:१२४ जप-तप, ध्यान-धारणा आणि तपश्चर्येमुळे मनुष्य आध्यात्मिक दृष्टीने उच्च होऊ शकतो

आणि स्वत:मध्ये देवदूतांच्या गुणांचा रंग आणू शकतो. परंतु हे शक्य नाही की आपल्या या खडतर तपश्चर्येच्या बळावर तो प्रेषितपदापर्यंत पोहोचावा व आपल्या त्या तपांमुळे प्रेषितत्त्वाने उपकृत व्हावा. कारण, प्रेषितत्व एक अधिकारपद आणि ठराविक कामगिरी आहे. कोणतेही अधिकारपद स्वत: होऊन केवळ आपल्या प्रयत्नांनी मिळत नसते तर कुणा समर्थ अधिकारीच्या आदेशाने व नियुक्तीनेच हे प्राप्त होत असते. म्हणून एक दैवी पदाधिकार - संदेशहरत्वदेखील त्यालाच मिळू शकते, ज्याच्यासाठी सृष्टीच्या व मानवजातीच्या खऱ्या शासकाकडून नियुक्ती आदेश निघाला असेल.

३) संदेष्टा ('नबी') जे काही आदेश देतो, आणि धर्म व शास्त्र ('दीन व शरीयत') म्हणून ज्या ज्या गोष्टींची शिकवण देतो, ती त्याच्या स्वत:कडून असत नाही, तर सर्वोच्च अल्लाहकडून असते. म्हणूनच प्रत्येक संदेशहर ('नबी') लोकांना हेच सांगत राहिला आहे, ''मी माझ्या विधात्याचे संदेश तुमच्यापर्यंत पोचवीत आहे, आणि तुम्हाला प्रामाणिक उपदेश करत आहे, आणि अल्लाहकडून मला अशा (गोष्टी) ज्ञात झालेल्या आहेत की ज्या तुम्हाला माहीत नाहीत.'' ७:६२ मग ज्या अर्थी संदेष्टाची प्रत्येक गोष्ट अल्लाहकडून असते त्याअर्थी त्याची आज्ञा पाळणे खरे म्हणजे अल्लाहची आज्ञा पाळणे होय. व त्याची अवज्ञा करणे प्रत्यक्षात अल्लाहची अवज्ञा करणे आहे. जसे की स्पष्टपणे सांगितले गेले आहे, ''ज्याने प्रेषिताचे आज्ञापालन केले त्याने (साक्षात) अल्लाहचे आज्ञापालन केले.'' ४:८०. तसेच ''आणि आम्ही कोणताही प्रेषित या उद्देशाशिवाय पाठवलेला नाही, की अल्लाहच्या आदेशानुसार त्याच्या आज्ञेचे पालन व्हावे.'' ४:६४ खुद्द 'रसूल' हा शब्ददेखील हेच दर्शवतो की वस्तुस्थिती हीच असू शकते, कारण अल्लाहचे 'रसूल', म्हणजे अल्लाहकडून पाठवलेले असल्याचा अर्थच असा की तो जे काही सांगेल आपल्या व्यक्तिगत भूमिकेने व स्वत:हून सांगणार नाही तर आपल्या पाठवणाऱ्यातर्फे सांगेल, म्हणून त्याचे आज्ञापालन किंवा त्याची अवज्ञादेखील त्याची व्यक्तीश: आज्ञापालन किंवा अवज्ञा ठरणार नाही तर सर्व जगांचा स्वामी अल्लाहचेच आज्ञापालन व त्याचीच अवज्ञा ठरेल.

शेवटी 'नबी' व 'रसूल' यांच्यातील एक फरक देखील समजून घेतला पाहिजे. या उभय शब्दांच्या वापरासंबंधीचा हा फरक आहे. 'रसूल' हा तो पैगंबर (प्रेषित) असतो, ज्याला परमेश्वराकडून नूतन धर्मशास्त्र म्हणजेच 'शरीअत' आणि ग्रंथ प्रदान केले गेले असेल, आणि 'नबी' प्रत्येक पैगंबरास म्हणतात. मग भलेही त्याला नवीन धर्मशास्त्र आणि ग्रंथ मिळालेले असोत अथवा त्याला फक्त पूर्वकालीन धर्मशास्त्र आणि ग्रंथावर लोकांना अनुसरण करण्यास प्रवृत्त करण्याचे कार्यभार त्याच्यावर सोपवलेले असेल.

### ३३) मानव (इन्सान)

मानवाची जडण-घडण, त्याचे स्वभाव-वैशिष्ट्य, त्याचा शारीरिक विकास, त्याची वैयक्तिक जबाबदारी, त्याचे कर्तव्य, त्याचे कर्म इत्यादी मानवाच्या पैलूंवर पवित्र कुराणामध्ये फार सुंदर प्रकाश टाकण्यात आला आहे. मानव हा सृष्टीचा मुकुटमणी असल्यामुळे परमेश्वराने पृथ्वीतलावर त्याला आपले प्रतिनिधी - उप-प्रभारी - उत्तराधिकारी बनवले आहे. त्याचा फार मोठा महिमान आहे. उपरोक्त संदर्भात प्रथम कौराणिक दाखले देऊन नंतर ब्रह्मांडामधील त्याचे सर्वोच्च स्थानासंबंधी विवेचन प्रस्तुत करण्यात आले आहे.

**मानवाचे कुराणोक्त शब्द-चित्र**

मानव हा सद्‌गुण आणि दुर्गुणांचा पुतळा आहे. तो वाईटपणाच्या पैलूने शैतानाहून अधिक निष्ठुर व निकृष्ट आहे, तर चांगुलपणाच्या पैलूने तो देवदूतांहूनही अधिक उत्कृष्ट व श्रेष्ठ आहे. त्याच्यामध्ये उपरोक्त दोन्ही पैलू एकवटलेले आहेत. यावरून ब्रह्मांडामधील त्याच्या सर्वोच्च स्थानाची कल्पना आल्याशिवाय राहात नाही. म्हणून तर तो इहलोकामध्ये परमेश्वराचा उप-प्रभारी वा उत्तराधिकारी आहे. २:३० कारण परमेश्वराने त्याला आपल्या दोन्ही हातांनी बनवले आहे. ३८:७५ त्यास संगोपनाच्या सर्वोत्तम पद्धतीने वाढवले आहे. ९५:४ ईश्वराने मानवामध्ये आपला आत्मा फुंकला १५:२९ आणि उपकाराचे वरदान प्रदान केले. १६:४

'करावे तसे भरावे', 'पेराल तसे उगवेल' (उगवते) हा न्याय परमेश्वराने मानवासाठी लागू करून "त्याने प्रत्येक मनुष्याचे प्रारब्ध त्याच्या गळ्यात बांधून टाकले आहे." १७:१३. "प्रत्येकाला त्याच्या कर्माचा परिणाम भोगावाच लागणार आहे. आणि ओझे वाहणारी कोणतीही व्यक्ती दुसऱ्याचे ओझे आपल्या शिरावर घेत नाही. मग तुम्हाला तुमच्या विधात्याकडे परत जायचे आहे." ६:१६४ "आणि तोच आहे, ज्याने या भूतलावर तुम्हाला (इतरांचे) वारस बनवले आणि तुमच्यापैकी काहींना इतरांपेक्षा श्रेष्ठ दर्जा यासाठी प्रदान केला की, त्याने जे काही तुम्हाला दिलेले आहे त्याद्वारे त्याला तुमची परीक्षा घेता यावी." ६:१६५ "निःसंदेह, जे लोक श्रद्धा धारण करून, चांगली कामे करतात ते, संपूर्ण जीवनसृष्टीमध्ये सर्वात चांगली निर्मिती आहे. त्यांच्यासाठी सर्वांत चांगला मोबदला अल्लाहकडे तयार आहे. हे सर्व त्याच्यासाठी आहे, जो नेहमी आपल्या पालनकर्त्याप्रती भीतीयुक्त आदर बाळगून असतो." ९८:७-८ "परमेश्वराने मानवाला गोठलेल्या (रक्तापासून) निर्माण केले. त्याने (मानवाला ज्ञानप्राप्तीसाठी) लेखणीचा उपयोग करणे शिकवले. मानवाला ते सर्व शिकवले, जे त्यास माहीत नव्हते. तरीही मनुष्य मगरूरीने वागतो. कारण तो (आत्मनिर्भर नसतानाही) स्वतःला आत्मनिर्भर समजतो. सर्वांना विधात्याकडेच परत जायचे आहे. यात शंकाच नाही." ९६:२-८ "मनुष्य हा नेहमी तोट्यात आहे, यात शंका नाही. पण यास अपवाद फक्त ते लोक आहेत, जे श्रद्धा धारण करून सत्कर्मे करतात आणि एकमेकांना सत्याशी (अढळपणे नाते ठेवण्याविषयी) उपदेश करत असतात. आणि जे एकमेकांना सहनशीलतेचे पालन करण्यासाठी उपदेश करतात." १०३:२-३ "हे मानवा! आपल्या कृपावंत विधात्याविषयी तुझी कोणत्या गोष्टीने फसवणूक केली आहे? ज्याने तुला निर्माण केले, मग तुझ्या शरीरातील अवयवांची संतुलित अशी रचना करून तुला घडवले. ज्या रूपात इच्छिले तसे तुला रूप दिले." ८२:६-८. "माणसाने विचार करायला हवा की, त्यास कशापासून निर्माण करण्यात आलेले आहे. त्याला अशा पाण्यापासून (म्हणजे वीर्यबिंदूपासून) निर्माण करण्यात आले आहे, जो उचंबळून, पाठींतून व उराच्या हाडांमधून निघतो. निःसंदेह, तोच त्याला पुन्हा जिवंत करण्याचे पूर्ण सामर्थ्य बाळगतो. ज्या दिवशी सर्व रहस्ये उघड केली जातील. तेव्हा (माणसाकडे) कोणतेही सामर्थ्य असणार नाही, ना कोणी साहाय्यकर्ता त्याला लाभेल." ८६:५-१०. "तुम्ही नरकास अवश्य पाहाल. आणि तुम्हाला खात्री पटेल, अशा रीतीने पाहाल आणि त्या दिवशी (जगात तुम्ही उपभोगलेल्या ईश्वरीय) कृपाप्रसादांविषयी जाब विचारला जाईल." १०२:६-८

मानव-स्वभावामधील दोषांकडे अंगुलीनिर्देश अशा पद्धतीने करण्यात आला आहे - "मार्ग दाखवणे एवढेच आमचे काम आहे, (आणि मार्ग त्याला अवलंबायचा आहे.)" ९२:१२ अशी भूमिका बांधून परमेश्वर

हा मानव किती कृतघ्न आहे, तो उतावीळतेचा पुतळा कसा आहे, तो किती क्षुल्लक आहे, त्याला संपत्तीची किती लालसा आहे, इतकेच नव्हे तर तो सर्व प्रकारच्या मर्यादा ओलांडणारा आहे या संबंधी संकेत आहेत. ''नाश पावो माणूस! किती कृतघ्न आहे तो! (अल्लाहने) त्यास कशापासून निर्माण केले? वीर्याच्या एका बिंदूपासून! त्यास तो निर्माण करतो आणि त्याची स्वभाववैशिष्ट्ये निश्चित करतो. आधी त्याच्यासाठी (जीवनाचा) मार्ग सुकर करतो. आणि शेवटी त्यास मृत्यू देऊन कबरीत पोचवतो. आणि मग जेव्हा तो इच्छील त्यास पुन्हा जिवंत करून उभा करेल. तरीही माणूस त्याच्या आदेशांनुसार कृती करण्यास नकार देतो. (जो माणसाचा सर्व प्रकारे कर्ता करविता आहे). माणसाने आपल्या अन्नाकडे पाहावे. (ते त्याला कसे उपलब्ध करून दिले जाते, त्यावर त्याने चिंतन करावे).'' ८०:१७-२४. ''आम्ही मानवाला उत्तम आकार देऊन (उत्कृष्ट निर्मितीच्या रूपाने) निर्माण केले आहे. पण त्याच्या (अन्यायी वर्तनामुळे) त्यास सर्वात खालच्या ठिकाणी अर्थात रसातळास फेकून दिले आहे.'' ९५:४-५ ''जी कोणती आपत्ती तुमच्यावर ओढवते (किंवा ओढवेल), ती तुमच्या हातांनी केलेल्या कमाईचेच फळ असते.'' ४२:३० ''खरोखर, माणूस उतावीळ स्वभावासह जन्माला आलेला आहे. जेव्हा त्याला कष्ट पोहोचतात, तेव्हा तो शोक करू लागतो. आणि जेव्हा तो सुस्थितीत असतो, तेव्हा तो कंजूषपणाचे वर्तन करतो.'' ७०:१९-२१. ''निःसंदेह, आम्ही मानवाला कष्टाचे (व कसोटीचे जीवन जगण्यासाठीच) निर्माण केलेले आहे. तो असा विचार करतो का की, त्यावर कोणाचेच नियंत्रण नाही? तो (बढाई मारत) म्हणतो, 'मी प्रचंड धन खर्च केले आहे.' तो असा विचार करतो का की, त्याच्यावर कोणीही नजर ठेवून नाही. त्याला (आम्ही चांगले व वाईट असे) दोन खुले मार्ग दाखवले नाही का?'' ९०:४-१०. ''मनुष्यावर एक अशी वेळ आलेली नाही का, जेव्हा तो वर्णन करण्यास योग्य असा नव्हता? आम्ही माणसाला एक मिश्रित अशा वीर्यबिंदूने निर्माण केले. आणि त्याची परीक्षा पाहण्यासाठी आम्ही त्याला ऐकणारा व पाहणारा बनवले. आम्हीच त्याला (धर्माचा) मार्ग दाखवला आहे. आता स्वतःला कृतज्ञ किंवा कृतघ्न त्याला सिद्ध करून दाखवायचे आहे. त्याच्यासमोर हे दोन विकल्प खुले आहेत. निवड त्याच्या हातात आहे.) खरे सदाचरणी ते आहेत, जे आपल्या वचनपूर्तीच्या बाबतीत फार दक्ष असतात, आणि त्या दिवसाचे भय बाळगतात, ज्याचे संकट सर्वदूर पसरलेले असेल.'' ७६:१-३, ७ (हे मानवा) खेद आहे तुझ्याबद्दल खेद! पुन्हा तुझ्याविषियी खेद वाटतो, फक्त खेद. मनुष्याला असे वाटते की काय, त्यास (वाटेल ते करण्यासाठी) असेच सोडून देण्यात येईल? (म्हणजे त्याला जाब विचारला जाणार नाही?) प्रथमतः तो गर्भाशयात टाकला गेलेला वीर्याचा एक बिंदू नव्हता काय? ७५:३४-३७. 'आम्हीच त्यांना निर्माण केलेले आहे. आणि त्यांच्या अवयवांची सुदृढ अशी रचना आम्हीच केलेली आहे. आणि आम्ही इच्छिले, तर त्यांच्यासारख्या इतरांना आणू शकतो.'' ७६:२८ संपत्तीची तुम्हाला फारच लालसा आहे, जी कधीही तृप्त होत नाही. कदापी नाही. ८९:२०-२१.

### मानवाची विशेषता

**मानव दोन्ही हाताची कृती –** ''(ईश्वर) म्हणाला – इब्लिसा, तुला कोणत्या गोष्टीने प्रतिबंध केला, त्या वस्तूला प्रणिपात करावयाला, जिला मी दोन्ही हातांनी बनवले?'' ३८:७५.

**अमानत (ठेव)** – आम्ही ही (विचार व आचार स्वातंत्र्याची) अमानत आकाशे, भूमी आणि पर्वत यांच्यासमोर ठेवली. प्रत्येकाने ती (जबाबदारी) उचलण्याला नकार दिला, आणि तिला भ्याले, आणि माणसाने (जणू मुद्दाम अविचारीपणाने) ती उचलली. तो (आपल्या ठायी) फारच अनर्थकारी (होता आणि अनर्थकारी होण्यापलीकडे) फारच अज्ञानीही होता. (आणि ती उचलली तर तिचा आवश्यक परिणामही हा व्हावयाचाच होता.)'' ३३:७२

**दोन टोके** – ''खरोखरच, आम्ही माणसाला अतिशय उत्तम स्वरूपात निर्माण केले. नंतर आम्ही, त्याच्या करणीमुळे त्याला अत्यंत निकृष्ट करून, निकृष्टात परतवले.'' ९५:४-५

**हीन, मध्यम, उत्तम** : ''नंतर आम्ही ग्रंथाचा वारसा आमच्या सेवकांपैकी आम्ही ज्यांची निवड केली त्यांनाच दिला, आणि त्यांच्यापैकी काही लोक (सत्कर्मे करताना) स्वतःवरच अन्याय करत आहेत, त्यांच्यापैकी काही लोक मध्यम मार्गावर आहेत आणि काही लोक अल्लाहच्या प्रेरणेने सत्कर्मात सर्वांच्या पुढे आहेत, आणि (खरोखरच) परमेश्वराची ही एक अपार कृपा आहे.'' ३५:३२

**मनुष्य जन्माचा हेतू** : ''मी जिन्न (दैवत,यक्ष, किन्नर) व मनुष्यें यांस या हेतूनेच निर्माण केले आहे, की त्यांनी माझी उपासना (भक्ती) करावी.'' ५१:५६

**मानव : दार्शनिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोन**

सृष्टीमध्ये मानवाचे आविष्करण हे सर्वात शेवटी झाले. परमेश्वरामध्ये जेव्हा सृष्टीनिर्मितीची इच्छा उत्पन्न झाली, तेव्हा त्याने आपल्या ज्योतीपासून 'नुरूल मुहम्मदिया' म्हणजेच प्रेषित मुहम्मद यांचा प्रकाश निर्माण केला. हाच त्यांचा आत्मा, आणि हेच आदिभूत होय. या आदिभूताशी परमेश्वराचा साक्षात संबंध आहे. हेच विश्व-ज्ञान आहे, आणि हेच जगाचे आदिरूप आहे. आदिभूतापासून मूल तत्त्वे, स्वर्ग, चार महाभूते, आकाश, (सूफ़ी तत्त्वज्ञानामध्ये 'आकाश' हे महाभूत स्वरूपात परिगणीत नाही.) तारे इत्यादींचा आविष्कार झाला. महाभूतांची अग्नी, वायू, आप आणि पृथ्वी ही चार तत्त्वे सर्वात अगोदर आविष्कृत होणारे पदार्थ आहेत. दृश्य जगामध्ये सर्वप्रथम रूपग्रहण करणारी अशी हीच चार तत्त्वे आहेत. यापैकी सर्वात वर अग्नी आहे. त्यानंतर वायू, मग आप आणि नंतर पृथ्वी. हे सर्व एकात एक वर्तुळाप्रमाणे एक दुसऱ्याच्या वर क्रमाने आहेत. यांचे गुण वेगवेगळे आणि समाईक पण आहेत. याच समाईक गुणांमुळे ते एका रूपापासून दुसऱ्या रूपामध्ये बदलत असतात. जसे, अग्नी शुष्क आणि उष्ण आहे. वायू उष्ण आणि ओलसर आहे. पाणी (आप) ओलसर आणि शीत (थंड) आहे, तर पृथ्वी थंड आणि शुष्क आहे. अशा प्रकारे संपूर्ण चक्र पूर्ण होते. अग्नी आणि वायूमध्ये समाईक गुण उष्णतेचा आहे. त्यामुळेच अग्नीकांडामध्ये सभोवतालची हवा एकदम गरम (उष्ण) बनते. पृथ्वीवरील द्रवरूप पाणी हे शीत(ल)तेच्या समाईक गुणामुळे व त्याच्या अतिशयतेमुळे ते द्रवरूप पाणी घनरूप बर्फ बनून जाते. अशीच प्रक्रिया इतर तत्त्वांमध्ये घडत असते. हा बदल सप्तग्रहांच्या प्रभावामुळे होतो. परिणामी धातू, खनिज, वनस्पती आणि जीवजंतूंचा उद्भव होतो. या कारणांमुळे सप्तग्रहांना 'पितृसप्तक' ('अबा-ए-सबा') म्हणतात, आणि चार महाभूतांना 'मातृचतुष्टय' ('उम्मुहात-ए-अरबा') म्हणतात. जीव-जंतूंची चरम परिणती मानवामध्ये येऊन समाप्त होते. अशा प्रकारे सर्वात शेवटी सर्वनिधान ('जामिअ') मानवाचा उद्भव

होतो. त्यानंतर मानव हा आपल्या बहुगुणसंपन्नतेच्या ('रफीउदर्जात') बळावर पुरुषोत्तम वा नरोत्तम ('इन्सानुल कामिल') या सर्वोच्च दर्जावर जाऊन पोहोचतो.

जीवजगत्‌मध्ये अन्यतम मानव हा आहे, आणि मानवामध्ये पण उच्चतम आणि अन्यतम 'नरोत्तम' वा 'पुरुषोत्तम' ('इन्सातुल कामिल') आहे. सर्व प्राणी जाणतेपणाने किंवा अजाणतेपणाने या नरोत्तमाच्या स्तरापर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्नशील असतात, कारण की येथे पोहोचल्यावर ते 'विश्व-ज्ञान' ('अक्ल-ए-अव्वल')मध्ये प्रवेश करतात, आणि येथे पोहोचून आत्मा त्या परम ऐश्वर्याच्या मनात प्रवेश करू शकतो. येथूनच त्याची अधोगामी यात्रा सुरू झाली होती, आणि पुन्हा तेथेच पोहोचून ती समाप्त होते. या यात्रेस 'दौरान-ए-वुजूद' (अस्तित्व-यात्रा) म्हणतात.

या अधोगामी यात्रेस 'तरीक-ए-मब्द' अर्थात बाह्य यात्रा असे म्हणतात. ज्योतिकिरण, ज्ञान, आत्मा (यांची यात्रा) लोक आणि तत्त्वांपासून सुरू होऊन पृथ्वीपर्यंत पोचतात. यानंतर ऊर्ध्वगामी यात्रा सुरू होते, आणि याला 'तरीक-ए-मआद' अर्थात गृहाभिमुखी यात्रा असे म्हणतात. ही यात्रा धातू, उद्‌भिद्‌ (खनिज, वनस्पती), जीव-जंतूपासून मानवापर्यंत पोहोचते. मानवाची यात्रा आणखी वरच्या बाजूस 'नरोत्तमा'च्या स्तरापर्यंत पोहोचते. ही सर्वोच्च अवस्था आहे.

वास्तविक मानव हा ईश्वराचा प्रति-नमुना आहे. ईश्वराचा उत्तराधिकारी किंवा उप-प्रभारी ही त्याची उपाधी आहे. तो दैवी गुह्यांचा भांडार आहे. तो दैवी प्रकाशकिरण आहे. सर्व प्रकारच्या वस्तू त्याच्यामध्ये एकवटलेल्या आहेत. कोणतीही वस्तू त्याच्यापासून बहिष्कृत नाही. म्हणूनच 'जे ब्रह्मांडी, ते पिंडी' असे म्हटले जाते. मानव ही ग्रंथ-मातृका आहे की जिच्या अक्षरांवरून तो आपल्या मनाच्या गुजगोष्टी जाणतो व ओळखतो. मानवास आपल्या 'स्व'त्वाचे चिंतन, आपल्या वासनेचे ज्ञान आणि आपल्या वास्तवाचा पुरेसा बोध आहे. त्याच्या श्रेष्ठत्वाचे संकेत पवित्र कुराणात असे नोंदलेले आहे – "निःसंदेह, आदमच्या संततीला आम्ही सन्मान दिला आणि त्यांना (उपजीविकेच्या) उत्तमोत्तम वस्तू दिल्या, व त्यांना आम्ही निर्मिलेल्या अनेकांवर श्रेष्ठत्व दिले." १७:७०

मानवाने परमेश्वराच्या सत्तेमध्ये किंवा नामा ('ज़ात') मध्ये चिंतन करू नये. तर त्याने ब्रह्मांडाविषयी सृष्टीविषयी चिंतन करावे. यासाठी सर्वोत्तम उपाय हा आहे की त्याने आपले स्वत्त्व ('ज़ात') आणि गुण ('सिफात') या विषयी चिंता बाळगावी. म्हणून तर प्रेषित जामात अली यांनी अशी शिकवण दिली होती – हे माझ्या सुपुत्रा, तुझी स्वतःविषयी चिंता ही पुरेशी आहे. कारण की कोणतीही वस्तू ही तुझ्याखेरीज नाही. तुझे दुःख तुझ्यामध्येच आहे, आणि तुला याची जाण नाही. आणि तुझे औषध तुझ्यामध्ये आहे, मात्र तू पाहत नाहीस आणि तुला असे वाटते की तू एक लहान देह (शरीर) आहेस, परंतु खरे पाहता तुझ्यामध्ये एक विशाल विश्व सामावलेले आहे आणि तू ती ग्रंथ-मातृका आहेस की आपल्या स्वतःच्या अक्षरांवरून अंतःकरणाच्या गोष्टी जाणतोय.

एके दिवशी अब्दुल्ला बिन उमर यांनी प्रेषितास विचारले की, अल्लाह (परमेश्वर) कोठे आहे? प्रेषितांनी उत्तर दिले की, परमेश्वर हा भक्तांच्या अंतःकरणात आहे. भक्ताचे अंतःकरण हे ईश्वराचे सिंहासन ('अर्श-ए-इलाही') आहे, आणि ईश्वर हा सिंहासनावर विराजमान आहे, ज्या अर्थी श्रद्धावंतां (भक्तां)चे अंतःकरण हे

ईश्वराचे सिंहासन आहे, त्याअर्थी हे सिद्ध झाले झाले की परमेश्वर हा भक्ताच्या अंतःकरणात विराजमान आहे. असा सर्वोच्च आहे, मानवाचा महिमान!

मानवाचे चित्त, त्याची प्रशस्ती आणि त्याचे वैभव यासंबंधी कौराणिक दाखले पुढीलप्रमाणे आहेत –

१) ''त्यात माझा आत्मा फुंकलेला असेन.'' ३८:७२ – हा मानवाचा प्राण आहे.

२) ''आणि स्वतः तुमच्यामध्ये (ही) (अनेक संकेत आहेत) तर मग ते तुम्ही पाहात का नाही?'' ५१:२१ – ही मानवाची प्रशस्ती आहे.

३) ''आणि (त्याच्या) कंठातील शिरेपेक्षाही आम्ही त्याच्या अधिक निकट आहोत.'' ५०:१६ – हे मानवाचे वैभव आहे.

४) ''आणि तुम्ही कोठेही असा, तो तुमच्याबरोबर असतो.'' ५७:४ – हे परिपूर्ण ओलाव्याचे कथन आहे.

सर्वत्र पृथ्वी व आकाश आणि संसार व जे काही संसारामध्ये आहे, त्या सर्वांमध्ये मानवाची धूमधाम आहे. त्याचाच बोलबाला आहे, आणि संपूर्ण आलोकावर मानवाचेच प्रभुत्व व पकड आहे. प्राणिमात्राच्या या शिरोमणीस प्रेषित मुहम्मद यांनी त्याला (मानवाला) चिंतन करण्यावर भर दिला आहे. या संदर्भात एक कौराणिक दाखला असा आहे –

''निःसंशय, आकाशाच्या व पृथ्वीच्या उत्पत्तीत व रात्रंदिवसाच्या अनुक्रमात, बुद्धिमानांच्या (समजण्या) करिता (ईश्वर सामर्थ्याच्या बऱ्याच) निशाण्या होत.'' ३:१९०.

### ३४) स्वर्ग (जन्नत)

परमेश्वराने सत्कर्मासाठी स्वर्ग (जन्नत) आणि दुष्कर्मासाठी नरक (दोज़ख़)ची योजना केली आहे. आठ (अष्ट) स्वर्ग मानण्यात आले आहेत. ते या प्रमाणे –

(१) जन्नतुस्सलाम, (२) जन्नतुल मकासिब, (३) जन्नतुल मवाहिब, (४) जन्नतुल इस्तिहक़ाक़, (५) जन्नतुल फ़िरदौस, (६) जन्नतुल फ़ाज़िलात, (७) जन्नतु स्सिफ़ात आणि (८) जन्नतुज़्ज़ात. या आठ स्वर्गांची वैकल्पिक नावे अशी आहेत –

१) दारुल जलाल, २) दारुस्सलाम, ३) जन्नतुल मावा, ४) जन्नतुल खुल्द, ५) जन्नतुल नईम, ६) जन्नतुल फ़िर्दौस, ७) जन्नतुल अदन आणि ८) जन्नतुल इल्लियून अथवा जन्नतुल करार.

पहिला स्वर्ग जन्नतुस्सलाम आहे. यामध्ये माणसाची कर्मे आकार घेतात. अर्थात त्याची कर्मे साकार बनतात. त्याची सत्कर्मे त्याला सुख प्रदान करतात. ते स्वर्गीय अप्सरा आणि दूध व मधाच्या नद्या बनून प्रकट होतात. कारण सत्कर्मे करताना त्याने इहलोकात याची आस (आशा) बाळगली होती. अथवा दुसऱ्या शब्दात असेही म्हणता येईल की त्याचे विचार सुंदर रूप धारण करतात. दैवी ज्ञानप्राप्ती आणि परिपूर्ण श्रद्धेच्या लाभामुळे तो स्वर्गाचा सुखोपभोग घेतो. दूध हे दैवी ज्ञानाचे प्रतीक आहे, तर मध हे श्रद्धेचे प्रतीक आहे.

दुसरा स्वर्ग जन्नतुल मकासिब आहे. यालाच जन्नतुस्स्वर (विचारांचा स्वर्ग) असेही म्हणतात. परमेश्वराकडून चांगली अपेक्षा बाळगणारास या स्वर्गाचा लाभ होतो. मी मनुष्याच्या कल्पनेजवळ असतो. त्याने माझ्याकडून अनुकूल आशा बाळगावी. कारण ''तेव्हा ज्यांनी श्रद्धा बाळगली व सत्कर्मे केली त्यांना स्वर्गात

सन्मान व सौख्य देण्यात येईल.'' ३०:१५. अबू हुरैराशी संबंधित एका हदीस (प्रेषित वचना)मध्ये असे सांगितले आहे – ''सत्कर्मे सुंदर रूप धारण करतात, आणि ती मृतासोबत जातात.''

तिसऱ्या स्वर्गाचे नाव आहे जन्नतुल मवाहिब. परमेश्वराचे एक नाव 'वह्हाब' आहे. कसलाच भेदभाव न ठेवता तो (ईश्वर) महादाता आहे. ही परमेश्वराची कृपा आहे. या स्वर्गात सर्व पंथांच्या व धर्माच्या लोकांना प्रवेश असतो, कारण परमेश्वर म्हणतो, 'माझ्या दयेचे सत्र सर्वासाठी खुले आहे.' त्याची दया ही आपल्या मानवांच्या फक्त सत्कर्मांवर केंद्रीभूत नाही.

चौथा स्वर्ग आहे जन्नतुल इस्तिहक़ाक़. धार्मिक शिस्त पाळून सत्कर्मे करणाऱ्या साधकांसाठी, आपल्या नावाप्रमाणेच, हा स्वर्ग आहे. पुण्यफल म्हणून त्यांना हा स्वर्ग बहाल करण्यात येतो. 'आदिल' (न्यायी) हे ईश्वराचे एक नाव आहे.

पाचवा जन्नतुल फ़िरदौस हा स्वर्ग परमेश्वरात विलीन झालेल्या, ब्रह्मज्ञान प्राप्त साधकांसाठी आहे. त्यांनी परमेश्वराच्या सृष्टीचे सौंदर्य निरीक्षण केलेले असते.

सहावा स्वर्ग हा परमेश्वराच्या नामांचे प्रकटीकरण न्याहाळलेल्या भक्तांसाठी असतो, आणि त्यांना जन्नतुल फ़ाज़िलात या सहाव्या स्वर्गामध्ये प्रवेश दिला जातो. हे संत महात्मे (औलिया) असतात.

सातवा स्वर्ग आहे जन्नतुसिफ़्फ़ात. हा प्रेषित आणि थोर संतांसाठी असतो. आणि

शेवटचा आठवा स्वर्ग आहे जन्नतुज़्ज़ात. यालाच 'मक़ाम-ए-महमूद' म्हणजेच प्रशंसित स्थळ असे म्हणतात. यामध्ये ईश्वरदर्शन घडते. ही विश्वचेतना फक्त प्रेषित मुहम्मद यांच्यासाठी आरक्षित आहे (असते). याच स्थळावरून ते मानवाच्या 'मुक्ती'साठी वकिली करतील. या अवस्थेमध्ये व्यक्तित्व स्वतः विलय पावत असल्याचे भासते आणि ते सीमातीत सत्तेमध्ये लुप्त होऊन जाते. आणि अशा प्रकारे ही एक गोंधळलेली स्थिती नसते, परंतु उलट ती सर्वात जास्त खात्रीलायक आाणि स्वच्छ अशी निव्वळ शब्दातीत अवस्था असते. येथे व्यक्तिमत्त्वाचा ऱ्हास म्हणजे तिचे उन्मुलन किंवा अवमान नसून ते एक निव्वळ सत्य जीवन आहे. यालाच 'त्रानातीत विस्मय' किंवा 'लोकोत्तर आश्चर्य' असे आंग्ल कवी टेनिसनच्या शब्दांत म्हणता येईल.

अशा प्रकारे एकूण आठ स्वर्ग आहेत. त्यापैकी सर्वोच्च 'ज़ात' (सत्ता)चे स्वर्ग आहे, आणि बाकीचे सात हे परमेश्वराच्या सौंदर्यनामां ('अस्मा-ए-जमाली')शी निगडित आहेत. परंतु नरक फक्त सात आहेत. ते सर्व परमेश्वराच्या रुद्रावतारी नामांशी संबंधित आहेत. त्याच्या या नामांस 'अस्मा-ए-जलाली' असे म्हणतात. जन्नतुलज़ातशी समांतर असे कोणतेच नरक नाही. कारण ईश्वराची 'रहमान' (दयाळू) व 'रहीम' (कृपाळू) अशी सर्व प्रमुख गुणदर्शक दोन नावे आहेत. 'रहमान' हा भेदभावरहित सर्वांवर दयाळू असतो. त्याची दया भले-बुरे सर्वांवर व्यापलेली असते. तर 'रहीम' हा फक्त योग्य अशा व्यक्तींवरच कृपाळू असतो. परमेश्वर हा 'ग़ज़बान' (सर्वसामान्यांसाठी निर्दयी) आणि 'ग़ज़ूब' (विशिष्टांसाठी निर्दयी) नसतो. क्रोध नव्हे, तर दया हा परमेश्वराचा वैयक्तिक गुण ('सिफ़ात-ए-जाती') आहे.

परमेश्वराने आपली दोन नामे 'बदीअ' (अनुपम सृष्टा) आणि 'क़दीर' (शक्तिशाली) यांच्या मदतीने 'मुहम्मदीय आलोक' (मुहम्मदांचे प्रकाश, यालाच 'याकूत-ए-बैज़ा' असेही म्हणतात.) निर्माण केले आणि आपल्या 'मन्नान' (बक्षीस करणारा) व 'कह्हार' (क्रोधी, प्रकोपी) या नाम-गुणांनी त्यांच्यावर दृष्टिक्षेप केले

असता, त्या (मुहम्मदिया) प्रकाशाचे द्विभाजन झाले. उजवीकडील भाग हा जन्नत (स्वर्ग) आणि डावीकडील भाग हा दोज़ख़ (नरक) म्हणून ओळखले गेले. त्याचे नाम 'कह्हार'मुळे नरक अस्तित्वात आले. नरकाच्या निर्मितीचे रहस्य असे आहे की परमेश्वरास आपले 'ग़ाफ़िर' (क्षमा करणारा) या नावाने प्रकटन करावयाचे होते. क्षमेचे महत्त्व व ते सिद्ध करण्यासाठी परमेश्वराने नरकयातना निर्माण केली आहे.

उपरोक्त आठ स्वर्ग हे एक दुसऱ्याच्या आत आहेत व ते विभिन्न स्तरांमध्ये वर उंच गेलेले आहेत. यांपैकी सर्वात आतील व सर्वोच्च 'जन्नत-ए-अदन' आहे. याच 'जन्नत-ए-अदन'मध्ये स्वर्गीय विभूतीची एक झलक प्राप्त होऊ शकते. या विभूतीस प्रत्यक्ष करणे हे सर्वांच्या भाग्यात नसते. साधक हा आपल्या साधनेत अग्रेसर होत परमेश्वराच्या कृपेद्वारेच या विभूतीचे दर्शन करण्यास समर्थ होतो. या स्वर्गामध्ये भगवत्कृपा प्राप्त झालेले लोकच निवास करतात. या पुण्यात्म्यांसाठी स्वर्गात मोठमोठे प्रासाद बांधले गेले आहेत आणि त्यामध्ये सुंदर सुंदर अशी उद्याने आहेत. या स्वर्गामध्ये नद्या वाहतात. त्यापैकी तीन प्रमुख आहेत. त्यांची नावे आहेत - १) कौसर, २) तस्नीम आणि ३) सलसबील. या नद्यांचे उगमस्थळ सर्वांत उंच असलेले स्वर्ग 'जन्नत-ए-अदन'मध्ये आहे आणि त्या सर्वात खालच्या स्वर्गापर्यंत वाहत असतात. येथील निवासी हूर (अप्सरा) आणि गिल्मे (नवयुवक) आहेत. या हूर सौंदर्यवती असतात आणि सर्व प्रकारच्या गुणांनी विभूषित असतात. या पुण्यात्मा पुरुषांच्या पत्नी आहेत, आणि गिल्मे हे नित्य नवयुवकच असतात. आणि ते पुण्यात्म्यांच्या सेवेत तत्पर असतात. स्वर्गाची देखरेख करणारा एक देवदूत आहे. त्याचे नाव 'रिजवाँ' आहे.

या आठ स्वर्गांची नावे त्यांच्या वैशिष्ट्यांसह अशी आहेत - १) सर्वात उंच चकचकीत मोत्यांचा स्वर्ग जन्नतुल अदन आहे आणि यानंतर खाली क्रमशः आहेत - २) विशुद्ध कस्तुरीयुक्त स्वर्ग - जन्नतुल करार; ३) लाल सुवर्णयुक्त स्वर्ग - कानन, जन्नतुल फ़िरदौस; ४) शुभ्र रजतयुक्त आनंद कानन - जन्नतुल नईम; ५) पिवळे रत्नयुक्त शाश्वत कानन - जन्नतुल खुल्द; ६) हिरव्या प्रस्तरांचा आवास कानन -जन्नतुल मावा; ७) लाल रुबीयुक्त शांती प्रासाद - दारूस्सलाम आणि ८) शुभ्र मोतीयुक्त विभूती-प्रासाद - दारुल जलाल आहे. काहींनी या क्रमात हेरफेर पण केलेले आहेत.

### ३५) नरक (दोज़ख़)

परमेश्वराने केलेली जगाची निर्मिती ही त्याच्या दयेची अभिव्यक्ती आहे. क्रोधाची नव्हे. कारण तत्पूर्वी जगात पापकर्म घडले नव्हते. म्हणून त्याच्या नरकातसुद्धा त्याची माणसे आराम अनुभव करतील. शेख मुहियुद्दीन इब्न अरबी यांनी 'अज़ाब' (यातना - यंत्रणा) या शब्दाची उत्पत्ती 'अज़्ब' (स्वादिष्ट) या शब्दापासून मानलेली आहे. कारण त्या यातनेपासून आराम मिळेल. मासा हा पाण्यासाठी असतो, आणि समुद्र हा अग्नीसाठी असतो. म्हणूनच 'वडवानल' वा 'वडवाग्नी' हा शब्द रूढ आहे. हे स्थान बदलू शकत नाहीत. ते आपापल्या स्वाभाविक वातावरणात आरामशीर आहेत. खरूज झालेला माणूस जसा आपल्या शरीरावर खाजवून रक्तस्राव घडवून आणतो, तशाच नमुन्याचा हा प्रकार आहे या खाजवण्याच्या प्रक्रियेत त्याला आराम वाटतो.

नरकाशी निगडित परमेश्वराची गुणदर्शक नावे पुढीलप्रमाणे आहेत. आणि हीच त्याची सप्त रौद्र नावे आहेत. (१) मुंतक़िम, (२) आदिल, (३) शदीद, (४) ग़ज़ब, (५) मुदिल. (६) ज़िल्-बत्श आणि (७) ज़ुलइक़ाब.

१) मुंतकिम (बदला घेणारा). **दोज़ख़** हे सदरहू ईश्वरनाम अभिव्यक्त करणारे एक नरक आहे. दुसऱ्यांच्या अधिकारावर गदा आणणारे व त्यांचे अधिकार हिसकून घेणारे व त्यांच्यावर जुलूम करणारे, अशा लोकांसाठी या दोज़ख़ची योजना आहे.

२) आदिल (न्यायी). या नावाची अभिव्यक्ति **जहीम** या नरकरूपात होते. दुसऱ्यांची मालमत्ता अन्यायपूर्वक, बळजबरीने आपल्या ताब्यात घेणाऱ्या व्यक्तींकरता हे नरक राखीव आहे.

३) शदीद (कठोर). हे **उस्रा** या नरकाशी निगडित आहे. हा नरक कृपण, ईर्ष्याळू, बदल्याची भावना मनात राखणारे, वासनेचे पुजारी अशा लोकांसाठी राखीव आहे.

४) ग़ज़ब (क्रुद्ध, कुपित). हे **हाविया** या नरकाशी निगडित आहे. खोटारडे, पाखंडी इत्यादीसारख्या लोकांकरिता हाविया या नरकाची योजना केलेली आहे.

५) मुदिल (पथभ्रष्ट करणारा). याचा संबंध **सक़र** या नरकाशी आहे. सक़र हे गर्विष्ट आणि घमेंडखोर लोकांसाठी राखीव आहे.

६) जिल-बत्श (निष्ठुर). या ईशनामाचा संबंध **सईर** या नरकाशी आहे. धूर्त आणि स्वधर्मत्यागी लोक यात खितपत पडतात.

७) ज़ुलइक़ाब (यातना देणारा). **जहन्नम** हे नरक या नामाचे प्रकटीकरण आहे. हे परमेश्वराशी सहभागी मानणारे, संगत मानणारे असे 'मुश्रिक' म्हणजेच वि-भक्त लोकांसाठी विशेष करून आहे.

काही जण नरकाची सप्त नावे अशी पण नोंदवितात. (१) जहन्नम, (२) हाविया, (३) जहीम (४) सईर (५) सक़र (६) लज़ा आणि (७) हुतमा. यांचे कुराणोक्त उल्लेख असे आहेत –

**१) जहन्नम –** ''नरकाग्नी की त्यात यांना जावे लागेल, आणि ते (किती तरी) वाईट स्थल होय.'' ३८:५६ ''हे तर इहलोकीचे शासन होते (व) याच्या पलीकडे (त्याच्यासाठी) 'जहन्नम' होय व (तेथे) त्याला पुंवाचे पाणी पाजले जाईल.'' १४:१६.

**२) हाविया –** ''आणि (हे प्रेषिता!) तू काय समजलास की तो 'हाविया' आहे काय वस्तू? तो (नरकाचा) धगधगीत (प्रखर) अग्नी होय.''

**३) जहीम –** ''आणि सर्व पाहणाऱ्यांच्या समोर नरकाग्नी बाहेर काढून ठेवला जाईल.'' ७९:३६. तर (त्याचे) आतिथ्य उकळत्या पाण्याने करण्यात (येईल), आणि नरकामध्ये जळत राहण्याचे.'' ५६:९३-९४ दुराचरणी लोक नरकात राहतील. ८२:१४

**४) सईर –** ''जे त्या घटकेवर विश्वास ठेवीत नाहीत त्याच्यासाठी धगधगती आग तयार ठेवली आहे.'' २५:११

**५) हुतमा –** ''आणि (हे प्रेषिता!) तू काय समजलास की 'हुतमा' काय आहे? (हुतमा म्हणजे) परमेश्वराचा भडकवलेला अग्नी होय, की जो (पायापासून तो) हृदयापर्यंत झेपावत जातो.'' १०४:५-७

६) **लज़ा** – ''पण (हे तर) कधी (होणारच) नाही. कारण, नरकाग्नी (असा भयंकर) डोंब होय, की तो माथ्याची कातडी उडवून टाकील.'' ७०:१५-१६

७) **सक़र** – ''तर लवकरच मी त्याला (नेऊन) नरकाग्नीत ('सक़र'मध्ये) झोकून देईन. आणि हे (हे पैगंबरा!) तू काय समजलास की नरकाग्नी ('सक़र') आहे तरी काय, तो (फडशा केल्याशिवाय काहीच) राखून ठेवणार नाही. व (भस्म केल्याखेरीज) सोडणार नाही. (आणि तो मनुष्याच्या) शरीरत्वचेस (मारून) होळपरून टाकील.'' ७४:२६-२०

**कोणता नरक कोणासाठी?**

१) **जहन्नम** – हे नरक परमेश्वराच्या 'जुलइकाब' या नावाशी निगडित आहे. हे श्रद्धाहीन (काफ़िर) आणि ईश्वरास सहभागी मानणारे (मुश्रिक) लोकांसाठी राखीव आहे. हिच्या २,४३,००,००० श्रेणी, दर्जे, प्रखंड आहेत.

२) **हाविया** – हे परमेश्वराच्या 'ग़ज़ब' या नावाशी निगडित आहे. हे नरक फूट पाडणारे, दांभिकासाठी राखीव आहे. हिच्या १८,८०,००० श्रेणी, दर्जे, प्रखंड आहेत. हे अगदी खालच्या दर्जाच्या नरकाग्नीचे नाव आहे.

३) **जहीम** – हे नरक परमेश्वराच्या 'आदिल' या नावाशी निगडित आहे. हे जुल्मी, ईर्षा व द्वेष-मत्सर करणारे, उद्धट लोकांसाठी राखीव आहे. हिचे ७,२०,००० दर्जे, श्रेणी, प्रखंड आहेत.

४) **सईर** – हे परमेश्वराच्या 'जिलबत्श' या नावाशी निगडित आहे. हे नरक व्यभिचार, कलह, नास्तिकता, उपद्रव माजवणाऱ्या सैतानी प्रवृत्तीच्या लोकांसाठी राखीव आहे. हिचे १,०६,२०,००० दर्जे, श्रेणी, प्रखंड आहेत.

५) **उस्रा** – हे परमेश्वराच्या 'शदीद' या नावाशी निगडित आहे. हे नरक लोभ, मत्सर, वासना, इहलौकिक वैभवात रस घेणारे लोकांसाठी राखीव आहे. हिचे १४,४०,००० दर्जे, श्रेणी, प्रखंड आहेत.

६) **लज़ा** – हे परमेश्वराच्या 'मुंतकिम' या नावाशी निगडित आहे. अल्लाहची भक्ती न करणारे, पाखंडी, मदिरापान करणारे, ईश्वराच्या विधीनिषेधाज्ञा न पाळणारे, गुन्हेगार यांच्यासाठी राखीव आहे. हिचे ३,६०,००० दर्जे, श्रेणी, प्रखंड आहेत.

७) **सक़र** – हे परमेश्वराच्या 'मुज़िल' या नावाशी निगडित आहे. हे नरक घमेंडखोर, आत्मश्लाघी (फ़िरौनासारखे), ईश्वराच्या भक्तीपासून पाठ फिरवणारे अशा लोकांसाठी राखीव आहे. हिचे ५७,६०,००० दर्जे, श्रेणी, प्रखंड आहेत.

## ३६) वासना (नफ़्स)

वासना (नफ़्स) एक द्रव्य-विशेष आहे. हे गुण नव्हे. ही नाना रूपे धारण करते. ही सर्व अपकृत्ये व दुष्कृत्यांचे मूळ आहे. वासनेमुळे आत्मा कलुषित होतो. त्यामध्ये दुष्ट भावना निर्माण होतात. वासना आत्म्यास नरकाकडे ओढून नेते. परमेश्वराने वासनेस यासाठी निर्माण केले आहे की आत्मा हा ईश्वरास विसरू नये. पवित्र आत्मा हा आत्म्यास वर घेऊ जातो. दैवी वृत्तीचे हे निवासस्थान आहे. म्हणून साधक हा आत्म्याच्या साहाय्याने

वासनेवर नियंत्रण करू शकतो. हिच्याच अस्तित्वामुळे साधक हा सदैव सावधानचित्त राहतो, आणि आपल्या आध्यात्मिक मार्गावर अविचल राहतो. वासनेवर विजय मिळवण्यासाठी सूफ़ी साधक हे वेगवेगळ्या उपायांचा अवलंब करतात. यापैकी काही बाह्य उपाय आहेत, तर काही आंतरिक आहेत. वासनेचे दमन करण्यासाठी सूफ़ी साधक मौनधारणा (मौनव्रत), एकांत सेवन आणि उपवास या व्रतांचा आश्रय घेतात. अनुभवसिद्ध गोष्ट अशी आहे की उपवास व्रतामुळे वासनेवर नियंत्रण मिळवता येते, आणि यांच्या अभ्यासामुळे वासना हळूहळू पवित्र आणि शुद्ध होत जाते.

वासनाशुद्धीच्या प्रक्रिया लक्षात घेऊन तिच्या श्रेणी याप्रमाणे प्रस्थापित केल्या आहेत – (१) नफ़्से अम्मारा (दुष्ट आत्मा), (२) नफ़्से लव्वामा (प्रदूषणकारी आत्मा), (३) नफ़्से मुल्हिमा (अनुप्रणित आत्मा), (४) नफ़्से राजिय्या (संतुष्ट आत्मा), (५) नफ़्से मरजिय्या (तुष्टिदायक आत्मा), (६) नफ़्से मुतमइन्ना (प्रशांत आत्मा), आणि (७) नफ़्से साफ़िय्या व कामिल (विशुद्ध आणि परिपूर्ण आत्मा).

साधारणपणे सूफ़ी नफ़्स अर्थात वासनेला मानवाचे समस्त दुर्गुणांचे मूळ मानतात. 'नफ़्स'ला भारतीय तत्त्वज्ञानाच्या भाषेत 'अविद्या माया' म्हणता येईल. सूफ़ी तत्त्वज्ञ अब्दुल करीम जीली इब्लीस या शैतानांच्या प्रमुखास नफ़्सपासून निर्माण झालेला मानतात, आणि हाच समस्त दुर्गुणांचा स्रोत व कारण बनतो. सामी धर्मावलंबी शैतानास ईश्वराचा शत्रू मानतात. परंतु सूफ़ींचे असे मत आहे की ईश्वरास प्रतिद्वंद्वी असणे अशक्य आहे. ते शैतानाला पण परमेश्वराचा सेवक मानतात. तो ईश्वराच्या आदेशावरूनच भक्त किंवा साधकांची कठोर परीक्षा घेत असतो. सूफ़ींच्या मते तो परमेश्वराची सेवा विपरीत पद्धतीने करत असतो.

१३



## प्रकरण १३

# परलोक (आख़िरत) : तौलनिक विवेचन[५०]

इस्लाम धर्मामध्ये 'आख़िरत' अर्थात परलोकाची धारणा मान्य आहे. पवित्र कुराणामध्ये पारलौकिक जीवनामध्ये आस्था ठेवण्यासाठी जागोजागी समर्थन आहे. इस्लाम धर्मानुसार, इहलोकाचे निश्चित असे आयुष्य आहे. हा सीमित अवधी समाप्त झाल्यानंतर एक वेळ अशी येईल की तेव्हा या सृष्टीची संपूर्ण व्यवस्था कोलमडून पडेल. त्यावेळेस ईश्वर एका नवीन लोकाची निर्मिती करेल, ज्याचे नियम सर्वथा भिन्न असतील. त्या लोकामध्ये म्हणजेच परलोकामध्ये रहस्य हे रहस्य राहणार नाही. अप्रत्यक्ष हा प्रत्यक्ष बनून बोलू लागेल, आणि वास्तव स्वतःच प्रकट होऊन जाईल. तेथे अल्लाह सर्व मानवांना, जे सुरुवातीपासून आतापर्यंत झाले असतील, भलेही ते कोणत्याही देशात अथवा स्थळी मेलेले असतील, त्यांचा धर्म–कर्म कोणता का असेना, पुन्हा जिवंत करून एकत्र करील आणि त्यांच्या बऱ्या–वाईट कर्मासंबंधी निर्णय देईल. ज्यांनी सत्कर्मे केली असतील, ज्यांनी ईश्वराज्ञापालन केले असेल त्यांना 'जन्नत' म्हणजेच स्वर्गलाभ होईल आणि ज्यांनी दुष्कृत्ये – दुष्कर्म केले असतील त्यांना 'दोज़ख़' म्हणजेच नरकामध्ये ढकलून दिले जाईल. पवित्र कुराणामध्ये या दिवसासाठी 'क़यामत' (प्रलय दिवस) आणि 'हश्र जज़ा' (न्यायनिवाड्याचा दिवस) हे शब्द उपयोगात आणले गेले आहेत.

मानवाचा मृत्यू अटळ आहे. इस्लामी धारणेनुसार ''प्रत्येक सजीवास मृत्यूची चव चाखावी लागणार आहे.'' ३:१८५, २१:३५ ''तुम्ही जिथे कुठे असाल, (तुमची ठरलेली वेळ आल्यावर), मृत्यू तुम्हाला गाठेल, मग तुम्ही मजबूत बांधलेल्या (मोठमोठ्या) वाड्यात का असेना.'' ४:७८ ''तुमच्यापैकी कोणा एकाची मृत्यूची वेळ येते, तेव्हा आमचे पाठवलेले देवदूत त्याचा प्राण काढून घेतात, आणि ते आपल्या कर्तव्यात कधीही कसूर करत नाहीत.'' ६:६१ ''आणि तुम्ही जर ते पाहू शकला असता, जेव्हा देवदूत श्रद्धाहीन लोकांचे आत्मे काढून घेतात, (व) त्यांच्या मुखावर आणि पाठींवर प्रहार करून (असे म्हणतात) तुम्ही जळण्याची शिक्षा भोगा.'' ८:५० ''मग जेव्हा मृत्युदूत यांच्या चेहऱ्यावर आणि पाठीवर ठोसे लगावून प्राण काढतील, तेव्हा त्यांची काय अवस्था होईल. याचे कारण हे आहे की, त्यांनी त्या मार्गाचे अनुसरण केले, जो अल्लाहला क्रोधीत करणारा होता, आणि त्याला प्रिय असलेल्या मार्गाचा मात्र त्यांनी तिरस्कार केला. परिणामी अल्लाहनेही त्यांची कृत्ये निष्फळ करून टाकली.'' ४७:२८ आणि आज्ञाधारकांचे प्राणहरण करताना देवदूत त्यांना म्हणाले, ''तुम्हाला शांती लाभो, तुम्ही जी कर्मे करत होतात त्याचा मोबदला म्हणून स्वर्गात प्रविष्ट व्हा.'' १६:३२ मृत्युनंतर आत्म्यांना ज्या लोकांमध्ये ठेवले जाते, तेथून ते इहलोकामध्ये परत येऊ शकत नाहीत.

एवढेच नव्हे तर, मरणोत्तराच्या वेळेपासून ते प्रलय दिवसा (क़यामत)पर्यंत श्रद्धाहीनास रात्रंदिवस नरक (दोज़ख़) दाखवला जातो.

''(ती दुःखदायक शिक्षा म्हणजेच) (नरकाचा) अग्नी. रात्रदिवस त्यांना त्या (नरकाग्नीसमोर) उभे केले जाते, आणि त्यादिवशी जेव्हा नियत वेळ येईल (तेव्हा असे सांगण्यात येईल की) फ़िरऔनच्या लोकांना अत्यंत कठोर शिक्षेच्या (खाईत) फेकून द्या, आणि (नरका)ग्नीमध्ये ते जेव्हा एकमेकांशी वितंडवाद घालतील तेव्हा जे दुर्बल आहेत, ते गर्व करणाऱ्या लोकांना म्हणतील (की), 'निःसंशय, आम्ही तुमचे अनुयायी होतो, तेव्हा (आज) तुम्ही आम्हाला त्या आगीच्या एखाद्या हिश्शापासून वाचवाल काय?' ज्यांनी गर्व केला होता ते म्हणतील (की) 'आपण सर्वजण त्यामध्ये पडलेले आहोत.' अल्लाहने (त्याच्या) सेवकांमध्ये आधीच निवाडा केलेला आहे.'' ४०:४६-४८

या उल्लेखावरून असे ज्ञात होते की इस्लाम धर्मानुसार, मनुष्य हा सर्वस्वी विलुप्त (नष्ट) होत नाही. फक्त त्याचे सध्याचे शरीर त्याच्यापासून हिरावले जाते. त्याचे व्यक्तित्व त्याच्या मृत्युनंतरसुद्धा बाकी असते. सुख-दुःखाची अनुभूती पण यथापूर्व होत असते. तसेच, हे पण ज्ञात होते की परलोकामध्ये कुणीही कुणाच्या कामी येत नाही - येऊ शकत नाही. लोकांना पथभ्रष्ट करणारे आणि स्वतः सन्मार्गापासून ढळलेले - विचलित झालेले - यांपैकी कोणीही अल्लाहच्या शिक्षेपासून वाचू शकत नाही.

'छांदोग्योपनिषद'मध्ये नाड्यांच्या ऊर्ध्वगमनास मृत्यू मानण्यात आला आहे. ''हा प्राण जेव्हा या शरीरापासून निघून जातो, तेव्हा हा किरणांच्या मदतीनेच वर जातो. हृदयस्थित ब्रह्माची उपासना करणारा तो उपासक 'ओम' म्हणत आत्म्याचे ध्यान करत स्वस्थ अवस्थेसह वर गेलेला असतो. (आणि जर उपासना करणारा नसेल तर याहून वेगळी अवस्था होते.) तो उपासक शरीरामधून निघून जेवढ्या वेळेत चित्त (प्राण) फेकतो, तेवढ्याच कालावधीत तो आदित्यमंडळामध्ये जाऊन पोहोचतो. आदित्यच ब्रह्मलोकाचे प्रसिद्ध द्वार आहे. त्या दारातून उपासक ब्रह्मलोकामध्ये प्रवेश करतो. म्हणून तो उपासकास ब्रह्मलोकाची प्राप्ती करून देणारा आहे, आणि उपासना करणारा अविद्वान सूर्याच्या प्रकाशा (तेजा)मुळे शरीरामध्ये थांबल्याकारणाने सुषुम्ना नाडीमधून न निघता तो दुसऱ्या (इतर) नाडींमधून निघून जातो. त्यामुळे आदित्य त्यांचा (अव)रोधक बनतो.'' छांदोग्योपनिषद् - ८।६।५

मरणोत्तर काळामध्ये जीवाच्या अवस्थेचे वर्णन 'कठोपनिषद्'मध्ये असे करण्यात आले आहे -

''*योनिमन्ये प्रपद्यन्ते शरीरत्वाय देहिनः ।*
*स्थाणुमन्ये नुसंयन्ति यथाकर्म यथाश्रुतम् ।।*''

- वल्ली २, मंत्र संख्या ७.

अर्थात आपले कर्म आणि ज्ञानानुसार कितीतरी देहधारी तर शरीर धारण करण्यासाठी कोणत्या तरी योनीस प्राप्त होतात आणि कितीतरी स्थावर-भावास प्राप्त होतात. तात्पर्य हे की ज्याने जसे कर्म केले असेल त्या कर्मानुसारच त्याला फळ प्राप्त होत असते. 'यथा प्रज्ञं हि संभवाः'पासून पण याच तथ्याची पुष्टी होते. म्हणूनच पवित्र कुराणाच्या अधिकांश श्लोकांमध्ये सत्कर्मावर भर देण्यात आला आहे. खरोखर अल्लाहच्या मार्गात

प्राणाची आहुती देणारे नित्य-सदैव जिवंत असतात. ''जे अल्लाहच्या मार्गात मारले गेले आहेत, त्यांना मृत समजू नका ते तर त्यांच्या विधात्याजवळ जीवित आहेत, (आणि) त्यांचा निर्वाह (त्याच्याकडून)केला जात आहे.'' ३:१६९. इंजील अर्थात बायबलमध्ये याच बाबीस अशा प्रकारे सांगितले गेले आहे, ''हे बंधूनो! मी असे इच्छीत नाही की ज्या विषयापासून तुम्ही निद्रिस्त आहात त्यापासून अजाण राहावे. आशा नसलेल्या इतरांमध्ये तुम्ही शोक करावे, कारण येशू मेला व पुन्हा जिवंत झाला, यावर जसा आमचा विश्वास आहे, तशाच प्रकारे जे येशूमध्ये निद्रिस्त आहेत, त्यांना पण ईश्वर त्यांच्यासोबत आणेल. कारण की प्रभूच्या वचनाप्रमाणे आम्ही तुमच्याशी असे म्हणतो की आम्ही जे जिवंतच आहोत, आणि प्रभूच्या आगमनापर्यंत वाचवून राहू तर जे निद्रिस्त आहेत त्यांच्यापेक्षा (आम्ही) पुढे कधीच जाणार नाही. कारण प्रभू स्वतःच मोठ्या शब्दा(नादा)सहित, प्रमुख ख्रीस्टाच्या शब्दांसहित आणि ईश्वराच्या तुतारीनादासह स्वर्गापासून खाली उतरेल, आणि जे ख्रीष्टामध्ये मृत आहेत, तेच प्रथम जागे होऊन उठतील आणि आम्ही जे जिवंत आहोत आणि वाचलेले आहोत एकत्रच त्याच्यासोबत प्रभूशी भेटण्यासाठी मेघांमध्ये आकाशावर ओढवले जाऊ, आणि अशा प्रकारे आम्ही नित्य (सदैव) प्रभूसोबत राहू.'' थिस्सलुनीकियांना. ४:१३-१८

पवित्र कुराणामध्ये क़यामत म्हणजे प्रलय दिवसाचे सविस्तर वर्णन आहे. या वर्णनानुसार प्रलय दिवस निश्चितच (येणार) आहे. सर्व लोक प्रलय दिवशी आपल्या कर्मांचा मोबदला प्राप्त करण्यासाठी जिवंत एकत्र उठवले जातील. ''निःसंशय, निर्णयाच्या दिवसाची एक नियत वेळ आहे.'' ७८:१७ ''तो दिवस निश्चितपणे येणार आहे, जेव्हा आम्ही अल्लाहची जाण ठेवून असलेल्यांना सन्माननीय अतिथीप्रमाणे कृपावंत (अल्लाह) समोर एकत्रित करू, आणि अपराध्यांना नरकाकडे तहानलेल्या जनावरांच्या कळपाप्रमाणे हाकलत नेऊ.'' १९:८५-८६. ''ते (अपराधी) लोक केवळ याची प्रतीक्षा करत आहेत की ती घटका अचानक त्यांच्यावर यावी आणि तिची त्यांना तेव्हा कल्पनाही नसावी.'' ४३:६६ म्हणजेच प्रलय अकस्मात होईल, त्याची पूर्वकल्पना पण कुणालाच असणार नाही. प्रलय घटकेच्या स्वरूपाचे वर्णन करताना पवित्र कुराणाच्या अनेक श्लोकांमध्ये असे म्हटले गेले आहे की, इहलोकाचा कालावधी संपल्यानंतर एक वेळ असा येईल की या सृष्टीची समस्त व्यवस्थाच कोलमडून पडलेली असेल. जसे -''जसे सूर्य व चंद्र यांना एकत्र आणण्यात येईल.'' ७५:९ ''तेव्हा जेव्हा नक्षत्रांचा प्रकाश हिरावून घेण्यात येईल, आणि जेव्हा आकाश दुभंगण्यात येईल, आणि जेव्हा पर्वतांना उडवून देण्यात येईल.'' ७७:८-१० ''ज्या दिवशी शिंग फुंकण्यात येईल, आणि तुम्ही फार मोठ्या संख्येने याल, आणि आकाश उघडण्यात येईल आणि (ते सर्व) दरवाजेच दरवाजे होऊन जातील, आणि पर्वतांना चालविण्यात येईल व ते असे होऊन जातील की (जणू काही ते) मृगजळच. निःसंशय, नरक दबा धरून बसलेला आहे.'' ७८:१२-२१ ''जेव्हा सूर्याला गुंडाळण्यात येईल आणि जेव्हा नक्षत्रे निस्तेज होतील, आणि जेव्हा पर्वतांना चालविण्यात येईल.'' ८१:१-३. ''जेव्हा पृथ्वी आपल्या प्रचंड हादऱ्याने हादरवली जाईल आणि पृथ्वी आपले ओझे बाहेर काढून फेकून देते, त्यादिवशी लोक विखुरलेल्या स्थितीत बाहेर येतील ते यासाठी की त्यांना त्यांच्या कर्मांची परिणती दाखवता यावी.'' ९९:१-२।६. ''ज्या दिवशी माणसे विखुरलेल्या पतंगासारखी झालेली असतील आणि पर्वत पिंजलेल्या लोकरीसारखे झालेले असतील.'' १०१:४-५. ''जेव्हा एकच जोरदार फुंक मारून शिंग फुंकण्यात येईल, आणि धरती व पर्वत यांना वर उचलण्यात येईल व एका

आघातात त्यांचे तुकडे तुकडे करण्यात येतील, त्या दिवशी (महान) घटना घडेल आणि आकाश दुभंगून जाईल व त्यादिवशी ते निस्तेज होऊन जाईल.'' ६९:१३-१६.

उपरोक्त उदाहरणामध्ये एकीकडे 'क़यामत' प्रलयाचे भीषणतेचे वर्णन आहे तर दुसरीकडे त्याचे रोमांचकारी विवेचन आहे. तसेच त्या गोष्टींचा पण उल्लेख आहे की, ज्या मरणोत्तर पुन्हा जिवंत करण्याच्या वेळेस घडतील. ''जेव्हा आकाश दुभंगून जाईल, आणि जेव्हा नक्षत्रे विखरून जातील आणि जेव्हा (महाभयानक सुनामी - समुद्री वादळामुळे) समुद्र वाहू लागतील, आणि जेव्हा थडगे (कबरी) उघडले जातील.'' ८२:१-४ ''आणि जमिनीला पसरवून अगदी सपाट प्रदेश बनवण्यात येईल. तिच्यामध्ये जे काही आहे, ते सर्व बाहेर टाकून ती रिकामी होऊन जाईल.'' ८४:३-४ ''जेव्हा संपूर्ण पृथ्वी (शेवटच्या प्रलयंकारी भूकंपाने हादरवूरन सोडली जाईल, तेव्हा ती आपले सर्व ओझे बाहेर फेकून देईल. मनुष्य (तिला असे पाहून ओरडू लागेल, 'तिला झाले तरी काय?' त्या दिवशी ती (तिच्यावर घडलेल्या) सर्व घटना कथन करू लागेल.'' ९९:१-४ सृष्टीच्या या प्रलयात्मक स्थितीमुळे सर्वजण हतप्रभ होऊन जातील.'' तेव्हा संपूर्ण मानवजात विखुरलेल्या पतंगासारखी झालेली असेल.'' १०१:४ त्या वेळेस परेशानी आणि घबराटीमध्ये उत्तमोत्तम मालाची परवाह पण कुणीच करणार नाही. याबाबतीत विचार करण्यास त्यांना अवसरच कुठून बरे असेल!'' आणि जेव्हा दहा महिन्यांच्या गाभण सांडण्या (उंटीणी) मोकाट सोडून दिल्या जातील.'' ८१:४ ''ज्या दिवसी भयानक भूकंपाने (संपूर्ण पृथ्वी) हादरून जाईल आणि त्या पाठोपाठ (आणखी हादरे बसतील, त्या दिवशी (लोकांची) हृदये (त्या दहशतीमुळे वेगाने) धडधडू लागतील. त्यांच्या नजरा खाली खिळलेल्या असतील.'' ७९:६-९. ''आणि ज्या दिवसी शिंग फुंकले जाईल, तेव्हा सर्व (प्राणिमात्र) जे आकाशात आहेत व जे पृथ्वीवर आहेत, त्याच्या भीतीने भांबावून जातील. पण यापासून ते लोक सुरक्षित असतील, ज्यांच्याबाबतीत अल्लाहची इच्छा असेल आणि ते सर्वजण विनम्र होऊन त्याच्यासमोर हजर होतील. तुम्ही पर्वतांना पाहता आणि तुम्हाला (सध्या) वाटते की, ते भक्कमपणे अढळ अवस्थेत आहेत. पण पुनरुत्थानाचे शिंग फुंकल्यानंतर हे (पर्वत) ढग चालतात तसे चालू लागतील.'' २७:८७-८८ देवदूत प्रत्येक रांग आणि गटाजवळ पोहोचतील. लोकांना त्यांचे कर्म-पत्रक दिले जाईल. त्यामध्ये त्यांच्या कर्मांचा संपूर्ण सविस्तर हिशोब असेल. आपल्या प्रभूसमोर जो त्यावेळेस हजर झाला असेल, त्याच्या सिंहासना ('अर्श')वर हे कर्मपत्रक उघडे करून ठेवलेले असेल. अल्लाह (त्या त्या कर्मपत्रकानुसार) निर्णय देईल (ऐकवील). ज्याने जसे केले असेल त्यानुसारच त्याचे फळ मिळेल. पवित्र कुराणात म्हटले आहे, ''जेव्हा ज्याची कर्मवही त्याच्या उजव्या हातात दिली जाईल, त्याचा हिशेब लगेच सहजपणे आटोपला जाईल. आणि तो आपल्या लोकांकडे आनंदाने परत येईल. आणि ज्याची कर्मवही त्याच्या पाठीच्या मागून देण्यात येईल, तो स्वतःच्या कायमस्वरूपी विनाशासाठी प्रार्थना करू लागेल. आणि तो धगधगत्या अग्नीत प्रवेश करेल.'' ८४:७-१२. याच संदर्भात, कर्मानुसार मानवांच्या तीन श्रेणी वर्णित आहेत. ''(त्या दिवशी समस्त मानवजात प्रामुख्याने) तीन समूहांत विभागली जाईल. पहिला समूह उजव्या बाजूला असेल (म्हणजे जीवनात सन्मार्ग अवलंबलेल्यांचा असेल) वाह! उजव्या बाजूला असणाऱ्यांचे काय सौभाग्य! आणि दुसरा समूह डावीकडचा (म्हणजे कुमार्ग अवलंबिलेल्यांचा) असेल. (खरोखर), किती अभागी आहेत ते डावीकडचे! आणि तिसरा समूह (श्रद्धा व सत्कर्मांच्या बाबतीत) अग्रेसर (राहिलेल्या) लोकांचा असेल. ज्यांना

(अल्लाहच्या) सर्वांत निकटचे स्थान लाभेल. ते ऐश्वर्यसंपन्न स्वर्गात वास्तव्य करतील.'' ५६:८-१२. थोडक्यात, उजवीकडील गट हा भाग्यवान असतो, तर डावीकडील दुर्भागी आणि आघाडीवरील लोक सर्वात पुढे गेलेले व ईश्वराशी सर्वात अधिक जवळचे आहेत. (असतील.)

'क़यामत' (प्रलयकाळ वा पुनरुत्थान घटका)च्या उपरोक्त वर्णनामध्ये जो संकेत आहे तो 'श्रीमद्‌भागवता'च्या पुढील विवरणाशी अत्यंत मिळते जुळते असे आहे -

''परमेष्ठी ब्रह्माची शंभर वर्षे व्यतीत (संपल्यानंतर) झाल्यानंतर प्राकृत प्रलय होतो. या वेळेस अंडकोशाचे संघात लीन होऊन जाईल. सुरुवातीची शेकडो वर्षेपर्यंत वर्षा (पाऊस) होणार नाही. त्यामुळे मानवादी जीव तडफडून नष्ट होऊन जातील. सर्व प्रकारच्या पाण्यास सांवर्तक (प्रलयकालीन) सूर्य खेचून घेतो. त्यानंतर संकर्षण भगवानच्या मुखातून भडकलेला अग्नी समस्त चराचरास भस्मसात करेल. अशा प्रकारे चारी बाजूस जळणाऱ्या भूपिंडाची दशा हुबेहूब जळणाऱ्या गोळ्यासारखी होऊन जाईल. मग शेकडो वर्षे प्रचंड वेगाने तीव्र वायू वाहू लागेल आणि शेकडो वर्षांपर्यंत मुसळधार वर्षा (पाऊस) होईल. परिणामी संपूर्ण संसार म्हणजेच विश्व जलमय होऊन जाईल.''- श्रीमद्‌भागवत, १७:१३. / १२/४/५-१३

'मनुस्मृती'मध्ये, ज्याच्यापासून सृष्टीचा उद्‌भव झालेला आहे, त्या संपूर्ण विश्वाच्या महान आत्म्यामध्ये लीन (विलीन) होऊन जाण्यास प्रलय असे म्हटले आहे -

'' *युगपत्तु प्रलीयन्ते यदा तस्मिन्महात्मनि ।*
*तदायं सर्वभूतात्मा सुखं स्वपिति निवृतः ।।* '' - मनुस्मृती, १:५४

मनुस्मृतिच्या उक्त विवरणावरून या तथ्याची पुष्टी होते की ज्या तत्त्वापासून सृष्टीची उत्पत्ती होते, त्याच तत्त्वामध्ये तिचे विलय होते. शीख धर्म संस्थापक गुरू नानक यांच्या मतानुसार पण याच तथ्याची पुष्टी होते. 'तुझते उपजहि तुझ मांहि समावहि' (मारू सोलह, १४) अथवा 'जिसते उपजै तिसते बिनसै' (सिरी रागु, सबद १६) इत्यादी उक्तींमध्ये या सृष्टीचे त्याच परमात्म्यामध्ये विलीन होऊन जाण्याचे संकेत आहे, जो स्थूल आणि सूक्ष्म सृष्टीचा निमित्त आणि उपादान कारण आहे. उत्पत्तीच्या वेळेस जे तत्त्व ज्या तत्त्वाचे उत्पादक असते, त्याच प्रकारे विलोम (विरुद्ध) क्रमाने उत्तरोत्तर ते तिच्यामध्ये विलीन होऊन जाते. विलीन होण्याचा क्रम 'श्रीमद्‌भागवता'मध्ये अशा तऱ्हेने वर्णित आहे -

''जेव्हा जलमग्न पृथ्वीचे गुण गंध नष्ट होऊन जाईल, तेव्हा पृथ्वी पण नष्ट होऊन जाईल. पाण्याचा गुण - रसास अग्नी स्वाहा करेल, तेव्हा पाणी पण अग्नी बनून जाईल. तेजाचे गुण रूप हे वायूमध्ये विलीन होऊन जाईल, तेव्हा तेज पण राहणार नाही. वायूचे स्पर्शादी गुण आकाशामध्ये सामावले जातील, तेव्हा वायू पण नष्ट होऊन जाईल. मग आकाशाचे गुण शब्द यास सूक्ष्म भूत गिळंकृत करतील. ते पण त्याच्यामध्ये विलीन होऊन जाईल. त्यानंतर इंद्रियांची अधिष्ठाता देवता - अहंकार - हा उत्तरोत्तर महतत्त्वामध्ये लीन होऊन जाईल. तेव्हा (शेवटी) तेच शुद्ध, निर्लेप, निरंजन ब्रह्म बाकी राहील. 'शेष (उरलेला) संसार अव्यक्त स्वरूपामध्ये परिवर्तित होऊन जाईल.'' - श्रीमद्‌भागवत १२।४।१४-१८.

पवित्र कुराणमध्ये सुद्धा अनेक ठिकाणी उल्लेख आहे की प्रलयामध्येसुद्धा प्रभू (परमेश्वर) बाकी राहील. ''पृथ्वीवर (तसेच आकाशात) जे जे आहे ते सर्व संपुष्टात येणार आहे आणि भव्यतेने व महानतेने परिपूर्ण असे

तुझ्या पालनकर्त्याचे स्वत्त्व नेहमीसाठी कायम राहणार.'' ५५:२६-२७. त्याच्याशिवाय इतर सर्व वस्तू नाश पावतील. इंजील म्हणजेच बायबलमध्ये प्रलय (क़यामत) दिवसास 'ईश्वराचा दिवस' ही संज्ञा दिली गेली आहे. त्या दिवसाचे विवरण प्रस्तुत करताना सांगितले गेले आहे की ''परंतु रात्रीच्या वेळेस चोर जसा येतो, तशाच प्रकारे प्रभूचा दिवस येईल. त्यामुळे आकाश भयकंपित होईल आणि तत्त्व अति तप्त होऊन वितळून जातील आणि पृथ्वी व तिची कार्ये भस्मसात होऊन जातील. तर मग ज्या अर्थी ह्या सर्व वस्तू नाशवंत आहेत, त्या अर्थी तुम्हास याची जाणीव झाली पाहिजे की पवित्र आचरण आणि भक्तीमध्ये कशा प्रकारचा माणूस व्हायला पाहिजे, आणि कशा प्रकारे ईश्वराच्या दिवसाची वाट पाहिली पाहिजे, आणि तो दिवस लवकर यावा म्हणून कसे प्रयत्नशील राहिले पाहिजे, की ज्या दिवसामुळे आकाश जळू लागलेले असेल, आणि तत्त्व अति तप्त होऊन वितळू लागतील.'' - (पितर ३:१०-२१-१२)

दुसरे एक उदाहरण पाहा. पुनरुत्थाना (क़यामत)च्या भीषणतेचे चित्र हृदयामध्ये धडकी भरवून देणारे असे आहे. - ''आणि पहा, धरणीकंप झाले आणि सूर्य कांबळीसारखा काळा झाला आणि चंद्र रक्तासारखा झाला, आणि झंजावातामुळे हेलकावे खात असलेल्या गूलरच्या वृक्षापासून त्याची कच्ची गूलरे जशी झडतात, तशाच प्रकारे आकाशातील तारे पृथ्वीवर खाली पडले आणि जे आकाश कागदाच्या पत्रावळीप्रमाणे गुंडाळले गेले होते, ते सुटे झाले आणि सर्व पर्वत आणि टापू आपापल्या जागेपासून हटले.'' - (प्रकाशित वाक्य ६:१२-१४)

संक्षेपात त्या दिवशी एका भयंकर ध्वनीसह (गर्जनेसह) पृथ्वी फाटून जाईल. आकाश उडून जाईल आणि स्वर्गवासी आत्म्यांचे भौतिक रूप उष्णतेच्या आधिक्यामुळे विरघळून वाहून जाईल, आणि तेव्हा जीवात्म्यांना एक नवीन शरीर प्राप्त होईल.

ते ईश्वराच्या निर्णयासाठी प्रस्तुत केले जातील. या संबंधी विवरण पुढील ओळींमध्ये दृष्टव्य आहे - ''आणि मी एक मोठे पांढरे सिंहासनास आणि त्यावर आरूढ होणाऱ्यास पाहिले. त्याच्या समोरून पृथ्वी आणि आकाश पळून गेले, आणि त्यांना लपण्यास जागा मिळाली नाही, आणि मी सर्व लहान मोठ्या मृतकांना ईश्वरासमोर उभे पाहिले आणि ग्रंथ उघडले गेले दुसरे म्हणजे जीवनाचे ग्रंथ उघडले गेले आणि ग्रंथात लिहिलेल्या गोष्टींवरून मृतकासंबंधी विचार त्यांच्या कर्मानुसार झाला आणि समुद्राने आपल्यामधील समाविष्ट मृतकांना देऊन टाकले आणि त्यांपैकी प्रत्येकाचा विचार त्यांच्या कर्मानुसार करण्यात आला आणि मृत्यु व परलोक यांना अग्नीच्या प्रवाहात टाकण्यात आले. हा तर दुसरा मृत्यू आहे आणि ज्याचे नाव जीवनाच्या ग्रंथामध्ये लिहिलेले दिसून आले नाही, त्याला आगीच्या प्रवाहामध्ये टाकून देण्यात आले.'' - (प्रकाशित वाक्य, २०:११-१५)

उपरोक्त वर्णन इस्लाम धर्माच्या 'क़यामत' (पुनरुत्थान) संबंधी मान्यतेहून वेगळे नाही. कर्म-पत्राच्या वैज्ञानिकतेविषयी येथे विचार करणे अपेक्षित आहे.

आपण जे काही बोलतो, आमच्या तोंडातून जो पण ध्वनी निघतो, तो तरंगाचे रूप धारण करून वायुमंडलामध्ये अंकित होत असतो. याच तथ्यास सर मुहम्मद यामीन खाँ यांनी 'गॉड, सोल अँड यूनीव्हर्स इन सायन्स अँड इस्लाम' नावाच्या आपल्या अभ्यास ग्रंथात अशा रीतीने व्यक्त केले आहे -

''प्रत्येक शब्द जे आपण बोलतो, प्रत्येक विचार जो आपल्या मनामध्ये घोळतो, प्रत्येक कार्य जे आपण करतो – हे सर्व तरंग निर्माण करतात. हे तरंग 'क़यामत' म्हणजेच पुनरुत्थानापर्यंत विद्यमान असतील. आपले शब्द हवेमध्ये तरंग निर्माण करतात, आणि जितका वेळ हे तरंग याच आयामांमध्ये राहतात, तेवढ्या वेळेपर्यंत आपले कर्णपटल यांस ऐकू शकतात, आणि जेव्हा हे तरंग आमच्या कानांच्या क्षमतेपलीकडे म्हणजेच विस्तारत जातात, तेव्हा आपण यांना ऐकू शकत नाही. परंतु सर्व तरंग त्याच स्थितीमध्ये विद्यमान असतात. हवेमध्ये हे तरंग इतर दुसऱ्या माध्यमांमध्ये तरंग निर्माण करतात, तर आमचे कार्य दुसऱ्या माध्यमास प्रभावित करतात.'' पृ. १०६– १०७.

अशा प्रकारे आमचे शब्द, आमचे विचार आणि आमच्या क्रिया चलचित्राप्रमाणे कर्मपत्राच्या रूपामध्ये सुरक्षित राहतात. नैसर्गिक प्रक्रिया असल्यामुळे लहान–मोठे सर्व कार्य अंकित होत असतात, आणि म्हणूनच तेथे चूक–भूलचा प्रश्नच उपस्थित होत नाही. इस्लाम सांगतो की, मनुष्यास आपल्या प्रत्येक कर्माचा हिशोब द्यायचा आहे. माणसास या दुर्भाग्यपूर्ण परिस्थितीपासून वाचवण्यासाठी पवित्र कुराणामध्ये वारंवार चेतावणी देण्यात आलेली आहे, आणि क़यामत म्हणजेच पुनरुत्थानाचे भयावह चित्र प्रस्तुत करण्यात आले आहे. माणसाच्या असहाय्य अवस्थेकडे संकेत करत एका ठिकाणी म्हटले गेले आहे –

''वत्तकू यौमल्ला तज्ज़ी नफ़्सुन् अन्‌फ़सिन् शैअंव्वला युक्बलु मिन्हा शफ़ाअतुंव्व ला युअ्ख़ज़ु मिनहा अद्‌लुंव्व ला हुम युन्सरून'' २:४८ अर्थात ''आणि त्या (येणाऱ्या) पुनरुत्थानाच्या दिवसाचे भय (जाण) बाळगा, जेव्हा कोणताही मनुष्य, दुसऱ्या मनुष्याच्या किंचितही उपयोगी पडणार नाही, ना त्याच्याकडून कोणाची मध्यस्थी स्वीकारली जाईल. त्यांना कोणतेही साह्य लाभणार नाही.'' २:४८ आणि अशा प्रकारे मानवाच्या मनास कुमार्गापासून हटवून सन्मार्गावर चालण्याची प्रेरणा दिली गेली आहे.

पवित्र कुराणामध्ये 'क़यामत' अर्थात पुरूत्थानाशी निगडित स्वर्ग आणि नरकाचे प्रश्न पण आहेत. ज्या प्रश्नांचा सदरहू धर्मग्रंथामध्ये सुंदर (चांगले) समाधान आहे. पवित्र कुराणामध्ये स्वर्गाचे अत्यंत मोहक चित्र प्रस्तुत केले आहे. इस्लाम धर्मानुसार 'जन्नत' (स्वर्ग), ते स्थान आहे जे सुख आणि आनंदाने सर्वथा परिपूर्ण आहे. अल्लाहच्या आज्ञाधारकांना पुनरुत्थानामध्ये हेच स्थान प्राप्त होणार आहे. या ठिकाणाचे वर्णन करताना म्हटले गेले आहे की, ''त्यांच्यासाठी अशा बागा आहेत, ज्यांत पाण्याचे प्रवाह वाहत असतील, ज्यांची शुद्धता सदैव कायम राहील, आणि अशा दुधाच्या नद्या असतील, ज्याचा स्वाद कधीही बदलणार नाही. तसेच मद्याच्या नद्या असतील, जे (मद्य) पिणाऱ्यांसाठी फारच रूचकर असेल, आणि शुद्ध मधाच्या नद्या असतील. आणि तेथे (स्वर्गनिवासीयांसाठी) सर्व प्रकारची फळे असतील.'' ४७:१५

पवित्र कुराण पुन्हा म्हणते –

''(पण) अल्लाहची जाण ठेवून असलेल्या लोकांसाठी यश नक्की आहे. भव्य बागा आणि द्राक्षांच्या वेली, आणि समवयस्क नवयुवती आणि काठोकाठ भरलेले प्याले. तिथे ते व्यर्थ व खोट्या गोष्टी कधीही ऐकणार नाहीत.'' ७८:३१–३५ ''येथे आम्ही त्यांच्या मनामध्ये जो काही (एक दुसऱ्याप्रती) द्वेषभाव (किंवा अनुचित विचार) असेल, तो काढून टाकू. ७:४३ ते आणि त्यांच्या सहचारिणी सुखद छायेखाली (आलिशान) बिछान्यावर टेकून बसलेले असतील. त्यांच्यासाठी तिथे (नाना तऱ्हेचे) मेवे (फळे) उपलब्ध असतील, आणि

तिथे त्यांना सर्व काही मिळेल, जे ते मागतील.'' ३६:५६-५७ ''अल्लाहची जाण ठेवून (भय बाळगून) जीवन जगलेले लोक सुरक्षित स्थानी असतील. बागांत व सुंदर प्रवाहांच्या सान्निध्यात. ते तलम रेशमी व जरीदार वस्त्रे परिधान करून एकमेकांसमोर बसलेले असतील. असेच होईल. आणि आम्ही त्यांचा मोठे आणि सुंदर डोळे असलेल्या स्त्रियांशी विवाह लावून देऊ. संपूर्ण शांततामय वातावरणात ते तिथे विविध प्रकारची फळे मागवतील. पहिल्या वेळेस आलेल्या मृत्यूनंतर ते तिथे पुन्हा मृत्यूची चव कधीही चाखणार नाहीत, आणि अल्लाहने त्यांना (कायमस्वरूपी) नरकाच्या शिक्षेपासून वाचवलेले असेल.'' ४४:५१-५६.

एक दुसरे विवरण अशा प्रकारे आहे -

''पण ईशभिरू (म्हणजे अल्लाहची जाण ठेवून जीवन जगलेले लोक) त्या दिवशी ऐश्वर्यसंपन्न अशा बागांत असतील. त्यांच्या पालनकर्त्याने त्यांना दिलेल्या सुखदायी गोष्टींचा उपभोग घेत असतील. त्यांच्या पालनकर्त्याचा (सर्वात मोठा कृपाप्रसाद म्हणजे) त्याने त्यांना आगीच्या शिक्षेपासून वाचवलेले असेल. (त्यांना सांगितले जाईल) खा व प्या आणि मजा करा. तुम्ही केलेल्या (सत्)कृत्यांचे बक्षीस म्हणून ते रांगेने मांडलेल्या आरामदायी आसनांवर मस्तपैकी पहुडलेले असतील, आणि आम्ही मोठ्या व सुंदर डोळे असलेल्या रूपवती स्त्रियांशी त्यांना विवाहबद्ध करू. ज्या लोकांनी श्रद्धा धारण केली, त्यांच्या अपत्यांनी (सत्य)श्रद्धेसह आपल्या वाडवडिलांचे अनुसरण केलेले असेल तर अशांनाही आम्ही त्यांच्या सोबतच वास्तव्य प्रदान करू, आणि आम्ही त्यांच्या (चांगल्या) कृत्यांच्या मोबदल्यातून काहीही कमी करणार नाही. प्रत्येक माणूस आपल्या केलेल्या कर्मांत बांधलेला आहे, आणि आम्ही त्यांना त्यांच्या इच्छेनुरूप फळे आणि मांस विपुल प्रमाणांत (कायम) देत राहू. ते एकमेकांपुढे अशा मद्याचे प्याले प्रस्तुत करत असतील, ज्याद्वारे ना नशायुक्त बडबडीस प्रेरणा मिळेल, ना एखाद्या वाईट कृत्यास. आणि अशी रूपवान मुले त्यांच्या सेवेत सदैव तयार असतील, जसे की, ते फार काळजीपूर्वक जतन करून ठेवलेले मोती आहेत.'' ५३:१७-२४.

दुसऱ्या एके ठिकाणी 'जन्नत' म्हणजेच स्वर्गासंबंधी असा उल्लेख आहे -

''ज्यांना (अल्लाहच्या) सर्वात निकटचे स्थान लाभेल (ते) ऐश्वर्यसंपन्न स्वर्गात वास्तव्य करतील. त्याच्यात अनेक आधीच्या लोकांपैकी असतील. नंतरचे (म्हणजे क़यामती-पुनरुत्थानाच्या जवळच्या पिढ्यांपैकी) फारच थोडेसे असतील. त्यांना हवे ते करण्यासाठी (सुंदर व) चिरतरुण सेवक मुले (सदैव) उपस्थित असतील. ते शुद्ध मद्याने भरलेले प्याले व चषक व खुजे घेऊन (त्यांच्याकडे ये जा करत असतील.) ते पिण्याने ना डोके दुखेल, ना नशा येईल. आणि प्रत्येक प्रकारची फळे जी त्यांना हवी असतील, आणि पक्ष्यांचे मांस जे त्यांना आवडत असेल, आणि त्यांच्यासह विशाल व सुंदर डोळ्यांच्या रूपवती सहचारिणी असतील. त्या अशा असतील, जणू त्यांच्या आवरणातच जतन करून ठेवलेले मोती. हे बक्षीस असेल त्या कार्यांबद्दल, जे ते करत असत. ते (स्वर्गाच्या वातावरणात कधीही व्यर्थ किंवा तुच्छ शब्द ऐकणार नाहीत.) फक्त ऐकतील तर (शुभेच्छा देणारे) असे शब्द 'सलाम', 'सलाम' (म्हणजेच तुम्हाला सदैव शांती लाभो!)'' ५६:११-२६. ''(त्यांच्या आसपास) काटेरहित बोरीचे वृक्ष असतील, आणि घोसदार केळीचे वृक्ष (तिथे असतील), आणि लांबवर पसरलेल्या सावलीत (ते असतील). (त्यांच्या शेजारी) पाण्याचे प्रवाह असतील. प्रचंड प्रमाणात फळे (त्याच्यासाठी उपलब्ध असतील.) त्यांचा तुटवडा कधीही निर्माण होणार नाही, ना त्यांच्या (वापरासंबंधाने

कसले) प्रतिबंध असेल. उंच शाही आसने (तिथे त्यांच्यासाठी असतील). (त्यांच्या ज्या सहचारिणी असतील) त्यांना आम्ही (स्वर्गातील स्त्रियांसाठी) परिपूर्ण जीवनसाथीच्या रूपाने निर्माण केलेले आहे, आणि त्यांना कुमारी बनवले आहे. त्या (आपल्या जीवनसाथीशी) प्रेम करणाऱ्या आणि समान वयाच्या असतील.'' ५६:२८–३७

या संदर्भात नबी सल्लल्लाहु अलैहि वसल्लम (अर्थात त्यांच्यावर अल्लाची कृपा व शांती असो) यांचे हे कथन पण द्रष्टव्य आहे. – ''स्वर्गनिवासीयांना म्हटले जाईल : येथे तुम्ही स्वस्थ अर्थात निरोगी राहाल. केव्हाही आजारी पडणार नाही, सदा जिवंत राहणार, कधीही मरणार नाही. नेहमी खुशाल राहाल. कधीही दुःखी–कष्टी राहणार नाही. नेहमी चिरतरुण रहाल, केव्हाही वृद्ध होणार नाही.'' नबी सल्ल. उपरोक्त कथन हे 'कठोपनिषद्'च्या स्वर्गासंबंधी खालील विवरणाशी बरेचशे मिळते–जुळते आहे.

'' *स्वर्गलोके न भयं किंचितास्ति*
*न तत्र त्वं न जरया बिभेती ।*
*उभे तीत्वाशिनायापिपासे,*
*शोकातिगो मोदते स्वर्गलोके ।।* '' – वल्ली १, मंत्रसंख्या १२

अर्थात हे मृत्युदेव! स्वर्गलोकामध्ये कसलीच भीती नाही. तेथे तुझे पण वश चालत नाही. तेथे कोणीही वृद्धावस्थेस भीत नाही. स्वर्गलोकामध्ये पुरुष भूक–तहान दोहोवर विजय मिळवून शोकापासून वर उठून आनंदित होतो. 'अथर्ववेदा'मध्ये पण देवलोकाचे अशाच प्रकारचे वर्णन आहे. ''यत्र सुहार्दः सुकृतो मदन्ति विहाय रोगं तत्त्वः स्वायाः'' – अथर्ववेद, ६।१२०।३ अर्थात स्वर्गामध्ये मित्रतायुक्त पुण्यात्मा लोक आपल्या शारीरिक रोगास त्यागून आनंदीत असतात. दुसऱ्या एका उदाहरणामध्ये सांगितले आहे – ''अस्थिरहित, पवित्र वायुहून निर्मळ, स्वच्छ, पवित्र, स्वर्गलोकांमध्ये जातात. कामाग्नी या देवतांच्या उपस्थेंद्रियास जाळत नाही आणि स्वर्गलोकामध्ये यांच्यासाठी अनेक स्त्रियांचा समूह असतो.'' – अथर्ववेद ४/३४/२

ऋग्वेदाच्या निम्नलिखित मंत्रामध्ये या स्त्रियांचा अशा प्रकारे उल्लेख आहे –

''नव्यानव्या युवतयो भवन्तीमहद्देवानाम् सुरत्वमेकम्'' ३/५५/१६ अर्थात स्वर्गलोकामध्ये देवतांसाठी नव–नवीन युवती असतात. हे देवतांसाठी एक फार मोठी अशी आत्मरति आहे. स्वर्गाच्या स्वरूपवर्णनाबरोबरच स्वर्गलोकाच्या पुण्यात्म्यांच्या निवासियांच्या अवधीचा उल्लेख करत पवित्र कुराणाच्या निम्नलिखित श्लोकांमध्ये म्हटले गेले आहे –

''जे श्रद्धा बाळगून आहेत व सत्कर्मे करत आहेत, अशा लोकांना शुभवार्ता द्या. त्यांच्यासाठी अशा बागा आहेत ज्यांत पाण्याचे (नयनरम्य) झरे प्रवाहित असतील. (तिथे) जेव्हा त्यांना खाण्यासाठी फळे दिले जातील, ते म्हणतील, ही तर तशीच (फळे) आहेत, जशी या पूर्वीदेखील आम्हाला देण्यात आली होती, (तेव्हा त्यांना त्यांचा भूतकाळ आठवेल). त्यांना देण्यात आलेल्या वस्तूंसारख्या (वस्तू) त्यांच्याकडे आणण्यात येतील. त्यांच्यासाठी तिथे शुचिर्भूत जीवनसाथी असतील, आणि ते तिथे सदैव निवास करतील.'' २/२५.

'आपस्तंबधर्म'मध्ये स्वर्गलोकात पुण्यात्म्यांच्या निवासाच्या अवधीचा अशा प्रकारे निर्देश आहे. ह्र

''आभूतसंप्लवास्ते स्वर्गजितः पुनः स्वर्गे बीजार्था भवन्ति'' २/२४/५–६ अर्थात ते लोक प्रलयापर्यंत स्वर्गामध्ये निवास करतात आणि सृष्टीच्या पुनरुत्पत्तीमुळे स्वर्गादी लोकांचे बीजभूत बनून जातात.

महाभारतामध्ये स्वर्गलोकचे विशद वर्णन आहे. त्या अनुसार स्वर्ग हा पुण्यकर्मांनी प्राप्त होणारा देवलोक आहे. याच्यामध्ये इंद्रपुरी प्रमुख आहे. ही शंभर योजने विस्तृत आणि एक हजार दरवाजांनी सुशोभित आहे. तेथे ययातीने एक हजार वर्षेंपर्यंत निवास केले होते. तेथेच नंदनवन आहे. तेथे आपल्या इच्छेनुसार रूप धारण करून अप्सरांशी विहार करत ते दहा लाख वर्षेंपर्यंत राहिले होते. (आदि. ८९/१६,१९) येथे इंद्राची जी सभा आहे, तिची लांबी दीडशे आणि रुंदी शंभर योजनेची आहे. ती आकाशामध्ये विचरण करणारी आणि इच्छेनुसार तीव्र अथवा मंदगतीने चालणारी आहे. तिची उंची पण पाच योजने इतकी आहे. त्यामध्ये वार्धक्य, शोक आणि थकवा यांचा मुळीच प्रवेश नाही. तेथे भिती नाही. ती मंगलमय आणि दिव्य शोभेने युक्त आहे. त्यामध्ये राहण्यासाठी सुंदर सुंदर महाल असून, बसण्यासाठी उत्तमोत्तम सिंहासने ठेवली आहेत. ती रमणीय सभा दिव्य वृक्षांनी सुशोभित आहे. गंधर्व आणि अप्सरा नृत्य, वाद्य आणि गीतांद्वारे नृत्य करतात. – (सभा. अध्याय ७) या स्वर्गामध्ये प्रवेश करण्यासाठी सात दरवाजे आहेत. ते आहेत; दान, तप, शम, दम, लज्जा, सरलता आणि सर्वांवर दया. या दरवाजांमधून या देवलोकामध्ये सहजतेने प्रवेश होऊ शकतो. (आदि. ९०।२२) 'हदीस मिशकात बाबुल जन्नहममध्ये सातव्या आकाशामध्ये स्थित असलेल्या 'जन्नत' म्हणजेच स्वर्गाचे आठ (दर्जे) दर्शविण्यात आले आहेत.

स्वर्गाचे हे श्रेणी–विभाजन कर्माची प्रधानता सिद्ध करते. जो जसे कर्म करील, तो त्याच दर्जाच्या स्वर्गामध्ये प्रवेश करू शकेल. ईश्वरविद्यानुसार प्रकृतीच्या (निसर्ग) सात अवस्थांच्या आधारावर स्वर्गाचे सात खंड कल्पिण्यात आले आहेत. हे सप्तलोक आहेत – भूलोक, भुवलोक, मनोलोक, बुद्धीलोक, आत्मलोक वा निर्वाणलोक, परानिर्वाणलोक आणि महापरानिर्वाणलोक. एका लोकामधून दुसऱ्या लोकामध्ये जाणे, याचा अर्थ चेतनेस एका कोशामधून उचलून दुसऱ्यामध्ये स्थित करणे असा आहे.

बौद्ध धर्मामध्ये स्वर्गास 'सुखावती' असे म्हटले गेले आहे. या धर्मात स्वर्गाचे वर्णन एक वेगळ्याच प्रकारचे आहे. महात्मा गौतम बुद्धाने म्हटले आहे –

''या पृथ्वीपासून हजारो लोकांपलीकडे एक आनंदलोक आहे. याला सुखावती म्हणतात. याच्या आसपास सात काष्टगृह, मोठमोठ्या पडद्यांच्या सात श्रेणी, मोठमोठ्या वृक्षांच्या सात रांगा आहेत. हे अर्हत लोकांचे पवित्र स्थळ आहे. यामध्ये बोधीसत्वांचा अधिकार आहे (चालतो.) तथागत लोक तेथे राज्य करतात. तेथे सात सुंदर सरोवरे आहेत. त्यांमध्ये निर्मळ सुंदर जल (पाणी) आहे. या पाण्याची सात विशेष लक्षणे वा गुण आहेत. हे गुण वा लक्षण वेगवेगळे असून पण एकरूप आहेत. हे सारिपुत्र! हे देवचन धाम आहे. त्याच्या दिव्य औदुंबर फुलाचे मूळ प्रत्येक पृथ्वीच्या छायेमध्ये घुसलेले आहे. जे प्राप्त करू शकतात, अशांसाठी हे फूल उमलते. जे लोक सुवर्ण पूल (सेतू) ओलांडून, सात सोनेरी पर्वतांवर पोचून या इहलोकामध्ये जन्म घेतात, ते वास्तविक अत्यंत सुखी आहेत. त्यांच्यासाठी दुःख नष्ट झाले आहे.''

येथे सात सोनेरी पर्वतांचा अर्थ आहे, स्वर्ग लोकाचे सप्त विभाग. जैन मतानुसार ''ऊर्ध्वलोकामध्ये स्थित सिद्धशिलाच स्वर्गपुरी आहे. ही सिद्धशिला पंचेचाळीस लाख योजने लांब आणि तेवढीच रुंद आहे व आठ योजने जाडी आहे. जसे मोत्याचे श्वेतहार वा गोदुग्ध असते, त्याहूनही हे शुभ्र आहे. हे सोन्यासारखे प्रकाशमान आणि स्फटिकाहून अधिक निर्मळ आहे. ही सिद्धशिला चौदाव्या लोकाच्या शिखरावर आहे. त्या सिद्धशिलेच्या

वर शिवपुर-धाम आहे. त्यामध्ये पण मुक्त पुरुष राहतात. तेथे जन्म-मरणादी कोणतेच दोष नाही. (मुक्त पुरुष) तेथे आनंदात असतात. ते पुन्हा जन्म-मरणात येत नाहीत. ते सर्व सर्व प्रकारच्या कर्मापासून मुक्त असतात. (रत्नसार भाग, पृष्ठ २३). सिद्धशिलाच्या सिद्धभूमीस 'ईषत्' आणि 'प्राग्भरा' पण म्हटले गेले आहे. या दिव्य आकाशामध्ये (ज्यांना केवलज्ञान, सर्वज्ञता आणि पवित्रता प्राप्त झालेली आहे.) केवलीच प्रवेश प्राप्त करू शकतात.

"सम्यक आचरण संपन्न केवली समुद्घात अवस्थेपासून संपूर्ण चौदा राज्यलोक आपले आत्मप्रदेश बनवून फिरतील. आशय असा की हे केवलीच त्या चौदाव्या राज्याच्या शिखरावर स्थित लोकांमध्ये जातात आणि आपल्या आत्मप्रदेशामुळे सर्वज्ञ असतात." - प्रकरण. भा. ४ / संग्रह सू. १३५.

इंजील म्हणजेच बायबलमध्ये स्वर्गास एक दिव्यधाम स्वरूपात मानले गेले आहे. "त्याचे वैभव अतुलनीय आहे. याचे सात दूत आहेत. त्यांच्यापाशी सात संकटांनी भरलेले सात प्याले होते. त्या पैकी एक माझ्यापाशी आला आणि माझ्याशी संवाद साधून तो बोलला की, ये! मी वधूस अर्थात शेळीस तुला दाखवीन, आणि तो मला आत्म्यामध्ये एका मोठ्या उंच पर्वतावर घेऊन गेला, आणि येरुशेलेमच्या महानगरीस मला दाखवून दिले. हे महानगर स्वर्गापासून ईश्वराजवळ उतरले आहे. त्यामध्ये ईश्वराचे तेज आहे, आणि त्याची ज्योती अत्यंत मूल्यवान दगडासारखी अर्थात स्फटिकवत आणि सूर्यकांत मण्यासारखी आहे. त्याची एक मोठी आणि उंच भिंत आहे, आणि त्याच्या बाहेर फाटक आहे, आणि फाटकाबाहेर दूत आहेत, आणि त्या फाटकावर इस्राईलच्या संततीच्या बारा कुळांची नावे लिहिलेली आहेत. पूर्वेस तीन फाटक, उत्तरेस तीन फाटक, दक्षिणेस तीन फाटक आणि पश्चिमेस तीन फाटक आहेत, आणि जो माझ्याशी बोलत होता त्याच्याजवळ सोन्याची एक नळी होती. या नळीच्या साह्याने शहरास, त्याच्या फाटकांना आणि त्याच्या भिंती मोजल्या जात. शहर चौरसाकृती वसलेले आहे. म्हणून त्याची लांबी-रुंदी समसमान आहे. त्याने त्या नळीने त्या शहरास मोजले म्हणजेच शहराचे मोजमाप घेतले तेव्हा ते साडेसातशे कोस (अर्थात एक कोस म्हणजे जुने दोन मैल) भरले. त्याची लांबी, रुंदी आणि उंची समान आहे. शहरास आणि त्याच्या भिंतीस मनुष्याच्या म्हणजेच दूताच्या मापाने मापले तेव्हा ती एकशे चव्वेचाळीस हात एवढे भरली, आणि त्याच्या भिंतीची रुंदी सूर्यकांताची होती, आणि शहर निर्मळ सोन्याचे होते, जे निर्मळ काचेसारखे होते आणि शहराच्या भिंतीचा पाया प्रत्येक प्रकारच्या बहुमूल्य दगडाने सुशोभित होता. पहिला पाया सूर्यकांताचा होता, दुसरा नीलमणीचा, तिसरा हा लालमणीचा, चौथा मरकतचा, पाचवा गाईचे बळी देण्याचे यज्ञासारखा म्हणजेच गोमेदकाचा, सहावा माणिकाचा, सातवा पिवळ्या मणीचा, आठवा हरितनील मणीचा, नववा पुखराजचा, दहावा लसूणीचा, अकरावा धूम्रकांताचा, तर शेवटी बारावा मर्टोषचा होता. आणि बारा फाटक आणि बारा मोती होते. एक-एक प्रकारच्या मोत्याने एक-एक फाटक बनलेले होते. शहराची सडक (रस्ता) स्वच्छ काचेसमान निर्मळ सोन्यासारखी होती. शहरास सूर्य-चंद्राची गरजच नाही की, त्यांनी प्रकाशमान व्हावे. कारण ईश्वराच्या तेजाने त्यास प्रकाश दिला होता, आणि शेळीचे करडू त्याचा दिवा (दीपक) आहे ..... आणि कोणतीच अपवित्र वस्तू अथवा घृणित कर्म करणारा किंवा असत्यावर चालणारा त्याच्यामध्ये मुळीच प्रवेश करणार नाही, परंतु फक्त तेच लोक प्रवेश करतील, ज्यांची नावे शेळीच्या करडूच्या पुस्तकामध्ये लिहिलेली असतील ..... आणि त्याने मला जीवन-जलाची स्फटिकासारखी

स्वच्छ नदी दाखविली. ती नदी ईश्वर आणि शेळीच्या करडूचे सिंहासनापासून उगम पावते. शहराची सडक त्या नदीच्या मधोमध. अलीकडे आणि पलीकडे जीवनाचे वृक्ष आहे. तो प्रत्येक महिन्यास एक-एक या प्रमाणे (वर्षातून) बारा फळे पिकवतो.'' - (प्रकाशित वाक्य, २:९-२७/२२:१-३)

'बायबल'चे स्वर्गासंबंधी उपरोक्त लिखाण हे 'महाभारता'मध्ये निर्दिष्ट स्वर्गाच्या स्वरूपाशी मेळ खाणारा आहे. याच संदर्भात, ईसाई धर्ममतावलंबी ईश्वराच्या सिंहासनाचे, जे विवेचन प्रस्तुत करतात, ते पण द्रष्टव्य आहे -

''पहा! स्वर्गामध्ये एक सिंहासन होते, आणि त्या सिंहासनावर एक बसलेला आहे, आणि जो बसलेला आहे तो सूर्यकान्त मणीसारखा आहे, आणि सिंहासनाच्या चारी बाजूस मेघ धनुष आहे. तो मरकतसारखा दिसतो. त्या सिंहासनाच्या चारी बाजूस अवती-भवती चोवीस सिंहासने आहेत, आणि या सिंहासनावर मी चोवीस जुन्यांना बसलेले पाहिले. त्यांनी पांढरे वस्त्र नेसलेले होते. त्यांच्या डोक्यावर सोन्याचे मुकूट होते. त्या सिंहासनामधून विजा चमकतात, गर्जना होते आणि शब्द बाहेर पडतात. सप्त अग्निदीपक सिंहासनासमोर प्रदीप्त आहेत. ते ईश्वराचे सप्त आत्मे आहेत. त्या सिंहासनापुढे काचेचे समुद्र आहे, जे स्फटिकासारखे आहे आणि सिंहासनाच्या मधोमध आणि सिंहासनाच्या आसपास चार प्राणी आहेत. त्यांना समोर आणि पाठीमागे डोळे आहेत. त्यापैकी प्रत्येकास सहा-सहा पंख आहेत. ते रात्रंदिवस अविश्राम म्हणत असतात - पवित्र, पवित्र, पवित्र परमेश्वर ईश्वर जो शक्तिशाली होता आणि आहे, आणि जो येणारा आहे. आणि जेव्हा जेव्हा तो प्राणी जो सिंहासनावर बसलेला आहे, जो सदा सर्वदा जिवंत आहे (चिरंजीव आहे) महिमा, आदर आणि धन्यवाद करतात तेव्हा तेव्हा (हे) चोवीस प्राचीन सिंहासनावर बसलेल्यांसमोर लोटांगण घालतात आणि त्यास जो चिरंजीव आहे, प्रणाम करतात.'' - (प्रकाशित वाक्य, ४:३-१०)

अशाप्रकारे विभिन्न धर्मांमध्ये स्वर्गाचे जे स्वरूप-वर्णन आहे, त्याची उपलब्धीच जीवनाचे चरम लक्ष्य मानले गेले आहे.

हिंदू धर्मानुसार पूर्णब्रह्मामध्ये विलीन होऊन जाणे हे मनुष्याचे परमपुरुषार्थ मानले गेले आहे. म्हणूनच म्हटले गेले आहे -

'' *ते सर्वगं सर्वतः प्राप्य धीराः*
*युक्तात्मनः सर्वमेवाविशान्ति ।* '' - मुंडकोपनिषद्, मुंडक ३।२।५

अर्थात धीर पुरुष त्या सर्वगत ब्रह्मास सर्व दृष्टीने प्राप्त करून (मृत्यूसमयी) समाहित चित्ताने सर्वरूप ब्रह्मामध्येच प्रवेश करून जातात. 'श्वेताश्वतरोपनिषद्'मध्ये याच गोष्टीस या स्वरूपात म्हटले गेले आहे -

'' *अत्रान्तरं ब्रह्मविदो विदित्वा,*
*लीना ब्रह्मणि तत्परा योनिमुक्ताः ।* '' - १।७

म्हणजेच (ब्रह्मा)मध्ये प्रवेशद्वार प्राप्त करून ब्रह्मवेत्ता लोक ब्रह्मामध्ये विलीन होऊन समाधिनिष्ठामध्ये स्थित होऊन जन्म-मरणापासून मुक्त होऊन जातात. याच योनि-मुक्ती स्थितीसच नामरूपापासून मुक्त होऊन परात्पर दिव्य पुरुषास प्राप्त होण्यासच मोक्ष मानले गेले आहे. मोक्षाचे स्वरूप वर्णन याप्रमाणे आहे - ''(प्राणादि) पंधरा (१५) कला (देहारंभक तत्त्व) आपल्या आश्रयामध्ये स्थित होऊ शकतात. (चक्षु आदी

इंद्रियांचे अधिष्ठाता) समस्त देवगण आपल्या पतिदेवता (आदित्यादी)मध्ये लीन होऊन जातात आणि त्याचे (संचितादी) कर्म आणि विज्ञानमय आत्मा इत्यादी सर्वच्या सर्व वर अव्यय देवामध्ये एकीभावास प्राप्त होऊन जातात.'' महात्मा गौतम बुद्धाने या स्थितीस 'निर्वाण' असे नाव दिले आहे. त्यांच्या मतानुसार सर्व भावी दु:खांच्या एकांतिकविरोधाचेच दुसरे नाव निर्वाण आहे. महाकवी अश्वघोष याने 'सौंदरानंद काव्या'मध्ये परमशांतीच्या उपलब्धीस निर्वाण म्हटले आहे. ''ज्याप्रमाणे विझलेला दिवा ना पृथ्वीकडे जातो आणि ना आकाशाकडे; ना दिशाकडे जातो ना विदिशाकडे. तेल संपल्यावर तो विझून शांत होतो. त्याप्रमाणे जीवनमुक्त जेव्हा निर्वाण प्राप्त करतो, तेव्हा तो ना दिशेकडे जातो ना विदिशाकडे; ना पृथ्वीकडे जातो ना प्रकाशाकडे. क्लेश नष्ट झाल्यामुळे त्याला शांतीचा लाभ होतो.''

पवित्र कुराणामध्ये स्वर्गाच्या या वैभवपूर्ण वर्णनासोबतच 'दोज़ख़' म्हणजेच नरकाचे अत्यंत भयानक चित्र प्रस्तुत करण्यात आले आहे. हे चित्र मानवाचे डोळे उघडण्यास पूर्णपणे समर्थ आहे. 'जहन्नम' अर्थात नरकाचे चित्र प्रस्तुत करत या पवित्र धर्मग्रंथामध्ये अनेक ठिकाणी म्हटले गेले आहे की दोज़ख़ म्हणजेच नरकाची शिक्षा अत्यंत दु:खदायक आहे. नरक हा आगीचा एक असा समुद्र आहे की ज्याचा ना आरंभ आहे ना अंत. आतापर्यंत जेवढे म्हणून अपकर्मी-पापी झाले आहेत आणि होतील – त्या सर्वांसाठी नरकाचे हे ठिकाण पर्याप्त (पुरेसे) आहे.

अपराध्यांना नेस्तनाबूत करण्यास या आगीमध्ये अद्भुत क्षमता आहे. याच्या शिक्षेपासून वाचण्याचे कोणतेच साधन नाही. या 'हुतमा', 'जहन्नम' म्हणजेच नरकापासून जेव्हा धूर निघतो तेव्हा त्याला वेगवेगळ्या शाखा फुटतात. 'मानव आणि गंधकाचे दगड हे या अग्नीचे इंधन आहेत.' 'अल्लाहची अवज्ञा करणाऱ्यांसाठी हे स्थान पूर्वनिश्चित आहे.' ''त्यांच्यासाठी नरकाचेच अंथरुण असेल, आणि वरून त्या (आगी)चेच पांघरुण असेल.'' ७:४१. ''त्या नरकापोटी त्यांना (पिण्यासाठी) उकळते पाणी व यातनामयी शिक्षा मिळेल.'' १०:४. ''जे सदैव नरकाच्या आगीत वास्तव्य करतील, ज्यांना तिथे (पिण्यासाठी) उकळते पाणी दिले जाईल. जे त्यांची आतडी फाडून टाकेल.'' ४७:१५. ''अत्याचारी लोकांसाठी आम्ही अशी आग तयार करून ठेवलेली आहे, जिच्या ज्वाला त्यांना सर्व बाजूंनी (स्वत:मध्ये) सामावून घेतील. आणि जर त्यांनी (तहान भागवण्यासाठी) पाण्याची याचना केली तर त्यांना असे गरम पाणी दिसे जाईल, जे वितळलेल्या शिशासारखे असेल, जे त्यांचे तोंड भाजून काढील. (खरोखर!) किती भयंकर पेय असेल ते! आणि किती वाईट राहण्याचे ठिकाण!'' १८:२९. ''त्याच्यापुढे नरक त्याची वाट पाहत आहे, आणि (तेथे) त्याला पू (सारखे दुर्गंधीयुक्त) पाणी प्यायला भाग पाडण्यात येईल.'' १४:१६. ''हे दोन परस्पर विरोधी पक्ष आहेत (श्रद्धावंत आणि श्रद्धाहीन), जे आपल्या विधात्याविषयी झगडतात. तर ज्यांनी सत्य स्वीकारण्यास नकार दिला (मृत्युनंतरच्या जीवनात) त्यांच्यासाठी आगीचे कपडे असतील, आणि त्यांच्या डोक्यावर उकळते पाणी ओतले जाईल. ज्यामुळे त्यांच्या पोटात जे काही आहे व त्यांची कातडी गळून पडेल. (त्यांना शिक्षा देण्यासाठी) तिथे लोखंडी हातोडे असतील. जेव्हा जेव्हा ते त्या नरकाच्या (भयंकर) वेदनेतून स्वत:ची सुटका करून घेण्याचा प्रयत्न करतील, तेव्हा त्यांना त्यातच पुन्हा लोटून देण्यात येईल. आणि (त्यांना सांगितले जाईल) 'चाखत राहा जळण्याच्या शिक्षेची चव' (कायमस्वरूपी)'' २२:१९-२२. ''जे लोक आज्ञाभंग करत राहिले तर अशा लोकांचे वास्तव्याचे ठिकाण नरक

आहे. आणि ते पुन्हा पुन्हा त्यातून बाहेर पडण्यासाठी प्रयत्न करतील, तेव्हा त्यांना पुन्हा त्यातच लोटून देण्यात येईल, आणि त्यांना सांगितले जाईल, त्या आगीची चव चाखतच राहा, जिला खोटे ठरवण्यावर तुम्ही फार आग्रही राहिलात.'' ३२:२० ''ज्यांनी आपल्या विधात्यास मानण्यास नकार दिला, हेच ते लोक आहेत, ज्यांच्या मानेवर (त्यांच्या कर्जरूपी कमाईपोटी) जोखड पडलेले असतील. हेच नरकाच्या आगीचे निवासी आहेत. ते त्यात सदैव वास्तव्य करतील.'' १३:५. ''(आज्ञा होईल), त्याला पकडा आणि त्याच्या गळ्यात साखळदंड घाला. आणि मग त्याला नरकात फेकून द्या. मग त्याला (त्याच्यासारख्या इतर अपराध्यांसोबत) सत्तर गज एवढ्या लांब साखळीने जखडून टाका. कारण तो सर्वशक्तिमान अल्लाहवर विश्वास ठेवत नव्हता.'' ६९:३०-३३. ''(शैतानाचे अनुयायी असलेले) अशा सर्वांसाठी नरक हेच वचन दिलेले ठिकाण आहे. त्याचे सात दरवाजे आहेत. प्रत्येक दरवाजातून प्रवेश करणाऱ्या (नरकवासी लोकांच्या) टोळ्या विभागलेल्या आहेत.'' १५:४३-४४. ''(अल्लाह म्हणतो) 'मी त्याला लवकरच नरकात फेकून देईन.' तुम्हाला काय माहीत नरक काय चीज आहे? तिची आग ना जिवंत राहू देईल, ना मरू देईल. त्वचा भाजून टाकणारी. तिच्यावर एकोणीस रखवालदार नियुक्त आहेत.'' ७४:२६-३०. ''श्रद्धावंतांनो! तुम्ही स्वत:ला व तुमच्या कुटुंबीयांना त्या (नरकाच्या) आगीपासून वाचवा, जिचे इंधन माणसे व दगड असतील, जिचे (रखवालदार म्हणून) कठोर व प्रचंड शक्तिशाली (अल्लाहचे) दूत नियुक्त आहेत. अल्लाहने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत ते जरादेखील कुचराई करत नाहीत. ते अगदी तेच करतात, जे करण्याचा त्यांना आदेश दिला जातो.'' ६६:६. 'जहन्नम' अर्थात नरकामध्ये अपराध्यांशी केला जाणारा व्यवहार पुढील ओळीत द्रष्टव्य आहे – ''निश्चितपणे 'ज़क़्क़ूम' म्हणजेच निवडुंगाच्या वृक्षाची काटेरी फळे अपराधी लोकांचे अन्न असेल... वितळलेल्या तांब्याप्रमाणे ते पोटात उकळत राहील. ज्याप्रमाणे गरम पाणी उकळत असते. (आज्ञा होईल), '(नरकाच्या रखवालदारांनो!) त्यास पकडा आणि त्याला फरफटत नरकाच्या मध्यभागी घेऊन जा. मग त्याला शिक्षा देण्यासाठी, त्याच्या डोक्यावर उकळते पाणी ओता. चव चाख या शिक्षेची, तू स्वत:ला फार सामर्थ्यशाली आणि प्रतिष्ठित समजत होतास. ही तीच (नरकाची शिक्षा) आहे, ज्या विषयी तुम्ही शंका घेत असत.'' ४४:४३-५०

एक अन्य चित्र पहा – ''त्या दिवशी काही चेहरे उतरलेले असतील. (पापाच्या ओझ्याने) कष्टी झालेले आणि (दहशतीने) गळून गेलेले असतील. ते धगधगत्या आगीत प्रवेश करतील. आणि त्यांना उकळत्या झऱ्याचे पाणी पाजण्यात येईल. त्यांना कडू काटेरी झुडपाशिवाय अन्न म्हणून अन्य काही मिळणार नाही. ज्याच्या खाण्याने ना पौष्टीकता लाभेल, ना भूक भागेल.'' ८८:२७. ''जे लोक आमच्या संकेतांद्वारे स्पष्ट होणारे संदेश नाकारण्यासाठी आग्रही राहिले, त्यांना आम्ही (भयानक) अग्नीमध्ये प्रवेश करायला लावू. जेव्हा त्यांची त्वचा जळून जाईल, तेव्हा (पुन्हा पुन्हा) आम्ही त्यांना दुसरी नवीन त्वचा बदलून देऊ, हे यासाठी की, (सातत्यपूर्वक) त्यांनी शिक्षेची चव चाखत राहावी. निश्चितच अल्लाह सर्वशक्तिमान आहे. बुद्धिमान आहे.'' ४:५६. अल्लाहच्या संकेताला असत्य मानणारे हे नित्य नरकामध्येच खितपत राहतील. त्यापासून त्यांची सुटकाच नाही. 'ज्यांनी नाकारले आणि आमच्या चिन्हां (संकेतां)ची अवहेलना केली, ते नारकीय आहेत, आणि सदैव त्यातच राहतील. हदीसां (प्रेषित वचनां)मध्ये पण नरकाचे सविस्तर आणि भीतिदायक वर्णन आहे.

उपरोक्त चित्र 'श्रीमद्भागवता'च्या एतद्विषयक वर्णनाशी जवळ जवळ मिळते जुळते असे आहे. विभिन्न धर्मग्रंथांमध्ये त्रिलोकीच्यामध्ये (त्रैलोकामध्ये), दक्षिण दिशेमध्ये पृथ्वीच्या खाली पाण्यावर नरक लोक असल्याचे मानले जाते. येथे यमराज मृतांना कर्मानुसार दंड देण्याचे कार्य करतात. 'श्रीमद्भागवता'मध्ये अठ्ठावीस (२८) प्रकारच्या नरकांचे वर्णन प्राप्त होते. हे वर्णन अशा प्रकारे आहे –

''(१) तामिस्त्र, (२) अंधतामिस्त्र, (३) रौरव, (४) महारौरव, (५) कुंभीपाक, (६) कालसूत्र, (७) आसिपत्र-वन, (८) सूकरमुख, (९) अंधकूप, (१०) कृमिभोजन, (११) संदंश, (१२) तप्तसूर्मि, (१३) वज्रकंटक, (१४) शाल्मली, (१५) वैतरणी, (१६) पयोद, (१७) प्राणरोध, (१८) विशासन, (१९) लालाभक्ष, (२०) सारमेयादन, (२१) अवीचि, (२२) अय:पान क्षारकर्दम, (२३) रक्षाभोजन, (२४) शूलप्रोत, (२५) दंदशूक, (२६) अवटिनिरोध, (२७) पर्यावर्तन, (२८) सूची-मुख (पंचमस्कंध, अध्याय २६) असे एकूण अठ्ठावीस (२८) नरक आहेत. कर्मानुसार जीवास या नरकांमध्ये राहावे लागते.'' कोणत्या कुकर्मासाठी कोणता नरकवास होतो, आणि कोणकोणते दंड भोगावे लागतात, कोणती शिक्षा मिळते, या विषयांसंबंधी 'सुख-सागर'मधील पुढील वर्णन द्रष्टव्य आहे –

''जो माणूस दुसऱ्याचे धन हडप करतो, आणि स्त्री-पुत्रांचे हरण करतो, तो यमदूतांच्या पाशामध्ये बद्ध होऊन '**तामिस्त्र**' नावाच्या नरकामध्ये फेकून दिला जातो. तेथे त्याला तहान भुकेने व्याकूळ राहून मार खावा लागतो. जो इतर पुरुषांस ठकवून त्याच्या पत्नीचा उपभोग घेतो, असा माणूस '**अंधतामिस्त्र**' नरकामध्ये जातो. तेथे त्याला मोठमोठ्या यातना भोगाव्या लागतात. त्याची बुद्धी भ्रष्ट होते. त्याचे डोळे नष्ट होतात. आणि जो मी आणि माझेचा अभिमान बाळगून गर्वाने इतरांशी वैर करतो आणि स्वत:च्याच कुटुंबाचे पालन पोषण करतो, तो '**रौरव**' नरकात जाऊन पडतो. त्याने ज्या प्राण्याची हिंसा केलेली असते, तेच प्राणी त्याला 'रूरू' नावाचे जंतू बनून त्याला कापत असतात, आणि खात असतात. जो माणूस आपल्या देहाचेच पालन करत राहतो, तो '**महारौरव**' नरकामध्ये पडतो. तेथे क्रव्याद नावाचे मांस भक्षण करणारे रूरू नावाचे जंतू त्याच्या शरीराचे लचके तोडत त्याचे मांस खातात, आणि जो जिवंत पशू-पक्षांना मारून शिजवून खातो, त्याला नरकामध्ये यमदूत उकळत्या तेलामध्ये घालून '**कुंभीपाक**' नरकामध्ये तळतात. जो आपले पिता आणि ब्राह्मणाशी द्रोह करतो, तो '**कालसूत्र**' नरकामध्ये तप्त तांब्याच्या कढईमध्ये फेकून दिला जातो. त्यामुळे त्याचे संपूर्ण शरीर जळत राहत असते. तेथे तो पशूंच्या शरीरावर असलेल्या केसांच्या संख्येएवढे हजारो वर्षे मोठमोठ्या यातना भोगत असतो. जे आपल्या वेदमार्गाचा त्याग करून पाखंडामध्ये-ढोंगामध्ये पडतात. त्यांना यमदूत '**असिपत्रवन**' या नरकामध्ये फेकून देतात, आणि त्यांना आसुडाचे फटके खावे लागतात. तीक्ष्ण धार असलेल्या तलवारीच्या वारासारखे घाव त्यांच्या संपूर्ण शरीरावर पसरलेले असतात, आणि त्या घावांमुळे 'हाय, मी मेलो रे बाबा!' अशी किंकाळी करत क्षणाक्षणाला जागोजागी खाली पडत राहतात. स्वधर्म त्याग करणाऱ्या त्या पाखंडांच्या परिणामास ते भोगत राहतात. जो राजा किंवा जे राजसेवक निष्पाप माणसास दंड देतात, ते मरून '**सूकरमुख**' नरकामध्ये पडतात. तेथे उसाच्या पेऱ्याप्रमाणे त्यांच्या शरीराचा प्रत्येक अवयव शिक्षा भोगत मोठे दु:ख प्राप्त करून बेहोश होऊन जातात. जे पुरुष ईश्वराने दिलेल्या उपजीविकेवर समाधानी असलेल्यांना त्रास देतात, ते '**अंधकूप**' नावाच्या नरकामध्ये पडतात. तेथे पशू, पक्षी, मृग, सर्प, डास, उवा, मच्छर, माशी इत्यादी अनेक

जंतूंनी दंश केल्यामुळे त्यांना यातना होतात. जो मनुष्य पंच महायज्ञ संपन्न न करताच अन्नसेवन करतो, तो किड्यांच्या कुंडामध्ये मरून पडतो, आणि तो स्वत: एक (मोठा) किडा बनून इतर किड्यांना खात असतो, आणि इतर किडे त्याला ओरबडून खात असतात. हे **'कृमिभोजन'** नरक आहे. जो चोरी करून किंवा जबरदस्तीने ब्राह्मणाची किंवा अन्य इतर जातीच्या माणसांच्या सोन्याच्या वस्तू इत्यादी चोरतो, तो मेल्यानंतर **'संदंश'** नावाच्या नरकामध्ये पडतो. तेथे यमदूत त्याची त्वचा त्याच्या शरीरापासून लोखंडी सळ्यांनी खेचून (उपटून) काढतील. जो पुरुष अथवा जी स्त्री अगम्य व परक्या स्त्री किंवा पुरुषाशी संभोग करतात, त्या दोघांना चाबकाच्या फटक्याने मारत यमदूत **'तप्तसूर्मि'** नावाच्या नरकामध्ये घेऊन जाऊन फेकून देतात, आणि मग तप्त लोखंडी शृंखलेमध्ये बांधतात. परिणामी ते जळत राहतात. जो माणूस पशुयोनीशी मैथुन करतो, त्याला यमदूत **'वज्रकंटक'**, **'शाल्मली'** नामक नरकामध्ये घेऊन जाऊन खाली पाडतात आणि तेथे वज्रासारखी काट्यांनी बनलेली शाल्मलीवर ओढत असतात. जे राजे लोक किंवा त्यांचे कर्मचारी धर्माच्या मार्गास किंवा मंदिर, उपासनागृह इत्यादीस नष्ट-भ्रष्ट करतात, ते विष्ठा, मूत्र, रक्त, केस, नखे, हाडे, चरबी इत्यादींनी भरलेल्या **'वैतरणी'** नदीमध्ये बुडून जात असतात. जे शूद्र स्त्री सोबत आपला धर्म गमवतात, त्यांचे सर्व आचार-विचार तर नष्ट होतातच आणि ते पशुप्रमाणे आपल्या विवेकास गमावून सर्व प्रकारे पतित होत असतात, ते मेल्यानंतर विष्ठा, मूत्र, कफ, मळ इत्यादींनी भरलेल्या समुद्रामध्ये जाऊन पडतात, आणि त्यांना तिच विष्ठा इत्यादी खावे लागते. जे लोक ढोंगी आणि अभिमानामध्ये - गर्वामध्ये येऊन पशूंना ठार मारतात, असले लोक **'वैशख़'** नावाच्या नरकामध्ये पडतात, आणि यमदूत त्यांना अत्यंत निर्दयतेने मारत असतात. जे कामासक्त होऊन द्विज, सवर्ण स्त्रीशी मुख-मैथुन करतात, त्यांना यमदूत **'लालाभक्ष'** नावाच्या नरकामध्ये टाकून वीर्य पाजतात. जे चोर राजा अथवा राजदूत, गावास लूटतात, त्यांना वज्रासमान तीक्ष्ण दात असलेले सातशेवीस कुत्रे चावा घेतात. जे खोटी साक्ष देतात ते **'अवीचि'** नामक नरकामध्ये शंभर योजने उंच पर्वतावरून खाली ढकलून दिले जातात. जे ब्राह्मण, क्षत्रिय अथवा वैश्य किंवा त्यांच्या स्त्रिया प्रमादस्वरूप मदिरापान करतात, त्यांना **'अय:पान'** नावाच्या नरकामध्ये खाली आपटून त्यांच्या तोंडामध्ये आगीपासून वितळलेल्या लोखंडाचा रस यमदूत टपकवीतात. जो घमंडी पुरुष जन्म, तपस्या आणि विद्येमध्ये आपल्याहून श्रेष्ठांचा आदर करत नाहीत, त्याला चिखलामध्ये रूतवले जाते, आणि त्यामध्येच पडून तो मोठमोठ्या यातना भोगत असतो. जे माणसास मारून भैरव आदी देवतांना भेट चढवितात आणि जे स्वतंत्र बनून पुरुष वा स्त्रीचे मांस खातात, ते मेल्यानंतर नरकामध्ये त्याच पशूंद्वारे राक्षस स्वरूपात तीक्ष्ण अशा शस्त्रांनी कापले जातात. आणि ते पशूच राक्षस स्वरूप बनून त्यांचे रक्त पितात, ओरखडे घेतात आणि गात असतात. जे इहलोकामध्ये निरपराध पशूंना जंगल अथवा गावांमध्ये नेऊन ठार मारतात (कत्तल करतात), ते मेल्यानंतर नरकामध्ये जाऊन पडतात. आणि यमदूत तेथे त्यांना सुळावर चढवून तीक्ष्ण अशा शस्त्रांनी कापतात. जी माणसे भयंकर रूप धारण करून उग्र बनून लोकांना भयभीत करतात, ते **'दंदशूक'** नावाच्या नरकामध्ये पडतात, जेथे त्यांना पंचमुखी आणि सप्तमुखी सर्प उंदराप्रमाणे आपल्या तोंडात गिळतात. जे गुंफा इत्यादीमध्ये प्राण्यांना बंद करून घुटमळून त्यांचे प्राण (जीव) घेतात, ते मेल्यानंतर **'अवटिनिरोध'** नावाच्या नरकामध्ये जाऊन पडतात, आणि तेथे विषारी धूम्रामुळे त्यांच्या जिवांना घुटमळून ठेवून यमदूत त्यांना वाईट प्रकारे त्रास देतात. जो अतिथी, अभ्यागतांना घृणेच्या दृष्टीने पाहतो, त्याच्या

डोळ्यांना वज्रासमान तीक्ष्ण चोच असलेली गिधाडे, कावळे उपटून उपटून लचके घेत असतात. जो संपत्तीच्या घमेंडीमध्ये येऊन द्रव्यनाश होण्याच्या चिंतेमुळे शुष्क मुखाच्या लोभामध्ये फसून जाऊन पिशाच्चासारखा संपत्ती गोळा करत असतो, आणि ना त्याचा उपभोग घेतो, ना दान-पुण्य करतो, तो मेल्यानंतर '**सूचीमुख**' नावाच्या नरकामध्ये जाऊन पडतो. तेथे यमदूत त्याला सुया टोचत असतात.'' - 'सुखसागर', पृ. २९३-२९६.

वेदांमध्ये नरकाचे वर्णन प्राप्त होते. यजुर्वेदच्या खालील मंत्रामध्ये नरकास 'महा अंधकाराचे लोक' अशी संज्ञा दिली गेली आहे -

'' *असुर्या नाम ते लोका अंधेन तमसाऽऽवृताः ।*
*ताँस्ते प्रेत्यापि गच्छन्ति ये के आत्महनो जनाः ।।* ''

अर्थात आपल्या आत्म्याचे हनन करणारे मनुष्य मेल्यानंतर महाअंधकारयुक्त लोकांमध्ये जातात. यजुर्वेदभाष्यम्, अध्याय ४०, पृ. १२६३.

'ईशावास्योपनिषद्' मध्ये पण नरकास 'अंधतमः' असे म्हटले गेले आहे. - 'अंधतमः प्रविशन्ति ये विद्यामुपासते' - मंत्र ९.

हिंदू धर्मशास्त्राच्या मान्यतेनुसार नरकोन्मुखी तीन प्रवेशद्वार आहेत. ती म्हणजे (१) वासना, (२) क्रोध आणि (३) हाव (लोभ), धनलिप्सा. या तीन मानवी दुर्बळता माणसास दुष्कर्म - अपकर्म करण्यास प्रवृत्त, बाध्य व प्रेरित करतात. याच गोष्टी तर मानवाच्या सामाजिक आणि आध्यात्मिक जीवनासाठी महाघातक आहेत. त्यांच्यावर विजय मिळवून, उच्च आध्यात्मिक सिद्धी प्राप्त करण्यासाठी, उचित नैतिक कर्मशील बनणे अत्यंत आवश्यक आहे.

अविद्येची उपासना करणारे घोर अंधकारयुक्त लोकांमध्ये प्रवेश करतात. इंजिल अर्थात बायबल नरकास 'अग्नी आणि गंधकामुळे जळणारा निर्झर' असे म्हटले गेले आहे. त्यानुसार हाच दुसरा 'मृत्यू' आहे. २१:८

अशाप्रकारे, 'आख़िरत' म्हणजेच पुनरुत्थानाशी संबंधित उक्त विवेचनावरून हे स्पष्ट होते की इस्लाम धर्माचा परलोकामध्ये विश्वास आहे. त्यानुसार मानव जीवनाचा हा उद्देश आहे की परलोक सुधारले पाहिजे. इहलोकापेक्षा परलोकाकडे जादा लक्ष पुरवले पाहिजे. यासाठी, पारलौकिक जीवनास सफल बनविण्यासाठी सत्कर्मावर जादा भर देणे आवश्यक ठरते. त्यामुळे व्यक्तीचे नैतिक शरीर, की जिच्यामध्ये पाप आणि पुण्याची चेतना विद्यमान आहे, ती पुष्ट होईल. परिणामस्वरूप, मनुष्य हा पापमार्गावरून हटून शुभ कर्मांची प्रेरणा प्राप्त करू शकेल. या प्रेरणेची प्राप्तीच पवित्र कुराणाच्या शिकवणुकीचे रहस्य आहे.

१४



प्रकरण – १४

# सूफींच्या कल्पनेतील सृष्टीची विलक्षणता व अद्‌भुतता[५१] वा ईश्वराची अगाध लीला : सृष्टीमधील चमत्कारांचा खेळ[५१]

(सूफींनी सृष्टीमधील चमत्कारांचा खेळ हा भूगर्भामधील, भूपृष्ठावरील आणि नभोमंडळामधील चमत्कारांच्या स्वरूपात रंगवलेला आहे. ही एक प्रकारची सूफींच्या कल्पनेतील विलक्षण व अद्‌भुत अशी सृष्टी आहे. पुढील विवेचनामध्ये अधे–मधे लेखक सूफ़ी आचार्य व तत्त्वज्ञ अब्दुल करीम जीली यांच्या स्वानुभूतीची अभिव्यक्ती दिसून येते. ही स्वानुभूती ईश्वरी प्रेरणेमुळे अभिव्यक्त झाल्याकारणाने त्यांना विविध प्रेषित आणि देवदूतांचे दर्शन घडल्याचे नमूद करण्यात आले आहे. ती कवि–कपोलकल्पित असल्याचे वाटते व परिणामी ते लेखकाचे मनोराज्य व मनोरथ असल्यासारखे वाटते. परंतु ईश्वरी प्रेरणेमध्ये कपोल–कल्पित कल्पनेस वास्तवामध्ये उतरविण्याचे अपार सामर्थ्य असते. याची जाण ठेवूनच सदरहू विवेचनाकडे बघावे, अशी विनम्र सूचना जिज्ञासू व सुज्ञ वाचकांना करावीशी वाटते. या विवेचनामधील प्रथमपुरुषी विधाने ही उपरोक्त सूफी आचार्याशी निगडित आहेत.)

ब्रह्मांड निर्मिती अगोदर सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा आपल्या सत्तेमध्ये (ज़ात) व्यक्त अस्तित्वात होता, आणि सृष्टी त्याच्यामध्ये विलीन होती, आणि कोणत्याच वस्तूमध्ये (स्वरूपामध्ये) तिच्या अस्तित्वाचे प्रकटन नव्हते. हेच गुप्त कोष म्हणजेच ब्रह्मगुफा होय. संदेशहर स. यांनी 'अमा' (गहन तिमिर) या नावाने संबोधले आहे. हिच्या वर ना हवा (वायू) होती ना खाली. (म्हणजे एक प्रकारची निर्वात पोकळीच होती). कारण की वास्तवाच्या वास्तवतेचे आपल्या स्वतःच्या अस्तित्वाशी संबंधित संबंधांपैकी कोणत्या तरी संबंधाशी प्रमुखता नाही – ना सर्वोच्च संबंधाशी ना सामान्य संबंधाशी. आणि ते शुभ्र रत्न (याक़ूत) आहे. त्यासंबंधी हदीस (प्रेषित वचना)मध्ये निवेदन आहे की सर्वश्रेष्ठ परमेश्वर ब्रह्मांड निर्माण करण्या अगोदर शुभ्र रत्नामध्ये होता. मग जेव्हा विश्वाच्या – ब्रह्मांडाच्या सुरक्षेची व्यवस्था निर्माण करण्याचा मनोदय झाला, तेव्हा त्याने वास्तवांच्या वास्तवतेकडे न्याहाळले. यालाच असे पण म्हणता येईल की त्याने शुभ्र रत्नाकडे पाहिले. हे अस्तित्वाचे मूळ आहे. त्याचे हे न्याहाळणे म्हणजे त्याच्या पराकाष्ठेची दृष्टी होती. मग ते वितळले. वितळून पाणी झाले. म्हणूनच अस्तित्वामध्ये अशी कोणतीच वस्तू नाही की जी परमेश्वराच्या दृश्य स्वरूपाच्या पराकाष्ठेस सहन करू शकेल, परंतु केवळ तेच, कारण की अस्तित्वाचे मूळ असलेले वास्तवाचे वास्तव हे सहनशील बनू शकले नाही; परंतु अंतरंगामध्ये, पुन्हा जेव्हा ते त्याच्यावर प्रकटले, तेव्हा ते त्याच्यामुळे वितळले. पुन्हा त्याच्याकडे

त्या (परमेश्वरा) ने आपल्या माहात्म्याच्या दृष्टीने पाहिले. पुन्हा या कारणामुळे ते वितळले. पुन्हा एकदा महात्म्याच्या दृष्टीने त्याच्याकडे पाहिले तेव्हा परिणामी ते असे तरंगीत झाले, जसे की समुद्रामधील लाटा तरंगतात. पुन्हा त्याचे जड पदार्थ मोठ्या आवेशाने बाहेर निघाले, जसे की फेस समुद्राबाहेर निघतो. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने त्या जड पदार्थापासून पृथ्वीचे सप्त खंड निर्माण केले. प्रत्येक खंडाचे निवासी हे तिच्या जमिनीच्या सत्त्वापासून निर्माण केले. मग त्या पाण्याची कोमलता (सूक्ष्मता) वर चढली जसे की समुद्रापासून बाष्प वर चढते. या सूक्ष्मतेपासून सर्वश्रेष्ठ परमेश्वराने सप्त आकाशांना एक दुसऱ्यापासून वेगळे अशा पद्धतीने निर्माण केले. प्रत्येक आकाशाचे देवदूत हे त्या त्या आकाशाच्या सत्त्वापासून निर्माण केले. मग त्या पाण्यापासून सर्वश्रेष्ठ परमेश्वराने सात समुद्र निर्माण केले. हे विश्वास घेरलेले आहेत. तर मग हे समस्त अस्तित्वाचे मूळ आहे. या नंतर हे लक्षात राहू द्या की सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा अतीत काळामध्ये या गहन तिमिरा ('अमा')मध्ये व्यक्त होता. याचे नाव वास्तवतेचे वास्तव, गुप्तकोष वा ब्रह्मगुफा, शुभ्र रत्न (याकूत) असे होते. या शुभ्र रत्नापासून अवताराशिवाय निर्माण झालेल्या वस्तूंमध्ये तो सध्या पण – या क्षणी व्यक्त आहे, विद्यमान आहे. तो विश्वाच्या अणुरेणूमध्ये असंख्य प्रकारे, अविभाज्यपणे आणि संबंधविरहित पद्धतीने प्रकाशमान आहे, आणि तो या सर्वांमध्ये प्रदीप्त आहे. सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा तसाच आहे, जसा तो गहन तिमिर (अमा) आणि शुभ्र रत्ना (याकूत)मध्ये होता. हे सर्व अस्तित्वच (ते) रत्न आणि हे तिमिर (अमा) आहे. जर का सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा सर्व अस्तित्वामध्ये प्रकाशमान नसता तर नि:संदेह तो जसा होता तसा नसता. त्याच्यामध्ये बदल घडून आला असता, परंतु परमेश्वराची सत्ता ही परिवर्तनापासून मुक्त आहे. म्हणून त्याच्यामध्ये बदल घडून आला नाही. परंतु या प्रकटनाचे नाव शुभ्र रत्न असे आहे. मात्र या स्वरूपातसुद्धा तो विशुद्ध आणि श्रेष्ठतर आहे, आणि तो आपल्या सृष्टीमध्ये व्यक्त होऊनसुद्धा आपल्या कोषामध्ये बाकी आहे, जो तिच्या गहन तिमिराच्या आतमध्ये होता. तर मग यावर तुम्ही चिंतन करा. विचार करा. वास्तवांच्या वास्तवामध्ये विद्यमान त्या सर्व घटकांचा आपणास विचार करायचा आहे. म्हणून सर्वप्रथम आम्ही सप्त आकाशांचा उल्लेख व त्यांचे विवेचन सुरू करत आहोत.

**आकाश**

ओळखावे की आपणास दिसणारे हे आकाश हे पार्थिव आकाश नाही. त्याचा (हा) रंग स्वत:चा नाही, आणि ना गुण हा त्याचा गुण आहे. हे जे आपण (आकाश स्वरूपात) पाहतो आहे तो एक ऊष्मा (बाष्प) आहे. (जो) सूर्याच्या उष्णतेच्या प्रभावामुळे पृथ्वीची शुष्कता आणि ओलसरपणा यापासून बनलेला आहे. तो (उष्मा) (बाष्प, वाफ) आपल्या स्वभावधर्मानुसार वायूकडे खेचला गेला. परिणामी तो इहलोका (पार्थिव जागा) दरम्यान पोकळी आहे. (हे) आकाश ऊष्मेने (बाष्प) भरलेले आहे. म्हणून तर ते कधी आभाळमय दृष्टीस पडते, तर कधी कृष्ण–धवल दिसते. तर कधी धुळीसारखे दिसते. हे सर्व रंग त्या वाफे (उष्मा)मुळे आहेत. ही वाफ जमिनीवरून वर चढते. या वाफेवर पडणाऱ्या प्रकाशाच्या प्रमाणानुसार तिचे विविध रंग निर्माण होतात. पार्थिव आकाशाशी निगडित असल्याकारणाने तिचे नाव 'आकाश' ठेवण्यात आले. वास्तविक जे पार्थिव आकाश आहे ते अति सुदूर असल्याकारणाने ते दृष्टिक्षेपापासून आड (लांब) आहे. ते दृष्टिक्षेपाच्या

कक्षेपलीकडे आहे. ते दुधाहून अधिक शुभ्र आहे. हदीस (प्रेषित वचना)मध्ये नमूद आहे की, पार्थिव आकाश आणि पृथ्वीतळा(जमिनी)च्या दरम्यान पाचशे वर्षे (इतके अंतर चालण्याचा) मार्ग आहे, आणि हे निर्विवाद आहे की दृष्टी पाचशे वर्षाचे अंतर कापू शकत नाही. म्हणून हे सिद्ध होते की जी वस्तू (वरील) नजरेस पडत आहे ती ऐन पार्थिव आकाश नाही. जर ताऱ्यांची किरणे जमिनीवर (पृथ्वीतळावर) पोचले नसते तर ते पण गोचर (दिसले) झाले नसते, आणि आकाशामध्ये असे कित्येक चकाकणारे तारे आहेत की ज्यांची किरणे पृथ्वीतळावर पोहचत नाहीत. यांच्या पलीकडे आणि यांच्या सूक्ष्मतेमुळे आपण त्यांना पाहू शकत नाही. परंतु ईश्वरप्रेरित ज्ञाते लोक त्यांना पाहतात (पाहू शकतात). इहलौकिक लोकांसमोर ते त्यांचे वर्णन करतात आणि त्याविषयी त्यांना माहिती समजावून देतात.

**आकाशाची विलक्षणता**

सर्वश्रेष्ठ परमेश्वराने सर्व प्रकारची उपजीविका आणि विविध प्रकारचे खाद्यान्न चार दिवसांमध्ये निर्माण केले आणि आकाश व पृथ्वीच्या दरम्यान चार महाभूतांच्यामध्ये लपवून ठेवले. प्रथम महाभूत हे उष्णतेचे महाभूत आहे, द्वितीय महाभूत हे शुष्कतेचे महाभूत आहे, तृतीय महाभूत हे शीतलतेचे महाभूत आहे, तर चतुर्थ महाभूत हे आर्द्रतेचे महाभूत आहे. परमेश्वराच्या या कथनाचा हाच अर्थ आहे की या चारींमध्ये जीविकोपार्जन निश्चित केले आहे. सुप्रतिष्ठित अशी सत्तात्मक याचना त्याने समसमान शक्ती स्वरूपात त्यांच्या भाग्यामध्ये निश्चित केली. कारण की वास्तव हे स्वत: त्या वस्तूचे आकांक्षी असते, ज्यांची त्यास गरज असते. मग सर्वश्रेष्ठ परमेश्वराने उपजीविका पोहोचणाऱ्या त्या देवदूतांना सप्त आकाशामध्ये ठेवून दिले. प्रत्येक आकाशामध्ये एक असा देवदूत आहे जो उपजीविका पोहोचणाऱ्या देवदूतांवर शासक म्हणून नियुक्त आहे. त्याचे नाव 'मलक-ए-हवादिस' म्हणजेच नूतनांचा देवदूत असे आहे. आणि त्या देवदूतांमध्ये त्या ग्रहताऱ्याची चेतना ठेवली गेली आहे, जी त्या आकाशाशी विशिष्ट अशी आहे. उपजीविका पोहोचविणाऱ्या देवदूतांपैकी कोणताही देवदूत त्या देवदूताच्या आदेशाशिवाय प्रकट होत नाही. तो प्रकटणारा देवदूत त्या आकाशाच्या ग्रहताऱ्याच्या चेतनेमुळे निर्मित आहे. पार्थिव आकाशाचा चकाकणारा मोठा तारा ग्रह हा चंद्र (सोम) आहे, दुसऱ्या आकाशाचा ग्रह बुध, तिसऱ्या आकाशाचा ग्रह हा शुक्र, चौथ्याचा रवी (सूर्य), पाचव्याचा मंगळ, सहाव्याचा गुरू तर सातव्या आकाशाचा ग्रह शनी आहे. पार्थिव आकाश हे चांदीहून जादा शुभ्र आहे. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने याला आत्म्याच्या वास्तवाने निर्माण केले आहे की जेणेकरून पृथ्वीशी त्याचा तशाच प्रकारचा संबंध असावा जसे की आत्म्याचा देहाशी (शरीराशी) संबंध असतो. आणि अशाच प्रकारे चंद्र या ग्रहास त्याच्यामध्ये ठेवण्यात आले आहे. यासाठी की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने चंद्रास आपले नाम 'हय्य' म्हणजेच चैतन्याचे दृश्य स्वरूपात बनवले आहे. राशींच्या नामांमध्ये अस्तित्वाचे चैतन्य (जीवन) आहे, आणि यावर अस्तित्व व आशंका अवलंबून आहे. राशींना परिभ्रमण करणारे बनवले आहे. सोम ग्रहाच्या म्हणजेच चंद्र ग्रहाच्या आकाशास पृथ्वीच्या व्यवस्थेचे विश्वस्त नेमले आहे, जसे की आत्मा हा देहाच्या व्यवस्थेचा विश्वस्त आहे. जर परमेश्वराने पार्थिव आकाशास आत्म्याच्या वास्तवाने निर्माण केले असते तर पृथ्वी ही निर्जीव आणि जड पदार्थांची एक ग्रह ठरली असती. मग परमेश्वराने मानवाचे आदि आद्य प्रपितामह आदम यांना त्या आकाशामध्ये ठेवले. कारण की आदम हे पार्थिव

जगाचे आत्मा आहेत. कारण की यामुळेच सर्वश्रेष्ठ परमेश्वराने सृष्टीवर दृष्टिक्षेप टाकले आणि त्यावर कृपा केली आणि तिला त्याने आदमच्या आयुष्याने (जीवनाने) सजीव केले आणि जोपर्यंत ही मानवजात पृथ्वीतलावर जीवंत आहे तोपर्यंत हे जग कायम राहील, आणि जेव्हा मानवजात ही या जगावरून नष्ट होईल तेव्हा हे जग पण नष्ट होईल आणि काही (गोष्टीं)मध्ये मिसळून जातील. जसे की मानवाचा पशु आत्मा (पाशविक आत्मा) हा जेव्हा त्याच्या शरीरापासून वेगळा होऊन जातो तेव्हा त्याचे शरीर नष्टप्राय होऊन जाते. त्याचा काही (अंश) हा काहीमध्ये मिसळून जातो. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने पार्थिव आकाशास चकाकणाऱ्या प्रखर प्रकाशाच्या ताऱ्यांनी सुशोभित केले आहे. जसे की मानवी रूप व आकृतीने धारण केलेल्या त्या सर्व वस्तूंनी आत्म्यास सुशोभित करून त्याची आरास केली आहे. म्हणजेच व्यक्त सूक्ष्मतेपासून अर्थातच ती पंचेद्रिये आहेत. आणि अव्यक्त सूक्ष्मता वा गुण ही सात (सप्त) आंतरिक शक्ती आहेत : (१) विवेक-बुद्धी, (२) साहस (धैर्य), (३) समज, (४) कल्पनाशक्ती, (५) मानस, (६) चिंतन आणि (७) विचार. पुन्हा जसे की पार्थिव आकाशाचे ग्रह हे धिकृत शैतानांचे स्रोत आहेत, त्याचप्रमाणे उपरोक्त सप्तशक्ती या जेव्हा बरोबर आणि सुव्यवस्थित असतात, तेव्हा त्या मानवास शैतानी हल्ल्यापासून नित्य वाचवितात. या शक्तींपासून त्याचे अंतरंग सुरक्षित राहते. जसे की पार्थिव आकाश हे ताऱ्यांमुळे सुरक्षित आहे. त्या आकाशाचे देवदूत (जे) आत्म्यांच्या मध्यभागी नित्य परमेश्वराचे गुणगान करत असतात. जेव्हा वेताळ-देवदूत त्यांना एखादे कार्य करण्याचा आदेश देऊन त्यांना जगामध्ये पाठवून देतो, तेव्हा ज्या कार्यासाठी त्यांना नियुक्त करण्यात आलेले असते तेव्हां ते कार्य करण्यास आपले रूप धारण करतात. ते त्या रूपाकृतीच्या आत्म्याचे वेताळ बनतात. मग ते त्यांना ईश्वरनिर्दिष्ट स्थळावर पोहोचवतात. जर त्याची उपजीविका असेल तर ते ज्याच्यासाठी निर्वाह-साधन असेल त्याच्यापर्यंत नेऊन पोहोचवले जाते. जर ते एखाद्याच्या भाग्यात असेल तर त्याचे प्रारब्ध त्याप्रमाणे घडवले जाते. मग ते सद्भाग्य असो की दुर्भाग्य असो. नंतर ते त्या आकाशामध्ये परमेश्वराचे गुणगान करतात आणि त्यानंतर कधीच इतर कार्यासाठी ते अवतीर्ण होत नाहीत. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने इस्माईल नामी देवदूतास या आकाशाच्या समस्त देवदूतांवर शासक नेमले आणि तो चंद्राचा आत्म-तत्व (आत्मा) आहे. मग जेव्हा सर्वश्रेष्ठ परमेश्वर त्याला एखाद्या आदेशाचा हुकूम करतो आणि (तो) देवदूत त्या आदेशाची अंमलबजावणी करतो, तेव्हा त्याला पादपीठावर ('कुर्सी')वर बसवितो. याचे नाव 'मन्सत्तसूर' असे आहे. तो आपल्या नियुक्तीच्या (नेमणुकीच्या) हुद्द्यास्वरूपात बसतो, आणि त्यानंतर तो आपल्या सामर्थ्याकडे परत फिरत नाही. परंतु त्याच सदोष व कमी स्वरूपात बाकी राहतो, आणि अशा या अस्तित्वामध्ये तो परमेश्वरा(अल्लाह)ची उपासना करतो. यासाठी की आत्मे जेव्हा एखादे स्वरूप धारण करतात तेव्हा ते स्वरूप त्यांच्या 'अहम्' अथवा आत्म्यापासून वेगळे होऊ शकत नाही की जेणे करून ते त्याच्यापासून विभक्त होऊन आपल्या मूळ सामर्थ्याकडे प्रवृत्त व्हावेत. हे अशक्य, असंभव (कर्म) आहे. परंतु याच्यामध्ये ही शक्ती आहे की मूळ स्वरूपाशी विभक्त झाल्याशिवाय प्रत्येक स्वरूपामध्ये रूप धारण करू शकेल. आणि ते मूळ स्वरूप परमेश्वरा (अल्लाह)च्या बुद्धिचातुर्याशी निगडित आहे. आणि ते स्वरूप म्हणजे आत्म्याशी संबंधित दैवी वचने आहेत, जे सृष्टीसोबत कायम आहेत, जसे की आत्मा हा देहासोबत कायम आहे. पुन्हा जेव्हा ती सृष्टी अज्ञानापासून निघून प्रत्यक्ष ज्ञानाकडे ओढ घेते, तेव्हा ती अस्तित्वामध्ये आपल्या सत्तांसह कायम राहते. म्हणून समस्त विश्व-शरीरे खनिज, वनस्पती,

प्राणी, शब्द इत्यादीसाठी आत्मे आहेत. इथपर्यंत की जेव्हा शरीर नष्ट होईल तेव्हा आत्मा हा सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या गुणगानामध्ये लागलेला असेल. परमेश्वराने बाकी राखल्यास तो बाकी राहील. यासाठी की परमेश्वराने आत्म्यांना नष्ट होण्यासाठी निर्माण केलेले नाही. याशिवाय नाही की ते शाश्वतासाठी निर्माण केले गेले आहेत. ईश्वरीय प्रेरणा धारण करणारे लोक जेव्हा अस्तित्वाच्या एखाद्या कर्माचा उलगडा करण्याचा संकल्प करतात तेव्हा दैवी वाणी असलेले हे आत्मे त्यांच्यावर प्रकट होतात. मग ते त्यांच्या सत्ता, त्यांची नामे, त्यांची रूपे म्हणजेच गुण ओळखून देतात. यासाठी की अस्तित्वाच्या जगतामधील प्रत्येक आत्मा या पोशाखामध्ये प्रकट होतो. ते या शरीराचे स्तुत्य गुण आहेत. जिचे ते आत्मे प्रबंधकुशल (निपुण)च आहेत. आणि ती शरीरे पशु-प्राणी, खनिज, वनस्पती, मिश्रित आणि अमिश्रित अशी आहेत. किंवा अशा स्वरूपात व्यक्त होतात की आत्मा त्या स्वरूपास सार्थक बनवितो आणि ते वचन, कर्म, गरजा इत्यादी सारखे आहेत. हे त्या वेळेस आहे की जेव्हा ज्ञानाच्या क्षेत्रापासून निघून ते प्रत्यक्ष जगाकडे कूच करेल. परंतु जेव्हा तो ज्ञानक्षेत्रामध्ये आपल्या वस्तुस्थितीशी बाकी राहतो, तेव्हा ईश्वरी प्रेरणाधारक हा त्या आत्म्यांना अशाच प्रकारे त्या स्थितींमध्ये पाहतो, जी नाना प्रकारच्या पोशाखांमध्ये त्याच्यावर कायम असतात. ते त्या स्थानाच्या दृश्य स्वरूपासाठी शरीर अथवा दशेसारखी असते. ते कर्म आणि गुण बनून जातात, परंतु तो ओळखतो की त्यांचे कोणतेच अस्तित्व नसते. परंतु या दृष्टीने की ते आहेत. मग ती त्यापासून जी माहिती हवी असते ती तो प्राप्त करतो. परंतु या दृष्टीने नव्हे की ते आहेत; अपितु ईश्वरी प्रेरणा धारकाच्या स्वरूपामध्ये जशी (की ती वस्तू) आहे. परंतु या आत्म्यांच्या वास्तवांच्या इच्छेनुरूप ते ज्ञान प्राप्त होते. या उलट जर ते प्रत्यक्ष ज्ञानाकडे अग्रेसर झाल्यानंतर पाहतील तेव्हा तो जाणतो की त्यांचे अस्तित्व हे आपल्या हैसियतप्रमाणे आहे जसे की ते आहे. मग तो त्यांच्याशी संवाद साधतो. त्यांच्यामध्ये असलेल्या नाना प्रकारचे ज्ञान आणि वास्तवांच्या आधारे ते त्यास उत्तर देतात. या दृश्यामध्ये काही संदेष्टे, ईशसखा, संतमहात्मे हे काहींच्या सोबत एकत्रित जमा होतात. मग मी यामध्ये ज़बैद शहरामध्ये हिजरी सन ८०० च्या रबी-उल-अव्वलच्या महिन्यामध्ये मुक्काम केले. आणि सर्व प्रेषित, संदेशहर, संत-महात्मे, श्रेष्ठ आणि निकटवर्ती देवदूत, सेवेकरी अधीनस्थ देवदूत या सर्वांना मी पाहिले, आणि समस्त सृष्टीच्या आत्म-तत्वास पण पाहिले. (निरीक्षण केले.) अनादि पासून अनंतापर्यंत असणाऱ्या समस्त वास्तवांच्या आदेशांचे पण ईश्वरी प्रेरणेच्या साहाय्याने मी निरीक्षण केले आणि त्या दैवी ज्ञानांचा शोध घेतला, की ज्यांचे वर्णन करणे अशक्य आहे आणि जे होते त्या दृश्यामध्ये मी होतो आणि झाले ते झाले. म्हणून सद्विचार ठेव आणि कल्याणाविषयी विचारू नको. (ईश्वरी प्रेरणा आणि दिव्य ज्ञानाच्या साहाय्याने अज्ञात गोष्टी पण उघड होतात. इतकेच नव्हे तर त्या प्रत्यक्ष पण होतात, अशी सूफींची धारणा आहे. हाच न्याय उपरोक्त विधानांना लागू होतो, याची जाण कृपया, वाचकांनी ठेवावी.) आता आम्ही त्या बाबकडे वळत आहोत की जिचे आम्ही इच्छुक होतो म्हणजेच पार्थिव आकाशाचे विवेचन सुरू करत आहोत.


**१) पार्थिव प्रथम आकाश - रूक़ैया - चंद्र (सोम)ग्रहाचे आकाश**

जाणून असा की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने या आकाशाचा घेर (परिवृत्त) अकरा हजार वर्षे (११,००० वर्षे) चालण्याइतका लांब अंतराचा मार्ग बनविला आहे, आणि ते परिवृत्तामध्ये सर्व आकाशांहून लहान आहे. चंद्र या आकाशाच्या परिवृत्तास (परिघास) चोवीस (२४) तासांमध्ये पूर्ण करतो. आणि या आकाशाचा व्यास चार

हजार पाचशे (४,५००) वर्षे चालण्याइतका लांब अंतराचा मार्ग आहे, आणि अशाच प्रकारचा प्रत्येक ग्रहासाठी एक लहानसा आकाश आहे ज्यामध्ये तो त्या मोठ्या आकाशामध्ये परिभ्रमण करत असतो. सर्वात मोठा आकाश हा मंद गतीचा आहे, तर लहान आकाश हा शीघ्र गतीचा आहे, आणि मागे हटणारे मोठे व प्रखर प्रकाशाचे तारे, जे मागे सारले जात असल्याचे आपण पाहतो, त्याचे कारण हेच आहे की मोठ्या आकाशाच्या परिभ्रमणामध्ये यांच्या आकाशाचे परिभ्रमण विभिन्न असते. मग ते परिभ्रमणामध्ये त्याच्याहून पुढे जातात. माणूस असा विचार करतो की मागे सारले गेले आहेत, यद्यपि ते मागे सरत नाहीत. कारण की जर ते परत फिरले तर संपूर्ण विश्व – ब्रह्मांड उध्वस्थ होऊन जाईल.

**चंद्राचे जग**

जाणून घ्या की चंद्राचे विश्व हे निळेशार आहे. त्याचा स्वत:चा असा कोणताच प्रकाश नाही. परंतु जेव्हा त्याचा निम्मा भाग हा सूर्यासमोर असतो, तेव्हा तो भाग सूर्यापासून प्रकाश ग्रहण करतो. म्हणून नित्य–सदैव त्याचा निम्मा भाग हा प्रकाशमान असतो, आणि उरलेला निम्मा भाग जो सूर्यासमोर नसतो तो अंधकारमय असतो. म्हणून चंद्र प्रकाश हा नेहमी सूर्याच्याच दिशेनेच पाहिला जातो – पाहण्यात येतो. या उलट बाकीच्या ताऱ्यांमधील प्रत्येक तारा हा संपूर्णपणे सूर्याच्या सम्मुख असतो. यांचे दृष्टान्त हे विशुद्ध पारदर्शक स्फटिकासारखे आहे. जेव्हा अशा स्फटिकावर प्रकाश पडतो, तेव्हा तो आत आणि बाहेर प्रवेश करतो. या उलट चंद्राचे असते. तो खनिज पदार्थांमधील तीक्ष्ण धारदार दगडासारखा आहे. म्हणून तो सूर्यासम्मुख आल्याशिवाय प्रकाश ग्रहण करत नाही. यामुळेच त्याचा प्रकाश पृथ्वीतळावर कमी जास्त होत असतो. बाकी इतर ग्रहांची, ताऱ्यांची अशी स्थिती नाही. हे लक्षात असावे की, काही आकाश काहींना घेरलेले – व्यापलेले आहेत, आणि यांपैकी सर्वात मोठा आकाश शनी ग्रहाचा आकाश आहे, आणि सर्वात लहान आकाश हा चंद्राचा म्हणजेच सोम ग्रहाचा आकाश आहे, आणि त्याचे स्वरूप असे आहे. (आकृती ११ पाहा.)




**आकृती ११**

**आकाशांचे परस्पर संबंध**

प्रत्येक आकाश आपल्या खालच्या आकाशास घासलेला - घासणारा आहे. आणि तो एक अर्थादेश आहे. यासाठी की दिशांमध्ये, मोठ्या प्रखर प्रकाशमान ग्रहाच्या परिभ्रमण दिशेचे ते एक नाव आहे, आणि 'शऩाफ-ए-जरम' ग्रहाचे नाव आहे, जो प्रत्येक आकाशाहून प्रकाशमान आहे. जर आम्ही दुय्यम दर्जाची गुह्ये, एकामध्ये दुसऱ्याचा समावेश, दिशा आणि भ्रमण यांचे वर्णन करू लागू आणि त्यांची वैशिष्ट्ये आणि गरजांचे भाष्य करू लागलो तर अनेक खंड-ग्रंथांची जरूरी भासेल. म्हणून आता आम्ही ते टाळतो. कारण आमचे उद्दिष्ट हे फक्त ब्रह्मज्ञान आहे. जे काही आम्ही व्यक्त - प्रकट वस्तूंचे उल्लेख केले आहेत, त्यांमध्ये सुद्धा आम्ही दैवी गुह्ये गुप्त ठेवली आहेत. आणि या सालपटासाठी त्यांना आम्ही आतील गरासारखे ठेवले आहे. ''अल्लाहचे वचन सत्य असते आणि तोच मार्गदर्शक असतो.''

**२) दुसरे आकाश - माऊन - बुध ग्रहाचे आकाश**

ते एक विशुद्ध तत्त्व, जड पदार्थ आहे. ते सूक्ष्म आहे. त्याचा रंग हा कृष्ण-धवल आहे. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने या आकाशाला चिंतनमूलक वास्तवापासून निर्माण केले आहे. हे अस्तित्वासाठी, मानवाच्या टप्प्याकरिता चिंतन किंवा विचार स्वरूप आहे. म्हणून तर ते 'फ़लक-ए-कातिब' म्हणजेच बुध ग्रहाचे स्थळ आहे. सर्वक्षेष्ठ परमेश्वराने याला आपले 'सर्वसमर्थ' (क़दीर) या नामाचे दृश्य स्वरूप बनवले आहे आणि त्याचे आकाश आपले 'सर्वज्ञ सर्वश्रुत' (अलीम ख़बीर) या नामांनी निर्माण केले.

आधुनिक खगोलशास्त्रानुसार, प्रखर तापमान असलेल्या सूर्याच्या मांडीवर खेळणारे वयाने सर्वात मोठे पण आकारमानाने सर्वात लहान असे सूर्याचे अपत्य म्हणजे बुध ग्रह. तो सूर्यापासून अवघा ५ कोटी ८० लाख किलोमीटर दूर आहे. म्हणजे पृथ्वीच्या तिप्पट जवळ आहे.

नंतर ते देवदूत जे कुशल कारागीरांना मदत करणारे असतात, त्या सर्वांना परमेश्वराने याच आकाशामध्ये ठेवले आहे, आणि त्यांच्यावर एक देवदूत निश्चित केले आहे, ज्याला बुध ग्रहाचे आत्म-तत्त्व (आत्मा) बनवले आहे. या आकाशामध्ये दुसऱ्या इतर आकाशाचे देवदूतांचे आवाज ऐकत होते. कारण की आत्म्यांना नंतर संवाद ऐकण्याची मनाई नाही. (नसते.) परंतु ही गोष्ट तेव्हाची आहे, जेव्हा ते आपल्या जगामध्ये असतील, परंतु जेव्हा ते आपल्या जगामध्ये नसतील, तेव्हा त्यांचा आदेश हा याच जगाचा आदेश असतो, की ज्यामध्ये ते असतील. कारण की यक्ष वा किन्नर (जिन) हे आत्मे आहेत. आणि ते त्या पार्थिव व शरीरी जगामध्ये आहेत. (असतात.) ते वर (आकाशाकडे) चढून जातात. इथपर्यंत की ते आत्म्याच्या जगापर्यंत पोहोचतात, आणि हा पार्थिव आकाशाचा किनारा आहे. या उत्कर्षाच्या आधारे ते द्वितीय आकाशाच्या देवदूतांचे संभाषण ऐकतात, कारण की त्यांच्यामध्ये कसलेच अंतर नसते. लांब अंतरामुळे तिसऱ्या आकाशामधील संवाद ऐकणे त्यांना शक्य नाही. अशाच प्रकारे प्रत्येक स्थळाचे लोक, त्यांच्याहून एक टप्पा किंवा दर्जा वर असलेल्या गोष्टी, ईश्वरी प्रेरणेशिवाय ओळखू शकत नाहीत. जेव्हा अंतर फार असेल आणि दर्जे अनेक असतील, तेव्हा सर्वसाधारण हा त्या वस्तूस जाणत नाही. जी उच्च दर्जामध्ये असेल. म्हणून यक्ष (किन्नर) (जिन) हे पार्थिव आकाशाच्या जवळ जाऊन द्वितीय आकाशाच्या देवदूतांचे आवाज ऐकत असत की

जेणे करून काही गोष्टी चोरून वि-भक्तां (मुश्रिकां)ना ऐकवत आणि त्यांना परोक्षांच्या गोष्टींची कल्पना देत. आता जेव्हा केव्हा ते या स्थळापर्यंत वर चढतात, तेव्हा तेव्हा त्यांच्यावर एक प्रकाशमान तारा तुटून पडतो आणि त्यांना जाळतो. अंधकारमय पटलांमध्ये गुंतलेल्या लोकांना त्यांचे दोष दाखवून देणारा तो मुहम्मदी प्रकाश(च) आहे. म्हणून जे धैर्यधर पक्षी आपले पंख जळून जातील की काय या भीतिपोटी आपले अवसान गमावतात त्यांच्यासाठी प्रगती शक्य नाही. ते पश्चातापदग्ध होऊन परत फिरतात.

**प्रेषित नूहशी भेट**

मी या आकाशामध्ये प्रेषित नूह यांना एका सिंहासनावर बसलेले पाहिले. हे सिंहासन महान प्रकाशाने (देदिप्यमान प्रकाशाने) बनलेले होते. प्रभुगुणगान करणाऱ्या मंडळींदरम्यान ते बसलेले होते. मी त्यांना अभिवादन ('सलाम') केले आणि ठीक त्यांच्या समोर उभा राहिलो. त्यांनी माझ्या अभिवादनास प्रत्युत्तर दिले. त्यांनी शाबास! मरहबा! असे उद्‌गार काढले. मग मी त्यांना त्यांचे वैचारिक आकाश आणि गुप्त स्थळाविषयी विचारणा केली. त्यांनी उत्तर दिले की हा आकाश सुप्रसिद्ध मोत्यांची माळ (लडी) आहे. त्यामध्ये साधू-महात्म्यांच्या कुमारिका प्रकट होतात. या आकाशाचे देवदूत सामर्थ्याच्या प्रकाशापासून निर्मित आहेत. ते व्यक्त जगत् आहेत. कोणत्याच वस्तूची कल्पना करवत नाही, परंतु त्या परिस्थितीमध्ये की आकाशाचे देवदूत त्या दृश्याचे स्वरूप बनविण्याचे व्यवस्थापक असतात. म्हणून ही लघु गुह्ये चित्रणासाठी आदेशित प्रारब्धाची लघु गुह्ये असतात. भयप्रद भयंकर निशाण्या व चमत्कारांचा आदेश त्यांच्यावरच प्रकट होतो. दिसणारे चमत्कार यांच्यामुळेच निर्माण होतात. ईश्वराने या आकाशामध्ये देवदूत निर्माण केले आहेत. लोकांना सत्य प्रकाशाकडे मार्गदर्शन करत राहणे हीच त्यांची एकमेव उपासना आहे. हे उपदेशाच्या आकाशामध्ये सामर्थ्याच्या पंखाच्या आधारावर उडतात. यांच्या डोक्यावर प्रकाशाचे मुकुट आहेत. या देवदूतांपैकी एखाद्या देवदूताच्या पाठीवर जी व्यक्ती स्वार होते, तो तिला घेऊन आपल्या पंखाच्या बळाने सात आकाशापर्यंत उडतो, आणि आत्म्याच्या प्रसन्नतेस जेव्हा इच्छील आणि जसे इच्छील त्याप्रमाणे तो शरीरामध्ये अवतरवितो. पुन्हा जर तो त्यांच्याशी बोलत असेल तर ते त्यास बोलून दाखवतात. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने या आकाशाचे परिघ तेरा हजार तीनशे तेहतीस वर्ष (१३,३३३ वर्ष) आणि एकशेवीस (१२०) दिवसांमध्ये पूर्ण करण्याइतके मार्गाचे निर्माण केले आहे. या आकाशाचे ग्रह बुध आहे. तो प्रत्येक तासामध्ये पाचशे पंचवीस (५२५) वर्ष आणि पाच (५) महिने व वीस (२०) दिवसाचा मार्ग आक्रमण करतो, आणि सर्व आकाशास चोवीस (२४) तासांमध्ये पूर्ण करतो आणि महदाकाशास संपूर्ण एक वर्षामध्ये पूर्ण करतो. या देवदूताच्या आत्म्याचे नाव 'तबहाईल' असे आहे. हा या आकाशाचे समस्त देवदूतांचा शासक आहे. मी या आकाशामध्ये परमेश्वराचे चित्र-विचित्र चमत्कार आणि सृष्टींची रहस्ये पाहिली आहेत. या युगातील लोकांसमोर याचा उलगडा करण्याची गुंजाइश नाही. म्हणून त्या गोष्टींकडे आम्ही संकेत केले आहे त्यावर विचार करा, आणि या गोष्टीविषयी चिंतन करा. ज्याचे आम्ही कोड्याच्या (कूट भाषेत) रंगामध्ये वर्णन केले आहे ते तुझ्या अस्तित्वापासून आहे. ते तुझ्यापासून बहिष्कृत नाही. आमच्या या रहस्याचा उलगडा कर.

### ३) तिसरे आकाश – मलकूत – शुक्र ग्रहाचे आकाश

तिसऱ्या आकाशाचे रंग पिवळे आहे आणि ते शुक्राचे आकाश आहे. त्याचे तत्त्व विशुद्ध-स्वच्छ आहे, आणि त्याचे निवासी हे सर्व गुणांमध्ये रंग बदलणारे आहेत. विचाराच्या वास्तवाशी निर्माण केले गेले आहे, आणि प्रतिकृतीत प्रतिरूप जगत् किंवा सादृश्य जगताचे स्थळ बनवले गेले आहे. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने या आकाशाचे ग्रह शुक्रास आपले नाम सर्वज्ञा (अलीम)चे स्रोत-स्थळ बनवले आहे आणि याच्या आकारास मीमांसक स्रष्टा अर्थात ईश्वराच्या सामर्थ्याचे प्रकाशक निर्धारित केले आहे. याचे देवदूत प्रत्येक स्वरूपामध्ये निर्मित आहेत. यांमध्ये अशी चित्र-विचित्र विलक्षणता व अद्भुतता आहे की जिची कल्पनासुद्धा करवत नाही. (करता येत नाही.) अशक्य याच्यामध्ये सोपे आहे. आणि पुष्कळ वेळेस याच्यामध्ये वैध (गोष्टी) पण निषिद्ध होऊन जातात. या आकाशाचे परिघ सर्वश्रेष्ठ परमेश्वराने पंधरा हजार छत्तीस (१५,०३६) वर्ष आणि वीस (२०) दिवस (अंतराचे) बनवले आहे. याचा ग्रह शुक्र आहे. हा प्रत्येक तासामध्ये सहाशे एकतीस (६३१) वर्षे व साडेआठ (८.५) दिवसांचा मार्ग आक्रमण करतो. आणि सर्व आकाशास चौवीस तासांमध्ये (आपले भ्रमण) पूर्ण करतो. आणि महदाकाशाच्या सर्व टप्प्यांना तीनशे चोवीस (३२४) दिवसांमध्ये कापतो. या आकाशाचे देवदूत 'सूराईल' नावाच्या देवदूताच्या अधीन आहेत, आणि तो शुक्र ग्रहांचा आत्मा आहे. या आकाशाचे देवदूत जगास घेरलेले आहेत. मानवजातीपैकी जो कोणी याची आठवणीने आळवणी करतो, तो त्यास प्रतिसाद देतो. मी या आकाशाच्या देवदूतांना एकत्रित आणि अनुकूल असलेल्या परिस्थितीमध्ये पाहिले आहे, परंतु ते विभिन्न आकार-प्रकाराचे आहेत. काही निद्रिस्तांवर प्रज्ञान पाठविण्याच्या कामगिरीवर नियुक्त आहेत – स्पष्ट रीतीने किंवा दृष्टांताद्वारे. लोक ज्या पद्धतीने समजू शकतील त्या पद्धतीने. आणि काहींना शिशूंना प्रशिक्षित करण्यासाठी आणि त्यांना अर्थबोध व सुभाषितांचे मर्म समजावून देण्यासाठी नियुक्त केले आहे. आणि काहींना चिंताक्रांत (चिंतामग्न) आणि व्यथितांना सांत्वना देण्यासाठी नेमले आहे. ही जबाबदारी त्यांच्यावर सोपवली आहे. काहींना भयभीत लोकांना एकत्रित करून त्यांच्यामध्ये आपसात सख्य जुळवून दिलासा देण्यासाठी नियुक्त केले आहे, आणि काहींना एकटे राहण्यासाठी त्यांच्याशी वार्तालाप करण्यासाठी वेताळ (मुवक्किल) स्वरूपात नेमले आहे. काहींना सर्वश्रेष्ठ परमेश्वराने स्थिरचित्त लोकांचे आदेशांचे परिपालन करण्यासाठी वेताळ (मुवक्किल) म्हणून नेमले आहे की जेणेकरून ते त्यांच्यासाठी स्वर्गामधील गोड फळांना नेत्रसुखदायक परम रूपवती अप्सरांच्या हातून पोहोचवावेत. काहींना प्रेमीजनांच्या अंत:करणामध्ये प्रेमाग्नी प्रदीप्त करण्याच्या कामगिरीवर वेताळ म्हणून नेमले आहे. आणि काहींना प्रेयसीच्या सुंदर चेहऱ्यास शाबूत-सुरक्षित ठेवण्यासाठी वेताळ नेमले आहे की जेणेकरून प्रियकराच्या अंत:करणामध्ये प्रज्ज्वलीत असलेला प्रेमाग्नी थंड होऊन जाऊ नये, आणि काहींना परमेश्वराने मध्यस्थ लोकांदरम्यान संदेश पोचविण्याच्या कार्यासाठी नेमलेले आहे. मी या आकाशामध्ये प्रेषित यूसुफ यांना भेटलो. त्यांना मी गुह्यांच्या सिंहासनावर आसनस्थ असल्याचे पाहिले. ते ज्ञान-प्रकाशाची गुह्ये प्रकट करणारे होते. या वास्तवाचे ते ज्ञाते होते. जाणकारांना याची (मुळीच) जाणीव नाही. वास्तवांच्या तथ्यांशी अवगत होते. पाणी आणि कुंभा (घट)च्या गरजां (मर्यादा)पासून मुक्त होते. मी त्यांच्या प्रतिष्ठेशी सुसंगत अशी आळवणी करून त्यांना अभिवादन (सलाम) केले, त्यांच्याकडे येणाऱ्यांनाही अभिवादन केले. त्यांनी माझ्या अभिवादनाचा स्वीकार करून मला आशीर्वाद दिले आणि शाबास! मरहबा!

असे उद्‌गार काढून माझी पाठ थोपटली. माझ्या क्षेमकल्याणाविषयी विचारपूस केली. मी त्यांना म्हणालो, हे माझ्या महापुरुषा (सय्यद), मला ''रब्बि क़दु ऐतनी मिनल मुल्कि व अल्लामतनी मिन तावीलुल अहादीसि'' आपल्या या विधानासंदर्भात असे विचारावेसे वाटते की यामध्ये कोणत्या दोन प्रदेशांविषयी आपला आशय आहे, आणि कोणत्या प्रेषित वचनां (अहादीस)च्या स्पष्टीकरणावरून आपण गुप्त संकेत केले आहेत? त्यांनी उत्तर दिले की माझा आशय हा दिव्यत्वाच्या साम्राज्याशी आहे, जे मानवाच्या मर्मामध्ये ठेव स्वरूपात ठेवण्यात आले आहे आणि प्रेषित वचनांच्या मीमांसेच्या आधारे त्या ठेवींचे आशय आहेत, जे प्राण्यांच्या बोलींमध्ये समाविष्ट आहेत. (मग) मी त्यांना म्हणालो, हे माझ्या महापुरुषा (सय्यद)! काय; हे निवेदन स्पष्टीकरणाच्या गंतव्याखातर सांकेतिकपणे आधान स्वरूपात ठेवले गेले नाही? ते म्हणाले; लक्षात ठेव. दासांमध्ये, भक्तांमध्ये सर्वश्रेष्ठ परमेश्वराची ठेव (अमानत) असते की ज्याला त्या ठेवीचे तार्किक धर्मशास्त्रवेत्ते मार्गदर्शन करण्यासाठी मार्गदर्शकांपाशी पोहोचवतात. मग मी त्यांना म्हणालो, सत्याची ठेव कशी बरे असू शकते! यद्यपी ती अभिव्यक्ती व प्रकटीकरणांमध्ये अस्तित्वाचे मूळ असते. ते म्हणाले की ते त्याचे गुण आहे आणि हे त्याचे वैभव आहे. तो त्याचा आदेश आहे. अज्ञानी ठेवीस आपल्या जीव्हेमध्ये ठेवतो आणि ज्ञानी हा अंत:करणामध्ये अंतरंगात लपवून सुरक्षित ठेवतो. आणि सर्व यामुळे आश्चर्यचकित आहेत आणि ब्रह्मज्ञानीखेरीज कोणतीच व्यक्ती कुठल्याही वस्तूवर विजय मिळवू शकत नाही. मी त्यांना म्हणालो, हे कसे होऊ शकते? जाणून घे की परमेश्वर तुझे अनुमोदन करो. तुला सुरक्षित ठेवो. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने आपल्या गुह्यांना संकेतांच्या मोत्यांच्या रूपाने लेखस्वरूपात ठेव म्हणून ठेवले आहे. आणि ते रस्त्यात पडलेले आहेत. एका विवेकशील पक्षास कंठाग्र आहेत. सर्वसामान्य लोक त्यांच्या संकेताशी अनभिज्ञ आहेत. पण ज्ञानी त्यास ओळखतात की जे गुह्य लेखामध्ये व्यक्त (प्रस्तुत) आहे. मग ते आपल्या गरजेनुसार यथास्थान त्या लेखांचे भाष्य करतात. आणि ईश्वराच्या इच्छेनुसार त्यांचे प्रसार करतात. स्वप्न-मीमांसा पण याच (गुह्याच्या) समुद्राचा एक थेंब आहे. अथवा या वैराण प्रदेशामधील दगडांपैकी एक लहानसा खडा (खडी) आहे. मग मी ती गोष्ट जाणून घेतली जिच्याकडे प्रेषित युसूफ यांनी संकेत केला होता आणि मी या अगोदर सुद्धा या शोधाविषयी अनभिज्ञ नव्हतो. नंतर मी त्यांना सोडून सर्वोच्च मित्राकडे परतलो आणि तो चांगला सखा होता.

### ४) चौथे आकाश – ज़ाहिरा – रवी ग्रहाचे आकाश

चौथे आकाश एक बहुमूल्य तत्त्व आहे. हे प्रखर रंगाचे आहे. देदिप्यमान सूर्याचे आकाश आहे. आकाशांचे ध्रुव-आधार आहे. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने या आकाशास आपल्या अंत:करणाच्या प्रकाशापासून निर्माण केले आहे. सूर्यास यामध्ये जगाच्या अंत:करण स्वरूपात ठेवून दिले आहे. तारे याच्यापासूनच प्रकाश ग्रहण करतात. त्यांच्या श्रेणींचा मनोरा त्याच्यामुळे उंच होतो. ईश्वराने रवी ग्रहाच्या या आकाशास या चैतन्यमय आकाशामध्ये ईश्वरी सत्तेचे सर्वोच्च श्रेणीचे स्रोत-स्थळ बनवले आहे. सूर्य हा समस्त भौतिक सृष्टीचा मूळ आहे, जसे की ईश्वरी शुभनामांमध्ये 'अल्लाह' हे नाम सर्वोच्च आहे. प्रेषित हदीस यांना ते ज्ञानी असल्याकारणाने सर्वश्रेष्ठ परमेश्वराने आत्म्याच्या वास्तवाने या निर्मळ स्थानावर अवतरित केले. म्हणून ते प्रतिष्ठेमध्ये इतरांहून सुप्रतिष्ठित ठरले. ईश्वराने या आकाशास प्रकाश प्रकटनाचे स्थळ आणि गुह्यांची खाण बनवले.

**इस्राफ़ीलचे स्थळ**

नंतर हे जाणले पाहिजे की प्रतिष्ठित महान देवदूत, ज्याचे नाव इस्राफ़ील आहे, या आकाशाच्या देवदूतांचा शासक आहे. आणि त्यामध्ये कोणताच खोलगट हा उंचवटा होत नाही. आणि कोणतेच आकुंचन आणि प्रसरण त्याच्यामध्ये उत्पन्न झाले आहे. परंतु या देवदूताच्या अदलाबदलीमुळे, ज्यास या आकाशाचा सर्वश्रेष्ठ परमेश्वराने अधिकर्ता बनवले आहे आणि तो सर्व देवदूतांहून महान दिव्य आहे, आणि विस्तारामध्ये त्यांच्याहून मोठा आणि साहसामध्ये प्रबळतर आहे. 'सिद्रतुल मुंतहा' म्हणजेच कल्पवृक्षापासून ते 'तहतस्सरा' अर्थात पाताळापर्यंत (सर्व) याच्याचसाठी आहेत. तो सर्वांवर अधिकार गाजवतो आणि प्रत्येक लहान-मोठ्यांसाठी तो समर्थ आहे. त्याचे प्रदर्शन करण्याचे स्थान 'कुर्सी' (पादपीठा)जवळ आहे आणि त्याचे सीमान्त रवी ग्रहाचे हे आकाश आहे. समस्त आकाश आणि पृथ्वी आणि जे काही यांच्यामध्ये बोध व संवेद्यस्वरूपात आहे (ते) सर्व काही त्याचेच जग आहे.

जाणून असा की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने रवी ग्रहाच्या आकाशास सतरा हजार, एकोणतीस वर्ष (१७,०२९) आणि साठ (६०) दिवसांच्या मार्गाचा बनवले आहे. मग तो सर्व आकाशास चोवीस (२४) तासांमध्ये (आपली परिक्रमा) पूर्ण करतो. तो महदाकाशास तीनशेपासष्ट आणि एक चतुर्थांश दिवस आणि तीन तासामध्ये (३६५.१/४ दिवस, ३ तास) कापतो.

**प्रेषित इद्रीस यांचे स्थळ**

हे जाणले पाहिजे की ज्या स्थळावर प्रेषित इद्रीस अ. आहेत, ते स्थळ प्रेषित मुहम्मद यांच्या स्थळांपैकी एक आहे. आपल्याला हे माहीतच आहे की दिव्यारोहणाच्या रात्री ('शब-ए-मेराज') प्रेषित मुहम्मद स. हे या चौथ्या आकाशावर पोहोचले. मग तेथून त्यांनी वरच्या आकाशाकडे प्रयाण केले आहे. म्हणून इद्रीस यांच्या स्थळावर प्रेषित मुहम्मद स. यांचे पोहोचणे हे प्रभुत्वाच्या टप्प्यापासून उच्च स्थळावर पोहोचण्याचे निदर्शक आहे. आणि तेथून त्यांचे पुढे प्रयाण होणे हे या गोष्टीचे प्रमाण आहे की जे त्याच्याहून उच्चतर आहे, इथपर्यंत की आपल्या (त्यांच्या) प्रतापाची आज्ञा ''सुबूतल्लजी अस्रा बिअब्दिह'' म्हणजेच ''त्याचेच वैभव आहे जो आपल्या सेवकाला......'' - १७:१ च्या मैत्री, सख्याशी संबंधित निघाले. म्हणून तपस्येचे, भक्तीचे स्थळ हे ते उच्च वंद्य स्थळ, प्रशंसित स्थळ ('मक़ाम-ए-महमूद') आहे. आणि ''रफ़ीउश्शान लिवा हम्द'' आहे.

**प्रेषितांचे स्थळ**

हे जाणून असा की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने अस्तित्वास संपूर्णपणे सूर्याच्या ठिपक्यामध्ये (काळ्या डागामध्ये) गुप्तपणे ठेवले आहे. सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या आदेशामुळे नैसर्गिक शक्ती त्यास थोडे थोडे करून प्रकट करतात. म्हणून सूर्य हा गुह्यांचा बिंदू आणि प्रकाशांचे परिवृत्त अर्थात वर्तुळ आहे. अधिकांश स्थिरचित्त दृढ लोक व संदेशहर (प्रेषित) याच मजबूत आकाशाच्या वर्तुळामध्ये आहेत. उदाहरणार्थ, ईसा, सुलेमान, दाऊद, इद्रीस, जर्जीस इत्यादी. संदेशहर (प्रेषित) हे मोठ्या संख्येत आणि बऱ्याच काळापासून आहेत. ते सर्व या स्पष्ट व प्रकट टप्प्यामध्ये निवास करतात आणि या उच्च स्थळावर आरूढ असतात.

## ५) पाचवे आकाश – मसहरा – मंगळ ग्रहाचे आकाश

हा मंगळ (बहराम) नावाच्या ग्रहाचा आकाश आहे. हे दिव्यत्वाचे व प्रतिशोधाचे माहात्म्य याचे स्रोतस्थळ आहे. यामध्ये प्रेषित याहिया माहात्म्य तप:लोकाचे निरीक्षण आणि प्रतिष्ठा व देवलोकाचे अनुशीलन यासाठी अवतरित झाले आहेत. म्हणून त्यांच्याकडून प्रमादाचे प्रयत्न झाले नाही. जी व्यक्ती साहस आणि मित्रत्वाचा दर्जा राखते यास सोडून त्यांच्यापैकी कोणीच नाही. त्याचे आकाश विवेकाच्या प्रकाशाने निर्मित आहे आणि त्याचा रंग रक्तासारखा लाल आहे आणि या आकाशाच्या देवदूतांना सर्वश्रेष्ठ परमेश्वराने पराकाष्ठेचे आरसे आणि प्रतापाचे स्रोत-स्थळ बनवले आहे. याच कारणास्तव अस्तित्वामध्ये सर्वश्रेष्ठ परमेश्वराची पूजा केली गेली आहे. आणि यांच्याचमुळे नतमस्तक होऊन अनुसरण करणारे लोक परमेश्वराच्या अधीन झाले. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने या देवदूतांची उपासना, परावृत्तास प्रवृत्त करून (ईश्वरा)समीप आणणे आणि अंतर्धान झालेल्यास प्रकट (व्यक्त) करणे, ही बनविली. यांच्यापैकी काहींची उपासना अशी असते की ते श्रद्धाहीनांना – अ-भक्तांना गुह्यांच्या जगापासून परावृत्त करतात, हटवतात. आणि काहींची उपासना ही रुग्णास रोगमुक्त करणे आणि हाडे मोडलेल्यांची हाडे जोडून देणे, अशी असते. काहींना प्राणोत्क्रमण करण्यासाठी निर्माण केले आहे. म्हणून हा देवदूत परमेश्वराच्या आदेशान्वये निष्पाप आत्म्याचे प्राण हरण करतो. या आकाशाचे शासक 'अलाईल' आहेत. यांचेच नाव इज्राईल देवदूत आहे. आणि तो मंगळ ग्रहाचा आत्मा आहे. तो बदला घेणारा आणि भर्त्सना करून फटकारणारा आहे. या देवदूताचे सीमान्त सर्वश्रेष्ठ परमेश्वराने याच आकाशास ठरवले आहे आणि याचे (कर्मपत्रकाचे) दप्तर 'क़लम-ए-आला' म्हणजेच सर्वश्रेष्ठ लेखणीपाशी आहे. या देवदूताच्या आदेशाशिवाय बदला घेणे, आत्म्याचे प्राण हरण करणे आणि व्यवस्था प्रस्थापित करणे यासाठी कोणताच देवदूत अवतरित होत नाही. हा मंगळ ग्रहाचा आत्मा आहे.

हे जाणले पाहिजे की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने या आकाशाच्या भ्रमणास एकोणीस हजार आठशे तेहतीस वर्ष आणि एकशेवीस दिवसां (१९,८३३ वर्ष व १२० दिवस)चा मार्ग बनवले आहे. हा ग्रह त्यामुळे प्रत्येक तासास आठशेसव्वीस वर्ष व चाळीस दिवस (८२६ वर्ष व ४० दिवस)चा मार्ग आक्रमण करतो. अशा रीतीने सर्व आकाशास चोवीस (२४) तासांमध्ये पूर्ण करतो. आणि महदाकाशा (महत् आकाशा)स अंदाजे पाचशे चाळीस दिवसा (५४० दिवसा)मध्ये पूर्ण करतो. त्याचा आत्मा योद्धा आणि बदला घेणाऱ्या लोकांचा सहाय्यक आहे. ज्याची मदत करण्याचा दृढ संकल्प सर्वश्रेष्ठ परमेश्वराने केलेला असतो आणि जो परमेश्वराशी मजबूत करार (नामा) केलेला असतो अशा व्यक्तीच्या मदतीसाठी तो वेताळ (मुवक्किल) असतो.

## ६) सहावे आकाश – ख़ालसा – गुरू ग्रहाचे आकाश

याचे सीमांकन साहसाचे प्रकाश वा साहस-ज्योतीशी आहे. ते एक विशुद्ध, स्वच्छ तत्त्वाच्या आत्म्याने बनलेले असून निळ्या रंगाचे आहे. याचा ग्रह शाश्वतता व निरंतरता याचे स्रोत-स्थळ आहे. हे प्रकाशाचे धनी आहे, प्रकाशमान आहे. याचे नाव गुरू आहे. मी या स्थानावर प्रेषित मूसा यांना स्थानापन्न पाहिले. त्यांनी आपले पाय आकाशाच्या पृष्ठभागावर टेकवले होते आणि आपल्या उजव्या हाताने मसिद्र तुल मुंतहाम म्हणजेच कल्पवृक्षाच्या पिंडरीस धरलेले होते. प्रभुत्वाच्या प्रकाशाच्या मदिरेमुळे मस्त होऊन सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या

प्रतिष्ठेमुळे आश्चर्यचकित होते. त्याच्या ज्ञानाच्या दर्पणामध्ये सृष्टींच्या आकृती रेखाटलेल्या होत्या. त्याच्या अहंकारामध्ये देवदूत 'दय्यान'चे प्रभुत्व प्रकाशित होते. त्याचा चेहरा पाहणारास भीतिदायक वाटतो. त्याचे स्वरूप येणारा-जाणारांच्या मनामध्ये भीतिचा धडका निर्माण करतो. मग मी मोठ्या अदबीने त्यांच्यासमोर उभा राहिलो आणि त्यांच्या प्रतिष्ठेस जाणून मी त्यांना 'सलाम' (अभिवादन) केला. त्यांनी अनादिच्या मस्तीपासून आपले डोके वर केले आणि मला 'मरहबा!' 'शाबास!' म्हणाले आणि आपले लायक बनवले. मी त्यांना म्हणालो, हे माझ्या महापुरुषा! (सय्यद), सत्यभाषी! सत्य बोलणाऱ्याने मला बातमी दिली की ईश्वरी दरबारापासून आपणास ''तू मला मुळीच पाहू शकणार नाहीस''चा सन्मान प्रदान करण्यात आला होता आणि तुमची ही स्थिती अवगुंठन धारण करणारासारखी नव्हती. या विचित्र आदेशाचे वास्तव मला समजावून द्या. त्यांनी उत्तर दिले. तर मग ऐक. जेव्हा मी आपली मातृभूमी मिसर (इजिप्त)हून निघून आपल्या काल्पनिक वास्तवाकडे आलो आणि मी अनादिच्या प्रकाशाचे स्वच्छ मैदानात एकत्वतेच्या वृक्षाच्या बाजूने आपल्या प्रभूच्या जिव्हेने आपल्या अंत:करणाच्या पर्वतापासून पुकारला गेलो की, ''मी अल्लाह आहे. माझ्याशिवाय दुसरा कुणी उपास्य नाही. माझी उपासना कर.'' तर पुन्हा जेव्हा मी वस्तूंमध्ये त्याची उपासना केली, जशी त्याने मला आज्ञा केली होती आणि नामगुणांनिशी मी त्याचे स्तवन करण्याचा त्याचा अधिकार होता, तेव्हा प्रभुत्वाचे प्रकाश माझ्यावर प्रकाशित झाले आणि त्याने मला माझ्या अस्तित्वापासून घेऊन टाकले. तेव्हा मी दर्शनस्थळावर चिरंतनतेची इच्छा केली. आणि ही गोष्ट अशक्य आहे की प्राचीन चिरंतनतेच्या प्रकटनावर नूतनता कायम आणि अखंड राहू शकेल. पण माझ्या मर्माच्या जिव्हेने या महान आदेशाची मध्यस्थता करत आवाज दिला आणि मी म्हणालो -

''हे माझ्या पालनकर्त्या! तू मला स्वत:चे दर्शन घडव, म्हणजे मी तुला पाहू शकेन.'' आणि माझ्या अहंकारास आपल्या पावित्र्याच्या स्तरामध्ये दाखल करून घे.'' तेव्हा पावित्र्याच्या मंदिरापासून (दर्ग्यापासून) मी हे उत्तर ऐकले की -

''तू मला कदापि पाहू शकणार नाहीस, पण तू त्या (सिनाई) पर्वताकडे पाहा,'' आणि ती तुझी सत्ता आहे जी अनादि काळामध्ये माझ्या प्रकाशापासून निर्मित आहे. ''तो जर आपल्या ठिकाणी स्थिर राहिला तरच, तू मला पाहू शकशील.'' याच्यानंतर की अनादिच्या साम्राज्याचा उदय झालेला असेल.

''जेव्हा त्याच्या पालनकर्त्याचे दिव्य तेज प्रकट झाले.''

आणि अनादिच्या वास्तवाने मला ओढले आणि प्राचीन अर्वाचीनावर प्रकट झाले. ''तेव्हा त्या पर्वताचे तुकडे-तुकडे होऊन धुळीत रूपांतर झाले. आणि (ते पाहून) मूसा बेशुद्ध होऊन खाली पडला.'' ७:१४३

मग अनादिमध्ये, अनादिशिवाय कोणतीच वस्तू शिल्लक नाही राहिली. आणि महात्म्यामध्ये फक्त महानच प्रकट होता. आणि हा आदेश या आधारावर आहे की या स्थळाच्या सत्यास पूर्ण करणे अशक्य आहे, आणि याचे अवलंबन उचित नाही. म्हणून याचे मूळ समजले जाऊ शकत नाही, ना पाहिले जाऊ शकते ना त्याचे वंश ज्ञात होऊ शकते ना समजले जाऊ शकते. मग जेव्हा अनादिचा मध्यास या उपाधीने संबोधित झाला तेव्हा 'उम्मुल किताब' म्हणजेच ग्रंथ-मातृकापासून या आदेशाची तुम्हास कल्पना दिली आणि सत्य गोष्टीचे अनुवाद केले. नंतर मी त्याला सोडून निघालो आणि त्याच्या समुद्रापासून ओंजळीत जे घ्यायचे होते ते घेतले.

### गुरू ग्रहाचे स्थळ

जाणले पाहिजे की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने या आकाशाच्या कालचक्रास बावीस हजार, सहासष्ट वर्ष व आठ महिने (२२,०६६ वर्ष व ८ महिने) इतक्या महिन्याचा मार्ग बनवला आहे. या ग्रहाचे नाव गुरू आहे. तो प्रत्येक तासामध्ये नऊशे एकोणीस वर्ष, पाच महिने आणि साडेसत्तावीस दिवस (९१९ वर्ष, ५ महिने व २७.५ दिवस) इतका रस्ता कापतो. यास्तव तो संपूर्ण आकाशास चोवीस (२४) तासांमध्ये कापतो आणि महदाकाशा (महत् आकाशा)स बारा (१२) वर्षांमध्ये कापतो. आणि प्रति महदाकाशा (महत् आकाशा)स बारा (१२) वर्षांमध्ये कापतो. आणि प्रति वर्ष तो महदाकाशाच्या एका राशीस पार करतो. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने या आकाशास साहसाच्या प्रकाशाने निर्माण केले आहे. आणि याच्या देवदूतांवर 'मीकाईल' यास वेताळ (मुवक्किल) बनवले आहे. ते कृपेचे देवदूत आहेत. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने त्यांना संदेशहरां (प्रेषितां)चे उत्कर्ष (याचा) आणि संत-महात्म्यांचे प्रगतीचा जीना बनवले आहे. ईश्वराने त्यांना यासाठी उत्पन्न केले आहे की जेथे वास्तवांसाठी गरज असेल तेथे गूढास पोहोचवण्यात यावे. खालच्यास वर उचलून आणणे, कठीण व अशक्यास सोपे आणि शक्य करणे हा त्यांचा नियम आहे. जेव्हा पृथ्वीतलावरील निवासी अध:पतनाच्या अंधारापासून उच्च स्तरावर येतात तेव्हा ते पृथ्वीवर आपल्या बुद्धीची प्रखरता दर्शवतात आणि ते देवदूतांमध्ये संकोच व प्रमाणांचे लोक आहेत आणि ते उत्तमोत्तम उपजीविकेस त्याची आस बाळगणारांकडे पोहोचते करतात. ते देवदूतांमध्ये आळवणी मान्य – स्वीकार करणारांपैकी आहेत. ते जेव्हा एखाद्यासाठी कृपायाचना करतात तेव्हा त्यांची कृपायाचना स्वीकारली जाते. जेव्हा ते संकटग्रस्त लोकांजवळून जातात तेव्हा त्यांची संकटे टळतात व ते सुरक्षितपणे वाचतात. प्रेषित मुहम्मद यांच्या वचनामध्ये की ज्याचे 'तथास्तु' (आमीन) म्हणणे हे देवदूतांच्या 'तथास्तु' म्हणण्यासारखे असेल तर त्यांची कृपायाचना स्वीकारली जाते आणि त्याची कामना-इच्छापूर्ती होते. हे त्यांच्याचकडे संकेतित आहे. प्रत्येक देवदूताची कृपायाचना स्वीकारली जात नाही आणि प्रत्येक प्रशंसकाची प्रशंसा चांगली गणली जात नाही. नंतर मी आकाशाच्या देवदूतांना सर्व प्रकारच्या प्राण्यांच्या स्वरूपात निर्मित असलेले पाहिले आहे. काही पक्षी रूपात आहेत. त्यांचे अगणित असे पंख आहेत. त्यांची गणती करणे अशक्य आहे आणि अशा प्रकारच्या देवदूतांची उपासना गुपीतांची सेवा करणे ही आहे. आणि ते अंधाराच्या वसतीपासून प्रकाशाच्या जगाकडे खेचतात. काही पताकाधारी – ध्वजवाही घोड्यांच्या स्वरूपात आहेत. या प्रतिष्ठित समुदायाची उपासना अंत:करणांना दृश्य जगाच्या बंधनापासून अदृश्य जगाच्या प्रारब्धामध्ये उंचावणे आहे. आणि काहींना सर्वश्रेष्ठ परमेश्वराने उत्तम प्रकारच्या प्रवासी उंटांच्या स्वरूपात उत्पन्न केले आहे. आणि अशा प्रकारची उपासना काही अस्तित्वांना म्हणजेच लोकांना संवेदनाच्या जगण्यापासून भावनेच्या जगाकडे घेऊन जाते.

### देवदूतांच्या आकृती (स्वरूप)

ईश्वराने काहींना गाढव आणि खेचरे यांच्या आकृतीसारखे निर्माण केले आहे, आणि यांची उपासना तुच्छास मान-मरातब प्रदान करणे आणि विभक्त झालेल्यांची भेट घडवून आणणे आणि तसेच अल्पसंख्यांकांना बहुसंख्यांकांमध्ये बदलणे आहे. काहींना मानवी स्वरूपामध्ये निर्माण केले आहे आणि त्यांची उपासना धर्मांच्या नियमांना सुरक्षित ठेवणे आहे. काहींना भौतिक तत्त्व आणि भूमींच्या अमिश्रित व निष्केवळ

गुणांच्या स्वरूपात निर्माण केले आहे आणि त्यांची उपासना आजारी देहांना बरे करणे (रोगमुक्त करणे) ही आहे. काहींना खारे-गोड पाणी आणि उत्तम पेयांच्या स्वरूपात निर्माण केले आहे आणि त्यांची उपासना सर्व सजीवांना उपजीविका पोहोचवणे आहे. आणि पुन्हा या आकाशामध्ये मी असे देवदूतपण पाहिले आहेत जे दोन वस्तूंच्या मिश्रणामुळे निर्माण झाले आहेत. म्हणून त्यांचा निम्मा भाग अग्नीमय आहे, तर निम्मा भाग गोठलेल्या पाणी म्हणजे बर्फापासून बनलेले आहे. यास्तव ना पाणी आगीस विझवू (शांत करू) शकतो ना अग्नी पाण्याची परिस्थिती बदलू शकतो.

**मीकाईल (देवदूता)चे स्थान**

हे जाणून असा की देवदूत मीकाईल हे या आकाशाच्या ग्रहाचे आत्मा आहेत. या आकाशामध्ये निवास करणारे सर्व देवदूतांचे ते शासक आहेत. ईश्वराने या आकाशास त्यांची सीमा ठरवली आहे. यांची बैठक (वा यांचे सभागृह) 'सिद्रतु मुंतहा' म्हणजेच कल्पवृक्षाच्या उजव्या बाजूस आहे. मी त्यांना मुहम्मदाचे 'बुराक़' म्हणजेच इस्लामी धारणेनुसार तो घोडा, ज्याच्यावर स्वार होऊन प्रेषित मुहम्मद आकाशांवर गेले होते याविषयी माहिती विचारली की काय तो याच सर्वोच्च सीमेसाठी निर्माण केला होता. त्यांनी उत्तर दिले की नाही. प्रेषित मुहम्मद यांच्यावर अपवित्र, मलिन फडके (पटल) नव्हते आणि त्यांचे रहस्य, गूढ प्रकाशाच्या आकाशापासून अवतरित झालेले नव्हते आणि ते विश्व-ज्ञाना (अक्ल-ए-अव्वल)ची परिसीमा (लक्ष्मण-रेषा) आणि सर्वश्रेष्ठ व सर्वात पवित्र आत्म्याचे जन्मस्थळ आहे. प्रेषितांचे 'बुराक' म्हणजेच अति प्रचंड वेगवान अश्व या मजबूत स्थानाच्या आकाशापासून होता आणि देवदूत जिब्रील त्यांचे प्रतिनिधी होते आणि ते विश्वासू आत्मा आहेत आणि यांच्याशिवाय दुसरे इतर संदेशहर (नबी) आणि सर्व संत-महात्मे या उच्च प्रवासामध्ये या आकाशाच्या प्रतिष्ठित उंटांवर स्वार आहेत. आपल्या स्वभावाच्या हीनतेसह ते त्यांच्यावर स्वार होऊन वर चढतात, इथपर्यंत की ते सातवे आकाश पार करून जातात. यानंतर मात्र गुणांव्यतिरिक्त त्यांचे कोणतेच स्वार नाही. आणि सत्तेव्यतिरिक्त त्यांचा कोणीही प्रतिनिधी नाही.

**७) सातवे आकाश - लाबिय: - (दामिया) - शनी ग्रहाचे आकाश**

सप्तम आकाश हे प्रतिष्ठित असे शनी ग्रहाचे स्थळ आहे. काळेकुट्ट अंध:कारमय निर्मळ अर्थात विशुद्ध रात्रीसारखे याचे वैशिष्ट्य आहे. ईश्वराने या ग्रहाला विश्व-ज्ञानाच्या प्रकाशापासून निर्माण केले आहे, आणि त्याची मजल अत्युच्च आणि श्रेष्ठतर बनविली आहे. त्याच्या काळ्याकुट्ट रंगाशी संकेत आहे ओळखू न येणारे असे. अज्ञानाचे अंध:कार. म्हणूनच विश्व-ज्ञानास परिपूर्ण ब्रह्मज्ञानीशिवाय कोणीच ओळखू शकत नाही आणि हे शनी ग्रहाचे सप्तम आकाश आहे. तो समस्त विश्वास घेरून आहे. तो सर्व आकाशांहून सर्वश्रेष्ठ आणि समस्त ब्रह्मांडाहून श्रेष्ठतम आहे. याच्या सोबत चालणारे सर्व अखंड ग्रह त्याच्या आकाशामध्ये मंद गतीने चालतात. आणि याच्या आकाशाचे परिघ चोवीस हजार पाचशे (२४,५००) वर्षांचा आहे आणि त्याचे ग्रह (तारा) प्रत्येक तासात एक हजार वीस (१,०२०) वर्ष आणि दहा (१०) महिन्यांचा मार्ग कापतो. आणि महदाकाश (मोठ्या आकाशा)स तीस वर्षाच्या मुदतीमध्ये पार करतो आणि त्याच्यामध्ये वर्तमान सर्व अखंड तारे यांचा प्रवास असा

गुप्त आहे की ते दिसत नाहीत. आणि काही या आकाशाच्या प्रत्येक राशीस तीस (३०) वर्षांमध्ये पार करतात आणि याहून जास्त किंवा कमी वर्षामध्ये पूर्ण करतात. हे फार गहन व असंख्य असल्यामुळे ओळखू येऊ शकत नाहीत आणि ज्योतिषशास्त्राच्या परिगणनेमध्ये यांचे कोणतेच नाव नाही. परंतु ईश्वरप्रेरित लोक प्रत्येक ग्रहा (ताऱ्या)च्या नावास ओळखतात आणि ते त्या नावाने संबोधतात आणि त्यांच्या परिभ्रमणासंबंधी त्याच्याशी विचारणा करतात. तो (ग्रह) त्यांना उत्तर देतो आणि आपल्या आकाशाच्या गरजेनुसार त्यांना मीहिती देतो.

**ब्रह्मांडाची व्याप्ती**

मग हे जाणले पाहिजे की हे आकाश पहिले आकाश आहे. याला सर्वश्रेष्ठ परमेश्वराने सर्व सृष्टीच्या जगावर व्याप्त बनवले आहे. याचे खालचे आकाश हे त्याच्यानंतर निर्मित आहेत आणि ते विश्व-ज्ञानाचे प्रकाश आहे. हे सर्व नवनिर्मित वस्तूंपैकी सर्वप्रथम निर्माण होणारे आहे. मी प्रेषित इब्राहीम यांना या आकाशावर कायम पाहिले आहे. त्यांच्यासाठी एक प्रकाश करणारा होता. त्याच्यावर ते दैवी सिंहासना ('अर्श')च्या उजव्या बाजूस पादपीठा (कुर्सी)वर बसलेले होते आणि ते या महाश्लोकाचे वाचन करत होते - ''अलहम्दु लिल्लाहिल्लज़ी बहब ली अलीलु किबरि इस्माईल व इसहाक़ अलै:''

**निकटवर्ती (मुक़रब) देवदूत**

हे समजून घेतले पाहिजे की या आकाशामध्ये सर्व देवदूत हे निकटवर्ती आहेत. आणि प्रत्येक निकटवर्ती देवदूतासाठी (एक निश्चित) टप्पा आहे. हा (टप्पा) त्याच्या नाम-जपासी अनुरूप असा आहे. त्यामध्ये ईश्वराने त्याला कायम केले आहे. आणि त्याच्यावर आहे, 'फलके अत्लस' म्हणजेच सर्वात वरचे आकाश जे अत्लस सारखे अत्यंत साधे आणि तारेविहिन आहे. आणि तो एक महदाकाश आहे. त्याचे तळ म्हणजेच पृष्ठभाग सर्वोच्च कुर्सी आहे. आणि या दोहोंमध्ये म्हणजेच 'अत्लस' आकाश अर्थात तारेविहीन आकाश आणि तारेयुक्त आकाश यांच्या दरम्यान तीन काल्पनिक ऐच्छिक आकाश आहेत, ज्यांचे अस्तित्व नाही, परंतु ना ऐच्छिक ना वास्तवामध्ये. यामध्ये आकाश हे एक सर्वोच्च आकाश आहे. मूल प्रकृतीच्या (हैयुला) आकाशावर आहे. द्वितीय आकाश हे भौतिक आकाश आहे. तिसरे आकाश हे महाभूत आकाश आहे आणि तो या सर्वात शेवटी आहे. हे आकाश तारेमय-ग्रहयुक्त आकाशाशी मिळालेले आहे आणि काही तत्त्वज्ञांनी असे म्हटले आहे की आणखीन एक चौथे आकाश आहे आणि ते स्वाभाविक आकाश आहे.

**सिद्रतुल मुंतहा (कल्पवृक्ष)**

हे समजून घेतले पाहिजे की तारेविहीन ('अतलस') मुंतहा अर्थात कल्पवृक्षाचे मैदान आहे आणि तो पादपीठा ('कुर्सी') खाली आहे आणि कल्पवृक्षामध्ये 'करूबी' देवदूत राहतात. मी त्यांना विविध स्वरूपामध्ये पाहिले आहे. अल्लाह (परमेश्वरा) शिवाय त्यांची गणती कोणीच करू शकत नाही. प्रभूचा प्रकाश त्यांच्याशी असा मिसळून गेला आहे की त्यांच्यापैकी कोणीच आपल्या डोळ्याची पापणी हलवू शकत नाही. त्यांच्यापैकी काही तोंडाच्या आधारे पडलेले आहेत आणि त्यांच्यापैकी काही गुडघे टेकून पडलेले (बसलेले) आहेत आणि

ते सर्व परिपूर्ण आहेत. काही आपल्या पैलूवरती पडलेले आहेत आणि काही दगडासारखे उभे कायम आहेत आणि ते प्रबळतर आहेत. काही त्याच्या तदत्त्वामध्ये (हूय्यत) आश्चर्यचकित आहेत आणि काही आपल्या अहंकारामध्ये स्व-चलित आहेत, आणि मी त्यांच्यापैकी शंभर (१००) देवदूत असे पाहिलेत की जे या सर्वांवर भारी आहेत. यांच्या हातांमध्ये प्रकाश-स्तंभ होते. प्रत्येक खांबावर ईश्वराच्या शुभनामांपैकी एक शुभनाम लिहिलेले होते. याच्या सहाय्याने ते स्वत:स सोडून इतर दुसरे 'करूबी' देवदूतांना आणि यांचे समकक्ष असलेल्या संतांना ते भीती दाखवतात. मग मी पुन्हा या शंभर (१००) देवदूतांमधून सात (७) सर्वात पुढे असलेले देवदूत पाहिले आणि त्यांचे नाव 'क़ायमतुल करूबीन' असे आहे. या सात (७) पैकी मी तिघांना असे पाहिले की या सात (७) वर भारी होते. यांचे नाव 'अहलुल मरातिब वलतमकीन' असे होते. आणि एकास मी सर्वांहून प्रबळ व अग्रेसर पाहिले, ज्याचे नाव 'अबदुल्ला' असे होते. आणि हे सर्व त्या उच्च दर्जाचे देवदूत आहेत की ज्यांना मानवास प्रणिपात करण्याचा आदेश दिला गेला नव्हता. आणि यांच्यावर पण श्रेष्ठ देवदूत आहेत. जसे 'नून' देवदूत, 'लेखणी' (कलम) देवदूत आणि यांच्यासारखेच आणखी इतर उच्च दर्जाचे प्रेषित आहेत. आणि बाकीचे इतर निकटवर्ती देवदूत यांच्यापेक्षा कमी दर्जाचे आहेत. जसे, जिब्रील, मीकाईल, इस्राफ़ील, इज्राईल आणि यांच्याच सारखे इतर देवदूत आणि या आकाशामध्ये मी अशी विलक्षणता आणि अद्‌भुतता पाहिली आहे की जिचे वर्णन करता येऊ शकत नाही.

**आकाशांची संख्या**

हे जाणून घेतले पाहिजे की, सर्व आकाशे की ज्यांना सर्वश्रेष्ठ परमेश्वराने या ब्रह्मांडामध्ये निर्माण केले आहे, संख्यांमध्ये अठरा (१८) आहेत. पहिले आकाश व्यापक दैवी सिंहासन (अर्श) आहे, दुसरे पादपीठ (कुर्सी), तिसरे तारेविहीत (अतलस) आकाश आणि याला कल्पवृक्षाचा म्हणजेच सिद्रतुल मुंतहाचा आकाश पण म्हणतात, आणि चौथे मूल प्रकृतीचे (हयूला) आकाश आहे, पाचवे वायू महाभूतांचे आकाश आहे, सहावे महाभूत (अनासिर) आकाश आहे, सातवे स्वभावां (तबाया)चे आकाश आहे, आठवे राशिचक्राचे आकाश आहे, आणि ते शनी ग्रहाचे आकाश आहे. नववे गुरू ग्रहाचे आकाश आहे, दहावे मंगळ ग्रहाचे आकाश आहे, अकरावे रवी ग्रहाचे आकाश आहे, बारावे शुक्र ग्रहाचे आकाश आहे, तेरावे बुध ग्रहाचे आकाश आहे, चौदावे सोम (चंद्र) ग्रहाचे आकाश आहे, पंधरावे निष्केवळ अंतराळाचे तेज महाभूत आकाश आहे, सोळावे वायूचे आकाश आहे, सतरावे आप महाभूताचे आकाश आहे, अठरावे भूमंडळाचे पार्थिव आकाश आहे. आणि ते एक व्यापक खोल समुद्र आहे. यामध्ये 'बहमूत' नावाचे एक महाकाय मत्स्य (मासा) आहे. पुन्हा याच्यावर अग्नी आकाश आहे. पुन्हा सोम आकाश आहे अशाच प्रकारे वर चढत जावे जसे की क्रमश: खाली उतरत आलो होतो. मग पुन्हा प्रत्येक दृश्य जगासाठी एक विस्तीर्ण आकाश आहे. याला ईश्वरप्रेरित व्यक्ती पाहते. यामध्ये ती व्यक्ती तरंगते - पोहते व तिची गरज ओळखते. असंख्य असल्यामुळे आकाशे गणतीत येत नाहीत. सर्व श्रेष्ठ परमेश्वराने पवित्र कुराणामध्ये म्हटले आहे -

''प्रत्येक (ग्रह) आपापल्या कक्षेत तरंगत आहे.'' वा ''प्रत्येक (ग्रह) एक आकाशामध्ये पोहत आहे.'' २१:३३

उपरोक्त विवेचन वाचल्यानंतर आपणास आधुनिक विज्ञान-सम्मत व समर्थित 'अवकाशा'ची आठवण होते. खरं म्हटलं तर आपली पृथ्वी आणि आपले आकाश हे आकाशाच्या पोकळीमध्ये आहे. आकाश आणि अवकाश हे शब्द केवळ आपण सोयीसाठी वापरतो. आपल्या पृथ्वीवर आणि पृथ्वीसभोवती काही अंतरापर्यंत वातावरण आहे. त्या मर्यादेपर्यंत आकाश मानले जाते. म्हणजेच आकाशाला मर्यादा आहे. परंतु ती अवकाशाला नाही! आकाश अनंत आहे, निराकार आहे, अमर्याद आहे. आकाश जरी डोळ्यांना दिसत नसलं तरी अवकाशातील नक्षत्र, तारका, तेजोमय दीर्घिका आपणास दिसत असतात. आपली पृथ्वी, आपली सूर्यमाला, आपली आकाशगंगा आणि इतर शंभर अब्ज आकाशगंगा या आणि इतर सर्व गोष्टी या अवकाशातच आहेत.

जाणून घ्या की तेज, आप आणि वायू यांपैकी प्रत्येकाच्या चार श्रेणी आहेत, भू-नभाचे सात श्रेणी वा प्रकार आहेत. यास्तव या सर्वांचे विवेचन याच प्रकरणामध्ये होणार आहे. आता आम्ही पृथ्वीच्या विवेचनाकडे वळतो आणि तिच्या प्रकारांचे वर्णन प्रस्तुत करत आहोत. कारण की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने आकाशानंतर पृथ्वीचा उल्लेख केला आहे. म्हणून आम्ही पण या दोहोंमध्ये मध्यंतर ठेवू इच्छीत नाही.

### १) पहिली पृथ्वी – अर्जुल नुफूस – मानव लोकांची पृथ्वी

या स्तरास जेव्हा ईश्वराने उत्पन्न केले (निर्माण केले) तेव्हा ते दुधाहून जास्त शुभ्र आणि कस्तूरीपेक्षा अधिक सुगंधित होते. नंतर जेव्हा प्रेषित आदम पापकर्मामध्ये लिप्त होऊन चालले तेव्हा ते धुळीने भरून गेले. या जमिनीचे म्हणजेच पृथ्वीचे नाव मानव लोकांची पृथ्वी आहे. यामुळे हिच्यामध्ये पशू राहतात. या भूगोलाकृतीचा परिघ अकराशे सहासष्ठ (११६६) वर्षे आणि दोनशे चाळीस (२४०) दिवसां (त पूर्ण होणारा)चा मार्ग आहे. हिचा तीन चतुर्थांश (३/४) भाग परिवृत्त स्वरूपात पाण्यामध्ये बुडालेला आहे. उरलेला एक चतुर्थांश (१/४) भाग हा भूमध्य भाग आहे. हा हिस्सा सोडून (बाकीचा) उत्तर दिशेस मिळालेला आहे, आणि दक्षिणेकडील बाजूची अशी अवस्था आहे की ती संपूर्णपणे पृथ्वीचा निम्मा भाग असून पाण्याखाली आहे. फक्त एक चतुर्थांश (१/४) भाग बाकी राहतो आणि या एक चतुर्थांश (१/४) पैकी, तीन चतुर्थांश (३/४) भाग निर्जन उजाड आहे, परंतु फक्त बाकी राहिले एक चतुर्थांश (१/४)चा (१/४) हिस्सा. मग या उरलेल्या एक चतुर्थांश (१/४) लोकवस्ती असलेल्या हिश्शाचा विस्तार वा लांबी-रुंदी फक्त चोवीस (२४) वर्षा (अंतर कापण्याचा)चा मार्ग आहे. जगत्जेता अलेक्झांडर (इस्कंदर) हा फक्त याच बाकीच्या एक चतुर्थांश हिश्श्यापर्यंत पोहोचला होता. हिच्या व्यासाच्या पूर्वेपासून पश्चिमेकडील दिशेतच त्याने संचार केला होता. कारण की तिची शहरे पश्चिमेकडे होती, तो रोमचा सम्राट होता. त्याने आपल्या जवळील पृथ्वीपासून चालावयास सुरूवात केली. तो चालत चालत पृथ्वीच्या अंतर्भागापर्यंत पोहोचला. शेवटी तो सूर्यास्ताच्या पश्चिम दिशेच्या जागेपर्यंत पोहोचला. मग तो दक्षिणेकडे वळला, आणि ते ठीक याच्या समोर आहे. तेथे त्याला वस्तू अर्थात लोकवस्ती दिसू लागली. मग तो सूर्योदयाच्या स्थळापर्यंत पोहोचला. मग तो दक्षिण दिशेकडे चालू लागला आणि तेथे अंधार आहे. शेवटी तो घाघ-महाघाघ ('याजूज माजूज') यांच्यापर्यंत पोहोचला आणि ते पृथ्वीच्या दक्षिण दिशेमध्ये आहेत. पृथ्वीशी त्यांचा अशाच प्रकारचा संबंध आहे जसा वासनायुक्त विचारांच्या

वासनेशी संबंध असतो. ना हे किती आहेत ते समजते ना त्यांची संख्या समजते ना त्यांची निर्भरता होऊ शकते. त्यांच्या जमिनीवर म्हणजेच पृथ्वीवर सूर्योदय कधीच झाला नाही. त्यामुळेच ते अशक्त, दुर्बळ आहेत. इथपर्यंत की त्यांच्या मध्ये एक मामूली भिंत पण पाडण्याचे सामर्थ्य नव्हते. नंतर तो उत्तर दिशेकडे रवाना झाला. इथपर्यंत की तो अशा जागी पोहोचला जिथे सूर्यास्त होत नाही, आणि पृथ्वीचा हा भाग तसाच आहे जसा की तो परमेश्वराने निर्माण केला होता. हा उत्तर ध्रुव अद्याप तसाच बर्फाच्छादित असून शुभ्र आहे. हे परोक्ष ईश्वरनिष्ठांचे (रिजाल-ए-ग़ैब) निवासस्थान आहे. याचे शासक-सम्राट हे ख़िज़्र आहेत. त्या शहरामध्ये राहणाऱ्या लोकांशी देवदूत वार्तालाप करतात. प्रेषित आदम तेथे पोहोचले नाहीत आणि ना तेथे परमेश्वराचा कोणीच अवज्ञाकारी माणूस तेथे पोहोचला आहे. म्हणून ते अद्यापपर्यंत आपल्या मूळ स्वभावात कायम आहे आणि पृथ्वीचा हा भाग बल्गार (शहरा)जवळ आहे. आणि बल्गार इराण (अजम)चा एक शहर आहे. येथे थंडीच्या दिवसात (शिशिर ऋतुमध्ये) रात्रीची उपासना (नमाज़-ए-इशा) अनिवार्य (वाजिब) नाही, कारण की तेथे उषःकालाची क्षितिजावरील लाली ही सूर्यास्ताच्या लाली अगोदर उदय पावते. या पृथ्वीची विलक्षणता व अद्‌भुतता निवेदन करण्याव्यतिरिक्त आमचा दुसरा कोणताच हेतू नाही. कारण की ज्याअर्थी हिची विलक्षणता व अद्‌भुतता सर्वसामान्यपणे ज्ञात आहे. म्हणून त्यांच्या उल्लेखाची येथे गरज नाही. आमच्या संकेतास समजून घ्या. अर्थात ब्रह्मज्ञानाची गूढ असलेली विलक्षणता व अद्‌भुतता यांचे वर्णन करण्याचा आमचा हेतू आहे. रात्रीच्या उपासनेच्या अभावाशी या ब्रह्मज्ञानाकडे संकेत आहे की जेव्हा सूफीस वेळेचे भान राहत नाही तेव्हा त्याच्यासाठी कोणतीच उपासना (नमाज़) अनिवार्य (वाजिब) ठरत नाही, जसे की बल्गारच्या लोकांसाठी रात्रीची उपासना (नमाज़) अनिवार्य (वाजिब) ठरत नाही. म्हणून विचित्र गोष्टींचा उल्लेख केलेला आहे. सत्य परमेश्वरच जाणो.

सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या दृष्टीमध्ये ही पृथ्वी इतर सर्व पृथ्वींमधून मूल्याच्या दृष्टीने सर्वश्रेष्ठ व सर्वोत्तम आहे. कारण की प्रेषित, संदेशहर, संत-महात्मे आणि सदाचारी लोकांची ही भूमी आहे. याच पृथ्वीतलावर हे सगळे लोक होऊन गेले आहेत. म्हणून माणूस जर हिच्या ब्रह्मज्ञानापासून बेसावध नसता तर हे वाचक श्रोत्या! तू त्यांना परोक्षाच्या गोष्टी सांगताना आणि संकट निवारण करताना पाहिले असतेस आणि तसेच या गोष्टीस पण तू पाहिले असतेस की त्या परमस्तुत्य आणि सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या बळावर ते आपल्या मनात जे येईल ते करून दाखवतात. या सर्व गोष्टींना समजून घे की जिच्याकडे आम्ही संकेत केला होता आणि त्या आदेशास ओळखून घे की जिच्याकडे आम्ही तुला मार्गदर्शन केले होते. वरवरच्या गोष्टींवर अवलंबून राहू नकोस आणि हे ओळखून अस की प्रत्येक व्यक्त गोष्टींसाठी तिचे एक अव्यक्त रूप असते आणि प्रत्येक सत्याचे वास्तव आहे, परम शांती!

### २) दुसरी पृथ्वी – अर्जुल इबादात – ईश्वरनिष्ठांची पृथ्वी

या पृथ्वीचे रंग पन्ना नामक रत्नासारखे हरित (हिरवे) आहे आणि तिचे नाव 'अर्जुल इबादात' म्हणजे ईश्वरनिष्ठांची पृथ्वी असे आहे. यांमध्ये श्रद्धावंत जिन्न म्हणजेच यक्ष वा किन्नर राहतात. यांची रात्र म्हणजे पहिल्या पृथ्वीचे दिवस होय आणि यांची रात्र म्हणजे त्यांचा दिवस होय. हिचे निवासी सदैव हिच्यामध्ये राहतात

इथपर्यंत की भौतिक पृथ्वी अर्थात पहिली पृथ्वीपासून सूर्य मावळतो. नंतर ते प्रकाशमान पृथ्वीकडे कूच करतात. हे मानवजातीशी इतके गाढ प्रेम करतात की जसे लोहचुंबक हा लोखंडास आकर्षित करून घेतो. हिंस्त्र वाघाच्या-सिंहाच्या हल्ल्यास भिणाऱ्या शिकार श्वापदापेक्षा जास्त हे मानवजातीपासून भितात. या भूगोलाकृतीचा परिघ दोन हजार दोनशे (२२००) वर्षे आणि चार (४) महिने (पार करण्याचा) मार्ग आहे परंतु यामध्ये उजाड भूमी नाही, अपितु सर्व वसतीमय आहे. बहुतांश श्रद्धाळू यक्ष वा किन्नर (जिन्न) साधक आणि धाडशी माणसाशी द्वेष-ईर्ष्या करतात. पुष्कळसे साधक या पृथ्वीच्या यक्षांपासून ठार मारले गेले आहेत. ते त्यांना धरतात याची कल्पना पण माणसास येत नाही. मी निम्न श्रेणीचे प्रतिष्ठित सूफी लोकांचा एक गट पाहिला आहे की त्यांच्या हातांत बेड्या आणि पायांत साखळदंड (बांधलेले) होते. या पृथ्वीच्या किन्नरांनी त्यांना कैदेत ठेवले होते. नंतर त्यांना मुक्त केले. त्यांचे डोळे आंधळे केले होते. यद्यपि ते महात्मा ख़िज़र यांच्या वाणीस आपल्या दोन्ही कानांनी ऐकत होते. मग ते असे झाले की त्यांना या पृथ्वीच्या दुसऱ्या टोकापासून हाक दिली असता ते ऐकू शकत नसत. ना ते समजत (ना त्यांना उमगत होते.) ते आपल्या स्थितीशी अनभिज्ञ होते. त्यांना त्यांच्या मागील गोष्टी सांगितल्या असता ते त्यांस नकार देत. ज्या गोष्टीकडे मी संकेत केले आहे तिला समजून घ्या. आणि ज्या गोष्टीसंबंधी मी मार्गदर्शन केलेले आहे तिची पडताळणी करा. ईश्वराज्ञापित मार्गाचे अनुसरण करण्यासाठी ईश्वराच्या मदतीची याचना करा म्हणजे तुम्ही पथभ्रष्टांच्या षड्यंत्रापासून वाचू शकाल. ही सशर्त घटना प्रस्तुत लेखकाने (म्हणजेच अब्दुल करीम जीली) ईश्वर प्रेरित अवस्थेमध्ये पाहिली आहे. कारण की जर ईश्वर प्रेरित अवस्थे (कश्फ)मध्ये समस्त माणसांची स्थिती पाहिल्यास अधिकांश माणसे किन्नर आणि शैतान यांच्या कैदेमध्ये कैद असल्याचे दिसून येईल, जे डोळ्यांनी दिसून येत नाहीत. ईश्वरच चांगले जाणो.

### ३) तिसरी पृथ्वी – अर्जुल तबा – प्रकृतीची पृथ्वी

या पृथ्वीचे रंग केशरासारखे पिवळे आहे. हिचे नाव 'अर्जुल तबा' म्हणजेच प्रकृतीची पृथ्वी आहे. हिच्यामध्ये श्रद्धाहीन वि-भक्त जिन्न म्हणजेच यक्ष वा किन्नर राहतात. त्यांच्यामध्ये कोणीच श्रद्धावंत नाही. ते वि-भक्ती आणि श्रद्धाहीनतेसाठी निर्माण केले गेले आहेत. ते लोकांमध्ये मानवजातीचे गुण धारण करून मिळून मिसळून जातात. ईश्वरनिष्ठांशिवाय यांना कोणीच ओळखत नाही. ज्या शहरांमध्ये सत्यान्वेषी लोक राहतात त्या शहरांमध्ये हे प्रवेश करत नाहीत. ते आपल्या प्रकाशकिरणांवर समर्थ असताना हे शक्य आहे. मात्र तत्पूर्वी हे अशक्य आहे. आणि असा सत्यान्वेषी ईश्वरनिष्ठ माणूस त्यांच्याशी विजय मिळेपर्यंत सामना करत असतो. मग ते पृथ्वीतलावर फिरकत सुद्धा नाहीत. जो कोणी इकडे येण्याचा प्रयत्न करतो तो त्याच्या प्रकाशकिरणांनी जळून जातो. लोकांना ईश्वराची उपासना करण्यापासून परावृत्त करण्याशिवाय यांचे दुसरे कोणतेच काम नसते. या भूगोलाकृती पृथ्वीचा परिघ चार हजार चारशे दोन (४,४०२) वर्ष आणि आठ (८) महीने पार करण्याइतका लांब मार्ग आहे. ते सर्व वसतीयुक्त आहे. तिच्यामध्ये कोणताच उजाड प्रदेश नाही. जेव्हापासून सर्वश्रेष्ठ परमेश्वराने तिला निर्माण केले आहे, तिच्यामध्ये त्याचे नाम-स्मरण फक्त एकदाच झाले आहे, पुन्हा कधी झाले नाही. आणि ते नाम-स्मरण पण तेथे राहणाऱ्या लोकांची भाषा सोडून दुसऱ्या बोलीमध्ये होते. ज्या गोष्टीकडे आम्ही मार्गनिर्देश केला आहे, त्याला समजून घ्या.

### ४) चौथी पृथ्वी – अर्ज़ुल शह्‌व – वासनेचे जग

या पृथ्वीचे रंग रक्तासारखे लाल आहे, आणि तिचे नाव वासनेचे क्षेत्र आहे. या भूगोलाकृती पृथ्वीचा परीघ आठ हजार पासष्ट (८,००,६५) वर्ष आणि एकशेवीस (१२०) दिवस इतका पार करण्याचा मार्ग आहे आणि ती संपूर्णपणे वसतीमय आहे. हिच्यामध्ये शैतान राहतात. त्यांचे अनेक प्रकार आहेत. हे इब्लीसच्या जाती (सत्ते) पासून उत्पन्न झालेले आहेत. जेव्हा ते त्याच्यासमोर जातात तेव्हा ते आपले गट बनवितात. तो एका गटास कत्तल करण्याचे शिक्षण देतो की जेणेकरून ईश्वराच्या भक्तांना–दासांना कत्तल करण्यास प्रवृत्त होऊन जावे. दुसऱ्या गटास वि–भक्तीचे शिक्षण देतो आणि त्यांना लोकांना वि–भक्तीचे ज्ञान अवगत करण्याचा आदेश देतो की जेणेकरून त्यांच्या अंत:करणामध्ये श्रद्धाहीनतेचा पाया मजबूत व्हावा. तिसऱ्या गटास भांडखोरीचे शिक्षण देतो की जेणेकरून ते विद्वान लोकांशी भांडावेत. चौथ्या गटास दगाबाजी करण्याचे शिक्षण देतो. त्यामुळे कोणी दगा देतो तर कोणी चोरी करतो. इथपर्यंत की तो ना लहान अपराध सोडून देतो ना मोठे. याच्यासाठी ते आपल्या संततीस प्रवृत्त केल्याशिवाय राहात नाहीत. पुन्हा त्यांना असा आदेश देतो की त्यांनी आपल्या परिचयाच्या जागेवर बसून लालसा, दगाफटका करणारे लोकांना असे शिक्षण द्यावे की ते लालसेच्या हीन दर्जावर कायम राहावेत. कत्तल व व्यंग्य (टोमणे मारणाऱ्या) करणाऱ्या लोकांना तो शासनाच्या दर्जामध्ये कायम राहण्याचे शिक्षण देतो. ज्ञानी लोकांना असे शिक्षण देतो की ते प्रभू–याचना आणि उपासना यांतील त्रुटींवर कायम राहावेत. खरोखर प्रभू–याचना, निवेदन आणि उपासना हे सत्कर्मामध्ये समाविष्ट होतात, परंतु जे ब्रह्मज्ञानी आणि एकेश्वरवादी जे अस्तित्वाच्या एकेश्वरवादामध्ये धोक्यात गुरफटलेले आहेत ते याला पडद्यामध्ये समाविष्ट करतात म्हणजेच अव्यक्तामध्ये गणतात. म्हणून तर लेखक अब्दुल करीम जीली याने यास शैतानी तुच्छतेमध्ये समाविष्ट केले आहे. ईश्वरच सत्य ते जाणतो. व्यभिचारी आणि चोरांना इब्लीस असे शिकवितो की ते आपल्या स्वभाव–ज्ञानामध्ये पडून राहावेत. नंतर तो त्यांच्या हातांमध्ये साखळी आणि बेड्या घालून त्यांना आदेश देतो की त्यांनी इतर लोकांच्या मानेवर ते घालावेत. ते त्यांचे आदेश एकापाठोपाठ सात वेळा मान्य करतात आणि त्यांच्या जवळ ते पश्चाताप व्यक्त केलेले नसतात. यानंतर ते त्यांना मोठ्या दुष्ट शैतानांवर सोपवून देतो मग त्या साखळ्यांना त्यांच्या मानेमध्ये अटकून झाल्यानंतर ते विरोध करू शकत नाहीत.

### ५) पाचवी पृथ्वी – अर्ज़ुल तुग़्यान – अमर्याद पृथ्वी

या पृथ्वीचे रंग अत्यंत निळे आहे, आणि तिचे नाव अर्ज़ुल तुग़्यान म्हणजेच अमर्याद पृथ्वी आहे. या भूगोलाकृती पृथ्वीचा परिघ सतरा हजार सहाशे दहा (१७,६१०) वर्ष आणि आठ (८) महिन्याचा मार्ग आहे. ही सर्व पृथ्वी वसतीने भरलेली आहे. यामध्ये शक्तिशाली किन्नर आणि शैतान राहतात. त्यांचे काम म्हणजे अपराधी लोकांना मोठमोठ्या पापकर्मांकडे घेऊन जाण्याशिवाय दुसरे कोणतेच नाही. हे सर्व उलटे कर्म करतात. जर यांना जाण्याचा आदेश दिला गेला तर ते जाण्याऐवजी येतात आणि जर त्यांना येण्यास सांगितले जाते तेव्हा ते निघून जातात. दगाबाजीमध्ये हे सर्व शैतानांमध्ये जास्त शक्तिशाली आहेत. यांच्यावर चौथ्या आकाशांचे शैतानांचा दगाफटका हलका वाटतो. म्हणून ते लहानशा हालचालीमुळे सुद्धा घाबरून हटतात. यांच्याच संबंधात सर्वश्रेष्ठ परमेश्वराने म्हटले आहे, ''परंतु यांचा दगाफटका फार मोठा आहे.'' मानवजातीवर भीतीचा भार घालतात. यांना त्यांचा विरोध करणे शक्य नाही.

### ६) सहावी पृथ्वी – अर्ज़ुल इल्हाद – अधर्माची पृथ्वी

अधर्माची पृथ्वी ही नास्तिकांची भूमी आहे. घनघोर अंधारी रात्रीसारखे हिचे रंग काळे आहे. या भूगोलाकार पृथ्वीचा परिघ पस्तीस हजार दोनशे एकवीस (३५,२२१) वर्ष आणि एकशेवीस (१२०) दिवसांचा मार्ग आहे. ही पृथ्वीपण संपूर्णपणे वसतीमय आहे. यामध्ये राहतात उद्धट आणि उद्दंड यक्ष (जिन्न) आणि ते यक्ष जे ईश्वराच्या दासांचे कोणतेच आदेश मानत नाहीत. हे जाणले पाहिजे की सर्व यक्ष हे नाना प्रकारचे असूनसुद्धा हे चार प्रकारांमध्ये मोडतात. पहिला प्रकार मूलद्रव्यवाले यक्षांचा, दुसरा प्रकार अग्नीवाल्यांचा, यद्यपी अग्नीपण एक मूलद्रव्य वा तत्त्व आहे; परंतु येथे एक मुद्दा आहे. तिसरा प्रकार वायूवाले जिन्नांचा अर्थात यक्षांचा आणि चौथा प्रकार पार्थिव यक्षांचा आहे.

मूलद्रव्यवाले यक्ष आत्म्याच्या जगापासून बाहेर येत नाहीत. यांच्यामध्ये प्रबळ सामर्थ्य असते. ते शक्तीमध्ये अधिक मजबूत असतात. देवदूतांशी घनिष्ठ साम्य असल्याकारणाने ते या नावाने नामाभित (नामांकित) आहेत. आणि ही गोष्ट त्यांच्या पतित (घृणित) स्वभाव–धर्म कर्मांवर आत्म्यांचे कर्म बलवत्तर (प्रबळ) असल्यामुळे आहे. यांचा उदय फक्त वासनामय विचारांमध्ये होतो. ''सर्वश्रेष्ठ परमेश्वर म्हणतो की मी शैतान, मानव व जिन्न अर्थात यक्ष यांना निर्माण केले.'' याला समजून घ्या. ते दिसत नाहीत. संत–महात्मे मात्र त्यांना पाहू शकतात. अग्नीवाले यक्षांची ही अवस्था आहे की ते बहुधा आत्म्याच्या जगापासून निघतात आणि कुठल्याही परिस्थितीत ते अनेक तऱ्हेने प्रकट होतात. अधिकांशपणे यांना मानवाशी भेटण्याचा योग प्रतिकृती जगात किंवा सादृश्य जगतामध्ये होतो. मग या जगामध्ये मनात येईल तसे करतात आणि त्यांची दगाबाजी फार जबरदस्त असते. त्यापैकी काही असे आहेत की जे माणसांसोबत कायम असतात. जोपर्यंत ते त्याच्या सोबत असतात तो पर्यंत पाहणारा बेहोश पडलेला असतो. आणि वायूवाले यक्षांची अशी अवस्था आहे की ते मानवाच्या आत्म्याच्या समोरासमोर होऊन अनुभूतीमध्ये दिसतात. पाहणारास त्यांचे स्वरूप आकृतीबद्ध होते. मग तो बेहोश होऊन जातो. आणि पार्थिव यक्षांची अशी अवस्था आहे की ते माणसास शंकेमध्ये गुरफटतात आणि ते आपल्या मातीने त्यांना धुळीने सारवतात. हे शक्ती आणि दगाबाजीमध्ये अत्यंत अशक्त असतात.

### ७) सातवी पृथ्वी – अर्ज़ुल शक़ावत – दुर्दशा–विपत्तीचे प्रांत

ही सातवी पृथ्वी दुर्दशा व विपत्तीचे प्रांत आहे. आणि ते नरकाचे तळ आहे की ही हीन व नीच स्वभावापासून बनलेली आहे. यामध्ये सर्प आणि विंचू राहतात. काही दंड किंवा शिक्षा देणारे देवदूतपण येथे राहतात. या भूगोलाकार पृथ्वीचा परिघ सत्तर हजार चारशे चाळीस (७०,४४०) वर्ष आणि चार (४) महिन्यांचा मार्ग आहे. हिचे सर्प आणि विंचू पर्वतासारखे आहेत. हे स्तर नरकास जाऊन मिळालेले आहेत. परमेश्वर न करो! ईश्वराने या वस्तू (म्हणजेच जीवजंतू) या पृथ्वीवर ठेवलेल्या आहेत की जेणेकरून या जगातच नरक–यातनेचे नमुना बनून जावे. जसे की स्वर्गाच्या त्या स्थळासारखे की त्याला सर्वश्रेष्ठ परमेश्वराने ग्रहांच्या आकाशाचे दलामध्ये ठेवले आहे की जेणेकरून त्यांनी या जगामध्येच स्वर्गामधील उत्तमोत्तम देणग्यांचा नमुना बनून जावे. कल्पनासुद्धा करवत नाही इतक्या सुंदर देणग्या ईश्वराने सदाचारी माणसांसाठी स्वर्गामध्ये ठेवून दिलेल्या आहेत. हे सर्व यासाठी आहे की ईश्वराचे प्रमाण हे लोकांसाठी सिद्ध व्हावे. कारण की जर सर्वश्रेष्ठ परमेश्वराने स्वर्ग आणि

नरकाची कोणतीही बाजू इहलौकिक जगामध्ये ठेवली नसती तर साम्याच्या अभावी मानवी बुद्धीस तिचे आकलन होऊ शकले नसते आणि श्रद्धा त्यांच्यासाठी अनिवार्य ठरली नसती. ईश्वराने या ऐहिक जगामध्ये स्वर्ग आणि नरकामधील या वस्तू ठेवून दिल्या आहेत की जेणे करून बुद्धीसाठी या वस्तू ओळखण्याचा जिना (पायऱ्या) बनून जावे. स्वर्गाची बक्षिसी आणि नरकाची शिक्षा याची माहिती ईश्वराने दिली आहे. म्हणून आम्ही ज्या वस्तूकडे संकेत केले आहे तिला समजून घ्या. शब्दांच्या बाह्य रूपावरच थांबू नकोस. त्यांच्या अर्थाच्या आपल्या अंतरंगामध्ये विसंबून राहू नकोस. परंतु त्या गोष्टीस ओळख की जिच्याकडे त्याच्या अंतरंगाने संकेत केले आहे आणि ज्या गोष्टीकडे तिचे बहिरंग मार्गदर्शन करते तिच्यावर ठेव. कारण की प्रत्येक व्यक्ताचे अव्यक्त असते आणि प्रत्येक सत्याचे वास्तव असते आणि माणूस तो आहे जो गोष्टीस ऐकून चांगल्या गोष्टींचे अनुकरण करतो. परमेश्वर तुम्हा–आम्हास त्या लोकांपैकी लेखावे जे उपदेश ऐकून महान बनतात.

पुन्हा यानंतर जाणून असावे की जमिनीचे दर्जे जेव्हा सर्वोच्चतेपासून सुरू केले जातात. तेव्हा त्यांच्यावर चढण्यामध्ये लांब(चे) होईल. जसे की नरकवासी त्यांच्या भाग्यात लिहिलेली शिक्षा भोगल्यानंतर नरकामधून पडतील तेव्हा ते त्याच गोष्टीकडे वळतील जी स्वर्गामधील लोकांची शेवटची स्थिती असेल. जसे कृपाळूचे दर्शन, ईश्वराचे महात्म्याचे प्रकाशाचे निरीक्षण करणे. शिवाय पार्थिव आकाशाचे पण प्रथम आकाश आहे. मग त्याच्यानंतर वायू आहे, मग अग्नी आहे, नंतर सोम (चंद्र) यानंतर उल्लेखित क्रमानुसार सर्व आकाशाहून उंच अर्थात सर्वोच्च आकाश, नववे आकाशा (फ़लकुलअफ़्लाक)पर्यंत सर्व आकाश आहेत. इथपर्यंत की महान दैवी सिंहासन ('अर्श')पर्यंत जाऊन संपतो.

**समुद्रांची विलक्षणता**

हे जाणले पाहिजे की पृथ्वीला चारी बाजूने वेढलेल्या सप्त समुद्रांचे मूळ दोन समुद्रे आहेत. कारण की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने पाणी बनलेल्या पांढऱ्या मोत्याकडे जेव्हा पाहिले होते, परमेश्वराच्या ज्ञानामध्ये जो धाक, आतंक, जी महानता आणि जे महात्म्य होते, त्यांच्या दहशतीमुळे ते पाणी खारे व कडवे (कडू) बनून गेले आणि परमेश्वराच्या ज्ञानासमोर प्रेम व कृपेच्या बाजूने जे पाणी होते ते गोडे बनून गेले. गोडे पाण्याच्या संदर्भात परमेश्वराचे हे वचन तंतोतंत लागू पडते – ''दया (कृपा) ही क्रोधावर अग्रेसर आहे.'' समुद्राच्या पाण्याच्या संदर्भात हेच विधान असे व्यक्त करता येईल – कडू व खारट (पाण्या)वर गोड (पाणी) अग्रेसर (वरचढ) आहे. म्हणून तर वास्तविक मुळात दोन समुद्र होते – एक गोड व दुसरे खारट. नंतर गोड पाण्यापासून एक प्रवाह पूर्वेकडे निघाला. त्या स्थळापासून जे पश्चिमेकडे जवळ आहे, आणि तो खारट समुद्र पृथ्वीच्या चारी बाजूस जवळ सरकला. (परिणामी) या गोड पाण्याचे स्वाद खारट पाण्याच्या स्वादामध्ये मिसळून गेले. त्या मिश्र पाण्याने एक वेगळा समुद्र तयार झाला. आणि खारट समुद्रापासून तीन प्रवाह निघाले. एक प्रवाह भूगर्भाच्या मध्यभागी स्थिर झाला. तो आपल्या पहिल्या (मूळच्या) स्वादाप्रमाणे खारटच राहिला. आणि तो एक वेगळा समुद्र आहे. एक प्रवाह उजवीकडे गेला आणि तो दक्षिण बाजूस आहे आणि या पृथ्वीमध्ये वाहणाऱ्या पाण्याच्या स्वादावर तिचे जमिनीचे स्वाद प्रबळ राहिले. आणि तो जलप्रवाह तुरट स्वादाचे बनून गेला आणि एक स्वतंत्र समुद्र म्हणून निर्माण झाला, आणि एक जलप्रवाह शाम (प्रांताकडे, राष्ट्राकडे) वळला आणि ते उत्तर दिशेकडे

आहे. यामध्ये तो वहात असलेल्या जमिनीचा-पृथ्वीचा स्वाद मिसळून गेला आणि ते पाणी प्राणघातक विषासारखे कडवट (कटू) बनले. आणि तो एक स्वतंत्र समुद्र आहे. जो 'क़ाफ़' नावाच्या पर्वतास घेरलेला आहे. येथील समस्त पृथ्वी (जमीन) तदंतर्गत वस्तूसह - तिचे कोणतेच विशिष्ट स्वाद निश्चित केले जाऊ शकत नाही, परंतु ते सुगंधित आहे. त्या सुगंधास हुंगणारा हा आपल्या नित्याच्या अवस्थेमध्ये बाकी राहात नाही, अपितु त्याच्या सुगंधामुळे तो मरून जातो. तो (एक) अथांग गहन समुद्र आहे. त्याचा ध्वनी (गर्जना) ऐकू येत नाही. या संकेतांना समजून घे. या शब्दांमध्ये लिप्त त्या वस्तूस ओळख. हे घ्या, मी या संक्षेपास सविस्तर व्यक्त करतो. जी दैवी गुह्ये यामध्ये लपलेली आहेत. त्यांना मी विलक्षण अशा चित्र-विचित्र विधानांमध्ये व्यक्त करत आहे.

**गोडे (गोड) समुद्र**

गोडे समुद्र स्वादिष्ट आहे. नौका त्याच्यामध्ये सहजतेने चालतात (तरंगतात). विशेष आणि सर्वसाधारण लोकांना यापासून फायदा होतो. विचार आणि समज याच्याशी संबंधित असतात. जवळचे व लांबचे, अशक्त आणि सशक्त याच्यापासून लाभ उठवतात. शरीरांचा तराजू याच्यामुळे सरळ (न्यायपूर्ण) असतो. आज्ञास्वरूपात धर्माची मर्यादा यामुळेच कायम - निर्धारित होते. याचे रंग शुभ्र आणि याचे पाणी स्वच्छ आहे. याच्या प्रचलनामध्ये मुलगा आणि नवयुवक सर्व वेगवान असतात. त्याच्या जेवणावळीचा सर्वजण लाभ घेतात. त्याचे मासे सहजपणे शिकार केले जातात. हा समुद्र सन्मान आणि आदराच्या प्रकाशापासून निर्माण केला गेला आहे. याच्यामध्ये विधीमान्य हे निषिद्धपासून वेगळे केले आहे. स्पष्ट आदेशाचा याच्याशी मेळ-मिलाफ आहे. प्रथम व शेवटचा आदेश याच्यामुळे ग्राह्य आहेत. प्रवास याचा लांबचा आहे, आणि याचा धोका कमी आहे. याच्या नौका नष्ट झाल्याचे दुर्मिळच (अप्राप्य) आहे. हिच्या लाटेपासून बुडालेला असा पण दुर्मिळच. मोक्षाकडे पळणाराचा तो मार्ग आहे. इच्छुकांच्या इच्छापूर्तीचा तो मार्ग आहे. तो शब्दांच्या शिंपल्यापासून संकेतांचा मोती बाहेर काढतो, आणि त्यामुळे आदेशाचा विनाश शब्दांच्या जाळ्यामध्ये (शब्दजालामध्ये) प्रकट होतो. तिच्या नौका स्थानांतरित आहेत. तिची बंदरे ज्ञात आहेत, अज्ञात नाहीत. त्याचे तळ उथळ आहे आणि खोली गहन आहे. त्याचे निवासी हे सहधर्मी आणि विषमधर्मी दोन्ही आहेत. तिचे प्रतिष्ठित व्यक्ती मुसलमान आहेत. त्याचे अधिकारी धर्मशास्त्री आणि विद्वान लोक आहेत. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने स्वर्गामधील देवदूतांना त्यांच्या रक्षणासाठी वेताळ (मुवक्किल) म्हणून नेमले आहे आणि त्यांना ईश्वरी प्रकोपाची भीती बाळगणारे आणि त्याच्या कृपेची आशा ठेवणारे लोक बनवले आहे. आशा आज्ञापालनासाठी भय निर्माण करते. आणि भय दुष्कर्मास प्रवृत्त करते. या समुद्राचे चार प्रवाह सुप्रसिद्ध आहेत. शिवाय चाळीस हजार प्रवाह पण आहेत, मात्र हे नामशेष झालेले आहेत. प्रसिद्ध जलप्रवाह असे आहेत - (१) फ़िरात, (२) नील, (३) सेहून आणि (४) जेहून. जे नामशेष झालेले प्रवाह आहेत, ते भारत आणि तुर्कमान या देशांच्या भूमीशी निगडित आहेत, आणि त्यापैकी दोन प्रवाह हबशामध्ये आहेत. या समुद्राच्या परिघाचा प्रदेश चोवीस (२४) वर्षांचा (कापण्याचा) मार्ग आहे, आणि तो पृथ्वीभोवती प्रवाहांतर्गत प्रवाह स्वरूपामध्ये आहे. लांबी-रूंदीमध्ये त्यापासून प्रवाह निघालेले आहेत आणि त्याचे दोन प्रवाह आहेत.

**इरम ज़ातुल इमाद (सत्तेचे आधारस्तंभ असलेले स्वर्ग)**

प्रथम प्रवाह त्यापेकी सत्तेचे आधारस्तंभ असलेले स्वर्गामध्ये आहे आणि दुसरे प्रवाह 'नोमान' (सुंदर-सुंदर वस्तू)मध्ये आहे. याला पृथ्वीमध्ये धरतीमिश्रित स्वरूपामध्ये घेण्यात आलेले आहे. तो (प्रवाह) कर्म आणि प्रदेशास समृद्ध करणारा आहे, आणि तो कर्म करणारे आणि लेखन करणारे लेखनिकांच्या हाती प्रकट आहे. जो प्रवाह धर्मच्युत आयामपासून निघून सत्तेचे आधारस्तंभ असलेल्या स्वर्गामध्ये स्थिर झाला, तो प्रवाहित असा समुद्र आहे. यामध्ये मिश्र उत्पन्न मोती प्राप्त होतात – आढळतात. या संकेतांना समजून घे. हा आदेश वरवरचा नाही. अल्लाह हा प्रत्येक कृत्याच्या प्रारंभी व शेवटी घेरलेला असतो. दुर्गंध समुद्राचे मार्ग मात्र कठीण आहेत, संकटमय व भीतीने भरलेले आहेत. तो साधकांचा मार्ग आहे आणि सहलीवर जाणाऱ्यांची पद्धत आहे. प्रत्येक जण त्याच्यावरून जाण्याचा प्रयत्न करतो, परंतु त्याचे भक्तच त्याच्याकडे पोहोचतात. त्याचा रंग कृष्णधवल असा संमिश्र आहे. त्याचे स्वरूप हे अत्यंत विलक्षण व अद्भुत आहे. त्याच्या लाटा अनेक प्रकारचे भूभाग वर आणतात. त्याची हवा (वायू) सकाळ-संध्याकाळ अनेक प्रकारच्या उत्तमता (चांगल्या गोष्टी) निर्माण करतात. त्याचे मासे खेचर आणि उंटासारखे आहेत. तो सर्वांना सामावून घेतो. ते मोठमोठ्या ओझ्यांना वाहून (उठवून) अत्यंत सुंदर मोत्यासारखे शहराकडे घेऊन जातात. मोठ्या प्रयासाने तिथपर्यंत पोहोचवतात. परंतु ते मोठ्या प्रयासाने नियंत्रणामध्ये येतात. महतप्रयासाने त्यांची शिकार केली जाते. त्यांच्या भक्कम आणि स्पष्ट स्वारीवर कोणताच माणूस (व्यक्ती) समुद्र पार करू शकत नाही. परंतु अशीच व्यक्ती पार करू शकते की जिच्यामध्ये संकटास धैर्याने तोंड देण्याची क्षमता आहे. या समुद्रावरील वारे हे पूर्व दिशेकडे स्पष्टपणे वाहतात. ते नौकांना यशस्वीपणे किनाऱ्यापर्यंत पोहोचवितात. याचे लोक कर्मामध्ये सच्चे, वचनामध्ये पक्के, आणि दशेमध्ये प्रामाणिक असतात (आहेत). याचे निवासी भक्त, धर्मनिष्ठ आणि सदाचारी आहेत. या समुद्रापासून शाश्वततेचे मोती आणि स्वच्छतेतील बिघाड किंवा खोट काढून टाकतात. ज्याने आपल्या वासनेस विशुद्ध केले ती व्यक्ती यामुळे सुशोभित बनते, जी निर्माता, वेध घेणारी आणि प्रकाशक असते. या समुद्राच्या अथांगतेचा परिघ पाच हजार (५,०००) वर्षं पार करण्याचा मार्ग आहे आणि त्याचे एक वृत्त पृथ्वीमध्ये आहे. हा जमिनीवर विस्तारलेला नाही. यामध्ये मिश्र मोती आढळतात. याचा रंग पिवळा आहे. याच्या लाटा लाल प्रस्तरासारख्या बांधलेल्या आहेत. याचे पाणी सर्व माणसांना पिण्यास योग्य नाही. ना प्रत्येक जण त्याच्या फटीमध्ये चालण्याचे सामर्थ्य राखतो. आणि तो आहे 'इरम ज़ातुल इमाद' म्हणजेच सत्तेचे आधारस्तंभ असलेले स्वर्ग. 'इरम ज़ातुल इमाद' एक असे शहर आहे की त्याच्यासारखे कोणतेच शहर नाही. याचा मार्ग कठीण आहे. मोठा विनाशक असा मार्ग आहे. काही श्रद्धावंतांशिवाय यामध्ये कोणतीच व्यक्ती सुरक्षित राहात नाही. श्रद्धाळू व्यक्तींशिवाय याचे आदेश मजबूत करत नाही. श्रद्धाहीनांपैकी जी व्यक्ती याच्या नौकेवर स्वार झाली, ती नौका सरतेशेवटी बुडाली आणि ध्वस्त झाली. मुसलमानांच्या अधिकांश नौकांना या प्रवाहित समुद्राचे मासे गिळंकृत करतात. अशाच लोकांच्या नौका सुरक्षित राहतात जे परिपूर्ण बुद्धिमान असतात. या समुद्राचे मासे मोठमोठे निमित्त साधणारे आणि निमित्तकारण शोधणारे असे आहेत. हे निश्चितपणे कच्च्या रेशमाच्या जाळ्याशिवाय शिकार केले जाऊ शकत नाहीत. जे श्रद्धावंत असतात ते माणसाचे रक्षक व व्यवस्थापक असतात. श्रद्धावंत, संसारी आणि मर्त्य लोकांना (समुद्रातील) विनाश आणि बळी घेण्याच्या ठिकाणापासून दूर सारतात. या समुद्राचे

अगणित लाभ (फायदे) आहेत आणि त्याची चरम सीमा ओळखली जाऊ शकत नाही. त्याचा बिघाड अत्यंत हानिकारक आहे. शरीर व मन यासाठी प्रभावोत्पादक आहे. या समुद्राचे निवासी (कोळी) हे काहीसे सत्यनिष्ठ आहेत आणि महान सत्यनिष्ठांसाठी ते अन्नपुरवठा करतात. मला या समुद्राचे कोळी चांगले निष्ठावान आढळले. ते आपल्या सद्विचारांमुळे उपद्रवाच्या अधीन होण्यापासून वाचले आहेत. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने जिंकून आपल्या अधीन करणाऱ्या देवदूतांना या समुद्राच्या अथांग पाण्यास सुरक्षित ठेवण्याच्या जबाबदारीवर नेमले आहे. या समुद्राच्या लाटा त्या शहराजवळच्या किनाऱ्यापर्यंत पोहोचतात की जेथील कोळी लोक त्यामधील विचित्र माश्यापासून लाभ उठवितात. या समुद्राच्या परिघाचा व्यास सात हजार (७,०००) वर्षं इतका लांब पल्ल्याचा मार्ग आहे आणि कधी-कधी समुद्री प्रवाशास हे अंतर पार करण्यासाठी अंदाजे एक वर्षाचा काळ लागतो. हे भौतिक लांबी (विस्तारा)मध्ये विशाल आहे. याने समृद्धी आणि उजाडपणास लपवले आहे.

**खारट समुद्र (क्षारयुक्त समुद्र)**

खारट समुद्राची अशी कथा आहे की तो एक सर्वसाधारण अथांग (गहन) समुद्र आहे. संपूर्णपणे आवेष्टित आहे, निळ्या रंगाचा आहे, आणि फार खोल आहे. जी व्यक्ती याचे पाणी पिते ती व्यक्ती मरून जाते. जी व्यक्ती याला पार करण्याचा प्रयत्न करते ती व्यक्तीपण मरून जाते. मूळ हवा याच्या पश्चिम दिशांकडे वहाते आणि त्याच्या आवती-भोवती लाटा धडकतात. म्हणून पट्टीचा पोहोणारासुद्धा वाचत नाही. उषःकाल व रात्री नौकानयन करणारास मार्ग सापडत नाही. जर तो महा भाग्यवान असेल तरच त्याला मार्ग सापडतो आणि त्याची नौका किनाऱ्यास लागते. त्याच्यावर तरंगणाऱ्या नौका या मजबूत पट्ट्यांनी बनलेल्या असतात, आणि त्यावर गहन अशा मेखा रोखलेल्या असतात. याच्यावर जलप्रवास करताना मति भ्रमित होते - मति गुंग होऊन जाते. त्याची खोली पाहून बुद्धी आश्चर्यचकित होऊन जाते. यात बऱ्याचशा नौका नष्ट-भ्रष्ट झाल्या आहेत. त्या दुरुस्त पण झाल्या आहेत. थोड्या लोकांशिवाय कोणीच वाचलेले नाहीत. त्याच्या प्राणघातक धोक्यापासून फक्त काहीच सुरक्षितपणे वाचलेले आहेत. या समुद्राचे मासे स्वारांसह नौकांना गिळंकृत करतात. यात स्थानिक कोळी आणि प्रवासी दोघेही मरून जातात. प्रवासी हा प्रत्येक टप्प्यावर हजारो संकटे झेलतो. यात निषिद्ध हे वैध बाबीबद्दल संशय निर्माण करतो. यामध्ये मनोकामना व माल (धन, संपत्ती) दोन्ही समाविष्ट असतात. तळाची कोणतीच सीमा नाही आणि ना त्याच्या शेवटची. महाचोरच याच्यामध्ये बुडी मारू शकतो. साहसी व धाडसी लोकच त्याच्यामधील मोती काढू शकतात. याचा आदेश प्राप्तीच्या वास्तवावर अवलंबून आहे. याच्यावर मूळ व शाखेचा पाया आहे. त्याच्या लाटा आपसात आदळ-आपट करत असतात. त्याचे शोध आपसात भिडतात. त्याचे धोके मोठे आहेत. त्याचे मेघ एकावर एक समूह स्वरूपात असतात. चकाकणाऱ्या ताऱ्यांशिवाय रात्री त्यांना कोणीच मार्गदर्शक नसतो. घोर अंधाराच्या जंगलाशिवाय त्याच्या नौकांना थांबण्यासाठी कोणतीच जागा नाही. याचे मासे सृष्टीच्या सर्व स्वरूपामध्ये आहेत. याच्या हवेमध्ये विहार करणारे लहान जीव-जंतू हे नाना प्रकारचे विष पसरवणारे आहेत. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने या समुद्राच्या जीव-जंतूंना आपले सामर्थ्य (क़ादिर) नामाच्या प्रकाशापासून निर्माण केले आणि यांना निर्माणकारी बुद्धिचातुर्याच्या प्रकट आदेशाचे वास्तव बनवले. निष्णात लोक या समुद्राच्या भरती-ओहोटीपासून सुरक्षित राहतात तेव्हा ते शपथा-शपथी प्रतिज्ञेच्या

शिंपल्यांपासून एक मोठा चमकदार एकमेव मोती याच्यामधून (बाहेर) काढतात. यांच्या कोळ्यांना सर्वश्रेष्ठ परमेश्वराने सर्वश्रेष्ठ व सर्व शक्तिमान अशा देवदूताचा गट बनवले आहे. त्यांच्या संरक्षणासाठी प्रज्ञान (वही) आणणाऱ्या देवदूतांना वेताळ (मुवक्किल)स्वरूप बनवले आहे.

**जीवन निर्झर (चश्म–ए–हयात)**

जाणले पाहिजे की जेव्हा सर्वश्रेष्ठ परमेश्वराने आपल्या पायाखाली अस्तित्वहीनतेमध्ये असलेल्या रत्नाकडे पाहिले तेव्हा त्या समुद्रास त्या रत्नाची चमक प्राप्त झाली (मिळाली). गोडवा (गोडेपण) त्याचे आद्य पितामह, त्याचे स्वरूप आणि त्याच्या भया (हैबती)मुळे निर्माण झाला. जेव्हा ते रत्न (मोती) पाणी बनून गेले तेव्हा समुद्र काळे आणि चमकदार बनले. नंतर जेव्हा दोन्ही समुद्र मिळून प्रवाहित होऊ लागले तेव्हा सर्वश्रेष्ठ परमेश्वराने या दोहोंच्या दरम्यान जीवन–जलास अडकण, अडसर वा मध्यगा बनवले. त्यामुळे दोन्ही आपल्या सीमेचे अतिक्रमण करत नाहीत. या दोन्ही समुद्रांच्या संगमाजवळ सदरहू अमृताचे पाणी आहे. येथे दोन आदेश एकमेकास मिळतात. (जुळतात) आणि तो एक झरा आहे जो उसळून पश्चिमेकडे प्रवाहित होतो आणि तो 'अज़ील मग्रिब' नावाच्या शहराजवळून वाहतो. 'समुद्र–संगमा' ('मज्मा उलबहरीन')मध्ये असलेले वैशिष्ट्य या प्रवाहित समुद्रामध्ये आढळते. जो माणूस या संगमामधील पाणी प्राशन करतो तो मरत नाही, तो अमर बनतो. जो याच्यामध्ये पोहोतो तो 'बहमूत' नावाच्या महाकाय मत्स्याच्या हृदयास (अंत:करणास) खातो. 'बहमूत' हा खारट क्षारयुक्त समुद्रामधील तो महाकाय मत्स्य आहे, की ज्याने संपूर्ण विश्व व तदंतर्गत समस्त वस्तूंना उचलून धरले आहे. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने पृथ्वीस अंथरले तेव्हा तिला 'बरहूत' नावाच्या बैलाच्या दोन्ही शिंगांवर ठेवून दिले. या बैलास त्या 'बहमूत' नावाच्या मत्स्याच्या पाठीवर उभे केले, जसे की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने आपले वचन 'मा तहतस्सरा' म्हणजेच 'पृथ्वीचे सर्वात खालचे तळ' अर्थात 'पाताळापर्यंत' यामध्ये संकेत केला आहे. 'मज्मा उल बहरीन' ते स्थळ आहे जेथे प्रेषित मूसा हे आपले सद्गुरू ख़िज़र यांना भेटले होते. कारण की परमेश्वराने त्यांच्याशी वायदा केले होते की, तुम्हास माझा एक सेवक त्या समुद्र–संगम स्थळा ('मज्मा उल बहरीन')जवळ भेटेल. ''आणि (ती वेळ आठवा) जेव्हा मूसा आपल्या सेवकास म्हणाला, (जेव्हा ते दोघे भटकत्या अवस्थेत होते) 'मी तोपर्यंत चालत राहीन, जोपर्यंत दोन समुद्रांच्या संगमस्थानी पोहोचत नाही, मग मला त्यासाठी कित्येक वर्षे का लागेनात.' पण शेवटी जेव्हा ते त्या ठिकाणी पोहोचले, जिथे दोन समुद्र येऊन आपसात मिळतात, तेव्हा त्यांना आपल्या माशाचा विसर पडला आणि तो मासा वेगाने समुद्रात आपल्या मार्गावर मार्गस्थ होऊन त्यांच्या नजरेपासून नाहीसा झाला. आणि जेव्हा ते तिथून काही अंतर पुढे गेले, तेव्हा मूसा आपल्या सेवकास म्हणाला, 'आमची न्याहरी आम्हाला दे, या प्रवासाने आम्हाला फार थकवले आहे.' (त्यावर तो सेवक उत्तरला, 'तुम्ही पाहिले नाहीत का, आपण खडकाजवळ आराम करत होतो, तेव्हा मला माशाविषयी विसर पडला. शैतानानेच तुम्हाला त्याविषयी आठवण करून देण्याचा विसर पाडला. आणि तो मासा अजब प्रकारे निघून समुद्रात दाखल झाला.' (त्यावर) मूसाने म्हटले, 'हेच ते (ठिकाण) आहे, ज्याचा आपण शोध घेत होतो. मग ते दोघे आपल्या पाऊलखुणांचा मागोवा घेत, ज्या मार्गाने आले होते, त्याच मार्गाने

परत फिरले. तेव्हा त्यांना आमच्या भक्तांपैकी एक भक्त भेटला, ज्यावर आम्ही आमच्याकडून कृपा प्रदान केलेली होती, आणि ज्याला आम्ही आमच्याकडून विशेष ज्ञान दिलेले होते.'' १८:६०-६५

आगीत शिजवलेला तो मृत मासा जिवंत पाहून मूसा अत्यंत आश्चर्यचकित झाले. त्या सेवकाचे नाव 'योशा बिन नून' होते. तो वयाने प्रेषित मूसांपेक्षा एका वर्षाने मोठा होता. या दोहोंची कथा प्रसिद्ध आहे. या कथेवर चिंतन केले पाहिजे. अफ़लातून (प्लेटो)च्या कथनावर विश्वास ठेवून इस्कंदर (जगज्जेता अलेक्झँडर) या अमृत प्राशनासाठी प्रवासास निघाला. त्याने त्यास सांगितले होते की जो कोणी या पाण्याचे प्राशन करील तो मरणार नाही. कारण की अफ़लातून या जागेवर पोहोचले होते. त्या समुद्राच्या पाण्याचे त्याने प्राशन केले होते. असे म्हणतात की तो 'दरावन्द' नामक पर्वतामध्ये अद्याप जिवंत आहे. अरस्तू (ॲरिस्टॉटल) हा अफ़लातून (प्लेटो)चा शिष्य होता, आणि तो इस्कंदर (अलेक्झँडर)चा गुरू होता. त्याने समुद्र-संगमा ('मज्मा उल बहरीन')पर्यंत सिकंदरास सोबत दिली नंतर जेव्हा तो काळोख्या पृथ्वीपर्यंत पोहोचला, तेव्हा तो आणि त्याचे काही सैनिक त्याच्यासोबत गेले आणि बाकीचे 'शुबत' नावाच्या शहरामध्ये मुक्कामास थांबले आणि ती सूर्योदयाची हद्द आहे. इस्कंदर सोबत असलेल्या लष्करा (सैनिकां)मध्ये एक ख़िज़र पण होते. काही काळपर्यंत ते चालत राहिले. कुठपर्यंत आणि कशासाठी हे अज्ञात आहे. ते समुद्र तटावर होते. जेथे कोठे ते उतरत ते तेथील पाणी पीत. जेव्हा लांब प्रवासामुळे ते थकले तेव्हा ते लष्कराच्या छावणीकडे परत फिरले, यद्यपि त्यांनी समुद्र-संगम पार केले (ओलांडले) होते. याची त्यांना कल्पना नव्हती. ओळखले नसल्या कारणाने ते ना तेथे उतरले ना थांबले. मात्र ख़िज़र या महात्म्यांना दिव्य ज्ञाना(इलाहाम)मुळे याची कल्पना होती. नंतर जेव्हा ते त्या जागी पोहोचले तेव्हा त्या (मृत) पक्षांमध्ये प्राण निर्माण झाले व तो जिवंत झाला. तो फडफडू लागला. म्हणून ते तेथेच थांबले. त्याचे पाणी प्याले, स्नान केले आणि त्या पाण्यामध्ये पोहू लागले. सिकंदरापासून त्यांनी ही गोष्ट लपवली. मग ते त्याच्यापासून निघून गेले. मग अरस्तूने महात्मा ख़िज़रकडे पाहिले तेव्हा त्यास कळून चुकले की महात्मा ख़िज़र यशस्वी झाले आहेत आणि त्यांचे सोबती अपयशी ठरले. नंतर अरस्तूने आमरण त्याची सेवा केली. त्याने आणि इस्कंदरने त्यांच्याकडून खूप विद्या शिकून घेतल्या.

ओळखून अस की प्रत्यक्ष (ऐन) जीवन हे या अस्तित्वाच्या सत्तात्मक वास्तवाचे दृश्य स्वरूप आहे. या संकेतांना समज आणि या लेखनामधील गुह्यांचे उद्‌घाटन कर. आदेशाच्या वास्तवाचा, आपल्या अस्तित्वाच्या साहाय्याने, आपल्या वासनेच्या अहंकारापासून मुक्त होऊन, शोध घे, की जेणेकरून तू त्या लोकांच्या दर्जापर्यंत पोहोचशील. ते आपल्या प्रभू, ईश्वरापाशी जिवंत आहेत. त्यांना उपजीविका दिली जाते आणि काळाने आपल्या दातृत्वामुळे मला त्या संप्रदायामध्ये दाखल करावे. आणि मूसा, ख़िज़र, इस्कंदर, अंधार आणि त्याचा समुद्र यांच्याशी अभिप्राय तूच (स्वतः) बनून जावेस.

हे जाणून घ्या की महात्मा ख़िज़र ज्यांचा उल्लेख अगोदरच झालेला आहे, त्यांचा जन्म 'नफ़ख़्तु फ़ीहि मिर्रूही' अर्थात 'त्यात माझा आत्मा फुंकलेला असेन.' ३८:७२ या वास्तवाशी झालेला आहे. ते परमेश्वराचा आत्मा आहेत, म्हणून ते प्रलय दिवसापर्यंत – न्यायाच्या शेवटच्या दिवसापर्यंत, पुनरूत्थानापर्यंत जिवंत आहेत. मी त्यांना भेटलो. त्यांच्याकडे विचारणा केली. जे काही मी या गहन, अथांग समुद्राविषयी वर्णन केले आहे, हे त्यांच्याच कथनापासून आहे.

**अथांग, गहन समुद्राचे प्रवाह**

हे जाणावे की उपरोक्त अथांग, गहन समुद्राचा जो प्रवाह, जगाला खेटून असलेल्या 'क़ाफ़' नावाच्या पर्वतापासून वेगळा होऊन जातो, ते जणू मातीचे गोल भांडेच आहे. आणि तोच उपरोक्त समुद्र आहे आणि जे पाणी या क़ाफ़ पर्वताशी खेटून आहे तो या क्षारयुक्त खारट समुद्राच्या मागे आहे. तो लाल समुद्र (बहर-ए-अहमर) आहे. तो सुगंधित आहे. जे पाणी क़ाफ़ पर्वताच्या मागे काळ्या पर्वताशी खेटून आहे, तो गडद हिरव्या रंगाचा समुद्र म्हणजेच 'बहर-ए-अख़ज़र' आहे. त्याचा स्वाद प्राणघातक विषासारखा कडू (कटू) वा कडवट आहे. याचे एक थेंब सुद्धा जो कोणी पितो तो तात्काळ मरून जातो. आणि त्याचे जे पाणी क़ाफ़ पर्वतामागे ईश्वरी निर्णयाच्या आदेशान्वये सर्व सृष्टीस समाविष्ट करून घेरलेल्या स्वरूपात आहे, ते म्हणजे कृष्ण (काळा) समुद्र अर्थात 'बहर-ए-अस्वद' आहे. त्या पाण्यास ना स्वाद आहे, ना गंध आणि ना कोणतीही व्यक्ती तेथे पोहोचलेली आहे, परंतु दैवी ज्ञान (इलहाम) वार्तेमुळे हे ज्ञात झालेले आहे. कारण याची लक्षणे अदृष्ट असल्यामुळे ते गुह्य स्वरूपात आहे. म्हणून अव्यक्त आहे.

**१) बहर-ए-अहमर - लाल समुद्र :** याचा वास विशुद्ध कस्तुरीसारखा आहे. हा सुप्रतिष्ठित, मोठमोठ्या लाटांचा समुद्र म्हणून प्रसिद्ध आहे. या समुद्राच्या किनाऱ्यावर मी श्रद्धावंत लोकांना पाहिले. लोकांना ईश्वराजवळ आणणे हीच फक्त त्याची उपासना होती. हे त्यांचे स्वाभाविक कर्म आहे. ज्यांनी त्यांच्याशी सन्मानपूर्वक संबंध ठेवले त्यांनी तदनुरूप ईश्वरास ओळखले आणि त्यांच्यासोबत काही प्रमाणात ते 'सैर-इल-ल्लाह' अर्थात परमेश्वराकडील सफर वा वारी करण्याच्या अधिकाराजवळ जाऊन पोहोचतात. यांचे चेहरे सूर्यप्रकाशासारखे चमकदार आणि चकाकणाऱ्या विजेसारखे आहेत. जो माणूस उजाड, निर्जन वनांमध्ये भ्रमंती करत असतो, तो यांच्यापासून (ज्ञान) प्रकाश ग्रहण करतो. जो समुद्राच्या अंधारामध्ये गुरफटलेला आहे तो यांच्यापासून मार्गदर्शन प्राप्त करतो. जे ते समुद्रपर्यटनाचा संकल्प करतात तेव्हा ते समुद्रामध्ये माशाची शिकार करण्यासाठी आपले जाळे पसरवतात. ते यासाठी आपल्या नौकेवर स्वार होतात, कारण की या समुद्राच्या नौका पण त्याचे मासे आहेत. या समुद्रामधून ते रत्न व मोती काढतात, परंतु जेव्हा ते माशाच्या पाठीवर मजबूत बसून जातात तेव्हा समुद्राच्या सुगंधामुळे त्यांच्यामध्ये आनंदातिरेक निर्माण होतो. परिणामी त्यांच्यामध्ये मूर्च्छा निर्माण होते. यामुळे ते ना आपल्या अंत:करणामध्ये शुद्धीवर असतात ना त्यांना कशाची अनुभूती असते. जोपर्यंत ते माशांवर स्वार असतात तोपर्यंत मासे त्यांना समुद्र किनाऱ्यावर त्यांच्या हद्दीपर्यंत पोहोचवतात. त्यांना कोणत्या तरी टप्प्यावर टाकून देतात. जेव्हा ते समुद्रापासून निघून खुश्कीवर (जमिनीवर) पोहोचतात तेव्हा त्याची शुद्ध परत येते. त्यांची बुद्धी व अनुभूती ठिकाणावर येतात. त्यांना आपले समुद्र-धन दिसून येते व ते बेहद्द विलक्षणता आणि अद्‌भुततेपासून यशस्वी होतात. त्याची लघुतर मीमांसा आणि सामान्य लक्षण हे आहे की असे कोणतेच नेम नाही की ज्याने त्यांना पाहिले असेल आणि कोणतेच कान नाही की ज्याने त्यांना ऐकले असेल आणि ना कधी कुणा माणसाच्या मनामध्ये त्याचा विचार शिवला असेल.

जाणले पाहिजे की या समुद्राच्या लाटांपैकी प्रत्येक लाट आकाश व जमीन यांच्या दरम्यान लाखो वेळा उचंबळते, मात्र ती सीमेस अतिक्रांत करत नाही. जर सामर्थ्याच्या जगामध्ये या समुद्राचा समावेश नसता तर या

दृश्य जगामध्ये त्याचे अस्तित्वच दिसले नसते. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने 'करूबियून' देवदूतांना म्हणजेच प्रतिष्ठित निकटवर्ती देवदूतांना या समुद्राच्या संरक्षणासाठी नेमलेले आहे. ते त्याच्या किनाऱ्यावर उभे असतात. त्याच्या मध्यभागी ते स्थिर राहू शकत नाहीत. या समुद्रामध्ये चतुष्पाद आणि मासे या व्यतिरिक्त आणखी कोणतीच वस्तू (गोष्ट) नाही.

**२) बहर–ए–अख़ज़र – हरित (नील) समुद्र** – या हरित समुद्राची अशी स्थिती आहे की त्याचा स्वाद कटू (कडवट) आहे. हा समुद्र म्हणजे बुडणे – जलसमाधी आणि मृत्यूची खाण आहे. विद्वान चांगल्या गुणांनिशी याचे गुणवर्णन करतात. साधू–महात्मा याला चांगल्या लक्षणांनी ओळखतात. यामध्ये कोणतीच मासळी नाही. या समुद्रात जो सफरीवर जातो तो मरून जातो. मी या (समुद्रा)ला पाहिले आहे. याच्या किनाऱ्यावर एक शहर वसलेले आहे हे संतोष आणि शांतीचे शहर आहे. हे तेच शहर आहे की ज्यामध्ये प्रेषित मूसा आणि त्यांचे सद्गुरू ख़िज़र पोहोचले होते. तेथील लोकांकडे त्यांनी भोजनाची मागणी केली होती, मात्र त्यांनी त्यांचा पाहुणाचार करण्याचे नाकारले. याचे कारण हे होते की ते फ़क़ीरी वेषामध्ये होते आणि त्या शहरामधील लोक फक्त राजे–महाराजे व श्रीमंत लोकांनाच जेऊ घालत. मी तेथील लोकांना असे पाहिले आहे की ते समुद्राच्या सफरीचे इच्छुक होते आणि त्यांना हे प्रिय होते. इतके की ते त्यांच्या नववर्षाचा प्रथम दिवस सणाचा असल्यामुळे ते त्या दिवशी मेळा भरवतात. रंगीबेरंगी उत्तम प्रकारच्या उंटांवर ते स्वार होतात. हे उंट काही हिरव्या रंगाचे असतात, काही लाल रंगाचे तर काही पिवळ्या रंगाचे असत. ते त्यांच्यावर मजबूत बांधून घेतात. उंटांच्या डोळ्यांवर पट्ट्या बांधतात. मग त्यांना समुद्राजवळ घेऊन जातात. ज्याचा उंट त्याला घेऊन समुद्रामध्ये घुसतो, तो आणि त्यांचा उंट दोघे गतप्राण होतात. ज्याने आपल्या स्वारी उंटास समुद्रापासून मागे फिरवले तो उंटासह वाचतो, परंतु त्याच्या मनामध्ये त्याची अवस्था ही रद्दबातिल, अज्ञात आणि निष्कासित असते. मग तो दुसऱ्या एका उंटाची व्यवस्था करतो आणि येत्या वर्षभर त्याची चांगली देखभाल करतो. मग त्याच्याशी पण तसाच व्यवहार केला जातो, जसे की या अगोदरच्या वर्षामध्ये केला होता. इथपर्यंत की तो प्रेमाच्या पोटी त्या समुद्रामध्ये मृत्यूमुखी पडतो. त्याचे प्रेम इतके प्रबळ असते की जसा पतंग कीट हा दिव्याच्या प्रकाशावर तुटून पडतो. पतंग हे त्यावर आपली आहुती देतात.

**३) बहर–ए–अस्वद – कृष्ण (काळा) समुद्र :** सातवा कृष्ण वा काळा समुद्र हा कापणारा आहे. ना याच्या कोळ्यांना ओळखता येऊ शकते ना याच्या मासळींचा पत्ता लागतो. तेथे पोहोचणे अशक्य आहे. यापासून लाभ अशक्य आहे. कारण की त्याची दशा ओळखू येत नाही. तो वळणे आणि भ्रमणाचा शेवट आहे. याची विलक्षणता व अद्भुतता याला सीमाच नाही. पुष्कळ हे त्याच्यासाठी थोडे आहे. त्याची विलक्षणता इतकी अद्भुत आहे की जणू काही ती एक अशक्य, अप्राप्य गोष्ट आहे. तो सत्तेचा समुद्र आहे. त्याच्यापाशी गुण आश्चर्यचकित आहेत (होऊन जातात). तो मिथ्या आहे, अज्ञात पण आहे, माया आहे, सुबोध पण आहे. त्याला प्राप्त करणे म्हणजे त्याचे अंतर्धान करणे होय. त्याचे अभाव ही त्याची आत्मविस्मृती आणि आरंभ त्याच्या शेवटास घेरून आहे. अंतरंग त्याच्या बहिरंगामुळे कायम आहे. ना त्याची कोणतीच वस्तू बुद्धिग्राह्य

होऊ शकते ना कोणती व्यक्ती त्याला संपूर्णपणे जाणू शकते. म्हणून आम्ही त्यामध्ये शिरण्यापासून आणि त्याचे वर्णन करण्यापासून स्वत:स आवरून घेतो.

**विशेष सूचना :**

वाचकांनी इकडे थोडेसे लक्ष द्यावे. दैवी प्रेरणेस वशीभूत होऊन आत्मानुभूतीच्या बळावर प्रस्तुत सूफ़ी आचार्य व तत्वज्ञ अब्दुल करीम जीली यांनी समुद्राच्या विलक्षणतेचे जे वर्णन केले आहे ते सूफ़ी तत्त्वज्ञानाचे एक गाढे आंग्ल विद्वान डॉ. रेनॉल्ड ॲलीन निकल्सन यांना न पटल्यामुळे त्यांनी आपला सुप्रसिद्ध ग्रंथ 'स्टडीज इन इस्लामिक मिस्टिसिझम'मध्ये पुढील शब्दात आपली नाराजी व्यक्त करत टाळले आहे. आम्ही मात्र तो भाग संपूर्णपणे घेतलेला आहे. याची कारणमीमांसा सदरहू प्रकरणाच्या सुरुवातीसच अभिव्यक्त आहे.

डॉ. निकल्सन यांचे शब्द असे आहेत -

"Concerning the Seven Seas, which were originally two - one of salt and the other of fresh water. - Jili has much to say, but his description of them is somewhat confused and we must now pass on to matters of greater interest." i.e. vl. The Return to the Essence अर्थात सत्त्वाकडे परतीचा प्रवास Studies in Islamic Mysticism, pp 125.

# विभाग - ४
# मानव

१५



प्रकरण १५

# मानव: निर्मिती - प्रयोजन व विशेषता

### १) मनुष्य-जन्माचा हेतू व ब्रह्मांडामधील त्याचे स्थान

मनुष्य-जन्माचा आध्यात्मिक हेतू आणि त्याचे दार्शनिक पैलू पवित्र कुराणामध्ये स्पष्टपणे पुढील शब्दात मांडण्यात आले आहे -

''मी 'जिन्न' अर्थात दैवत, यक्ष-किन्नर व मानव यांना अन्य कशासाठी नव्हे तर त्यांनी माझी उपासना (भक्ती) करावी, यासाठी निर्माण केले आहे. मी त्यांजकडून कसलीही अन्नसंपत्तीची अपेक्षा बाळगीत नाही. ना त्यांनी मला भरवावे, अशी त्यांच्याकडून कधी अपेक्षा करतो. कारण खरोखर ईश्वरच (सर्वांचा) अन्नदाता आहे, सर्वशक्तिमान आहे, बलवंत आहे.'' ५१:५६-५८

अल्लाहने ब्रह्मांडनिर्मिती प्रक्रियेमध्ये माणसास सर्वोच्च स्थानी ठेवून त्याला पृथ्वीतलावर आपला उत्तराधिकारी म्हणून नेमले आहे. म्हणूनच तो प्राणिमात्रांचा शिरोमणी - 'अश्रफुल मख़्लक़ात' गणला जातो. त्याच्या सर्वोच्च स्थानामुळे त्याची जबाबदारी पण तितकीच मोठी आहे. परमेश्वराने संपूर्ण ब्रह्मांडाला त्याच्या सेवेत ठेवून दिले. सूर्य, चंद्र, इतर ग्रह, आकाश, पृथ्वी, इतर पशू-पक्षी या सर्वांना त्याने मानवाच्या सेवेसाठी निर्माण केले. उत्तराधिकाऱ्यासारखे सर्वोच्च पद दिले गेल्यामुळे त्याची भक्ती-उपासना पण तितकीच भव्य असावयास हवी. अशा भक्तीची रूपरेषा ठरवताना त्याने मानवास काही पथ्ये पाळण्याचे निर्देश दिले आहेत. जसे, ''हे श्रद्धावंत लोक हो! उपासनेत (नमाजामध्ये) ओणवे होऊन नमन करा व नतमस्तक व्हा आणि आपल्या विधात्याची भक्ती करा आणि सत्कृत्ये करत राहा की तुम्ही (सरतेशेवटी आपल्या) मनोरथात सफल व्हाल.'' २२:७७ ''नि:संशय त्या श्रद्धावंतांना यश प्राप्त होते, जे आपल्या उपासनेत (नमाजात) विनम्रता अंगीकारतात आणि जे सर्व निरर्थक गोष्टींपासून अलिप्त राहतात आणि जे दान (ज़कात) देण्यात सक्रिय असतात आणि जे आपल्या शीलाचे रक्षण करतात.'' २३:१-५

भक्तीचे इतर पैलू उलगडून दाखवताना परमेश्वराने एक सोपे असे सूत्र मांडले आहे की, ईश्वराज्ञा पाळणारे लोक यशाचे मानकरी ठरतात, तर त्याची अवज्ञा करणारे हे शिक्षेस पात्र ठरतात. जसे, ''जे लोक (धर्मविषयक) इंद्रियातीत गोष्टींवर विश्वास ठेवतात व नित्य भक्ती (उपासना) करत असतात (नमाज पढतात) आणि जे काही त्यांना दिलेले आहे, त्यातून (परमार्थात) खर्चवेच करतात आणि (हे प्रेषित!) जे लोक, तुला जो (ग्रंथ म्हणजेच पवित्र कुराण) प्रकट झाला आहे, त्यावर व तुझ्या पूर्वी जे (ग्रंथ) प्रकट झाले आहेत त्यावर (दिव्य ज्ञानावर)

श्रद्धा ठेवतात आणि परलोकीचीही जे (पूर्ण) खात्री बाळगतात. हेच ते लोक आहेत जे त्यांच्या पालनकर्त्याच्या मार्गदर्शनपर तत्त्वांचे अनुसरण करतात आणि हेच ते लोक आहेत जे (अखेर आपल्या मनोरथात) यशस्वी होतील. (हे प्रेषिता!) ज्या लोकांनी अश्रद्धा दाखवली आहे, त्यांना तू (ईश्वरी शिक्षेचे) भय दाखवलेस काय अगर न दाखवलेस काय (दोन्ही) सारखेच, ते तर विश्वास धरणार नाहीत. परमेश्वराने त्यांच्या अंत:करणावर व त्यांच्या कानांवर मोहर लाविली आहे व त्यांच्या डोळ्यांवर पडदा पडलेला आहे आणि त्यांना (परलोकी) फार मोठी शिक्षा (होणे) आहे.'' २:३-७. ''जे लोक (ईश्वरी मर्यादेचे) उल्लंघन करतात व संशयात पडलेले असतात त्यांना परमेश्वर बहकवून देत असतो. अल्लाह प्रत्येक उद्दाम (व) गर्विष्ठ (माणसाचे) मन मोहोर लावून बंद करत असतो.'' ४०:३४-३५

''हेच ते लोक होत की ज्यांची मने अल्लाहने मोहोर लावून बंद केली आहेत आणि जे आपल्या स्वत:च्याच दुष्ट मनोकामनांच्या मागे लागलेले आहेत.'' ४७:१६. ''आम्ही (असे) अनेक जिन्न आणि मनुष्य निर्माण केले आहेत, ज्यांचा शेवट नरक (हाच) असेल. त्यांना अंत:करणे तर आहेत, (पण) त्यांनी ते समजण्याचे काम घेत नाहीत; आणि त्यांना डोळेही आहेत, पण त्यांच्या सहाय्याने ते पाहात नाहीत. त्यांना कान आहेत, (पण) त्यांनी ते ऐकण्याचे काम घेत नाहीत. (सारांश) हे लोक चतुष्पाद जनावरांसारखे आहेत, किंबहुना (त्यांच्याहूनही) ते जास्तच बहकलेले आहेत. ते खरोखरच (अतिशय) दुर्लक्ष करणारे आहेत.'' ७:१७९

कर्मफळावरून भक्तीचे यशापशय ठरवणारा हा मानवी स्वभाव कसा आहे, याचे रेखाचित्र परमेश्वराने असे रेखाटले आहे - ''आणि जेव्हा आम्ही मनुष्यावर कृपा करतो तेव्हा तो दिशा बदलतो आणि (आमच्यापासून) दूर जातो, परंतु जेव्हा त्याला कोणतेही दु:ख होते तेव्हा तो (लांब) रुंद प्रार्थना करू लागतो.'' ४१:५१. ''मनुष्य चांगल्या गोष्टींची याचना करण्यास कधीही थकत नाही, परंतु त्याच्या बाबतीत काही वाईट गोष्टी घडल्यास तो हताश होतो (आणि सर्व) आशा सोडून देतो.'' ४१:४९. परंतु याचे खरे मर्म परमेश्वराने पुढील शब्दात उघड केले आहे - ''तुझा जो काही लाभ होत असतो तो अल्लाहकडून (मिळत) असतो आणि तुझ्यावर जी काही विपत्ती येत असते ती तुझ्या (वासने)कडूनच आलेली असते. ४:७९. ''ज्याने आपल्या आत्म्याला (नास्तिकपणा व अनितीच्या दुर्गंधापासून) शुचिर्भूत केले, खरोखर तोच (आपल्या) मनोरथात सफल झाला आणि ज्याने त्याचे दमन केले तो असफल झाला.'' ९१:९-१०. ''तर त्या नमाज पढणाऱ्या (दांभिक उपासका)स फारच दु:ख होय, की जे आपल्या उपासनेच्या वास्तवाचे भान ठेवत नाहीत, (आणि) जे काही सुकृत्यही करतात तर डामडौल दाखवतात.'' १०७:४-७. ''सर्व परिपूर्ण गुणांचा स्वामी (केवळ) अल्लाह हाच आहे. म्हणून त्या गुणाची (नावे घेऊन) त्याची आळवणी करा आणि त्याच्या गुणांच्या बाबतीत जे सत्य मार्गाहून दूर जात आहेत, त्यांना तसेच एकटे सोडून द्या. त्यांना त्यांच्या कर्माचे फळ दिले जाईल.'' ७:१८०

शेवटी परमेश्वराने भक्तिमर्यादेसंबंधी आपले निष्कर्ष, कमीत कमी शब्दात अशा पद्धतीने मांडले आहे - ''(भक्ती) मर्यादांचे उल्लंघन करणाऱ्यांना त्यांची कामे त्यांच्या नजरेत चांगली वाटायला लावली आहेत.'' १०: १२

मानवाची निर्मिती प्रयोजनहीन – निष्प्रयोजित तर नाही ना, अशी संशयाची पाल मनात चुकचुकते. या कुशंकेचे निराकरण स्वत: परमेश्वर या शब्दात करतो – ''तेव्हा तुम्ही असे समजत होता की काय आम्ही तुम्हाला (विनाप्रयोजनच) व्यर्थ निर्माण केलेले आहे आणि तुम्हाला आमच्याकडे पुन्हा परतून यावयाचे नाही?'' २३:११५ पुढील उताऱ्यावरून याचे स्पष्ट प्रत्यंतर येते की, ''नि:संशय, आम्ही मनुष्यास निर्माण केले आणि (त्यास) संगोपनाच्या सर्वोत्तम पद्धतीने (वाढविले). नंतर (जेव्हा त्याने अन्यायी वर्तन केले तेव्हा) आम्ही त्यास नीचातील नीचतम अवस्थेत अर्थात रसातळात परत आणले. (त्यास) अपवाद (फक्त) त्यांचा होता जे श्रद्धा बाळगतात व सत्कर्मे करतात. म्हणून त्यांच्यासाठी (परलोकी) अपंरपार मोबदला होय.'' ९५:४-६. ''नि:संशय, तुम्हा लोकांचे प्रयत्न भिन्न-भिन्न (तऱ्हेचे) होत. जर ज्याने (परमार्थात दान) दिले व पवित्राचरणाचा बाणा पत्करला आणि सर्वोत्तम गोष्टीला (म्हणजे इस्लाम धर्माला) सत्य जाणले, त्याच्यासाठी आम्ही सौख्याची जागा (म्हणजेच स्वर्गात पोहोचण्याचा मार्ग) सुलभ करून टाकू. ज्याने (परमार्थात) देण्यात कृपणता केली व (परलोकीची) पर्वा केली नाही आणि सर्वोत्तम गोष्टीला (म्हणजे इस्लाम धर्माला) पाखंड जाणले त्याच्यासाठी आम्ही कष्टाची जागा (म्हणजे नरकात पोहोचण्याचा मार्ग) सुलभ करून देऊ आणि जेव्हा तो नरकात जाऊन पडेल, तेव्हा त्याचे द्रव्य त्याच्या काहीच कामा येणार नाही. नि:संशय, मार्ग दाखवणे हे आमचेच काम आहे आणि परलोक व इहलोक (दोन्ही) आमच्याच अधीन आहेत.'' ९२:४-१३

उपरोक्त सविस्तर खुलासा करून सर्वात शेवटी परमेश्वर हा मानवास कळकळीचे आव्हान करतो की, ''मीच परमेश्वर आहे, माझ्यावाचून (अन्य) कोणी उपास्य नाही. तू माझीच उपासना करत राहा आणि माझ्या संस्मरणार्थ नमाज (भक्ती) कायम राख.'' २०:१४

भक्ती ही एक द्वि-मुखी साधना पद्धती आहे. तिचे एक मुख परमेश्वराकडे असते, तर दुसरे मुख आपल्या समाजबांधवांशी निगडित व्यवहार आणि आचरणाशी असते. भक्तीमुळे एकीकडे साधकाची परमेश्वराप्रती त्याची श्रद्धा आणि निष्ठा अभिव्यक्त होत असते, तर दुसरीकडे आपल्या समाजबांधवांशी सदाचरणमूलक सद्व्यवहार प्रस्थापित करण्यास बळ प्राप्त होते. भक्ती ही खरोखर मानवी आचरणास सुशोभित करण्याचे साधन आहे. ते ईश्वरसान्निध्य प्राप्त करून घेण्याचा सर्वात सुलभ आणि सोपा असा एक निकटवर्ती मार्ग आहे. ते अध्यात्म-मार्गावरील भक्ताचे उच्च असे एक आरोहण आहे. ते ईश्वराज्ञापालनास उद्युक्त करणारे एक सकारात्मक साधन आहे. शिवाय माणूस म्हणजे ईश्वराची जिवंत कलाकृती. त्याची सेवा ही साक्षात ईश्वराची पूजा असते व ती सर्व प्रकारच्या उपासनांपेक्षा श्रेष्ठ आहे.

मानवाचे ईश्वराशी संबंध प्रस्थापित करणारे तसेच मानवाचे मानवाशी नाते जोडणारे जे विधि-विधान आहेत, त्यांच्या समष्टीचे नाव 'धर्म' असे आहे. मानवी जीवनातील मूलभूत गोष्ट धर्मच आहे. धर्माच्या सत्तेतच वास्तविक जीवनाची सत्ता असते. धर्मामुळेच सिद्धी प्राप्त होते. म्हणून धर्ममार्गाचा त्याग न करणे, मानवाचे कर्तव्य आहे. परमेश्वर (अल्लाह) हा मानवासह समस्त ब्रह्मांडाचा सृष्टिकर्ता आहे आणि म्हणूनच तोच स्वामी आणि शासक आहे. ''जे काही आकाशात आहे आणि जे काही पृथ्वीवर आहे ते सर्व अल्लाहचेच आहे.'' २:२८४ ''तुमचा पालनकर्ता अल्लाह आहे. ...... लक्षात ठेवा, (सर्व) त्याचीच निर्मिती आहे. आणि (सर्वांवर) आदेश त्याचाच असणार आहे.'' ७:५४. उपासने-भक्तीचा अधिकारी पण अल्लाहच आहे आणि

तसेच दासता व आज्ञापालनाचा पण. ''तुमच्या पालनकर्त्याकडून जे अवतरित झाले आहे (पाठवण्यात आले आहे), त्याचे अनुसरण करा. आणि त्याच्याव्यतिरिक्त दुसऱ्या कोणालाही पालनहार मानून त्याचे अनुसरण करू नका.'' ७:३ म्हणजेच अल्लाहस पालनकर्ता मानण्याचा हा अर्थ आहे की त्याच्या नियमास -कायदेकानूंस सच्चे जाणावे आणि त्यांचे पालन करावे. अल्लाहचा धर्म याशिवाय दुसरे काहीच नाही की संपूर्ण मानव-जीवन ईश्वरीय आदेशांच्या अंतर्गत असावे आणि जीवनाचा कोणताही भाग अल्लाहशिवाय अन्य कोणाच्या तरी दासतेमध्ये व्यतीत होऊ नये.'' (त्यांना) सांगा, माझ्या पालनकर्त्याने मला सरळ मार्ग दाखवलेला आहे. सचोटीच्या धर्माचा मार्ग, (सत्यनिष्ठ) इब्राहीमचा मार्ग, ज्याने सर्व खोट्या गोष्टींपासून स्वतःला पूर्णपणे दूर केले होते आणि तो त्या लोकांपैकी मुळीच नव्हता, ज्यांनी इतरांना अल्लाहचे समकक्ष ठरविले होते. (त्यांना) सांगा, माझी अक्षय भक्ती (उपासना), सर्व प्रकारचा त्याग व माझे जगणे आणि माझे मरणे (सर्व) केवळ विश्वाचा पालनकर्ता असलेल्या अल्लाहसाठीच आहे.'' ६:१६१-६२. ''त्यांना केवळ अशी आज्ञा देण्यात आली होती की, त्यांनी अल्लाहप्रति पूर्ण समर्पणभाव बाळगून आणि श्रद्धेच्या बाबतीत एकाग्रचित्त होऊन त्याचीच उपासना करावी, आणि नित्य प्रार्थना (नमाज) करावी आणि दानधर्म (ज़कात) करावे, कारण हाच नेहमी खरा धर्म (राहिलेला) आहे.'' ९८:५. खरी गोष्ट अशी आहे की अल्लाहचा धर्म - इस्लाम अर्थात संपूर्ण समर्पण - हा मानवाच्या संपूर्ण जीवनासाठी आहे. ''निश्चितच अल्लाहच्या नजरेत एकमेव खरा धर्म, (माणसाचे) त्याच्यासमोर संपूर्ण समर्पण (म्हणजेच) 'इस्लाम' हा आहे. ३:१९ ''श्रद्धावंतांनो! अल्लाहला संपूर्णपणे शरण जा (समर्पित व्हा).'' २:२०८. जीवनामधील संपूर्ण समस्या, मग भलेही त्या सामाजिक असोत वा व्यक्तिगत याच धर्मामुळे सुटतात.

संसाराच्या प्रत्येक क्षेत्रात निर्विवादपणे धर्माची गरज असते. मानवाची जी काही कर्तव्यकर्मे असतात, त्याच धर्माचे रूप धारण करतात. कर्तव्य हे धर्माचे दुसरे नाव आहे. कर्तव्य हे सार्वकालिक आणि सार्वभौमिक सत्याचे नाव आहे. म्हणून जे काही सत्य आहे तेच धर्म आहे. सत्याच्या स्थितीमध्ये धर्माची स्थिती असते. धर्माच्या स्थितीमध्ये पाप हेय आणि पुण्य श्रेयस्कर मानले जाते. कारण की पाप असत्यस्वरूप असते, तर पुण्य हे सत्यस्वरूप. सदाचरण हे पुण्य आहे, तर दुराचरण हे पाप. यापैकी पुण्यमार्गच पवित्र असल्यामुळे त्याचाच अंगीकार केला पाहिजे.

मानव हा सामाजिक प्राणी आहे. म्हणून कुटुंब, नातलग, शेजारी, माता-पिता, गुरू व इतरेजनांशी त्याची कर्तव्ये असतात. ती त्याला पाळावी लागतात. हीच सत्प्रवृत्त कर्तव्ये पुण्यस्वरूप असतात. यांचा त्याने स्वीकार केला पाहिजे. सन्मार्गाच्या अनुसरणाने मनुष्य चांगला बनतो. परिणामी तो सर्वत्र व सदासर्वदा सफलच होतो, यशस्वी होतो.

धर्माचरणामुळे मनुष्यामध्ये मानवता जागृत होते. म्हणून तो आपल्या कर्तव्यांविषयी नेहमी जागरूक असतो. धर्ममार्ग अनुसरल्यामुळे आपणास अशी शिकवण मिळते की मानवतेच्या नात्याने मनुष्यजात ही एकच आहे. धर्मभेद, पंथभेद, वंशभेद, लिंगभेद अशा भेदाच्या विविध भिंतींमध्ये तो अडकत नाही. परमेश्वर एक आहे आणि सर्व मानव हे त्याचेच अंश आहेत. एकता, प्रेम व इतर उदारमतवादी सद्गुणांमुळे मनुष्य हा महान बनतो. संत-संगत आणि सत्संग यामुळे मानवात सत् प्रवृत्ती निर्माण होतात. तो सद्गुरूची सेवा करून त्यांचा

मान मरातब राखतो. मानव-मनस्थित षड्रिपूंना हेय समजून त्यांना थारा देऊ नये. साधनेसाठी विकारांच्या विनाशाचे फार मोठे महत्त्व आहे. निराहार, मिताहार आणि सात्त्विकाहार या शस्त्रांच्या साहाय्याने साधक त्यांचा विनाश घडवून आणतो. तो लोभाची निंदा करतो आणि दानधर्माचा महिमा गातो. मन, वचन आणि कर्माने तो सत्याची श्रेष्ठता सिद्ध करतो. अशाप्रकारे सूफींमध्ये साधनेसाठी आचरणाचे फार मोठं महत्त्व आहे. याच्याशिवाय मनुष्यामध्ये मानवताच निर्माण होऊ शकत नाही. जर मानवताच नाही तर मग प्रेम कुठे आणि जर प्रेमच नसेल तर प्रेयसीचा प्रसाद कुठे? म्हणून सदाचरणाचे परिपालन हे सर्व दृष्टीने कल्याणकारी असते.

अशाप्रकारे भक्ती ही धर्माचरणाची प्रमुख घटक सिद्ध होते. धर्माचरण सदाचरणास प्रोत्साहित करते. भक्ती मानवास दुराचरणापासून परावृत्त करते. त्याला पूर्णत्व प्राप्तीसाठी साहाय्यक ठरते. त्याला आपल्यामधील दिव्यत्वाची प्रचीती येते. ती मानवामध्ये उदात्त आध्यात्मिक आणि नैतिक पातळी उंचावण्यास मदत करते. एक सजीव, सप्राण संस्कृतीचे आवश्यक आधारभूत असलेले अभिसरण आणि ऐक्य ते लोकांमध्ये घडवून आणते. भक्तीमुळे व्यक्तीची आत्मोन्नती साध्य होते- ऐहिक आत्मोन्नती आणि पारलौकिक आत्मोन्नती दोन्ही. शाश्वती, नि:स्पृहता आणि सन्मान या सद्गुणांमुळे व्यक्तीचे ऐहिक जीवन सुखमय बनते, तर पारलौकिक आत्मोन्नतिसाठी पुढील चार घटकाची आवश्यकता असते - १) मृत्यूविहीन शाश्वत जीवन, २) गरजाविरहित संपत्ती, ३) मानहानिशिवाय सन्मान आणि ४) अज्ञानशून्य ज्ञान. भौतिक आणि नैतिक महानता साध्य करण्याचेच दुसरे नाव आहे परिपूर्ण आत्मोन्नती. उच्चतर आध्यात्मिक दृष्टिकोनातून पाहिल्यास भक्ती एक प्रकारचा ईश्वर व भक्त यांच्यामध्ये घडून येणारा सु-संवाद असतो. प्रार्थनेच्या माध्यमातून भक्त हा आत्मनिवेदन करून ईश्वरापुढे आपले चित्त उघड करत असतो. आपल्या चित्तशुद्धीने तो परमेश्वरास आपलेसे करून घेतो आणि त्याच्या परम कृपेच्या साहाय्याने आपले पारलौकिक जीवन सुखमय करून घेतो. हेच भक्ताचे खरे यश आहे.

आज्ञाधारक भक्त परमेश्वरास अतिशय प्रिय असतो. त्याने माणसासारख्या क्षुल्लक जीवास देवदूताहूनही श्रेष्ठ ठरवले आहे, तर मग उत्कट भक्त हा किती बरे श्रेष्ठ असेल! या बाबतीत पवित्र कुराणचा पुरावा असा आहे - ''जेव्हा तुझ्या विधात्याने देवदूतांना म्हटले (की), मी लवकरच मातीपासून मनुष्य निर्माण करणार आहे आणि जेव्हा मी त्यास (पूर्णपणे) घडवलेला असेन व त्यात माझा आत्मा फुंकलेला असेन, तेव्हा तुम्ही त्याच्यासमोर नतमस्तक व्हा. म्हणून सर्व देवदूत एकत्र नतमस्तक झाले, परंतु इब्लीस (शैतानांचा महागुरू) नतमस्तक झाला नाही. तो घमेंडीने वागला. तो श्रद्धाहीनांपैकी होता. (ईश्वराने) म्हटले की, हे इब्लीस, मी माझ्या दोन्ही हातांनी ज्या (आदम-मानवा)स निर्माण केले त्याच्यासमोर नतमस्तक होण्यास तुला कोणत्या (गोष्टीने) प्रतिबंध केला? काय तू घमेंड करत आहेस की तू मोठेपणाचा दावा करणाऱ्यांपैकी आहेस?'' ३८:७१-७५

उपरोक्त कौराणिक दाखल्यावरून हे स्पष्ट आहे की ईश्वराने आपल्या निर्मिती विश्वाच्या श्रेणी-परंपरेत म्हणजे उतरंडीमध्ये मानवास सर्वोत्तम व सर्वोच्च स्थानावर स्थानापन्न करून, त्याचा यथोचित गौरव करून त्याची प्रतिष्ठा वाढवण्यासाठी निष्पाप, निरागस आणि आज्ञाधारक सेवक देवदूतांना त्याचे प्राणिपात करण्याचा आदेश दिला. इब्लीस सोडून सर्व देवदूतांनी परमेश्वराची आज्ञा तात्काळ शिरसावंद्य मानली. मानव हा सर्वोच्च

स्थानावर यासाठी आहे की स्वत: परमेश्वराने त्यास आपल्या दोन्ही हातांनी घडवून आपला आत्मा त्याच्या शरीरात फुंकला. हे फक्त त्याने मानवनिर्मितीच्या बाबतीत व्यक्तिश: केले. म्हणून परमेश्वराच्या दृष्टीत मानवाचे स्थान मोठे प्रतिष्ठित असे आहे. प्रतिष्ठित मानवाची भक्ती पण त्याला साजेल व शोभेल अशी अतिभव्य असायला पाहिजे. मानवाने आपल्या भक्तिमध्ये परमोच्च बिंदू गाठला पाहिजे, अशी रास्त अपेक्षा आहे. हा परमोच्च बिंदू म्हणजे साक्षात अल्लाहचे दर्शन! त्याने आपल्या उत्कट भक्तिमध्ये अल्लाह–परमेश्वराचे दर्शन साध्य करून घेतले पाहिजे. भक्तिच्या संदर्भात सूफींचा पण दृष्टिकोन जवळपास हाच आहे.

### २) मानव माहात्म्य : नैतिक पैलू

### नीति : दार्शनिक दृष्टिकोन :

'एकमेवाद्वितीयम्' हे आद्यतत्त्व धर्मानें कंठरवाने सांगितलेले आहे. जीवात्मे अनंत आहेत असे बाह्यत: आपणाला दिसून येते, परंतु ते सर्व एकाच परमात्म्याचे अंश किंवा प्रतिबिंबे आहेत. हे जीवात्म्यांचे भिन्नत्व अशाश्वत असून त्यांचे ऐक्य मात्र शाश्वत आहे. एखाद्या विहिरीतून पुष्कळ पोहोरे पाण्याने भरून काढता येतील, परंतु त्या सर्वांतील पाणी एकस्वरूपीच असते. तद्वत ह्या आत्मजलधींतून अनंत उपाधी बुडवून काढलेल्या आहेत, म्हणून तदंतर्गत आत्मतत्त्व हे सर्व एकस्वरूपीच आहे. धर्माचे हे आद्य तत्त्वच नीतिशास्त्राचा पाया होय. म्हणून नीतिशास्त्राचा विचार करताना आत्म्याचे हे एकत्व आपण लक्षात ठेवले पाहिजे.

पूर्णाकडे जाण्याच्या अंत:करणातील नैसर्गिक तळमळीमुळे मनुष्य जो प्रयत्न करतो तीच नीति होय. आपल्या हृदय–सिंहासनी विराजमान झालेल्या आत्मराजाची ती आज्ञा होय. सर्व भूतांना आत्म्यामध्ये पाहणे हा पूर्ण सदाचार होय. नीतीचे हे ध्येय साध्य व्हावयाचे तर मनुष्याने व्यक्तित्वाची संकुचित कुंपणे मोडून सर्व भूते आत्मवत् मानली पाहिजेत. मनुष्य अज्ञानाने आपले अन्नमय, प्राणमय इत्यादी कोष म्हणजेच आपण आहोत असे मानतो. जडत्व व चैतन्य यांच्यामधील सांध्यावर मनुष्य उभा आहे. मनुष्य प्राणी हा दैवी व आसुरी वृत्तींच्या युद्धाचे कुरूक्षेत्र असल्यामुळे नीतीच्या प्रश्नाला फार महत्त्व आहे. माणसाचा जन्म जणु या युद्धासाठीच आहे व त्याचा विकासही या युद्धातूनच होतो.

आत्मसाक्षात्कार हे नीतीचे ध्येय आहे. आत्मस्वरूपी स्थिर झालेल्या पुरुषाचे आचरण हेच नैतिक आचरण होय. मनुष्याचे निरनिराळे विकार व लालसा आणि वासना व आकांक्षा त्याच्यामध्ये असलेल्या दिव्य शक्तींची वाढ होऊ देत नाहीत आणि त्याचे जीवन स्वार्थी व संकुचित बनवतात. जीवनाच्या विकासासाठी त्यांचे नियंत्रण करणे जरूर आहे. इंद्रियसुख आणि वासनातृप्ती म्हणजे नैतिक जीवन नव्हे. बुद्धी व ज्ञान हे नैतिक जीवनाचे आधार आहेत. उपनिषत्कारांनी हे तत्त्व मनुष्याच्या मनावर बिंबविण्यासाठी पुढील सुंदर रूपकाचा आश्रय केला आहे : ''आत्म्याला रथी, शरीराला रथ, बुद्धीला सारथी, मनाला लगाम समजावे. इंद्रियरूपी घोडे विषयाच्या मार्गावरून जातात. शरीर, इंद्रिये व मन यांनी युक्त असलेल्या आत्म्याला विवेकी पुरुष भोक्ता असे म्हणतात. सारथीला जसे आपले दांडगे घोडे आवरता येत नाहीत, त्याप्रमाणे ज्या माणसाची बुद्धी अज्ञानी व मन अशांत असते त्याला इंद्रिये आवरता येत नाहीत. उलट, कुशल सारथी जसे आपले घोडे नीट चालवू शकतो, त्याप्रमाणे ज्ञानी, शांतचित्त पुरुषाला आपली इंद्रिये आपल्या ताब्यात ठेवता येतात.'' कठोपनिषद् १/३/३–६

मनुष्य सुखोपभोगांच्या मागे लागून स्वार्थी-अदूरदर्शी बनतो तेव्हा तो स्वत:च गळफास लावून घेतो. स्वार्थ आत्म्याला संकुचित करतो, तर प्रेम त्याचा विकास करतो. प्रेमाने व्यक्तित्वाचा परिघ वाढतो. पापांतून मुक्त व्हावयाचे असेल तर स्वार्थाला शत्रू समजले पाहिजे. इतरांपासून आपल्याला निराळे ठेवणाऱ्या अहंकाराचा त्याग केला पाहिजे. अहंकारी मनुष्य नीतिमान होऊ शकत नाही. सर्व विश्व ईश्वराने निर्माण केले आहे व ईश्वरातच स्थित आहे, या जाणिवेने आपण वागले पाहिजे. त्यागाचे पाणी मिळाले म्हणजे प्रेमाची वेल फोफावते व फैलावते. आत्मप्राप्ती हेच नीतीचे ध्येय आहे. आत्म्याची व्याप्ती विश्वाइतकी मोठी असल्यामुळे त्यात स्वार्थाला मुळीच स्थान नाही. तेव्हा नैतिक जीवन म्हणजे सर्व विश्वावर प्रेम व त्याची सेवा असेच समजले पाहिजे. आणि प्रेम करणे हा माणसाचा स्वभावच आहे.

माणसाच्या मनाची धाव नेहमी पुढे असते. 'त्याला आकाश लाभले तरी त्याच्यापलीकडची गोष्ट लाभावी असे त्याला वाटते.' - ऐतरेय आरण्यक, ३/३/१. तो त्याचा स्वभावच आहे. विषयांचा कोंडा खाऊन मनुष्याची अमृताची भूक शमलेली कधी कोणी पाहिलेली नाही. वित्ताने माणसाची तृप्ती कधी होत नाही.

**नीति : आध्यात्मिक दृष्टिकोन**

आदिकाळापासून आधुनिक काळापर्यंत मानवी चिंतनाचा कणा खुद्द मानव राहिलेला आहे. मानवाचा विकास कशा प्रकारे व्हावा, त्याच्यात सर्वांगपूर्णता कशी यावी, मानवी मूल्याची स्थापना कशा तऱ्हेने व्हावी इत्यादी प्रश्नांवर विचार केला जात राहिलेला आहे. याच्या परिणामस्वरूप जे व्यावहारिक समाधान समोर आले आहे ते आहे नैतिकता. जिच्यामुळे जास्तीत जास्त लोकांना जास्त सुख मिळते तिला नैतिकता म्हणतात. प्रेम आणि सौहार्द हे नैतिकतेचे मूळ मंत्र मानले गेले आहे.

नैतिकता प्रत्येक धर्माचा अनिवार्य भाग आहे. त्यामुळे नैतिकतेचेच विकसित स्वरूप धर्म आहे, असे म्हटल्यास काहीच वावगे नाही. दुसऱ्या शब्दात नीतीचेच उन्नत रूप म्हणजे धर्म होय. मनुष्याची नैतिकता, सदाचार पालनावर अवलंबून आहे आणि हीच त्याची महानता आहे. हीच ती संपत्ती आहे जिच्याआधारे माणसाला सृष्टीत श्रेष्ठत्व व वर्चस्व प्राप्त झाले आहे. सृष्टीचा मुकूटमणि असण्याचा गौरव त्यास लाभला आहे. नैतिकतेचा आश्रय घेतल्यास तो आपले मन, बुद्धी आणि अहंभावनेला परिष्कृत, परिमार्जित करून तिला आत्मस्वातंत्र्याच्या आलोकात (प्रकाशात) आणून बसवतो.

अध्यात्माची संपूर्ण रचनाच सदाचाराच्या पायावर आधारित आहे. विचारवंत याची महत्ता व उपयुक्तता प्रतिपादन करतात. त्यांनी नैतिकतेच्या पालनावर सर्वाधिक भर दिला आहे. ते व्यक्तित्वाच्या विकासात आचरणाची शुद्धता व नैतिकतेला आधारशिला मानतात.

ज्या कार्याचा उद्देश मानव व्यक्तित्वाला उजाळणे, प्रगतिपथावर अग्रेसर करून आत्मविकासाच्या सर्वोच्च शिखरावर प्रतिष्ठित करविणे व सत्य स्वरूपांचा बोध करविणे असतो, त्यास सदाचरण, नैतिक कर्म म्हणतात. सत्यासाठी केल्या गेलेल्या आचरणास विचारवंतांनी 'सदाचरण' आणि 'नैतिकता' असे नाव दिले आहे. ऋषी, महापुरुष व प्रेषित म्हणविले जाणाऱ्या जीवनाच्या मर्मज्ञांनी नैतिकतेचे महत्त्व ओळखून स्वत:ला सदाचार व नैतिकतेच्या साच्यात बसवून आपल्या व्यक्तित्त्वाला सुगठित, सुविकासित व सर्वांगीण सुस्वरूप बनवले होते. त्यांनाच मनुष्य नैतिकतेच्या प्रतिमूर्तिच्या रूपात स्वीकार करण्यास सहजपणे राजी होतो. त्याच सदाचार व नैतिक

कर्माला प्रत्येक स्तराची मानसिकता बाळगणारे लोक स्वतःच्या स्थितीनुसार जीवनात त्याचा अवलंब करून विकासाच्या चरम उत्कर्षापर्यंत पोहचू शकतात. त्यांनी दया, दान व दमनाचे अनेक दृष्टांत आपल्या आचरणाने प्रस्तुत केले आहेत. त्यांनी सत्य, तप, संयम व शांतीला आपल्या आचरणात समाविष्ट करण्यावर भर दिला आहे आणि स्वाध्याय व ज्ञानदान करण्यात मानवाचे कल्याण निहित असल्याचे सांगितले आहे. त्यांचा उपदेश आहे की मानवाचे प्रमुख अलंकार श्रद्धा, औदार्य व नम्रता आहे. ही सर्व सत्कृत्ये नैतिकतेच्या विस्तृत क्षेत्रात समाविष्ट होतात. यांना जीवनामध्ये अवलंबिल्यास मानवजातीचे कल्याण होईल.

आध्यात्मिक (आत्मिक) व भौतिक दोन्ही प्रकारच्या प्रगतीत नैतिकतेच्या तत्त्वांचा समावेश आवश्यक आहे. कारण की कोणतीही व्यक्ती याच कसोटीवर स्वतःला प्रामाणिक सिद्ध करते. हीच प्रामाणिकता लौकिक क्षेत्रात लोकांचा विश्वास व सहकार्य संपादन करते. आध्यात्मिक क्षेत्रात मनुष्य याच आधारावर आत्मसंतोष व दैवी सहानुभूतीचा अधिकारी बनतो. स्वर्ग, मोक्ष इत्यादींमध्येदेखील याच प्रवृत्तीची प्रमुख भूमिका असते.

व्यक्तीच्या जीवनात जितके महत्त्व शिक्षणाचे आहे, त्यापेक्षा कितीतरी अधिक महत्त्वपूर्ण स्थान नैतिकतेचे आहे. नैतिक गुणांशिवाय माणसाचा सर्वांगिण विकास होणे शक्य नाही. याशिवाय कोणतेही शिक्षण उदात्त भावना व उत्कृष्ट चिंतन असलेला मनुष्य निर्माण करण्यात सदैव अपयशीच राहील. नैतिकतेच्या अवलंबनानेच मनुष्य सुसंस्कृत, आदर्श व चरित्रनिष्ठ नागरिक बनतो.

नैतिक नियमांचे निर्धारण करण्यासाठी ज्ञानोपार्जन अत्यावश्यक आहे. मात्र अट अशी की ते व्यक्तिवाद संकीर्ण चिंतनावर आधारित नसावे. ज्ञानार्जनासाठी व्यक्ती चिंतनशील व विवेकशील असणे आवश्यक आहे. चिंतन जीवनाचा सैद्धान्तिक पक्ष आहे. त्याचा व्यावहारिक पक्ष श्रेष्ठ कर्माच्या रूपाने परिलक्षित होतो. विचार मंथनाने जे सिद्धान्त निश्चित होतात, त्यांच्या सत्यतेच्या परीक्षेसाठी त्यांना व्यावहारिक क्षेत्रात कार्यान्वित करणे आवश्यक असते. उच्च आदर्श व्यवहारात येणे म्हणजेच नैतिकता होय. नीतिमान मनुष्य स्वतःच्या कल्याणाबरोबर समाजाचे सुद्धा कल्याण करतो. तो समाजातील लोकांशी सहानुभूति ठेवतो व त्यांना आपले उत्कृष्ट विचार श्रेष्ठ व्यवहाराने निरंतर उंचावण्याचा प्रयत्न करतो. खरोखर, समाजापासून अलिप्त राहून माणसाच्या नैतिकतेचे मूल्य व उपयुक्तता काहीच राहत नाही.

वैयक्तिक जीवनामधील नैतिकता सामूहिक रूपाने विकसित झाल्यानंतर सामाजिक सुव्यवस्था बनते. प्रगती व समृद्धीची आणि सुख व शांतीची आधारशीला याच पृष्ठभूमीवर ठेवली जाते. पारिवारिक, सामाजिक मर्यादांचे पालन व श्रेष्ठ जीवन जगण्याच्या कलेचा मूळ आधार नैतिकताच मानली जाऊ शकते. नैतिकतेशिवाय राष्ट्रीय चरित्राचा विकास होऊ शकत नाही. धन नव्हे, वैभव नव्हे, तर नैतिकताच मानवाची श्रेष्ठ संपत्ती आहे. नैतिकतेचा मूळ आधार निःस्वार्थीपणा आहे. नैतिकता म्हणूनच सर्व स्वार्थी प्रवृत्तींचा विनाश करते.

### ३) ईश्वरनिर्दिष्ट मानव-निर्मिती प्रक्रिया व मानवी स्वभाव

पवित्र कुराणामध्ये शरीरशास्त्र दृष्टीने मानवाचे जन्म-पूर्व टप्पे आणि जन्मोत्तर त्याच्या स्वभावाचे विविध पैलू यावर सुंदर प्रकाश टाकण्यात आला आहे. त्याचे विवेचन असे आहे -

**मानव निर्मिती प्रक्रिया :**

''आम्ही मानवाला मातीच्या सत्त्वापासून निर्माण केले. मग आम्ही त्यास वीर्याच्या एका बिंदूच्या रूपात, एका सुरक्षित स्थानी (म्हणजेच गर्भाशयात) ठेवले. मग आम्ही त्या वीर्याला गोठलेल्या रक्ताच्या रूपात विकसित केले. आणि पुढे आम्ही त्यास मांसाच्या गोळ्याच्या रूपात विकसित केले. पुढे आम्ही मांसाच्या त्या गोळ्यात हाडे विकसित केली आणि आम्ही त्या हाडांवर मांसाचे आवरण चढवले. मग (शेवटी) त्याला एक नवीन निर्मितीच्या रूपाने घडवून टाकले. खरोखर, प्रशंसनीय आहे अल्लाह, सर्वोत्तम निर्मितीकार!'' २३:१२-१४. ''अल्लाहने तुमच्यापैकी (प्रत्येकाला) मातीपासून (म्हणजेच मातीतील रासायनिक घटकांपासून) निर्माण केले आहे. मग शुक्राच्या एका बिंदूपासून (मानवी वंश पुढे सुरू ठेवले.) मग त्याने (स्त्री-पुरुषाच्या रूपाने) तुमच्या जोड्या बनविल्या. आणि त्याचे ज्ञान (व परवानगीशिवाय) कोणतीही स्त्री गर्भ धारण करत नाही, ना ती (बाळ) जन्माला घालते. तसेच कोणालाही (योगायोगाने) ना दीर्घायुष्य लाभते, ना कोणाला कमी आयुष्य, तर जे घडते ते (अल्लाहच्या) हुकूमनाम्यात नमूद असल्याप्रमाणेच घडते. आणि नि:संशय, अल्लाहसाठी ही अगदी सोपी गोष्ट आहे.'' ३५:११. ''(लोकांनो!) आम्ही तुम्हांस एका तुच्छ वीर्यबिंदूपासून निर्माण केलेले नाही का? मग त्यास एका सुरक्षित ठिकाणी ठेवले, (म्हणजेच गर्भाशयात!) एका निर्धारित मुदतीपर्यंत. अशा प्रकारे आम्ही (गर्भाच्या) वाढीचे टप्पे निश्चित केले. होय! आम्ही किती कुशल रचनाकार आहोत!'' ७७ :२०-२३. ''माणसाने विचार करायला हवे की, त्यास कशापासून निर्माण करण्यात आलेले आहे. त्याला अशा पाण्यापासून (म्हणजे वीर्यबिंदू पासून) निर्माण करण्यात आले, जो उचंबळून, पाठीतून व उराच्या हाडांमधून निघतो. नि:संदेह, तोच त्याला पुन्हा जिवंत करण्याचे पूर्ण सामर्थ्य बाळगतो.'' ८६ :५-८ ''आणि (ती वेळ आठवा) जेव्हा तुझ्या पालनकर्त्याने देवदूतांना म्हटले, 'मी सडलेल्या चिखलाच्या खणखणीत मातीपासून मानवाची निर्मिती करणार आहे.' आणि जेव्हा मी त्याला पूर्ण आकार देऊन, त्यात माझ्या आत्म्याची फुंकर मारेन, तेव्हा तुम्ही त्याच्यासमोर नतमस्तक व्हा.'' १५:२८-२९

**मानवाचे स्वभाव-वैशिष्ट्य**

''त्यानेच मानवाला वीर्याच्या (केवळ) एका थेंबापासून निर्माण केले. पण (हाच तुच्छ थेंबापासून निर्मित मानव) एकदम धडधडीत भांडखोर बनला.'' १६:४ ''त्याने जे काही निर्माण केले परिपूर्ण (नमुन्यात) निर्माण केले. आणि त्याने मानवाच्या निर्मितीची सुरुवात मातीपासून केली. मग मानवाचा वंश त्याने (वीर्यरूपी) तुच्छ द्रवाच्या सत्त्वाद्वारे पुढे सुरू ठेवला. मग त्याने त्याची घडवणूक केली आणि आपल्या आत्म्याची फुंकर मारली, आणि (अशाप्रकारे हे मानवा!) त्याने तुला कान, डोळे आणि बुद्धी या गोष्टी प्रदान केल्या (म्हणजे हे गुण असलेला परिपूर्ण माणूस बनून तू तयार झालास.) पण तुम्ही लोक फारच अल्प कृतज्ञता व्यक्त करता.'' ३२:७-९. ''मानवाला या गोष्टीची जाणीव नाही का की, आम्ही त्याला वीर्याच्या केवळ एका बिंदूपासून निर्माण केलेले आहे? मग तो (आपल्या वास्तवाला विसरून) फारच भांडखोर बनलेला आहे. आणि तो आमच्याविषयी उपमा रचून (वादविवाद करू लागला) आणि त्याला आपल्या स्वत:च्या निर्मितीचा विसर पडला. म्हणू लागला, 'हाडे कुजून (खाक) झाल्यानंतर त्यांना कोण जिवंत करू शकतो?'' ३६:७७-७८

''मनुष्यावर एक अशी वेळ आलेली नाही का, जेव्हा तो वर्णन करण्यास योग्य असा नव्हता? आम्ही माणसाला एका मिश्रित अशा वीर्यबिंदूने निर्माण केले. आणि त्याची परीक्षा पाहण्यासाठी आम्ही त्याला ऐकणारा व पाहणारा बनवले. आम्हीच त्याला (धर्माचा) मार्ग दाखवला आहे. आता स्वत:ला कृतज्ञ किंवा कृतघ्न त्याला सिद्ध करून दाखवायचे आहे. (त्याच्यासमोर हे दोन विकल्प खुले आहेत. निवड त्याच्या हातात आहे.) ७६:१-३. ''मनुष्याचा सर्वनाश होवो! तो किती कृतघ्न आहे! (अल्लाहने) त्यास कशापासून निर्माण केले? वीर्याच्या एका बिंदूपासून! त्यास तो निर्माण करतो आणि त्याची स्वभाववैशिष्ट्ये निश्चित करतो. आणि त्याच्यासाठी (जीवनाचा) मार्ग सुकर करतो. आणि शेवटी त्यास मृत्यू देऊन कबरीत (थडग्यात) पोहोचवतो. आणि मग जेव्हा तो इच्छील त्यास पुन्हा जीवंत करून उभा करेल. तरीही माणूस त्याच्या आदेशांनुसार कृती करण्यास नकार देतो. (जो माणसाचा सर्वप्रकारे कर्ताकरविता आहे) माणसाने आपल्या अन्नाकडे पाहावे, (ते त्याला कसे उपलब्ध करून दिले जाते, त्यावर त्याने चिंतन करावे).'' ८०:१७-२४. ''वाच! आपल्या पालनकर्त्याच्या नावाने (आरंभ करून) ज्याने सर्वांना निर्माण केले. ज्याने मानवाला गोठलेल्या रक्तापासून निर्माण केले. वाच! तुझ्या विधात्याच्या (नावाने) जो फार उदार आहे. ज्याने (मानवाला ज्ञानप्राप्तीसाठी) लेखणीचा उपयोग करणे शिकवले. मानवाला ते सर्व शिकवले, जे त्यास माहीत नव्हते. तरीही मनुष्य मगरुरीने वागतो. कारण तो (आत्मनिर्भर नसतानाही) स्वत:ला आत्मनिर्भर समजतो.'' ९६:१-७. ''नंतर आम्ही ग्रंथाचा वारसा आमच्या भक्तांपैकी त्यांना प्रदान केला, ज्याची आम्ही निवड केली होती. त्यांच्यापैकी काही स्वत:वरच अन्याय करणारे आहेत आणि काही मध्यम मार्गावर चालणारे आहेत. तर त्यांच्यापैकी काही असेही आहेत जे अल्लाहच्या प्रेरणेमुळे चांगली कामे करण्याच्या बाबतीत सर्वांच्या पुढे आहेत. खरोखर ही त्यांच्यावर अल्लाहची फार मोठी कृपा होय.'' ३५:३२. ''आम्हीच तर तुम्हाला निर्माण केले आहे, तर (लोकांनो! या) सत्याचा स्वीकार करण्यास तुम्हाला काय अडचण आहे? तुम्ही कधी (चिंतनपूर्वक) त्यावर विचार केला आहे का, जे (वीर्य) तुमच्यामधून बाहेर पडते, त्याद्वारे (मानवाची) निर्मिती तुम्ही करता की, त्याची निर्मिती करणारे आम्ही आहोत? आम्ही तुम्हा सर्वांसाठी मृत्यू अटळ ठरवला आहे. आणि (तसे करण्यापासून) आम्हाला रोखू शकेल असा कोणीही नाही. (आम्ही यासाठी समर्थ आहोत) की, तुमच्या जागी तुमच्यासारख्याची निर्मिती करून आणू किंवा तुमच्यात परिवर्तन घडवून आणू आणि अशा आकारात तुमची पुन:निर्मिती करू ज्याविषयी (सध्या) तुम्ही अनभिज्ञ आहात. तुम्हाला आपल्या पहिल्या निर्मितीचे निश्चितपणे ज्ञान आहे. त्यापासून तुम्ही बोध का घेत नाही? (तुमच्या विधात्यास तुमची पुन:निर्मिती करणे, अगदी सहज गोष्ट आहे.)'' ५६:५७-६२. ''खरोखर, माणूस उतावीळ स्वभावासह जन्माला आलेला आहे. जेव्हा त्याला कष्ट पोहोचते, तेव्हा तो शोक करू लागतो. आणि जेव्हा तो सुस्थितीत असतो, तेव्हा तो कंजूषपणाचे वर्तन करतो.'' ७०:१९-२१. ''(सत्यास खोटे ठरवणाऱ्या हे मानवा!) खेद आहे तुझ्याबद्दल, खेद! पुन्हा तुझ्याविषयी खेद वाटतो. फक्त खेद! मनुष्याला असे वाटते की काय, त्यास (वाटेल ते करण्यासाठी) असेच सोडून देण्यात येईल? (म्हणजे त्याला जाब विचारला जाणार नाही?) प्रथमत: तो गर्भाशयात टाकला गेलेला वीर्याचा एक बिंदू नव्हता का? (मग त्यातून, एक चालणारा, बोलणारा, हसणारा, विचार करणारा, अशा विविध अर्थपूर्ण क्रिया करणारा परिपूर्ण असा माणूस त्याला कोणी बनवले?) वीर्यापासून पुढे तो गुठळी झाला, मग अल्लाहने त्यास घडवले

व पूर्ण संतुलनासह त्याच्या अवयवांची रचना केली. आणि त्याने दोन प्रकार बनवले. म्हणजे नर व नारी.'' ७५ : ३४-३९. ''हे लोक (जे अल्लाहविषयी गाफील आहेत), ताबडतोब प्राप्त होणाऱ्या फायद्याची अभिलाषा बाळगतात. आणि (त्यांच्याशी अटळरित्या सामना होणाऱ्या) भयंकर दिवसाकडे, ते दुर्लक्ष करून आहेत. आम्हीच त्यांना निर्माण केलेले आहे. आणि त्यांच्या अवयवाची सुदृढ अशी रचना आम्हीच केलेली आहे. आणि आम्ही इच्छिले तर त्यांच्या जागी त्यांच्यासारख्याच इतरांना आणू शकतो.'' ७६:२७-२८ ''माणसाचे असे आहे, जेव्हा त्याचा विधाता त्याला सन्मान आणि कृपाप्रसाद देऊन आजमावतो, तेव्हा तो म्हणू लागतो, 'माझ्या विधात्याने मला सन्मानित केले आहे.' आणि जेव्हा त्याला (दुसऱ्या प्रकारे) आजीविकेची साधने कमी करून आजमावतो, तेव्हा तो म्हणतो, 'माझ्या विधात्याने मला अपमानित केलेले आहे.' कदापि नाही, तुम्ही लोक अनाथांचा आदर करत नाही आणि तुम्ही गरजवंतांना अन्नदान करण्याच्या बाबतीत एकमेकांना प्रेरित करत नाही. आणि तुम्ही दुर्बलाची वारसाप्राप्त संपत्ती गिळंकृत करून टाकता. आणि संपत्तीची तुम्हाला फारच लालसा आहे, जी कधीही तृप्त होत नाही. कदापि नाही.'' ८९:१५-२१ ''तो (बढाईखोर माणूस) असा विचार करतो का की, त्याच्यावर कोणीही नजर ठेवून नाही. आम्ही त्याला दोन डोळे दिलेले नाही का? आणि जीभ व दोन ओठ, आणि त्याला (आम्ही चांगले व वाईट असे) दोन खुले मार्ग दाखवले नाही का? पण त्याने (हिमतीने) चढण पार करण्याचा प्रयत्न केला नाही. पण तुम्हाला काय माहीत, ती चढण काय आहे? ती आहे, गुलामाला गुलामीतून मुक्त करणे, उपासमारीच्या काळात अन्नदान करणे, अनाथ नातेवाइकांना किंवा इतर दु:खी-कष्टी लोकांना.'' ९०:७-१६ ''लोकांनो! तुमचे प्रयत्न भिन्न भिन्न आहेत. तर जो दान देतो व अल्लाहची जाण ठेवून जीवन जगतो. आणि जे अंतिम (व अटळ) सत्य आहे, त्यावर विश्वास ठेवतो. अंतिम (सुख) सोयीकडे जाणारा (जीवन)मार्ग त्याच्यासाठी आम्ही सुलभ करू. पण जो कंजूष आहे आणि स्वत:ला (फारच) आत्मनिर्भर समजतो. आणि अंतिम सत्यास खोटे ठरवतो. आम्ही त्याच्यासाठी (नरकाकडे) जाणारा मार्ग सुकर करू. जेव्हा तो नरकाच्या (खड्ड्यात) जाऊन पडेल, तेव्हा त्याचे धन त्याच्या काही कामी येणार नाही. मार्ग दाखवणे एवढेच आमचे काम आहे. (आणि मार्ग त्याला अवलंबायचा आहे). यानंतरचे जग आणि हे जगही आमच्याच नियंत्रणात आहेत. मी तुम्हाला धगधगत्या आगीपासून सावध केलेले आहे.'' ९२:४-१४. ''आम्ही मानवाला उत्तम आकार देऊन (उत्कृष्ट निर्मितीच्या रूपाने) निर्माण केलेले आहे. पण त्याच्या (अन्यायी वर्तनामुळे) त्यास सर्वात खालच्या दर्जाच्या ठिकाणी म्हणजेच रसातळास फेकून दिले आहे.'' ९५:४-५. ''आम्ही (विचार व आचार स्वातंत्र्याचा) ठेवा आकाश, धरती आणि पर्वत यांना देऊ केला, पण त्यांनी ती जबाबदारी उचलण्यास नकार दिला, कारण ते त्या जबाबदारीचे भार उचलण्याच्या बाबतीत घाबरले. पण माणसाने (मुद्दाम व अविचारीपणे) ती उचलून घेतली. खरोखर त्याने स्वत:ला सर्वात मूर्ख व सर्वात दुष्ट सिद्ध केले.'' ३३:७२

अशाप्रकारे परमेश्वराने मानवी स्वभावाचे एकूण एक कंगोरे उलगडून दाखवले आहे. त्याने मानवास याविषयी विचार मंथन करण्याचे आव्हान केले आहे.

१६



## प्रकरण १६

# विश्व, मानव आणि ईश्वर

**१) विश्व आणि मानव**

आपल्या सभोवताली पसरलेले हे अनंत विश्व आणि अगणित तारे, सूर्यमालिका व आकाशगंगा यांनी व्यापलेले असून, ज्यांच्या प्रकाशाची गती प्रती सेकंदास तीन लक्ष किलोमीटर असून त्यास पृथ्वीवर पोहोचण्यासाठी कित्येक वर्षे लागतात. हे ब्रह्मांड अनादी असून काही अब्जावधी वर्षांपूर्वी अस्तित्वात आले आहे. हे ब्रह्मांड आकस्मिक किंवा अपघाती अस्तित्वात आलेले नाही, किंबहुना असे होणे अशक्यप्राय आहे! याचा एक निर्माता आहे व तो 'अल्लाह' (परात्पर परब्रह्म) आहे. या विश्वाच्या कानाकोपऱ्यात एकाच प्रकारचे समान नियम, व्यवस्था लागू आहेत. म्हणजेच येथे एकच ईश्वर आहे. हे विश्व ना देव-देवताची लीला आहे आणि ना ही मायाजाल. वास्तविक ही अल्लाहची विशिष्ट व ठोस विचारपूर्वक केलेली निर्मिती आहे. ईश्वराने विश्वाला ज्ञान, विवेक व बुद्धिचातुर्याने निर्माण केले आहे आणि याच्या प्रत्येक कणाकणामध्ये शिस्त, नियमबद्धता, समतोलता, बुद्धिचातुर्य व विशिष्ट उद्देश दिसून येतो.

मनुष्य हा योगायोगाने, अपघाती किंवा स्वयंभू जन्मलेला नाही. तो मोकाट सुटलेला प्राणी पण नाही. अल्लाहने त्याला मनुष्य म्हणूनच निर्माण केलेले आहे. अल्लाहने त्याला सर्व प्राणीमात्रांमध्ये संपूर्ण श्रेष्ठता प्रदान केलेली आहे. पृथ्वीतलावर ईश्वराचा प्रतिनिधी म्हणून आणि त्याच्या मर्जीप्रमाणे जीवन व्यतीत करण्याचा हक्क त्याला दिला आहे. अल्लाहने त्याला स्वातंत्र्य, स्वयंनिर्णय घेण्याची क्षमता प्रदान केली असून त्यानुसार तो पुण्य आणि पाप यांसारखे कर्म करू शकतो. त्याला कर्मस्वातंत्र्य बहाल करण्यात आले आहे. त्या अधिकारस्वातंत्र्यामुळे तो अल्लाह आणि त्याच्या दासांजवळ आपल्या कृत्याला जबाबदार आहे.

ईश्वराने त्याच्या अंतर्मनामध्ये सत्य-असत्य, चांगले-वाईट ओळखण्याची पारख व क्षमता दिलेली आहे. मनुष्य जन्मत:च अपराधी व पापी नसतो किंवा पुन्हा पाप घडणार नाही इतपत निष्पापही नसतो. त्याच्याकडून पाप किंवा पुण्य घडू शकते आणि असे घडतेसुद्धा. एवढेच नव्हे तर केलेल्या चुकांची, पापाची क्षमायाचना करूनसुद्धा तो सन्मार्गाकडे वळू शकतो आणि तो तसे करतो देखील.

प्रत्येक मानव, मग काळा असो वा गोरा, पाश्चिमात्य असो वा पौर्वात्य, एकाच ईश्वराची निर्मिती आणि भक्त आहे. त्याच्यामध्ये ईश्वरीय अंश नसून तो ईश्वराचे अपत्यही नाही. सर्व मानव आदम व हव्वा या एकाच

आईवडिलाची अपत्ये आहेत. अखिल मानवजातीतील प्रत्येक व्यक्ती आपआपसात भाऊ-भाऊ आहे. वर्ण, जात, वंश, देश, भाषा, लिंग, व्यवसाय, भाऊबंदकी यांच्या फरकावरून त्यांच्यामध्ये भेदभाव करणे योग्य नाही. कोणत्याही जाती, वंश, भाऊबंदकी किंवा व्यवसायाशी त्यांचा संबंध असला तरी मानवतेच्या दृष्टिकोनातून ते सर्व एकसारखे, समान व एकरूप आहेत. तो मानव सत्प्रवृत्त, सदाचारी किंवा ईशभिरू, पापभिरू असेल तर तो ईश्वराजवळ व मानवाजवळ दोन्ही ठिकाणी प्रतिष्ठित व आदरणीय आहे. उच्च-नीचता आणि स्पृश्य-अस्पृश्यता, समाज बहिष्कृत करणे हे धार्मिक व नैतिक अपराध आणि संपूर्ण मानवतेवर होणारा अन्याय आहे. प्रत्येक मानवाचा देह पवित्र आहे. पण त्याच्या हाताला व शरीराला घाण लागलेली असेल तर तो अस्वच्छ होऊ शकतो. तसेच प्रत्येक मानवाचे उष्टे अपवित्र असत नाही. मग तो कोणत्याही जाती, जमाती किंवा धर्माचा असो. प्रत्येक मनुष्याबरोबर बसून तो निर्धास्तपणे खाऊ-पिऊ शकतो. परंतु त्या खाण्या-पिण्याच्या वस्तू स्वच्छ, पवित्र आणि वैध असाव्यात.

पुरुषाची अर्धांगी स्त्री ही ना शैतानाची अभिकर्ता आहे ना पापाचे मूळ, ना ती तिरस्करणीय वा अपवित्र आहे. ती मानवतेच्या व कायदेव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून ईश्वराजवळ हिशोब देण्यास जबाबदार आहे आणि ईश्वराचा कोप, शिक्षा, बक्षीस आणि चांगले फळ यांस पुरुषाएवढीच पात्र आहे. मातेचे स्थान मानवांमध्ये सर्वोच्च आहे आणि सर्वांमध्ये सद्वर्तन आणि सेवा यासाठी तिचे स्थान उच्च पातळीवर आहे.

### २) अल्लाह (ईश्वर) आणि मानव

सूफ़ी तत्त्वज्ञानाचे आधारस्तंभ इस्लाममध्ये ईश्वराचे-अल्लाहचे स्वरूप अत्यंत स्पष्ट, बुद्धीला व मनाला पटणारे पवित्र असे आहे. त्यामध्ये कुठलीही अस्पष्टता, भेसळ, संदिग्धता किंवा बुद्धीविरुद्ध गोष्ट नाही. अल्लाह (ईश्वर) एक आणि एकमेव आहे. त्याच्या ईश्वरतत्त्वामध्ये कोणीही भागीदार नाही. तो या सृष्टीचा एकमेव निर्माता, पालनकर्ता, स्वामी, शासक, अन्नदाता आणि आदेश देणारा अधिकारी आहे. त्याच्या कोणत्याही गुणधर्मामध्ये कोणीही सहभागी नाही. तो स्वयंभू आहे. तो चिरस्वरूपी, चिरंतन आहे आणि चिरंतन राहील. त्याला मृत्यू नाही, तो तहानभूक, आसक्ती, सकल मानवी इच्छा आकांक्षा आणि प्रत्येक प्रकारचे मानवी दोष आणि कमतरता यांपासून पवित्र आहे. त्याला ना गुंगी येते ना निद्रा घेरते ना थकवा येतो. त्याला पश्चात्ताप होत नाही किंवा त्याला कोणी धोका देऊ शकत नाही. कुठल्याही कामाकरिता त्याच्यावर जबरदस्ती केली जाऊ शकत नाही. त्याला कोणत्याही गोष्टीची लालसा नाही. मानव, संपूर्ण सृष्टी, विश्व व प्रत्येक वस्तू त्याच्या आज्ञेत आहेत. ईश्वर आणि सृष्टी एक नाही. त्यांचे स्वतंत्र वेगवेगळे अस्तित्व आहे. ईश्वराने सृष्टीला निर्माण केले आहे, वाढविले व सजविले आहे. त्याच्या या निर्माण कार्यामध्ये त्याला त्याग करण्याची किंवा बळी अगर बलिदान देण्याची गरज नाही. सृष्टीची निर्मिती, देखभाल किंवा आदेश देणे हे ईश्वराचे अगदी सोपे काम आहे. (तो मानवाकरिता मार्गदर्शन, त्याच्या पापाची, अपराधाची क्षमा किंवा अन्यायकर्त्याची शिफारस अथवा दुसऱ्या कोणत्याही हेतूने मानवी किंवा प्राण्यांच्या रूपामध्ये अवतार स्वरूप येत नाही.) त्याला कोणताही पुत्र नाही, की जो त्याच्या मदतीकरिता पृथ्वीवर जन्मावा. या सर्व विकृत भावनांपासून तो पवित्र आणि समर्थ

आहे. कोणतीही गोष्ट किंवा वस्तू ईश्वराची बाजू घेत नाही आणि ईश्वरदेखील कोणाच्याही बाजूने नाही. तसेच त्याला त्याच्या बरोबरीचा जोडीदार नाही. तो अजोड, अतुल व अदृश्य आहे. त्याला खालपासून वरपर्यंत कोणी पाहू शकत नाही. तो सर्वव्यापी आहे. सर्व वस्तूंना पाहणारा आहे. तो प्रत्येकाचे म्हणणे ऐकणारा, एवढेच नव्हे तर मानवाच्या हृदयामध्ये, मनामध्ये येणारे विचार, हेतू, इच्छा, आकांक्षासुद्धा जाणणारा अंतर्ज्ञानी आहे. तो अंतर्यामी पण आहे. त्याच्यापासून कोणतीही गोष्ट लपून राहात नाही. त्याचे ज्ञान प्रत्येक गोष्टीस व्यापलेले आहे. तो प्रत्येक माणसाच्या त्याच्या धमनीपेक्षा जास्त जवळ आहे. त्याला कोणाच्या मध्यस्थीची किंवा कोणाच्या शिफारशींची गरज नाही. तो मानवाची प्रार्थना, भक्ती कोणत्याही माध्यमाविना अगर शिफारशींशिवाय ऐकतो. तो संकटग्रस्त माणसाची फिर्याद ऐकतो व प्रत्येकाच्या मदतीस येतो. तो सर्वश्रेष्ठ, सर्वसत्ताधीश आहे. याउलट इतर सर्वजण ईश्वराचेच लाचार व आज्ञाधारक आहेत. सर्व सत्कर्मांची गुणवैशिष्ट्ये त्याचीच व त्याच्याचसाठी आहेत. सामर्थ्य, मोठेपणा, उत्कर्षाचा उगमसुद्धा ईश्वरामध्येच आहे. तो न्यायी व न्यायदाता आहे. अन्यायाच्या प्रत्येक वाईट पैलूपासून पवित्र आहे. तो जे काही कार्य करतो ते आपल्या ज्ञानाने आणि बुद्धिकौशल्याने करतो. त्याचे नियम व आदेश सृष्टीच्या, विश्वाच्या कणाकणांमध्ये अस्तित्वात आहेत आणि त्यांचे पालन केले जाते. पृथ्वी आणि त्यावरील निर्मिती या सर्व गोष्टी त्याच्या अधिपत्याखाली आहेत.

मानवाच्या ऐच्छिक व अनैच्छिक जीवनामध्ये सुद्धा त्याचेच आदेश व आज्ञा पाळल्या जातात. ईश्वरच या सृष्टीचा आणि मानवाचा योग्य व सत्य स्वामी आहे. म्हणूनच मानवाच्या वस्तुनिष्ठ जीवनाकरितादेखील त्याचेच आदेश, कायदे-कानून आहेत. तो कृपावान व अत्यंत दयाळू आहे. त्याची दया, कृपा सर्व चराचरामध्ये सामावलेली, व्यापलेली आहे. संपूर्ण मानवजातीवर त्याची असीम दया, अनंत कृपा व देणग्या आहेत. या जगात सर्वांत मोठी कृपा आणि देणगी 'ईश्वरीय धर्म' (इस्लाम म्हणजेच ईश्वरास संपूर्णपणे शरणागती व समर्पण) आहे, जो मानवतेकरिता, मानवाच्या मार्गदर्शनाकरिता या ऐहिक आणि पारलौकिक जीवनामध्ये यश प्राप्त करण्याकरिता दिला आहे. त्याचे जे सेवक व भक्त त्याची भक्ती करतात, त्याच्या आज्ञेचे पालन करतात, त्याच्या धर्माचे पालन नि:स्वार्थीपणे करतात आणि त्याच्या सन्मार्गामध्ये आपले प्राण, संपत्तीची आहुती देतात, संकटकाळामध्ये त्याच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन कायम दृढ राहतात, अशांना सर्वशक्तिमान, सर्वसंपन्न आणि बुद्धिमान ईश्वर मदत करतो, त्यांना साथ देतो आणि त्यांना आपल्या निकट करून प्रसन्न करतो आणि प्रसन्न होतो. सर्वज्ञ ईश्वर त्यांना पारलौकिक जीवनात प्रामाणिक निवडक भक्तांमध्ये, सेवकांमध्ये सामील करून स्वर्गामध्ये उच्चस्थान देईल व अनंत, अगणित देणग्यांचा, भेटींचा, कृपेचा वर्षाव करील. ऐहिक जीवन असो की पारलौकिक जीवन दोन्ही जीवनांमध्ये, त्याच्याच आदेशांचे व आज्ञांचे पालन केले जाते. त्याची मदत असेल तर कोणी त्याला अंकित व अधीन करू शकणार नाही. त्याने आपली दया, कृपा नाकारली तर त्या मनुष्याला वाचवणारा कोणी असणार नाही. मानवांना या जगामध्ये तोच पाठवितो आणि तोच त्यांना अन्नोदक देतो. व्यक्ती व समाज आणि त्यांचा उत्कर्ष, उन्नती व अधोगती त्याच्याच हातात आहे. त्याच्या कौशल्याने जाती-वंशसुद्धा अपकर्षाला व अधोगतीला पोहोचतात आणि व्यक्तीलादेखील मृत्यू येतो. मृत्यूनंतर मानवाला परत त्याच्याच जवळ जायचे आहे. इहलोक व परलोक दोन्हीमध्ये त्याचा ईश्वराशी संबंध येणार आहे आणि त्यालाच प्रसन्न करून त्याचीच भक्ती करून दोन्ही लोकांमध्ये मनुष्य यशस्वी व सफल होणार आहे.

### ३) मानव समाजामध्ये प्रेषित पाठविण्याचे प्रयोजन

लोकांना शुभवार्ता देण्यासाठी आणि त्यांना सावध करण्यासाठी ईश्वर प्रेषितांना पाठवित असतो. लोकांनी श्रद्धा धारण करून स्वत:ची सुधारणा करून घ्यावी आणि सदाचारी बनून ईश्वरी कोपापासून निर्भय होऊन जावे. अनभिज्ञ लोक सावध होऊन जावेत. त्यांच्याप्रत सत्याचा संदेश स्पष्टपणे पोचून जावा. लोकांना सर्व प्रकारच्या अंध:कारातून बाहेर काढून प्रकाशाकडे आणले जावे. त्यांना अल्लाहच्या दिवसाची आठवण व्हावी. अल्लाहने केलेल्या उपकाराची आठवण ठेवली जावी. छळ आणि हत्येपासून वाचविले जाणे, सहनशीलता बाळगणे. ''प्रत्येक जनसमुदायासाठी एक प्रेषित आहे. आणि जेव्हा त्यांचा पैगंबर (त्यांच्याकडे) येतो, (व आपला संदेश त्यांना पोचवतो), तेव्हा (पूर्ण न्यायानिशी) त्यांचा निर्णय लावला जातो. आणि त्यांच्यावर तिळमात्र देखील अन्याय केला जात नाही.'' १०:४७ अल्लाहची उपासना करण्यासाठी आणि दुष्ट शैतानापासून दूर राहण्यासाठी, प्रत्येक जनसमूहामध्ये एका पैगंबराला उभे केले गेले. पैगंबरांना (प्रेषितांना) खोटे ठरविणाऱ्यांचा सर्वनाश होतो. सत्य नाकारण्यावर आग्रही राहणाऱ्या लोकांचा नाश होतो. कारण ते पक्के श्रद्धाहीन असतात यात मुळीच शंका नाही. अशा श्रद्धाहीनांसाठी अपमानास्पद शिक्षा तयार ठेवलेली असते. ''जे लोक अल्लाहवर आणि त्यांच्या प्रेषितांवर विश्वास ठेवतात, त्यांच्यापैकी कोणामध्येही फरक करत नाहीत, अशांनाच अल्लाह निश्चितपणे (त्यांच्या सत्कृत्यांचा पुरेपूर) मोबदला देईल. अल्लाह फार क्षमाशील व दयाळू आहे.'' ४:१५२ सतप्रवृत्त, सदवर्तनी आणि अल्लाहकडून सन्मार्गी लावले गेलेले प्रेषित ''हे अन्य काही नसून समस्त मानवजातीसाठी एक उपदेश आहे.'' ६:९० हे सर्वसाधारण प्रयोजन आहेत मानवसमाजामध्ये प्रेषित पाठवण्याचे!

परंतु प्रेषित मुहम्मद स. यांना अल्लाहने (परमेश्वराने) विशेष अभियाना ('मिशन') साठी जगात पाठविले होते. ते अभियान पवित्र कुराणाच्या शब्दांमध्ये असे होते–

''(हे पैगंबरा!) आम्ही तर तुला सकळ जगांच्या लोकांसाठी केवळ मूर्तिमंत दया बनवूनच पाठविले आहे.'' (म्हणजे पैगंबराद्वारे मानवजातीसाठी ईश्वरी कृपेचे व मार्गदर्शनाचे दार उघडले आहे.) २१-१०७.

''(ईश्वराच्या) संदेशहरा ! आम्ही तुला (लोकांवर सत्याची) साक्ष देणारा व (सज्जनांस ईश्वर प्रसन्नतेची) सुवार्ता ऐकवणारा आणि (दुर्जनांस आमच्या कोपाकडून) भिववणारा बनवून पाठविले आहे. आणि (तसाच) परमेश्वराच्या आज्ञेचे (समस्त मानवजातीला) त्याच्याकडे येण्याचे आवाहन करणारा म्हणून आणि लोकांना सन्मार्ग दाखवणारा प्रकाशित दीपक (बनवून) पाठवले आहे.'' ३३:४५-४६

सर्व विश्व, सृष्टी फक्त ईश्वराची भक्ती आणि त्याच्याच आदेशाच्या पालनाकरिता आहे. परमेश्वर सर्वज्ञ असून सर्व मानवजात आणि निसर्गाचा निर्माता आहे. त्याच्या दृष्टीत सर्व मानव एकसारखे, एकरूप व समान आहेत. सर्व त्याचीच निर्मिती, सेवक व भक्त आहे. तो सर्वांकरिता कृपाळू व दयाळू आहे. त्याने मानवाच्या सर्व लहान-मोठ्या गरजांच्या पूर्ततेसाठी व्यवस्था केली आहे. तोच संपूर्ण मानवजातीच्या सर्वांत मोठ्या आणि मूलभूत गरजाची पूर्तता करू शकतो. परलोकाची कायमस्वरूपी मुक्ती, सफलता आणि यशाचा मार्ग ईश्वराशिवाय कोण दाखवू शकतो? आणि म्हणूनच अशा न्यायी, दयाळू, कृपाळू, ज्ञानी ईश्वरावर पूर्णपणे श्रद्धा ठेवली पाहिजे. त्याने मानवाच्या मूलभूत आणि महत्त्वपूर्ण गरजांच्या पूर्ततेकरिता व्यवस्था केलीच असेल आणि त्याची पूर्तता तो आणि फक्त तोच ईश्वर करू शकतो.

आपण पाहतो की, वस्तुत: ईश्वराने मानवाच्या सर्वात मोठ्या गरजेच्या पूर्ततेची व्यवस्था केली आहे. त्याने प्रत्येक काळामध्ये निरनिराळ्या समाजांमधून, जातींमधून अशा व्यक्ती निवडल्या आहेत की, ज्या उत्तमोत्तम बुद्धिमत्ता, सदाचारी आणि सन्मार्गी होत्या. त्या व्यक्तींना आपल्या देवदूतांमार्फत आपल्या मर्जीप्रमाणे आपला धर्म आणि कायदे-कानून याविषयी मार्गदर्शन केले आणि त्यांना या गोष्टींची जबाबदारी दिली की, हा ईशधर्म सर्वसामान्य, अज्ञानी, मार्गभ्रष्ट, अन्यायी, कुकर्मी, सामान्य माणसांपर्यंत पोहचवावा. त्यांना सुधारण्याचे अथक प्रयत्न त्यांनी (अर्थात प्रेषितांनी) करावे. या ईशधर्मामध्ये ईश्वराने सरळ स्पष्ट केले होते की, ईश्वराचे सेवक, भक्त, दास यांनी कोणत्या रीतीने ईश्वराची भक्ती करावी, कोणते कर्म ईश्वराच्या दृष्टीने चांगले आहे ते त्यांनी करावे, कोणते कर्म ईश्वराच्या दृष्टीने वाईट आहे त्यापासून त्यांनी दूर राहावे. जीवनातील प्रत्येक क्षेत्रामध्ये कोणत्या मार्गाने ते कार्यरत राहतील ज्यामुळे सर्वांचा मालक व शासक – ईश्वर हा प्रसन्न होईल. ईशधर्माने अशा कायद्याची देणगी दिली की ज्यांमध्ये सर्व मानवजातीकरता न्याय, जीवनातील सर्व बाबी, व्यवस्था, कर्तव्य, सदाचार, सामाजिक, आर्थिक, राजकीय इत्यादी घडामोडींमध्ये सार्वजनिक समस्यांचे समाधान व निराकरण आहे. त्यांच्या ऐहिक जीवनाची सफलता, कायमस्वरूपी विकास व यशाची हमी, तसेच परलोकाची कायमस्वरूपी मुक्ती आणि यशाची खात्री व हमी दिलेली आहे.

ईश्वराने निवडलेले प्रेषित हे ईश्वर नाहीत किंवा ईश्वराचे अपत्य, अवतार नसून ते ईश्वराचे सेवक, भक्त व दास आहेत. ते देखील ईश्वरीय कोपापासून, अवज्ञापासून स्वत:चा बचाव करतात आणि ईश्वर त्यांना पापांपासून वाचवीत असतो. त्यांचे जीवन म्हणजे पवित्र जीवन असते. ते ईश्वराचे उत्तम दास, उपासक व भक्त असतात. ते ईश्वरीय धर्माचा, जीवनपद्धतीचा प्रचारक आणि सदाचाराचा एक आदर्श नमुना असतात. प्रेषितांचे शुद्ध जीवन म्हणजे उत्तम जीवनाचा एक आदर्श नमुना आहे.

अल्लाहचे हे निवडक दास ईश्वरीय कायदे-कानून, नीती-नियम सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचवीत असतात. मार्गभ्रष्ट झालेले मानव त्या प्रेषितांचा विरोधकात, त्यांना शिवीगाळ करत, आणि त्यांची थट्टामस्करी करत असत, दगडफेकही करत असत. त्यांना देशांतर करण्यास भाग पाडण्याऱ्या किंवा ठार मारण्याच्या योजना बनवत असत परंतु ते अन्यायी, जुल्मी मनुष्याला किंवा संकटास भिऊन स्वार्थापोटी आपला ईश्वरीय धर्म आणि जीवनपद्धतीमध्ये कणभरही बदल करत नसत. उलट तेच विरोधकांना क्षमा करून त्याचीसुद्धा स्वच्छ मनाने सेवा करत असत आणि ईश्वराकडून त्या विरोधकांना सन्मार्ग मिळावा यासाठी प्रार्थना करत. सर्व प्रेषितांचा मूलभूत संदेश एकच होता की, ''ईश्वराचीच – अल्लाहचीच भक्ती, आराधना, पूजा-अर्चा करा. अल्लाहाशिवाय भक्ती व उपासनेस योग्य असा दुसरा कोणी नाही. तो एक आहे. तत्सम कोणी नाही.'' प्रेषित मुहम्मद स. समस्त मानवांकरिता ईश्वराचे अंतिम प्रेषित आहेत.

### ४) ईश्वराचे मानवास हितोपदेश

मानवाचे इहलोक व परलोक दोन्ही सुधारावेत यासाठी परमेश्वर मानवास हितोपदेश करतो. या दोन्ही जगामध्ये तो सुखी व आनंदी राहावा अशी त्याची उत्कट इच्छा आहे. इहलोक ही परलोकासाठी शेती आहे. पेराल तसे उगवते. यासाठी त्याने मानवाकरता नीतिमय आदर्श जीवन जगण्याची चाकोरी आखून दिली आहे की जेणेकरून या सन्मार्गावर चालून त्याने आपले इहलोक व परलोक दोन्ही सुधारावे. म्हणूनच पवित्र कुराण

मानवासाठी आदर्श आचरणाचा एक निर्मळ आरसा आहे. ते मानवजातीसाठी सर्वोत्कृष्ट अशी एक आदर्श आचारसंहिता आहे. ती संहिता दोन विभागामध्ये म्हणजेच एक 'काय करावे' आणि दुसरे 'काय करू नये' यामध्ये विभागली गेली आहे. 'काय करावे' ही परमेश्वराची रास्त अपेक्षा आहे, आणि 'काय करू नये' ही त्याची इच्छा आहे यांना 'विधी-निषेधाज्ञां' पण म्हणता येईल. त्या आदर्श आचार संहितेचे स्वरूप आणि रूपरेषा पुढीलप्रमाणे आहे -

अल्लाहने मानवाला भूतलावर आपला उत्तराधिकारी बनवले आहे २:३० यासाठी की आम्हाला हे पाहता यावे की, तुम्ही कसे आचरण (कृत्य) करता. १०:१४ त्याचे सदाचरण कसे असावे याचे रेखाचित्र परमेश्वराने असे रेखाटले आहे-

**विधी-आज्ञा** - संकुचित मनोवृत्तीपासून दूर राहा. ४:१२८ दुष्कृत्यापासून अलिप्त रहा. १६:९० दिलेली वचने व करार यांचे कसोशीने पालन करा. १६:९१ वजन व माप पुरेपूर करा. १७:३५ खोट्या गोष्टी वर्ज्य करा. २२:३० पुरुषांनी व स्त्रियांनीही आपापल्या नजराची जपणूक करावी व आपल्या लज्जास्थानांचे रक्षण करावे. २४:३०-३१ पापकृत्ये व अश्लील कृत्यांपासून दूर राहा. ४२:३७ वजनमापात दांडी मारणाऱ्यांसाठी विनाश आहे. ८३:१-३ तोंडावर टोमणे मारणे व पाठीमागे निंदा करणे अत्यंत वाईट खोड आहे. १०४:११ क्षुल्लक गरजांच्या वस्तूही दुसऱ्यांना देण्याचे टाळणे अत्यंत वाईट आहे. १०७:७ मातापित्यांशी, नातेवाईकांशी, गोरगरिबांशी व अनाथांशी चांगला व्यवहार करा. आणि लोकांना चांगल्या गोष्टी सांगा. २:८३ संयम आणि उपासनेचे सहाय्य घ्या. २:१५३ आपली आवडती धनसंपत्ती नातेवाईकांसाठी, अनाथांसाठी, गोरगरिबांसाठी, वाटसरूंसाठी, मदतीची याचना करणाऱ्यांसाठी व गुलामाच्या मुक्तीसाठी खर्च करा. २:१७७ तुमच्या कर्जदाराला, जर तो हलाखीच्या अवस्थेत असेल तर सवड व सवलत द्या. कर्ज जर माफ करून टाकले तर ते अधिक चांगले आहे. २:२८० राग गिळून टाका व दुसऱ्यांच्या अपराधाची क्षमा करा. ३:१३४ हातून चूक व अपराध घडल्यास ती मान्य करून क्षमायाचना करा. ३:१३५ अमानती अमानतवाल्यांच्या स्वाधीन करा आणि निवाडा न्यायपूर्ण रीतीने करा. ४:५८ जेव्हा एखादा माणूस अदबीने तुम्हाला सलाम (नमस्कार) करील तेव्हा त्याला अधिक चांगल्यारीतीने प्रत्युत्तर द्या. ४:८६ न्यायावर व सत्यावर दृढ राहा आणि साक्ष खरी खरी द्या, मग ती तुमच्या स्वत:विरुद्ध की तुमच्या आप्तेष्टाविरुद्ध असो. ४:१३५ चांगुलपणात एकमेकांशी स्पर्धा करा. ५:४८ दिलेल्या वचनाची पूर्तता करा. १३:२० वाईटाला भलाईने नाहीसे करा. १३:२२ कृतज्ञ बनून रहा. १४:७ न्यायाने व भलाईने वागा. नातेवाईकांचे हक्क अदा करा. १६: ९०-९१ व्यर्थ गोष्टींपासून दूर राहा व आपल्या गुप्तांगांचे रक्षण करा. २३:३-५ भल्या गोष्टीकडे धाव घ्या व तिचा अंगीकार करा. २३:६१ लोकांचे अपराध क्षमा करत जा. २४:२२ संयम बाळगा आणि शीलचारित्र्याचे रक्षण करा. २४:३३ जमिनीवर विनम्र चालीने चालत जा आणि अडाण्यांच्या तोंडी न लागता त्यांना सलाम करत जा. २५:६३ बुराईचे निवारण भलाईने करा. २८:५४-५५. दुष्टतेचे निवारण उत्तम भलेपणाने करा. त्यामुळे हाडवैरीही जिगरी दोस्त बनतो. ४१:३५ राग आला तर क्षमा करा. ४२:३७ आपले व्यवहार परस्पराच्या सल्लामसलतीने करत जा. ४२:३८ संयमाने वागणे व क्षमा करणे हे मोठे साहसी काम आहे. ४२:४३ परस्परांशी लढणाऱ्या दोन गटात समेट घडवून आणा. ४९:९-१० तुम्हाला जितके शक्य आहे तितके अल्लाहचे भय बाळगून वागा व संकीर्ण मनोवृत्तीपासून दूर रहा. ६४:१६

आईवडिलांशी व नातेवाईकांशी सद्व्यवहार करा. २:८३ नातेवाईकांवर आपली संपत्ती खर्च करा. २:१७७ मातापित्यांशी सद्वर्तन करा व नातेवाईकांशी चांगला व्यवहार करा. ४:३६ आईवडिलांशी नेक व्यवहार करा. ६:१५१ अल्लाह नातेवाईकांचे हक्क अदा करण्याची आज्ञा देतो. १६:१० मातापित्यांशी सद्व्यवहार करा आणि त्यांच्याविरुद्ध ब्र शब्दही काढू नका. १७:२३-२४ अल्लाहने मानवाला आज्ञा दिली आहे की त्याने मातापित्याचे हक्क ओळखावे. ३१:१४ अल्लाहने मानवाला आज्ञा दिली आहे की त्याने आपल्या मातापित्याशी सद्व्यवहार करावा. ४६:१५ अनाथांशी आणि गोरगरिबांशी चांगला व्यवहार करा.२:८३ अनाथांवर, गोरगरिबांवर व वाटसरूंवर आपली संपत्ती खर्च करा. २:१७७ २:२१५ अनाथांशी सद्वर्तन करा. २:२२० अनाथाची संपत्ती त्यांना परत करा. ४:२ अनाथांशी, नातलग, शेजारी, परका शेजारी व सान्निध्याच्या साथीदाराशी सद्व्यवहार करावा. ४:३६ अनाथांसाठी न्यायावर दृढ रहा. ४:१२७ अनाथांच्या संपत्तीचे रक्षण करा. ६:१५२१७:३४ गोरगरिबांचे व वाटसरूंचे हक्क अदा करा. ३०:३८ अनाथांना सन्मानाने वागवा आणि गोरगरिबांस जेऊ घालण्यास लोकांना उद्युक्त करा. ८९:१७-१८ भुकेलेल्यांना जेऊ घाला मग तो नातेवाईक असो की भिकारी असो. ते मोठे पुण्यकर्म आहे. ९०:१३-१८ अनाथांना धक्के देणे व गोरगरिबांना जेऊ घालण्यासाठी दुसऱ्यांना उद्युक्त न करणे हे मोठे दुर्भाग्य आहे. (१०७ : २-३)

पुरुष, स्त्रियांचे विश्वस्त आहेत. ४:३४ तुमची सहचारिणी तुमच्यासाठी संतोषप्राप्तीचे साधन आहे. ७:१८९ आपल्या ऐपतीनुसार स्त्रियांवर खर्च करा. त्यांना अडचणीत आणू नका. ६५:६ अल्लाहने तुमच्या पत्नींना तुमच्यासाठी संतोषप्राप्तीचे साधन बनवले आहे व तुमच्या दरम्यान प्रेम व करुणा उत्पन्न केली आहे. ३०:२१ पत्नीशी चांगल्याप्रकारे जीवन व्यतीत करा. ४:१९ एकापेक्षा जास्त पत्नी जर असतील तर त्यापैकी कुणा एकीकडे झुकू नका तर न्यायाने वागा. ४:१२९ पती व पत्नी दरम्यान तडजोड होणे हे विभक्त होण्यापेक्षा अधिक चांगले. ४:१२८ दारू, जुगार, फासे टाकणे ही सर्व अमंगळ शैतानी कृत्ये आहेत. ५:९० विधवांना एकटे न राहू देता त्यांचा विवाह करा. २४:३२

भरल्या सभेत वाईट कृत्ये करणे अत्यंत वाईट गोष्ट आहे. २९:२९ जेवण उरकल्यानंतर वार्तालाप करत बसू नका. त्यामुळे यजमानाला त्रास होतो. ३३:५३ धर्माला अल्लाहसाठीच विशुद्ध ठेवून पूर्णतः त्याचीच भक्ती करा. ३९:२ आज्ञापालन त्याचेच करावे. ३९:१२

अल्लाहाने निश्चित केलेल्या मर्यादांचे उल्लंघन करणारे अत्याचारी आहेत. २:२२९ अल्लाहने उतरविलेल्या कायद्यानुसार जे न्याय-निवाडा करत नाहीत तेच अश्रद्धावंत आहेत, अवज्ञाकारी आहेत, अत्याचारी आहेत. ५:४४-४६ जो कोणी अल्लाह व त्याच्या प्रेषितांच्या निर्णयापासून तोंड फिरवितो तो मुळीच श्रद्धावंत नाही. २४:४७-४८ अल्लाहने भूतलावरील सर्व वस्तू मानवासाठी वशीभूत केल्या आहेत. २२:६५ सर्वात जास्त प्रतिष्ठित तो आहे जो सर्वात जास्त ईशभीरू आहे. ४९:१३ अल्लाहने अवतरित केलेल्या कायद्यानुसारच मामल्यांचा न्यायनिवाडा केला पाहिजे. ५:४८ न्यायनिवाडा कराल तेव्हा न्यायपूर्ण रीतीने करा. ४:५८ लोकांनी न्यायाधिष्ठित व्हावे व अन्याय आणि अत्याचाराचा बिमोड व्हावा. ५७:२५ धर्म सर्वस्वी अल्लाहसाठी व्हावा. ८:३९ धर्माच्या बाबतीत कोणतीही जोरजबरदस्ती नाही. २:२५६ कुणालाही श्रद्धा स्वीकारण्यासाठी विवश केले जाऊ शकत नाही. १०:९९

दिलेल्या वचनाचे पालन करा. १७:३४ एखादा करार केला असेल तर तो पूर्ण करा. १६:९१-९२ इतर लोक जर कराराच्या विरुद्ध जात नसतील तर तुम्हीदेखील कराराच्या कालावधीपर्यंत कराराचे पालन पूर्णपणे करा. ९:७ करारमदार झाल्यानंतर जर एखादा लोकसमूह प्रामाणिक राहात नसेल व दगलबाजी करत असेल तर प्रथम जाहीरपणे करारसमाप्ती घोषित करा व त्यानंतर कारवाई करा. ८:५८ शत्रू जर समझोता करू इच्छित असेल तर तुम्हीही त्यासाठी तयारी दाखवा. ८:६१ एखाद्या गटाच्या शत्रुत्वाने तुम्हाला इतके प्रक्षुब्ध करू नये की तुम्ही न्यायापासून विमुख बनावे. ५:८ ज्यांनी तुमच्याशी युद्ध छेडले आहे व तुमच्या शत्रुला जे मदत करत आहेत त्यांच्याशी मैत्री केली जाऊ शकत नाही. ६०:९ तुमच्यावर जर एखाद्याने हात टाकले तर त्याच प्रमाणात तुम्हीही त्याच्यावर हात टाकू शकता. २:१९४ तुम्हाला जर बदला घ्यावयाचा असेल तर तुमच्यावर झालेल्या अत्याचाराच्या प्रमाणातच बदला घ्या. संयम बाळगणे अधिक चांगले आहे. १६:१२६ तुमच्यावर अत्याचार केला गेला असेल व तुम्ही त्याचा बदला घेऊ इच्छित असाल तर त्यात काही दोष नाही. ४२:४०-४२ प्राणहत्या निषिद्ध आहे. परंतु सत्याच्या व न्यायाच्या पूर्ततेसाठी केली जाऊ शकते. १७:३३ कुणालाही हकनाक ठार करणे असे आहे जणू सर्व मानवतेलाच ठार करणे. ५:३२ सत्यापासून भ्रष्ट करण्याचे उपद्रव प्राणहत्येपेक्षाही अधिक वाईट आहे. २:१९१ जर अल्लाह एखाद्या मानवसमूहाला दुसऱ्या मानव समूहाहस्ते हटवीत राहिला नसता तर भूतलावरील व्यवस्था बिघडली असती. २:१५१ ज्या लोकांविरुद्ध युद्ध छेडले गेले असेल व अत्याचाराने ज्यांना घरातून बाहेर केले गेले असेल त्यांना युद्धाची परवानगी आहे. २२:३९-४० अल्लाह अशा लोकांवर प्रेम करतो जे त्याच्या मार्गात एकसंधतेने लढतात. ६१:४ धर्माच्या रक्षणासाठी व स्वरक्षणासाठी युद्ध अनिवार्य आहे. २:१९०-९२ अल्लाहच्या मार्गापासून रोखणाऱ्यांविरुद्ध शस्त्र उचलण्याची परवानगी आहे. ९:९ जे लोक कपट कारस्थाने करतील व करार भंग करण्यास उद्युक्त बनतील त्यांच्याविरुद्ध युद्ध करा. ८:५५-५७ करार भंग करणाऱ्यांना प्रथम सवड द्यावी नंतर त्यांच्याविरुद्ध युद्धाची घोषणा करावी. ९:१-४ जे नात्यागोत्याचाही आदर करत नाहीत, कराराच्या जबाबदारीचाही विचार करत नाहीत व धर्मावर हल्ले करतात अशा लोकांविरुद्ध युद्ध करा. (९:१०-१४)

दांभिक पुरुष व दांभिक स्त्रिया सर्व समरूप आहेत. ते वाईट गोष्टींचा आदेश देतात व भलाईपासून रोखतात. ९:६७ दांभिकांपैकी कुणालाही मित्र बनवू नका. त्यांना धरा व ठार मारा. ४:८९ जर दांभिक लोक त्यांच्या कारवायांपासून परावृत्त होत नसतील तर त्यांच्याविरुद्ध लढावे. ३३:६०-६१ जे लोक अल्लाह व त्याच्या प्रेषितांशी युद्ध करतात व भूतलावर उपद्रव माजविण्यासाठी धावपळ करतात, त्याची शिक्षा ठार करणे आहे. ५:३३ दुर्बल व असहाय पुरुषांसाठी व मुलांसाठी लढा. ४:७३ तुम्ही उत्तम लोकसमुदाय आहात. जगासमोर साक्षीदार बनून उभे रहा. २:१४३ बिघाड आणि उपद्रवांना रोखणे भल्या माणसांचे कर्तव्य असते. ११:११६ लोकांना वाईट गोष्टींपासून न रोखणारे लोक धिक्कारास पात्र ठरतात. ५:७८ ठार करणे जरी वाईट गोष्ट असली तरी उपद्रव त्यापेक्षाही अधिक वाईट आहे. (२:१९१)

**निषेधाज्ञा**

अल्लाहशी केलेली बांधीलकी मोडू नका, ती सर्वात मोठी हानी आहे. २:२७ हकनाक रक्त सांडू नका व लोकांना बेघर करू नका. २:८४ अयोग्य रीतीने दुसऱ्यांच्या संपत्तीचा अपहार करू नका. तसेच इतराची संपत्ती

बळकावण्यासाठी डावपेच रचू नका. २:१८८ दान-पुण्य करून उपकार दर्शवू नका. दिखाऊपणापासून दूर रहा. २:२६४ बेईमानी करून लबाडीने एकमेकाची संपत्ती खाऊ नका. हकनाक हत्या करू नका. ४:२९ अहंकार व गर्व करणारे अल्लाहला आवडत नाहीत. तसेच कंजूषपणा करणारेही आवडत नाहीत. ४:३६-३७ इतरांच्या उपास्याबद्दल अपशब्द व शिवीगाळ करू नका. ६:१०८ अश्लील गोष्टींच्या जवळपासही फिरकू नका व हकनाक कोणाचेही प्राण घेऊ नका. ६:१५१ आपल्या संततीला गरिबीच्या भयाने ठार मारू नका. ६:१५१ कोणाशीही बेईमानी करू नका व अमानतीत अफरातफर करू नका. ८:२७ वायफळ खर्च करू नका. वायफळ खर्च करणारे शैतानाचे बंधू होत. १७:२७ दारिद्र्याच्या भयाने संततीला ठार मारू नका. १७:३१ व्यभिचाराच्या जवळपासही फिरकू नका. १७:३२ विनाकारण कोणाचाही प्राण घेऊ नका. १७:३३ ऐट दाखवीत चालू नका. १७:३७ व्यर्थ गोष्टीपासून दूर रहा व व्यभिचाराच्या जवळ जाऊ नका. २३:३-५ कोणावरही आळ घेऊ नका. २४:२३ परवानगीशिवाय इतरांच्या घरात शिरू नका. २४: २७-२९ आपल्या दासींना ऐहिक लाभापोटी वेश्याव्यवसायासाठी विवश करू नका. २४:३३ फाजील खर्चही करू नका व कंजूषपणाही करू नका. २५:६७ व्यभिचारापासून अलिप्त रहा. हकनाक प्राण घेऊ नका. २५:६८ अपराध्यांच्या मदतनीस होणे कदापिही योग्य नाही. २८:१७ अल्लाहने दिलेल्या देणग्यांवर फुगून जाऊ नका. २८:७६ लोकांशी तोंड फिरवून बोलू नका व जमिनीवर ऐटीत चालू नका. ३१:१८ कोणाचीही टिंगल करू नका. कोणाला टोमणेही मारू नका व कोणालाही वाईट अर्थी टोपण नाव ठेवू नका. ४९:११ कल्पनाविलास करून अपसमज करून घेण्यापासून दूर रहा. असे करणे अपराध आहे. कोणाच्याही पाळतीवर राहू नका. ४९:१२ अधिक मिळविण्याच्या उद्देशाने उपकार करू नका. ७४:६ अनाथाशी कठोर व्यवहार करू नका. ९३:९ याचकाला झिडकारू नका. ९३:१० परस्पर व्यवहारात औदार्याचा विसर पडू देऊ नका. २:२३७ अमानतीत बेईमानी करू नका आणि साक्ष कदापि लपवू नका. (२:२८३)

अल्लाहचे सदाचरणी दास भूतलावर स्वत:चा बडेजाव इच्छित नाहीत व उपद्रवही माजवीत नाहीत. २८:८३ वजन-मापे न्यायपूर्ण रीतीने करा, तराजुची दांडी मारू नका. ५५:९ केवळ छळणूक करण्याच्या उद्देशाने पत्नींना रोखून ठेवू नका. २:२३१ घटस्फोट दिल्यानंतर स्त्रीच्या पुनर्विवाहाच्या मार्गात आड येऊ नका. २:२३२ परस्परांच्या व्यवहारात औदार्याचा विसर पडू देऊ नका. २:२३७ बलपूर्वक पत्नीचे वारस बनण्याचा प्रयत्न अवैध आहे व त्यांना त्रस्तही करू नका. ४:१९ दिलेल्या स्त्रीधना (महर) पैकी काहीही परत घेऊ नका. ४:२०-२२ आपल्या ऐपतीनुसार स्त्रियांवर खर्च करा. त्यांना अडचणीत आणू नका. ६५:६ सामूहिक कार्याप्रसंगी परवानगी घेतल्याशिवाय तेथून जाऊ नका. २४:६२ आपल्या प्रमुखाशी आरडाओरड करून बोलत जाऊ नका. ४९:२ जो कोणी अल्लाह व त्याच्या प्रेषितांच्या निर्णयांपासून तोंड फिरवितो तो मुळीच श्रद्धावंत नाही. २४:४७-४८ अल्लाहच्या स्मरणापासून ज्याचे मन गाफील आहे अशाचे आज्ञापालन करू नका. १८:२८ पृथ्वीतलावर उपद्रव माजविणाऱ्याचे व मोकाट व्यक्तीचे आज्ञापालन करू नका. २६:१५१-५२ आपापसात एकमेकाची संपत्ती व माल अयोग्य रीतीने खाऊ नका. २:१८८ कुणीही इतर कुणाची टिंगल-टवाळी करू नये, टोमणे मारू नये, वाईट नावे ठेवू नये व एकमेकांच्या पाठीमागे निंदा व चहाडी करू नये. ४९:११-१२ इतरांच्या घरात विना परवानगी प्रवेश करू नका. २४:२७ धर्माच्या बाबतीत कोणतीही जोरजबरदस्ती नाही. २:२५६

कुणालाही श्रद्धा स्वीकारण्यासाठी विवश केले जाऊ शकत नाही. १०:९९ इतरांच्या उपास्यासाठी अपशब्द वापरू नका. ६:१०८ चौकशी केल्याविना कुणाच्याही विरुद्ध कारवाई केली जाऊ शकत नाही. ६:४९ तुमच्यावर अत्याचार केला गेला असेल व तुम्ही त्याचा बदला घेऊ इच्छित असाल तर त्यात काही दोष नाही. (४२:४०-४२)

### ५) आदर्श जीवन-व्यवस्था - प्रारूप

सूफ़ी विचारधारांचा पाया इस्लाम धर्माची मूलभूत तत्त्वे असल्यामुळे त्यावर सूफी तत्त्वज्ञानाची सुंदर इमारत सूफी संतांनी उभी केली आहे. सूफी तत्त्वज्ञान प्रणीत व पुरस्कृत जीवनव्यवस्था चारित्र्यसंपन्नतेवर अवलंबून असून ज्या मूलभूत तत्त्वांवर आधारभूत आहे ते पवित्र कुराणाच्या शब्दात खालीलप्रमाणे आहे -

निश्चितच नि:संशय अल्लाहचा आदेश आहे की, ''तो अटळ न्यायसंपन्न चारित्र्य प्रस्थापित करतो आणि निर्लज्जता, दुष्कृत्य, अन्याय व अत्याचार यांपासून रोखतो.''

वैश्विक मूल्यांचे चिकित्सक शास्त्र म्हणजे तत्त्वज्ञान. कालांतराने मूल्ये बदलत असतात. तत्त्वज्ञानाची चिकित्सा होवून नव्याने मांडणी करण्याची प्रक्रिया सुरू होते. ईश्वराने माणूस बनवला, माणसाने धर्म आणि समाज बनविला, याचाच अर्थ धर्म माणसांसाठीच आहे. माणसाने धर्माने कर्तव्य करावे, मात्र धर्माचा दुरूपयोग करू नये.

समाजशास्त्रातील विचारवंत एमिल दुर्खीम धर्माची व्याख्या करताना म्हणतो, ज्या पवित्र वस्तूंना ऐहिक जीवनापासून वेगळे केले जाते, आणि ऐहिक जीवनांतून वर्ज्य मानले जाते, त्या पवित्र वस्तुंशी निगडित असलेल्या श्रद्धा आणि विधीची एकात्म व्यवस्था म्हणजे धर्म होय. या व्याख्येचे विश्लेषण केल्यास असे स्पष्ट होते की, धर्म म्हणजे पवित्र मानल्या जाणाऱ्या वस्तुविषयीच्या श्रद्धा आणि विधींची एकात्म व्यवस्था होय. श्रद्धा आहेत आणि त्या पूर्ण करण्यासाठी विधीही आहेत.

मानवाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत जे विविध संस्कार केले जातात त्याला धार्मिक कर्मकांडाची पार्श्वभूमी असते. समाजातल्या रूढी आणि परंपरा धर्मसंस्कारातूनच आकार घेत असतात. तर संस्कारपूर्ण व संस्कारमय जीवन जगण्यासाठी देशकालविशिष्ट रीत म्हणजे संस्कृती, अशी संस्कृतीची व्याख्या केली जाते. संस्कृती ही सर्वसमावेशक संज्ञा असून ती 'धर्म' या संकल्पनेपेक्षा अधिक व्यापक आहे. म्हणून संस्कृतीच्या बृहत वर्तूळात धर्माचे वर्तूळ नांदत असते. यास्तव धर्म आणि संस्कृतीमध्ये अन्योन्य संबंध दृष्टोत्पत्तीस पडतो. अध्यात्म हा धर्माचा जिवंत झरा आहे. अध्यात्म व धर्माच्या उदात्त संकल्पना मानवी जीवामध्ये कार्यप्रवृत्त झाल्यास आदर्श जीवन-व्यवस्था निर्माण होते.

पुण्य व पाप, सन्मार्ग व वाममार्ग, सत्कर्म व दुष्कर्म, न्याय व अन्याय, दया व निर्दयता, लज्जा व निर्लज्जता आणि ईश्वराचे आज्ञापालन व त्याची अवज्ञा हे समान होऊ शकत नाहीत. तसेच या परस्परविरोधी कृत्यांचा परिणामदेखील एकच असू शकत नाही. सत्कृत्याचा परिणाम चांगला व दुष्कर्माचा परिणाम वाईटच असला पाहिजे. पुण्यवानाला बक्षीस आणि पापीला शिक्षा ही मिळालीच पाहिजे. परंतु सर्वसाधारणपणे असे घडत नाही. सत्कर्माला लाभ व बक्षीस तसेच पापाची, दुष्कर्माची शिक्षा मिळतेच असे नाही. असेही घडते की

सन्मार्गी, सदाचारी लोक संकट व त्रास सहन करतात, दु:ख भोगतात, तर वाईट, वाममार्गी लोक चैन व ऐश करतात, मजेत राहतात.

असे का बरे घडते? हे जग अंधेर नगरी तर नाही ना! या जगाचा शासक अन्यायी आहे का? नाही! असे नाही!! आपण पाहतो की, जगातील प्रत्येक वस्तू, ज्ञान, बुद्धिचातुर्य, व अर्थपूर्णतेची साक्ष देत आहे. विश्वाचा शासक, अज्ञात व अन्यायाच्या प्रत्येक स्वरूपापासून पवित्र आहे. अल्लाह लाचार व परावलंबी नाही. तो शक्तिशाली व समर्थ आहे. तर मग हे असे का घडावे? का घडते? वस्तुस्थिती ही आहे की हे जग ज्ञान भाडांरांनी भरलेले असून मानवासाठी ते परीक्षागृह आहे. इथे पुण्य व पाप, न्याय व अन्याय, ईश्वराचे आज्ञापालन व त्याची अवज्ञा, याचे संपूर्ण स्वातंत्र्य आहे. ही कर्माची एक प्रयोगशाळा आहे. येथे मानवास कर्म-स्वातंत्र्य बहाल करण्यात आले आहे. म्हणून मानवाला या जगात शिक्षा किंवा बक्षीस मिळू शकत नाही. याच्या परिमार्जनासाठी परलोकाचे विश्व आवश्यक आहे. तेथे सर्वांना यथोचित न्याय मिळेल. कोणावरही यत्किंचित अन्याय होणार नाही. यासाठी स्वर्ग व नरकाची संकल्पना जन्मास आली आहे. स्वर्ग हे बक्षीसाचे स्थळ आहे, तर नरक के यातनांचे कारागृह आहे.

सूफ़ींनी अंगिकारलेल्या इस्लामजवळ आपले असो वा परके, सर्वांकरिता सदाचार संपन्न व निर्मळ चारित्र्य हाच मापदंड आहे. सर्वांत अवघड गोष्ट म्हणजे न्यायाची प्रस्थापना करण्यास्तव इस्लामचा कडक आदेश हाच आहे की, शत्रूबरोबरदेखील न्याय करा. इस्लामच्या दृष्टीने आदरणीय प्रेषित मुहम्मद स. यांचा पृथ्वीतलावर पाठविण्याचा उद्देश हाच आहे की, जगामध्ये संपूर्ण मानवता न्यायावर प्रस्थापित व्हावी आणि प्रत्येकास कायमस्वरूपी न्याय मिळावा. प्रत्येक मनुष्याच्या अस्तित्वाचा उद्देश हा आहे की त्याने सत्य व सदाचाराची साथ द्यावी, न्याय व चारित्र्य प्रस्थापित करावे, सन्मार्ग व सत्कर्माचे आदेश द्यावे, दुष्कर्म व वाममार्गापासून परावृत्त व्हावे व इतरांनाही करावे. तसेच दुराचाराचा विरोध व नाश करणे हे आहे.

सूफ़ींना अपेक्षित असलेली आदर्श जीवन-व्यवस्था ही नैतिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय बाजू असलेल्या संपूर्ण जीवनाला सदाचारी व चारित्र्यसंपन्न तत्त्वांवर आधारभूत असते. ही व्यवस्था व्यक्ती, समाज व राज्य या सर्वांना अनिवार्य कर्तव्य कर्म म्हणून राबवते. तसेच याची जबाबदारीही लादते की त्यांनी सामूहिकरीत्या वाईटाचा, दुष्कृत्याचा नाश करावा, अन्याय व अत्याचाराचा समूळ नायनाट करावा. त्यापासून पराङ्मुख करावे. न्याय व सच्चारित्र्य प्रस्थापित करून चारित्र्यसंपन्न सदाचाराचा, सत्कृत्याचा प्रचार-प्रसार करावा. इतकेच नव्हे तर अशी आदर्श जीवनव्यवस्था असावी की जी नखशिखांत सदाचार व सच्चारित्र्याच्या तत्त्वांवर उभारलेली असावी. अशी आदर्श जीवन-व्यवस्था पृथ्वीवर कायमस्वरूपी प्रस्थापित व्हावी, अशी सूफ़ींची रास्त अपेक्षा आहे.

एकाच ईश्वरावर, प्रेषित आणि पारलौकिक जीवनावर विश्वास, श्रद्धा ही मुक्तीची गुरूकिल्ली आणि इस्लामच्या भक्कम इमारतीचा पाया आहे. ''उठा व सावध करा'' ७४:२ अल्लाहचे हे जे संबोधन प्रेषित मुहम्मद स. याच्यासाठी आहे, तेच सर्व लोकांसाठी अनुसरणीय व पालनीय आहे. याचा मथितार्थ आहे, उठा आणि लोकांच्या चेतनेला जागृत करा. उठा, जागा व जागे करा, हाच तर तो महामंत्र आहे ज्याला संपूर्ण दिव्य कुरआनचा आत्मा म्हटला जाऊ शकतो. हाच तर आम्हाला नैतिकतेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देतो,

प्रोत्साहन देतो. आम्ही स्वत: उठावे, जागे व्हावे व त्यानंतर दुसऱ्यांना उठवावे, जागे करावे, हेच तर आमचे नैतिक कर्तव्य आहे. (होय.) ''लोकांनो ! आम्ही तुम्हा (सर्वांना) एक नर व एक नारी पासून निर्माण केले आहे, मग तुम्हाला एक दुसऱ्यांना ओळखता यावे म्हणून आम्ही तुमच्या अनेक जाती व संप्रदाय बनवले आहेत. अल्लाहच्या सान्निध तुमच्यापैकी सर्वाधिक आदरणीय तोच होय जो तुमच्यामध्ये सर्वाधिक सदाचरणी आहे. नि:संशय, अल्लाह हा सर्वज्ञ (आणि) बहुश्रुत आहे.'' ४९:१३ म्हणजेच या जगातील सर्व मानव एकाच स्त्री-पुरुषाची संतती होय. यास्तव मानवामानवात भेदभाव मानणे योग्य नव्हे. रंग, रूप, वेष-भूषा, जात, वंश, राष्ट्र, हवामान, भौगोलिक परिस्थितीमुळे जे फरक, प्रकीर्णता, विविधता आढळतात, ते केवळ एकमेकाला ओळखण्यासाठी आहेत. अल्लाहच्या नजरेत सर्व समान आहेत. म्हणून आम्ही सुद्धा सर्वांना समान मानले पाहिजे आणि एका आई-बापाची संतती समजले पाहिजे. याच धारणेला स्थायी बनवून याच्या अनुरूप सर्वांनी आपापसात व्यवहारसुद्धा केला पाहिजे. माणसात श्रेष्ठ व आदरणीय व्यक्ती तीच आहे जिचे चरित्र, आचरण, नैतिकता व प्रामाणिकता मानवीय दृष्टिकोनाने सर्वात श्रेष्ठ आहे. आणि ती सर्वात अधिक अल्लाहवर प्रेम करते व त्याचे भय बाळगते.

सर्व मानव आपसात भाऊ-भाऊ आहेत. कोणीही कुणाशी भांडण वा युद्ध करू नये. यदाकदाचित आपापसात भांडण अथवा युद्ध झालेच तर सर्वप्रथम असा प्रयत्न केला गेला पाहिजे की आपसात तह अथवा समझोता व्हावा. यात यश मिळाले नाही तर ज्याची बाजू खरी असेल, सत्य असेल तिकडे रहा. सत्याच्या बाजूने लढा, युद्ध करा, जेणेकरून सत्याचे व खरेपणाचे रक्षण व्हावे. तुमचे हे कर्तव्य होय की तुम्ही सदैव सत्य व न्यायाचे रक्षण करावे. त्याचे सदैव समर्थन करा. तुमचे युद्ध केवळ शांति स्थापनेसाठीच असावे, एखाद्या अन्य उद्देशाच्या पूर्ततेसाठी नव्हे. न्यायाचा अवलंब करा. निस्संदेह अल्लाह न्याय करणाऱ्यावर प्रेम करतो.

अन्यायाचा बदला घेण्यात काहीच आक्षेपार्ह नाही. आक्षेपार्ह तर त्यांचे कृत्य आहे, ''जे इतरांवर अन्याय करतात आणि भूतलावर कोणत्याही न्याय करण्याशिवाय अराजकता माजवतात. हेच ते लोक आहेत, ज्यांना कठोर शिक्षा होणार आहे.'' ४२:४२ अन्यायाला दृढतेने तोंड द्या. सहनशीलता व क्षमा करण्याच्या नीतीवर चाला, परंतु अत्याचारी, अनाचारी, अन्यायी व जुलूमी लोकांच्यासमोर कदापि गुडघे टेकू नका. त्यांना दृढतेने तोंड द्या. क्षमा व सहनशीलता शक्तिमान लोकांचे अस्त्र आहे, भित्र्या लोकांचे नाही. ''(लोकांनो!) तुमची धनसंपत्ती व तुमची अपत्ये या गोष्टी तुमची कसोटी पाहण्याचे साधन आहेत. तर (श्रद्धावंतांनो!) नेहमी अल्लाहची जाण ठेवून (जीवन व्यतीत करण्यासाठी) प्रयत्नशील राहा. (जे सांगितले जाते ते ) ऐका व आज्ञेचे पालन करा व त्याच्या कार्यासाठी खर्च करा. यात तुमचे स्वत:चे भले आहे.'' ६४:१५-१६ म्हणजे अल्लाहवर प्रेम करणे आणि त्याचा कोप, यातनाचे भय बाळगण्याला आपले पावन कर्तव्य समजून त्यात आपली संपूर्ण शक्ती पणाला लावा आणि आपल्या आत्म्याचा आवाज ऐका. तो मान्य करा व त्याचे पालन करा. आत्म्याच्या उन्नतीसाठी, आत्मकल्याणासाठी आपले धन व शक्ती खर्च करा. आपल्या मनाच्या लोभापासून आपला बचाव करा. असलेच लोक जगात यश प्राप्त करतात.

येथे असा संदेश दिला गेला आहे की ईश्वर (अल्लाह)ची भक्ती करा, स्वकल्याणासाठी आपल्या तन-मन-धनाने कार्यरत रहा आणि आपल्या मनाचा लोभ, मोह, तृष्णा, मद, क्रोध, काम इत्यादी कुप्रवृत्तींना

दृढपूर्वक रोखत रहा. यातच सफल जीवनाचे रहस्य लपलेले आहे. अशा प्रकारचे जीवन जगण्यानेच इहलोकात सुख, शांति व परलोकात स्वर्ग प्राप्त होईल.

ईश्वराचे कथन आहे की ''ज्या लोकांनी श्रद्धा धारण करून चांगली कृत्ये केली, तर अशांना त्यांचा पालनकर्ता आपल्या कृपाछत्राखाली सामावून घेईल, हेच वास्तविक यश आहे. ४५:३० या वास्तविक यशाकडे सरसावणे वा अग्रेसर होण्याचे सर्वात सोपे साधन म्हणजे ईश्वराची उपासना (नमाज) किंवा भक्ती मन:पूर्वक नियमितपणे करत राहणे हे होय. उपासना किंवा भक्तीचा मूळ उद्देश अल्लाहकडे पुढे वाटचाल करणे आहे. याचा आशय अल्लाह, रब्ब (पालनकर्ता) चे गुण स्वत:मध्ये धारण करणे आहे. उपासना (नमाज) दासाला (भक्ताला) अल्लाहशी जोडते. अल्लाहशी जुडण्याचा, भेटण्याचा अर्थ आहे त्याच्या गुणांना आपल्या जीवनात उतरविणे, व्यवहारात दर्शविणे. भक्त उपासनेमध्ये अल्लाहजवळ प्रार्थना करतो की हे माझ्या पालनकर्त्या ! माझ्यात विनम्रता, दया, कृतज्ञता व विनयशीलतेचा संचार कर आणि अहंकार, क्रोध व लोभ यासारख्या महादुर्गुणाचा नाश कर. उपासने (नमाज)च्या माध्यमाने मनुष्याला ती शक्ती प्राप्त होते की ज्या योगे तो अल्लाहच्या मार्गात, नैतिकतेच्या मार्गावर चालू लागेल. शिवाय प्रार्थनेचे – उपासनेचे महत्त्व विशद करताना खुद्द पवित्र कुराण अशी ग्वाही देतो की, ''प्रार्थना (उपासना) कर, (कारण) निर्लज्जतेच्या तिरस्करणीय कृत्यांपासून आणि दुष्कृत्यांपासून प्रार्थना निश्चितच परावृत्त करते.'' २९:४५ व ती ईश्वरी कोपापासून व अवज्ञेपासून माणसास वाचवते.

सृष्टीचा निर्माता परमेश्वरासमोर आत्मसमर्पण करणे हे सच्चे भक्ताचे खरे लक्षण. याची आठवण करून देताना पवित्र कुराण असे निर्दिष्ट करते की, ''हे मुहम्मद स.! सांगा, मला तर हीच आज्ञा (अल्लाहकडून) झालेली आहे की मी स्वत:ला पूर्णपणे त्याला अर्पण करावे.'' ६:१४ मनुष्याची हीच आत्मसमर्पणाची भावना त्याच्या संपूर्ण नैतिकतेचे मूळ होय. आत्मसमर्पणाच्या उत्कर्ष स्वरूपाचा प्रतिध्वनी पुढील कुरआनी श्लोकात असा उमटलेला आहे – ''सांगा, माझी प्रार्थना (नमाज़) तसेच माझ्या सर्व प्रकारच्या उपासना आणि माझा त्याग व माझे जीवन व माझे मरण (सर्व) विश्वाचा विधाता असलेल्या अल्लाहसाठी आहे.'' ६:१६२ उत्कट भक्तीच्या अशा सर्वोत्तम स्वरूपामुळे मानवाची ईश्वराशी जवळीक साधते. त्याला एक उत्तम आदर्श मानव बनवते.

''प्रत्येक व्यक्तीचे एक लक्ष्य असते आणि तो त्या दिशेने पुढे जात असतो म्हणून सत्कर्मे करण्याच्या बाबतीत एकमेकांशी स्पर्धा करा.'' २:१४८ असा प्रेमळ सल्ला परमेश्वराने मानवास दिला आहे, आणि सत्कर्मास आपले लक्ष्य बनविण्याचा आग्रह केला गेला आहे. एखाद्याशी स्वेच्छापूर्वक, नि:स्वार्थ भावनेने, सदव्यवहार करणे नैतिकतेची गरज आहे. परमेश्वर पुन्हा मानवास आठवण करून देतो की, ''लोकांनो! आपल्या विधात्याची उपासना करा ज्याने तुम्हाला आणि जे तुमच्यापूर्वी होऊन गेले आहेत त्यांना निर्माण केले, ज्यामुळे तुम्ही सदाचरणी व्हाल.'' २:२१ हाच पवित्र कुराणचा संदेश 'वसुधैव कुटुंबकम' आहे जो उच्चदर्जाची नैतिकता आणि उदार चेतनेवर आधारित आहे.

'धर्म' म्हणजे नैतिकतेचे विकसित स्वरूप. धर्मामध्ये उपासनेस सर्वोच्च स्थान आहे. उपासना (नमाज) ईश्वराच्या गुलामीबरोबरच शिस्तबद्धता, भक्तिभाव, बंधुत्व, समानता, उत्तमोत्तम आचरण आणि

कर्तव्यपरायणता याची शिकवण देते. उपासनेमुळे बंधुभाव पण निर्माण होतो. ज्या कार्याचा उद्देश मानव व्यक्तित्वाला उजाळणे, प्रगतिपथावर अग्रेसर करून आत्मविकासाच्या सर्वोच्च शिखरावर प्रतिष्ठित करविणे व सत्य स्वरूपांचा बोध करविणे असतो, त्यांना सदाचरण म्हणतात. अध्यात्माची संपूर्ण रचनाच सदाचाराच्या पायावर आधारित आहे. मनुष्याची महानता सदाचाराच्या पालनावर अवलंबून आहे. हीच खरी संपत्ती आहे जिच्या आधारे माणसाला सृष्टीत श्रेष्ठत्व व वर्चस्व प्राप्त झाले आहे. सृष्टीचा मुकुटमणी असण्याचा गौरव त्याला लाभला आहे. या गौरवास पात्र ठरण्यासाठी मानवास उपरोक्त आदर्श जीवनव्यवस्था अंगिकारणे अत्यंत आवश्यक आहे.

### ६) ईश्वर, जग व मानव यासंबंधाच्या ख्रिश्चन प्रज्ञानाचे थोर विचार[५२]

**अ) ईश्वर** – ज्या दृश्य व अदृश्य वस्तूंनी हे विश्व बनले आहे त्या सर्वांचा ईश्वर हा एकमेव स्रष्टा होय. ईश्वर हा सर्वज्ञ व सर्वशक्तिमान असल्याने त्याने हे जग शून्यांतून निर्माण केले आहे. ह्याचा अर्थ असा की, पूर्वी अस्तित्वात असलेले कोणतेही द्रव्य, आकार किंवा साधने यांच्या मदतीशिवाय त्याने हे जग निर्माण केले आहे, म्हणजेच प्रत्येक वस्तू ईश्वराचा स्वत:चा अंश असते व ईश्वरात सहभागी असते. ईश्वराने हे जग मुक्त अशा स्वेच्छेने घडविले आहे, म्हणजेच त्याने जग हे कोणत्याही अपरिहार्यतेतून किंवा गरजेतून निर्माण केलेले नसून, ते केवळ त्याच्या आज्ञापक शब्दाच्या सामर्थ्यांतून निर्माण झाले आहे. (इस्लामी सूफी तत्त्वज्ञानाची धारणा पण अशाच स्वरूपाची आहे.) त्याच्या याच कार्यपद्धतीने तो जगाचे संगोपन करतो व सर्व वस्तूंना त्यांच्या नियत उद्दिष्टाप्रत नेत असतो. तो वस्तूंना चांगल्या व वाईट कृत्यांचा योग्य तो मोबदला मिळेल अशारीतीने त्यांच्या नियत उद्दिष्टांना पोहोचवितो. त्याचे कारकत्व सर्व प्राणिमात्रांना पूर्णतया निर्माण करत असल्याने तो त्यांचे केवळ निमित्त कारण म्हणून त्यांच्या अतीत राहत नाही, तर तो त्यांचा गूढतम अंत:प्रेरक असतो व त्याच्याशिवाय प्राणिमात्र एक क्षणभरसुद्धा जगू शकत नाही.

ईश्वर हा त्याच्या स्वत:पुरता पाहिल्यास सर्व प्रकारच्या शुद्ध पूर्णतांनी परिपूर्ण असतो. तो एकमेव, अद्वितीय, असंकीर्ण किंवा निर्गुण असतो व त्याच्यासारखा किंवा त्याच्याहून श्रेष्ठ असा दुसरा कोणीही नसतो. यामुळेच आपण देवत्व, सारतत्त्व, बुद्धी, शक्ती, प्रेम यासारख्या भाववाचक नामांनी त्याचे यथार्थपणे वर्णन करू शकतो आणि त्याचप्रमाणे आपण त्याला ईश्वर, सत्ता, सर्वप्रज्ञावंत, सर्वशक्तिमान, सर्वप्रेममय अशा मूर्त संज्ञा देऊ शकतो. शिवाय कसे तरी करून त्याची पूर्तता दाखविण्यासाठी ईश्वराची अनेक नावे आपण वापरली पाहिजेत. अशा नावांत प्रमुख नावे आहेत ती अशी – सत्ता, चिन्मय, सत्य, शिव, आत्मबोध, आत्मसंकल्पक, आत्मप्रेमी, सुंदर, सुखी, शक्तिमान आणि यांच्याशी संवादी अशी जी सापेक्षपदें आहेत जी जिवंत प्राण्यांच्या संदर्भात वापरावयाची असतात. इतके करूनही पार्थिवतेतून निर्माण झालेली कोणतीही संकल्पना किंवा कोणताही शब्द या अनंत व अतुलनीय चैतन्याचे यथार्थपणे व्यक्तीकरण करू शकत नाही, आणि या अर्थाने ईश्वर हा अवर्णनीय महत्तमच राहतो व त्याचे प्रत्यक्ष ज्ञान झाले नाही तरी ''ईश्वर जे नाही ते जेव्हा कळते तेव्हा तो आपणास उत्तमपणे समजतो.'' ईश्वराला बव्हंशी पुढील अभाववाची पदें वापरण्यात येतात – अनंत, अपरिमित, अनिर्मित, सनातन (अकालिक), अपरिवर्तनीय.

ईश्वराच्या आत्मजागरूकतेची पूर्णता व आत्मप्रेमाचे सुख इतके विशाल असते की, त्याच्या अस्तित्वाच्या ऐक्यात पिता, पुत्र व पवित्र आत्मा या तीन व्यक्तींची तो त्रिमूर्ती असतो. पित्यापासून पुत्र किंवा शब्द शाश्वतपणे स्रवत असतो, परंतु तो कारणसंबंधांतून नव्हे तर केवळ शुद्ध बौद्धिक कोटींतून निपजतो. कारण कारणसंबंधाला ईश्वरामध्ये स्थान असू शकत नाही. उपपत्तीच्या सर्व प्रक्रियेत पित्यापासून अपत्य निर्माण होताना अपत्याच्या ठिकाणी जनकाचे गुणधर्म यावयास पाहिजेत. भौतिक निर्मितीच्या बाबतीत अशा गुणधर्मांचे एकरूपत्व दोघांमध्ये वेगळेपणाने दिसते, पण दैवी व बौद्धिक निर्मितीत हे एकरूपत्व पूर्ण असण्यासाठी त्यांच्या स्वभावाचे केवळ एकरूपत्वच असू शकते. जनक व जनित ह्या दोघांचे सारच समान असते. जरी संख्येच्या दृष्टीने ते दोन भिन्न असले तरी ते एकच दैवी वस्तू असतात. त्यांचा संख्यात्म भेद हा केवळ त्यांच्या संबंधांच्या (पिता-पुत्र) द्वित्वामुळे असतो, आणि अरस्तू (ॲरिस्टॉटल) पासून ही गोष्ट विख्यात आहे की, संबद्ध पदांच्या सत्यतेमध्ये संबंध हा स्वत: काहीही भर घालत नसतो किंवा काहीही कमी करत नसतो. पुत्राला शब्द (लोगोस) असेही समजतात. कारण ही आध्यात्मिक निर्मिती समजण्यासाठी मन हे स्वत:स शब्दांद्वारा व्यक्त करते. हा सर्वात जवळचा दृष्टांत आपणास वापरता येईल. ज्या अर्थी ईश्वर हा पूर्ण आत्मविज्ञापनाच्या गुणाने ओळखला जातो त्याअर्थी तो आपल्या शाश्वतेत स्वत:ला पूर्णपणे व्यक्त करत असतो, म्हणजे स्वत:स व्यक्त करत असतो तेव्हा तो पूर्णपणे देवता असतो व तितकाच तो स्वत:स व्यक्त केल्यावरही दैवी असतो. त्याचे पूर्णत्व निरपेक्ष असण्यासाठी त्याचे आविष्करण हे संपूर्ण व असाधारण असावयास पाहिजे, आणि म्हणून त्याचा शब्द हा त्याचा 'निर्मित एकुलता एक पुत्र' असला पाहिजे.

ज्या अर्थी ईश्वर हा आनंदपूर्ण प्रेम व तसेच आत्माश्रयी चैतन्य असतो त्या अर्थी पिता व पुत्र यांच्या परस्पर पूर्ण प्रेमापासून त्यांच्या प्रेमाचे 'पवित्र आत्मा' नावाचे समसाररूप असलेले असे असाधारण पद संभवते.

ह्या तिघांचे एकांत वर्णन करून सांगण्यासाठी ख्रिश्चन लोकांनी 'व्यक्तीच्या' कल्पनेचा उपयोग करून घेतलेला आहे, व ती कल्पना 'बुद्धिस्वरूपी संपूर्ण सुस्पष्ट आत्माश्रयी तत्त्व' अशा रीतीने समजली जाते. या अर्थाने ईश्वर हा केवळ निर्विशेष पूर्ण असतो व त्याच्या अंतर्गत तीन पुरुष एकरूप झालेले असतात. हे पुरुष ईश्वराची अंगे असू शकत नाहीत, कारण जे अविभाज्य असते त्याला स्वत:ला अंगे असू शकत नाहीत. केवळ आपल्या अपूर्ण ज्ञानाच्या संदर्भात तशी अंगे असू शकतात, पण वस्तुत: ते तीन पुरुष (व्यक्ती) असतात.

येशू ख्रिस्त हा मूर्तिमंत शब्द आहे. तो खरा मानव व खरा ईश्वर आहे. तो या दोन स्पष्ट रूपांत एक दैवी पुरुष आहे. तो स्रष्टा व सृष्टी प्राणी यांच्यातील पूर्ण मध्यस्थ ('बर्ज़ख़') आहे. त्याची ती दोन रूपे एकमेकात मिसळत नाहीत किंवा एकीभूत होत नाहीत. त्याचे मानवी व दैवी रूप यांच्या प्रगाढ ऐक्यांत पूर्णत: अतीत व अपरिवर्तित राहते, त्याच्या दैवी स्वरूपाच्या शाश्वत अस्तित्वाच्या आधारानेच आणि त्याच्यामार्फतच त्याचे मानवी रूप अस्तित्वात राहते.

ईश्वर व ख्रिस्त यासंबंधीची ही मूलभूत शिकवण रोमन कॅथॉलिक व तथाकथित 'सनातनी पौर्वात्य' चर्चेस ह्यांना समायिकरीत्या मान्य आहे. मात्र ख्रिस्ताच्या कल्पनेसंबंधी ज्यांचा मतभेद आहे असे काही अल्पसंख्य नेस्टोसिअन्स यात समाविष्ट होत नाहीत. ॲँग्लिकन्स्ना ही शिकवण सर्वसाधारणपणे मान्य आहे, परंतु प्रॉटेस्टंट पंथांत जी परिवर्तने झाली त्यांचा ॲँग्लिकन्सवर काहीसा परिणाम झाला आहे. ते त्रिमूर्तीचा (ऐक्यतत्त्वाचा)

अस्वीकार करतात, ईश्वराची संपूर्णतः स्वतंत्र सत्ता आग्रहाने प्रतिपादन करत राहतात, त्यामुळे ईश्वरासंबंधी कोणत्याही तात्त्विक विचारांना प्रतिबंध होतो. ('बर्थिझम' हे याचे एक उदाहरण आहे.) तसेच कॅलिव्हनिझममध्ये ईश्वरी प्रज्ञानाला संक्षेप देऊन त्याच्या निरंकुश इच्छाशक्तीवर भर दिला गेला आहे. ख्रिस्तासंबंधी विचार प्रकट करताना त्याचे अस्तित्व कोणत्या स्वरूपाचे आहे, ते मूलभूत सत्तारूप आहे का पुरुषप्राय व्यक्तिरूप आहे, असे प्रश्न ते टाळतात आणि तात्त्विक संकल्पनांच्या परिभाषेत निश्चित काहीही म्हणत नाहीत. मात्र धर्मग्रंथात ईश्वराचा पुत्र, मानवाचा पुत्र, स्वामी आणि प्रेषित ह्या ज्या ख्रिस्तासंबंधी अनेक संज्ञा वापरलेल्या आहेत, त्यामात्र त्यांना मान्य आहेत. मात्र त्यांचे प्रेषित ह्या ज्या ख्रिस्तीसंबंधी अनेक संज्ञा वापरलेल्या आहेत, त्यामात्र त्यांना मान्य आहेत. मात्र त्यांचे परंपरावादाशी जे प्रमुख मतभेद आहेत ते माणसे व ख्रिस्त ह्यांच्यात जे प्रत्यक्ष ऐक्य आहे त्या बाबतीत आहेत. मानवाचे ईश्वराशी ऐक्य, ल्यूथर मानतो त्याप्रमाणे कोणत्याही कर्माशिवाय केवळ श्रद्धेने कॅल्व्हिनच्या मताने संपूर्ण पूर्वनियतीच्या, पाएटिस्टांना अभिप्रेत असल्याप्रमाणे संस्कार न घडविता केवळ नीतीच्या मार्फत किंवा रिव्हायव्हलिस्टपंथ मानतो त्याप्रमाणे आकस्मिक ईश्वरी हाक आणि साक्षात्कार वगैरेंच्या मार्गांनी प्राप्त करून घेता येते.

**ब) विश्व –** विश्व हे ईश्वराशी समकक्ष अशी निरूपाधिक अंतिम सत्ता नव्हे. उलट विश्व हे स्वतःच्या संपूर्ण अस्तित्वासाठी सर्वज्ञ व सर्वशक्तिमान अशा सद्‌वस्तूंना अशा सद्‌वस्तूंवर अवलंबून असलेले असे एक अनिरुद्ध सर्जन होय. म्हणून त्याचे सत्यत्त्व हे संपूर्णतः सापेक्ष आहे. कारणता ही समानता व भेद हे दोन्ही व्यंजित करत असल्याने सर्जनातून स्रष्टा व्यक्त होत असतो, परंतु तो केवळ अपूर्ण अर्थाने. विश्व हे एखाद्या उपाधीप्रमाणे ईश्वराला व्यक्त करते, त्याप्रमाणे झाकूनही टाकते. ते आपल्या मते सान्त, शुद्ध व अजड असे आत्मे आणि मनुष्यप्राण्यापासून ते थेट निर्जीव पदार्थांपर्यंत सर्व जड पदार्थांना सामावते. विश्व हे ईश्वरावर केवळ त्याच्या निर्मितीकरिताच अवलंबून असते असे नाही, तर त्याचे सातत्य, पूर्ति व अंत यासाठीही ते ईश्वरावर अवलंबून असते. याप्रमाणे ईश्वर हा त्याच्या संगोपक आणि नियामक व कारक शक्तींनी विश्वात सर्वत्र प्रगाढ रीतीने व्यापून राहिलेला आहे. ईश्वर हा विश्वाच्या अंतर्यामी आहे व तो विश्वांतील प्राणिमात्रांच्या त्यांच्या विशिष्ट अंतर्गत नियमांच्या अनुरोधाने, त्याची परिपूर्णता गाठण्याच्या दिशेने त्यांच्यांत सतत विकास घडवून आणीत असतो. अशा रीतीने ईश्वर प्रत्यक्षपणे अशिव निर्माण न करताही (भौतिकतेच्या अस्तित्वामार्फत) भौतिक अशिव या विश्वात राहू देतो, त्याचप्रमाणे जे नैतिक अशिव निर्माण केलेल्या जीवांच्या स्वतंत्र इच्छाशक्तीपासून उत्पन्न होते, ते नैतिक अशिवही या जगात तो राहू देतो. ईश्वर हा दोन्ही अशिवांचा संपूर्ण विश्वाच्या कल्याणासाठी उपयोग करून घेऊ शकतो.

**क) मानव –** सर्वात श्रेष्ठ प्राणी बुद्धिमान असतो, व तो म्हणजे मानव. त्याचा बौद्धिक आत्मा हे चित्तत्व (स्पिरिट) असते व तेच सर्व जडाला चैतन्य पुरविणारे असे त्याचे साररूप असते. मानवामध्ये आध्यात्मिक व अमर अशा आत्म्याचे संप्रवेशन होत असल्याने मानवाच्या ठिकाणी हक्क व कर्तव्ये याची क्षमता निर्माण होते, आणि त्यांचा स्वतंत्रपणे व जबाबदारीने त्याने पाठपुरावा करावयाचा असतो. याप्रमाणे पूर्णाच्या सेवेसाठी केवळ साधन न बनता मानव स्वतःच स्वतःचे उद्दिष्ट बनतो व तो स्वतःकरिताच ईश्वराचाही आवडता बनतो. ह्यामुळे त्याला एक प्रकारची प्रतिष्ठा प्राप्त होते, व तिच्यामुळे 'मानव हा ईश्वराच्या प्रतिमेप्रमाणे घडविलेला आहे' असे

म्हटले जाते. त्याच्या या प्रतिष्ठेस अनुरूप होण्यासाठी त्याने नैतिक नियमांचे पालन केले पाहिजे. मानव-व्यक्तींच्या स्वभावात जी आध्यात्मिकता अनुस्यूत असते व जी त्याच्या शारीरिकतेवर अधिराज्य चालविते, तिचे एक अपरिहार्य व्यक्तीकरण म्हणजे नैतिक नियम होत. याप्रमाणे मानवाने आपले विचार व कृती यांमध्ये सर्वश्रेष्ठ अंतिम सत्ता जो ईश्वर तोच आपला स्रष्टा, स्वामी व अंतिम अर्थ किंवा श्रेय आहे हे मान्य केले पाहिजे. त्याचप्रमाणे इतर माणसे ही स्वत:च अंतिम उद्दिष्टे आहेत असे समजून, त्यांच्याविषयी आदर व प्रेम बाळगले पाहिजे. आपल्याप्रमाणेच त्यांना जगण्याचा, निकोप आरोग्य ठेवण्याचा, स्वत:च्या गरजा भागविण्यासाठी भौतिक वस्तू संपादन करण्याचा, सुव्यवस्थित शांतता, स्वातंत्र्य व सत्य अनुभविण्याचा हक्क असतो व ते प्रत्येकाने इतरांच्या बाबतीतही उचलून धरला पाहिजे. कुटुंबापासून राज्यसंस्थेपर्यंत प्रत्येक सामाजिक पातळीवर योग्य प्रमाणात कारभार करण्याचा प्रत्येकास हक्क असला पाहिजे. अधिक जागतिक कल्याणाकरिता प्रत्येक मानवाने सत्याचा व इतर मूल्यांचा त्यांच्या अधिकृत उच्चनीच श्रेणींमध्ये पाठपुरावा करावयाचा असतो. श्रेष्ठ नैतिक मूल्यें ज्या वेळी धोक्यात असतात, तेव्हा सर्व प्रकारच्या अशिवांच्या विरुद्ध जरूर पडल्यास स्वत:चे जीवित धोक्यात घालूनही झगडा केला पाहिजे. कोणत्याही नैतिक नियमांच्याविरुद्ध होणारे कोणतेही पाप हे ईश्वराविरुद्ध केलेला गुन्हाच असतो असे मानले पाहिजे, कारण ईश्वर हा मानवाच्या स्वभावाचा व म्हणून नीतीचा निर्माता असतो. पश्चात्ताप व क्षमाशीलता हे थोर गुण आहेत, परंतु ईश्वर त्यांचा अतिरेक करत असतो व त्यांच्यामार्फत आपल्या अमर आत्म्यास अध:पतनापासून वाचवू शकतो.

मानवी ज्ञानात संवेदनशीलता व बुद्धिनिष्ठा यांचा मिलाफ असतो. आपली ज्ञानेंद्रिये आणि बुद्धी यांचा उपयोग करून स्वत:संबंधीचे आणि जग व ईश्वर यांसंबंधीचे ज्ञान तो वाढवू शकतो. हे त्याचे ज्ञान तर्कशुद्ध, साधार, चिकित्सापूर्ण व वास्तव असते, पण सदैव अपूर्ण असते. ह्या ज्ञानास पुष्टी देण्यासाठी तो ख्रिस्ताच्या ठिकाणी ईश्वराचे जे अधिकृत आविष्कारण झालेले होते, त्याला स्वत:च्या अनिर्बंध पण बुद्धिनिष्ठ श्रद्धेची अनुमति देऊ शकतो. आनंदगर्भ अंतर्ज्ञानाच्या साहाय्याने जेव्हा मानवाचा आत्मा स्वत:मध्ये ईश्वर व जगातील सर्व वस्तू पाहू शकेल, तेव्हा त्याची खरी नियति प्राप्त करून घेण्याची शक्यता त्याला सापडेल. यामागे ईश्वराची आत्मजागृती आणि शाश्वत आत्मनियंत्रण यात त्याला सहभागी होता येईल.

**ड) उपसंहार –** मनुष्य हा स्वभावत: या जगात ईश्वराच्या संभाव्य आत्मप्रकटनाकडे साक्षात्कारांमार्फत जाण्यास मोकळा असतो व तो गतिमानपणे त्याकडे झुकत असतो, आणि मरणोत्तर तो आनंदमय दिव्य दृष्टीच्या मार्गे त्या दिशेने जात असतो. मानवाची गूढतम व अतिव्यापक इच्छा ही त्याच्या प्रत्यक्ष आवाक्याच्या बरीच बाहेर जाते. ती अस्तित्वाच्या पूर्णतेपर्यंत जाऊन भिडते. पण माणसाची ही जन्मजात इच्छा त्याच्या संपूर्ण गतिमानतेचे प्रमुख उगमस्थान असल्याने, ती असाध्याची इच्छा राहत नाही, तर ती उलट निश्चित अशा प्राण्याची इच्छा असते. मानव हा खरोखर अशा मर्मदृष्टीस पात्र असतो. आधी मानवाच्या श्रद्धेने व नंतर त्याच्या अंतर्ज्ञानाने मानवाची ईश्वरास प्राप्त करून घेण्याची जी इच्छा असते, ती तृप्त करण्याचे ईश्वर मुक्तमनाने ठरवू शकतो.

### ७) ईश्वर व जगत् – दार्शनिक सिद्धान्तांच्या दृष्टिकोनातून

ईश्वर व जगत् यांच्या संबंधास अनुलक्षून केवळ जडवाद (उदा. मार्क्सवाद) आणि शून्यवाद या दोन एकांतिक भूमिकांमध्ये इतिहास आपणास विविध रंगांच्या छटा असलेल्या अनेक भूमिका सादर करतो. त्यांचा

अंतर्भाव प्रत्येकीच्या स्वत:च्या उपभेदांनी युक्त अशा आठ प्रमुख भूमिकांमध्ये करता येईल.

**१) सर्वेश्वरवाद** – या मतानुसार ईश्वर व जगत् यांचे मूलभूत ऐक्य आहे. या मतात जगाची आवश्यकता आणि ईश्वराचे स्वगतभेद्युक्त व परिणामी स्वरूप ही ध्वनित होतात.

**अ) स्थित्यात्मक सर्वेश्वरवाद** – झेनो फेनीस व डिनँडचा डेव्हिड यांना मान्य असलेल्या परंतु विशेष प्रचलित नसलेल्या या मतानुसार ईश्वर विश्वातील सर्व जीवाची समष्टी आहे.

**आ) विकासवादी सर्वेश्वरवाद** – या मताप्रमाणे विश्वाचा विकास ईश्वरी स्वरूपाच्या दृष्टीने आंतरिक आहे. यातही पुन्हा विषयवादी व चिद्वादी असे दोन भेद आहेत. विषयवाद्यांच्या मते ईश्वर नानात्वापन्न सत् आहे, तर चिद्वाद्यांच्या मते तो आत्मविकसनशील चित् किंवा चेतनाशक्ति आहे. हेरॉक्लिटस, स्पिनोझा, स्टोइकपंथीय आणि वल्लभपंथीय हे प्रथम मताचे आहेत, तर हेगेल, फिश्ट, शोपेनहॉवर, हार्टमन, ब्रॅडले आणि अधिकांश महायान बौद्धमत दुसऱ्या मताकडे झुकणारे आहेत.

**२) निस्सरणवाद** – या मतानुसार जगत् हे ईश्वरस्वरूपातून स्वाभाविक आवश्यकता या रूपाने बहि:सृत होणाऱ्या निस्सरणांच्या उतरत्या श्रेणींमधून निष्पन्न होते, तथापि हे सर्व घडत असताना ईश्वराचे केवळ अतीतत्व अक्षुण्ण राहते. प्लेटो या मताचा आहे असे काहीजण मानतात. प्लॉटिनस, ऑरिजेन, इब्न सीना, भर्तृहरि, मंडनमिश्र, निंबार्क आणि इतर भेदाभेदवादी व व्यूहवादी या मताचे आहेत.

**३) विभुत्ववाद किंवा अर्धेसर्वेश्वरवाद** – हा सिद्धान्त नव्हे तर हे नाव क्राऊस यांच्यापासून मिळाले आहे. या मताप्रमाणे जगत् ईश्वर आहे खरे, परंतु तत्त्वत: ईश्वर हा जगातातील आहे आणि तो निराळ्या विश्ववस्तूंनी युक्त असाही असू शकतो. शेलिंग व शेलरचे नंतरचे मत, फेश्नर, लेकियर, व्हॅरिस्को, ब्राइटमॅन, जे.रॉइस, मुहम्मद इक्बाल, काही उपनिषदे, रामानुज, लीलावादी हे या मताचे पुरस्कर्ते होत.

**४) विधातृवाद किंवा निमित्तकारणवाद** – या मतात ईश्वराची सामान्य–निमित्त–कारण या रूपाने कल्पना करण्यात येते. असा हा ईश्वर नित्य अतएव पूर्वत: अस्तित्ववान असलेल्या जडद्रव्यास बुद्धिपूर्वक विशिष्ट भेदयुक्त करतो, आणि मग अशा प्रकारे निष्पन्न होणाऱ्या जगावर किंवा पुन्हा पुन्हा होणाऱ्या जगतावर सुव्यवस्थितपणे शासन करतो. या शास्त्या 'ईश्वराची' विभिन्न विचारकांनी विभिन्न रूपांनी कल्पना केली आहे. प्लेटो त्यास 'ईशात्मा' म्हणतो. ॲरिस्टॉटल त्यास 'आकर्षक ध्रुव' म्हणतो, नैयायिक त्यास 'ईश्वर' म्हणतात, भागवत व बरेचसे शैव त्याला 'ईश्वर' आणि 'उध्दर्ता' म्हणतात, तर माध्व याला 'निरपेक्ष प्रेरक' व 'अंतर्यामी पथप्रदर्शक' म्हणतात.

**५) शाक्तमत** – या मतात एका परमतत्त्वाची दोन रूपे मानण्यात आली आहेत– एक अतीत, निष्क्रिय, आधाररूप शिवसंज्ञक ईश्वर आणि दुसरे, त्याची मुख्य तत्त्वामिका, सर्वान्तर्यामी, सर्वव्यापिनी शक्ति दुर्गादेवी, जिच्यामुळे विश्व उदयास येते व विकास पावते आणि जिच्या कृपाप्रसादेकरून जीव बंधमुक्त होऊन शिवैक्य प्राप्त करून घेतात. शाक्त मताचे (विशेषत: श्रीकंठ यांचे) निस्सरणवादाशी बरेच साम्य आहे. विज्ञानभिक्षु या मताचे पुरस्कर्ते आहेत.

**६) द्विकारणतावाद** – या मतानुसार जग हे स्वतंत्र आणि विरुद्ध तत्त्वांनी जन्य आहे. मानीच्या संप्रदायानुसार ही तत्त्वे साक्षी व प्रकाशरूप सुष्ट–तत्त्व आणि जड द्रव्य व अंधकार रूप दुष्ट तत्त्व ही होत. तर

झरतुष्ट्र धर्माप्रमाणे ही तत्त्वे आहुरमज्दसंज्ञक प्राज्ञ ईश्वराची जुळी मुले होत. ती म्हणजे १) शुभाची निवड करणारा स्पेंटामैन्यू व २) अशुभाचे वरण करणारा आंग्रमैन्यू.

**७) सृष्टिवाद –** या मतात एकमेव ईश्वरच जगत्कारण होय. केवळ व अखंडपूर्णता हे ईश्वराचे स्वरूप असल्यामुळे जगद् व्यापारामुळे त्याच्यात कोठलेही स्वगतभेद किंवा परिणाम घडून येत नाहीत. अज्ञेय व अनुपादान असल्यामुळे तो सर्वथैव अपरिवर्तितच राहतो. याप्रमाणे ईश्वर हा जगाच्या अतीत परंतु त्याचबरोबर चित् अंतर्यामी व सर्वव्यापी कारणही आहे. विश्वांतील चित्–जड–समष्टीची उत्पत्ति व स्थिती त्याच्यापासूनच होते. तोच सर्व जीवांचा प्रेरक व शास्ता असून तोच सर्व परमार्थप्रवण जीवांना ईश्वराशी अनुभवात्मक ऐकरूप आनंदमय अंतिम ध्येयप्रत नेऊन पोहोचवितो. सृष्टिवादात ईश्वर सर्वज्ञ व सर्वशक्तिमान असे निमित्त–कारण आहे, तोच पूर्णादर्शरूप कारण आहे, आणि तोच जीवमात्राचे पूर्णत्वप्रदायक असे अंतिम कारण ही आहे. सर्व जीवांचे उपादान कारणही तोच आहे, कारण त्यांच्या सत्तेची समष्टि त्यानेच घटित आहे. ऑगस्टीनचे तर या बाबतीत सूत्र असे की, 'तो त्यांच्या आंतरतमापेक्षाही आंतरतर आहे आणि त्यांच्या उच्चतमापेक्षाही श्रेष्ठतर आहे.' याप्रमाणे सर्व जीवांचा एकच आणि अनुगत असा परमात्मा आहे. सेंट पॉलचे या बाबतीत सूत्र असे की, ''एकमेव ईश्वरच जीवांचे उगमस्थान होय, या ईश्वरातच ते जगतात, यातच ते चलनवलन करतात, व यातच ते स्वतःचा अस्तित्वभाव प्राप्त करतात.''

**अ) आवश्यक सृष्टिवाद –** यातही दोन मते आहेत १. इब्न रूश्द व लॅटिन ॲव्होरेवाद्यांच्या मते ईश्वर खुद्द आपल्या स्वरूपाच्या आवश्यकतेस अनुसरूनच सृष्टि करतो, तर २ मालब्रांश, लायब्निझ, ए. गुंथर, जी. हर्मिस यांच्यामते लायब्निझ ज्याला सर्व शुभवाद किंवा आशावाद म्हणतो या प्रकारच्या नैतिक आवश्यकतेस अनुसरूनच ईश्वर सृष्टीची रचना करतो.

**आ) स्वतंत्र सृष्टिवाद –** या मतानुसार ईश्वर सृष्टि निर्माण करणे किंवा न करणे याबाबतीत अथवा हे जग किंवा दुसरे कोणतेही जग निर्माण करण्याच्या बाबतीत पूर्णपणे स्वतंत्र आहे. मात्र यात अंतर्विरोध असता कामा नये. अतएव सृष्टीची उत्पत्ति एकमात्र ईश्वराच्या स्वतंत्र संकल्पमूलक आज्ञेपासूनच निष्पन्न होते. काही उपनिषदे, भागवत् गीतेचे एक विवरण, शंकराचार्यांचे अप्रक्षिप्त असे प्रमाणित ग्रंथ, उत्तरकालीन यहूदी मत, मुस्लिम धर्मतत्त्वज्ञ, ख्रिस्ती धर्म व अधिकतर ख्रिस्ती आचार्य, विशेषतः ऑगस्टीन, ॲक्वायनस, देकार्त तसेच कबीर आणि संभवतः गुरू नानकही या मताचे पुरस्कर्ते होत.

**८) अविश्ववाद किंवा मायावाद –** या सिद्धान्ताच्या काही पुरस्कर्त्यांच्या मते ईश्वराचे अस्तित्व एकमेवद्वितीय असल्यामुळे त्यात कुठल्याही तऱ्हेच्या द्वैतभावास अवकाशच संभवत नाही, म्हणून भासमान संपूर्ण जग भ्रमात्मक असून कोणत्याही प्रकारची द्वैतात्मक जीवभावाची जाणीव अविद्यामूलक होय. या सिद्धान्तात उद्भवणाऱ्या परस्पर विरोधांचे निराकरण अनिवर्चनीयवादाचा अवलंब करून करण्यात येते. पार्मेनायडीस, शंकराचार्यांचे नंतरचे शिष्य, विशेषतः प्रकाशानंद व योगवासिष्ठ, गौडपादाचार्यांचे एक विवरण या मताचे पुरस्कर्ते होत.

१७



प्रकरण १७

# मानव-देह-विज्ञान[५३] : दार्शनिक दृष्टिकोन

### १) नरदेह-वंदन : नरदेहस्तवन

मानवाचे देह आणि आत्मा हे दोन घटक आहेत. देह हा त्याचा दृश्य घटक आहे तर आत्मा अदृश्य. प्रथम देहाचे स्वरूप सविस्तर पाहू या. धन्य आहे हा नरदेह! जरा याची अपूर्वता तरी पाहा! परमार्थाच्या उद्देशाने जे काही केले जाते, त्या सर्वाची सिद्धी याच्याद्वारे होते. या नरदेहाद्वारेच काही लोक भक्तीमध्ये मग्न असतात, तर काही परम वीत-राग होऊन गिरि-कंदरेमध्ये निवास करतात. काही लोक तीर्थाटन करतात, काही पुरश्चरण करतात, तर काही निष्ठावान बनून अखंड नाम-स्मरण करतात. कोणी तपस्या करतो, कोणी महा योगाभ्यासी बनतो, तर कोणी वेद-शास्त्रांचा अभ्यास करून महा पंडित बनतो. कोणी हठयोग करून आपल्या शरीरास यातना पोहोचवितो, तर कोणी भाव-बळाने ईश्वराची प्राप्ती करून घेतो. कोणी प्रसिद्ध महापुरुष बनतो, कोणी विख्यात भक्त बनून जातो, तर कोणी सिद्ध बनून अकस्मात आकाशामध्ये विहार करू लागतो. कुणी तर तेजामध्ये मिसळून स्वत: तेजस्वरूप बनला, कुणी पाण्यात मिसळून जलमय बनून गेला, तर कोणी पाहता-पाहता वायूसारखा अदृश्य बनून गेला. कोणी अनेक रूप धारण करतो कोणी पाहता-पाहता लुप्त होतो, तर कोणी बसल्या-बसल्या अनेक ठिकाणी आणि समुद्रांमध्ये भ्रमण करतो. कुणी प्रेतावर स्वार होतो, कुणी निर्जीवास चालावयाला लावतो, तर कुणी आपल्या तपोबलाने मृतास जिवंत करतो. कुणी अग्नीला थंड बनवितो, तर कुणी लोकांच्या प्राण-वायूस रोखून धरतो. असे असंख्य सिद्ध हठ-निग्रही आणि कृतबुद्धी होऊन गेले आहेत की ज्यांना नाना सिद्धी प्राप्त झाल्या होत्या. कोणी नवविधाभक्तिच्या राजमार्गाचे मार्गस्थ बनून परमार्थाचे साधक बनले, तर कोणी योगी गुप्त मार्ग आक्रमण करून ब्रह्म-भुवनास पोहोचले. कोणी वैकुंठास गेले, तर कोणी सत्यलोकामध्ये राहून गेले. कोणी नक्षत्रामध्ये जाऊन बसले, तर कोणी क्षीरसागरामध्ये. सालोक्य, सामिप्य, सारूप्य आणि सायुज्य या चारी प्रकारच्या मुक्तींचा ते मनासारखा उपभोग घेतात. असे अनेक सिद्ध, साधू आणि संत आपल्या हितामध्ये मग्न आहेत. ज्या नर-देहाची अशी ख्याती आहे, त्याचे कशारीतीने वर्णन करता येईल! या नरदेहाच्या कृपेमुळे अनेकांना उत्तम पदप्राप्त झाले आणि अभिमानाचा त्याग करून आत्मानंदमुळे ते सुखी झाले. सर्वत्र असे म्हटले गेले आहे की पशू-देहामुळे मुक्ती मिळत नाही, म्हणूनच नर-देहापासून परलोक प्राप्त होतो. संत, महंत, ऋषी, मुनि, सिद्ध, साधू, समाधानी, भक्त, मुक्त, ब्रह्मज्ञानी, विरक्त, योगी, तपस्वी, तत्त्वज्ञानी, योगाभ्यासी, ब्रह्मचारी, दिगंबर, संन्यासी, षड्दर्शनी, सर्वजण याच

नरदेहापासून होऊन गेलेले आहेत. म्हणून नरदेह सर्व देहांमधून श्रेष्ठ आणि महान आहे. नर–देह स्वाधीन आहे. तो सहसा पराधीन होत नाही. परंतु याला परोपकारामध्ये गुंतवून जगामध्ये कीर्ति मिळविली पाहिजे. नरदेह आपल्या इच्छेने (स्वेच्छेने) भले राहो अथवा न राहो, परंतु अन्य कोणी याला बंधनामध्ये बांधू शकत नाही. नरदेह जर पांगळे बनले तर ते कुचकामी बनेल, आणि जर ते लुळेच असेल तर त्याच्याने परोपकार घडणार नाही. जर ते अंध असेल तर निरर्थक आहे आणि जर कर्णबधिर असेल तर त्याच्याने निरूपण होऊ शकणार नाही. जर ते मुके असेल तर ते आपली शंका व्यक्त करू शकणार नाही, आणि जर ते अशक्त, रोगी किंवा अपंग असेल तर तेही व्यर्थ आहे. जर ती शरीरधारी व्यक्ती मूर्ख असेल तर ती पण निश्चितच निरर्थक असणार.

ज्या नरदेहामध्ये हे सर्व दोष नसतील आणि जे सर्व प्रकारे ठीकठाक असेल, तर त्याने ताबडतोब परमार्थाच्या मार्गाकडे वळले पाहिजे. लोक सर्वांग–पूर्ण नर–देह प्राप्त करून सुद्धा परमार्थ विस्मरण करतात. हे मूर्ख माया–जालमध्ये फसलेले असतात. मातीने बनलेल्या या घरास या लोकांनी निश्चितपणे आपलेच मानले आहे, परंतु त्यांना याची कल्पना नाही की हे घर अनेकांचे आहे. कृमी–कीटकांपासून ते पशूंपर्यंत सर्वजण मानव देहावर आपला हक्क सांगतात. इतकेच नव्हे तर अग्नी पण म्हणतो की हे घर माझे आहे, मी याला भस्मसात करीन. सर्वजण याच्यावर आपली मालकी दर्शवतात. अनुभव सांगतो की घराची ही मिथ्या स्थिती आहे. हे जीवन दोन दिवसाचे आहे. हे परक्याचे धन आहे. मातीचा याचेवर स्वामित्व आहे.

नरदेह हे फक्त मानवाचेच नसून, त्यावर इतरांचा पण अधिकार आहे. उवा डोके खातात. रोम–रंध्रामध्ये किडे पडतात, घाव असल्यास त्यामध्ये किडे उत्पन्न होतात आणि प्राण्यांच्या पोटामध्ये पण अनेक जंतू असतात. किडे शरीराचे मांस खातात. डास रक्त घोटतात (पितात). पिसवा दंश करून पळून जातात, मत्कुण (ढेकूण) अंथरूणामध्ये त्रास देतात, साप–विंचू चावतात. कुत्रे मांसाचे लचके तोडतात. उंट कापून खातो, हत्ती चिरडून टाकतात आणि बैल अचानक आपल्या शिंगांनी हल्ला करतो. चोर लाठीप्रहार करतात आणि भूत–पिशाच्च भिववून मारून टाकतात. हीच या शरीराची स्थिती आहे. हा शरीर तर आहे अनेकांचा, परंतु मूर्ख त्याला आपलेच समजतात. खरोखर, हे शरीर अनेक प्रकारच्या जीवांचे खाद्य आहे. परमार्थाच्या सेवेमध्येच या शरीराची सार्थकता आहे, नाही तर ते अनेक प्रकारच्या आघातांमुळे व्यर्थ मृत्यू–मार्गाकडे चालते बनते. जे प्रापंचिक व मूर्ख आहेत, ते परमार्थाच्या सुखास कसे बरे समजतील!

विचारशक्ती हे नरदेहाचे वैशिष्ट्य आहे. अवस्था तीन प्रकारच्या आहेत –

**१) पशूची अवस्था –** या अवस्थेत विचारांना प्रारंभ झाला आहे पण ते आहार, निद्रा, भय आणि मैथुन या पुरतेच सीमित आहेत.

**२) विचार आणि विवेक याची अवस्था –** ही मानवाची अवस्था असून क्रमशः विकसित झालेली चित्तदशा इथे पाहायला मिळते.

**३) तिसरी अवस्था संतत्वाची** असून त्यात माणसाला निर्विचारता प्राप्त होते. विचार क्रमशः विकसित होत जातात. विचाराच्या हजारो पेशी माणसाच्या मेंदूमध्ये असतात. शरीराचा सर्वश्रेष्ठ उपयोग नरदेहातच शक्य आहे. सर्व पशूंचा पाठीचा कणा आडवा असतो. मानवाचा पाठीचा कणा उभा असतो. त्यामुळे कुंडलिनी शक्ती जागृत होण्याची शक्यता फक्त नरदेहात आहे. जीवनाच्या उपासनेद्वारा माणसाला अनेक सिद्धी प्राप्त होऊ

शकतात. चमत्कार घडू शकतात. परंतु चमत्कार हे नरदेहाचे ध्येय नसून सारासार विचाराने ब्रह्मपदाची प्राप्ती करून घेणे हे नरदेहाचे ध्येय आहे. नरनारी भेद हा देहबुद्धीच्या पातळीवरील आहे आणि अध्यात्मात देहबुद्धीला कुठेही जागा नाही.

देहाचे अस्तित्व हा आत्म्याच्या अस्तित्वाचा पुरावा आहे. कारण देह नसेल तर आत्मा असूनही अभिव्यक्ती नसल्यामुळे त्याच्याबद्दल काहीच अंदाज करता येणार नाही. नरदेह हे ईश्वरप्राप्तीचे सर्वश्रेष्ठ साधन आहे. देह नसेल तर पूजा, उपासना, भजन, भगवंतोत्सव, तीर्थाटन या सर्व गोष्टी जमू शकल्या नसत्या. देहाच्या नश्वरतेबद्दल कितीही आरडाओरडा केला तरी जप, तप, ध्यान, उपासना ही सारी सत्कर्मे केवळ नरदेहातच घडू शकतात.

## २) जन्म-पूर्व (गर्भस्थ) देह-अवस्था

जन्मच दुःखाचे अंकुर किंवा मूळ, शोक-सागर आणि भितीचे अचल पर्वत आहे. जन्मच कर्मांची रूपरेषा, पातकाची खाण आणि काळाची नित्य होणारी यातना आहे. जन्मच कुविद्येचे फळ, लोभाचे कमळ आणि ज्ञानहीन भ्रांती उत्पन्न करणारा पडदा आहे. जन्मच जीवासाठी बंधन, मृत्यूचे कारण आहे. जन्मच सुखाचे विस्मरण, चिंतेचे आगर आणि वासनेच्या रूपाने विस्तृत आहे. जन्मच जीवाची अवदशा आणि कल्पनेचे लक्षण आहे. जन्मच मायेचे कपट-जाल, क्रोधाचे शौर्य आणि मोक्षास बाधक असणारे असे विघ्न आहे. जन्मच जीवाचे ममत्व, अहंकाराचे गुण आणि ईश्वराचे विस्मरण करवणारा आहे. जर जन्माचे मूळ पहायला जाल तर तुम्हाला त्याचासारखा वाईट किंवा अमंगल गोष्ट दुसरी कोणतीच दिसून येणार नाही.

रजस्वला रजपासून याचा जन्म होतो. रज हे रजस्वलाचे फार मोठे दोष असते. त्याचाच हा पुतळा आहे. मग तेथे निर्मळतेची गोष्टच नको! रजस्वलेचे रज एकत्रित झाल्यामुळे जो एक बुडबुडा बनतो, त्याच्यापासूनच हे शरीर उत्पन्न होते. वरून पाहिल्यास हा फार सुंदर दिसतो, मात्र आतून नरकाचे गाठोडे असतो. जणू काही तो चर्मकुंडाचा एक झाकण असतो, ज्याला कधीच उघडावेसे वाटत नाही. कुंडास धुतल्यास स्वच्छ होऊन जाते, मात्र हे शरीर नित्य प्रति धुतल्यावर सुद्धा स्वच्छ होत नाही. अस्वच्छता तशीच कायम राहते. मानवाचे शरीर म्हणजे उभे केलेले अस्ति-पंजर, त्यामध्ये शिरा आणि नाडी लावलेल्या आणि त्याच्या पोकळीमध्ये मेद-मांस भरलेले. एवढे झाले की शरीर तयार! ज्या अशुद्ध रक्ताचे नाव पण शुद्ध नाही, तेच या शरीरामध्ये भरलेले आहे. वरून नाना प्रकारचे रोग त्याच्यामध्येच उपजतात. यामध्ये दुर्गंधित मल, मूत्र भरलेले आहे. संपूर्ण शरीरामध्ये डोके या अवयवास सर्वोत्तम समजले जाते, परंतु त्याच्यामध्ये सुद्धा नाका-तोंडातून कफ आणि थुंकी वाहते. डोळ्यांत आणि नाकामध्ये मळ जमून जातो. ज्या तोंडामध्ये लाळ, थुंकी, मळ, पित्त आणि कफ भरलेले असते, त्यालाच चंद्रासारखे मुख -कमळ म्हणतात. इकडे तोंडामध्ये तर घाण भरलेली आहे आणि तिकडे पोटामध्ये विष्टा भरली आहे. ही गोष्ट अत्यंत स्पष्ट आहे आणि जगामध्ये प्रत्यक्षासाठी प्रमाणाची गरज नसते. पोटामध्ये दिव्य अन्न भरले जाते, परंतु त्याचा काही अंश विष्टास्वरूप बनून जातो, तर काही अंश हा वमन. प्यालेले शुद्ध पाणी लघु शंका बनून जाते. अशा प्रकारे हे मल, मूत्र आणि वमनच या शरीराचे जीवन आहे, आणि यामध्ये मुळीच संशय किंवा शंका नाही की यांच्यापासूनच शरीर बनते. जर पोटामध्ये मल, मूत्र आणि वमन नसते तर

लोक मेले असते. सर्व काही व्यवस्थित असताना शरीराची अशी अवस्था आहे, तर दुर्दशा झाल्यावर विचारूच नका. अनेक प्रकारचे कष्ट सहन करून या शरीराला नौ (९) महिन्यांपर्यंत गर्भाच्या कारागारमध्ये कैद रहावे लागते. नौ दारे बंद असतात आणि त्यामध्ये कोठूनही वायूचा प्रवेश नसतो. तेथेच वमन आणि नरकाचे रस जठराग्नीद्वारे तप्त होतात आणि त्यामध्येच अस्थि आणि मांस उकळत असतात. जेव्हा त्वचेविना गर्भ उकळत असतो तेव्हा मातेची वांती करण्याची इच्छा होते आणि कडू व तीक्ष्ण रसांमुळे गर्भस्थ बालकाचे सर्व अवयव तापून जातात. जेथे चामड्याची पिशवी बांधलेली असते, तेथे विष्टेची पण पिशवी असते आणि तेथूनच वक्रनाळेद्वारे गर्भस्थ बालकास रस प्राप्त होते. तेथे विष्टा, मूत्र, वमन, पित्त यामुळे बालक भयभीत झालेले असते.

फक्त एवढेच की अशाच प्रकारच्या कारागारामध्ये जीव (मानव शिशु) मोठ्या कष्टामध्ये पडलेला असतो आणि अत्यंत दु:खी बनून ईश्वराची प्रार्थना करतो की आता मला इथून सुटकारा होऊ दे. जर या वेळेस तू मला येथून सुरक्षित बाहेर काढशील तर मी आपले खरे हित करून घेईन आणि असे प्रयत्न करीन की ज्यामुळे या गर्भवासाचे अंत होऊन जावे आणि मला पुन्हा येथे यावे लागणार नाही. जेव्हा अशा प्रकारे दु:खी होऊन प्रतिज्ञा केली जाते तेव्हा जन्मण्याची वेळ येते. त्या वेळेस माता प्रसव वेदनेने तडफडू लागते. गर्भामध्ये तर बालकाचे तोंड आणि नाक मांसामुळे बंद असतात त्यामुळे जीव व्याकूळ होऊन चोहोकडे तडफडत असतो आणि तो आपल्या मस्तकाने श्वास घेत असतो, परंतु जन्माच्या वेळी त्या मस्तकाकडील द्वार पण बंद होऊन जाते, त्यामुळे त्याला फार त्रास घडतो (होतो). सौभाग्याने योनि मार्ग सापडल्यास त्याची सुटका होते व नवजात बालकाचे इहलोकामध्ये आगमन होते.

गर्भामध्ये असताना बालक ''सोऽहं सोऽहं'' असे म्हणत असतो. अर्थात मी तोच ब्रह्म आहे, परंतु बाहेर काढताक्षणीच म्हणू लागतो – ''कोऽहं कोऽहं'' अर्थात मी कोण आहे. अशाप्रकारे गर्भामध्ये अनेक कष्ट भोगावे लागतात. गर्भामधील कष्ट भोगून तो मोठ्या मुश्किलीने बाहेर येतो. इहलोकामध्ये पदार्पण करताच गर्भवासातील सर्व कष्ट विसरून जातो. त्याची वृत्ती बिलकूल शून्य होऊन जाते. त्याला काहीच आठवत नाही. अज्ञानामुळे जो भ्रम निर्माण होतो, त्यालाच तो सुख समजू लागतो. देह-विकार प्राप्त होताच तो मायाजालमध्ये असा गुरफटला जातो की तो सगळे दु:ख विसरून जातो.

प्राणिमात्रांना गर्भामध्ये अशाच प्रकारचे दु:ख होत असतात. म्हणूनच परमेश्वराच्या शरणी गेले पाहिजे. जो परमेश्वराचा भक्त असतो, तो आपल्या ज्ञानाच्या बळावर जन्मपासूनच मुक्त आणि सदा विरक्त असतो.

### ३) देह – तापत्रय (त्रिविध ताप)

माणसाच्या वाट्याला जी दु:खे येतात, त्याची विभागणी शास्त्रानुसार तीन प्रकारात केली जाते. ते त्रिविध ताप आहेत – १) आध्यात्मिक ताप, २) आधिभौतिक ताप आणि ३) आधिदैविक ताप. भुकेलेल्यास अन्न मिळाल्यानंतर, तहानलेल्यास पाणी मिळाल्यानंतर आणि बंदीवासास कैदेतून मुक्त झाल्यानंतर सुख प्राप्ती होते. महापुरामध्ये बुडणारा मनुष्य काठास लागल्यानंतर आणि स्वप्नामध्ये दु:ख भोगणारा मनुष्य जागे झाल्यानंतर सुखी व समाधानी होतो. मरणारास जीवदान मिळाल्यानंतर आणि संकटामध्ये सापडलेला संकटमुक्त झाल्यानंतर

सुखी बनतात. दुर्धर रोगास परीक्षित औषधामुळे किंवा रामबाण उपायामुळे आरोग्य प्राप्त झाल्यावर (बरे झाल्यानंतर) सुख प्राप्त होतो. याचप्रकारे जो त्रिविध तापांनी पीडित बनून जगामध्ये अत्यंत दुःखी बनतो, तो सत्संगामुळे परमार्थाचा अधिकारी बनून जातो.

**१) आध्यात्मिक ताप**

*देहेन्द्रियप्राणेन सुखं दुःखं च प्राप्यते ।*
*इममाध्यात्मिकं तापं जायते दुःख देहिनां ।।*

इंद्रिये आणि मन यांच्या योगाने आपणास ज्या सुख-दुःखांचा अनुभव होतो, त्याचेच नाव आध्यात्मिक ताप आहे. जे दुःख शरीर, इंद्रिय किंवा मनामुळे उत्पन्न होते, ते त्रिविध तापांमधील आध्यात्मिक ताप गणले जाते. नाना प्रकारच्या शारीरिक व्याधी, विषय-वासनेमुळे होणारी दुर्दशा, विस्मरण, मनामध्ये भय निर्माण होणे, कुटिलता, ईर्ष्या, क्रोध, संताप, अपमृत्यू, संसारामधील तंटे-बखेडे, नाना प्रकारच्या चिंता, मनस्ताप, व्याकुळता, सर्व प्रकारच्या शारीरिक यातना, शोक विव्हल होणे हे सर्व आध्यात्मिक ताप आहे. हे जग अपार दुःखाचे सागर आहे. आणखी काय सांगायचे.

**२) आधिभौतिक ताप**

*सर्वभूतेन संयोगात् सुखं दुःखं च जायते ।*
*द्वितीयतापसन्तापः सत्यं चैवाधिभौतिकः ।।*

समस्त चराचर भूतांच्या संयोगाने जे सुख-दुःख उत्पन्न होतात आणि ज्यांच्यामुळे मन दुःखी कष्टी होते, त्यांना आधिभौतिक ताप असे म्हणतात. दृश्य जगतातील दुसऱ्या व्यक्तीशी अथवा दुसऱ्या पदार्थाशी संबंध आल्यामुळे शरीराला जे दुःख होते, त्याला आधिभौतिक ताप असे म्हणतात. उदा. - साप चावणे, मधमाशा चावणे, ठेच लागणे, बैलाने शिंग मारणे, मारामारी होणे, एखाद्या वाहनाची धडक बसणे, झाडाची फांदी अंगावर पडणे, डोंगर चढताना दगड कोसळणे, पिशाच्चबाधा होणे, संसार मनासारखा नसणे, मुलगी विधवा होणे, मुलगा अपंग होणे, सासुरवास अशी नाना दुःखे आहेत. शाप लागणे, वेडसर होणे, विषप्राशन करविले जाणे, कलंक लागणे, जीभ पोळणे, चुकांमुळे वारंवार समज दिली जाणे, बोलणी खाणे, चोरी होणे, डाका पडणे, आगीमुळे नुकसान होणे, साडेसाती लागणे, अपशकुन होणे, ग्रहपीडा होणे, काल-तिथी, घात-नक्षत्र इत्यादींचा योग होणे, अशुभ भविष्यामुळे मनात खटकणे, वाईट स्वप्नांमुळे चिंतित होणे, आर्थिक नुकसान होणे, आई-बापाचा मृत्यू, अनेक प्रकारच्या अपमानामुळे लज्जित होणे तसेच शोक संतप्त होणे हे सर्व आधिभौतिक ताप आहेत.

**३) आधिदैविक ताप**

*शुभाशुभेन कर्मणा देहान्ते यमयातना ।*
*स्वर्गनरकादि भोक्तव्यमिदं चैवाधिदैविकं ।।*

मनुष्य आपले शुभ आणि अशुभ कर्मांमुळे मेल्यानंतर ज्या यातना भोगतो आणि स्वर्ग, नरक इत्यादींचा भोग घेतो, त्यास आधिदैविक ताप असे म्हणतात. तो मदान्ध बनून अविवेकामुळे अनेक प्रकारची वाईट कर्मे आणि पातके करतो जे शेवटी दुःखदायक असतात आणि ते यम-यातना भोगावयास लावतात.

कर्मविपाकाच्या सिद्धान्तानुसार माणसाला त्याच्या चांगल्या–वाईट कर्मांची फळे भोगावी लागतात. त्याला आधिदैविक ताप म्हणतात. मृत्यूनंतरच्या नरक यातना हे आधिदैविक तापाचे उत्तम उदाहरण आहे. तसा विचार केल्यास आपल्या वाट्याला येणारे आध्यात्मिक आणि आधिदैविक ताप देखील गतजन्मीच्या कर्मांची फळे आहेत. त्यामुळे आधिदैविक तापात सगळ्याच दु:खांचा अंतर्भाव करता येईल. 'मनाच्या श्लोकात' श्रीसमर्थ रामदासस्वामी यांनी ''जगी सर्व सुखी असा कोण आहे?'' असा प्रश्न उपस्थित करून, जीवन दु:खमय आहे असेच म्हटले आहे. गौतमबुद्धांचे सार तत्त्वज्ञान या दु:खाच्या चर्चेने भरलेले आहे.

माणसाच्या वाट्याला आयुष्यभर जी वेगवेगळी दु:खं येतात, त्यांचा शेवट मृत्यूने होतो. खुद्द मृत्यू हा दु:खाचा परमोच्च आविष्कार आहेच. जन्माला आलेला प्रत्येक माणूस मरणार आहेच. फक्त मृत्यूच माणसाची सगळ्या यातनांतून सुटका करू शकतो.

### ४) देह – निर्मिती आणि प्रकार

वेगवेगळ्या सूक्ष्म आणि स्थूल तत्त्वांचे मिश्रण म्हणजे आपले शरीर किंवा जीव होय. या तत्त्वाची संख्या प्रत्येकाने आपापल्या सोईनुसार वेगवेगळी दिली आहे. ज्ञानेश्वर महाराजांनी छत्तीस (३६) तत्त्वे दिली आहेत तर पूज्यपाद शंकराचार्यांनी पन्नास (५०) तत्त्वे दिली आहेत. समर्थ रामदास शरीरातील तत्त्वांचे जरा अधिक पृथक्करण करतात व एकूण ब्याऐंशी (८२) तत्त्वे सांगतात. त्यांच्या मतानुसार, मानवी देह, मग ते स्थूल असो वा सूक्ष्म, ८२ तत्त्वांचे गाठोडे आहे. यांतील प्रत्येक तत्त्व जड आहे. याचा अर्थ त्या तत्त्वाला स्वतंत्र अशी चेतना किंवा जाणीव नाही. उदाहरणार्थ माझा हात जोपर्यंत माझ्या शरीराशी जोडलेला आहे तोपर्यंत तो हालचाल करू शकतो. तसेच माझ्या इतर अवयवांचे आहे. परंतु माझा हात किंवा इतर कोणताही अवयव माझ्या शरीरापासून वेगळा केला तर हालचाल करू शकणार नाही किंवा त्याला संवेदना प्राप्त होणार नाही. वेगवेगळे 'स्पेअरपार्टस्' जोडून एखादी स्कूटर तयार करावी त्याप्रमाणे माझे शरीर म्हणजे कर्मेंद्रिये आणि ज्ञानेंद्रिये यांचा जोड आहे. आपण झोपले असताना घरातील लोकांचे बोलण्याचे आवाज आपल्याला ऐकू येत नाहीत. याचा अर्थ कान ऐकत नसून ऐकणारा कुणीतरी निराळा आहे. केनोपनिषदात हीच चर्चा आहे. ऋषी प्रश्न विचारतात –

आपले मन, आपले प्राण आणि आपली इंद्रिये कोणत्या सत्तेने प्रेरित होऊन आपापली कामे करतात? कोणाच्या प्रेरणेने वाणी बोलते? कोणाच्या सत्तेने डोळे पाहातात आणि कान ऐकतात? ऋषींनी उपस्थित केलेला हा प्रश्न आत्मनिवेदन प्रक्रियेचा आत्मा आहे. याचे उत्तर देताना केनोपनिषदातील ऋषी म्हणतात – कानाचा कान, मनाचे मन, वाणीची वाणी, प्राणाचा प्राण, डोळ्याचा डोळा हे ऋषींनी दिलेले उत्तर म्हणजे आपल्या मूळ स्वरूपाचा शोध आहे.

ही जी समस्त ८२ तत्त्वे आहेत ती जड आहेत. परंतु ही सगळी तत्त्वे एकत्रित आल्यावर त्यामध्ये ब्रह्मचैतन्याचे प्रतिबिंब पडते व देहाला जीवदशा प्राप्त होते. यातील तत्त्वे ही सगुण म्हणजे नाशिवंत असून चैतन्य हे निर्गुण म्हणजे शाश्वत आहे. आत्मनिवेदनामध्ये साधकाने आपल्या या मूळ शाश्वत स्वरूपाचा शोध घ्यावयाचा असतो.

आपण बोलताना मी शरीर असे म्हणत नाही. माझे शरीर असे म्हणतो. याचा अर्थ शरीरापेक्षा माझे अस्तित्व निराळे आहे. त्याचप्रमाणे आपण मी मन असे म्हणत नाही. माझे मन असे म्हणतो. याचा अर्थ मी म्हणजे मन नव्हे. मनाखेरीज माझे वेगळे अस्तित्व आहे. 'माझ्या अंत:करणात चलबिचल झाली' असे आपण म्हणतो किंवा 'माझ्या चित्तात कालवाकालव झाली' असे आपण म्हणतो. याचा अर्थ अंत:करण आणि चित्त यांना माझे म्हणणारा खरा मी कुणीतरी वेगळा आहे. या मीचा शोध घेणे म्हणजे आत्मनिवेदन होय. माझे हात, माझे पाय, माझे डोळे या विविध प्रयोगाद्वारे आपण इंद्रियांच्या अतीत असलेले आपले खरे अस्तित्व स्वीकारत असतो. तात्पर्य, आत्मा हे माझे खरे अस्तित्व असून देह ही माझी काल्पनिक अथवा मानसिक धारणा आहे. याची प्रत्यक्ष अनुभूती घेणे याला आत्मनिवेदन म्हणतात. आत्मनिवेदन ही संपूर्ण ज्ञानमार्गाची प्रक्रिया आहे. यामध्ये स्वत:चा शोध अपेक्षित आहे.

आता ही ८२ तत्त्वे कोणती ते समजावून घेऊ आणि ती तत्त्वे कशी जड आणि नाशिवंत आहेत, ते पण बघू.

मानवी देह हे पंचमहाभूतांचे वा भूत पंचकाचे समूह आहे. सर्व प्रथम ब्रह्मामध्ये मूळ माया उत्पन्न झाली आणि मग त्यामध्ये गुणांचे आविर्भाव झाले. म्हणूनच मायेस गुणक्षोभिणी असे म्हणतात. मग त्यापासून सत्त्व, रज आणि तम हे तीन गुण निर्माण झाले, आणि तमोगुणापासून पंचभूताची सृष्टी झाली. अशा प्रकारे प्रथम पाच भूते उत्पन्न झाली, मग त्यांचा विस्तार झाला आणि त्यांनी सृष्टीच्या स्वरूपात जडता (जडत्व) प्राप्त केली, आणि मग तमोगुणापासून पंचमहाभूते बनली.

| | भूतपंचक वा पंचमहाभूते | तन्मात्रा (विषय) |
|---|---|---|
| १) | पृथ्वी | शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध. |
| २) | आप | शब्द, स्पर्श, रूप, रस. |
| ३) | तेज | शब्द, स्पर्श, रूप. |
| ४) | वायू | शब्द, स्पर्श. |
| ५) | आकाश | शब्द. |

शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध हे पाच 'विषय' आहेत.

**१) सूक्ष्म पंचमहाभूत –**

जे काही जड आणि कठीण आहे, ते पृथ्वीचे लक्षण आहे, आणि जे काही मृदु आणि आर्द्र आहे, ते सर्व आप (जल) आहे. जे काही उष्ण आणि सतेज आहे, ते तेज वा अग्नी आहे. जे काही चैतन्य आणि चंचल आहे, ते केवळ वायू आहे, आणि जे काही शून्य, अवकाश आणि निश्चल आहे, ते आकाश आहे. हीच पंचभूताची सर्वसामान्य ओळख आहे. आता आपण हे पाहणार आहोत की प्रत्येक भूतामध्ये इतर चार भूते कसे मिसळलेले आहेत आणि त्रिगुणातीत कोण आहे.

**१) आकाश –** सूक्ष्म आकाशामध्ये पृथ्वी कशी आहे, हे सर्वप्रथम पाहू या. आकाशाचा अर्थ आहे – शून्य अवकाश. शून्याचा अर्थ आहे – अज्ञान, आणि अज्ञानाचा आशय आहे जडत्व आणि तेच जडत्व पृथ्वी आहे. आकाश स्वतः मृदु आहे आणि मृदुता आप (जल) आहे. अज्ञानामुळे जे काही भासमान होते तेच तेजाचे प्रकाश आहे. अशा प्रकारे आकाशामध्ये अग्नी (तेज) पण समाविष्ट झाला. वायू आणि आकाशामध्ये काही भेद नाही. वायू पण आकाशाप्रमाणेच स्तब्ध आहे, आणि आकाशामध्ये जो निरोध आहे, तोच वायू आहे. आणि हे सांगण्याची गरजच नाही की आकाशामध्ये आकाश मिसळून गेलेले आहे. अशाप्रकारे आकाशामध्ये पाच भूते समाविष्ट आहेत.

**२) वायू –** हलक्यात हलक्या वस्तूमध्ये पण जडता (जडत्व) अवश्य असते. म्हणून वायूमध्ये पण जडता (जडत्व) आहे. कारण की त्याच्या प्रबळ आघातामुळे मोठ–मोठे वृक्ष उन्मळून पडतात आणि त्यामुळे त्याच्यामध्ये पृथ्वी तत्त्वाचे असणे सिद्ध होते. ज्याप्रमाणे आगीच्या लहानात लहान ज्वालेमध्ये काही–ना–काही उष्णता किंवा ताप असतो, त्याचप्रमाणे वायूमध्ये पण जडत्वाच्या रूपाने पृथ्वीचा काही ना काही अंश हा असतोच. वायूमध्ये जी मृदुता असते, तेच आप (जल) आहे. त्याचा जो काही भास होतो, तोच तेजाचे स्वरूप आहे, आणि वायूमध्ये चंचल स्वरूपात स्वतः वायू हा आहेच. वायूमध्ये अवकाश स्वरूपात आकाश पण मिसळलेला आहे. अशा प्रकारे वायूमध्ये पाची भूतांचा अंश आहे.

**३) तेज –** आता तेज भूताचे लक्षण पाहा. त्याच्यामध्ये प्रखरतेचा जो भास आहे, तो पृथ्वीच्या अंशामुळे आहे. त्याच्यामध्ये जो मृदुतेचा भास होतो, तो आप (जल)च्या अंशामुळे आहे. आणि हे सांगण्याची मुळीच गरज नाही की तेजामध्ये तेज पण असते, कारण की ही गोष्ट स्वयंसिद्ध अशी आहे. त्याच्यामध्ये जी चंचलता आहे, ती वायूमुळे आहे, आणि निश्चलता आकाशाचे अंश आहे. अशाप्रकारे तेजामध्ये पण भूतपंचक समाविष्ट असतात.

**४) आप –** पाण्या (जला)ची मृदुता ही स्वतः आपचेच लक्षण आहे, आणि त्या मृदुतेमध्ये जी कठीणता आहे, ती पृथ्वीचा अंश असल्याकारणाने आहे. आप मध्ये आप (जल) तर आहेच आणि त्याच्या मृदुतेमध्ये तेज पण सहजतेने दिसून येते. त्याच्या मृदुतेमध्ये जी स्तब्धता आहे, ती वायूचा अंश आहे. हे सांगण्याची गरज नाही की आप (जल)मध्ये आकाश आहे, कारण की ते स्वाभाविकपणे व्याप्त आहे. अशा प्रकारे आप मध्ये पण पाच भूते समाविष्ट आहेत.

**५) पृथ्वी –** आता पृथ्वीचे उदाहरण घ्या. ती स्वतः कठीण तर आहेच आणि हे तिच्यामध्ये पृथ्वीचे अंश असल्याचे लक्षण आहे. तिच्या कठीणतेमध्ये जी मृदुता आहे, ती आप मुळे आहे. पृथ्वीमध्ये कठीणतेचा जो भास होतो, तो तिच्यामध्ये तेजचा प्रकाश असल्याकारणाने आहे. त्या कठीणतेमध्ये जी निरोध शक्ती आहे, ती वायू आहे. हे तर सर्वांना माहितच आहे की आकाश सर्वांमध्ये व्याप्त आहे आणि त्यामुळे तो इतर चार भूतांमध्ये आढळतो. आकाश ना तोडण्यामुळे तुटतो, ना फोडण्यामुळे फुटतो ना तिळ मात्र पण कुठूनही हटतो. अशा प्रकारे पृथ्वीमध्ये पण पाची भूते समाविष्ट असल्याचे सिद्ध आहे, आणि हे पण सिद्ध आहे की पाची भूतांपैकी प्रत्येक भूतामध्ये उरलेले चार भूत पण विद्यमान असतात. परंतु वर–वर पाहता, या गोष्टीची जाणीव होत नाही, आणि यामुळे फार मोठी शंका उत्पन्न होते.

सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास वायूमध्ये पण पाची भूत दिसून येतात. आणि हाच पंचभूतात्मक वायू मूल माया आहे. माया आणि सूक्ष्म त्रिगुण पण पंचभौतिकच आहेत. अशा प्रकारे पाच महाभूते आणि तीन गुण मिळून आठ प्रकारच्या सृष्टी बनल्या. आठ प्रकारच्या सृष्टींना पण पंचभौतिकच समजले पाहिजे. तीन गुणांमुळेच पाची भूते स्पष्ट किंवा व्यक्त झालीत. तीन्ही गुणच जड बनून पाच भूते बनलीत. यांच्याद्वारेच पिंड आणि ब्रह्मांड इत्यादींची रचना झाली. भूतांची एक दुसऱ्यामध्ये सूक्ष्म स्वरूपात मिसळलेले असल्याचे जे उपरोक्त वर्णन आलेले आहे, ते या ब्रह्मांड रचनेच्या अगोदरच्या अवस्थेचे आहे. हे ब्रह्मांड आणि ही सृष्टी निर्माण होण्याअगोदर मूळ मायाच होती. ब्रह्मांडाच्या समस्त विस्ताराचे मूळ फक्त ती पंचभौतिक मूळ माया आहे. सूक्ष्म पंचमहाभूतेच पुढे जाऊन जड स्वरूपात स्थूल पंचमहाभूते बनलीत.

### २) स्थूल पंचमहाभूत

पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश ही जी पंचमहाभूते एकमेकात मिसळली गेली आहेत, त्यांना कोणत्याच प्रकारे वेगळे केले जाऊ शकत नाही. तरी पण यांचे थोडेसे पृथक्करण करून स्पष्टपणे याची लक्षणे सांगता येऊ शकतील.

**१) पृथ्वीचे लक्षण –** अनेक प्रकारचे लहान–मोठे पर्वत, दगड, शिळा, शिखर आणि अनेक प्रकारचे दगड–गोटे हे सर्व पृथ्वी आहेत. जागोजागी जी अनेक प्रकारची माती किंवा वाळू दिसून येते, सुंदर शहरे आणि गावे, साधारण आणि भव्य मंदिरे, देवालये इत्यादी सर्व पृथ्वी आहेत. सप्त द्वीप आणि नौ खंड ही सर्व पृथ्वीच आहेत. उजाड जागा, वन, उपवन, सर्व प्रकारचे वृक्ष, गिरी–कंदरा इत्यादी नैसर्गिक स्थाने आणि मानव निर्मित निवासस्थाने, सोने, लोखंड इत्यादी धातू, अनेक रत्ने, वृक्ष–लता सर्व मिळून पृथ्वी आहेत. थोडक्यात हे जाणावे की जे काही जड आणि कठीण अंश पहाण्यात येते ते सर्व पृथ्वीच आहे. हे झाले पृथ्वीचे स्वरूप.

**२) आपचे लक्षण –** कूप, विहीरी, तलाव, सरोवर, नद्या यामधील पाणी, मेघ आणि सात ही समुद्र सर्व मिळून आप (जल) आहे. खारे पाण्याचे क्षारयुक्त समुद्र सर्वांना दिसतोच आहे. ज्याच्या पाण्यामध्ये मीठ आहे, तोच क्षार समुद्र आहे. याच्याशिवाय आणखी एक दुधाचा समुद्र आहे, त्याला क्षीरसागर असे म्हणतात. ईश्वराने हा समुद्र उपमन्यूस दिलेला आहे. एक दुसरे समुद्र आहे मद्याचे, तर तिसरे घृताचे (तुपाचे) आणि चौथे दहीचे. एक समुद्र उसाच्या रसाचा आहे आणि एक शुद्ध पाण्याचा आहे. अशा प्रकारे हे सातही समुद्र पृथ्वीस घेरलेले आहेत. या भूमंडलाच्या समस्त स्थानांमध्ये जेवढे म्हणून पाणी आहे, त्यास आप समजले पाहिजे. याशिवाय भूगर्भामध्ये सुद्धा बरेचसे पाणी आहे आणि जमिनीस चोहोबाजूनी घेरलेले पण पाणी आहे. हे सारे पाणी आणि त्रैलोक्यामध्ये (तिन्ही लोकांमध्ये) जेवढे म्हणून पाणी आहे, ते सर्व मिळून आप आहे. जेवढे म्हणून द्रवस्वरूप तरल पदार्थ आहेत ते सर्वचे सर्व आप आहेत. त्याचप्रमाणे घाम, कफ, आणि अश्रू पण आपच आहेत. सारांश, जे पदार्थ तरल, मृदु आणि शीतल आहेत, ते सर्व आप आहेत.

**३) तेजाचे लक्षण –** चंद्र, सूर्य, तारागण, तेजपूर्ण दिव्य देह, अग्नी, ढगांमधील विद्युल्लता, सृष्टीचा संहार करणारा प्रलयाग्नी, समुद्रामधील अग्नी वा वडवानल, शंकराच्या नेत्रामधील अग्नी, काल–क्षुधेचा अग्नी आणि पृथ्वीमधील अग्नी ही सर्व तेज आहेत. आशय असा की जे पदार्थ प्रकाशमान, तेजस्वी, शोषक, उष्ण आणि प्रखर आहेत, ते सर्व तेज आहे.

**४) वायूचे लक्षण –** जे काही चंचल आहे, त्यास वायू समजले पाहिजे. तो चैतन्यस्वरूप आहे. मनुष्य जे काही बोलतो आणि चालतो, ते सर्व वायूमुळे आहे. वायूशिवाय कोणतीच वस्तू ना हालू किंवा चालू शकते. सृष्टीस चालविणारे मूळ कारण वायूच आहे. जेवढे म्हणून चलन–वळण, प्रसारण–निरोध आणि आकुंचन आहे, ते सर्व चंचल वायूमुळे आहे. प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान हे पाच प्राण, नाग, कूर्म, कृकल, देवदत्त आणि धनंजय हे पाचही उपप्राण आहेत आणि जेवढे म्हणून चलन आहेत ते सर्व वायूचेच लक्षण आहेत. आकाशामधील चंद्र, सूर्य, आणि तारागण हे सर्व वायूमुळेच स्थित आहेत.

**५) आकाशाचे लक्षण –** जे काही पोकळ, निर्मळ, निश्चल आणि अवकाश स्वरूप आहे, ते सर्व आकाश आहे. ते आकाश सर्वांमध्ये व्याप्त आहे, अनेकामध्ये एक आहे आणि त्यामध्येच इतर चारी भूतांचे कौतुक होत आहे. आकाशासारखे श्रेष्ठ असे कोणतेही भूत नाही आणि ते सर्वात मोठे आहे. त्याचे स्वरूप निराकार ब्रह्माच्या स्वरूपासारखे आहे. शास्त्रांमध्ये सांगितले गेले आहे की आकाशामध्ये काम, क्रोध, शोक, मोह, भय, अज्ञान आणि शून्यता हे सात गुण आहेत. आकाशाचे अशा प्रकारचे सप्तविध स्वभाव आहे. म्हणून आकाश हे महाभूत आहे आणि त्याचे स्वरूप निर्विकार आणि उपमारहित आहे. आकाशाचे वर्ण श्याम आहे. ते रूप–रहित आहे. आकाशाचे नाश होत नाही (आकाश नाश पावत नाही).

आकाश तमोगुणामुळे उत्पन्न झाले आहे. म्हणून तर ते काम, क्रोध इत्यादीनी वेष्टित आहे. आणि अज्ञान अथवा शून्यताच त्याचे नाव आहे. अज्ञानामुळे जे काम, क्रोध, मोह, भय, शोक इत्यादी उत्पन्न होतात, ते सर्व आकाशामुळेच उत्पन्न होतात. ज्याचे अस्तित्वच नसते, तेच शून्य असते. जो प्राणी (जीव) अज्ञान असतो, त्यालाच हृदयशून्य म्हणतात. स्तब्धतेमुळेच आकाश शून्य आहे. शून्यच अज्ञान आहे, अज्ञानच जडत्वाचे रूप आहे. आकाशामध्ये अज्ञान मिसळलेले आहे. आकाश आणि अज्ञानाचे मिश्रण ज्ञानामुळे नष्ट होते, म्हणूनच म्हणतात की आकाश नश्वर आहे. आकाश आणि ब्रह्म या दोहोंचे स्वरूप एकसारखे दिसत असले तरी दोघांच्या दरम्यान शून्यतेचे पटल (पडदा) किंवा भेद आहे.

### ५) पंचीकरण

विषयांचे ग्रहण हे ज्ञानेंद्रियांचे कार्य आहे. पंचमहाभूतांचे आपापले वेगळे गुण असतात. जसे, आकाशाचा गुण शब्द, वायूच स्पर्श, तेजाचा रूप, जलाचा रस व भूमी (पृथ्वी)चा गंध आहे. तथापि पंचीकरणाने गुणाचा विनिमय होतो. एका भूतामध्ये दुसऱ्या भूतांच्या गुणाची प्रचिती येणे, यालाच 'गुणविनिमय' म्हणतात. गुण स्वतंत्र नाहीत. ते द्रवाच्या आश्रयानेच राहतात. त्यामुळे द्रव्यांच्या मिश्रणावाचून गुणांचे मिश्रण संभवत नाही. यास्तव गुणांच्या विनिमयाकरिता भूतांचे मिश्रण करावे लागते. त्या मिश्रणालाच 'पंचीकरण' म्हणतात. प्रत्येक भूतात स्वत: त्या भूताचा अर्धा भाग आणि इतर चार भूतांचा अष्टमांश मिळून पूर्ण प्रमाण होते. त्यामुळे पूर्वी अपंचीकृत म्हणजे प्रत्येकी एकेक निरनिराळे असलेले भूत वरील प्रक्रियेने पंचीकृत – पांच भूतांच्या अंशांनी युक्त होते. त्यामुळे सर्व भूतांत सर्व गुण आढळतात. पंचीकृत भूतांतील ज्यात ज्या भूताचा अर्धा भाग असतो त्याच्या नावाने त्या भूताचा उल्लेख करतात. पंचीकरणामुळेच आकाशात नीलरूपाचा भास होतो व अवकाश डोळ्यांनाही दिसतो.

**६) श्रीसमर्थ रामदासस्वामी प्रणीत पंचमहाभूतां (भूतपंचका)चा निरास (निरूपण) –**

**१) पृथ्वी –** नरदेह जड असून त्याला वजन आहे. हे मानवी देहामधील पृथ्वी तत्त्व होय. पृथ्वी याचा अर्थ ज्याच्यावर आपण राहतो ती पृथ्वी नव्हे. मानवाची हाडे, मांस, त्वचा, नाडी व रोम या सर्वांना आकार व वजन आहे. हे मानवामधील पृथ्वी तत्त्व होय. मात्र या पृथ्वी तत्त्वाला स्वतंत्र चेतना आणि स्वतंत्र अस्तित्व नाही. त्याला जाणीवही नाही. त्याचप्रमाणे त्यात सतत बदल होत जातो, म्हणून पृथ्वी तत्त्व हे काही मानवाचे खरे स्वरूप नाही.

**२) आप –** मानवाच्या शरीरात रक्त, लाळ, रेत (शुक्राणू), मूत्र व घाम आहे. हे मानवी देहामधील आप तत्त्व आहे. मानवाच्या शरीरात सतत रक्ताचा प्रवाह चालू आहे. ते देखील त्याच्यामधील आपतत्त्व आहे. शरीरात असा ओलसरपणा आहे म्हणून मानवाची हाडे लवचिक आहेत. शरीरातील हे जे आपतत्त्व आहे ते देखील नश्वर आहे. या आप तत्त्वाला स्वतःची अशी स्वतंत्र जाणीव नाही. म्हणून ते आपतत्त्व हे काही मानवाचे खरे स्वरूप नव्हे.

**३) तेज –** मानवी शरीरामध्ये उष्णतादेखील आहे. ९७ ते ११० या तापमानात आपण जगतो. भूक, तहान, आळस, झोप व मैथून ही मानवामधील तेज तत्त्व आहेत. परंतु या सर्व गोष्टी मानसिक असून जड आहेत. त्यांना स्वतःची अशी स्वतंत्र चेतना नाही. म्हणून हे तेज तत्त्व म्हणजे काही मानवाचे खरे स्वरूप नव्हे.

**४) वायू –** मानव श्वासोच्छ्वास घेतो, त्यावरून त्याच्यामध्ये वायूचे तत्त्व आहे. चलन, वलन, प्रसारण, निरोध आणि आकुंचन हे मानवामधील वायू तत्त्व आहे. वायू कितीही सूक्ष्म असला तरी शेवटी जड तत्त्वच असून त्याला स्वतंत्र असे अस्तित्व नाही. तसेच जाणीवही नाही. म्हणून वायू हे काही मानवाचे खरे स्वरूप नाही.

**५) आकाश –** हे नरदेहामधील सर्वात सूक्ष्म तत्त्व आहे. मानवाच्या शरीरात अवकाश किंवा पोकळी आहे. म्हणून काम, क्रोध, शोक, मोह आणि भय हे वृत्तीचे तरंग अंतःकरणात उमटू शकतात. मानवाच्या शरीरात चोवीस तास रक्ताभिसरण चालू आहे. रक्तवाहिन्यांमध्ये आकाश तत्त्व आहे म्हणून रक्त धावू शकते. पण माणसामधील या आकाश तत्त्वाला स्वतंत्र चेतना किंवा जाणीव नाही. कितीही सूक्ष्म असले तरी त्याला देखील जडत्व आहेच, म्हणून आकाश हे काही मानवाचे खरे स्वरूप नाही.

काही शास्त्रकारांच्या मते मानवी शरीर उपरोक्त पाच भूतांचे बनलेले नसून केवळ पृथ्वी आणि आप या दोनच तत्त्वांचे बनलेले आहे. वातावरणातील उष्णता हीच मानवातील उष्णता आहे. वातावरणातील खेळती हवा हेच मानवातील वायू तत्त्व आहे. मानव हा जो श्वासोच्छ्वास घेतो तो त्याचा स्वतंत्र वायू नाही. वातावरणातील वायू तत्त्वाचा तो एक भाग आहे. तसेच संपूर्ण वातावरणातील आकाशतत्त्व आणि त्याच्या शरीरातील आकाश तत्त्व या दोन भिन्न गोष्टी नाहीत. तात्पर्य, पृथ्वी आणि आप हे दोनच घटक त्याच्या शरीराचे स्वतंत्र आहेत. बाकी तिन्ही तत्त्वे वैश्विक आहेत. हे पंचभूतिक शरीर जड आणि नाशिवंत असून त्याला स्वतंत्र चेतना नाही.

श्रीसमर्थ रामदासांच्या मते ही पाचही भूते एकमेकांत तर कालवली आहेतच, परंतु प्रत्येक भूतामध्ये बाकीच्या चार भूतांचा अंतर्भाव आहे. समर्थ म्हणतात –

*"येक येक भुता पोटी । पंच भुताची राहाटी ।*
*सर्व कळे सूक्ष्म दृष्टी । ज्ञालियावरी ।"* ८-३-६१

पृथ्वीमध्ये जडत्वाचा अंश जास्त आहे आणि आप, तेज, वायू, आकाश या तत्त्वांचे अंश कमी प्रमाणात आहेत, म्हणून त्याला पृथ्वी तत्त्व असे नाव दिले. याचा अर्थ त्यामध्ये बाकीची तत्त्वं अजिबात नाहीत असे नाही. हिवाळ्यात पाण्याचा बर्फ होतो. हे आपातील पृथ्वी तत्त्व आहे. तर नदीचे पाणी वाहात जाते हे आपातील वायू तत्त्व होय. पाण्याला काहीतरी तापमान असते. हे त्यातील तेज तत्त्व म्हणावे लागेल, तर पाण्यामध्ये आपण हात बुडवू शकतो ही पाण्यातील पोकळी म्हणजे आपातील आकाशतत्त्व होय. वारा वाहात असताना त्याचा स्पर्श आपल्याला जाणवतो. हे त्या वाऱ्याचे जडत्व किंवा वायूतील पृथ्वी तत्त्व होय. अनेकदा वादळामुळे झाडे उन्मळून पडतात. याचा अर्थ अशा वादळातील वायूत जास्त प्रमाणात पृथ्वी तत्त्व आहे. जर आपण समुद्रकाठी फिरत असू तर वारे गार आणि ओलसर असते. हे वायूतील आप तत्त्व होय. तर उन्हाळ्यात पंखा लावला असता खोलीत गरम वारे वाहू लागते हे वायूतील तेज तत्त्व होय. वायू स्वत:मध्ये ओलसरपणा किंवा उष्णता सामावून घेऊ शकतो. याचा अर्थ वायूमध्ये पोकळी आहे. हेच वायूमधील आकाश तत्त्व होय. आकाशामध्येदेखील शून्यत्व किंवा अज्ञान आहे. हे त्यातील जड तत्त्व होय. म्हणून आकाशातही पृथ्वी तत्त्व आहे. आता एका भूतात बाकीची भूते किती प्रमाणात कालवली आहेत याबद्दल शास्त्रकारांमध्ये भिन्न भिन्न मतं आहेत. याची कोष्टके प्रत्येकाने निरनिराळी दिली आहेत. पण सगळ्यांचे तात्पर्य एकच की पाचही भूते एकमेकात कालवली आहेत. म्हणून एखाद्या मंदिराच्या शिखरावर पिंपळ उगवतो याचा अर्थ त्या पाषाणात आप, तेज, वायू आणि आकाश ही चारीही तत्त्वे कालवलेली आहेत.

### पाच ज्ञानेंद्रिये व पाच कर्मेंद्रिये यांचा निरास

पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश ही पंच महाभूते जड असल्याने काही नाशिवंत आहेत ते आपण पाहिले. आता पाच ज्ञानेंद्रिये व पाच कर्मेंद्रिये यांचे मिथ्यत्व पाहू.

१. गुद, २. शिश्न (वा योनि), ३. पाय, ४. हात आणि ५. वाणी. ही पाच कर्मेंद्रिये होत, तर १. नाक, २. जीभ, ३. डोळे, ४. त्वचा आणि ५. कान ही पाच ज्ञानेंद्रिये होत. आता मुळातच पंचभौतिक देह (शरीर) जड आहे आणि ही ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये पंचभूतिक असल्यामुळे जड अथवा अचेतन आहेत. केवळ डोळे पाहात नाहीत किंवा केवळ कान ऐकत नाहीत. ज्याप्रमाणे पंचमहाभूते म्हणजे मानवाचे खरे अस्तित्व नाही, त्याचप्रमाणे ही ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये म्हणजे त्याचे खरे अस्तित्व नाही. एखाद्या माणसाचा पाय कापला गेला तरी तो जिवंत राहातो. याचा अर्थ त्याचे पाय म्हणजे तो नव्हे. पाय हा त्याच्या अस्तित्वाचा एक भाग आहे. हेलन केलर ही जन्मत:च आंधळी, मुकी व बहिरी होती. याचा अर्थ ज्ञानेंद्रियांशिवाय अथवा कर्मेंद्रियांशिवाय मनुष्य जीवन जगू शकतो. तात्पर्य, या इंद्रियांना स्वत:ची चेतना नसल्यामुळे ते काही मानवाचे खरे स्वरूप नव्हे. त्याचे खरे स्वरूप आत्मा हेच आहे.

### पाच विषयांचा निरास

उपरोक्त पाच ज्ञानेंद्रिये आणि पाच कर्मेंद्रिये यांच्या द्वारे जीव पंच विषयांचे सेवन करतो. १) शब्द, २) स्पर्श, ३) रूप, ४) रस आणि ५) गंध. हे पाच विषय आहेत. हे पाच विषय माणसाला शरीर आणि जग

यांच्याशी जोडतात आणि कायमचे बांधून टाकतात. अगदी जन्मल्यापासून मनुष्य या पाच विषयांचे सेवन करत राहतो. जन्मलेले लहान मूल कोणताही आवाज ऐकताच कान टवकारून त्या दिशेने पाहू लागते. सतत शब्द ऐकून ऐकून त्याला शब्द-विषय सेवन करण्याची सवय लागते. 'आई, बाबा, काका, मामा' हे शब्द पुन्हा पुन्हा ऐकून त्याला ते शब्द परिचयाचे होतात. झोपेतून उठलेल्या मुलाला आईचे शब्द ऐकू आले नाहीत किंवा आईचा स्पर्श जाणवला नाही अथवा आईचे रूप दिसले नाही, तर ते बेचैन होते. काही दिवसांनी स्पर्शाच्या बाबतीत ते चोखंदळ होते. जमिनीवर ठेवले तर रडायला लागते. आईच्या मांडीवर किंवा कडेवर ते खुषीत असते. लहान मुलाला आईच्या कुशीत सर्वांत सुरक्षित वाटते. याचा अर्थ स्पर्शात सुरक्षिततेची भावना आहे. याबरोबरच या मुलाला जिभेने विविध रसांचा स्वाद घेण्याची सवय लागते. वेगवेगळ्या रसांचा जिभेला स्पर्श झाल्यावर लहान मुलाच्या चेहऱ्यावरचे भाव पाहण्यासारखे असतात. हळूहळू या मुलाला सुगंध आणि दुर्गंध कळू लागतो. लहानपणी मनाचे श्लोक, रामरक्षा या शब्दात ते रमते तर मोठेपणी सिनेमाच्या गाण्यातील शब्द आवडतात. लहानपणी आई-वडिलांच्या रूपाचे आकर्षण असते, तर मोठेपणी वेगवेगळी रूपं त्याला आकर्षित करतात. वयोमानापरत्वे आणि प्रसंग-परत्वे स्पर्शाचे विषय बदलतात. उन्हाळ्यात गार कपडे बरे वाटतात तर हिवाळ्यात गरम कपडे सुखदायक ठरतात. हे पंच विषय सतत बदलत असतात. लहानपणी बाहुल्यांचे आकर्षण असते तर शाळेत खेळाच्या साहित्याची आवड असते. तरुणपणी प्रपंचातील वस्तू गोळा कराव्याशा वाटतात, तर म्हातारपणी त्या सर्व वस्तूंबद्दल विरक्तदशा प्राप्त होते. आता सातत्याने बदलणाऱ्या या विषयांपैकी कोणता विषय म्हणजे मानवाचे खरे स्वरूप आहे? तो म्हणजे शब्द आहे की तो म्हणजे स्पर्श आहे. आपल्याला सापाचा स्पर्श भयावह वाटतो, पण सापाची पिले सापाला प्रेमाने कवटाळतात. तेव्हा हे सारे पंच विषय भासमान असून ते काही मानवाचे खरे स्वरूप नाही.

### अंत:करण पंचकाचा निरास

जसे आपले स्थूल शरीर आहे, तसेच सूक्ष्म शरीर देखील आहे. स्थूल शरीर डोळ्यांनी दिसू शकते, पण सूक्ष्म शरीर डोळ्यांनी दिसत नाही. सूक्ष्म शरीर आपल्याला जाणवते. प्रत्येकाला आपापले सूक्ष्म शरीर जाणवते. हे सूक्ष्म शरीर वासनात्मक किंवा वायूरूप असते. आपल्याला दुसऱ्याचे सूक्ष्म शरीर दिसत नाही अथवा जाणवतही नाही. मात्र त्या माणसाच्या स्थूल शरीराच्या वागण्यावरून सूक्ष्म शरीराचा अंदाज करता येतो. विचार हे सूक्ष्म शरीराचे प्रधान मूलद्रव्य असून या विचारांचेच पाच भाग पाडून **अंत:करण पंचक** तयार झाले. ते पाच भाग आहेत - १) अंत:करण, २) मन, ३) बुद्धी, ४) चित्त आणि ५) अहंकार. सर्वांत प्रथम विचार निर्माण होतो. त्या तरंगाला **अंत:करण** असे म्हणतात. त्याला संकल्प असे दुसरे नाव आहे. आपल्या मनात हा जो सर्वांत पहिला तरंग असतो तो आपला मूळ संकल्प होय. हा मूळ संकल्प इच्छास्वरूप असतो. आपली इच्छा किंवा संकल्प पूर्ण होईल की नाही अशी शंका निर्माण करणारा विचार तरंग निर्माण होतो. त्याला विकल्प असे म्हणतात. विकल्प या शब्दाचा पर्याय असाही अर्थ होतो. जर मूळ संकल्प पूर्ण होणार नसेल तर तडजोड स्वीकारून पर्याय मान्य करणारा विचारतरंग निर्माण होतो. संकल्प आणि विकल्प या दोन विचारतरंगांना **मन** असे म्हणतात. अशा प्रकारे अनेक संकल्प आणि विकल्प या दोन विचार तरंगांना मन असे म्हणतात. अशा

प्रकारे अनेक संकल्प आणि अनेक विकल्प यांचे विचार तरंग निर्माण होत राहतात. त्यातून एक निश्चयात्मक तरंग जन्माला येतो. तो कोणतातरी ठाम निश्चय करतो. त्याला **बुद्धी** असे म्हणतात. एकदा निश्चय झाला की त्याला कृतिरूप देण्यासाठी एका दिशेने विचारतरंग धावू लागतात. त्याला **चित्त** असे म्हणतात. ज्यावेळी प्रत्यक्ष कृती घडून अभिनिवेश निर्माण होतो, तेव्हा त्याला **अहंकार** म्हणतात.

अंत:करण पंचक म्हणजे काही पाच निरनिराळ्या वस्तू नव्हेत. आहेत सारे विचार तरंगच. काही सूक्ष्म विचारतरंग तर काही स्थूल विचारतरंग. अंत:करणाचा विचारतरंग सर्वांत सूक्ष्म तर अहंकाराचा विचार तरंग सर्वात स्थूल. म्हणजे हे पाचही भाग कल्पित आहेत. काहींनी या पाचही भागाना केवळ **मन** असे नाव दिले. आता हे मन किंवा हे विचार तरंग तरी मानवाचे खरे अस्तित्व आहे का? विचार सारखे बदलत राहातात. आवडीनिवडी सारख्या बदलत राहातात. जीवनाकडे पाहाण्याची दृष्टी बदलत राहाते. यातील नेमके काय म्हणजे मानवाचे स्वरूप आहे. मुळात मनाचे अस्तित्वच भासमान आहे. समर्थांनी तर आत्माराम या ग्रंथामध्ये मनालाच **माया** म्हटले आहे. संत ज्ञानेश्वर तर मनाचे अस्तित्वच नाकारतात. ते म्हणतात –

*"वाया मनची ना । नातरी कल्पना सावेव ।*
*हिचे कारणे जीव । दशा प्राप्त ।।"*

सतत कल्पना करत राहिल्यामुळे शरीर तयार झाले व त्यात आत्म्याचे प्रतिबिंब पडून जीवदशा प्राप्त झाली. वासनेमुळे शरीर निर्माण होत रहाते. स्वामी विवेकानंद म्हणत – 'मन विचाराच्या द्वारे शरीर तयार करते' जर मन आणि विचार सारखे बदलत असतील तर त्यातील नेमके कशाला आपले खरे अस्तित्व मानायचे? आचार्य रजनीश म्हणतात–

"Mind is a negative term. No Mind is a positive term. Mind lives through that which is not at all. Mind sits upon that which is not at all. Mind sits either on past tense or on future tense. The past tense is no more. The future tense is yet. No sooner the mind sits on present tense, than the mind disappears. Mind is non-cxistiantial."

तेव्हा मनाचे अस्तित्व सगळेच संत नाकारतात. आणि अंत:करण पंचक केवळ मानसिक आहे. याचा अर्थ हे अंत:करण पंचक म्हणजे काही मानवाचे खरे अस्तित्व नाही. एकूण ब्याऐंशी (८२) तत्त्वांतील ज्या पंचवीस (२५) तत्त्वांचा आपण निरास केला, त्याची मांडणी कोष्टक रूपाने पुढीलप्रमाणे करता येईल.

**पंचवीस तत्त्वे**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) भूत पंचक → | १ आकाश | २ वायू | ३ तेज | ४ आप | ५ पृथ्वी |
| २) कर्मेंद्रियपंचक → | ६ वाणी | ७ हात | ८ पाय | ९ जननेंद्रिय | १० गुद |
| ३) ज्ञानेंद्रियपंचक → | ११ कान | १२ त्वचा | १३ डोळे | १४ जीभ | १५ नाक |
| ४) विषय पंचक → | १६ शब्द | १७ स्पर्श | १८ रूप | १९ रस | २० गंध |
| ५) अंत:करणपंचक → | २१ अंत:करण | २२ मन | २३ बुद्धी | २४ चित्त | २५ अहंकार |

समर्थ रामदासांच्या मते सर्व प्राण्यांचे अंत:करण एकच आहे. समर्थ जाणिवेला अंत:करण असे म्हणतात. अंत:करण या शब्दात मन, बुद्धी, चित्त, अहंकार यांच्यासह अंत:करण पंचकाचा अंतर्भाव होतो. दगड, लाकूड

आणि जड पदार्थांत अंत:करण नसते. जाणीव नसल्यामुळे तेथे आत्म्याची अभिव्यक्ती नसते. या सर्व जड पदार्थांमध्ये आत्मचैतन्य आहे, पण अंत:करण नसल्यामुळे आत्म्याची अभिव्यक्ती नाही. वनस्पती सृष्टीमध्ये सौम्य प्रमाणात अंत:करण विकसित झालेले असते. त्यामुळे वनस्पतींना थोड्याफार प्रमाणात भावभावना असतात. मनुष्य योनीत अंत:करणाचा संपूर्ण विकास झालेला आढळतो. तर पशू योनीत ही जाणीव क्रमशः विकसित होत असते. ही जाणीव नसेल तर मनुष्य आणि दगड यांत काहीच फरक राहाणार नाही. माणसाचा मृत्यू होतो तेव्हा त्याच्या शरीरातून आत्मा निघून जात नाही. आत्मचैतन्य मृतदेहात सुद्धा असते. मरण पावलेल्या माणसाच्या शरीरातून अंत:करण निघून जाते म्हणून अभिव्यक्ती नसते. त्यामुळे 'मृतात्म्यास शांती लाभो' किंवा 'आत्म्यास सद्‌गती लाभो' या विधानापाठीमागे कितीही सद्‌भावना असल्या तरी आध्यात्मिकदृष्ट्या हे वाक्‌प्रयोग सदोष आहेत. सद्‌गती मिळायला हवी ती त्या अंत:करणाला. एका शरीरातून बाहेर पडलेले अंत:करण पुन्हा दुसऱ्या स्त्रीच्या शरीरात प्रवेश करते आणि तिथे नवीन शरीरात धारण करते. प्रत्येक नवनवीन शरीरात अंत:करण विकसित होत राहते. संतांच्या जीवनात अंत:करणाचा सर्वांत जास्त विकास पाहायला मिळतो.

समर्थ जेव्हा सर्वांचे अंत:करण एक आहे असे म्हणतात, तेव्हा सर्व प्राणिमात्रांची जाणीव एकसारखी आहे असे म्हणतात. सर्वांना भूक लागते, सर्वांना तहान लागते, सर्वांना जगावेसे वाटते. सर्वांना कामविकार आहे, सर्वांना भीती आहे, सर्वांना प्रेम करावेसे वाटते, सर्वांना मृत्यूची भीती वाटते या अर्थाने सगळ्यांचे अंत:करण सारखे आहे. सापाला पाहून माणूस पळून जातो व माणसाची चाहूल लागताच साप पळू लागतो. दिसायला हे परस्परविरोधी दिसते. पण जगण्याची इच्छा ही जाणीव दोन्ही ठिकाणी सारखीच आहे आणि म्हणून दोघे एकमेकांपासून दूर पळतात. य:कश्चित किड्यापासून ब्रह्मदेवापर्यंत ही जाणीव असून ती क्रमश: विकसित होत जाते. जाणिवातीत होणे हा जाणिवेच्या विकासाचा अंतिम टप्पा होय.

**पंचभौतिक पंचवीस विषयांचा निरास**

शास्त्रामध्ये प्रत्येक महाभूताचे विषय दिले आहेत. उदा. १) काम, २) क्रोध, ३) शोक, ४) मोह व ५) भय. हे आकाशाचे पाच विषय आहेत. अशा प्रकारे वृत्तीचे तरंग शरीरातील अवकाशात निर्माण होतात. म्हणून याला आकाशाचे पाच विषय म्हटले आहे. पूज्य विमलाजी ठकार यांच्या मते माणसाच्या शरीरातील आकाशातून हे पाच विषय विसर्जित झाले असतील तर त्या माणसाला आत्मज्ञान झाले असे समजावे. यालाच अंत:करणाची शुद्धी असे म्हणतात. जप, तप, ध्यान-धारणा, व्रतवैकल्ये या सर्व साधना या पंच विषयांच्या निवृत्तीसाठी आहेत. आकाशाचे हे पाचही विषय मानसिक असल्यामुळे हे मानवाचे खरे अस्तित्व नाही. मुळात सारे विकार विचारात्मक असून आपल्या सर्व साधनापद्धती आपल्याला निर्विचार बनविण्याचा प्रयत्न करतात. निर्विचार स्थितीत अंत:करणाला आत्मदर्शनाचा लाभ होतो. १) चळण, २) वळण, ३) प्रसारण, ४) निरोध व ५) आकुंचन. हे पाच वायूचे विषय आहेत. वारा हालतो, तो वेगवेगळ्या दिशेने वळतो, कधी तो सर्वत्र पसरतो तर कधी विशिष्ट भागातच पसरतो. काही वेळेला वायू अगदी स्तब्ध असतो. अशा वेळी झाडावरचे एकही पान हालत नाही. याउलट वायूचे प्रसरण होत असताना झाडाच्या फांद्यादेखील हलतात. वायू हा कितीही सूक्ष्म असला तरी त्याला जाणीव नाही. त्यामुळे ही पाचही तत्त्वे म्हणजे मानवाचे खरे अस्तित्व नव्हे.

१) भूक, २) तहान, ३) आळस, ४) झोप आणि ५) मैथून हे पाच तेजाचे गुणधर्म आहेत. या पाचही गोष्टींचा अग्नी तत्त्वाशी संबंध आहे. भूक लागते तेव्हा आपण पोटात आगीचा डोंब उसळला असे म्हणतो. मैथून प्रसंगी शरीरामध्ये जास्त उष्णता निर्माण होते. सतत झोपून राहिल्यामुळे देखील शरीर गरम होते. तेजाचे गुणधर्म इंद्रियांशी निगडित असल्यामुळे आणि इंद्रिये जड असल्यामुळे हे मानवाचे खरे अस्तित्व नाही. शिवाय या पाचही गोष्टी नसताना देखील मानवाचे अस्तित्व असतेच म्हणून मानव या पाच तत्त्वांपेक्षा निराळा आहे. अनेक साधूंनी ब्रह्मचर्याचे पालन केले, लक्ष्मण चौदा वर्षे वनवासात झोपलाच नाही. रामकृष्ण परमहंस अनेक वर्षे झोपले नव्हते. पूर्वी एका शंकराचार्यांनी ७२ दिवस उपोषण केले होते. याचा अर्थ भूक, तहान, झोप, मैथून यांच्याशिवाय माणसाचे अस्तित्व असू शकते.

१) रेत (शुक्राणू), २) रक्त, ३) लाळ, ४) मूत्र आणि ५) घाम. हे पाच आपाचे विषय आहेत. या पाचही गोष्टी स्थूल असून त्यांना स्वतःची जाणीव नाही. तसेच ते जड आहेत. यातील नेमके काय म्हणजे मानवाचे खरे स्वरूप आहे? मानवाच्या शरीराचे ते अंश असतील, पण मानव म्हणजे रक्त नव्हे किंवा घाम नव्हे. म्हणून मानव या सर्वांपेक्षा निराळा आहे.

१) हाडे, २) मांस, ३) त्वचा, ४) नाडी आणि ५) रोम. हे पाच पृथ्वीचे विषय आहेत. हे पाचही पदार्थ जड असून त्यांना स्वतःची जाणीव नाही. मानवाच्या शरीराचे ते विभिन्न अंश आहेत. हाडांच्या जागी स्टीलच्या पट्ट्या बसवता येतात तर प्लॅस्टिक सर्जरी करून त्वचा बदलता येते व कृत्रिम त्वचा तयार करता येते. डोक्यावरचे केस काढल्याने मानवाचे अस्तित्व नाहीसे होत नाही किंवा डोक्यावर कृत्रिम केसांचा टोप चढवून त्याचे आयुष्य वाढत नाही. तेव्हा पृथ्वी तत्त्वाच्या या पाच विषयांपेक्षा मानव हा निराळा आहे. हे पंचवीस (२५) विषय कोष्टकाच्या रूपाने पुढील प्रमाणे मांडता येतील –

**पंचवीस विषय**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) आकाश | १. काम | २. क्रोध | ३. शोक | ४. मोह | ५. भय |
| २) वायू | ६. चळण | ७. वळण | ८. प्रसारण | ९ निरोध | १०. आकुंचन |
| ३) तेज | ११. भूक | १२. तहान | १३. आळस | १४ झोप | १५. मैथून |
| ४) आप | १६. रेत (शुक्राणू) | १७. रक्त | १८. लाळ | १९ मूत्र | २०. घाम |
| ५) पृथ्वी | २१. हाडे | २२. मांस | २३. त्वचा | २४ नाडी | २५. रोम |

**चार देहाच्या बत्तीस तत्त्वांचा निरास**

यापूर्वी कोष्टकात दिल्याप्रमाणे पन्नास (५०) तत्त्वांचा आपण निरास केला. ही सारी तत्त्वे नाशिवंत असून जड आहेत हे आपण पाहिले. याखेरीज समर्थ रामदासांनी आणखी बत्तीस (३२) तत्त्वाची कल्पना मांडली आहे. चार देहाची संकल्पना या बत्तीस (३२) तत्त्वांचा मूळ आधार आहे. आपण यापूर्वी पंचभौतिक स्थूल देह पाहिला. त्याचप्रमाणे अंतःकरण पंचकाचा सूक्ष्म देह पाहिला. याखेरीज कारण आणि महाकारण असे दोन देह शास्त्रात कल्पिले आहेत. सूक्ष्म देह वासनात्मक आहे. अज्ञान हे वासनेचे कारण आहे. म्हणून अज्ञानाला कारण देह असे म्हणतात. याखेरीज ज्ञान ही देखील अवस्था आहेच. त्याल महाकारण देह (शरीर) म्हणतात. आता चारही देहांचा निरास करावा लागतो याचा अर्थ ज्ञानाचाही निरास करावा लागतो. ज्ञानाचा निरास म्हणजे मी

ज्ञानी आहे या जाणिवेचा निरास. जोपर्यंत जाणीव आहे तोपर्यंत खाली घसरण्याची शक्यता आहे. म्हणून जाणिवातील अवस्था प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. 'सकळ अवघेची जाणावे। जाणोनी टाकोनी द्यावे।।'' असे समर्थ म्हणतात. म्हणून महाकारण देहाला देखील चिकटून बसायचे नाही. या चार देहांचे समर्थ रामदासांनी चार अवस्था, चार अभिमान, चार स्थाने, चार भोग, चार मात्रा, चार गुण आणि चार शक्ती कल्पिल्या आहेत. या बत्तीस (३२) तत्त्वांचे कोष्टक पुढीलप्रमाणे मांडता येईल–

परंतु शाक्त मताप्रमाणे सर्वत्र सुप्रसिद्ध असलेले छत्तीस (३६) तत्त्व याप्रमाणे आहेत – **(क)** अठरा (१८) तत्त्वे आहेत – शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध (५) मन, बुद्धी, अहंकार, गुण आणि प्रकृति (५) पुरुष, नियति, काल, माया, विद्या, ईश्वर, सदाशिव आणि शक्ति (८) **[१८] (ख)** नौ (९) तत्त्व – प्रकृति, पुरुष, नियति, काल, माया, विद्या, ईश्वर, सदाशिव आणि शिव (९) **[९] (ग)** पंच (५) तत्त्व – पृथ्वी, जल (आप), तेज, वायू व आकाश **[५] (घ)** तीन (३) तत्त्व – आत्म-तत्त्व (विज्ञानाकल पर्यंत), विद्यातत्त्व (ईश्वरपर्यंत) आणि शिवतत्त्व (शेष सर्व तत्त्व) **[३]** आणि **(च)** एक (१) तत्त्व – अर्थात शिवतत्त्व **[१]**

**देहाची बत्तीस तत्त्वे**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) चार देह | १. स्थूल | २. सूक्ष्म | ३. कारण | ४. महाकारण |
| २) चार अवस्था | ५. जागृती | ६. स्वप्न | ७. सुषुप्ती | ८. तुर्या |
| ३) चार अभिमान | ९. विश्व | १०. तैजस | ११. प्राज्ञ | १२. प्रत्यगात्मा |
| ४) चार स्थाने | १३. नेत्र | १४. कंठ | १५. हृदय | १६. मूर्धन् (टाळू) |
| ५) चार भोग | १७. स्थूल | १८. प्रविविक्त | १९. आनंद | २०. आनंदावभास |
| ६) चार मात्रा | २१. अकार | २२. उकार | २३. मकार | २४. अर्धमात्रा |
| ७) चार गुण | २५. तम | २६. रज | २७. सत्त्व | २८. शुद्ध सत्त्व |
| ८) चार शक्ती | २९. क्रिया | ३०. द्रव्य | ३१. इच्छा | ३२. ज्ञान |

प्रथम आपण **चार अवस्थांचा** विचार करू

**१) जागृती –** या अवस्थेमध्ये इंद्रिये आणि मन दोन्ही जागे असतात. अर्थात ही जागृती केवळ व्यावहारिक सावधानतेच्या पातळीवरील आहे. संत ज्याला जागृती म्हणतात ती आत्मबोधाच्या पातळीवरील होय. हा जागृती शब्द निद्रा या शब्दाच्या विरोधात आला आहे. म्हणजेच निद्रेचा अभाव.

**२) स्वप्न –** या अवस्थेत इंद्रिये झोपलेली असतात पण मन जागे असते. त्यामुळे दिवसभराच्या व्यवहाराचे जे ठसे मनावर उमटले आहेत त्याची कॅसेट स्वप्नामध्ये चालू असते.

**३) सुषुप्ती –** या अवस्थेत मन आणि इंद्रिये ही दोन्ही झोपलेली असतात. हीच गाढ निद्रेची अवस्था होय.

**४) तुर्या –** या अवस्थेमध्ये इंद्रिये जागी असतात आणि मन आत्म्याच्या अनुसंधात असते. इंद्रियांना दृष्य विश्वाची जाणीव असते. तर मनाला विश्वाच्या अधिष्ठान चैतन्याची जाणीव असते. उन्मनी अवस्था ही शुद्ध ज्ञानाची अवस्था मानली जाते. उन्मनी अवस्थेत मन शिल्लक राहात नाही. ते आत्मस्वरूपात लीन झालेले

असते. अशा अवस्थेत फक्त आत्मस्वरूपच दिसते. इंद्रियांना दृष्य विश्वाचे भान नसल्यामुळे वागण्यात एक प्रकारचा तऱ्हेवाईकपणा येऊ शकतो. या चारही अवस्था मनाच्या पातळीवरील असतात, पण मन हे मायिक असल्यामुळे मानवाचे खरे स्वरूप या चार अवस्थांच्या पलीकडचे आहे.

१) विश्व, २) तैजस, ३) प्राज्ञ आणि ४) प्रत्यगात्मा हे **चार देहांचे अभिमान** आहेत. जागृती अवस्थेत आपल्याला देहाच्या अस्तित्वाची सतत जाणीव असते. त्याला **विश्व** अभिमान असे म्हणतात. स्वप्न पडत असताना मन त्याच्याशी एकरूप होते व मनाला भय निर्माण होते. सूक्ष्म देहाच्या या अभिमानाला **तैजस** असे म्हणतात. आपण सकाळी झोपेतून उठलो की गाढ झोप लागल्याचे आठवते. याचा अर्थ गाढ झोपेतही हा शांत मी अस्तित्वात होताच. त्याला कारण देहाचा **प्राज्ञ** अभिमान असे म्हणतात. तुर्या अवस्थेमध्ये एकीकडे दृष्य जगत पाहाणारा आणि त्यातील चैतन्याचे अनुसंधान करणारा जो साक्षीरूप अंतरात्मा असतो त्याला महाकारण शरीराचा **प्रत्यगात्मा** अभिमान म्हणतात. शास्त्रामध्ये हे चार अभिमान ज्या ठिकाणी वास करतात त्याच्या जागा सांगितल्या आहेत. स्थूल देहाचा विश्व अभिमान **नेत्रामध्ये** असतो. सूक्ष्म देहाचा तैजस अभिमान **कंठामध्ये** असतो. कारण देहाचा प्राज्ञ अभिमान **हृदयामध्ये** असतो. तर महाकारण देहाचा प्रत्यगात्मा अभिमान **टाळूमध्ये** असतो. ही चारही स्थाने पंचभौतिक असल्यामुळे आणि पंचभौतिक शरीर नाशिवंत असल्यामुळे मानवाचे हे खरे स्वरूप नाही.

१) स्थूल, २) प्रविविक्त, ३) आनंद आणि ४) आनंदावभास हे **चार भोग** आहेत. जागृतीमध्ये स्थूल देहाद्वारे आपण जे भोग भोगतो त्याला **स्थूल** भोग असे म्हणतात. स्वप्नामध्ये देखील आपण भोग भोगतो, पण स्वप्नातील भोग स्थूल नसतो. **प्रविविक्त** भोग असे त्याचे नाव आहे. प्रविविक्त म्हणजे निवडलेला होय. दिवसभरातील व्यवहारातील आदी अनुभूती मी स्वप्नात पुन्हा भोगण्यासाठी निवडतो म्हणून त्याला प्रविविक्त असे म्हणतात. कारण शरीराला झोपेचा जो आनंद मिळतो त्याला **आनंद** भोग असे म्हणतात. तुर्याअवस्थेमध्ये आत्मबोधाच्या जाणिवेचा एक आनंद असतो. हा आनंद द्वैताचा असला तरी तो अद्वैत ज्ञानाच्या जवळ नेणारा आहे. महाकारण शरीराच्या या भोगास **आनंदावभास** असे म्हणतात. हे सारे विश्व ॐकारातून निर्माण झाले. **ॐकाराच्या चार मात्रा** आहेत. त्यांतील **अकार** मात्रा स्थूल शरीराची, **उकार** मात्रा सूक्ष्म शरीराची, **मकार** मात्रा कारण शरीराची, **अर्धमात्रा** महाकारण शरीराची आहे. हे चारही देह नाशिवंत असल्यामुळे या चार मात्रा हे काही मानवाचे खरे स्वरूप नव्हे.

शास्त्रामध्ये **तीन गुण** सांगितले आहेत. त्याची नावे **सत्त्व, रज** आणि **तम** अशी आहेत. यामध्ये समर्थ रामदासांनी महाकारण शरीरासाठी **शुद्धसत्त्व** हा **चौथा गुण** कल्पिला आणि या चारही गुणाची सांगड **चत्वार देहाशी** घातली. हे चारही गुण वृत्तीचे तरंग असल्यामुळे व मानवाचे खरे स्वरूप वृत्ती शून्य असल्याने तो या सर्व तत्त्वांपेक्षा निराळा आहे.

मानवी मनाच्या **चार शक्ती** आहेत. १) क्रियाशक्ती, २) द्रव्यशक्ती, ३) इच्छाशक्ती आणि ४) ज्ञानशक्ती. स्थूल शरीराद्वारे मनुष्य कर्म करू शकतो. त्याला **क्रियाशक्ती** असे म्हणतात. सूक्ष्म शरीराद्वारे माणूस विचार करतो. त्याला **द्रव्यशक्ती** असे म्हणतात. कारण शरीर हे अज्ञानात्मक असून आपल्या सगळ्या **इच्छा** म्हणजे आपले अज्ञानच होय. इच्छेमुळे कारण शरीर तयार होते. इच्छेमुळे जे दुःख होते त्यातून मुक्त

होण्यासाठी महाकारण शरीरात **ज्ञानाची** सुद्धा शक्ती आहे. शुद्ध ज्ञानासाठी या चारही शक्तींच्या पलीकडे जावे लागते. अशा प्रकारे या पूर्वीची पन्नास (५०) तत्त्वे आणि चत्वार देहाची बत्तीस (३२) तत्त्वे या सगळ्यांचा निरास आपण केला. मानवाचे खरे स्वरूप या ब्याऐंशी (८२) तत्त्वांच्या पलीकडे आहे. मानवाचे देह या ब्याऐंशी (८२) तत्त्वांचे गाठोडे असून आत्मनिवेदनाद्वारे या तत्त्वांचा निरास करून आत्मबोध प्राप्त करून घ्यावयाचा आहे. ब्याऐंशी (८२) तत्त्वांचा निरास ही नकारात्मक साधना झाली. तत्त्वांचा झाडा केल्यामुळे मानव काय नाही हे लक्षात आले, पण सोऽहम साधना ही भावात्मक असून त्यामध्ये आपण आत्मस्वरूप आहोत याचे सतत अनुसंधान अपेक्षित आहे. सोऽहम साधनेला समर्थांनी अजपा जप नाव दिले आहे. कारण हा जप आपण करावयाचा नसतो. श्वासोच्छ्वासाबरोबर हा जप चालूच असतो. आपण फक्त तो ऐकायचा असतो. म्हणून आत्मबोधासाठी सोऽहम साधना उपयोगी आहे.

### ७) सुप्रसिद्ध सूफ़ी संत ख्वाजा बंदानवाज़प्रणीत तत्त्व–विवेचन[५४]

गुलबर्गा निवासी सुप्रसिद्ध सूफी संत ख्वाजा बंदानवाज़ 'गेसूदराज़' (दीर्घकेशी) हे दक्षिण भारतातील सूफी तत्त्वज्ञानाचे अध्वर्यू गणले जातात. यांनी आपले दरवनी हिंदी ग्रंथ ''तिलावतुल वजूद'' (देह संकीर्तन), ''शिकारनामा'' (आखेटगाथा) नामक कूटकाव्य आणि ''मेअराजुल आशिक़ीन'' (भक्तांचे उत्कर्ष सोपान) यामध्ये महाभूते व देह यांचे विवेचन प्रस्तुत केले आहे. वास्तविक सूफी तत्त्वज्ञानामध्ये पृथ्वी, आप, तेज आणि वायू ही चार महाभूते मान्य असतानासुद्धा ख्वाजा बंदानवाज़ यांनीच सर्वप्रथम भारतीय तत्त्वज्ञानप्रणीत पंचमहाभूताची संकल्पना उचलून धरली आहे. परिणामी आकाशाची गणना महाभूतांमध्ये नसतानासुद्धा यांनी आकाशास पाचव्या महाभूताची मान्यता दिली. कदाचित ही त्यांची समन्वयात्मक दृष्टी असावी. या संबंधात त्यांनी असा शेरा मारला आहे की जो कोणी या पाच तत्त्वांना चांगल्या प्रकारे जाणतो, तोच अध्यात्मविद्येस समजू शकतो.

आकाश हेही भूत मानले पाहिजे, कारण ज्याचा विशेष गुण बाह्य इंद्रियाने ग्राह्य असतो ते भूत असे भूतत्वाचे लक्षण असल्याने, शब्द हा ज्याचा विशेष गुण आहे ते आकाश मानलेच पाहिजे. आकाशच शब्दगुणाचा आश्रय आहे. बाकीची इंद्रिये व त्यांचे इतर भूतांशी असलेले संबंध तसे व्यवस्थित आहेत तशीच व्यवस्था श्रोत्र हे पृथक इंद्रिय, शब्द हा गुण व आकाश हे भूत यांमध्ये आहे. कोणतेही भूत अथवा द्रव्य त्याच्या गुणाच्या द्वाराच जाणले जाते. येथे भूत हे अनुमेयच असते. जसे स्पर्शावरून डोळ्यांस न दिसणाऱ्या वायूचे अनुमान करतात, तसेच शब्दावरून आकाशाचे करणे योग्य आहे.

डॉ. श्रीराम शर्मा यांच्या मतानुसार सांख्य दर्शनच नव्हे, तर इतर हिंदू तत्त्वज्ञानामध्ये ही गोष्ट वारंवार सांगितली गेली आहे की जी व्यक्ती सृष्टीच्या निमित्त आणि उपादान कारणांस अर्थात प्रकृती, पुरुष, गुणतत्त्व, तन्मात्रा इत्यादीस जाणते ती (व्यक्ती) नि:श्रेयस प्राप्त करते. मात्र इस्लाममध्ये पंचतत्त्वांच्या आत्मसातामुळे (माहितीमुळे) ईश्वरप्राप्ती होत असते, याचा उल्लेख नाही. यावरून स्पष्ट होते की पंचमहाभूतांची ही संकल्पना 'गेसूदराज' यांनी भारतीय तत्त्वज्ञानापासून उचललेली आहे.


उपरोक्त ग्रंथांच्या आधारे ख्वाजा बंदानवाज़प्रणीत तत्त्व आणि देह यांचा निरास पुढीलप्रमाणे मांडता येऊ शकते–

**१] ''तिलावतुलवजूद'' (देहसंकीर्तन) या ग्रंथानुसार तत्त्व विवेचन व देहसंकीर्तन**

महान सूफी संत ख्वाजा बंदा नवाज़ यांनी सहा दर्शन आणि छत्तीस पाखंड मानले आहेत. १) नफ़्स (वासना), २) दिल (चित्त), ३) रूह (आत्मा), ४) सिर्र (मर्म), ५) नूर (प्रकाश, ज्योती) आणि ६) ज़ात (परम सत्ता). हे सहा दर्शन आहेत. पाच तत्त्व (महाभूते), पंचवीस गुण, साधनेमधील प्रयुक्त होणारे नामस्मरणाचे पाच प्रकार आणि एक प्रेम (ईश प्रेम) हे सर्व मिळून छत्तीस पाखंड आहेत. मानवास ओळखण्यासाठी पाच पटले (पडदे) असतात. हे पाच पडदे म्हणजे नामस्मरणाचे पाच प्रकार होत. ते पुढीलप्रमाणे आहेत –

१) जली अर्थात वाचिक नामस्मरण – स्थूल देह वाणी, २) कल्बी अर्थात मानस जप – लिंग देह वाणी, ३) रूही अर्थात आत्मिक जप – कारण देह वाणी, ४) सिर्री अर्थात अव्यक्त जप – महाकारण देह वाणी, ५) ख़फ़ी अर्थात अंत:स्थ जप – ईश्वर वाणी

'बोले तैसा चाले' चे आव्हान करून बंदानवाज़ पाच तत्त्वांच्या उत्पत्तिसंबंधात प्रकाश टाकताना स्पष्ट करतात की परम सत्ते (ज़ात) पासून शून्य निर्माण झाले आणि १) या शून्यापासून वायू, २) वायूपासून तेज, ३) तेजापासून आप, ४) आपपासून पृथ्वी (माती) आणि ५. मातीपासून जीवाची उत्पत्ती झाली. म्हणून मातीचे जीव पाणी, पाण्याचे जीव अग्नी, अग्नीचे जीव वायू, वायूचे जीव शून्य आणि शून्याचे जीव परमसत्ता. हे चक्र पुढील आकृतीवरून स्पष्ट होईल–




**आकृती १२**

पंचमहाभूतांचा उल्लेख करूनच बंदानवाज़ थांबले नाहीत, तर त्यांच्यामधील परस्पर प्रतिद्वंद्वितेचा उल्लेख पण त्यांनी केले आहे. ते याप्रमाणे -

मातीचा प्रतिद्वंद्वी पाणी

पाणी अग्नीचा प्रतिद्वंद्वी

अग्नी वायूचा प्रतिद्वंद्वी

वायू शून्या(आकाशा)चा प्रतिद्वंद्वी

शून्य ईश्वराचा प्रतिद्वंद्वी आहे.

त्यानी १) स्थूल देह, २) लिंग देह, ३) कारण देह आणि ४) महाकारण देह या चार देहांचे वर्णन पुढीलप्रमाणे प्रस्तुत केले आहे-

**१) वाजिबुलवजूद - स्थूल देह**

स्वत:साठी कोणतेच अस्तित्वाची गरज न राखणारे अस्तित्व. हे स्वत:मध्ये पूर्ण असते. ही अस्तित्वाची अनिवार्यता आहे. मन दगडासारखा कठोर. नफ़्स अम्मारा अर्थात दुष्टात्मा. ही पापाकडे प्रवृत्त करणारी वासना आहे. देवदूत मीकाईल. बुद्धी अनुमान. आत्मा वासनामूलक. स्थळ पाशविक, शैतानी. मार्ग शरीयत अर्थात विधी-विधान. उद्दिष्ट नासूत अर्थात भुव:लोक. त्याची कार्ये - इतरास पाहाणे, वाईट गोष्टी ऐकणे, वाईट बोलणे, वाईट कर्मे करणे, अहंकार, द्वेष, अहंमना, चाडी-चुगली करणे, लोभ, कृपणता, लालुच, वर्जित कामे करणे, अनेकेश्वरवादामध्ये निष्ठा, कपट, कृतघ्नता, कामवासना, इतरांस त्रास देणे. ही सर्व कामे वाईटाकडे प्रवृत्त करणारी आहेत म्हणजेच ही कर्मे 'अम्मारा'ची आहेत. वासना तर कुप्रवृत्तीकडे खेचते. पवित्र कुराणामध्ये सांगितले गेले आहे की तुम्हास वाईटाकडे प्रवृत्त करणारी वासना हीच असते. तुम्ही तिकडे ढुंकूनही पाहू नये.

**२) मुमकिनुलवजूद - लिंग देह**

हे दुसऱ्या अस्तित्वावर निर्भर असलेले अस्तित्व आहे. ही अस्तित्वाची संभावना आहे. मन नफ़्स लव्वामा दुष्टता अवरोधक भाव किंवा वासना आहे. दुष्टतेपासून परावृत्त करणारा असा मानसिक भाव. हा पापकर्म करण्यापासून माणसास रोखून धरतो. तो पापाची निंदा करतो. रूह अर्थात आत्मा पवित्र. देवदूत इस्राफील. साक्ष आत्मविस्मृती. मार्ग तरीकत म्हणजेच धर्माचरण प्रणाली अथवा ईश पथानुभव. उद्दिष्ट जनलोक. त्याची कार्ये - ईश्वरनिष्ठ मांदियाळीचे दर्शन घेणे, ज्ञान प्राप्त करणे, उपासना करणे (नमाज पडणे), उपवासव्रत करणे, सत्संग करणे, ईश्वरस्मरणामध्ये मग्न होणे, दानधर्म करणे, विरक्त-फ़क़ीर लोकांशी स्नेह राखणे. ही कामे 'लव्वामा'ची आहेत. पवित्र कुराणाच्या (या) श्लोकाद्वारे प्रमाणित होते - ''आणि जो कोणी आपल्या इंद्रियांना वासनेपासून अलिप्त ठेवतो त्याचे स्थान स्वर्ग ('जन्नत') आहे.'' अर्थात जो कोणी अहंकारापासून मुक्त असेल तो ईश्वरीय सौंदर्याच्या स्वर्गामध्ये प्रवेश करेल.

**३) मुमततुलवजूद- कारण देह**

हा दिसत नाही आणि शिवाय बोधगम्य पण नाही. हे संपूर्णपणे निरपेक्ष अस्तित्व असते. ही अस्तित्वाची प्रशांतता आहे. मन अंधकार समूह. नफ़्स मुतमइन्ना - अर्थात प्रशांत आत्मा. हा चांगुलपणाकडे अनुरक्त करतो-ओढतो आणि वाईटापासून दूर ठेवतो आणि अशा प्रकारे तो नेहमी शांतचित्त असतो. याला नफ़्स

मुतमइन्ना म्हणतात. बुद्धी अनुमान. देवतूद इज्राईल. साक्ष चांगुलपणा. उद्दिष्ट तप:लोक. मार्ग वास्तविक ज्ञान. आत्मा शुद्ध. विचार आत्म्याशी निगडित. कार्य विस्मरण होणे, ध्यानमग्न राहणे. याचे कौराणिक प्रमाण म्हणजे हा श्लोक – ''(आणि ज्या आत्म्याला परमेश्वराकडून शांती होय त्यास सांगितले जाईल की,) हे शांती पावणाऱ्या आत्म्या! तू आपल्या प्रभूकडे परत चल. तू त्याच्यावर प्रसन्न आणि तो तुजवर प्रसन्न. मग (परमेश्वर त्याला आज्ञा करील की) माझ्या निवडक (खास) सेवकां(भक्तां)मध्ये प्रविष्ट हो आणि माझ्या स्वर्गांत प्रविष्ट हो.'' ८९:२७–३०

**४) आरिफ़ुल वजूद – महाकारण देह**

हे बोधगम्य अस्तित्व असते. हे एका परीने अस्तित्वाचे बोध आहे. मन पवित्र. नफ़्स मुलहिमा अर्थात दैवी आत्मा, ईश प्रेरित आत्मा, उद्दीप्त आत्मा. बुद्धी जागरूक (परिचित) देवदूत जिब्रील. विचार ईश्वरी अर्थात रहमानी. आत्मा –ऊर्ध्व, उच्च. साक्ष उन्मत्तता. मार्ग ब्रह्मज्ञान, रहस्यज्ञान (मारिफ़त) उद्दिष्ट लाहूत अर्थात प्रथम सत्यलोक. स्थळ ईश्वराच्या जवळ म्हणजेच ईश सान्निध्य. याचे कार्य ईश्वराचे दर्शन करणे, ईश्वरासमक्ष उपस्थित होणे, आत्मविस्मृत होणे, ईश्वर मीलनाचे आनंद उपभोगणे आहे. हे सिद्ध करताना गेसूदराज (अर्थात दीर्घकेशी) यांनी पवित्र कुराणाचे पुढील श्लोक उधृत केले आहे – ''(हा तो दिवस असेल की,) ज्या दिवशी कोणीही मनुष्य दुसऱ्या मनुष्याच्या कामी येणार नाही! आणि त्या दिवशी (केवळ) अल्लाहचीच सत्ता असेल.'' ८२:१९ मानवाचे अंत:करण – चित्त हे ईश्वराचे राहण्याचे ठिकाण आहे. जो आत्मचिंतन करतो, त्याला ईश्वराच्या अस्तित्वाविषयी मुळीच शंका नसते. परमेश्वराच्या सत्तेशिवाय इतर सर्व नाशवान आहेत. जे काही माणूस पाहतो आणि विचार करतो ते सर्व ईश्वरास ठावूक (ठाऊक) असते. तो तुम्हा लोकांना नित्य पहात असतो तर मग तो तुला कसे बरे विसरेल?

**२] ''शिकारनामा'' (आखेटगाथा) या कूटकाव्यानुसार तत्त्व–निरूपण**

या कूटकाव्याची तत्त्वनिदर्शक संहिता अशी आहे – ''नौ पिता आणि सात मातांचे आम्ही चार पुत्र आहोत. (हे) चारी मिळून (एकत्र) बाजारास गेले. तो बाजार चोवीस तत्त्वांचा होता. त्या बाजारामध्ये चार कमानी (धनुष्य) होत्या. ....... तेथे चार घरे होती. ....... तेथे त्यानी पाच गज जमीन खणली (खोदली). ........ (आणि) घाघर हाती लागली.''

उपरोक्त संहितेची उकल सूफी तत्त्वज्ञानाच्या भाषेत अशा प्रकारे होते – नौ पित्यांचा प्रथम अर्थ आहे – १) नासूत, २) मलकूत, ३) जबरूत, ४) लाहूत, ५) हाहूत, ६) याहूत, ७) माहूत, ८) नसीरा आणि ९) महेमूदा म्हणजेच क्रमश: पुढील नौ लोक – १) भुव: लोक, २) जनलोक, ३) तप:लोक, ४) सत्यलोक (प्रथम), ५) कौमारलोक, ६) शक्तिलोक, ७) शिवलोक, ८) विष्णुलोक आणि ९) सत्यलोक (द्वितीय).

नौ पित्यांचा दुसरा अर्थ होतो सप्त आकाश, राजसिंहासन ('अर्श') आणि केवल सत्ता (अज़्ज़ात)

नौ पित्यांचा तिसरा अर्थ मानवी देहाच्या अवयवांशी निगडित आहे. तो असा – १) मुख (तोंड), २) व ३) दोन डोळे, ४) नाक, ५) व ६) दोन कान, ७) मेंदू, ८) गुदद्वार आणि ९) मूत्रेंद्रिय.

सप्त मातांचा अर्थ आहे सप्त पृथ्वी. याचा पण मानवी देहाच्या अवयवांशी संबंध जोडल्यास असा आशय निघतो – १) हृदय, २) यकृत, ३) फुफ्फुस, ४) पित्ताशय, ५) मेंदू, ६) (वजडी) जठर, व ७) आतडे.

माता-पिता एकत्रितपणे संसार करीत असल्यामुळे त्यांना पुत्रप्राप्ती होणे स्वाभाविक आहे. मानवाच्या शारीरिक अवयवाची परस्पर कार्यप्रणाली पुढीलप्रमाणे होत असते – मुख (तोंड) हृदयाचे पाणी पिऊन असते (शब्दश: आशय– तोंडाने हृदयाचे पाणी गिळले). दोन्ही डोळे यकृताचे पाणी पितात. नाकपुड्या फुफ्फुसाचे पाणी पितात. कान पित्ताशयाचे पाणी ग्रहण करतात. डोक्याचे केस मेंदूचे पाणी पिऊन वाढत असतात. गुदद्वार (वजडीचे) जठराचे पाणी शोषून घेत असते आणि जिव्हा आतड्यांचे पाणी पित असते.

चार पुत्र आहेत – १) नफ़्स अम्मारा, २) नफ़्स लव्वामा, ३) नफ़्स मुलहिम्मा आणि ४) नफ़्स मुतमइन्ना. हे सर्व मानवी वासनेचे प्रकार आहेत. या आत्म्याच्या श्रेणी आहेत. अर्थात हे क्रमश: (१) भ्रष्ट आत्मा किंवा दुष्ट आत्मा, (२) प्रदूषणकारी आत्मा, (३) अनुप्राणित आत्मा आणि (४) द्रष्टा आत्मा किंवा प्रशांत आत्मा.

त्या चोवीस तत्त्वांचा बाजार असा आहे –

१) मांस, २) हाडे, ३) चामडे, ४) घाम, ५) मेंदू, ६) पाणी, ७) लघवी (मूत्र), ८) जुलाब, ९) स्वभाव १०) तृष्णा, ११) भूक, १२) सुस्ती (आळस), १३) निद्रा, १४) सुख, १५) हालणे, १६) चालणे, १७) विस्मरण, १८) थरथरणे, १९) भोगणे, २०) वासना, २१) ममता, २२) कृपणता, २३) भय आणि २४) जननेंद्रिय (प्रजनक).

चार कमानी अर्थात धनुष्य आहेत – १) रूह मलकी अर्थात देवदूत, २) रूह क़ुदसी म्हणजेच पवित्रात्मा जिब्रील, ३) रूप सिफ़ली अर्थात भूत पिशाच्च आणि ४) रूह उलवी म्हणजेच ऊर्ध्वात्मा.

ती चार घरे आहेत – १) शरीयत (भोगपूर) म्हणजेच विधि-विधान, २) तरीक़त (गोरखपूर) अर्थात आचरण प्रणाली, ३) हक़ीक़त (स्नेहनगर) म्हणजेच वास्तविक ज्ञान आणि ४) मारिफ़त (रूपनगर) अर्थात ब्रह्मज्ञान. यांचा परस्परसंबंध असा आहे –

१) शरीयतचा अंतर्भाग तरीक़त आहे.
२) तरीक़तचा आंतरिक भाग हक़ीक़त आहे.
३) हक़ीक़तचे अंतरंग मारिफ़त आहे आणि
४) मारिफ़तचा वृक्ष आहे 'कल्म-ए-तय्यबा' हा मूलमंत्र. हेच ब्रह्मसूत्र आहे.

त्या घरामध्ये पाच गज जमीन खोदली (खणली). ते पाच गज क्रमश: असे आहेत –

१) ज़िक्र कल्बी अर्थात सस्वर जप
२) ज़िक्र रूही अर्थात हृदयस्थ जप
३) ज़िक्र रूही अर्थात आत्मस्थ जप
४) ज़िक्र सिर्री अर्थात मर्म जप आणि
५) ज़िक्र ख़फ़ी अर्थात अजपा जप.

शेवटी हाती लागलेली ती घाघर म्हणजे शाश्वतता. त्या घाघरीमध्ये प्रेमरूपी अग्नी होता. थोडक्यात, ईश्वर प्रेम प्राप्ती हेच खऱ्या साधकाचे, सच्चे भक्ताचे उद्दिष्ट असते.

मानवी देहाचे घटक असे निर्दिष्ट करता येतील –

| | | |
|---|---|---|
| १) पृथ्वी → अस्तित्व | } | → मानव |
| २) आप → वासना | | |
| ३) वायू → आत्मा | | |
| ४) तेज → ईश्वर प्रेम | | |

निष्कर्ष असे की मानवाचे खरे अंतिम उद्दिष्ट, ध्येय हे ईश्वर प्रेम प्राप्तीच असायला हवे. याचे मार्ग आहे परमेश्वराची उत्कट भक्ती.

### ३] ''मेअराजुल आशिक़ीन''(भक्तांचा दिव्य उत्कर्ष) (प्रेमिकांचे निर्वाण) मधील देह संकीर्तन स्वरूप

दार्शनिक सूफी पृथ्वी, आप, तेज आणि वायू हे चार तत्त्व स्वीकारतात. मात्र ख्वाजा बंदा नवाज़ हे भारतीय तत्त्वज्ञानाप्रमाणे पाच तत्त्वे स्वीकारतात. सूफ़ी तत्त्वज्ञान आकाशास तत्त्व म्हणून स्वीकारत नाही, मात्र बंदानवाज़ आकाशास पण तत्त्व रूपाने स्वीकार करतात. म्हणजेच बंदानवाज़ यांना पंचमहाभूते ग्राह्य आहेत. उपरोक्त ग्रंथामध्ये त्यांनी आपले देह संकीर्तन असे मांडले आहे –

**१) वाजिबुल वजूद – स्थूल देह**

मानवास समजून घेण्यासाठी पाच देह आहेत. प्रत्येक देहास पाच दारे आहेत आणि तेथे पाच द्वारपाल – रक्षक आहेत. प्रथम देह हे वाजिबुलवजूद अर्थात स्थूल देह आहे. याचे स्थान शैतानी आहे आणि हे वासनेने पुरेपूर भरलेले असते. यामुळेच डोळ्यांनी याच्याकडे कधीही पाहू नये. याच्याकडे कान टवकारू नयेत. नाकाने याची दुर्गंध हुंगू नये आणि याच्याविषयी काहीच बोलू नये. वासना आणि छल कपटाकडे कधीच वळू नये. याचे मार्ग शरियत, लोक नासूत आहे.

पंचमहाभूतांचे मंथन करून 'गेसूदराज' पुढे म्हणतात की मातीत माती, मातीमध्ये पाणी, मातीमध्ये आग, मातीमध्ये वायू, मातीमध्ये आकाश. या पंचतत्त्वांचा (मिळून) स्थूल देह बनलेला आहे. या पाच तत्त्वांना योग्य रितीने समजून घेणेच ज्ञानप्राप्ती होय.

**२) मुमकिनुल वजूद – लिंग देह**

याची व्यवस्था पाहणारा देवदूत इस्राफ़ील आहे. हे पाप बुद्धीस रोखून धरणारी विवेकशक्ती आहे. हित यातच आहे की पंचज्ञानेंद्रियेद्वारे वाईट पाहू नये, वाईट ऐकू नये, दुर्गंध हुंगू नये, वाईट बोलू नये, चांगल्या तोंडामधून वाईट उच्चारू नये. गर्विष्ठ बनून चुकीचे कर्म करू नये. या पाच गोष्टींचे पालन करावे. सद्गुरूंचे एकाग्रचित्त होऊन ध्यान करावे. हृदयस्थ जप करून, विधी–विधांना (शरियत)चे पालन केले पाहिजे. मन–चित्त निर्विकार झाल्यास संभाव्य संकट टळेल. यानंतर पुन्हा गेसूदराज हे पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पंच तत्त्वांचा उल्लेख करतात आणि असे विधान करतात की ज्याला या पाच तत्त्वांची जाण असेल त्यालाच ज्ञानप्राप्ती होते. याचे मार्ग तरीक़त आहे, तर लोक हाहूत आहे.

### ३) मुमतनुल वजूद – कारण देह

हा दिसत नाही आणि ना ही बोधगम्य आहे. ही अस्तित्वाची प्रशांतता आहे. याच्यावर यमदूताची पकड आहे. ही ती मनोवृत्ती आहे जी आत्म्यामध्ये वासना (अभिलाषा) उत्पन्न करते. ही पाच बाधा निर्माण करते –

१) ही मनोवृत्ती ईश्वराकडे पाहू देत नाही.

२) ईश्वरवाणी ऐकू देत नाही.

३) नाकाने परमेश्वराचे सुगंध हुंगू देत नाही.

४) ईश्वराविषयी ही कटू वाणी बाहेर काढते.

५) सत्य न बोलणेच श्रेयस्कर असते. अशी या मनोवृत्तीची धारणा असते.

या कारणामुळेच या पाच मनोवृत्तींना नियंत्रणात ठेवले पाहिजे. सद्गुरूंच्या कृपेकडे बघावे लागेल. जिक्र रूही म्हणजेच आत्मस्थ जपाच्या मधामध्ये चांगले शुद्ध पाणी मिसळून प्याले पाहिजे. जर या देहाच्या मनोवृत्तीपासून मनुष्य सुटका करून घेत असेल, तर तो इच्छांच्या दु:खापासून मुक्त होऊन जाईल. यानंतर पुन्हा पंचमहाभूतांचा उल्लेख करत गेसूदराज म्हणतात की वासनेच्या स्वभावास ओळखल्यानंतर सद्गुरूंच्या आत्म्याचे ज्ञान होऊन जाईल. कारण देहाचा मार्ग हक़ीक़त आहे, तर त्याचे लोक जबरूत आहे.

### ४) आरिफुलवजूद : महाकारण देह

हे बोधमय अस्तित्व असते. म्हणून ते एक प्रकारचे अस्तित्वाचे बोध असते. प्रेषित मुहम्मद स. पाशी जो देवदूत ईश्वरी संदेश पोहोचते करतो त्या जिब्रील देवदूतास ज्ञानी आपल्या डोळ्यांनी पाहू शकतो. कानांनी जिब्रीलच्या गोष्टी आपण ऐकल्या पाहिजेत. नाकाने जिब्रीलचे गंध हुंगावे आणि जिव्हेने जिब्रीलशी संवाद साधावा. आम्हास जिब्रीलपर्यंत पोहोचले पाहिजे. उपरोक्त पाच अवस्थांना – म्हणजेच ऐकणे, पाहणे, हुंगणे, बोलणे आणि स्पर्श करणे – एकाग्र होऊन एकत्र केले पाहिजे. सद्गुरूंचे गुण आणि स्वत:चे गुण यामध्ये समन्वय प्रस्थापित केले पाहिजे.

ज्ञानी माणसाने अंतर्लीन बनून सद्गुरूंच्या देहाचे दर्शन करत अंत:करणपूर्वक जप करत रहावे. प्रार्थनारूपी रव्यामध्ये सद्गुणांची साखर घोळून निर्विकारितेच्या पाण्यामध्ये शिजवून खाल्ले पाहिजे. याचे पथ्य असे आहे–

सद्गुरूशिवाय इतरांकडे पाहू नये. तरच अस्तित्वाचे दु:ख संपवून जाईल. मनामध्ये–चित्तामध्ये जीवन रस असावे किंवा रसामध्ये (अद्वैतची स्थिती) जीवन असावे. या शाश्वत व अनंत स्थितीसच 'मकाम–ए–मुहम्मदी' म्हणजेच मुहम्मदीय स्थळ असे म्हणतात.

महाकारण देहाचा मार्ग मारिफ़त आहे. त्याचे लोक लाहूत आहे.

### ५) वाहिदुलवजूद : सूक्ष्म देह

ईश्वरीय अस्तित्वामध्ये संपूर्णपणे विलीन होण्याची ही स्थिती आहे. हे अस्तित्वाचे ऐक्य आहे. याचा देवदूत ईश्वराच्या द्वाराजवळ असतो. हा स्वजन प्रिय आणि एकट्या व्यक्तीस आत जाऊ देतो. तो अपरिचीतांना रोखून धरतो – आत जाऊ देत नाही. या इब्लीस – महाशैतानास ओळखल्यानंतरच ईश्वर प्राप्ती होते. ज्ञानचक्षूंनी एकेश्वरास पाहिले पाहिजे. प्रेमाच्या कानांनी त्याला ऐकले पाहिजे. रतीच्या नाकाने त्याचे वास घेतले पाहिजे. स्मरणाच्या जिव्हेने त्याच्या संबंधात बोलले पाहिजे. यालाच रहस्यात्मक गूढ अनुभव अथवा 'इल्हाम'

म्हणजेच आकाशवाणी म्हणतात. वासनेस प्रतिबंध करून उपरोक्त पाच गोष्टींच्या आधारे समाधिस्थ झाले पाहिजे आणि सद्गुरूंच्या एकेश्वर ज्ञानास प्राप्त करावे लागेल. एकेश्वर ज्ञानाच्या समुद्रामध्ये उडी घ्यावी लागेल. ज़िक्र ख़फ़ी अर्थात मौन जप म्हणजेच अजपा जपच्या महालामध्ये अद्वैताची झोप घ्यावी लागेल. यानंतर पंचमहाभूतांचा उल्लेख करत असे सांगितले गेले आहे की या पाच तत्त्वांच्या एकेश्वर ज्ञानास ईश्वराचे मूळ ज्ञान म्हणतात.

सूक्ष्म देहाचा मार्ग तौहीद अर्थात एकेश्वरवाद आहे. मलकूत याचे लोक आहे.

## ८] देह महिमा[५५]

सर्व जीवांच्या अंतर्यामी तोच द्रष्टा ईश्वर वसलेला असतो. देहाविना भक्ती अशक्य आहे. यास्तव त्याची प्राप्ती पण अशक्यच असणार, म्हणून उपासना, आराधना आणि भक्तीचे मूळ देहच आहे. जर शरीरास प्रथमपासून मिथ्या किंवा व्यर्थ मानले गेले तर भजन, उपासना, आराधना, भक्ती कसे बरे होऊ शकेल? म्हणून उपासना, भक्तीचे साधन देह-शरीर आणि आत्म्याचा योगच (संयोग) आहे. शरीराविना ईश्वराचे भजन व पूजन किंवा भक्ती इत्यादी कशा प्रकारे संपन्न होऊ शकेल? उपासनेसाठी आवश्यक त्या क्रियाविधी या योग्य त्या शारीरिक हालचालींवरच अवलंबून असतात. त्याच्याशिवाय हे शक्य नाही. देह असेतोपर्यंतच मनुष्य भजन, पूजन, उपासना, भक्ती करू शकतो. संसारात मायेची लता ही खूप विस्तारलेली आहे आणि ती अनेक प्रकारच्या शरीररूपी फळांनी लादली गेलेली आहे, आणि त्याच फळांमध्ये मूळ चेतनेचा थांगपत्ता लागतो.

भगवंताने या भूमीवर अनेक जीव जन्माला घातले आहेत, परंतु यातील फक्त नरदेहातच 'मन' दिले आहे. त्यामुळेच मनुष्य चांगले विचार मनात आणून ते आचरू शकतो. माणसांच्या मनाची उत्पत्ती अन्नाच्याद्वारे होते. आपण ज्या प्रकारचे अन्न सेवन करतो व आपली संगती ज्या पद्धतीची आहे त्या संगतीच्याद्वारे माणसाच्या मनामध्ये मतभिन्नता येते. मनाला शांतता नसेल तर आयुष्य कमी होते व मनाला समाधान असेल तर आयुष्य वर्धमान होते. मनुष्याचे मन खचले तर शरीरही खचत जात असते. तेव्हा मनाला खंबीर ठेवल्यास शरीर खचणार नाही.

## दुर्लभ देहा (शरीरा)चे महत्त्व

या शरीराद्वारेच ईश्वराची उपासना-भक्ती संपन्न होते. गुरू, सज्जन, संत-महात्मा आणि श्रोत्याची सेवा याच्याद्वारेच होते. याच्यानेच ग्रंथ लिहिले जातात. अनेक प्रकारच्या विद्यांचा अभ्यास व अध्ययन होतो आणि अनेक प्रकारच्या पदार्थांचा शोध लागतो. महाज्ञानी, सिद्ध, साधू, ऋषि, मुनी, संत-महात्मा हे सर्व याच शरीरामुळे बनतात. याच्यामुळेच मनुष्य श्रवण व मनन करतो, आणि याच्या मदतीनेच परमेश्वरापर्यंत तो पोहोचू शकतो. कर्म, उपासना आणि ज्ञानमार्गाचे सर्व कर्म याच्यामुळेच संपन्न होतात. योगी, वीतराग, तपस्वी इत्यादी शरीराद्वारेच अनेक प्रकारचे प्रयत्न करतात आणि याच्यामुळेच आत्मा प्रकट होतो. इहलोक आणि परलोक दोन्ही याच्यामुळेच सार्थक होतात. याच्याशिवाय सर्व काही व्यर्थ आहे. याच्यामुळेच मनुष्य पुण्यशील वा पापी आणि उच्छृंखल वा पवित्र होतो (बनतो.) अवतारी आणि वेषधारी पण याच्यामुळेच बनतात आणि याच्या

साह्यानेच लोक अनेक प्रकारचे उपद्रव आणि पाखंड करतात. विषयभोग पण याच्यामुळेच होतो आणि सर्व गोष्टींचे त्याग पण याच्यामुळेच संभवते. अनेक प्रकारचे रोग पण याच्यामुळेच होतात आणि नाहीशे होऊन जातात. नवविधा भक्ती चार प्रकारच्या मुक्ती आणि अनेक प्रकारच्या युक्ती आणि मन याच देहापासून होतात. याच्यामुळेच दान-धर्म होतो आणि अनेक प्रकारची गुह्ये अवगत होतात. लोक म्हणतात की याच्यामुळेच पूर्वकर्मांचे फळ पण मिळते. याच्यामुळेच अनेक प्रकारचे स्वार्थ साध्य होतात आणि याच्यामुळेच सर्व जीवन व्यर्थ बनते. अथवा मनुष्य धन्य होऊन जातो. याच्यामुळेच भक्ती मार्गाने मन पूर्णपणे रमून जाते. देहच सन्मार्गाचे साधन बनते. बंधने पण याच्यामुळेच गळून पडतात. याच्यामुळेच आत्मनिवेदन होते आणि मोक्ष प्राप्ती होते. हे शरीर सर्वात उत्तम आहे आणि याच्यामध्येच आत्म्याचे निवास आहे. हे कीर्ति आणि अपकीर्तिचे साधन आहे. अनेक प्रकारच्या मान-मर्यादा आणि संभ्रम याच्यामुळेच होतो आणि लोक उत्तमोत्तम पद उपभोगतात. सर्व काही याच्यामुळेच आहे आणि याच्याशिवाय काही नाही. हेच शरीर परलोकापर्यंत पोहोचते करणारे आहे आणि समस्त गुणांचे आगार आहे. अनेक विचार-रत्ने याच्यामुळेच निर्माण होतात. याच्यामुळेच विविध कलेंचे ज्ञान होते. याच्यामुळेच अंतर्कलेचा पण सुगावा लागतो. हे ब्रह्मांडाचे फळ आहे आणि अत्यंतही दुर्लभ आहे. या संसारात जीव धारण करून आलेले काही ना काही तरी करूनच गेले आणि हरि-भजनामुळे कित्येक लोक पावन झालेत. अष्टधा प्रकृतीचे मूळ केवळ संकल्प-रूप आहे आणि तेच अनेक प्रकारचे संकल्प देह रूप फळ घेऊन येथे आले आहेत. मुळामुळे फळे लागतात आणि फळांमुळे मूळ असते. अशाच प्रकारे भूमंडळामध्ये सर्व कामे होत राहतात. कोणतेही का कर्म असेना, शरीराशिवाय कसे बरे होऊ शकते? म्हणूनच देहास उत्तम कार्यांमध्ये मग्न करून सार्थक करणेच श्रेयस्कर आहे. आत्म्यासाठी शरीर आहे आणि शरीरामुळे आत्मा आपली सर्व कामे करतो. दोहोंच्या संयोगामुळेच सर्व कार्ये होत असतात. प्रकट किंवा अप्रकटपणे केलेल्या सर्व कर्मांचा थांगपत्ता आत्म्यास असतो. कारण की सर्व कर्तृत्व आत्म्यामुळेच घडते. शरीरामध्येच आत्मा असतो (राहातो) आणि शरीराचे पूजन केल्यामुळेच आत्मा संतुष्ट होतो. शरीरास त्रास घडला तर आत्मा क्षुब्ध होतो. सारांश शरीराविना उपासना-भक्ती संपन्न होऊच शकत नाही.

**'देहबुद्धी ते आत्मबुद्धी करावी'** आपले सगळे प्रयत्न देहाला सुखी करण्यासाठी होत असतात. देहाला सुखविण्यासाठी नवनवीन साधने उपलब्ध होत आहेत. त्यातून मिळणारे सुख म्हणजेच खरे सुख असे समजल्याने नित्य, शाश्वत असलेल्या सुखाचा, आनंदाचा संतांना येणारा अनुभव आम्हाला मिळत नाही. शाश्वत वस्तूंच्या सातत्याच्या अनुसंधानानेच देहबुद्धीचा निरास होतो, असे संत सांगतात. श्रीसमर्थ रामदासांनी 'मनाच्या श्लोकां'त सुद्धा देहबुद्धी अष्टक लिहिलेले आहे

*''देहबुद्धीचा निश्चयो दृढ झाला ।*
*देहातीत ते हित सांडीत गेला ॥*
*देहबुद्धी ते आत्मबुद्धी करावी ।*
*सदा संगती सज्जनाची धरावी ॥''*

आत्मानुसंधानाचा हा अभ्यास संतांच्या कृपेने, श्री सद्गुरूंच्या सेवेत प्राप्त होतो. त्यातूनच ज्ञानदीप उजळतो. संत सांगतात, 'या अभ्यासाने शरीर असतानाच अशरीरी झाल्याचा आम्हाला अनुभव मिळतो.'

*''विवेके देहबुद्धी सोडून द्यावी ।*
*विदेहीपणे मुक्ती भोगीत जावी ।।''*

आत्मविवेकाच्या अनुसंधानाने हा देह ब्रह्मस्वरूपाच्या स्मशानात पोचविला आहे, असे श्री तुकाराम महाराज एका अभंगात सांगतात. प्रारब्ध शेष आहे म्हणून देहरूपी 'मी' उरला आहे, असे संत सांगतात. या देहाची राख आणि आत्मस्वरूपातून मिळणाऱ्या आत्मानंदाचे रक्षण अशी या अभ्यासाची फलश्रुती संतांनी सांगितली आहे.

अध्यात्मशास्त्रामध्ये सर्वत्रच योगी आणि साधकांसाठी देहात्मदृष्टीच सर्व अनर्थांचे मूळ मानली गेली आहे. संत-महात्म्यांनी पण असेच मत नोंदविले आहे. त्या सर्वांचे असे म्हणणे आहे की मुमुक्षूंस यथाशक्य देहाच्या चिंतनापासून अलिप्त होऊन आत्म-चिंतन परायण झाले (बनले) पाहिजे. हेच वैराग्याच्या समस्त उपदेशांचे मूळ तत्त्व आहे. कारण की देहावेशामुळेच विविध प्रकारच्या भोग विलासांना संधी प्राप्त होते. अविद्यात्मक देहादीपासून दृष्टी हटवून ती चित्स्वरूप आत्म्याकडे वळविणेच विवेकाचे पण मूळ उद्दिष्ट आहे.

ही झाली एक बाजू. तर दुसरीकडे, विशेषत: नरदेहाच्या परम उपयोगितेची गोष्ट पण शास्त्रांमध्ये आढळते. ''शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् '' - कवीचे हे कथन लोकसमाजामध्ये सर्वत्र प्रसिद्ध आहे. हे रक्तमांसमय पंचकौशिक नरदेहच कर्मदेह आहे. या देहाशिवाय कर्मसाधन होऊ शकत नाही.

मूल्यांच्या दृष्टीने पण दुर्लभ देहाचे असाधारण महत्त्व अधोलेखित करता येणे शक्य आहे. शारीरिक आणि आध्यात्मिक धार्मिक मूल्यें यांचा आधार पंचकोशमय आत्म्यास असतो. मूल्यांच्या साधनभूत आणि साध्यभूत अशा श्रेणी मान्य आहेत. उपरोक्त संस्कृत उक्तीमध्ये शारीरिक आणि धार्मिक मूल्यांचा, अनुक्रमे साधन आणि साध्य, असा विवेक करूनही आद्य साधन म्हणून शारीरिक मूल्यांच्या महत्त्वावरच भर दिला आहे.

जरी नरदेह भोगायतन पण आहे, कारण या देहापासूनच प्राक्तन जन्माच्या पाप-पुण्याचे फलभोग पण होतात, तरी मुख्यत्वेकरून याची परिगणना कर्मदेहरूपातच होते. या देहाद्वारे जर शुभ कर्माचे संचय होऊ शकत नसेल तर देव-देह अथवा अन्य प्रकारच्या एखाद्या अमानवीय देहाद्वारे पूर्णत्वाच्या मार्गावर कर्म योगाने अग्रेसर होणे संभवत नाही. जे उच्च आत्मे दिव्य स्तरावर परमानंदमय भोग आस्वादनामध्ये मग्न आहेत, त्यांना सुद्धा जर पूर्णत्वाकडे अग्रेसर व्हायचे असेल तर त्यांना कर्मपथामध्ये पदार्पण करावेच लागेल आणि या अनित्य सुख-दुःखमय मानवदेहाचे अवलंबन करावेच लागेल. म्हणून हे निश्चित आहे की फक्त भोगासाठी नव्हे तर विशेषत: परमार्थ सिद्धीसाठीच मानवदेहाचा गौरव आहे.

व्यष्टी आणि समष्टीच्या भेदा आधारे हा देह दोन प्रकारचा आहे. व्यष्टी देहास पिंड किंवा पिंडांड म्हणतात, समष्टी देहाचे दुसरे नाव ब्रह्मांड आहे. समग्र ब्रह्मांडामध्ये जे काही आहे, ते सर्वच्या सर्व पृथक-पृथक स्वरूपामध्ये या लहानशा देहामध्ये पण आहे. म्हणून जर योग्य प्रकारे या मानवदेहाचा परिचय झाल्यास ब्रह्मांडच काय तर समग्र विश्वाचे परिचय घडू शकेल. उपनिषदांमध्ये निर्दिष्ट 'दहरविद्या' संबंधी विचार केल्यास आपणास असे आढळून येईल की बाह्य आकाशामध्ये जे काही विद्यमान आहे, ते सर्व मानवाच्या अंतराकाशरूपी हृदयपुंडरीकमध्ये विद्यमान आहे. म्हणून बहिरंगावर दृष्टी न टाकता अंतर्मुखदृष्टिद्वारे हृदयाकडे दृष्टिक्षेप करणेच ऋषींचा मुख्य उपदेश होता.

लघु असल्या कारणामुळे मानवशरीराची उपेक्षा करणे योग्य नव्हे, ही एक परम सत्य गोष्ट आहे. या संदर्भात एका कवीचे असे म्हणणे आहे की, तुम्ही हे जाणता की बाह्य दृष्टीने जो लघु (लहान) असतो, तो खरोखर लहान असत नाही. कारण की जेथे कोठे अंश स्वरूपात सत्य असते, तेथे समग्र विश्वाचे निवास असते. फक्त एवढेच नव्हे, तर ब्रह्मांड वा विशाल विश्वाचे ज्ञान देहज्ञानामुळे होऊ शकते, तद्वतच विश्वातीत सत्तेचा बोध पण होत असेल तर ते पण या लहानशा मानव देहाचेच अवलंबन करण्यामुळेच शक्य होते. या नरदेहाने परमार्थसिद्धी मिळते, भक्तिसुखाचा आनंद अनुभवता येतो.

अतिप्राचीन काळापासूनच योगी जनांना याची कल्पना होती. त्यांच्यापैकी जे विशिष्ट योग्यता संपन्न होते, ते योग-साधनेद्वारे या सत्याचा-तथ्याचा उपयोग करत असत. त्यांचे असे मत होते की जर एखाद्यास देह-तत्त्वाचे यथार्थ स्वरूपात ज्ञान असेल म्हणजेच या मानव-देहाचे वास्तविक स्वरूप माहीत असेल तर तो दिव्यदेह प्राप्त करण्यामध्ये समर्थ होऊन जातो आणि अमरत्वाच्या साधनेमध्ये सिद्धी प्राप्त करून कृतकृत्य होऊन जातो. देहस्थित ज्या विषयांचा क्रमशः प्रत्यक्ष करणे आवश्यक आहे, त्यांपैकी पुढीलप्रमाणे काही प्रमुख आहेत. षटचक्र, सोळा आधार, तीन लक्ष्य, पाच आकाश, बारा ग्रंथी, तीन शक्ती, तीन धाम-पथ आणि नाडी चक्र.

दिव्य-देह लाभ आणि पूर्णत्वाच्या प्राप्तीच्या मार्गामध्ये उपरोक्त विषयांचे ज्ञान असणे अत्यंत आवश्यक आहे. दिव्य देहाची साधनाच अमरत्वाची साधना आहे. काल देहाच्या अधीन असलेल्या, क्षणभंगुर, जरा आणि व्याधिने भरलेले नश्वर देहाऐवजी शाक्त देहाची प्राप्तीच अमरत्व साधनेचे उद्दिष्ट आहे. हे शरीर चिच्छक्तिमय असल्यामुळे चिदानंदमय आणि अमृताने व्याप्त आहे.

### ९] देहादिसंसृष्ट आत्म्याच्या पाच अवस्था

### देह-मन-संबंध

मन-शरीर-संबंधाच्या प्रश्नाच्या संदर्भात तत्त्ववेत्ते पुढील निरनिराळी उत्तरे देतात -

१) मन हे शरीराचे कार्य आहे, २) शरीर हे मनाचे दृष्यरूप आहे, ३) मानसिक व शारीरिक घटनांमध्ये अन्योन्यसंबंध आहे, ४) मन व शरीर समांतर कार्ये करतात, ५) मन व शरीर एकमेकांवर प्रतिक्रिया घडवतात, ६) ईश्वर हा मन व शरीर यांमध्ये परस्पर मेळ जमविणारे बदल घडविण्यास निमित्त होतो, ७) परमेश्वराने प्रारंभिक अवस्थेत दोहोत सुसंवादित्व प्रस्थापित केले, म्हणून मन व शरीर परस्पर समांतर असे बदल दर्शवतात.

स्वरूपाच्या दृष्टीने आत्मा हा सर्व भावनांच्या पलीकडे आहे. म्हणून हा सर्व भावनांमध्ये स्थित असून पण नित्य सर्वत्र आपल्या स्वभावानुसार स्वयंस्वरूपात स्थित आहे. म्हणून हा निर्विकार, द्वंद्वातीत, निर्दोष आणि समरस आहे. परंतु व्यवहारभूमिमध्ये आणि प्रतिभास स्थळांमध्ये याचे अवस्थाकृत भेद दिसून येतात. या अवस्थेचे पाच प्रकार सर्वत्र मान्य आहेत. या पाच अवस्थांपैकी जागृत, स्वप्न आणि सुषुप्ति या तीन अवस्था सर्वपरिचित आहेत. अन्य दोन - तुरीय व तुरीयातीत या अवस्थांना ज्ञानाचा उदय आणि त्याचा परिपाक झाल्याशिवाय स्पष्टपणे ओळखले जाऊ शकत नाही. वास्तविक कोणतीच अवस्था ही विशुद्ध आत्म्याची नसून, त्या देहादिसंसृष्ट आत्म्याच्याच सर्व अवस्था आहेत, हे लक्षात ठेवले पाहिजे.

साधारणपणे ढोबळ मानाने या अवस्थांच्या उपपादनासंबंधी असे सांगितले जाऊ शकते की आत्मा, मन, इंद्रिय आणि बाह्य विषयांच्या परस्पर संबंधांच्या वैशिष्ट्यामुळेच या सर्व अवस्थांचा उदय होतो. येथे 'आत्मा' या शब्दाचा अर्थ देहविशिष्ट जीव–आत्मा असे समजले पाहिजे. विदेही केवलात्मा नव्हे. आत्मा आणि मनाचा संसर्ग, मन आणि इंद्रियांचा संसर्ग आणि इंद्रिये व विषयांचा संसर्ग ज्या अवस्थेमध्ये विद्यमान असते, ती जागृत अवस्था गणली जाते. परंतु ज्या अवस्थेमध्ये इंद्रिये आणि विषय यांचा संसर्ग नसतो, इतर दोन संसर्ग पूर्ववत अक्षुण्ण राहतात, त्याचे प्रचलित नाव आहे स्वप्नावस्था. ज्या अवस्थेमध्ये इंद्रिये आणि विषय यांचा संबंध नसतो, त्याशिवाय मन आणि इंद्रिये यांचा पण संबंध नसतो, एकमात्र आत्मा आणि मनाचाच संबंध विद्यमान असतो, त्याचे सुषुप्ति या नावाने वर्णन केले जाते. अज्ञानग्रस्त जीव निरंतर या तीन अवस्थांच्या चक्राचा अनुभव घेत असतो. याच चक्रापासून जर त्राण प्राप्त करायचे असेल तर अपरोक्ष ज्ञानाच्या उदयासाठी प्रयत्न केले पाहिजेत. जोपर्यंत अपरोक्ष ज्ञानाचा उदय होत नाही अर्थात जोपर्यंत आत्म्याच्या सम्यक् ज्ञानाचा उदय होत नाही, तोपर्यंत हे चक्र चालत राहणे अवश्यंभावी आहे. व्यष्टिभावामध्ये हे जसे सत्य आहे, तसेच समष्टीभावामध्ये पण सत्य आहे.

सुषुप्ति अवस्थेमध्ये पण आत्म्याचा मनाशी संयोग असतो. हा अनादि संयोग आहे आणि मूळ अज्ञानापासून उत्पन्न आहे. सुषुप्तीच्या काळामध्ये मन हृदयामध्ये निश्चल रूपाने स्थित असते. म्हणून त्या वेळेस कोणत्याच प्रकारच्या लौकिक ज्ञानाची शक्यता नसते. देहामध्ये सर्वत्र मनाचा संचार आणि वायूची क्रिया शक्य आहे, परंतु हृदयामध्ये वायू, मन इत्यादी काहीच क्रिया करत नसतात. जेव्हा मन हृदयामध्ये प्रवेश करते तेव्हा ते निष्क्रिय स्वरूपात विद्यमान असते. ही मनाची लयावस्था आहे.

जागृत अवस्थेमध्ये इंद्रिये बहिर्मुखी असतात आणि शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध या पाच विषयांशी संसृष्ट होऊन त्यांना ग्रहण करतात. अशा प्रकारे आम्हा लोकांच्या बाह्य जगाचे ज्ञानाचा उदय होतो. परंतु स्वप्नावस्थेमध्ये हे बाह्य ज्ञान नसते. थकव्यामुळे इंद्रियाची बाह्योन्मुखता त्यावेळेस विरत होऊन जाते. इंद्रिये त्यावेळेस अंतर्मुख असतात. परंतु इंद्रिये अंतर्मुख असताना पण मन त्या वेळेस पण बर्हिमुखच असतो अर्थात त्या वेळेस इंद्रिये जरी विषयाभिमुख नसतात तरी मनाची इंद्रियोन्मुखी प्रवणता निवृत्त होत नाही. त्यामुळेच स्वप्नानुभवाचा उदय होतो. हे संस्कारजन्य ज्ञान आहे. ज्या वेळेस मन स्थिर असते आणि त्याचबरोबर लोकोत्तर ज्ञानाचा पण उदय होतो. त्या वेळेसच तुरीय अवस्थेचा उन्मेष झाला असे समजले पाहिजे. सुषुप्तीमध्ये जी स्थिरता आहे, ती तामसिक आहे. मनाच्या निष्क्रिय आणि चेतनभावापन्न अवस्थेचे नाव मनाचे जागरण, मनाचा उद्धार वा मनाचा त्राण अर्थात ज्ञानाचा उन्मेष आहे. तुरीय अवस्था याचेच नामांतर आहे. यानंतर हे चेतन आणि शुद्ध मन पण राहात नाही. तीच तुरीयातीत अवस्था आहे. तेव्हा एकमात्र आत्माच आपल्या स्वरूपामध्ये विराजमान असतो आणि तो स्वत: आपल्याशीच क्रीडा करतो. सारांश, तुरीय अवस्था म्हणजे ज्ञानोन्मेष – ज्ञानाचा उन्मेष, तर तुरीयातीत अवस्था म्हणजे आत्म्याची स्वत:शीच क्रीडा होय. तुरीयातीत अवस्थाच देहचक्राचे केंद्र आहे.

जागृत एक सक्रिय अवस्था आहे. घट, पट इत्यादी बाह्य पदार्थांचे अनुसंधानच याचे स्वरूप आहे. सुषुप्ती अवस्थेची निवृत्ती झाल्यानंतर अशाप्रकारे बाह्य पदार्थांचे जे ज्ञान होते, तेच जागृत आहे. यामध्ये क्रियेची

प्रधानता असते. परंतु सुषुप्ती अवस्थेमध्ये क्रियेची प्रधानता असत नाही. ती जडताप्रधान निष्क्रिय अवस्था आहे. या दोन्ही अवस्थांच्यामध्ये आणखी एक अवस्था आहे. तिचे नाव आहे स्वप्न. सुषुप्तिच्या निवृत्तीपूर्वी जे विविध प्रकारचे मानसिक भेदजन्य विकल्प ज्ञानांचा उदय होतो, त्यांचेच नाव स्वप्न आहे. सुषुप्ती ही संसाराची बीज-दशा आहे, स्वप्न ही संसाराची उन्मेष दशा आहे आणि जागृत ही संसाराची गाढ आणि वृद्धिंगत अवस्था आहे. परंतु तुरीय अवस्था ही या तीन्ही अवस्थांहून सर्वथा भिन्न आहे. ज्या वेळेस जागृत अवस्था असते, त्यावेळेस स्वप्न अथवा सुषुप्ती नसते, ज्यावेळेस स्वप्न अवस्था असते त्या वेळेस जागृत किंवा सुषुप्ती नसते आणि ज्यावेळेस सुषुप्ती अवस्था असते त्या वेळेस जागृत किंवा स्वप्न अवस्था नसते. परंतु तुरीय अवस्था अशा प्रकारची नसते. कारण की ती वरील तीन अवस्थांपैकी प्रत्येकाशी ओत-प्रोत स्वरूपात विद्यमान असते. तुरीय अवस्था जागृतमध्ये असते. स्वप्नमध्ये असते आणि सुषुप्तीमध्ये पण असते. तुरीयच्या प्रकाशासाठी इतर अवस्थेची निवृत्ती आवश्यक नसते. चित् चे अनुसंधान होणेच तुरीय अवस्थेचे वैशिष्ट्य आहे. वरील तीन अवस्थांपैकी प्रत्येक अवस्था ही चित् पासून उत्पन्न (झालेली) आहे. म्हणून चित् हे त्यांचे कारण आहे आणि ते चित्चे कार्य आहेत. कार्यामध्ये कारण जसे व्यापक रूपात असते तसेच जागृत, स्वप्न आणि सुषुप्ती मध्ये तुरीय अवस्था व्यापक रूपात विद्यमान असते. तुरीय अवस्था जरी शुद्ध आणि निर्मळ आहे तरी पण त्यामध्ये जागृत, स्वप्न आणि सुषुप्त या भिन्न अवस्थांच्या कलंकाचे स्पर्श आहेत. हे स्पर्शमात्र आहे, यामध्ये मुळीच शंका नाही, परंतु ते आहे अवश्य. परंतु तुरीयातीत अवस्थेमध्ये तो स्पर्श पण राहात नाही.

सारांश, चेतनेच्या तीन अवस्था असतात. जागे असतानाची जागृतावस्था, झोपेत स्वप्न बघण्याची अनुभूती घेते ती स्वप्नावस्था आणि स्वप्नविरहित झोपेत जी अनुभूती येते ती सुषुप्ती. या तीन अवस्थांच्या पलीकडे आपल्या अस्तित्वाच्या जाणिवेचा जो अनुभव असतो, त्याला तुरीय म्हटले जाते. हीच चेतनाची शुद्ध अवस्था आहे. जागृतावस्थेमध्ये 'मी' पण आणि आपल्या विचारांची जाणीव असते. निद्रेत 'मी' पणाची अनुभूती नसते, पण विचार आणि त्यांची जाणीव असते. फार गाढ झोप असली तर 'मी' पण आणि विचार या दोहांची अनुभूती जाते. तुरीय अवस्थेत विचार नसतात तर शुद्ध चेतनाच असते. मांडुक्य उपनिषदात म्हटले आहे की, तुरीय ही काही अवस्था नाही. ही ती पार्श्वभूमी आहे ज्यावर निद्रा आणि जागृची उदय-अस्त होत असतात, यालाच निर्विकल्प असेही म्हटले आहे.

### १०] देह आणि कर्म[५५]

स्थूल देहाची निर्मिती कर्मानेच होते. कर्म हेच सुखदुःखाला कारण होते. सूक्ष्म शरीरालाच लिंगदेह म्हणतात. श्री श्री विशुद्धानंद परमहंस देव म्हणत -''शरीरं केवलं कर्म शोकमोहादिवर्जितम्।'' कर्मामुळे शरीर बनते (घडते) हे जसे सत्य आहे, त्याचप्रमाणे कर्मासाठीच शरीर आहे हे पण तितकेच खरे आहे. शरीराशिवाय कर्म पण होत नाही आणि भोग पण घडत नाही. प्रारब्ध कर्माचे फळ भोगण्यासाठी शरीर ग्रहण करावे लागते आणि जोपर्यंत या शरीराद्वारे ते भोग समाप्त होत नाही तोपर्यंत शरीर धारण करणे आवश्यक असते. भोगसमाप्तीसोबतच देहावसान होते. जाती, आयुष्य आणि भोग - हेच तीन प्रारब्धाचे फळ आहेत. देहाशी संबंधच जाती वा जन्म आहे आणि या संबंधाच्या विच्छेदाचेच नाव मृत्यू आहे. दोहोमधील काळ त्या संबंधाचे

स्थिती काळ आहे. यालाच प्रचलित भाषेमध्ये आयुष्य असे म्हणतात. सुख आणि दुःख जे आपल्या नियतविपाक प्राक्तन कर्मामुळे होतात, त्यांचा विचार न करता, भोग भोगले पाहिजे. तरच ते समाप्त होऊ शकतात. नाहीतर भोग-काळामध्ये सुद्धा नूतन कर्मबीजे संचित होण्याची दाट शक्यता असते.

ज्या देहाद्वारे कर्म केले जाते ते कर्म-देह आहे. ज्या देहाद्वारे कर्मफळ सुख-दुःखाचे भोग होते त्याला भोग-देह असे म्हणतात आणि ज्या देहामुळे एकाच वेळेस कर्मपण घडते आणि भोग पण भोगावे लागते ते मिश्र देह आहे. साधारणपणे कामधातु स्थित देवता इत्यादीची, पशू पक्ष्याची, प्रेतयोनींची, असुर इत्यादींची आणि नरकवासी जीवांचा देह भोगदेह असतो. मनुष्य-देह कर्म-देह आणि भोग-देह दोन्ही आहे. कर्म करून अर्थात पौरुषाच्या मदतीने जीवनमार्गावर अग्रेसर होण्याची क्षमता एकमात्र मनुष्यामध्येच आहे - इतर प्राण्यांमध्ये ते सामर्थ्य नाही. म्हणून तर मनुष्याचा इतका गौरव आहे. तत्त्ववेत्त्यांनी म्हणूनच नर-देहाचा इतका महिमा गायला आहे. निसर्ग नियमानुसार चौऱ्याऐंशी (८४) लाख योनींमध्ये भ्रमण करत जीवास शेवटी मनुष्य देह प्राप्त होतो. तेव्हा तो कर्माचा अधिकारी बनतो आणि अध्यात्मयात्रेच्या मार्गावर अग्रेसर होण्याचा त्याला सुयोग लाभतो.

मनुष्य-देहच कर्मानुसारिणी गतीचे सूत्र आहे. येथून वर जाता येऊ शकते आणि खाली पण जाता येऊ शकते. विश्वाच्या सर्व ठिकाणी जाण्याचा मार्ग यामध्येच आढळतो. जर भाग्यात असेल तर येथूनच कर्माच्या प्रभावामुळे असा मार्ग सापडतो की ज्यावर चालल्यामुळे आत्मज्ञानाचा विकास झाल्यामुळे पूर्णत्व स्थितीचा लाभ होतो.

''योनेः शरीरम् '' - योनिपासून शरीराचा उद्भव होतो. नरयोनी श्रेष्ठ योनी आहे. नरदेह श्रेष्ठ देह आहे. हा देह एक लघु ब्रह्मांडस्वरूप आहे. जे काही बाह्य जगामध्ये आहे ते सर्व मनुष्य देहामध्ये आहे. अतिगंभीर पाताळ राज्यामधील सर्वात खालचे रसातळामधील घोर अंधःकारापासून ते सर्वोच्च महाव्योमाच्या अत्यंत परिस्फुट चिदालोकपर्यंत सर्व काही या देहामध्ये विराजमान आहे. जरी पृथ्वीचे देह हे पार्थिव देह आहे, ही गोष्ट खरी आहे, तरीपण यामध्ये निसर्गाचे समस्त गुण गुप्तपणे विद्यमान आहेत. आत्मा वा पुरुषाचे भोग आणि सेवा व कर्मासाठी जे काही आवश्यक आहे ते सर्व या देहामध्ये शोधल्यास आढळून येते. देहास क्षेत्र म्हटले जाते. कारण मन आणि प्राण या द्वारे याचे यथानिधी कर्षण करणे शक्य झाल्यास यापासून कल्पवृक्ष निर्माण (उत्पन्न) होतो, जो वेळेवरती अमृतरूप फळ उत्पन्न करतो.

चेतन आणि अचेतन- दोन्ही सत्तांच्या संघर्षामुळे देह उत्पन्न होतो. लिंग आणि योनिच्या परस्पर सान्निकर्षामुळे हा (देह) जन्म घेतो. लिंग अलिंगाचे चिन्ह मात्र आहे. महालिंग आणि महायोनि मूलतः जरी एकच आहेत तरी व्यक्त स्वरूपात लिंग आणि योनिमध्ये तारतम्य आहे. या तारतम्यामुळे क्रमिक उत्कर्षमय ८४ लाख स्तर (थर) आणि त्यानुसार ८४ लाख देह विद्यमान आहेत. विशुद्ध अहंभावाच्या विकासासाठी निसर्गाच्या विशाल विज्ञानशाळेमध्ये हे विवर्तन कार्य चाललेले आहे. मूळ अव्यक्त सत्तेच्या शक्तीच्या स्पंदनामुळे अन्नमय सत्तेचा आविर्भाव होतो. अन्नमय सत्तेपासून प्राणमय सत्तेचा विकास आणि प्राणमय सत्तेपासून मनोमय सत्तेची अभिव्यक्ती या विवर्तनेच्या अंतर्गत आहे. याचप्रमाणे देहाचा क्रमविकास जाणावे.

मानवदेहाच्या विकासाअगोदरपर्यंत नैसर्गिक प्रेरणेमुळेच आपोआप विकास कार्य संपन्न होत असे. मानव ही परमेश्वराची प्रतिमा आहे. 'God made man after His own image' असे जे म्हटले गेले आहे त्याचे

तात्पर्य असे आहे की मनुष्य देहच भगवत् स्वरूपाचे प्रतीक किंवा आभास आहे. मनुष्याच्या पूर्णतेमुळेच भगवत्तेची अभिव्यक्ती होते. नररूपी आधाराव्यतिरिक्त अन्य दुसऱ्या आधारामध्ये अर्थात पशू इत्यादी आधारामध्ये दिव्यशक्तीचे आविर्भाव शक्य नाही. अवतारासारखे व्यापार हे दुसऱ्या (अन्य) प्रकारचे आहेत. भक्त रामप्रसाद यांनी ज्याला कृषिकार्य म्हटले आहे ते एकमात्र याच नरदेहामध्ये होऊ शकते. कारण की याच देहामध्ये अहंभावाची प्रथम स्फूर्ती होते आणि याच देहामध्ये अहंभावाची पूर्णता सिद्ध होते. समस्त जड आणि जीव जगताच्या समष्टिसत्तेचे घनीभूत होऊन मानव देह रचला जातो. मन आणि अहंभाव यांच्या उन्मेषासोबत वाक्शक्ती वैखरी रूपामध्ये प्रथमत: याच देहामध्ये प्रकट होते. हेच प्रज्ञेचे बीज आहे, हे सांगण्याची गरज नाही. वर्णात्मक शब्दाची क्रिया आणि वर्णात्मक शब्दाचा विलयन व्यापार दोन्ही याच देहामध्ये होतात. बिंदूपासून अभिव्यक्त होणारी, नाद आणि ज्योतिची प्रथम सूचना मानव देहातच दिसून येते. याच देहामध्ये बंधनाचे बोध होते. म्हणून या देहातच मुक्ती होऊ शकते. कुंडलिनीची स्थिती याच देहामध्ये आहे. सुषुम्णा नाडी आणि षट्चक्रांचे अवस्थान मानव योनी सोडून इतरत्र यथावत् दिसून येत नाही. ब्रह्मचर्याचा अभ्यास अन्य देहांमध्ये होऊ शकत नाही. जागृत, स्वप्न आणि सुषुप्ती या अवस्था पशू इत्यादीमध्ये आढळतात, परंतु तुरीय वा तुरीयातीत अवस्था एकमात्र मानवामध्येच आढळू शकतात. म्हणून कर्म, ज्ञान आणि भक्तिरूप योगाचा अभ्यास पण फक्त या मानवदेहामध्येच होऊ शकतो.

वास्तविक दिव्यदेह मनुष्यदेहाचाच विकास-मात्र आहे. मानवदेहच पूर्णता प्राप्त झाल्यावर भगवद्देह रूपामध्ये परिणत होते. या परिणतिसाठी जे उपाय कार्यरत केले जातात त्यांचेच नाव कर्म असे आहे.

मातेच्या गर्भापासून उत्पन्न स्थूलदेहच कर्म देह आहे. मनुष्य जोपर्यंत या देहास धारण करतो तोपर्यंतच तो कर्म करण्यामध्ये समर्थ असतो. हे देह नसल्यास कर्म होऊ शकत नाही. केवळ कर्मफलाचा भोग भोगदेहास होतो. स्थूल शरीर साधारणपणे प्रारब्धद्वारे नियंत्रित होते. प्रारब्ध अत्यंत जटिल तत्त्व आहे. कर्म, अनुग्रह, संस्कार (प्राक्तन) इत्यादी अनेक विभिन्न शक्तींच्या एकत्र संघटनेमुळे प्रारब्ध बनते आणि इच्छेची उत्कटता व संकल्प स्वातंत्र्यामुळे याची सृष्टी (निर्मिती) होते. म्हणून एक दृष्टीने आयुष्य निश्चित असल्यामुळे अकाल मृत्यू होत नाही, ही गोष्ट खरी आहे. शिवाय आयुष्यामध्ये वाढ आणि ऱ्हास दोन्ही होऊ शकतात-हे पण खरे आहे.

### ११] संकल्प स्वातंत्र्य आणि कर्मवाद[५६]

कर्म-फळ-संबंध नैतिकतेची अनिवार्य मान्यता आहे. ज्याप्रमाणे भौतिक जग हे कार्य-कारण नियमाने बांधले गेले आहे, त्याचप्रमाणे नैतिक जग हे 'कर्म-फळ-संबंधा'च्या नियमाने बांधले गेले आहे. जग (लोक) हे स्वकर्म सूत्रामध्ये ग्रथित आहे. केलेल्या शुभाशुभ कर्माचे फळ अवश्यपणे मिळते. कर्माची गती टाळली जाऊ शकत नाही. कर्मावस्थेचा कर्ता आणि फलावस्थेचा भोक्ता दोन्ही वास्तवात एकच व्यक्ती असते.

ना कर्माच्या फळाचा नाश होतो आणि ना अकृत कर्माचा फळ मिळतो. कर्म आणि फळामध्ये अविच्छेद संबंध आहे. आमचे सध्याचे वर्तमान जीवन हे पूर्ववर्ती जीवनाचे परिणाम आहे आणि याच आधारावर परवर्ती जीवनास वर्तमान जीवनाचे प्रतिफळ समजले पाहिजे. जे कार्य स्वतंत्रेच्छेने केले जाते, त्याचेच फळ कर्त्यास

प्राप्त होते. जर कोणास चोरी करण्याची इच्छा नसेल आणि इतर लोक त्याला चोरी करण्यास विवश (बाध्य) करतील तर त्याला त्या चोरीच्या कर्माचे फळ मिळणार नाही.

व्यवहारामध्ये कधी-कधी कर्म आणि फळाच्या संबंधामध्ये व्यतिक्रम दिसून येतो. सत्कर्मे करणारा दु:ख भोगतो आणि अपकर्मे करणारा सुखमय जीवन जगत असतो. वास्तविक कर्म-फळ-संबंधामध्ये असे कोणतेच व्यतिक्रम नसते. कर्माच्या तीन श्रेणी (प्रकार) आहेत – १) प्रारब्ध कर्म, २) संचित कर्म आणि ३) क्रियमाण वा संचीयमान कर्म. प्रारब्ध कर्म हे पूर्व जीवनाचे कर्म असते, ज्याचे परिणाम वर्तमान जीवनामध्ये भोगले जातात. क्रियमाण जीवनाचे सुख आणि दु:ख पूर्ववर्ती जीवनाच्या बऱ्यावाईटावर निर्भर असते. संचित कर्म ते कर्म असतात की ज्याचे परिणाम प्रारब्ध कर्माचे फळ समाप्त झाल्यानंतर भोगावे लागतात. क्रियमाण वा संचीयमान कर्म वर्तमान जीवनाचे कर्म असतात, ज्यांच्या परिणामाची अद्याप प्रतीक्षा असते. फल-भोगामध्ये तारतम्यता असते. प्रारब्धानंतर संचित आणि संचितानंतर क्रियमाण कर्माचे फळ (परिणाम) भोगावे लागतात. याच कारणास्तव वर्तमान जीवनामध्ये सत्कर्मे करणारी व्यक्ती पण दु:खाचा सामना करत असल्याचे निदर्शनास येते. हे दु:ख त्या व्यक्तिच्या पूर्ववर्ती जीवनामधील अशुभ-वाईट कर्मांच्या परिणामस्वरूप असते. कर्म-फळ-संबंध हा कर्त्याच्या इच्छेवर तर निर्भर नसतो. इच्छा असूनही पण सत्कर्मांचे सुखद परिणामांचा लाभ मिळत नाही, जोपर्यंत पूर्ववर्ती कर्मांचा फळ त्याने भोगलेले नसते. नैतिक संस्थानामध्ये (क्षेत्रामध्ये) कर्त्याची सर्व कर्मे सुरक्षित असतात. यांचे परिणाम क्रमश: भोगावे लागतात. क्रियमाण कर्मांचे फळ अद्याप मिळालेले नाही, परंतु मिळणार मात्र अवश्य, ते मरणोपरांत जीवनामध्ये का होईना! जर वाईट कर्म करणारा सुख उपभोगत असेल आणि चांगले कर्म करणारा दु:ख भोगत असेल तर आमची ही मान्यता सबळ-सशक्त बनते की अगोदरच्या व्यक्तीचे प्रारब्ध चांगले होते आणि नंतरच्याचे वाईट.

अध्यात्मवाद जगामध्ये एक शाश्वत नैतिक व्यवस्थेकडे संकेत करते. या व्यवस्थेमध्ये माणसाचे कृतकर्म सुरक्षित राहतात. या आधारावर मनुष्य आपल्या वर्तमान जीवनामधील दु:खांना पूर्व जन्माच्या वाईट कर्मांचे परिणाम समजू लागतो. परिणामी, तो आपल्या वर्तमान जीवनाच्या सत्कर्मांच्या आधारे भविष्यातील भावी जीवनास सुखमय बनविण्यामध्ये प्रयत्नशील असतो. ऋग्वेद या नैतिक व्यवस्थेस 'ऋत', मीमांसा 'अपूर्व' आणि न्यायवैशेषिक 'अदृष्ट' असे म्हणतात.

### १२] मानवी देह – सूक्ष्मजगत

ब्रह्म हे विश्वांत अंतर्व्यापी आहे. ब्रह्म म्हणजेच सत्य. मानवी देह हे त्याचे आश्रयस्थान. मानवी शरीर इतर वस्तूंसारखीच एक वस्तू नसून विश्वाचे संक्षिप्त रूप आहे. त्याला व्यष्टि व विश्वाला समष्टि म्हणता येईल व 'पिंडीं ते ब्रह्मांडीं' या न्यायाने विश्वांत जे जे आहे ते ते मानवी शरीरात आहे. म्हणजेच विशाल विश्वांत व शरीरांत एकाच शक्तीचे कार्य चालू आहे आणि म्हणूनच साधकाने विश्वाच्या अफाट पसाऱ्यांत बुडून न जाता स्वत:च्या शरीरांत असणाऱ्या सत्यावर (ईश्वरावर) मन एकाग्र करावे.

मानवी देहात पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पाच तत्त्वांचे (पंचमहाभूतांचा) समावेश असला तरी, मानवी देह मुख्यत: पृथ्वीचे बनलेले आहे. पृथ्वी, जल, वायू, अग्नी व आकाश यांचा आपल्या शरीराशी

असणारा संबंध आपण जितका जाणून घेऊ तितके शरीर आणि आत्म्याचे वेगळेपण उत्तम समजेल. हेच विश्लेषण आम्हाला शरीराची मूळ रचना आणि आत्म्याच्या शाश्वत स्वरूपाशी परिचय करून देईल.

**१३] कृपा आणि कर्म**

अध्यात्ममार्गामध्ये कृपा आणि कर्म यामधील परस्पर संबंध विशेषेकरून अनुसरणीय असे आहे. साधकाच्या जीवनामध्ये कृपेचे स्थान प्रमुख असते तर कर्माचे स्थान गौण असते. वास्तविक साधकाचे यथार्थ कर्म एका परीने नाहीच, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. जे कर्म रूपाने प्रतीत होते ते कर्माचे आभासमात्र आहे. पक्षांतराने असे म्हणता येईल की योगीसाठी योगमार्गामधील कर्मच प्रमुख असते – कृपा अवश्य सर्वत्र अपेक्षित असते, परंतु कृपेपेक्षा कर्माचा महिमा अधिक आहे. यामध्ये पण खंड आणि महाखंड योगांमध्ये कर्माचे प्राधान्य आणि उत्कर्ष असूनही पण सापेक्षिक दृष्टिने कृपाच प्रमुख असते. परंतु अखंड योगामध्ये कृपा गौण असते. इथपर्यंत की स्थूलमानाने ती लुप्तप्राय असते, मात्र कर्मच आपल्या प्राधान्यासह खंड कृपेस दाबून आत्मप्रकाशित होतो. अशाप्रकारे कर्माच्या स्वप्रतिष्ठित होण्यामुळे पूर्ण पुरुषार्थ प्रकट होते आणि महाकृपा स्वत:स प्रकट करते. महाकृपा आणि परम पुरुषार्थ अभिन्न स्वरूपात एका क्षणामध्ये अभिव्यक्त होऊन जातात.

**१४] भारतीय तत्त्वज्ञान व सूफ़ी दर्शनप्रणीत देह – तौलनिक विवेचन[५७]**

**पंचमहाभूत व मानव निर्मिती**

भारतीय तत्त्वज्ञानानुसार महाभूते पाच आहेत. यांना पंचमहाभूते असे म्हणतात. १) पृथ्वी, २) आप, ३) तेज, ४) वायू आणि ५) आकाश यांना पंचमहाभूते असे म्हणतात. इस्लामी धारणेनुसार आकाशास प्रेषित मुहम्मद सं. यांचे निवासस्थान मानण्यात येते. म्हणून त्यांच्या आदराप्रित्यर्थ पृथ्वी, आप, तेज व वायू यापासून आकाशास वेगळे केले गेले आहे. यास्तव आकाशाची गणना सूफी तत्त्वज्ञानामध्ये महाभूतामध्ये होत नाही. या पंचमहाभूतांचे स्थान मानवी शरीरामध्ये आपादमस्तक खालून वर याप्रमाणे आहे – पृथ्वी, आप, तेज, वायू आणि सर्वात वर मस्तकामध्ये आकाश. यावरून हे स्पष्ट आहे की सूफी तत्त्वज्ञानामध्ये पृथ्वी, आप, तेज आणि वायू हे चार महाभूत परिगणित आहेत.

मनुष्य जन्माचा हेतू स्पष्ट करताना पवित्र कुराणामध्ये परमेश्वर म्हणतो – ''मी 'जिन्न' (दैवत, यक्ष-किन्नर) व मनुष्ये यास या हेतूनेच निर्माण केले आहे की त्यांनी माझी उपासना (भक्ती) करावी.'' ५१:५६. उपासना किंवा भक्ती म्हणजे केवळ ईशस्तवन, ईशप्रशंसा, ईशपावित्र्य वर्णन नव्हे. समस्त सृष्टी ईशस्तवन व ईशपावित्र्य वर्णनात मग्न आहे, परंतु मानवास सोडून इतर सर्वांपैकी कोणीच उपासना वा भक्ती करू शकत नाही. उपासना फक्त मानवप्राणीच करू शकतो. ही गोष्ट सर्वमान्य आहे की आहार, निद्रा, भय आणि मैथून या गोष्टी मानव आणि इतर सर्व सजीव प्राणी यांमध्ये समाईक आहेत. या गोष्टींची सेवा म्हणजे उपासना होऊ शकत नाही आणि ना मानव या गोष्टींसाठी जन्मास आला आहे. सूफ़ी संतांनी उपरोक्त क़ुरआनी महाश्लोकांमधील मूळ अरबी संहिता ''इल्ला लि आबुदून'' चे पर्यायी वचन ''इल्ला लि आरेफ़ून'' असे करून मानव जन्माचा हेतू फक्त उपासनेकरिताच नसून, आपल्या विवेक-बुद्धीचा सुयोग्य उपयोग करण्यासाठी आहे, असे नमूद केले

आहे. आपल्या बुद्धिमत्तेमुळेच मानव हा इतर सर्व सजीव प्राण्यांहून श्रेष्ठ आहे. मानवाच्या बुद्धिमत्तेचा संबंध श्रद्धेशी आहे, त्याच्या ईश्वरनिष्ठेशी आहे. याच कारणामुळे प्रेषित, संदेशवाहक, संत, महात्मे इत्यादी मानवांमध्ये निर्माण होतात. त्यांना ब्रह्मज्ञानी म्हटले जाते. हदीस कुद्सी (पवित्र प्रेषित वचन) मध्ये अभिव्यक्त आहे की, 'मी स्वत:मध्ये आवृत्त एक कोष (खजिना) होतो, स्वत:स ओळखण्यासाठी, आपल्या आत्मोपलब्धीसाठी, मी स्वत:स विभक्त करून ही सृष्टी निर्माण केली.'

**आत्मा – मानवासाठीच विशेष देणगी**

पवित्र कुराणामध्ये एके ठिकाणी असे नमूद आहे – ''आणि (ती वेळ आठवा) जेव्हा तुझ्या पालनकर्त्याने देवदूतांना म्हटले, 'मी सडलेल्या चिखलाच्या खणखणीत मातीपासून मानवाची निर्मिती करणार आहे.' आणि जेव्हा मी त्याला पूर्ण आकार देऊन, त्यात माझ्या आत्म्याची फुंकर मारेन, तेव्हा तुम्ही त्याच्यासमोर नतमस्तक व्हा.'' १५:२८–२९ तैत्तरीय उपनिषदामध्ये असे नमूद आहे की पंचमहाभूताच्या निर्मितीनंतर मानवाची निर्मिती झाली आहे. तसेच पंचमहाभूतापासून आत्म्याची निर्मिती झाली आहे – आत्मा पंचमहाभूतांपासून बनलेला आहे. पहिले महाभूत आकाश, आकाशानंतर वायू, वायूनंतर अग्नी, अग्नीनंतर आप. नंतर पृथ्वी बनली. पृथ्वीपासून वनस्पती निर्माण झाल्या. वनस्पतीपासून खाद्यान्न बनले. अन्नापासून रक्त बनले अर्थात पशू बनले. नंतर मानव निर्माण झाला. हा प्रथम होता, नंतर उदयास आला.

प्रारंभी आत्म्याच्या स्वरूपात मानवाची निर्मिती होती. हाच ब्रह्मांडनिर्मितीचा मूळ कारण बनला. आत्म्याने स्वत:स बऱ्याच काळापर्यंत स्वत:स अव्यक्त ठेवले. नंतर मानवी शरीरात प्रवेश करून स्वत:स प्रकट केले. या महान आत्म्यास (रूह अज़ीम) भारतीय संत महात्मा असे म्हणतात. अबुल अर्वाहस महापुरुष अथवा कारण देह असे म्हणतात. भारतीय संत सिद्दीक़ीयतच्या श्रेणीस महात्मा संबोधतात तर अल्लाहस परमात्मा म्हणतात. ते खरोखर 'वहदत'चे स्थळ आहे. याला अद्वैत म्हणतात. हे अबुलअर्वाह किंवा रूहुलअर्वाह आहे. ज्याअर्थी भारतीय संतांना अहदीयतचे स्थळ, जी अल्लाहची सत्ता आहे, अज्ञात आहे किंवा त्यांच्या दृष्टीने अंतर्धान आहे सांकेतिकपणे 'परमवस्तू' म्हणून त्यांनी मौन धारण केले. परमेश्वराचे अस्तित्व मान्य करून त्यांची मती गुंग झाली.

**पंचमहाभूतांच्या तन्मात्रा**

शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे पंचमहाभूतांचे विषय आहेत. यांनाच तन्मात्रा असेही म्हणतात. १) आकाशामध्ये फक्त शब्द (ध्वनी) ही तन्मात्रा आहे. २) शब्द आणि स्पर्श हे वायूचे विषय आहेत. ३) तेज (अग्नी) मध्ये शब्द, स्पर्श व रूप या तन्मात्रा आहेत. ४) शब्द, स्पर्श, रूप आणि रस हे आपचे विषय आहेत. तर ५) पृथ्वीच्या तन्मात्रा आहेत शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध. भारतीय संत पृथ्वीस धरती पण म्हणतात. कारण त्यात सर्वांना धारण करण्याची शक्ती आहे. हे मातीचे वैशिष्ट्य आहे. संकेत असा की मानव हा मातीपासून बनलेला आहे. तो मातीचा पुतळा आहे.

नाक, जीभ, डोळे, कान आणि त्वचा ही पाच ज्ञानेंद्रिये आहेत. त्यांची कार्ये आहेत – नाकाने वास घेणे, डोळ्यांनी पाहाणे, कानांनी ऐकणे, जिभेने स्वाद (आस्वाद) घेणे आणि त्वचेने स्पर्शाची जाणीव होते, शीतोष्णाची अनुभूती होते. गुद, शिश्न (वा) योनि, पाय, हात आणि वाणी ही मानवाची पाच कर्मेंद्रिये आहेत. गुदद्वारे मलविसर्जन होते, शिश्न व योनिमधून मूत्रविसर्जन होते, पायांमुळे चालणे, पळणे शक्य होते, हातांमुळे धरले जाते तर वाणीमुळे बोलणे शक्य होते.

**पंचमहाभूतांचा ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये यांच्याशी संबंध**

पृथ्वीचा संबंध नाक आणि गुदस्थानाशी आहे. आपचा संबंध जीभ आणि गुह्येंद्रियां (शिश्न व योनि)शी आहे. तेज(अग्नी)चा संबंध डोळे आणि बेंबीशी(नाभीशी) आहे. वायूचा संबंध त्वचा आणि वक्ष:स्थळा(छाती)शी आहे. आकाशाचा संबंध कानांशी आहे.

मानवी देहामधील पुढील सात स्थळे (सप्तस्थाने) पंचमहाभूताशी निगडित आहेत– १) गुदस्थान, २) लिंगस्थान, ३) नाभी स्थान, ४) हृदयस्थान (छाती), ५) कंठस्थान, ६) भुवया आणि ७) तालु (टाळू) स्थान.

भारतीय संतांनी उपरोक्त प्रत्येक स्थळासाठी एक–एक पुजारी कल्पिलेले आहे. ते याप्रमाणे : १) गुदस्थान – गणपती, २) लिंग स्थान – ब्रह्मा, ३) नाभीस्थान – विष्णू, ४) हृदयस्थान – शिव, ५) कंठस्थान – सदाशिव, ६) भ्रुकुटी (भुवया) – गुरू आणि ७) तालुस्थान (त्रिकुटी) – परमेश्वर, परमात्मा.

**सप्त श्रेणी आणि सप्त नाम–स्मरण (जप)**

| सप्त श्रेणी व पंच नामस्मरण | षट्चक्रे |
|---|---|
| १) श्रेणी – वासना (नफ़्स)– दृश्य जगत् (आलम–ए–शहादत) – सस्वर जप (अज़्कारे जली) | १) मूलाधार चक्र<br>२) स्वाधिष्ठान चक्र |
| २) श्रेणी – अंत:करण (कल्ब)– प्रतिरूप वा साहदृश्य जगत (आलम–ए–असमाल) – मानस जप (अज़्कारे कल्बी) | ३) मणिपूर्ण चक्र<br>४) अनाहत चक्र |
| ३) श्रेणी – आत्मा (रूह) – वाहिदिय्यत (अनेकता) आत्मिक जप (अज़्कारे रूह) – हृदय (सीना) | ५) विशुद्ध चक्र<br>६) अग्नी चक्र |
| ४) श्रेणी – ज्योती, प्रकाश (नूर) वहदत (एकता) मर्म जप (अज़्कारे सिर्री) – कंठ (हल्क) | ७) सहस्रदल चक्र<br>**सूचना –** येथे अग्नी चक्र हे सातवे चक्र म्हणून घेण्यात आले आहे. ही षट्चक्रे म्हणजे राशी चक्रातील बारा राशी होत. हे राशीचक्र म्हणजे विराट पुरुष होय. |
| ५) श्रेणी – परम सत्ता (ज़ात ) अहदियत (एकत्त्वता) ख़फ़ी मौन जप (अज़्कारे ख़फ़ी) | |
| ६) भ्रुकुटी (अब्रू) – ब्रह्मगुफा (गंज मख़फ़ी) | |
| ७) शून्य (नुक्ता) – सोऽहम् (हूय्यत) तालु | |

## लिंग-नफ़्स-तुलना

भारतीय संतांनी या सात श्रेणींना तीन लिंगामध्ये विभाजित केले आहेत.

| | |
|---|---|
| १) इष्ट लिंगम्<br>२) प्राण लिंगम्<br>३) भाव लिंगम् | १) नफ़्स-ए-अम्मारा<br>२) नफ़्स-ए-लव्वामा<br>३) नफ़्स-ए-मुतमइन्ना |

**भारतीय शैव तत्त्वज्ञाना**मध्ये उपरोक्त तीन लिंगां(नफ़्स)चे प्रत्येकी दोन विभाग दर्शविले आहेत. उपासनेच्या या सहा पायऱ्या शिवाच्या सहा स्वरूपांना धरून आहेत. या साक्षात्काराशी निगडित असून याला षट्स्थलसिद्धान्त असे नाव आहे.

**१) इष्ट लिंग** →
- १) आचार लिंग
- इष्ट लिंग हे प्रतीकरूप दिसणारे असून याचा संबंध शरीरांशी आहे. इष्ट लिंग दीक्षा देणारे गुरू देतात.
- २) गुरू लिंग

**२) प्राण लिंग** →
- १) शिवलिंग
- प्राणलिंग याचा संबंध जीवाशी असून ते अवयवरहित असल्याने त्याची मनाने कल्पना करावी लागते.
- २) प्रसाद लिंग

**३) निष्कललिंग किंवा मूललिंग** —
- १) महालिंग – महालिंगापासून जगाची उत्पत्ती होते. ते भावलिंग, प्राणलिंग व इष्टलिंग असे त्रिविध आहे.
- २) भावलिंग – याचा संबंध आत्म्याशी असून त्याची कल्पना भक्तीने करता येते.

सूफी तत्त्वज्ञानामध्ये लिंगांशी समशील असे 'नफ़्स' अर्थात वासनेचा वा आत्म्याचे पण प्रमुख तीन प्रकार मानले गेले आहेत. त्यांचेही पण प्रत्येकी दोन गट कल्पिण्यात आले आहेत. ते पुढीलप्रमाणे –

**१) नफ़्स अम्मारा** (दुष्टात्मा वा भ्रष्टात्मा) —
- १) शरियत (भोगपुर) (कर्मकांड)
- २) तरीक़त (गोरखपुर) (साधनामार्ग) (भक्तिकांड)

**२) नफ़्स लव्वामा** (प्रदूषणकारी आत्मा) —
- १) मारिफ़त (रूपनगर) (ब्रह्मज्ञान) (ज्ञानकांड)
- २) हक़ीक़त (नेहनगर) (ब्रह्मवास्तव) (मुक्तिकांड)

**३) नफ़्स मुतमइन्ना** (द्रष्टा आत्मा) वा (प्रशांत आत्मा) —
- १) फ़ैजोबरकात (कृपाप्रसाद)
- २) हूय्यत (तदत्त्व) (शून्यावस्था)

उपरोक्त सप्त श्रेणींना समांतर असे सूफी तत्त्वज्ञानप्रणीत 'नफ़्स'चे पुढील सात प्रकार निर्दिष्ट करणे शक्य आहे. 'नफ़्स'च्या शुद्धीकरणाच्या प्रक्रियेस लक्षात ठेवून त्याच्या सप्त कोटि (श्रेणी) पुढीलप्रमाणे ठरतात –

१) नफ़्स अम्मारा (दुष्टात्मा वा भ्रष्टात्मा)

२) नफ़्स लव्वामा (प्रदूषणकारी आत्मा)

३) नफ़्स मुल्हिमा (अनुप्राणित आत्मा वा ईशप्रेरित आत्मा)

४) नफ़्स राज़िय्या (संतुष्ट आत्मा वा तृप्त आत्मा)

५) नफ़्स मरज़िय्या (तुष्टिदायक आत्मा)

६) नफ़्स मुतमइन्ना (द्रष्टा आत्मा वा प्रशांत आत्मा), आणि

७) नफ़्स साफ़िया व कामिल (विशुद्ध आणि परिपूर्ण आत्मा)

**पंच देह : पंच अस्तित्व व पंच जगत् (लोक)**

| | | | |
|---|---|---|---|
| १) लिंग देह | मुमकिनुल वजूद | आलम–ए–नासूत | भुव:लोक |
| २) कारण देह | मुमतनुल वजूद | आलम–ए–मलकूत | जनलोक |
| ३) महाकारण देह | आरिफुल वजूद | आलम–ए–जबरूत | तप:लोक |
| ४) सूक्ष्म देह | वहदतुल वजूद | आलम–ए–लाहूत | प्रथम सत्यलोक |
| ५) स्थूल देह | वाजिबुल वजूद | आलम–ए–हाहूत | कौमारलोक |

**पंचमहाभूतवर्ण : अलवान–ए–पांच अनासीर**

पहिले महाभूत आकाशाचे रंग निळे आहे, दुसरे महाभूत वायूचा रंग हिरवा आहे. तिसरे महाभूत तेज (अग्नी)चा रंग काळा आहे, तर चौथे महाभूत आपचा रंग लाल आहे आणि शेवटचे पाचवे महाभूत पृथ्वीचे रंग पिवळे आहे. जमिनीपासून जेव्हा एखादे झाड उगवते तेव्हा ते काहीसे पिवळसर रंगाचे असते. त्यावर हवेचा मारा पडून ते हिरवे होते. आणि याला जाळल्यास काळे पडते. एखादी वस्तू पाण्याने वारंवार धुतल्यास ती काहीशी लालसर बनते.

**पंचीकरण : प्रक्रिया व स्वरूप**

**पंचीकरण** – माणसास कर्म करण्यास प्रवृत्त करणारे जे मानसिक घटक आहेत त्यांना कर्मेंद्रिये असे म्हणतात. **१) चित्त (फ़िक्र) –** याच्या अवस्थेमध्ये बेचैनी, अधीरता समाप्त होते. म्हणजे हे पण नष्ट होते. **२) बुद्धी (अक़्ल) –** शुभ आकांक्षा याचे स्वरूप आहे. दंगा–मस्तीपासून परावृत्त आहे. इच्छा पूर्ति झाल्यानंतर याची समाप्ती होते. किंवा असे म्हणता येईल की समाधानावर याची समाप्ती आहे. बुद्धीच्या उड्डाणाच्या समाप्तीमध्ये (नंतर) वास्तविक समाधान असते. **३) मन व संकल्प (इरादा)** – याचे आधार अंत:करण आहे. याचे दोन प्रकार आहेत – १) संकल्प (खुदी) २) विकल्प (बेखुदी). माणूस जेव्हा सद्गुरूचे शिष्यत्व पत्करतो म्हणजेच प्राण आणि देह यांना सोबत घेऊन जाणारी शक्ती अर्थात आपले संकल्प – इच्छा (इरादा) आपल्या सद्गुरूच्या हवाली करतो, याला विकल्प (बेखुदी) असे म्हणतात. तेव्हा येथूनच परमेश्वराची

ओळख सुरू होते, म्हणजेच आत्मज्ञान (रूहानियत) आणि प्रकाश (नूर) यांचा सामना सुरू होतो. या वेळेस तो शिष्य नसतो, परंतु ईश्वरी ज्ञानाचा धारणकर्ता असतो. तो आत्मवाणी अंतरात्म्याचा आवाज ऐकण्याचा अधिकारी बनतो. म्हणजेच त्याला आपल्या संकल्पास ईश्वराच्या संकल्पाशी समरस करावे लागते. **४) अहंकार (अनानियत)** – भारतीय संत–महात्मा याला परमेश्वराचे स्थळ मानतात. ईश्वरास अहंकाराचा अधिकार प्राप्त आहे. त्याचे अस्तित्व स्वत:तर्फे वस्तूंना स्वरूप प्रदान करून देणारे असते. जेव्हा तो (ईश्वर) मायास्वरूप असतो तेव्हा त्यास प्रेम (इश्क़) म्हणून संबोधतात. ''हुवलइश्क़'' अर्थात तोच प्रेमस्वरूप आहे. अहंकार तीन प्रकारचे असते – १) सात्त्विक, २) राजसिक (रजोगुण) आणि ३) तामसिक. सात्त्विक अहंकार हे ज्ञानस्वरूप (मुक़ाम–ए–मारिफ़त) असते. याचे मायाशी संबंध असते. तो म्हणतो की जे काही आहे ते सर्व मीच आहे.

हा दर्जा संपूर्ण अधिकार म्हणजेच सर्वाधिकाराचा आहे. जसे की सर्वश्रेष्ठ अल्लाह निवेदन करतो की, 'त्याने सर्व वस्तूंना घेरलेले आहे' ४१:५४ म्हणजेच ''प्रत्येक वस्तू ही त्याच्या आधिपत्याखाली आहे'' ३६:८३ आणि पुन्हा अल्लाह (परमेश्वर) निवेदन करतो की ''तो आदि, अंत, व्यक्त, अव्यक्त आणि सर्व वस्तूंचा ज्ञाता आहे.'' ५७:३

रजोगुण हा मध्यभागातील अहंकार आहे. याची दृष्टी जीवनावर असते. ती दृष्टी म्हणते की मी महाभूतापासून वेगळी आहे. देह माझ्याशी संबंधित नसतो. ''कोणतीच वस्तू त्याच्यासारखी नाही.'' ४१:११ ''अल्लाह निरपेक्ष, निस्पृह आहे व सर्व त्याच्यावर अवलंबून आहेत.'' ११२:२

तमोगुण ही ती शक्ती आहे जी जगामध्ये वृत्तिहीन दिसून येते. ती दास्यत्व व भक्तीच्या स्वरूपात आहे. ती मायावी प्रीतिमुळे वृत्तिहीन आहे. ही शक्ती अज्ञान आणि बेसावधगिरी यांच्याशी निगडित असते. अहंकाराच्या जाणीवेमुळे मी आणि तू चे तुणतुणे वाजवत असते. अशा प्रकारे ती अद्वैतापासून फार लांब जाते. पवित्रकुराणात असे सांगितले गेले आहे की ''हे मुहम्मद स. म्हण, मी तुमच्यासारखा एक माणूस आहे.'' ''हे पैगंबर स. तुमच्या अगोदरसुद्धा आम्ही माणसांनाच पैगंबर म्हणून पाठविले होते.'' – २१:७ पूर्वोक्त विधानाद्वारे जेव्हा 'सोऽहम्'ने ('हूय्यत') अस्तित्व धारण करण्याची इच्छा व्यक्त केली तेव्हा परमेश्वराच्या संकल्पामुळे तो आत्मा बनला. जेव्हा बंधने वाढू लागली तेव्हा अहंकार उफाळून वर आला. जेव्हा दुसऱ्याचे बंधन याच्यावर जास्त झाले तेव्हा त्यास 'अक़्ल–ए–कुल' अर्थात विश्वज्ञान किंवा निरपेक्ष विवेक असे नामाभिधान प्राप्त झाले. हे संकल्पा(खुदी)मुळे घडले. याच्यापासून पाच ज्ञानेंद्रिये बनली आणि याच संकल्पामुळे पाच कर्मेंद्रिये बनली. ती पाच कर्मेंद्रिये आहेत – गुद, शिश्न (वा योनि), हात, पाय आणि वाणी.

ही कर्मेंद्रिये देह आणि त्याच्या अवयवांपासून बनलेली आहेत. म्हणजेच वाणी किंवा बोलणे ते कर्म आहे जे जीवनवृत्तीस शब्दांच्या साच्यामध्ये बसवून वायू लहरींच्या आधारे श्रोत्यांच्या कानांपर्यंत पोहोचविते. हस्तकर्म ते कर्म आहे की जेव्हा माणूस एखाद्या वस्तूस हस्तगत करण्याचा संकल्प करतो व त्या दिशेने कार्यरत होऊन ती वस्तू हातांनी धरतो किंवा पकडतो. मनुष्य आपल्या पायांनी हालचाल करून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचतो. पाय पण संकल्पाचे गुलाम आहेत. संकल्पानंतर पायांनी स्थलांतरासाठी हालचाल सुरू होते आणि ते उद्दिष्टापर्यंत त्यास पोहोचते करतात. शिश्न वा योनि मूत्रविसर्जनाचे कर्म करतात. हे कर्म शरीराच्या

आरोग्यासाठी लाभदायक आहे. मलविसर्जन हे गुदाचे कार्य आहे. मानवी देहाच्या आरोग्यासाठी हे आवश्यक आहे. गणपती याचे द्वारपाल आहे. प्रथम याची पूजा होते नाहीतर सर्व धार्मिक जीवन नीरस बनून जाईल. लिंग स्थानापासूनच ब्रह्मांड उदयास येतो. उपरोक्त इंद्रियांना कर्मेंद्रिये यासाठी म्हणतात की यांच्यावर माणसाची बाह्य कर्मे निर्भर असतात. या संदर्भात पवित्र कुराणाच्या श्लोकांमध्ये असे नमूद आहे – ''तुम्ही कुठल्याच प्रकारच्या श्रेष्ठत्वेमध्ये नसता आणि तुम्ही कुराणपठणापासून काहीच बोध घेत नाही आणि तुम्ही कुठल्याही कार्यामध्ये कार्यमग्न होत नाही. तुम्ही कोणत्याही कार्यामध्ये मग्न असाल तेव्हा आम्ही तुमच्यावर नजर ठेवून असतो अर्थात यास आम्ही साक्ष असतो.'' मनुष्य जे काही करतो तो त्याचे फळ प्राप्त करतो. कर्माचे फळ चाखण्यासाठी मानवाचे जन्म झाले आहे. या कार्यास सर्वश्रेष्ठ परमेश्वराने यासाठी ठेवले आहे की त्याने परमेश्वराच्या लीलांना समजून घ्यावे. अल्लाह आपले कार्य त्याच माणसामध्ये व्यक्त होऊन करतो ज्याची मायावी कर्मे–कृत्ये बंद झालेली आहेत. तो त्याच्या सत्कर्मांमुळे त्याला मुक्तिमार्गा–मोक्षमार्गाकडे खेचून घेतो. अल्लाहचे साक्षात्कार त्याच्या नशिबी असते जो आपल्या वास्तविक नैसर्गिक मृत्यूअगोदर मेलेला असतो. अशा माणसाच्या सर्व प्रकारच्या भौतिक लालसा संपूर्णपणे नष्ट झालेल्या असतात. अशी व्यक्ती मृत्युंजय बनते.

**पंचमहाभूतांची कार्यप्रणाली**

**१) आकाश विवेचन**

आकाशामध्ये ध्वनी आहे. ध्वनीचा आत्मा (नफ़्स) ब्रह्म (रहमान) आहे. 'कुन' ('भव') या शब्दापासून ध्वनीचे उगम झाले. भारतीय संत व तत्त्वज्ञ या ध्वनीस 'नाद' असे म्हणतात. या नादला सरस्वती पण म्हणतात. कारण नाद पासून शेकडो ध्वनी निर्माण झाले. इस्लामी सूफींनी या संबंधात लिहिले आहे की ''कस निदाए चुनीं सदाए दराज़'' म्हणजेच माणसाचा ध्वनी हा सुदीर्घ नाद निर्माण करू शकतो. हा नाद अव्यक्त ध्वनी अथवा अचल अक्षरमात्र असतो.

शब्द याचा शाब्दिक अर्थ ध्वनी संकेत असा आहे. अध्यात्माच्या मते संपूर्ण जीवसृष्टीचा प्रत्येक घटकात अंतर्भूत असणारे हे ध्वनितरंग आहे. दोन वस्तू एकमेकांवर आदळल्याने याची निर्मिती होत नाही. हा ध्वनी स्वत: उत्पन्न होतो. जीव आणि ईश्वरातील संपर्काचे हे माध्यम आहे. हा ध्वनी अंत:करणातील आवाज अनुभवला जाऊ शकतो. थोडक्यात सांगायचे झाले, तर प्रत्येक जीवाला प्राप्त झालेला हा ईश्वरी अंशच आहे. म्हणूनच म्हटले जाते, शब्द ब्रह्म आहे. गुरू आपल्या शिष्याला हा ध्वनी ऐकण्याची क्षमता देऊन त्याला आत्मसाक्षात्काराचा मार्ग मोकळा करून देतो. शिष्य हा ध्वनी ऐकता ऐकता त्याच्याशी एकरूप होऊन आत्मसाक्षात्काराची अनुभूती घेऊ शकतो. वेगवेगळ्या धर्मांमध्ये याला वेगवेगळ्या नावाने ओळखले जाते. वेदांती यांनी याला 'नाद' 'आकाशवाणी', 'श्रुती' अशा संज्ञा दिल्या आहेत. कठोपनिषदात याला 'उद्‌गीत' म्हटले आहे. ग्रीक संस्कृतीत याला 'लोगोस' आणि चिनी तत्त्वज्ञ लाओत्सेने याला 'ताओ' नाव दिले आहे. पवित्र कुराणात याला 'कल्मा' म्हटले आहे. शीख धर्मात याला 'शबद' आणि 'नाम' असे नाव दिले गेले आहे.

हे लक्षात असावे की अर्थसृष्टी ही शब्दाच्या अधीन असते. अर्थात सृष्टिचा हा क्रम आहे की प्रथम ज्ञानापासून शब्दाचा उद्‌भव होतो तदनंतर त्याच्या अर्थाचा आविर्भाव होतो. ज्ञानामध्ये ज्या सत्तेची आत्मरूप

प्रचिती होते शब्दामध्ये त्याचेच अनात्मरूप स्फुरण प्रतीत होते. यानंतर शब्दापासून अर्थाच्या स्तरावर पोहोचल्यानंतर सृष्टिक्रिया पूर्ण होते. रहस्यवित् आचार्य भर्तृहरिने म्हटले आहे की शब्दतत्त्वापासूनच अर्थाचा आविर्भाव होतो. अनादि आणि अनंत शब्दतत्त्वासच त्यानी मूलतत्त्व मानले आहे. तेच अक्षरस्वरूप आहे. तेच अर्थरूपाने विवर्तित होते. या विवर्तापासूनच जगाची सृष्टिप्रक्रिया चाललेली असते. ज्या सिद्धान्तानुसार शब्द ब्रह्माचा सिद्धान्त मानला जातो त्यानुसार शब्दातीत परब्रह्मापासून अर्थ स्वाभाविकपणे प्रकट होते.

वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की शब्दानंतरच अर्थाचा आविर्भाव मानला जातो. अर्थात अर्थाची स्फूर्ती होते शब्दापासून आणि शब्दाचे स्फुरण होते शब्दातीत चैतन्यापासून. शब्दच अर्थरूपात परिणत होतो. वास्तविक शब्द पण शक्तीच आहे आणि अर्थ त्याचे बाह्य विकासमात्र.

तत्त्वज्ञ संतांनी नादाची तीन प्रकारामध्ये विभागणी केली आहे १) अहंभाव किंवा नादब्रह्म, २) कंपन ध्वनि आणि ३) शब्द.

**१) अहंभावाचा ध्वनी** हा अनादिकाळापासून नित्य आहे, आणि नित्य राहील. इस्लामी तत्त्वज्ञ सूफ़ी या ध्वनीस निरपेक्ष ध्वनी (आवाज़-ए-मुतलक़) असे संबोधतात. याला 'सुलतान-ए-अज़कार'ही म्हणतात. हा स्वयंभू आहे. सुरुवातीस शब्द (कल्मा) होता. या शब्दाने देह (शरीर) धारण केले. हे समस्त ब्रह्मांड 'कुन' अर्थात 'भव' 'हो' या शब्दापासून बनलेले आहे. जसे की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने म्हटले आहे - ''शपथ घेतो मी त्या वस्तूची ज्या तुम्ही पाहता आणि ज्या तुम्ही पाहत नाही (पाहू शकत नाही). ६९:३८-३९ खरोखर ती प्रेषित (मुहम्मद स.) यांची वाणी आहे. (अर्थात यांचे शब्द आहेत.)''

**संकल्पानुभूती -** हे महत् आकाशाशी निगडित आहे. आतापर्यंत कुणालाच या ध्वनीचा थांगपत्ता लागलेला नाही. आत्मा (रूह) निर्मित झाल्याकारणाने हा ध्वनी अज्ञातवासात विलीन आहे.

**२) कंपन-ध्वनी -** हा तो ध्वनी आहे जो एक वस्तू दुसऱ्या वस्तूवर आपटल्याने निर्माण होतो. जेव्हा हा ध्वनी समष्टिगत रूप धारण करतो तेव्हा तो ॐध्वनीचा रूप धारण करतो. घंटानादामध्ये सुद्धा ॐचा ध्वनी निघतो. हा तो ध्वनी आहे की ज्याच्यामध्ये 'आकाशवाणी'चे रहस्य निहित आहे. घंटा आणि झांग (झांझ) यांच्या एकसोबत वाजण्यामुळे 'सोऽऽहम्' चा ध्वनी निघतो. घंटानाद, आकाशवाणी आणि झांगचा प्रतिध्वनी हा मानवामधील ईश्वराचे प्रकट होण्याच्या स्थानापासून निघतो. कारण की 'सोऽऽहम्' चा अर्थ आहे 'तो मी आहे.'

**३) शब्द -** हा ध्वनी शब्दांच्या अनुषंगाने व्यक्त होतो. भारतीय संत शब्दास सरस्वती स्वरूपात मानतात, तर इस्लामी सूफ़ी याला 'इस्म-ए-आज़म' म्हणून ओळखतात. याला 'कल्मा' पण म्हणतात. भारतीय संत या ध्वनीस वेदमुख म्हणतात आणि हा तीन गुणांनी युक्त आहे. याला 'अकार', 'उकार' आणि 'मकार' असे म्हणतात. सूफ़ींच्या शब्दांमध्ये हेच अनुक्रमे 'फ़तहा', 'जम्मा' आणि 'कसरा' आहेत. अकार, उकार आणि मकारच्या समष्टिगत संयुक्त रूपास 'ॐ'कार असे म्हणतात. भारतीय संत याच्या वरील स्थानास 'बंद' म्हणतात, तर सूफ़ी संत याला 'कल्मा', 'कलाम', 'नूर' म्हणून संबोधतात. पवित्र कुराणामध्ये अभिव्यक्त आहे - ''त्याच्याचकडे अग्रेसर होतात उत्तम शब्द. (हे पैगंबरा!) का, तू (या गोष्टीचे) अवलोकन केले नाहीस की परमेश्वराने उत्तम शब्द (म्हणजे उदाहरणार्थ एकेश्वरवाचक शब्द) याचा कसा (उत्तम) दृष्टांत दिला आहे की

(उत्तम शब्द) जणू एक उत्तम वृक्ष होय, की त्याचे मूळ (जमिनीत) भक्कम रोवलेले व त्याच्या फांद्या गगनात (पोहोचलेल्या अशा) होत.'' १४:२४. ''तो आपल्या पालनकर्त्याच्या आज्ञेने सर्व काळ आपली फळे देत असतो आणि परमेश्वर लोकांस (यासाठी) दृष्टांत सांगतो की कदाचित् ते मनन करतील.'' १४:२५

## २) वायू विवेचन

मानवी देहामध्ये वायू संचरणाची पाच स्थाने आहेत. वायूचे पाच प्रकार आहेत. 'प्राणापान व्यानोद्दानमेदात्।'' १) उद्दान, २) प्राण, ३) समान, ४) व्यान आणि ५) अपान.

**१) उद्दान –** हा तो वायू आहे जो कंठापासून निघून मेंदूच्या मुळापर्यंत पोहोचतो. हा स्वप्रदर्शन घडवितो. ज्या माणसाचे चित्त शुद्ध असते त्याला सत्य स्वप्नांचे दर्शन होते. हा स्वप्नावस्थेप्रमाणे सुषुप्ती अवस्थेमध्ये सुद्धा कार्यरत असतो.

**२) प्राण –** हा वायू श्वासोच्छ्वासासाठी उपयोगात आणला जातो. हा जीवनाधार असतो. प्राणवायूमुळेच मनुष्य जिवंत असतो. हे विधान त्या गोष्टीकडे संकेत करते की सजीवांचे जीवन त्या परमेश्वराच्या कृपेवरच अवलंबून असते.

**३) समान –** हा तो वायू आहे जो नाभीमध्ये संचार करतो. तो अन्नरसास सर्व देहामध्ये पसरवण्याचे काम करतो. नाभीपासून विष्णूची उत्पत्ती होणे हे जगरहाटीकडे संकेत करते.

**४) व्यान –** हा वायू मानवी देहाच्या सांद्यांमध्ये संचरित होतो. मानवी देहामध्ये हा विविध जगतांना बांधून सोडतो. त्यांच्यामध्ये परस्पर संबंध निर्माण करतो. याला 'संधी' ('रूकू') असे म्हणतात. याच्यामुळे परमेश्वराचे 'कर्मग्रंथ' आणि 'वचन ग्रंथ' यांच्या सांध्याचे सत्त्व निदर्शनास येते.

**५) अपान –** हा वायू गुदद्वारामधून निघतो. याला सूफ़ी 'रीह' म्हणून संबोधतात. या 'रीह'ला बंदिस्त केल्यामुळे आत्म्याची शक्ती वाढते. आचमनासह (बावज़ू) केलेले कर्म हे अधिक प्रबळ आणि वैभवशाली बनते. हा वायू गुदस्थानास घेरलेला असतो. आकाशाची सहल आणि अर्धरात्रीची उपासना ('तहज्जुद') विशेषकरून सुदीर्घ प्रणिपात अवस्थेमध्ये हा वायू मोकाट असतो. तो कार्यप्रवृत्त नसतो. म्हणूनच आत्मिक आणि दैहिक आरोग्यासाठी अर्धरात्रीची उपासना अधिक लाभदायक सिद्ध होते. भारतीय संतांच्या मते सप्त नरकाची स्थाने नाभीपासून सुरू होऊन गुदस्थानावर समाप्त होतात. या नरकामध्ये बदल घडवून आणणारी गोष्ट (वस्तू) म्हणजे अर्धरात्रीची उपासना ('तहज्जुद') होय.

## ३) तेज (अग्नी) विवेचन

भारतीय संतांच्या दृष्टीत अग्नी एक देवता आहे. याच्या दर्शनामुळे आत्मज्ञान म्हणजेच ईश्वरज्ञान–ब्रह्मज्ञान निर्माण होते. वेदांमध्ये याच्या पूजेचा अनेक ठिकाणी उल्लेख आहे. अग्निहोत्र म्हणजे अग्नीचीच उपासना होय. संतांनी याला इतके पसंत केले आहे की ते मृत्यूनंतर देहाच्या तिन्ही भूतांना आगीत भस्मसात करतात. हे भूत संपूर्ण शरीरभर फैलावलेले आहे. याचे तिरोधान म्हणजे सजीवांचे अवसान होय. त्यांचा मृत्यू होय. मानवी देहामध्ये याची दोन स्थाने आहेत. एक नाभी तर दुसरे डोळे. कारण की प्रत्येक वस्तूचे सत्त्व हे आगीत

तापविल्यानंतरच निदर्शनास येते. याच कारणामुळे हे भूत जोपर्यंत देहामध्ये आहे तोपर्यंत प्रत्येक आंतरिक शक्ती, मग सात्त्विक असो वा रजोगुण असो किंवा तमोगुण असो मानवाच्या डोळ्यांमधून प्रकट होते. सूफ़ी संतांनी डोळ्यास जिब्रीलचे स्थान दर्शविले आहे. भारतीय संत-महात्मा अपराधाच्या काळास परमेश्वराची निद्रा म्हणून संबोधतात. अल्लाहचे डोळे उघडणे म्हणजे पुनरूत्थान घडून येणे - यासारखे आहे. अल्लाह महादेवदूत जिब्रीलच्या माध्यमाने सदाचारी दासांचे रक्षण करतो आणि याच दासांना तो नष्टभ्रष्ट करतो.

### ४) आप विवेचन

भारतीय संतांच्या मते पाण्याची देवता ब्रह्म आहे. याची दोन स्थाने आहेत. एक लिंग स्थान तर दुसरे जिव्हा. हा कुठल्याच परिवर्तनाशिवाय सृष्टी निर्माण करतो. सरस्वती ही ब्रह्माची धर्मपत्नी आहे. ही विद्येची देवी आहे. सूफ़ी संत या शक्तीस दैवी शक्ती म्हणजेच 'रहमानी ताक़त' म्हणतात.

पवित्र कुराणामध्ये अभिव्यक्त आहे - "(तो) कृपानिधी (ईश्वरच होय), ज्याने (मानवाला) कुराण शिकवले (मानवाला समजेल अशा भाषेत कुराणाचे सादरीकरण केले आहे.) त्यानेच मानवाला (विचार करणारा प्राणी) बनवले. त्यानेच माणसाला (आपल्या विचारांना व्यक्त करण्याची) बोलण्याची योग्यता प्रदान केली." ५५:१-४ "ब्रह्मवाणी (वह्यी)चा दृष्टांत मुसळधार पावसासारखा आहे. हा पाऊस (रात्री) अंधारामध्ये विजांच्या कडकडाटासह कोसळतो. परमेश्वराने आकाशामधून पाणी वर्षविले. मग त्याने मृत जमिनीस (पुन्हा) जीवन प्रदान केले. (अशीच स्थिती ब्रह्मवाणीची आहे). आणि आम्ही पाण्याच्या मदतीने प्रत्येक वस्तूस जिवंत केले. तर मग काय ते लोक श्रद्धा ठेवणार नाहीत?"

देहामध्ये पाण्याचे स्थळ दोन ठिकाणी आहे. एक जिव्हा तर दुसरे लिंग. पाण्यामुळे प्रत्येक वस्तू जिवंत आहे. हेच भूत प्रत्येक वस्तुच्या फलण्यास फुलण्यास कारणीभूत ठरते. याचे आत्मिक वास्तव असे आहे की याच्यापासूनच स्वर्गाचे उद्यान विकसित होतात. स्वर्गामध्ये प्रत्येक प्रकारचे फळ आणि हिरव्या वनस्पती असतात आणि स्वर्ग यांच्यानेच सुशोभित आहे.

### ५) पृथ्वी विवेचन

भारतीय संतांच्या मते पृथ्वीची देवता गणपती आहे. मानवी देहामध्ये याची दोन ठिकाणे आहेत. एक गुद तर दुसरे नाक. पृथ्वी जेव्हा अग्नीच्या स्वरूपात आपल्या केंद्र स्थानापासून सरकली आणि कक्षा बनली तेव्हा तिच्यावर एकसारखा पाण्याचा मारा होत राहिला आणि परिणामी पर्वत बनले, नद्या ओढे बनले, वनस्पती उदयास आले, सजीव प्राणी निर्माण झाले आणि शेवटच्या टप्प्यावर मानवाचे उदय झाले. जगामध्ये जरी मानव हा इतर प्राण्यांसारखा आला तरी तो इतर सर्व सजीव प्राण्यांहून भिन्न स्वरूपात दृष्टिगत झाला. हा घट्ट मातीपासून निर्माण झालेला आहे आणि तो ब्रह्मांडाचे सार आहे. घट्ट मातीपासून उत्पन्न झाल्याकारणाने तो चांगल्या वस्तू सेवन करतो, गरम पाण्याने स्नान करतो. ब्रह्मांडाचे सारतत्त्व असल्यामुळे तो परमेश्वराचा उप-प्रभारी वा प्रतिनिधी आहे. जरी तो प्राण्यांशी संयुक्त आहे, तरी पण तो वेगळ्या श्रेणीचा आहे. मानवामध्ये श्रेष्ठत्वाच्या दृष्टीने ईश्वराच्या प्रेषिताचे वर्चस्व असते. हे वर्चस्व समष्टिगतपणे आत्म्याच्या दृष्टीने असते. प्रेषित

आपल्या बांधवांना म्हणतात, 'मी पण तुमच्यासारखा एक माणूसच आहे.' मातीचे ठिकरे जरी हजार वर्षेपर्यंत मातीमध्ये दडलेले असले तरी ते माती कधीच होऊ शकत नाही आणि समष्टी कधीच व्यष्टी बनत नाही, पूर्णत्व (अंशी) कधीच अंश बनत नाही. ठिकरे जास्तीत जास्त प्रमाणात कुटले गेले आणि आपले मूळ स्वरूप हरवून बसले तरी पण तिचे माती बनणे हा शेवटचा परिणाम आहे. अशाच प्रकारे मनुष्यामध्ये कुठल्याच सत्कर्माचा लवलेश नसेल व महापापी चांडाळ स्वरूपात तो मरून जाईल इथपर्यंत की मानवता सुद्धा शिल्लक नसेल तरी पण तो जेथून आला असेल तिकडेच परतणे हा त्याचा स्वभाव आहे. घर उद्ध्वस्त झाल्यानंतर त्याच्या अवशेषातील एखाद्या भागास घर मुळीच म्हणता येणार नाही. सर्व विभागांच्या संयुक्त रूपाचे नाव घर आहे. अशाच प्रकारे इतर सजीव प्राणी आणि वनस्पती यांच्या समाईक गुणांनी युक्त म्हणजे मानव. मानव प्रगतीसाठी आला आहे. त्याची प्रगती रोकण्यासाठी या मातीच्या पुतळ्यापाठीमागे शैतान पाठीमागे लागलेला आहे. शैतान अग्नीपासून निर्माण झाला असल्या कारणाने तो मातीच्या गुणधर्मास इतर गुणांवर वर्चस्व प्रस्थापित करण्यात अडथळे निर्माण करतो. हा पार्थिव मानव प्रत्येक युगामध्ये संत महात्म्यांकडून यथाशक्ती आशीर्वाद प्राप्त करून घेत असतो. शैतानाच्या अग्नीमय भुरळ पाडण्याच्या पिंजऱ्यात सापडून मानव मार्गभ्रष्ट होत राहतो, जरी तो ईश्वराची सर्वोत्तम निर्मिती असला तरी. भलेही हा सृष्टीचा मुकुटमणीच का होईना!

# स्रोत ग्रंथ


१. डॉ. केशनीप्रसाद चौरसिया मध्यकालीन हिंदी संत, 'विचार और साधना', पृ. ७७–८० आणि प्रा. दे. द. वाडेकर, 'मराठी तत्त्वज्ञान – महाकोश' (त्रिखंडात्मक) खंड २, पृ. ३१–३४.
तत्रैव, खंड ३, पृ. १२५–२६.

२. डॉ. के. रं. शिरवाडकर, 'आपले विचारविश्व', पृ. ३८–३९.

३. प्रा. दे. द. वाडेकर, 'मराठी तत्त्वज्ञान – महाकोश' (त्रिखंडात्मक), खंड १, पृ. ३५०–५४.

४. प्रा. रामपूजन तिवारी, 'सूफीमत : साधना और साहित्य', पृ. १६१–६५.

५. प्रा. दे. द. वाडेकर, 'मराठी तत्त्वज्ञान – महाकोश' (त्रिखंडात्मक), खंड १, पृ. ३५४–५६.

६. तत्रैव, खंड १, ४५२–६०.

७. डॉ. रफ़ीक़ ज़करिया, 'अज्ञाताच्या ज्ञानासाठी', पृ. १९६–२००.

८. प्रा. दे. द. वाडेकर, 'मराठी तत्त्वज्ञान – महाकोश' (त्रिखंडात्मक), खंड १, पृ. ३५३–५४.

९. डॉ. रफ़ीक़ ज़करिया, 'अज्ञाताच्या ज्ञानासाठी', पृ. १७९–१९४.

१०. खान साहिब खाजा खान, 'स्टडिज इन तसव्वुफ़', पृ. ८–२०.

११. डॉ. केशनीप्रसाद चौरसिया मध्यकालीन हिंदी संत, 'विचार और साधना', पृ. ५४–६१.

१२. सरदार इकबाल अली शाह, इस्लामिक सूफीझम, पृ. ११३–१८.

१३. खान साहिब खाजा खान, 'स्टडिज इन तसव्वुफ़', पृ. ३९–७२.

१४. डॉ. मुंशीराम शर्मा, 'भक्ती का विकास', पृ. ३–३३.

१५. 'फुड फॉर थॉट सेंटर, नांदेड ने प्रसरित केलेले पँफ्लेट (माहितीपत्रक)

१६. प्रा. दुर्गादत्त पांडेय, धर्मदर्शन, 'सिद्धान्त और समीक्षा', पृ. १६८–२१९.

१७. मीर शब्बीर अली, 'काल सही', प्रथम खंड, पृ. ४–१४.

१८. तत्रैव, पृ. ३४–४२.

१९. तत्रैव, पृ. ५८–७६.

२०. सरदार इकबाल अली शाह, 'इस्लामिक सूफीझम', पृ. १६३–७१.

२१. हज़रत मिर्ज़ा गुलाम अहमद साहब क़ादियानी, ‘इस्लामी मूल्यांचे तत्त्वज्ञान’, पृ.७१-७५.
२२. शाह सय्यद मुहम्मद ज़ौक़ी, ‘सिर्रे दिलबराँ’, पृ. ३४४-५७.
२३. डॉ. मुहम्मद आज़म, ‘सूफ़ी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन’, पृ. ४८३
२४. डॉ. मुंशीराम शर्मा, ‘भक्ती का विकास’, पृ. ३७-६५
२५. ज्ञानावतार स्वामी श्रीयुक्तेश्वर, ‘कैवल्यदर्शनम्’, पृ. २५-३१
२६. प्रा. रामपूजन तिवारी, ‘सूफीमत, साधना और साहित्य’, पृ. २४८-५०
२७. ख़ान साहिब ख़ाजा ख़ान, ‘स्टडिज इन तसव्वुफ़’, पृ. २१-२९
२८. अब्दुल करीम बिन इब्राहीम जीली, ‘इन्सान-उल-कामिल’, पृ. १४८-२०८
२९. आचार्य विनोबा भावे, ‘कुराण-सार’, पृ. ९
३०. अब्दुल करीम बिन इब्राहीम जीली, ‘इन्सान-उल्-कामिल’, पृ. १४८-२०८
३१. डॉ. मुहम्मद आज़म, ‘सूफी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन’, पृ. ४५६
३२. मौलाना अब्दुल माजिद दर्याबादी, क़ुर्आन शरीफ़ : तफ़्सीर माजिदी : जिल्द पहली, पृ. ४५
३३. डॉ. मुहम्मद आज़म, सूफ़ी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन, पृ. ४५४-५६
३४. मौलाना शाह अबुलहसन ज़ैद फ़ारूक़ी, ‘वहद्तुलवजूद’, पृ. ४५-६५
३५. डॉ. मौलवी हकीम सूफी मीर मोहंमद याक़ूब खान, ‘पवित्र कुराण’, पृ. ६८८
३६. डॉ. मीर वलियुद्दीन, ‘क़ुरआन और तसव्वुफ़’, पृ. १०७
३७. सय्यद अबुल आला मौदूदी, ‘दिव्य कुरआन’ (मराठी भाषांतर), पृ. ३५-४०
३८. डॉ. मुहम्मद अब्दुर्रहीम दळवी, ‘धर्म : इस्लाम’, पृ. ११-१२
३९. डॉ. गणेशदत्त सारस्वत, ‘इस्लाम-दर्शन’, पृ. १३-२२
४०. प्रा. दुर्गादत्त पांडेय, ‘धर्म दर्शन : सिद्धान्त और समीक्षा’, पृ. २२५-२९०
४१. शंकरराव देव, ‘उपनिषदत्सार’, पृ. ५७-६४
४२. कृष्णराव सीताराम देसाई, ‘सनातन धर्मप्रवेश’, पृ. १७-२७
४३. डॉ. गणेशदत्त सारस्वत, ‘इस्लाम दर्शन’, पृ. ५३-७०
४४. सय्यद शरीफ़ खुंदमीरी, कुरआन अँड सायन्स : देअर इंप्लिकेशन्स ऑन दि मनकाइंड, पृ. ७६-७७, ९०-९५.
४५. प्रा. दुर्गादत्त पांडेय, धर्म दर्शन : सिद्धांत और समीक्षा, पृ. ४८-५५.
४६. मॉरिस बुकैल्ले, दि बायबल, दि कुरआन अँड सायन्स, प्रस्तावना अंश आणि विकीर्ण पृष्ठे.
४७. प्रा. देविदास दत्तात्रेय वाडेकर, मराठी तत्त्वज्ञान महाकोश, खंड-२, पृ. ९८-१०३.
४८. प्रा. रामपूजन तिवारी, सूफ़ीमत : साधना और साहित्य, पृ. २५२-७०.
४९. शाह सय्यद मुहम्मद ज़ौक़ी, सिर्र-ए-दिलबराँ, पृ. ३७५-८१.

५०. डॉ. गणेशदत्त सारस्वत, इस्लाम दर्शन, पृ. २३-५२.
५१. सय्यद अब्दुल करीम बिन इब्राहीम जीली - इन्सान कामिल, पृ. ४४३-४७९.
५२. प्रा. देविदास दत्तात्रेय वाडेकर - मराठी तत्त्वज्ञान - महाकोश खंड-१, पृ. ३९६-९८
५३. अ) श्रीसमर्थ रामदासस्वामी (अनुवादक - बाबू रामचंद्र वर्मा) हिंदी दासबोध
पृ. १२-१४, ४६-५४, १५२-५७, १७९-८४, २८४-८५, ३११-१४, ३३४-३५
आ) सुनील चिंचोलकर-दासबोधातील ज्ञानयोग (ज्ञानबोध विवरण भाग-४), पृ. १८-३४
५४. डॉ. सय्यद एहसानुल्लाह हसन क़ादरी - दक्खिनी हिन्दी साहित्य और ख्वाजा बंदा नवाज, पृ. ९४-९८, १०३-१०८, १२७-२९
५५. महामहोपाध्याय डॉ. गोपीनाथ कविराज - तांत्रिक वाङ्मय मे शाक्तदृष्टि, पृ. १०८-१०९, ११५-११६, ११९-१२०
५६. प्रा. दुर्गादत्त पांड्ये - धर्मदर्शन -सिद्धांत और समीक्षा, पृ. ३३६-३८
५७. निष्कलंक अवतार हजरत मौलाना सिद्दीक़ दीनदार चन्न बसवेश्वर साहब -
जॉमे-उल-बहरीन (सागरी-संगम), पृ. ४-२२, ६१



**डॉ. मुहम्मद आज़म**

अहमदनगर

हिन्दी, उर्दू आणि फ़ारसी भाषांचे सेवानिवृत्त प्राध्यापक. सूफ़ी साहित्याचे व तत्त्वज्ञानाचे मराठी भाषक गाढे व्यासंगी विद्वान, बहुभाषापंडित. अनेक विद्यापीठीय व राष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये सक्रिय सहभाग. साहित्य अकादमी, दिल्ली द्वारा वारंवार निमंत्रित. भक्ती व तत्त्वज्ञान क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावरील एक मान्यवर विद्वान.